महात्मा गांधी

# आदिपर्व

**खंड १ ला**


लेखक

**प्यारेलाल**

अनुवादक

**ब्रिजमोहन हेडा**



प्रथमावृत्ती :

**१५ ऑगस्ट २००४, (स्वातंत्रदिवस)**

ISBN No.: 81-901982-1-1

: प्रकाशक :

**पराग एजन्सीज्, अकोला**

**अर्पण** -

माझी संतप्रवृत्तीची आई

आणि

सदाचरणी भाऊ

यांच्या पवित्र स्मृतीला

- **प्यारेलाल**

## श्री. प्यारेलाल यांची ग्रंथसंपदा

- द एपिक फास्ट
- स्टेटस ऑफ इंडियन प्रिन्सेस
- अ पिलिग्रिमेज फॉर पिस
- अ नेशन बिल्डिंग अॅट वर्क
- गांधियन टेक्निक्स इन द मॉडर्न वर्ल्ड
- महात्मा गांधी - द लास्ट फेज (खंड १ आणि २)
- टुवड्र्स न्यू हराइझन
- महात्मा गांधी - द अर्ली फेज
- डिस्कव्हरी ऑफ सत्याग्रह
- बर्थ ऑफ सत्याग्रह

## ब्रिजमोहन यांनी अनुवादित केलेले साहित्य

- राजबदल : लेखक बिमल मित्र
- महात्मा गांधी - अखेरचं पर्व : लेखक प्यारेलाल (खंड १ ते चार)
- महात्मा गांधी - आदिपर्व : लेखक प्यारेलाल (खंड १ ते २)
- आगामी
- एका गुलामाची आत्मकथा : फ्रेड्रिक डग्लस

माझ्यासारखे शेकडो नाश पावले तरी चालेल,

परंतु

सत्य कायम राहिलं पाहिजे.

माझ्यासारख्या स्खलनशील मर्त्य माणसाचं मूल्यन करताना

सत्याचा दर्जा आपण रतिभरही

कमी होऊ देऊ नये.

**मो. क. गांधी**

असा हाडामासाचा माणूस

या पृथ्वीवर खरोखरच चालत बोलत होता की काय

यावर अनेक पिढ्यांनंतर लोक

क्वचितच विश्वास ठेवतील.

**अल्बर्ट आईनस्टाईन**

# पुरस्कार

क्र. १३४८- पीएमएच/६३

**प्रधानमंत्री भवन**

प्रधानमंत्र्यांचे निवासस्थान

नवी दिल्ली

मे २८, १९६३

मत्प्रिय प्यारेलाल,

*    *    *

बापूंवरील तुमच्या ग्रंथासंबंधी बोलायचं तर मी तुमच्या ग्रंथाचा पुरस्कार करायचा प्रयत्न करीन. परंतु त्यासाठी कमीतकमी त्या ग्रंथाचा बहुतांश भाग वाचायला हवा. त्याची टंकलिखित प्रत तयार झाल्यानंतर तुम्ही ती मला पाठवू शकाल.

मी सध्या बराच व्यस्त आहे आणि २ जूनला सकाळी मी दिल्लीबाहेर जाणार आहे. तुम्हाला कदाचित १ जूनला सकाळी ९.३० वाजता माझ्या परराष्ट्र मंत्रालयाच्या कार्यालयात भेटायला येणं शक्य होईल.

आपलाच

जवाहरलाल नेहरू

श्री प्यारेलाल

२-४, थिएटर कम्युनिकेशन बिल्डिंग

कॅनॉट सर्कल नवी दिल्ली.

# प्रास्ताविक

श्री प्यारेलालनी - ज्यांनी गांधीजींबरोबर आपल्या जीवनाचा बराचसा उमेदीचा काळ घालवला होता - लिहिलेला '**महात्मा गांधी - लास्ट फेज**' हा द्विखंडात्मक ग्रंथ (अखेरचं पर्व खंड १-४) आधीच प्रकाशित झालेला आहे. आता 'महात्मा गांधी - अर्ली फेज' हा ग्रंथ प्रकाशात ते आणत आहेत. या खंडात गांधीजींच्या जन्माच्या आणि बालपणाच्या काळापासून तर दक्षिण आफ्रिकेतून १८९६ साली भारताला त्यांनी जी अल्पशी भेट दिली तोपर्यंतचा कालखंड आलेला आहे. श्री जवाहरलाल नेहरू या ग्रंथाला लहानसे प्राक्क्थन लिहिणार होते परंतु त्यांच्या दुर्दैवी अकाली निधनामुळे प्रास्ताविकाच्या रूपाने मी दोन शब्द लिहीत आहे.

दक्षिण आफ्रिकेत जो वर्णभेद होता तो दूर करण्यासाठी गांधीजींनी संघर्ष केला. जरी दक्षिण आफ्रिका अजूनही वर्णभेद आणि वर्णसंकरासंबंधीच्या पूर्वग्रहांनी ग्रस्त आहे तरी आफ्रिकेच्या इतर भागांनी वसाहतीतील गुलामगिरीपासून मुक्ती मिळवलेली आहे. आफ्रिकेतील बराच मोठा भाग आज आपल्या इच्छेप्रमाणे आणि प्रतिभेप्रमाणे आपले भवितव्य ठरवायच्या परिस्थितीत आहे. अमेरिकेत नागरी अधिकाराच्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आहे. अमेरिकन निग्रोंना आपली अस्मिता परत मिळत आहे. वर्णावर्णातील या वाढत्या समतेसाठी काही प्रमाणात गांधीजींचा प्रभाव कारणीभूत आहे. पूर्वग्रहातून मुक्त झालेल्या दक्षिण आफ्रिकेतील शासकांना स्वार्थाची जाणीव होईल, संपूर्ण जगातील बदलत्या वाऱ्याचं त्यांना भान येईल आणि आपल्या नागरिकांत अधिक समता निर्माण होण्यासाठी ते कार्य करतील अशी आशा करायला बरीच जागा आहे.

गांधीजी निश्चितच धार्मिक पुरुष होते. त्यांच्यासाठी राजकारण हा कृतिपरायण धर्म होता. त्यांचा धर्म विशाल होता आणि तो पंथ वा संप्रदायात विभाजित होणारा वा दुराग्रही नव्हता. ते सांगतात की सर्वोच्चाला प्रत्यक्ष भेटायचा त्यांनी तीस वर्षे अविरत प्रयत्न केला होता. खरा धार्मिक माणूस तोच असतो ज्याला ईश्वराविषयीची ही अंतर्दृष्टी असते. एकदा ईश्वराच्या स्वरूपाविषयीची ही अंतर्दृष्टी आपल्याला लाभली की मग आपण त्याला देण्यात आलेल्या

नावांसाठी वा त्याच्याकडे जायच्या मार्गासाठी भांडत बसत नाही. अशा रीतीने ते उदार अंतःकरणाचे होते आणि आपल्या प्रार्थनेत त्यांनी जगातील विविध धर्मातील अवतरणांचा समावेश केला होता. सर्वधर्मसमानता हा त्यांच्या श्रद्धेचा आवश्यक भाग होता. त्यांच्या वैश्विक दृष्टीचा प्रत्यय ते इतरांशी जो व्यवहार करायचे त्यातूनही येतो.

आधुनिक जीवनात - जे पूर्णपणे ताणतणावानं भरलेले आहे - अशा अनेक लोकांशी आपला संबंध येतो की जे मानसिक दृष्टीने अस्वस्थ असतात, मानसिक आणि नैतिक दृष्टीने दरिद्री झालेले असतात आणि या नित्य बदलत जाणाऱ्या जगात एखादे स्थिर तत्त्व पकडायचा प्रयत्न करत असतात. या यंत्रयुगात आपले बरेचसे जीवन शुष्क, कठोर आणि पाशवी झालेले असते. हे केवळ आपल्याच देशाचे लक्षण नाही. या 'विपर्यस्त' जगात चोहोकडे बऱ्याच प्रमाणात अस्थिरता, विस्कळितपणा आणि उध्वस्तता आहे. आपण जीवनाच्या पृष्ठभागावरून वाहत आहोत आणि आपल्याजवळ कोणताच जीवनहेतू नाही. त्यामुळेच जेव्हा आपल्याला निसर्गाच्या वा इतिहासाच्या रौद्र रूपाला तोंड द्यायची वेळ येते तेव्हा आपल्याला आपल्या नपुंसकतेची जाणीव होते. परंतु आपल्याला माहीत असायला पाहिजे की माणूस हा परिस्थितीशी जुळवून घेणारा प्राणी आहे. मानवी जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त व्हायची असेल तर माणसानं जीवनहेतू विकसित करायला पाहिजे. या सर्व शतकांमध्ये धर्मामुळे मानवी जीवनाचे उद्दिष्ट ठरू शकले. आम्हाला धर्माची गरज आहे परंतु तो बुद्धीचं समाधान करणारा, नैतिकता उंचावणारा आणि आध्यात्मिकतेची भूक भागवणारा असायला हवा. गांधीजींचा धर्म असा होता. आज आपण आपल्या दैनंदिन आणि सार्वजनिक जीवनात वर्णसमानतेच्या, खऱ्या धर्माच्या तत्त्वांचा आणि व्यवहारात आपल्याला शक्य तेवढ्या अहिंसेचा समावेश करायला पाहिजे. आपल्या धर्मग्रंथांनी सांगितलं आहे की संपूर्ण हिंसेचा त्याग करणं शक्य नसलं तरी आपण तिचा व्याप शक्य तेवढा कमी करायचा प्रयत्न केला पाहिजे.

जपानवर टाकण्यात आलेल्या अण्वस्त्रासंबंधी गांधीजींना विचारण्यात आलं असता गांधीजी म्हणाले की मी यामुळे अस्वस्थ झालेलो नाही. उलट त्यांनतर त्यांना वाटत होतं की

अहिंसेचा स्वीकार करण्याऐवजी माणसाजवळ आता अन्य कोणताच उपाय उरलेला नाही. त्यांची निश्चित धारणा होती की नैतिक ध्येयप्राप्तीची साधनेही नैतिकच असायला हवी. आपल्या देशात इतरांनी अहिंसेचा स्वीकार धोरण म्हणून केला होता, उलट गांधीजींसाठी अहिंसा आणि सत्य हे श्रद्धेचे विषय होते. सत्यनिष्ठा आणि वैयक्तिक सचोटी यासाठी आपण आपल्या ध्येयवर दृढ असणे आवश्यक असते. केवळ एखादे ध्येय धारण करण्याचा हा प्रश्न नसून ध्येयानेच आपल्याला धारण करायचा हा प्रश्न आहे. त्याने आपल्या अस्तित्वात शिरायला पाहिजे, आपल्या आत्म्याचा कब्जा घ्यायला पाहिजे आणि आपल्यात परिवर्तन घडवून आणायला पाहिजे. आपला संपूर्ण जगाशी मतभेद होऊ शकतो परंतु आपला आपल्याशीच मतभेद व्हायला नको. असं म्हणतात की 'आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्'. माणसानं आपल्या आत्म्यासाठी संपूर्ण जगाचा त्याग करायची तयारी ठेवायला हवी. या दिवसात अण्वस्त्रांचा साठा करायची सर्वत्र चर्चा सुरू असताना आपण संपूर्ण निःशस्त्रीकरणासाठी आणि शांततेसाठी कार्य करणे गांधीजींना आवडले असते. शांततेचा आधार प्रेम आणि बंधुत्वाची भावना असायला पाहिजे, भय नाही. आज मात्र जगाला युद्धापासून सुरक्षित ठेवण्यासाठी भीतीचाच व्यापक उपयोग करण्यात येत आहे. ज्या अण्वस्त्राच्या वापरामुळे पृथ्वीवरील मानवजातीचा समूळ नाश होऊ शकतो त्या अण्वस्त्रांच्या निर्मितीनंतरही आपण शांतपणे मननचिंतन करू शकतो ही मानवजातीची अवनती आहे. त्यामुळे गांधीजींना वाटत होते की शांततेच्या आड येणाऱ्या राष्ट्रीयता, वर्णवाद, हिंसेवरील श्रद्धा इत्यादी गोष्टींचा सर्व राष्ट्रांनी त्याग करायला पाहिजे.

आधुनिक इतिहासाच्या उत्तेजित वातावरणात आपल्याला वर्णसमानतेच्या तत्त्वाधारे मार्ग काढावा लागतो. सांप्रदायिक भावना पूर्वीएवढ्याच तीव्र आहेत आणि आपल्या विश्वासू सहकाऱ्यांनीही आपल्या इच्छेविरुद्ध फाळणीला मूक संमती दिली आहे असे जीवनाच्या अखेरच्या काळात गांधीजींच्या लक्षात आले.

बंदुकीची गोळी शिरण्याआधीच हा भ्रमनिरास गांधीजींच्या हृदयात शिरलेला होता. या काळात त्यांनी जी पत्रे लिहिली त्यातून त्यांची ही व्यथा दिसून येते.

असे असूनही ज्या आदर्शांसाठी ते झटले आणि ज्यांच्यासाठी ते जगले आणि मेले ते आदर्श आजही आपल्याला प्रेरणा देत आहेत. आपल्या जीवनातील अनिर्णयाच्या आणि संशयाच्या क्षणी जर त्यांची आपण आठवण केली तर ते आपल्याला योग्य मार्गावर नेऊ शकतात.

ज्यांनी श्री गांधीजींवरील प्यारेलाल यांचे ग्रंथ वाचलेले आहेत ते गांधीजींच्या प्रतिभेच्या द्रष्टेपणाने, त्याच्या व्यावहारिक समयसूचकतेने आणि त्यांच्या मानवताप्रेमाने चकित झाल्याशिवाय राहणार नाहीत. गांधीजींनी आयुष्यभर ज्या कार्याला वाहून घेतले होते त्या कार्यामुळे, त्यांच्या भक्तीने आणि त्यागाने गोखले यांनी १९१२ साली काढलेले संस्मरणीय उद्गार आजही किती अर्थपूर्ण वाटतात!

'याहून शुद्ध, शूर आणि उदात्त पुरुष या पृथ्वीवर यापूर्वी कधीही झाला नाही... हा असा माणूस आहे की ज्याचे वर्णन पुरुषातील पुरुष, शूरातील शूर आणि देशभक्तातील देशभक्त असे करता येईल. आपण निश्चितपणे असे म्हणू शकतो की आजच्या काळात भारतीय मानवता त्यांच्यातून खरोखरच सर्वोच्च बिंदूला पोहोचली आहे.

सर्वपल्ली राधाकृष्णन

राष्ट्रपती भवन,

नवी दिल्ली.

जानेवारी २३, १९६५

## प्रस्तावना

नियोजित मालिकेतील 'महात्मा गांधी - अर्ली फेज' (महात्मा गांधी - आदिपर्व) हा पहिला खंड आहे. आपल्या कुटुंबाला आणण्याकरिता दक्षिण आफ्रिकेतून गांधीजींनी भारताला जून १८९६ साली जी भेट दिली तोपर्यंतची गांधीजींच्या जीवनाची कहाणी यात आलेली आहे. त्यावेळी ते उणेपुरे अठ्ठावीस वर्षांचे होते. यानंतरच्या खंडात गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत केलेल्या सत्याग्रहाची हकीगत येईल आणि ईश्वराची इच्छा असल्यास अजून दोन खंडातून महात्मा गांधी - अखेरचं पर्वपर्यंतच्या काळाची हकीगत येईल.

अनेक खंडात्मक गांधी चरित्राचं काम हाती घेण्याआधी 'महात्मा गांधी – लास्ट फेज' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते दोन खंड (४खंड) सखोल, स्वयंपूर्ण आणि स्वतंत्रपणे अभ्यासाला उपयुक्त ठरावेत या दृष्टीने मला कोणत्या परिस्थितीत तयार करावे लागले ते मी सांगितलेलंच आहे. त्यानंतर माझे काम पुढे सुरू ठेवता यावे म्हणून नवीन व्यवस्था होईपर्यंत थांबावे लागले. आपले दिवंगत प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी याबाबतीत गांधी राष्ट्रीय स्मारक संघात घेतलेल्या पुढाकारामुळे हा खंड तयार करण्यात आला, या संस्थेच्या मंगल सहकार्यानेच या ग्रंथाचे शेवटपर्यंत लेखन शक्य झाले.

'लास्ट फेज'च्या दोन खंडांतील काळ हा गांधीजींच्या आयुष्यातील अत्यंत नाट्यपूर्ण घटनांचा काळ होता. प्रेक्षकांना पाचवा अंक दाखवल्यानंतर पहिला अंक दाखवताना निर्मात्याची जशी अवस्था व्हावी त्याप्रमाणे लास्ट फेज लिहिल्यानंतर हा खंड लिहिताना माझी अवस्था होत आहे.

नाव घेण्यासारखं कोणतीही कौटुंबिक कागदपत्रे नसल्यामुळे आणि मूळ कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे मुळातील अडचणीत अजूनच भर पडली. एवढेच नाही तर गांधीजींच्या पूर्वजांविषयी संस्थानातील कागदपत्रेही राजकीय अस्थिरतेमुळे आणि तत्कालीन शासकांच्या फारशी फिकीर न करण्याच्या स्वभावामुळे अपुरी आहेत. त्या कागदपत्रातील जी काही

कागदपत्रे उपलब्ध आहेत तीही अत्यंत अव्यवस्थित आहेत व त्यामुळे ती सहजी सापडू शकत नाहीत. डॉ. जिवराज मेहता आणि श्री बलवंतराय मेहता, गुजरातचे माजी आणि आजी मुख्यमंत्री, यांच्या मदतीनेच थोडीशी कागदपत्रे मला सापडू शकली. त्यांचा उपयोग या ग्रंथात करण्यात आला आहे.

१९५० साली काठेवाडचा मी विस्तृत प्रमाणावर प्रवास केला. जे गांधीजींचे शाळेतील सहाध्यायी होते वा गांधीजींच्या बालपणच्या जीवनात ज्यांचा जवळून संबंध आला होता अशा जवळपास वीसेक लोकांना त्यावेळी मी भेटू शकलो. त्यांच्या पूजनीय बहिणीसह त्यांच्या अनेक नातेवाइकांशीही मी बोललो. त्यापैकी आता कोणीच जिवंत नाही.

गांधीजी मला सांगत असत की माझ्या भावी चरित्रकाराला संशोधनासाठी कमीतकमी दक्षिण आफ्रिकेत आणि इंग्लंडमधे जावे लागेल. दुर्दैवाने यापैकी मी काहीच करू शकलो नाही.

त्यामुळे अठ्ठावीस वर्षांच्या त्यांच्या निकटच्या सहवासात गांधीजींनी उच्चारलेले जे शब्द माझ्या कानावर पडले होते त्यांच्यावरच विसंबून राहणे मला भाग पडले. त्याचबरोबर संकलित गांधी साहित्यासाठी इंग्लंडमधे शोध करणारे माझे मित्र इयान ली मेस्त्री यांनीही माझ्या सुदैवाने केवळ या कामाच्या प्रेमापोटी इंग्लंडमधील ब्रिटिश म्युझियममधे आणि अन्यत्र मला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्राचा शोध घ्यायचे मान्य केले. १९४५ साली गांधीजी बंगालमधे दौऱ्यावर असताना माझी त्यांच्याशी भेट झाली होती. युवक गांधींजींच्या कौमार्यावस्थेतील आणि विद्यार्थीदशेतील माहिती मिळवण्यासाठी मदत करायचं आपण होऊन मला आश्वासन दिलं.

माझ्या कामाच्या संशोधनाच्या संदर्भात मदत व्हावी म्हणून दक्षिण आफ्रिकेत जाण्यासाठी अगदी १९४९मध्येच मी जनरल स्मट्सशी पत्रव्यवहार सुरू केला होता. इंग्लंडमधे सुदैवाने १९३१साली माझी त्यांच्याशी भेट झाली होती. दुर्दैवाने माझे पत्र जेव्हा त्यांना पोहोचले तेव्हा ते बिछान्याला खिळून होते. त्यानंतर थोड्याच दिवसात त्यांचा मृत्यू झाला. अशा रीतीनं माझ्या योजनेचा तो भागही फसला.

त्यानंतर अजूनही आफ्रिकेत असलेल्या गांधीजींच्या काही सहकाऱ्यांशी मी मदतीसाठी संपर्क साधला. त्यांनी मोठेपणानं ती विनंती मान्य केली. परंतु मूळ ठिकाणावर जाऊन स्वतःशोध घेण्याऐवजी पत्करण्यात आलेला हा मार्ग फारच कमी श्रेयस्कर होता. माझी अजूनही इच्छा आहे की यानंतरच्या खंडाच्या कामासाठी, ज्यात गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील जीवनाचा आणि कार्याचा महत्त्वपूर्ण भाग यायचा आहे, दक्षिण आफ्रिकेत जावे. आधीपेक्षाही या गोष्टीची आता मला अधिक गरज जाणवते. गांधीजींच्या काळातील दक्षिण आफ्रिकेतील लोकांची संख्या वेगात कमी होत आहे. त्यापैकी ज्यांच्याशी मी पत्रव्यवहार सुरू केला आणि ज्यांनी मला माहिती देऊन मला मदत केली त्यातील श्रीयुत रिच, गॉडफ्रे, मणिलाल गांधी आणि सोराब रुस्तमजी आता हयात नाहीत. दुर्दम्य इच्छाशक्तीचे व्हिन्सेट लॉरेन्स बिछान्याला खिळून आहेत.

आपल्यापैकी बहुतेकांसाठी दक्षिण आफ्रिकेतील या काळाचा इतिहास अज्ञात प्रदेशासारखा आहे. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत गेले तेव्हा दक्षिण आफ्रिकी व्यक्तिमत्व अजून पुरेसे विकसित झालेले नव्हते, राजकीय सीमा वेगानं बदलत होत्या आणि राजकीय दृश्ये इतक्या वेगात बदलत होती की कल्पनाही करता येऊ नये. परिणामी त्यांच्या जीवनावर आणि कार्यावर महत्त्वाचा परिणाम करणाऱ्या सामाजिक, धार्मिक आणि ऐतिहासिक घडामोडींना दक्षिण आफ्रिकेवरील आदर्श समजल्या जाणाऱ्या पुस्तकातही क्वचितच स्पर्ष करण्यात येतो. वास्तवात त्याच घडामोडींमुळे घेतलेल्या निर्णयांनी गांधीजींच्या पुढील कार्यक्रमाची दिशा ठरत होती. सुदैवाने गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतून परतताना पत्रव्यवहार आणि इतर कागदपत्रे मिळून पेटीभर साहित्य सोबत आणले होते. गांधी राष्ट्रीय स्मारक संघाने त्यातील बहुतेक साहित्याच्या फोटोप्रती तयार केल्या आहेत. त्याचबरोबर १८८९ ते १९०० या काळातील तत्कालीन वृत्तपत्रांची कात्रणेही त्यांनी १३ कात्रणपुस्तकातून फार चांगली जपून ठेवली होती. मझ्याशी त्यांच्याबद्दल ते बोलले होते. परंतु साबरमती संग्रहालयाच्या बाहेर ते न्यायची अनुमती नसल्यामुळे काम सुरू करण्यापूर्वी मला त्यांच्या फोटोप्रती नॅशनल आर्काईव्हजकडून तयार करून घ्याव्या लागल्या.(आणि माझ्या ताब्यात असलेल्या या साहित्याचे लॅमिनेशनही करावे

लागले.) अनेकदा ते फार वाईट अवस्थेत असायचे. काही वेळा ते एकमेकात गुंतलेले असत तर काही वेळा त्यांचे तुकडे झालेले असायचे वा काळ्या कसरीमुळे त्यावरील लेखन स्पष्ट दिसत नसे. काही ठिकाणी ती कुठून घेतलेली आहेत ते कळत नसे, त्यावरील तारीख कापल्या गेलेली असायची वा खोडलेली असायची वा अन्य काही कारणांनी त्यात नसायची. बुरशी आल्यामुळे वा फाटलेला भागावर चिकटपट्टी वा बटरपेपर लावल्यामुळे फोटोप्रतीतील काही भाग अगदीच वाचता येत नसे. परंतु मूळ कगादपत्रातील लेखन तरीही प्रयत्नपूर्वक वाचता यायची काहीशी शक्यता असायची. परंतु मूळ लेखन मालकांना परत करण्यात आल्यामुळे त्यातही अडचण यायची. या सर्व अडचणींमुळे आठवड्यांमागून आठवड्यांचा मूल्यवान वेळ वाया जायचा. मोठी अक्षरं दिसणारी काच व अन्य प्रकारची साधनं वापरूनही अशा वेळी माझ्या आणि माझ्या सहकाऱ्यांच्या डोळ्यांना होणाऱ्या त्रासालाही सीमा नसायची.

त्याचबरोबर मला बऱ्याच जुन्या नोंदी, मूळ साधनसामग्री आणि संदर्भ ग्रंथसुद्धा अनेक संस्थातून गोळा करावे लागत असत. मग सुरक्षित उपयोगासाठी त्यांना लॅमिनेशन करण्यात येईल असे आमिष त्यांच्या राखणदारांना दाखवून ते साहित्य मिळवावे लागायचे. यामुळेही अनेकदा काम लांबले.

भारतात संदर्भाच्या सोयीच्या अभावामुळेही या अडचणीत भर घातली. महत्त्वाच्या कात्रणाच्या तारखेचा वा मूळाचा शोध घेण्यासाठी - जिथे ते उपलब्ध नसायचे वा वाचता येणे शक्य नसे - वा या नाट्यातील सर्व लोकांची माहिती मिळवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील लोकांची मदत घ्यावी लागायची व त्यात मिळणाऱ्या यशाचे प्रमाण नेहमीच सारखे नसायचे.

भारत, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेतील घटनांचा परस्परांवरील क्रिया-प्रतिक्रियांचा जो परिणाम व्हायचा त्यामुळे माझ्या संशोधन कार्यात मला वैशिट्याने अडथळा आला. या घटनाचा परस्परांशी किती निकटचा संबंध होता हे समजण्यासाठी त्यांना मुळातून संपूर्णपणे समजावून घेणे आवश्यक होते.

ज्या वाचकाला या भागातील कथा बुद्धिवादी दृष्टीनं जाणून घ्यायची इच्छा असेल त्यानं भारत आणि दक्षिण आफ्रिकेचा त्या काळातील ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि घटनाक्रम समजावून घेणे अत्यावश्यक आहे. गांधीजींना ज्या समस्या हाताळाव्या लागल्या त्यांची कारणे काय, गांधीजींच्या कृतीमागील अंत:प्रेरणा कोणत्या, त्यांना ज्या अडचणींना तोंड द्यायचे होते त्या किती भयानक होत्या, त्यांनी जे केले आणि जे केले नाही ते का या दृष्टीने गांधीजींच्या जीवनाचा गांभिर्याने अभ्यास ज्यांना करायचा आहे त्यांना 'भविष्याची चाहूल' या पहिल्या प्रकरणानंतरची पाच प्रकरणे आणि 'दुःखद वादळ' हे पंधरावे प्रकरण ही प्रकरणे आवश्यक वाटतील.

जसजसे आपण या ग्रंथातील कथानकात पुढे जाऊ तसतशी आपल्याला प्रकरणांची प्रसंगोचितता अजूनच जाणवेल. या प्रकरणातील माहिती शांतपणे बारकाईने समजावून घेण्यासाठी चोखंदळ वाचक संयमपूर्वक जो वेळ देईल त्याचा लाभ, वैशिष्ट्यानं पुढील खंडात मनाला हादरवून टाकणाऱ्या नाट्यातील युगप्रवर्तक संघर्ष वाचताना, त्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही. वाचकाच्या सोयीसाठी ठिकठिकाणी मागीलपुढील संदर्भ दिलेले आहेत.

मला खेद वाटतो की या खंडात देण्यासाठी तयार केलेली गांधीजींच्या जीवनातील आणि त्याचवेळी भारतात आणि दक्षिण आफ्रिकेत घडलेल्या घटनाक्रमाची सविस्तर सूची आर्थिक कारणासाठी मला वगळावी लागली. तसेच या खंडातील घटनाक्रमांशी संबंधित दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडमधील अनेक अधिकाऱ्यांची त्यांच्या माहितीसह सूची (हूजहू) आणि त्यांनी धारण केलेल्या पदाच्या तारखांचा तक्ता या गोष्टीही मी तयार केल्या होत्या. परंतु त्यांनाही मला त्याच कारणासाठी वगळावे लागले.

गांधीजींनी आपल्या लेखनात त्यांच्या जीवनातील काही घटनांच्या ज्या तारखा दिल्या आहेत त्यात मी काही ठिकाणी बदल केला आहे. अशा प्रत्येक ठिकाणी मी पुराव्यासह माझी संपूर्ण कारणमिमांसा एक तर मूळ पाठात वा 'संदर्भ आणि टिपांमधे' दिलेली आहे. तसंच 'द स्टोरी ऑफ माय एक्सपेरिमेंट्स विथ ट्रुथ'मध्ये दिलेले काही उतारे जेव्हा मला अस्पष्ट वा अपुरे

वाटले तेव्हा गांधीजींनी मुळात गुजरातीत लिहिलेल्या आत्मरित्राचा वा गांधीजींनी प्रत्यक्ष उच्चारलेल्या शब्दांचा आधार मी घेतला आहे.

पूर्व आणि पश्चिमेच्या विचारांच्या ज्या संगमातून गांधीजींनी आपली आध्यात्मिक भूक भागवली होती आणि ज्यामुळे त्यांनी भव्य उंची गाठली होती, तसेच त्यांना प्रचंड किर्ती आणि प्रसिद्धी मिळाली होती त्या गांधीजींच्या विद्यार्थी जीवनाचा कथाभाग या खंडात उलगडण्यात आला आहे. भीतीमुळे मागेमागे राहणारा, लाजाळू, अपरिपक्व, अननुभवी, स्वतःबद्दल आत्मविश्वास नसलेला आणि जिवनाच्या कठिण समस्यांनी गोंधळलेला तरुण स्वतःला एकाएकी एका नव्या जगात अनोळखी माणूस म्हणून पाहतो. तिथे तो देवाच्या एका लहरीने फेकला गेला होता. प्रक्षुब्ध एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस साम्राज्यविस्ताराच्या काळात तिथे लगेच त्याला वर्ण आणि राजकीय पूर्वग्रहांचा भयानक अनुभव आला. सत्याशिवाय इतर कोणतेही शस्त्र जवळ नसणारा तो तरुण भविष्यात काय होईल याची तमा न बाळगता ते आव्हान स्वीकारतो आणि दोन वर्षाच्या आतच त्याची दखल घेणे सर्वांना भाग पडते. अक्षरशः एकट्याने तो नाताळमधील राजकीय घटनाक्रमाला नवीन दिशा देतो आणि भीतीच्या सीमारेषेवर बसून आ वासून पाहत असणाऱ्या लोकांना नवीन प्रेरणा देतो. परंतु तरीही त्याच्याकडे पाहणाऱ्या लोकांना त्याच्याबद्दल प्रेम आणि कौतुक वाटल्याशिवाय राहू शकत नाही. ही गोष्ट काळ्या आणि गोऱ्या, शत्रू आणि मित्रांना सारखीच लागू होत होती. असे का घडत होते या प्रश्नाचे उत्तर मिळवण्यासाठी हा अभ्यास करण्यात आला आहे.

प्यारेलाल

अहमदाबाद, ३० जानेवारी १९६५.

# ऋणनिर्देश

ह्या उपक्रमास सुरुवात करणारे दिवंगत प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांचा आणि या उपक्रमासाठी आवश्यक सोयीसवलती पुरवल्याबद्दल गांधी राष्ट्रीय समारक ट्रस्टचा, या बहूखंडात्मक गांधी चरित्राची प्रकाशनाची जबाबदारी अंगावर घेतल्याबद्दल आणि त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या नवजीवन प्रकाशन गृहाचा, जेव्हा केव्हा आवश्यकता पडली तेव्हा विचारणा केल्याबरोबर माहिती पुरविल्याबद्दल सॉरबॉन विद्यापीठातील प्रा. एल. मॅसिग्नॉन, इयान ली मेस्त्री आणि व्हिन्सेन्ट लॉरेन्स यांचा आणि केवळ कामावरील प्रेमामुळे ज्या अनेक मित्रांनी टंकलिखित प्रत दुरुस्त करायला मदत केली त्यांचा मी आभारी आहे. त्यात संत निहाल सिंह, श्री ए. ई. चार्टन, प्रा. के स्वामीनाथन आणि प्रा. एरिक एरिकसन आणि जॉन एरिकसन यांचा समावेश आहे. या उपक्रमाकडे सामूहिक जबाबदारी म्हणून पाहिल्याबद्दल आणि त्यासाठी घेतलेल्या श्रमाबद्दल माझे मदतनीस श्री सुनीलकुमार गुप्ता आणि दिवाण वासुदेव यांचा तसेच इतर कर्मचारी वर्गांचाही मी आभारी आहे.

गांधी स्मारक संग्रहालय, नवी दिल्ली, आणि साबरमती संग्रहालय यांनी गांधीजींशी संबंधित फोटोप्रत साहित्य वापरायला परवानगी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणेही आवश्यक आहे. 'संकलित वाङ्मय - महात्मा गांधी' आणि प्रकाशन विभाग, भारत सरकार यांनी विविध प्रकारची मदत केल्याबद्दल, श्रीमती रुक्मिणी अरुंदेल आणि स्वर्गीय पोलक यांनी माझ्या कामाशी संबंधित काही अप्राप्य पुस्तके दिल्याबद्दल त्यांचा, जोहान्सबर्ग येथील इन्स्टिट्यूट ऑफ रेस रिलेशन्सची माहिती पुरविल्याबद्दल त्यांचा, दक्षिण आफ्रिकेबद्द्ल इतरत्र उपलब्ध नसलेली माहिती आणि साहित्य मिळवून दिल्याबद्दल इन्स्टिट्यूट ऑफ रेस रिलेशन्स, जोहान्सबर्गचा, गांधीजींशी संबंधित वृत्तांतांच्या फोटोप्रती पाठवल्याबद्दल जोहान्सबर्ग येथील स्टारचा, काही फोटो पाठवल्याबद्दल श्रीमती सुशीला मणीलाल गांधी यांचा आणि गांधीजी इंग्लंडमधे शिकत असताना त्यांनी द व्हेजिटेरिअनमधे लिहिलेल्या सर्व लेखांच्या फोटोप्रती पाठवल्याबद्दल श्री. रॉय वॉकर यांचा मी आभारी आहे.

माझ्या ग्रंथात स्वामित्वाचा हक्क असलेले उतारे घ्यायला परवानगी दिल्याबद्दल पुढील प्रकाशन संस्थांचा मी आभारी आहे : श्री. अरनेस्ट बेन लि. लंडन; २१ सेसिल कोर्ट येथील श्री. जॉन एम. विल्किन्स, लंडन; जोनाथन केप लिमिटेड, लंडन; ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस, मुंबई; प्रेन्टिस हॉल इंन्क, विन्डसर; लॉंगसन्स ग्रीन अँड कंपनी लि. लंडन; फेबर अँड फेबर लि. लंडन; जॉर्ज अॅलन अँड अलविन लि. लंडन; कॅसल अँड कंपनी लि. लंडन; मॅथ्यू अँड कंपनी लि. लंडन.

त्याचबरोबर मी फ्रेड्रिक मुल्लर लि. लंडन; कॉन्स्टेबल अँड कंपनी लि. लंडन; पाल माल प्रेस, लंडन; .... अँड विन्डस, लंडन; सायमन अँड शुश्टर, न्यू यॉर्क; रेनॉल्ड अँड हिचकॉक, न्यू यॉर्क; जोनाथन केप, लंडन; जॉन लेमन, लंडन; व्हिक्टर गोलानेझ लि. लंडन यांनी प्रकाशित केलेल्या पुढील ग्रंथातून घेतलेल्या उताऱ्यांसाठी मी त्यांचा आभारी आहे. लेखकांची व ग्रंथांची क्रमशः नावे अशी : एफ अँडिक्टन सायमंड्स : द जोहान्सबर्ग स्टोरी, हेन्री गिब्ज : बॅकग्राऊंड टू बिटरनेस, सारा गर्ट्रूड मिलान : द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका आणि द साऊथ आफ्रिकन्स, अर्ल ऑफ रोनाल्डशे : द हार्ट ऑफ आर्यव्रत, अॅलन पॅटन : होप फॉर साऊथ आफ्रिका, सारा गर्ट्रूड मिलान : ऱ्होड्स, विल ड्युरांट : द केस फॉर इंडिया, रेगिनाल्ड रेनॉल्ड्स : द व्हाईट साहिब्स इन इंडिया, तिखॉं पोल्नर : टॉलस्टॉय अँड हीज वाईफ, अर्नेस्ट जे. सिमन्स : लिओ टॉलस्टॉय, आणि अलेक्झँड्रा टॉलस्टॉय : टॉलस्टॉय.

अखेरची परंतु महत्त्वाची गोष्ट म्हणजे अगदी सुरुवातीपासून तर या उपक्रमाच्या प्रत्येक अवस्थेत या उपक्रमाशी एकरूप झालेले डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचा मी ऋणाईत आहे. त्यांनी केवळ आवश्यक प्रेरणा आणि धीरच दिला नाही तर स्वतः आजारी असतानाही माझ्याकडून त्यांनी या ग्रंथाच्या पहिल्या दोन भागांचे वाचनही आपल्यासमोर करून घेतले. वाचन सुरू असताना आपल्या आजारी पत्नीच्या शुश्रुषेसाठीच ते उठले होते. तो त्यांच्या पत्नीचा शेवटचा आजार होता. 'महात्मा गांधी - लास्ट फेज'ला त्यांनी लिहिलेल्या अविस्मरणीय प्रस्तावनेनंतर ते या ग्रंथालाही प्रस्तावना लिहिणार होते. त्यांच्या आशिर्वादामुळेच हा खंड रसिकांसमोर सादर करता आला.

प्यारेलाल

माझे वडील भगिरथजी हेडा

आणि

माझे सासरे

सीतारामजी एदलाबादकर

यांच्या

पवित्र स्मृतीस हा अनुवाद समर्पित

**ब्रिजमोहन हेडा**

# अनुवादकाचे मनोगत आणि ऋणनिर्देश

महात्मा गांधी : अखेरचं पर्व या ग्रंथाच्या चार खंडांच्या अनुवादानंतर मुळात एका खंडात असलेल्या आदिपर्वचे हे दोन खंड वाचकांच्या हाती देताना आनंद होतो आहे. प्यारेलाल यांनी मुळात लास्ट फेज हा ग्रंथ एकाच खंडात प्रकाशित केला होता. परंतु ८०० पानांचा हा ग्रंथ हाताळायला सोपा जावा म्हणून मुद्दाम तो दोन खंडात प्रकाशित केला आहे. वास्तवात हा खंड एकच आहे. वाचकांची यामुळे काही गैरसोय झाल्यास त्यांनी क्षमा करावी आणि हा बदल गोड करून घ्यावा, ही विनंती.

या खंडांच्या प्रकाशनासाठी परवानगी दिल्याबद्दल प्यारेलाल ट्रस्टचा आणि ट्रस्टकडून परवानगी मिळवून दिल्याबद्दल श्री. धीरुभाई मेहता यांचा मी अतिशय ऋणी आहे.

या खंडांच्या अनुवादाच्या कामातही प्राध्यापक मनोहर सरपटवार, प्राध्यापक डॉक्टर सुशीला पाटील आणि प्राध्यापक चित्तरंजन यांची मोलाची मदत झाली आहे. प्राध्यापक सरपटवार यांच्याशी चर्चा करण्यासाठी पहाटे पाच वाजताच मी जात असे व दोनतीन तास रोज आमची चर्चा चालत असे. हा क्रम जवळपास दोन महिने चालू होता. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनाही त्रास झाला असावा. पण त्याबद्दल कुरकुर न करता आनंदाने त्यांनी तो सहन केला. परंतु या मित्रांच्या ऋणातून आभार मानून मुक्त होणं शक्य तरी आहे? पण तरीही न राहवल्याने या मित्रांच्या ऋणाचा केवळ इथे उल्लेख करत आहे.

पराग एजन्सीज अकोलाच्या वतीने सौ. शुभा कुळकर्णी आणि श्री. आनंदराव कुळकर्णी यांनी महात्मा गांधी - अखेरचं पर्वच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली होती तशीच याही वेळी महात्मा गांधी - आदिपर्वच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारून मला कायम ऋणी करून ठेवले आहे.

या खंडाच्या अनुवादाचे बहुतांश काम मी माझा मुलगा डॉ. शंशाक याच्याकडे डल्लास (अमेरिका) येथे असताना केले. या कामासाठी माझी सून ज्योती, हिने मला आपला लॅपटॉप

पूर्णवेळ उपलब्ध करून दिला होता. माझा मुलगा भूषण, याने आदिपर्व प्रमाणेच या पर्वाची मुद्रिते काढून देण्यासाठी अतिशय त्रास घेतला. या सर्वांच्या व्यस्त कार्यक्रमातूनही यांनी वेळ काढल्यामुळे या कामाचा ताण अगदीच जाणवला नाही.

**ब्रिजमोहन हेडा**

# अनुक्रमणिका


पुरस्कार

डॉ. राधाकृष्णन यांची प्रस्तावना

प्यारेलाल यांची प्रस्तावना

ऋणनिर्देश : प्यारेलाल

अनुवादकाचे मनोगत आणि ऋणनिर्देश

प्रकाशकाचे मनोगत

**भाग १**

**महान जागृती**

प्रकरण १ भविष्याची चाहूल

प्रकरणे २ अन्यायाचं शतक

प्रकरण ३ नवप्रभातचे अग्रदूत

प्रकरण ४ पथशोधक

प्रकरण ५ राखेतून बाहेर

प्रकरण ६ नव्या आणि जुन्या जगाच्या मधे

**भाग २**

**महात्म्याचं आगमन**

प्रकरण ७ अद्भुतरम्य भूतकाळाची झुळूक

प्रकरण ८ कहाणी दोन शहरांची

प्रकरण ९ बालपण आणि मुग्धावस्था

प्रकरण १० पौरुषाची प्रभात

प्रकरण ११ ध्येयाच्या शोधात

प्रकरण १२ वादळ : आतलं आणि बाहेरचं

## भाग ३
## भवितव्याशी भेट

प्रकरण १३ नकोसा वाटणारा पाहुणा

प्रकरण १४ चाचपडणे

प्रकरण १५ दुःखद वादळ

प्रकरण १६ गावकुसाबाहेरील पोरं

प्रकरण १७ नशिबाच्या हिंदोळ्यावर

# महात्मा गांधी आदिपर्व -

## खंड १ ला

# भाग १ ला

## महान जागृती

# प्रकरण १ ले

# भविष्याची चाहूल

## १

इ.स. १९१९ची उन्हाळ्याकडे चांगलीच वाटचाल सुरू झालेली होती. मी लवकरच लाहोर येथील महाविद्यालयातून वाङ्मय पारंगतच्या परीक्षेस बसणार होतो. एका सायंकाळी कॉलेज संपल्यानंतर काही मुलं आमच्या वसतिगृहात विश्रांती घेत पडलेली असतानाच दूरवरून फार मोठ्या जमावाच्या किंकाळ्या ऐकू आल्या व त्या मागोमागच वारंवार गोळीबार सुरू झाल्याच्या बातम्या कानावर आल्या. त्या ऐकताच अनवाणी, उघडेबोडकेच आम्ही बाहेर पडलो. क्षणातच फार मोठ्या जमावात आम्ही वेढले गेलो असल्याचं आम्हांला आढळून आलं - त्या जमावातील अनेकांच्या कपड्यातून रक्त ठिपकत होतं. लोक पळत होते आणि घोड्यावर बसलेले पोलीस त्यांचा पाठलाग करत होते. तसं करताना कुणाचे हातपाय तुटतात की कुणाचा जीव जातो याची त्यांना मुळीच पर्वा नव्हती. महात्मा गांधींना अटक केल्याची बातमी लोकांना कळलेली होती आणि त्यासंबंधीचा आपला विरोध नोंदवण्यासाठी पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर मायकेल ओडायर यांच्या निवासस्थानाकडे शिस्तबद्ध मिरवणुकीने ते जात होते. पोलिसांनी त्यांना थांबायचा आणि निघून जायचा आदेश दिला, परंतु तो त्यांनी जुमानला नाही. जमावाच्या या नवीन वर्तनात अधिकाऱ्यांना बंडखोरीचं दर्शन झालं. त्यानंतर जे काही घडलं ते ही लाट अडवण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न होता. त्यासाठी त्यांना माहीत असलेला तोच एकमेव मार्ग होता. त्यानंतर दहशतीचं वातावरण ही दैनंदिन बाब झालेली होती.

काही दिवसांनंतर अमृतसरमधील नरसंहाराची बातमी आली. चोहोबाजूंनी बंदिस्त असलेल्या एका मैदानातील २०,००० लोकांच्या शांततापूर्ण जमावावर, ज्याला होऊ घातलेल्या घटनेसंबंधी यत्किंचितही जाणीव नव्हती, ब्रिगेडिअर जनरल डायर यांनी गोळीबार करायचा आदेश दिला. हे मैदान जालियनवाला बाग म्हणून प्रसिद्ध होतं. कोंडी झालेल्या या जमावात

बाया, माणसं आणि मुलं या सर्वांचा समावेश होता. शासकीय अंदाजाप्रमाणे गोळीबारामुळे या जमावातील अंदाजे ३७९ माणसं मरण पावली व त्याहून तिप्पट जखमी झाली.

यानंतर लगेच पंजाबच्या अनेक भागात सैनिकी प्रशासनाचा कायदा लागू करण्यात आला. त्या कायद्यांतर्गत लोकांना अपमानित करण्यात येऊन त्यांचा अतिशय छळ करण्यात आला. सन्माननीय नागरिकांच्या अंगावरील कपडे काढून त्यांना सार्वजनिक ठिकाणी फटके मारण्यासाठी उभारलेल्या खांबाशी बांधण्यात आलं आणि सैनिकी कायद्याच्या केवळ तांत्रिक भंगासाठी त्यांना फटके मारण्यात आले. एवढंच नाही तर मुलांचीही फटक्यातून सुटका झाली नाही. ज्या ठिकाणी एका इंग्रज बाईवर अत्याचार करण्यात आला होता त्या ठिकाणी आखण्यात आलेल्या रेषेवरून कुणालाही जायचं असलं तरी पोटावर घुसत जावं लागत असे. प्रत्येक भारतीयाला, मग तो कितीही का प्रतिष्ठित असेना, रस्त्यात भेटलेल्या प्रत्येक ब्रिटिश अधिकाऱ्यास सलाम करणं आवश्यक होतं. विद्यार्थ्यांच्या बंडखोर मनात ब्रिटिश ध्वजासंबंधी 'निरोगी आदर भाव' निर्माण करण्यासाठी लाहीलाही करणाऱ्या उन्हात १६ मैल पायी चालत जाऊन युनियन जॅकला नमस्कार करावा लागायचा.

गुन्हा असो वा नसो परंतु काही विशिष्ट प्रमाणात विद्यार्थ्यांना शिक्षा ही करायलाच पाहिजे असा सैनिकी प्रशासनाच्या आदेश होता. त्यासमोर नतमस्तक होऊन काही निरपराध विद्यार्थ्यांना शिक्षा करताना शिक्षण संस्थांच्या अशा संस्थाप्रमुखांना विद्यार्थ्यांनी पाहिलं की ज्यांच्याकडे विद्यार्थी समाजाचे धार्मिक नेते म्हणून पाहत होते. भारतीय तरुणांच्या मनावर या सर्व गोष्टींच्या खोल जखमा झाल्या. नैराश्याच्या काळोखानं त्यांच्या आत्म्याला गुदमरून टाकलं. जी आध्यात्मिकता भौतिक शक्तीसमोर उभी राहू शकत नाही आणि अन्याय व असत्याची मूक साक्षीदारच होऊन राहते अशा आध्यात्मिकतेचा काय उपयोग? अथवा आध्यात्मिकतेचा उपयोग केवळ परलोकातील शाश्वत सुखासाठीच आहे व मानवी वर्तनावर तिचा कोणताच अंकुश नाही असं तर नाही? - असे प्रश्न तरुण विचारू लागले.

अशाच प्रकारचं वादळ माझ्याही अंतःकरणात त्यावेळी उठलेलं होतं. त्या वर्षी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचं अधिवेशन नाताळच्या सुट्यात अमृतसरला भरणार होतं. त्या अधिवेशनाला हजर राहायचं मी ठरवलं. विद्यार्थी प्रेक्षक म्हणून त्यावेळी गांधीजींचं मला प्रथमच दर्शन झालं.

नाताळच्या दिवसात अमृतसरचं वातावरण थंडीनं अतिशय बोचरं झालेलं होतं. सायंकाळच्या वेळी मी जेव्हा रेल्वे स्टेशनवर उतरलो तेव्हा कापरे भरवणारा वारा वाहत होता. राखी रंगाच्या आकाशातून जोरदार पावसाची सर येऊन गेलेली होती व त्यामुळे रस्त्यांवरून गुढघाभर पाणी वाहत होतं. त्यातूनच पायपीट करत मी माझ्या मित्राच्या घरी पोहोचलो. त्याच्याच घरी मी मुक्काम करणार होतो. त्याच्याकडे जाण्यासाठी पायऱ्या चढत असतानाच राष्ट्रीय पातळीवरील पुढाऱ्यांचा एक गट भरभर पायऱ्या चढत मला ओलांडून वर जाऊ लागला. त्यातील प्रत्येकाचं नाव सर्वपरिचित होतं. त्यात भगवे वस्त्र धारण केलेले हरिद्वार येथील गुरुकुल विद्यापीठाचे संस्थापक उत्तर भारतातील स्वामी श्रद्धानंदजी, चातूर्यपूर्ण वक्तृत्वशैली असलेले बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक आणि कुलगुरू मदनमोहन मालवीय आणि गांधीजींचा समावेश होता. त्यांना वाट करून देण्यासाठी पायऱ्यांच्या दारामागे मी दडलो. माझ्या कानावर त्यांचे जे शब्द पडले त्यामुळे माझं जीवनच बदलून गेलं.

जालियनवाला बागेत ज्या लोकांचं हत्याकांड करण्यात आलं होतं त्यांच्या स्मारकासाठी ती बाग विकत घ्यायचं ठरवण्यात आलेलं होतं. स्मारकासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीनं हे नेते शहरातील मुख्य व्यावसायिकांना भेटायला आले होते. मालवीयजींनी लोकांची मनं जिंकणाऱ्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीनं त्यासाठी व्यावसायिकांना विनंती केली. तुम्ही जर आपल्या तिजोरीची दारं थोडी मोकळी केली तर तुम्हाला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या सर्व पुरुषार्थांची प्राप्ती होईल असं मालवीयजींनी त्यांना सांगितलं. परंतु व्यावसायिकांच्या खिशातून कपर्दिक काही बाहेर पडली नाही. त्यानंतर श्रद्धानंदजींनी त्यांना आवाहन केलं. त्यांनी त्यांना भारताच्या गौरवशाली इतिहासाची आणि उज्ज्वल परंपरांची आठवण करून दिली आणि प्रसंगानुरूप

वागायची विनंती केली. परंतु त्याच्या वक्तृत्वाची स्थितीही पालथ्या घागरीवरील पाण्याप्रमाणे झाली.

अखेरीस गांधीजी बोलले. त्यांनी त्यांना लाडीगोडीही लावली नाही, त्यांची खुशामतही केली नाही वा त्यांच्या भावनांनाही आवाहन केलं नाही. संथ आवाजात शांतपणे गांधीजींनी त्यांना सांगितलं की स्मारकासाठी किती निधी उभारायचं ते ठरवण्यात आलेलं आहे. तेवढा निधी गोळा करायलाच हवा. जर तुम्ही तुमच्या कर्तव्याला चुकलात तर मी माझा आश्रम विकेन आणि निधीची रक्कम पूर्ण करायचा प्रयत्न करेन. राष्ट्रानं केलेल्या निर्धाराच्या पावित्र्याला मी सहजासहजी धक्का लागू देणार नाही, कारण तो निर्धार करणारात तुमच्याप्रमाणेच मीही सहभागी होतो. सहानुभूतिशून्य, कठोर अंतःकरणाच्या त्या व्यापाऱ्यांच्या लगेच लक्षात आलं की ही असामी काही वेगळीच आहे. हा असा माणूस आहे की तो जे बोलतो ते करतो आणि जे करतो तेच बोलतो. त्यांच्या पोलादी निर्धाराबद्दल कोणताच गैरसमज निर्माण होऊ शकत नव्हता. राष्ट्रीय निर्धाराच्या पावित्र्याबद्दलचा धडा लगेच त्यांच्या गळी उतरला. त्याच वेळी आवश्यक तेवढा निधी तिथे गोळा झाला.

काँग्रेसचं ते अधिवेशन अतिशय महत्त्वाचं ठरलं. मी जे काही पाहिलं त्यामुळे माझा विश्वास झाला की एका नवयुगाची सुरुवात होते आहे. जुन्या मूल्यांचा लोप होऊ लागला होता व त्या ठिकाणी नवी मूल्ये मूळ धरू लागली होती. युगांपासून सुप्तावस्थेत असलेल्या भारताच्या अंतःकरणाचा व त्याच्या असीम सामर्थ्याचा शोध भारताला लागू लागलेला होता. आता यापुढे भारतातील परिस्थिती पूर्वीसारखी कधीच राहू शकणार नव्हती.

अशा प्रकारे मनाच्या वादळी अवस्थेतच मी पुन्हा अभ्यासाकडे वळलो. काही आठवड्यांनंतर मी गांधीजींना भेट मागितली. सायंकाळ होत होती. आकाश राखी रंगाच्या ढगांनी भरलेलं होतं आणि मधेमधे घाणेरडे लालसर रंगाचे डाग त्या ढगांवर पडलेले दिसत होते. डोक्यावरील झाडांमधून थंडगार वारा वाहत होता. काळोख पडू लागलेला असताना गांधीजींच्या लाहोर येथील तात्पुरत्या मुक्कामी मी पोहोचलो. त्यावेळी तिथं आत काही चर्चा सुरू असल्याचं

मला आढळलं. त्यावेळी सैनिकी कायद्याखालील खटले जोरात सुरू होते व त्या खटल्यात गोवण्यात आलेल्या एका व्यक्तीच्यावतीनं गांधीजींना भेटायला एक प्रतिनिधी मंडळ आलेलं होतं. आरोपीविरुद्ध खुनाचा आरोप असल्यानं त्या प्रकरणी काही आशा नाही असं समजण्यात येत होतं. राजकीय खुनात गुंतलेल्या व्यक्तीसाठी माफी मागायचा कोणी धीर तरी कसा करू शकणार होता? ते अतिशय निराश झालेले होते. आपण या माणसासाठी काही करू शकता काय असं त्यांनी गांधीजींना विचारलं.

उत्तरात गांधीजींनी त्यांना 'त्या प्रकरणातील संपूर्ण सत्य काय आहे' ते विचारलं 'व जर ती व्यक्ती गुन्हेगार असेल तर तशी त्या व्यक्तीनं कबुली द्यावी' असं गांधीजींनी त्यांना सांगितलं.

प्रत्येकजण घाबरून स्तंभित झालेला होता. त्या वातावरणात राजकीय खुनात गुंतलो असल्याची कबुली दिलेल्या माणसाला काय भवितव्य राहू शकणार होतं? तसं करणं म्हणजे स्वतःच्या मृत्यूच्या आदेशावरच सही करण्यासारखं झालं असतं.

त्यानंतर अशी निरव शांतता पसरली की टाचणीचाही आवाज ऐकू यावा. त्यांना धीर देत गांधीजी म्हणाले, 'अगदी वाईट प्रकारच्या खुनी माणसालाही मी फासावर चढू देणार नाही. माझ्या आश्रमात अनेक असे लोक आहेत की जे राजकीय खुनात गुंतलेले होते. त्यांनी त्याची स्पष्ट कबुली दिली. अहिंसेकडे त्यांचं मतपरिवर्तन झालेलं असल्यामुळे ते आज माझे अत्यंत विश्वासार्ह सहकारी आहेत.'

त्यांच्या आवाजात एक धीर गंभीर आश्वासन होतं, एक अशी अभौतिक तटस्थता होती की जी आश्चर्यकारकपणे माणसाचं सांत्वन करत होती; अशी एक शांत गौरवाची भावना होती की जिच्यातून राजतेज झळकत होतं. ती अशी भावना होती की जिचा जन्म एखाद्या अज्ञात शक्तिस्रोतातून झाला आहे असं वाटावं. असा शक्तिस्रोत की ज्याला कोणीही अडवू शकत नाही, ज्याला पराभव माहीत नाही आणि जो अभेद्य ग्रॅनाईटच्या भिंतीलाही न जुमानता आपली वाट काढू शकतो. मला नेमके शब्द आठवत नाहीत. शब्दांची गरजच नव्हती. शब्दांशिवायही ते जाणवत होतं. कुठून तरी खोलातून ती जाणीव निर्माण होत होती व मनाच्या खोलवर कुठे तरी

ती स्पर्श करत होती. हीच ती गोष्ट होती की जिच्या शोधात मी होतो. आत्म्याच्या शक्तीचं ते ओझरतं दर्शन होतं. ती स्वतःच स्वतःचा निकष होती. जगातील कोणतीही शक्ती तिला दाबून ठेवू शकत नव्हती. ती कधीही पराभूत होऊ शकत नव्हती. खच्ची झालेल्या लोकांचा मुक्तिदाता आलेला होता. तो त्यांना उभं राहायला सांगत होता, भीती टाकायला सांगत होता, ताठ मानेनं चालायला सांगत होता.

मी मागितलेली मुलाखत काही दिवसांनी झाली. त्यांनी नुकताच आंघोळ केलेली होती व ते दुपारच्या जेवणासाठी चाललेले होते. त्यांनी पांढरी काश्मिरी पश्मिना शाल पांघरलेली होती. ते ताठ बसलेले होते. त्यावेळी ते जणू काय गौरवाची मूर्तीच दिसत होते. त्यांच्या साधेपणातही राजवैभव होतं. त्यांचा आवाज गोड आणि मंत्रमुग्ध करणारा होता. त्यांच्या डोळ्यातून असीम प्रेम, दया आणि शांततेची भावना पाझरत होती. शरीर अतिशय कृश होतं. परंतु त्यांची भव्य छाली त्यांच्यातील प्रचंड शक्तीची जाणीव करून देत होती. त्यांच्या रुंद मृदू भुवयांवर एकही वळी दिसत नव्हती. त्यांची चर्या लालसर, त्वचा मुलायम रेशमी होती व एकूण स्वरूप पारदर्शी होतं. ज्या मूल्यव्यवस्थेत मी वाढत होतो त्या मूल्यव्यवस्थेमुळे माझ्या मनात व्यापलेल्या असंतोषाबद्दल मी त्यांना सांगितलं. तसंच माझ्या अवतीभवती जे काही चालू असलेलं मला दिसत होतं ते मला कसं अर्थहीन वाटत आहे व त्यामुळे जीवनाचा अर्थ काय आहे हा माझ्यासमोर कसा महाप्रश्न निर्माण झाला आहे तेही मी त्यांना सांगितलं.

मी जे काही बोलत होतो त्यातील प्रत्येक शब्द ते लक्षपूर्वक मन लावून ऐकत होते. त्यामुळे माझ्या मनावरील ताण पूर्णपणे निघून गेला. माझं बोलणं जेव्हा संपलं तेव्हा मला आश्वासत ते म्हणाले की मला आलेला अनुभव हा काही केवळ माझ्या एकट्याचाच आगळावेगळा अनुभव नाही. असं प्रत्येकाच्याच जीवनात केव्हा ना केव्हा घडत असतं. त्याबद्दल काळजी करण्यासारखं काहीच नाही. अखेरीस ते म्हणाले, 'मी जेव्हा आश्रमात पोहोचेन तेव्हा तू आश्रमात ये. आश्रमातील शांत वातावरणात तुला तुझ्या प्रश्नांची उत्तरं मिळू शकतील.' त्यांच्या शब्दांनी माझ्या अंतःकरणावरील फार मोठं ओझं उतरलं. विद्यापीठाच्या शिक्षणातून मला असं काहीच मिळत

नाही की जे माझ्या परिश्रमांनी मी घरीच मिळवू शकत नाही आणि त्यामुळे मी माझं शिक्षण सोडून सरळ तुमच्या आश्रमात येऊ काय असं मी जेव्हा त्यांना विचारलं की तेव्हा ते म्हणाले, ‘नाही, तू आधी तुझा अभ्यास पूर्ण करायला हवा. तू विद्यापीठात गेलाच नसतास तर गोष्ट वेगळी असती. जी गोष्ट आपण एकदा सुरू केली ती मधेच सोडून देणं बरोबर नाही .

मी त्यांचा सल्ला मान्य केला. मी स्वतःचीच समजूत घालत म्हणालो की अखेर सहा महिनेच तर उरले आहेत. याशिवाय माझ्यासाठी ज्या आश्रमीय जीवनाची दारं उघडली आहेत त्या आश्रमीय जीवनासाठी मध्यंतरीच्या काळात मी स्वतःला तयारदेखील करू शकेन. गांधीजींनी लिहिलेलं तसंच त्यांच्यासंबंधी लिहिण्यात आलेलं मला मिळू शकणारं सर्व साहित्य मी मिळवलं आणि ते अतिशय उत्सुकतेनं वाचून काढलं. त्या वेळी त्यांचं हिंद स्वराज हे पुस्तक मला पूर्णपणे चुकीचं वाटलं होतं. जोपर्यंत मी एडवर्ड कार्पेंटर यांचं *सिव्हिलायझेशन - इट्स कॉज अँड क्युअर*, रस्किन यांचं *अन् टु धिस लास्ट* आणि हेन्री जॉर्ज यांचं *सोशल प्रॉब्लेम्स अँड देअर रेमेडिज* ही पुस्तकं वाचली नव्हती तोपर्यंत माझा तो समज कायमच होता. त्यानंतरच माझ्यासमोर सर्व काही स्फटिकवत स्पष्ट झालं. त्याचबरोबर लंडन येथील फ्री एज प्रेसनं प्रकाशित केलेल्या टॉलस्टॉय यांच्या काही पुस्तकांच्या स्वस्त आवृत्त्यातील काही पुस्तकंही मी वाचली. परंतु तात्तिकदृष्ट्या शासनविरहित समाजव्यवस्थेतील अप्रतिकाराचा त्यांनी मांडलेला सिद्धान्त मला भावला नव्हता. तसंच सर्व शासक हे समाजातील सर्वात मोठे गुंड असतात हे मतही मला अतिव्याप्त वाटत होतं. स्वच्छंदतावादी इंग्लिश कवी शेली, कोलरिज आणि वैशिष्ट्यानं वर्डस्वर्थ यांची गोष्ट मात्र वेगळी होती. त्यांनी माणूस, समाज, आणि निसर्गाचं तसंच निसर्गापलीकडे असणाऱ्या काही तरी चिरंतनाचं जे दर्शन घडवलं त्यातून माझ्या कल्पनाशक्तीला चालना मिळून मला बौद्धिक आणि आध्यात्मिक स्फूर्तीचा अखंड स्रोत सापडला. त्यामुळे मला गांधीजींच्या तत्त्वज्ञानाकडे नवीन दृष्टीनं पाहणं शक्य झालं.

तयारीचा भाग म्हणून मी माझं जीवन साधं करू लागलो. हे ठीक होतं. परंतु आरोग्याची किल्ली या गांधीजींच्या पुस्तकाच्या आधारे मी जेव्हा खाण्यापिण्याबाबत प्रयोग करू लागलो

तेव्हा माझ्या गरीब बिचाऱ्या आईसमोर मोठंच संकट उभं राहिलं व माझी लहान बहीण आणि भाऊही असं करतील की काय याचा धसका तिनं घेतला.

मी माध्यमिक शाळेत असतानाच माझे वडील वारले होते. ते न्यायमंडळावर उच्च अधिकारी होते. माझी आई आणि काका माझ्यासाठी वडिलांपेक्षाही अधिक होते व शिक्षण संपवून कुटुंबाची जबाबदारी मी केव्हा खांद्यावर घेतो याची ते वाट पाहत होते. परंतु तसं घडायचं नव्हतं.

१९२० सालच्या शरद ऋतूत असहकार चळवळीच्या हाकेला प्रतिसाद देऊन मी शिक्षणाला रामराम ठोकला आणि गांधीजींच्या साबरमती येथील आश्रमात रुजू झालो. मी तिथं पोहोचलो तेव्हा ते एका झंझावाती दौऱ्यावर होते. ते परतल्यानंतर माझी त्यांच्याशी भेट झाली. आमच्या बोलण्याच्या शेवटी 'तू असहकाराच्या तत्त्वज्ञानावर आणि त्याच्या आचरणावर एक प्रबंध लिही' असं त्यांनी मला सांगितलं. 'आणि एक लक्षात ठेव, माझ्या हाती ते आज तीन वाजताच्या आत पडायला पाहिजे.'

मला सांगण्यात आल्याप्रमाणे मी साहस केलं. दुसऱ्या दिवशी ते पुन्हा दौऱ्यावर गेले व मी त्या प्रसंगासंबंधी विसरून गेलो. काही आठवड्यांनंतर मला पत्र मिळालं. ते पत्र त्यांनी पाठवलेलं होतं व ते हिंदुस्तानीत होतं. त्यांना माझा लेख अतिशय आवडला असल्याचं त्यात लिहिलं होतं व माझ्या लेखणीचा उपयोग करायचं त्यांनी ठरवलं असल्याचा त्यात उल्लेख होता. त्यानंतर दिल्ली येथील त्यांच्या आगामी दौऱ्यात मला सहभागी व्हायला सांगणारी तारही लगेच आली. मी दिल्ली येथे त्यांच्यासमोर हजर झालो असता माझा लेख त्याच्या *यंग इंडिया* या साप्ताहिकात प्रकाशनासाठी पाठवत असल्याचं त्यांनी मला सांगितलं. त्यामुळे माझी छाती दोन इंच फुगली. असं करत असताना त्यांनी त्या लेखासोबत प्रास्ताविक टिपणही पाठवलं होतं.

दुपारी रोहटक येथे सभा असल्यानं ते तिथं जाणार होते. मी मागे थांबलो. परतल्यानंतर मी का आलो नाही म्हणून त्यांनी चौकशी केली. 'मला कोणीच तसं म्हणालं नाही' - मी उत्तरलो. ते म्हणाले याचा अर्थ माझ्या मंडळीतील कोणी तरी आपल्या कर्तव्यपालनात चूक केली आहे,

परंतु त्यांच्या चुकीच्या परिणामापासून मुक्त करण्याकरिता मी काही तरी करायला पाहिजे होतं. आपलं कर्तव्य पार पाडताना आड येणारा लाजरेपणा वा नम्रपणा सुप्त अहंकाराचंच चिन्ह आहे व माणसानं त्याविरुद्ध सदैव सावध राहायला हवं.

अशा प्रकारे माझ्या शिक्षणाला सुरुवात झाले व अखेरचा पडदा पडेपर्यंत अठ्ठावीस वर्षांच्या दीर्घ कालखंडात ते सुरूच होतं. ती घटनाही आमच्या काळातील अतिशय आश्चर्यजनक नाट्यपूर्ण घटना होती.

माझ्या लगेच लक्षात आलं की 'खाजगी सचिव' हा शब्द काहीसा चुकीचाच होता. इंग्रजीतील प्रायव्हेट सेक्रेटरी या शब्दात 'खाजगी' वा 'गुप्त' असा जो अर्थ दडलेला आहे तसं त्यांच्या जीवनात गुप्त वा खाजगी असं काहीच नव्हतं. तसंच राजकीय संदर्भात त्या शब्दातून एका प्रतिष्ठितपणाची वा मोहकतेची जाणीव होते तसंही तिथं काही नव्हतं. पाश्चिमात्त्य समाजात मोठ्या माणसाचं स्वीय सचिव असणं ही गोष्ट सार्वजनिक जीवनात उच्चस्थानाकडे नेणाऱ्या पायरीप्रमाणे असते. काही वेळा तर ती व्यक्ती ज्या व्यक्तीची स्वीय सचिव असते त्याचीच वारस होते. परंतु गांधीजींच्या बाबतीत परिस्थिती उलट होती. त्यांचा स्वीय सचिव असणाराला मात्र प्रसिद्धी आणि नावलौकिकाकडे तसंच जीवनात आकर्षक वाटणाऱ्या गोष्टींकडे पाठ वळवावी लागते व त्याच्या मालकानं समाजसेवेचं जे व्रत अंगीकारलेलं असतं त्यासाठी त्याला स्वतःला झोकून द्यावं लागत असतं.

गांधीजींनी स्वतःचं वर्णन शेतकरी, विणकर, सूतकताई करणारा, भंगी अशा विविध प्रकारे केलेलं आहे. त्यांच्या सचिवालाही हे सर्व व्हावं लागत असतं. त्यांच्यासाठी काहीच लहान नव्हतं आणि मोठंही नव्हतं. प्रत्येक कर्तव्याला सारखंच महत्त्व होतं व ते तेवढ्याच दक्षतेनं व काळजीनं पार पाडलं जायचं. ते कसून काम करून घेणारे होते. क्षणाच्या सूचनेवर प्रत्येकाला कोणत्याही आकस्मिक परस्थितीसाठी तयार राहावं लागायचं. सोपवलेल्या कामात आलेली अडचण ही काम पूर्ण न होऊ शकण्याची अडचण होऊ शकत नसे. त्यामुळे 'अपयश यायलाच

नको' हा कोणत्याही जबाबदारीतील अलिखित नियमच असायचा. एका इंग्रजी कवीनं 'जर' या शब्दाच्या मालिकेच्या आधारे आपल्या आदर्श माणसाचं चित्रण असं केलं आहे :

*जर तुम्ही पाहू शकत असाल स्वप्न -*
*आणि होऊ देत नसाल स्वप्नांना मालक तुमचे;*
*जर करू शकत असाल विचार तुम्ही -*
*आणि होऊ देणार नसाल विचारांनाच ध्येय तुमचं;*
*जर विजय आणि विनाशाला*
*सारखेच सामोरे जाऊ शकत असाल*
*आणि पाहू शकत असाल या दोन्हींकडे सम दृष्टीनं तुम्ही;*
*आणि मूर्खांना सापळ्यात अडकवण्यासाठी*
*तुम्हीच उच्चारलेल्या गोष्टींना*
*विकृत स्वरूप दिलेलं अधमांनी,*
*जर अस्वस्थ न होता पाहू शकत असाल तुम्ही,*
*अथवा जीवनाचा तुम्हीच रचलेला इमला*
*जर भग्न झालेला पाहू शकत असाल स्थिर चित्तानं तुम्ही*
*आणि नम्र होऊन झिजलेल्या जुनाट अवजारांनी*
*करू शकत असाल बांधणी परत :*

*जर तुमच्या सर्व विजयांचा रचू शकत असाल तुम्ही एक ढीग*
*आणि नशिबाच्या एका फटक्यानिशी*
*देऊ शकत असाल झुगारून सर्व*
*करू शकत असाल पुनश्च हरिओम्*
*आणि उच्चारणार नसाल एकही शब्द*

*झालेल्या नुकसानासंबंधी;*

*जर तुम्ही तुमच्या तनमनानं सर्व सामर्थ्यानिशी*

*करू शकत असाल दीर्घकाळ सेवा*

*तुमची पाळी संपल्यानंतरही*

*केवळ इच्छाशक्ती सोडून*

*उरला नसताना अगदीच*

*त्राण जरी तुमच्यात*

*धरू शकत असाल तग तरी*

*आणि म्हणत असाल लोकांना 'जरा थांबा !'*

ज्या माणसाची त्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत मला सेवा करायची संधी मिळाली तशाच माणसाचं उदाहरण कवीनं या काव्यातील आपल्या आदर्श व्यक्तीच्या चित्रणासाठी स्वतःसमोर ठेवलं असेल तर त्याहून वास्तव दुसरं कोणतंच चित्र असू शकणारा नाही. वादळातही शांत, इतर लोक आभासमय संरक्षणात निद्राधीन असताना जागा असणारा, सर्व काही ठाकठीक दिसत असताना धोक्याची जाणीव होऊन सावध राहणारा, जगानं टाकलेल्या सापळ्यातून आपल्या स्वच्छ शांत तेजस्वी दृष्टीनं मार्गाचा शोध घेणारा, इतरांच्या दुःखानं व्याकुळ होणारा परंतु स्वतःच्या दुःखांचं भानही नसणारा, आपल्या अनासक्तीच्या रसायनानं आपल्या व्याकुळतेचं परिवर्तन निरंतर स्वार्थत्यागात, आत्मशुद्धीत आणि आत्मसमर्पणात करणारा गांधीजींसारखा महापुरुष विरळाच. त्यांच्याशी संपर्क आल्यानंतरच्या माझ्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी एकही कठोर शब्द आपल्या विरोधकांविरुद्ध, टीकाकारांविरुद्ध अथवा बदनामी करणारांच्याही विरुद्ध उच्चारल्याचं मी कधीही ऐकलं नाही. ती केवळ क्षमावृत्ती नव्हती. समोरच्या माणसाचा दृष्टिकोन त्याच्या दृष्टिकोनातून सत्य असण्याच्या संभवाला व एक दिवस ते आपलंही सत्य होऊ शकेल या विचाराला त्यांनी अंतःकरणपूर्वक दिलेली ती मान्यता होती.

त्यांच्या अवतीभवतीच्या वातावरणात एक आगळीच शांतता आणि निश्चलता त्यांच्यामुळे निर्माण व्हायची. ती बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसायची. उलट संपूर्ण बाह्य वातावरणातच त्यामुळे परिवर्तन व्हायचं. मूल्यांचा अर्थ व्यंग्यार्थाहूनही अधिक व्यापक व्हायचा. यश आणि अपयशाचा अर्थ हरवला जायचा आणि सत्याच्या अनंत शोधाच्या मार्गातील ते केवळ मैलाचे दगड बनायचे. त्यांच्या सहवासात माणूस पराभवाचं शल्य विसरून जायचा - साधन साध्य बनायचं आणि साध्याचं परिवर्तन साधनात व्हायचं.

## २

दिल्लीतील मुक्काम थोडेच दिवस होता. त्यावेळी ते आपल्या हिंदुस्तानीशी झगडत होते. रेल्वेच्या प्रवासात हिंदुस्तानी स्वयंशिक्षक 'मुन्शी' सदैव त्यांच्याजवळ असायचा. जेवण करताना, शौच्याला जाताना एवढंच नाही तर जेव्हा केव्हा त्यांना क्षणाचीही सवड मिळायची तेव्हा ते त्या स्वयंशिक्षकाकडे वळायचे.

त्यांनी एका नवयुगाची स्थापना केलेली होती. दिवसरात्र त्यांच्याकडून नवविचार आणि नवनवीन कल्पना प्रसृत होत असत. त्यांच्या प्रभावानं जुन्या मूल्यांमध्ये आणि वर्तनात क्रांतिकारी परिवर्तन होऊ लागलेलं होतं. हिंदूंच्या संघटनेचं एक प्रतिनिधिमंडळ एकदा गांधीजींना भेटायला आलं होतं. गोरक्षा परिषदेच्या अधिवेशनात गांधीजींनी अध्यक्षपद भूषवावं अशी विनंती करायला ते आलं होतं. त्यांची विचारसरणी परंपरागत आणि कर्मठ होती. त्यांच्या दृष्टीनं गायीचं संरक्षण म्हणजे काहीही करून अहिंदूंच्या हातून गायीला वाचवणं, मग त्यासाठी बळाचा वापर करावा लागला तरी हरकत नाही. परंतु गांधीजींनी ते आमंत्रण नाकारलं. त्यांचं म्हणणं होतं की या विषयाचं मला जरी अतिशय महत्त्व वाटत असलं तरी गोरक्षणाची माझी खास अशी कल्पना आहे व ती तुमच्यापेक्षा वेगळी आहे. जोपर्यंत भारतात मारल्या गेलेल्या एकाही गायीची हाडं दिसतात व एकही गाय अस्थिपंजर झालेली दिसते तोपर्यंत गोरक्षण हे एक ढोंग आहे. माझ्या गोरक्षणात पराकोटीच्या अहिंसेचा समावेश होतो. तसंच त्यासाठी निखळ शुद्धता,

स्वार्थत्याग, तपश्चर्या, निदिध्यास आणि प्रायश्चित्ताच्या भावनेची आवश्यकता असते. तुमच्या गोरक्षणाच्या कामात यापैकी कशालाच स्थान असल्याचं मला दिसत नाही.

त्यांच्याकडे आलेल्या दुसऱ्या एका प्रतिनिधिमंडळानं त्यांच्याशी 'अस्पृश्यता' घालवण्याच्या प्रश्नाविषयी चर्चा केली. काँग्रेसनं अजून या कामाचा आपल्या आवश्यक कामकाजात समावेश केलेला नव्हता आणि प्रतिनिधिमंडळातील काही लोकांना स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीनं त्याचं काय महत्त्व आहे ते कळत नव्हतं. त्यांना वाटत होतं की यामुळे काँग्रेस एकोप्यानं जो राजकीय लढा देते आहे त्यात अडथळा निर्माण होईल. परंतु गांधीजी आपल्या भूमिकेवर अढळ होते. 'तुम्हांला कुणाशी लढावं लागत आहे ते तुम्हांला माहीत नाही. ज्या क्षणी हिंदू-मुसलमानात भांडणं लावायचा खेळ संपला असल्याचं ब्रिटिशांच्या लक्षात येईल त्या क्षणी 'फोडा आणि राज्य करा' या आपल्या धोरणासाठी ते दलित वर्गाचा उपयोग करतील. ज्यावेळी विभक्त मतदार संघाचा प्रश्न हा आपल्या राष्ट्रीय ध्येयाच्या आड येणारा महाप्रश्न बनला त्यावेळी त्यांनी दिलेली धोक्याची जाणीव खरीच होती हे कळलं.

शारीरिक दृष्टीनं अशक्त माणसाच्या बहिणीची अब्रू लुटायचा गुंड प्रयत्न करत असतील तर अशा अवस्थेत त्यानं काय करावं असं दुसऱ्या एका गटानं गांधीजींना विचारलं. उत्तरात गांधीजी म्हणाले : मुंगळा आपल्या मुलांना खाऊ घालण्यासाठी अन्नाचा घास घेऊन जात असताना त्याच्या तोंडातील अन्नाचा तो घास काढून घ्यायचा प्रयत्न केला तर तो काय करतो? त्याच्या शरीराचे दोन तुकडे झाले तरी तो आपल्या तोंडातील अन्नाचा घास सोडायला तयार होत नाही. आपल्या बहिणीच्या अब्रूरक्षणार्थ माणूस एवढं निश्चितच करू शकतो ! त्यांच्या ह्या शब्दात अशी काही भावना सामावलेली होती की त्यानंतर कोणालाही बौद्धिक झटापट करायची इच्छाच उरली नाही.

त्यांच्यात अभूतपूर्व शक्ती होती. त्यांच्या पोलादी इच्छाशक्तीमुळे त्यांची इंद्रिये त्यांच्या लहानसहान आज्ञांचंही तंतोतंत पालन करीत असत. एखाद्या पटाईत घोडेस्वाराच्या लहानसहान इशाऱ्यांचंही घोडा जसा कसोशीनं पालन करत करतो तशी त्यांची इंद्रिये त्यांच्या आज्ञांचं पालन

करत असत. दररोज केवळ तीनचार तास झोप घेऊन ते दिवसेंदिवस आणि आठवड्यामागून आठवडे काम करू शकत असत, आणि काही वेळा तर ते अगदीच झोपत नसत. दैनंदिन जीवनात वा पोषाखात ते अतिशय काटेकोर असत व प्रत्येक बारीकसारीक गोष्टही नीटपणे करण्यावर त्यांचा भर असे. स्वच्छता आणि नीटनेटकेपणातील कसूर त्यांना अगदीच चालत नसे. विचार, लेखन, पोषाख वा दैनंदिन जीवनातील कोणत्याही स्वरूपाच्या कामातील उतावीळपणा वा गबाळेपणा त्यांना अगदीच सहन होत नसे. त्यांनी स्वतःला सैनिकी शिस्तीची आणि प्रत्येक काम घड्याळाप्रमाणे वेळेवर करायची सवय लावली होती व तशीच अपेक्षा ते त्यांच्याबरोबर असलेल्या लोकांकडूनही करत असत. शक्य असेल ती प्रत्येक गोष्ट स्वतः करण्यावर त्यांचा भर होता. त्यांना जर एखाद्या कागदाची वा पीकदाणीची वा अशाच इतर कोणत्याही गरज असली तर ती गोष्ट इतर कुणाला आणायला न सांगता ते स्वतःच ती गोष्ट आणायला जात असत. एवढंच नाही तर स्वतःच्या कपड्यांना घडीही तेच घालायचे. कुणाला तरी सांगून लिहून घेण्यापेक्षा स्वतः लिहिणं ते पसंत करत असत. एके दिवशी त्यांनी स्वतः लिहिलेली पत्रं मी मोजली तर ती छप्पन भरली. त्यातील प्रत्येक पत्र अगदी तारखेपासून तर पत्त्यापर्यंत त्यांनी पुन्हा अगदी बारकाईनं वाचलं आणि मगच ती पत्रं डाकेत टाकणाराच्या स्वाधीन केली. त्यानंतर ते एवढे थकलेले होते की आपली थडथडणारी कानशिलं दाबत ते तिथंच लवंडले. त्यांच्या अंथरुणालाच ते टेकून बसलेले होते पण ते पसरायचं त्राणही त्यांच्यात उरलेलं नव्हतं. त्यांनी केवळ ते बाजूला ढकललं.

ते पोलादाची नीफ लावलेल्या टाकानं लिहीत आणि व त्यांची दौत देशी बनावटीच्या काचेची होती. आपली कागदपत्रे ठेवण्यासाठी ते खादीची लाल रंगाची पिशवी वापरत असत. त्यांच्या आहारात बकरीचं दूध, फळं आणि मनुका असायच्या व औषध विक्रेत्याच्या अचूकपणानं आणि काळजीनं त्यांचं वजन करण्यात येत असे. एकदा त्यांना नकळत १९वरून २३पर्यंत मनुका मी वाढवल्या. त्यांच्या ते लक्षात आलं आणि त्यांनी 'आंधळ्या प्रेमावरील' एक प्रवचन मला ऐकवलं. ती अमूल्य संपत्ती ही माझी कायम ठेव आहे. प्रत्येक वेळी काय आहार

राहील हे आधीच्या आहाराला शरीरानं कसा प्रतिसाद दिला, किती झोप लागली वा लागायला हवी होती व किती मानसिक ताण सहन करावा लागला होता वा करावा लागणार होता यावरून ठरायचं. फळांच्या निवडीच्या बाबतीत ते अतिशय चोखंदळ होते. त्यासंबंधी विचारलं असता ते स्मित करत सांगायचे की माझी प्रकृती दक्षिण आफ्रिकेतील फळांवर पोसली गेली आहे हे तुम्ही विसरू नका. त्यांना त्यांचं पेय अतिशय गरम लागायचं आणि चमच्यानं ते आधी ढवळलेलं असावं यावर त्याचा कटाक्ष असायचा. चमच्यानं ढवळलेलं यासाठी की त्यात काही अन्य पदार्थ तळाशी असले तर ते ढवळल्यानं वर यावे.

त्यांना आपल्या टेबलवरील सर्व कामं वेळेवर उरकवणं आवडायचं. त्यांच्या कार्यालयातील कोणीही त्यांना अठ्ठेचाळीस तास आधीचं पत्र दाखवलं तर मग त्याची गच्छंतीच असायची. त्यांच्या पत्रोत्तरात बोटचेपेपणा वा वादविवादातील कौशल्य यांना अगदीच स्थान नसायचं. उत्तर सरळ, स्पष्ट आणि मुद्देसूद असणं आवश्यक असायचं. 'पत्र पाठवणाराच्या अडचणीची सरळ दखल घेण्याव' त्यांचा भर असायचा. परंतु जे भांडखोर वृत्तीचे पत्रलेखक केवळ त्यांना खोड्यात गुंतवण्यासाठी पत्र लिहीत त्यांना चातूर्यपूर्ण, मुत्सद्दीपणाचंच नाही तर जशास तसं उत्तर दिलेलंही त्यांना आवडायचं. अट एवढीच असायची की त्यात विषारीपणा नसावा. ५ अथवा १० ओळींपेक्षा मोठ्या उत्तराला केराची टोपली दाखवली जाणं हा जणू काही नियमच होता. पत्तासुद्धा काही कमी बारकाईनं तपासला जात नसायचा. भारतातील कानाकोपऱ्यातील एखाद्या गावाचा नक्की ठावठिकाणा ब्रॅडशा आणि पोस्ट आणि टेलिग्राफ मार्गदर्शिकेच्या मदतीनंही न समजणं हा मोठाच अपराध समजला जायचा. गाड्यांच्या वेळेची नक्की माहिती नसणं वा विशिष्ट मार्गानं ते पत्र पोहोचवण्यासाठी डाकखातं नक्की किती वेळ घेईल याचा अंदाज नसणं हा देखील एक मोठा गुन्हा ठरायचा. वाईट हस्ताक्षर ओळखता यायच्या गुणातून सहनशीलता, चिकाटी आणि समयसूचकतेची परीक्षा व्हायची. पत्त्यातील ठिकाणाचं नाव सर्व प्रयत्न करूनही उलगडता येत नसे तेव्हा ते न ओळखता येणाऱ्या अक्षराचा शक्य तोवर तसाच कित्ता गिरवायला सांगत. दुसऱ्या एका वेळी डोळे मिचकावत त्यांनी सांगितलं

की पत्त्यातील ठावठिकाणा कळणं शक्य नसेल तर मूळ पत्रातील पाठवणाराचा पत्त्याचा भाग कापून तो तसाच उत्तराच्या पत्राला चिकटवण्यात यावा. 'पोस्टाचे लोक आपल्यापेक्षा अधिक चांगलं वाचू शकतील !'

अतिशय सौंदर्योपासक असल्यामुळे ते आपल्या सर्वसंगपरित्यागाचं आचरण अतिशय नेमस्तपणानं करत असत व तसं करताना आपल्यामुळे इतरांची संकोचावस्था होऊ नये याची ते काळजी घेत असत. साध्या राहणीशी चहा आणि कॉफीची सवय विसंगत असल्यानं त्यांना ती पसंत नव्हती. परंतु त्यांच्या सहकाऱ्यांपैकी काहींना चहा कॉफीची सवय असल्याचं माहीत असल्यानं एकदा रेल्वे प्रवासात स्थानकावर ते स्वतः उतरले आणि आपल्या झोपलेल्या सहकाऱ्यांसाठी चहाचा ट्रे घेऊन आले !

आपल्या अवतीभवतीच्या वातावरणाचा परिणाम न होऊ देता क्षणात वेगवेगळ्या विषयांवर आपलं लक्ष केंद्रित करायची त्यांच्यात विलक्षण क्षमता होती. शारीरिक गैरसोय अथवा जमावाच्या गोंगाटाचा वा गडबडीचा त्यांच्यावर कोणताच परिणाम होत नसे. त्यांना हवं तेव्हा ते झोपी जाऊ शकत असत व नेमलेल्या मिनिटांनंतर त्यांना स्वतः होऊन जाग येत असे. काही वेळा लिहायचा मजकूर सांगत असताना वाक्याच्या मधेच ते डुलकी घेत, काही क्षण डुलकी घेतली की पुन्हा जागे होऊन जेथून मजकूर सांगणं थांबवलं असेल तेथून मजकूर सांगायला परत सुरुवात करत. त्यासाठी त्यांना काही खास प्रयत्नही करावे लागत नसत आणि 'आपण कुठवर आलो होतो?' वा 'मी काय म्हणत होतो?' असं काही विचारावंही लागत नसे.

कामाच्या धबडक्यातही त्यांची मानसिक जागृती आणि तत्परता या गोष्टी पाहिल्या की माणूस आश्चर्यचकित होत असे. एका प्रवासात एक मुसलमान राष्ट्रीय पुढारी आमच्याबरोबर प्रवास करत होते. आमच्या डब्यातील सर्वांना गाढ झोपा लागलेल्या होत्या. मध्यरात्री एकाएकी ते उठले आणि पुढील स्टेशन कोणतं याची त्यांनी चौकशी केली. 'गुजरात' मी उत्तरलो. 'गाडी थांबेल तेव्हा डॉ.... ना उठवायची आठवण ठेव. ते बाजूच्याच डब्यात आहेत. त्यांना गुजरानवाला

येथे उतरायचं आहे.' -त्यांनी मला सांगितलं. गाडीनं गुजरात ओलांडताच ते पुन्हा उठले आणि आपल्या सूचनांचं नीट पालन झालेलं आहे की नाही ते त्यांनी पाहिलं.

याच प्रवासाच्या दरम्यान पंजाबमधील शिखांचं प्रसिद्ध तीर्थस्थळ नानकानासाहेब येथील दुःखद घटनेची माहिती त्यांना कळली. त्यामुळे त्या भयानक घटनेच्या ठिकाणी भेट देणं आवश्यक झालेलं होतं. शीख धर्मस्थळांच्या प्रशासनाच्या शुद्धिकरणाची एक चळवळ १९२०च्या दरम्यान पंजाबमधे सुरू होती. नानकानासाहेब येथील भ्रष्ट महंतानं अनेक शीख सुधारकांचं निर्घृणपणे शिरकाण केलं होतं. उत्साही सुधारक असण्याशिवाय त्यांचा अन्य कोणताच अपराध नव्हता. 'शक्तीचा उपयोग टाळणं एवढंच महत्त्वाचं नाही तर शक्तिप्रदर्शनही टाळायला हवं,' ज्या कोणत्या गोष्टीमुळे विरोधकाला धोका जाणवत असेल त्या गोष्टीमुळे विरोधक हिंसा करायला प्रवृत्त होतो व त्यामुळे अशी प्रत्येक गोष्ट ही सुद्धा हिंसाच ठरते हा त्यावेळी गांधीजींनी आपल्या भाषणातून मांडलेला विचार अहिंसक लढ्याच्या डावपेचाच्या दृष्टिकोनातून चिरंतन महत्त्वाचा ठरलेला आहे.

त्यांचं मन आश्चर्य वाटावं एवढं सुसंघटित होतं. लाहोर सोडून रेल्वे स्टेशनवर जायच्या ते तयारीत असतानाच एका इंग्रजी वृत्तपत्राच्या वार्ताहरानं नानकानासाहेब येथील भयानक घटनेविषयी त्यांना निवेदन करायची विनंती केली....

'तुमचा वार्ताहर माझ्यासोबत.... स्टेशनपर्यंत येऊ शकतो काय?' गांधीजींनी विचारलं.

'होय, परंतु ते तर ४० मिनिटांच्याच अंतरावर आहे.'

'तेवढा वेळ मला पुरेसा आहे.'

आणि नेमकं गाडी पोहोचायच्या पाच मिनिटं आधीच त्यांनी 'खालसाजीं'च्या नावे रखरखणाऱ्या उकाड्यात एक अनावृत पत्र तयार केलेलं होतं व आश्चर्यचकित झालेल्या वार्तहारांकडे ते घेऊन गांधीजी गेले. आपल्या मनाच्या एकाग्रतेचं श्रेय ते ब्रह्मचर्य पालनाला वा आत्मशिस्तीला देत असत. 'सामान्यपणे आपल्या मनात विविध विचार गोंधळ घालत असतात.

ब्रह्मचर्याच्या शिस्तीमुळे त्यांना शिस्त लावणं शक्य होतं. तसंच हाती असलेल्या कामाच्या दृष्टिकोनातून नको असलेले विचार, भावना वा ऊर्मी यांनाही मनातून काढून टाकणं शक्य होतं. आपल्याला जर असं करता आलं तर थकवा कशाला म्हणतात ते आपल्याला माहीतही नसेल. कामानं माणूस थकत नसतो तर गोंधळामुळे थकत असतो. मनातील विचारांच्या संघर्षानं झीज होत असते.'

त्यांनी परत तिसऱ्या वर्गाच्या प्रवासाला सुरुवात केलेली नव्हती कारण नुकतंच झालेल्या आजारानं तसं करायला त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नव्हती. तसंच त्या काळात आश्रमाबाहेर असताना आपल्या सहकाऱ्यांसोबत वा एकट्यानं सकाळच्या वा सायंकाळच्या प्रार्थनेला त्यांना बसलेलं मी पाहिलं नव्हतं. १९२४ साली येरवडा तुरुंगातून ते बाहेर पडल्यानंतर त्या गोष्टीची सुरुवात झाली.

याच प्रवासात घडलेल्या एका प्रसंगाचा माझ्या मनावर कधीही न पुसला जाणारा ठसा उमटला आहे. लाहोरमध्ये ते लाला लजपतराय यांच्यासोबत राहत होते. लालाजी पंजाबचे निर्विवाद राष्ट्रीय पुढारी होते. या पंजाबसिंहानं असहकार्याचा कार्यक्रम पूर्णपणे स्वीकारला नव्हता. पंजाबमधील काही पुढारी गांधीजींकडे आले आणि आम्ही स्वतंत्रपणे असहकार कार्यक्रमासंबंधी काही कृती करू इच्छितो असं गांधीजींना म्हणाले. परंतु गांधीजींनी या प्रस्तावित योजनेला पाठिंबा दिला नाही. पंजाब हा लालाजींचा प्रांत होता. लालाजींच्या प्रांतात कोणत्याही प्रकारची गैरशिस्त माजवणाऱ्या वा बेदिली पसरवणाऱ्या कामात आपण सहभागी होऊ इच्छीत नाही असं ते म्हणाले. असं करणं ही आपल्या सहकाऱ्याशी धोकेबाजी होईल व असा अपराध मी कधीच केला नाही असंही ते म्हणाले. हे संभाषण जेव्हा झालं तेव्हा त्या खोलीत लालाजी नव्हते. परंतु बाजूच्या खोलीत ते त्यांच्या कानावर पडलं. त्याचा लालाजींच्या मनावर एवढा ठसा निर्माण झाला की त्यामुळे लालाजी आणि गांधीजी यांच्यातील आयुष्यभराच्या मैत्रीचा पाया रचला गेला.

दौरा संपल्यानंतर आम्ही साबरमती आश्रमात परतलो. सर्व दृष्टींनी पाहता ते कंटाळवाणं आणि निरस ठिकाण होतं. तिथं लोक सकाळपासून तर सायंकाळपर्यंत एखाद्या रोजमजुरीवर काम करणाऱ्या मजुराप्रमाणे सामान्य आणि निरस कामात गुंतलेले असत. तिथं त्यांना अतिशय मागासलेल्या पद्धतीचं जीवन जगावं लागायचं. ज्या आश्रम शिस्तीवर आश्रमातील सर्व कार्यक्रम आधारलेले होते त्या आश्रम शिस्तीच्या गाभ्यापर्यंत जेव्हा माणूस पोहोचत असे तेव्हा कुठं त्याला त्या जीवनाचा अर्थ कळत असे. ती तत्त्वं होती विचार, शब्द आणि वर्तनातून सत्याचरण, अहिंसा, असंग्रह आणि अस्तेय, शुद्धता व तिच्या अनुषंगाने येणाऱ्या गोष्टी म्हणजे रसनेवर संयम, स्वदेशी आणि प्रादेशिक निष्ठेचं तत्त्व, स्वयंपूर्णता आणि स्वावलंबन आणि निर्भयता ही या सर्व आचरणामागील आधारभूत तत्त्वं होती.

आश्रमात किती तरी अनुभवी सत्याग्रही स्त्रिया होत्या. केवळ आश्रमातील मूलभूत शिस्तीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी इतिहास घडवला होता. तसंच काही मुलंही होती. सैनिकी प्रशासनाच्या काळात त्यांना गांधीजींनी पत्रवाहन, निरोप देणे आदी लहानसहान कामं सांगत. ऐन पौगंडावस्थेतच गांधीजींनी त्यांना सार्वजनिक कामाची दीक्षा दिली होती.

आश्रमाकडे आकर्षित झालेल्या सगळ्यांनाच आश्रमीय जीवनाच्या अंतरंगाचा अर्थ कळत नसे. खूप उत्साहानं तिथं आलेल्या अनेक तरुणांनी निराश होऊन आश्रमाकडे पाठ फिरवली होती. त्यांच्यापैकी एक जण याचं कारण सांगताना म्हणाला होता, 'तिथं राजकीय जीवनातील क्षोभाचा मागमूसही नव्हता !

एके दिवशी सायंप्रार्थनेनंतर आश्रमीय शिस्तीचं महत्त्व आणि आश्रमवासीयांनी राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंघर्षात बजावायची भूमिका यांबाबत गांधीजी समजावून सांगत म्हणाले, 'राष्ट्राच्या अहिंसक संघर्षात राष्ट्रानं दिलेल्या हाकेवर आश्रमातील सर्व लोक स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर आपले प्राण समर्पित करायला तयार होतील त्या दिवसाची मी वाट पाहतो आहे. मनात भीतीची वा द्वेषाची भावना न बाळगता शत्रूबद्दलही केवळ प्रेमाचीच भावना मनात बाळगून बंदुकींच्या गोळीबाराला एकामागून एक ते बळी पडत असताना मी निःस्तब्ध मनाने शांतपणे त्यांच्याकडे

पाहत राहीन. त्यांच्यातील शेवटचा जेव्हा धारातीर्थी पडेल तेव्हा मीही त्यांच्यामागून जाईन. तो महान त्याग बघण्यासाठी जेव्हा आश्रमातील झाडंच केवळ जेव्हा वाचतील तेव्हा आश्रमाच्या इतिहासातील तो दिवस सुवर्णाक्षरात लिहिण्यासारखा असेल. तसं घडेल तेव्हाच ते आश्रमाच्या प्रतिष्ठेनुसार वागले आणि आश्रमाचं व भारताचं नाव सार्थ झालं असं म्हणता येईल.’

सायंकाळच्या वेळी आश्रमातील आम्हा काही मंडळींबरोबर ते फिरायला जात असत. सामान्यपणे हा फेरफटका साबरमती तुरुंगाच्या फाटकापर्यंत होत असे. एके दिवशी त्याकडे बोट दाखवत गांधीजी हसत हसत म्हणाले, ‘हा आपला आश्रम आहे.’ पुढं स्पष्ट करत ते म्हणाले, ‘आपल्या आश्रमात भिंती नाहीत. आपल्याकडे ज्या भिंती आहेत त्या केवळ आश्रमातील शिस्तीच्या भिंती आहेत. परंतु तुरुंगातील भिंतींप्रमाणे त्या आपल्या मार्गात आडकाठी निर्माण करण्याकरिता नाहीत तर आपल्या संरक्षणासाठी आणि आपल्याला विशाल स्वातंत्र्य देण्यासाठी आहेत. आपण आध्यात्मिक शिस्तीचं जेव्हा स्वेच्छेनं पालन करतो तेव्हाच आपल्याला खऱ्या स्वातंत्र्याचा लाभ होतो. त्यांच्या संरक्षणात आपण कुठंही जाऊ शकतो, कोणत्याही आणीबाणीला तोंड देऊ शकतो आणि आपली कधीही गोंधळल्यासारखी अवस्था होत नाही. उदाहरणार्थ तुरुंगापेक्षाही आश्रमातील जीवन कठीण असावं अशी अपेक्षा आहे. कोणी हिरावून घेऊ शकेल अशी आपल्याजवळ कोणतीही संपत्ती नाही. आश्रमात आपल्याला साध्यासरळ जीवनाची सवय असल्यामुळे तुरुंगात गेल्यानंतर आपल्याला कोणत्याही प्रकारच्या सुखसोयींना वा खाण्यापिण्याच्या आनंदाला मुकल्यासारखं वाटणार नाही. आपण ईश्वराला भिऊन वागणं शिकलेलो असल्यामुळे आपण कोणालाही घाबरणार नाही आणि ‘स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे’ हे सत्य आमच्या हृदयात ठसलेलं असल्यामुळे मृत्यूला कवटाळायची आमची सहज तयारी राहील. त्या गोष्टीला आम्ही कधीही नाही म्हणणार नाही. आणि तुरुंगात शांततामय प्रतिकार करणारा तुरुंगाच्या शिस्तीचं तसचं तुरुंगवासासोबत येणाऱ्या हालअपेष्टांचं सत्यासाठी स्वागत करत असल्यामुळे आपल्याला तसं करताना आनंदच वाटेल व तुरुंगाच्या भिंतीआड असूनही एखाद्या पक्ष्याप्रमाणे मुक्त वाटेल. तुरुंगवासाचा

आपल्याला कधीही कंटाळा वाटणार नाही. संपूर्ण भारत जेव्हा हा धडा शिकेल तेव्हा भारत स्वतंत्र होईल. कारण परकीय शक्ती जरी संपूर्ण भारताचं तुरुंगात रूपांतर करू शकत असली तरी ती भारताच्या आत्म्याला कैद करू शकणार नाही.

या दोन 'आश्रमांमधे' जेमतेम १० फर्लांगांचं अंतर असावं. परंतु तिथं जायला आणि त्या दोघांच्या भूमिकांमधे अदलाबदल व्हायला तेवढीच वर्ष लागली. १९३० साली सम्राटांच्या सरकारचे तुरुंग भारतीय राष्ट्रवाद्यांचे आश्रम झाले आणि संपूर्ण देश एक विशाल तुरुंग झाला. गांधीजींच्या शिकवणुकीमुळे परकीय सत्तेविरुद्ध भारतीय जनता लवकरच बंड करून उठली. त्यांना प्रत्युत्तर द्यायचा एकच पर्याय होता व तो म्हणजे भारतात स्मशान शांतता निर्माण करायचा. जगातील सुसंस्कृत मनाची त्या वेळी ते सहन करायची तयारी नव्हती आणि ब्रिटिश सत्तेलाही तसं करायची लाज वाटली. त्याऐवजी तिनं इतर सूक्ष्म उपायांचा अवलंब करायचं ठरवलं. परंतु तसं फार दिवस चालू शकलं नाही.

३

१९३० साली मिठाचा सत्याग्रह जोरात सुरू असताना द स्टोरी ऑफ सिव्हिलायझेशन या प्रचंड ग्रंथाचे लेखक प्रसिद्ध अमेरिकन तत्त्वज्ञ विल ड्युरांट भारतात आले होते. भारताच्या संस्कृतीचा ते अभ्यास करत असल्यामुळे प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी काही कलाकृती पाहण्यासाठी ते आले होते. यानंतर समकालीन जगाला विसरून आपल्या इतिहासाच्या अभ्यासात मग्न व्हायचा त्यांचा विचार होता. [विल ड्युरांट : द केस फॉर इंडिया, सायमन अँड शुस्टर, न्यूयार्क, (१९३०), प्रस्तावना ९]

ते म्हणाले की भारताबद्दल माझा आधी अनुकूल ग्रह नव्हता व भारताच्या राजकारणात 'भावविवश होऊन आपण वाहून जाऊ' अशी मला अगदीच शक्यता वाटत नव्हती. परंतु भारतात आल्यानंतर 'मानवजातीच्या एकपंचमांश लोकसंख्येच्या दारिद्र्यांचं आणि हालअपेष्टांचं जगात कुठेही आढळू शकणार नाही असं जे दर्शन मला झालं त्यामुळे मी हादरलो.' त्यांनी आपला जुना

बेत रद्द केला. 'आजच्या भारताचा तसंच भारताच्या गौरवशाली इतिहासाचा, यातना सहन करणाऱ्या परंतु त्यांचं प्रत्युत्तर न देणाऱ्या भारतात सुरू असलेल्या अद्‌भुत क्रांतीचा, तसंच आजच्या गांधीजींचा आणि प्राचीन काळातील बुद्धाचा अभ्यास करायचं त्यांनी ठरवलं. [वरीलप्रमाणे]

आणि जसजसा ते अभ्यास करत गेले तसतसे ते अधिकाधिक आश्चर्यचकित होत गेले. 'त्याचबरोबर लज्जेनं आमची मानही खाली होऊ लागली' असं ते पुढं सांगतात. 'इतिहासातील सर्वात मोठ्या गुन्ह्याचे आपण साक्षीदार आहोत' असं त्यांना वाटायला लागलं. सामान्यपणे भावावेगात न वाहून जाणारे विल ड्युरांट आवेगात उद्गारले, 'संघर्ष संपायच्या आधीच ..... प्रत्येकानं बाजू घ्यायलाच हची. [वरीलप्रमाणे प्रस्तावना १] 'जो कणी हे पाहील आणि तरीही बोलणार नाही तो भित्रा असेल. कोणत्याही इंग्रजानं वा ब्रिटिशानं हे पाहिलं व तरीही तो याविरुद्ध बंड करून उठला नाही तर तो आपल्या देशाला वा नावाला जागला असं म्हणता येणार नाही.'

भारतीय स्वातंत्र्यसमरातील नेते तुरुंगात असतानाच पहिली भारतीय वर्तुळ परिषद लंडनमध्ये नुकतीच सुरू झाली होती. ब्रिटिश काय करतील याकडे प्रत्येकजण आश्चर्यानं पाहत होता. त्यांच्याजवळ सत्ता होती, त्यांना न्यायानं वागण्याची गरज नव्हती. परिषद अयशस्वी झाली. टोरी पक्षाचे भारत मंत्री सॅम्युअल होर टोमणा हाणत म्हणाले, 'कुत्री भुंकत असतात, तांडा चालतच असतो.' दडपशाहीचा वरवंटा पूर्ण जोरात पुन्हा एकदा फिरायला लागला. सत्ताधाऱ्यांना वाटलं की त्यांनी आंदोलन दडपलं आहे आणि आता आपण आपल्या शस्त्राच्या बळावर अवलंबून राहू शकतो. आपल्या गुप्त कार्यालयीन अहवालात आंदोलनाच्या नेत्यांचा 'शिणलेलं नेतृत्व' असाही उल्लेख त्यांनी केला होता.

ब्रिटिश सत्तेला भारतावरील आपली पकड ढिली करायची इच्छा नव्हती. भारतानं इंग्लंडला संपन्न बनवलं होतं. भारताच्या संपत्तीमुळेच इंग्लंडला आपलं जीवनमान इतर राष्ट्रांपेक्षा उच्च ठेवता येणं शक्य झालेलं होतं. भारतीय नागरी सेवेकडे 'उच्चकुलीन प्रतिभासंपन्न परंतु भोतिकदृष्टीनं सामान्य परिस्थिती असलेल्या' तरुणांचं लक्ष वेधलं जाई. जो कोणी आपली

लायकी सिद्ध करील त्याला अगदी तरुण असतानाच ‘अतिशय आकर्षक पगार दिला जाई व त्याच्या निवृत्तीनंतर त्याला भरपूर सेवानिवृत्ती वेतन देण्यात येई.’ [विलहेम डेबिलस, *इंग्लंड*, जोनाथन केप, लंडन, (१९३०), मूळ जर्मन आवृतीचा इंग्रजीत १९२२ साली अनुवाद, पृष्ठ ५८] त्यावेळी इंग्लंडमधे जवळपास ७५०० सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकारी होते व त्यांना वार्षिक ३,५००,००० ते ४,०००,००० सेवानिवृत्ती वेतन भारताच्या खजिन्यातून देण्यात येत असे. [हाऊस ऑफ कॉमन्समध्ये लॉर्ड विंटर्टन, विल ड्युरांट यांनी *द केस फॉर इंडियामधे* दिलेलं उद्धरण, पृष्ठ ४१]

भारत ‘साम्राज्याची मध्यवर्ती छावणी होतं.’ भारतातील सैन्य इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणासाठी चल राखीव सैन्य पुरवण्याचं काम करत असे. १८९९ साली बोअर युद्धात, बॉक्सर लोकांच्या उठावाच्या वेळी १९०० साली आणि पहिल्या महायुद्धात भारतीय सैन्य भारताच्या खर्चानंच पाठवण्यात आलं होतं. त्यामुळे क्रमशः दक्षिण आफ्रिका, चीन, जर्मन, पूर्व आफ्रिका, पॅलेस्टाईन, मेसोपोटोमिया आणि फ्रान्समधे इंग्लंडचा पराभव टळला होता.

शिवाय साम्राज्यवाद्यांच्या प्रशिक्षणासाठी भारत आदर्श केंद्र झालेलं होतं. याच भारतात त्यांना साम्राज्यवादी मुत्सद्दीपणाची दीक्षा मिळत असे. विल्यम डेलिबस यांच्या शब्दात, ‘राष्ट्राराष्ट्रांतील, राज्याराज्यांमधील आणि सामाजिक वर्गांमधील मत्सराचा कसा फायदा घ्यायचा’ त्याचं तसंच ‘धार्मिक पूर्वग्रहांचा आणि कल्पनांचा’ फायदा घेऊन ‘फोडा आणि राज्य करा’चं प्रशिक्षणही त्यांना इथंच मिळायचं. भारताचा समुद्रीमार्ग सुरक्षित ठेवण्यासाठी केप व्यापण्यात आला व इजिप्त पादाक्रांत करण्यात आला. पहिल्या महायुद्धाच्या काळात त्याच्या आणि भूमध्य सागराच्या दरम्यान पर्शिया, पॅलेस्टाईन आणि मेसोपोटोमिया येथे पूल बांधण्यात आले. [विलहेम डेबिलस, *इंग्लंड*, जोनाथन केप, लंडन, (१९३०), मूळ जर्मन आवृतीचा इंग्रजीत १९२२ साली अनुवाद, पृष्ठ ५८-५९] ‘साम्राज्याच्या सर्वात दैदिप्यमान हिऱ्यावरील’ आपला ताबा ब्रिटन गमावू इच्छीत नव्हता. मी ‘सम्राटांच्या सरकारचा प्रधानमंत्री ब्रिटिश साम्राज्याचा विलय करण्यासाठी झालेलो नाही’ अशी विन्स्टन चर्चिल यांनी गर्जना केली.

परंतु खेळ संपलेला नव्हता. अजून त्याचा शेवट झालेला नव्हता. ब्रिटिश सत्तेचं प्रतीक असलेला युनियन जॅक भारतावर दोन शतकं फडकत होता. अखेरीस दिल्लीतील राजभवनावर १५ ऑगस्ट १९४७ला तो उतरवण्यात आला व त्याच्या ठिकाणी स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकला. त्यावेळी अभूतपूर्व असं राष्ट्रीय आनंदाचं दृश्य दिसत होतं. मध्यरात्रीच्या बारावर काटा जाताच जयघोष करण्यात आला आणि नवजात स्वातंत्र्याचं स्वागत करणाऱ्या जयनादानी आकाश दुमदुमून गेलं. लोक नाचत होते आणि गात होते. लोकांना दास्याच्या श्रृंखलातून मुक्त करणाऱ्या गांधीजींच्या जयजयकारानं आनंदोत्साहात लोकांनी वारंवार आकाश दुमदुमून टाकलं.

परंतु या सर्व जल्लोषात छातीवर पदकं लावून मिरवताना राष्ट्रपिता मात्र कुठंच दिसत नव्हते. सत्तेच्या राजदंडाचं त्यांना मुळीच आकर्षण नव्हतं. आतापर्यंत त्या कामासाठी प्रशिक्षित केलेल्या लोकांना ते काम सोपवून ते बंगालच्या राजधानीतील तोडफोड झालेल्या एका जवळपास ओसाड पडलेल्या घरात राहायला गेले होते. अल्पसंख्यांकांना त्यांची तिथं गरज भासत होती. ब्रिटिश सत्तेचा लोप झाल्यानंतर होणाऱ्या सांप्रदायिक दंगलीत आपला बळी जाईल असं त्यांना वाटत होतं. गांधीजींनी त्यांना वाचवण्यासाठी आपले प्राण पणाला लावायची शपथ घेतली होती. त्यांनी आपल्या शपथेची पूर्ती आत्मशक्तीच्या चमत्कारानं केली होती व त्या चमत्कारासमोर तोवरचे सर्व चमत्कार फिके पडले होते. त्यानंतर गांधीजींनी दिल्लीत जो उपवास केला होता त्याच्या चमत्कारानं हाही चमत्कार फिका पडला होता. गांधीजींनी कलकत्त्यातील आपल्या एकट्याच्या उपस्थितीनं तेथील सांप्रदायिक दंगली नियंत्रणात आणल्या होत्या. उलट त्याचवेळी पंजाबमधील ५०,००० सैनिकांना मात्र तेथील दंगलींवर नियंत्रण प्रस्थापित करता आलेलं नव्हतं. त्यामुळे भारतीय संघराज्याचे व्हाईसराय आणि एकेकाळी नौदलाचे महान सेनापती असलेले लॉर्ड माऊंटबॅटन यांनी गांधीजींचं वर्णन 'आमचं एका माणसाचं सीमा सुरक्षा सैन्य' असं केलं.

काही महिन्यांनंतर नेहमीप्रमाणे सायंप्रार्थनेला जात असताना एका मारेकऱ्याच्या गोळीला ते बळी पडले. परंतु त्याही वेळी त्यांच्या अंतःकरणात आपल्या मारेकऱ्याबद्दल क्षमाभाव होता आणि ओठांवर होतं रामनाम. ही त्यांची कृती अहिंसेची एक परिपूर्ण कृती होती. ते म्हणत असत की जेव्हा केव्हा अशी परिपूर्ण कृती घडेल तेव्हा तिच्यातून अशी काही शक्ती निर्माण होईल की जिचा प्रभाव संपूर्ण जगाला जाणवल्याशिवाय राहणार नाही. राष्ट्रसंघाच्या सुरक्षासमितीनं त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आपली सभा अर्ध्यातच थांबवली. राष्ट्रसंघाचा ध्वज अर्ध्यावर फडकत होता. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रांमधे जणू स्पर्धा लागलेली होती. ज्ञात इतिहासात असं क्वचितच झालं असावं. आज त्यांच्या विचारांचे प्रतिध्वनी अनेक देशांमधे ऐकू येतात व अनेक शतकांपर्यंत ते ऐकू येत राहतील.

## ४

स्वातंत्र्यासाठी झालेल्या संघर्षानंतर बहुधा कटुता, द्वेष आणि बदला, नुकसान भरपाई, बळीचा बकरा बनवणं, सूड, धोकेबाजांना फासावर चढवणं आणि शत्रूशी 'सहकार्य करणारांवर' तसंच 'युद्धगुन्हेगारांना' अटक करून त्यांच्यावर न्युरेन्बर्गप्रमाणे खटले चालवणं अशा प्रकारच्या घटना बहुतेक देशांत घडत असतात.

ब्रिटिशाकडून भारतीयांकडे सत्तांतर व्हायचा प्रसंग हा इतिहासातील एक आगळाच प्रसंग होता. ब्रिटनच्या लॉर्ड्स सभागृहाच्या एका सदस्यांनी भारतीय स्वातंत्र्याचं वर्णन 'युद्धाशिवाय शांततेचा करार असं केलं होतं.' त्याशिवाय ही अशी क्रांती होती की जी उभयतांच्या संमतीनं झाली होती, हा असा विजय होता की ज्यात पराभवांचं शल्य नव्हतं, आणि ह्या स्वातंत्र्यामुळे राष्ट्राच्या आकांक्षेची परिपूर्ती झाली होती.

ज्या गांधीजींनी इंग्लंडविरुद्ध बंडखोरी केली होती, जे गांधीजी ब्रिटिश साम्राज्याचे कट्टर शत्रू होते व ज्यांनी ब्रिटिशांविरुद्ध पाव शतक लढा दिला होता त्या गांधीजींना इंग्लंडचा

'आश्रयदाता संत' म्हणून घोषित करावं असं ब्रिटिशांचं भारतातील राज्य संपल्यानंतर उणीपुरी १० वर्ष झाली असतील नसतील तोच इंग्लंडच्या एका लॉर्डनी सुचवलं.

कॉलरीज यांच्या एका प्रसिद्ध बॅलेमधे एक नावाडी अल्बुट्रास या अशुभ समजल्या जाणाऱ्या पक्ष्याला मारून टाकतो. परंतु त्या पक्ष्याचं प्रेत त्याच्या गळ्यात अडकतं. हा त्याला शापही असतो आणि शिक्षाही असते. इंग्लंडच्या बाबतीतही असंच घडलं होतं. एका प्राचीन देशाला - ज्याला संस्कृतीचा संपन्न वारसा मिळालेला होता व ज्याच्याकडे आध्यात्मिक सिद्धीची अशी परंपरा होती की जशी जगात कुणाही जवळ नव्हती - मारल्यानंतर तो देश साम्राज्यवाद्यांच्या गळ्यात अडकला. त्या प्राचीन दर्यावर्दीच्या अंतःकरणातून ज्यावेळी सहजपणे पश्चात्तापाची भावना व्यक्त होते त्यावेळी तो पक्षी पुन्हा जिवंत होतो व त्या दर्यावर्दी माणसाची शापापासून मुक्तता होते. परंतु असं म्हणतात की व्यवस्था आणि आयोगांना आत्मा नसतो. ते वैयक्तिक स्पर्शाच्या वा नैतिक नियमांच्या पलीकडे असतात. एका अर्थानं हे खरंही आहे.

ते काहीही असलं तरी अल्बुट्रास परत जिवंत झाला. हा चमत्कार झाला एका माणसाच्या रंगभूमीवरील आगमनानं. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांसाठीही पापमुक्तीच्या मार्गाचा अवलंब कसा करता येतो ते त्यानं दाखवलं. केवळ नैतिक माणसासाठीच नाही तर 'अनैतिक समाजासाठीही'.

मानवी समाजाच्या प्रगतीसाठी गांधीजींनी जी भर घातली तिचं वैशिष्ट्य यातच सामावलेलं आहे. अन्यायाविरुद्ध न्यायाच्या संघर्षात विरोधकाचा नाश करायची वा त्याला खच्ची करायची आवश्यकता नसते हे त्यांनी दाखवून दिलं. स्वतः यातना भोगून म्हणजे अहिंसेच्या म्हणजेच प्रेमाच्या रसायनाद्वारे आपण त्याच्यात परिवर्तन घडवून आणू शकतो हे गांधीजींनी दाखवून दिलं. त्यांनी त्याला 'सत्याग्रह' हे नाव दिलं. सत्याग्रह म्हणजे 'आत्मशक्ती' वा 'सत्याची शक्ती'. ही अशी शक्ती आहे की जिची प्राप्ती संपूर्ण विश्वाशी आणि त्याच्या माध्यमातून सर्वोच्च सत्याशी म्हणजे ईश्वराशी म्हणजेच सत्याशी जाणीवपूर्वक तादात्म्य पावल्यामुळे होते. याच परमेश्वराची अभिव्यक्ती मानवी संबंधातील प्रेमातून होत असते. त्याला आपण कोणत्या

नावानं बोलावतो अथवा त्याचं अस्तित्व आपण मान्य करतो की नाही यामुळे काहीही फरक पडत नाही. तो स्वतःच कायदा देणारा वा कायदा असतो. त्यामुळे त्याचं अस्तित्व जरी आपण अमान्य केलं तरी त्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीवर कोणताही परिणाम होत नाही. गुरुत्वाकर्षणाचा नियम आपण अमान्य केला तरी सफरचंद पडायचं थांबत नाही तसंच हे.

* * *

साध्य आणि साधनाच्या समस्येनं म्हणजेच साध्याचं स्वरूप व ते साध्य करण्याकरिता अवलंबायची उपाययोजना यांच्या स्वरूपाविषयीच्या प्रश्नानं आदर्शवाद्यांना, तत्त्वज्ञांना आणि कृतिवीरांना अगदी आधीपासून गोंधळवलं आहे. न्याय्य साध्य साध्य करण्याकरिता वाईटाला मूक संमती आणि अयोग्य मार्गाशी तडजोड याशिवाय अन्य काही पर्यायच नाही काय? अशा वेळी संशय आणि नैराश्यात आपली ओढाताण होत असताना आपल्यालाही कवीबरोबर ओरडून विचारावंसं वाटतं

*‘याशिवाय नाहीच का अन्य काही माणसाच्या भाळी*
*व्हायलाच हवं का त्यानं वेडपट वा गुलाम ?’*

एकीकडे अनैतिक सामर्थ्यासमोर न्यायाचा प्रभाव पडत नाही आणि दुसरीकडे स्वतःलाच पराभूत करणाऱ्या दूषित साधनांचा उपयोग करून शुद्ध ध्येयप्राप्तीचा प्रयत्न केल्यामुळे मानवी जीवनात अशी परिस्थिती निर्माण होते की त्यावर कोणताच उपाय नाही असं वाटावं. चांगुलपणा कसा प्रभावी होऊ शकलो; सहनशीलता कशी चैतन्यदायी होऊ शकते, प्रामाणिकपणा हाच खरा मुत्सद्दीपणा कसा होऊ शकतो व अहिंसा हीच सर्वात महान शक्ती कशी होऊ शकते ते महात्माजींनी दाखवलं. चांगल्या ध्येयांच्या प्राप्तीसाठी साधनशुचितेची आवश्यकता असते हे गांधीजींनी वारंवार दाखवून दिलं. त्यांनी सांगितलं की साधनशुचितेची गरज केवळ आध्यात्मिक प्रगतीसाठीच नसते तर व्यावहारिक पातळीवरील यशासाठीही असते. अशा रीतीनं आधुनिक माणसाच्या जीवनात शोकांतिका निर्माण करणारा एक घटक गांधीजींनी दूर केला. अनेकदा त्याचंच रूपांतर ‘अश्रुपूर्ण संसारात’ होत असे....

संपूर्ण युगाला व तीन खंडांना व्यापणाऱ्या महात्मा गांधींच्या जीवनकथेला भविष्याचा वेध घेणारा वैश्विक पदर आहे. ते जन्मल्यापासून जगाचा चेहरा बदलला आहे. त्यांच्या डोळ्यादेखतच रोमन साम्राज्याहूनही मोठं आणि शक्तिसंपन्न असलेल्या साम्राज्याची शक्ती कळसाला पोहोचली होती, साम्राज्यबांधणीच्या टप्पा तिनं ओलांडला होता आणि नंतर आपल्या ताब्यात असलेला मुलूख परत करण्याच्या कामी ते साम्राज्य लागलं होतं. गांधीजींनी त्या साम्राज्याच्या शक्तीला आव्हान दिलं. तसं करताना इतर कोणत्याही शक्तीचा आधार न घेता केवळ आत्मशक्तीचा आधार त्यांनी घेतला होता. ज्या साम्राज्यानं दोन महायुद्धात आपल्या विरोधक सैनिकी शक्तींना पराभूत केलं होतं त्याच साम्राज्याला या निःशस्त्र योद्ध्याशी तडजोड करावी लागली होती व तसं करताना त्याला अभिमानही वाटत होता. वर्णद्वेषाच्या रोगाचं निदान त्यांनी बिनचूकपणे केलं आणि त्याविरुद्ध त्यांनी एका दूरस्थ प्रदेशात लढा पुकारला. त्यावेळी तर ते प्रसिद्धीच्या झोतातही नव्हते. परंतु आज तोच वर्णद्वेष जागतिक संस्कृतीला धोका निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यांच्या उदाहरणानं प्रेरीत होऊन गोऱ्यांच्या प्रभुत्वाविरुद्ध रंगीत लोकांनी केलेल्या उठावामुळे अनेक राष्ट्रांनी इतिहास निर्माण केला आणि त्यानं एका पिढीपर्यंत वा कदाचित त्यानंतरच्या पिढ्यांच्या काळातही जागतिक रंगभूमी व्यापून टाकली. त्यांच्या मृत्यूच्या अडीच वर्षांपूर्वी जपानवर अणुबाँब टाकल्यामुळे अणुयुगात जगानं प्रवेश केला. त्यामुळे केवळ मानवजातच नाही तर आपण राहत असलेल्या या जगाचं अस्तित्व धोक्यात येतं की काय असा धोका कधी नव्हे तो जगासमोर निर्माण झाला. परिणामी विचारवंतांना अशा शक्तीचा शोध घ्यायला बाध्य केलं की जी शक्ती अणूशक्तीवर नियंत्रण प्रस्थापित करील आणि या अणुयुगात आक्रमणाचा अशा रीतीनं प्रतिकार करू शकेल की ज्यामुळे मानवजात आणि व ज्या मूल्यांसाठी ती उभी आहे ती मूल्ये कायम टिकू शकतील . आपल्यातदेखील ईश्वरी अंशाचं अस्तित्व आहे ही जाणीव अगदी कमी दर्जाच्या आणि दीनदुबळ्या माणसात त्यांनी निर्माण केली, त्याला जागृत करता येऊ शकतं, कामाला लावता येऊ शकतं आणि समाजात राहणारा सामान्य माणूसही त्याचा उपयोग शस्त्र म्हणून करू शकतो व त्याविरुद्ध शस्त्रशक्तीही टिकाव धरू शकत नाही. वर्णद्वेषानं भरलेल्या, शस्त्रसज्ज व भक्कम साधनसामुग्री असणाऱ्या जुलूमशहांविरुद्ध लक्षावधी

पददलित लोकांना विषम परिस्थितीत संघर्ष करावा लागत होता. गांधीजींनी त्यांच्या अंतःकरणात ही जी नवजागृती निर्माण केली त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात नवीन आशा पल्लवित झाली. विज्ञानाच्या सहाय्यानं काहींच्या हाती अनेकांच्या तुलनेत भयानक सत्ता केंद्रित होत असताना व त्या आधारे मानवी स्वातंत्र्याचा जबरदस्त अपहार होत असताना इतिहासानं दिलेलं हे उत्तर आहे असंही काही लोक म्हणू शकतात. अण्वस्त्रानं मानवी समाजासमोर जो धोका उत्पन्न केला होता त्याला अहिंसा हेच एकमेव उत्तर आहे अशी श्रद्धा गांधीजींनी आपल्या मृत्यूच्या काही तास आधीच पुन्हा व्यक्त केली होती.

या हिंसक जगात ह्या शक्तीच्या शोधाची, विकासाची आणि क्रमशः अंमलबजावणीची कहाणी म्हणजे या शक्तिच्या संशोधकाच्या जनकाच्या जीवनाची आणि त्यानं त्यासाठी केलेल्या संघर्षाची कहाणी आहे.

## ५

महात्मा गांधींचा अन्वयार्थ अनेक लोकांनी आपापल्या दृष्टिकोनानुसार आणि इतिहासाच्या आकलनानुसार लावायचा प्रयत्न केला आहे. काहींनी त्यांचं वर्णन धर्माच्या बुरख्याचा उपयोग करून आपले राजकीय हेतू साध्य करणारा संताच्या वेषातील एक धूर्त राजकारणी असं केलं आहे. इतरांनी त्यांचं चित्रण 'मध्यकालीन संत' म्हणून केलं आहे. अजून काहींनी राजकारणात धर्माची भेसळ करून राजकारणाची खेळपट्टी बिघडवणारा 'गोंधळी' असं त्यांचं वर्णन केलं आहे. असाही दृष्टिकोन व्यक्त करण्यात येत असतो की त्यांनी राजकारणात केलेल्या ढवळाढवळीमुळे वास्तवात भारताचं स्वातंत्र्य लांबलं. ते स्वातंत्र्य एवीतेवी मिळालंच असतं व त्यांनी धर्म आणि राजकारणाची भेसळ असणारी सत्याग्रह चळवळ केली नसती तर ते कदाचित अजून आधीच मिळालं असतं. त्यांचं पुढं असंही म्हणणं असतं की गांधीजींनी तसं केलं नसतं तर आज आपल्याला ज्या अनेक समस्या भेडसावत आहेत त्यांनी आपल्याला भेडसावलंच नसतं. त्यात भारताच्या फाळणीचाही समावेश आहे, त्यांना टाळता आलं असतं काय? सत्य काय

आहे? ते 'मूर्ख हलकट गृहस्थ' होते काय? वा ते एक 'नादिष्ट' गृहस्थ होते व जगात अन्यत्र कुठेच नाही तर केवळ भारतातच घडू शकतो असा ते 'अपघात' होते? की भारतसचिव एमरी यांच्या दृष्टिकोनाप्रमाणे अवास्तव महत्त्व देण्यात आलेले ते व्यक्ती होते?

शर्लोक होम्स म्हणत असत की प्रत्येक घटनेचे कमीतकमी अर्धा डझन अन्वयार्थ लावता येणं शक्य असतं. ते सर्वच संपूर्णपणे तर्कशुद्ध आणि सुसंगत असू शकतात. परंतु त्यातील तो एकच अन्वयार्थ बरोबर असतो जो संबंधित प्रकरणातील सर्व घटनांशी सुसंगत असतो. वर्तुळाकृतीच्या परिघाचा लहानसा भाग पाहिला की तो पॅराबोले, हायपरबोले, वर्तुळाचा वा लंब वर्तुळाचा भाग आहे असं वाटू शकतं. परंतु हे वाटणं तेव्हाच अर्थपूर्ण होऊ शकतं जेव्हा त्या आकृतीचा प्रत्येक बिंदू दुसऱ्या आकृतीशी पूर्णपणे जुळतो. व्यक्तीबाबतही हेच खरं आहे.

रोग्याच्या रोगाचा इतिहास आणि रोगाची लक्षणं यांचा विचार करून औषधोपचाराचा विचार करण्यात येत असतो. महात्माजींच्या जीवित कार्याचं मूल्यन करण्यासाठी माणसाला भारताच्या आजाराचं, व्याधींचं, तिच्या स्वरूपाचं आणि तिच्या कारणाचं पूर्ण ज्ञान असायला हवं, भरपूर नैसर्गिक साधनसंपत्ती असताना तसंच नैतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा असलेल्या भारतासारख्या देशात घोर दारिद्र्य निर्माण होऊन त्याचा शक्तिपात व्हायचं कारणं काय? लढवैय्या जमातींच्या शौर्यासाठी प्रसिद्ध असलेला तीस कोटी लोकसंख्या असणाऱ्या या देशाला समुद्रापलीकडून आलेल्या काही थोड्याशा लोकांनी पादाक्रांत करावं व त्याला दोन शतकं गुलामगिरीत ठेवावं याचं कारण काय? आणि अमेरिकन युद्धात जेव्हा या लोकांची पराकोटीची दुर्बलता दिसून येत होती तेव्हा! इंग्लंड सैनिकी राष्ट्र कधीच नव्हतं. काही वेळा सांगण्यात येतं त्याप्रमाणे ब्रिटिशांनी विसरभोळेपणाच्या झटक्यात साम्राज्याकडे वाटचाल केली काय? की त्यांचा विजय सांगता येऊ शकणार नाही अशा प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक सामर्थ्याचं कारण होतं? या प्रश्नांची उत्तरं जेव्हा आपल्याला सापडतील तेव्हाच त्यांनी जे केलं ते का केलं व इतर कोणत्याच गोष्टीनं का काम भागलं नसतं हे कळेल व त्यानंतरच गांधीजींच्या कार्याचं मोल आपल्याला कळू शकेल.

*एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंड* या ग्रंथात जे. आर. सेली लिहितात की ‘युरोपिअन इतिहासाचा आपण अभ्यास केला तर आपल्याला अशी अनेक उदाहरणं सापडतात की आक्रमकांना भाषा आणि धर्माच्या संबंधात पूर्णपणे वेगळ्या असलेल्या लोकांना जिंकणं अगदी अशक्य असतं. डचांची अगदी नगण्य लोकसंख्या असतानाही संपूर्ण शक्ती लावूनही ८० वर्षात स्पेन डचांना जिंकू शकला नाही. प्राचीन काळात स्वित्झर्लंडच्या लोकांवरही विजय मिळवता येऊ शकला नाही वा ग्रीसलाही कधी काळी पराभूत करता येऊ शकलं नाही. [जे. आर. सिली, *द एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंड*, मॅकमिलन अँड कंपनी, लंडन, (१८९०), पृष्ठ १९७] इंग्लंडच्या बाबतीत त्यांच्याच वंशाच्या तीस लाख अमेरिकन लोकांनी त्याचं राज्य झिडकारून लावलं असताना असं वाटायला लागलं होतं की इंग्लंडच्या मोठेपणाचे दिवस संपलेले आहेत व त्याला उतरती कळा लागलेली आहे. परंतु त्याच वेळी भारतात मात्र इंग्रजांच्या विजयरथाला अडवणं शक्य होत नव्हतं. या घटनांकडे पाहिलं की प्रथमदर्शनी त्यात विसंगती असल्याचं जाणवतं. परंतु इतिहासाच्या तळाशी काय घडलं याकडे आपण विश्लेषणात्मक दृष्टीनं पाहिलं तर हा विरोधाभास दूर होतो.

प्राध्यापक सिली पुढं सांगतात, ‘असं म्हणतात की इंग्लंडनं भारतावर विजय मिळवला. भारतावर विजय मिळवण्याऱ्या सैन्यात केवळ एकपंचमांश लोक ब्रिटिश होते.... त्यामुळे भारतावर विदेशी लोकांनी विजय मिळवला असं म्हणणं कठीण आहे.... उलट असं म्हणणं योग्य राहील की भारतावर भारतानंच विजय मिळवला.... वास्तवात आपण असं म्हणायला पाहिजे की भारतानं तेथील अराजकाचा अंत करायचं ठरवलं आणि त्यामुळे विदेशी का होईना देशात एकछत्री राज्य असणं पसंत केलं.’ [वरीलप्रमाणे]

भारताला स्वराज्य ज्या मार्गानं मिळालं त्याच मार्गानं का मिळालं व वेगळ्या मार्गाचा अवलंब केला असता तर ते याहून लवकर मिळू शकलं असतं काय याचं उत्तरही यातूनच मिळतं. संपूर्ण विश्लेषण केलं असता ब्रिटिश गेल्यामुळे अराजक निर्माण झालं तरी बेहत्तर परंतु ब्रिटिशांची गुलामगिरी नको असं भारतानं ठरवण्यावरच भारताची मुक्ती अवलंबून होती. मग भारताजवळ शस्त्रास्त्र नसली तरी काही फरक पडणार नव्हता. असहकारानं त्याला पहिला

मुद्याचं रहस्य शिकवलं. तसंच आम्हाला 'ईश्वराच्या भरवशावर सोडा', मग 'अराजक निर्माण झालं तरी चालेल' परंतु तुम्ही 'भारत सोडा' असं इंग्रजांना सांगायचं धैर्य भारतात अहिंसेच्या शस्त्रामुळे आलं.

पुन्हा असंही सांगण्यात येत असतं की सदसद्विवेकबुद्धी असणाऱ्या माणसाविरुद्धच अहिंसेचं शस्त्र वापरलं जाऊ शकते. इंग्रजांच्या विरोधात ते यशस्वी झालं कारण इंग्रज अतिशय सुसंस्कृत, स्वातंत्र्यप्रेमी आणि ईश्वरभिरू लोक होते. हिटलरसारखा शत्रू असता तर अहिंसा आणि तिचा पुरस्कर्ता हे केव्हाच धुळीस मिळाले असते. आपली सत्ता टिकवण्यासाठी इंग्रजांना निर्दयीपणाची आवश्यकता वाटायची तेव्हा ते हिटलरपेक्षा कमी निर्दयीपणा करायचे का असा एक प्रश्न इथं विचारावासा वाटतो. तसंच भारतानं जाणता वा अजाणता अहिंसेच्या शस्त्राचं जे पालन केलं तेच इंग्रजांच्या निर्दयीपणाची धार बोथट होण्याकरिता कारणीभूत नव्हतं काय असा दुसरा प्रश्न आहे. या सर्व गोष्टी इतिहासाचं सखोल अभ्यास करायची मागणी करतात.

अखेरीस गांधीजींना भारताच्या आत्म्याचं स्थान का मिळालं आणि ते भारताच्या आकांक्षेचे प्रतीक कसे झाले याही प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणं आवश्यक आहे. आपल्या कोट्यवधी देशबांधवांच्या अंतःकरणाचा इतक्या प्रचंड प्रमाणात त्यांना प्रतिसाद कसा मिळवता आला? त्यांच्या आवाहनात कोणती विश्वव्यापी कारणं होती?

असं म्हणतात की महान शिक्षक आपली शिकवणूक कुणालाही सरळ देत नसतात. लोकांच्या जाणिवेत ज्या कल्पना आणि प्रवृत्ती सुप्त असतात त्यांनाच ते केवळ जागृत करत असतात. मग भारताच्या जाणिवेत युगायुगांपासून कोणत्या मूलभूत संकल्पना दडलेल्या होत्या व गांधीजींनी आपल्या जादुई स्पर्शानं त्यांच्या जीवनात त्या इतक्या जलद गतीनं कशा रुजवल्या? याचं उत्तर आहे भारतीय जनमानसाच्या दीर्घकालीन आध्यात्मिक परंपरेत. ती परंपरा भारतीय माणसाच्या रक्तमासात भिनलेली आहे. गांधीजी त्याच परंपरेचे जिवंत स्वरूप होते. अगदी अलीकडच्या काळाबद्दल बोलायचं तर भारताच्या स्वातंत्र्यसमराआधी अन्यायाच्या ज्या

शतकाला भारताला तोंड द्यावं लागलं होतं व ज्यातून भारताला आपल्या स्वराज्याच्या हेतूचा शोध लागला त्यातूनच त्याच्या स्वरूपाचं आकलनही भारताला झालं.

# प्रकरण २ रे

# अन्यायाचं शतक

## १

ज्ञात काळाच्या आधीपासूनच भारतात संस्कृतीचा वास होता ही गोष्ट कुणीही फेटाळून लावू शकणार नाही असा भरपूर निर्विवाद पुरावा हराप्पा आणि मोहोंजोदारो येथील उत्खननातून मिळतो. येशू ख्रिस्ताच्या तीन-चार शतकं आधीपासूनच आपल्या पूर्वजांनी आपल्या देशाला सुसंस्कृत जगात फार पुढचं स्थान मिळवून दिलं होतं. 'महान शहरं आणि उद्योग, न्हाणीघरापासून तर बागा आणि त्यातील पुतळे व दागिन्यापर्यंत सर्व सुखसोयी असलेली घरं पुरातत्ववेत्त्यांनी केलेल्या उत्खननात अतिशय उत्तम प्रकारे जतन करण्यात आलेल्या अवस्थेत आढळली. [विल ड्युरांट, *द केस ऑफ इंडिया*, पृष्ठ ५] अगदी प्राचीन अशा त्या काळातही भारतात सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारांची उत्तम व्यवस्था होती. त्यावरून त्या काळातील भारतातील सामाजिक परिस्थिती 'तत्कालीन बॅबिलियन आणि इजिप्तच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ असल्याचं आढळून येतं.' [सर जॉन मार्शल, *द प्रि हिस्टॉरिक सिव्हिलायझेशन ऑफ इंडस, इल्युस्ट्रेटेड* लंडन, न्यूज, जानेवारी ७, १०२८, १, विल ड्युरांट यांनी द स्टोरी ऑफ सिव्हिलायझेशनमधे दिलेलं उद्धरण, पृष्ठ ३९५]

कनवाळू अशोकानं आपल्या विरोधकांना रणांगणात नमवल्यानंतर आपल्या साम्राज्याच्या सीमा वाढवण्यासाठी शस्त्रांचा उपयोग कधीच करायचा नाही असं ठरवलं. हस्तकौशल्य, व्यापार, उद्योग आणि शेती, शिक्षण व नागरी प्रशासन या बाबतीत इसवीसनपूर्व सहाव्या शतकातील बुद्धकाळापासून तर सोळाव्या शतकापर्यंत भारतानं प्रगतीच्या बाबतीत जगावर ताण केली असं जरी आपण म्हणालो नाही तरी पाश्चात्त्य जगाच्या बरोबरीनं पाऊल टाकलं होतं एवढं मात्र कमीतकमी म्हणता येईलच. पहिल्या एलिझाबेथच्या काळाच्या आधी इंग्लंडचं जेव्हा केवळ एका लहानशा बेटावर राज्य होतं तेव्हा एखाद्या दंतकथेत शोभावं त्याप्रमाणे आपली संपत्ती, संस्कृती आणि कला यांसाठी दक्षिण भारतात विजयनगर प्रसिद्ध होतं

आणि त्याचबरोबर अकबराच्या आधिपत्याखालील आग्रा आणि फतेपूर सिकरी ही शहरं दूरवरच्या प्रवाशांना आपल्याकडे आकर्षित करत होती.

युरोपिअनांनी अठराव्या शतकात भारतात आपली सत्ता जेव्हा प्रस्थापित केली तेव्हा भारत राजकीय दृष्टीनं जरी दुबळा होता तरी आर्थिक दृष्टीनं संपन्न होता. राजघराणी निर्माण व्हायची आणि नष्ट व्हायची, राज्ये कोसळून पडत होती आणि परकीय आक्रमकांच्या लाटांमागून लाटा वायव्येकडून भारतावर येऊन कोसळत होत्या व धूर आणि रक्ताच्या रूपानं आपल्या पाऊलखुणा माग ठेवून जात होत्या. परंतु या सर्व क्रांत्यांच्या आणि राजकीय बदलांच्या उलथापालथीनंतरही भारताच्या अगणित स्वायत्त खेड्यांतून या 'चिरंतन देशातील' सामाजिक आणि राजकीय प्रथांचा प्रवाह तसाच अखंड सुरू होता. सर चार्ल्स मेटकाफ यांच्या म्हणण्यानुसार 'ती लहान गणराज्ये होती. त्यांना आवश्यक असणारी प्रत्येक गोष्ट त्यांच्याजवळ असायची व विदेशांच्या सर्व प्रकारच्या संबंधापासून ती मुक्त होती.' [*द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (अंडर ब्रिटिश रूल), लंडन, सहावी आवृत्ती, पृष्ठ ३८६वर रमेश दत्त यांनी सर चार्ल्स टी मेटकाफ यांच्या इतिवृत्तातून दिलेलं उद्धरण, दिनांक ७ नोव्हेंबर १८३०] त्यांच्या अवतीभवतीची प्रत्येक गोष्ट जेव्हा कोसळत असताना दिसायची तेव्हाही ती टिकून राहायची. भारतीय खेड्यांच्या दुर्दशेचा काळ यायच्याआधी ती खेडी उद्योगानं गजबजलेली होती. तिथं खास त्यांची खास अशी कलाकौशल्ये विकसित झालेली होती की ज्यामुळे भारताचं नाव सर्व जगात प्रसिद्ध झालं. नैसर्गिक साधनसंपन्नतेत शेतकऱ्यांच्या परंपरागत कौशल्याची आणि चिकाटीपूर्ण श्रमाची भर पडली. त्यामुळे त्यांची घरं संपत्तीनं भरलेली होती. परिकथेतील वर्णनाप्रमाणे भारत संपत्तीचं माहेरघर झालेला होता. त्याच्या या प्रसिद्धीमुळेच साहसी युरोपिअन लोकांच्या मनात भारताचं आकर्षण निर्माण झालं व नंतर त्या आकर्षणाचं रूपांतर हावेत होऊन त्या हावेनंच त्यांना भारताचा समुद्र किनारा गाठायला प्रवृत्त केलं.

सोळाव्या शतकात पोर्तुगीज लोकांना पूर्वेशी व्यापार करायचा एकाधिकार मिळालेला होता. हा एकाधिकार त्यांना १४९३ साली बुल ऑफ पोप अलेक्झँडर सहा यांनी दिला होता.

त्यासाठी 'केप बेटाच्या ३७० लीग पश्चिमेला आणि दक्षिणेला एक काल्पनिक रेषेची कल्पना करण्यात आली होती.' त्या रेषेच्या पूर्वेकडील शोध न लागलेले सर्व देश पोर्तुगालकडे देण्यात आले होते व पश्चिमेकडील सर्व देश स्पेनला.

पोर्तुगीजांनी दिलेल्या 'शुल्काच्या मोबदल्यात त्यांच्याकडे एक शतक भव्य पूर्व होती.' पी. इ. रॉबर्ट्स याच्या शब्दात सांगायचं तर पोर्तूगीज नावाड्यांची व्यापाराची पद्धत 'चाचेगिरीपेक्षा थोडीशीच बरी असावी.' स्थानिक लोकांना पोर्तूगीज जी वागणूक द्यायचे ती 'रानटीपणाच्या काळातील रानटीपणापेक्षाही रानटीपणाची होती.'

नंतर आले डच आणि इंग्रज. त्यांनी पोर्तुगिजांच्या एकाधिकाराचा भंग केला. या दोन देशांच्या ईस्ट इंडिया कंपन्यांची स्थापना अगदी लगतच्या काळातच झाली. 'ईस्ट इंडीजमधे व्यापार करू इच्छिणाऱ्या संचालकांनी आणि लंडनमधील व्यापारी मंडळींनी' इसवी सन १६००च्या अखेरच्या दिवशी २१७ भागीदार असलेल्या या कंपनीची 'द गव्हर्नर अँड कंपनी ऑफ मर्चंट्स ऑफ लंडन ट्रेडिंग इन ईस्ट इंडीज' या नावानं इंग्लंडमधील ईस्ट इंडिया कंपनीची लंडनमधे स्थापना केली. फ्रेंचांनी १६६८ ते ९२च्या दरम्यान सुरत, मसुलीपट्टण, पॉन्दिचेरी आणि चंदननगर येथे कारखाने उघडले. त्यानंतर सुरू झाला सत्तासंघर्ष आणि त्यात अखेरीस इंग्रज विजयी झाले आणि अठराव्या शतकाच्या मध्यात त्याच्या सत्तेला आव्हान द्यायचं सामर्थ्य कोणत्याच युरोपिअन स्पर्धकात उरलं नव्हतं.

मोगल साम्राज्याच्या विनाशानंतर राजकीय दृष्टीनं संघटित नसलेला आणि सैनिकी शक्तीत दुबळा असलेला भारत हा हळूहळू सामाजिक ऱ्हासाच्या अवस्थेकडे चाललेला होता. अंतःसंघर्षानं तो विभाजित झालेला होता. 'अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि नैतिक संकल्पना घेऊन आलेल्या विदेशी लोकांशी' या देशातील सत्ताधाऱ्यांचं बुरसटलेलं सैन्य व त्यांची तशीच शस्त्रास्त्रं आणि त्याहूनही बुरसटलेली विचारसरणी यांची कुठेच बरोबरी होऊ शकत नव्हती. [विल ड्युरांट, *द केस ऑफ इंडिया*, पृष्ठ ८] आणि त्यामुळे एक प्राचीन समाजव्यवस्था आणि संस्कृती असलेला देश सांस्कृतिक आणि इतर अनेक दृष्टीनं मागासलेल्या आक्रमकाच्या आक्रमणाला बळी पडला.

## २

या शतकाच्या अखेरीस एका हुशार वकिलानं - ज्याची प्रसिद्धी अजून त्याच्या देशाबाहेर पसरलेली नव्हती - एक वाक्प्रचार प्रचलित केला होता. तो म्हणजे 'अन्यायाचं शतक'. जॉन ख्रिश्चन स्मट्स यांनी लिहिलेल्या एका परिपत्रकाचं ते नाव होतं. ते त्यांनी बोअर युद्धाच्या प्रारंभी लिहिलं होतं. १७९५ साली पहिल्यांदा केप घेतल्यापासून तर जेम्सन रेडच्या प्रकरणापर्यंत त्यांच्या देशातील लोकांवर ब्रिटिशांनी जे अन्याय केले होते त्याचा पाढा वाचण्यासाठी त्यांनी ते परिपत्रक काढलं होतं. याच जेम्सन रेडच्या प्रकरणामुळे बोअर युद्ध झालं होतं.

भारताच्या बाबतीत भारताचं अन्यायाचं शतक प्लासीच्या लढाईपासून सुरू झालं. त्या युद्धात लॉर्ड क्लाईव्हनं केवळ बावीस ब्रिटिश सैनिकांच्या प्राणांचे मोल देऊन बंगालच्या सैन्याला पराभूत केलं होतं. त्यामुळे जॉन कंपनी भारतातील 'सर्वात श्रीमंत प्रांताची वास्तवात सत्ताधीश झाली होती'. त्यानंतर तीनशेहून अधिक बोटीच्या तांड्यानं नदीच्या मार्गानं 'झेंडे फडकवत आणि संगिताच्या तालासुरावर गाणी म्हणत' [लॉर्ड मेकॉले, रिव्ह्यूज, *एसेज अँड पोएम्स,* वार्ड, लॉक अँड कंपनी लि. लंडन, संपूर्ण आवृत्ती, पृष्ठ ५२९] एकाच वेळी चांदीच्या नाण्याचा ८००,००० पौडांचा खजिना मुर्शिदाबाद येथून फोर्ट विल्यमला नेला.  'तोफांचा गडगडाट करण्यात आला, बायांनी एवढा नाच केला की त्यांच्या पायांना फोड आले.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया* मधे क्लाईव्ह यांना आरमार प्रमुखांचे मदतनीस कॅप्टन लॅथम यांच्या पत्राचं दिलेलं उद्धरण, पृष्ठ १९२] क्लाईव्हला त्यातून २३४,००० पौंडांचा वाटा मिळाला. कंपनी आणि इतर व्यक्तींचा ३,०००,००० पौंडांचा फायदा झाला. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया,* पृष्ठ ९१] तीन वर्षांनंतर क्लाईव्ह मायदेशी परतला. त्यावेळी त्याच्या देशातील तो सर्वात श्रीमंत नागरिक असावा. [वरीलप्रमाणे] त्यानं २०० पौंड किंमत असलेले कंपनीचे ५०० समभाग विकत घेतले. त्यांचा उपयोग करून आपण म्हणू तसं मत द्यायला तयार असणारा आपल्या पाठीराख्यांचा एक गट त्यानं संसदेत तयार केला, हाउस ऑफ लॉर्ड्समध्ये त्यानं प्रवेश केला आणि माणसाच्या विवेकबुद्धीला भयानक रीतीनं भ्रष्ट केलं. त्यावेळी अतिशय घाणेरडं समजलं जाणाऱ्या

राजकारणामुळे तो कुप्रसिद्धीस आला. संसदेसमोर त्याच्यावर खटला चालवण्यात आला असताना त्यानं स्वतःचा बचाव आपल्यावर अन्याय होतो आहे अशा संतापात केला. 'त्या देशातील अप्रतिम संपत्तीचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा तुलनात्मकदृष्ट्या जो अतिशय लहानसा भाग मी घेतला त्यातील सौजन्याबद्दल माझंच मला नवल वाटतं' असं त्याचं त्यासंबंधीचं भाष्य होतं. [विल ड्युरांट, *द केस ऑफ इंडिया* मधे व्हिन्सेन्ट स्मिथ, ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ इंडिया (१९२३) मधून दिलेले उद्धरण, पृष्ठ ५०५]

क्लाईव्हनं पाडलेल्या पायंड्याचं अनुसरण करत त्याच्या वारसदारांनी कटकारस्थानं केली, आपले हेतू साध्य करण्याकरिता फसवणूक आणि बनावट दस्तावेजांचा आधार घेतला व त्यासाठी त्यांना सरदारी देऊन गौरवण्यात आलं. उलट बनावट दस्तावेज करण्याच्या कारणासाठी इतरांना तेच लोक फासावर चढवत होते. त्यांनी बळजबरीनं तह लादले, नंतर त्यांनी त्या तहांचा भंग केला, सत्ताधाऱ्यांना त्यांच्या गादीवरून पदच्युत केलं व स्वतःला सोयीस्कर होईल त्याला गादीवर बसवलं. त्यांनी दरवेळी अशा प्रसंगाचा उपयोग 'पूर्वेकडील पॅगोडाचं झाड हलवणं' या वाक्प्रचाराप्रमाणे केला. प्लासीची लढाई होऊन एका दशकाच्या आतच त्यांनी तीनदा नबाब बदलले आणि त्यांना त्यांच्या पदावरून हुसकावून लावलं. क्रांती घडवून आणणं हा त्यांच्यासाठी 'जगातील सर्वात फायदेशीर व्यवसाय ठरलेला होता'. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ९१] कंपनीच्या बंदूकांवर आणि कृपेवर अवलंबून असणाऱ्या बंगालमधे राहणाऱ्या कंपनीच्या नोकरांना या काळात २,१६९,६६५ पौंड 'बक्षीस' म्हणून मिळाले. त्याशिवाय क्लाईव्हला ३२,००० पौंडांची जहागीर मिळाली ती वेगळीच. त्याशिवाय या काळात 'नुकसान भरपाई' म्हणून ३,७७०,८८३ पौंड वसूल करण्यात आले. १७६५ साली संचालकांनी आपल्या सार्वजनिक पत्रात लिहिलं, 'बंगालमधील इंग्रजांनी तह भंग करायचा, भयानक दडपशाहीचा अपराध स्वतःसाठी संपत्ती मिळवण्यासाठी केलेला आहे. संपत्तीच्या अनावर हावेनं आपल्या संपूर्ण नोकरवर्गाला इतक्या मोठ्या प्रमाणात ग्रासलं आहे की त्यांना देशातील शासन, न्याय, आणि कंपनीप्रती कर्तव्य यापैकी कशाचंच भान राहिलं नाही' [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया*, टी. फिशर अनविन, लंडन, (१९०१), पृष्ठ २७-२८]

कालांतरानं कंपनीच्या नोकरांच्या वर्तनाचा पुनर्विचार करताना जेम्स मिल यांनी आपल्या *हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया* या ग्रंथात लिहिलं, 'त्यांच्या स्वार्थानं न्यायभावनेला आणि लाजेला पूर्णपणे गुंडाळून ठेवलं होतं.' [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), केगन पॉल, ट्रेन्च, ट्रुब्नर अँड कंपनी, लंडन, सहावी आवृत्ती, पृष्ठ ३०]

'त्यांना नफ्याची एवढी हाव सुटली होती की कोणत्याही प्रकारच्या विधिनिषेधाची तमा न बाळगता' व्यापारी कंपनीच्या माध्यमातून त्यांनी या उपखंडावरील बलात्काराला सुरुवात केली. जी. टी. गॅरेट आणि एडवर्ड थॉम्पसन या भारताच्या दोन ब्रिटिश इतिहासकारांच्या शब्दांत 'ब्रिटिशांच्या मनात सोन्याची हाव एवढी प्रचंड होती की तिची तुलना केवळ स्पॅनियार्ड ऑफ कोट्र्स पिझारोज यांच्या काळातील वेडाशीच करता येऊ शकते' [इ. थॉम्पसन आणि जी. टी, गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ९१-९२] 'शिकारी आणि स्थलांतर करणारे पक्षी' असं बर्कनं त्यांचं वर्णन केलं. कंपनीच्या लोकांनी वैयक्तिक आणि संस्थागत स्वरूपात देशांतर्गत खाजगी व्यापाराला सुरुवात केली, त्याद्वारे त्यांनी लोकांचं असीम शोषण केलं व आपला फायदा करून घेतला. त्यांनी लोकांकडून बळजबरीनं बाजारभावापेक्षा 'एकचतुर्थांश किमतीला मालमत्ता विकत घेतली'. [*द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (अंडर ब्रिटिश रूल), लंडन, सहावी आवृत्ती, पृष्ठ ३८६वर रमेश दत्त यांनी उद्धृत केलेले नबाब मीर कासीम यांचे मे १७६२ मधे लिहिलेले पत्र, पृष्ठ २३] तसंच 'ज्या वस्तूची किंमत एक रुपयाही येणार नाही ती वस्तू लोकांना पाच रुपयांना विकून लोकांना 'उपकृत' केलं.' [वरीलप्रमाणे] नाका द्यायची सूट केवळ कंपनीला होती. परंतु तसं असतानाही प्रत्येकजण जो नाका द्यायचा तो द्यायला कंपनीचे नोकर नकार द्यायचे, अशा रीतीनं त्यांनी प्रचंड संपत्ती जमवली. आपल्या कोट्यवधीच्या संपत्तीसह मायदेशी परतल्यानंतर ते स्वतःला 'पूर्वेकडील नबाबासारखे' समजायचे, नबाबांच्या घराण्यात लग्न करायचे व त्यांना स्वतःला उमरावाची पदवी मिळायची. हर्बर्ट स्पेन्सर यांनी लिहिलं आहे की पेरू आणि मेक्सिकोमधील त्यांच्यासारख्या लोकांपेक्षा ते काकणभरच कमी असावे. कंपनीच्या संचालकांनीदेखील मान्य केलं की कंपनीच्या नोकरांनी देशांतर्गत व्यापारात जी अफाट संपत्ती गोळा केली ती इतक्या क्रूर आणि दडपशाहीच्या मार्गानं मिळवली की तसं उदाहरण कोणत्याही देशाच्या वा काळाच्या इतिहासात क्वचितच आढळेल. यावरूनच त्यांची

काळी कृत्यं किती भयानक असावी याची कल्पना करता येते. व्हॅन्सीटार्ट सांगतात की 'इंग्रज देशी लोकांना फटक्यांच्या आणि तुरुंगवासाच्या धाकावर हवी ती वस्तू हव्या त्या भावात लोकांना विकत घ्यायला वा विकायला भाग पाडायचे.' [हर्बर्ट स्पेन्सर, *सोशल स्टॅटिस्टिक्स*, पहिली आवृत्ती, पृष्ठ ३६७] यावरून तत्कालीन परिस्थितीच्या भयानकपणाची आपण कल्पना करू शकतो.

कंपनी इतका अधिक लाभांश द्यायची की तिच्या समभागाची किंमत ६४०० पौंड प्रती समभाग झाली. लाचलुचपत सार्वत्रिक झाली होती. 'प्रत्येक माणूस आणि वस्तू या विक्रेय गोष्टी झाल्या होत्या.' [*द केस ऑफ इंडिया*मधे विल ड्युरांट यांनी ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ इंडियामधून दिलेले उद्धरण, पृष्ठ ४९८] 'संचालक वा संचालकांच्या नातेवाइकांना, सरदारांना एवढंच नाही तर राजवंशातील लोकांनाही आपल्या तरुण मित्राचा वा आपल्यावर अवलंबून असणाराचा कंपनीच्या नोकरीत शिरकाव व्हावा म्हणून प्रयत्न करताना काहीही वाटत नसे. एवढ्या अल्पावधीत माणूस कोट्यधीश होऊन परतायची निश्चिती इतर कुठेच नव्हती.' एडवर्ड थॉम्पसन यांच्या शब्दांत 'इंग्लंडमधील राजकारण आणि नैतिकता भ्रष्ट झालेली होती. इंग्रजांची भारताबद्दलची कल्पना अतिशय गलिच्छ झाली होती व तिचा जो कायम परिणाम झाला त्याची आजही आपल्याला पुरेशी कल्पना येऊ शकत नाही .' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ १०८]

भारताची भूमी इतकी सुजलाम सुफलाम आहे की तिच्या संपत्तीत कधीही घट होऊ शकत नाही असं समजल्या जायचं. [वरीलप्रमाणे] त्यामुळे कंपनीच्या संचालकांनी गुंतवणुकीसाठी पैसा पाठवणं बंद केलं. त्यांच्या अंकित असलेल्या तिन्ही राज्यातील सर्व खर्च भागवल्यानंतरही कंपनीच्या शिलकेतून चीन आणि युरोपमधील कंपनीच्या कारभारासाठी लागणारा खर्चही कंपनी बंगालमधून होणाऱ्या बचतीतून पाठवू शकेल असं त्यांना वाटत होतं.... कंपनी व्यापारी होती तशीच सत्ताधारीही होती. 'पहिल्या भूमिकेतून तिनं व्यापाराकडे पूर्ण लक्ष दिलं तर दुसऱ्या भूमिकेतून तिनं भारतातील महसुलाचा अपहार केला.' [श्रीयुत शोर यांचं इतिवृत्त, नंतर लॉर्ड टिगमाऊथ. दिनांक १८ जून १७८९] लोकांनी दिलेल्या करातून जहाजं भरभरून माल खरेदी केला जायचा. भारताला

कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता तो माल देशाबाहेर नेला जायचा. बंगालच्या एकूण महसुलाच्या एकतृतियांश महसुलाचं म्हणजे दहा लाख ते बारा लाख पौंडांचं अशा प्रकारे शोषण करून तो देशाबाहेर नेण्यात यायचा. कंपनीला १५ लाख पौंडांचा फायदा व्हायचा [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), पृष्ठ ४०] आणि कंपनीकडून इंग्लंडच्या खजिन्यात ४००,००० पौंडांची भर पडायची. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ १०९] आणि हे सर्व व्हायचं एक कपर्दिकही न खर्च करता. हे शोषण जवळपास ३० लाख पौंडांचं होतं. मॉन्टेगामरी मार्टीन यांनी दर्शवल्याप्रमाणं 'यावर १२ टक्के चक्रवाढ व्याज धरलं तर ती रक्कम तीस वर्षात ७२३,९९७,९१७ पौंड एवढी प्रचंड होते. व्याजाचा दर कमी धरून वर्षाचं व्याज २,०००,००० धरल्यास पन्नास वर्षात ही रक्कम ८,४००,०००,००० एवढी होते.' [*द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* या ग्रंथात रोमेश दत्त यांनी मॉटेगामरी मार्टीन यांच्या ईस्टर्न इंडिया या ग्रंथाला लिहिलेल्या खंड १ व ३ ला लहिलेल्या प्रस्तावनेतून घेतलेले उद्धरण, पृष्ठ ४०९]

## ३

भारताच्या प्रदेशांवर आक्रमण करून ते आपल्या साम्राज्यात जोडायची प्रक्रिया लॉर्ड वेलस्ली आणि लॉर्ड डलहौसी यांच्या काळात कळसाला पोहोचली. लॉर्ड वेलस्ली यांनी सुरू केलेल्या तैनाती पद्धतीनुसार ज्या राज्यांशी मैत्रीचे तह करण्यात आले त्या राज्यांना तहानुसार आपल्या प्रदेशात आपल्या खर्चानं ब्रिटिश सैन्य ठेवणं आवश्यक करण्यात आलं. यामुळे त्यांना स्वतःचं सैन्य जरी कमी करावं लागलं तरी ते कमी करून ब्रिटिश सैन्य ठेवणं सक्तीचं होतं. तसंच आपल्या राजदरबारात ब्रिटिशांचा निवासी अधिकारी (रेसिडंट) ठेवावा लागत असे. या निवासी अधिकाऱ्याचं काम संबंधित राज्याचं धोरण ब्रिटिशांना अनुकूल राहील हे पाहणं होतं. डेबिलसच्या शब्दात :

*व्यवस्थेच्या नावाखाली निवासी आधिकारी लहान संस्थानाच्या विरोधात मोठ्या राज्याला पाठिंब देत; स्वातंत्र्याच्या नावाखाली लहान सत्ताधाऱ्याच्या वियेधात मोठ्या*

*सत्ताधाऱ्याला मदत करत. इथं एखाद्या रक्तरंजित जुलुमशाहीचा त्याला शोध लागायचा, तर दुसरीकडे कुठं तरी एखादा लहानशा समूहावर दडपशाही करण्यात आली असल्याचं ते सांगायचे...परिस्थिती बदलायची परंतु ज्या व्यक्तीवर विश्वास टाकण्यात यायचा आणि ज्याला संरक्षण देण्यांत यायचं ती निश्चितच इंग्लंडची मित्र असायची.* [विल्हेम डेबिलस, इंग्लंड, पृष्ठ ५९]

सैन्याच्या खर्चासाठी भारतीय राज्यकर्त्यांकडून जे अनुदान मागण्यात यायचं ते बहुधा अन्याय्य असायचं तसंच त्या राज्यांच्या महसुलाच्या उत्पन्नाशी ते पूर्णपणे विसंगत असायचं. आणि 'त्या अनुदानावर पोसल्या जाणाऱ्या सैन्याचे पगार उधळपट्टी वाटावे एवढे प्रचंड होते, त्यांच्या बराकींचा आणि संसाधनांचा खर्च फार मोठा होता.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया* या ग्रंथात रॉबर्ट्स यांच्या इंडिया अंडर वेलस्ली या ग्रथातून घेतलेला पृष्ठ ५७ वरील उतारा, पृष्ठ २३०] राज्यकर्ते जेव्हा त्यावर आक्षेप घ्यायचे व त्या अनुदानाची रक्कम देण्यात कसूर करायचे तेव्हा त्यांचं राज्य खालसा करण्यात यायचं. प्रत्येक गोष्ट अर्थातच बळी जाणाराच्या 'सहमतीनं' अशा पद्धतीनं करण्यात यायची की नंतर 'त्यानं त्यासंबंधी केलेली कुरकूर 'सराईतपणे केलेल्या राजद्रोहाची' आणि 'पौर्वात्यांच्या दुटप्पीपणाची' ठरवता यावी.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ २३२] सर्वोच्च सत्ता कधीही अशा प्रकारच्या 'हलकटपणाच्या वादविवादात पडून खालच्या पातळीवर उतरत नसते' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २३४] बळी जाणाऱ्या सावजाची वर्तणूक नेहमीच 'असमर्थनीय' असायची, आक्षेप 'खोटी निंदानालस्ती करणारे' आणि अर्थातच 'निराधार' असायचे, जेम्स मिल यांनी लिहिलं आहे की जर नुकसान झालेल्या पक्षानं शरणागती पत्करली तर त्याच्या संमतीचं निमित्त पुढं करण्यात यायचं. त्यानं जर तक्रार केली तर आपल्या वरिष्ठाच्या न्यायाला आणि सन्मानाला त्यानं आव्हान दिलं आहे असं समजून त्यानुसार त्याला वागणूक देण्यात यायची. 'एका क्षुल्लक व्यक्तिमत्वाच्या माणसानं' वरिष्ठाशी केलेलं ते वर्तन तथाकथित अपमानास्पद भयानक गुन्हा आहे असं मानण्यात यायचं.' [जेम्स मिल, *हिस्ट्री ऑफ इंडिया*, VI, पृष्ठ १५५]

भारतातील स्थानिक लोकांवर ब्रिटिशांचा अधिकार, प्रभाव आणि सत्ता प्रस्थापित करण्याएवढा भारतीयांवर मोठा उपकार कोणताच नाही अशी स्वतःचीच समजूत घालून लॉर्ड

डलहौसी यांनी भारतीय राजेरजवाड्यांना ‘कोणतीही भावभावना नसलेल्या आणि आतून बाहेरून सैतानी वृत्तीनं भरलेल्या लाकडाच्या ठोकळ्यांना’ द्यावी तशी वागणूक दिली. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ २३६] राज्यांना खालसा करायची त्यांची पद्धती ही ‘आपल्या प्रचंड शक्तीच्या बळावर केलेली साधीसरळ दंडुकेशाही होती. त्यांच्या एका चरित्रलेखकानं दर्शवल्याप्रमाणं याचा अर्थ स्वातंत्र्याचा, राष्ट्रीय चारित्र्याचा व लोकांमधे जे काही सन्माननीय होतं त्या सर्व गोष्टींचा अपहार असला [लाईफ ऑफ सर थॉमस मन्रो, पृष्ठ २४१] तरी त्या गोष्टींचं डलहौसीसाठी काहीच महत्त्व नव्हतं. भारतीयांच्या सर्व वर्गातील लोकांच्या मनामध्ये त्याच्या कार्यपद्धतीबद्दल आणि धोरणाबद्दल जी तीव्र प्रतिक्रिया निर्माण होत होती त्याचं त्याला काहीच भान नव्हतं. ‘ती घृणास्पद पद्धत एवढी सर्वव्यापी होती की तिच्यापासून आणि तिच्यामुळे निर्माण होणाऱ्या घृणेपासून अठराव्या शतकातील इंग्लंड.... आणि ज्या कंपनीचे डलहौसी प्रशासक होते ती कंपनी व तिची नैतिकताही अस्पृष्ट राहू शकली नाही.’ [डुंडा यांचं पत्र, दिनांक २१ मार्च १७९९]

खालसा करण्यात आलेल्या प्रदेशातील सन्माननीय वा किफायतशीर नोकऱ्यांची सर्व संधी भारतीयांसाठी नाकारण्यात आलेली होती. सैन्यातून कमी करण्यात आलेल्या सैनिकांना भिकेवर जगणं भाग पडत होतं. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ २३१] कालौघात जसजसे अधिकात अधिक राज्यं खालसा करण्यात येऊ लागले आणि ब्रिटिशांच्या नियंत्रणात आणण्यात येऊ लागले तसतसं बेकार झालेल्या सैनिकांनी भटक्या टोळ्या तयार केल्या आणि त्यांनी लुटारूपणा व डाकूगिरीच्या कामाला सुरुवात केली. त्यांनी भारतातील दऱ्याखोऱ्यांचा आणि जंगलांचा आश्रय घेतला आणि देशातील बऱ्याच मोठ्या प्रदेशात लोकांना शांतपणे जीवन जगणं अशक्य करून टाकलं. ब्रिटिशांच्या अनेक पिढ्यांनी त्यांचा नायनाट करायचा प्रयत्न करूनही त्यात त्यांना यश येऊ शकलं नाही.

‘कुप्रशानाचं मोजमाप करण्यासाठी एखादा मापदंड हवा असेल तर तो परकीय बंदुकांवर विसंबून असणारे आणि ब्रिटिश रेसिडंटच्या निर्देशानुसार चालणारे स्थानिक राजे आणि त्यांचे

मंत्री यांच्या कारभारातून मिळवता येईल’ असं हेन्री लॉरेन्स यांनी लिहिलं आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३७९] थॉमस मन्रो यांनी तैनाती फौजेच्या संदर्भात लिहिलं आहे :

*ज्या कोणत्या शासनात ती असते त्या शासनाला दुबळं आणि जुलमी बनवायची; समाजातील उच्च वर्गाच्या सर्व उच्च गुणांचा नाश करायची आणि संपुर्ण समाजाला हीन पातळीवर न्यायची तिची प्रवृत्ती असते.... कोणत्याही प्रकारच्या परकीय आणि देशांतर्गत शत्रूपासून राज्याला वाचवण्यास सज्ज असलेल्या ब्रिटिश सैन्याच्या उपस्थितीनं या गोष्टींवरील कोणतीही उपाययोजना अशक्य करून टाकली आहे. आपल्या संरक्षणाकारिता नवख्या माणसावर अवलंबून रहायचं शिकवण्यात आल्यामुळे आणि आपल्या प्रजेच्या घृणेला घाबरायचं काहीही नाही असं त्याला दाखवण्यात आल्यामुळे तो आळशी, क्रूर आणि लोमी झाला आहे, जेव्हा केव्हा तैनाती फौजेची पद्धती सुरू करण्यात येते तेव्हा, जर तेथील रजा फारच कर्तबगार नसेल तर, लगेच देशात ऱ्हास ह्योत जाणाऱ्या खेड्यांचं आणि कमी ह्योत जाणाऱ्या लोकसंख्येचं दर्शन होऊ लागते.* [*लाईफ ऑफ सर थॉमस मन्रो*, पृष्ठ २४७, (ऑगस्ट १२, १८१७)]

टिपू सुलतानपासून म्हैसूर १७९९ साली जिंकण्यात आलं होतं. दोन वर्षांनंतर कर्नाटक खालसा करण्यात आला आणि औंधला आपला काही प्रदेश ब्रिटिशांना देण्यासाठी भाग पाडण्यात आलं. परिणामी निर्माण झालेल्या कुशासनामुळे भारतातील अत्यंत संपन्न दोन प्रांतात असं काही दारिद्र्य निर्माण झालं की त्याची तुलना जगातील कोणत्याही राष्ट्राशी करणं कठीण व्हावं. [विल ड्युरांट, *द केस ऑफ इंडिया* या ग्रंथात लजपत राय यांच्या अनहॅपी इंडिया या ग्रंथातून घेतलेला उतारा, पृष्ठ १६]

ही पद्धती राज्यांसाठी तेवढीच घातक होती जेवढी प्रजेसाठी. ‘ज्या कोणत्या प्रदेशात ती सुरू करण्यात आली त्या प्रदेशात लवकर म्हणा वा उशिरा ब्रिटिश प्रशासनाच्या अंतर्गत येण्याची अपरिहार्य प्रवृत्ती निर्माण झाली. मन्रोंनी लिहिलं आहे :

जरी राजा स्वतः मैत्रीच्या तहाला बांधील राहायला पूर्णपणे अनुकूल असला तरी त्याच्या प्रमुख अधिकाऱ्यात असा कोणी तरी असतोच की जो त्याला मैत्रीच्या करारातून मुक्त व्हायला सांगत असतो. जोपर्यंत देशात परकीय लोकांचं जोखड फेकून द्यायचं सांगणारी उच्च स्वतंत्र

बुद्धिमत्ता असते तोपर्यंत असे सल्लागार सापडतातच. भारतीय लोकांबद्दल माझं चांगलं मत आहे, ते भारताची आत्मज्योत विझू देणार नाहीत असा माझा विश्वास आहे. त्यामुळे माझं मत आहे की तैनाती फौजेची व्यवस्था संपूर्ण भारतात पूर्णपणे पसरवायला पाहिजे व जे कोणतं शासन स्वतःचं संरक्षण करायचा प्रयत्न करील त्याचा नाश करायला पाहिजे. [लाईफ ऑफ सर थॉमस मन्रो, पृष्ठ २४७, (ऑगस्ट १२, १८१७), (तिरपी अक्षरं माझी)]

या पद्धतीनं हे कार्य जवळपास पूर्ण केलं.

ज्या प्रदेशाचा राजा पोटच्या वारसाशिवाय मरण पावत असे त्याचा 'राज्याधिकार संपवायचा' व त्यामुळे ते राज्य खालसा करायचा नियम करून लॉर्ड वेलस्लींनी सुरू केलेलं कार्य लॉर्ड डलहौसींनी पूर्णत्वास नेलं. एकोणिसावं शतक अर्ध संपायच्या आधीच मराठा संघराज्याची सत्ता भंग करण्यात आली (१८१७), सिंध बळकावण्यात आला, शिखांचं राज्य नादारीत काढण्यात आलं आणि पंजाब खालसा करण्यात आला (१८४९). १८५२ साली ब्रह्मदेश जिंकण्यात आला व १८५६ साली औंधवर कब्जा करण्यात आला. दिल्ली येथील मोगल सम्राटांना केवळ नामधारी ठेवण्यात आलं होतं. ब्रिटिश सर्वोच्च सत्ताधारी म्हणून उदयास आले व त्यांना आव्हान देऊ शकणारी कोणतीच सत्ता उरलेली नव्हती.

## ४

यशाबरोबरच उद्धटपणाही आला. ब्रिटिशांना जसजसं सुरक्षित वाटू लागलं तसतशी 'स्वतःच्या अपरिमित श्रेष्ठत्वाविषयीची अधिकाधिक खात्री' ब्रिटिश मनाला वाटू लागली. भारतात राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा पुनर्जन्म झाला असल्याच्या जाणिवेकडे ब्रिटिशांचं लक्ष वेधणं भाग पडायच्या आधी आणि ब्रिटिशांच्या सदसद्विवेकबुद्धीची उच्चतर मागणी व भारतातील परकीय शासनाचं अपरिहार्यपणे होत जाणारं स्खलन यातील विसंगती दृग्गोचर होऊ लागण्याआधी ब्रिटिश प्रशासनानं भारताला लक्षणीय अधिकारी दिले. मन्रो आणि एलफिन्स्टन, माल्कम आणि टॉड यासारखे अधिकारी उच्चतर ब्रिटिश संस्कृतीचं प्रतिनिधित्व करत होते. अशा प्रकारच्या

अधिकाऱ्यांत जनसेवेची श्रेष्ठतम भावना असायची. द्विधावस्थेच्यां पीडेनं पीडित न झालेल्या इंग्रजांनी - जे नंतरच्या काळातील इंग्रजांचं वैशिष्ट्य झालेलं होतं - आपल्याकडे जे काही सर्वोत्कृष्ट होतं ते प्रामाणिकपणे भारताला द्यायचा प्रयत्न केला. हे खरं आहे की त्याही वेळी ते श्रेष्ठत्वाच्या भावनेला जोपासत होते. काहीही असलं तरी भारतीय त्यांच्यासाठी 'तद्देशीय' लोक होते. तरीही त्यांना येथील लोकांबद्दल - ज्यांच्यापासून त्यांच्या श्रेष्ठत्वाला धोका निर्माण होत नव्हता आणि ज्यांच्या अधोगतीला ब्रिटिशांची गुलामगिरीच कारणीभूत आहे असं प्रामाणिकपणे वाटत होतं - एक प्रामाणिक जिव्हाळा वाटत होता.

भारतानं आपलं स्वातंत्र्य गमावण्यापूर्वी भारतातील उत्तम गोष्टींचं दर्शन घेतलेल्या लोकांची सुरुवातीला बरीच संख्या होती. आदरभावना निर्माण करण्यासारखे गुण असलेल्या त्या राज्यांची त्यांना अजूनही आठवण होती. 'जेव्हा गुरखायुद्ध भयावह अवस्थेत होतं, आणि भरतपूरनं आपली अजिंक्यावस्था अजूनही टिकवून ठेवली होती तेव्हा इंग्रज आणि भारतीय शत्रू म्हणून समोरासमोर उभे ठाकलेले असले तरी ते तासंतास बरोबरीच्या नात्यानं मैत्रीपूर्ण गप्पा मारू शकत असत.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ २९९] त्यांच्या प्रभावामुळे विजेत्यांचा फाजील आत्मविश्वास काही काळ आटोक्यात राहिला. परंतु त्यांची संख्या कधीच जास्त नव्हती. त्यांची संख्या कमी होत चाललेली होती. त्यांच्यानंतर आलेली अधिकाऱ्यांची पिढी वेगळ्या प्रकारच्या परंपरांमधे वाढलेली होती. ती भारतीयांकडे 'अवनतावस्थेतील जमात' म्हणून पाहत होती. तिला वाटायचं की शासनानं दिलेल्या अधिकारांशिवाय इतर कोणतेही खास अधिकार मागायचा भारतीयांना अधिकार नाही. त्यासाठी भारतीयांनी कोणत्याही प्रकारची कुरकुर करता कामा नये.' [वरीलप्रमाणे] परकीय सत्तेचं आज्ञापालन तक्रार न करता करणं हाच असा एकमेव गुण होता की जो भारतीय आत्मसात करायची अपेक्षा बाळगू शकत होते. भारतीयांकडे पाहण्याची ब्रिटिशांची वृत्ती असीम तुच्छतेची होती.

लॉर्ड विल्यम्स बेंटिकपर्यंत कोणत्याही भारतीयाला वाहनात बसून गव्हर्नर जनरलच्या बंगल्यावर जायची परवानगी नव्हती. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, या ग्रंथात. टी. जी. पी. स्पीअर, *द नोबल्स*, पृष्ठ १४० वरून घेतलेला उतारा] कोणताही इंग्रज स्टेशनवर जात असताना त्याच्याशी भेटायचा विचारही 'जिल्ह्यातील प्रतिष्ठित माणसांच्या मनाला शिवू शकत नव्हता. इंग्रजांसोबत बसण्याकरता त्यांना भेटण्याकरता भारतीय माणसाला प्रतिष्ठितपणाचा दाखला लागत असे. [वरीलप्रमाणे] कोलकात्यातील 'अनेक लेखनिक प्रत्येक भारतीयानं आपल्याला नमस्कार करावा अशी अपेक्षा करत असत.' [वरीलप्रमाणे]

अत्युच्च पदावरील अधिकाऱ्यांमधेसुद्धा 'अत्याचाराच्या' धोरणावरील विश्वास सार्वत्रिक होता. हेन्री लॉरेन्स यांनी सांगितलेलं सूत्र असं होतं : 'पौर्वात्यांशी वागायची सर्वोत्कृष्ट पद्धती, नव्हे एकमेव पद्धती म्हणजे त्यांच्यावर संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करणं.' चार्ल्स मेपियर यांनी आपला विश्वास असा व्यक्त केला आहे : 'मानवी मनाला जोपर्यंत भीतीनं कमकुवत करण्यात येत नाही तोपर्यंत ते कृतज्ञता आणि प्रेमाला प्रतिसाद देऊ शकत नाही' व तदनुरूप वर्तन करू शकत नाही. 'तद्देशीय सैन्यातील' विल्यम बेंटिक यांनी बंद केलेली फटक्याची शिक्षा त्यांनी परत सुरू केली. त्यांचं मत होतं की 'दोन युद्धांमुळे.... त्यांच्यात जो रानटी वृथाभिमान निर्माण झाला आहे तो याशिवाय नाहीसा करता येणार नाही.' [सर विल्यम नेपिअर, *हिस्ट्री ऑफ जनरल सर चार्ल्स नेपिअर्स अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ शिंदे*, पृष्ठ १७] 'ब्रिटिश सत्तेच्या ऐश्वर्यपूर्ण शक्तीचा योग्य दरारा पौर्वात्य मनात निर्माण करण्यासाठी राणीच्या चित्रावर पडदा टाकून ते झाकून ठेवायची आज्ञा करण्यात आली. खाजगी लोकांना वा नोकरांना ते पाहायची अनुमती नव्हती.' [वरीलप्रमाणे] केवळ उत्तम आचरण करणाऱ्या काही लोकांनाच काही विशिष्ट प्रसंगी सलाम करण्यासाठी ते पाहायची अनुमती होती. जॉन लॉरेन्सच्या पुतळ्यावर खालील अपमानास्पद ओळी कोरण्यात आलेल्या होत्या : 'तुम्हाला लेखणीच्या बळावर शासन केलेलं आवडेल की तरवारीनं? निवडा!' एका शहरातील चौरस्त्यावर असलेला हा पुतळा १९२० अखेरपर्यंत लोकांना अपमानित करत होता आणि जेव्हा त्या विरोधात

आंदोलन झालं तेव्हा केवळ त्यावरील ओळी तेवढ्या दुरुस्त करण्यात आल्या परंतु तो अपमानास्पद पुतळा मात्र तिथेच होता.

ब्रिटिश राज्याच्या या 'संस्थापकांकडून' आणि 'पालकांकडून' एका आश्चर्यजनक अनैतिकतेचं उघडपणे समर्थन आणि आचरण करण्यात येत होतं. नेपियरनं सिंधवर जो कब्जा केला त्याचं वर्णन मेजर ओटराम यांनी 'अत्यंत जुलमीपणाची सकारात्मक लूट' असं केलं आहे. तसंच नेपियरनं आपल्या रोजनिशीत 'एक अत्यंत फायदेशीर, उपयुक्त, परोपकारी लबाडी' असा त्या विजयाचा उल्लेख केला आहे. रॉबर्ट पील यांच्या मंत्रिमंडळानं एकमुखानं नाराजी व्यक्त केल्यानंतर 'ते सोडून देण्यात जो खोडसाळपणा आहे त्यापेक्षा ते ठेवून घेण्यात कमी खोडसाळपणा आहे' [ग्लॅडस्टोन, *कॉन्टेंपररी रिव्ह्यू*, नोव्हेंबर, १८७६] असं बेदरकारपणे म्हणून पील यांनी त्या कृत्याला मान्यता दिली. 'स्वतःचा गळा कापला जायची फिकीर न करणाऱ्या आणि धीटपणे कुणाचाही गळा कापायची तयारी असलेल्या दुष्ट लोकांची टोळी उभारण्याकरिता' महसूल गोळा करायचं काम बन्नूमध्ये प्रसिद्धीस आलेले लेफ्टनंट एडवर्ड्स यांनी कसं थांबवलं; पंजाबमधील विविध जमातींमधे असलेल्या वैरभावनेचा उपयोग करायच्या हेतूने त्यांनी ३००० पठाणांची भरती कशी केली व घटनाचक्राला उलट गती कशी दिली - ज्याचा लाभ बंडाच्या काळात आपल्याला फार चांगला झाला - आणि अखेरीस नंतरच्या काळात शिखांना शस्त्रसज्ज करून दिल्ली येथील मुसलमान आणि हिंदू यांच्याविरुद्ध ज्याप्रमाणे लढाईत त्यांचा उपयोग करून घेतला त्याप्रमाणे वायव्य सरहद्दीवरील मुसलमानांना मुलतान येथील शिखांशी आणि मुसलमानांशी लढण्यासाठी कसं शस्त्रसज्ज केलं' याची नोंद सर जॉन लॉरेन्स यांनी या मूर्खपणाचं कौतुक करत केली आहे.

मोठे वृक्ष छाटायचं धोरण जाणीवपूर्वक स्वीकारण्यात आलेलं होतं. खानदानी लोकांचा जाहीर अपमान करायची वा त्यांचा प्रभाव वा सत्ता कमी करायची कोणतीच संधी सोडण्यात येत नसे. १८५८ साली औंधच्या राजाला पदच्युत करण्यात येऊन त्यांचं राज्य खालसा करण्यात आलं. त्यानंतर संवेदनशून्य मुख्य आयुक्तानं 'राजाच्या कुटुंबासाठी खास राखून ठेवण्यात

आलेल्या निवासस्थानात आपला मुक्काम ठोकला.’ [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ४१०] दिल्लीच्या वारसांकडून त्यांचा राजप्रासाद सोडायचं वचन लॉर्ड डलहौसींनी बळजबरीनं घेतलं. त्यांना ते ब्रिटिश सैन्याच्या वापरासाठी हवं होतं. ‘मूर्खपणाच्या भावनांना महत्त्व दिल्यामुळे राजप्रासादाबरोबरच राजमुकुटही घेता येत नाही’ [वरीलप्रमाणे, पृष्ठ ४११] याच गोष्टीचा त्यांना खेद होता.

५

‘अतिशय परोपकारी हेतू असलेले ब्रिटिश अधिकारीही’ भारतीयांना ‘तुच्छतेनं’ वागवत असत याहून धक्कादायक गोष्ट अजून काहीही नाही अशी होल्ट मॅकेन्झी यांनी १८३० साली नोंद केलेली आहे. [होल्ट मॅकेन्झी यांचं इतिवृत्त, दिनांक १ ऑक्टोबर १८३०, परिच्छेद ६७] या तुच्छतेच्या भावनेमुळे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना भारतीयांच्या भावना, संस्था, मूल्ये आणि भूतकालीन उपलब्धी यापैकी कोणतीही गोष्ट कळू शकली नाही. याच गोष्टी माणसाचा सांस्कृतिक वारसा असतात. त्यामुळे ब्रिटिश प्रशासनानं मूळ भारतीय संस्थांकडे केवळ दुर्लक्षच केलं नाही तर त्यांच्या कामातही विनाकारण ढवळाढवळही केली. त्यामुळे त्यांनी चांगलं करायचा जो काही प्रयत्न केला तोही धुळीस मिळाला. ही मूलभूत सहानुभूती नसल्यामुळे आणि ब्रिटिश शासनाच्या विदेशी प्रकृतीमुळे त्यांनी ज्या कोणत्या चांगल्या गोष्टींचा प्रयत्न केला त्या गोष्टींचं रूपांतर ग्रीक भेटीप्रमाणे अनिष्टात झालं.

परिणामी भारताचा चौतर्फी विनाश झाला. आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक. भारतातील मूळची हस्तकला आणि इतर उद्योग यांचा अंत झाला, त्याची शेती रसातळाला गेली, शैक्षणिक आणि सांस्कृतिक दृष्टीनं त्याची अधोगती झाली आणि त्याचं नैतिक आणि आध्यात्मिक शोषण वर्षानुवर्ष, दशकानुदशकं चालू होतं. त्यामुळे ही भूमी दारिद्र्य आणि उपासमारीची भूमी झाली. प्रसिद्ध प्रशासक डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांच्या म्हणण्यानुसार या देशातील एकतृतियांश लोकांना वर्षभर पोट भरून जेवणसुद्धा मिळत नव्हतं.

युरोपिअन लोक जेव्हा भारतात आले तेव्हा आणि अठराव्या शतकापर्यंत भारत हा धनधान्यानं समृद्ध देश होता व इथल्या कलाकौशल्यातील तज्ज्ञ लोकांनी आश्चर्यजनक वस्तू निर्माण केल्या होत्या. त्यांनी निर्माण केलेली मलमल, रेशमी वस्त्र यांना बफ्त हवा (वाऱ्यानं विणलेले वस्त्र), शबनम (सायंकालीन दवबिंदू) आणि अब रवॉ (वाहतं पाणी) अशा प्रकारच्या नावांनी संबोधत असत व ती वस्त्रं जगप्रसिद्ध होती. ऑर्मे यांच्या कथनानुसार केवळ येथील वस्त्रोद्योगात हिंदुस्थानातील निम्मे लोक गुंतलेले होते. पोर्तूगीज पर्यटक पायरड यांनी सांगितलं आहे की 'केप ऑफ गुड होपपासून तर चीनपर्यंत प्रत्येक स्त्री-पुरुषाचे 'डोक्यापासून तर पायापर्यंतचे' सर्व कपडे भारतीय हातमागाच्या कापडापासून बनलेले असत.'

युरोपिअन लोकांजवळ काही खेळणी आणि थोडसं जाडंभरडं कापड यापेक्षा निर्यात करण्यायोग्य काहीही नव्हतं. त्यामुळे स्वतःच्या राष्ट्रातून सोनं न आणता पौर्वात्य राष्ट्रातील वस्तू विकत घेण्यासाठी क्रयशक्ती कशी मिळवावी हा युरोपमधील सर्व राष्ट्रांसमोर प्रश्न होता. त्यामुळे कंपनीच्या राज्याचा विस्तार करून जे काही कंपनीजवळ भांडवल असेल 'ते उत्पादनाच्या प्रमुख साधनात म्हणजे हजारो गुलामात गुंतवायचा' उपाय डच राज्यपाल कोएन यांनी त्यावर सुचवला. [डब्ल्यू. एच. मोरलँड, *फ्रॉम अकबर टू औरंगजेब*, लंडन, (१९२३), पृष्ठ ६३] त्याची योजना डच सरकारनं फेटाळून लावली, परंतु ती योजना ब्रिटिश सरकारनं मात्र उचलून धरली. अर्कोटचे नबाब सादतुल्ला खान यांच्या दरबारातील इमाम साहेब अतिशय खुशामत करणारे होते. त्यांच्या सहकार्यानं आणि संगनमतानं त्यांच्या प्रशासनातील हवालदारांसाठी एक आज्ञापत्र काढण्यात आलं. त्यामुळे नबाबाच्या राज्यातील सर्व कारागीर वास्तवात गुलामगिरीत ढकलले गेले :

*मद्रासच्या राज्येपालाच्या अखत्यारीतील जे लोक तुमच्या देशात कापड विकत घ्यायला येतील त्या संबंधात हे पत्र आहे. मी तुम्हाला कळवू इच्छितो की बाझी इच्छा आहे की तुम्ही तुमच्या भागातील व्यापाऱ्यांचा कडक आदेश द्यावे की त्यांनी असाच माल विकवा जो मद्रासच्या राज्यपालांच्या लोकांसाठीच केवळ योग्य राहील व त्यांच्याजवळ जे काही कापड असेल ते त्यांच्या गुमास्ताच्या हवाली करावं. ते ज्या गोष्टींना नकार देतील त्या गोष्टी तुम्ही त्यांना अन्यत्र*

*विकायचा परवाना द्या. अशा प्रकारच्या वस्तू राज्यपालांच्या लोकांशिवाय इतर कोणीही खरेदी करू नये याची काळजी घ्या. ही माझी सक्त ताकीद आहे. आणि तुमच्या व्यापाऱ्यांनी आज्ञापालन केल्यास त्यांच्याकडून दंड घ्या.* [जे. तालबॉईज व्हीलर : *मद्रास इन द ओल्डन टाईम्स*, जे. हॅगिनबोथॅम, मद्रास, (१८६२), खंड ३ पृष्ठ १६८]

बंगालमधे तर एवढ्याचीही आवश्यकता नव्हती. वास्तवात कंपनीच तिथं सर्वेसर्वा होती. तिला हवं तसं ती तिथं करू शकत होती. तिच्या नोकरांनी विणकरांना बळजबरीनं करारावर सह्या करायला भाग पाडलं. त्या करारानुसार विणकरांना कंपनीला विशिष्ट किंमतीवर विशिष्ट प्रमाणात माल देण्याची सक्ती करण्या आली होती. त्यासाठी विणकरांच्या संमतीची कंपनीला आवश्यकताच वाटली नव्हती. 'विणकरांनी जर ते पैसे घेण्यास नकार दिला.... तर बळजबरीनं ते त्यांच्या कमरेत खोसण्यात येत.... आणि फटके मारत त्यांना हाकलून देण्यात येत असे. कंपनीच्या गुमास्ताच्या वहिखात्यात यापैकी अनेक विणकरांची नावं नोंदवण्यात आलेली होती व त्यांना इतर कुणाहीसाठी काम करायची अनुमती नव्हती. त्यांची एका मालकाकडून दुसऱ्या मालकाकडे अनेक गुलामांप्रमाणे बदलीही करण्यात येत असे.' [विल्यम बोल्ट्स, *कंसिडरेशन्स ऑन इंडिया अफेअर्स*, लंडन, (१७२२), पृष्ठ १९१-९४] त्यांच्यावर लादण्यात आलेल्या या कराराचं पालन त्यांनी केलेलं नाही असं आढळल्यास 'त्यांचा माल जप्त करण्यात येऊन तो त्याचवेळी तिथल्या तिथेच नुकसानभरपाईसाठी विकण्यात येत असे.' [वरीलप्रमाणे] बोल्ट्स यांनी नोंदवलं आहे की 'त्यांना रेशीम विणता येऊ नये म्हणून त्यांची बोटं कापल्याचीही उदाहरणं सापडतात. [वरीलप्रमाणे]

जी गोष्ट कापडाविषयी तीच गोष्ट या देशात निर्माण होणाऱ्या इतर साहित्याविषयी आधी त्यांची व्यापारी लाभासाठी पिळवणूक करण्यात यायची आणि नंतर ब्रिटिशांचं उत्पादन खपावं म्हणून त्यांना संपवण्यात आलं. त्यासाठी भारतात तयार झालेल्या मालावर प्रतिबंधक कर लादण्यात आले तसंच भारतीय कारागिरांवर अतिशय जबर कर लावण्यात आले. त्यापैकी अतिशय कुप्रसिद्ध कर म्हणजे मुतर्फा होता. 'उत्पादनाच्या प्रत्येक प्रक्रियेवर, प्रत्येक उपकरणावर, कच्च्या आणि तयार झालेल्या मालावर कर लावण्यात आलेला होता.' त्यामुळे

उत्पादकांना आपल्या मालाच्या किमती अनेकदा सहापट वाढवाव्या लागल्या. ज्या स्वेच्छाधिकारानुसार ते कर गोळा करायचे त्या अधिकारानुसार त्यांना अमर्याद पिळवणूक आणि छळणूक करायचा अधिकार मिळायचा. आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे कंपनीच्या नोकरांना स्वतःच्या घरी जाण्यासाठीही हा कर गोळा करता यायचा. या गोष्टींची एवढी धास्ती निर्माण झाली होती की आजही दक्षिण भारतात घराबाहेर रुईचा गोळा पडलेला आढळला तर ती गोष्ट अनिष्टसूचक आहे असं खेड्यातील लोक मानतात. रुई दिसली की त्या वस्तीत कापडाचं उत्पादन होत असावं असा संशय कंपनीच्या लोकांना यायचा व मग त्या गावातील खाजगी घरांवर धाड पडायची. या काळापासूनच लोकांच्या मनात ही अंधश्रद्धा रुजली. त्यावेळी लोकांना किती अपमान सहन करावा लागत असेल याचं वर्णन करण्यापेक्षा कल्पनाच केलेली बरी.

इंग्लंडनं भारताच्या गृहोद्योगाचा जो विनाश केला त्याचं वर्णन इतिहासकार एच. एच. विल्सन यांनी एक दुःखद घटना म्हणून केलं आहे. ते लिहितात :

एका साक्षीत (१८१३) असं सांगण्यात आलं की भारतातील सुती आणि रेशमी कापड इंग्लंडच्या बाजारात काही काळापर्यंत ५० ते ६० टक्के नफ्यानं विकता येऊ शकेल. व तरीही ती किंमत इंग्लंडमधे तयार करण्यात आलेल्या कापडापेक्षा कमी राहील. त्यामुळे त्या मालावर ७० ते ८० टक्के कर लावून इंग्लंडच्या मालाला संरक्षण देणं आवश्यक झालं. असं करण्यात आलं नसतं व अशा प्रकारे प्रतिबंधक कर लावून निर्बंध घालण्यात आले नसते तर पेस्ले आणि मँचेस्टर येथील गिरण्या सुरुवातीलाच बंद पडल्या असत्या आणि मग विजेवर वा वाफेवरही त्यांना सुरू करणं क्वचितच शक्य झालं असतं. भारतीय निर्मात्यांचा बळी देऊन त्या सुरू करण्यात आल्या. भारत जर स्वतंत्र असता तर भारतानं जशास तशी कृती केली असती. ब्रिटिश मालावर प्रतिबंधात्मक कर लावला असता व अशा प्रकारे आपल्या उद्योगाला विनाशापासून भारतानं वाचवलं असतं. स्वसंरक्षणाचं कृत्य करायचा भारताला अधिकार नव्हता. तो परक्यांच्या मर्जीवर अवलंबून होता. कोणताही कर न भरता ब्रिटिश माल त्याच्यावर लादण्यात आला. स्पर्धकाला नमवण्यासाठी आणि अंतिमतः त्याला संपवण्यासाठी परदेशी निर्मात्यांनी राजकीय

अन्यायाचा आधार घेतला. समतेच्या तत्त्वावर तो त्याच्याशी स्पर्धा करूच शकत नव्हता. [मिल, *हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया,* विल्सन यांचे *कंट्यूनिएशन बुक १,* प्रकरण ८, टीप]

अशा प्रकारे भारताला कच्च्या मालाचा निर्यातक बनण्यासाठी व ब्रिटिश मालाचा उपभोक्ता बनण्यासाठी बाध्य करण्यात आलं. आपल्या वंशपरंपरागत उपजीविकेच्या साधनापासून वंचित करण्यात आल्यामुळे व इतर कोणतीही पर्यायी व्यवसायाची संधी नसंल्यामुळे कोट्यवधी कारागीर मरण पावले. लॉर्ड बेंटिक यांनी १८३४ साली लिहिलं की 'तिथल्या विपन्नावस्थेची तुलना व्यापाराच्या इतिहासात क्वचितच करता येईल. भारताच्या मैदानी प्रदेशात कापड विणकरांची हाडं चोहोकडे पसरलेली आहेत.' [मार्क्स यांनी *कॅपिटलमधे* दिलेले उद्धरण, एव्हरग्रीन आवृत्ती, पृष्ठ ४६२]

## ६

सूचित करण्यात. येत असते की अठराव्या शतकातील इंग्लंडच्या औद्योगिक प्रगतीसमोर भारतातील उद्योग नाही तरी मेलेच असते. शक्य आहे, परंतु इतिहासात अपरिहार्य असं काहीच नसते. सोशल हिस्ट्री ऑफ इंग्लंड या ग्रंथात कनिंगहॅम यांनी दर्शवलं आहे की शोध अनेकदा योगायोगानं लागत असतात, परंतु त्याच्या उदयासाठी अठराव्या शतकात इंग्लंडमधे अलौकिक बुद्धिमान संशोधकांचा खास करून एकाएकी झालेला स्फोट कारणीभूत आहे व त्याचं कारण सांगता येऊ शकत नाही असं म्हणणं पुरेसं होणार नाही. नेमकं सांगायचं तर आर्क राईट आणि वॅट हे सुदैवी होते कारण त्यांच्या आगमनासाठी काळ अनुकूल होता. असं म्हणायचा उद्देश त्यांचं महत्त्व नाकारायचं आहे असं नाही असं ते पुढं सांगतात. विल्यम ली आणि डोडो डडली यांच्या काळापासून अनेक संशोधक निर्माण झालेले आहेत. परंतु त्यावेळी यशस्वी होण्याकरिता परिस्थिती अनुकूल नव्हती. 'महागडी साधनं आणि प्रक्रिया यांचा प्रारंभ करण्यासाठी फार मोठा खर्च येत असतो. एका माणसाला, मग तो कितीही उत्साही असला तरीही, ती परवडणारी गोष्ट नसते. त्याच्याजवळ जेव्हा भरपूर संपत्ती असते आणि फार मोठ्या बाजारात तो प्रवेश करू

शकतो तेव्हाच त्यासाठी तो प्रयत्न करू शकतो.' [डब्ल्यू. कनिंगहॅम, डी. डी., *ग्रोथ ऑफ इंग्लिश हिस्ट्री अँड कॉमर्स*, (१९२९), पृष्ठ ६१०-११]

उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामग्रीमधे सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेलं अतिरिक्त भांडवल सामान्य व्यापारातून सतराव्या शतकातील व्यापारी कंपन्यांमधे पुरवायची क्षमता नव्हती. त्यामुळे अठराव्या शतकात आवश्यक परिस्थिती निर्माण होईपर्यंत यांत्रिक शोधांना व्यावहारिक यश येऊ शकलं नाही. कनिंगहॅम यांच्या कथनानुसार 'यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट होती पैशाचा प्रचंड साठा. आणि केवळ साठवलेला पैसा नव्हे तर चलनात असलेला पैसा. बंगालमधील चांदीच्या आगमनामुळे केवळ पैसाच वाढला नाही तर त्याच्या चलनालाही गती मिळाली'.

प्लासीपासून तर वाटर्लूपर्यंतच्या ५७ वर्षात भारतातून इंग्लंडमधील बँकांमधे पाठवण्यात आलेली रक्कम ५००,०००,००० ते १,०००,०००,०००च्या दरम्यान असावी असा हिशेब करण्यात आला आहे. द लॉ ऑफ सिव्हिलायझेशन अँड डिके या ग्रंथाचे लेखक ब्रूक अॅडम्स लिहितात की 'ग्रेट ब्रिटनला कोणी स्पर्धकच नसल्यामुळे कोणत्याही गुंतवणुकीपासून जेवढा फायदा झाला नाही तेवढा ब्रिटिशांनी भारताच्या लुटीतून मिळवला.' इंग्लंडने केलेल्या बचतीमुळे त्याने दिलेल्या कर्जातील वाढीच्या आकडेवारीची आणि त्याच्या वेगात वाढत जाणाऱ्या उधार देण्याच्या पद्धतीची कारणमीमांसा करताना ब्रूक अॅडम्स भाष्य करतात:

पत पुरवठा हे शक्तीनं निवडलेलं वाहन आहे... आणि त्या व्यवस्थेचा पाया घालण्यासाठी लंडनमधे पुरेसा खजिना जमा होत नाही तोच त्यात अलौकिक वेगानं वाढ झाली.

बँक ऑफ इंग्लंडचा पाया घातल्यानंतर साठ वर्षांपेक्षाही अधिक काळ तिची लहानात लहान नोट २० पौंडांची होती. त्याचप्रमाणे १७५० साली प्रांतांमधे बँकेच्या १२ शाखाही नव्हत्या. परंतु १७५९ साली बँक ऑफ इंग्लंडनं पहिल्यांदाच १० आणि १५ पौंडाच्या नोटा छापल्या. जवळपास प्रत्येक शहरात तिच्या शाखा होत्या. देशामधे खाजगी पेढ्यांनी हुंड्याचिठ्ठ्यांद्वारे किती तरी पतपुरवठा निर्माण करायला सुरुवात केलेली होती. [ब्रूक्स अॅडम्स : *लॉ ऑफ सिव्हिलायझेशन अँड*

*डिके*, स्वान सोनेशिअन अँड कंपनी लि., लंडन, (१९००), पृष्ठ २६४] प्लासीचं युद्ध होईपर्यंत आणि त्यात विजय मिळेपर्यंत बेन्स यांच्या कथनानुसार 'यंत्रादी सामग्रीचा विचार' करता लँकेशायर येथील वस्त्रोद्योग भारताच्या बरोबरीत होता परंतु कौशल्याच्या बाबतीत तो किती तरी मागे होता. [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया,* टी. फिशर अनविन लि., (लंडन), १९०१, पृष्ठ ३०-३१] त्याचप्रमाणे १७५०च्या दरम्यान इंधनासाठी जंगलांचा वापर करण्यात आल्यामुळे इंग्लंडचा पोलाद उद्योग डबघाईला आलेला होता. 'त्यावेळी इंग्लंडला आवश्यक असलेलं चारपंचमांश पोलाद स्वीडनमधून येत असे.' प्लासीची लढाई १७५७ साली झाली. त्यानंतर लगेचच बंगालमधील चांदी यायला सुरुवात झाली आणि त्यानंतर ज्याची तुलनाच करता येणार नाही इतक्या वेगात बदल होऊ लागला असे ब्रूक अॅडम्स यांचे उद्गार आहेत. १७६० साली धावत्या धोट्याचा शोध लागला. याच वर्षी लाकडी इंधनाच्या ठिकाणी भट्ट्यांमधे कोळशाच्या वापराला सुरुवात झाली आणि कार्टराईटनं १७३५ साली विजेवर चालणाऱ्या मागाचा शोध लावला.

*परंतु या यंत्रांबुळे जरी काळ फार गतीनं पुढं जाऊ लागला तरी तेवढ्यामुळे उद्योगाला काही खरोखरी चालना मिळाली नाही. केवळ शोधांचा विचार करायचा तर ते स्वतः निष्क्रिय असतात. अनेक शोध तर शतकंशतकं सुप्तावस्थेत पडून असतात. त्यांना कार्यरत करण्यासाठी पुरेशा शक्तीचा सरा गोळा व्हायची ते वाट पाहत असतात.... वॅटच्या जन्माच्या बराच काळ आधी वाफेवर प्रयोग करण्यात आलेले होते. त्या कल्पनेला जन्म देण्यासाठी वॅटला फार कमी श्रम करवे लागले. परंतु ती कल्पना खपवण्यासाठी वॅटला जन्म खर्ची घालावा लागला. भारतीय संपत्तीचा पूर आल्यामुळे ऋणव्यवस्थेत झालेल्या वाढीपुर्वी यासाठी पुरेसी शक्ती गोळा झालेली नव्हती. आणि जर वॅट ५० वर्षांआधी या जन्मला असता तर तो आणि त्याचा शोध या दोघांचा एकाच वेळी अंत झाला असता. आपल्या काळातील अतिशय निष्णात आणि उत्साही कारखानदार मॅथ्यू बोल्टन यांचा ज्या अडचणीत काम करावं लागलं त्यामुळे ते जवळपास नामशेष व्हायच्या अवस्थेत आले होते. बोल्टन यांनी बर्मिंगहॅम येथे जे काम केलं ते केलं नसतं तर एंजिन निर्माणच करता येऊ शकलं नसतं याबाबत कोणीही शंका घेऊ शकत नाही. आणि*

*तरीही १७६०च्या आधी ह्या कामाला सुरुवात करता येऊ शकली नाही.* [ब्रूक्स अॅडम्स : *लॉ ऑफ सिव्हिलायझेशन अँड डिके*, स्वान सोनेशिअन अॅड कंपनी लि., लंडन, (१९००), पृष्ठ २५९-६०, (तिरपी अक्षरं माझी)]

भारतीय संपत्तीचं इंग्लंडद्वारे शोषण आणि ब्रिटिश उद्योगाची भरभराट ह्यांच्यातील कार्यकारणभाव हा असा आहे. तो केवळ योगायोग नाही.

पूर्वेकडून आलेला संपत्तीचा पूर, त्यामुळे देता येऊ शकलेली कर्ज यामुळे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. औद्योगिक क्षेत्रांत वर्चस्व मिळवण्यासाठी आणि समुद्रपार प्रदेश ताब्यात घेण्यासाठी त्यामुळे इंग्लंडला प्रारंभिक मदत झाली. या झोंबाझोंबीत इंग्लंडला आपल्या अतिरिक्त उत्पादनासाठी सुरक्षित बाजारपेठ मिळाली तसंच कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचीही शाश्वती झाली. अशा प्रकारे साम्राज्यवादी विस्तारवादी युगाला सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या इतिहासातील ही सर्वात प्रमुख घटना आहे. त्यामुळेच जागतिक घटनाक्रमाला - वैशिष्ट्यानं आफ्रिका आणि आशिया खंडातील – दिशा मिळाली.

प्रत्येक ठिकाणी कमीअधिक प्रमाणात कार्यपद्धती जवळपास सारखीच होती. व्यापाराच्या मागोमाग ध्वजही गेला, कारखान्यांचं रूपांतर किल्ल्यात झालं आणि आर्थिक परावलंबनामुळे संबंधित जनता गुलामगिरीत ढकलली गेली. ऐतिहासिक दृष्ट्या स्वातंत्र्यासाठी भारतानं केलेला अहिंसक संघर्ष या कार्यपद्धतीला उलट दिशा देणारा होता. स्वाभाविकपणेच चरखा त्याच्या सर्व ध्वन्यर्थासह या आंदोलनाचं प्रतीक बनला. वसाहतवादी आणि साम्राज्यवादी विस्तारवादाला ज्या प्रक्रियेनं गती दिली होती त्या प्रक्रियेला उलंट गती देण्याचं कार्य भारताच्या तीस कोटी जनतेनं जाणीवपूर्वक चरख्याला नवजीवन दिल्यामुळे होईल असं गांधीजींनी जाहीर केलं. त्यामुळे दडपशाहीला बळी पडलेल्या परंतु त्यातून मुक्त होऊ पाहणाऱ्या जगातील सर्व जनतेसाठी चरख्याचा संदेश आहे.

७

भारतीय हस्तोद्योगाच्या विनाशामुळे बहुतांश भारतीय जनतेसाठी शेती हाच एक उदरनिर्वाहाचा व्यवसाय राहिला. परंतु ब्रिटिशांच्या सत्तेखाली हे साधनसुद्धा लवकरच शुष्क होऊ लागलं. ब्रिटिशांच्या आधी भारतात जमीन ही विक्रेय वस्तू नव्हती. तिला गहाण ठेवता येत नव्हतं, कर्ज परत करता आलं नाही वा देणं देता आलं नाही तरी ती जप्त केली जाऊ शकत नव्हती, वहितदार जर आपलं ऋण परत करायला असमर्थ ठरला तर त्याला तुरुंगात टाकलं जाऊ शकत असे, त्याला यातना दिल्या जाऊ शकत असत वा लहरी सत्ताधारी त्याचा छळ करू शकत असे. परंतु त्याच्या मुलाबाळांना उदरनिर्वाहाच्या साधनापासून वंचित करता येऊ शकत नसे. एखादा दुर्दैवी वा उधळा शेतकरी एखादवेळी दारिद्य्रावस्थेत जाऊही शकत होता परंतु शेती व्यवसाय मात्र टिकून राहत होता. ब्रिटिश राज्यपालांनी, जे स्वतः जमीनदार वर्गातून आले होते, जमिनीच्या मालकीची इंग्रजी संकल्पना भारतात सुरू केली. त्याचबरोबर उत्पन्नाच्या ठराविक प्रमाणात शेतसारा घेणं त्यांनी बंद केलं आणि निश्चित स्वरूपात शेतसाऱ्याची रोख रक्कम ठरवण्यात आली. त्यामुळे संपूर्ण चित्रच बदललं. पहिल्यांदाच जमीन क्रयविक्रयाची वस्तू झाली. ती गहाण टाकली जाऊ शकत होती वा जप्त केली जाऊ शकत होती. 'ग्रामसमुदायाचं जमिनीवरील व तिच्या उत्पादनावरील संपूर्ण नियंत्रण काढून घेणारी जमीनदारीची प्रथा सुरू झाल्यामुळे ग्रामसमाजाची सामुदायिक जीवनपद्धती संपुष्टात आली. परिणामी हळूहळू सामुदायिक सेवाही बंद झाल्या' असं जवाहरलाल नेहरू सांगतात. [जवाहरलाल नेहरू, *डिस्कव्हरी ऑफ इंडिया*, द सिग्नेट प्रेस, कोलकाता, (१९४६), पृष्ठ ३५८] जमिनीवरून हुसकावून लावलं जायच्या भीतीची तरवार सतत डोक्यावर लटकत असल्यामुळे वहितदारावर भरमसाट लागवड लादता येत असे. त्याची जमीन अधिकाधिक गहाण पडू लागली. त्याची परिणती झाली वाढत्या दारिद्र्यात आणि शेती व्यवसायाच्या विनाशात.

गेल्या तीन शतकात पूर्वेला भेट देणाऱ्या सर्व युरोपिअन प्रवाशांनी सांगितलं आहे की मोगल साम्राज्यांतर्गत भारतातील शेतीव्यवसाय तसंच 'संपत्ती, लोकसंख्या आदी बाबतीत

भारताची परिस्थिती ही त्यांनी युरोपमधे पाहिलेल्या परिस्थितीपेक्षा किती तरी अधिक होती.' त्यामुळे ते आश्चर्यचकित झाले होते असं लेफ्टनंट कॉलनल ब्रिग्ज यांनी १८३० साली निदर्शनास आणून दिलं आहे. [जॉन ब्रिग्ज, *प्रेझेन्ट लॅन्ड टॅक्स इन इंडिया*, लंडन, (१८३०), पृष्ठ ३९३] बोल्ट यांच्या कथनानुसार 'ब्रिटिशांच्या राज्यात शेतसारा एवढा जास्त होता आणि तो वसूल करायची पद्धती एवढी जबर होती की अनेकदा लोक तो भरण्यासाठी आपली मुलंसुद्धा विकत' [विल्यम बोल्ट्स, *कंसिडरेशन्स ऑन इंडिया अफेअर्स*, लंडन, (१७२२), पृष्ठ १९१-९४] १७७० साली पडलेल्या भयानक दुष्काळामुळे बंगालमधील एकूण लोकसंख्येच्या एकतृतियांश म्हणजे १ कोटी लोक मारले गेले. तरीही शेतसाऱ्यात १० टक्के वाढ करून तो वसूल करण्यात आला. ज्या देशद्रोही लोकांनी 'मरण्याचं पातक' केलं होतं त्यांच्या शेतसाऱ्याची भरपाई जिवंत लोकांना करावी लागली.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ११०] हाउस ऑफ कॉमन्सच्या सिलेक्ट कमेटीसमोर बोलताना फिलिप फ्रँसिस म्हणाले की बंगाल आणि बिहारच्या भूमीतील कमीतकमी दोनतृतियांश भूभाग निर्मनुष्य व्हायची शक्यता आहे. 'भित्रा हिंदू छळाला तोंड देऊ शकत नसल्यामुळे पळ काढत आहे.' [सिलेक्ट कमेटीचा अकरावा अहवाल, १७८३, परिशिष्ट ओ] जवळच्या औंध प्रांतातील कर न भरू शकलेल्या लोकांना .... 'भारताच्या रणरणत्या उन्हात उघड्या पिंजऱ्यात बंद करण्यात आलं होतं. वडिलांना मुलांना विकायला भाग पाडण्यात आलं होतं.' [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया (अंडर अर्ली ब्रिटिश रूल)*, पृष्ठ ७६] असह्य झालेल्या वसुलीमुळे लोकांनी जेव्हा पळायचा प्रयत्न केला तेव्हा सैन्य पाठवण्यात येऊन त्यांना अटकाव करण्यात आला. चोहोकडून कोंडमारा होत असल्यामुळे त्यांनी प्रतिकार केला. 'संतप्त सैनिकांनी युद्धकला माहीत नसणारांना पराभूत केलं आणि त्यानंतर सुरुवात झाली भयानक छळवादाला आणि देहदंडाला.' [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया (अंडर अर्ली ब्रिटिश रूल)*, पृष्ठ ४०]

जिथे कुठे ब्रिटिशांची सत्ता पसरली तिथे विनाश गेला. आणि ती जेवढा अधिक काळ तिथं कायम राहिली त्या प्रमाणात शेतकऱ्यांची अवस्था बिघडली आणि सर्वसामान्य लोकांचं दारिद्रय वाढलं. १८ सप्टेंबर १७८९च्या इतिवृत्तांत लॉर्ड कॉर्नवालिस लिहितात : 'मी निश्चितपणे सांगू

शकतो की हिंदुस्तानातील कंपनीच्या अधिकारातील एकतृतियांश प्रदेश जंगल आहे व त्यात केवळ श्वापदं राहतात.' [लॉर्ड कॉर्नवालीस यांचं इतिवृत्त, दिनांक १८ सप्टेंबर १७८९]

१७६४साली बंगालच्या अखेरच्या मोगलला पदच्यूत करण्यात आलं. तीस वर्षांच्या काळात ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी मागीलपेक्षा तिप्पट महसूल गोळा केला. [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), प्रास्ताविक पृष्ठ ix] अलाहाबाद आणि १८६२ साली औंधच्या नबाबांनी ब्रिटिशांसाठी सोडलेल्या इतर काही संपन्न जिल्ह्यातून तीन वर्षांतच शेतसारा १,३५२,३४७ पौंडांपासून तर १,६८२,३०६ पौंडांपर्यंत वाढवण्यात आला. मुंबई प्रांतात १८१७ साली मराठ्यांपासून जिंकलेल्या प्रदेशातील शेतसारा ब्रिटिशांच्या राज्यात काही वर्षातच जवळपास दुप्पट झाला. म्हणजे ८००,००० पौंडांपासून तो १,५००,००० पौंडांपर्यंत गेला. मुंबई प्रांतात अशी काही उदाहरणं होती की जिथे एकूण उत्पन्नापेक्षा शेतसारा अधिक होता असं मुंबई प्रशासनिक अहवाल सांगतो. 'गरीब बिचाऱ्या शेतकरी वर्गाकडून जास्तीत जास्त घ्यायचा कायदेशीर वा बेकायदेशीर प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी काही प्रसंगी त्याचा छळही करण्यात आला. तो छळ अनेकदा इतका क्रूरपणाचा असायचा की लोक बंड करायला प्रवृत्त व्हायचे.... अनेकांनी पळ काढला व शेजारील राज्यात आश्रय घेतला. जमिनीचा फार मोठा भाग पडीत राहिला, आणि काही जिल्ह्यात लागवडीयोग्य जमिनीपैकी केवळ एकतृतियांश जमीनच लागवडीखाली होती.' [मुंबई प्रशासन अहवाल १८७२-७३, पृष्ठ ४१]

भारताचा विस्तृत दौरा केल्यानंतर बिशप हेबर यांनी १८२६ साली लिहिलं की कंपनीच्या प्रदेशातील शेतकरी वर्गाची अवस्था एकूण पाहता वाईटच होत चाललेली होती. संस्थानिकांच्या राज्यातील लोकांपेक्षा त्यांचा उत्साहभंग अधिक झालेला होता. कोणताही तद्देशीय राजा आपण जेवढ्या शेतसाऱ्याची मागणी करतो तेवढ्या शेतसाऱ्याची मागणी करत नाही.' ब्रिटिश वसाहत विषयक दुसरे एक अधिकारी कॉलनल ब्रिग्ज - जे भारतातील शेतसारा या विषयातील तज्ज्ञ होते आणि ज्यांनी या विषयावरील प्रचंड ग्रंथ लिहिला आहे - यांनी आपल्या महान ग्रंथातून दर्शवलं आहे की जमिनीपासून मिळणारा सर्व नफा हडप करायच्या प्रयत्नामुळे शेतकऱ्यांजवळ

आपल्या उदरभरणासाठी क्वचितच काही शिल्लक राहत असे. ब्रिटिश राज्यातील भारतीयांच्या दारिद्र्याचं तेच कारण आहे. ते लिहितात, 'माझा प्रामाणिकपणे विश्वास आहे की कायद्यानुसार राज्य करणारं इतर कोणतंही शासन, मग ते हिंदूंचं असो की मुसलमानांचं, बहुसंख्य लोकांच्या समृद्धीकडे एवढं दुर्लक्ष करू शकणार नाही जेवढं या प्रशासनात करण्यात येतं.... भारतात जसा शेतसारा आहे तसा आशियातील वा युरोपातील कोणत्याही सरकारनं लावलेला मला माहीत नाही.' [जॉन ब्रिग्ज, *प्रेझेन्ट लॅन्ड टॅक्स इन इंडिया*, लंडन, (१८३०), पृष्ठ ३९३, ४१०, ४१४ आणि ४१६]

## ८

ब्रिटिशांनी सुरू केलेल्या एकीकृत न्यायव्यवस्थेनुसार सर्व समान आहेत असं मानण्यात आलेलं होतं, जर खरोखरच तसं असतं आणि त्या व्यवस्थेतील 'समता बनावट नसती आणि वांशिक श्रेष्ठता ब्रिटिश शासनाचा पायाभूत आधार नसती तर ती न्यायव्यवस्था कदाचित ब्रिटिश शासनाचा मानाचा तुरा ठरली असती. (पाहा प्रकरण ५, विभाग ३) ब्रिटिश न्यायलयांचा उपयोग अस्पृश्यतेसारख्या अनिष्ट परंपरांना जपण्यासाठीच करण्यात आला. तथाकथित उच्चवर्णीय लोकांबरोबर कनिष्ठ वर्गीयांनी नागरी समतेचा हक्क प्रस्थापित करायचा जर प्रयत्न केला तर त्यांना तुरुंगात पाठवून ती शापरूप परंपरा टिकवण्यासाठीच त्या न्यायव्यवस्थेचा उपयोग करण्यात आला. अशाप्रकारे त्या व्यवस्थेनं परंपरांना कायद्याचा आधार दिला. त्यामुळे वास्तवात समता निर्माण होण्याऐवजी सामाजिक समता निर्माण करायच्या मार्गातील ती अडसरच ठरली. धर्मात काळानुरूप सुधारणा करायचा आणि त्यात जे काही दोष शिरले असतील ते दूर करायचा त्या धर्मात जन्मलेल्या लोकांना जो जन्मसिद्ध अधिकार होता त्यात ब्रिटिश राज्याच्या धार्मिक तटस्थतेमुळे वास्तवात अडथळाच निर्माण झाला.

अनुभवानं वारंवार हे दाखवू दिलं आहे की लोकांकडून उत्स्फूर्तपणे ज्याचा पुरस्कार करण्यात येतो तेच लोकांसाठी कल्याणकारी असतं. नवीन न्यायव्यवस्था ना तर भारताच्या प्राचीन परंपरांतून निर्माण झालेली होती ना ती इथल्या लोकांच्या पचनी पडली होती. लॉर्ड

डलहौसींनी १८४८ साली लखनौ येथे निवासी अधिकारी म्हणून पाठवलेले विल्यम स्लीमन यांची साक्ष आहे की ‘इतर सर्व संस्थांनी जेवढी हानी केली नाही तेवढी आपल्या ब्रिटिशांच्या न्यायव्यवस्थेनं केली’ [विल्यम स्लीमन, *ए जर्नी थ्रू द किंगडम ऑफ औंध* १८४९-५०, १८५८ आवृत्ती, पृष्ठ ६८-६९] त्यामुळे गोंधळ आणि दडपशाहीच निर्माण झाली व अप्रामाणिकपणा आणि खोट्या साक्षीला महत्त्व आलं.

ब्रिटिशसत्तेआधी शतकामागून शतकं कायदा आणि न्यायाची अंमलबजावणी पूर्णपणे भारतीयांकडून स्वतःच्या संस्थांतून होत होती. अशा प्रकारच्या भारतीयांच्या संस्था समाजाच्या सर्व गरजा भागवण्यासाठी समर्थ होत्या आणि अनेक प्रवाशांच्या आणि इतिहासकारांच्या मते त्या व्यवस्थेखाली देशातील बहुतांश भागातील लोकांची भरभराट झाली आणि ते त्या व्यवस्थेत सुखी होते. [मिल, *हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया,* विल्सन यांचे कंट्यूनिएशन बुक १, प्रकरण ७] एकंदरीत पाहता पंचायतीतून न्याय त्वरित मिळायचा व तो कार्यक्षम आणि स्वस्त असायचा. पंचायत पद्धतीमुळे न्यायाचं प्रेम जोपासलं गेलं. न्याय्य वर्तनाला प्रोत्साहन मिळालं आणि खरं बोलायच्या सवयीची जोपासना झाली. तिच्याऐवजी ब्रिटिशांनी निर्माण केलेली न्यायव्यवस्था अपुरी, ‘दुर्बोध, क्लिष्ट आणि पांडित्याचे स्तोम माजवणारी’ होती. तिच्यामुळे न्याय एवढा मंद गतीचा आणि महागडा झाला की ‘वास्तवात त्यामुळे न्याय नाकारलाच गेला’. न्यायाधीश केवळ युरोपिअन असत. त्यांना लोकांची भाषा, त्यांच्या भावना आणि प्रथा यापैकी काहीही कळत नव्हतं. न्यायालयात शपथ घ्यायची पद्धत अशी काही होती की कोणत्याही प्रतिष्ठित भारतीयाच्या ती पचनी पडू शकली नाही. एवढंच नाही तर प्रदीर्घ न्यायालयीन कामकाजाच्या अनुभवानंतर फ्रेड्रिक शोर या निर्णयावर आले की जर कोणताही प्रतिष्ठित भारतीय न्यायालयात साक्ष देत असेल तर ती गोष्ट ‘त्याच्या प्रतिष्ठितपणाविरुद्धचा पुरावा आहे असं गृहीत धरलं जाते.’ [*द कॅम्ब्रीज शॉर्टर हिस्ट्री,* पृष्ठ ६३८वरून रेजिनाल्ड रेनाल्ड्स यांनी *द व्हाईट साहिब्स इन इंडिया* या ग्रंथात घेतलेला उतारा, रेनाल्ड्स आणि हिचकॉक, न्यूयॉर्क, (१९३७), पृष्ठ ३१५] परिणामी ब्रिटिश न्यायालयांबाबत लोकांमधे घृणा उत्पन्न झाली.

१८०० ते १८१०च्या दरम्यान बंगालमधे डाकूंनी उच्छाद मांडला होता. पोलिसांना पगार कमी होता व ते भ्रष्ट होते. परिणामी 'ब्रिटिशांचा सर्वोच्च अधिकार असलेल्या ठिकाणीच अगदी त्यांच्या नाकाखालीच राक्षसी आणि अनागोंदीची अवस्था समाजात चोहोकडे पसरलेली होती.' [लॉर्ड मिंटो यांचं इतिवृत्त, दिनांक २४ नोव्हेंबर १८१०] मोठ्या शहरात व्यापाराच्या केंद्रावर अगदी दिवसाढवळ्या डाके घातले जात होते. तसंच डाकूंच्या धमक्यांपासून वाचण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेला डाकूंच्या स्थानिक आश्रयदात्यांना पैसे देऊन शांतता विकत घ्यावी लागत होती. डाकूंना पायबंद घालण्यासाठी विशेष अधिकार देऊन खास न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली. परंतु रोगापेक्षाही औषध घातक ठरलं. साक्ष द्यायला लोक पुढं यायला तयार नव्हते. त्यामुळे साक्षीदार म्हणून नाव पुढं आलं की लोकांना ती भयानक शिक्षा वाटायची. न्यायाधीशांनी संशयास्पद लोकांची माहिती देण्यासाठी गुप्तहेरांची नेमणूक केली. खेड्यात राहणाऱ्या लोकांना खोट्या माहितीच्या आधारावर मनमानेल त्याप्रमाणे गोवण्यात आलं. महिनोगणती त्यांना तुरुंगात ठेवण्यात आलं. काही वेळा तर त्यांना न्यायालयात उभं करेपर्यंत वर्ष निघून जायची. अनेकदा तुरुंगातच त्यांचा अंत व्हायचा. त्यामुळे 'खबऱ्यांच्या आकसाला न्यायाधीशाच्या कोपापेक्षाही लोक अधिक घाबरायचे.' [रोमेश दत्त, द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया (अंडर अर्ली ब्रिटिश रूल), प्रास्ताविक पृष्ठ ३१५ कोर्ट ऑफ डायरेक्टर्ससमोर भारतातील न्यायव्यवस्थेबद्दल बंगालचे सर हेन्री स्ट्रॅची यांनी केलेल्या निवेदनाप्रमाणे बंगालमधील एका तुरुंगात २९० कैद्यांना डांबून ठेवण्यात आलं होतं. त्यापैकी काही 'केवळ संशयावरून न्यायाधीशासमोर न नेता' ५ महिन्यांपासून तुरुंगात होते. दुसऱ्या एका ठिकाणी 'दरोड्यानंतर १९० लोकांना संशयावरून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून बळजबरीनं कबुलीजबाब घेण्यात आला वा तसा बनाव रचण्यात आला. त्यापैकी ४६ लोकांना जवळपास १ वर्ष गजाआड ठेवण्यात आलं होतं. त्यापैकी ३ तुरुंगातच मरण व उरलेल्यांची निकालानंतर निर्दोष सुटका झाली.' त्यांच्याच सांगण्यानुसार दुसऱ्या एका जिल्ह्यात नोव्हेंबर १८०८ ते मे १८०९ पर्यंत २०७१ लोकांना संशयावरून अटक करण्यात आली. सहा महिन्यात ४८ लोक तुरुंगात मरण पावले, २७८ लोकांची अजूनही चौकशी सुरू होती आणि १४७७ लोकांची चौकशी अजून व्हायचीच होती. (वरील पुस्तकात पृष्ठ ३२०.)] सर हेन्री स्ट्रॅची लिहितात की 'अशा प्रकारचं धक्कादायक क्रौर्य, न्यायदानात अशी राक्षसी विकृती आमच्या उघड्या डोळ्यासमोर जाणीवपूर्वक झाली. जनसमूहाला तुरुंगात डांबणं, त्यांचा छळ, खोट्या साक्षीसाठी लाचलुचपत, लूट, निरपराध लोकांचा तुरुंगात मृत्यू आदी अशी दृश्यं होती की त्यांना परवानगी देणाऱ्या लोकांसाठी ती लज्जास्पद बाब होती असा माझा विश्वास आहे. दरोडेखोरी कितीही

भयानक असली तरी तिच्या प्रमाणाचा विचार करता या पद्धतीमुळे निर्माण झालेल्या भयानक कृत्यांशी त्यांची तुलनाच होऊ शकत नाही.' [ईस्ट इंडिया पेपर्स, लंडन, (१८२०), खंड २, पृष्ठ ७०]

सर्वात वाईट गोष्ट म्हणजे या गोष्टीचा लोकांच्या चारित्र्यावर झालेला परिणाम. अनेक जाणकारांनी भारतातील ग्रामीण लोकांच्या शांतताप्रिय आणि सरळ स्वभावाची वैशिष्ट्याने नोंद केलेली आहे. थॉमस मन्रो यांनी आपल्या १८१३च्या अनौपचारिक पत्रात लिहिलं आहे की भारतीय ग्रामीण समाजातील न्यायनिवाडा करण्यासाठी जी व्यवस्था होती, आणि ज्या पद्धतीनं खटल्यात पराभूत होणारा पक्षही निवाडा मान्य करायचा ते पाहून मी आश्चर्यचकित झालो. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ११६, ११८] न्यायमूर्ती अर्स्किन पेरी यांनीही हाउस ऑफ कॉमन्स कमेटीसमोर अशीच साक्ष दिलेली आहे. भारतीयांच्या व्यापारातील उच्च प्रतीच्या सचोटीविषयी बोलताना ते म्हणाले की 'या व्यापाऱ्यांचे वहिखाते इतके प्रामाणिकपणानं ठेवलेले असतात की तद्देशीय न्यायालयात व्यापारी व्यवहाराबाबत त्यांचा पुरावा मान्य केला जातो.' [कॉमन्सचा पहिला अहवाल, १८५३] भारतातील इंग्रजांची न्यायव्यवस्था भारतीयांच्या खटलेबाजीच्या सवयीमुळे कोलमडली असा जेव्हा आरोप करण्यात आला तेव्हा मन्रो यांना धक्काच बसला. ते म्हणाले, 'मला भारतीयांना विविध क्षेत्रात पाहायची भरपूर संधी मिळालेली आहे आणि मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की भारतीयांना खटलेबाजीची मुळीच सवय नाही.... आपली व्यवस्था खटले निर्माण करते व आपण निराधारपणे भारतीयांच्या चारित्र्यावर आरोप करतो.' [ईस्ट इंडिया पेपर्स, लंडन, (१८२०), खंड २, पृष्ठ ११६,११८..] पंचायतीत शेतकरी खरं बोलायचे. सर विल्यम स्लीमन १८४८ साली म्हणाले, 'जीवनातील सुखासाठी ज्या गावकऱ्यांचा आदरभाव प्राप्त होणं आवश्यक असतं त्या आपल्या गावकऱ्यांसमोर, नातेवाइकांसमोर, वडीलधाऱ्यांसमोर आणि शेजाऱ्यांसमोर खोटी साक्ष देणं अशक्य असतं कारण तो आदर त्यांच्यासमोर सत्याचरण करूनच मिळू शकतो.' [सर विल्यम स्लीमन, *रॅम्बल्स अँड रिकलेक्शन्स*, १८४४, यातून जी. टी. रेंच यांनी *द रिस्टोरेशन ऑफ द पिझंटरीज*, द सी. डब्ल्यू. डॅनिअल कंपनी लि., लंडन, (१९३९), पृष्ठ १०६] त्यांचं म्हणणं होतं की 'माझ्यासमोर असे हजारो खटले होते की ज्यांत माणसाची भरभराट, त्याचं स्वातंत्र्य आणि जीवन हे सर्व त्याच्या खोटं बोलण्यावर अवलंबून होतं. परंतु तरीही त्यांनी खोटं बोलायला नकार दिला.' [सर विल्यम स्लीमन, *रॅम्बल्स अँड रिकलेक्शन्स ऑफ अॅन इंडियन ऑफिशिअल* यातून रोमेश दत्त यांनी द *इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया*

(व्हक्टोरिअन एज), पृष्ठ १९४] पर्वत आणि जंगलात वसलेल्या अगदी लहानशा एकाकी खेड्यात 'माणसाकडून खोटं बोलणं सोडलं तर अजून काहीही करवून घेता येऊ शकतं!' [विल्यम स्लीमन, *ए जर्नी थ्रू द किंगडम ऑफ औंध* १८४९-५०, १८५८ आवृत्ती, पृष्ठ ६८-६९] त्याचप्रमाणे 'नरबुद्ध दरीतील रानटी गोंडाला वेळप्रसंगी खोटं बोलायचे फायदे शिकवणं अशक्य आहे!' [वरीलप्रमाणे] परंतु तरीही याच लोकांची ब्रिटिश न्यायालयातील साक्ष 'यत्किंचितही विश्वसनीय' नसायची. सर विल्यम स्लीमन यांचं म्हणणं आहे की दोष लोकांचा नव्हता, व्यवस्थेचा होता. 'ज्या व्यवस्थेत चांगल्याच्या मोबदल्यात वाईटाहून अधिक मोल मिळत नाही त्या व्यवस्थेत साक्षीचा दर्जा.... इतर क्रयविक्रयाच्या वस्तूप्रमाणेच घसरतो. आपल्या न्यायालयांतील औपचारिकपणामुळे त्यांना जे काही मिळतं त्याचा दर्जा इतर ठिकाणांप्रमाणेच इथेही कमीअधिक प्रमाणात घसरायची प्रवृत्ती आहे!' [वरीलप्रमाणे]

श्रीमंत आणि गरिबांना सारख्याच प्रमाणात वाटणाऱ्या तिटकाऱ्याच्या या वातावरणात ब्रिटिश न्यायालये काम करत होती. असं सांगतात की लेक यांची लास्वारीवरील मोहीम सुरू असताना 'सर्व लोक केवळ क्रूर आणि स्वैर सैनिकांना पाहूनच नाही तर त्याच्याबरोबर *उच्च न्यायालयही* आहे या माहितीमुळे घाबरून पळाले!' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ २५३]

## ९

परकीय शासनामुळे राष्ट्रीय चारित्र्याचं हनन होणं अपरिहार्य असते. यापूर्वीही भारत जिंकला गेलेला होता. परंतु त्यानं आपलं स्वातंत्र्य कधीच गमावलेलं नव्हतं, तो गुलामगिरीत कधीच ढकलला गेला नव्हता. ब्रिटिशांच्या काळात प्रथमच तो दुसऱ्या राष्ट्राच्या ताब्यात गेला होता. परिणामी त्याचं सर्व काही शोषून घेण्यात आलं. परंतु त्यामुळे त्याचं जे आर्थिक शोषण झालं त्याहूनही भयानक शोषण होतं त्यामुळे झालेलं नैतिक शोषण. भारतीयांसंबंधीच्या काही प्रमाणातील अविश्वासामुळे आणि ब्रिटिशांच्या काहीशा हावरटपणामुळे ब्रिटिशांच्या राज्यात

भारतीयांना जबाबदारीच्या आणि विश्वसनीयतेच्या सर्व सरकारी प्रशासकीय पदापासून वगळण्यात आलं होतं. हे सर्व कार्यक्षमतेच्या नावाखाली करण्यात आलं होतं. परंतु त्यामुळे वास्तवात प्रशासन अकार्यक्षम आणि भ्रष्ट झालं होतं. विषमता आणि अदूरदर्शिता या प्रशासनातील दोषांमुळे सर थॉमस मन्रो यांचा संताप झाला. ३१ डिसेंबर १८३४ला पाठवलेल्या आपल्या प्रसिद्ध इतिवृत्तांतात ते विचारतात :

*'जर आम्ही त्यांना (भारतीयांना) प्रत्येक महत्त्वाच्या पदावरून वगळणार असू तर कोणत्या तोंडानं आम्ही म्हणू शकतो की आमचं शासन हे मायबाप सरकार आहे ? अशा प्रकारच्या मनाईमुळे सर्व लोकांचा आपण अपमानास्पद वागणुकीची शिक्षा देतो व त्याची भरपाई कशानेही होऊ शकत नाही. संपुर्ण राष्ट्राला असा प्रकारची शिक्षा सुनावली जायचं जगात असं एकही उदाहरण नाही. जर फार मोठी सिद्धी प्राप्त करूनही तिच्या उदात्त हेटूसाठी म्हणजे समाजसेवेसाठी तिचा उपयोग होणार नसेल तर तिचा काय फायदा?....*

आपले ग्रंथ.... काहीच करू शकणार नाहीत; साधं शुष्क साहित्य समाजाचं चरित्र उन्नत करू शकत नाही.... ही गोष्ट सर्वच राष्ट्रांसाठी सत्य आहे.... *उद्या ब्रिटनला परकीय सत्तेच्या जोखडाखाली जाऊ द्या.* शासनातील लोकांचा सर्व सहभाग काढून टाकू द्या; सार्वजनिक सन्मानापासून, मोठ्या जबाबदारीच्या वा पगाराच्या जागेपासून त्यांना दूर ठेवू द्या आणि प्रत्येक परिस्थितीत त्यांना अविश्वसनीय समजलं जाऊ द्या आणि *मग त्यांच्या वंशाला एक वा दोन पिढ्यांतच हलकटपणा, दगलबाजी आणि अप्रामाणिकपणा या दुर्गुणांपासून त्यांचं सर्व ज्ञान, त्यांचं धार्मिक वा धर्माशी संबंध नसलेलं सर्व साहित्यही त्यांना वाचवू शकणार नाही.....*

*जो कोणी आपलं स्वातंत्र्य गमावतो तो आपले निम्मे गुण गमावतो हा जुनाच अनुभव आहे. ही गोष्ट जशी राष्ट्राला लागू आहे तशीच व्यक्तीलाही लागू आहे. जवळ काहीच संपत्ती नसल्यामुळे कमी अधःपात होतो, परंतु जवळ असलेली संपत्ती परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली असावी व संबंधित माणसाचा त्यात कोणताच सहभाग नसला तर मात्र अधःपात जास्त होतो. ज्याप्रमाणे गुलाम स्वतंत्र माणसाचे विशेषाधिकार गमावतो त्याचप्रमाणे गुलामगिरीतील राष्ट्रही आपल्या*

*विशेषाधिकारांना मुकते. ते राष्ट्र स्वतःवर कर लावायचा, स्वतःचे कायदे करायचा, प्रशासनातील सहभागाचा म्हणजेच देशाचा सर्वसामान्य कारभार चालवायचा अधिकार गमावते, ब्रिटिश भारताला यापैकी कोणतेही आधिकार नाहीत.* [ईस्ट इंडिया पेपर्स, लंडन, (१८२६), खंड ३, पृष्ठ ६०२-६३२ (तिरपी अक्षरं माझी)]

'लोकांच्या चारित्र्याची हळूहळू हानी होऊ देऊन, आजपेक्षाही त्यांच्या चारित्र्याचा स्तर कमी होऊ देऊन केवळ इथल्या लोकांचं संरक्षण केल्यानं आणि आपली सत्ता कायम राखल्यानं आपलं समाधान होणार आहे की त्यांच्या देशाचा कारभार चालवण्यासाठी उच्च पद प्राप्त करून घेण्यासाठी आपण त्यांना पात्र बनवल्यामुळे आपलं समाधान व्हायला हवं?' असा प्रश्न विचारून ते स्वतःच उत्तर देतात, 'निश्चितपणे आपलं ध्येय तद्देशीय लोकांचा मानसिक स्तर उंचावण्याचा असायला हवा. भारतात आपण गेलो तेव्हा भारतीयांत स्वतःचं प्रशासन चालवायची जी पात्रता होती त्यापेक्षाही भारताशी आपला संबंध तुटताना ती पात्रता कमी झालेली आहे व ते अजून तिरस्करणीय जीवन जगत आहेत असं वाटायची आपल्यावर वेळ यायला नको याची आपण काळजी घ्यायला हवी.

प्रत्येक भारतीयाला शासकीय सेवेपासून दूर ठेवून भारताचं प्रशासन चालवणं जरी शक्य असलं तरीही न्यायाच्या अमूर्त कल्पनेसाठी जरी नाही तरी केवळ स्वार्थासाठी का होईना आपण असं करायला नको. 'ज्या प्रमाणात आपण यापासून त्यांना दूर ठेवू त्या प्रमाणात आपला त्यांच्यावरील पगडा कमी होईल. आणि जर संपूर्णपणे आपण त्यांना यांतून वगळलं तर त्यांच्या मनात आपल्याबद्दल जिव्हाळ्याऐवजी द्वेषभावना रुजेल. शासकीय पदापासून वगळल्या गेलेल्या *लोकांच्या भावना सर्व जनतेत आणि तद्देशीय लोकात पसरतील आणि मग लोकांमधे एवढा जबरदस्त असंतोष एसरेल की त्याला दाबणं वा त्याचा प्रतिकार करणं आपल्याला शक्य होणार नाही.*' उलटपक्षी काहीही प्रतिकार न करता भारतीय लोकांनी ही गोष्ट सहन केली तरी तिचे परिणाम त्याहूनही भयानक होतील. 'त्यांची नैतिकता घसरेल.... आणि निकृष्टावस्थेत जाऊन त्यांची तिरस्करणीय वंशात गणना होईल. मग ते भूक भागवण्याशिवाय कोणतंही उच्च

प्रतीचं काम करायला पात्र राहणार नाहीत.' समारोप करत ते म्हणाले, *'आपल्या प्रशासन पद्धतीमुळे सर्व लोकांची अवनती होण्यापेक्षा तर आपण त्या देशातून पुर्णपणे हाकललं जाणं किती तरी चांगलं होईल.'* [वरीलप्रमाणे (तिरपी अक्षरं माझी)]

त्यामुळे त्यांनी सुचवलं की या देशातील आपली सत्ता राखून ठेवण्यासाठी नागरी आणि सैनिकी सेवेतील जी पदं सोडल्यामुळे 'आपल्या सत्तेला धोका उत्पन्न होईल' ती सर्व उच्च पदं युरोपिअन लोकांसाठी राखून ठेवावी आणि इतर सर्व पदं भारतीयांसाठी मोकळी करणं आपल्यासाठी अधिक हितावह होईल. 'सध्याच सर्व महत्त्वाची पदं आपल्याकडे आहेत. जी पदं कमी प्रतीची आहेत आणि सध्या जी तद्देशीय लोकांनी भरलेली आहेत त्या पदांपर्यंतही आपण खाली उतरलो तर आपलं चारित्र्य कमी प्रतीचं होईल व आपण आपलं कर्तव्य एवढ्या चांगल्या रीतीनं पार पाडू शकणार नाही.' [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडियामधे* उद्धृत पृष्ठ ३०-३जेम्स मिल, हाऊस ऑफ कॉमन्स कमेटीसमोर, दिनांक ऑगस्ट २५, १८३१ मधून]

एलफिन्स्टनच्या नंतर मुंबईचे राज्यपाल झालेले सर जॉन माल्कम हेही काही कमी आग्रहशील नव्हते. त्यांनी भविष्यवाणी केली की 'शिक्षणप्रसाराच्या आपल्या योजनेशी शिक्षितांच्या मनाला व्यस्त ठेवणाऱ्या कर्तव्याची सांगड घातली न गेल्यास साम्राज्याच्या विनाशाचे घटक तयार व्हायच्या प्रक्रियेला गती येईल. यामुळे केवळ नैतिक अधःपातच होणार नाही. ही प्रक्रिया आपल्याबरोबर सूडभावनाही घेऊन येत असते. तिच्यातच साम्राज्याच्या विनाशाची बीजं दडलेली असतात.'

परंतु पूर्वग्रहांएवढं आंधळं बनवणारं काहीच नसतं. व त्यात जेव्हा संकुचित स्वार्थाची भर पडते तेव्हा तर विचारायलाच नको. हाउस ऑफ कॉमन्सच्या कमेटीसमोर १८३१ साली एका प्रश्नाला साक्षीदारानं दिलेलं उत्तर या दृष्टीनं विशेष लक्षणीय आहे.

'समजा.... आयर्लंडमधे उच्च पदावर केवळ इंग्रज नेमले असते तर आयरिश लोकांना तो स्वतःवरील कलंक वाटला नसता काय ?'

'*मला असं वाटतं की परकियांकडून शासित होण्यातील अवमाननेची ही भावना केवळ युरोपिअन भावना आहे. गाझा असा विश्वास आहे की आशियात तिचं अस्तित्व नगण्य आहे वा नाहीच असं म्हणालो तरी चालेल.*' [वरीलप्रमाणे (तिरपी अक्षरं माझी)]

१८५७पर्यंत ३६० (५४०० रु.) पौंडापेक्षा अधिक वार्षिक पगार मिळवणारे केवळ २५६ भारतीय होते. [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ २५३] पाव शतकानंतर १०००० रुपये वा त्यापेक्षा अधिक वार्षिक पगार असलेल्या २३८८ नागरी आणि सैन्यातील उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यांपैकी केवळ ६० भारतीय होते. [रॉयल कमिशन ऑफ एक्सपेडिचरसमोर जी. के. गोखले यांची साक्ष, क्रमांक १८३३१, १८९५-१९००]

१८३३ साली कंपनीच्या सनदेचं नूतनीकरण करताना करण्यात आलेल्या कायद्यात पुढील प्रसिद्ध कलम होतं : 'सम्राटांच्या सरकारच्या प्रदेशात राहणाऱ्या कोणत्याही भारतीय प्रजेला केवळ तिच्या धर्मामुळे, जन्माच्या ठिकाणामुळे, वंशामुळे, वर्णामुळे कंपनीत कोणतंही पद, अधिकार वा स्थान प्राप्त करण्यापासून वंचित करण्यात येणार नाही.' [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), पृष्ठ ४२२] परंतु ज्यामुळे या कायद्याचं पालन करणं सरकारला भाग पडू नये अशा प्रकारच्या पळवाटा शोधायचा प्रयत्न कायदा होत नाही तोच सरकारनं सुरू केला असं नंतर व्हाईसराय लॉर्ड लिटन यांनी उघड केलं. लॉर्ड क्रॅनब्रुक यांना पाठवलेल्या गोपनीय पत्रात त्यांनी लिहिलं :

'त्यांना अडवायचं की त्यांची फसवणूक करायची यापैकी एकाची आपल्याला निवड करायची आहे. आणि आम्ही कमीतकमी सरळ मार्ग निवडला आहे.... हे मी गोपनीयतेनं सांगत असल्यामुळे मला सांगायला संकोच वाटत नाही की भारत सरकार आणि इंग्लंडचं सरकार या दोघांनीही जे अभिवचन दिलं होतं त्याचा ते भंग करत आहेत असा जो आरोप करण्यात येतो त्याचं समाधानकारक उत्तर या क्षणापर्यंत तरी यापैकी कुणीही दिल्याचं मला आढळत नाही.' [लॉर्ड लिटन, कॉन्फिडेन्शल मिनिट्स ऑफ १८७५ मधून दादाभाई नौरोजी यांनी घेतलेले उद्धरण, पॉव्हर्टी अँड अनब्रिटिश रूल ऑफ इंडिया, स्वान सोनेशीन कंपनी अॅड कंपनी, लंडन, (१९०१), पृष्ठ ३१७-१८]

घृणास्पद भेदभाव ही भारतीय राजकारणातील चिघळलेली जखम होती. नैतिक शोषण सुरूच होतं. क्षुल्लक कारकुनाच्या वा तत्सम जागा सोडल्या तर मुत्सद्दीपणाची, प्रशासनाची, उच्च वैज्ञानिक माहितीची पदं युरोपिअनांकडेच होती व ती पदं धारण करणारा सेवेतून निवृत्त झाल्यानंतर भारतातून जेव्हा जायचा तेव्हा त्याच्याबरोबर त्याचं पांडित्य, अनुभव आदींनाही भारत मुकायचा. अशा प्रकारे निसर्ग प्रत्येक देशाला प्रतिभा, आत्मा आणि बुद्धिमत्तेचं जे वैभव देतो तो खजिना भारतासाठी दूरस्थ स्वप्नासारखा झाला.

## **१०**

मुंबईचे राज्यपाल एलफिन्स्टन यांनी १८२४ साली लिहिलं की भारत सरकारविरुद्ध विनंतीवजा तक्रार करण्यात येते की त्यांनी पूर्वेकडील राज्यांची 'अवहेलना' केलेली आहे आणि ज्या मार्गांनी देशाचं वैभव निर्माण व्हायचं ते सर्व मार्ग भारत सरकारनं बंद केलेले आहेत एवढंच नाही तर 'देशाच्या उपयोगाचं वा देशाला वैभव प्राप्त करून देणारं कोणतंच कार्य केलेलं त्यानं केलेलं नाही.' परंतु अधिक न्यायानं बोलायचं तर असा म्हणता येईल की त्यांनी तद्देशीय प्रतिभेचे स्रोत कोरडे पाडले आणि आमच्या विजयाच्या स्वरूपावरून 'ज्ञानसंवर्धनासाठी जे प्रोत्साहन देण्यात येत असते ते प्रोत्साहन देणं संपूर्णपणे बंद केलं. एवढंच नाही तर देशातील शिक्षण व्यवस्था ढासळली जायची आणि पूर्वीप्रमाणे प्रतिभावंतांना जन्माला घालायची परंपरा विस्मरणात जायची शक्यता आहे.' [फॉरेस्ट्स *सिलेक्शन्स फ्रॉम द मिनिट्स अँड अदर ऑफिशिअल रायटिंग्ज ऑफ द ऑनरेबल माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन*, (१८८४), पृष्ठ १०२]

सामान्यपणे गृहीत धरल्या जाणाऱ्या कल्पनेविपरित देशातील मूळची जी शिक्षण पद्धती होती तिचा ऱ्हास तर झालाच पण त्याचबरोबर भारतात देण्यात येणाऱ्या प्राथमिक शिक्षणातही ब्रिटिश राज्यात घट झाली. ब्रिटिश राज्याच्याआधी भारतात स्वतःची शिक्षणपद्धती होती. त्या पद्धतीत अगदी गरिबात गरीब मुलाच्याही आटोक्यात शिक्षण येत असे. शिक्षण विषयक वार्तापत्रात कोर्ट ऑफ डायरेक्टरांनी १८१४ साली लिहिलं की 'गावातील तद्देशीय शाळा या

ग्रामीण व्यवस्थेच्या भाग आहेत.... ही सन्माननीय आणि परोपकारी संस्था.... क्रात्यांच्या धक्क्यातूनही वाचलेली आहे आणि तिच्या कार्यरततेचं श्रेय तद्देशीय लोकांच्या सर्वसामान्य बुद्धिमत्तेला आहे.' [दौलतराम गुप्ता, एम. ए. *यंग इंडियामधे* २९-१२-१९२० आणि १९-१-२१, 'हाऊ इनडिजिनस एज्यूकेशन वाज क्रश्ड इन पंजाब, १८४९-९६'] शिक्षण प्रसाराचं कार्य राज्याचं असल्याची मोगल सत्तेला जाणीव होती व त्या दृष्टीने त्यांनी पाठशाळा, मकताब मदरसे यांना सेतसारा माफ असलेली जमीन दान दिली. उलट ईस्ट इंडिया कंपनीनं महसूल वाढवण्यासाठी यापैकी बहुतांश जमिनी जप्त केल्या. त्यामुळे मकताब आणि पाठशाळा बंद कराव्या लागल्या. एकच उदाहरण द्यायचं तर पंजाबमधे १८४९ साली ३०,००० शाळा होत्या. [उदाहरणार्थ पंजाब काबीज करण्यापूर्वी तिथे प्राथमिक शिक्षण देणाऱ्या ३०,००० शाळा होत्या. शिक्षण एक तर निःशुल्क देण्यात यायचं वा नाममात्र मासिक शुल्कावर देण्यात यायचं. त्याशिवाय तिथं अनेक 'महाविद्यालये' होती जी तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, गणीत, आधीभौतिक तत्त्वज्ञान, व्याकरण आदी विषयांवर जवळपास ४ लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देत असत] त्या १८५९-६० साली २१७१ राहिल्या आणि १८८१-८२ साली केवळ १५२६ राहिल्या. [यंग इंडिया, २९-१२-१९२० आणि १९-१-१९२१, 'हाऊ इनडिजिनस एज्यूकेशन वाज क्रश्ड इन पंजाब, १८४९-९६']

भारतीयांच्या 'मनाला अस्थिर करील' या कारणासाठी सुरुवातीच्या ब्रिटिश सत्तेच्या काळात पाश्चात्त्य शिक्षणाला विरोध करण्यात आला. विल्बरफोर्स यांनी १७९२ साली त्या वर्षाच्या सनदेच्या कायद्यात भारतात शिक्षक पाठवण्याविषयीच्या दोन कलमांचा अंतर्भाव करायचा प्रयत्न केला तेव्हा कोर्ट ऑफ डायरेक्टरांनी प्रखर विरोध केला. त्यावेळी एक डायरेक्टर म्हणाले की 'आम्ही नुकताच अमेरिका गमावली कारण तिथं शाळा आणि महाविद्यालयं उघडायची चूक आम्ही केली. त्याच चुकीची पुनरावृत्ती भारताच्या बाबतीत आम्ही करू इच्छीत नाही.' [जे. सी. मार्शमन यांचं *इव्हिडन्स*, लॉर्डास सेकंड रिपोर्ट, १८५३]

१८४२ साली भारतात गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड एलेनबरो आले होते. कवी रविंद्रनाथ टागोराचे आजोबा देवेंद्रनाथ टागोर त्या काळातील तत्कालीन विषयावर लेखन करणारे आघाडीचे लेखक आणि इंग्रजी शिक्षणाचे कडवे पुरस्कर्ते होते, त्यांच्याजवळ लॉर्ड एलेनबरो यांनी अर्ध्या शतकानंतर हीच भीती व्यक्त केली होती. ते म्हणाले होते : 'हे जे सद्गृहस्थ तद्देशीय

लोकांना इंग्रजी शिकवू इच्छितात ते जर आपल्या उद्दिष्टात सफल झाले तर आम्ही या देशात तीन महिनेही राहू शकणार नाही.' [लॉर्ड एलेनबरोज *इव्हिडन्स,* १८८२चा कॉमन्स रिपोर्ट]

काये यांनी *लाईफ ऑफ मेटकाफ* या ग्रंथात लिहिलं आहे की 'भारतातील लोकांना पूर्णपणे रानटी अवस्थेत आणि काळोखात ठेवणं आणि आमच्या लोकांतर्फे वा स्वतंत्र संस्थानांतर्फे त्यांच्यात ज्ञानप्रसाराचा प्रयत्न करण्यात आला तर त्याला प्रखर विरोध करणं हेच त्या काळात आमचं धोरण होतं.' [काये, *लाईफ ऑफ मेटकाफ,* ii, पृष्ठ २४७-४८] मुद्रणालये आणि वृत्तपत्रे याकडे कोपदृष्टीने पाहिलं जायचं. 'ज्ञानप्रसाराचा धसका जुनाट रोगाप्रमाणे घेतला गेला होता.'

प्रशासन चालवण्यासाठी कमी पगारावरील कारकुनांची गरज असल्यामुळे व ती पुरेशा प्रमाणात भागवणं आवश्यक असल्यामुळे त्या कामासाठी प्रशिक्षण देताना इंग्रजी शिक्षणाचे काही उपाय अप्रत्यक्षपणे झिरपलेच. खासकरून धर्माच्या प्रचाराकरिता ख्रिश्चन मिशनरीही शिक्षणाच्या क्षेत्रात उतरले.

भारतात भारतीय भाषांच्या माध्यमातून शिक्षण द्यावं की इंग्रजी भाषेच्या माध्यमातून हा प्रश्न लगेचच निर्माण झाला. पहिल्या विचाराचे जे पाठीराखे होते त्यांना पौर्वात्याळलेला (ओरिएंटॅलिस्ट) असं म्हणत आणि नंतरच्या विचाराच्या पाठीराख्यांना इंग्रजाळलेले (अँग्लीसिस्ट) म्हणत असत. या दोन विचारपद्धतीत १८५३ साली झालेल्या अखेरच्या धुमश्चक्रीत पौर्वात्याळलेल्या (ओरिएंटॅलिस्ट) लोकांचा सपशेल पराभव झाला आणि मेकॉलेंनी पाश्चात्त्यांच्या धर्तीवर इंग्रजी माध्यमातून शिक्षण द्यायच्या आपल्या योजनेला सुरुवात केली. परंतु ज्या तुच्छतेच्या भावनेमुळे आणि बंधुभावाच्या अभावामुळे सत्ताधाऱ्यांच्या इतर 'परोपकारी' योजना फारशा फायदेशीर झाल्या नव्हत्या त्याच भावनांच्या अभावामुळे याही योजनेची तीच गत झाली. भारताचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांनी निदर्शनास आणून दिलं की 'भारतीय तत्त्वज्ञांचं लिखाण तेव्हा टिकेल जेव्हा ब्रिटिशांची भारतातील सत्ता संपून बराच काळ झालेला असेल व ज्या स्रोतांद्वारे तीनं संपत्ती गोळा केली होती ते इतिहास जमा होतील.' [एच. डी. थरो यांनी *अ वृइक ऑन काँकॉर्डमधे* उद्धृत केलेलं ईस्ट इंडिया कंपनीच्या अध्यक्षांना वॉरन हेस्टिंग्ज यांनी श्रीमद्भगद्गिताचं भाषातर

करण्याविषयी लिहिलेलं पत्र] परंतु मेकॉले यांचा विश्वास होता की 'चांगल्या युरोपिअन वाचनालयातील एक चांगलं कपाट हे भारतीयांच्या व अरबांच्या संपूर्ण साहित्यापेक्षा श्रेष्ठ ठरेल.' पूर्वेकडील भाषा आणि साहित्याकडे ते 'सडक्या अवयवाप्रमाणे' पाहत असत व ते कापून काढायचा त्याचा प्रस्ताव होता. [अर्ल ऑफ रोनाल्डशे, *द हार्ट ऑफ आर्यव्रत*, कॉन्स्टेबल अँड कंपनी लि., लंडन, (१९२७), पृष्ठ २०]

केवळ अज्ञानामुळे जरी हे घडलं असतं तरीही ते घातक ठरलं असतं. परंतु मेकॉलेच्या अज्ञानात इथं तर पूर्वग्रहदुषिततेचीही भर पडलेली होती. त्यातच त्याचं मन धार्मिक पक्षपातापासूनही मुक्त नव्हतं. आपल्या शिक्षणविषयक धोरणामुळे त्यानं त्याच्या प्रभावाखाली असणाऱ्या लोकांच्या श्रद्धेची आणि संस्कृतीची अवहेलना केली. खरं म्हणजे श्रद्धापूर्वक त्याची सांगता करायची त्याची इच्छा होती. कोलकाताहून ऑक्टोबर १३, १८३६ला आपल्या वडिलांना पाठवलेल्या पत्रात तो लिहितो :

इंग्रजी शिक्षण घेतलेला कोणताही हिंदू निष्ठापूर्वक आपल्या धर्माशी जुळलेला राहूच शकत नाही. काही लोक धोरण म्हणून त्याचं अनुसरण करत असतात, परंतु बहुतेक जण त्याचं पालन आस्तिक म्हणून करतात, तर काही ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करतात. माझा पक्का विश्वास आहे की जर माझ्या शिक्षण विषयक धोरणाचं अनुसरण करण्यात आलं तर यानंतर तीस वर्षांनी बंगालमधील प्रतिष्ठित वर्गात एकही मूर्तिपूजक शिल्लक राहणार नाही..... याच्या केवळ कल्पेनंनच मला आनंद होतो. [जॉर्ज ओटो ट्रेव्हलीन, *द लाईफ अँड लेटर्स ऑफ लॉर्ड मेकॉले*, खंड १, पृष्ठ ४६४ वरील संत निहाल सिंग यांनी १८३५ साली गुरुकुल विश्वविद्यालय, कांगडी, हरिद्वार, येथे दीक्षांत समारंभात दिलेल्या भाषणात उद्धरण, पृष्ठ १६, (तिरपी अक्षरं माझी)]

मेकॉलेचे मेहुणे सर चार्ल्स ट्रेव्हलिअन, जे नंतर मद्रासचे राज्यपाल झाले होते, यांनी भारतातील कामकाजाची चौकशी करण्याकरिता संसदेनं नेमलेल्या समितीला १८५३ साली दिलेल्या निवेदनात अरेबिक आणि संस्कृत विषयांच्या शिक्षणाला प्रोत्साहन न द्यायच्या घोरणाचं समर्थन करायचा प्रयत्न केला. त्यांचा युक्तिवाद होता की मुसलमान मुसलमानेतरांना धर्मलंड व आपलं राज्य बळकावणारे समजतात व अशा माणसांशी धोरण म्हणून आवश्यकतेपेक्षा कोणताही अधिक संबंध ठेवायला नकार देतात. आणि हिंदू पद्धती जरी

'कमी उग्र व आक्रमक असली' तरीही ती अधिक आपपरभाव करणारी आहे. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या योजनेच्या पुरस्कारामुळे मुसलमानांत आपण धर्मलंड असल्याची व त्यांचं धर्माधिष्ठित अत्यंत चांगलं राज्य आपण बळकावल्याची भावना निर्माण होईल आणि हिंदूंना आपण घाणेरडे पशू आहोत असं सतत जाणवत राहील. त्यामुळे आपणा ब्रिटिशांसाठी राष्ट्रीय शिक्षणाच्या योजनेच्या पुरस्कार चुकीचा ठरेल. जी शिक्षणपद्धती आपल्याविरुद्ध तीव्रतम भावना भडकवेल ती सुरू करावी याहून वेगळी इच्छा आपला कडवा शत्रूदेखील करणार नाही.

*उलटपक्षी भारतीय मन जर इंग्रजी साहित्यानं संस्कारित झालं तर ती गोष्ट इंग्रजांशी संबंध जुळवुन ठेवण्यासाठी अतिशय अनुकूल राहील. इंग्रजी साहित्याद्वारे आपल्याशी परिचय झालेला असल्यामुळे भारतीय तरुण आपल्याला परकीय लेखणं बंद करील. आपल्या महापुरुषांबद्दल आपण जेवढ्या उत्साहानं बोलतो तेवढ्याच उत्याहानं तेही बोलतात. समान मार्गानं शिक्षित झालेले, सयान उद्दिष्टात रस असलेले, ज्याप्रमाणे रोमनांच्या प्रांतात राहणारे लोक इटालिअन वा गॉल कमी राहिले व रोमन आधिक झाले त्याप्रमाणे आपल्याबरोबर समान व्यवसाय करणारे हिंदू हिंदू कमी याहिले आहेत व इंग्रज अधिक झाले आहेत.* [*अ टेरिबलइंडिक्टमेंट* मधील उद्धरण, *यंग इंडिया*, १७-१-२९, पृष्ठ २२]

त्याशिवाय

जोपर्यंत तद्देशीय लोक त्यांच्या पूर्वीच्या स्वातंत्र्याबद्दल विचार करत राहतील तोपर्यंत आपली परिस्थिती सुधारण्यासाठी इंग्रजांना या देशातून पूर्णपणे घालवलं पाहिजे असाच विचार ते करत राहतील... त्यांच्या मनात युरोपिअन संकल्पना भरवूनच त्यांच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाला नवीन वळण देता येईल. चर्चनं चालवलेल्या आपल्या शाळांमधे शिक्षण घेऊन वाढलेले तरुण आपल्या पूर्वजांच्या रानटी संस्थांकडे घृणेनं पाहतात आणि आपल्या राष्ट्रीय संस्थांना इंग्रजी संस्थांच्या नमुन्यावर ढाळायचा प्रयत्न करतात... इंग्रजांशी आपले संबंध घट्ट करण्यापेक्षा त्यांची स्वतःच्या विकासाबद्दलची कोणतीही अशी खास कल्पना नाही. या संस्थांतील शिक्षणामुळे

इंग्रजांच्या संरक्षणावर आणि इंग्रजी माध्यमातील शिक्षणावर अवलंबून राहायची त्यांना सवय लागते. [सर चार्ल्स ट्रेव्हलिअन यांचे सांसदीय समितीसमोरील निवेदन, १८५३]

इंग्रजी माध्यमाचे दुसरे पुरस्कर्ते डॉ. डफ लिहितात :

रोमन जेव्हा प्रांत जिंकायचे तेव्हा ते ताबडतोब त्या प्रांताला रोमन संस्कृतीत ढाळायच्या कामाला लागायचे. म्हणजे ते जित लोकांच्या मनात आपली सुसंस्कृत भाषा आणि साहित्य यांबद्दलची आवड निर्माण करायचा प्रयत्न करायचे.... आणि त्याद्वारे त्यांचे विचार, भावना आणि कल्पनाशक्ती यांना रोमनांना हितावह होण्याच्या दृष्टीने ते वळण लावायचे. [*अ टेरिबलइंडिक्टमेंट*, यंग इंडिया, १७-१-१९२९, पृष्ठ २२]

लॉर्ड बेंटिक यांनी सुरू केलेल्या अनैसर्गिक शिक्षण पद्धतीला पाठिंबा देण्यासाठी शिक्षणविभागानं पाठवलेल्या एका अहवालात एक अतिशय घाणेरडा मुद्दा विचारार्थ मांडला. मन्रो, जॉन माल्कम आणि एलफिन्स्टन यांनी निदर्शनास आणून दिलं होतं की भारतीय लोकांच्या 'वस्त्रप्रावरणाच्या आणि जीवनावश्यक गरजांच्या अतिशय साध्या सवयींमुळे, त्यांच्या धार्मिक दृष्टिकोनामुळे आणि ते निर्माण करत असलेल्या मालाच्या उत्तम दर्जामुळे' इंग्रजी वस्तूंना त्यांच्याकडून फार कमी मागणी येते. पाश्चात्त्य शिक्षणाद्वारे त्यांच्या सांस्कृतिक मूल्यात बदल होईल. *त्यामुळे आपल्या कारखानदारांना आपल्या देशातील विविध वर्गांना आवश्यक असलेला माल बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक वस्तूंचा स्थिर व सतत पुरवठा होत राहील व त्याचबरोबर ब्रिटिश मजुरांनी निर्माण केलेल्या मालाला कायम बाजारपेठ मिळेल.'*

इंग्रजी शिक्षणाचा हेतू 'रक्तामासानं भारतीय असलेल्या लोकांना अभिरुची, मतमतांतरे, नीतिमूल्ये आणि विचारपद्धतीच्या बाबतीत इंग्रज बनवायचा आहे' असं मेकॉलें म्हणाले होते. ज्यांना हे शिक्षण मिळालं ते पाश्चात्त्य संस्कृती, विज्ञान आणि शिक्षण यांचा भारतीय समाजात प्रसार करतील आणि त्याला नवजीवन द्यायचं कार्य करतील. यालाच 'झिरपण्याचा सिद्धान्त' म्हणून ओळखतात. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावात आलेल्या लोकांच्या मनातील राष्ट्रभक्ती दूर करायचं, भारतीयत्व नष्ट करायचं आणि त्यांना नकली इंग्रज बनवायचं कार्यच वास्तवात इंग्रजी

शिक्षणानं केलं. आंग्ल शिक्षितांचा आपल्या भूमीशी संबंध तुटला, त्यांनी स्वतःचं स्वत्व गमावलं आणि आपल्या देशापासूनही ते दूर ढकलले गेले. एके काळी बंगालचे राज्यपाल असलेले लॉर्ड रोनाल्डशे यांच्या शब्दात, :

*एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात बौद्धिक गोंधळ निर्माण झालेला होता. नावेचे दोर तुटून वाऱ्याबरोबर ती इतस्ततः भरकटत जावी तशी उमलती तरुण पिढी त्यामुळे भरकटत गेली. पाश्च्यात्त्यीकरण हा त्या काळात परवलीचा शब्द झालेला होता - आणि पाश्च्यात्त्यीकरणाची मागणी होती त्यांची आपल्याच देशाच्या संस्कृतीविरुद्ध ओरड करणं. पाश्चात्त्य देशातील प्रत्येक गोष्टीबद्दल त्यांचं कौतुक जसजसं वाढत जायचं तसतसा त्यांचा पौर्वात्य गोष्टींचा निषेध वाढत जायचा. प्राचीन शिक्षणाला कमी लेखण्यात यायचं, प्राचीन परंपय आणि प्रथा यांना बाजूला ढकलण्यात यायचं. 'प्राचीन धर्म जुनाट अंधश्रद्धा आहे' असं म्हणून त्याला कमी लेखण्यात यायचं. हिंदू समाजरचनेची उभारणी ज्या प्राचीन पायावर करण्यात आली होती त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं होतं आणि प्राचीन परंपरांवर हल्ला करणाऱ्या सुधारकांच्या नवीन पिढीला ज्या परंपरांवर भारतीय समाजाची उभारणी झाली होती त्यात स्वीकरंणीय असं काही आहे असं अगदीच वाटत नव्हतं.* [अर्ल ऑफ रोनाल्डशे, *द हार्ट ऑफ आर्यव्रत*, पृष्ठ ४५]

शिक्षित लोकांना संस्कृत, पर्शियन आणि अरेबिक या भाषा 'रानटीपणाच्या, किडक्या आणि प्रचलनाबाहेरील वाटत होत्या'. वैशिष्ट्यानं भारताच्या इतिहासाबद्दल त्यांना अत्यंत किळस वाटायची. मातृभाषेचा वापर त्यांना अप्रतिष्ठितपणाचा वाटायचा व त्या गोष्टीला ते मागासलेपणाची खूण समजायचे. त्यांनी पाश्चात्त्य आहाराचा, पोषाखाचा आणि राहणीचा स्वीकार केला आणि पाश्चात्त्यांच्या पद्धतीनं ते बोलू चालू लागले. परिणामी स्वतःच्याच भूमीत ते परकीय झाले. सवयी, भाषा आणि विचारपद्धतीमुळे ते जनसमूहापासून तोडले गेले. प्रसिद्ध बंगाली कवी मायकेल मधूसूदन दत्त अभिमानानं सांगायचे की 'मला स्वप्नही इंग्रजीत पडतात.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ६१-६२] त्यांना जेव्हा स्वप्नांच्या अवास्तवतेचं भान आलं तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की आपल्याला इंग्रजांसारखी मान्यता नाही. असं होणं अपरिहार्यच होतं. आणि मग त्यांनी बंगालीत

काव्य लेखनाला सुरुवात केली व ते बंगालीतील प्रसिद्ध कवी झाले. [बुद्धदेव बोस, *अॅन एकर ऑफ ग्रीन ग्रास*, ओरिएंट लाँगमन्स लि., कोलकाता, (१९४८), पृष्ठ ६१]

आपल्याच भूतकाळाच्या विरोधात आपणच केलेल्या प्रतिक्रियेच्या मागोमागच धार्मिक संशयवाद आला. 'त्यानं तरुण बंगालच्या नैतिकतेचा लचका तोडला व त्या जखमेत जीवघेणं विष ओतलं.' [अर्ल ऑफ रोनाल्डशे, *द हार्ट ऑफ आर्यव्रत*, पृष्ठ ४६] अनादर, बेशिस्त आणि अपव्यय या गोष्टींची शिक्षित तरुणांमधे फॅशन झाली होती. आपल्या बंधमुक्तीचं दर्शन घडवण्याकरता त्यांच्यापैकी काही लोक सनातनी लोकांच्या घरात गायीच्या हाडाचे तुकडे फेकत, 'आम्ही मुसलमान ब्रेड खाल्ली आहे, (आणि) इस्लाम धर्मातील प्रवेशाचं नाटक आम्ही करणार आहोत' अशी आरडाओरड करत ते रस्त्यातून हिंडत,' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ३०९] अर्ध पोर्तूगीज, मुक्त विचारवंत आणि कवी असलेले हेन्री लुईस डेरेझिओ यांना त्यांच्या वागणुकीमुळे त्यांचे प्रशंसक 'बंगालचे बायरन' म्हणत. ज्याची नक्कल 'बिभत्सता, गोमांस भक्षण आणि मद्यपान या बाबतीतच करता येईल अशा संप्रदायाचे ते केंद्र बनले होते.' एकोणिसाव्या शतकातील प्रसिद्ध बंगाली जमीनदार, शिक्षणतज्ज्ञ, अरविंद घोष यांचे आईकडून आजोबा असलेले बाबू राजनारायण बोस परोपकारी सद्गृहस्थ होते. महाविद्यालयातील त्यांच्या सहाध्यायी मित्रांचा समज होता की 'मद्यपान आणि सुसंस्कृतता या सोबत चालणाऱ्या गोष्टी आहेत.' त्यामुळे या गोष्टीला आपणही प्रकृती बिघडण्याएवढे बळी पडलो असं त्यांनी आपल्या आत्मचरित्रात वर्णन केलं आहे. इतर साक्षीदारांच्या म्हणण्याप्रमाणेही 'अमाप मद्यपान, विचार, अभिरुची आणि चारित्र्य याबाबतीत भयावह प्रमाणात बेछूटपणा पसरलेला होता. धर्मावरील अविश्वास आणि स्पष्ट नास्तिकपणा यांचा निर्लज्जपणे पुरस्कार करण्यात येत असे.' [अर्ल ऑफ रोनाल्डशे, *द हार्ट ऑफ आर्यव्रत*, पृष्ठ ४७]

सांस्कृतिक हल्ल्याच्या समांतर रेषेतच लोकांच्या धार्मिक श्रद्धांविरुद्ध मिशनऱ्यांचाही हल्ला सुरू होता. ख्रिश्चन धर्म सोडून इतर धर्मांतील लोकांच्या श्रद्धा आणि धार्मिक आचार याविरुद्ध अश्लाघ्य मोहीमच उघडण्यात आली. या मोहिमेच्या अंतर्गत अज्ञान, पूर्वग्रह आणि मनमानेल त्याप्रमाणे अर्थाचा अनर्थ करणे इत्यादी बाबींचा उपयोग करण्यात येत असे.

त्याचबरोबर धर्मवेड आणि कडवी धर्मश्रद्धा यातून अतिरेकी वर्णन करणे यावर या प्रचारकांचा खास भर असायचा. अज्ञानी आणि साध्यासरळ लोकांना भुलवण्यासाठी वादविवादातील सर्व युक्त्याप्रयुक्त्यांचा उपयोग करण्यात यायचा. अखेरीस लॉर्ड मिन्टो यांना ख्रिश्चन मिशनऱ्यांना कोलकातात धर्मप्रचार करायला मनाई करणं भाग पडलं. अश्लाघ्य लेखनामुळे जेव्हा एका धार्मिक पुस्तिकेवर त्यांनी बंदी घातली तेव्हा मिशनऱ्यांच्या पाठीराख्यांनी लंडनमधे वादळ उभं केलं. त्यासंबंधी कोर्ट ऑफ डायरेक्टरांच्या अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं की त्या पुस्तिकेतील एक पात्र अलंकारिक भाषेत या देशातील सर्व ब्राह्मणांची कत्तल करायचा पुरस्कार करते त्यामुळे असं करणं भाग आहे.' [लंडनमधे जो गलबला झाला तो चूक होता कारण लॉर्ड मिंटो अवास्तव बोलत नव्हते असं गॅरेट आणि थॉम्पसन यांचं म्हणणं आहे. लॉर्ड मिन्टो यांनी अध्यक्षांना लिहिलेलं पत्र असं होतं : 'विनंती आहे की हा दुर्दैवी भाग वाचावा..... पाखंडी वाचकांना समजावण्याचा वा त्यांच्या मनाचं समाधान करायचा एका शब्दानंही प्रयत्न न करता, त्यासाठी पुरावा न देता वा कोणत्याही प्रकारचा युक्तिवाद न करतानाही ही पानं नरकाच्या आगीनं सर्वत्र भरलेली आहेत, एवढंच नाही तर त्याहूनही ती भयानक आहेत, आपल्या वाडवडिलांनी शिकवलेल्या धर्मावर विश्वास ठेवण्यासाठी, ज्याच्या सत्यतेबद्दल अविश्वास दाखवावं असं त्यांच्या मनातदेखील येऊ शकत नाही, त्यांच्याजवळ काहीच कारण नाही. त्यासाठी विशिष्ट वंशाच्या सर्व लोकांची जाहीरपणे निंदा करण्यात येत आहे. हेच आपल्या श्रद्धेचं तत्त्वज्ञान आहे काय? .... जर ख्रिश्चन धर्मात याबद्दल दुमत असेल तर मी एवढंच म्हणेन की मी अशा पंथाचा आहे की ज्याचा विश्वास आहे न्यायी ईश्वर कुणालाही त्याच्या व्यक्तिगत अपराधाशिवाय शिक्षा करणार नाही...... या देशात ब्राह्मणांची सरसहा जी कत्तल होत आहे तीच ह्या उताऱ्याचं स्मरण करून द्यायचं कारण हेच आहे.....'इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट, राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया, पृष्ठ २४७]

जेव्हा कोलकातातील मिशनरी कॉलेजमधील विशेष गुणवत्ता आणि उत्तम चरित्र असलेल्या अनेक तरुणांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला तेव्हा बंगाली समाजाला धक्काच बसला. त्यातील अनेक अतिशय उच्चकुलीन हिंदू होते. एडवर्ड थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया या ग्रंथात दर्शविलं आहे की थोडा वेळ असं वाटलं की बंगालमधील बुद्धिवादी तरुणांच्या पुढाकारानं संपूर्ण बंगाल समाजच सामूहिकपणे ख्रिश्चन धर्माचा अंगीकार करणार आहे.... शिक्षणानं हिंदू धर्म नष्ट होऊन ख्रिश्चन धर्माची त्या ठिकाणी स्थापना होईल या मेकॉलेच्या स्वप्नाची उपहासानं थट्टा केली जायची पण आता ते वास्तव वाटायला लागलं आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३१०] परंतु हे स्वप्न वास्तवात आलं नाही हा व्यवस्थेचा दोष नव्हता.

## ११

अखेरीस ज्याची भीती होती तेच घडलं. १८५७ साली फार मोठं बंड झालं. धर्मानं वर्ज्य मानलेल्या प्राण्यांच्या चरबीनं माखलेल्या काडतुसांना स्पर्श करायला मेरठ येथील शिपायांनी नकार दिला. ही काडतुसं नेहमीच्याच दारूगोळ्यातील होती आणि भारतीय सैन्यात नव्यानंच दाखल झालेल्या एनफिल्ड बंदुकांबरोबर ती देण्यात आली होती. त्यातून गोळी झाडण्याआधी त्यावरील झाकण तोंडानं काढावं लागत असे. लवकरच देशातील फार मोठा भाग पेटला होता.

परंतु चरबीने माखलेली काडतुसं हे केवळ एक निमित्त झालं होतं. खरं कारण खोल कुठं तरी दडलेलं होतं. हाउस ऑफ कॉमन्समधे डिझराईली यांनी जुलै २७, १८५७ला सांगितलं, ‘माझी खात्री पटवण्यात आली आहे की बंगाल सैन्यातील बंडखोरांची आपल्या कामातील वातावरणाबद्दलची तक्रार नव्हती तर ते सर्वसामान्य असंतोष व्यक्त करत होते.’ [कॅम्ब्रीज *शॉर्टर हिस्ट्री ऑफ इंडिया*, पृष्ठ ७२२ वरील रेजिनाल्ड रेनाल्ड्स यांच्या व्हाईट साहिब्स इन इंडियामधील उद्धरण, पृष्ठ ८९] वस्तुस्थिती ही आहे की ‘बंड झालेल्या अनेक ठिकाणी जनतेनं शिपायांच्या आधी बंड केलं.’ [रेजिनाल्ड रेनाल्ड्स यांनी *व्हाईट साहिब्स इन इंडिया*मधे ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ इंडिया, पृष्ठ ७२२वरून उद्धृत केलेला उतारा, पृष्ठ ८९]

एक शतक लोकांनी मूकपणे सर्व सहन केलं होतं. परकीय शासनाबद्दलची घृणा समाजाच्या सर्व वर्गात पसरली होती. समाजातील ‘उच्च वर्गांचा समाजावरील प्रभाव कमी करण्यासाठी’ त्यांचा दर्जा कमी करायचा वा त्यांना नष्ट करायचा.... आणि सर्वांना समान पातळीवर आणायच्या’ [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), पृष्ठ ४२२] ब्रिटिशांच्या धोरणामुळे समाजातील अमीर उमरावांचा वर्ग संतप्त झालेला होता. खालसा केलेल्या वा गुलामगिरीसम अवस्थेत आणलेल्या संस्थानात सैन्य ठेवण्याला मनाई करण्यात आल्यामुळे सर्व स्तरावरील लढाऊ वर्गातील लोकांची नोकरी गेली. खालसा करण्यात आलेल्या प्रदेशात भ्रष्ट आणि शिरजोर अधिकाऱयांच्या टोळक्यांनी सामान्य लोकांचा, विशेषतः शेतकऱ्यांचा अतिशय छळ केला होता. त्या छळामुळे आणि त्यांनी केलेल्या दडपशाहीमुळे लोकांची सहनशीलता संपुष्टात आलेली होती. लोकांच्या जीवन पद्धतीतील आणि त्यांच्या प्राचीन

संस्थांतील - ज्यांच्यावर त्यांचा अतिशय जीव होता - हस्तक्षेपामुळे तसंच संपूर्ण सुपीक जिल्ह्यांचं नापीक वाळवंटात रूपांतर करणाऱ्या निर्दय पिळवणुकीमुळे हा असंतोष श्रीमंतांच्या महालांपर्यंतच शिल्लक राहिलेला नव्हता तर तो गरिबांच्या झोपड्यांतही पोहोचलेला होता. संपूर्ण देशच जणू काय आगीत होरपोळत होता. बरखास्त केलेल्या आणि ज्यांची राज्ये धोक्यात होती त्या राजकुटुंबातील लोकांनी नेतृत्व पुरवलं. ते या बंडाच्या अग्रभागी होते व त्याच्याच नेतृत्वाखाली लोक एकत्र झाले होते.

एकोणीसाव्या शतकातील पाचव्या आणि सहाव्या दशकात इंग्लंडमधील जनतेच्या सर्व वर्गात धर्मासंबंधीचा बराच उत्साह होता. १८५७च्या उठावाच्या आदल्या दिवशी बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष रॉस मँगल्स जाहीर भाषणात म्हणाले, 'भारताच्या एका टोकापासून तर दुसऱ्या टोकापर्यंत ख्रिश्नत्वाची विजयपताका फैलावण्यासाठी दैवानं भारतासारख्या विशाल देशावर इंग्लंडला साम्राज्य स्थापायची संधी दिली आहे. भारताला ख्रिश्चन करायच्या महान कार्यासाठी प्रत्येकानं मुळीच वेळकाढूपणा न करता संपूर्ण सामर्थ्यानिशी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला पाहिजे.' [इंदुलाल याज्ञिक यांनी *शामजी कृश्न वर्मा*मधे उद्धृत केलेले रॉस मँगल्स, लक्ष्मी प्रकाशन, मुंबई, (१९५०), पृष्ठ ४] लॉर्ड कॅनिंग यांची जेव्हा गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती झाली तेव्हा त्यांच्या सार्वजनिक सत्कार समारंभात आपल्या भावना व्यक्त करत लॉर्ड पामरस्टन म्हणाले, 'ज्याची कल्पनाही मानव जातीनं केलेली नसावी एवढी उच्च आणि उदात्त देणगी भारतातील असंख्य लोकांना द्यायचं आपल्या नशिबी आहे.' [कॅम्ब्रीज *शॉर्टर हिस्ट्री ऑफ इंडिया*, पृष्ठ ७२२ वरील रेजिनाल्ड रेनाल्ड्स यांच्या *व्हाईट साहिब्स इन इंडिया*मधील उद्धरण, पृष्ठ १२] १८५७च्या उठावाआधी पेशावरमधे आयुक्त असलेले हर्बर्ट स्पेन्सर यांना प्रकर्षानं वाटत होतं की

*लोकांचा ख्रिश्चन करता यावं म्हणून दैवानं भारताला ब्रिटिशांच्या हाती सोपवलं आहे. जोपर्यंत भारत ख्रिश्चन होत नाही तोवर त्याच्यात स्वतंत्र व्हायची पात्रता येणार नाही. जेव्हा भारत ख्रिश्चनत्वानं परिपुर्ण होईल तेव्हा त्याहून किंचितही कमीसाठी तो पात्र असणार नाही. आणि*

*त्यानंतर भारताला चालणं शिकवणारा इंग्लंड भारताला साम्राज्याबाहेर चालत जायचं स्वातंत्र्य देईल. माझा दृढविश्वास आहे की इंग्लंडनं हे करावं अशी ईश्वराची इच्छा आहे.* [वरीलप्रमाणे, पृष्ठ ८८]

धर्मप्रसार करू इच्छिणाऱ्या या अति उत्साही लोकांची आकांक्षा ब्रिटिश साम्राज्यवादी लोकाच्या मनाला अतिशय प्रोत्साहित करत असे. दोघांच्याही भावना परस्परांशी सुसंगत आणि पूरक होत्या. परंतु भारतीय जनता मात्र त्याकडे भयचकित उत्साहानं पाहत होती. भारतीयांनी जे गमावलं होतं त्यापेक्षा त्यांना आपल्या पूर्वजांनी ठेवलेला श्रद्धेचा ठेवा अधिक मोलाचा वाटत होता. परंतु जगाला मात्र भारतीयांनी जे गमावलं होतं त्याचंच महत्त्व वाटत होतं.

अठराशे सत्तावनचा उठाव हा केवळ सैनिकांचाच उठाव नव्हता. त्याला जनतेचा लोकप्रिय पाठिंबा होता, वैशिष्ट्यानं संयुक्त संस्थानात. समाजातील सर्व स्तरात परकीय शासनासंबंधी प्रखर विरोधाची भावना वसत होती. न्यायमूर्ती मॅकार्थी यांच्या शब्दात सांगायचं तर हिंदू-मुसलमानात धार्मिक कारणामुळे जे हाडवैर निर्माण झालं होतं ते त्यामुळे क्षणात विसरलं गेलं. 'मेरठच्या शिपायांना एका क्षणात नेता, ध्वज आणि ध्येय यांची प्राप्ती झाली आणि उठावाचं रूपांतर क्रांतियुद्धात झालं.' [इंदुलाल याज्ञिक यांनी शामजी कृष्णवर्मामधे उद्धृत केलेला जस्टिन मॅकार्थी, हिस्ट्री ऑफ अवर ओन टाईम, त्, मधील उतारा, पृष्ठ २]

बहुतांश लोकांना दीर्घकाळ सरंजामशाहीच्या काळातील आपल्या मालकांकडून तसंच परकीयांकडून जुलूम सहन करावा लागलेला होता. ते इतके निस्तेज आणि असंघटित झालेले होते की त्याविरोधात प्रभावी कृती करायचं सामर्थ्यच त्यांच्यात राहिलेलं नव्हतं. त्यांना सैनिकी प्रशिक्षण मिळालेलं नव्हतं, तशी संघटना त्यांच्याजवळ नव्हती, व त्यासाठी आवश्यक साधनंही त्यांच्याजवळ नव्हती. ब्रिटिश यशस्वीपणे परस्परांत भांडणं लावत होते. त्यांनी गुरखे आणि शिखांचं भाडोत्री सैन्य उभारलं. भारतातील अनेक संस्थानातील राज्यकर्ते आपल्या प्रजेवर जुलूम करायचे. त्यामुळे त्यांच्या प्रजेचा त्यांच्यावर जो रोष व्हायचा त्यापासून वाचण्यासाठी ते इंग्रजावर अनेक वर्षांपासून अवलंबून होते. उठाव 'मध्ययुगीन क्रौर्यानं' दडपून टाकण्यात आला. [एच. कॉन, *हिस्ट्री ऑफ द नॅशनॅलिझम इन द ईस्ट*, न्यूयॉर्क, (१९२९), पृष्ठ ३५९] **लंडन स्पेक्टेटरनं** लिहिलं की 'बंडाच्या दरम्यान

आम्ही कमीतकमी १००,००० भारतीयांचा जीव घेतला.’ [डॉ. जे. टी. सन्डरलॅन्ड, *इंडिया इन बाँडेज*, न्यू यॉर्क, (१९२९), पृष्ठ १३३] बंडखोर आणि ज्यांच्यात मैत्रीभाव नाही असा संशय होता त्यांना पकडल्यानंतर तडकाफडकीनं फासावर चढायची शिक्षा देण्यात यायची. त्याशिवाय **लंडन टाईम्सच्या** वार्ताहरानं वर्णन केल्याप्रमाणे ‘त्यांचा मानसिक आणि आध्यात्मिक छळ करण्यात यायचा. तसा छळ करायचा आपल्याला कोणताच अधिकार नव्हता आणि तसं काही करायचं युरोपमधे आपण साहसही करणार नाही.’ [रसेल, *माय डायरी इन इंडिया* ii, पृष्ठ ४३, लेखक टाईम्स ऑफ लंडनचे वार्ताहर होते] फासावर चढवायच्या आधी मुसलमानांना डुकराच्या कातडीनं शिवण्यात यायचं, त्यांच्या अंगाला डुकराची चरबी चोपडण्यात यायची आणि नंतर जाळण्यात यायचं. [वरीलप्रमाणे] ‘हजारोंना ओळीत कोर्ट मार्शल मार्शलसाठी उभं करण्यात यायचं व त्यांना फासावर चढवायची वा गोळ्या घालून मारायची शिक्षा देण्यात यायची' . काही प्रकरणी ‘गायीचं मास तलवारीच्या वा बंदुकीच्या दस्त्याच्या आधारे शिक्षा झालेल्या माणसाच्या तोंडात खुपसण्यात यायचं.’ [होम्स, *हिस्ट्री ऑफ द सिपॉय वॉर*, पृष्ठ १२४]

सुसंस्कृत जगातील युद्धाचे नियम बाजूला सारण्यात आले. मृत्युदंडाची शिक्षा झालेल्या लोकांची ‘खालच्या दर्जाचे अडाणी सैनिक जेव्हा चेष्टा आणि छळ करायचे तेव्हा वरच्या दर्जाचे शिक्षित अधिकारी तिकडे डोळेझाक करायचे आणि मूक संमती द्यायचे.’ बंडखोरांना शिक्षा द्यायचा त्यांचा आवडता प्रकार होता तोफेसमोर उभं करून उडवायचा. असं ‘ते त्या शिक्षेचा प्रभाव वाढावा म्हणून करायचे. संशयित बंडखोरांसाठी ही नेहमीची शिक्षा होती.’ [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ४५२ (तिरपी अक्षरं माझी)] आक्रमक आणि आक्रमणात भाग न घेणारा, अपराधी आणि निरपराध, शत्रू वा मित्र यांत कोणताच भेदभाव करण्यात येत नसे. एवढंच नाही तर छावणीच्या मागेमागे जाणाऱ्या निरपराध लोकांनाही सोडण्यात आलं नाही. *द हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी* या ग्रंथाच्या लेखकाच्या शब्दांत ‘पूर्वेकडील राखी रंगाचा सैनिकी गणवेष घातलेल्या लोकांबद्दलची गोऱ्या सैनिकांच्या मनातील द्वेषभावना निष्ठा, भक्ती, चांगल्या लोकांनी केलेली चांगली सेवा या गोष्टींमुळेसुद्धा कमी होऊ शकली नाही.’ [काये अँड मॅलिसन, *हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी*, ii, पृष्ठ ४३८] ते युद्ध गोरे विरुद्ध काळे असं होतं.

त्यात काळे क्षमेची कोणतीही अपेक्षा ठेवू शकत नव्हते. *हिस्ट्री ऑफ द सिपॉय वॉर* या ग्रंथात होम्स यांनी नोंदवून ठेवलं आहे की 'आम्हांला कोणतीही हानी न पोहोचवणारे म्हातारे, छातीवर मुलांना दूध पाजणाऱ्या निराधार स्त्रिया यांनादेखील दुष्टतम गुन्हेगारांपेक्षा आमच्या सुडाचा काही कमी परिणाम भोगावा लागला नाही.' [होम्स, *हिस्ट्री ऑफ द सिपॉय वॉर*, पृष्ठ १२४]

मेरठमधील उठावाच्या पंधरवड्याच्या आतच बदला आणि प्रतिशोधाची भावना कळसाला पोहोचली होती. 'बंडाच्या काळात निकोल्सन नावाजलेला होता. तो अपराध्यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यासाठी बेभान होऊन सतत निमित्तच शोधत असायचा. 'जिवंतपणी कातडी सोलता यायचा, सुळावर चढवता यायचा, दिल्लीत स्त्रिया आणि मुलांचा खून करणारांना जाळायचा अधिकार देणारा आपल्याजवळ कायदा असायला हवा' असं तो कॉलनल एडवड्र्सला सुचवत असे. [काये अँड मॅलिसन, *हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी*, ii, पृष्ठ ३०१] तथाकथित अपराध्यांची शिकार करण्यासाठी 'सैन्याचे अधिकारी कोणत्याही प्रकारची दयामाया न ठेवता एखाद्या कुत्र्याच्या, कोल्ह्याच्या श्वापदाच्या मागे लागावं त्याप्रमाणे अपराध्यांच्या मागे लागत. ते त्यांना माणूस समजतच नसत. माणसापेक्षाकमी प्रकारच्या प्रजातीशी करावा तसा व्यवहार ते त्यांच्याशी करत. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ७७] ब्रिटिश तुकड्यांनी मार्गावरील शेकडो मैलातील गावं जाळून टाकली व अशा रीतीनं देशाचं वाळवंटात रूपांतर केलं. त्यांच्याकडे फासावर चढवण्यासाठी स्वयंसेवकाच्या तुकड्या तसंच हौशी फासावर चढवणारेही असत. 'आठआठच्या संख्येनं कलात्मक पद्धतीनं किती लोकांना आपण फासावर चढवलं याचं ते अभिमानानं वर्णन करायचे. जणू काय तो त्यांचा रिकामपणाचा खेळ असायचा.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १७७] निगर म्हणून बंदींना सतत मारहाण करणं [वरीलप्रमाणे, पृष्ठ २०३] हा त्यांचा रिकामपणातील आवडता छंद होता. त्यांत त्यांना फार मजा वाटायची.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २०३] असमाधानी खेड्यांना जाळण्यासाठी दररोज मोहीम काढण्यात यायची. अशाच एका मोहिमेत,

*आम्ही एका आगबोटीत बसलो आणि आमचं आमची बोट सुरू होताच बदनाम ठिकाणावर पोहचेपर्यंत आम्ही डावीउजवीकडे गोळीबार सुरू केला.... आम्ही जेव्हा किनाऱ्यावर*

*उतरलो तेव्हा चोहोकडे गोळीबार करत आम्ही अनेक निगरांना मारलं... आम्ही त्या ठिकाणी इतस्ततः गोळीबार केला व त्यामुळे आगी लागल्या व त्यावेळी वारा असल्यामुळे त्याचा जाळ गगनाला भिडू लागला. आम्ही आमचा बदला घेतलेला होता.* [चार्ल्स बॉल, *इंडियन म्युटिनी,* , पृष्ठ २५७]

अलाहाबाद येथे सैनिकी शासनाची घोषणा करण्यात आल्यानंतर 'सैनिक तसंच इतर लोकही दुष्ट फिरत्या न्यायलयांचं काम पाहत असत. अनेकदा तर अशा न्यायालयांसमोर उभं न करताही लोकांना कंठस्नान घालण्यात येत असे व त्यावेळी वयाचा वा लिंगाचा कोणताच विचार करण्यात येत नसे.' [संसदेला सादर करण्यात आलेली कागदपत्रे, फेब्रुवारी ४, १८५८, काये अँड मॅलिसन, *हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी,* ii, पृष्ठ २०३] 'आणि जे काही थोडंसं औपचारिकता म्हणून करण्यात आलं होतं ते अनौपचारिकपणे जे करण्यात आलं त्यासमोर काहीच नव्हतं.' [होम्स, *हिस्ट्री ऑफ द सिपॉय वॉर,* पृष्ठ १२४] काये आणि मालेसन यांच्या सांगण्यानुसार उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यामधे प्रचलित असलेल्या पुस्तकात सांगण्यात आलेलं आहे की एका ठिकाणी 'मृतांना घेऊन जाणाऱ्या आठ गाड्या तीन महिनेपर्यंत सकाळपासून तर सायंकाळपर्यंत चौफुल्यांवर आणि बाजाराच्या ठिकाणी लटकत असलेल्या प्रेतांची वाहतूक करत होत्या' [काये अँड मॅलिसन, *हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी,* ii, पृष्ठ ७७] अशा प्रकारे सहा हजार लोकांना 'तडकाफडकी अनंतत्वात विलीन करण्यात आलं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २०३]

उपलब्ध पुराव्यानुसार कानपूर येथील हत्याकांड घडलं होतं व 'त्याला प्रेरणाही बहुधा बनारस आणि अलाहाबाद येथे देण्यात आलेल्या पाशवी शिक्षेतूनच मिळाली असावी.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया,* पृष्ठ २५४] 'सरकारी सैनिकांनी कितीही राक्षसी वर्तन केलं तरी ते स्वागतार्ह आहे अशी जणू काय त्याला धार्मिक मान्यता' या घटनेमुळे मिळाली, [वरीलप्रमाणे] निरागसपणे खेळत असताना काही मुलांनी बंडखोरांचा ध्वज फडकवला. त्यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली. न्यायालयात काम करणाऱ्या एका अधिकाऱ्याच्या डोळ्यात अश्रू येऊनही त्या मुलांना झालेली शिक्षा ते अश्रू अडवू शकले नाही. [काये अँड मॅलिसन, *हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी,* ii, पृष्ठ ७७] दुसऱ्या एका प्रकरणी २८२ निःशस्त्र सैनिकांनी पंजाबमधील नागरी अधिकारी कुपर यांच्यासमोर शरणागती पत्करली. त्यांच्यावर जिथे औपचारिकपणे खटला

चालवला जाऊ शकत होता तिथं त्यांना न्यायला कोणतंही साधन नव्हतं. उलटपक्षी 'त्यांना जर तडकाफडकी शिक्षा करण्यात आली तर त्यांची ती अवस्था पाहून इतर तुकड्यातील सैनिक आणि बंडखोरीकडे वळू पाहणारे लोक धडा शिकायची शक्यता होती.' केवळ याच कारणासाठी कुपरनं त्यांना ठार करायचा निर्णय घेतला.

*दुसऱ्या दिवशी सकाळी त्यानं त्या शरणागतांचा १०-१०च्या संख्येत बाहेर काढलं आणि काही शिखांना त्यांना गोळ्या घालायला लावलं. अशा प्रकारे २१६ लोकांना संपवण्यात आलं. तरीही ६६ लोक उरले होते. त्यांना तहसिलीतील एका कोठडीत कोंडून ठेवण्यात आलेलं होतं. ते प्रतिकार करतील अशा अपेक्षेनं कुपरनं त्या कोठडीचं दार उघडायचा आदेश दिला. परंतु दार उघडण्यात आल्यानंतर त्या कोठडीतून कोणताच आवाज ऐकू आला नाही. तिथं जमिनीवर ४५ लोकांचे मृतदेह पडलेले होते. कारण कुपरला न कळवता त्या खोलीच्या खिडक्या बंद करण्यात आल्या होत्या. गरीब बिचाऱ्या त्या कैद्यांसाठी ती काळकोठडी झाली होती. उरलेल्या २१ जणांना त्यांच्या सहकाऱ्यांप्रमाणेच गोळ्या घालून ठार मारण्यात आलं.* [होम्स, *हिस्ट्री ऑफ द सिपॉय वॉर*, पृष्ठ ३६३]

कानपूर आणि लखनौमधे राहणाऱ्या लोकांची सामुहिक हत्त्या करण्यात आली. जे कोणी ब्रिटिश सैनिकांच्या हाती पडले त्यांचं काम संपवण्यात आलं. मग हाती 'सापडलेली माणूस शिपाई होता की साधा ग्रामीण खेडूत होता याला काहीच महत्त्व नव्हतं. कोणताही प्रश्न विचारला जात नव्हता. सापडलेल्या माणसाची कातडी काळी असणं हे पुरेसं कारण नव्हतं काय? दोराचा एक तुकडा, झाडाची एक फांदी आणि तेही नसलं तर बंदुकीची गोळी त्या माणसाच्या मेंदूबाहेर काढली की झालं, संपली त्या दैत्याची जीवनयात्रा!' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*मधे पृष्ठ ४५४ वर लेफ्टनंट व्ही. डी. परांजपे यांच्या अप अमंग द पांडीज या ग्रंथातील पृष्ठ १९५वरील उतारा] दिल्ली काबीज करण्यात आल्यानंतर 'कानपूरप्रमाणेच दिल्लीची निर्दयपणे लूट करण्यात आली' आणि ब्रिटिशांच्या प्रवेशाच्या वेळी जे लोक शहराच्या परकोटात सापडले त्यांना बंडखोर पळू जाऊ नये म्हणून 'जागेवरच गोळ्या घालण्यात आल्या.' [माँटेगमरी मार्टिन यांच्या *द इंडियन एम्पायर* या ग्रंथात पृष्ठ ४४९वर *बॉम्बे टेलिग्राफमधील* उद्धृत करण्यात आलेलं पत्र] दिल्लीच्या सम्राटाच्या तीन मुलांना ठार

मारण्यात आलं व त्यांची प्रेतं दिल्लीच्या रस्त्यातून फरफटत नेण्यात आली. स्वतः सम्राटांना रंगूनला हद्दपार करण्यात आलं होतं व तिथेच तुरुंगात ते मरण पावले. त्यांच्याचबरोबर मोगल साम्राज्याची अखेरची निशाणीही नष्ट झाली.

१८५८च्या सुरुवातीलाच उठावाला चिरडून टाकण्यात आलं होतं, त्याच्या नेत्यांना मारण्यात आलं होतं, पकडण्यात आलं वा पळून जायला भाग पाडण्यात आलं होतं. परंतु त्यामागे उरलेली कटुता भारतीयांचे व इंग्रजांचे संबंध अनेक दशकापर्यंत कलुषित करतच राहिली. जी. ओ. ट्रेव्हलियन यांनी लिहिलं, '१८५७च्या उठावाचा ब्रिटिश मानसावर परिणाम झालाच. त्याच्या स्मरणानंच ब्रिटनमधील लोकांना लाज वाटायला लागते. परंतु भारतात त्याचा परिणाम पिढ्यांपिढ्या कल्पनाही करता येणार नाही एवढ्या प्रामाणात जाणवत राहणार आहे.' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडियामधे* पृष्ठ ४६४ वर जी. ओ. तल्यारखान यांच्या *द कॉम्पिटिशनवाला* या ग्रंथातील पृष्ठ २८३वरील उतारा] *लंडन टाईम्सचे* वार्ताहर श्री, रसेल यांनी भविष्यवाणी केली की 'जे विष यातून पेरलं गेलं ते नष्ट व्हायला अनेक वर्ष लागतील. पूर्वीचा आत्मविश्वास कधीच परत येणार नाही आणि तो आलाही तरी आपलं भारतातील राज्य कायम ठेवायला किती किंमत चुकवावी लागेल याचा विचारच भयावह वाटतो.'

लॉर्ड कॅनिग यांना कडवे ब्रिटिश उपहासानं 'क्षमाशील' आणि 'माणुसकीचा देखावा करणारे' कॅनिंग म्हणून संबोधत असत. या वातावरणात वाहवत न जाता ते आपल्या भूमिकेवर स्थिर होते. ब्रिटिशांच्या मनात निर्माण झालेल्या विमनस्कतेमुळे अस्वस्थ होऊन राणीला त्यांनी लिहिलं: 'द्वेषभावनेनं परदेशात सूड घ्यायचा जो प्रयत्न सुरू आहे त्याबाबतीत आपल्यापैकी अनेक लोक चांगलं उदाहरण घालून देऊ शकले असते. परंतु तसं घडलेलं नाही. त्याबद्दल विचार करताना आपल्या देशबांधवांबद्दल लाज वाटू लागल्याशिवाय राहू शकत नाही. तेवढ्याच प्रमाणात चिंतित होऊन राणीनं परत लिहिलं, 'लोकांनी ख्रिश्चनत्व विरोधी भारतासंबंधी इथंही मोठ्या प्रमाणात जे अन्याय्य वर्तन केलं आहे त्यामुळे लॉर्ड कॅनिग यांना जाणवणाऱ्या शोकात राणीही पूर्णपणे सहभागी आहेत यावर तुम्ही सहज विश्वास ठेवू शकाल.' [रोमेश दत्त यांच्या *द इकॉनॉमिक*

*हिस्ट्री ऑफ इंडिया* (व्हिक्टोरिअन एज), या ग्रंथात पृष्ठ २२४-२५वर *लाईफ ऑफ द प्रिन्स कन्सॉर्ट* कंड ४,६, -, पृष्ठ १४५वरून घेतलेला उतारा]

१८५७चा उठाव दडपल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीचं राज्य रद्द करणारं आणि ते सरळ राणीच्या सत्तेखाली आणणारं विधेयक ब्रिटिश संसदेत मांडण्यात आलं. त्यावेळी इंग्लंडमधे कॉब्डेनसारखे असे काही लोक होते की ज्यांना 'भारतातील ब्रिटिशांचं राज्य अनैसर्गिक आहे' असं वाटत होतं. त्यांना वाटत होतं की 'एक दिवस भारतातील लोक आपलं म्हणणं समर्थपणे मांडल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे हिंदूंना अनुकूल असलेल्या वातावरणात जीवनानंद घेण्यासाठी मोकळं सोडलं पाहिजे.' [रेजिनाल्ड रेनाल्ड्स यांनी *व्हाईट साहिब्स इन इंडिया*मधे कॉब्डेन यांनी विल्यम हरग्रीव्हज यांना ऑगस्ट ४, १८६०ला पाठवलेलं पत्र पृष्ठ ८७वर उद्धृत केलेलं आहे. पृष्ठ ८७] कॉब्डेननी पुढं निदर्शनास आणून दिलं की 'आपल्या स्वतःच्या अवनतीसाठी जाणीवपूर्वक लोकांचा कायम उपयोग करून घेता येणं अशक्य आहे. परंतु ब्रिटिश भारतीय राज्याची संपूर्ण योजना मात्र भारतीय लोक स्वतः होऊन आपल्या स्वतःच्या अवमाननेसाठी तयार होतील या गृहीतकावर आधारित आहे.' [रिचर्ड कॉब्डेन यांनी जॉन ब्राईट यांना पाठवलेलं पत्र, ऑगस्ट २४, १८५७, *मोर्लेज लाईफ ऑफ कॉब्डेन*, ११वी आवृत्ती, पृष्ठ ६७२] त्यामुळे त्यांनी विनंती केली की 'व्यावहारिक दृष्टीनं तसंच नैतिक दृष्टीनं भारतावर तिथल्याच लोकांना शासन करायला, मग ते शासन चांगलं असो वा वाईट, आपण मोकळं सोडायला पाहिजे. भूमीच्या दुसऱ्या टोकावर राहणाऱ्या अस्थायी मुक्कामास आलेल्या परकीय लोकांच्या उत्तम शासनात राहून सतत अपमानित होण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या लोकांच्या, वर्णाच्या, नात्याच्या लोकांनी - आपल्या दृष्टीनं - वाईट शासन केलेलंही त्यांना आवडेल.' [रिचर्ड कॉब्डेन यांनी श्री. ॲशवर्थ यांना पाठवलेलं पत्र, ऑक्टोबर १६, १८५७, *मोर्लेज लाईफ ऑफ कॉब्डेन*, ११वी आवृत्ती, पृष्ठ ६७०]

उठाव दडपण्याच्या पद्धतीमुळे कॉब्डेन यांच्या मनात भयानक कुतर्क येऊ लागले. 'दूरवर राहणाऱ्या आणि कुणालाही न दुखवणाऱ्या लोकांवर मूलतः आपणच केलेल्या आक्रमणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत आपण जी अघोरी कृत्यं केली त्याबद्दल दैव आपल्याला शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही' अशी त्यांना भीती वाटत होती. परंतु मुक्त व्यापाराचे पुरस्कर्ते असलेल्या त्यांच्या मित्राची विचारसरणी वेगळी होती. लंकेशायर आणि यॉर्कशायर येथील

कारखानदार 'भारताकडे केवळ बळजबरीनंच आपल्याकडे ठेवता येईल असं मुक्त व्यापाराचं क्षेत्र म्हणून पाहत होते.' [रेजिनाल्ड रेनाल्ड्स यांनी *व्हाईट साहिब्स इन इंडियामधे* कॉब्डेन यांनी कॉलनल फिट्झमेयर यांना ऑक्टोबर १८, १८५७ला पाठवलेलं पत्र पृष्ठ ३६वर उद्धृत केलेलं पत्र] त्यानंतर तिथं जॉन लॉरेन्स आणि हर्बर्ट एडवड्ससारखे धर्मप्रसारकही होते. त्यापैकी हर्बर्ट एडवड्सला वाटत होतं की 'खोट्या धर्माला मान्यता द्यायची एक देश म्हणून जी चूक आपण केली त्यामुळे दैवानं आपल्याला उठावाच्या रूपानं दिलेली ही शिक्षा आहे. त्याची इच्छा होती की हिंदूंच्या वा मुसलमानांच्या कोणत्याही सणासाठी सुटी देण्यात येऊ नये आणि शाळेत बायबलचं शिक्षण सक्तीचं करण्यात यावं. सर बर्टले फ्रेअर यांनी त्याबद्दल त्याची चांगलीच खरडपट्टी काढली : 'ख्रिश्चन सरकारच्या वर्तनासाठी काही वेगळे सुरक्षित नियम असतात आणि व्यक्तीच्या वर्तनासाठी वेगळे नियम असतात असं होऊ शकत नाही - लोकांनी आपल्याशी जसं वागावं असं आपल्याला वाटतं तसंच आपण लोकांशी वागावं हाच ख्रिश्चन धर्मानं सांगितलेला नियम आहे. आणि कॉलनल एडवड्स आणि जे. लॉरेन्स जे करू इच्छितात तसं वर्तन आपल्याशी जर कोणी करायचा प्रयत्न केला तर आपण त्याचा प्राण पणाला लावून प्रतिकार करू.' तरीही हर्बर्ट एडवड्सशी सहमत होण्याकडे पन्नास टक्के कल असलेले अनेक लोक होते परंतु त्यातील धोका त्यांच्या लक्षात आला व आपण करत असलेली तडजोड 'थोडी अधिकच ऐहिक आहे असं जाणवल्यानं थोड्याशा अस्वस्थ चित्तानंच त्यांनी तडजोडीला मान्यता दिली.' [फिलिप वुडरफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, जोनाथन केप, लंडन, (१९५४), पृष्ठ ३६] अखेरीस सर्व प्रयत्न व्यर्थ जात असलेले पाहून कॉब्डेन यांनी त्यांना आठवण करून दिली की 'जे धार्मिक लोक आज आपल्याला सांगत आहेत की भारताचं धर्मांतर करण्यासाठी भारताला आपल्या ताब्यात ठेवायला हवं त्यांनी लक्षात ठेवायला हवं की लोकांना ख्रिश्चन करण्यासाठी लाल वा काळे कोट पाठवून धर्मप्रचार करणं हा ईश्वराचा आशीर्वाद मिळवण्यासाठी केलेला सर्वोत्तम प्रयत्न नाही.' [रेजिनाल्ड रेनाल्ड्स, *व्हाईट साहिब्स इन इंडिया*, पृष्ठ ८३] परंतु त्यांचे हे शब्द अरण्यरुदनासारखे ठरले. 'भारताला परत जिंकायचा, त्याचं ख्रिश्चनीकरण करायचा' [रेजिनाल्ड रेनाल्ड्स, *व्हाईट साहिब्स इन इंडिया*, पृष्ठ ८३] आणि त्याला लँकेशायरच्या व्यापारासाठी राखून ठेवायचा

विचारच अखेरीस प्रभावी ठरला. कंपनीच्या राज्याचा अंत करण्यात आला व भारत ब्रिटिशांची संपत्ती झाला.

ज्या कायद्यान्वये हे करण्यात आलं होतं त्यातील सगळ्यांत आश्चर्याची कलमं अर्थविषयक कलमं होती. त्यान्वये कंपनीच्या सर्व संपत्तीच्या सुरक्षिततेची ग्वाही देण्यात आली होती परंतु कंपनीच्या ऋणाची जबाबदारी मात्र भारतावर टाकण्यात आली होती. ह्या सनदेचं १८३३ साली नूतनीकरण करण्यात आलं. त्यानुसार एप्रिल १८३४पासून कंपनीचा व्यापार बंद करण्यात आला, कंपनीच्या भूप्रदेशासंबंधीचे आणि इतर कर्ज भारताच्या महसुलातून वळते करायचं ठरवण्यात आलं. त्याशिवाय भारताच्या महसुलातून कंपनीला 'तिच्या भागभांडवलावर वार्षिक १० पौंड १० शिलींग लाभांश' द्यायचा होता. कंपनीच्या १०० पौंड भाग भांडवलासाठी २०० पौंड देऊन हा लाभांश १८७४पासून बंद करता येऊ शकत होता. त्याशिवाय या कायद्यात तरतूद करण्यात आली होती की १८५४नंतर कंपनी बंद पडल्यास कंपनीनं मागणी केल्यानंतर तीन वर्षांच्या आत हा लाभांश बंद करता येऊ शकणार होता. [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), पृष्ठ ३९८]

१८५८ साली कंपनीचा भूप्रदेश सिंहासनाच्या ताब्यात घेताना कंपनीच्या वहिखात्यातील सर्व कर्जांची व त्यावरील देय व्याजाची जबाबदारी भारतीय जनतेनं दिलेल्या महसुलावर टाकण्यात आली होती व त्या संपूर्ण रकमेवर त्यावेळी १०.५ टक्के व्याजदर ठरवण्यात आला होता, [विल ड्युरांट, *द केस फॉर इंडिया*, पृष्ठ १३]` अशा प्रकारे कंपनीच्या अस्तित्वात नसलेल्या भागभांडवलावर भारताला व्याज द्यायला भाग पाडण्यात आलं. एवढंच नाही तर त्यानंतर दोन पिढ्यांपर्यंत भारताच्या महसुलातून विकत घेतलेल्या मालावर कंपनीला प्रचंड नफा मिळत राहिला. सिंहासनानं एक पैही खर्च न करता साम्राज्यात फार मोठ्या भूप्रदेशाची भर घातली. भारतीय जनता या सौद्याची व त्यावरील व्याजाची रक्कम ब्रिटिशांचं राज्य कायम असेपर्यंत चुकवत राहिली.

## १२

ब्रिटिश राज्याच्या आगमनापूर्वी भारताला सार्वजनिक कर्जाची माहिती नव्हती. भारतीय शासकांना सार्वजनिक कार्यासाठी काही रक्कम लागली तर ते ती त्यांच्या श्रीमंत प्रजेकडून कर्ज घ्यायचे. तसं करताना ते राज्यातील काही प्रदेशाचा महसूल वा मूल्यवान जडजवाहीर गहाण टाकायचे. परंतु मार्च ३१, १९३० रोजी म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनं ज्या दिवशी स्वातंत्र्य घोषित केलं होतं त्या दिवशी भारतावरील सार्वजनिक कर्ज ८९३.३० कोटी रुपये होतं. ब्रिटन आणि भारत यांच्यातील आर्थिक देवघेवीचा आढावा घेण्याकरता काँग्रेसनं त्यावर्षी एक समिती नेमली. त्या समितीत दोन ॲडव्होकेट जनरल होते. त्यापैकी एक मुंबई विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते तर दुसरे चार्टर्ड अकौटंट होते. तिच्या निर्णयानुसार भारतावरील सार्वजनिक कर्जाला कोणताच वैधानिक आधार नव्हता. ते नाकारण्याकरता प्रथमदर्शनीच आधार मिळतो आणि नीट हिशेब केल्यास भारताच्या बाजूनं भरपूर घेणंच निघेल असा निष्कर्ष त्यांनी काढला.

ही चमत्कारिक परिस्थिती कशी निर्माण झाली?

करांच्या मान्य तत्त्वप्रणालीप्रमाणे लोकांकडून वसूल करण्यात आलेला कर ही जनसंपत्ती असते व तिचा विनिमय हा त्याच लोकांच्या जनकल्याणासाठी करायचा असतो. परंतु कंपनीनं आपल्या शासनाखालील प्रदेश जणू काय आपली प्रचंड इस्टेट वा मळा आहे अशा प्रकारे कंपनीनं भारताच्या संपत्तीचा विनियोग केला आणि या संपत्तीचं शोषण ती आपल्या भागधारकांसाठी वा आपल्या मातृभूमीसाठी करायची. प्रत्येक युद्धात भारताच्या अंत:प्रदेशात ब्रिटिश साम्राज्याचा व्याप वाढवणे आणि जित प्रदेशातील महसूल अतिरिक्त सैन्यबळासाठी उपयोगात आणून त्याचा उपयोग नवीन प्रदेश जिंकण्यासाठी करणं असं ब्रिटिशांचं धोरण असावं असा दृष्टिकोन सर चार्ल्स मेटकाफ यांनी मांडला होता. त्यानुसार मार्क्विस ऑफ हेस्टिंग्ज (भारताचे गव्हर्नर जनरल, १९१४ ते २३) यांना पाठवण्यात आलेल्या अहवालात ब्रिटिश शासनाचे हेतू विशद करण्यात आले होते...' [इ. थॉम्पसन आणि जी. टी. गॅरेट यांनी *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन*

*इंडिया,* पृष्ठ २६७] या धोरणानुसार भारताला काहीही देणंघेणं नसलेल्या कंपनीच्या बाह्य आक्रमणासाठी भारताला ३२ दशलक्ष पौंड द्यावे लागले.

कंपनीचं राज्य संपवून ब्रिटिश सरकारनं भारताचा राज्यकारभार आपल्या हाती घेईपर्यंतच्या ४६ वर्षांच्या काळात तरीही भारताची नक्त शिल्लक ३२ दशलक्ष पौंड राहत होती. परंतु भारताला त्यातील पैही मिळाली नाही. हा सर्व पैसा कंपनीच्या भागधारकांना लाभांश वाटण्यासाठी उपयोगात आणण्यात आला. एवढंच नाही तर हा पैसा पुरेसा नव्हता म्हणून की काय उधारीचा आधार घेण्यात आला आणि ती रक्कम 'सार्वजनिक कर्ज' म्हणून व्याजासह भारताच्या नावे टाकण्यात आली. अशा रीतीनं कंपनीची सत्ता संपेपर्यंत कंपनीनं ७० दशलक्ष पौंडांचं कर्ज भारताच्या माथ्यावर लादलं होतं. भागभांडवल म्हणून म्हणायचं तर भारताकडे इंग्लंडचं काहीच देणं निघू शकत नव्हतं. कारण तोपर्यंत व्याज सोडूनही भारताकडून१५० दशलक्ष पौंड खंडणी म्हणून वसूल करण्यात आलेले होते. एवढंच नाही तर भारताकडून अवैध रीतीनं वसूल करण्यात आलेल्या रकमेचा हिशेब केला तर भारताचे इंग्लंडकडे १०० दशलक्ष पौंड निघत होते. परंतु जॉर्ज विंगेट यांच्या शब्दात 'इंग्लंड सामर्थ्यसंपन्न होतं आणि भारत त्याच्या पायाशी लोळण घेत होता. सबळांकडून पैसा वसूल करून घ्यायची फार कमी क्षमता दुबळ्यांत असते.' [मेजर विनगेट, *अवर फायनान्शिअल रिलेशन्स विथ इंडिया,* लंडन, (१८५९), पृष्ठ ५६-६४]

१८५७चा उठावं दडपण्यासाठी करण्यात आलेल्या मोहिमेचा संपूर्ण खर्च, ब्रिटिश सैन्य भारतात आणण्यासाठी आलेला खर्च, त्याला भारतात ठेवण्यासाठी आलेला खर्च, त्या सैन्याला परत पाठवायचा खर्च आणि ते भारतात यायला निघण्यापूर्वीचा सहा महिन्यांचा इंग्लंडमधील [वरीलप्रमाणे, पृष्ठ १५-१६] खर्च आणि या सर्व रकमेत सार्वजनिक कर्जाचे ४० दशलक्ष पौंड रकमेची भर घालून ही सर्व रक्कम भारताकडून वसूल करण्यात आली. सर जॉर्ज विन्टेज यांच्या शब्दात या वर्तनाच्या 'हलकटपणाच्या बाबतीत तुलनीय असं उदाहरण' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १३] जगाच्या इतिहासात सापडणं कठीण आहे.

ब्रिटिश भारत जेव्हा सिंहासनानं आपल्या ताब्यात घेतला तेव्हा ब्रिटिश भारताचा प्रदेश नंतर साम्राज्याच्या ताब्यात आलेल्या प्रदेशापेक्षा निम्मेच होता. सिंहासनाच्या अधिकारात कंपनीचा प्रदेश आल्यानंतरही ब्रिटिशांचं आपल्या ताब्यातील प्रदेशविस्ताराचं काम सुरूच होतं. भारतीयांच्या ताब्यात असलेला आणि सीमेवरील प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन ते आपला राज्यविस्तार करत होते. अशा प्रकारे इंग्लंडनं एकोणिसाव्या शतकाच्या सातव्या दशकात भारतातील आपल्या प्रदेशात ४,००० चौरस मैलांची, आठव्या दशकात १५,००० चौरस मैलांची, नवव्या दशकात ९०,००० चौरस मैलांची आणि दहाव्या दशकात १३३,००० चौरस मैलांची भर घातली. [पी. टी. मून, *इम्पेरिॲलिझम अँड वर्ल्ड पॉलिटिक्स,* द मॅकमिलन कंपनी, न्यू यॉर्क, (१९३०), पृष्ठ २९४]

उदारमतवादी भारत मंत्री जॉन मोर्ले यांच्या कथनानुसार ‘इंग्लंडनं केवळ एकोणिसाव्या शतकात १११ लढाया भारतात केल्या व त्यापैकी बहुतेक लढायांमधे भारतीय सेनेचा उपयोग करण्यात आला होता.’ [डॉ. जे. टी. सन्डरलॅन्ड, *इंडिया इन बॉंडेज,* पृष्ठ १३५] या सर्व युद्धांचा खर्च भारताला अखेरच्या पैपर्यंत सहन करावा लागला. त्याशिवाय या काळात इंग्लंडनं भारताबाहेरही भारतीय सैन्याचा उपयोग करून ज्या युद्धात भाग घेतला होता त्यांसाठीही भारताला ९० दशलक्ष पौंड द्यावे लागले. [विल ड्युरांट, *द केस फॉर इंडिया,* पृष्ठ २४] सर जॉर्ज विनगेट यांनी लिहिलं आहे की ‘खरं पाहता भारताला इंग्लंडच्या आशियातील सर्व युद्धांसाठी माणसं आणि साधनसामग्री पुरवावी लागत होती आणि भारतानं इंग्लंडला केलेल्या या मदतीचा कधीही संपूर्ण मोबदला चुकवण्यात आला नाही. भारतविषयक धोरणातील आपल्या एकतर्फी आणि स्वार्थी प्रवृत्तीचा वादातीत पुरावा यातून दिसून येतो.’ [सर जॉर्ज विनगेट, *अवर फायनान्शिअल रिलेशन्स विथ इंडिया,* पृष्ठ १७-१९]

कंपनीचा प्रदेश सिंहासनाच्या स्वाधीन करण्यासाठी करण्यात आलेल्या कायद्यात एक तरतूद अशी होती की प्रत्यक्ष भारताला आक्रमणाचा धोका असल्याशिवाय वा भारतावरील आक्रमण परतून लावायच्या कारणाशिवाय भविष्यात भारताच्या महसुलाचा उपयोग भारताबाहेर उघडण्यात आलेल्या सैनिकी आघाडीत संसदेच्या संमतीशिवाय करता कामा नये. परंतु वास्तवात या कायद्याचा सन्मान त्याचं पालन करून करण्यापेक्षा भंग करूनच करण्यात

आला. आणि स्वतः भारत सरकारच्या विरोधानंतरही ॲबिसिनियन युद्ध (१८६७), पेराकची मोहीम (१८७३), दुसरं अफगाण युद्ध (१८८६), इजिप्तची मोहीम (१८८२), सीमायुद्ध (१८८२), ब्रह्मदेशातील युद्ध (१८८६) आणि सौकीन मोहीम इत्यादींचा खर्च भारताला उचलावा लागला. [भारताचे व्हाईसराय (१८७२-७६) लॉर्ड नॉर्थब्रूक यांच्या विरोधानंतरही असं घडलं. त्यांनी पेरक येथील मोहिम 'कायदाविरोधी आणि भारत सरकारनं केलेल्या तक्रारीच्याही विरोधात' असल्याचं सांगितलं. आणि ग्लॅडस्टोन यांनी अफगाण युद्धाचा साम्राज्यवादी युद्ध म्हणून जाहीरपणे निषेध केला होता. एवढंच नाही तर सौकिन मोहिमेबद्दल भारत सरकारला लिहिणं भाग पडलं की : 'सौकिनची शक्ती वाढवण्याकरता आणि इजिप्शिअन सैन्याला नाईलकडे पाठवता यायला पाहिजे म्हणून आम्हाला भारतीय सैन्यातील सैनिकांची तुकडी पाठवायला सांगण्यात आलेलं आहे..... ज्या गोष्टीत भारताचा काहीच लाभ नाही परंतु तरीही भारताच्या महसूलावर दडपण येईल अशा प्रकारच्या सेवा द्यायला सांगणाऱ्या धोरणाचा अवलंब करायला आम्हाला सांगण्यात येत आहे. हा भारतावर अन्याय आहे कारण त्यामुळे इंग्लंडला उधारीवर देण्यात येणाऱ्या सैन्याचा खर्च आम्हाला द्यावा लागणार आहे, कारण त्यामुळे आम्हाला अशा टीकेला तोंड द्यावं लागेल की जिचं आमच्याजवळ व्यवस्थित उत्तर नसेल. आमच्याकडे ज्या देशाच्या प्रशासनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे त्या जबाबदारीपोटी हे सांगणं आमचं कर्तव्य आहे असं आम्ही समजतो.' जे. सी. कुमारप्पा, क्लाईव्ह टू काये, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, (१९४७), पृष्ठ २०-२२]

सत्तारूढ शक्तीनं राज्ये काबीज करण्यासाठी करण्यात आलेल्या या सैनिकी साहसांमुळे ब्रिटिशांच्या प्रशासन काळात भारताचं सार्वजनिक कर्ज पहिल्या अठरा वर्षांच्या काळात ७० दशलक्ष पौंडांपासून १४० दशलक्ष पौंडांपर्यंत आणि १८७७ पासून १९००पर्यंत ते २२४ दशलक्ष पौंडांवर पोहोचलं. असं व्हायचं कारण १८७७ आणि १८९७मधील अफगाण युद्धे तर होतीच [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (**व्हिक्टोरिअन एज**), प्रस्तावना पृष्ठ XV] परंतु त्याहूनही मुख्य कारण होतं राज्यानं ग्वाही दिलेल्या कंपन्यांनी केलेल्या रेल्वेच्या बांधकामाचं. ही एक वेगळीच कहाणी आहे.

## १३

भारतातील ब्रिटिशांच्या प्रमुख परोपकारी कार्यांचं उदाहरण म्हणून भारतीय रेल्वेप्रणालीचा निर्देश करण्यात येत असतो. परंतु वास्तवात सत्ताधाऱ्यांनी आपल्या अंकिताची प्रचंड आर्थिक फसवणूक केल्याचं ते उदाहरण आहे. भारताच्या तत्कालीन परिस्थितीत निकड नसताना आणि भारताच्या क्षमतेबाहेरील रेल्वेची योजना असूनही २२,००० मैल लांबीचा रेल्वेमार्ग ३०० दशलक्ष पौंड खर्च करून बांधण्यात आला. वास्तवात रेल्वेची निकड भारतीय

जनतेला नव्हती तर ब्रिटिश सैन्य, ब्रिटिश व्यापार आणि भारताच्या नैसर्गिक साधनसामग्रीचं शोषण करू इच्छिणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना होती. रेल्वेनं उघडपणे भारतीय कारखानदारांशी भेदभावाचं वर्तन केलं, देशातील कच्च्या मालाचं शोषण केलं आणि ब्रिटिश कारखान्यातील हलक्या प्रतीचा माल भारतीयाच्या माथी मारला. रेल्वे वर्षानुवर्ष तोट्यात चालली. तोटा लोकांनी सहन केला, नफा व्यापाऱ्यांनी लाटला. रेल्वेसाठी करण्यात आलेली गुंतवणूक वास्तवात युरोपिअनांची होती. हमीच्या तत्त्वावर भारत सरकारनं भागधारकांच्या भागभांडवलावर किमान ५ टक्के व्याजाची आणि मिळालेल्या नफ्यातील निम्मे नफ्याची हमी दिली होती. तोट्याचा कोणताच हिशेब करायचा नव्हता. जर रेल्वेला तोटा आला तर तो तोटा भारत सरकारचा राहणार होता व ५ टक्के व्याज भारताच्या महसुलातून दिलं जाणार होतं. भागधारकांना हमीदरानं व्याज देण्याकरता सामान्य महसुलातून ४० दशलक्ष पौंड घेण्यात आले. पुन्हा हा ५ टक्के दर किमान दर होता: कंपनीनं याहून अधिक नफा मिळवण्यावर कोणतीच सीमा नव्हती. हिशेब अर्धवार्षिक तत्त्वावर करण्यात यावयाचे होते. परिणामी तोट्याच्या प्रत्येक सहामाहीचा तोटा भारतालाच सहन करावा लागला. कमी उत्पन्नाचे दिवस येईपर्यंत मोठे खर्च हिशेबात न आणायची कंपनी नीट काळजी घ्यायची. अशाप्रकारे खर्च पुढे ढकलण्यात आल्यामुळे दुसऱ्या सहामाहीत गोळा झालेला तोटा भारताला सहन करावा लागायचा.

रेल्वेचं जवळपास सर्व उत्पन्न देशाबाहेर नेण्यात यायचं. ग्रेट इंडियन पेनिन्सुलर (जी. आय. पी.), द बॉम्बे बरोदा अँड सेंट्रल इंडिया (बी. बी. अँड सी. आय.) आणि मद्रास लाईनवरील गाड्या या तीन रेल्वेच्या प्रकरणांचा एकत्र विचार केला असता असं आढळतं की प्रत्यक्षात रेल्वेच्या वार्षिक उत्पन्नाच्या ९९.७० टक्के उत्पन्न इंग्लंडमधे पाठवण्यात येत असे. उलट सरकारला मात्र नक्त तोटा १३,०००,००० पौंड एवढा आला होता. त्यापैकी एक कंपनी औंध अँड रोहिलखंड रेल्वे (ओ. आर. आर.) सुरू व्हायच्या दिवसापासूनच उत्पन्न आणि हमीदराचा व्याज यातील तफावतीमुळे सरकार २,३२३,३८७ पौंड तोट्यात आलं. तरीही तिचे ४,०००,००० समभाग, ‘या

समभागांची मागील तीन वर्षातील सरासरी किंमत बाजारात २५ पौंड १८ शिलींग १/४ पेन्स असल्यानं तेवढा नफा देऊन विकत घेतले.' [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया*, पृष्ठ ११३]

ही दुहेरी लूट होती कारण या समभागांची किंमतच मुळी शासनानं भारताच्या जीवावर अती उदारपणानं दिलेल्या हमी व्याज दरामुळे होती. 'जरी प्रवाशांपासून मिळणारं उत्पन्न शून्य असतं तरी समभागांचा बाजारभाव तेवढाच असता.' [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया*, पृष्ठ ११३] त्याचप्रमाणे सदर्न इंडियनचे ३,२९८ ,५९८ पौंडांचे समभाग ९६९,०४८ पौंड ११ शिलींग २ पेन्स नफा देऊन विकत घेण्यात आले. ज्या वर्षी ती रेल्वे बांधण्यात आली त्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत त्या रेल्वेनं शासनाला १,९४८,५९९ पौंडांनी तोट्यात आणलं असतानाही असं करण्यात आलं होतं.

सर्व प्रकारच्या जोखमीविरुद्ध हमी आणि भरपूर नफ्याची आधीच ग्वाही मिळाल्यामुळे सर जॉन लॉरेन्स आणि लॉर्ड मेयो या दोन व्हाईसरायच्या कारकिर्दीत काम करणारे विल्यम मॅसी यांच्या शब्दात सांगायचं तर 'रेल्वे कंपन्यांचं काम आजपर्यंत करण्यात आलेल्या कामातील सर्वात उधळपट्टीचं काम होतं' आणि सरकारशी आणि लोकांशी एवढ्या उद्धटपणानं, बेजबाबदारीनं, अरेरावीनं आणि दडपशाहीनं त्यांचं वर्तन होतं की त्यावर विश्वासही बसू नये. तृतीय श्रेणीच्या ज्या प्रवाशांपासून रेल्वेला मुख्य उत्पन्न होतं त्यांच्याशी रेल्वेची वागणूक लाजिरवाणी असायची. सर्व प्रकारच्या सोयी *बडा साहेबांसाठी* राखून ठेवलेल्या असायच्या. युरोपिअनच नाही तर अँग्लो इंडियन आणि युरेशियन लोकांसाठीही वेगळे डबे राखून ठेवण्यात आलेले असायचे. या भूमीतील भूमीपुत्रांच्या नशिबी रेल्वे अधिकाऱ्यांचं असभ्य आणि चढेलपणाचं वर्तन नेहमीच यायचं आणि कितीही उच्च श्रेणीचा माणूस असला तरीही त्याला अपवाद नसायचा. यातील काही कंपन्या तर एवढ्या असभ्य होत्या की त्यांनी तृतीय श्रेणीच्या डब्यांना सरळसरळ कुलीश्रेणी असंच नाव देऊन टाकलं होतं व असं करताना आपण काही वावगं करतो आहोत याचंही त्यांना भान नसायचं. तृतीय श्रेणीच्या प्रवाशांना मिळणाऱ्या वाईट

वर्तणुकीचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रश्नातील एक महत्त्वाचा प्रश्न झालेला होता व त्याकडे भारतातील राजकीय नेत्यांचं लक्ष वर्षानुवर्ष वेधलं गेलं होतं.

## १४

मागील इतर सत्तांपेक्षा ब्रिटिश सत्तेत अंतर हे होतं की ब्रिटिश भारताचे कधीच रहिवासी झाले नाहीत. त्यांनी भारताला आपलं घर कधीच मानलं नाही. ते परदेशी म्हणून आले आणि अखेरपर्यंत परदेशी म्हणूनच राहिले. याच्या अपायकारक परिणामांचं वर्णन एडमंड बर्क यांनी एका परिच्छेदात केलं आहे आणि तो परिच्छेद अतिशय संस्मरणीय ठरलेला आहे :

*आशियातील विजेत्यांनी जित राष्ट्राला आपलाच देश मानल्यामुळे त्यांनी लवकरच आपलं क्रौर्य सोडलं. त्यांची वाढ आणि त्यांचा ऱ्हास ते राहत असलेल्या देशातील वाढीबरोबर आणि ऱ्हासाबरोबरच झाली.... या मातीशी त्यांचं नशीब पुर्णपणे जुळलेलं होतं. आणि आपलं नशीब वाईट भूमीशी जोडलं जाऊ नये अशी सामान्यपणे सर्वांचीच इच्छा असते... हावरटपणामुळे वा वासनांमुळे तार्तार सरदार अतिलोभीपणानं वागले वा त्यांनी जुलूम केला वर निरंकुश सत्तेवर झालेले त्याचे परिणाम अतिशय कमी काळात म्हणजे त्याच्या आयुष्यातच जाणवू शकायचे. हिंसा वा जुलुमाच्या आधारे साठा करण्यात आला तरीही तो साठा या भूमीतच केलेला साठा असायचा. आणि स्थानिक वैपुल्यामुळे अथवा अधिक शक्तिशाली माणसानं केलेल्या लुटीमुळे तो साठा परत जनतेत वाटला जायचा. अनेक प्रकारच्या गोंधळामुळे आणि सत्तेवर फार कमी राजकीय अंकुश असल्यामुळे निसर्गाला आपला खेळ खेळायला अजूनही बराच वाव होता. लाभाचे स्त्रोत अजूनही शुष्क झालेले नव्हते. त्यामुळे देशातील व्यापार, कारखानदारी आदी फोफावतच होते. एवढंच नाही तर हावरटपणा आणि सावकारी यामुळेसुद्धा देशातील संपत्तीचं आणि रोजगारीचं संरक्षण झालं....*

*परंतु ब्रिटिश सरकारच्या काळात या सर्व गोष्टीत उलटापालट झाली होती. तार्तरांनी केलेलं आक्रमण खोडसाळपणाचं होतं परंतु आपलं संस्क्षणच आज भारताचा विनाश करत आहे. ते त्यांचं शत्रुत्व होतं परंतु ही आपली मैत्री आहे. आपला भारतातील विजय आजही तेवढाच क्रूर आहे जेवढा पहिल्या दिवशी होता... जवळपास मिसरूड न फुटलेल्या वयाची तरुण माणसं तिथं शासन चालवत आहेत. इंग्लंडमधे राहणाऱ्या लोकांना जेवढ्या सामाजिक रीतिभाती माहीत असाव्या त्यापेक्षाही त्यांना इथल्या रीतीभातीची माहिती कमी आहे. वयानुसार त्यांना वाटणाऱ्या पैशाच्या तीव्र हावेत आणि तारुण्यसुलभ आवेगात ते एकामागून एक सुखसाधनात लोळत असतात. अशा तरुणांच्या भारतात लाटांमागून लाटा भक्षाच्या शोधात येत असतात आणि त्यांची भूक कधीच शमणारी नसते. त्यांनी मिळवलेलं अन्न ही सातत्याची उधळपट्टी असते. इंग्रजांनी मिळवलेल्या प्रत्येक रुपयाचा नफा म्हणजे भारताचा तेवढाच कायमचा तोटा.* [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), या ग्रंथात बर्कचं उद्धृत करण्यात आलेलं भाषण, पृष्ठ ४९-५०]

नादीरशहानं दिल्लीची जी कुप्रसिद्ध लूट केली होती त्यात त्यानं लुटून नेलेली संपत्ती ३७ दशलक्ष पौंडांपेक्षा अधिक नव्हती. आणि नादिरशहा फक्त एकदाच आला होता. परंतु अगदी अलीकडच्या अंदाजानुसार इंग्लंडला भारताकडून संपूर्ण एकोणिसाव्या शतकात दरवर्षी १०० दशलक्ष पौंड मिळत आहेत.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारताच्या एकूण महसुलातून निम्मे महसुलाचं इंग्लंडद्वारे शोषण केलं जात होतं. तेव्हा भारताचा महसूल ४४ दशलक्ष पौंड होता. भारताच्या सर्व प्रांतांच्या शेतीतून झालेल्या उत्पन्नाएवढं एकूण उत्पन्न म्हणजे १७.५ दशलक्ष पौंड [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*व्हिक्टोरिअन एज*), प्रस्तावना पृष्ठ xiv] इंग्लंड भारताकडून भारतासाठी इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या खर्चापोटी घेत असे. यात भारतीय कर्जावरील व्याज, रेल्वे आणि नागरी प्रशासन आणि सैन्यावरील खर्चाचा समावेश होता. भारतातील युरोपिअन अधिकाऱ्यांचा पगार, ज्यांचा अक्षरशः सर्व उच्च पदांवर एकाधिकार होता, १० दशलक्ष पौंडांपर्यंत जात होता. याशिवाय भारतातून पगार घेणारे युरोपिअन अधिकारी खाजगी रीतीनं कोट्यवधी रुपये भारताबाहेर पाठवायचे. ‘अर्ध

शतकापर्यंत दरवर्षी दोन ते तीन आणि केव्हा केव्हा तर चार दशलक्ष पौंडांनी आम्ही भारताचं शोषण करतो आहोत. अशा प्रकारे सतत आणि जमा होत जाणाऱ्या शोषणामुळे इंग्लंडसुद्धा दारिद्र्यावस्थेत जाऊ शकला असता मग जिथे मजुरीचा दर दिवसाला तीन ते चार पेन्सच आहे त्या भारताची गोष्टच काय?’ असं मॉटेगमरी यांनी १८३८ साली लिहिलं आहे. [मॉन्टेगमरी मार्टीन, *ईस्टर्न इंडिया*, लंडन, (२८३८), खंड १ आणि ३ च्या प्रस्तावनेत]

जेव्हा कर एका देशात गोळा करण्यात येतात आणि ते त्या देशाला एका वा दुसऱ्या स्वरूपात परत करण्याऐवजी दुसऱ्या देशात खर्च करण्यात येतात तेव्हा प्रभावित देशातील संपत्तीचा प्रवाह आटतो. आजच्या आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रानं निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे आणि त्यात वसाहतीच्या शासनप्रणालीची भर पडल्यामुळे अन्नधान्य वा प्राणीमात्र यांच्या स्वरूपातील भूमीतील एका देशातील उत्पन्न जेव्हा त्या देशाच्या राजकीय वा भौगोलिक सीमांच्या बाहेर उपभोगार्थ पाठवण्यात येते तेव्हा निर्यातक देशाच्या जमिनीची होणारी धूप दिवसेंदिवस वाढतच जात असते. परंतु या दोघांचा जेव्हा समन्वय होतो तेव्हा ती गोष्ट प्राणघातक होते. भारतात हे दोन्हीही घटक दोन शतकांपेक्षाही अधिक काळ कार्यरत होते. परिणामी भारतीय शेतकऱ्याला जमिनीची धूप भरून काढण्यासाठी खर्च करणं शक्य नसल्यामुळे पैशाची गरज भागवण्यासाठी त्याला जमिनीची सुपीकता विकण्याकडे वळावं लागलं. जमिनीच्या लागवडीचं रूपांतर ‘जमिनीवरील बलात्कारात’ झालं. शेतकरी शेतावर काम करणारा जवळपास वेठबिगारी मजूर झाला. परदेशात निर्यात करणाऱ्या पेढीच्या दलालाकडून घेतलेल्या अग्रिमाच्या मोबदल्यात त्यांनी ठरविलेल्या मनमानेल त्या किमतीला शेतकऱ्याला अनेकदा आपलं पीक घरात येण्यापूर्वीच विकायला भाग पाडलं जायचं. शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणाचा फायदा घेऊन तो दलाल शेतकऱ्याला हवं ते पीक पेरायला भाग पाडायचा. त्या पिकाचे भाव पडत असले तरी त्याला फिकीर नसायची. परिणामी शेती व्यवसाय डबघाईला आला, जमिनीचा पोत घसरला. कर्करोगाप्रमाणे वाढत चाललेल्या जमिनीच्या धूपेमुळे घाबरून सरकारनं नंतर रॉयल कमिशन ऑफ ॲग्रिकल्चरची नेमणूक केली. आयोगानं बैल गेला आणि झोपा केला याप्रमाणे

त्या प्रश्नाची नंतर शवचिकित्सा केली : ‘भारतातील बहुतांश लागवडीखालील शेतीची सर्व सुपीकता अनेक वर्षांपूर्वीच संपलेली आहे.’ [जी. टी. रेन्च, *द रिस्टोरेशन ऑफ पिझंटरीज*, पृष्ठ १४]

अठरावं शतक जसजसं पुढं जाऊ लागलं आणि ते एकोणिसाव्या शतकाकडे पोहोचू लागलं तसतसे लागोपाठ मोठमोठे दुष्काळ पडू लागले. अशा प्रकारच्या दुष्काळांची त्यांच्या प्रमाणांच्या दृष्टीनं म्हणा वा त्यांच्यामुळे झालेल्या प्राणहानीमुळे म्हणा जगाच्या इतिहासात तोड सापडणं कठीण आहे. शंभर वर्षांपूर्वी तुटवडा आणि दुष्काळाचं जे प्रमाण होतं त्यापेक्षा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या तीस वर्षात त्यांची तीव्रता आणि क्षेत्रफळ यांच्यात चौपटीनं वाढ झाली. [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया*, पृष्ठ ११३] ब्रिटिश सत्ता प्रस्थापित व्हायच्या आधीच्या अकरा ते सतरा या सात शतकात नोंद असलेले १९ दुष्काळ पडले होते आणि एकाचा अपवाद सोडल्यास इतर सर्व दुष्काळ स्थानिक स्वरूपाचे होते. परंतु एकोणिसाव्या शतकात ३१ दुष्काळ पडले व त्यातील ४ पहिल्या पंचवीस वर्षात, २ दुसऱ्या पंचवीस वर्षात, ६ तिसऱ्या पंचवीस वर्षात आणि शेवटच्या पंचवीस वर्षात १८ दुष्काळ पडले. त्यांनी ४१,५००,००० लोकांचा बळी घेतला व त्यातील २५,८२५,००० लोकांचा बळी शेवटच्या १८५४ ते १९०१ या ४६ वर्षात घेतला गेला होता. [डब्ल्यू. एस. लिली यांनी *इंडिया अँड इट्स प्रॉब्लेम्स* या ग्रंथात दुष्काळात मरणारांची खालीलप्रमाणे आकडेवारी दिलेली आहे: १८००-२५ १,०००,०००; १८२५-५० ४००,०००; १८५०-७५ ५,०००,०००; १८७५-१९०० १५,०००,०००] भारतीय जनतेच्या वाढत्या दारिद्र्याचीच ही कहाणी आहे. पूर्वी दोन वर्षांच्या दुष्काळांमुळे वा दुष्काळाप्रत न पोहोचलेल्या तीन वर्षांच्या कमी पावसामुळेच लोकांवर उपासमारीची पाळी येत असे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी पिकांसाठी योग्य वेळी पाऊस जरी आला नाही वा अधिक पाऊस पडला तरी लोक दुष्काळग्रस्त होत असत. [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया*, पृष्ठ १३९] थकलेल्या भूमीवर झालेली बेसुमार गर्दी आणि शेतीच्या जोडीला दुसरा कोणताही जोडधंदा नाही अशा परिस्थितीत ते उपासमार वा उपासमारीमुळे होणारे रोग यांच्या हल्ल्यात किडामुंग्यांप्रमाणे बळी पडले. १८३३मधील मद्रास दुष्काळाचे साक्षी असलेले सर वाल्टर कॅम्पबेल यांनी लिहिलं: ‘सकाळच्या आणि सायंकाळच्या रपेटीच्या वेळी जी दृश्यं आम्हाला दिसली त्यांसमोर कोरिन्थला

सैन्यानं घातलेल्या वेढ्याच्या वेळी कुत्र्यांचे कळप मानवी कवटी कुरतडत असल्याची जी दृश्यं दिसायची ती काहीच नव्हती. ती भयानक दृश्यं पाहिली की मानवप्राण्याला किती क्रांतिकारी अन्नात सहभागी होणं भाग पडू शकतं हे लक्षात यायचं. उपासमारीनं खंगलेली, हाडाचा सांगाडा शिल्लक राहिलेली माणसं मेलेल्या कुत्र्यांवर आणि घोड्यावर मेजवानीप्रमाणे तुटून पडत.' [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*व्हिक्टोरिअन एज*), पृष्ठ ७०]

माणसांची जीवनशक्ती कमी झाल्यामुळे विविध प्रकारच्या आजारांनी आणि साथीच्या रोगांनी घेतलेल्या बळींचं दृश्य जरी लक्षवेधी नव्हतं तरी याहूनही भयानक होतं. *स्टॅटिस्टिकल अॅब्स्ट्रॅक्टस ऑफ इंडिया* या शासकीय प्रकाशनानं थोडक्यात सांगितलं की 'अपुऱ्या अन्नाचं, अर्धपोटीपणाचं, अपुऱ्या वस्त्रांचं आणि अयोग्य घराचं सौम्य स्वरूपातील दर्शन म्हणजे ताप.' [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया*, पृष्ठ १४०]

या दुष्काळांचं खास वैशिष्ट्य असं होतं की हे अन्नधान्याचे दुष्काळ नव्हते तर ते पैशाचे दुष्काळ होते. म्हणजे या दुष्काळाची कारणं बेकारी आणि क्रयशक्तीचा अभाव हे होते. आर. सी. दत्त यांनी लिहिलं, 'भारतात असं एकही वर्ष नव्हतं की लोकांसाठी धान्याचा साठा अपुरा होता.' [विल ड्युरांट यांनी *द केस फॉर इंडिया* या ग्रंथात रोमेश दत्त यांचं दिलेलं उद्धरण, पृष्ठ ५३] वॉ नॅश यांनी *द ग्रेट फॅमिन* या ग्रंथात दर्शविलं आहे की 'दुष्काळाच्या वर्षातसुद्धा सर्व लोकांची गरज भागावी एवढं धान्य भारतात निर्माण होतं असे. परंतु ते विशिष्ट किमतीत मिळालं तर लोक ते घेऊ शकणार होते.' [विल्यम डिग्बी, *प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया* या ग्रंथात वॉ नॅश यांच्या *द ग्रेट फेमिन* या ग्रंथातून घेतलेला उतारा, पृष्ठ १४०] भारतातील लक्षावधी लोक जेव्हा उपासमारीनं मरत होते तेव्हाही भारतीय बंदरांमधून धान्याची निर्यात सुरूच होती. श्री. जे. रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी अवेकनिंग ऑफ इंडिया या ग्रंथात लिहिलं, 'एका अर्थानं रेल्वेनं भारताच्या अडचणीत भरच घातली आहे व दुष्काळाच्या क्षेत्रात वाढ केली आहे. पहिली गोष्ट म्हणजे भारतातील धान्याची निर्यात करायची साधनं उपलब्ध आहेत.' ते पुढं लिहितात की जो कोणी भारतात आला नाही अथवा इथं आल्यानंतर त्यानं 'भारतात जे काही अतिरिक्त असेल ते निर्यात करणारी कराचीच्या प्रचंड धान्य गोदांमांपासून तर प्रत्येक गावातील

दलालापर्यंतची ब्रिटिश सत्तेंतर्गत तयार झालेली निर्यातीची प्रचंड पद्धती पाहिली नाही त्याच्या लक्षात या व्यवस्थेचा अवाढव्यपणा येणार नाही.'

*येथील प्रखर सूर्य ज्याप्रमाणे येथील सर्व जीवन शोषून घेतो व मागे केवळ पाणी ठेवतो त्याप्रमाणे केवळ एकच पेढी भारतीयांचं रक्त शोषून घेते (आणि मागे दारिद्य शिल्लक ठेवते). पिकांच्या कापणीनंतर एक वा दोन आठवड्याच्या आतच भारतातील अतिरिक्त (?) गहु अथवा तांदुळ विक्रेत्याच्या हाती पोहोचतात आणि जेव्हा मान्सून पडत नाही तेव्हा त्यांची उपासमार होते. शेतकऱ्यांना राखीव साठा ठेवायची सवय होती. आता त्याच्याजवळ जवळपास काहीच साठा नसतो. त्याच्याजवळ थोडासा पैसा असतो पण तो भरपुर नसतो. आणि प्रत्येक गोष्टीचं येखीत रूपांतर करणं हीच गोष्ट त्यांच्या अडचणींसाठी कारणीभुत आहे. पूर्वी भारतात जेव्हा दुष्काळ पडत असत तेव्हा दुष्काळाचा भाग जरी अडचणीत असला तरी त्याच्या शेजारील भाग फार कमी प्रभावित झालेला असायचा. त्यावेळी दळणवळणाची साधनं नसल्यामुळे दुष्काळाची प्रखरता कमी करणारी सामग्री शेजारील ग्रदेशाच्या बाजारपेठेतून बाहेर जाऊ शकत नसे व त्यामुळे दुष्काळाचा प्रभाव फारसा जाणवत नसे. ज्या साधनांमुळे दुष्काळाची तीव्रता कमी होते ती त्याचा प्रभावही वाढवतात. एका भागात वस्तुंची उणीव जाणवु लागली की लगतच्या भागातही त्या वस्तूचे भाव वाढू लागतात व त्यामुळे दारिद्र्यात वाढ होते....* [लजपतराय यांच्या *इंग्लंड्स डेट टू इंडिया* या ग्रंथात जे. राम्से मॅक्डोनाल्ड यांच्या *अवेकनिंग ऑफ इंडिया* या ग्रंथातून घेतलेला उतारा, बी. डब्ल्यू. ह्यूब्श, न्यू यॉर्क, (१९१७), पृष्ठ २७८-७९]

१८९७-९८ साली सर्वत्र पसरलेल्या दुष्काळामुळे लक्षावधी लोक मरण पावले. आर. सी. दत्त यांच्या म्हणण्यानुसार त्याही वेळी महसूल अधिकाऱ्याची मागणी पूर्ण करण्याकरता त्या संकटग्रस्त वर्षातही शेतकऱ्यांना आपलं धान्य विकणं भाग पडलं, 'ते धान्य निर्यात करण्यात आलं व त्याची किंमत शंभर लक्ष पौंड होती.' [रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*व्हिक्टोरिअन एज*), पृष्ठ ५३४]

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी भारताचं रक्तशोषण करायचं ठरवूनच टाकलेलं होतं. काहीच दिवसात त्याचं विविध प्रकारे उदात्तीकरण करायची कलाही ते शिकले. अविचारीपणानं सत्य

बोलण्यासाठी प्रसिद्ध असलेले भारत मंत्री लॉर्ड सॅलिसबरींनी १८७८ साली घोषित केलं की मानवी यातनांविषयीची केवळ दोषैकवृत्ती आणि संवेदनशुन्यता यांचंही एक महत्त्व आहे. ते म्हणाले की '*भारताचं रक्तशोषण करणं आवश्यक असल्यामुळे ज्या ठिकाणी रक्त साकळलेलं आहे त्याच ठिकाणी शस्त्रक्रियेचा चाकू आपण चालवला एाहिजे. जिथे रक्त कमी आहे तिथं चालवायला नको.*' [वरीलप्रमाणे, प्रस्तावना, पृष्ठ xiii, (तिरपी अक्षरं माझी)] 'साकळलेल्या रक्ताचा भाग' म्हणून करण्यात आलेला उल्लेख मोठ्या शहरांसंबंधीची उल्लेख होता. ब्रिटिश 'साम्राज्याची दलाली' करणारी आणि खेड्यांच्या जीवावर लठ्ठ झालेली ती शहरं होती. प्रगतीचं चिन्ह म्हणून आणि व्यापारात भारताच्या निर्यातीमुळे जी शिल्लक राहत होती त्यासाठी ब्रिटिश अधिकारी त्या शहरांचा उल्लेख मोठ्या अभिमानानं करत असत. वास्तवात मात्र ती शहरं केवळ भारताच्या शोषणाचंच स्मरण करून देत असत. 'कार्यक्षम ब्रिटिश सत्तेनं दिलेल्या' स्मशानशांततेसाठी' आणि गुलाम वंशावरील निर्दयी परकीय शासनासाठी आयातीपेक्षा अतिरिक्त निर्यात ही मोजावी लागलेली किंमत होती.

भारतातून सेवानिवृत्त झाल्यानंतर सन्माननीय जॉन शोअर १७ वर्षांनंतर आठवत म्हणाले, 'ब्रिटिश राज्याची भारतात स्थापना होणं हे भारतीयांसाठी ईश्वरी वरदान आहे आणि या विधीलिखिताबद्दल जे दुर्दैवी लोक प्रश्न करतात त्यांच्या डोक्यावर वादळाचा घोंघाट सुरू आहे अशी त्या काळात इंग्रजांच्या मनाची 'जवळजवळ निश्चितपणे सुखद' खात्री पटलेली होती. ते लिहितात :

*लोकांची शासनाबद्दल आणि आमच्याबद्दल जी भावना होती ती समजून घेण्यात काहीच नुकसान नाही हे माझ्या लगेच लक्षात आलं. तसं घडलं नसतं तरच मला आश्चर्य वाटलं असतं. सर्व प्रकारे संपुर्ण भारताला आपल्याला लाभदायी आणि हितावह होईल असं घडवणं हे इंग्रजांचं मुलश्रृत तत्त्वज्ञान आहे. त्यांच्यावर कमाल सीमेपर्यंत कर लावण्यात आलेला आहे, जसजसा प्रत्येक प्रांत आमच्या ताब्यात येत गेला तसतसं त्याला अधिकाधिक लुबाडायचं क्षेत्र बनवण्यात आलं. तद्देशीय शासक जेवढा महसूल गोळा करू शकत नसत तेवढा आम्ही वसुल करू शकतो*

*याचा आम्हाला नेहमीच गर्व वाटत आलेला आहे. अगदी किमान पात्रतेचा इंग्रजही ज्या सन्मानाला, प्रतिष्ठेच्या पदाला पात्र ठरतो त्यापासून भारतीयांना वगळण्यात आलेलं आहे.* [ऑनरेबल एफ. जे. शोर, *नोट्स ऑन इंडियन अफेअर्स*, लंडन, (१८३७), खंड २, पृष्ठ ५१६ यातील रोमेश दत्त, *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*अंडर अर्ली ब्रिटिश रूल*), या ग्रंथात घेतलेला उतारा, पृष्ठ ४१०-१२]

शोषणाचा उल्लेख करत अन्यत्र त्यांनी लिहिलं :

*भारतातील शांततेचे दिवस आता गेले. एकेकाळी त्याच्याजवळ जी प्रचंड संपत्ती होती ती बहुतांशानं शोषून घेण्यात आलेली आहे आणि त्याची शक्ती कुंठित करण्यात आलेली आहे. आपल्या स्वार्थी अनागोंदीच्या कारभारामुळे अनेकांच्या हिताचा काहींच्या हितासाठी बळी दिला गेला आहे.* [हिन्डमन, *बॅंकरप्सी ऑफ इंडिया*, पृष्ठ १५२ यातून रेजिनाल्ड रेनाल्ड्स, *व्हाईट साहिब्स इन इंडिया*, या ग्रंथात घेतलेला उतारा, पृष्ठ ११२]

ब्रिटिश प्रशासनानं भारताचा जो ‘चौतर्फी विनाश’ घडवून आणला त्याचं हे चित्र आहे. भारताला भेडसावत असलेल्या या प्रश्नाला, ज्याचं अस्तित्वच इंग्रज नाकारत होते, वाचा फोडण्याचं व या भावनेला पहिल्यांदा अभिव्यक्ती द्यायचं कार्य महात्माजींच्या स्वातंत्र्याच्या घोषणेनं केलं. कुणालाही स्पष्टपणे दिसू शकेल अशा या सत्याला केवळ क्षमाप्रार्थी इंग्रजच नव्हे तर मानसिक गुलामगिरीच्या वातावरणात शिकलेले पाश्चात्त्याळलेले भारतीयही नाकारत होते. ब्रिटिश मजूर पक्षाचे पुढारी हिंडमन यांनी लिहिलं, ‘आपल्या दृष्टीनं जरी पाहिलं तरी भारत दुर्बल आणि दुर्बलतर होत जात आहे, आपल्या शासनाखाली हळूहळू परंतु तरीही वेगात मोठ्या प्रमाणात त्याच्या जीवनस्रोताला ओहोटी लागलेली आहे .

उठावानंतर भारतीय राष्ट्रभक्तांच्या पहिल्या पिढीला मनापासून वाटत होतं की या सर्वांच्या मुळाशी ब्रिटिशांचं भारतातील अब्रिटिश शासन आहे. यातून त्यांच्या वैफल्याच्या भावनेचं तसंच श्रद्धेचं दर्शन होते. नंतरच्या दशकांत एकामागून एक हृदयावर आघात करणारे धक्के बसत गेले. त्यामुळे अखेरीस भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसनं जानेवारी २६, १९३०ला घोषित केलं : ‘या चौपदरी विनाशाला नष्ट करायचा मार्ग इथल्या ब्रिटिश शासनाचा शेवट करणे हाच आहे.’

या संघर्षात गांधीजी अग्रभागी होते. अन्यायाच्या या शतकात परकियांच्याजवळ श्रेष्ठ प्रतीची शस्त्र आणि संघटना होती. त्यांच्याशी संघर्ष करताना त्यांची शस्त्रश्रेष्ठता नगण्य ठरेल अशा पातळीवर म्हणजे अहिंसात्मक पातळीवर तो संघर्ष न्यायला पाहिजे याची गांधीजींना जाणीव झाली. परकीय शासनाला भारतातील सत्ता कायम ठेवायचा मोह ज्या प्रलोभनामुळे होत होता त्या प्रलोभनांना मुळापासून छाटून टाकायचा उपायच भारताचं वाढतं दारिद्र्य आणि आध्यात्मिक क्षय नष्ट करायचाही उपाय होता.

अशाप्रकारे या अन्यायाच्या शतकानं भारतीय स्वातंत्र्यसंघर्षाचं स्वरूप कसं राहणार होतं तेही ठरवलं. गमावलेल्या मूल्यांचा शोध घेताना भारतीयांना आपल्या अंतर्मनाकडे दृष्टी वळवावी लागली. आपल्यावर झालेल्या अन्यायाचंच रडगाणं गात बसण्यापेक्षा आपलं स्वतःचं घर नीट करायचं व विजेत्यांशी सहकार्य करून त्यांच्या जीवनात आणि संस्कृतीत जे काही उत्तम आहे ते आत्मसात करायचा भारतानं निर्णय घेतला. भारतानं अजाणता का होईना व्यवहारात अवलंबिलेली हीच अहिंसा होती. त्यामुळे ब्रिटिशांच्या निर्दयीपणाची धार काहीशी बोथट झाली. त्यानंतरच्या अवस्थेत ब्रिटिशांच्या हिंसेचा जाणीवपूर्वक आणि आनंदानं यातना सहन करून भारतानं प्रतिकार केला. ही अंतिम अवस्था प्राप्त करण्याकरिता गत चार पिढ्यातील संतांची, धर्मगुरूंची आणि मुत्सद्दी लोकांची तपश्चर्या उपयोगात आली. त्यांच्या निरपेक्ष अविरत श्रमानं नवयुगाचा मार्ग मोकळा झाला.

या अशुभ अन्यायाच्या शतकाची दुष्ट सावली दक्षिण आफ्रिकेपर्यंत लांबली होती. ब्रिटिश नोकरशाहीनं भारतात अवलंबिलेल्या पद्धतीचा ऱ्होड्ससारख्या साम्राज्यवाद्यांनी जाणीवपूर्वक *किती तरी पटीनं आधिक परिणामकारकतेनं* अवलंब केला. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची राजकीय परिस्थिती सुधारण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आल्यास त्याचं 'राजद्रोही' भूत भारतातही भेडसावील अशी नाताळचे प्रधानमंत्री सर जॉन रॉबिनसन यांनां भीती वाटत होती. केप कॉलनीचे राज्यपाल हॅरी स्मिथ, सर बार्टल फ्रेअर, सर बेंजामिन रॉबर्टसन, अर्ल किचनर, आणि लॉर्ड रॉबर्ट्ससारखे आफ्रिकेच्या टोकावरील स्वयंशासित राज्यांचे अनेक रासवट निर्माते 'भारतीय

शाळेतून' उत्तीर्ण झालेले होते. अर्ल ऑफ एल्गिन, लॉ रिपन आणि लॉर्ड अम्टहिल हे माजी राज्यपाल होते, अर्ल डर्बी हे वसाहत मंत्री होण्यापूर्वी भारत मंत्री होते. वसाहतीतील त्यांच्या कामाची पद्धत भारतातील कामाच्या पद्धतीशी बरीच जुळती होती. अन्यायाच्या शतकानं निर्माण केलेल्या प्रचंड दारिद्र्यामुळे भारतीय बंधुआ मजूर पाठवावे लागणारी परिस्थिती निर्माण केली व त्यातूनच समुद्रपार भारतीयांचा प्रश्न निर्माण झाला. आप्रवासी भारतीयांच्या अज्ञातवासातही राजकीय वेठबिगारी एखाद्या कर्करोगाप्रमाणे त्यांचा पाठलाग करत होती व त्यांना कमीपणाचा बट्टा लावत होती. त्यामुळे 'साम्राज्याचे गुलाम' म्हणून भारतीय लोकांना वागवायचं निमित्त दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना सापडायचं.

वर्णश्रेष्ठतेच्या भावनेवर आधारित साम्राज्यशाहीच अन्यायाच्या शतकासाठी कारणीभूत झाली होती. तिचा विखार दक्षिण आफ्रिकेत जेव्हा पराकोटीला पोहोचला तेव्हा तिच्या व्यक्तिमत्त्वातूनच तिच्यावरील उपायाचा जन्म झाला. दक्षिण आफ्रिका सत्याग्रहाची रोपवाटिका बनली आणि त्या सत्याग्रहामुळेच भारताला मुक्ती मिळाली आणि त्या काळ्या उपखंडातही अनेकांची मुक्तीसाठी ती सहाय्यभूत होऊ शकेल.

# प्रकरण ३ रे

# नवप्रभातचे अग्रदूत

## १

१८५७ साली भारतात झालेला उठाव हा सत्ता गमावलेल्या लोकांनी जाणीवपूर्वक विनाशाकडे घेतलेल्या उडीपेक्षा अधिक काही नसता तर उठावानंतर भारतीयांची अवस्था आफ्रिकेतील आफ्रिकानार लोकांपेक्षा फारशी वेगळी झाली नसती. त्यावर्षी त्या दूरवरच्या देशात एक अतिशय विलक्षण घटना घडली होती. इंग्लंडच्या वाढत्या शक्तीमुळे धडकी भरून आणि परकीय वंशाच्या लोकांच्या हातून आपला संपूर्ण विनाश व्हायची अथवा संपूर्ण गुलामगिरीची वेळ यायची भीती वाटल्यानं पश्चिम आफ्रिकारारियाच्या लोकांनी चमत्कारिक मार्गाचा आश्रय घेतला. जवळपासच्या लोकात भविष्यवाणी पसरली होती की लवकरच एके दिवशी सर्व जग बदलणार आहे. शेतांमधे एवढी जनावरं होतील की कुणालाही त्यांची मोजदाद करता येणार नाही. खाण्यासाठी तयार असं मिलीचं पीक जमिनीतून उसळी मारून वर येईल आणि देशात दुःख आणि आजाराची नावनिशाणीही शिल्लक राहणार नाही; प्राचीन सुवर्ण काळातील दिवंगत बलाढ्य योद्धे अजेय झोसा सैन्याच्या सेनापतीपदी येतील; गोरे लोक परत समुद्रात ढकलले जातील; आणि काळी माणसं परत दक्षिण आफ्रिकेवर राज्य करतील. केवुळ एकाच गोष्टीची यासाठी गरज होती - श्रद्धेची, नवजीवनावरील श्रद्धेची. 'एवढ्या जोरदार श्रद्धेची गरज होती की माणसानं आपलं सर्वस्व त्या श्रद्धेसाठी झोकून द्यायला तयार व्हावं.' [सारा गर्ट्रुड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, कॉन्स्टेबल अँड कंपनी लि., लंडन, पृष्ठ ३७] त्यासाठी त्यांनी आपली जनावरं मारून टाकायला पाहिजे होती, अन्नधान्याचा कोणताही साठा ठेवायला नको होता आणि पिकांची पेरणीही करायची नव्हती; आणि येणाऱ्या सुखाच्या काळाची केवळ वाट बघत बसायला हवं होतं. त्यानुसार ५०,००० लोकांनी म्हणजे देशातील जवळपास १/३ लोकांनी

'आत्महत्या केली' असं रिदाथ आणि एलिस यांनी स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका या ग्रंथात सांगितलेलं आहे. त्यांनी आपल्या गुराढोरांची कत्तल केली, शेतीत कोणत्याही प्रकारची पेरणी केली नाही आणि त्यामुळे उपासमारीनं आणि नंतर आलेल्या आजारानं किडा-कीटकाप्रमाणे ते मेले. परिणामी दक्षिण आफ्रिकेतील केप कॉलनीजवळील काफ्रारियाचा तो भाग 'अक्षरशः निर्मनुष्य' झाला. 'या लोकांचा विनाश हा फारसा तोटा आहे असं स्वाभाविकपणेच ब्रिटिशांना वाटलं नाही करण त्यामुळे दक्षिण आफ्रिका व्यापायच्या प्रक्रियेला गती आली होती.' [जॉन क्लर्क रिडपाथ एल.एल.डी आणि एडवर्ड्स एस. एलिस ए. एम., *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका*, विल्यम वॅटसन अँड कंपनी, लंडन, (१८९९), पृष्ठ ७०]

अनुभवानं वारंवार दाखवलं आहे की केवळ व्यथांमधे पुनर्निर्माणाची शक्ती नसते. भारताच्या बाबतीत वरवरच्या जड पापुद्र्याखाली अजूनही शांत जीवनरस वाहत होता. पराभूत झाल्यानंतरही, चिरडलं जाऊनही आणि अपमानित होऊनही आपली गमावलेली शक्ती परत मिळवण्यासाठी भारतानं आपल्या संपन्न भूतकाळातील संस्कृती आणि आध्यात्मिक परंपरा यांच्या शांत राखीव साठ्यातील जीवनस्रोताचा आधार घेतला. १८५७चं आंदोलन निर्घृणपणे चिरडल्यानंतर केवळ ३० वर्षातच तो परत राष्ट्रीय पुनरुत्थानाकडे वाटचाल करू लागला. या वाटचालीत अनेक अडथळे आले असले व अनेकदा दोन पावलं माधारही घ्यावी लागली असली तरीही आपलं ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक सामर्थ्य मिळेपर्यंत ही वाटचाल सुरूच राहिली व अखेरीस भारताला स्वातंत्र्य मिळालं.

काही काळापूर्वी प्राध्यापक अर्नोल्ड भारतात बोलत असताना म्हणाले होते की 'आत्मचिंतनात्मक मार्गाकडे वळून निर्मितीक्षम माघार घेतल्याशिवाय माणूस जगू शकणार नाही. त्यांनी दाखवून दिलं की हाच बुद्धाचा मार्ग होता. २,००० वर्षांनंतर तो भारताच्या सुटकेचाही मार्ग झाला. गुलामगिरीच्या काळात भारताची जीवनशक्ती अगदी लुप्त झाल्यासारखी वाटत होती. पक्षाघातानं तो ग्रस्त झाला होता. रोमॉ रोलॉ यांच्या शब्दात सांगायचं तर त्यावेळी, 'भारत आपल्या राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी अंतर्मुख झाला कारण तिथंच त्याच्या जीवनशक्तीनं आश्रय घेतलेला होता.' ह्या अंतर्गत बदलामुळे एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धात जीवनाच्या सर्व

क्षेत्रात - धर्म, संस्कृती, कला, विज्ञान, साहित्य, सामाजिक सुधारणा आणि अखेरीस राजकीय चळवळ - एकाएकी नवजागरणाची लाटच आली.

भारताच्या आकाशमंडळात त्या वेळी दैदिप्यमान असलेल्या लोकांमध्ये पौर्वात्य संस्कृतीचे विद्वान डॉ. राजेंद्रलाल मित्र आणि आर. जी. भांडारकर, वैज्ञानिक जे. सी. बोस आणि पी. सी. राय, उत्तरेकडील बंगाल स्कूल ऑफ आर्टचे संस्थापक अवनींद्रनाथ टागोर आणि गजेन्द्रनाथ टागोर आणि दक्षिणेकडील रवी वर्मा यांच्यासारखे कलाकार, १८५० साली १३ भागातील पहिल्या बंगाली विश्वकोशाचं संपादन करणारे कृष्णमोहन बॅनर्जी यांच्यासारखे अभ्यासक आणि किती तरी कवी, नाटककार, कलाकार आणि गद्यलेखकांचा समावेश होता. राजा राममोहन राय यांनी समाजसुधारणेचं काम जिथे सोडलं होतं तिथून अज्ञेयवादी, दयाळू अंतःकरणाचे, मानवतावादी, शिक्षणमहर्षी आणि समाजसुधारक ईश्वरचंद्र विद्यासागर (१८२०-१८९१) यांनी ते उचललं. विधवाविवाहाचा पुरस्कार करून त्यांनी अन्य कुणापेक्षाही अधिक बालविधवांची भयानक दुःखातून सुटका करण्यासाठी प्रयत्न केला. मेघनाथवध या महाकाव्याचे लेखक ख्रिश्चन कवी मायकेल मधूसूदन दत्त (१८२४-७३) यांनी बंगालीत मुक्तछंदाची रचना केली. दीनबंधू मित्र (१८२९-७३) यांनी नीलदर्पण हे नाटक नीळलागवडीच्या प्रश्नावर लिहून एक इतिहासच निर्माण केला. स्वच्छंदी गिरीशचंद्र घोष - जे नंतर रामकृष्ण परमहंसांच्या परिसस्पर्शानं त्यांचे भक्त झाले होते - नट, निर्माते, नाटककार होते व त्यांनी बंगाली रंगभूमीला ४० वर्षांपर्यंत उच्चपदावर नेऊन ठेवलं होतं.

गद्यलेखकांत सर्वात आघाडीवर होते बंकीमचंद्र चटर्जी. ते 'बंगालचे वाल्टर स्कॉट' म्हणून ओळखले जात असत. ते आधुनिक बंगाली गद्याचे निर्माते आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखक होते. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय तरुणांमधे त्यावेळी इंग्रजांची नक्कल करायची आणि मातृभाषेची टवाळी करायची जी टूम होती त्याविरुद्धच्या बंडाचं त्यांनी नेतृत्व केलं. राष्ट्रीयत्व विसरलेल्या लोकांवर त्यांनी आपल्या उपहासात्मक भाषेनं कोरडे ओढले आणि देशी भाषांना समाजात योग्य स्थान प्राप्त करून दिलं. त्याचबरोबर बोलचालीतील बंगालीचा साहित्यात

उपयोग करून त्यांनी परंपरागत बंगाली लेखकांच्या विरोधातही बंडाचं निशाण उभारलं. जे बंगाली साहित्य आधी काही निवडक शिक्षित लोकांसाठीच होतं त्या बंगाली साहित्याचा वारसा त्यांच्यामुळे लक्षावधी लोकांना मिळाला.

शेवटचे परंतु कमी महत्त्वाचे नसलेले म्हणजे रवींद्रनाथ टागोर.. त्यांनी जगाच्या नकाशावर विचारवंत, तत्त्वज्ञ, कलाकार आणि साहित्यिकांचा देश म्हणून भारताला नाव मिळवून दिलं. आणि याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मानवतेचे देवदूत होते.

मुसलमानांमध्ये पाली, गालीब आणि इकबाल यांच्यासारखे कवी झाले. धार्मिक विषयावर आणि इस्लामसंबंधी लेखन करणारे अमीर अली आणि शिबली नुमानी झाले, सैय्यद अहमद खान यांच्यासारखे सुधारक झाले.

पश्चिमेचा राजकीय आणि सांस्कृतिक असा जो हिंसक प्रभाव भारतावर पडला होता त्यामुळे भारताला आधी आपलं घर नीट करायची आवश्यकता जाणवली व त्यामुळे काही प्रमाणात हे घडलं होतं. काही प्रमाणात पश्चिम आणि पूर्वेचा जो संगम झाला होता व त्यामुळे पाश्चात्त्य शिक्षणात जी वाढ झाली त्यामुळेही हे घडलं होतं. परंतु मूलतः भारताच्या जीवनशक्तीनं आपल्या तद्देशीय जोमानं या बाह्य घटनांना दिलेली ती प्रतिक्रिया होती. या बाबतीत पौर्वात्य विषयांचे विद्वान सर विल्यम जोन्स आणि सर चार्ल्स विल्किन्स, कोलब्रूक, विल्सन आणि म्यूर; मोनिअर विल्यम्स, पॉल डुसॉ आणि मॅक्समुल्लर; बुहलर, फ्लीट हॅवेल आणि आनंद कुमारस्वामी या लोकांनी काही कमी महत्त्वाची कामगिरी बजावली नाही. भारताला अभिमान वाटावा अशा त्याच्या प्राचीन ज्ञानाची, शिल्पशास्त्राची आणि कलेची त्यांनी भारताला ओळख करून दिली व त्याला वारसात मिळालेल्या खजिन्याचं महत्त्व समजावून सांगितलं.

## २

ब्राह्मो समाजाचे संस्थापक राजा राममोहन राय हे या नवजागरणाच्या प्रभातीचे उगवलेल्या पहिल्या चांदणीसारखे होते. बरद्वान जिल्ह्यात ब्राह्मण जमीनदार कुटुंबात प्लासीच्या

लढाईनंतर १५ वर्षांनी १७७४ साली ते जन्मले होते. हिंदू-मुसलमान संस्कृतीच्या संयुक्त संस्कारात त्यांची वाढ झालेली होती. ज्या ठिकाणी त्यांची वाढ झाली होती त्या ठिकाणी मोगल न्यायालयांची पर्शियन ही अधिकृत भाषा होती. बालपणी पाटण्यात ते अरेबिक भाषा शिकले व त्याच भाषेतून त्यांनी युक्लिड आणि ॲरिस्टॉटल यांच्या ग्रंथांचं वाचन केलं. वयाच्या १४ ते १६व्या वर्षाच्या दरम्यान ते बनारस येथे संस्कृत शिकले. तोपर्यंत त्यांना भारतीय धर्मशास्त्राचा परिचय नव्हता.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी हिंदू धर्मातील मूर्तिपूजेवर जोरदार हल्ला करणारं पुस्तक पर्शिअन भाषेत लिहिलं व त्याला अरेबिक भाषेत प्रस्तावना लिहिली. त्यामुळे त्यांना घराबाहेर काढण्यात आलं. त्यानंतर ४ वर्ष ते भारतात आणि तिबेटमधे बौद्ध धर्माचा अभ्यास करत आणि धर्मवेड्या लामांच्या हातून मृत्यूचा धोका पत्करत भटकत होते. नंतर वडिलांच्या आग्रहामुळे ते घरी परतले व विवाहित झाले.

त्या काळात इंग्रजी शिकवणारी शाळा-महाविद्यालये नव्हती. त्यामुळे त्यांनी स्वतःच इंग्रजीचा आणि त्याचबरोबर आपल्या बंगाली मातृभाषेचा आणि हिंदीचा अभ्यास केला आणि हिब्रू, लॅटीन आणि ग्रीक भाषेत प्राविण्य मिळवलं. त्यांना मुळातून बायबलचा, उपनिषदांच्या, तंत्रविज्ञानाचा आणि मुसलमान धर्मशास्त्राचा आणि सूफी गूढवादाचा अभ्यास करायचा होता म्हणून त्यांनी हे सर्व केलं.

१८०३ साली इस्ट इंडिया कंपनीत महसूल विभागात त्यांना नोकरी मिळाली आणि १८०९ साली रंगपूर जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्षाच्या हाताखाली ते दिवाण झाले. १८१५ साली सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी स्वतःला तनमनानं हिंदू धर्म आणि हिंदू समाजाच्या शुद्धीकरणाच्या कामासाठी झोकून दिलं. कारण त्यावेळी कर्मकांड, अंधश्रद्धा आणि विविध सामाजिक परंपरा यांमुळे हिंदू धर्म वेगानं अधोगतीकडे चाललेला होता.

विधवांना जाळायच्या राक्षसी प्रथेविरुद्ध संतापून त्यांनी केलेल्या निषेधामुळे १७९९ साली ब्राह्मणांनी जोर लावल्यामुळे त्यांना पुन्हा घराबाहेर काढण्यात आलं. परंतु त्यांच्या

वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांना परत घरात घेण्यात आलं. वारसात त्यांना भरपूर संपत्ती मिळाली. दिल्लीच्या सम्राटांनी त्यांना राजा ही पदवी दिली. कोलकात्यात त्यांचा महाल व भव्य बाग होती. तिथं ते मोठ्या रुबाबात राहत असत आणि ‘संगीतकार, वाद्यवृंद आणि नर्तक यांच्या ताफ्यानं रंगलेल्या वातावरणात ते मोठमोठ्या मेजवान्या देत असत.’

राजा राममोहन राय यांची सामाजिक सुधारणांविषयीची कळकळ ही भारताच्या प्रबोधनपर प्राचीन परंपरांच्या अभिमानातून जन्माला आली होती. त्यांना आपल्या लोकांनी केलेल्या कामगिरीचा अभिमान होता आणि आपल्या पूर्वजांच्या धर्मात जे काही चांगलं आणि महान होतं ते जपण्यासाठी ते उत्सुक होते. हिंदू समाजात शिरलेल्या कुप्रथांवर त्यांनी धैर्यानं हल्ला केला आणि अतिशय क्रांतिकारक सुधारणांचा पुरस्कार केला. परंतु असं असतानाही ते आपल्या श्रद्धांच्या मूलभूत तत्त्वांना चिकटून होते. त्यांनी केलेल्या आत्मवृत्तात्मक लेखनातून त्यांनी सांगितलं, ‘मी घेतलेली भूमिका ब्राह्मण्यवादाच्या विरोधात नव्हती तर ती ब्राह्मण्यवादाला शुद्ध करणारी होती.’ हिंदू धर्माचा त्याग करण्याऐवजी त्यांनी त्याला शुद्ध करण्याची मोहीम उघडली. उपनिषद आणि वेद यांच्यात सांगितलेल्या विवेकावर आधारित ईश्वरावरील विश्वासाकडे त्याला न्यायचा प्रयत्न केला.

हिंदू धर्माविरुद्ध ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी केलेल्या असभ्य अपमानास्पद भाषणांमुळे त्यांना अतिशय वेदना झाल्या.. तेवढ्याच उपहासानं प्राणघातक हल्ला करत ते उद्गारले, ‘जेव्हा एका देशाला दुसऱ्या देशावर विजय मिळतो तेव्हा पहिल्याचा धर्म जरी हास्यास्पद असला तरी त्याच्या ताब्यात आलेल्या देशातील लोकांच्या धर्माला आणि शिष्टाचाराला हसणं आणि तुच्छ लेखणं स्वाभाविकच असतं... त्यामुळे या देशाचे विजेते ब्रिटिश धर्मप्रचारक जर तद्देशीय लोकांच्या धर्माला शिवीगाळ करत असतील आणि हसत असतील तर ती गोष्ट फारशी काही अस्वाभाविक नाही.’ १८२० साली त्यांनी लिहिलेला *द प्रिसेप्ट्‌प ऑफ जिझस द गाईड टु परीस अँड हॅपिनेस* हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यांत नव्या करारातील जिझसच्या नैतिक सल्ल्यापासून इतर गोष्टी वेगळ्या कराव्या म्हणून त्यांनी जो युक्तिवाद केला त्यांमुळे बॅप्टिस्ट चर्चच्या लोकांशी त्यांचा वाद

झाला. येशूच्या नैतिक शिक्षणाबद्दल सखोल आदर दाखवल्यानंतर त्याच्या दैवीपणावर त्यांनी घेतलेल्या आक्षेपाला चर्चच्या लोकांनी पाखंडीपणा म्हणून संबोधलं व त्यांना नास्तिक ठरवलं. परंतु मोनिअर विल्यम्स यांनी मात्र त्यांना 'तुलनात्मक धर्मशास्त्राचा प्रामाणिकपणे प्रयत्न करणारा जगातील पहिला अभ्यासक ठरवलं.'

आधुनिक भारताचे जनक, भारतीय राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाचं प्रतिपादन करणारे महापुरुष आणि आधुनिक बंगाली गद्याचे जनक म्हणून ते ओळखले जातात. तसंच राजा राममोहन राय हे भारतातील सार्वजनिक जीवनातील अग्रेसर पुढारीही होते. वैदिक विज्ञानाच्या अभ्यासासाठी त्यांनी बंगालीत एक आणि पर्शिअन भाषेत एक अशी दोन साप्ताहिक वृत्तपत्रे काढली. त्याशिवाय इंग्रजी, पर्शिअन, बंगाली आणि नागरी या चार भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या *बेंगाल हेराल्ड* या वृत्तपत्रातही ते लेखन करायचे. वृत्तपत्र स्वातंत्र्याचे ते महान पुरस्कर्ते होते. वृत्तपत्रांची गळचेपी करणारा कायदा जेव्हा लॉर्ड अॅमहर्स्ट यांच्या कारकिर्दीत जाहीर करण्यात आला तेव्हा आधी सर्वोच्च न्यायालयात आणि नंतर प्रिव्ही कौन्सिलमधे वकील लावून त्यांनी त्याला कडाडून विरोध केला. त्या संदर्भात त्यांनी जे निवेदन तयार केलं त्याचं वर्णन त्यांच्या इंग्रज चरित्रकार मिस कोलेट यांनी 'भारतीय इतिहासाचा अॅरिओपॅगिटिका' असं केलं.

त्यांनी पुरस्कारिलेल्या सुधारणा आणि प्रागतिक विचारांची संख्या किती तरी आहे. लॉर्ड बेंटिक यांना सतीचा कायदा करण्यासाठी त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला, त्यांनी बहूपत्निकत्वाविरुद्ध आंदोलन उभारलं, विधवाविवाह आणि आंतरजातीय विवाहाचा तसंच हिंदू-मुसलमानातील मैत्रीचा, आधुनिक पद्धतीचं शिक्षण, स्त्रीशिक्षण, विचारस्वातंत्र्य, कायदेविषयक सुधारणा आणि राजकीय समता यांचा पुरस्कार केला. त्यांनी भूगोल, खगोलशास्त्र, भूमिती, व्याकरण इत्यादी विषयांवर किती तरी पाठ्यपुस्तके लिहिली. त्यांनी पहिलं आधुनिक हिंदू महाविद्यालय उघडलं तसंच अनेक निःशुल्क शाळा काढल्या. ते संस्कृत, बंगाली, अरेबिक, पर्शिअन आदी भाषांचे महान लेखक होते. वेद आणि इतर हिंदू धर्मग्रंथातील उतारे आपल्या स्वतःच्या भाष्यासह त्यांनी बंगाली आणि इंग्रजीत अनुवादित केले. या ग्रंथांतील ज्ञान सामान्य माणसाच्या आवाक्यात यावं

म्हणून त्यांनी असं केलं होत. याशिवाय ते अनेक स्तोत्र, कविता, प्रवचनं, तत्त्वज्ञानात्मक प्रबंध, राजकीय आणि इतर किती तरी विषयावरील लेख आदींच्या लेखनाचं श्रेय त्यांच्याकडे जातं.

'अनंत, अनाकलनीय, नित्य, विश्वाचा निर्माता आणि त्याचं पालनपोषण करणाऱ्या ईश्वराची पूजा करणाऱ्या' ब्राह्मो समाजाची स्थापना त्यांनी १८२८ साली केली. अनेक मोठ्या गोष्टींप्रमाणेच त्याची सुरुवातही लहान होती. निवृत्त होऊन कोलकातात स्थायी झाल्यानंतर लगेच त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली. धार्मिक रूक्षपणाला कंटाळलेल्या परंतु गांभीर्यपूर्वक ईश्वरोपासना करू इच्छिणाऱ्या त्या काळातील लोकांचा त्यात अंतर्भाव होता. अध्यात्माचं ध्यान करण्यासाठी, प्रेरणेचा अखंड स्रोत असलेल्या गायत्री मंत्रातून प्रेरणा घेण्यासाठी ते वेळोवेळी भेटत. दोन वर्षांनंतर म्हणजे १८२१ साली युरोपिअन आणि भारतीय सदस्य असलेल्या कलकत्ता युनिटॅरिअन सोसायटी या नवीन संस्थेची त्यांनी स्थापना केली. हीसुद्धा यशस्वी झाली नाही. परंतु तिनं ब्राह्मो समाजाच्या स्थापनेचा मार्ग मोकळा केला.

ही संस्था सर्व व्यक्तींसाठी – 'रंग, जात, वंश वा धर्म या कशाचाही भेदभाव न करता सर्वांसाठी - खुली राहणार होती. ती सर्वांसाठी वैश्विक प्रार्थनागृहाचं काम करणार होती.' कुणालाही कोणत्याही धर्माला 'ध्वन्यार्थानेही नगण्य लेखता येणार नाही वा त्याच्याबद्दल अनादर व्यक्त करता येणार नाही' अशी संस्थेच्या घटनेत संस्थापकांनी मर्यादा घालून दिली होती. परोपकार, नैतिकता, करुणा, दयाळूपणा, सद्‌गुण आणि सर्व धर्मांना आणि पंथांना सामर्थ्यसंपन्न करणं या गुणांचा तिच्या ध्येयात समावेश होता. त्यांच्या या कार्यात त्यांना मुख्य पाठिंबा राजा द्वारकानाथ टागोरांचा होता.

राजा राममोहन राय विलक्षण बुद्धिमान तर होतेच पण त्याचबरोबर ते गाढे धर्मशास्त्र पंडितही होते. त्यांच्यावर इतर धर्मांचा वैशिष्ट्यानं ख्रिश्चन धर्माचा आणि इस्लामचा प्रभाव पडलेला असला तरी त्यांनी तसं केवळ विविधतेची हौस म्हणून केलं नव्हतं. 'तत्त्वज्ञान मूलभूत विश्लेषणावर आधारित असायला हवं असा त्यांचा विश्वास होता.' [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, अल्बर्ट अँड चार्ल्स बोनी. न्युयॉर्क, (१९३०), पृष्ठ ८१] अगदी बालपणापासूनच त्यांना चिंतनात्मक मार्गाची आवड

असल्याचं दिसून येतं. अनेकदा मनाला विचलित करणाऱ्या आजुबाजूच्या गोंधळाच्या वातावरणातही ते ध्यानमग्न होऊन चिंतन करत असल्याचं दिसत असे. 'सर्वांमधे ब्रह्माचं दर्शन घ्यायची आणि आत्म्याला सर्वोच्च आत्म्याच्या स्वाधीन करायची त्यांची पद्धत होती. आत्मानुभूती 'जगाचं अस्तित्व नाकारण्यासाठी नव्हती.... तर प्रत्येक इंद्रियगम्य वस्तूतून ईश्वराचं दर्शन घेण्यासाठी होती.' [धिरेन्द्रनाथ चौधरी, राम मोहन राय, *द डिव्होटी*, द मॉडर्न रिव्ह्यू, ऑक्टोबर, १९२८] त्यांच्या या स्वभावामुळे विचारवंत म्हणून, राजकारणी पुरुष म्हणून आणि कडवे समाज सुधारक म्हणून त्यांना जी ख्याती मिळायला पाहिजे होती तिला थोडासा धक्का लागला.

१८३० साली दिल्लीच्या सम्राटांच्या तक्रारी इंग्लंडच्या राजासमोर मांडण्यासाठी आणि दिल्ली दरबाराच्यावतीनं तयार केलेल्या अर्जाचा पाठपुरावा कोर्ट ऑफ डायरेक्टर्ससमोर करण्यासाठी ते दिल्लीच्या सम्राटांचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला गेले. त्यावेळी ते त्यांच्या काळातील अनेक प्रसिद्ध पुरुषांना भेटले. त्यात इतिहासकार विल्यम रोस्को, तत्त्वज्ञ जेरेमी बेन्थॅम आणि लॉर्ड ब्रोहमसह अनेक राजघराण्यातील लोकांचा समावेश होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी त्यांना जाहीर मेजवानी दिली. ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचं नूतनीकरण करताना हाउस ऑफ कॉमन्सच्या सिलेक्ट कमेटीसमोर त्यांना साक्ष देण्यासाठी बोलावण्यात आलं.

स्वातंत्र्याचं त्यांना एवढं प्रेम होतं की कॉमन्स सभागृहानं लॉर्ड्स सभागृहाला पाठवलेलं सुधारणाविषयक विधेयक जर फेटाळण्यात आलं तर ब्रिटिश साम्राज्यात आपण राहणार नाही व आपण अमेरिकेत राहायला जाऊ अशी त्यांनी जाहीर घोषणा केली. त्यांनी पुकारलेला लढा 'केवळ सुधारक विरुद्ध परंपरावादी असा नव्हता तर संपूर्ण जगातील स्वातंत्र्य विरुद्ध दडपशाही असा होता.' [डी. एस. शर्मा, *स्टडीज इन द रनेसन्स ऑफ हिंदूइझम*, बेनारस हिंदू युनिव्हर्सिटी, वाराणसी. (१९४४), पृष्ठ ८४] नेपल्सच्या लोकांचं स्वातंत्र्य ऑस्ट्रियन सैन्यानं जेव्हा पायदळी तुडवलं तेव्हा त्यांना अतिशय दुःख झालं. त्यांना ते अशुभसूचक चिन्ह वाटलं आणि वाटायला लागलं की 'संपूर्ण युरोप आणि आशिया खंडात आणि वैशिष्ट्यानं युरोपच्या अंकित असलेल्या देशात लोकशाहीची परत स्थापना

झालेली पाहण्यासाठी आपण जगणार नाही.’ [डी. एस. शर्मा यांनी *स्टडीज इन द रनेसन्स ऑफ हिंदूइझम*मधे राजा राममोहन राय यांच्या पत्रातील दिलेलं उद्धरण, पृष्ठ ८७]

परंतु त्यांच्या या स्वातंत्र्यप्रेमानंतरही त्यांना ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्याचा दर्जा उंचावता आला नाही. जरी इतर अनेकांप्रमाणे ब्रिटिशांचं भारतात राज्य प्रस्थापित व्हायच्या ते विरोधात होते तरी त्यांचा पश्चिमेशी जो संबंध आला त्यामुळे त्यांना वाटायला लागलं की भारताला पश्चिमेकडून बरंच काही शिकण्यासारखं आहे, विशेषतः संस्कृतीच्या तांत्रिक दृष्टिकोनाच्या संदर्भात ब्रिटिशांशी आलेल्या संबंधामुळे तशी संधी निर्माण झालेली होती. त्यामुळे पाश्चात्त्य शिक्षणाचे ते कडवे पुरस्कर्ते झाले व त्या काळात प्रचलित असलेल्या शुष्क विद्वत्तापूर्ण शिक्षणाऐवजी ‘गणित, निसर्गविज्ञाने, रसायनशास्त्र. शरीरविज्ञान आणि उपयोजित शास्त्राच्या इतर शाखांच्या’ शिक्षणावर त्यांनी भर दिला. त्यांचा पूर्ण विश्वास होता की पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रसारानं जागृत झालेला भारत येत्या शतकात पूर्णपणे परिपक्व होईल. त्यानंतर आपली नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्या यांच्या आधारे तो आपल्या स्वातंत्र्याचा दावा करील व त्या वेळी कुणालाही तो फेटाळणं शक्य होणार नाही. आणि याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंग्लंडही तशी इच्छा करणार नाही. ब्रिटिशांच्या स्वातंत्र्य आणि न्यायासंबंधीच्या वक्तव्यांवर त्या काळातील भारतातील प्रखर राष्ट्रवाद्यांनीसुद्धा शब्दशः विश्वास ठेवला हे त्या वेळच्या भारताच्या बालीशपणाचंच लक्षण म्हणावं लागेल. ह्या विश्वासाला धक्का लागणारे अनुभव नंतर आले.

राजा राममोहन राय मूलतः राष्ट्रवादी असले तरी ते एवढे मोठे होते की केवळ राष्ट्रवादाच्या परिसीमेत त्यांचं मूल्यन होऊ शकत नाही. ते संपूर्ण मानवजातीच्या संदर्भात विचार करत असत. त्यांची शिकवणूक विश्वबंधुत्वाची होती व ती भावना आधुनिक भारताच्या निर्मात्यांच्या वक्तव्यांतून वारंवार प्रतिध्वनित झालेली आहे. फ्रान्सच्या परराष्ट्र व्यवहार विषयक मंत्र्यांना १८३१ साली त्यांनी लिहिलं की संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे आणि सगळे देश आणि विविध जातिजमाती या त्याच्या शाखा आहेत. त्यामुळे जगातील ‘सर्व ज्ञानी माणसांची इच्छा माणसामाणसातील आदानप्रदान वाढावं आणि त्याद्वारे परस्परांचा लाभ होऊन संपूर्ण मानवजात सुखी व्हावी अशी असते व म्हणूनच... त्या आड जे अडथळे उभारण्यात आलेले आहेत

ते दूर करायचा ते पुरस्कार करत असतात.’ [डी. एस. शर्मा, *स्टडीज इन द रनेसन्स ऑफ हिंदूइझम*, पृष्ठ ७१] त्यांच्या द्रष्टेपणाचा आवाका पाहिला की माणूस स्तंभित होतो. त्यांनी सुचवलं की ‘जेव्हा दोन राष्ट्र परस्परातील सर्व राजकीय मतभेद दूर करण्यासाठी दोन्ही राष्ट्रांतील संसदेतील समान संख्येतील प्रतिनिधी असलेल्या काँग्रेसकडे आपले प्रश्न सोपवतील आणि या काँग्रेसमधे बहुमतानं निर्णय घेण्यात येईल तेव्हाच घटनात्मक सरकारचे हेतू चांगल्या रीतीनं सफल होऊ शकतील, तसंच या काँग्रेसचा अध्यक्ष एक वर्षाच्या मुदतीसाठी आळीपाळीनं निवडण्यात यावा.’ [डी. एस. शर्मा यांनी *स्टडीज इन द रनेसन्स ऑफ हिंदूइझम*मधे राममोहन राय यांनी फ्रेंच मत्र्याला लिहिलेल्या पत्रातील दिलेलं उद्धरण, पृष्ठ ८८] त्यांनी एक शतकापूर्वीच जेव्हा असं सुचवलं तेव्हा त्यांनी युरोपसाठी राष्ट्रसंघाची कल्पना केलेली होती.

१८३३ साली त्यांचा ब्रिस्टल येथे मृत्यू झाला. जवळपास अगदी अखेरच्या क्षणी त्यांनी उच्चारलेला शब्द होता ओम्.

राजा राममोहन राय यांचं व्यक्तिमत्व उत्तुंग होतं. पूर्व आणि पश्चिमेच्या संस्कृतींचं संस्लेषण करून त्यांनी आपल्या उदाहरणानं दाखवून दिलं की या दोन संस्कृती परस्पर विरोधी नसून परस्पर पूरक आहेत. या दृष्टीनं विचार करता त्यांचं व्यक्तिमत्त्व तत्कालीन इतर नेत्यांपेक्षा आगळंवेगळं होतं असं म्हणावं लागतं. भारताची राष्ट्रभाषा नागरी अथवा हिंदीच असू शकते हे लक्षात येणारे ते पहिलेच व्यक्ती होते. परकीय शासनाचा अवशेष म्हणून आणि परकीय भाषेच्या माध्यमातून पाश्चात्त्य संस्कृती भारतावर लादून इथल्या लोकांची सांस्कृतिक आणि ऐतिहासिक मूळं न तोडता सहजपणे पौर्वात्य आणि पाश्चात्त्य संस्कृती मातृभाषेच्या माध्यमातून एकजीव झाल्या तर किती उंची गाठता येऊ शकते ते त्यांनी आपल्या उदाहरणानं दाखवून दिलं.

### ३

राजा राममोहन राय यांच्यानंतर ब्राह्मो समाजाची धुरा ज्यांच्याकडे आली ते देवेन्द्रनाथ टागोर, रविन्द्रनाथ टागोरांचे वडील, हेही आंतर्बाह्य उच्चकुलीन संस्कृतीतील आणि धार्मिक

प्रवृत्तीचे होते. ते सांगतात त्याप्रमाणे योगायोगानं ईशोपनिषदाचं एक पान उडत येऊन त्यांच्या पायाशी पडलं व त्यामुळे ते ब्राह्मो समाजाच्या विचारधारेकडे वळले. परंतु उपनिषदातील आत्मा एक आहे आणि आत्म्याच्यावरही आत्मा आहे हा विचार त्यांना पटू शकला नाही. ज्या वेदांवर आणि उपनिषदांवर ब्राह्मो समाजाची विचारधारा आधारित होती त्यांचा अधिकार त्यांनी अमान्य केला आणि विवेक आणि सदसद्विवेकबुद्धीच सर्वोच्च असायला हवी यावर भर दिला. त्यांचं म्हणणं होतं की 'शुद्ध अंतःकरणाला प्राप्त झालेल्या अंतर्ज्ञानालाच अचूक सर्वोच्च अधिकाऱ्याचा दर्जा प्राप्त होत असतो व त्यामुळे अंतःकरणातून निघालेले उपनिषदातील श्लोकच मान्य करण्यात यावे. अंतर्ज्ञानासंबंधीचं त्यांचं तत्त्वज्ञान हे असं होतं.

इतर बाबतीत देवेन्द्रनाथांनी राजा राममोहन राय यांच्या परंपरा सुरू ठेवल्या. राजा राममोहन राय यांचा सामाजिक सुधारणांकडे पाहायचा दृष्टिकोन देशभक्ताचा आणि व्यावहारिक राजकारणी पुरुषाचा होता. त्यांच्या स्वातंत्र्य प्रेमानं आणिं मानवतेविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यानं त्याच्या सुधारणांना व्यावहारिकेतेचा कधीच विसर पडला नाही. उदाहरणार्थ त्यांचा जातीसंस्थेसंबंधीचा पुढील उतारा पाहा :

'मला सांगताना दुःख होतं की सध्या हिंदूंची धर्माचरणाची जी पद्धत आहे ती राजकीय हेतूंच्या दृष्टीने त्यांच्यासाठी हितावह नाही. जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या भेदभावामुळे अगणित जाती आणि पोटजाती निर्माण होऊन समाजाचे तुकडे तुकडे झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यातील राष्ट्रीयत्वाची भावना अगदी संपलेली आहे. तसंच अनेक प्रकारच्या धार्मिक कर्मकांडांमुळे, समारंभांमुळे आणि शुद्धतेसंवंधीच्या नियमांमुळे कोणतंही कठीण कार्य हाती घेणं त्यांच्यासाठी फार कठीण झालं आहे. त्यामुळे मला वाटतं की त्यांच्या धर्मात काहीतरी बदल करणं आवश्यक आहे, कमीतकमी राजकीय हितासाठी आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी तसं करणं आवश्यक आहे. [रामानंद चटर्जी यांनी *राममोहन राय अँड मॉडर्न इंडिया*मधे आणि डी. एस. शर्मा यांनी *स्टडीज इन द रनेसन्स ऑफ हिंदूइझम*मधे राममोहन राय यांचं उद्धृत केलेलं पत्र]

सामर्थ्यसंपन्न होऊन हिंदू धर्माचं पुनरुत्थान व्हावं आणि राष्ट्रीय नवजीवनात त्याला योग्य भूमिका बजावता यावी हा सामाजिक सुधारणांमागील त्यांचा हेतू होता. त्यासाठी हिंदू धर्मातील दोष दूर करून त्याला शुद्ध करायचा त्यांचा प्रयत्न होता. हिंदू धर्मात नाट्यपूर्ण बदलाचा अथवा हिंदू समाजरचनेत क्रांतिकारक परिवर्तन करायचा त्यांनी कधीही विचार केला नाही. तसं करण्यात आलं असतं तर भारतातील अनेक पंथात अजून एका पंथाची भर पडण्यापेक्षा फारसं काही घडू शकलं नसतं. त्यांच्या सुधारणासंबंधीच्या उत्साहाला सावधगिरीची मर्यादा पडलेली होती. सामाजिक सुधारणांच्या बावतीत बळजबरीला विरोध करणाऱ्या राजा राममोहन राय यांच्या भूमिकेला देवेन्द्रनाथांचा पूर्ण पाठिंबा होता. परंतु त्यांच्यानंतर किती तरी गोष्टी बदलल्या.

अतिशय भावनाशील असलेले केशवचंद्र सेन (१८३८-८४) यांच्याकडे ब्राह्मो समाजाचं नेतृत्व यायचं जणू विधिलिखित ठरलेलं होतं. त्यांनी हिंदू धर्मात आमूलाग्र सुधारणा करायचा आणि त्याला ख्रिश्चन धर्माचा रंग द्यायचा प्रयत्न केला. देवेन्द्रनाथ टागोरांच्या नेतृत्वाखाली समाज विधवाविवाह आणि आंतरजातीय विवाह यांच्या बाबतीत फारशी प्रगती करू शकत नाही असं वाटल्यामुळे १८६४ साली त्यांनी राजा राममोहन राय यांच्या मूळ संस्थेशी संबंध तोडला. दोन वर्षांनंतर त्यांनी 'नवविधान चर्च'ची स्थापना केली. सनातनी ख्रिश्चनत्व आणि या समाजाच्या विचारसरणीत फार कमी अंतर उरलं होतं अशी अनेकांची मान्यता होती. ते येशूला प्रेषितांचा केवळ युवराजच मानत नव्हते 'तर त्रिमूर्तीतील दुसरी व्यक्ती, ईश्वराच्या दुसऱ्या पुत्राचा अवतार... हिंदू धर्माची परिपूर्णता मानत होते. ते जरी येशूला ईश्वरावतार मानत नव्हते तरी आपल्या अनुयायांना स्वार्थत्यागासाठी प्रवृत्त करण्याकरिता ते क्रुसाला बलिदानाचं प्रतीक मानत होते. एवढंच नाही तर बाप्तिस्मा, लॉर्ड्स सपर, पिलिग्रिमेज ऑफ द सेंट्स आदी प्रथा आणि परंपरांचाही त्यांनी स्वीकार केला होता. आपल्या चर्चमधील भक्तिभावनेची तीव्रता वाढावी म्हणून त्यांनी वैष्णव पंथातील पथगानासारख्या अनेक प्रथांचं नूतनीकरण करून त्यांचा समावेशही चर्चमधे केला. चैतन्य पंथातील अनुयायी पथगानात एकतारा आणि मृदुंगाचा उपयोग करत असत. रामकृष्ण परमहंसांच्या प्रभावाखाली येऊन त्यांनी ध्यान, योग आणि

सर्वसंगपरित्यागावर अधिक भर द्यायला सुरुवात केली. आपल्या चर्चमधील प्रवचनांसाठी त्यांनी हिंदू, बौद्ध, जेविश, ख्रिश्चन, इस्लाम चिनी आदी धर्मातील धर्मग्रंथांच्या आधारे निवडक वेच्यांचा ग्रंथ तयार केला.

१८७३ साली त्यांनी केलेल्या प्रवासात सर्वसामान्य हिंदू मूर्तिपूजक लोकांच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या लक्षात आलं की 'त्यांचे देव मुळात वेगळे काही नसून एकाच देवाची ती वेगवेगळी विशेषणं आहेत आणि त्यांची मूर्तीपूजा म्हणजे त्या दैवी विशेषणांचीं पूजा आहे.' परिणामी कोणत्याही प्रकारच्या मूर्तीपूजेला त्यांचा आधी जो कट्टर विरोध होता तो सौम्य झाला आणि त्यांनी जाहीर केलं की, 'ईश्वराच्या स्वरूपाचा विचार न करता अविभाज्य ईश्वरावर विश्वास ठेवणं म्हणजे अमूर्त ईश्वरावर विश्वास ठेवणं होईल आणि त्यामुळे व्यवहारात आपण बुद्धिप्रामाण्यवाद आणि नास्तिक्याकडे जाऊ.' [केशवचंद्र सेन, *द फिलॉसॉफी ऑफ आयडॉल वर्शिप*, द संडे मिरर, ऑगस्ट १, १८८०]

ब्राह्मोसमाजाच्या तत्त्वांच्या विरोधात जाऊन त्यांनी आपल्या मुलीचं लग्न कुचबिहारच्या युवराजांशी केलं. त्यावेळी ते दोघंही अल्पवयीन होते. त्यामुळे ब्राह्मो समाजात अजूनच तट पडले. ख्रिश्चन धर्माकडे कल असलेल्या त्यांच्या लोकांनी हिंदू आणि ब्राह्मो समाजातील दरी अजूनच रूंद केली. त्याचा प्रभाव बहुतांशानं पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या मध्यम वर्गीय बुद्धिवादी वर्गावर पडलेला होता आणि त्याचं नेतृत्व जेव्हा पाश्चात्य शिक्षित वर्गाकडे गेलं तेव्हा त्याची लोकप्रियता संपली.

परंतु महर्षी देवेन्द्रनाथ यांची तपश्चर्या आणि ज्ञान यांमुळे तसंच ज्या हिंदू धर्मापासून समाजानं जीवनरस मिळवला होता त्या हिंदू धर्माशी पूर्णपणे संबंध तुटण्यापासून तो वाचला. सामाजिक सुधारणांच्य क्षेत्रात त्यानं प्रचंड चांगलं काम केलं. त्यानं हिंदू धर्माला विवेकाधिष्ठित आणि उदार होण्यासाठी प्रवृत्त केलं आणि हिंदू समाजात सामाजिक जाणीव निर्माण केली. गांधीजींच्या शब्दात, 'त्यानं विवेकशक्तीला मुक्त केलं आणि श्रद्धेसाठी बरीच मोकळी जागा सोडली.' [एम. के. गांधी, *ब्राह्मो समाज्स कॉन्ट्रयूब्यूशन टू हिंदूइझम*, यंग इंडिया, ऑगस्ट ३०, १९२८, पृष्ठ २९१] इतर श्रद्धांसाठी

त्यानं सहनशीलतेचं वातावरण तयार केलं आणि सर्वोच्च ईश्वराच्या - परमेश्वराच्या - शुद्ध भक्तीचा आदर्श समोर ठेवून धर्माचा मूळ स्रोत जिवंत ठेवला.

ब्राह्मो समाजाची एक शाखा प्रार्थना समाज होती. १८४९ सालीच मुंबईत परमहंस सभा नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली होती. तिच्या जाहीर हेतूतील एक हेतू होता जातिभेद नष्ट करणं. ती गुप्त संघटना होती, सुधारणांबद्दलच्या उत्साहामुळे नव्हे तर अभक्ष्य पदार्थ खाण्यासाठीच तिच्यातील काही लोक तिथे जात होते असा संशय होता. ह्या गुपिताचा स्फोट १८६० साली झाला. त्यानंतर संघटना मोडली. परंतु १८६४ साली जेव्हा केशवचंद्र सेन यांनी मुंबईला भेट दिली तेव्हा बंद पडलेल्या सभेतील काही प्रामाणिक लोक एकत्रित आले आणि विधवाविवाह, बालविवाहबंदी, जातिभेद न मानणे आणि स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार अशा प्रकारच्या सुधारणा करण्यासाठी नवीन संघटना उभारायचा त्यांनी निर्णय घेतला. ब्राह्मो समाजापासून आपलं वेगळेपण दाखवण्याकरता आणि विनाकारण मतभेद आणि फाटाफूट टाळण्याकरता त्यांनी संघटनेचं नाव 'प्रार्थना समाज' ठेवायचं ठरवलं.

या तिन्ही ब्राह्मो समाजांची मिळून एकूण सदस्यसंख्या फारशी नव्हती. परंतु या ब्राह्मो समाजांच्या कार्याविषयीचा विचार त्यांच्या निष्ठावंत अनुयायांच्या संख्येवरून करता येऊ शकत नाही. ब्राह्मो समाजापासून प्रेरणा घेतलेल्या लोकांमधे बंगालमधील सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, बिधनचंन्द्र पाल, चित्तरंजन दास, आणि टागोर मंडळी; आणि मुंबईतील प्रार्थना समाजाचे के. नटराजन, नारायण गोविंद चंदावरकर, न्यायमूर्ती रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले या भारतातील महान राष्ट्रीय नेत्यांचा समावेश होता.

## ४

सुधारक ब्राह्मो समाजाच्या अगदी विरुद्ध आर्य समाज होता. हिंदू धर्मातील तो आक्रमक पंथ होता. रोमन कॅथॉलिक चर्चशी जो संबंध प्रॉटेस्टंट पंथाचा होता तोच संबंध आर्य समाजाचा

हिंदू धर्माशी होता. दयानंद स्वामींनी संस्थापिलेला हा पंथ पुरुज्जीवनवादी विचारधारेचा होता. त्याला परत शुद्ध वैदिक धर्मातील संस्कृतीकडे आणि संस्थांकडे वळायचं होतं.

देशात ख्रिश्चन शाळा, महाविद्यालये व धर्मप्रचारकांच्या संघटनांचं जाळं पसरलेलं होतं आणि मिशनरी संस्था आणि ख्रिश्चन मिशनरी हे धर्मपरिवर्तनाचं आक्रमण हिंदू धर्मावर संपूर्ण सामर्थ्यानिशी करत होते. भारतातील बुद्धिवादी वर्ग आपल्या स्वतःवरील, आपल्या धर्मावरील आणि आपल्या वंशात जन्माला आलेल्या महान लोकांविषयी श्रद्धा गमावू लागला होता. ब्राह्मो समाज एका पिढीत दोनदा झालेल्या फाटाफुटीमुळे दुर्बल झालेला होता आणि ख्रिश्चन धर्म त्याला पूर्णपणे गिळून टाकतो की काय अशी भीती वाटत होती. लोकांच्या भावनांना आवाहन करण्यात त्याला अपयश आलं होतं. भारतीय जनतेला त्याच्याबद्दल विश्वास वाटत नव्हता.

स्वामी दयानंद आणि त्यांच्या पिढीच्या लक्षात आलं होतं की एकीकडून उथळ युरोपिअन विवेकवादानं आणि दुसरीकडून पाश्चात्त्य साम्राज्यवाद्यांच्या हातातील दासीप्रमाणे काम करणाऱ्या ख्रिश्चन धर्मानं हिंदू धर्मावर निर्घृण हल्ला सुरू केलेला होता व त्यामुळे त्यांना अपरिमित दुःख होत होतं. त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय ऐक्याला तडा गेला होता, त्यानं जेव्हा भारतीय कुटुंबात प्रवेश केला तेव्हा संशयवादाला आणि धार्मिक फुटीला जन्म दिला, त्यानं भारतीयांच्या धार्मिक श्रद्धांना कमी लेखलं आणि त्या श्रद्धांना कोणताच योग्य पर्यायही पुरवला नाही. अंतर्गत आणि बाह्य अशा दुहेरी आव्हानाला 'आर्य समाज' हे उत्तर होतं. भारताच्या स्वसंरक्षणाच्या प्रेरणेचं तो बंडखोरपणे प्रतिनिधित्व करत होता.

संन्यास घेण्यापूर्वी स्वामी दयानंदांचं नाव मूलशंकर होतं. त्यांचा जन्म ब्राह्मण कुटुंबात काठेवाडमधील मोरवी संस्थानात १८२४ साली झाला होता. त्यांच्या बालपणापासूनच ते शिवाचे निस्सीम भक्त होते. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांना धार्मिक समस्येनं भेडसावलं. वडिलांच्या आज्ञेमुळे शिवरात्रीला त्यांनी उपास करून शिवाच्या देवळावर पहारा ठेवला. तिथं इतर भक्तांना झोप लागली असताना हा युवक मात्र वारंवार डोळ्यांवर पाणी मारून जागं राहून पहारा करायचा प्रयत्न करत होता. एक उंदीर शिवाच्या पिंडीवर चढलेला आहे असं त्यावेळी त्यांना जेव्हा दिसलं

तेव्हा त्यांना धक्काच बसला. जो देव उंदरालासुद्धा दूर ठेवू शकत नाही तो नक्कीच देव नसावा. त्यांची शंका दूर करायचा वडिलांनी केलेला प्रयत्नही व्यर्थ गेला. घरी जाऊन त्यांनी उपास मोडला आणि ते झोपायला गेले. काही काळानंतर त्यांच्या बहिणीच्या आणि काकांच्या मृत्यूमुळे त्यांच्या अंतःकरणात मुक्तीची वा जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यांच्या वडिलांनी त्यांचं लग्न जुळवून ठेवलं होतं. ते टाळण्यासाठी ते घरातून पळाले, त्यांनी ब्रह्मचर्याची शपथ घेतली, योगाचा अभ्यास केला आणि खऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी अनेक वर्ष देशभर प्रवास केला. मथुरेत त्यांची भेट शीघ्रकोपी व्रजानंदांशी झाली. त्यांनी त्यांना वेद शिकवले आणि सत्याचा प्रसार करायची, पौराणिक हिंदू धर्माचा खोटेपणा सिद्ध करण्यासाठी अथक आणि कोणत्याही प्रकारची तडजोड न करता लढा पुकारायची, आणि खऱ्या वैदिक तत्त्वज्ञानाच्या स्थापनेची शपथ दिली. त्यानंतर १२ वर्ष संपूर्ण देशात ते हिंडले आणि विविध धार्मिक विषयांवरील वादविवादात तत्कालीन अनेक प्रख्यात पंडितांना आव्हान दिलं.

१८७२ साली त्यांनी कोलकाताला भेट दिली. तिथं त्यांची भेट ब्राह्मो समाजाचे नेते महर्षी देवेन्द्रनाथ टागोर आणि केशवचंद्र सेन यांच्याशी झाली. दयानंदांच्या पांडित्यामुळे आणि प्रतिमापूजनाविषयीच्या त्यांच्या क्रांतिकारक दृष्टिकोनामुळे ते फार प्रभावित झाले. परंतु वेदांच्या अचूकपणाबद्दलचा आणि आत्म्याच्या देहान्तरप्राप्तीबद्दलचा सिद्धान्त त्यांना मान्य होऊ शकला नाही. लवकरच ते वेगळे झाले. परंतु काहीही असलं तरी त्या भेटीचा स्वामी दयानंदांवर चिर परिणाम झाला. आतापर्यंत माध्यम म्हणून ते केवळ संस्कृतचाच उपयोग करत असत. केशवचंद्र सेन यांच्या सल्ल्यानुसार आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी जनभाषा हिंदीचा अवलंब सुरू केला. दोन वर्षांनंतर त्यांनी आपला महान ग्रंथ *सत्यार्थप्रकाश* प्रकाशित केला. आर्य समाजाच्या लोकांसाठी हा ग्रंथ कायदेविषयक ग्रंथासारखा आहे. असं सांगतात की त्याच्यात वेदांवर आधारित गर्भधारणेपासून तर मृत्यूपर्यंतचे आयुष्याच्या सर्व अवस्थांत लागू पडणारे आचरणासंबंधी नियम सांगितलेले आहेत. त्याच्या पुढील वर्षी त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली.

१८७८ साली त्यांच्यात आणि थिऑसॉफिकल सोसोयटीचे नेते मॅडम ब्लावात्स्की आणि कॉलनल ऑलकॉट यांच्यात काही पत्रव्यवहार झाला. थिऑसॉफिकल सोसायटी आणि आर्य समाज या दोन्ही संस्थांनी एक व्हावं आणि स्वामीजी जे 'पवित्र कार्य' करत आहेत त्याला बळकटी आणावी असं त्या पत्रव्यवहारातून मॅडम ब्लावात्स्की आणि कॉलनल ऑलकॉट यांनी दयानंदांना सुचवलं. आधी त्यांनी मान्यता दिली परंतु नंतर थिऑसॉफिकल सोसोयटीच्या दीक्षितांसाठी असलेल्या भागासंबंधी आणि गूढ भागासंबंधी त्याच्यात वाद निर्माण झाला. दोन वर्षांच्या प्रयोगानंतर ख्रिश्चन धर्माच्या वेदांवरील वाढत्या आक्रमणाच्या विरोधात अखेरीस ती 'राजकीय सोयरीक' तुटली. १८८३ साली वयाच्या ५९व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. असं सांगतात की ज्या महाराजांच्या चारित्र्याविषयी त्यांनी टीका केली होती त्यांच्या रखेलीनं दिलेल्या विषाच्या विषबाधेमुळे त्यांचा मृत्यू झाला होता.

वादविवादातील त्यांची भाषा नेहमीच संयत असायची असं काही नाही. विरोधकाला त्याच्याच भाषेत उत्तर देण्यावर त्यांचा विश्वास होता. संस्कृतेतर भाषांच्या अज्ञानामुळे अनेकदा त्यांची टीका संपूर्ण माहितीवर आधारित नसायची. अनेकदा तिच्यातून त्यांच्या संकुचितपणाचं आणि दृष्टिकोनातील ताठरतेचंच दर्शन व्हायचं. रोमॉ रोलॉ यांच्या शब्दात 'चुकीच्या मार्गानं नेलं जात असलेल्या आणि चुकीचं मार्गदर्शन होत असलेल्या स्वतःच्याच चर्चच्या विरोधात संघर्ष करणारे ते ल्युथर होते. जो भारत एकेकाळी जगात नावलौकिकास चढलेला होता त्या भारताच्या हजारो वर्षांपासूनच्या अधःपतनास कारणीभूत झालेल्या वर्तमानकालीन वा भूतकालीन देशबांधवांविषयी त्यांना कोणतीच सहानुभूती वाटत नव्हती. खऱ्या वैदिक धर्माला खोटं ठरवणारांचे वा त्याच्या पावित्र्याला धक्का लावणारांचे ते कठोर टीकाकार होते.' [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, पृष्ठ १२५] कुराण वा पुराणामुळे त्यांच्यासाठी कोणतंच अंतर निर्माण होत नव्हतं. त्यांना जी गोष्ट चूक वाटायची तिला ते सोडत नसत, मग अशा प्रकारे चुकीचा वाटणारा धर्म पौराणिक हिंदू धर्म, जैन धर्म, ज्यूंचा धर्म, इस्लाम वा अन्य कोणताही धर्म असो ते कुणाचीची गय करत नसत. पुन्हा रोमॉ रोलॉंना उद्धुत करायचं तर 'भारतावरील सर्व आक्रमकांविरुद्धं त्यांनी

केलेला तो प्रतिकार होता.' ख्रिश्चन धर्मप्रसारकांच्या 'धार्मिक साम्राज्यवादाला' त्यांनी आव्हान दिलं आणि 'ख्रिश्चन धर्माविरुद्*युद्ध घोषित केलं. आपल्या प्रचंड तलवारीनं त्यांनी त्यांना क्षतविक्षत केलं. तसं करताना त्यांनी कोणत्याही सीमांचा विचार केला नाही आणि नेमका कुठे वार करायचा याचाही विचार केला नाही.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १२३] त्यांचं आंदोलन धर्मांतराचं आंदोलन होतं व अशा प्रकारच्या आंदोलनात असतात तशी त्यातही जशी सामर्थ्यस्थळे होती तशाच उणिवाही होत्या.

हिंदू समाजासाठी त्यांनी केलेलं युगप्रवर्तक कार्य म्हणजे प्राचीन धर्मग्रंथांचा देशी भाषांमधे केलेला अनुवाद. लोकभाषांतच त्यावर भाष्य करून त्यांनी प्राचीन हिंदू धर्मातील आध्यात्मिक ज्ञानाच्या ज्या विहिरी पूर्वी कर्मठ ब्राह्मणांनी तथाकथित अस्पृश्यांसाठी बंद केल्या होत्या त्या त्यांनी त्यांच्यासाठी खुल्या केल्या. एवढंच नाही तर त्यांचं म्हणणं होतं की वेदांचा अभ्यास करणं आणि त्यांचा प्रसार करणं प्रत्येक आर्याचं कर्तव्य आहे.

त्यांच्या व्याख्येप्रमाणे आर्य हे नाव काही एखाद्या जातीचं वा पंथाचं नव्हतं. राष्ट्रीयत्वाचा वा लोकांच्या रंगादींचा विचार न करता उच्चतर ध्येयानं प्रेरित झालेले लोक म्हणजे आर्य असं त्यांचं म्हणणं होतं. त्यांनी सर्वांसाठी समान न्याय गृहीत धरला होता. स्त्री-पुरुष समानतेसाठी त्यांनी संघर्ष केला होता. शुद्ध वांशिक पद्धतीवर आधारित जातिप्रथेचा निषेध केला होता आणि केवळ नैसर्गिक आणि आनुवंशिक गुणांवर आधारित सामाजिक व्यवसायांना अथवा व्यापारांनाच त्यांची मान्यता होती. या विभागणीत धर्माला कोणतंच स्थान राहणार नव्हतं तर केवळ समाजसेवेच्या (वा देश) दृष्टीनंच प्रत्येकाच्या व्यावसायिक कार्यक्षमतेचं मूल्यन करण्यात येणार होतं. कोणी कोणत्याही वर्गाचा असला तरी त्याला हवं तेवढं ज्ञान मिळवायचा व आपल्या पात्रतेनुसार आणि क्षमतेनुसार स्वतःचा विकास करून घ्यायचा माणसाला अधिकार राहणार होता. स्त्रियांना ज्या विपरीत परिस्थितीला तोंड द्यावं लागत होतं त्याविरुद्ध आणि समाजातील त्यांना मिळालेल्या कमी प्रतीच्या स्थानाविरुद्ध क्वचितच कोणी संघर्ष करील असा संघर्ष त्यांनी केला होता. भारताच्या सुवर्ण युगात स्त्रियांचं कुटुंबात आणि समाजात 'कमीतकमी पुरुषाच्या

बरोबरीचं' जे स्थान होतं त्याची त्यांनी त्यांना आठवण करून दिली. त्यामुळे त्यांना समान शिक्षणाचा, अधिकार असावा असं त्यांचं म्हणणं होतं. तसंच 'विवाह, आर्थिक व्यवहार वगैरे सर्व कौटुंबिक प्रश्नांच्या बाबतीत स्त्रियांचा निर्णय अंतिम असावा' अशी त्यांची मान्यता होती. [वरीलप्रमाणे, पृष्ठ १२३] स्त्री-पुरुषांना विवाहात समान अधिकार असावेत या मताचा त्यांनी धैर्यानं पुरस्कार केला. त्यांना जरी विवाह हे पवित्र बंधन वाटत होतं व त्याचा कधीही भंग करता येत नाही असं त्यांचं मत होतं तरीही त्यांनी पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी आणि तिच्या पाळामुळांचं संपूर्ण उच्चाटन करून तथाकथित अस्पृश्यांना हिंदू समाजात सामावून घेण्यासाठी त्यांनी जेवढा संघर्ष केला तेवढा त्यांच्यापूर्वी कोणीही केला नव्हता.

आर्य समाजाचा विश्वास आहे की वेद अस्खलनीय आहेत आणि त्यात प्रत्यक्ष ईश्वरी संदेश शब्दांकित करण्यात आलेला आहे. त्यातील आध्यात्मिक ज्ञानच नव्हे तर वैज्ञानिक ज्ञानही अचूक असल्याचा आर्य समाजाच्या विश्वासाबद्दल बराच वाद निर्माण झाला होता.

वेदांच्या अस्खलनीयतेबरोबरच आर्य समाज कर्मसिद्धान्त, पुनर्जन्म, यज्ञातील कर्मकांड, आश्रम धर्माचं म्हणजे वेदांमधे सांगितलेल्या मानवी जीवनातील चार नैसर्गिक अवस्थांचं पुनरुज्जीवन यांचा पुरस्कार करतो तर मूर्तिपूजा, पशुबळी, पूर्वजपूजा, तीर्थयात्रा, पुजाऱ्याची फसवणूक, देवळात प्रसाद अर्पण करणं आणि बालविवाह यांना वेदांची मान्यता नाही असं आर्य समाजाचं म्हणणं आहे व त्यामुळे या रूढींचा आर्य समाजानं स्पष्ट शब्दात धिक्कार केला आहे.

हिंदू धर्मातील काही अतिशय प्रचलित असलेल्या कुप्रथा दूर करायचा प्रयत्न करून आणि संस्कृतच्या अभ्यासाला चालना देऊन आर्य समाजानं फार मोलाची कामगिरी विशेषतः उत्तर भारतात बजावलेली आहे. अनाथालयं, विधवाश्रम, मुलांमुलींसाठी कार्यशाळा आदी उघडून ती चालवण्याचा आर्य समाजानं केलेल्या परोपकारी कार्यात समावेश होता. त्याचबरोबर सामाजिक संकटाच्या वेळी स्वयंसेवकाच्या संघटना उभारून आर्य समाजानं एक नवा पायंडा घातला. रामकृष्ण मिशनच्याआधी आर्य समाजानं हे पाऊल उचललं. लाला मुन्शिराम (नंतर

स्वामी श्रद्धानंद) यांनी हरिद्वारला गुरुकुल विद्यापीठ उघडून प्राचीन काळात वनात आश्रम स्थापून शिक्षण द्यायची जी पद्धत होती तिचं पुनरुज्जीवन करायचा धाडसी प्रयत्न केला. नंतर स्थापन करण्यात आलेल्या अनेक आश्रमांसाठी आणि राष्ट्रीय शिक्षण संस्थांसाठी तो आदर्श नमुना ठरला. या आश्रमांनी आणि शिक्षणसंस्थांनीच नंतर राष्ट्रीय जीवनातील पुनरुत्थानात महत्त्वाची भूमिका बजावली होती. आर्य समाजानं अधिकृतपणे जरी राजकारणापासून स्वतःला दूर ठेवलं होतं तरी रोमॉ रोलॉ म्हणतात त्याप्रमाणे आपल्या संस्थापकातील प्रचंड जोम आत्मविश्वास आणि सिंहासारखं शौर्य या गुणांची देणगी आर्य समाजानं भारताच्या निस्तेज शरीराला दिली आणि भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचा मार्ग मोकळा केला. स्वामी दयानंदांना अपेक्षित असो वा नसो 'त्यांनी १९०५मधे बंगालमधील आंदोलनाचा मार्श तयार केला.' पंजाबचे सिंह म्हणून प्रसिद्ध असलेले लाला लजपत राय आणि स्वामी श्रद्धानंद या आर्य समाजाच्या दोन नेत्यांची भारताच्या अहिंसक संघर्षात महत्त्वाची भूमिका होती.

५

पूर्वेनं पश्चिमेकडे प्रेरणेसाठी वळायचं ब्राह्मो समाज जर चिन्ह असेल आणि आर्य समाज पूर्वेनं पश्चिमेविरुद्ध उभारलेलं बंड असेल तर मॅडम ब्लावात्स्की आणि कॉलनल अल्कॉट यांनी स्थापन केलेली आंतरराष्ट्रीय संस्था थिऑसॉफिकल सोसायटी ही पश्चिमेनं पूर्वेकडे ज्ञान आणि विद्वत्ता यासाठी वळायचं प्रतीक होती.

हेलेना पेट्रोव्हना ब्लावात्स्की ही रशियन स्त्री अतींद्रीय शक्तीसाठी प्रसिद्ध होती. मॅडम ब्लावात्स्की या नावानं त्या लोकप्रिय होत्या. असा दावा करण्यात येत होता की तिबेटमधे कुठे तरी अदृश्य स्वरूपात वा अज्ञात स्थळी राहणाऱ्या महान प्रज्ञावंतांच्या आदेशानुसार प्राचीन ज्ञानाबद्दल आस्था निर्माण करण्यासाठी त्या अमेरिकेत गेल्या होत्या. तिथं त्यांची भेट कॉलनल अल्कॉट यांच्याशी झाली. त्यांचाही आध्यात्मिकतेत आणि अतींद्रीय ज्ञानात रस होता. त्यांच्या सूचनेनुसार १८७५ साली अमेरिकेत थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना करण्यात आली.

सोसायटीचे पहिले अध्यक्ष कॉलनल अल्कॉट होते तर मॅडम ब्लावात्स्की या सचिव होत्या. अत्यंत उच्च प्रतीच्या नैतिकतेची शिकवण देणं आणि धार्मिक आकांक्षा निर्माण करणं आणि संस्थेच्या सदस्यांकडून त्यांची अपेक्षा करणं, विज्ञानानं निर्माण केलेल्या जडवादाला विरोध करणं, मिशनरी लोक तथाकथित नास्तिक आणि पाखंडी लोकांची जी फसवणूक करतात तिचा प्रतिकार करणं, वेद, झोरास्टर, आणि कन्फ्यूशिअस यांनी प्रतिपादिलेल्या प्राचीन शुद्ध गूढ ज्ञानाचा प्रसार करणं, आणि अखेरची महत्त्वाची गोष्ट म्हणजे विश्वात्मक, अनंत आणि अमर कारणासाठी सर्व वंशातील चांगल्या आणि शुद्ध माणसांचा परस्परांशी परिचय होऊन विश्वबंधुत्वाच्या भावनेचा प्रसार करणं [*द गोल्डन बुक ऑफ थिऑसॉफिकल सोसायटी*, पृष्ठ २३] हे संस्थेचे हेतू निर्देशित करण्यात आले होते.

मॅडम ब्लावात्स्की यांनी लिहिलेल्या द सिक्रेट डॉक्ट्रिन या ग्रंथावर समीक्षालेख लिहिण्यासाठी रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूचे संपादक डब्ल्यू. टी. स्टीड यांनी ॲनी बेझंट यांना सांगितलं. त्यामुळे ॲनी बेझंट थिऑसऑफिकल आंदोलनात आल्या. रेव्ह. फ्रॅन्क बेझंट यांच्यापासून त्या १८७३ साली विभक्त झालेल्या होत्या. चार्ल्स ब्रॅडलॉ यांच्याबरोबर मुक्त विचाराचा त्या वादळी प्रचार करत असत. तसंच वेब्ज, बर्नार्ड शॉ यांच्याबरोबर १८८०च्या दरम्यान त्या समाजवादी आंदोलक आणि फेबिअन सोसायटीच्या सदस्य होत्या. १९०७ साली कॉलनलं अल्कॉट यांचा मृत्यू झाल्यानंतर त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष झाल्या. आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली मुख्यत्वेकरून थिऑसॉफिकल सोसायटीच्या आंदोलनानं भारतात मुळं धरली.

थिऑसॉफी या शब्दाचा शब्दशः अर्थ संस्कृतमधे ब्रह्मविद्या वा अमूर्ताचं ज्ञान असा आहे. थिऑसॉफिकल सोसायटीच्या मुख्य शिकवणुकीत 'वेदांतातील अमृर्ताच्या संकल्पनेशी जुळणाऱ्या सर्व प्रमुख देवांतील एकात्मता; आत्म्याचं अमरत्व आणि विश्वबंधुत्व यांचा' अंतर्भाव आहे. [*एन्शन्ट विजडम*, पृष्ठ ३७ वरून डी. एस. शर्मा यांनी स्टडीज इन द रनेसन्स ऑफ हिंदूइझममधे दिलेले उद्धरण, पृष्ठ २२५] तिची मान्यता आहे की मानवजात एक आणि अविभाज्य आहे. त्यामुळे,

*जगाला संप्रदायांची गरज नाही, मग ते बौद्ध, ख्रिश्चन, मुसलमान, स्विडनबर्ग, काल्विन अथवा इतर कोणीही असो. विश्वात केवळ एकच सत्य असल्यामुळे माणसाला एकाच चर्चची गरज आहे - आपल्या आतील ईश्वराच्या चर्चची. त्याला जडाच्या भिंतीत बंदिस्त करण्यात आलं आहे, परंतु जो कोणी मार्ग शोधु इच्छितो त्याला मार्ग सापडू शकतो. अंतःकरणानं जो बुद्ध आहे तो देवाला पाहू शकतो.* [एच. पी. ब्लावात्स्की, *इसीस अनव्हेल्ड,* (१८७७), खंड २ रा, पृष्ठ ६३५]

त्याचप्रमाणे सोसायटीची मान्यता आहे की धर्म म्हणजे काही विशिष्ट प्रकारची शिकवण नाही. खरा धर्म केवळ सर्व मानवांनाच नाही तर विश्वातील सर्व प्राणीमात्रांना एका भव्य समग्रात बांधत असतो. [एच. पी. ब्लावात्स्की, *इज थिऑसॉफी अ रिलिजन?*, (१८८८)] माणसाच्या विश्वबंधुत्वाशिवाय थिऑसॉफिकल सोसायटी कर्मसिद्धांत, अवतार आणि पुनर्जन्माच्या तत्त्वांनाही मान्यता देते आणि त्याचबरोबर तिची अशीही मान्यता आहे की आत्मा हा निराकार निर्गुणातून निघालेला असल्यामुळे त्याच्यातही देवत्व आहे.

थिऑसॉफिकल सोसायटी भारताच्या प्राचीन श्रद्धेचा, संस्कृतीचा पुरस्कार अशा वेळी करत होती की जेव्हा एका प्रसिद्ध ख्रिश्चन लेखकाच्या शब्दात सांगायचं तर 'ख्रिश्चन मिशनरी, बहुतेक इंग्रज आणि काही भारतीयसुद्धा कोणत्याही न्याय्य कारणाशिवाय त्यावर निर्दयपणे टीकेची झोड उठवून त्यांचा धिक्कार करायचे.' भारतीय बुद्धिवाद्यात जबर न्यूनगंड निर्माण झालेला होता. ते स्वतःचं साहित्य विसरले होते, आपल्या भूतकाळाबद्दल त्यांच्या मनात तिरस्काराची भावना होती आणि भविष्याबद्दलची सर्व आशा त्यांनी गमावलेली होती. त्यांचं वागणंबोलणं इंग्लिश पद्धतीचं होतं, त्यांनी आपली घरं इंग्लिश फर्निचरनं सजवली होती व त्यांच्यातील राष्ट्रभावना पूर्णपणे लोप पावली होती. थिऑसॉफिकल सोसायटीनं त्यांना त्यांचा स्वाभिमान परत दिला, त्यांना स्वतःबद्दलचा आत्मविश्वास दिला. परंपरा आणि भूतकाळासंबंधीचा अभिमान जागवून जगातील आपलं स्थान परत मिळवायची प्रेरणा त्यांना दिली. उपनिषद आणि गीतेसारख्या अनेक उत्कृष्ट पौर्वात्य ग्रंथांना युरोप आणि अमेरिकेत लोकप्रिय करायचा प्रयत्न सोसायटीनं केला आणि पाश्चात्त्य राष्ट्रांना पौर्वात्य बांधवांविषयी

सहानुभूती ठेवायला सांगून ते तुमच्या आदराला पात्र असल्याचं त्यांना सांगितलं. त्यामुळे सर व्हॅलेन्टाईन चिरोल यांना सोसोयटीच्या कामात 'भारतीय असंतोषाची बीजं दिसली यात काही आश्चर्य नाही. डॉ. ॲनी बेझंट यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी लिहिलं :

उच्चशिक्षित, जबरदस्त बुद्धिमत्ता, वक्तृत्वसंपन्नतेची अजोड देणगी असलेली एक युरोपिअन व्यक्ती येते आणि त्यांना जेव्हा सांगते की तुमच्या जवळ सर्वोच्च ज्ञानाची किल्ली आहे, तुमचे देव, तुमचं तत्त्वज्ञान, तुमची नैतिकता इतक्या उंच पातळीवरील आहे की अजून पश्चिम तिथं पोहोचूही शकलेली नाही. असं झाल्यानंतर आपल्या संस्कृतीकडे हिंदूंनी पाठ वळवली तर काय आश्चर्य?

आधीची दोन आंदोलनं आणि नंतरचं रामकृष्णांचं आंदोलन यांच्याप्रमाणे थिऑसॉफिकल सोसायटीनं राजकारणाकडे पाठ वळवली नाही. उलट भारतीय स्वातंत्र्य संघर्षाशी थिऑसॉफिकल सोसायटी एकरूप झाली व त्या आंदोलनाला पश्चिमेतून अनेकांची सहानुभूती आणि पाठिंबा मिळवून दिला. गांधीजी आणि थिऑसॉफिकल सोसायटी यांच्यात धार्मिक आणि तात्त्विक विचारांच्याबाबतीत जे साम्य होतं त्यामुळे गांधीजींना विद्यार्थीदशेत इंग्लंडमधे अनेक इंग्रज मित्र आणि दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह संघर्षात अत्यंत विश्वासू असे अनेक सहकारी मिळाले.

# प्रकरण ४ थे

# पथशोधक

## १

वर सांगितलेल्या सर्व आंदोलनाचे निर्माते सुशिक्षित आणि विद्वान लोक होते. ज्या उच्च मध्यम वर्गीय वातावरणात त्यांचा जन्म झाला होता व पालनपोषण झालेलं होतं त्या वातावरणातील सुसंस्कृततेचा ठसा त्यांच्यावर उमटलेला होता. त्यानंतर झालेल्या आंदोलनाचं नाणं मात्र वेगळ्याच टाकसाळीत घडलेलं होतं व या आंदोलनाच्या संस्थापकाच्या नावावरच त्या आंदोलनाचं नामकरण झालेलं होतं. केशवचंद्र सेन आणि स्वामी दयानंद यांचे समकालीन असलेले श्री रामकृष्ण परमहंस, ज्या नावानं नंतर त्यांना ओळखण्यात आलं, हे साधे, फारसे शिक्षण न झालेले, गरीब घरातील होते. ते जनसामान्याचे व जनसामान्यातील होते. विद्वत्तेची बढाई मारू शकत नसले तरीही रामकृष्ण परमहंस हे युगायुगांपासून भारतात ज्या अलौकिक आध्यात्मिक व्यक्तींनी जन्म घेतला त्याच परंपरेतील होते. त्यांच्याकडे सर्व प्रकारचे, सर्व स्तरातील लोक यायचे आणि त्यांच्या आत्मिक गरजेची परिपूर्ती त्यांच्याकडून व्हायची. भारतीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ब्रजंद्रनाथ सील, विद्वानांचे महामेरू केशवचंद्र सेन व प्रतापचंद्र मुजुमदार यासारख्यांनाही त्यांच्या बुद्धीचं समाधान करणारं खाद्य त्याच्या प्रवचनातून मिळायचं. महान कादंबरीकार बंकीमचंद्र चटर्जी आणि गिरीशचंद्र घोष यांच्यासारखे प्रतिभासंपन्न लेखक आणि प्रसिद्ध व्यक्तीदेखील त्यांचा सल्ला घ्यायचे. तसंच परोपकारी, संन्यस्त वृत्तीचे परंतु अज्ञेयवादी ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्यासारख्यांनाही अंतःकरणापासून त्यांच्याबद्दल आदर वाटायचा. सामान्य माणसंही आपल्या दुखऱ्या मनाला शांत करणाऱ्या त्यांच्या आरोग्यदायी दृष्टिक्षेपाचा लाभ घ्यायला त्यांच्याकडे यायचे. ते कोणालाच परत पाठवत नसत आणि प्रत्येकाला त्यांच्याकडून सारख्याच सहानुभुतीचा, मार्गदर्शनाचा आणि आश्चर्यजनक आत्मशक्तीचा लाभ

व्हायचा. याबद्दल असं सांगतात की ते जेव्हा एकही शब्द बोलत नसत तेव्हाही ती आत्मशक्ती समोरच्या माणसाच्या हृदयाला एखाद्या वाघाप्रमाणे खिळवून ठेवायची. त्यांच्या प्रभावातून अनेक दिवस तो माणूस मुक्त होऊ शकत नसे.

माणसाच्या मनबुद्धीवर त्यांचा अनाकलनीय आणि आश्चर्यजनक प्रभाव असायचा. अशाच रीतीने प्रभावित झालेले ब्राह्मो समाजाचे प्रमुख आणि केशवचंद्र सेन यांचे एक अनुयायी पी. सी. मुजुमदार विचारतात की 'मी एक युरोपीयीकरण झालेला सुसंस्कृत, आत्मकेंद्रित, अर्धवट संशयवादी, तथाकथित सुशिक्षित विवेकी आहे. आणि ते गरीब, अशिक्षित, असंस्कृत, अर्धवट मूर्तिपूजक, मित्र वगैरे कोणी नसलेले भक्त आहेत. त्याच्यात आणि माझ्यात अशी कोणती सामान्य गोष्ट आहे? माझ्यासारख्याने डिझराईली आणि फॉसेट, स्टॅनले आणि मॅक्समुल्लर यांच्यांसारख्यांची व्याख्याने ऐकलेली असताना त्याच्याजवळ तासंतास मी का बसावं?.... आणि असा मी काही एकटाच नाही. माझ्यासारखे डझनांनी लोक असं करतात.' आणि माझा धर्म हाच माझा मुख्य उपदेश आहे असं उत्तर ते देतात व इथेच खरी अडचण आहे. त्यांचा धर्म हेच मुळी एक कोडं आहे. 'ते शिवाची भक्ती करतात, कालीची भक्ती करतात, रामाची भक्ती करतात, कृष्णाची भक्ती करतात आणि वेदांताच्या तत्त्वज्ञानावर कट्टरपणे विश्वास ठेवतात... ते मूर्तिपूजक आहेत आणि तरीही ते निराकार, अनंत परमेश्वरावरची अनन्य भक्ती आणि उपासना करत असतात.' या कोड्याचं त्यांना सापडलेले उत्तर असं आहे : 'त्यांचा धर्म म्हणजे ब्रह्मानंद, त्यांची भक्ती म्हणजे पारलौकिक अंतर्दृष्टी, त्यांचं संपूर्ण अंतर्विश्व रात्रंदिवस अलौकिक श्रद्धेच्या आणि भावनेच्या अग्नीत होरपळत असते. [अर्ल ऑफ रोनाल्डशे, *द हार्ट ऑफ आर्यावर्त*, पृष्ठ २०६-२०७]

श्री रामकृष्णांनी कोणतंही पुस्तक लिहिलेलं नाही, कोणतंही नवीन सत्य मांडलं नाही आणि आपल्या शिकवणुकीत काही नवीन आहे असाही दावा केला नाही. परंतु त्यांनी जे काही शिकवलं त्याला साक्षात्काराचा स्पर्श होता. ते जे काही बोलायचे ते अधिकारी पुरुषाप्रमाणे बोलायचे. त्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या जुन्याच सत्याला नव्या अर्थाची झळाळी यायची.

त्यांच्याकडे येणाऱ्या सुशिक्षित आणि विद्वान लोकांना बौद्धिक क्षेत्रातही ते किती तरी अधिक अधिकारी पुरुष असल्याची जाणीव व्हायची. अतिशय गहन तत्त्वज्ञानही लहान मुलाला समजेल अशा पद्धतीनं सांगायचं कौशल्यं त्यांच्यात होतं. युगानुयुगे चालत आलेले ब्रह्मज्ञानासंबंधीचे वादही एखाद्या बोधकथेतून वा प्रतिमेतून ते अशा रीतीने उलगडायचे की तो त्या विषयावरील अखेरचा शब्दच आहे असं वाटावं.

त्यांचं अंतर्ज्ञान दिव्य दृष्टी असलेल्या व अनंताचा स्पर्श झालेल्या पुरुषाप्रमाणे होतं. त्यांना अंतर्ज्ञानाची देणगी लाभलेली असल्याने, जी जवळपास सहाव्या इंद्रियाप्रमाणे होती, त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांच्या मनातील भावभावना एखाद्या काचेच्या कपाटातील वस्तूप्रमाणे त्यांना इतक्या स्पष्टपणे दिसू शकत असत की संबंधित लोकांनाही त्यांची स्पष्ट कल्पना नसायची. एका दृष्टिक्षेपातच त्यांच्याकडे येणाराच्या अंतःकरणात दडलेल्या शक्तीची, गुणदोषांची त्यांना कल्पना येत असे. त्यांच्याकडे येणाऱ्या कुणाचाही ते न्यायनिवाडा करत नसत तर येणाराशी ते तादात्म्य पावत असत. त्याच्या दडलेल्या इच्छा, सुखदुःखं ही आपलीच आहेत असं त्यांना वाटायचं आणि व्यापक सहनशील सहानुभूतीनं ते प्रत्येकाच्या समस्येचा विचार करायचे. जमावाच्या घोळक्यातूनही आपल्यापासून लपू पाहणाऱ्या दुःखी माणसाला ते शोधून काढायचे, त्याच्या संशयावर, काळजीवर, वा गुप्त दुखण्यावर नेमकं बोट ठेवायचे आणि केवळ एखाद्या शब्दानं, स्मितानं, वा हस्तस्पर्शानं त्याला 'अनामिक शांततेचा आणि ज्यासाठी माणसं तळमळतात अशा सुखाचा ते प्रत्यय आणून द्यायचे.' [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, पृष्ठ २४३]

सुशिक्षित वर्गाला जडलेल्या आजाराचं निदान त्यांना झालं. एकीकडे अश्रद्धा आणि भौतिकवाद त्याच्या जीवनशक्तीला कुरतडत होता तर दुसरीकडे कोणत्याही प्रकारच्या धार्मिक अनुभवाशिवाय धार्मिक विषयावरील व्यर्थ चर्चेमुळे त्याचा ऱ्हास होत होता. गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे 'ईश्वरी अवताराप्रमाणे ते त्या लोकांसमोर आले.' रामकृष्णांनी त्यांच्यासमोर शुष्क बौद्धिक विचार वा परंपरागत उपाय मांडले नाहीत तर जीवनाच्या ग्रंथातील पानं.... वा स्वतःचे अनुभव मांडले.' गांधीजींना पुन्हा उद्धृत करायचं तर 'संशयवादाच्या या काळात

रामकृष्णांनी उज्ज्वल आणि जिवंत श्रद्धा मांडली. केवळ त्याच श्रद्धेतून हजारो स्त्री-पुरुषांना दिलासा मिळू शकला. त्याशिवाय त्यांना आध्यात्मिक प्रकाशाचा लाभ होऊ शकला नसता.' [अद्वैत आश्रम, अल्मोराने प्रकाशित केलेल्या *लाईफ ऑफ श्री रामक्रिष्ण* या ग्रंथाला महात्मा गांधींनी लिहिलेल्या पुरस्कारातून]

## २

हमरस्त्यावरून दूर असलेल्या हुगळी जिल्ह्यातील कामारपुकूर या गावी अठराशे छत्तीस साली एका ब्राह्मण पुजाऱ्याच्या घरात जन्मलेले श्री रामकृष्ण परमहंस, ज्यांचं त्यांच्या वडिलांनी गदाधर म्हणून नाव ठेवलं होतं, बालपणापासूनच अतिशय प्रतिभासंपन्न होते. त्यांच्यात अतिशय उच्च दर्जाची कलात्मक संवेदनशीलता होती. ते केवळ सात वर्षांचे असतानाच त्यांना समाधी लागली होती व अशा प्रकारे संपूर्ण आयुष्यभर त्यांना समाधी लागत असल्याचं आढळतं. आपल्या भावाला कोलकाता येथे कौटुंबिक पौरोहित्याचं काम करण्यात काही काळ त्यांनी मदत केली. तीन वर्षांनंतर १८५५साली एका श्रीमंत बाईनं दक्षिणेश्वर येथे मंदिर बांधल्यानंतर ते दोन्ही भाऊ त्या देवळातील पुरोहित झाले. त्यानंतरच्या वर्षी त्यांच्या मोठ्या भावाचा मृत्यू झाल्यानंतर रामकृष्णांनी त्यांची जागा घेतली. त्यावेळी ते २० वर्षांचे होते.

हिंदू धर्मात तंत्र वा शक्ति पंथ आहे. या पंथाच्या मते या जगाचा दुःखद वा अपूर्ण म्हणून त्याग करू नये तर ईश्वरी शक्तीचा अविरत आविष्कार म्हणून त्याला आलिंगन द्यायला हवं. या पंथाचा मूलभूत विचार असा आहे की पुरुषानं प्रकृतीला झिडकारून नव्हे तर प्रकृतीद्वारे आपला विकास घडवून आणायला पाहिजे. 'माणूस जसा जमिनीवर पडतो तसंच त्यानं जमिनीच्या आधारे उठायलाही पाहिजे.' [जे. वुडरफ यांनी आपल्या *शक्ती अँड शाक्त* या ग्रंथात (३री आवृत्ती, मद्रास आणि लंडन,) कुलार्णव तंत्रातील दिलेले उद्धरण, पृष्ठ ५९३] पाशवी वासनांना योग्य तंत्राद्वारे माणसाच्या उद्धारासाठी त्यांना कामाला लावता येणं शक्य असताना त्यांना व्यर्थ नष्ट करायचा प्रयत्न करण्यात काहीही अर्थ नाही. या पंथाचे लोक विश्वमाता शक्ती वा कालीदेवतेची म्हणजे प्रकृतीची पूजा करतात. या प्रकृतीत निसर्गातील काळ आणि शक्ती या तत्त्वांचा समावेश झालेला असतो. या उलट पुरुष

तत्त्व सनातन आणि निर्गुण असते. सखोल मानसशास्त्रीय दृष्टी आणि धाडसी आध्यात्मिक तंत्र यामुळे युंगसारख्या प्रसिद्ध पाश्चात्त्य मानसशास्त्रज्ञांचं लक्ष या पंथानं वेधून घेतलं आहे. ‘त्यांना असं वाटतं की या पंथाच्या तत्त्वज्ञानात आधुनिक मनोविश्लेषणशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास करण्यासारख्या ज्ञानाचा खजिना दडलेला आहे.

विश्वमातेची कल्पना काही केवळ हिंदू धर्मापर्यंतच मर्यादित नाही. ख्रिश्चन धर्मासह जगातील अनेक धर्मांच्या तत्त्वज्ञानांत तिचा समावेश झालेला आहे. रामकृष्णांचे आईवडील इतर शाक्तांप्रमाणेच कालीचे भक्त होते. हे जग या कालीची जणू रंगभूमीच आहे आणि या रंगभूमीवर ती विविध नावांनी आणि रूपांनी खेळत असते. रामकृष्ण ज्या देवळात पुजारी होते ते देऊळ याच काळ्या कालीमातेचं होतं. तिच्यात तिच्या भयानक आणि दयाळू या दोन्ही अंशाचा समावेश झालेला आहे.

रामकृष्णांची यानंतरची बारा वर्षे ईश्वरशोधाच्या चिकाटीपूर्ण अथक प्रयत्नात याच मंदिराच्या परिसरात गेली आणि त्यावेळी त्यांना तोच एकमेव निदिध्यास होता. ते एक विलक्षण जग होत. त्याच्या अवतीभवती रणरणतं मैदान होतं व मंदिर आणि पवित्र नदीवरील घाट हे त्याचे मध्यवर्ती केंद्र होते. त्या संपूर्ण देखाव्यातून सर्वोच्च्याचं दर्शन व्हायचं. विविधरंगी धार्मिक अनुभव ज्यात साठलेले आहेत अशा हिंदूधर्माचा तो गाभा होता. त्यांच्या विलक्षण करारीपणानं सर्वभक्षी आगीप्रमाणे त्यांच्या शरीराला गिळून टाकलं होतं. मातेचा सेवक म्हणून पूजाअर्चेत ते जसजसे रममाण होत होते तसतसा त्यांना प्रश्न पडायचा की आपण जिची पूजा करत आहोत ती खरोखरच चिन्मयी माता आहे की केवळ मृण्मयी व आपल्या मनाची कल्पना आहे? जर ती खरी असेल तर ती आपल्यासमोर प्रगट का होत नाही? मध्यरात्री तिची भक्ती करत असताना आईनं आपल्याला प्रत्यक्ष दर्शन दिलं नाही म्हणून ते आक्रंदन करायचे. अखेरीस ते अशा अवस्थेत आले की मनाची ही व्याकुळता सहन न झाल्यामुळे त्यांनी आपल्या जीवनाचा अंत करायचं ठरवलं. ते आपल्या वेडेपणाच्या या विचारानुसार आचरण करणार होते तोच अंधारी आणणाऱ्या एका

प्रकाशानं त्यांना ग्रासलं. ते देऊळ, विविध यात्रेकरूंनी भरलेला तो घाट, ती नदी हे सर्व जणू लोपले होते. असं वाटत होतं की आता काहीच अस्तित्वात नाही. उलट

*डोळे दिपवणाय चैतन्याचा अपार महासागर मला दिसत होता. ज्या कोणत्या दिशेनं मी वळत होतो त्या दिशेनं मोठमोठ्या तेजस्वी लाटा उठत असलेल्या दिसत होत्या. जोरजोरात गर्जना करत त्या एवढ्या उंच उफाळत होत्या की मला त्या गिळू पहत आहेत असं वाटलं. एका क्षणात त्यांनी मला ग्रासलं. त्या माझ्यावर येऊन कोसळत होत्या. त्यांची मला मिळून टाकलं. मी गुदमरून गेलो होतो. माझी चेतना हरवली आणि मी पडलो. तो आणि त्यानंतरचा दिवस मी कसा घालवला ते मला माहीत नाही. माझ्या सभोवती अनिर्वचनीय आनंदाचा सागर उफाळत होता. माझ्या अस्तित्वाच्या मुळाशी असलेल्या माझ्या दैवी मातेच्या अस्तित्वाचं मला भान होतं.*

त्यानंतर समाधीच्या अवस्थेतील ते दृश्य कायम करण्यासाठी त्यांनी सर्व शक्ती पणाला लावली. अंतर्ज्ञानाने प्राप्त होणारी दिव्य दृष्टी असलेल्या एका ब्राह्मण पुजारीणीच्या मार्गदर्शनाखाली ते त्या अवस्थेतून बाहेर आले. तिनं त्यांच्याशी मातापुत्राचे संबंध प्रस्थापित केले आणि त्यांनी स्वतःला सामान्य अवस्थेत आणायचा प्रयत्न सुरू केला. ती तंत्रज्ञानात वाकबगार होती. कुणालाच तिचं नाव माहीत नव्हतं. इतकंच नाही तर रामकृष्णांनाही तिचं नाव शोधायचं सुचलं नाही. त्यानंतर त्यांनी वर्णन केल्याप्रमाणे तिनं त्यांच्यावर अशा काही भयानक तंत्रांचा प्रयोग केला होता की त्यामुळे एखाद्याला वेड लागावं वा त्याचं नैतिक अधःपतन व्हावं. परंतु सखोल ध्यान आणि प्रार्थनेच्या प्रभावामुळे ते त्यातून निष्कलंक बाहेर पडले आणि त्यांना मातेनं दिलेली दिव्य दृष्टी त्यांच्या जागेपणी वा झोपलेल्या अवस्थेतही रात्रंदिवस त्यांच्याजवळ स्थिर झाली. प्रत्येक गोष्टीचा त्या जगन्मातेत समावेश झालेला होता. तिचा प्रत्येक गोष्टीत शिरकाव झालेला होता आणि तिनं प्रत्येक गोष्टीत परिवर्तन घडवून आणलं होतं.

रामकृष्ण धर्मासंबंधी न थकता सतत प्रयोग करणारे असल्यामुळे त्यांचं एकाच प्रकारच्या पंथीय विचारानं समाधान होऊ शकत नव्हतं. ईश्वराचा त्याच्या विविध स्वरूपातील प्रत्यय यावा म्हणून त्यांनी आळीपाळीनं वैष्णव धर्मातील विविध प्रकारच्या साधनांचा प्रयोग केला. ज्या

कोणत्या साधनाद्वारे ते ध्यानधारणा करायचे त्या साधनांशी पूर्णपणे एकरूप व्हायची त्यांच्यांत अद्भुत क्षमता होती. त्यांच्या मनात ईश्वरविषयक जी काही अमूर्त कल्पना असायची तिला मूर्त स्वरूपात अभिव्यक्त करायचं त्यांच्यात सामर्थ्य होतं.

हिंदूधर्मातील सर्व पंथातील ईश्वरविषयक संकल्पनांची प्रचीती आल्यानंतर एका अद्वैती सिद्धपुरुषाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी त्याच्या निराकार, अद्वैत स्वरूपाची अनुभूती घेण्याचा प्रयत्न केला. हा मार्गदर्शक पंजाबमधील फिरस्ता तोतापुरी महाराज होता. तो अतिशय उंच आणि धिप्पाड होता व त्याचं शरीर आणि मन पोलादी होतं. करारी आणि एखाद्या शिळेप्रमाणे अविचल असल्यामुळे त्याला आजार माहीत नव्हता. सुखदुःखांचा तो सारख्याच निर्विकार मनानं स्वीकार करायचा. शारीरिक यातना, मोह वा मानसिक दुर्बलता यांचा आपल्या स्वतंत्र इच्छाशक्तीवर कोणत्या का प्रकारानं होईना प्रभाव पडू शकतो याची ते कल्पनाही करू शकत नव्हते. त्यांनी भटकंतीचं जीवन स्वीकारायच्या आधी ते ७०० साधूंच्या मठाचे प्रमुख महंत होते. ते जवळपास नग्नावस्थेत असायचे व रामकृष्ण नंगा महाराज (नँगटा) म्हणूनच त्यांचा उल्लेख करायचे.

त्यांनी रामकृष्णांना स्पष्ट करून सांगितलं की ब्रह्म हेच केवळ सत्य आहे. तेच शुद्ध, सतत प्रकाश देणारं, सदा मुक्त, काळ, अवकाश आणि कार्यकारणभावाच्या सीमेला भेदून जाणारं आहे. 'मुमुक्षू जेव्हा समाधीच्या परमानंदात मग्न असतो तेव्हा त्याला काळ, अवकाश, नाव वा आकार यांचं भान नसतं.... तो नाव आणि आकाराच्या सापळ्याला भेदून सिंहाप्रमाणे बाहेर झेप घेतो.... त्यानंतर तुमचा लहानसा अहंकार वैश्विक जाणिवेत विलीन होत असल्याचं व तुम्ही ब्रह्माशी तादात्म्य पावल्याचं तुम्हाला आढळेल. तुमचं अस्तित्व, ज्ञान हे सगळं लोपतं आणि तुम्हाला केवळ ब्रह्मानंदी टाळी लागली असल्याचं आढळतं.'

रामकृष्णांनी नंतर वर्णन केल्याप्रमाणे प्रारंभिक दीक्षेनंतर तोतापुरी महाराजांनी सर्व वस्तूंपासून मन काढून घ्यायला आणि आत्म्यात एककेंद्रित करायला सांगितलं. रामकृष्णांच्याच शब्दात सांगायचं तर

*परम आनंददायी माता सोडली तर इतर सर्व वस्तूंपासून मन काढून घेण्यात कोणतीही अडचण आली नाही... मी वारंवार प्रयत्न केला परंतू मातेची मुर्ती मार्गात मधे उभी असलेली दिसायचीच. अखेरीस निराशेच्या भरत मी म्हणालो, 'हे व्यर्थ आहे. निराकार अवस्थेत मी माझं मन केंद्रित करू शकत नाही व आत्म्याचं प्रत्यक्ष दर्शन घेऊ शकत नाही.' त्यावर ते चिडले व म्हणाले, 'काय? तू असं करू शकत नाहीस? पण तुला हे करावंच लागेल!' त्यांना काचेचा एक तुकडा दिसला. त्यांची तो उचलला आणि माझ्या भुवयांच्या मधे दाबत ते मला म्हणाले, 'या बिंदुवर तू लक्ष केंद्रित कर.' त्याचंतर कठोर निग्रहाचं मी पुन्हा ध्यान करायला बसलो आणि ईश्वरी कृपा असलेला दिव्य आकार माझ्यासमोर व्यक्त होताच माझ्या विवेकाचा तलवारीप्रमाणे उपयोग करत मी त्या आकाराचे दोन तुकडे केले. त्यानंतर माझ्या मनासमोर कोणताच अडथळा उरला नाही. मी समाधीत रंगलो होतो.*

तुलनात्मक दृष्ट्या अस्तित्वाची सीमारेषा ओलांडताच ते मनोविकार शून्यतेच्या अवस्थेत गेले. विश्वाचं अस्तित्व लोपलं होतं, काळ अनंतत्वात हरवला होता. इतकंच नाही तर अवकाशही वितळला होता. प्रत्येक गोष्ट संवेदनेत रूपांतरित झाली होती. 'थोडावेळ त्यांच्या धूसर छाया मनाच्या अंधुक पार्श्वभूमीत तरळत होत्या. अहंकाराची अस्पष्ट जाणीव स्मृतीत निरसपणे कंटाळवाणी टकटक करत होती. त्या क्षणी तेही थांबलं होतं. आत्मा जणू आत्म्यात विलीन झाला होता. द्वैतभाव लोपला होता. ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय जाणिवेच्या चिरंतन सागरात विरघळले होते. जन्म, मृत्यू आणि कार्यकारणभाव या सर्वांचा विलय झाला होता. जे काही उरलं होतं ते होतं केवळ अस्तित्व, सर्वोच्च चिरंतन आनंद.' शब्दांच्या, विचारांच्या पलीकडील 'ब्रह्मपद' त्यांना प्राप्त झालं होतं.

त्यांच्या गुरूचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. या माणसानं जे एका दिवसात मिळवलं होतं ते मिळवण्यासाठी त्यांना चाळीस वर्ष खडतर तपश्चर्या करावी लागली होती. तीन दिवस आणि तीन रात्री ते त्या निराकार परिपूर्ण ब्रह्मानंदात लीन होते. त्यांच्या शरीराची कोणतीच हालचाल नव्हती आणि ते प्रेताप्रमाणे निश्चेष्ट पडलेलं होतं. हृदयाचं स्पंदन थांबलेलं होतं,

श्वासोच्छ्वा बंद होता. परंतु त्यातून 'सर्व प्रकारच्या ज्ञानाच्या पलीकडे असणारा सार्वभौम शांतता देणारा प्रकाश बाहेर पडत होता.' [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, पृष्ठ २४३]

सामान्यपणे तोतापुरी महाराज आपल्या व्रतानुसार तीन दिवसांपेक्षा अधिक कुठेच थांबू शकत नसत. परंतु दक्षिणेश्वर येथे ते अकरा महिने राहिले. शेवटी त्यांच्या गुरुशिष्याच्या भूमिका बदलल्या होत्या. शिष्याला ईश्वराची धुंदी चढलेल्या गुरूकडून कळलं की निरपेक्ष ईश्वर आणि सापेक्ष ईश्वर, जगन्माता आणि ब्रह्म एकच आहेत, एकाच वास्तवाच्या त्या दोन बाजू आहेत. एकाशिवाय दुसऱ्याची प्राप्ती अशक्य आहे.

तोतापुरी निघून गेल्यानंतर रामकृष्ण पुन्हा भावसमाधीत गेले आणि सहा महिने ते जवळपास त्याच अवस्थेत राहिले. त्या अवस्थेत त्यांना अगदीच देहभान नव्हतं वा शारीरिक गरजाही त्यांना जाणवत नव्हत्या. दक्षिणेश्वर येथील एका दयाळू साधूच्या शुश्रूषेमुळेच त्यांचा देह तगू शकला. अनंतात खोल बुडी मारल्यामुळे व तुलनात्मकदृष्ट्या भावसमाधीच्या उंबरठ्यावरून परतल्यानंतर त्यांची मानसिक संवेदना आणि सर्व प्राणीमात्रांविषयी एकात्मतेची भावना इतकी तीव्र झाली होती की दोन नावाड्यांना त्यांनी जेव्हा रागानं भांडताना पाहिलं तेव्हा ते शारीरिक वेदनांनी आक्रंदन करू लागले. तसंच एक भिकारी बाहेर थंडीनं कुडकुडत असताना - ज्याच्या अस्तित्वाची त्यांना बसल्या ठिकाणावरून कल्पनाही येऊ शकत नव्हती, ते धगधगत्या जाळाजवळ बसलेले होते तरीही - ते तिथं थंडीनं कुडकुडू लागले.

मुसलमान सुफी संतांच्या साधनेनं आकर्षित होऊन त्यांनी नंतर काही काळ इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माप्रमाणे आचरण करायला सुरुवात केली. अखेरीस त्यांना इस्लामच्या पैगंबराच्या आणि ख्रिस्ताच्या दिव्य दृष्टीची प्राप्ती झाली. या सर्व आध्यात्मिक सहलींचं एक सर्वसामान्य वैशिष्ट्य असं होतं की ते ज्या कोणत्या मार्गाशी त्या वेळी एकरूप व्हायचा प्रयत्न करत त्यावेळी त्या मार्गाशी ते एवढे एकरूप होत की त्यांची जीवनशैली त्या मार्गाशी पूर्णपणे एकरूप होऊन जायची. अशा रीतीनं ज्या वेळी इस्लामच्या पद्धतीनं ते साधना करत होते त्या वेळी ते इस्लामच्या पद्धतीनं राहू लागले आणि पोषाख करू लागले. त्या वेळी ते आपल्या आईला

म्हणजे कालीलाही विसरून गेले. ज्या वेळी ते ख्रिश्चन धर्मानुसार साधना करत होते त्या वेळी ते येशू आणि मेरीच्या प्रतिमांची पूजा करायचे. या सर्व साधनांची अखेर मात्र अनंत, असीम, निराकार, विशेषण विरहित परब्रह्मातच व्हायची.

ज्या कोणत्या मार्गानं त्यांचा प्रवास सुरू असला - मग तो अद्वैतवादी हिंदू धर्माचा असो की इस्लामचा असो वा ख्रिश्चन धर्माचा असो वा हिंदू धर्मातील वेगवेगळ्या पंथांचा असो - तरी अपरिहार्यपणे अखेरीस असीमाच्या सागराकडे, सर्व प्रकारच्या विशेषण विरहित परमेश्वराकडेच ते पोहचायचे. त्यांनी घोषित केलं की 'वेगवेगळ्या नावांतही सारतत्त्व एकच आहे आणि प्रत्येकजण त्याच सारतत्त्वाच्या शोधात असतो. केवळ स्वभाव, वातावरण आणि नाव यांतच तेवढा बदल होत असतो. प्रत्येकाला आपापल्या मार्गाचं अनुसरण करू द्या. त्याला निश्चितपणे त्याचा साक्षात्कार होईल.' [*गॉस्पेल ऑफ रामक्रिष्णा*, रामकृष्ण मिशन बेलूर, (भारत), त्त्, १९४२ आवृत्ती, पृष्ठ ४२३]

१८६८-७०च्या काळात त्यांच्या सततच्या प्रवासात ते ज्या प्रदेशातून जात होते त्या भागात दुष्काळानं हाहाःकार माजवलेला होता. त्यामुळे माणसाला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची त्यांना जाणीव झाली. या जाणिवेमुळे त्यांच्या लक्षात आलं की त्यांच्या अंतःकरणातील परमेश्वराचं केवळ वैयक्तिक मुक्तीनं समाधान होऊ शकत नाही. त्यासाठी प्राणिमात्राविषयी नितांत प्रेमाची व त्यांच्या अथक सेवेची गरज होती. त्यामुळे मानव समाजाच्या सेवेतच परमेश्वराचं दर्शन घेणारे अनुयायी त्यांनी आपल्याभोवती गोळा करायला सुरुवात केली. त्यात सर्वात प्रमुख होते नंतर स्वामी विवेकानंद झालेले नरेंद्रनाथ दत्त. आपण अनुभवलेल्या परमेश्वराचं दर्शन त्यांना घडवणं आणि त्यांच्या जीवित कार्यासाठी त्यांना तयार करणं हाच त्यांचा निदिध्यास होता.

आपल्या अनुयायांना अंतर्मनाचा ठाव घेताना एक गूढवादी म्हणून त्यांनी विलक्षण चातुर्य दाखवलं. ठरीव मार्ग न आखून देता आपल्या आत्मशक्तिद्वारेच त्यांना अज्ञात प्रदेशात प्रवेश करायला त्यांनी मदत केली. त्यांना ठरीव ठशानं ढाळायचा त्यांनी प्रयत्न केला नाही. उलटपक्षी प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या मार्गानं विकसित व्हायला मदत केली. वाटिकेतील सर्व झाडाझुडपांवर, 'लतावेलींवर एकच उबदार उन्ह पडत असतं. ते प्रत्येकाला आपापल्या

प्रकृतीप्रमाणे आपापल्या ठिकाणीच वाढायला आणि आपापली फळंफुलं फुलवायला मदत करत असतं.' त्याचप्रमाणे ठाकुरांची कार्यपद्धती होती. सतत सावध आणि बारकाईनं लक्ष ठेवणारे रामकृष्ण आपल्या अनुयायातील कुणालाही आळस, अस्वच्छता वा अव्यवस्थेची परवानगी देत नसत आणि त्यांच्या दैनंदिन घरगुती जीवनातील सर्व चौकशी केल्याशिवाय राहत नसत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे, स्वभावाप्रमाणे आणि दृष्टीच्या आवाक्याप्रमाणे ते आपली पद्धत बदलवायचे. एकाला सामर्थ्यसंपन्न व्हायला सांगायचे तर दुसऱ्याला त्याचा उपयोग न करायला सांगायचे, आपलं स्वतःचं संरक्षण करता येत नसल्याबद्दल घाबरट भक्ताची खरडपट्टी काढायचे तर दुसऱ्या एखाद्या भक्ताला भावावेगात कृती करण्याबद्दल रागवायचे व आघात व्हायच्या परिस्थितीतही शांत राहणं त्याला शिकवायचे. व्यावहारिकतेवर अती चांगुलपणाला मात करू देणाऱ्या स्वप्नाळू भक्तासाठी त्यांची शिकवण अजूनच वेगळी असायची : 'भक्तानं मूर्ख असायची आवश्यकता नाही.'

१८८६ साली घशाच्या कर्करोगानं त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या चेहऱ्यावरील शांत निश्चल भाव पाहून सर्व पाहणारांना आणि डॉक्टरांनाही आश्चर्य वाटलं. एक थेंबही पाणी पिता येत नसल्यामुळे तहानेनं त्यांच्या घशाला जेव्हा कोरडं पडायची तेव्हा कोणी तरी त्यांना म्हणालं : 'तुम्हाला पाणी पिता यावं म्हणून तुम्ही तुमच्या आईला का सांगत नाही?' मुलाच्या निरागसपणानं ते म्हणाले, 'ठीक आहे, मी प्रयत्न करीन.' आणि ते आईचा सल्ला घेण्यासाठी भावसमाधीत गेले. त्यांची भावसमाधी उतरली तेव्हा त्यांचा चेहरा आनंदानं फुललेला होता. त्यासंबंधी त्यांना विचारलं असता ते म्हणाले, 'आईनं मला सांगितलं की तुला लक्षावधी तोंडं आहेत, मग तुला हेच तोंड का पाहिजे?' त्यांची शारीरिक अवस्था त्यानंतरही तशीच राहिली परंतु त्यानंतर त्यांनी दुःखाचा चकार शब्दही उच्चारला नाही. ते म्हणायचे, 'जेव्हा आत्मा ईश्वराशी एकाकार झालेला असतो तेव्हा केवळ देहालाच यातना होत असतात, आत्म्याला काहीच वेदना होऊ शकत नाहीत.' आणि पुन्हा, 'देहाला आणि वेदनेला एकमेकात गुंतून राहू द्या. माझा आत्मा मात्र परमानंदात मग्न आहे. आता मी आणि माझी आई कायम एक झालेले आहोत.'

## ३

गॅलॅटिअन लोकांना उपदेश करताना सेंट पॉल यांनी आत्म्याच्या फळाचं वर्णन, 'प्रेम, आनंद, दीर्घ यातना, गोडवा...... श्रद्धा, शांत' असं केलं होतं. परिपूर्णाच्या शोधातून श्री रामकृष्णांच्या आत्म्यानं आपल्याबरोबर आणलेलं फळही काही कमी महत्त्वाचं नव्हतं. ते फळ होतं वासना आणि लोभावरील म्हणजे कामिनी आणि कांचनवरींल संपूर्ण विजय.

वयाच्या तेविसाव्या वर्षी पाच वर्षांच्या मुलीशी त्यांचं लग्न झालेलं होतं. तत्कालीन भारतीय परंपरेप्रमाणे अशाप्रकारच्या लग्नात मुलीला न्हाण येईपर्यंत तिच्याशी पतीला शारीरिक संबंध प्रस्थापित करता येत नसे. त्यामुळे त्यांची बालवधू विवाहापासूनच दूर आपल्या आईवडिलांजवळ राहिली होती. १८६७ साली ते आपल्या घरी गेले असता त्यांची परस्परांशी नीट ओळख झाली. त्या वेळी ती अठरा वर्षांची होती. ते तिला म्हणाले, 'प्रत्येक स्त्रीकडे आईच्या दृष्टीनं पाहायला मी शिकलो आहे.... परंतु मी तुझ्याशी लग्न केलेलं असल्यामुळे तू जर मला या जगात ओढू इच्छीत असशील तर तू म्हणशील तसंच होईल.' परंतु त्यांना सर्वोच्च त्याग करायला सांगण्यापेक्षा शारदामणी - कारण हेच त्यांच्या पत्नीचं नाव होतं - त्यांना म्हणाली की तुम्ही तुमच्या मार्गावर चालायला स्वतंत्र आहात. तिच्या वयामुळे आध्यात्मिक जाणीव जरी तिच्या क्षमतेच्या बरीच पलीकडे होती तरी तिनं त्यांना गुरू म्हणून ओळखलं व स्वतःला त्यांना समर्पित केलं.

तिच्या सरळसाध्या श्रद्धेनं प्रभावित होऊन 'मोठा भाऊ' म्हणून त्यांनी तिची जबाबदारी स्वतःकडे घेतली आणि शांतपणे कर्तव्यदक्ष पत्नी होण्यासाठी आवश्यक शिक्षण ते तिला देऊ लागले. त्यांच्या घराला भेट देणारे लोक तिथली स्वच्छता आणि नीटनेटकेपणा पाहून चकित व्हायचे . १८७२ साली दक्षिणेश्वर येथे जेव्हा शारदामणी प्रथमच त्यांच्याकडे राहायला आल्या तेव्हा 'धार्मिक आदरामुळे द्विगुणित झालेल्या मायाळूपणानं आणि इच्छा आणि शारीरिक वासनांपासून पूर्णपणे मिळालेल्या मुक्तीमुळे शुद्ध झालेल्या अंतःकरणानं' त्यांनी त्यांच्या संबंधावर कायम परिणाम करणारं अखेरचं पाऊल उचललं. कालीच्या ठिकाणी शारदामणींची स्थापना करत त्यांनी ईश्वरी मातेचा भौतिक अवतार म्हणून त्यांचं स्वागत केलं आणि त्यांची

'मानवतेची जिवंत विशुद्ध प्रतीक' म्हणून यथाविधी पूजा केली. आपल्या 'पवित्र प्रेमानं आणि नाजुक अलिप्तपणानं' त्या त्यांच्या आदर्श मदतनीस आणि जीवनसाथी झाल्या. नंतर त्यांनी जेव्हा आपल्या मठाची स्थापना केली तेव्हा त्या मातेच्या स्थानावर पोहोचल्या आणि त्यांच्या सहवासात जो कोणी यायचा त्याच्या मनाचं निश्चल शांत भावानं शांतवन करायच्या.

आतापर्यंत पूर्णत्वाचा शोध घेणारे लोक धार्मिक जीवन आपल्याला सर्व जबाबदाऱ्यांपासून मुक्त करते असं समजून एक तर कौटुंबिक जीवनापासून पळायचे वा कौटुंबिक जीवनातील मागण्यांशी जुळवून घ्यायचे. रामकृष्णांनी मात्र वैवाहिक जीवनातूच पत्नीचे जे अधिकार निर्माण होतात ते झिडकारलेही नाहीत आणि आपल्या आदर्शांशी भित्रेपणानं तडजोडही केली नाही. उलटपक्षी पत्नीच्या बंधनाला त्यांनी धीटपणे मान्यता दिलीं आणि त्या बंधनांना परस्परांच्या संमतीनं काही तरी उच्च आणि उदात्तात परिवर्तन केलं. त्यामुळे त्यांच्यानंतर येणाराच्या - जरी गांधीजी त्याच मुक्कामावर वेगळ्या मार्गानं पोहोचले होते - जीवनात आणि दृष्टिकोनात परिवर्तन करणारा पायंडा पाडला गेला. गांधीजींची पाळी आली तेव्हा त्यांनी तो मार्ग भारताच्या अहिंसक स्वातंत्र्यसंघर्षात गाभ्याच्या ठिकाणी असलेल्या सामान्य सैनिक म्हणून काम करणाऱ्या देशातील विविध आश्रमातील आणि आश्रमाबाहेरील हजारो अनाम नायक नायिकांना दाखवला. शारदामणींनी पाडलेल्या पायंड्यावरूनच कस्तुरबा चालल्या व शारदामणी मांचं दक्षिणेश्वरातील आश्रमात जे स्थान होतं तेच कस्तुरबांचं गांधीजींच्या आश्रमात स्थान होतं.

'ऐन्द्रीय आणि मानसिक शक्तीचा विषयोपभोगात विनिमय करण्याऐवजी त्यांचा संग्रह केल्यामुळे जबरदस्त आत्मशक्ती निर्माण होते व ती आत्मशक्तीच सर्जनशील शक्तीच्या मुळाशी असते याची साक्ष सर्व महान गूढवादी आणि बहुतांश आदर्शवादी .... एवढंच नाही तर मुक्त विचारवंत.... आणि बेथोवन, बाल्झाक आणि फ्लाबर्ट यासारखी भोगासक्त माणसंही देतात' असं रोमॉ रोलॉ यांनी निदर्शनास आणून दिलं आहे. [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, पृष्ठ २४३] रामकृष्णांच्याही आधी अनेकांनी ब्रह्मचर्याची महती गाईलेली आहे आणि त्याच्या संपूर्ण

आचरणानं असीम आध्यात्मिक शक्ती निर्माण होते असं सांगितलेलं आहे. परंतु कौटुंबिक जीवनाचं पावित्र्य, त्यातील गोडवा आणि गांभीर्य यांना धक्का न लागू देताही ग्राहस्थ जीवनात संपूर्ण ब्रह्मचर्याचं त्याच्या असीम आध्यात्मिक शक्यतांसह कसं आचरण करता येऊ शकतं ते भव्योदात्त पद्धतीनं दाखवून देणारे मात्र रामकृष्णच होते. याच ब्रह्मचर्याचा जेव्हा भारतीय राष्ट्रीयत्वात समावेश करण्यात आला तेव्हा त्यामुळे अनेक लोक प्रभावित झाले. अनेकांच्या जीवनात त्यानं नकळत शांतपणे प्रवेश केला. अत्यंत सूक्ष्म प्रमाणात त्याचा अवलंब करण्यात आला असतानाही त्यानं येणाऱ्या नवयुगात नवीन मनःस्थिती आणि नवीन आध्यात्मिक वातावरण निर्माण केलं. एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात भारतातील अभूतपूर्व अहिंसक जनजागृतीच्या अभियानातील ब्रह्मचर्य महत्त्वाचा घटक होता.

## ४

श्री रामकृष्णांचं भारतातील सामाजिक आणि राष्ट्रीय पुनरुत्थानात एक आगळंच स्थान आहे. धर्माच्या सारतत्त्वाचा प्रत्यय घडवून आणणं हा त्यांच्या शिकवणुकीचा गाभा होता. जेव्हा तो प्रत्यय येऊ लागतो तेव्हा सर्व वाद, मतभेद, भांडणं विलयाला जाऊ लागतात. ज्यांना धार्मिक अनुभव नसतो तेच बाह्य आकारावरून भांडत असतात. ज्या माणसाला साक्षात्कार झालेला असतो त्याला कळत असतं की सर्व धर्म हे एकाच ध्येयाप्रत नेणारे मार्ग आहेत. आणि हा काही त्यांच्यासाठी केवळ बौद्धिक वा तत्त्वज्ञानात्मक विश्वास नव्हता. तो तर त्यांचा सकारात्मक अनुभव होता. आपण सर्व धर्मांचं - हिंदू, इस्लाम, आणि ख्रिश्चन - अनुसरण केलं असल्याचं त्यांनी जाहीर केलं. तसंच हिंदू धर्मातील विविध पंथांनी सांगितलेल्या मार्गांवरूनही आपण चाललो आहोत व 'आपण सर्व लोक ज्याकडे जात असतो तो देव एकच आहे, केवळ त्याच्याकडे जायचे आपले मार्ग भिन्न आहेत असं ते म्हणायचे.' त्यांच्या श्रद्धेत 'निराकार देवाला स्थान होतं तसंच सर्व स्वरूपातील देवांचाही त्यात समावेश होत होता.' [वरीलप्रमाणे]

त्यांचा हेतू केवळ सर्व धर्मातून चांगलं तेवढं घ्यायचाच नव्हता – 'इतरांची छोटी छोटी फुलं गोळा करून' ते आपल्या पंथाचा पुष्पगुच्छ त्यापासून तयार करत असत. एवढंच नाही तर अनेकदा झगडणाऱ्या पंथांमधे 'समन्वय' आणि 'सहनशीलता' यांच्या आधारे ते समझोता घडवून आणत असत. या पंथीय झगड्याच्या युगात ते अगदी धैर्यानं सर्व धर्मांच्या *स्वीकारासाठी* उभे राहत. सर्व धर्म सारस्वरूपात सत्य आहेत, ते सर्व एकाच ध्येयाकडे घेऊन जातात, प्रत्येक धर्म अवर्णनीय असीमाचं केवळ अंशतःच प्रतिनिधीत्व करतो अशी त्यांची मान्यता होती. ते म्हणाले की 'धर्माच्या शिकवणुकीबद्दल वाद करू नका, सर्व धर्म एकच आहेत. सर्व नद्या सागराला जाऊन मिळत असतात..... आपल्या प्रवासमार्गावरील उताराप्रमाणे - आपल्या वंशाप्रमाणे, काळाप्रमाणे आणि स्वभावाप्रमाणे - नद्या आपला मार्ग त्यांना ज्या भागातून जायचं असतं त्यावरून ठरवत असतात. परंतु पाणी सर्वत्र सारखंच असतं... ' [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात रामकृष्णांचं उद्धरण, पृष्ठ २४३]

विद्वान लोक व्यर्थ तात्विक चर्चेचा घोळ घालतात व बारीकसारीक गोष्टींचा कीस पाडतात. रामकृष्णांनी त्याबद्दल तीव्र नापसंती दर्शवली होती. त्यांची शिकवण होती : ईश्वराचं प्रेम ईश्वराच्या ज्ञानापेक्षा अधिक महत्त्वाचं आहे. 'तुम्ही राधाकृष्णावर कदाचित विश्वास ठेवणार नाही परंतु तुमच्यात राधेचं कृष्णावर जसं प्रेम होतं तसं प्रेम असायला हवं.' त्यासाठी केवळ एका गोष्टीची आवश्यकता असते आणि ती म्हणजे तुम्हांला ईश्वराची तीव्र ओढ असायला हवी. 'तुम्ही जेव्हा आंब्याच्या आमराईत जाता तेव्हा तुम्ही गोड आंबे खायला पाहिजे, पानं मोजत बसायला नको. तलावातील गडवाभर पाण्यानं तुमची तहान जर भागत असेल तर तलावात किती पाणी आहे याची मोजदाद करायची गरज काय?' [डी. एस. शर्मा, *स्टडीज इन द रिनॅसन्स ऑफ हिंदूइझम*, पृष्ठ २४९-५०]

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचं म्हणणं होतं की कोणीही माणसावर खऱ्या अर्थानं प्रेम करू शकत नाही आणि त्यामुळे त्याच्यातील ईश्वरावर जोपर्यंत कोणी प्रेम करत नाही तोपर्यंत कोणीही त्याची खरी सेवा करू शकत नाही. उलट्या बाजूनं पाहिलं तर असं म्हणता येईल की जोपर्यंत माणूस प्रत्येक माणसात ईश्वराचं दर्शन घेत नाही तोपर्यंत तो ईश्वराला खऱ्या अर्थानं जाणू शकत नाही. त्यामुळे ते म्हणायचे की वैयक्तिक मुक्तीचा मला काहीही उपयोग नाही. ते प्रार्थना करायचे

की माझा उपयोग एका जरी माणसाला होत असेल तरी मला वारंवार जन्म मिळावा, मग तो ‘कुत्र्याच्या योनीतील का असे ना.’

तिसरी गोष्ट म्हणजे वैयक्तिक उद्धाराला जरी त्यांनी नकार दिला होता तरी कोणत्याही भ्रष्ट व्यक्तीकडून खरी वा टिकाऊ कल्याणकारी गोष्ट निर्माण होऊ शकतं नाही. कुणाही माणसाला जर जगाची काही उपयुक्त सेवा करायची असेल तर आधी त्याला स्वतःला वासना आणि लोभापासून मुक्त व्हावं लागतं.

चौथी गोष्ट म्हणजे ईश्वरज्ञानाच्या आधी केवळ ईश्वर विषयक प्रेमच निर्माण व्हायला नको तर चांगल्या कामाबद्दलही माणसाच्या मानात प्रेम निर्माण व्हायला हवं. जे लोक ‘आत्मसाक्षात्कारासाठी जगाला मदत करण्याविषयी तुच्छतेनं बोलतात त्यांना आपण काय बोलतो आहोत तेही कळत नसतं. मर्त्य मनुष्य कितीही कार्य करील तरी या प्रचंड विश्वासमोर आणि त्याच्या समस्यांसमोर ते काहीच नसतं. केवळ देवच त्याच्या जगाची काळजी घेऊ शकतो. माणसानं केवळ त्याच्या इच्छेप्रमाणे वागणं शिकायचं असतं. त्याच्या शक्तीचं वरदान मिळाल्यानंतर तो इतरांचं कल्याण करायला समर्थ होईल. समाजसेवा आणि आत्मसाक्षात्कार या परस्परव्यावर्तक गोष्टी नाहीत तर परस्परपूरक गोष्टी आहेत. प्रत्येक गोष्ट दुसरीत समाविष्ट होते व त्यातूनच तिला अभिव्यक्ती मिळते.

अखेरीस सेवा ही चांगली आणि आवश्यक असते याबाबत कोणताही संशय नसला तरी तिची अभिव्यक्ती निरासक्त प्रेमातून व्हायला पाहिजे. समाजसेवेला तेव्हाच अर्थ असतो जेव्हा ती हृदयात ‘दानाचा आणि प्रेमाचा दीप पाजळते.’ – ‘प्रेम, केवळ आपल्या स्वतःवर, कुटुंबावर, जातिजमातीवर वा राष्ट्रावर केलेलं प्रेम नव्हे तर माणसाचा उद्धार करणारं आणि ईश्वराकडे नेणारं प्रेम म्हणजे खरं प्रेम.’ ज्या समाजसेवेत ही अंतर्दृष्टी नसते ती समाजसेवा अर्थहीन अवडंबर असते.

आजूबाजूच्या समकालीन धार्मिक लोकांना निरर्थक वादात - वितंडवाद, भांडणं, आपलं म्हणणं खरं करण्याकरता पाठांची मोडतोड करणं अशा प्रकारच्या कामात – स्वतःचा वेळ खर्च करताना त्यांनी पाहिलं. अंतःकरणाला होणाऱ्या यातनांमुळे ते उद्गारले : ‘ज्याला जीवन म्हणतात

त्या या लहानशा जीवनाचा उपयोग तुम्ही इतर लोकांशी भांडण करण्यात खर्च करणार आहात की ते उपयोगात आणणार आहात? तुमच्या मनातील भुंकणाऱ्या कुत्र्याला गप्प बसवा आणि आत्म्याच्या हत्तीला आपली गर्जना करू द्या....' [रोमॉ रोलॉ यांनी *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात डी. जी. मुखर्जींचं दिलेलं उद्धरण, पृष्ठ १५१] कवी आणि तत्त्वज्ञांनी नेहमीच सत्य आणि सद्‌गुणांची महती गाईलेली आहे, परंतु जगाला सद्गुणी करण्यात त्यांना अपयश आलं आहे का? कारण त्यांच्यात आत्मसाक्षात्काराचा अभाव होता. 'आपण आपलं अंतर्गत जीवन एवढ्या तीव्रपणे जगायला पाहिजे की तेच आपलं अस्तित्व व्हायला पाहिजे.' मग अस्तित्व सत्याच्या अनंत विजेऱ्यांना जन्म देईल. मानवतेमधे आपण ईश्वराचा पर्वत उभारू या.... जेव्हा तो उभारला जाईल तेव्हा मानवजातीवर प्रकाश आणि अनुकंपेच्या नद्यांची संतत धार कोसळत राहील.' [रोमॉ रोलॉ यांनी *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात डी. जी. मुखर्जी यांचं गॉस्पेल ऑफ रामक्रिष्ण या ग्रंथातून घेतलेलं उद्धरण, पृष्ठ १६८]

सामाजिक कार्याबद्दलचा एक नवीनच दृष्टिकोन इथं आढळून येतो. सामाजिक उत्थानाच्या आपल्या जनआंदोलनासाठी गांधीजींनी विद्वान वा बुद्धिमान लोकांची निवड केली नव्हती तर शुद्ध आणि प्रायश्चित्त घेऊ इच्छिणाऱ्या लोकांची त्या कार्यासाठी निवड केली होती. गांधीजींनी घोषित केलं होतं की 'आत्मशुद्धी ही सर्व कार्यांचं साधनही आहे आणि साध्यही आहे, मग ते कार्य सामाजिक असो वा राजकीय. सर्व प्रकारच्या साहसातील यशाची ती गुरुकिल्ली आहे.' यामुळे राजकारणाचं आध्यात्मिकरण स्वाभाविकपणे आणि सहजपणे होणं अपरिहार्य होतं.

## ५

रामकृष्णांचा अनासक्त सेवेचा उपदेश व्यवहारात आणायचं आणि त्यांचा उपदेश पाश्चात्त्यांना समजावून सांगायचं कार्य ज्यांच्या भाळी लिहिलेलं होतं ते रामकृष्ण मिशनचे संस्थापक नरेंद्रनाथ दत्त होते. कोलकाता येथे मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्यांची शरीरयष्टी सुदृढ होती, मुष्टियुद्ध, कुस्ती, पोहणं यांत ते प्रवीण होते. तसंच ते संगीतप्रेमी

होते आणि काव्य आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात त्यांना खूप रस वाटायचा. रामकृष्णांच्या प्रभावाखाली ते जेव्हा आले तेव्हा ते केवळ सतरा वर्षांचे होते. स्कॉटिश मिशनचे प्राचार्य श्री हेस्ट यांनी सहज केलेल्या एका उल्लेखामुळे त्यांची पावलं त्यांच्या भावी गुरूकडे, श्री रामकृष्णांकडे वळली. वर्डस्वर्थच्या 'एक्सकर्शन' या कवितेतील वैयक्तिक अनुभवासंबंधी वर्गात व्याख्यान देताना ते म्हणाले की असा अनुभव 'शुद्ध अंतःकरण आणि विशिष्ट विषयावर लक्ष एकाग्र केल्यामुळेच येऊ शकतो आणि आधुनिक जगात ही गोष्ट दुर्मिळ झालेली आहे.' ते म्हणाले की मला अशी एकच व्यक्ती आढळली आहे की जिला या दैवी स्थितीचा लाभ झालेला आहे. ती व्यक्ती म्हणजे दक्षिणेश्वर येथील श्री रामकृष्ण परमहंस. 'तुम्ही जर तिथं गेलात तरच तुम्हाला ही गोष्ट कळू शकेल.'

नरेन्द्रनाथ स्वामीजींकडे गेले आणि विचारलं, 'आपण देवाला पाहिलं आहे?'

'होय, जसा मी तुला पाहतो आहे तसंच मी देवाला पाहिलं आहे. केवळ अधिक सखोल अर्थानं.... मी जसा तुझ्याशी बोलतो आहे त्याचप्रमाणे कोणीही त्याच्याशी बोलू शकतो आणि त्याचा अनुभव घेऊ शकतो.... परंतु ते कुणाला हवं आहे.... जर कोणी त्याच्यासाठी अंतःकरणपूर्वक आक्रंदन करील तर त्याच्यासमोर तो निश्चितच प्रकट होईल.'

साधारण ब्राह्मो समाजाचे सदस्य असल्यामुळे नरेन्द्रनाथांनी हा प्रश्न देवेन्द्रनाथ टागोरांसह अनेक प्रसिद्ध व्यक्तींना विचारला होता. परंतु त्यांना समाधानकारक उत्तर मिळालं नव्हतं. या साक्षात्काराची त्यांना ओढ लागलेली होती. अखेरीस इथं असा माणूस भेटला होता की जो धैर्यानं सांगत होता की होय मी देव पाहिला आहे, धर्म असं सत्य आहे की जे अनुभवता येऊ शकतं, जाणून घेता येऊ शकतं आणि तेही या जगाचा आपण जो अनुभव घेतो त्यापेक्षा तो अनुभव अनंतपटीनं सखोल असतो. 'मी ते शब्द ऐकत होतो तेव्हा त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय वेगळं असं मी काहीच करू शकत नव्हतो. ते काही सामान्य शब्द नव्हते. ते शब्द साक्षात्कारी माणसाच्या खोल अंतःकरणातून सरळ बाहेर पडलेले होते.' त्या क्षणापासून त्यांच्या जागृतीला सुरुवात झाली.

परंतु प्रदीर्घ काळ जिद्दीनं केलेल्या संघर्षाशिवाय असं घडू शकलं नाही. ज्यावेळी भविष्याची तरतूद करायची संधी न मिळता त्यांच्या वडिलांचा एकाएकी मृत्यू झाला त्या वेळी जवळपास त्यांची अवस्था वेड लागल्यासारखी झाली होती. स्वतःला आणि आपल्या भावाला उपासमारीपासून वाचवण्यासाठी त्यांना नोकरीच्या शोधासाठी या कार्यालयापासून तर त्या कार्यालयापर्यंत व्यर्थ भटकंती करणं भाग पडलं होतं. अखेरीस त्यांना त्यांच्या विलक्षण गुरूला शरण जाणं भाग पडलं. परमहंसांचं वागणं लहरीपणाचं आहे असं त्यांना त्या वेळी वाटायचं. त्यांची निष्ठा, त्यांचा भावनोद्रेक, त्यांची आईची भक्ती, त्यांची दीव्यदृष्टी आणि साक्षात्कार आदी गोष्टींविरुद्ध त्यांची विचक्षणबुद्धी बंड करून उठायची. आजारी मनाचा तो भ्रम नाही याची काय शाश्वती? काही वेळा त्यांना वाटायचं की या माणसाच्या वेडपटपणाला वाव देण्यात येऊ नये म्हणून त्याला कोठडीत कोंडून ठेवावं. परंतु तरीही त्यांच्या मनाविरुद्ध दक्षिणेश्वराला त्यांचं भेट देणं आणि रामकृष्णांचा त्यांच्यावरील प्रभाव वाढणं सुरूच होतं.

गुरूनं आपल्या साक्षात्काराच्या काही गोष्टींचा त्यांना प्रत्यय आणून दिला. अनंताच्या अनुभवाची चव आधीच त्यांना चाखायला मिळालेली असल्यामुळे ज्या कार्यासाठी त्यांची खास निवड करण्यात आली होती ते कार्य पूर्ण होईपर्यंत परमानंदाच्या उपभोगासाठी त्यांना मनाई करण्यात आली. ते कार्य होतं भारतातील कोट्यवधी कंगाल दरिद्री लोकांची यातनांतून सुटका करणं.

१८८६च्या नाताळच्या सणाच्या आदल्या दिवशी रामकृष्णांचा मृत्यू झाल्यानंतर विवेकानंदांनी मानवतेच्या निष्काम सेवेसाठी आपल्या शिष्यांसह आजीवन संन्यासाची आणि ब्रह्मचर्याची शपथ घेतली. अशा रीतीनं रामकृष्णाच्या शिष्यपरंपरेची सुरुवात झाली.

दोन वर्षांनंतर त्यांनी आपल्या भटकंतीच्या जीवनाला सुरुवात केली. काही तुरळक अपवाद वगळता ती जवळपास पाच वर्षं अखंड सुरू होती. प्रवासाच्या त्रासाला आणि जोखिमेला न घाबरता, उद्याचा विचार न करता आपली नाव निशाणी न सांगता भारताच्या जनसागरात मिसळून जाऊन त्यांनी आपला प्रवास सुरू ठेवला. हिमालयापासून तर कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण

भारतात ते हिंडत होते. त्यांच्या प्रवासामुळे त्यांना अनादी भारतातील मती गुंग करणाऱ्या विविध जातीजमातींची, संस्कृतींची आणि संप्रदायांची माहिती कळली. त्याचबरोबर या विविधतेच्या अंतर्गत मूलभूत भौतिक आणि आध्यात्मिक ऐक्य कसं आहे याचीही त्यांना जाणीव झाली. भारतमातेच्या पुत्रांचं भयानक दारिद्र्य, आणि कोणत्याही प्रकारची आशा न उरलेली त्यांची विपन्नावस्था यामुळे त्यांचं अंतःकरण व्याकूळ झालेलं होतं. कोलकातात उपासमारीमुळे लोकांच्या मृत्यूची बातमी जेव्हा त्यांना कळली तेव्हा झालेल्या अपरिमित दुःखानं ते आपली छाती बडवू लागले. 'आम्ही ईश्वराचे तथाकथित भक्त, काय केलं आम्ही संन्याशांनी त्यांच्यासाठी?' ते कण्हत म्हणू लागले.

कन्याकुमारी येथे त्यांनी भारतमातेच्या सेवेवर लक्ष केंद्रित केलं, विशेषतः लक्षावधी भुकेकंगाल उपासमारीनं मरू घातलेल्या लोकांच्या सेवेसाठी आणि ज्या नावानं ते नंतर सर्वपरिचित झाले ते विवेकानंद हे नाव त्यांनी तिथंच धारण केलं. त्यांच्या प्रवासानं राष्ट्रभक्त संन्याशात त्यांचं परिवर्तन झालं.

'रिकाम्या पोटासाठी धर्म नाही' या त्यांच्या गुरूच्या शब्दांचा प्रतिध्वनी त्यांच्या कानात घुमू लागला. आपल्या शिष्यांना विश्वासात घेत त्यांनी सांगितलं की मी आता सर्व भारताचं भ्रमण केलेलं आहे. 'परंतु अरेरे! लोकांचं भयानक दारिद्र्य आणि दुःख स्वतःच्या डोळ्यांनी पाहावं लागणं ही किती वेदनादायक गोष्ट आहे? त्यांचं दारिद्र्य आणि यातना दूर केल्याशिवाय त्यांना धर्माचं शिक्षण देणं व्यर्थ आहे असा आता माझा पक्का विश्वास झालेला आहे.

परंतु ते त्यांना मदत कसे करणार होते? त्यांच्याजवळ पैसा नव्हता. एकोणिसाव्या शतकात एकामागून एक आलेल्या भयानक दुष्काळांमुळे मृत्यूचं जे तांडवनृत्य सुरू झालं होतं त्यामुळे भारतमातेच्या प्रत्येक पुत्राच्या मनावर त्याचा भयानक परिणाम झाला होता. परंतु प्रशासनावर मात्र त्याचा काहीच परिणाम झाला नाही. उलट त्याकडे एका उपहासात्मक तटस्थतेनं ते पाहत होतं. काही थोड्याशा लक्षाधीशांनी आणि राजांनी अत्यंत उदारपणानं

दिलेल्या देणग्यांनीसुद्धा भारताच्या गरजेची अंशतःदेखील पूर्ती होऊ शकली नाही. भारत जागा होऊन आवश्यक प्रयत्न करण्याआधीच सर्व काही संपायची शक्यता होती.

पश्चिमेला आवाहन करायची कल्पना विवेकानंदांच्या मनात घोळू लागली. अमेरिकेत 'केव्हा तरी आणि कुठे तरी' धार्मिक संसद भरणार असल्याचं त्यांच्या वाचनात आलं होतं. त्यांना जाणवलं की संपूर्ण जगाला भारताची गरज आहे. इतर अनेक राष्ट्रांच्या बाबतीत घडलं त्याप्रमाणे भारताचा राखीव आध्यात्मिक साठा जग खात्रीनंच नष्ट होऊ देणार नाही. भारताच्या भौतिक परिस्थितीत सुधारणा करण्याकरिता आणि त्या मोबदल्यात आत्म्याचा धर्मग्रंथ जगाला देण्याकरता अमेरिकेला जायचा निर्णय त्यांनी घेतला.

श्रीमंत सावकार आणि इतर पैसेवाले लोक यांची आर्थिक मदतीची विनंती नाकारत ते म्हणाले, 'मी जनतेच्या आणि गरिबांच्यावतीनं जात आहे' आणि मित्रांनी व जनतेनं दिलेल्या वर्गणीच्या आधारे त्यांनी अमेरिकेला प्रयाण केलं.

अमेरिकेत ते कोणत्याही ओळखपत्राशिवाय गेले होते. विवेकानंद कुणालाही परिचित नव्हते आणि कुणाशीही परिचय नसल्यामुळे विवेकानंदांजवळ जो काही थोडासा पैसा होता तो संपला. अशा अवस्थेत एका श्रीमंत अमेरिकन बाईनं हार्वर्ड विद्यापीठाचे प्रा. जे. एच. राईट यांच्याशी त्यांची ओळख करून दिली. शिकॅगो ते बोस्टनचा रेल्वेनं प्रवास करताना योगायोगानं त्यांची त्या बाईशी ओळख झाली होती. त्यांच्याशी झालेल्या संभाषणानं प्रभावित होऊन त्या बाईंनी विवेकानंदांना आपल्या घरी यायचं आंमंत्रण दिलं. तिथं प्रा. राईट यांच्या लक्षात विवेकानंदांची अलौकिक बुद्धिमत्ता आली. त्यांनी त्यांना एक ओळखपत्र दिलं आणि धार्मिक संसदेसाठी प्रतिनिधींची निवड करणाऱ्या समितीचे अध्यक्ष डॉ. बरोज यांच्याकडे भेटायला पाठवलं. त्या ओळखपत्रात लिहिलं होतं, 'आपल्या सर्व प्राध्यापकांच्या एकूण विद्वत्तेपेक्षाही अधिक विद्वत्ता असलेला हा माणूस आहे.'

सप्टेंबर ११, १८९३ला शिकॅगो येथे भरलेल्या धर्मसंसदेत विवेकानंद पहिल्या दिवशी अगदी शेवटी आणि तेही थोडक्यात बोलले. परंतु त्यांचं भाषण जरी केवळ तीन मिनिटंच चाललं

होतं तरी संसदेतील सर्व उपस्थितांना एखाद्या वादळाप्रमाणे त्यानं झपाटून टाकलं. आदल्या रात्री जायला कोणतंही ठिकाण नसल्यामुळे शिकॅगो रेल्वे स्टेशनवर एका रिकाम्या पेटीत ते झोपले होते. तो दिवस संपल्यानंतर ते जगप्रसिद्ध पुरुष झाले होते.

संसदेत जमलेल्या प्रतिनिधींना संबोधत ते म्हणाले, 'अमेरिकन बंधू आणि भगिनींनो, आम्ही केवळ वैश्विक सहनशीलतेवरच विश्वास ठेवत नाही. सर्व धर्म सत्य आहेत अशीही आमची मान्यता आहे. जगातील सर्व धर्मातील आणि देशातील छळल्या गेलेल्या शरणार्थ्यांना आश्रय देणाऱ्या देशाचा मी असल्याबद्दल मला अभिमान वाटतो.' समारोप करत ते म्हणाले, 'मी अंतःकरणपूर्वक अपेक्षा करतो की संमेलनाच्या स्वागतासाठी आज सकाळी जी घंटा वाजली ती सर्व प्रकारच्या धर्मवेडाची, लेखणीनं वा तलवारीनं करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या छळाची आणि एकाच ध्येयाकडे जाणाऱ्या सर्व सहप्रवाशातील अनुदारपणाच्या भावनेची मृत्यूघंटा ठरेल.' 'इतर धर्मांचा नाश करून नव्हे तर सर्व धर्मांत संयोग घडवून आणून सलोखा निर्माण करायची' विनंती त्यांनी समारोपाच्या दिवशीच्या व्याख्यानात केली. 'ख्रिश्चनाला हिंदू वा बौद्ध व्हायची वा हिंदू अथवा बौद्ध धर्मीयांना ख्रिश्चन व्हायची गरज नाही. परंतु प्रत्येक धर्मानं इतर धर्मातील आत्मतत्त्वाचा स्वीकार करायला पाहिजे आणि त्याचबरोबर स्वतःचं व्यक्तिमत्व जोपासून आपल्या वाढीच्या स्वाभाविक नियमाप्रमाणे वाढायला पाहिजे.

त्या संपूर्ण सत्रात त्यांना अतिशय मागणी होती. संमेलनातील त्यांचं संपूर्ण व्याख्यान अमेरिकेतील वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्यात आलं. न्यूयॉर्क हेरॉल्डनं लिहिलं, 'धर्मसंसदेतील ते सर्वात महान व्यक्ती आहेत यात काही संशय नाही. त्यांना ऐकल्यानंतर त्या सुबुद्ध देशात धर्मप्रचारक पाठवणारे आपण लोक किती मूर्ख आहोत याची जाणीव होते.'

त्यावेळी ते तीस वर्षांचे होते.

परंतु व्यक्तिगत यशाला त्यांच्यासाठी काहीच अर्थ नव्हता. धर्मसंसदेतील विजयाच्या दिवशी एका अतिशय श्रीमंत माणसानं शिकॅगोमधील आपल्या अत्यंत आधुनिक पद्धतीच्या घरी त्यांना राहायला बोलावलं होतं. त्या प्रासादातील अत्यंत आरामशीर बिछान्यावरही भारताच्या

भेसूर उपासमारीचं चित्र त्यांच्यासमोर उभं राहिलं होतं व त्यामुळे ते रात्रभर अस्वस्थ होऊन तळमळत पडलेले होते. 'आई, कोट्यवधी लोक घासभर भाताकरता मरत असताना मला नावाचं वा प्रसिद्धीचं काय महत्त्व आहे? भारताच्या जनसमूहाला कोण जागं करील? कोण त्यांना भाकरी देईल?' वेदनांनी तळमळत ते जमिनीवर इकडून तिकडे लोळत होते.

पश्चिमेच्या भौतिक आणि तांत्रिक प्रगतीनं आधी ते दिपून गेले होते. परंतु त्या चकाकीखाली असणाऱ्या दुःखद वास्तवाची त्यांना लगेच जाणीव झाली. त्यामुळे विवेकानंदांच्या शब्दात सांगायचं तर 'पाश्चात्त्य जीवनाच्या वरवरच्या हसऱ्या पापुद्र्याखाली दुःखच दुःखं असल्याची' त्यांना लगेच जाणीव झाली. उलटपक्षी भारतात 'वरवर दुःख आणि खिन्नता भरलेली दिसते परंतु त्याखाली निश्चिंतता आणि आनंद भरलेला असल्याचं' त्यांच्या लक्षात आलं. [सिस्टर निवेदिता, *मास्टर ॲज आय सॉ हिम*, पृष्ठ ११६, सहावी आवृत्ती] त्यांना भारतात आणि युरोपमधे दोन महान प्रयोग सुरू असल्याचं आढळलं. परंतु 'अजून त्यातील एकही पूर्ण झालेला नव्हता.' त्यामुळे परस्परांना आधार देऊन हातात हात घालून त्यांना वाढायची गरज होती. पूर्व आणि पश्चिमेच्या, विज्ञान आणि अध्यात्माच्या, आणि धार्मिक आणि आर्थिक कार्यक्रमाच्या संयोगाचे ते पुरस्कर्ते बनले.

त्यानंतर इंग्लंडला दोन अल्पकालीन भेटी दिल्यानंतर व्याख्यानं देत, चर्चा करत, वेदांताच्या शिकवणुकीची केन्द्र उघडत आणि लोकांना ध्यानधारणा शिकवत ते जवळपास तीन वर्षे अमेरिकेत राहिले. त्यात त्यांचे दोन हेतू होते. हिंदू तत्त्वज्ञानाच्या खऱ्या स्वरूपाचा प्रसार करणं आणि भारतीय जनतेच्या उत्थानासाठी निधी गोळा करणं. कामाच्या ताणानं त्यांचा जवळपास बळी घेतला होता.

१८९६ साली त्यांनी इंग्लंडला व युरोपखंडाला भेट दिली. त्या भेटीत ते ज्या लोकांना भेटले त्यात इंग्लंडमधे प्राध्यापक मॅक्समुल्लर यांचा आणि कील येथील वेदांतात प्राविण्यप्राप्त जर्मन विद्वान पॉल ड्युसेन यांचा समावेश होता. त्यानंतर ते भारतात परतले. ते परतायच्या आधीच त्यांची कीर्ती भारतात पसरलेली होती. या वेळचा कोलंबोपासून तर हिमालयापर्यंतचा त्यांच्या प्रवास अगदी वेगळा होता. पूर्वी त्यांनी अनाम निराधार भिकाऱ्याच्या अवस्थेत संपूर्ण भारताचा

प्रवास केला होता. या वेळी मात्र ते प्रसिद्धीच्या झोतात होते. एखाद्या विजेता योद्ध्याप्रमाणे त्यांचं स्वागत करण्यासाठी राजेमहाराजे, सर्वसामान्य जनता, सुशिक्षित लोक, सार्वजनिक संस्था आणि धार्मिक संघटना आदी सर्वांमध्ये स्पर्धा लागलेली होती.

भारताच्या आर्थिक आणि आध्यात्मिक उत्थानासाठी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना अमेरिकेतून आर्थिक साहाय्य मिळवता आलेलं नव्हतं. परंतु त्याहूनही काही तरी अधिक मोलाच्या गोष्टी त्यांनी भारतात आणल्या होत्या : त्या होत्या पूर्वेबद्दल पश्चिमेची सामंजस्याची आणि सहानुभूतीची भावना, भक्तिभावनेनं भारलेले अनेक पाश्च्यात्त्य अनुयायी, आत्मविश्वास आणि मातृभूमीच्या भवितव्याविषयी श्रद्धेनं भरलेलं मन.

## ६

स्वावलंबन, ऐक्य, समाजाची उन्नती, स्त्रियांच्या स्थानात सुधारणा आणि भारतीयांना आपल्या शक्तीची जाणीव होऊन स्वतःसंबंधीचं त्यांचं अज्ञान आणि दारिद्र्य दूर व्हावं म्हणून उपनिषदातील विसरल्या गेलेल्या सत्याच्या प्रचारार्थ संघटनेची उभारणी करायचा संदेश अमेरिकेतून परतल्यानंतर विवेकानंदांनी दिला. यासाठी धर्मकार्याला वाहून घेतलेल्या लोकांनी आपल्या परंपरागत चाकोरीतून बाहेर पडणं, केवळ आपल्या वैयक्तिक मुक्तीचा विचार करणं बंद करणं आणि संन्यासाच्या आदर्शासोबत सेवाभावाच्या आदर्शाचा संबंध प्रस्थापित करणं आवश्यक होतं. केवळ असं केल्यानंच भारताला पुनर्जीवन मिळू शकणार होतं. त्यांनी धर्म आणि मातृभक्तीला चलनी नाणं बनवलं.

त्यांच्या विविध भाषणांचा सारांश होता, भारतानं आपलं स्वत्व जपायला पाहिजे. राष्ट्राच्या खऱ्या आत्म्याला जागृत करणं हीच त्याला महान बनवण्यासाठी महत्त्वाची अट आहे. भारताच्या राष्ट्रीय जीवनाचा आत्मा धर्म आहे. त्यामुळे सामाजिक सुधारणा, राजकारण आणि शिक्षण या सर्वांना धार्मिक चेतनेच्या मार्गानंच सामर्थ्यशाली बनवता येईल, उच्च आध्यात्मिक जीवनाचा वेध घेतला तरच भारताचा लाभ होऊ शकेल, भौतिक प्रगतीच्या मागे लागल्यामुळे वा

पशचिमेप्रमाणे सत्तेच्या मागे लागल्यामुळे भारताला आपल्या आध्यात्मिक ध्येयाचा जर विसर पडला तर भारताचा आत्मा हरवला जाईल. सर्व भूतात एकच आत्मा असल्याचा वेदांतात जो चिरंतन भव्य विचार मांडण्यात आला आहे त्याचा भारताला अभिमानास्पद वारसा मिळालेला आहे. 'सर्व नैतिकतेचा एकच अंतिम आधार आहे आणि तो म्हणजे तुम्ही आणि मी भाऊभाऊच नाही तर आपण वास्तवात एकच आहोत.' हा आदर्श भारतानं आधी स्वतःच्या बाबतीत अंमलात आणायला हवा आणि मग तो जगासमोर मांडायला हवा.

तुम्ही वेदांताच्या शिकवणुकीला एवढं महत्त्व का देता असं विचारण्यात आलं असता ते म्हणाले की भारत 'पचनशक्ती मंदावलेल्या आणि दुबळ्या लोकांचा' देश झालेला आहे. मानवी आत्म्याच्या दैवीपणाचा मूलतः संदेश देणाऱ्या वेदांताधारित शक्तिधर्माची त्याला गरज आहे.

तेहतीस कोटी लोकांचा हा देश गेली हजार वर्षे मूठभर लोकसंख्या असलेल्या परकीय लोकांच्या गुलामगिरीत का राहत आला आहे? कारण 'त्यांची स्वतःवर श्रद्धा आहे आणि आपल्यात तिचा अभाव आहे.'

*एखाद्या इंग्रजाच्या हातून आपल्या देशबांधवाला अपमानास्पद वागणूक मिळते वा आपला देशबांधव त्याच्याकडून मारला जातो तेव्हा देशात किती रडारड होते ते मी वृत्तपत्रातून वाचतो, मीही ते वाचतो आणि रडतो, परंतु आपल्या या सर्व अवनतीसाठी कोण जबाबदार आहे असा दुसऱ्याच क्षणी माझ्या मनात विचार येतो. आपल्या उच्चकुलीन पूर्वजांची सामान्य लोकांना एवढं पायदळी तुडवलं की ते निराधार झाले. त्यांनी त्यांच्यावर एवढे अत्याचार केले करी ते गरीब, गरीब बिचारे लोक आपण माणूस आहोत हेही विसरले. शतकांपासून लोकांना अवनतीचे सिद्धान्त शिकवण्यात येत आहेत. त्यांना सांगण्यात येत होतं की तुम्ही काहीच नाही, त्यांचा आत्म्यासंबंधीचा शब्दही - खालच्याहुन खालच्या माणसातही असा आत्मा आहे की जो अजन्मा आहे, अमर आहे, विशुद्ध आहे, सर्व शक्तिमान आहे, सर्वव्यापी आहे - कधी ऐकू देण्यात आला नाही.*

*प्रत्येक माणसानं, स्त्रीनं आणि मुलानं, आपल्या जातीचा वा जन्माचा, शक्तीचा वा दुबळेपणाचा विचार न करता, आपल्या मनाला सतत सांगितलं पहिजे आणि शिकवलं पाहिजे की प्रत्येक सबळाच्या आणि दुर्बळाच्यायागे, तळागाळाच्या आणि वरच्या वर्गामागे, एक अनंत आत्मा आहे आणि त्यानं प्रत्येकाला असीम महत्ता प्राप्त करायची आणि चांगलं व्हायची अमर्याद शक्ती दिलेली आहे. प्रत्येकाजवळ आपण उद्घोषित केलं पाहिजे की... खरोखर कोणीच दुर्बल नाही, आत्मा अनंत आहे, सर्व शक्तिमान आहे आणि सर्वव्यापी आहे. उभे राहा, तुमचे हक्क बजावा, तुमच्यातील ईश्विराला प्रकट होऊ द्या, त्याला नाकारू नका.* [विवेकानंद, *माय प्लॅन ऑफ कॅम्पेन, कम्प्लीट वर्क्स*, रामक्रिष्ण मिशन, खंड ३, पृष्ठ १९१, पाचवी आवृत्ती]

त्याचवर्षी त्यांनी संन्यास आणि जनसेवेच्या माध्यमातून भारताचं सामाजिक आणि राजकीय उत्थान करायचं ध्येय असलेली रामकृष्ण मिशन या न-राजकीय संघटनेची स्थापना केली. भारताच्या प्राचीन आध्यात्मिक ज्ञानाचा संदेश भारताला आणि भारताबाहेर प्रसृत करण्यासाठी तरुणांना प्रशिक्षित करणाऱ्या विविध संघटना उभारायचा उद्देश त्यांनी जाहीर केला. या ध्येयानं प्रेरीत होऊन कार्य करण्यासाठी त्यांनी 'सशक्त, जोमदार, तरुणाईवर विश्वास असलेल्या आणि स्वाभिमानी' तरुणांना मोठ्या संख्येत पुढं यायचं आवाहन केलं. 'असे शेकडो तरुण पुढं येऊ द्या, जग क्रांतीमय झालंच म्हणून समजा.'

*'येती पन्नास वर्षं... इतर सर्व निरर्थक देवांना आपण आपल्या मनातून काढून टाकू या. ही आपली स्वतःची जनता, हाच असा एक देव आहे की जो जागा आहे. प्रत्येक ठिकाणी त्याचे हात आहेत. प्रत्येक ठिकाणी त्याचे पाय आहेत. प्रत्येक ठिकाणी त्याचे कान आहेत, प्रत्येक गोष्टीत तो व्याप्त आहे.... सर्व भक्तींमधे पाहिली भक्ती वियटाची आहे... म्हणजेच आपल्या अवतीभवती जे आहे ते.... हेच सर्व आपले देव आहेत - माणसं, प्राणी, आणि ज्या आद्य देवतेची आपण पूजा करायची आहे ते आहेत आपले देशबांधव.'* [विवेकानंद, *द फ्यूचर ऑफ इंडिया, कम्प्लीट वर्क्स*, खंड ३, पृष्ठ ३००-३०१, पाचवी आवृत्ती]

बेलूरला आधीच स्थापलेल्या मठानंतर १८८९ साली अलमोडा जिल्ह्यात मायावती येथे अजून एका मठाची त्यांनी स्थापना केली. या संस्थांना योग्यप्रकारे मार्गी लावल्यानंतर

पश्चिमेतील आपण सुरू केलेल्या कामाची गती कशी आहे ते पाहण्याकरता त्यांनी परत पश्चिमेचा दौरा केला. १९००च्यां एप्रिल महिन्यात त्यांनी न्यूयॉर्क सोडलं व युरोपमार्गे ते भारतात परतायला निघाले व त्याच वर्षी डिसेंबरमधे ते भारतात पोहोचले.

धर्मसंसदेत व त्यानंतर मिळालेल्या यशामुळे त्यांचे अनेक शत्रू झाले. त्यापैकी सर्वात कट्टर शत्रू होते ख्रिश्चन मिशनरी. त्यांचा निर्विरोध श्रेष्ठतेचा विजयरथ अडवायच्या त्यांच्या अपराधाला त्यांनी त्यांना कधीच क्षमा केली नाही. त्यांच्याबद्दलच्या विविध प्रकारच्या दुष्टपणाच्या कंड्या उठवून केवळ विशिष्ट प्रकारच्या ख्रिश्चनांशिवाय अजून कोणी करू शकणार नाही असा त्यांनी त्यांचा छळ केला. विवेकानंदांच्या प्रतिस्पर्धी भारतीय धार्मिक संघटनांनी त्यांचाच आधार घेतला. तसं करून त्यांची स्वतःची आणि भारताचीही लाजिरवाणी अवस्था केली. सहनशीलतेनं विवेकानंद अनेक वर्ष गप्प होते. परंतु अखेरीस त्यांनी त्यांचं पितळ उघड केलं. हे काम त्यांनी इतक्या जबरदस्तपणे केलं की नंतर विरोधकांनी कधीच डोकं वर काढलं नाही.

उत्तर भारताचा अजून एक, शेवटचा, प्रवास त्यांनी केला. त्यानंतरच्या वर्षी त्यांनी काश्मीरमधील अमरनाथला भेट दिली. सततच्या कामाचा ताण आणि त्यात मधुमेहाची पडलेली भर यामुळे त्यांची प्रकृती अतिशय खालावली होती. परंतु असं असूनही त्यांनी कोणताच आराम घेतला नाही. त्यांना एकच ध्यास होता. तो म्हणजे भारतीय जनतेच्या उत्थानाचं जे कार्य त्यांनी सुरू केलं होतं त्याचं. ‘नैतिक बळाचं ते असं साधन होतं की जे कधीच माघार घेऊ शकत नव्हतं.’ [विवेकानंद यांचे जुलै ९, १८९७चे पत्र, *लेटर्स ऑफ स्वामी विवेकानंद*, ४थी आवृत्ती, पत्र क्र. २५०, पृष्ठ ३९९] ‘माझ्या मुक्तीची सर्व इच्छा मी सोडली आहे, मला भौतिक सुखांची कधीच ओढ नव्हती.... जो एकच देव अस्तित्वात आहे, ज्या एकाच देवावर माझा विश्वास आहे तो म्हणजे सर्व आत्म्याची एकूण बेरीज. त्याच्या सेवेसाठी मला वारंवार जन्म मिळावा आणि सहस्र यातना मला भोगाव्या लागाव्या....’ [विवेकानंद यांचे जुलै ९, १८९७ चे पत्र, *लेटर्स ऑफ स्वामी विवेकानंद*, ४थी आवृत्ती, पत्र क्र. २५०, पृष्ठ ३९९] मठाधीश म्हणून ‘शांत चित्तानं सतत परिश्रम करायचं’ उदाहरण त्यांनी घालून दिलं. एकीकडे ते आधिभौतिक शास्त्र, संस्कृत,

पौर्वात्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान यांचे पाठ शिकवण्यात वेळ घालवायचे तर दुसरीकडे बागेत मशागतीचं, विहिरीच्या खोदकामांचं, कणिक भिजवायचं काम ते करत असत. त्यांचं प्रसिद्ध वचन होतं, 'कोणतंही काम धर्मविरहित नसतं, प्रत्येक काम हे ईश्वरभक्तीच आहे.' [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात विवेकानंदांचं उद्धरण, पृष्ठ ४२८] तसंच वेगवेगळ्या कामात अंतर आहे अशीही त्यांची मान्यता नव्हती. सर्व उपयोगी कामं ही सारखीच उदात्त असतात. मठातील त्यांच्या अनुयायांनी त्यांना जर आयुष्यभर आश्रमाच्या नाल्या साफ करायला सांगितलं असतं तर त्यांनी तसं निश्चितच आनंदानं केलं असतं. 'तेच केवळ असे महान पुढारी होते की ज्यांना सार्वजनिक कार्याची आज्ञा कशी पाळावी हे कळत होतं.

मठातील त्यांच्याबरोबरच्या महंतांना यशासाठी आवश्यक असलेल्या तीन अटी त्यांनी सांगितल्या. पहिली होती श्रद्धा. ती आतील परमेश्वराला साद घालत असते. 'तुम्ही कोणतंही काम करू शकता. जेव्हा अनंताची शक्ती अभिव्यक्त होण्यासाठी तुम्ही पुरेसे श्रम घेत नाही तेव्हाच तुम्हाला अपयश येतं. तुमच्या स्वतःवर विश्वास ठेवा....ईश्वरावर विश्वास ठेवा. मोजकेच सामर्थ्यसंपन्न लोक जगाला हालवू शकतात...... [वरीलप्रमाणे पृष्ठ ४२९]

दुसरी गोष्ट होती सर्वसंगपरित्याग. केवळ मोठा संतच (अनंताच्या सेवेला वाहून घेतलेला माणूस) महान कार्यकर्ता होऊ शकतो 'कारण त्याला कोणताच मोह नसतो.' अशा माणसाजवळील श्रद्धा पर्वतही हलवू शकते. कारण 'त्याच्यात ईश्वर वास करत असतो, तो ईश्वरात वास करत असतो.

अखेरची, परंतु तेवढीच महत्त्वाची तिसरी गोष्ट म्हणजे शौर्य. शौर्य म्हणजे 'सदैव संपूर्ण सत्य सांगायचं धैर्य, कोणत्ताही भेदभाव न करता सर्वांना, निःसंदिग्धपणे, निर्भयपणे आणि कोणत्याही प्रकारची तडजोड न करता सत्य सांगायचं धैर्य म्हणजे शौर्य. श्रीमंत वा गरीब असा विचार करायची तसदी घेऊ नका. संन्याशांना गरिबांशी कर्तव्य असतं.

धर्मसंबंधी वैयक्तिक संकल्पना सोडायला लावून स्वतःच्या धर्मसंकल्पनांत, ज्यात सार्वजनिक कार्याची तळमळ आणि आपल्या बांधवांची सेवा यांचा अंतर्भाव होता, आपल्या

अनुयायांना ढाळणं ही काही सोपी गोष्ट नव्हती. त्यांचं आग्रहपूर्वक म्हणणं होतं की श्रद्धेची कसोटी कृती आहे. माणसात जर ईश्वराविषयी जिवंत श्रद्धा असेल, आणि ज्याअर्थी ईश्वर सर्वेसर्वा आहे आणि सर्वात आहे त्याअर्थी 'ज्यानं देवाला पाहिलेलं आहे तो सर्वांसाठी आपलं जीवन अर्पण करील.' ते म्हणाले की अनेक तथाकथित भक्त वास्तवात केवळ नास्तिकच नाहीत तर नास्तिकाहूनही वाईट आहेत. 'ते धर्माबद्दल बोलतात, त्यासाठी भांडतात परंतु त्यांना धर्म कधीच नको असतो.' उलटपक्षी असे अनेक आध्यात्मिक प्रवृत्तीचे लोक आहे, समजदार लोक आहेत की जे देवावर मुळीच विश्वास ठेवत नाहीत', याचा अर्थ असा की रूढार्थानं ते देव मानत नाहीत. 'परंतु आपल्यापेक्षा देवाला ते कदाचित अधिक चांगलं ओळखत असतील.'

व्यक्तिशः त्यांना 'देव' या शब्दाचा उपयोग करणं अधिक आवडत होतं कारण अनंत काळापासून त्याचा उपयोग करण्यात येत होता; जर तो शब्द नाकारला तर प्रत्येक माणूस त्याऐवजी वेगवेगळा शब्द सुचवील. परिणाम होईल भाषेत अजून एक नवा गोंधळ.' [विवेकानंद, *कॉस्मॉस-मायक्रोकॉस्मॉस, कम्प्लीट वर्क्स,* खंड २, पृष्ठ २१०] त्याला वैयक्तिक देव म्हणून, व्यक्तिनिरपेक्ष देव म्हणून, अनंत म्हणून, नैतिक नियम म्हणून, आदर्श माणूस म्हणून वा अन्य कोणत्या नावानं ओळखण्यात येतं यामुळे काहीच फरक पडत नाही. एखादा माणूस कोणत्याही देवावर विश्वास ठेवत नसेल, त्यानं आपल्या संपूर्ण आयुष्यात कदाचित एकदाही प्रार्थना केलेली नसेल. तरीही चांगल्या कामांच्या आधारे जर आपलं जीवन आणि सर्वस्व लोकांसाठी अर्पायची त्याची तयारी झालेली असेल तर तो अशा अवस्थेत पोहोचला असेल 'की जिथे धार्मिक माणूस आपल्या प्रार्थनेद्वारे आणि तत्त्वज्ञ आपल्या ज्ञानाद्वारे पोहोचलेला असतो.' [विवेकानंद, *कर्मयोग,* प्रकरण ६, *कम्प्लीट वर्क्स,* खंड १, पृष्ठ ८४] देवाला पाहायचा एकच खरा मार्ग आहे आणि तो म्हणजे त्याचं माणसातून दर्शन घेणं. भूतकाळ कितीही गौरवास्पद असला तरीही कोणालाही भूतकाळावर अवलंबून राहणं परवडू शकणार नाही. त्यांना आपल्या भूतकाळाचं समर्थन वर्तमानकाळाच्या आधारे करावंच लागेल.

आपल्याच मुक्तीत दंग असणाऱ्या स्वार्थी भक्तांच्या वृत्तीविरुद्ध त्यांनी कडक कोरडे ओढले. माणसानं इतरांच्या मुक्तीची कामना करायला हवी. 'आपण गावोगावी जाऊ या आणि गरिबांच्या सेवेत स्वतःला वाहून घेऊ या. आपल्या चारित्र्याच्या, आध्यात्मिकतेच्या आणि साधेपणाच्या आधारे श्रीमंतांचं जनतेच्या प्रती काय कर्तव्य आहे ते त्यांना आपण समजावून सांगू या.... ' मेंदूतील रक्तस्रावामुळे अर्धांगवायुच्या धोक्याबद्दल ते बोलले आणि सांगितलं की त्याचप्रमाणे भारतीय समाजपुरुषाच्या अंगात विषम प्रमाणात संपत्तीचा संचय झाला तर भारतालाही अर्धांगवायुचा धोका राहणार आहे. 'देशाच्या कण्याप्रमाणे असलेल्या, संपूर्ण देशासाठी धान्य पिकवणाऱ्या गरीब, नग्न आणि दुर्दैवी लोकांची त्यांनी आठवण करून दिली.' [विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स*, खंड ७, पृष्ठ १४६] त्याशिवाय लाखो तथाकथित अस्पृश्य होते. 'जोपर्यंत त्यांची अस्पृश्यतेतून मुक्ती होत नाही तोपर्यंत देश जागा होऊ शकत नाही.' [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, पृष्ठ ४४९] रोमॉ रोलॉ यांच्या शब्दात सांगायचं तर 'त्यांनी सभोवती दैवीपणाचं वलय निर्माण केलं व तिला धर्माची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.'

त्यांची शिकवणूक होती की 'जर सेवा खऱ्या भक्तिभावानं केली तर ती आध्यात्मिक प्रगतीचं सर्वात मोठं साधन बनते.... मरणाऱ्या माणसासाठी आपला जीव द्यायची तयारी ठेवून कामाला सुरुवात करणं हाच खरा धर्म आहे.' [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात विवेकानंदांचं उद्धरण, पृष्ठ ५७२] १८९९च्या साथीच्या रोगाच्या दिवसात एक पंडित त्यांना भेटायला आले होते. त्यांनी तक्रार केली की स्वामीजींना धर्मचर्चा करण्याकरता भेटायला वेळ नाही. ते म्हणाले होते, 'माझ्या देशातील एक कुत्रा जरी उपाशी असेल तर त्याला खाऊ घालणं हाच माझा धर्म असेल.' [वरीलप्रमाणे] भारतात सुसंवाद आणि ऐक्य प्रस्थापित करण्यातील अडचणींसंबंधी तक्रार करणाऱ्या आपल्या एका शिष्याची खरडपट्टी काढताना ते म्हणाले, 'तू तुझ्या कर्मफळांचा विचार करायलाच पाहिजे का?.... एक जन्म तू इतरांच्या प्रेमासाठी घालवू शकत नाही?' थोडं थांबून ते पुढं म्हणाले, 'एवढी तपश्चर्या केल्यानंतर मी या निष्कर्षावर आलो आहे : तो सर्व प्राणीमात्रात आहे. ते त्याची विविध रूपं आहेत. त्याशिवाय वेगळा असा दुसरा कोणताही परमेश्वर नाही की

ज्याच्या प्राप्तीचा प्रयत्न आपल्याला करता येईल. जो सर्व प्राणीमात्रांची सेवा करतो केवळ तोच ईश्वराची सेवा करतो ! [वरीलप्रमाणे, पृष्ठ ४४९]

गांधीजींप्रमाणेच शुक्रवारी एकाएकी त्यांचा मृत्यू झाला. ती तारीख ४ जुलै १९०२ होती. त्या वेळी ते केवळ एकोणचाळीस वर्षांचे होते.

**७**

'हे धार्मिक युद्ध आहे हे परतपरत सांगताना मला लाज वाटत नाही. आपला राजकीय दृष्टिकोन बदलायचा म्हणजे आपल्या राजकारणात क्रांतिकारक बदल करायचा हा प्रयत्न आहे हेही वारंवार सांगताना मला लाज वाटत नाही' असं आपल्या अहिंसक आंदोलनाच्या दरम्यान गांधीजींनी सांगितलं. त्यांच्या त्या वेळच्या उद्‌गारांचा नीट अर्थ माहीत नसलेल्या लोकांकडून त्यांच्यावर टीकेचा बराच भडिमार झाला आणि अजूनही अधूनमधून तो होतच असतो. धर्माचा त्यांचा अर्थ एखादा विशिष्ट धर्म नव्हता तर वैश्विक अथवा आध्यात्मिक दृष्टिकोनातील धर्म असा त्यांचा त्या शब्दातील अर्थ होता. भारताच्या विचारभूमीत हाच धर्म अतिशय खोलवर मुरलेला आहे. धर्माच्या वैश्विक अर्थाचा पुनर्शोध हा काही विवेकानंदांचा लहानसहान शोध नव्हता. विवेकानंदांनी शिकवलं की खरा धर्म म्हणजेच 'आत्म्याचं वैश्वीकरण'. 'जगात जे काही अस्तित्वात आहे, चांगलं आहे आणि महान आहे त्याला आपल्यात सामावून घ्यायचा आणि भविष्यात स्वतःत असीम विकास घडवून आणायचा आदर्श भविष्यातील धर्मासमोर असायला पाहिजे .' [विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स*, खंड २, पृष्ठ ६७, पाचवी आवृत्ती] जोपर्यंत धार्मिक संकल्पना वैश्विक दृष्टिकोनाच्या या पातळीपर्यंत पोहोचत नाहीत तोपर्यंत धर्माला पूर्णत्व प्राप्त होऊ शकत नाही.

धर्म जोपर्यंत काही निवडक लोकांच्या वा महंतांच्या हाती होता तोपर्यंत तो केवळ 'देवळात, चर्चमधे, पुस्तकात, दरबारी समारंभात आणि विधिविधानात' होता. परंतु जेव्हा आध्यात्मिक आणि विश्वात्मक अंगातून त्याची अभिव्यक्ती होऊ लागेल तेव्हा तो जिवंत आणि खरा धर्म होईल. 'त्या वेळी तो आपल्या स्वभावाचा भाग बनलेला असेल, आपल्या प्रत्येक क्षणात

त्याचं अस्तित्व राहील, आपल्या समाजाच्या रंध्रारंध्रात तो प्रवेश करील आणि आजपर्यंत कल्याण करायचं त्याचं जे सामर्थ्य होतं त्याहून अधिक सामर्थ्य त्याच्यात असेल.' [*विवेकानंद, द नेसेसिटू ऑफ रिलिजन, विवेकानंद, कम्प्लीट* वर्क्स, खंड २, पृष्ठ ६७, पाचवी आवृत्ती] असा विचार केला तर धर्माचे दिवस भरलेले नाहीत तर ते आता सुरू होत आहेत असंच म्हणावं लागेल. 'नीट कल्पना नसल्यामुळे अनेकांची धारणा आहे की धर्म ही भूतकालीन गोष्ट आहे. परंतु तसं नसून भूतकाळापेक्षाही ती भविष्यकालीन गोष्ट अधिक आहे.' [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया,* पृष्ठ ५४३] विज्ञानाच्या प्रगतीनं माणसाच्या हातात जसजशी अधिक शक्ती येते आहे तसतशी माणसाला आत्मविनाशापासून वाचवण्यासाठी धर्माची अधिक गरज पडणार आहे.

व्यापक अर्थानं विचार केला तर धर्म विज्ञानविरोधी नाही. विज्ञान आणि धर्म हे दोन्ही माणसाच्या सत्याच्या शोधाची अभिव्यक्ती आहेत. एकाचा संबंध मानसिक घटना आणि वैयक्तिक अनुभवाचे विविध प्रकार यांच्याशी आहे तर दुसऱ्याचा - तथाकथित आधिभौतिक विज्ञाने - भौतिक घटनांशी असतो. मानवसमाजाला दोघांचीही गरज आहे; एकालाही नाकारता येऊ शकत नाही. आपल्याला 'गुलामगिरीबाहेर पडायला मदत करायचा हे दोघंही प्रयत्न करतात.' [विवेकानंद, *प्रॅक्टिकल वेदांत,* विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स,* खंड ७, पृष्ठ १०१, दुसरी आवृत्ती] विज्ञान धर्माचा स्वीकार करो वा न करो खऱ्या अर्थाच्या धर्माला विज्ञानाला नाकारणं परवडू शकत नाही. ज्यांचं कार्य सत्याचा शोध घेणं असतं त्या सर्वांना आपल्यात सामावून घेण्याएवढा धर्म निश्चितच व्यापक आहे.

अशाप्रकारे धर्म जर विज्ञानाला झिडकारू शकत नसेल तर मग धर्म इतर धर्मांना कसा नाकारू शकतो आणि आपणच तेवढे अस्खलनीय आहोत असं तो कसं म्हणू शकतो? 'देवाचा ग्रंथ संपला काय? की ईश्वरी ज्ञानाचं प्रगटीकरण अजूनही सुरूच आहे? विवेकानंदांनी विचारलं. 'बायबल, वेद, कुराण आणि इतर सर्व पवित्र धर्मग्रंथ यांत किती तरी पानं आहेत आणि अजून अनंत पानं आपल्यासमोर उघडली जायची आहेत.' त्यामुळे 'भूतकाळात जे होतं त्या सर्वांचा आपण स्वीकार करायला पाहिजे, वर्तमानात मिळणाऱ्या प्रकाशाचा आनंद आपण घ्यायला हवा

आणि भविष्यकाळात जे येईल त्याचा स्वीकार करण्याकरता आपल्या हृदयाच्या खिडक्या आपण उघडायला हव्या.’ [विवेकानंद, *द वे टु द रिअलाइझेशन ऑफ अ युनिव्हर्सल रिअलाईझेशन*, विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स*, खंड २, पृष्ठ ३७२, दुसरी आवृत्ती] प्रत्येक समाजाच्या तत्कालीन गरजांनुसार, आकांक्षांनुसार आणि प्रकृतीनुसार आणि त्या त्या काळातील आव्हानांनुसार आपल्या अपूर्णतेसह का होईना श्रद्धेच्या सर्व महान व्यवस्था वैश्विक सत्याचा काही विशिष्ट भागच अभिव्यक्त करत असतात, त्यामुळे आपला परवलीचा शब्द ‘स्वीकाराचा’ असायला हवा, ‘वगळायचा’ नसावा, केवळ सहनशीलतेचा नसावा कारण त्यातून इतर धर्मासंबंधीच्या अपमानास्पद भावनेचा आणि पाखंडीपणाचा तसंच सर्व सत्याचे आपणच तेवढे मालक असल्याच्या भावनेचा वास येतो. ‘माणसाची प्रगती कधीही चुकीकडून बरोबरकडे होत नसते, बरोबरकडून अधिक बरोबरकडे होत असते.’ [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात विवेकानंदांचं उद्धरण, पृष्ठ ५५१] वेगळ्या मार्गावरून चालणाऱ्या लोकांना तुम्ही चूक नाही असं सांगणं पुरेसं नाही, प्रत्येकाला आपापल्या मार्गावरून चालायलाही आपण मदत करायला पाहिजे. कारण प्रत्येक मार्ग ईश्वराकडेच जात असतो आणि प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार जो मार्ग त्याला मिळतो त्याचं मार्गाचं अनुसरण करणं त्याच्यासाठी उचित आणि आवश्यकही असते. [विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स*, खंड २, पृष्ठ ३९२, पाचवी आवृत्ती] ईश्वर सर्व विश्वाचं केंद्र आहे. ‘केंद्रापासून तो जेवढ्या अधिक अंतरावर तेवढंच त्या दोघांतील अंतर अधिक असेल.’ [विवेकानंद, *रिलिजन ऑफ लव्ह*, विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स*, खंड ६, पृष्ठ ३०, ४थी आवृत्ती] ते केंद्राजवळ जेव्हा पोहोचतात तेव्हा सर्व अंतर नाहीसं होतं. ज्याअर्थी सूर्याच्या एकाच केंद्रात सर्व समाविष्ट होत असतात त्याअर्थी ‘सर्वांनी आपल्या श्रद्धेवर अढळ राहून आणि इतरांच्या श्रद्धांचा आदर करत सूर्याकडे जात राहणं हा एकच उपाय शिल्लक राहतो. त्यानंतर आपण, टॉलस्टॉय म्हणतात त्याप्रमाणे, ‘मुक्कामावर पोहोचल्यानंतर सर्व जण भेटू.’

इतिहासाकडे वळून पाहिलं तर आढळतं की वेदांच्या ‘**एकं सद् विप्रः बहुधा वदन्ती**' या शोधामुळे ‘प्राचीन आर्य टोळ्यांच्या देवासंबंधीच्या वादातून होणाऱ्या सर्व युद्धांना पूर्णविराम मिळाला. देवांचं अस्तित्व कायम राहिलं परंतु त्यांच्याकडे एकाच सतचं, सर्वोच्च सतचं विविध

रूपातील प्रगटीकरण म्हणून पाहिल्या जायचं.’ भारतीयांच्या रक्तात भिनलेली हीच ती परंपरा होती की ज्यामुळे भारत असा देश झाला की जिथे मुसलमान राजांनी हिंदूंच्या देवळांसाठी दान दिले आणि हिंदू धर्माचं उच्चाटन करायचा ज्या धर्मांचा हेतू होता त्या धर्मासाठी हिंदूंनी मशिदी आणि चर्च यांची उभारणी केली! [विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स,* खंड ४, पृष्ठ ५२, ४ थी आवृत्ती] या तत्त्वाचा भारताच्या राजकीय ध्येयात समावेश करण्यात आल्यामुळे नंतरच्या काळात भारतात राष्ट्रीयत्वाची भावना जन्माला यायला फार मोठी मदत झाली. या तत्त्वप्रणालीमुळे केवळ विविध धर्मांचा समतेच्या तत्त्वावर समन्वय करणारं व्यासपीठच मिळालं नाही तर विवेकानंदांनी सांगितल्याप्रमाणे त्यामुळे विज्ञान आणि धर्म यांना एकत्रित आणणारं व्यासपीठदेखील मिळालं. त्यांमुळे नंतरच्या काळात भारताच्या भवितव्याला जगानं जे आव्हान दिलं त्यालाही तोंड द्यायचं सामर्थ्य भारतात आलं. त्याशिवाय वेदांतातील विश्वात्मकता, व्यक्तिनिरपेक्षता, विवेक, औदार्य आणि आशावाद या गुणांनी लोकशाही, समाजवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांचं अध्यात्मीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या नैतिकतेचा पाया रचला. यावरच समाजाचं भवितव्य अवलंबून असतं. भविष्यात भारतानं जगासाठी करावयाचं ते खास जीवितकार्य आहे असा गांधीजींचाही विश्वास होता.

विवेकानंदांना सर्व पंथातील धर्मातील ऐक्याच्या आवश्यकतेची जाणीव असली तरी, ते महान बुद्धिमान आणि व्यवस्था निर्माते असल्यामुळे. [रोमॉं रोलॉं, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया,* पृष्ठ ५९८] ‘वैश्विक सहनशीलतेच्या’ त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या आचरणात अंतराय निर्माण झाला. ही उणीव दूर करणं आवश्यक होतं. त्यासाठी संपूर्ण प्रश्नाचा कठोरपणे पुनर्विचार करून कुणीही माझ्या धर्मात यावं म्हणून मी कुणालाही धर्मांतरासाठी प्रवृत्त तर करणारच नाही परंतु ‘मनातल्या मनात गुप्तपणे तशी प्रार्थनाही करणार नाही असं नंतर गांधीजींनी घोषित केल्याप्रमाणे ‘घोषित करणं आवश्यक होतं. [यंग इंडिया, जानेवारी १९, १९२८, पृष्ठ २२] स्वेच्छेनं केलेल्या प्रत्येक धर्मांतराबद्दल तीव्र नापसंती दाखवत ते म्हणाले, ‘जर अनेक लोकांना आपली धार्मिक वर्तन पद्धती बदलवणं आवश्यक आहे असं वाटत असेल तर ते तसं करायला स्वतंत्र आहेत हे मी नाकारू शकत नाही, परंतु तसं

पाहायची पाळी माझ्यावर आल्यास मला खेद होईल.' [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात गांधीजींचं उद्धरण, पृष्ठ ५९५] रशियात टॉलस्टॉय यांनीही स्वतंत्रपणे वैश्विक मान्यतेचं हे तत्त्वज्ञान लोकांसमोर विचारार्थ मांडलं होतं. इतरत्र याच ग्रंथात त्या तत्त्वज्ञानाचा विचार करण्यात येईल.

८

केशवचंद्र सेन यांनी एक भव्य स्वप्न पाहिलं होतं – 'देशाच्या नैतिक आणि सामाजिक उत्थानासाठी दैवत्वाच्या विचाराच्या स्रोताला योग्य दिशा द्यायचं' ते स्वप्न होतं. भारतात नवीन नैतिक जाणीव निर्माण व्हावी अशी त्यांची इच्छा होती. 'सर्व आत्म्यांचं सामाजिकीकरण होऊ द्या आणि लोकांशी म्हणजे समाजाशी तुमची जी एकरूपता आहे तिची जाणीव ठेवा' असं ते म्हणाले. भारताच्या तेहतीस कोटी लोकांना शतकांच्या शैथिल्यातून जागृत करण्यासाठी, काळानं रुजलेले पूर्वग्रह आणि कुप्रथा दूर करण्यासाठी तसंच राष्ट्राच्या मुक्तीकरता त्यांना ऐक्याच्या एका धाग्यात बांधायला हवं व विचारविनिमय करून त्यांनी संघटित प्रयत्न करायला हवे. त्यासाठी आजपर्यंत नेत्यांनी ज्या मार्गांचा आणि साधनांचा अवलंब केला होता त्यापेक्षा अधिक हेतुपरस्सरता असायला हवी आणि त्यासाठी वेगळ्या साधनसाहित्याची गरज राहील असं त्यांचं म्हणणं होतं. या नवचैतन्याचा पाया श्री रामकृष्णांच्या साक्षात्कारांनी आणि विवेकानंदांनी केलेल्या सूत्रबद्ध मांडणीनं घातला.

तीव्र, गूढ विचारांची सर्वशक्तिमानता, जाणवलेल्या सत्याचा कार्यप्रवृत्त व्हायचा स्वभाव, शब्द वा कृती यांच्या माध्यमाशिवायही जिवंत श्रद्धेचा आपला विचार वा भावना कळवण्याचं सामर्थ्य, आणि सर्वोच्चाचा अनुभव येण्यासाठी सर्व प्रकारच्या मार्गांची वैधता या सर्व गोष्टींची घोषणा करून श्री रामकृष्ण परमहंसांनी आपल्या समकालीन जगाला विचार आणि कृतीचा नवीन मार्ग दाखवला. काही पौर्वात्य आणि काही पाश्चात्त्य मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानं याच सत्याचा शोध लावला व त्यांनी जनजागृती करण्याकरता त्या अभिनव मार्गाचा अवलंब केला.

गांधीजींनी परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयोगांतून, उभारलेल्या अहिंसक संघटनेतून आणि सत्याग्रहासाठी केलेल्या वेगवेगळ्या कृती यातून त्याचा प्रत्यय आपल्याला येतो.

धार्मिक अनुभवांच्या संबंधातही वस्तुनिष्ठ पडताळणीची पद्धत श्री रामकृष्णांनी सुरू केली. विवेकानंद ज्याला ‘अध्यात्माचं विज्ञान’ म्हणतात त्याचा पाया रामकृष्णांनी घातला. ते म्हणाले ‘आधी पडताळा घ्या आणि नंतर विश्वास ठेवा, धार्मिक अनुभवानंतर विश्वास येतो आधी नाही.’ धर्मातील त्यांचे प्रयोग गांधीजींच्या ‘सत्याच्या प्रयोगा’चे पूर्ववर्ती ठरले. सर्व धर्मातील सत्यतेसंबंधीच्या त्यांच्या सिद्धान्ताचा प्रतिध्वनी गांधीजींच्या सर्वधर्मसमभावातून उमटताना आढळतो. ब्रह्मज्ञानासंबंधीच्या वादविवादांना विद्वानांचा रिकामपणाचा विरंगुळा असं म्हणून त्यांनी ज्याप्रमाणे नापसंती दाखवली होती त्याचप्रमाणे गांधीजींनीही सर्व प्रकारच्या धर्मांतराच्या कृत्यांना ईश्वरविरोधी म्हणून नापसंती दर्शवली होती.

रामकृष्णांसाठी ही काही अमूर्त वा गृहीत धरलेली कल्पना नव्हती, त्याच्यासाठी ते असं वास्तव होतं की ज्याचा अनुभव घेता येऊ शकत होता, ज्याच्याशी बोलता येऊ शकत होतं, ज्याच्याशी कोणत्याही क्षणी सल्लामसलत करता येऊ शकत होती. तुम्ही आणि मी या खोलीत बसलो आहोत याबद्दल मी जेवढा निःशंक आहे त्यापेक्षाही त्याच्या अस्तित्वाबद्दल मी अधिक निःशंक आहे असं गांधीजी म्हणायचे. ‘आतल्या आवाजाचा’ सल्ला घेतल्याशिवाय त्यांनी कोणताच महत्त्वाचा निर्णय घेतला नव्हता.

श्री रामकृष्णांनी ठासून सांगितलं की जिवंत श्रद्धेत स्वतःची अनुभूती आणून द्यायचं सामर्थ्य असते. ‘जिवंत श्रद्धेची एखाद्या भौतिक वस्तूप्रमाणे देवघेव करता येते आणि जगातील इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक सार्थपणे.’ [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात रामकृष्णांच उद्धरण, पृष्ठ २४२] किंवा रोमॉ रोलॉ म्हणतात त्याप्रमाणे की तुमची खात्री पटवण्याकरता कोथिंबीरीप्रमाणे काहीच करत नसते, तुम्हालाच तिचा ताजा वास घ्यायचा असतो.’

जवळपास अशाच प्रकारच्या भाषेत गांधीजींनी साक्ष दिली :

*आपल्याला कल्पना असो अथवा न नसो - आपल्या शब्दातून नव्हे, कारण शब्द हे अतिशय तोटकं माध्यम आहे - आपल्या जीवनातून आणि आपल्या उदाहरणातून आपले आध्यात्मिक अनुभव अपरिहार्यपर्ण इतरांची वाटले जात असतात व इतरांपर्यंत ते संक्रांत होत असतात. विचारांपेक्षा आध्यात्मिक अनुभव सखोल असतात. आपण जगतो हीच गोष्ट आध्यात्मिक अनुभव भरभरून वाहू लागतील हे सिद्ध करण्यास पुरेसं आहे.* [साबरमती आश्रमात आंतरराष्ट्रीय बंधुभाव परिषदेत जानेवारी १५, १९२८ रोजी झालेली चर्चा]

*जीवन हीच त्याची अभिव्यक्ती आहे.... आपण अवतीभवती सुगंध पसरवत आहोत हे सांगायला वा ज्याला डोळे आहेत त्याला दिसायला गुलाबाला पुस्तक लिहावं लागत नाही अथवा त्यावर प्रवचन द्यावं लागत नाही.... आध्यात्मिक जीवन हे गुलाबापेक्षा किती तरी अधिक सुंदर आणि सुगंधी आहे.... ज्या क्षणी जीवनातून आध्यात्मिकतेची अभिव्यक्ती होईल त्या क्षणीच वातावरण सहजपणे त्याला प्रतिसाद देईल.* [हरिजन, दिनांक १२ डिसेंबर १९३६, पृष्ठ ३५३]

आपल्या गुरूच्या एकाग्र विचाराच्या सामर्थ्याचं विस्तृत विवेचन करताना रामकृष्णांचे शिष्य स्वामी विवेकानंद म्हणाले : 'श्रेष्ठतम माणसं शांत असतात. त्यांना विचाराचं सामर्थ्य माहीत असतं; त्यांना खात्री असते की आपण गुफेत जाऊन जरी दार बंद केलं आणि केवळ पाच खऱ्या विचारांचा विचार केला आणि नंतर मृत्यू आला तरी आपले ते पाच विचार अनंत काळपर्यंत जिवंत राहतील.' [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया*, पृष्ठ ४८७] गांधीजींनी या सत्याचं स्पष्ट प्रतिपादन वैज्ञानिक पद्धतीच्या काटेकोरपणानं असं केलं : 'विचार दोन प्रकारचे असतात, सुप्त आणि कार्यरत. मेंदूत थव्यानं येणारे पहिले अगणित असू शकतात, ... त्यांना महत्त्व नाही.... खोलवर अंतःकरणातून निघालेला आणि माणसाचं संपूर्ण अस्तित्वच ज्यातून प्रतिबिंबित होतं असा एक शुद्ध कार्यरत विचार चैतन्यमय होतो आणि सुफलित बिजांडाप्रमाणे कार्य करू लागतो.' [*हरिजन*, दिनांक १० नोव्हेंबर १९४६, पृष्ठ ३९४]

असं म्हणतात की रामकृष्ण परमहंसांचा कोणताच शब्द केवळ शब्द नसायचा, ती एक कृती असायची, एक वास्तव असायचं. 'तुम्ही स्वतः जेव्हा अस्तित्वाच्या सारतत्वानं परिपूर्ण

झालेले असता तेव्हा तुम्ही जे काही म्हणाल ते घडून येईल.... जेव्हा आपल्या 'स्व'पासून नागवला गेलेला माणूस आपल्यात येतो तेव्हा त्याच्या वर्तनातूनच सद्‌गुणाच्या नाडीचे ठोके जाणवत असतात; तो इतरांसाठी जे काही करतो त्यामुळे त्यांच्या सामान्य स्वप्नांनाही एवढी महत्ता प्राप्त होते की ते ज्या कशाला स्पर्श करतात ते सत्य आणि शुद्ध होतात; ते वास्तवाचे जनक होतात. आणि तो जे काही निर्माण करतो त्याचा कधीच नाश होत नाही.' [रोमॅ रोलॉ यांनी *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात डी. जी. मुखर्जींचं दिलेलं उद्धरण, पृष्ठ १५१]

गांधीजींच्या तत्त्वज्ञानात याच आत्मशक्तीला कृतीचं तंत्र म्हणून स्थान मिळालं:

*अहिंसेत.... सक्ती नावाची अशी काही गोष्ट नसते.... सत्याग्रही सेनापतीच्या शब्दात सामर्थ्य असलं पाहिजे.... कारण विचार हे सर्व बोलांच्या व आचाराच्या मुळाशी असतवात, दुसऱ्याचा दर्जा पहिल्याशी सुसंगत असतो. त्यामुळे पुर्णपणे नियंत्रित विचार हे स्वतःच अतिशय उच्च शक्तीचे द्योयक असतात व ते स्वतःच कार्यरत होऊ शकतात... माणूस जर देवाच्या प्रतिमेच्या मागे असेल तर त्याच्या वाट्याला आलेल्या मर्यादित क्षेत्रात त्याला केवळ इच्छा करवी लागेल आणि तसं घडेल.* [*हरिजन*, दिनांक २३ जुलै १९३८, पृष्ठ १९२]

आणि पुन्हा :

अशी वेळ येते की जेव्हा व्यक्तीला अडवणं शक्य होत नाही आणि परिणामी  त्याचं वर्तन सर्वव्यापी होतं. असं तेव्हा होतं जेव्हा तो स्वतःला शून्यावस्थेत नेतो. [*हरिजन*, दिनांक ऑक्टोबर ६, १९४६, पृष्ठ ३४२]

पहिली गोष्ट घटनेचं वर्णन करते तर दुसरी ती घटना घडण्यासाठी ज्या अटी असतात त्या अटींचं सविस्तर वर्णन करते.

वैज्ञानिक सत्याचं सार हे आहे की एकदा प्रयोगाचे विशिष्ट परिस्थितीत जे निष्कर्ष अनुभवाला येतात त्याच निष्कर्षांचा अनुभव प्रयोगाच्या त्याच परिस्थितीत कुणालाही परत यायलाच हवा. वैज्ञानिक भाषेत समकालीन जगाला त्यामागील कारणपरंपरा सांगू शकणारा त्यावेळी कुणीही नसता तर श्री रामकृष्ण परमहंसांना झालेल्या साक्षात्काराचं रहस्य

त्यांच्याबरोबरच विस्मरणात गेलं असतं. स्वामी विवेकानंदांनी ती गरज पूर्ण तर केलीच शिवाय त्यांनी आपल्या गुरूच्या अमूर्त विचारांना कृतीतही आणलं, त्याचबरोबर त्यांची शिकवण आपल्या तीव्र बुद्धिमत्तेनं समकालीन जगाला समजावून सांगणारे ते भाष्यकारही झाले. पूर्व आणि पश्चिमेतील, वर्तमान आणि भूतकाळातील दरी दूर करण्यासाठी त्या दरीवरील पुलाचं बांधकाम त्यांनी केलं. त्यांच्या लेखनाचा एकीकडे टॉलस्टॉयवर परिणाम झाला तर दुसरीकडे गांधीजींवर.

केवळ दहा वर्षांच्या काळातच त्यांनी एखाद्यानं संपूर्ण जीवनात करावं एवढं कार्य केलं. आपल्या स्वप्नांचं फळ पाहण्याएवढे ते जगले नाही परंतु त्यांचे भावोत्कट उद्‌गार त्यांच्या नंतरच्याही काळात लोकांच्या अंतःकरणात प्रतिध्वनित होत राहिले. आकर्षक शब्दयोजना करायचं त्यांच्यात अद्‌भुत सामर्थ्य होतं. त्यांनी दलित मानवतेतच ईश्वर मूर्त रूपात व्यक्त होत असतो हे सांगणारा 'दरिद्रनारायण' हा शब्द भारताला दिला. कोलकाता येथील महानगरपालिकेतील सत्तारूढ असलेल्या स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमासाठी हा शब्द आधी देशबंधू दास यांनी स्वीकारला आणि भारतातील सात लाख खेड्यांना नवजीवन देण्यासाठी गांधीजींनी तो शब्द जणू काय आपल्या ध्वजावर कोरला होता.

उपाशी पोटांना धर्माची शिकवण देण्यातील व्यर्थतेची विवेकानंदांनी केलेली घोषणा घ्या अथवा त्यांचे हे उद्‌गार पाहा : 'जो सर्व प्राणीमात्रांची सेवा करतो तोच केवळ देवाची सेवा करतो... इतर कोणताही असा देव नाही की ज्याची आस आपण धरावी.' [रोमॉ रोलॉ, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* या ग्रंथात विवेकानंदांचं उद्धरण, पृष्ठ ५९५] या शब्दांचं गांधीजींच्या शब्दांशी किती साम्य आहे.

'*लक्षावधी मुक लोकांच्या हृदयात जो देव आढळतो त्या देवाशिवाय दुसरा कोणताही देव मला माहीत नाही.... आणि या लक्षावधींच्या सेवेतून मी ज्या देवाची पुजा करतो तो सत्य आहे आणि सत्य हाच देव आहे.... ज्या लोकांचा दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत पडते त्यांच्याशी मी देवाबद्दल कसा बोलू शकतो? त्यांच्यासाठी तर ईश्वर मीठभाकरीतच असू शकतो... त्यांच्याशी आधुनिक प्रगतीबद्दल बोला. त्यांच्यासमोर देवाचं नाव घेणं हा त्यांचा अपयान आहे.... आपण*

*त्यांच्याशी ईश्वराबद्दल बोललो तर ते आपल्याला सैतान समजतील... मी असं म्हणेन की एक प्रकारे आपण चोर आहोत.... जोपर्यंत देशात काम करण्यास पात्र असलेल्या माणसाला काय नाही वा काय नसल्यामुळे त्याला पोटभर जेवण मिळू शकत नाही तोपर्यंत विश्रांती घेताना अथवा भरपुर पोटभर जेवताना आपल्याला लाज वाटायला पाहिजे.'* [*अ गुड एन्डिंग, हरिजन,* मार्च ११, १९३९, *प्रॉफेट्स ऑफ न्यू इंडिया* पृष्ठ ४५०, गांधीजीज रिप्लाय, *यंग इंडिया,* ऑक्टोबर १५, १९३१, पृष्ठ ३१०, *गॉड्स वर्क, यंग इंडिया,* सप्टेंबर १५, १९२७, पृष्ठ ३१३, महात्मा गांधी गणेश अँड कंपनी, मद्रास, (१९१८), पृष्ठ १८९, नोट्स, द ओन्ली ॲक्टिव्हिटी, *यंग इंडिया,* ऑक्टोबर ६, १९२१, पृष्ठ ३१४]

त्यांच्या विचारातील आणि अभिव्यक्तीतील साम्य अजून किती तरी दाखवता येईल. माझं जीवन लहान लहान गोष्टींपासून बनलं आहे हे घोषित करताना गांधीजी कधीच थकत नव्हते. अहिंसेची अभिव्यक्ती क्षुद्र गोष्टीतूनच होत असल्यामुळे गांधीजींनी लोकांना मोठ्या गोष्टी विसरायला आणि लहान गोष्टींवरच लक्ष केंद्रित करायला सांगितलं; तेव्हाच त्यांना मोठी फलप्राप्ती होऊ शकणार होती. स्वामी विवेकानंद मरणासन्न होऊन बिछान्यावर पडलेले असताना भगिनी निवेदिता या शिष्येला ते म्हणाले : 'मी जसजसा मोठा होत जात आहे तसतसं मला लहान गोष्टीतील मोठेपणा जाणवू लागला आहे.... मोठ्या स्थानावर असल्यामुळे कोणीही महान होईल.... जो आपलं काम क्षणोक्षणी आणि तासंतास जिव्हाळ्यानं, शांतपणे, सतत करत राहतो त्याच्यातच खरा मोठेपणा असतो हे मला तीव्रतेनं जाणवायला लागलं आहे.' [सिस्टर निवेदिता, *मास्टर ॲज आय सॉ हिम,* पृष्ठ १९९, सहावी आवृत्ती]

मी माझ्या आजूबाजूच्या लोकांसाठी ओझं झालो आहे आणि मी त्यांच्या प्रगतीच्या आड येतो आहे असं गांधीजी विशेषतः आयुष्याच्या अखेरीस सांगत असत. स्वामी विवेकानंदांनाही ह्या गोष्टीची भयानकता काही कमी जाणवत नव्हती : 'माणूस आपल्या शिष्यांबरोबर सदैव राहून किती तरी वेळा त्याच्या आयुष्याची नासाडी करतो' असं ते एकदा उद्गारले होते. आपल्या शिष्यांनी आपल्या पायावर उभं राहावं म्हणून अनेकदा त्यांना आपल्या शिष्यांपासून दूर निघून जावंसं वाटायचं. तत्कालीन प्रश्नांसंबंधी मत विचारण्यात आलं असता त्यांनी ते मत द्यायचं

निग्रहपूर्वक नाकारलं आणि म्हणाले : ‘मी बाह्य भानगडीत पडू शकत नाही, आता मी माझ्या वाटेवर लागलो आहे.’ [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३१७]

रामकृष्ण, विवेकानंद आणि गांधीजी यांच्या अनुभवातील आणि वचनातील हे विलक्षण साम्य पाहिलं तर आश्चर्य वाटल्याशिवाय राहू शकत नाही. परंतु थोडा विचार केला असता यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही, कारण ते सर्व अनंताचे सह-यात्रेकरू होते. आत्म्याच्या शोधार्थ त्यांनी जो आध्यात्मिक प्रवास केला होता तो सारखाच असल्यामुळे त्या प्रवासाच्या दरम्यान आढळलेल्या पाऊलखुणाही सारख्याच असणं अपरिहार्य होतं. उपमा बदलून बोलायचं तर त्यांच्या अंतःकरणात एकच ईश्वरी निर्झर वाहत होता व त्यापासून त्यांनी आपला जीवनरस शोषला होता व त्यामुळे त्या सर्वांपासून सारखीच रूप-रस-गंधाची फळंफुलं बहरली होती. त्यांची समान गुणवैशिष्ट्ये त्यांची मुळं आणि त्यांनी अनुभवलेलं वास्तव सारखंच असल्याचं घोषित करत असतात. विवेकानंद आणि गांधीजी यांच्या भाषेतील आणि अभिव्यक्तीतील नातं तर अजूनच जवळचं आहे. आणि त्या दोघांनीही पाश्चात्त्य ज्ञानाच्या विहिरीतून जलपान केलं आहे यात काहीच नवल नाही.

## ९

प्रत्येक मर्त्य प्राण्याला एक निश्चित क्षेत्र, एक निश्चित आयुष्य, निश्चित क्षमता आणि प्रतिभा देण्यात आलेली असते. नियतीनं आखलेल्या मार्गावरून प्रामाणिकपणे आणि निष्ठेनं चालणं हे प्रत्येकाचं कर्तव्य असतं. बाकी सर्व त्या महान कलाकारावर अवलंबून आहे. श्री रामकृष्णांना हे माहीत होतं. स्वामी विवेकानंदांनी ते शोधून काढलं. त्यांनी नवीन प्रदेशात प्रवेश केला, ईश्वरानं अभिवचन दिलेल्या भूमीकडे जाण्यासाठी दृस्टिक्षेपातील लोकांचं त्यांनी नेतृत्व केलं. परंतु त्यांनी स्वतः त्या भूमीत प्रवेश केला नाही. जनता एक आध्यात्मिक घटक असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी त्यांच्या दारिद्र्यावर आणि मानसिक हताशेवर आपलं लक्ष केंद्रित केलं. गांधीजींच्या आधी त्यांच्याएवढ्या तीव्रतेनं भारतातील शोषित आणि दलित जनतेच्या

यातनांना कोणीही अभिव्यक्ती दिली नाही वा त्यांच्याशी एवढा एकरूपही कोणी झाला नाही. परंतु त्यामागील खोलवर दडलेल्या आर्थिक आणि राजकीय कारणांचा - ज्यांचं चिन्ह शैथिल्य, अज्ञान आणि संघटनेचा अभाव हे होतं - वैज्ञानिक पद्धतीनं अभ्यास करून त्यावरील उपाययोजना शोधणं आवश्यक होतं. यासाठी या बाबतीत तज्ज्ञ असलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या एका पिढीच्या श्रमाची गरज होती.

भारतातील प्रत्येक राष्ट्रीय कार्य आध्यात्मिक पातळीवर करावं असं विवेकानंदांनी धीटपणानं सांगितलं असलं तरी राजकीय कार्याच्या संपूर्ण क्षेत्राचा मात्र त्यांनी या बाबतीत अपवाद केला होता. त्या काळातील राजकारणाच्या स्वरूपावरूनच त्याला अनैतिक समजलं जायचं - मूलतःच तो घाणेरडा खेळ आहे असं मानण्यात यायचं. त्याचंही अध्यात्मीकरण करायला पाहिजे हा विचारच तोपर्यंत कोणाला सुचला नव्हता. त्या घाणेरड्या छिद्रात शिरायची कल्पनाच विवेकानंदांना तिरस्करणीय वाटायची. परंतु राजकीय क्षेत्रातील प्रभावी थैतिक निर्बंधाची उणीव त्याहीपेक्षा विवेकानंदांना सलत असावी. त्यामुळे त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी स्वतः आणि राजकारण यामध्ये नग्न तलवार ठेवलेली होती. ते काहीही असलं तरी आजच्या गुंतागुंतीच्या जगात जोपर्यंत माणूस संपूर्ण मानवजातीशी तादात्म्य पावत नाही तोपर्यंत माणसाला धार्मिक जीवन जगणं शक्य नाही आणि त्यामुळे माणसाला राजकारणापासून पळ काढणं शक्य नाही. विवेकानंदांनी राजकारणाला दूर ठेवल्यामुळे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात धार्मिक नीतिनियमांचं पालन करणं आणि राजकीय क्षेत्रात नीतीअनीतिचा विचार न करता काम करणं अशा प्रकारचं दुहेरी जीवन जगण्याशिवाय माणसासमोर दुसरा पर्याय उरला नव्हता. वा असं म्हणायलाही हरकत नाही की अजून एक पर्याय माणसाला उपलब्ध होता व तो म्हणजे पापापासून दूर पळून अप्रत्यक्षपणे पापात सहभागी व्हायचा. यांतील काहीही केलं तरी मनोधैर्य गमावलं जाणं हा त्याचा अपरिहार्य परिणाम होताच. व्यक्तीची आणि राष्ट्राची आध्यात्मिक अखंडता कायम ठेवण्यासाठी राजकारणात नैतिक मानदंड आणणं आवश्यक होतं व आत्मशुद्धी

आध्यात्मिक प्रगतीच्या आड राजकारणाचा अडथळा येऊ नये अथवा ते किमान अपरिहार्य पातक ठरावं म्हणून तरी असं करणं आवश्यक होतं.

अखेरीस विवेकानंदांनी आत्म्याच्या सर्वशक्तिमानतेची आणि तपश्चर्येच्या सामर्थ्याची घोषणा केली असली तरीही सामुदायिक कृतीद्वारे आत्मशक्ती विकसित करायच्या तंत्राचा शोध अजून लागायचा होता. सामुदायिक कार्याच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या आवाक्यात तपश्चर्येला आणून तिचा उपयोग राष्ट्रीय उत्थानासाठी करणं आवश्यक होतं.

आपल्या अस्तित्वाचा नियम म्हणजे स्वयंनियंत्रणाची संकल्पना या अर्थानं अहिंसेपर्यंत विवेकानंद निश्चितपणे पोहोचले असल्याचं दिसून येत नाही. त्यांच्यासाठी अहिंसा अजूनही नीतिशास्त्र, शाश्वत सुख आणि अतिशय उच्च श्रेणीचा वैयक्तिक गुण होती - सतासताच्या युद्धातील प्रभावी अस्त्र म्हणून ती अजून विकसित व्हायची होती. गांधीजींनी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीतील असताच्या विरोधातील रामबाण अस्त्र म्हणून तिला अजून स्थान प्राप्त झालेलं नव्हतं.

संन्यासी आणि गृहस्थाश्रमातील लोक यांच्यातील दीर्घकाळापासून चालत आलेलं अंतर मान्य करत विवेकानंदांनी पुढील नियम घालून दिला होता : संन्याशांसाठी अप्रतिकार आणि गृहस्थाश्रमातील लोकांसाठी आत्मसंरक्षण [*लाईफ ऑफ विवेकानंद*, १९१५ आवृत्ती, खंड ३, पृष्ठ २७९] राष्ट्राच्या नामर्दपणावरील उपाय म्हणून सैनिकी संगीताचा ते अनेकदा उतावीळपणानं उपदेश करत. ते म्हणायचे की वेदांताचा पुरस्कार भ्याड लोक कदाचित करू शकतील, परंतु त्यानुसार आचरण अतिशय सुदृढ अंतःकरणाचे लोकच करू शकतात. प्रतिकाराची क्षमता आणि सामर्थ्य असूनही जाणीवपूर्वक प्रतिकार न करणं या गोष्टीचा अप्रतिकाराच्या तत्त्वज्ञानात अपरिहार्यपणे समावेश होतो. हे खरं असलं तरीही या गृहीतकावरून त्यांनी काढलेला व्यावहारिक निष्कर्ष – देवदूतांचा ताफा तुम्ही तुमच्या विजयासाठी सहजपणे आणू शकत असाल तर (व तुमची इच्छा असेल तर) क्षमा करा. [वरीलप्रमाणे]

- मात्र वेगळाच होता. क्षमेच्या आचरणासाठी भौतिक विजयाच्या आश्वासनाची अट आधीच घालता येऊ शकत नाही. जर निर्धार पक्का असेल आणि हृदयात खरी क्षमा असेल तर तत्त्वाचा वा हेतूचा विजय हा केव्हाकेव्हा पराभवातूनही होऊ शकतो.

काश्मीर आणि अमरनाथची १८८८ साली त्यांनी केलेल्या यात्रेत युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतीचं त्यांना दर्शन झालं होतं. ते पाहून विवेकानंद उद्गारले : 'अशा प्रकारच्या घटना घडूच कशा दिल्या जातात? मी जर तिथं असतो तर 'आईच्या' रक्षणासाठी मी माझा जीव दिला असता.' [सिस्टर निवेदिता, *मास्टर अॅज आय सॉ हिम*, पृष्ठ १३२, सहावी आवृत्ती] पण त्यावेळी त्या कूटप्रश्नातून त्यांनी असा मार्ग काढला : 'आई मला म्हणाली, 'माझ्या देवळात पाखंडी लोक आले आणि त्यांनी देवळाचं पावित्र्य भंग केलं तरी काय झालं!! त्यामुळे तुझ्यावर काय परिणाम होतो? तू माझं रक्षण करतोस की मी तुझं रक्षण करते?' अंतःकरणात खदखदत्या ज्वालामुखीचं सामर्थ्य असलेले विवेकानंद जेव्हा अशा प्रकारची भूमिका घेतात तेव्हा रोमॉ रोलॉ म्हणतात त्याप्रमाणे विवेकानंदांना आपल्या स्वाभाविक अभिनिवेशाचा विसर पडून प्रभावी आध्यात्मिक निर्बंधाच्या अभावामुळे आपल्या खोलवर रुजलेल्या भावनांच्या विरोधात कदाचित जाणं भाग पडलं असावं. आवश्यक कर्तव्य पार पाडण्यापासून करून घेतलेली सुटका म्हणजे त्यांचा राजकारण संन्यास असल्यासारखा जाणवतो. कदाचित ते कर्तव्य पार पाडताना नैतिकतेची हानी होईल असं त्यांना वाटलं असावं.

'एखादा मजबूत माणूस दुर्बळाला छळत असल्याचं दिसत असताना काय करावं?' असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. ते उत्तरले, 'मजबूताला झोडपून काढा.' [*लाईफ ऑफ विवेकानंद*, १९१५ आवृत्ती, खंड ३, पृष्ठ २७९] शूराच्या अहिंसेच्या संदर्भात भित्रेपणानं अत्याचाराला दिलेल्या मूकसंमतीला तसंच स्वसंरक्षणार्थ तात्पुरता उपाय म्हणून अत्याचाराला अत्याचारी मार्गानं दिलेल्या उत्तराला गांधीजींच्या तत्त्वज्ञानात स्थान नव्हतं. त्यामुळे गांधीजींना आपल्याला जाणवलेल्या सत्याचा सिद्धान्त विकसित करावा लागला.

अहिंसेच्या विद्यार्थ्याला अजूनही काही अडचणींना तोंड द्यावं लागत असतं. रामकृष्णांना अथवा त्यांच्या शिष्यांना मांसाहाराचं, वा गमतीखातर एखादवेळी केलेल्या धूम्रपान वावडं नव्हतं. विवेकानंदांसाठी अन्नात निषिद्ध असं काहीच नव्हतं. बौद्ध धर्माच्या प्रभावामुळे भारतात मांसाहार वर्ज्य मानण्यात आल्यामुळेच भारत दुर्बल झाला व त्याची परागती होऊ लागली असं त्यांचं मत होतं. कालीसमोर पशूबळी देऊन जी पूजाअर्चा चालते तिच्यापासून रामकृष्णांनी आपला संबंध तोडला की नाही हे आम्हांला माहीत नाही. तसंच कोणत्याही परिस्थितीत हिंसेला वगळायला विवेकानंदांचं जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगत असल्याचं जाणवत नाही. भारताची गुलामगिरी संपवण्यासाठी आतंकवादी पद्धतीचा वा सैनिकी आक्रमणाचा उपयोग करायला तत्त्वतः विवेकानंदांची संमती दिली असती की नाही या प्रश्नाचं उत्तर देणं कठीण आहे. परंतु त्यांची शिष्या भगिनी निवेदिता यांना मात्र तो मार्ग चुकीचा वाटत नव्हता.

या सर्व गोष्टीत आपल्या गुरूप्रमाणे ते सनातनी भारतीय परंपरांचं प्रतिनिधित्व करत होते. ती परंपरा धर्मग्रंथात सांगितलेल्या प्रसंगांशिवाय इतर सर्व प्रसंगी हिंसेला वर्ज्य मानते. परंतु नियम कुठेही अपवाद करत नाही. आत्मा संपूर्ण असल्यामुळे त्यात कोणतीही गोष्ट इतर भागांवर परिणाम केल्याशिवाय घडू शकत नाही. त्यामुळे अहिंसेच्या नियमाच्या एका ठिकाणच्या भंगाला मान्यता देण्यात आल्यास इतरत्रही त्याची मान्यता राहू शकत नाही. अहिंसेनं सर्वत्र पसरायला हवं आणि आपल्या अस्तित्वाच्या रंध्रारंध्रातून तिचं दर्शन व्हायला हवं. 'चांदणीला व्यथित केल्याशिवाय आपण फुलालाही स्पर्श करू शकत नाही' असं एका कवीनं लिहिलं आहे. आपलं खाणं, पिणं, वस्त्रप्रावरण, काम, करमणूक, विश्रांती, झोप, खर्च अथवा बचत, बोलण्या-चालण्याची आपली पद्धत, आपल्या उदरनिर्वाहाच्या साधनांचे मार्ग या सर्वांना वैश्विक प्रेमाच्या नियमाच्या दृष्टीनं नैतिक महत्त्व आहे आणि अहिंसेच्या शक्तीची संपूर्ण अभिव्यक्ती होण्याकरता माणसाला या नियमांचं पूर्णपणे काटेकोर पालन करावं लागत असतं.

हे म्हणायचा असा अर्थ नाही की मांसाहाराचा, खेळासाठी वा अन्नासाठी हिंसेचा शपथपूर्वक त्याग केल्यामुळे वा जाणीवपूर्वक अहिंसेच्या नियमाचा स्वीकार केल्यामुळे

आपोआपच अहिंसेच्या शक्तीची अभिव्यक्ती होते. असं असतं तर केवळ शाकाहारी लोक अथवा विशिष्ट विचारांवर वा तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवणारा लहानसा वर्ग हेच अहिंसाधर्माचं पालन करू शकतात असा याचा अर्थ झाला असता. परंतु तसं नाही, वास्तव याच्या अगदी विरुद्ध आहे. अहिंसा हा आपल्या अस्तित्वाचा कायदा आहे. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणे आपल्याला जाणीव नसली तरी तो कार्यरत असतोच. क्रोपाटकिन (म्युच्युअल एड अॅज अ फॅक्टर इन इव्हाल्यूशन), वॅलेस, कोनार्ड झेड. लॉरेन्झ (किंग सालोमन्स रिंग) तुर्गनेव्ह इत्यादी प्रख्यात समाजशास्त्रज्ञ, निसर्गाचे अभ्यासक आणि प्रतिभाशाली व दूरदृष्टीचे लोक यांनी संपूर्ण विश्वात अहिंसेचा नियम कार्यरत असल्याची साक्ष दिलेली आहे. एवढंच नाही तर रानटी माणसात, नरमांसभक्षक माणसात आणि क्रूर पशुतही हा नियम कार्यरत असतो. हिंसा, मांसाहार अथवा इंद्रियभोग यांच्यापासून दूर राहणं ही त्याची काही अंगं आहेत. परंतु तेच सर्व नाहीत. एखादी व्यक्ती या नियमांचं पालन अतिशय काटेकोरपणे करत असेल आणि तरीही ती स्वार्थी, निष्ठुर आणि पाषाणहृदयी असू शकेल; उलट दुसऱ्या एखाद्या व्यक्तीनं याचा विचारही केला नसेल आणि तरीही ती कनवाळू, प्रेमळ, परोपकारी असू शकेल. अशी व्यक्ती पहिलीपेक्षा अहिंसेच्या शक्तीची किती तरी अधिक चांगली अभिव्यक्ती करत असते.

विश्वबंधुत्वाच्या - म्हणजेच ज्याला प्रेमाचा कायदा म्हणतात - तत्त्वज्ञानाचं या पथशोधकांनी केलेलं प्रतिपादन आणि त्याची आपल्या वर्तनातून केलेली सिद्धी यांतील तृटी दाखवायचा हेतू त्यांच्या कार्याला नावं ठेवायचा वा त्यांच्या मोठेपणाला धक्का लावायचा नाही. याचा अर्थ केवळ एवढाच आहे की माणूस ज्या परंपरांमधून वर आलेला असतो त्या परंपरांचे ठसे आध्यात्मिक क्षेत्रातील महान व्यक्तीदेखील क्वचितच पुसून टाकू शकतात. विवेकानंद हे क्षत्रिय जीवनपद्धतीत वाढलेले होते तर श्री रामकृष्ण बंगालमधे पूजिल्या जात असलेल्या शाक्त पंथातील होते. त्यामुळे ज्याप्रमाणे वनस्पतीची मुळं ज्या भूमीत रुजलेली असतात त्या भूमीच्या मातीचे काही कण ती वनस्पती अपरिहार्यपणे शोषून घेते त्याचप्रमाणे ज्या परंपरांमधून त्यांनी जीवनरसपान केलं होतं त्यांचा ठसा त्यांच्या विश्वबंधुत्वाच्या सिद्धान्तावर उमटलेला आहे यात

आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नाही. परंतु तरीही ज्या आदर्शाची शक्ती अमर्याद असते त्याची प्राप्ती करायचा प्रयत्न करत असताना त्यांच्या शुद्धीकरणालाही कोणतीच मर्यादा राहत नसते. परिपूर्णतेच्या मार्गावर अंतिम विश्रांतीस्थळ कोणतंच नसते. अहिंसेच्या ध्येयाप्रत अर्धशतक अविरत वाटचाल केल्यानंतर गांधीजी सांगतात की आपण आदर्शाकडे जसजसे जाऊ लागतो तसतसं 'टेकडीमागून टेकड्या डोकावताना दिसत असतात आणि हिमालयावर हिमालय उभे राहून आपल्याला आव्हान देत असतात.' त्यांची पूर्णपणे प्राप्ती करण्याकरता 'दीर्घ प्रयत्नांची गरज असते व ते अनेक जन्म करावे लागावे एवढे प्रदीर्घही असू शकतात.' कदाचित पूर्णपणे त्याची प्राप्ती कधीच होऊ शकणार नाही. त्यामुळे मुमुक्षुनं धीर सोडायची गरज नाही. गांधीजी सांगतात त्याप्रमाणे, 'वाटेवरून वाटचाल करत असताना यात्रेकरूला दररोज अधिकाधिक संपन्न करणारे अनुभव येत जातील व ज्या टोकावर त्याला पोहोचायचं आहे त्या टोकावरील सौंदर्याची पुसटशी छटाही त्याला दिसू शकेल.... कठोर शिस्तीचं पालन करणाराला अहिंसेच्या या भव्यतेचं दर्शन होऊ शकेल.' [*हरिजन*, डिसेंबर १४, १९४७, पृष्ठ ४६८]

अहिंसेचा व्याप वैयक्तिक स्तरापासून सामुदायिक स्तरापर्यंत वाढवण्यासाठी तिच्या अनुसरणात व्यापकता आणि शुद्धता आणावी लागेल. अहिंसेच्या काही सामाजिक परिणामांचा आपल्या दैनंदिन जीवनाच्या संदर्भात - वैशिष्ट्यानं राजकीय आणि आर्थिक दृष्टीनं – विचार करायचं काम पाश्चात्त्य विद्वानांवर आणि ऋषींवर सोपवण्यात आलं होतं. त्यांचा त्याकडे पाहायचा दृष्टिकोन बहुतांशानं बुद्धिवादी होता व त्यांना त्याच्या अनुसरणात विविध प्रमाणात यश मिळालं. उलटपक्षी गांधीजींना आधी त्याची जाणीव झाली आणि नंतर त्यांनी त्याची कारणमीमांसा केली. ह्या कारणमीमांसेत पाश्चात्त्य विद्वानांच्या लेखनाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांच्या भाषेवर आणि अभिव्यक्तीवर त्यांचा गडद रंग चढलेला आहे. परंतु गांधीजी जेव्हा मूलभूत गोष्टींवर आले तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की ते या बाबतीत फारसे पुढे गेलेले नाहीत आणि गांधीजींना आपल्या विचारांचा पाया मजबूत करण्यासाठी परत प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानांचा - वेदांत आणि जैन तत्त्वज्ञानांचा – आधार घ्यावा लागला.

## १०

बंगालमधील प्रसिद्ध लेखक आणि राष्ट्रभक्त बिधनचंन्द्र पाल यांनी लिहिलं आहे : 'प्रत्येक राष्ट्राची जगाविषयी स्वतःची वेगळी अशी कल्पना असते आणि ती त्या राष्ट्राच्या खास वातावरणातून, वैशिष्ट्यपूर्ण संस्थातून आणि राजकारणातून विकसित होत असते.' [अर्ल ऑफ रोनाल्डशे, *द हार्ट ऑफ आर्यव्रित*, पृष्ठ २] ते पुढं सांगतात की भारताच्या बाबतीत भारताच्या इतिहासातील मध्यवर्ती सत्य हे आहे की ते 'वेदांतातील मूलभूत तत्त्वज्ञानावर म्हणजे सर्व जिवातील एकात्मतेवर आधारित आहे व त्यातून तर्कशुद्ध अनुमानाकडे जायचं तर आपल्याला माणूस आणि ईश्वरात अद्वैत असल्याचं मान्य करावं लागतं.'

असं दाखवण्यात आलं आहे की भारताच्या इतिहासातील निर्णायक क्षणी दोनदा अद्वैतानं भारताला वाचवलेलं आहे. अतिशय घृणित अशा जडवादानं भारत व्यापलेला असताना बुद्ध निर्माण झाला. 'शासक वर्गाच्या नैतिक अधःपातामुळे आणि खालचा वर्ग अंधश्रद्धांनी ग्रासला गेल्यामुळे' भारताचा जीवनस्रोत आटू लागला तेव्हा शंकराचार्यांनी वेदांतातील जीवनविषयक तर्कसंगत तत्त्वज्ञानाचा संदेश परत देऊन देशाला नवजीवन प्राप्त करून दिलं. शतकांच्या प्रवासात वेदांताचा चैतन्ययुक्त दृष्टिकोन हरवला गेला आणि वेदांताला शुष्क आधिभौतिक तत्त्वज्ञानाचं स्वरूप आलं. अंदाज वर्तवायच्या शास्त्राच्या घसरत्या वाळूचं त्याला जे स्वरूप आलं होतं त्यातून विवेकानंदांनी त्याला बाहेर काढलं आणि कृतीची प्रेरणा देणाऱ्या समर्थ शास्त्राचं रूप त्याला आणून दिलं.

ते म्हणाले की गुफा आणि जंगलांमधे नको तेवढ्या दीर्घ काळापासून वेदांत लपलेला आहे. एकांतवासातून त्याला बाहेर काढून कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात त्याचा प्रवेश घडवून आणणं हे त्यांचं जीवितकार्य झालं होतं. राष्ट्रीय जीवनाचं कोणतंही अंग त्यापासून अस्पृष्ट राहणार नाही अशी वेळ यायचं स्वप्न ते पाहत होते : 'अद्वैताचा नगारा प्रत्येक ठिकाणी - बाजारात, पर्वतशिखरावर आणि मैदानी प्रदेशातही - वाजला जायला हवा.' [विवेकानंद, *कम्प्लीट वर्क्स*, खंड १, पृष्ठ २८८, पाचवी आवृत्ती]

चार्ल्स बदाऊं यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण मानसशास्त्रीय अभ्यासातून दर्शवलं आहे की कर्मपरायणता आणि अकर्मण्यता, युद्धप्रवृत्ती आणि दूर राहण्याची प्रवृत्ती या गोष्टी परस्पर पूरक आहेत. ढळणाऱ्या असमतोलातून दोन्हीही मिळून अशी एक व्यवस्था निर्माण करतात की जिच्यात प्रतिक्रिया आणि अंतर्मुखता, पुढाकार आणि बहिर्मुखता या प्रवृत्तीमुळे होणारी तालबद्ध हालचाल परस्परपूरक होते. दुसरे एक महनीय तत्त्वज्ञ डॉ. राधाकृष्णन सांगतात की 'ताणतणावापासून शांतता आणि मनन चिंतनापर्यंत, वादळापासून तर निरवतेपर्यंत, संघर्षापासून तर शांततेपर्यंतच्या' [डॉ. एस. राधाक्रिष्णन, *रिलिजन अँड सोसायटी*, जॉर्ज ॲलन अँड अलविन लि., लंडन, (१९४७), पृष्ठ ७७] ह्या तालबद्धतेचं दर्शन ध्येयाला वाहून घेतलेल्या सर्व लोकोत्तर पुरुषांमधे होते. स्वतःहोऊन सर्व गोष्टींपासून ते जेव्हा अलिप्त होतात चिंतन करतात त्यावेळी त्यांना जो अनुभव मिळतो तो ते धकाधकीच्या जगाला देतात आणि 'शांत एकांतात जी नवी दृष्टी प्राप्त होते तीच वादळात मार्गदर्शन करत असल्याचं सर्वत्र आढळते. प्रतिभाशाली लोक आपल्या स्वप्नांच्या धाग्यांनी वास्तवाचं वस्त्र विणत असतात.' [वरीलप्रमाणे]

जीवनाचं व्यावहारिक तत्त्वज्ञान म्हणून अद्वैत तत्त्वज्ञानानं भारतीय लोकांना त्यांच्यातील निर्मितीक्षमतेच्या वा नवजीवन देणाऱ्या शक्तीच्या अक्षय साठ्याची जाणीव करून देऊन कृतीकरता प्रचंड शक्ती उन्मुक्त केली. त्यानं घोषित केलं :

*माणसानं आपलं साम्राज्य कधीच गमावलेलं नाही. आत्मा कधीच बांधला जाऊ शकत नाही. तो स्वभावतःच स्वतंत्र आहे. त्याला कोणतंही कारण नाही. तो कारणांच्या पलीकडील आहे. त्याच्यावर कोणीच बाहेरून पारिणाय करू शकत नाही.... विश्वास ठेवा की तुम्ही स्वतंत्र आहात आणि राहाल.... वाय वाहत आहे. ज्या जहाजांची शिडं मोकळी आहेत ते त्याला पकडतात, आणि ते आपल्या मार्गानं पुढं जातात, परंतु ज्यांची शिडं मिटलेली आहेत ते वाऱ्याला पकडू शकत नाहीत. तो काय वाऱ्याचा दोष आहे? ....माणसालाही दोष देऊ नका आणि देवालाही दोष देऊ नका आणि जगातील अन्य कुणालाही दोष देऊ नका, स्वतःलाच दोष द्या आणि पुन्हा चांगला प्रयत्न करा.... तुम्हाला गरज असलेली सर्व शक्ती आणि संकटकालीन मदतीचं केंद्र*

*तुमच्यातच आहे. त्यामुळे तुमचं भविष्य तुम्हीच घडवा.* [विवेकानंद, *द लिबर्टी ऑफ द सोल*, (नोव्हेंबर ५, १८९९), *कम्प्लीट वर्क्स*, खंड २, पृष्ठ २२४, पाचवी आवृत्ती]

त्याच्या जलद परिणामकारकतेमुळे पूर, दुष्काळ, भूकंप, साथीचे रोग आदींसारख्या नैसर्गिक संकटात लोकांना मदत करण्यासाठी स्वयंसेवकांच्या संघटना देशात ठिकठिकाणी उभ्या राहिल्या. आश्रम, सेवासमित्या, शुश्रूषागृह, स्त्रिया आणि पुरुष या दोघांसाठीही शैक्षणिक संस्था या गणिती श्रेणीनं वाढू लागल्या. सेवाभावनेनं ओतप्रोत भरलेले तरुण वाढत्या संख्येत पुढं येऊ लागले. भारत कुंभकर्णीय झोपेतून जागा झाला होता.

भारताच्या राष्ट्रीय जागृतीचा परवलीचा शब्द होता ऐक्य. देशात विविध जातीचे, पंथांचे, जवळपास शंभर वंशांचे, विविध भाषा बोलणारे ३३ कोटी लोक होते व त्यांची दोन मुख्य समुदायात वाटणी झालेली होती. परस्पर वैमनस्याचा आणि संघर्षाचा त्यांचा प्रदीर्घ इतिहास होता आणि अनेक जाती आणि पोटजातीत त्यांचं विभाजन झालेलं होतं. सर्व माणसांत एकच ईश्वर आहे या सर्वोच्च कल्पनेनं या देशातील विविध लोकांना एकत्र येण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ मिळालं. लोक विश्वमातेचं दर्शन मातृभूमीतून घेऊ लागले व 'मातृभूमीला तिच्या प्रतिकाचं' स्थान मिळालं. बंकीमचंद्रांच्या प्रसिद्ध 'वंदेमातरम' गाण्यात 'भारतमाता' ही पूजनीय देवता झाली. प्रत्येक राष्ट्रवादी माणसाचं ती दैवत झाली, मग त्याचा धर्म कोणता होता याला काहीच महत्व उरलं नव्हतं. जागृत भारताचा धर्म राष्ट्रभक्ती झाला होता व त्याला आपल्या सभोवती सर्वत्र 'त्याच देवाचं, त्याच्या त्याच हाताचं, त्याच्या पायांचं, कानांचं दर्शन व्हायचं.'

१९०५ साली बंगालची फाळणी झाली. त्यामुळे भारत मुळापासून हादरला. बंगाल बंड करून उठला. जवळपास दोन दशकं धुमसत असलेल्या राष्ट्रवादी आंदोलनाचा विवेकानंदांच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनी एकाएकी भडका उडाला आणि ह्या 'आत्म्याची शेकोटी किती शक्तिशाली असते ते त्यातून दिसून आलं!'

तुरुंगातून सुटका झाल्यानंतर केलेल्या जाहीर भाषणात बंगालमधील क्रांतीचे अधिनायक अरविंद घोष यांनी सांगितलं की जेव्हा मला कोणतीच वाट दिसत नव्हती तेव्हा वेदांत तत्त्वज्ञानाच्या अद्वैतातून मला शक्ती मिळाली.

*जेव्हा मला अटक झाली... तेव्हां माझ्या अंतःकरणाला त्याचे हेतू कळू शकले नाही. तेव्हा क्षणभर मी गडबडलो.... जेव्हा खालच्या न्यायालयात खटला उभा राहिला व आम्हाला न्यायाधीशासमोर आणण्यात आलं.... तेव्हा तो (ईश्वर) मला म्हणाला, 'जेव्हा तुला तुरुंगात डांबण्यात आलं तेव्हा तुझं हृदय दुभंगलं नव्हतं काय आणि तू माझ्याजवळ तुझं संरक्षण कुठं आहे म्हणून रडला नव्हतास काय? आता न्यायाधीशाकडे पाहा, आता आरोपीच्या वकिलाकडे पाहा.' मी पाहिलं आणि तो मी पाहिलेला न्यायाधीश नव्हता, तो तिथं बाकावर बसलेला वासुदेव होता, नारायण होता. मी आरोप करणाऱ्या वकिलाकडे पाहिलं आणि मी पाहिलेला वकील आरोप करणार वकील नव्हता, तिथं बसलेला तो श्रीकृष्ण होता, तिथं बसलेला माझा प्रियकर होता जो माझ्यावर प्रेम करत ह्योता आणि स्थित करत होता. 'आता तुला भीती वाटते काय?' तो म्हणाला, 'मी सर्व माणसांत आहे व त्यांचं वर्तन आणि त्यांचे शब्द मी बाजूला सारतो. अजुनही माझं तुला संरक्षण आहे आणि तुला घाबरायचं कारण नाही.'* [*स्पीचेस ऑफ श्री अरविंदो*, अरविंद आश्रम पॉन्दिचेरी, (भारत), (१९५२), पृष्ठ ५४ आणि ५८]

शिक्षा झाल्यानंतर तुरुंगात एकांतवासात असताना,

*मी म्हणालो.... मी कोणतं काय करायला पाहिजे व ते कसं करायला पाहिजे ते मला माहीत नाही. मला सांग. आणि मला सांगण्यात आलं : .... 'मी तुला दाखवलेलं आहे की मी सर्वत्र आहे आणि सर्व माणसात आहे आणि सर्व वस्तूत आहे, मी या आंदोलनात आहे आणि देशकार्यासाठी जे धडपडत आहेत केवळ त्यांच्यातच मी नाही वर जे त्यांना विरोध करतात आणि त्याच्या मार्गात उभे राहतात त्यांच्यातही मी आहे. मी प्रत्येकातून काम करत आहे आणि माणसं जो काही विचार करतात वा काम करतात तेव्हा माझ्या हेतूच्या पूर्तीशिवाय ते वेगळं काहीच करू शकत नाहीत... तू कुठं जातो आहेस ते तुला माहीत नसलं तरी तुझ्या सर्व कामातून तू*

*पुढंच जातो आहेस.... ती शक्ती आहे जी पुढं गेली आहे आणि लोकांच्या अंतःकरणात शिरली आहे. किती तरी काळापासून मी या उठावासाठी तयारी करतो आहे आणि आता वेळ आली आहे आणि त्याच्या परिपूर्तीसाठी मी पुढाकार घेणार आहे.'* [*स्पीचेस ऑफ श्री अरविंदा*, (१९५२), पृष्ठ ६२ – ६४]

आणि हा अनुभव केवळ काही अरविंद घोषांचाच नव्हता. देशासाठी आपलं जीवन अर्पणाऱ्या अनेक देशभक्तांचाही तोच अनुभव होता.

वेदांत हा शक्तीचा प्रमाणग्रंथ आहे. पण त्याचबरोबर तो अनासक्तीचाही प्रमाणग्रंथ आहे. जागृत नसलेल्या लोकांच्या डोक्यात चढण्यासाठी त्याचा दारूसारखा उपयोग होऊ शकतो. आपल्या खऱ्या अवस्थेत आत्मा, जो 'स्व'च असतो, 'तुमच्यात, सर्वात, विश्वात, विश्वाच्या आधी आणि नंतरही असतो. तो नैतिक सामर्थ्याचा अक्षय साठा आहे. परंतु अहंकारापासून पूर्णपणे मुक्ती मिळाल्यानंतरच तो कार्यरत होऊ शकतो. जेव्हा

शरीराच्या मागण्यांचा गलबला
जेव्हा होतो शांत,
अहंकारी मनाचा गोंगाट जेव्हा थांबतो,
अंतःकरणाच्या तारा ढिल्या करून
जेव्हा त्यांना करण्यात येतं मोकळं
तेव्हा बंधनात ठेवणारी बंधनं होतात ढिली
मागमूसही उरत नाही मग
मोहाचा आणि भ्रमाचा!

[*'अ साँग आय सिंग टू दी '*या विवेकानंदांच्या कवितेतील ओळी, *कम्प्लीट वर्क्स*, खंड ४, पृष्ठ ४४४, पाचवी आवृत्ती]

'सर्व खल्विदं ब्रह्म'चा अर्थ असा नाही की अहंकारानं लिप्त व्यक्ती आपल्या वासना, इच्छा आणि भ्रम यांना अक्षुण्ण ठेवून सर्वशक्तिमान, सर्वज्ञ परमेश्वर आपणच असल्याचं सांगू शकते आणि सतासताच्या पलीकडे आपण असल्याचं ढोंग करू शकते. असल्याचं सांगू शकते आणि

सतासताच्या पलीकडे आपण असल्याचं ढोंग करू शकते. याचा अर्थ एवढाच की आपला अहं असीम सागरात विरघळून टाकून सागराच्या सामर्थ्याशी आणि भव्यतेशी एकरूप व्हायचं स्वातंत्र्य आपल्या सगळ्यांना आहे.

राष्ट्रवाद्यातील अनेक लोक हा महत्त्वाचा मुद्दा विसरले आणि त्यांनी आपल्या तथाकथित महान उद्देशासाठी हिंसा आणि बेछूटपणाचं समर्थन करण्यासाठी वेदांताचा उपयोग केला.

परिणामी गव्हापासून कुटार पुन्हा वेगळं करावं लागलं. आपल्या चुका आणि अतिरेक यापासून शुद्धीकरण झाल्यानंतर ही विचारप्रणाली परत आत्मशक्तीच्या रूपानं गांधीजींच्या तत्त्वज्ञानातून अवतरली :

*माझा अद्वैतावर विश्वास आहे. माझा माणसाच्या अपरिहार्य एकात्मतेवर विश्वास आहे, माझा विश्वास आहे की जर एका माणसाचा आध्यात्मिक लाथ होईल तर संपुर्ण विश्वाचा त्याच्याबयोबरच लाभ होईल, जर एका माणसाचा अधःपात झाला तर त्या प्रमाणात सर्व जगाचा अधःपात होतो.* [एम. के. गांधी, *नॉट इव्हन हाफ मास्ट*, *यंग इंडिया*, डिसेंबर ४, १९२४, पृष्ठ ३९८]

*जेव्हा केव्हा मी चुकणारा माणूस पाहतो तेव्हा मी मला सांगतो की मीसुद्धा चुकलेलो आहे; जेव्हा विलासी माणुस पाहतो तेव्हा तेव्हा मी मला सांगतो की एके काळी मीही असाच होतो. अशा रीतीनं मला जगातील प्रत्येकाशी आपलं नातं असल्यासारखं वाटतं आणि वाटतं की आमच्यातील अगदी गरिबातील गरीबही सुखी होत नाही तोपर्यंत आपण सुखी होऊ शकत नाही.* [महादेव देसाई यांचे साप्ताहिक पत्र, *यंग इंडिया*, फेब्रुवारी १०, १९२७, पृष्ठ ४४]

*आपण जर अहंकाराच्या बेड्या तोडल्या आणि मानवतेच्या महासागरात विरघळलो तर आपण त्याच्या महनीयतेचे भागीदार होऊ.... आपण कोणी तरी आहोत ही जाणीव लुप्त होत जाणं हेच ईश्वराशी एकरूप होणं आहे. सागरातील एक थेंबही आपल्या आईवडिलांच्या मव्यतेत सहभागी झालेला असतो.... परंतु ज्या क्षणी तो सागरापासून वेगळं असं आपलं स्वतंत्र अस्तित्व राखू पाहतो त्या क्षणी तो वाळतो....*

*क्षणाचीही विश्रांती न घेता ईश्वर सतत कार्यरत आहे. आपण जर त्याच्यात विलीन झालो तर आपल्या कायामुळेही आपल्याला त्याच्याप्रमाणेच थकवा येणार नाही. सागरापासून वेगळं झालेल्या थेंबाच्या नशिबी कदाचित विश्रांतीचे काही क्षण असू शकतील परंतु सागरातील थेंबांच्या नशिबी विश्रांती नसते, त्याला विश्रांती माहीतच नसते.... ज्या क्षणी ईश्वररूपी सागरात आपण विलीन होतो त्या क्षणापासून आपल्यासाठी विश्रांती नसते.... ही कधीही न थांबणारी अस्वस्थताच चिरंतन शांततेची किल्ली आहे.... संपुर्ण शरणागतीचा हा अनुथव मानवी आकलनापलीकडील नाही.* [एम. के. गांधी, *फ्रॉम येरवडा मंदिर*, नवजीवन कार्यालय, अहमदाबाद, (भारत), (१९३५), पृष्ठ ६८-७०]

* * *

आत्म्याच्या प्रांताला वांशिक, धार्मिक अथवा भौगोलिक सीमा नसतात. 'स्व'च्या पुनःशोधामुळे आणि आपल्या अस्तित्वाच्या मुळाशी असलेली चिरंतन तत्त्वं ही काही केवळ भारतातील पथशोधकांपर्यंतच मर्यादित नव्हती. तो तर जागतिक घटनाक्रम आहे. अमेरिकेत तो अतींद्रियवादी कॉन्कॉर्ड वर्तुळात आढळतो. एडवर्ड कार्पेंटर आणि मॅडम ब्लावात्स्की यांच्या लेखनातून तसंच एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या तत्त्वज्ञानातून इंग्लंडमधे त्याला अभिव्यक्ती मिळाली आहे. रशियामधे टॉलस्टॉय यांनी हेच सत्य अतुल बुद्धिमत्तेनं घोषित केलं आहे. पूर्व आणि पश्चिमेत विचारांचं आदानप्रदान सुरूच होतं आणि त्यांच्या भेटीगाठीही होत होत्या. या प्रक्रियेत दोघंही ज्ञानसंपन्न झाले. जुन्या सत्यात नव्या अर्थाचा शोध लावण्यात येऊन त्याच्या आचरणासाठी नवीन पद्धतीचा आणि क्षेत्रांचा शोध घेण्यात आला. अखेरीस गांधीजींनी पश्चिमेचा सामाजिक दृष्टिकोन आणि प्रायोगिक पद्धत यांचा पूर्वेच्या वैयक्तिक गूढ धार्मिक अनुभवाशी मेळ घातला आणि 'स्व'च्या तत्त्वज्ञानाचा सत्याग्रहाच्या म्हणजे आत्मशक्तीच्या व्यावहारिक विज्ञानात अंतर्भाव केला. त्याचबरोबर त्यांनी अहिंसक कृतीच्या तंत्राचा विकास केला. त्याची आज आपण केवळ सुरुवातच पाहत आहोत.

राजा राममोहन रॉयपासूनच्या पथशोधक भारतीय देशभक्तांच्या या दोन पिढ्यांनी केलेल्या परिश्रमामुळे भारताच्या नवजागरणानं तारुण्यात प्रवेश केला. त्यानंतर भारताला नवजागरणासाठी बाहेरून प्रेरणा घ्यावी लागली नाही. आपल्या जागतिक जिवितकार्याची जाणीव त्यानं स्वतःच विकसित केली. भारताच्या एवढ्या मोठ्या अवनतीचं मूळ कारण शोधून काढण्यात आलं होतं व ते होतं भारतीय जनतेची झालेली आध्यात्मिक झीज. त्याच्या सामाजिक आणि राजकीय पुनर्जागरणासाठी आवश्यक कृतीची मूलभूत पद्धती आणि तत्त्व कमीअधिक प्रमाणात निर्धारित करण्यात आलेली होती. योजिलेल्या कामाची सुरुवातही करण्यात आलेली होती. परंतु पाया मजबूत करणं आवश्यक होतं. त्याचा विस्तार करायची, आकारमानात बदल करायची गरज होती. त्यासाठी मेहता, नौरोजी, गोखले, टिळक, रानडे, नेहरू, दास आणि गांधीजी यांच्यासारख्या समर्पित देशभक्तांच्या अजून दोन पिढ्यांच्या परिश्रमाची गरज होती. त्याआधी जगातील आपलं हक्काचं स्थान भारताला प्राप्त होऊ शकणार नव्हतं.

# प्रकरण ५ वे

# राखेतून बाहेर

## १

१८५७चा उठाव फसल्यानंतर ताकदीच्या भरवशावर ब्रिटिशांना हुसकावून लावायची भारताची आशा मावळली. भारत बाह्यतः आता शांत होता. उठाव चिरडण्यात आलेला होता. उठावात भाग घेणारांना एक तर संपवण्यात आलं होतं अथवा अशा लोकांची काय अवस्था होते हे दाखवण्यासाठी त्यांना जिवंत ठेवण्यात आलं होतं. ब्रिटिशांची प्रतिष्ठा परत प्रस्थापित करण्यात आली होती आणि पुन्हा एकदा ब्रिटिश राज्य सुरक्षित झालं होतं. अशा प्रकारच्या उठावाची पुन्हा शकयता उरू नये म्हणून संपूर्ण भारताला निःशस्त्र करण्यात आलं होतं. यापुढे कोणत्याही भारतीयावर संपूर्ण विश्वास टाकता येऊ शकणार नव्हता वा त्याला कोणत्याही महत्त्वाच्या पदावर नेमण्यात येणार नव्हतं. समुदायाविरुद्ध समुदाय, संस्थानाविरुद्ध संस्थान आणि एका वर्गाविरुद्ध दुसरा वर्ग अशी फूट पाडून नागरी प्रशासनात, आणि विशेषतः सैन्यात समतोल निर्माण करणारा तराजू आपल्या हाती ठेवायचं धोरण नंतरच्या पंचवीस वर्षात कटाक्षानं अवलंबिण्यात येऊन सत्तेची सर्व महत्त्वाची पदं इंग्रजांच्या हाती ठेवण्यात आली होती. भारतातील ब्रिटिश सैन्याची संख्या वाढवण्यात आली व त्या प्रमाणात सैन्यातील भारतीयांचं प्रमाण कमी करण्यात आलं. अतिरिक्त सुरक्षा म्हणून भारतीय सैन्यावर जरब बसवण्यासाठी प्रत्येक रेजिमेंटमधे पुरेशा प्रमाणात ब्रिटिश सैन्य ठेवण्यात आलं. दारूगोळा पूर्णपणे युरोपिअन लोकांच्या ताब्यात ठेवण्यात आला.

देशाच्या संरक्षणासाठी असलेल्या तटबंदीप्रमाणे यापुढे ब्रिटिश समुदाय स्वतःला लेखू लागला. त्यासाठी आपल्या शस्त्रांच्या अजेय सामर्थ्यावर तो अवलंबून राहू लागला. आज्ञापालनात किंचितही कसूर दिसून आल्यास भयानक मार्गांचा अवलंब करून आज्ञाभंग

चिरडण्यात आला. [१८७२ साली कुकाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिखांच्या एका संप्रदायातील लोकांनी राज्यातील एका शहरावर हल्ला केला. प्रचंड प्राणहानीनंतर त्यांच्यावर विजय मिळवण्यात आला. त्यांच्यातील ६८ लोकांना अटक करण्यात आली व जवळच्या ब्रिटिश सहायक आयुक्ताच्या ताब्यात त्यांना देण्यात आलं. त्यांच्यातील ४९ लोकांना अधिकार नसतानाही आणि आयुक्तांनी वाट पाहायचा सल्ला दिलेला असूनही गोळ्या मारून उडवून देण्यात आलं. याहीपेक्षा मोठी गोष्ट म्हणजे आयुक्तांनी त्या कृत्याला नंतर मान्यता दिली. पहा : फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १७१-७२] 'एका युरोपिअन माणसाच्या जीवनाचं मोल किती तरी भारतीयांच्या जिवापेक्षा अधिक आहे असा सर्वव्यापी विश्वास इंग्रजांच्या मनात १८५७नंतरच निर्माण झाला' असं एडवर्ड थॉम्पसन यांचं मत आहे.

उठावाच्या काळात सरंजामशाहीचा अवशेष असलेला संस्थानिक आणि जमीनदार यांचा वर्ग सामान्यपणे ब्रिटिशांकडून उभा राहिला. आपल्या प्रभावाखाली असणाऱ्या लोकांना उठावात भाग घेण्यापासून त्यांनी प्रतिबंध केला. अशा वर्गांची पद्धतशीर जोपासना करून त्यांची शक्ती वाढवणं व त्यांना संघटित करणं हे ब्रिटिश हितरक्षणाच्या दृष्टीनं आवश्यक ठरलं. फूटपाडू वृत्तीला प्रोत्साहन देण्यात येऊन त्यांना सक्रिय मदत करण्यात येऊ लागली तसंच ब्रिटिश राज्यात हितसंबंध गुंतलेल्या आणि त्याच्याशी बांधिलकी असणाऱ्या लोकांचा खास वर्ग निर्माण करण्यात येऊन त्याला संरक्षण देण्याचं कामही हाती घेण्यात आलं.

आतापर्यंत सेवांच्या भारतीयीकरणास अधिकाऱ्यांचा विरोध क्षुद्र स्वार्थी कारणांसाठी होता. आता ते धोरण फिरवण्यात आलं. खालच्या वर्गातील सेवांचं भारतीयीकरण करण्यात आल्यामुळे ब्रिटिश सरकारला मदत करणाऱ्या सेवकांची तटबंदी सर्व ठिकाणी उभारता आली. नागरी सेवेतील नोकरांच्या नोकरीची शाश्वती आणि विशेष हक्क हे ब्रिटिशांच्या आश्रयावर आणि ब्रिटिश राज्याच्या अस्तित्वावर अवलंबून होते. त्यामुळे ब्रिटिश मालकांच्या हातातील सहज नाचवता येऊ शकणाऱ्या कळसूत्री बाहुल्यासारखे ते होते व त्यांची त्यासाठी केव्हाही तयारी असायची. राज्यकर्त्यांशी आज्ञाधारक आणि नम्र असणारा हा वर्ग आपल्या अंकितांशी आणि देशबांधवांशी अत्यंत उद्धटपणानं वागणारा आणि त्यांचा छळवाद करणारा होता. लोकांकडून हवं ते काम करून घेण्यासाठी या वर्गाचा स्वाभाविकपणे चांगलाच उपयोग करून घेण्यात आला. दुय्यम सेवांचं भारतीयीकरण केल्यामुळे आश्रितांचा एक मोठा वर्ग निर्माण

करायची सत्ताधाऱ्यांना चांगलीच संधी मिळाली. तिचा उपयोग त्यांनी एका वर्गाविरुद्ध दुसरा वर्ग, एका समुदायाविरुद्ध दुसरा समुदाय उभा करण्यासाठी केला. या आश्रितांच्या वर्गाचा उपयोग लोकांची स्वातंत्र्याकांक्षा चिरडून टाकण्यासाठी उघडपणे करण्यात आला.

## २

ईस्ट इंडिया कंपनीचं राज्य असताना हाउस ऑफ कॉमन्सच्या मनात कंपनीच्या विशेषाधिकाराबद्दल एक निरोगी मत्सराची भावना वसत होती. कंपनीच्या सनदेचं दर वीस वर्षांनी नूतनीकरण करावं लागत असल्यामुळे कंपनीच्या प्रशासनतंत्राची सर्वंकष चौकशी करायची संधी आपोआपच हाउस ऑफ कॉमन्सला प्राप्त व्हायची. परंतु सम्राटांनी कंपनीचा कारभार हाती घेतल्यानंतर ती सर्वंकष संधीही घालवली गेली. त्यामुळे प्रशासनातील उणिवांची वा चुकांची अधूनमधून चौकशी करायची एकमेव सोयही संपली.

१८५७नंतरचं दशक हे गोऱ्या नोकरशाहीला सापडलेलं मुक्त कुरण होतं. प्रशासनाच्या दृष्टीनं संपूर्ण देशाचं जिल्ह्यात विभाजन करण्यात आलं होतं. प्रत्येक जिल्ह्याचा प्रमुख जिल्हाधीश असायचा व वास्तवात तो इंग्रजच असायचा. त्याला कर गोळा करायचा अधिकार असायचा, तोच पोलीस प्रमुख असायचा, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेचाही प्रमुख तोच असायचा. असे प्रचंड अधिकार असणारे जिल्हाधिकारी त्या त्या भागातील लहान प्रमाणातील झारच होते व काही वेळा त्यांच्या आधिपत्याखालील प्रदेश निम्मे इंग्लंडपेक्षाही मोठा असायचा. नवीन शासनाला भारतीयांच्या भावनांची वा दृष्टिकोनाची कदर नव्हती. आपल्या देशाच्या दृष्टीने भारताची पिळवणूक उत्तमरीत्या करता येईल अशा कार्यक्षम प्रशासन व्यवस्थेतच केवळ त्यांना रस होता. त्या दृष्टीने त्यांनी जिल्हा प्रशासनाला मुक्त अधिकार दिले होते. सत्तेची जाणीव व त्यामुळे आत्मसंतुष्ट असलेल्या ह्या वर्गात लवकरच आपण मालकाच्या जातीचे असल्याची तीव्र भावना निर्माण झाली. हा वर्ग आणि इथे वसाहतीसाठी आलेले युरोपिअन ह्यांचा एक गट तयार होऊन ते समाजातील नव-ब्राह्मण बनले. नागरी सेवेतील एक अधिकारी असलेले सर फिलिप

वुडरॉफ यांनी लिहिलेलं आहे : 'मानव जातीच्या संपूर्ण इतिहासात क्वचितच एखादा वर्ग असा असेल की ज्याला स्वतःबद्दल आणि स्वतःच्या बायकामुलांच्या उत्कर्षाबद्दल व मृत्यूनंतर स्वर्गाची एवढी खात्री वाटत असेल. ते अशा नोकरीत होते की त्यांच्या स्थानाला धक्का लागू शकत नव्हता आणि त्यामुळे आत्मविश्वासानं ते मुसमुसत असायचे..... ते जे काही करायचे ते चांगलंच आहे अशी त्यांची धारणा असायची. [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ ४४]

प्रशासनिक यंत्रणेबरोबर त्यांची संख्या जसजशी वाढत गेली तसतसे ते अधिकाधिक आत्मसंतुष्ट होत गेले, समाजापासून दूर राहू लागले. विचारसरणी, सामाजिक वा सांस्कृतिक दृष्टिकोन याबाबतीत त्यांच्यात आणि भारतातील सुशिक्षित वर्गात जवळपास कुठेच एकवाक्यता नव्हती. ते जणू काय अगदी वेगळ्या विश्वात राहत होते. हेतू, नैतिक संकल्पना आणि दृष्टिकोन याबाबतीत या दोन विश्वात कोणतंच साधर्म्य नव्हतं. वुडरॉफच्या शब्दात सांगायचं तरः

*'अगदी वेगवेगळ्या पातळीवरील या लोकात शिष्टाचार, दयाळूपणा आणि अभिरुची तसंच जिव्हाळा दिसत असला तरीही त्याच्यात समान पातळीवरून व्यवहार होत नसे. ते संबंध अभिभावकाच्या नात्यातील असायचे व दोन्हीही पक्षांना त्या गोष्टीची जाणीव असायची. जातिव्यवस्थेप्रमाणेच ते संबंध निश्चित आणि स्थिर होते. जिल्हाधिकारी आणि त्याचे कुटुंबीय हे एका प्रकारचे लोक असायचे तर त्यांच्या जिल्ह्यातील जनता वेगळ्याच प्रकारची.*

*समानतेचा विचारही तिथे नसायचा. ...... आपल्या मुख्य लिपिकाशेजारी जमिनीवर बसून त्याला 'अंकल' म्हणुन हाक मारणं बार्टले फ्रिअरसाठी पुरेसं असायचं. परंतु तो वयस्कर ब्राह्मण त्याला 'फ्रिअर, माझ्या पोरा' अशी हाक मारू शकायची शक्यता अगदीच नसायची.'* [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १७२-७३]

जोपर्यंत ही गोष्ट दोन्ही बाजूंनी समजून घेऊन मान्य केली होती तोपर्यंत म्हणजे अठराव्या शतकाच्या सहाव्या दशकापर्यंत ही व्यवस्था टिकली. परंतु सातव्या आणि आठव्या दशकात वातावरण बदललं. आता चोहोकडे इंग्रजी शिक्षणाच्या वाघिणीचं दूध प्यालेले अनेक लोक होते. त्यांनी मिल, बेंथॅम, कांट, हर्बर्ट स्पेन्सर आणि बर्क या इंग्रज राजकीय तत्त्वज्ञांच्या तत्त्वज्ञानाचा

सखोल अभ्यास केलेला होता, न्यायालयात त्यांनी उच्च स्थान मिळवलेलं होतं. त्यांनी इंग्रजी वृत्तपत्रांचं यशस्वीपणे संपादन केलेलं होतं. उद्योग आणि व्यापारात त्यांनी यशस्वीपणे इंग्रजांशी स्पर्धा केलेली होती. हेन्री कॉटन यांनी निदर्शनास आणून दिलं की अशाप्रकारच्या माणसांकडून रस्त्यात भेटणाऱ्या कोणत्याही इंग्रजाला सलाम करायची अपेक्षा करता येत नाही. इंग्रजाला येताना पाहून घोड्यावरून उतरायची वा डोक्यावरील छत्री बाजूला करायची वा इंग्रजाच्या घरात शिरत असताना पायातील जोडे काढायची अपेक्षा अशा माणसांकडून करता येऊ शकत नाही. [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १७३] जुन्या पद्धतीच्या संबंधांची सवय असलेल्या अरेरावी इंग्रजाशी समतेची अपेक्षा करणाऱ्या माणसाचा जेव्हा संबंध यायचा तेव्हा त्याला आपला राग क्वचितच आवरता यायचा. आणि मग असे काही प्रकार घडायचे की ज्यामुळे 'इंग्रजांची मान खाली व्हावी आणि भारतीयांच्या मनात चीड निर्माण व्हावी.' [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १७४]

अँग्लो इंग्लिश अधिकाऱ्यांनी व त्यांच्या युरोपिअन सहयात्रेकरूंनी भारतीयांशी अपमानास्पद वर्तणूक करणं, ब्रिटिश सोजिरांनी भारतीय स्त्रियांचा विनयभंग करणं, भारतीयांचा जखमी करणं वा त्यांना मारून टाकलं तरीही इंग्रजांवर कोणतीही कार्यवाही न होणं अथवा पुरेशी कार्यवाही न होणं अशा प्रकारच्या किती तरी घटना घडायच्या. [सर मंचरजी भोवनग्री के.सी.आय.ई. यांच्या स्वागत समारोहाचा प्रसंग होता. भोवनग्री हे एकदा काठेवाडमध्ये फिरोजशहा मेहता यांच्याबरोबर प्रवास करत असलेल्या प्रसंगाचं वर्णन व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांनी केलं आहे. आपल्या दांडग्या कुत्र्यासह त्याच डब्यातून प्रवास करायचा एका इंग्रज गृहस्थाचा आग्रह होता. सर मंचरजी त्याबद्दल रेल्वे अधिकाऱ्याशी बोलले. त्यामुळे तो इंग्रज आक्षेपकावर अतिशय चिडला आणि त्यानं इंग्रजी भाषेतील निवडक शिव्यांचा त्यांच्यावर वर्षाव केला. अखेरीस तो म्हणाला, 'मी जर या नेटिव्हाबरोबर प्रवास करण्यावर आक्षेप घेत नाही तर यांना माझ्या कुत्र्याबरोबर प्रवास करायला काय हरकत आहे?' पाहा : व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, द मद्रास लॉ जर्नल प्रेस, मद्रास, (१९४५) पृष्ठ ४७]

काही इंग्रज उभे असताना एक बंगाली सद्गृहस्थ घोड्यावर बसून जात होता. या त्याच्या तथाकथित क्षुल्लक अपराधासाठी त्याला मारहाण करण्यात आली. त्यामुळे त्याला दवाखान्यात भरती करावं लागलं व झालेल्या जखमांमुळे तिथं तो मरण पावला. मारहाण करणारातील एकजण निसटला आणि त्याला दक्षिण आफ्रिकेत बोअरांविरुद्ध चालू असलेल्या युद्धात सैनिक

म्हणून भरती करण्यात आलं. दुसऱ्याला केवळ चार महिन्याची शिक्षा झाली. युरोपिअनांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केलेले मजूर केवळ 'बरगडी मोडल्यामुळे' मरायचे. आपले आजचे पंतप्रधान पंडित नेहरू यांचे आजोबा पंडित मोतीलाल नेहरू यांनी एकदा असं निदर्शनास आणून दिलं की गेल्या दीडशे वर्षात एकाही इंग्रजाला खुनासाठी शिक्षा झालेली नाही. ['न्यायालयांकडे आलं तर..... युरोपिअन लोकांवर खास नियमांप्रमाणे खटला चालवण्यात येत असताना कोणत्या प्रकाराच्या न्यायाची अपेक्षा करावी हे सर्वांना माहीत असतं. गेल्या १५० वर्षात कोणत्याही भारतीयाला युरोपिअनाच्या हातून मरण आलेलं असलं तरी ते आजारपण वा अपघात यांच्यामुळे मरण आल्याचं न्यायालयांनी ठरवलं आहे. खुनाचा साधा व सरळ खटला एकही नाही.' (पंडित मोतीलाल, ऑन लॉ कोर्ट्स, ॲन अपील टू लायर्स, *यंग इंडिया*, ऑक्टोबर १३, १९२०, पृष्ठ ६)] बंगालमधील नागरी सेवेत सर हेन्री कॉटन हे उच्चाधिकारी होते.. अशा प्रकारचे खटलेही न्यायालयीन भ्रष्टाचाराचीच उदाहरणं आहेत असं मत त्यांनी नोंदवलेलं आहे.

आपल्या एकाधिकारशाही व्यापारी परंपरेमुळे भारतात वसाहतीस आलेल्या सर्व युरोपिअन लोकांना आपल्या फायद्याच्या आड येणारे ते लुडबुडे आहेत असं ईस्ट इंडिया कंपनी समजायची. परंतु सम्राटांच्या सरकारला असं काही वाटायचं कारण नव्हतं. उलटपक्षी पुन्हा उठाव होऊ नये म्हणून अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात येणाऱ्या युरोपिअन लोकांचं स्वागत 'संरक्षणाचा अतिरिक्त उपाय' समजून करायचं शासनाचं धोरण होतं. त्यामुळे लागवड करू इच्छिणारे युरोपिअन मळेवाले, व्यापारी, सोजीर आणि इतर लोकांचे लोंढेच भारतात आले आणि इथे आपल्या कुटुंबियांसोबत सहाव्या दशकात स्थायी झाले. बंडाच्या वेळी इंग्लंडमधे पसरलेल्या माथेफिरूपणाची भारतविरोधी भावना ते घेऊन आले. मोठ्या संख्येत आलेल्या युरोपिअन स्त्रियांमुळे तर परिस्थिती अजूनच चिघळली. सर हेन्री कॉटन यांनी लिहिलं आहे की 'स्त्रियांचं नीतिधैर्य पुरुषांपेक्षा लवकर खचत असल्यामुळे 'भयानक नेटिव्ह' लोकांशी होणारी गैर वर्तणूक सार्वत्रिक बाब असायची.'

ज्या काही इंग्रज स्त्रिया, इंडियन रेजिमेंटमधील अधिकाऱ्यांच्या बायका आदींना कॉब्डेन भेटले होते त्यांच्याबद्दल जॉन ब्राईट यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं की त्या बाया भारतीयांना नेहमी 'निगर' म्हणून संबोधायच्या. त्यांच्यापैकी एक तिच्या नवऱ्याकडे आदेशासाठी

आलेल्या भारतीय अधिकाऱ्यांना आपल्या उपस्थितीत खाली बसू देत असे एवढ्याचसाठी आपल्या 'मनाच्या मोठेपणाचा तिला अभिमान वाटायचा.' इंग्रजांचं भारतातील वर्तन उच्च नैतिक दर्जाचं असतं आणि त्यांनी 'श्रेष्ठ प्रतीच्या बुद्धिमत्तेचं दर्शन आपल्या वर्तनातून घडवलं असतं' [कॉब्डेन यांचं जॉन राईट यांना पत्र, ऑगस्ट २४, १८५७ (*लाईफ ऑफ कॉब्डेन*, पृष्ठ ६७२)] तर अशा गोष्टी एकदा सहनही केल्या गेल्या असत्या, परंतु वास्तव याहून अगदी उलट असावं अशी कॉब्डेन यांना भीती वाटत होती.

## ३

यात भर पडली ती १८५७च्या उठावानंतर विषाक्त झालेल्या जातीय भेदभावाच्या वातावरणाची. राणीचा १८५८मधे जाहीरनामा जाहीर झाला होता. त्याचं पुनर्लेखन राणीच्या प्रधानमंत्र्यांनी म्हणजे डर्बी यांनी केलं होतं. या जाहीरनाम्याद्वारे 'महाराणी १० कोटीहून अधिक लोकांशी बोलत असल्याची भावना व्हावी' अशाप्रकारे ते पुनर्लेखन करावं अशी महाराणींनी स्पष्ट शब्दात सूचना दिला होती. त्या जाहीरनाम्यात दोन पवित्र आश्वासनांचा समावेश होता. 'शासकीय पदावर नियुक्ती करताना जाती वा धर्माच्या आधारावर भविष्यात कोणत्याही भारतीयास वगळण्यात येणार नाही' या १८३३ साली ईस्ट इंडिया कंपनीनं जाहीर केलेल्या सनदेतील आश्वासनाचा त्यात पुनरुच्चार करण्यात आला होता. [१८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यात लिहिलेलं आहे : 'यापलीकडे आमची इच्छा आहे की शक्य असेल तोपर्यंत आमच्या प्रजेला, मग ती कोणत्याही वंशाची वा धर्माची असो, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे, कार्यक्षमतेप्रमाणे, आणि प्रामाणिकपणानुसार मुक्तपणानं आमच्या सेवेतील अधिकार पदावर नेमण्यात येईल.' रोमेश दत्त यांनी *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडियामधे* दिलेलं उद्धरण. पृष्ठ २३४] आणि 'आपल्या भारतीय प्रजेला इतर सर्व प्रजेप्रमाणेच समान हक्क व संधीची हमी' त्यातून देण्यात आली होती. [रोमेश दत्त यांनी *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*व्हिक्टोरिअन एज*), पृष्ठ २३३]

राणीच्या प्रचंड दरबारात ही आश्वासनं वाचून दाखवण्यात आली होती व भारतीय बुद्धिवादी वर्गानं आपल्या 'हक्काची सनद' म्हणून त्यावर शब्दशः विश्वास ठेवला होता. राणीच्या जाहीरनाम्यातील आश्वासनं काही विशेष नैतिक प्रसंगांसाठी आहेत आणि दैनंदिन प्रशासनात वा

कायद्यात त्यासंबंधी विचार करायचा नसतो कारण 'शक्यतोवर' हा त्यात जो शब्द आहे त्याचा तोच अर्थ आहे व त्यामुळे ती आश्वासनं कठोर बंधनासारखी नाहीत असं जेव्हा नंतर सांगण्यात आलं [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २२] तेव्हा ब्रिटिशांच्या प्रामाणिकपणावरून भारतीय बुद्धिवादी वर्गाचा विश्वास उडाला.

१९५३च्या मागील सनदेनुसार नागरी सेवांसाठी स्पर्धा परीक्षेच्या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला होता आणि त्या करारानुसार भारतीय लोकांना नागरी सेवेत प्रवेश मिळू शकत होता. परंतु त्यासाठी स्पर्धा परीक्षा केवळ इंग्लंडमधे घेण्यात येत असत व त्यामुळे भारतीय लोकांना ती परीक्षा देणं कठीण होत असे. त्यामुळे समतेच्या तत्त्वाला काही अर्थ असेल तर ती परीक्षा भारतातही घेण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. परंतु त्याचा काहीच लाभ झाला नाही.

या अडचणीवर मात करूनही काही भारतीय इंग्लंडमधे गेले व स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन नागरी सेवेत प्रवेश करण्यात त्यांनी यश मिळवलं. परंतु इंग्रजांसाठी राखीव असलेल्या नागरी सेवेच्या क्षेत्रात भारतीयांनी एवढ्या लहान प्रमाणात केलेला प्रवेशही तत्कालीन शासनाला सहन झालं नाही. [एडवर्ड थॉम्पसन अँड जी.टी. गॅरेट, *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ५३७] त्यामुळे भारतीयांना नागरी सेवेत प्रवेश करणं जवळपास अशक्य व्हावं म्हणून नागरी सेवेच्या परीक्षेत बसण्याचं वय लॉर्ड सॅलिसबरी यांनी २१ वर्षांवरून १९ वर्ष केलं. इंग्लंडमधे दादाभाई नौरोजी यांनी चालवलेल्या मोठ्या प्रमाणातील आंदोलनामुळे १८७० साली महत्त्वाच्या काही नागरी सेवांमधे भारतीयांना नामित करायचा अधिकार भारत सरकारला द्यायचा कायदा इंग्लंडच्या संसदेत मंजूर करण्यात आला. परंतु १८७९पर्यंत तो कायदा अमलात आणायच्या दृष्टीनं त्यासंबंधी नियम तयार करायचा कोणताच गंभीर प्रयत्न करण्यात आला नाही. त्यामुळे लॉर्ड लिटन यांना अखेरीस शासनाला लिहावं लागलं की दिलेल्या आश्वासनांची परिपूर्ती करण्यासाठी काहीच प्रयत्न करण्यात येत नाही. १८९३ साली नागरी सेवांसाठी भारतात आणि इंग्लंडमधे एकाचवेळी परीक्षा घेण्यासंबंधीचा हर्बर्ट पॉल यांचा प्रस्ताव ग्लॅडस्टोनच्या शासनाने मंजूर केला परंतु तो लॉर्ड किंबर्ले

यांच्या कार्यकारिणीने फेटाळून लावला. तो ठराव 'अचानक मतदान' घेऊन मंजूर केलेला असल्यामुळे त्याला 'नैतिक अधिष्ठान' नाही असं त्यांचं म्हणणं होतं!

भारत सरकारच्या १८९४ सालच्या अधिकृत निदेशानुसार दोन्ही ठिकाणी नागरी सेवांसाठी परीक्षा घ्यायची अनुमती देण्यात आली. परंतु सर्वोच्च पदं नेहमीसाठी युरोपिअन लोकांच्या हाती राहतील अशी त्यात अट घालण्यात आली. त्यावर कडवटपणे टीका करत गोखले म्हणाले, 'इंग्लंडनं आम्हाला जी पवित्र आश्वासनं दिली त्यामुळे आम्हाला उच्च आणि योग्य ध्येयांची प्राप्ती झाली आणि जर या आश्वासनांचा भंग करण्यात आला तर ब्रिटिशांचा आमच्याशी ज्या कारणांमुळे दुवा जुळलेला आहे ती कारणंच संपून जातील.' इंग्रज न्यायाधीश सर फिट्झ जेम्स स्टिफन्स हे एका खटल्याच्या संदर्भात उद्गारले होते की १८५८ सालच्या सनदेतील आश्वासनांना गांभीर्यानं घ्यायचं कारण नाही. त्यावर गोखले उद्गारले, 'मग ही सर्व कागदपत्रं रद्दीचे तुकडे म्हणून आगीत फेकून द्यायच्या पात्रतेची आहेत काय?' [बी. पट्टाभी सीतारामैय्या, *द हिस्ट्री ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस*, पद्म पब्लिकेशन्स लि. मुंबई (पुनर्मुद्रण), खंड १, पृष्ठ ८९]

१८७६ साली लॉर्ड लिटन यांची प्रतिक्रियावादी राजवट सुरू झाली. त्यामुळे भारतीयांचा अजूनच भ्रमनिरास झाला. त्यावेळी भारतात येणाऱ्या सर्व मालावर ५ऽ जकात होती. भारतीय हस्तकलेवर आधारित वस्त्रोद्योग नष्ट झाल्यानंतर त्यावेळी भारतीय कापड उद्योग नुकताच कुठे राखेतून उभा राहू लागला होता. १८७२-७३ साली कापडगिरण्यांची संख्या २० होती. ती १८७९-८०साली ५८ झाली. त्यामुळे लँकेशायरच्या उद्योगपतींना मत्सर वाटू लागला आणि ते ही जकात दूर करण्यासाठी दडपण आणू लागले. १८७७ साली त्यांच्या दडपणाला बळी पडत हाउस ऑफ कॉमन्सनं ही जकात उठवण्याची शिफारस करणारा प्रस्ताव मंजूर केला आणि लॉर्ड लिटन यांनी आपल्याच कार्यकारी मंडळाच्या विरोधात जात आपल्या विशेषाधिकारात ही जकात उठवली.

याच वर्षी राणीनं भारताच्या महाराणीचं पद धारण केलं. १८६७ ते १८७७च्या दरम्यान भारतात ४ मोठे दुष्काळ पडले होते. भारतात दुष्काळ आणि साथीच्या रोगांनी थैमान घातल्यामुळे हजारो लोक उपासमारीने मरत होते. असं असतानाही राणीच्या राज्यारोहणाच्या

निमित्ताने लॉर्ड लिटन यांनी मात्र आलेशान दरबार भरवून ‘उपाशी लोकांसमोर आपल्या थाटामाटाचं प्रदर्शन केलं.’

त्यानंतरच्या वर्षात देशी भाषांच्या वृत्तपत्रांसाठी आणि शस्त्रास्त्रे बाळगण्याविषयी मुस्कटदाबी करणारे कायदे करण्यात आले. १८७५ साली ४७५ वृत्तपत्रं होती आणि त्यातील बहुतेक प्रादेशिक भाषेत होती. व्हर्न्याक्युलर प्रेस अॅक्टमुळे मॅजिस्ट्रेटला ‘कोणत्याही प्रादेशिक भाषेच्या वृत्तपत्राच्या प्रकाशकाकडून जामीन मागायचा अधिकार प्राप्त झाला’. यामुळे मेटकाफनं १८३५च्या कायद्यानुसार ज्या काही सवलती दिल्या होत्या त्या या कायद्यान्वये काढून घेतल्या गेल्या. भारतीय शस्त्रास्त्राच्या कायद्यानुसार ब्रिटिश भारतात युरोपिअन सोडून कोणालाही शस्त्र बाळगण्यासाठी मज्जाव करण्यात आला. अशा प्रकारे या कायद्यान्वये पुन्हा जाती आणि वर्णानुसार अन्याय्य भेदभाव करण्यात आला व संपूर्ण जनतेला खच्ची करून तिला आत्मरक्षणासाठी असमर्थ करण्यात आलं. हाउस ऑफ कॉमन्समधील लिबरल पक्षाचे नेते ग्लॅडस्टोन यांनी या कायद्याचं वर्णन ‘शासनासाठी लज्जास्पद बाब’ असं करून त्याला विरोध केला. ग्लॅडस्टोन प्रधानमंत्री झाले आणि लॉर्ड रिपन व्हाईसराय होते तेव्हा ग्लॅडस्टोन यांच्या आग्रहाखातर हा कायदा मागे घेण्यात आला. परंतु शस्त्रास्त्रविषयक कायदा मात्र तसाच कायम राहिला.

लॉर्ड रिपन यांच्या काळात वंशविद्वेषाचा विषय पुढे आला. १८८३ पूर्वी भारतीय न्यायाधीश वा दंडाधिकाऱ्यासमोर तो इलाख्याचा प्रमुख नसल्यास आणि प्रमुख असला व इलाख्याच्या ठिकाणी नसला तर युरोपिअन माणसावर त्यांच्यासमोर खटला चालवला जाऊ शकत नसे. १८७२ साली हा कायदा बदलवण्याचा एकदा विचार करण्यात आला. परंतु व्हाईसराय यांच्या कार्यकारिणीतील युरोपिअनांच्या विरोधामुळे हा ठराव ५ विरुद्ध ७ मतांनी पडला. या पाचांमध्ये व्हाईसराय, सेनापती, बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर आणि मुंबईचे गव्हर्नर यांचा समावेश होता. एका दशकानंतर जेव्हा बिहारीलाल गुप्ता हे इलाख्याचे न्यायाधीश होते व त्यांनी एका युरोपिअनावर कलकत्ता येथे खटला चालवायचा प्रयत्न केला तेव्हा हा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला. त्यावेळी

बिहारीलाल गुप्ता यांची पदोन्नती करून त्यांची बदली तालुक्याच्या ठिकाणी करण्यात आली व त्यांना तो खटला चालवण्यापासून वंचित करण्यात आलं. त्यानंतर लॉर्ड रिपन यांनी कायद्यातील ही विसंगती दूर करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली. १८८३ साली कायदा मंत्री सर कर्टनी इल्बर्ट यांनी जिल्हा न्यायाधीश आणि जिल्हा दंडाधिकारी यांना कोणत्याही देशाच्या नागरिकावर खटला चालवण्याचा अधिकार दिला. या कायद्याला त्यांचंच नाव मिळालं. या कायद्याचा मसुदा प्रकाशित होताच युरोपिअन समाजानं अभूतपूर्व गोंधळ माजवला. एकेकाळी भारत सरकारचे विदेश विभागाचे सचिव असलेले सेटन केर यांनी लंडन येथे या बिलासंबंधी भाषण करताना घोषित केलं :

*भारतातील प्रत्येक इंग्रजाची, श्रेष्ठतम माणसापासून तर अगदी सामान्यापर्यंत, अगदी लहानशा बंगल्यात राहणाऱ्या प्लँटर्सच्या मदतनीसापासून तर कलकत्त्यासारख्या राजधानीच्या ठिकाणी झगमगित प्रकाशात राहणाऱ्या संपादकापर्यंत, महत्त्वाच्या प्रांताच्या मुख्य आयुक्तापासून तर पीठासीन व्हाईसरायपर्यंत सर्वांची अशी धारणा असते की ईश्वराने त्याची योजना जितांवर राज्य करण्यासाठी केलेली आहे.* [बिशप व्हाईटहेड, *इंडियन प्रॉब्लेम*, पृष्ठ २०७ वरून एडवर्ड थॉम्प्सन अँड जी.टी. गॅरेट, *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ५३६ मधे उद्धृत]

कोलकात्यात व्हाईसरायना अपमानित करण्यात येऊन युरोपिअन लोकांच्या अनेक सभांमध्ये त्यांच्याविरुद्ध घोषणा देण्यात आल्या होत्या. शासकीय समारंभाच्या कारणासाठी ते कोलकत्यास आले असताना युरोपिअन आणि अँग्लो इंडियन लोकांनी उग्र निदर्शने केली. युरोपिअन आणि अँग्लो इंडियन लोक उभे असलेल्या ठिकाणी व्हाईसराय यांची गाडी आली असता कोणीही आपली हॅट काढून त्यांना अभिवादन केलं नाही. राजभवनातील समारोहांवर सामान्यपणे बहिष्कार टाकण्यात आला होता व सेंट अँड्र्युज येथील भोजनास त्यांच्यापैकी कोणीच गेलं नाही. व्हाईसराय यांनी 'टोस्ट कापला त्यावेळी सर्व स्तब्ध राहिले व कोणीच उत्साह प्रदर्शित केला नाही.' [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ १८] शासनानं हे विधेयक पारित करून घ्यायचंच असं ठरवल्यास राजभवनातील कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन

व्हाईसरायना चांदपाल घाटावरील जहाजात बसवून इंग्लंडला रवाना करायचं असा कलकत्त्यातील गरम डोक्याच्या काही लोकांनी कट केला. [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ १९] या बिलाचं कायद्यात रूपांतर झालंच तरीही तो कायदा मानायचा नाही आणि जो कोणी 'भारतीय न्यायाधीश युरोपिअन माणसावर खटला चालवायचा प्रयत्न करील त्याला आपल्याच पद्धतीनं हाताळायच्या युरोपिअन प्लँटर्सनी शपथा घेतल्या.' [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ १९]

या सर्वांवर ताण म्हणून की काय व्हाईसराय यांना अपमानित केल्यानंतर आणि त्यांचा बहिष्कार केल्यानंतर तडजोड करण्यात आली की भारतीय न्यायाधीशासमोर युरोपिअन माणसावर खटला चालवावयाचा असल्यास त्या खटल्यासाठी ज्युरी नेमण्यात यावी आणि त्या ज्युरीत अर्ध्यापेक्षा कमी युरोपिअन नसावे.

विल्यम डिबिलस यांनी दर्शवलं आहे की शासक आणि शासित यांच्यात दोन प्रकारचे संबंध असू शकतात. एक मार्ग आहे शासितांनी शासकात मिसळून जायचा. दुसरा आहे 'जितांच्या भौतिक विकासासाठी शासकांनी पालकत्वाच्या भावनेनं प्रयत्न करायचा. असं करत असताना जेते आणि जित हा भेद कधीच विसरायचा नसतो.' [विल्हेम डिबिलेयस, इंग्लंड, पृष्ठ ६१] पहिल्यातून ब्रिटिशांच्या मुत्सद्दीपणाचं दर्शन होतं तर दुसऱ्यातून सर्वसामान्य इंग्रज माणसाच्या मनोवृत्तीचं दर्शन होतं. या दोन मार्गातील भेदामुळे काही अंतर्विरोध निर्माण झाले होते. आपल्याला फक्त मंदिराच्या ओसरीतच जागा मिळू शकते असं केंब्रिज ऑक्सफर्डमधून प्राविण्यासह सर्वोच्च पदवी घेऊन आलेल्या तरुणास दिसायचं. जर तो सैन्यात असेल तर तो व्हाईसरायच्या तथाकथित कमिशनच्या पदापलीकडे पदोन्नत होऊ शकत नसे आणि त्याच्या हाताखाली एकही इंग्रज माणूस ठेवण्यात येत नसे. युरोपातील पहिल्या युद्धापर्यंत त्याचं स्थान गौरवान्वित एन.सी.ओ.च्या पलीकडचं नसायचं आणि 'कॅप्टनच्या हाताखालील युरोपिअन अधिकाऱ्याच्या वर ते क्वचितच असायचं.' [एडवर्ड थॉम्सन अँड जी.टी. गॅरेट, *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ५३९]

लॉर्ड राबट्र्स यांनी सांगितलं की युरोपिअन लोकांना वारसा हक्क म्हणून मिळालेलं हे मोठेपण आहे. ते पुढं सांगतात :

*व भारतावर विजय मिळवुन आम्ही तो मोठेपणा मिळवला आहे. त्यामुळे नेटिव्ह माणूस कितीही हुशार असला आणि त्यानं आपलं शौर्य कोणत्याही प्रकारे सिद्ध केलेलं असलं व त्यामुळे त्याला कोणतंही पद देण्यात आलेलं असलं तरीही कोणताही इंग्रज अधिकारी त्याला स्वतःच्या बरोबरीचा मानु शकत नाही.* [सर जी. ऑर्थर, *लाईफ ऑफ लॉर्ड किचनेर*, २, पृष्ठ १७७]

भारतीय माणूस श्रीमंत, संपन्न आणि सुसंस्कृत असला, तो उच्च प्रतीच्या न्यायालयीन पदावर असला आणि त्याला व्हाईसरायकडून सन्मानितही करण्यात आलेलं असलं तरीही ज्या क्लबची दारं नव्यानेच सैन्यात भरती झालेल्या इंग्रजांसाठीदेखील उघडी असत ती भारतीयासाठी बंद असत. सामाजिकदृष्ट्या तरीही तो 'घाणेरडा निगरच' [विल्हेम डिबिलेयस, *इंग्लंड*, पृष्ठ ६२. युरोपिअन लोक भारतीयांविरुद्ध जो भेदभाव करत त्याची दोन उदाहरणं लक्षणीय आहेत : भारतीयांच्याच पैशानं महाबळेश्वर येथे बांधलेल्या फ्रेअर हॉलच्या नियमान्वये तेथील ओसरीवरदेखील भारतीयास चढायची मनाई होती. हीच अवस्था इंग्लिश जिमखाना क्लब, मुंबईचीही आहे. पहा :व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ ४७] असायचा. आधुनिक पद्धतीनं कोलकाता, मुंबई आणि चेन्नई येथे १८५८ साली भारतीय विद्यापीठांची स्थापना करण्यात आली होती. मेकॉलेचा पाझरण्याचा सिद्धान्त त्यावेळी झिजला होता. वंशवादानं त्याचा बळी घेतला होता. दहापैकी नऊ प्रकरणी सुशिक्षित भारतीय नवीन व्यवस्थेचा उत्साही पुरस्कर्ता बनण्याऐवजी ब्रिटिश राज्याचा मनातून द्वेष करणारा बनला होता.

## ४

पारतंत्र्याचा अपरिहार्य परिणाम राष्ट्रीय भावना वाढण्यात होत असतो. १८५७च्या अयशस्वी उठावाचा परिणाम भारताच्या गुलामगिरीच्या शृंखला अजूनच घट्ट होण्यात झाला. त्यामुळे ब्रिटिशांना आपलं स्थान अजूनच भक्कम करता आलं. पूर्वी कधीही नाही एवढी त्यांची मुळं जमिनीत अजूनच खोलवर चोहोकडे पसरली. उन्मत्त झालेला वर्णद्वेष भारतात यापूर्वी एवढा

कधीच पसरलेला नव्हता. भारताचं रक्त शोषण्यात आलं होतं. इतकंच नाही तर त्याची नैसर्गिक संपदाही संपू लागली होती. त्यामुळे यापूर्वी करण्यात आलेल्या प्रयत्नापेक्षा अधिक सर्वंकष प्रयत्न करायची आवश्यकता भारतीय मनाला जाणवू लागली तसंच सामाजिक जागृतीद्वारे आंतरिक सामर्थ्य वाढवून संघटित कार्य करायचा प्रयत्न करूनच आपलं गमावलेलं स्वातंत्र्य आपल्याला परत प्राप्त करून घेता येईल असंही भारतीयांना वाटू लागलं. भारतीय पुनरुज्जीवनाच्या काळातील राजा राममोहन राय यांच्यापासून सर्व नेत्यांचे उद्गार पाहिले तर त्यातून हीच स्वातंत्र्याकांक्षा अभिव्यक्त होताना आढळते. लोकशाही आणि स्वातंत्र्यविषयक पाश्चात्त्यांचे विचार वाचल्यामुळे तसंच अमेरिकन स्वातंत्र्य व फ्रेंच राज्यक्रांती यांसारख्या जागतिक घटनांमुळे सुशिक्षित भारतीयांना गुलामगिरीचा राष्ट्रीय चारित्र्यावर होणारा परिणाम अधिकच तीव्रतेनं जाणवू लागला. एका इंग्रज मित्रानं राजा राममोहन रायसंबंधी लिहिलं की ‘स्वातंत्र्याकांक्षा ही कदाचित त्यांच्या अंतःकरणाला लागलेली सर्वात मोठी तहान असावी.... एक तर ते स्वतंत्र होतील वा कदाचित कधीच स्वतंत्र होणार नाहीत.’ त्यांनी सामाजिक सुधारणा आणि सजकीय सुधारणा याच्या निकटच्या संबंधावर सर्वाधिक भर दिला.

ज्यांच्याकडे राजा राम मोहनराय यांचा वारसा आला होता ते महर्षी देवेंद्रनाथ टागोर सुरुवातीपासूनच चिंतनशील मनोवृत्तीचे होते. परंतु अध्यात्म आणि गुलामगिरी यांच्यातील अंतर्विरोध त्यांना सतत छळत होता. त्यांनी घोषित केलं की ‘सर्व अनिष्टांच्या मुळाशी गुलामगिरीच आहे आणि स्वातंत्र्याशिवाय समृद्धी आणि सुख अशक्य आहे.’ एवढंच नाही तर उपनिषदांचा अभ्यास, आणि मातृभाषेचा उपयोग यासंबंधीच्या त्यांच्या आग्रहामागेही हीच राष्टीयत्वाची तीव्र भावना होती.

नवयुगाच्या प्रवर्तकातील केशवचंद्र सेन हे सर्वाधिक पाश्चात्त्य संस्कृतीने भारलेले होते. ब्रिटिशांच्या परंपरा आणि संस्कृतीविषयी अतिशय आदर असूनही किंबहुना अधिक नेमकेपणानं सांगायचं तर त्याच कारणामुळे इंग्लंडमधील एका भाषणात त्यांनी इंग्रज लोकांना सूचित केलं: *तुम्ही भारतातील कोट्यवधी लोकांना चिरडून टाकू नये अथवा त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा नाश करू*

*नये.... तुम्ही जर भारतावर नीटपणे यज्य करू शकत नसाल तर भारत दीर्घ काळ तुमच्या हातात राहू शकणार नाही. इंग्लंडचा हेतू भारतावर केवळ पैशासाठी राज्य करायचा असेल तर मी म्हणेन की याच क्षणी ब्रिटिश साम्राज्याचा नाश होवो.* ब्राह्मो समाजाचे आधारस्तंभ आणि केशवचंद्र सेन यांचे समकालीन असलेले शिवनाथ शास्त्री यांनी एक पक्ष स्थापन केला होता. 'शासनव्यवस्थेचा स्वयंशासनाशिवाय इतर कोणताच मार्ग ईश्वरनियोजित नाही' असं त्यांचं म्हणणं होतं आणि म्हणून स्वराज्यप्राप्ती हे त्यांच्या पक्षाचं ध्येय होतं.' या पक्षाचे एक सदस्य बिपिनचंद्र पाल (१८३६-९१) होते. नंतर ते भारतीय स्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाचे उद्गाते बनले.

देवेंद्रनाथ टागोरांनी ज्या आदर्शवादी व्यक्तींना आपल्याकडे आकर्षित केलं होतं त्यात बाबू राजनारायण बोस यांचा समावेश होता. ते महर्षी अरविंद घोष यांचे आईकडून आजोबा होते. त्यांचं लोकांमधे प्रचलित नाव होतं ऋषी राजनारायण. ते व्यवसायानं शिक्षक होते. संपर्कात आलेल्या लोकांच्या जीवनात त्यांनी आपल्या चारित्र्याच्या बळावर परिवर्तन घडवून आणलं. पाश्चात्त्य शिक्षणामुळे आपल्या संस्कृतीवर झालेल्या आघाताचे तेही बळी होते. पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभावाला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी 'जातीय गौरवेच्छा संचारिणी सभा' या संस्थेची स्थापना केली.

या संस्थेचा जाहीरनामा १८६१ साली प्रकाशित झाला. हे वर्ष भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचं आहे कारण या वर्षी भारताचे शिल्पकार डॉ. पी. सी. रे, पं. मोतीलाल नेहरू, पं. मदनमोहन मालवीय आणि कवीवर रवींद्रनाथ ठाकूर यांचा जन्म झाला होता. राजनारायण यांनी जाहीर केलं की भारताची पुनर्निर्मिती राजकीय स्वातंत्र्याशिवाय अशक्य आहे. 'आपल्या राष्ट्रीयत्वाला तेव्हाच अर्थपूर्णता येईल जेव्हा विशाल पायावर भारतीय स्वातंत्र्याची उभारणी होईल.'

प्रस्तावित संस्थेच्या उद्देशात शारीरिक प्रशिक्षण, विद्याप्रसारासाठी भारताच्या प्राचीन गौरवाची माहिती सांगणाऱ्या ग्रंथांचं प्रकाशन, संस्कृतच्या अभ्यासाला प्रोत्साहन, या मातीत जन्मलेल्या प्रत्येकासाठी मातृभाषेत व्यवहार करण्याची सक्ती, स्थानिक औषधी आणि

विज्ञानाचा अभ्यास आणि 'राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करायच्या दृष्टीने रूढी, आणि परंपरांचं पुनरुज्जीवन इत्यादी बाबींचा समावेश होता.' राजनारायण यांनी लिहिलं, 'भारत आपली मातृभूमी आहे. प्रसंगी आमचे प्राण अर्पण करूनही आम्ही तिची सेवा करू. त्यासाठी आम्ही मुसलमान आणि अन्य भारतीयांशी राजकारणात आणि इतर प्रकरणात शक्यतोवर हातमिळवणी करू. धर्म, परंपरा, कला, आणि विज्ञान यात पूर्वी प्रगती करून भारतानं जसं गौरवाचं स्थान मिळवलं होतं तसं किंबहुना त्याहूनही उच्च स्थान त्याला परत मिळावं या दृष्टीने कार्य करण्यासाठी संपूर्ण जनतेला आम्ही प्रेरित करू.'

दोन वर्षांपूर्वी देवेंद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या नॅशनल पेपरचे संपादक नवगोपाल मित्र यांनी राजनारायण यांच्याशी सल्लामसलत करून १८६७ साली 'जातीय मेळ्याचं' (राष्ट्रीय अधिवेशन) आयोजन केलं. 'राष्ट्रीय जाणीव निर्माण करून त्याद्वारे भारतीयात ऐक्य आणि स्वावलंबनाची भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने' हा 'मेळा' आयोजित करण्यात आला होता. कलकत्ता आणि त्याच्या उपनगरात अंदाजे बारा वर्ष हा मेळा भरत होता.

तीन वर्षांनंतर म्हणजे १८७०साली जातीय सभेची स्थापना करण्यात आली. दरमहा तिची बैठक व्हायची व त्यात कला, साहित्य, तत्त्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आदी विषयांवर त्या त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींची राष्ट्रविकासाच्या दृष्टीने भाषणं व्हायची. चौथ्या सभेत राजनारायण यांनी 'सेकाल की एकाल' म्हणजे 'नंतर की आता' नावाचा पेपर वाचला. त्यातून इंग्रजी शिक्षणानंतर सर्व क्षेत्रात बंगालची अधोगती कशी झाली हे दाखवून बंगालच्या ऱ्हासाच्या काळातही बंगालची तेवढी अधोगती कशी झाली नव्हती व त्या काळातही बंगालनं धर्म आणि राजकारणाच्या विषयात प्रगती करून राष्ट्राच्या प्रगतीस कसा हातभार लावला होता व योग्य संधी मिळाल्यास बंगालची व पर्यायानं राष्ट्राची कशी प्रगती होऊ शकते हे दाखवण्यात आलं होतं.

राष्ट्रीय जागृती निर्माण करण्यासाठी हा मेळा महत्त्वाचा ठरला. या मेळ्याच्या निमित्तानं राष्ट्रगीतं रचण्यात येऊन ती गाण्यात आली. ही गीतं रचणारात व गाणारात रवींद्रनाथ टागोरांचे

भाऊ सत्येन्द्रनाथ, मेळ्याचे पहिले चिटणीस झालेले त्यांचे पुतणे गुणेन्द्रनाथ आणि गुणेन्द्रनाथांच्या मृत्यूनंतर मेळ्याचे चिटणीस झालेले कविश्रेष्ठांचे मोठे भाऊ द्विजेंद्रनाथ यांचा समावेश होता. त्यावेळी रवींद्रनाथ पंधरा वर्षांचे होते व त्यांनी या मेळ्यासाठी भारत नावाची कविता रचून ती गाईली होती.

हा मेळा स्थापन व्हायच्या पाच वर्षांच्या आतच बंगालच्या राष्ट्रीय जीवनात परिवर्तन झालं. 'बंगालच्या सुशिक्षित तरुणाच्या मनात फारं मोठं परिवर्तन होत आहे, बंगाली लोकांच्या मनात राष्ट्रवादाचा ऱ्हास व्हायची जी लाट आली होती तिला परत फिरवण्यात आलं आहे' असं नॅशनल पेपरनं लिहिलं.

५

ही माणसं भारताचं हृदयमंथन करणारी होती. भारतीय राष्ट्रवादाचे ते उद्गाते होते. त्यांनी भारताच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाचं पुनरुज्जीवन केलं. भारतीय स्वातंत्र्याकडे टाकलेलं ते पहिलं पाऊल होतं व केवळ त्यासाठीच त्यांनी आपलं संपूर्ण जीवन वाहिलेलं होतं. त्यांच्या परिश्रमामुळे देशाच्या राजकारणात चैतन्य आलं.

भारताच्या पहिल्या राजकीय संघटनेची म्हणजे 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन'ची चेन्नई, मुंबई आणि कोलकाता येथील शाखांसह १८५१ ते १८५७ च्या दरम्यान स्थापना झाली होती. मूलतः ती जमीनदारांची संघटना असल्यामुळे मुख्यत्वेकरून तिचा संबंध जमीनदारांच्या प्रश्नांशी यायचा. त्यामुळे अधिक लोकप्रिय संघटनेची आवश्यकता जाणवू लागली व लवकरच तिची जागा घेणारी 'बेंगाल नॅशनल लीग' ही संस्था *अमृत बझार पत्रिकेचे* संस्थापक संपादक शिशिरकुमार घोष व केंब्रीज विद्यापीठाचे पहिले भारतीय सिनिअर रॅंग्लर आनंदमोहन बोस यांनी काढली.

सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी १८७६ साली स्थापन केलेल्या 'इंडियन असोसिएशन'नं या संस्थेची नंतर जागा घेतली. सुरेन्द्रनाथ बनर्जींच्या आणि देशाच्या भाग्याच्या दृष्टीने नुकतंच त्यांना

नागरी सेवेतून मुक्त करण्यात आलं होतं. लॉर्ड सॅलिसबरी यांनी नागरी सेवा परीक्षेसाठी जी वयोमर्यादा कमी केली होती ती पूर्ववत करण्याकरिता लोकमत जागृत करण्याकरिता त्यांनंतरच्या वर्षात सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी संस्थेच्यावतीनं उत्तर भारताचा प्रचार दौरा काढला. १९७७ साली ते लॉर्ड लिटनच्या दरबारात *हिंदू पॅट्रिअटचे* प्रतिनिधी म्हणून हजर होते. राजकीय प्रगतीसाठी अखिल भारतीय संघटनेच्या आवश्यकतेची कल्पना या दरबारातच त्यांना सुचली. अनियंत्रित सत्ता असणाऱ्या व्हाईसरायचा गौरव वाढवण्यासाठी संस्थानिक आणि उमराव लोकांना भपकेदार पोशाख करून दरबारात आणण्यासाठी जर बळजबरी करण्यात येऊ शकते तर घटनात्मक मार्गाने शासनावर नियंत्रण आणण्यासाठी लोकांना का एकत्रित आणता येऊ नये असा प्रश्न त्यांनी स्वतःलाच विचारला. अशा प्रकारे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस'च्या कल्पनेचा जन्म झाला.

जवळपास याच वेळी कोलकाता येथील 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन'च्या धर्तीवर 'बाँबे असोसिएशन'ची स्थापना वेस्टर्न प्रेसिडेन्सीत मुख्यत्वेकरून दादाभाई नौरोजी यांच्या प्रयत्नाने करण्यात आली. ती एक दशकही टिकली नाही आणि अठराव्या शतकाच्या आठव्या दशकाच्या पूर्वार्धातच ती मृतप्राय झाली.

महाराष्ट्रात १८७० साली पुणे सार्वजनिक संस्थेची स्थापना करण्यात आली. या संघटनेची स्थापना मुख्यत्वेकरून शिक्षणतज्ज्ञ राष्ट्रवादी सीताराम हरी चिपळूणकर यांनी केली. त्यांनी आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व आगरकर यांनी *केसरी* आणि *मराठा* ही महाराष्ट्रातील मुख्य वृत्तपत्रेही काढली होती. मद्रास प्रांतात *द हिंदू* हे वृत्तपत्र प्रसिद्ध संपादक सुब्रमण्यम अय्यर यांनी अनेक गणमान्य व्यक्तींच्या मदतीने काढलं. मद्रास प्रांतातील सार्वजनिक जीवनात त्याला महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या जन्माआधी निघालेल्या या सर्व संस्था कमीअधिक प्रमाणात स्थानिक प्रश्नांशी जुळलेल्या होत्या. त्यांच्या प्रांतांच्या प्रश्नांना स्पर्श करणाऱ्या प्रशासनिक वा कायदेविषयक उणिवांवर अधूनमधून टीका करण्यापलीकडे त्यांच्या कामाचा आवाका जात

नव्हता. त्यांच्याजवळ कोणताच विधायक कार्यक्रम नव्हता. व्यापक अर्थानं सुनियोजित राजकीय आंदोलनाच्या काळाचा अजून जन्म व्हायचा होता आणि त्यांच्यासमोर निश्चित असं कोणतंच राजकीय उद्दिष्ट नव्हतं. सर्वसामान्य जनतेची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत होती व ती निराश होऊ लागली होती.

या प्रसंगी फार महत्त्वाची सेवा अनेक इंग्रज मित्रांनी केली. उदा. कॉब्डेन आणि जॉन ब्राईट, चार्ल्स ब्रॅडलॉ, इंग्लंडमधे हेन्री फॉसेट आणि ग्लॅडस्टोन तसेच सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर, जे पुढे कालांतरानं लंडन येथील टाईम्सच्या भारतीय विभागाचे संपादक झाले, भारतातील वायव्य सरहद्द प्रांतातील ए. ओ. ह्यूम. यांच्यासारखे भारतातील काही अधिकारी आणि उदार अंतःकरणाचे इंग्रज मित्र यांचा स्पष्टवक्तेपणा व त्यांनी भारतासाठी केलेले प्रयत्न यांमुळे अतिशय काळोखाच्या अवस्थेतही भारताची आशा जिवंत राहिली. भारतीय राष्ट्रवादाला नैराश्यापासून त्यांनी वाचवलं. इंग्लंड आणि भारतातील अंतिम तडजोड त्यांच्या प्रयत्नामुळे शक्य झाली.

लॉर्ड लिटनच्या काळात जे ढग दाटले होते ते लॉर्ड रिपनच्या काळात दूर झाले. त्यांनी रद्द केलेला व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट, स्थानिक स्वराज्य संस्थांत निवडणुकीच्या तत्त्वाचा समावेश करून त्यांनी दिलेलं प्रोत्साहन, नगरपालिकांमधे अधिकाऱ्यांशिवाय इतरास अध्यक्ष म्हणून निवडण्याची परवानगी, वर्णसमानतेसंबंधी त्यांनी घेतलेली धैर्याची भूमिका आणि त्यांच्याच देशबांधवांनी इल्बर्ट बिलासंबंधात त्यांची केलेली निंदानालस्ती या सर्व कारणांमुळे ते देशात अतिशय लोकप्रिय झाले होते. कालावधी संपल्यानंतर ते जेव्हा इंग्लंडला परतायला निघाले तेव्हा 'न भूतो न भविष्यती' अशी जी निदर्शनं झाली ती पाहून भारताचे अर्थमंत्री ऑकलंड कॉलव्हिन उद्गारले की हे सर्व जर खरं असेल तर याचा अर्थ काय आहे ? [सर सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, *अ नेशन इन मेकिंग*, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, (१९३१), पृष्ठ ८८] नोकरशहांचं मुखपत्र असलेल्या *पायोनिअरनं* भाष्य करताना लिहिलं: 'त्याचा अर्थ 'ब्रिटिश राज्याला फार मोठा धोका' असा होतो.' [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २४]

लॉर्ड रिपन यांना देण्यात आलेल्या निरोप समारंभात लोकांनी केलेला प्रेमाचा वर्षाव पाहून लॉर्ड रिपन यांचं हृदय हेलावून गेलं. त्यावेळी देण्यात आलेली सन्मानपत्रं, भेटी, स्मरणिका यांचा ढीग टेबलापासून छताला जाऊन भिडला होता. एक तासभर केलेल्या संस्मरणीय भाषणातून ब्रिटिश साम्राज्यात वर्णभेद न करण्यासंबंधी आणि समान संधी देण्याविषयी वेगवेगळ्या जाहीरनाम्यातून ब्रिटिशांनी जी आश्वासनं दिली होती त्यांचं मूल्य कमी करायचा काही लोकांनी जो प्रयत्न केला होता त्यावर सडकून टीका करत ते म्हणाले :

इंग्लंडच्या सम्राटांनी भारतीय लोकांना दिलेल्या पवित्र आश्वासनानंतर त्या आश्वासनांना फारसं मूल्य उरणार नाही असं तत्त्वज्ञान मांडणं चुकीचं आहे. उदारपणानं दिलेल्या त्या आश्वासनांवर सम्राटांच्या प्रजेनं गेली पंचवीस वर्षं विश्वास ठेवला आहे. पौर्वात्यांच्या पत्रातील मायन्यातील भाषा जशी निरर्थक असते त्याप्रमाणे त्या वचनांना निरर्थक समजणं हा शुद्ध शब्दच्छल होईल.

सर फिट्झ जेम्स स्टिफन यांनी ज्या विचारप्रणालीला मान्यता दिली आहे तिचा माझ्या संपूर्ण शक्तीनुसार प्रतिकार करणं माझं कर्तव्य आहे असं मी समजतो. सम्राटांच्या चारित्र्याशी आणि राष्ट्राच्या स्वाभिमानाशी ती गोष्ट विसंगत आहे. एकदा का जर त्या विचारसरणीचा स्वीकार करण्यात आला व त्यानुसार कृती करण्यात आली तर आपल्या शक्तीच्या मुळालाच त्यामुळे धक्का लागेल आणि आपला न्याय्य प्रभाव नाहीसा होईल. हा प्रभाव आपली गाजलेली शस्त्र वा सैन्यबळासारख्या इतर कोणत्याही गोष्टीवर अवलंबून नाही तर आपल्या प्रामाणिकपणावर अवलंबून आहे.' [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २५]

लॉर्ड रिपन यांच्या उदारमतवादी कार्यकालात भारतीयांच्या अंतःकरणात पुन्हा नवी आशा निर्माण होऊन भारतातील राष्ट्रीय आंदोलनानं प्रगतीचा नवीन टप्पा गाठला. आतापर्यंत आपण ठिकठिकाणी तुरळकपणे एकाकीपणानं जशी चळवळ करत होतो त्यापेक्षा एकमतानं जोमदार आणि सातत्यानं कृती करणं आवश्यक आहे असा विचार इल्बर्ट बिलाच्या चळवळीनंतर जवळपास एकाचवेळी विविध प्रांतातील लोकांच्या मनात येऊ लागला. असं केलं तरच

राजकीयदृष्ट्या आपली प्रगती होऊ शकेल. यासाठी आपण सर्वांनी एकाच झेंड्याखाली एकत्र येणं आवश्यक आहे. त्याप्रमाणे १८८३ साली इंडियन असोसिएशनच्या सूचनेनुसार कोलकाता येथे नॅशनल कॉन्फरन्स भरवण्यात आली. हीच ती सभा होती की जिच्यात राष्ट्रीय प्रश्नांसाठी लॉर्ड लिटनच्या मंडळाप्रमाणे सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी अखिल भारतीय संघटना स्थापन करायची कल्पना मांडली. नंतरच्या वर्षात 'बंगाल नॅशनल लीग'ची जतिन्द्रमोहन टागोर यांच्या नेतृत्वाखाली स्थापना करण्यात आली. भारतात प्रातिनिधिक संस्था स्थापन करायच्या प्रश्नाला लीगनं आपल्या कार्यक्रमात सर्वाधिक महत्त्व दिलं.

मद्रासमध्ये तीन वर्षांपूर्वी *द हिंदू* या वृत्तपत्राची ज्या मान्यवर लोकांनी स्थापना केली होती त्याच मान्यवरांच्या नेतृत्वाखाली १८८१ साली महाजन सभेची स्थापना करण्यात आली. मुंबईत जुनी 'बाँबे असोसिएशन' बंद पडल्यानंतर जणू काय मुंबई सुस्त झाली होती. नवीन वाऱ्याच्या झपाट्यात त्या काळात पश्चिम विभागाचं मार्गदर्शन करणाऱ्या फिरोजशहा मेहता, ऑनरेबल काशिनाथ त्रिंबक तेलंग आणि ऑनरेबल बद्रुद्दिन तैय्यबजी या प्रसिद्ध त्रिमूर्तीद्वारे मुंबईतही 'बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन'ची स्थापना ३१ जानेवारी १८८५ साली करण्यात आली.

अशा रीतीनं मध्यवर्ती राष्ट्रीय संघटना स्थापन करण्याच्या दृष्टीने भारत परिपक्व झाला होता.

## ६

ज्यांचा सामाजिक दर्जा कमी करण्यात आला आहे परंतु ज्याच्याजवळ परंपरागत बुद्धिमत्ता आणि नव्या काळातील ध्येयवाद आणि गतिशीलता असते ते लोक ज्या व्यवस्थेचं प्रतिनिधित्व करत असतात त्याच व्यवस्थेविरुद्ध, ती व्यवस्था पुन्हा अन्याय्य आणि जुलमी झाल्यानंतर, क्रांतीचं नेतृत्व करत असल्याचं इतिहासात अनेकदा आढळतं. अशाच प्रकारच्या लोकांत फ्रेंच राज्यक्रांतीचे प्रवर्तक डांटे आणि मिराबू होते. तसंच रशियात ऑक्टोबर १९१७ साली झालेल्या क्रांतीचं नेतृत्वही अशाच अनेक लोकांनी केलं होतं. अशाच प्रकारच्या लोकात

इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना करणाऱ्या ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम (१८२९-१९१२) ह्यांचीही गणना होते.

ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम हे प्रसिद्ध जोसेफ ह्यूम (१७७७-१८५५) ह्यांचे सुपुत्र होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात जॉन कंपनीच्या काळात केली होती. त्यावेळी वसाहतींचे राज्यपाल नबाब बनले होते आणि कंपनीच्या सेवेतील सामान्य अधिकारीदेखील मोठमोठ्यांची बरोबरी करू पाहत असत. ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम हे बंगाल सिव्हिल सर्व्हिसमध्ये १८४९ साली रुजू झाले. १८५७च्या उठावात धैर्य, हुशारी आणि कर्तव्याबद्दलची निष्ठा या आपल्या गुणांचा त्यांनी सर्वांना प्रत्यय आणून दिला. १८७९ साली त्यांची भारत सरकारच्या सेक्रेटरीपदी नियुक्ती झाली होती. परंतु वरिष्ठांचा काय हेतू आहे वा इच्छा आहे याचा विचार न करता आपल्याला चुकीच्या वाटणाऱ्या गोष्टींविषयी स्पष्टपणे मतप्रतिपादन करायच्या सवयीमुळे तीन वर्षांनंतर त्यांना त्या पदावरून काढून टाकण्यात आलं. सार्वजनिक शिक्षणासाठी व पोलिसांच्या कारभारात सुधारणा करण्यासाठी जिल्ह्याचे प्रमुख म्हणून त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नामुळे आणि अबकारी कराला ‘पापाचा पैसा’ म्हणून केलेल्या विरोधामुळे त्यांचा नावलौकिक फार वाढला.

*सध्याच्या अन्याय्य व्यवस्थेचा मी विरोध करतो. या व्यवस्थेनं आपल्याच बांधवांना मद्यपी केलं आहे आणि त्यामुळे निर्माण होणारे आनुषंगिक दुष्परिणाम उदा. बाहेरख्यालीपणा आणि गुन्हेगरी यासारख्या गोष्टीत ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा वर्गाला जन्य दिला आहे. आणि आता त्याच वर्गाला ही व्यवस्था मदत करते आहे.... आपण आपल्याच प्रजेला जेव्हा भ्रष्ट करतो तेव्ह त्यांच्या विनाशातून आपण कोणताच आर्थिक लाभ मिळवू शकत नाही. खरं सांगायचं तर या महसुलापासून, पापापासून मिळवलेल्या पैशापासून कोणतीच समृद्धी टिक शकत नाही. या अबकारी करामुळे मिळणाऱ्या प्रत्येक रुपयामुळे जी गुन्हेगारी निर्माण होते ती दाबण्यासाठी शासनाला दोन रुपये खर्च करावे लागतात... अजून काही वर्ष मी जर पदावर*

*राहिलो तर शासनाच्या तोंडावर लागलेला हा डाग पुसून टाकायचा मी प्रयत्न करीन व ख्रिस्ताने वर्णिल्याप्रमाणे समाजव्यवस्था निर्माण करायचा प्रयत्न करीन यात कोणताही संशय नाही.*

ते १८८२ साली सेवानिवृत्त झाले, भारतातच स्थायिक झाले आणि भारतीय लोकांच्या समस्यांशी एकरूप होऊन भारतीय लोकांमध्ये भारतीय लोकांसारखेच राहू लागले. मित्रांत पक्षीविद्येचे पोप म्हणून ते ओळखले जायचे. 'भारतातील शिकारी पक्षी' या विषयावर प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी त्यांनी आपल्या खिशातून ४००० पौंड खर्च केले. पक्षांचं संग्रहालय आणि वाचनालय तयार करण्यासाठी त्यांनी अजून २०००० पौंड खर्च केले. आशियातील पक्षांशी संबंधित असलेलं हे संग्रहालय आशियातील सर्वात मोठं संग्रहालय समजलं जाते. मृत्यूपत्राद्वारे त्यांनी ते भारत सरकारला दिलं.

भारताची झपाट्यानं संकटाकडे वाटचाल होत असल्यासंबंधीचे काही पुरावे निवृत्तीच्या काही काळ आधी ह्यूमना असे मिळाले. त्यामुळे त्यांना वाटायला लागलं की ब्रिटिशांनी आणलेली महागडी आणि अकार्यक्षम न्यायव्यवस्था ही भारतीय वातावरणाशी जशी अगदीच न जुळणारी आहे तशीच भारतीयाच्या गरजा पूर्ण करण्यासही ती असमर्थही आहे. भ्रष्ट आणि अन्याय्य धोरण, ताठर व सहानुभूतिशून्य महसूलव्यवस्था, जंगलच्या व शस्त्रास्त्राच्या कायद्याची कठोर अंमलबजावणी इत्यादी गोष्टीविषयी 'जोरात जरी नाही तरी मोठ्याप्रमाणात तक्रारी सुरू झाल्या होत्या. ह्यूमचे चरित्रलेखक व स्वतःही शासकीय अधिकारी असलेले सर विल्यम वेडरबर्न यांनी नोंदवल्याप्रमाणे लॉर्ड लिटनच्या काळात या 'दुर्दैवी उपायांना' पोलिसांच्या रशियन पद्धतीच्या दडपशाहीची जोड मिळाली. त्यामुळे भारत 'जवळपास क्रांतीच्या उंबरठ्याशी' येऊन ठेपला होता. 'दारिद्र्य, प्लेग आणि दुष्काळ' यामुळे त्रस्त झालेला शेतकरी समाज निराश होऊ लागला होता. त्याचवेळी तरुणांची मनं 'क्रांतीच्या व हिंसक मार्गाच्या धूसर स्वप्नानं भारली गेली होती.' धोकादायक वाटावं अशा पातळीवर तत्कालीनं शासनाचा जनतेशी संबंध तुटलेला होता. शासक आणि शासित यांच्यात कोणताच संवाद उरला नव्हता. आणि ज्याद्वारे प्रशासनासमोर आपली परिस्थिती, भावना, गाऱ्हाणी लोकांना मांडता यावी असा कोणताच घटनात्मक मार्ग

उरला नव्हता. अनेकांच्या शारीरिक यातनांचा काही थोड्याशा बुद्धिवादी लोकांवर परिणाम झाला व त्यामुळे सार्वत्रिक असमाधान धोकादायक पातळीवर पोहोचलं होतं. जनतेच्या दडपल्या गेलेल्या भावनांच्या अभिव्यक्तीसाठी सुरक्षित मार्ग निर्माण केला तरच विनाश टाळता येणं शक्य होईल असं ह्यूमना जाणवलं.

'सात मोठ्या खंडात संग्रहित करण्यात आलेल्या वेगवेगळ्या तीस हजार बातमीदारांनी दिलेल्या अहवालातील प्रचंड नोंदीतून' मिळालेल्या पुराव्यामुळे ह्यूमना पुढील धोक्याविषयी खात्री पटली होती. ह्या नोंदी धर्मगुरू आणि त्यांचे शिष्य यांच्यात झालेल्या पत्रव्यवहारावर आधारित होत्या. त्यामुळे त्यांच्या अस्सलपणाची खात्री होती. कारण आपल्या गुरूशी गुप्ततेच्या शपथेने बांधलेला कोणताही शिष्य आपल्या गुरूशी खोटा बोलू शकत नाही. खरा शिष्य आपल्या गुरूला जे काही सांगतो ते त्या शिष्याच्या दृष्टीने सत्य असते याविषयी आपण खात्री बाळगू शकतो. तो चूक करू शकतो पण तो खोटा बोलू शकत नाही. [सर वुइल्यम वेडरबर्न, *अॅलन ऑक्टोव्हिअन ह्यूम,* सी. बी., टी. फिशर अनविन, लंडन, (१९१३) पृष्ठ ८३] तसंच त्यातील अनेक नोंदी या अगदी 'तळच्या लोकांच्या संभाषणावर आधारित होत्या. तत्कालीन परिस्थितीविषयी सर्व लोक नैराश्यानं व्यापलेले असल्याचं त्या सर्व नोंदीतून दिसत होतं. उपासमारीनं झिजत झिजत आपण मरू अशी त्यांची खात्री पटलेली होती. त्यामुळे काही तरी करणं आवश्यक आहे असं त्यांना वाटत होतं.... आणि या 'काही तरी'चा अर्थ होता हिंसा.' अनेक नोंदीतून 'वेळ येताच उपयोग करता येईल अशा रीतीने लपवण्यात आलेल्या तलवारी, भाले, जुन्या प्रकारच्या बंदुकांची माहिती कळत होती.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *अॅलन ऑक्टोव्हिअन ह्यूम,* सी. बी., पृष्ठ ८३, पहा परिशिष्ट ज]

त्याचा असा अर्थ होत नव्हता की ताबडतोब क्रांतीची शक्यता होती वा क्रांतीचं बीजारोपण होऊ लागलं होतं. 'तिरस्करणीय लोकांची हत्त्या, सावकार, बाजार आदींना लुटणं अशाप्रकारच्या गुन्हेगारी स्वरूपाच्या प्रकरणात वाढ होऊ शकते एवढाच त्यातून निष्कर्ष काढण्यात आला होता.' सर विल्यम्स यांनी दिलेल्या माहितीनुसार संपूर्ण भारतभर उसळू शकणाऱ्या दंगलींबाबतचा हा अंदाज त्यांच्या स्वतःच्या देखरेखीखालील मुंबई प्रांतातील

दक्षिणेकडील उठावात खरा ठरला. दक्षिणेकडील उठाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या शेतकऱ्यांच्या उठावात अशाच प्रकारच्या घटना घडल्या. 'त्यांची सुरुवात टोळ्यांनी एकाएकी घातलेले डाके, सावकारांवर केलेले हल्ले यांनी झाली. अखेरीस या टोळ्या पोलिसांनाही भारी पडाव्या एवढ्या सशक्त झाल्या व त्यामुळे पायदळ, घोडदळ यासह पुण्यातील संपूर्ण सैन्याला त्याविरुद्ध मोर्चा सांभाळावा लागला.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ८३]

ह्यूमच्या संपर्कात आलेल्या काही धर्मगुरूंनी ह्यूमना सांगितलं की तुमच्यासारखे शासनाशी संपर्क असलेले लोक जनतेत सर्वत्र पसरलेलं हे नैराश्य घालवण्यासाठी काही उपाययोजना करणार नसतील तर संपूर्ण देशात जनतेच्या अगदी तळागाळापर्यंत पोहोचलेली नैराश्याची ही अशुभ भावना 'एखाद्या भयानक उद्रेकाकडे आपल्याला घेऊन जाईल...... ते म्हणाले की 'संपूर्ण जंगल वाळलेलं आहे, योग्य दिशेनं वारा वाहू लागला तर वणवा पसरायला वेळ लागणार नाही. असा वारा आता वाहतो आहे आणि तोही जोरात वाहतो आहे.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ७९-८०]

लहान प्रमाणात का होईना परंतु १८५७च्या उठावात अशाच परिस्थितीतून जावं लागलेलं असल्यामुळे 'एका भयानक क्रांतीच्या उंबरठ्यावर आपण उभं असल्याबद्दल' ह्यूम यांच्या मनात किंचितही शंका नव्हती. सर ऑकलंड कॉलव्हिन यांना पाठवलेल्या प्रसिद्ध पत्रात ह्यूमनी लिहिलं, 'आपल्याच चुकीमुळे प्रचंड प्रमाणात निर्माण होऊ घातलेल्या शक्तीला मोकळी वाट करून देण्यासाठी एका परिणामकारक सुरक्षित मार्गाची गरज होती.... व काँग्रेसच्या चळवळीपेक्षा दुसरा अधिक सुरक्षित मार्ग शोधला जाऊ शकत नाही.' त्यांनी तसंच वागायचा निर्णय घेतला.

त्यानुसार १८८३ साली 'कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना' उद्देशून काढलेल्या प्रसिद्ध परिपत्रकातून त्यांनी देशाच्या नैतिक, सामाजिक आणि राजकीय पुनरुज्जीवनासाठी वाहिलेल्या लोकांच्या संघटनेचे संस्थापक सदस्य होण्यासाठी 'चांगल्या आणि प्रामाणिक अशा पन्नास लोकांना' पुढं यायची विनंती केली.

*संस्थापक म्हणून जर चांगले आणि प्रामाणिक असे केवळ पंधरा लोक जरी मिळू शकले तरी या गोष्टीची सुरुवात करता येऊ शकते...... तुम्ही या भूमीचे मीठ आहात. आणि जर तुम्हा सुशिक्षितातून स्वार्थत्यागाची तयारी असलेले, देशाबद्दल पुरेसं प्रेम आणि अभिमान असलेले, पुढाकार घेण्यासाठी व आवश्यकता पडल्यास या कामासाठी आपलं संपुर्ण भावी जीवन वाहायची तयारी असलेले, खरी आणि अंतःकरणापासूनची निःस्वार्थ राष्ट्रभक्ती असलेले पुरेसे पन्नास लोकही आढळू शकले नाहीत तर मग या राष्ट्राला कोणतंही भवितव्य नाही. मग तिच्या मुलांना परकीय शासकांच्या हाताखाली दुय्यम दर्जाच्या असहाय साधनाप्रमाणेच राहावं लागेल आणि राहायलाही हवं. 'तुम्ही जर आघात कराल तरच तुम्ही स्वतंत्र होऊ शकाल.' आणि जर विचारवंत पुढाऱ्यांमधेही हे साहस करायचं धैर्य नसण्याएवढे ते दुर्दैवी प्राणी असतील अथवा वैयक्तिक स्वार्थात ते एवढे मग्न असतील की आपल्या मातृभूमीसाठी हा आघात करायची त्यांची तयारी नसेल तर त्यांना दाबुन ठेवुन जे पायाखाली चिरडण्यात येत आहे ते योग्यच आहे असं म्हणावं लागेल. मग याहून चांगल्या वागणुकीयाठी ते पात्रच नाहीत असं म्हणावं लागेल.... तुम्ही निवडक लोक, देशातील सर्वाधिक सुशिक्षित लोक तुमच्या आणि तुमच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी... वैयक्तिक सुखी जीवनाचा, स्वार्थी हेतूंचा अव्हेर करणार नसाल तर मग आम्ही तुमचे मित्र चुक आहोत आणि आपले विरोधक बरोबर आहेत असं ठरेल;.... मग सद्यःस्थितीत प्रगतीची आशा कोणत्याही परिस्थितीत करता येऊ शकत नाही आणि भारतात सध्या असलेल्या सरकारपेक्षा चांगलं सरकार मिळायची पात्रताही भारतात नाही असं म्हणावं लागेल...* [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ५१-५२]

या नम्र आवाहनाला देशातून व्यापक प्रतिसाद मिळाला आणि 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'च्या स्थापनेची कल्पना मूळ धरू लागली. मुळात त्यांची योजना प्रस्तावित संघटनेनं केवळ सामाजिक प्रश्न हाती घ्यावे आणि राजकीय कामाची जबाबदारी अस्तित्वात असलेल्या 'प्रेसिडेन्सी असोसिएशन ऑफ बॉम्बे', 'द इंडियन असोसिएशन ऑफ बेंगाल', आणि 'महाजन सभा ऑफ मद्रास' यासारख्या प्रांतीय संघटनांकडेच असू द्यावी अशी होती. परंतु त्यांनी लॉर्ड डफरिन यांचा सल्ला घेतला आणि डफरिन यांनी सांगितलं की भारतात इंग्लंडमधे विरोधी पक्ष

जे कार्य करतो ते कार्य करणारा गट नाही. शासनप्रमुख म्हणून लोकांच्या खऱ्या इच्छा काय आहेत हे जाणून घेण्यात अडचण येते, वृत्तपत्रांच्या मार्गदर्शनाला विश्वासार्ह मानता येऊ शकत नाही. त्यामुळे खरं लोकमत काय आहे हे सांगणारी आणि प्रशासनात काय उणिवा आहेत व त्या कशा दुरुस्त कराव्या हे सरकारच्या निदर्शनास आणून देणारी अशा प्रकारची एखादी विश्वासार्ह संघटना अस्तित्वात आली तर ते शासक आणि शासित या दोघांच्याही दृष्टीनं उत्तम होईल. शासन आणि प्रस्तावित संघटनेतील निकटच्या सहकार्याचं प्रतीक म्हणून प्रस्तावित संघटनेच्या प्रथम अधिवेशनाचं अध्यक्षपद मुंबईचे राज्यपाल लॉर्ड रे यांनी भूषवणं उचित राहील काय असं ह्यूम यांनी लॉर्ड डफरिन यांना विचारलं असता लॉर्ड डफरिन यांचं म्हणणं पडलं की असं केल्यास 'प्रतिनिधी आपल्या मनातले विचार मौकळेपणानं व्यक्त करायला कचरतील' व म्हणून असं करणं उचित होणार नाही. त्यांनी यापलीकडे जाऊन अशीही अट घातली की जोपर्यंत मी या देशात आहे तोपर्यंत या संघटनेशी असलेला माझा संबंध उघड करण्यात येऊ नये. [अम्बिका चरण मझुमदार, *इंडियन नॅशनल इव्हॉल्युशन*, जी. ए. नटेसन अँड कंपनी, मद्रास, (१९१७), पृष्ठ ५२]

डफरिन यांच्या युक्तिवादानं प्रभावित होऊन ह्यूम यांनी देशातील प्रमुख राजकीय पुढाऱ्यांसमोर दोन योजना ठेवल्या - एक स्वतःची आणि दुकरी लॉर्ड डफरिन यांची. पुढाऱ्यानी एकमतानं दुसऱ्या योजनेचा स्वीकार केला. अशा रीतीनं १८८४च्या दरम्यान 'इंडियन नॅशनल युनियन'ची स्थापना करण्यात आली. सदस्यांना एक प्राथमिक अहवाल पाठवण्यात आला. त्यात सांगण्यात आलं की 'ब्रिटिश राजमुकुटाप्रती एकनिष्ठ राहणं हे संघटनेचं प्रमुख ध्येय राहील याबद्दल सर्व सदस्यांचं एकमत आहे. त्याचबरोबर 'ब्रिटिश संसदेनं वेळोवेळी मंजूर केलेल्या आणि सिंहासनानं मान्यता दिलेल्या तत्त्वांच्या विरोधात भारत सरकारनं जर वर्तन केलं तर आवश्यकता पडल्यास सर्व घटनात्मक मार्गांनी सर्व प्रकारच्या अधिकाऱ्यांना वा अधिकरणांना, मग ते लहान असोत वा मोठे, आणि इथं असो वा इंग्लंडमधे, संघटना विरोध करील.' परंतु त्यात असंही मान्य करण्यात आलेलं होतं की 'राजकीय दृष्टीच्या टप्प्यात असलेल्या काळात भारताचं इंग्लंडशी जुळलेलं राहणं आमच्या राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीनं भारतासाठी नितांत आवश्यक आहे.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ५३] भारतातील सर्व भागातील प्रतिनिधींची

सभा पुणे येथे येत्या नाताळच्या सुट्यांमधे बोलावण्यात यावी असा निर्णय मार्च १८८५मधे युनियनतर्फे घेण्यात आला. तिलाच नंतर ‘भारतीय राष्ट्रीय काँग्रेस’ म्हणून ओळखण्यात येऊ लागलं.

**७**

कॉलऱ्याच्या उद्‌भवामुळे पुणे येथे बोलावण्यात येणाऱ्या काँग्रेसच्या सभेचं ठिकाण बदलवण्यात आलं व ती सभा पुण्याऐवजी मुंबई येथे घ्यायचं ठरवण्यात आलं. देशाच्या विविध भागातून सार्वजनिक कार्यात भाग घेणारे स्वयंनिर्वाचित प्रतिनिधी काँग्रेसच्या सभेत भाग घेण्यासाठी आले. काही प्रमुख अधिकाऱ्यांनी आणि मुंबईच्या प्रमुख नागरिकांनी परिषदेच्या पूर्व सायंकाळी त्यांची भेट घेतली. माननीय न्यायाधीश जार्डीन, कॉलनल फेल्प्स, प्रा. वड्‌र्सवर्थ आणि आपल्या निवृत्तीनंतर काँग्रेसच्या कार्याला वाहून घेणारे आणि काँग्रेसची सेवा केवळ आपल्या बुद्धिमत्तेनंच नाही तर पैशानंही करणारे सन्माननीय वुइल्यम वेडरबर्न इत्यादी लोकांचा त्यात समावेश होता.

२८ जून १८८५ रोजी दुपारी परिषदेची सभा तेजपाल गोकुलदास महाविद्यालयाच्या प्रशस्त सभागृहात झाली. आपल्या पारसी पगडीत, सडपातळ आणि थोडेसे ठेंगण्या बांध्याचे परंतु तीक्ष्ण बुद्धीचे, प्रांजळ आणि चष्मा घातलेले धारदार चेहऱ्याचे दादाभाई नौरोजी, पश्चिमेकडील उगवते तारे फिरोजशहा मेहता, काशिनाथ त्रिंबक तेलंग, नारायण गणेश चंदावरकर आणि मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनचे सचिव आणि नंतर सांख्यिकी शास्त्रातील विद्वान म्हणून मान्यता मिळवलेले दिनशा वाच्छा इत्यादींचा प्रतिनिधींमधे समावेश होता. उंच उठावदार शरीरयष्टी, रुंद कपाळ आणि चमकदार चेहऱ्याचे डब्ल्यू. सी. बॉनर्जी कोलकात्याचं प्रतिनिधित्व करत होते. पुण्याहून गोपाळ गणेश आगरकर आणि सार्वजनिक सभा पुणेचे सचिव चिपळूणकर आले होते. मद्रासचं प्रतिनिधित्व सार्वजनिक प्रश्नांची चांगली पकड आणि तीक्ष्ण लेखणी असलेले व ह्यूमच्या म्हणण्याप्रमाणे लंडन टाईम्समध्ये असते तर त्या वृत्तपत्राला

भूषणास्पद झालेले हिंदूंचे जी. सुब्रमण्यम अय्यर करत होते. मुसलमान समाजाचं प्रतिनिधित्व रहिमतउल्ला सयानी करत होते.

'भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पिता' असलेले ए. ओ. ह्यूम यांच्याकडे सर्व निरीक्षकांचे डोळे लागलेले होते. जनसेवा करायची तीव्र तळमळ असल्यामुळे त्यांनी लेफ्टनंट गव्हर्नरचं पदही नाकारलं होतं आणि त्यांना अथवा त्यांच्या पत्नीला राज्यपालपदाशी जुळलेल्या मानमरातबाचं विशेष असं काही वाटत नव्हतं. लॉर्ड लिटम यांनी जेव्हा गृहमंत्रिपदासाठी आणि के.सी.एस.आय. या पदवीसाठी त्यांचं नाव सुचवलं तेव्हा लँकेशायर येथील कापडाच्या मदतीसाठी कापसावरील कर कमी करायच्या लॉर्ड नॉर्थब्रूक यांच्या मार्गात ते अडथळा निर्माण करत असल्याच्या कारणासाठी त्यांच्या नावाला लॉर्ड सॅलिसबरींनी मान्यता दिली नाही. [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ४७]

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित असलेल्या लोकांमधे मुंबई विधान परिषदेचे सदस्य आणि स्मॉल कॉज कोर्ट, पुणेचे न्यायाधीश सन्माननीय महादेव गोविंद रानडे - जे नंतर मुंबई प्रांताच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले होते - व पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयाचे संस्कृतचे महान विद्वान आर. जी. भांडारकर हेही उपस्थित होते.

वृत्तपत्रकार, अर्थशास्त्रज्ञ आणि स्त्रियांच्या शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते दादाभाई नौरोजी (१८२५ - १९१७) हे काँग्रेसच्या पहिल्या आधारस्तंभापैकी होते. कडवे समाजसुधारक आणि दारूबंदीचे कडवे पुरस्कर्ते असलेल्या दादाभाईनी अफूच्या अनैतिक व्यापाराविरुद्ध कोणत्याही प्रकारच्या तडजोडीस वाव नसलेल्या वृत्तीनं बलिदानाच्या तयारीनं लढा द्यायला सुरुवात केलेली होती. तसंच काँग्रेसच्या स्थापनेच्या चाळीस वर्षे आधीपासूनच भारतातील संघटित जीवनाला सुरुवात केली होती. ते तीनदा भारतीय राष्ट्रीय कांग्रेसचे अध्यक्ष झाले होते व भारतात सर्वत्र पितामह म्हणून ते ओळखले जायचे.

मुंबई येथील एलफिन्स्टन शाळेत मुख्य नेटिव्ह सहायक शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली व शेवटी ते तिथं गणिताचे व नैसर्गिक इतिहासाचे सहायक

प्राध्यापक झाले. ते इंग्लंडमधे व्यापार करणाऱ्या सुरुवातीच्या प्रतिष्ठानातील कामा यांच्या प्रतिष्ठानात भागीदार म्हणून १८५५ साली काम करू लागले. परंतु 'हजारो माणसांचं आयुष्य बरबाद करणाऱ्या' अफू, दारू आदींच्या व्यापारातून मिळालेला पैसा खिशात घालणं विवेकाला न भावल्यामुळे आपण त्या प्रतिष्ठानातून राजीनामा दिला असल्याचं त्यांनी सांगितलं. [आर. पी. मसानी, *दादाभाई नौरोजी : द ग्रँड ओल्ड मॅन ऑफ इंडिया*, जॉर्ज ॲलन अँड अनविन लि., लंडन, (१९३९), पृष्ठ ७४] १८७४ साली त्यांची नियुक्ती बडोदा राज्याच्या मंत्रीपदी आणि १८८५ साली त्यांची नियुक्ती मुंबई विधान परिषदेचा अतिरिक्त सदस्य म्हणून करण्यात आली. सेंट्रल फिन्सबरी मतदार संघातून उदारमतवादी पक्षाचे १८९२ला उमेदवार म्हणून ते उभे राहिले. त्यावेळी हुजूर पक्षाचे प्रधान मंत्री लॉर्ड सॅलिसबरी यांनी त्यांचं वर्णन 'काळा माणूस' असं केलं आणि मतदारांना विचारलं की अशा माणसाला तुम्ही निवडून देणार काय? परंतु लॉर्ड सॅलिसबरी यांच्या या 'अविवेकीपणाच्या' उद्गारामुळे त्यांच्यावर जॉन मोर्ले यांनी 'जळजळित जाहीर टीका केली' व लॉर्ड सॅलिसबरी यांना आपले शब्द परत गिळावे लागले. अखेरीस दादाभाई अगदी थोड्या मतानं त्या मतदार संघातून निवडून आले. त्यामुळे 'श्रीयुत नॅरोजी' म्हणून ते प्रसिद्धीस आले.

*'द पॉव्हर्टी अँड अनब्रिटिश रूल इन इंडिया'* हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ प्रकाशित झाला. अतिशय चिकाटीनं केलेल्या संशोधनानंतर त्यांनी भारताच्या दारिद्र्याचं स्वरूप स्पष्ट केलं व भारतातील संपत्तीचं जे शोषण करण्यात येत आहे त्याच्याशी त्या दारिद्र्याचा असलेला संबंध त्यांनी स्पष्ट केला. ते ९२ वर्षांचं दीर्घ जीवन जगले. 'आमच्या काळातील सर्वात प्रमुख भारतीय, निष्कलंक आणि नि:स्वार्थ चारित्र्याचा माणूस' असं गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांचं वर्णन केलं आणि सांगितलं की 'त्यांच्या डोक्यावर वर्षवर्षाच्या संयमाचं ओझं होतं व तरुणाईचा जळजळित संताप होता.'

काँग्रेसमधे येण्यापूर्वी फिरोजशहा मेहता आणि डब्ल्यू. सी. बॉनर्जी हे दोघंही प्रख्यात कायदेपंडित होते. अमेरिकन युद्धाच्या काळात संपत्ती मिळवलेल्या जहागिरदाराचे सुपुत्र असलेले श्रीयुत रुस्तमजी जमशेटजी जिजीभाय या श्रीमंत पारसी गृहस्थाच्या दानशूरपणामुळे

त्यांना वकिलीची परीक्षा देता आली होती. जिजीभाय यांनी कायद्याच्या अभ्यासासाठी इंग्लंडला जाऊ इच्छिणाऱ्या होतकरू आणि चारित्र्यसंपन्न तरुणांना दरवर्षी शिष्यवृत्ती देता यावी म्हणून फार मोठी संपत्ती बाजूला काढून ठेवली होती. फिरोजशहा मेहता आणि डब्ल्यू. सी. बॉनर्जी हे दोघंही त्या वर्षाच्या शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले होते.

फिरोजशहा मेहता यांच्या नावावर इंग्रजीत कोटी करून त्यांच्या देशबांधवांनी त्यांच्या निर्भय धाडसीपणासाठी त्यांचं नाव फेरॉशस मेहता म्हणजे पोलादी मेहता असं ठेवलं होतं. मुंबई महानगरपालिकेचे ते आत्मा होते. घरंदाजपणाच्या सवयी आणि अधिकाराचा स्वभाव असल्यामुळे १८९३पासून मुंबई विधान परिषदेचे ते अखेरपर्यंत सदस्य होते व अनेक वर्ष काँग्रेसमागील शक्ती होते. 'कोणत्याही राष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात त्यांचं पहिलं स्थान राहील' असं त्यांचं वर्णन ब्रिटिश संसदेच्या एका उदारमतवादी सदस्यानं मँचेस्टर गार्डियनमधे केलं होतं. [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलटिक्स सिन्स म्युटिनी*, आंध्र युनिव्हर्सिटी, वाल्टेयर, (१९३७), पृष्ठ ३८]

सर्व बाबतीत फिरोजशहा मेहता यांच्या तोडीस तोड असलेले व नेहमी पार्श्वभूमीत राहणं पसंत करायच्या एका बाबतीत तरी फिरोजशहा मेहता यांच्यावरही ताण करणारे डब्ल्यू. सी. बॉनर्जी हे कलकत्ता वकील परिषदेचे ज्येष्ठ सदस्य होते. ते उच्च न्यायालयात वकिली करायची सनद प्राप्त केलेले पहिले भारतीय वकील होते. वकिली व्यवसायात त्यांना प्रचंड यश मिळालेलं होतं व त्यातून मिळालेल्या उत्पन्नामुळे ते एवढे धनाढ्य झाले होते की त्यांनी क्रॉयडन येथे एक घर बांधलं व आपल्या कुटुंबियांसह वर्षातून सहा महिने ते तिथं राहायचे. इंग्लंडमधील काँग्रेसच्या कार्यासाठी ते दरवर्षी १० ते २० हजार रुपये द्यायचे.

शिक्षणतज्ज्ञ, वकील आणि राजकारणी काशिनाथ त्रिंबक तेलंग उत्कृष्ट वादविवादपटू आणि तीक्ष्ण बुद्धिमत्ता असलेले विद्वान होते. ते वेगानं वकील मंडळाच्या नेतृत्वपदावर पोहोचले. बत्तीस वर्षांचे असतानाच त्यांना भारतीय शिक्षण आयोगाचं सदस्य नेमण्यात आलं व तीन वर्षांनंतर मुंबई विधान परिषदेचे ते सदस्य झाले. वयाच्या एकोणचाळीसाव्या वर्षी त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त करण्यात आलं. वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी त्यांना

मृत्यू आला व त्याच्या दोन वर्ष आधी त्यांना मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्त करण्यात आलं होतं. 'तेलंग संप्रदायाचे प्रवर्तक' म्हणून ओळखले जाणारे तेलंग यांचं भारताच्या सार्वजनिक जीवनात एक वेगळंच स्थान होतं.

परिषदेच्या उद्घाटन समारंभाचं दृश्य अतिशय गंभीर आणि प्रभावशाली होतं. नवयुगाला जन्म देणारा भारताच्या इतिहासातील तो एक आगळाच क्षण होता. ज्यांचे पहिले आवाज ऐकू आले त्यांत ए. ओ. ह्यूम, सुब्रमण्यम अय्यर आणि के. टी. तेलंग यांचे आवाज होते. पहिल्या अध्यक्षपदासाठी डब्ल्यू. सी. बॉनर्जी यांचं नाव ए. ओ. ह्यूम यांनी सुचवलं. सुब्रमण्यम अय्यर यांनी त्याचं अनुमोदन केलं आणि के. टी. तेलंग यांनी त्याला पाठिंबा दिला. बॉनर्जीचं अध्यक्षीय भाषण काँग्रेसच्या इतिहासातील कदाचित सर्वात लहान भाषण असावं. 'साम्राज्याच्या विविध भागातील देशासाठी कार्य करणाऱ्या कळकळीच्या कार्यकर्त्यात जवळीक आणि मैत्रीची भावना निर्माण करणं; सर्व देशप्रेमी लोकातील वंश, धर्म वा प्रदेश यामुळे निर्माण होणाऱ्या पूर्वग्रहांना दूर करायचा प्रयत्न करणं; लॉर्ड रिपन यांच्या लोकप्रिय शासनात मूळ असलेल्या राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेचा विकास आणि वाढ होण्यासाठी प्रयत्न करणं; देशातील सुशिक्षित लोकांचं तत्कालीन सामाजिक महत्त्वाच्या प्रश्नाविषयी अधिकृत मत मांडणं; आणि आगामी काळातील कार्यक्रमाची रूपरेषा मांडणं अशा प्रकारच्या कार्यक्रमाची चतुःसूत्री त्यांनी आपल्या भाषणातून मांडली. विविध विषयांना स्पर्श करणारे काँग्रेसनं नऊ प्रस्ताव मंजूर केले. त्यांत भारतीय प्रशासनाची चौकशी करण्याकरिता सम्राटांकडे चौकशी आयोगाची आणि इंडिया कौन्सिलच्या विसर्जनाची मागणी, तसंच विधानसभेत नियुक्त सदस्यांसमवेतच निवडून आलेल्या प्रतिनिधींचाही समावेश असावा ह्या गोष्टी प्रमुख होत्या. त्याचप्रमाणे मंत्र्यांना प्रश्न विचारायचा हक्क असणं आणि ज्या प्रांतात अजून विधान परिषदा तयार करण्यात आल्या नव्हत्या तिथं विधान परिषदा निर्माण करणं आणि विधान परिषदेतील बहुसंख्याकांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी हाउस ऑफ कॉमन्सची एक तदर्थ समिती तयार करणं इत्यादी मागण्यांचाही त्यात समावेश होता. इतर विषयात भारतीय नागरी सेवेची परीक्षा एकाच वेळी इंग्लंड आणि भारतात घेणं, उमेदवारांचं वय वाढवणं,

सैन्यावर होणारा अवाढव्य खर्च, ब्रह्मदेशाचा वरचा भाग काबीज करून तो भारताला जोडायची मागणी इत्यादींचाही समावेश होता.

प्रथेनुसार अध्यक्षांनी भूषवलेल्या अर्ध्यक्षपदाबद्दल त्यांचे आभार मानून तीन दिवसांच्या सत्राचा समारोप करण्यात आला. त्यानंतर श्रीयुत ह्यूम ह्यांचा 'त्रिवार जयघोष' करण्यात आला व नंतर दरवर्षीचा तो 'वार्षिक प्रघातच' झाला. त्यानंतर श्रीयुत ह्यूम ह्यांनी 'सम्राज्ञींचा त्रिवार जयघोष करायची' सूचना केली तेव्हा अत्यंत उत्साहात तो जयघोष करण्यात आला.

काँग्रेसचं दुसरं अधिवेशन कोलकाता येथे डिसेंबर २८, १८८६ रोजी झालं. तिचं अध्यक्षपद दादाभाई नौरोजी यांनी भूषवलं. काँग्रेसच्या सदस्यात यावर्षी पडलेली महत्त्वाची भर म्हणजे पंडित मदनमोहन मालवीय आणि राजा राजेंद्रलाल मित्र यांची. आंग्लभाषिक लोकांचं प्रमुख वृत्तपत्र असलेल्या *स्टेट्समननं* अधिवेशनाचा आढावा घेताना लिहिलं, 'आपल्या शतकाच्या राज्यकारभारानं निर्माण केलेले प्रभावी लोक म्हणून या लोकांकडे आपण पाहू शकतो.' परंतु लंडन येथील *टाईम्सनं* लिहिलं की काँग्रेस म्हणजे असंतुष्ट लोकांनी जागा मिळवण्यासाठी केलेला प्रयत्न आहे. ज्यांना देशात काडीचंही मोल नाही व देशहिताशी ज्यांना काहीही देणंघेणं नाही अशा प्रकारचे लोक काँग्रेसमधे आहेत. या सर्व 'बोलक्या क्लबचे' हे प्रतिनिधी 'देशाच्या शांततेला गंभीर धोका होऊ शकतात' अशीही *टाईम्सनं* धोक्याची जाणीव करून दिली.

काँग्रेसच्या अधिवेशनानंतर व्हाईसराय लॉर्ड डफरिन यांनी काही सदस्यांना प्रतिनिधी म्हणून नाही तर 'राजधानीत आलेले महत्त्वाचे पाहुणे' म्हणून बोलावलं व त्यांचं स्वागत केलं. त्यांनी त्यांना बागेतील मेजवानीसाठीही आमंत्रित केलं. बद्रुद्दीन तैय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली चेन्नई येथे भरलेल्या तिसऱ्या काँग्रेसच्या प्रतिनिधींचं स्वागतही अशाच प्रकारे करण्यात आलं होतं. राज्यपाल लॉर्ड कॉनेमोर यांची स्वतःची काँग्रेसच्या अधिवेशनात उपस्थित राहायची इच्छा होती. परंतु त्यांनी डफरिन यांचा सल्ला मान्य केला व केवळ राजभवनात प्रतिनिधींचे स्वागत करायचा निर्णय घेतला. तो समारंभ अतिशय उत्तम झाला होता. पाहुण्यांना भरपूर मेजवानी देण्यात आली व राज्यपालांच्या वाद्यवृंदाचं वादन त्यावेळी चालू होतं.

काँग्रेसचं चौथं अधिवेशन अलाहाबाद येथे कोलकाता येथील प्रसिद्ध व्यापारी जॉर्ज यूल यांच्या अध्यक्षतेखाली भरलं तर पाचवं मुंबई येथे सर वुइल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली भरलं होतं. याच वर्षी गोपाळ कृष्ण गोखले काँग्रेसचे सदस्य झाले. काँग्रेसच्या पाचव्या अधिवेशनास उपस्थित राहणाऱ्या प्रमुख लोकांमधे चार्ल्स ब्रॅडलॉ हेही होते. अधिवेशनाच्या शेवटी देशातील सर्व भागाच्या प्रतिनिधींनी त्यांना मानपत्रं दिली. अशा रीतीनं अगदी सुरुवातीपासूनच काँग्रेसशी सहानुभूती ठेवणाऱ्या इंग्रजांची एक मालिकाच असलेली आढळून येते व काँग्रेसचे त्यांच्याशी घनिष्ट संबंध होते. त्यामुळे तिचा संघर्ष इंग्रज माणसांशी नसून इंग्रजांच्या सत्तेशी असल्याचं स्पष्ट झालं.

## ८

काँग्रेसच्या अगदी स्थापनेपासूनच जात, धर्म वा पंथ यांचा विचार न करता काँग्रेस सर्वांचं प्रतिनिधित्व करत होती. अशा रीतीनं पहिल्या कांग्रेसचे अध्यक्ष हिंदू, दुसरीचे पारसी, तिसरीचे मुसलमान, चौथ्या आणि पाचव्या काँग्रेसचे अध्यक्ष इंग्रज होते. पहिल्या काँग्रेसला केवळ दोन मुसलमान हजर होते तर दुसरीत ३३ मुसलमान हजर होते. सहाव्या काँग्रेसमधे एकूण ७०२ प्रतिनिधीत १५६ म्हणजे २२ टक्के मुसलमान हजर होते.

अधिकाऱ्यांना वाटत होतं की काँग्रेस संबंधीच्या उत्साहाचा हा उद्रेक तात्पुरता राहील व ही अवस्था लवकरच निघून जाईल. परंतु त्यांचा काळवंडलेला चेहरा आणि निग्रहाच्या विरोध यानंतरही, जी गोष्ट लपवणं कधीकधी अशक्य व्हायचं, ती वर्षामागून वर्ष भरत राहिली व तिच्या सामर्थ्यात सतत भर पडत राहिली. १८८५ साली तिच्या अधिवेशनास हजेरी लावणाऱ्या प्रतिनिधींची संख्या केवळ ७२ होती, १८८६ साली ती ४३६ झाली, १८८७ मधे ६०७ व १८८८ मधे ती १२०८ वर पोहोचली.

ह्या सर्व गोष्टी नोकरशाहीला पसंत नव्हत्या. काँग्रेसची सुरुवात जरी सर्वोच्च अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीनं झालेली असली तरी जसजसं तिचं सामर्थ्य वाढत गेलं व ती

जोरदार धोरणाचा अवलंब करू लागली तसतशी ती त्यांच्या नजरेतून उतरू लागली एवढंच नाहीतर तिला बंडखोर म्हणूनही संबोधण्यात येऊ लागलं. सर्वसामान्य माणसाचं दारिद्र्य नष्ट करायच्या जाणिवेनं ह्यूम यांचं अंतःकरण तळमळत होतं. तीन वर्षे निवेदनं वगैरे देऊनही कोणतीही सूट मिळत नसल्याचं पाहून इंग्लंडमधील कॉर्न लॉच्या विरोधात लीगनं ज्याप्रमाणे जोरदार प्रचारमोहीम आखली होती त्याप्रमाणे ह्यूमनी अधिकाऱ्यांच्या लक्षात प्रश्नाचं गांभीर्य आणण्यासाठी प्रचार मोहीम आखायचं ठरवलं. आपल्या योजनेसाठी त्यांनी निधी गोळा करण्यासाठी आवाहन केलं. संपूर्ण देशात १,००० हून अधिक सभा घेण्यात आल्या. त्यातील अनेक सभांमधे ५,०००हून अधिक लोक उपस्थित होते. प्रचारासाठी ५ लाख परिपत्रकं वाटायची व्यवस्था करण्यात आली.

अधिकारी घाबरले. लॉर्ड डफरिन यांनी काँग्रेसशी आपला काहीही संबंध नाही असं जाहीर केलं आणि काँग्रेसनं प्रशासन व्यवस्थेचा न्यायव्यवस्थेशी कोणताही संबंध नसावा असा जो प्रस्ताव मांडला होता तो 'परिपूर्णावस्थेत लागू होणारा सल्ला' आहे असं ते म्हणाले. १८८८ साली भारतातून जायच्यापूर्वी सेंट अँड्र्युज येथे देण्यात आलेल्या मेजवानीत ते म्हणाले की काँग्रेसला पाठिंबा देणारा सुशिक्षित वर्ग अतिशय नगण्य आहे. असं म्हणून त्यांनी सुशिक्षित वर्गाला कमी लेखलं. इंग्लंडप्रमाणेच भारतातही सांसदीय पद्धती असावी या काँग्रेसच्या मागणीविषयी ते म्हणाले की 'इंग्लंडमधे देखील ही पद्धती अतिशय संथ गतीनं आणि अनेक शतकांच्या शिस्तीनं आजच्या अवस्थेत आली आहे. आणि भारतात ही पद्धत आजच लागू करणं ही अज्ञातात घेतलेल्या एखाद्या उडीप्रमाणे ठरेल.' अखेरीस त्यांनी सांगितलं की काँग्रेसची प्रातिनिधिक पद्धतीची मागणी स्पष्टपणे 'घटनाविरोधी' आहे. [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २९]

अलाहाबादमधे काँग्रेसचं चौथं अधिवेशन भरवायच्या मार्गात अनेक अडचणी उभ्या करण्यात आल्या व ते तिथं मुळीच भरवलं जाऊ नये असा प्रयत्न करण्यात आला. त्यांना आपले तंबू उभारण्यासाठी जागाही नाकारण्यात आली. सर ऑकलंड कॉल्विन यांनी सर सैय्यद अहमद

यांच्याशी हातमिळवणी केली व त्या दोघांनी मिळून काँग्रेसच्या विरोधात 'अँटी काँग्रेस युनायटेड पॅट्रिऑटिक असोसिएशनची' स्थापना केली. सर सैय्यद अहमद यांनी आपल्या धर्माच्या लोकांना काँग्रेसपासून दूर राहायला सांगितलं. परंतु याविषयी नंतर.

तिसऱ्या काँग्रेसनंतर काँग्रेसविषयी नवीन धोरण स्वीकारलं जायच्या आधी सर ऑकलंड यांना काँग्रेसच्या चळवळीविषयी स्पष्टपणे सहानुभूती वाटत होती. अजूनही काँग्रेसच्या तत्त्वांब्दल आणि सर्वसामान्य हेतूंबद्दल सहानुभूती असल्यामुळे काँग्रेसनं आपलं लक्ष सामाजिक सुधारणांवर केंद्रित करावं आणि राजकारण टाळावं असं त्यांनी सुचवलं. त्यांना कदाचित हे माहीत नसावं की ह्यूम यांची मुळात अशीच योजना होती व लॉर्ड डफरिन यांच्या सूचनेनुसार काँग्रेसच्या उद्दिष्टात राजकारणाचाही समावेश करण्यात आलेला होता. त्यांचं मत होतं की काँग्रेसनं आखलेला सार्वजनिक प्रचाराचा कार्यक्रम अवेळी आहे; काँग्रेसचं 'आक्रमक आणि निषेध करणारं' धोरण 'खोडसाळपणाचं' आहे; व त्यामुळे शासन आणि अधिकाऱ्यांबद्दल द्वेषभावना निर्माण होणं अपरिहार्य आहे; आणि काँग्रेसच्या आंदोलनामुळे प्रतिआंदोलन सुरू होईल व देशाचं विभाजन राष्ट्रीय विरुद्ध निष्ठावंत गटात होईल. आपणच 'देशातील जनतेचं प्रतिनिधित्व करतो हा काँग्रेसचा दावा निराधार आहे' असंही त्यांचं मत होतं.

ह्यूम यांनी आपल्या प्रसिद्ध पत्रातून ऑकलंड यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरं दिली. त्या दोघांतील पत्रव्यवहार नंतर 'कर्माच्या दुसऱ्या बाजूकडे पाहा' (ऑडी अल्टेरम पार्टेम) या शीर्षकाखाली प्रकाशित झाला. त्या पत्रातून ह्यूमनी निदर्शनास आणून दिलं की द्वेष आधीच पसरलेला आहे आणि त्याचं शमन करायची आवश्यकता आहे. जर कोणतंही प्रतिआंदोलन उभारण्यात आलं तर ते 'बहुतांश अधिकारी असलेल्या मूठभर अँग्लो इंडियन लोकांचं..... काही जुनाट विचारांच्या प्रामाणिक परंतु समजून घ्यायची क्षमता नसलेल्या भारतीयांचं आणि खुशामतखोर आणि स्वार्थी लोकांचं असेल.' मुसलमान 'इतरांएवढेच हुशार आहेत व इतरांपेक्षा अधिक लोकशाहीवादी आहेत. काँग्रेसबद्दलच्या तिटकाऱ्यामुळे 'फोडा आणि राज्य करा याच जुन्या वचनावर पुरेसा विचार न करता विश्वास ठेवत असलेले काही अधिकारी' – 'जे

सरकारचेही मित्र नाहीत' - त्यांचा उपयोग करून घेत आहेत. 'मुसलमान हिंदूंपेक्षा मागासलेले असल्यामुळे सर्व वर्गांना आणि पंथांना समान संधी देण्यात आल्यास मुसलमानांना कोणतंच स्थान उरणार नाही हा युक्तिवाद राक्षसी आहे.' सर सालारजंग, बद्रुद्दिन तैय्यबजी आणि न्यायाधीश सैय्यद महमद यांचा उल्लेख करत त्यांनी स्पष्ट केलं की 'मुसलमानांनी भूतकाळात आणि वर्तमानकाळातही स्वतःच्या भरवशावर मार्ग काढला आणि आपल्या वांशिक गुणांच्या आधारे प्रशासनातील आपला योग्य वाटा ते उचलतील. त्यामुळे ही संपूर्ण गोष्ट मुसलमानांना बट्टा लावणारी आहे.'

सर्व लोकांचं प्रतिनिधित्व करायच्या काँग्रेसच्या दाव्याबद्दल उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की सांसदीय प्रणालीची आई असलेल्या इंग्लंडमधे जर ॲबरडीन परगण्यासारख्या प्रगत परगण्यातील दहा टक्क्यांपेक्षा कमी लोक संसदेच्या निवडणुकीत भाग घेतात व तरीही तिथले प्रतिनिधी सर्व लोकांचं प्रतिनिधित्व करतात असं मानण्यात येतं तर काँग्रेसचा सर्व जनतेचं प्रतिनिधित्व करायचा दावा कसा काय नाकारला जाऊ शकतो ? [स्वतः ह्यूमच्या वडिलांनी म्हणजे जोसेफ ह्यूम ह्यांनी रॉटन बरो ऑफ वेमाऊथ यांच्या ताब्यात असलेल्या दोन जागा १९०८ साली विकत घेतल्या होत्या - सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ४]

अजूनही अधिकाराच्या गुलाबी चष्म्यातून शासनाकडे पाहणाऱ्या ऑकलंड यांना ह्यूमनी अखेरीस नम्रपणे सांगितलं, 'तुम्ही हा चष्मा काढा. नजर स्वच्छ करा, त्यासाठी नोकरी सोडा, सर्वसामान्य व्हा, लोकांमधे मोकळेपणानं मिसळा, आपल्या मनातील खरं सांगायला जेव्हा लोक घाबरत नाहीत तेव्हा ते काय म्हणतात ते ऐका, ढालीच्या दुसऱ्या बाजूचा अभ्यास करा आणि माझ्याप्रमाणेच तुम्हाला ज्ञान झाल्यानंतर मला खात्री आहे की तुम्ही तुमचा दृष्टिकोन बदलवाल.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ७५]

परंतु ह्यूम यांची विनवणीची अवस्था पालथ्या घागरीवरील पाण्याप्रमाणे झाली. अठराव्या शतकाच्या बरबन लोकांप्रमाणे अधिकाऱ्यांना 'पाहायला डोळे नव्हते आणि ऐकायला कानही नव्हते.' फिरोजशहा मेहता यांच्या अध्यक्षतेखालील कोलकाता येथील सहाव्या काँग्रेसच्या वेळी

पूर्वीप्रमाणेच व्हाईसराय यांच्या बंगल्यावर सहा निमंत्रण पत्र पाठवण्यात आली होती परंतु अधिकाऱ्यांना राजकीय सभांमधे भाग घ्यायची परवानगी नाही असं कारण देऊन ती निमंत्रण पत्रं परत करण्यात आली. [अम्बिका चरण मझुमदार, *इंडियन नॅशनल इव्हॉल्युशन*, पृष्ठ ८०] भारत सरकारच्या आदेशानुसार 'अशा प्रकारच्या सभांमधे पाहुणे म्हणूनदेखील सरकारी अधिकाऱ्यांना उपस्थितीची परवानगी नाही व अशा प्रकारच्या सभांच्या कामकाजात भाग घेण्यावर पूर्णपणे मनाई आहे.' असं निदर्शनास आणून देणारं एक परिपत्रक याच वेळी बंगाल सरकारनं सर्व सचिवांसाठी आणि विभाग प्रमुखांसाठी काढलं. [अम्बिका चरण मझुमदार, *इंडियन नॅशनल इव्हॉल्युशन*, पृष्ठ ८०]

## ९

अधिकार गाजवायच्या आणि प्रश्न न विचारता आपल्या आज्ञेचं पालन केल्या जायच्या सवयीमुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नोकरशाहीला शक्तिशाली स्वार्थी लोकांचं स्वरूप आलं होतं. सहानुभूतिशून्य आणि कल्पनाशक्तीचा अभाव असलेली, वांशिक वेगळेपणामुळे समाजापासून तोडली गेलेली, ज्ञानाबद्दल अविश्वास आणि काही नवीन करायला विरोध असं स्वरूप ब्रिटिश नोकरशाहीला आलेलं होतं. तत्त्वतः देण्यात आलेल्या गोष्टींना व्यवहारात नाकारायचं कौशल्य यावेळेपर्यंत तिच्यात आलेलं होतं. [उदाहरणासाठी पाहा बी. पट्टाभी सीतारामैय्या, *द हिस्ट्री ऑफ इंडियन नॅशनल काँग्रेस*, खंड १, पृष्ठ ३२-३३]

१८६१च्या परिषदेच्या कायद्यानुसार काही भारतीयांचा समावेश केंद्रीय तसंच प्रांतीय परिषदेत व्हायचा. ते सर्व नियुक्त सदस्य असायचे. कार्यकारिणीला सल्लागार समितीपेक्षा थोडेच जास्त अधिकार असावे आणि व्हाईसरायना तिच्या निर्णयांना फेटाळून लावायचा अधिकार होता. राष्ट्रवादी या सल्लागार समितीचा 'मुलामा चढवलेले ढोंगी' आणि नियुक्त सदस्यांचा 'भपकेदार क्षुद्र लोक' असं म्हणून उपहास करायचे. व ह्या वर्णनाला पूर्णपणे पात्र व्हावं असंच त्यांचं वर्तन असायचं. उदाहरणार्थ लॉर्ड लिटन यांच्या वेळी एतद्देशीय भाषेतील वृत्तपत्राच्या कायद्याला ज्यांनी मंजुरी दिली होती त्यांनीच लॉर्ड रिपन यांच्या काळात तेवढ्याच

श्रद्धेनं तो कायदा रद्द करायलाही संमती दिली! [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलटिक्स सिन्स म्युटिनी*, पृष्ठ १४] अर्थातच याला काही अपवादही होते. व्हाईट हॉलच्या दडपणामुळे जेव्हा लँकेशायरच्या कापडावरील आयात कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला तेव्हा आपल्या विरोधाचा उपयोग होत नाही असं नियुक्त सदस्य प्रसिद्ध न्यायविद विश्वनाथ नारायण मंडलीक यांच्या लक्षात आलं. तेव्हा दुसऱ्या दिवशी ते मुद्दाम जाडेभरडे हातमागाचे कपडे घालून सभेत गेलै व आपल्या या पोषाखामागील कारणही त्यांनी स्पष्टपणे सांगितलं. परंतु असे अपवाद विरळ होते व त्यामुळे नियमच सिद्ध होत होता.

१८६१चा परिषदेचा कायदा झाल्यानंतर ३० वर्षांनी आणि काँग्रेसनं घटना दुरुस्तीसाठी सतत ६ वर्ष आंदोलन केलं. या दरम्यान काँग्रेसच्या दोन प्रतिनिधी मंडळांनी इंग्लंडला भेट दिल्यानंतर लॉर्ड क्रॉस यांचा १८९२चा भारतीय परिषदेचा कायदा मंजूर करण्यात आला. [त्यानुसार विधान परिषदेच्या सदस्यांची संख्या काही प्रमाणात वाढवायची तरतूद करण्यात आली व काही विशिष्ट सार्वजनिक संघटनांच्या शिफारसींच्या आधारावर प्रांतीय सभेवर काही नियुक्त सदस्य नेमायची व्यवस्था करण्यात आली व त्यापैकी चार सदस्य केंद्रीय विधान परिषदेत उपस्थित राहण्यासाठी निवडण्यात यावयाचे होते. सविस्तर नियम करताना निवडणुकीच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आली नाही. पुरवणी प्रश्न विचारायचा अधिकार न देता प्रश्न विचारायचा अधिकार देण्यात आला. परिषदेला अर्थसंकल्पाची सर्वसाधारण चर्चा करायचा अधिकार होता परंतु खर्चात कपात सुचवायचा अधिकार नव्हता.] कृपणतेनं आणि अर्धवट मनानं केलेल्या सुधारणेच्या या उपायामुळे परिषदेच्या अधिकारात सत्ताधाऱ्यांनी केलेल्या नियमांद्वारे अजूनच छटाई करण्यात आली. या अधिकाऱ्यांचा उल्लेख करत गोपाळ कृष्ण गोखले उपहासानं म्हणाले की 'यांनी असं मुद्दाम केलं असं जरी मी म्हणणार नाही तरी यांना जर १८९२च्या कायद्याचा हेतू विफल करायच्या दृष्टीनं नियम तयार करायचं काम सांगण्यात आलं असतं तरी ते याहून चांगले नियम तयार करू शकले नसते.' [ॲनी बेझंट, *हाऊ इंडिया रॉट फॉर फ्रीडम*, (१९१५), पृष्ठ १६६]

नोकरशाहीची भूमिका प्रतिष्ठेची होती. त्यामुळे लोकांच्या मागण्या कितीही न्याय्य आणि योग्य असल्या तरी त्या मान्य करणं त्यांना दुबळेपणाचं चिन्ह वाटायचं व त्यात समतोल निर्माण करण्यासाठी शक्तिप्रदर्शनाची आणि 'ताठर व कठोर धोरण' ठेवायची आवश्यकता त्यांना जाणवायची. वेगळ्या शब्दात सांगायचं तर जनमत धुडकावून लावण्यासाठी दडपशाही करणं

आवश्यक आहे असं त्यांना वाटायचं. [वसाहत कायद्याद्वारे (कॉलनाईझेशन अॅक्ट), लोकांवर चेनाब कालव्याच्या भागात वसाहत करण्याविषयी निर्बंध घालण्यात आले होते व मोर्ले यांना ती गोष्ट संपूर्ण विश्वासघाताची असल्याप्रमाणे वाटत होतं. मोर्ले यांनी वसाहत मंत्री लॉर्ड मिंटो यांना लोकांमधे टीकेचा विषय झालेल्या या कायद्याविषयी (कॉलनाईझेशन अॅक्ट) लिहिलं, 'जे चूक आहे हे आपल्याला माहीत आहे त्याला मान्यता द्यायचं नाकारणं याचा अर्थ आंदोलनासमोर शरणागती पत्करणं होईल व ती गोष्ट आपल्या दुबळेपणाची निदर्शक होईल.' (एडवर्ड थॉप्सन अँड जी.टी. गॅरेट), *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडियामधे* उद्धृत लॉर्ड मिंटो यांचं लॉर्ड मोर्ले यांना पत्र पृष्ठ ५८०] लॉर्ड क्रॉस यांचा परिषदेचा कायदा मंजूर झाल्यानंतरच्या वर्षात लॉर्ड लॅन्सडाऊन यांच्या सरकारनं अर्ध्या तासाच्या आत भारताच्या एकाही प्रतिनिधीला न बोलावता १८९३चा नाणेविषयक कायद्यात दुरुस्ती करणारा कायदा मंजूर केला. लोकमान्य टिळकांनी त्या कायद्याचं वर्णन 'जून २६, १८९३चा अपराध असं केलं. त्या कायद्यानुसार चांदीची नाणी मुक्तपणे तयार करणाऱ्या भारतीय टाकसाळी बंद करण्यात आल्या होत्या. रुपयातील चांदी ६० टक्क्यांनी कमी करण्यात आली व रुपयाची किंमत कृत्रिमपणे त्याप्रमाणात वाढवण्यात आली. परिणामी जी चांदी एक रुपया तोळ्यानं विकली जात असे तिला १० वा ११ आणे भाव मिळू लागला व अखेरीस तर तो भाव ८ आण्यांवर आला. याचा अर्थ होता कृत्रिमपणे रुपयाच्या वाढवलेल्या भावामुळे जनतेनं आपल्या उत्पन्नाचा ६० टक्क्यांनी अधिक भाग शासनाच्या मागण्यांसाठी देणं. त्याचबरोबर त्यांच्या दागिन्याची किंमत, ज्यामधे त्यांची शिल्लक जमा असायची, बाजारभावाप्रमाणे ६० टक्क्यांनी कमी झाली. परिणामी कोट्यवधी लोकांना दारिद्र्याचा जबर मार सहन करावा लागला.

प्लेग, कॉलरा, भूकंप आणि दुष्काळ हे लॉर्ड एल्गिनच्या कारकिर्दीचं वैशिष्ट्य होतं. महादेव गोविंद रानडे यांनी वर्णन केल्याप्रमाणे जणू काय 'इजिप्तमधील सात प्लेगना' भारतात एकाचवेळी मोकळं रान सोडण्यात आलं होतं. या जखमेवर मीठ चोळण्यासाठी म्हणून की काय १८९६मध्ये दुष्काळ प्रांतांना पायाखाली तुडवत असताना आणि दुष्काळ आयोगानं नंतर वर्णन केल्याप्रमाणे माणसं 'किड्यामुंग्यांप्रमाणे मरत असताना' लॉर्ड एल्गिन यांनी आपल्या जबलपूर भेटीत 'मध्यप्रांताच्या समृद्धीसाठी' लोकांचं अभिनंदन केलं! युनायटेड सर्व्हिस क्लब, सिमला येथे दिलेल्या व्याख्यानात ते म्हणाले, 'भारताला तलवारीच्या बळावर जिंकण्यात आलं आहे

आणि तलवारीच्याच बळावर त्याला ताब्यात ठेवण्यात येईल.' [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलटिक्स सिन्स म्युटिनी*, पृष्ठ २८]

प्लेगवरील उपाययोजनेच्या कठोर अंमलबजावणीमुळे लोकांच्या घरातील खाजगी जीवनावर आक्रमण होत होतं. त्यामुळे लोकांच्या भावना एवढ्या दुखावल्या की या उपाययोजनेची जबाबदारी असलेला रँडचा आपल्या गाडीतून पुणे येथील राजभवनात परतत असताना राणीच्या वाढदिवशी खून करण्यात आला. त्याचबरोबर श्रीयुत आयर्स्ट नावाच्या अजून एक अधिकाऱ्यालाही मृत्यू आला. यामुळे चाफेकर बंधुंना फासावर चढवण्यात आलं व सरदार नातूंना १८२७च्या मुंबई अधिनियम २३नुसार हद्दपार करण्यात आलं. हा अनिर्बंध कायदा काही वेगळ्याच कारणासाठी मंजूर करण्यात आला होता व त्या अनिर्बंध कायद्याच्या अटींचं पालनही काटेकोरपणे करण्यात येत नव्हतं. करण्यात आलेले खून हे कटाचा भाग आहेत असं गृहीत धरून सरकारनं संघटित दडपशाहीला सुरुवात केली. उलटपक्षी ज्या इंग्रज सत्र न्यायाधीशाच्या न्यायालयात चाफेकर बंधुंवरील खटला चालला होता त्यांनी स्पष्टपणे पंचांना सांगितलं होतं की या खुनामागे काही कट आहे काय याचा मी विचार केला परंतु तसं काही असल्याचं मला मुळीच आढळलं नाही. कलम १२४मधील 'राजद्रोह' या शब्दाची नवीन व्याख्या करण्यात आली व त्यानुसार साम्राज्याबद्दल प्रेम नसणं म्हणजे राजद्रोह अशी त्या शब्दाची नवीन व्याख्या करण्यात आली व त्यानुसार महाराष्ट्रातील अग्रणी नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना दीर्घ काळाची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. लोकमान्यांना अठरा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली होती परंतु इंग्लंड व भारतातील अनेक मान्यवरांनी केलेल्या अर्जानुसार शिक्षा पूर्ण व्हायच्या सहा महिने आधीच त्यांना सोडण्यात आलं. या अर्ज करणारात प्राध्यापक मॅक्समुलर, सर डब्ल्यू. डंब्ल्यू. हंटर, सर रिटर्ड गर्थ, खासदार विल्यम केन, दादाभाई नौरोजी आणि आर. सी. दत्त यांसारख्या लोकांचा समावेश होता. कारावासातील शिक्षेच्या काळात लोकमान्यांनी *द आर्क्टिक होम ऑफ द वेदाज* हा नवीन संशोधनानं परिपूर्ण असलेला ग्रंथ लिहिला. *द ओरियनमधे* त्यांनी ज्या विषयाचं सूतोवाच केलं होतं त्याच विषयाचं या ग्रंथात सविस्तर विवेचन केलं. त्याला ताबडतोब आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. 'दोन समुदायात कटुता वाढवायच्या

प्रयत्नांवर उपाययोजना करण्यासाठी' भारतीय दंडसंहितेत कलम १३४ अ या नवीन कलमाचा अंतर्भाव करण्यात आला. डाक खात्याच्या नियमात संशोधन करून डाकखात्यातील कर्मचाऱ्यांच्या मतानुसार जे 'साहित्य राजद्रोहाच्या स्वरूपाचं' असेल त्याला मधेच अडवायचा अधिकार कर्मचाऱ्यांना देण्यात आला.

भारताच्या दुःखाचा प्याला पुरेपूर भरण्यासाठी निसर्गही या कटात सहभागी झाला आणि १८९६-९७पेक्षाही मोठा दुष्काळ १८९९-१९००मध्ये भारतात पसरला. १८९८च्या अखेरीस सुरू झालेल्या लॉर्ड कर्झन यांच्या कारकिर्दीत दडपशाही आणि प्रतिगामी स्वरूपाचे उपाय एकामागोमाग एक याप्रमाणे श्वासाचीही उसंत न देता सात वर्षांच्या दीर्घ कालावधीत योजण्यात येऊ लागले. १८३३च्या घोषणेनुसार केलेल्या कायद्याचं नूतनीकरण करताना मेकॉले यांनी अर्थगर्भ उद्गार काढले होते. महत्त्वाकांक्षा जागृत केल्याशिवाय भारतीयांना ज्ञान देणं योग्य राहील काय आणि महत्त्वाकांक्षा जागृत झाल्यानंतर तिला वाट करून द्यायची गरज पडणार नाही काय असा आक्षेप घेणाऱ्या लोकांच्या टीकेला उत्तर देताना मेकॉले म्हणाले होते की 'स्वार्थी अंतःकरणाच्या आणि संकुचित मनाच्या' लोकांनी 'कितीही निंद्य टीका केली आणि नावं ठेवायचा' धोका असला तरी एक तत्त्वज्ञ म्हणून मी म्हणेन की पाश्चात्य शिक्षणानं जर भारतीयांचं मन इतकं विकसित झालं की ते या व्यवस्थेत सामावू शकणार नाही व भविष्य काळात कधी तरी ते युरोपिअन संस्थांची मागणी करतील तरी मी त्यांना त्या शिक्षणापासून वंचित करणार नाही. 'जेव्हा केव्हा तो दिवस उगवेल तेव्हा तो दिवस इंग्लंडच्या इतिहासातील अभिमानाचा दिवस असेल.' ते पुढं म्हणाले की बर्नियरला भारतात आढळलं त्याप्रमाणे अतिशय जुलमी सत्ताधाऱ्यांच्या असमाधानकारक कारभाराचा अनुभव घेतल्यानंतर अज्ञानाच्या अफूनं आपल्या बुद्धीला कायम शिथिल करणारांच्या प्रशासनात राहायला हे महान लोक मान्यता देतील याची कल्पनाही करवत नाही. त्यांनी आपल्या आज्ञेत राहावं या नीच हेतूनं ईश्वरानं काही त्यांना निर्माण केलेलं नाही.'

*राजदंड कदाचित आपल्या हातातून निघुन जाईल. अनपेक्षित अपघातांची कदाचित आपल्या फार चांगल्या योजनाही कोलमडतील. आपल्या शस्त्रांना कदाचित यशही मिळणार नाही. परंतु असेही काही विजय असतात की ज्यांना पराभव माहीत नसतो. असंही एक साम्राज्य आहे की जे निसर्गाच्या विनाशापासून मुक्त आहे. तो विजय आहे रानटीपणावर विवेकानं मिळवलेला विजय. ते चिरंतन साम्राज्य आहे आपल्या कलेचं आणि नैतिकतेचं, आपल्या साहित्याचं आणि आपल्या न्यायव्यवस्थेचं.* [*मेकॉले हाऊस ऑफ कॉमन्समधे*, जुलै १०, १८३३]

परंतु विद्यापीठ शिक्षणाचा भारतीयांमध्ये होऊ लागलेल्या प्रसाराचे राजकीय परिणाम पाहून नोकरशाहीनं धसका घेतला. कलकत्ता विद्यापीठानं बर्कच्या लेखनाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करायला मनाई केली. नंतर मुंबई विद्यापीठानं इंग्लंडचा इतिहास शिकवणं बंद केलं. लॉर्ड कर्झन यांनी १९०२ साली विद्यापीठ आयोगाची स्थापना केली. त्या आयोगाच्या शिफारसीनुसार १९०४ साली विद्यापीठ कायदा मंजूर करण्यात येऊन विद्यापीठांना सरकारी नियंत्रणाखाली आणण्यात आलं. १९१७ साली नेमण्यात आलेल्या दुसऱ्या एका आयोगानं या निर्णयाचं वर्णन 'जगातील सर्वाधिक आणि पूर्णपणे शासनाद्वारे नियंत्रित व्यवस्था' असं केलं. लॉर्ड कर्झन यांनी नेमलेल्या आयोगानं इतर गोष्टींबरोबरच कुलगुरूची नियुक्ती शासनानं करावी अशी शिफारस केली व कुलगुरूंना प्राध्यापकांच्या आणि अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्यांचा व महाविद्यालयांना संलग्नता द्यायचा अधिकार देण्यात आला. त्या आयोगानं पुढं महाविद्यालयाच्या शिक्षणासाठी किमान शुल्काचीही शिफारस केली आणि सांगितलं की बौद्धिक चाचण्यांद्वारे नाही तर शिक्षण महाग करून महाविद्यालयीन शिक्षणावर निर्बंध आणण्यात यावे.

या सर्वांवर ताण म्हणजे कलकत्ता महानगरपालिकेचे अधिकार कमी करायचा आणि कार्यालयीन गोपनीयतेचा कायदा मंजूर करण्यात आला. 'वातावरण आणि सांस्कृतिक वारसा तसंच भारतीयांची पालनपोषणाच्या पद्धती यामुळे' यामुळे ब्रिटिश राज्यातील अधिकाराच्या उच्च पदासाठी भारतीय लोक अपात्र आहेत व त्यामुळे 'भारतातील नागरी सेवेच्या सर्वोच्च पदासाठी एक सर्वसामान्य नियम म्हणून इंग्रजांचीच नियुक्ती केली जायला पाहिजे' असे उद्गार

लॉर्ड कर्झन यांनी १९०४ सालच्या अर्थसंकल्पावरील भाषणात काढल्यामुळे भारतीयांच्या भावना दुखावल्या. कोलकाता विद्यापीठाच्या दीक्षांत समारोहात केलेल्या कुप्रसिद्ध भाषणात काहीही कारण नसताना ते म्हणाले की सत्यवादिता हा भारतीयांचा गुण नाही आणि 'प्रामाणिक माणसांनी प्रसंगी यशस्वीपणे केलेल्या खोटेपणाची स्तुती करून भारतीय महाकाव्यांनी सत्यवादित्वाला फारसं महत्त्व दिलेलं नाही.' 'अंगात ताकद नसलेले, शब्दावडंबर करणारे, वायफळ बडबड करणारे देशभक्त' अशी सुशिक्षित वर्गाबद्दल मुक्ताफळं त्यांनी उधळली आणि 'भारताचं राष्ट्र म्हणून काही अस्तित्वात आहे' ही गोष्ट त्यांनी शेवटी अमान्य केली. व्यापारी समाजासमोर केलेल्या भाषणात ते म्हणाले की 'प्रशासन आणि पिळवणूक यांनी हातात हात घालून परस्परांना सहकार्य करायला पाहिजे. 'नोकरशाहीवर प्रगाढ विश्वास असलेल्या लॉर्ड कर्झन यांचा विश्वास होता की ब्रिटिश साम्राज्य हा ईश्वरी योजनेचा भाग आहे व *'देवानंतर जगाच्या कल्याणासाठी सर्वात सामर्थ्यसंपन्न ब्रिटिशसत्ता आहे.'* [वाल्डिमिर हाल्पेरीन, *लॉर्ड मिल्नर अँड एम्पायर*, ओधाम्स प्रेस लि., लंडन, (१९५२), पृष्ठ ३७ (तिरपी अक्षरं माझी)] भारतातील इंग्रजांचं राज्य कायम स्वरूपाचं असून भारतानं सदैव इंग्रजांच्या 'ताब्यात' राहायला पाहिजे असंही ते म्हणाले. १९०३ सालच्या दिल्ली दरबाराच्या प्रसंगी त्यांनी 'ऑनवर्ड ख्रिश्चन सोल्जर्स' या चर्चमधे गाईल्या जाणाऱ्या भजनाचा निषेध केला. 'सिंहासन आणि राजमुकूट नाहीसे होऊ शकतात आणि राज्ये निर्माण आणि नष्ट होऊ शकतात' [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १९०] असं जे त्या भजनात म्हणण्यात आलं होतं त्यातून अकारण निराशावाद व्यक्त करण्यात आला आहे असं त्यांचं मत होतं. काँग्रेसचळवळीच्या सामर्थ्याचा त्यांना नीट अंदाजच बांधता आला नाही. त्यांनी सेक्रेटरी ऑफ स्टेटला लिहिलं की 'माझा स्वतःचा विश्वास आहे की काँग्रेस तिच्या विनाशाकडे धडपडत जात आहे व भारतात असताना तो विनाश शांतपणे व्हावा म्हणून मदत करणं ही माझी आकांक्षा आहे.' [लॉर्ड कर्झन यांचं भारत मंत्र्यांना पत्र, नोव्हेंबर १८, १९००] प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध भारतीयांच्या भावना केंद्रित करून पूर्वीच्या कोणत्याही व्हाईसरायपेक्षा त्यांनी अजाणता काँग्रेसला सर्वाधिक मदत केली. त्यांची सर्वात मोठी उपलब्धी बंगालची फाळणी होती व तिथूनच ब्रिटिश सत्तेच्या अस्ताला सुरुवात झाली.

# प्रकरण ६ वे

## नव्या आणि जुन्या जगाच्या मधे

### १

बंगालच्या फाळणीमुळे सुरू झालेल्या राष्ट्रीय चळवळीच्या मुळाशी विविध कारणं होती. परंतु त्या चळवळीचं खरं स्वरूप आणि गांभीर्य समजावून घ्यायला ब्रिटिशांना बराच वेळ लागला आणि तरीही त्यांना तिचा संपूर्ण अर्थ तर कधीच कळू शकला नाही. विविध प्रकारच्या घटनांनी त्या चळवळीला हातभार लावला. ब्रिटिशांच्या अवाढव्य सैन्याच्या आणि शस्त्रबळाच्या सामर्थ्यानंतरही दक्षिण आफ्रिकेतील बोअरांच्या लहानशा राष्ट्रानं प्रारंभिक अवस्थेत ब्रिटिशांवर उलटवलेली बाजू, तुर्कस्थान आणि ग्रीसच्या युद्धात तुर्कांनी ग्रीसचा केलेला पराभव, आयर्लंडच्या लोकांनी स्वराज्यासाठी दिलेला लढा, जपाननं रशियावर मिळवलेला विजय व जागतिक शक्ती म्हणून त्याचा झालेला उदय इत्यादी सर्व गोष्टींमुळे नवभारताच्या मनातील आशा पल्लवित झाल्या होत्या. परिवर्तनासाठी आवश्यक आंबवण 'नवप्रभातच्या अग्रदूतांनी' आणि 'पथशोधकांनी' पुरवलं होतं. त्यांनी गत अर्ध्या शतकात केलेल्या प्रयत्नांना आता फळं येऊ लागली होती. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आता तारुण्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचलेली होती.

'नवप्रभातचे अग्रदूत' आणि 'पथशोधक' यांनी राजकारणाशिवाय धार्मिक आधारावर विविध आंदोलनं चालवलेली होती. उलटपक्षी काँग्रेसनं चालवलेली आंदोलनं ही धर्मविरहित राजकारणावर आधारित होती. परंतु काँग्रेसच्या परिपक्वतेतील वाढीच्या प्रमाणातच राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक कार्य, सामाजिक सुधारणा, औद्योगिक पुनरुज्जीवन इत्यादी विविध बाबींची तिच्या आंदोलनात भर पडत गेली. अखेरीस धार्मिक आंबवण मिळाल्यानं तिला नवीन जोम आणि सामर्थ्य यांची प्राप्ती झाली.

या सर्व गोष्टींचा आपल्या राजकारणात समावेश करून त्यांचा उपयोग ऐक्यासाठी करणाऱ्या काँग्रेसच्या पुढाऱ्यात महादेव गोविंद रानडे पहिले होते. उदात्त राष्ट्रप्रेम, विशाल

बुद्धिमत्ता आणि संत प्रवृत्ती या गुणामुळे अनेक दृष्टींनी ते अद्वितीय होते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणूनच नव्हे तर भारताच्या भवितव्याविषयीची जाण असलेले इतिहासकार, भारतीय अर्थशास्त्राचा पाया रचणारे अर्थशास्त्रज्ञ आणि ज्वलंत समाजसुधारक म्हणून त्यांनी आपलं आगळंच स्थान निर्माण केलं होतं. त्यांनी भारताला अर्थशास्त्रज्ञ, संसदपटू, आणि थोर राजकीय नेते गोपाळ कृष्ण गोखले यांची सर्वात मोठी देणगी दिली होती. गोखले यांच्या अंदाजपत्रकावरील भाषणांचा अभ्यास त्या विषयावरील आदर्श भाषणं म्हणून आजही करण्यात येतो. त्यांचा सल्ला मोर्लेही मूल्यवान मानत असत आणि एक सन्माननीय शत्रू म्हणून कर्झन त्यांना घाबरत असत. भौतिक संपत्तीचा मोह सोडून देशसेवेला वाहून घ्यायचं तरुणांना प्रशिक्षण देणाऱ्या *सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीची* (भारत सेवक समाज) स्थापना त्यांनीच केली होती. राजकारणाला अध्यात्माचं अधिष्ठान द्यायला हवं हा मंत्र त्यांनीच दिला होता. गांधीजींनी त्यांना 'राजकीय गुरू' मानलं होतं.

महाराष्ट्रातील चित्पावन ब्राह्मण अतिशय प्रतिभासंपन्न आहेत. या समाजानं जीवनाच्या सर्व क्षेत्रात मिळवलेल्या यशाचा उल्लेख करत सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी लिहिलं : ते बाररूममध्ये बसतात आणि बारवर त्यांचं प्रभुत्व असतं. ते शाळेत शिकवतात. प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रांवर त्यांचं नियंत्रण आहे. पश्चिम भारतातील आधुनिक वाङ्मय आणि नाटक तसंच राजकारण इत्यादी क्षेत्रातील जवळपास सर्व उल्लेखनीय नावं त्यांचीच आहेत.' [१८७२ साली कुकाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिखांच्या एका संप्रदायातील लोकांनी राज्यातील एका शहरावर हल्ला केला. प्रचंड प्राणहानीनंतर त्यांच्यावर विजय मिळवण्यात आला. त्यांच्यातील ६८ लोकांना अटक करण्यात आली व जवळच्या ब्रिटिश सहायक आयुक्ताच्या ताब्यात त्यांना देण्यात आलं. त्यांच्यातील ४९ लोकांना अधिकार नसतानाही आणि आयुक्तांनी वाट पाहायचा सल्ला दिलेला असूनही गोळ्या मारून उडवून देण्यात आलं. याहीपेक्षा मोठी गोष्ट म्हणजे आयुक्तांनी त्या कृत्याला नंतर मान्यता दिली. पहा : फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया,* द गार्डियन्स, पृष्ठ १७१-७२] महान पेशवे याच ज्ञातीतील होते. याच समाजात रानडे, गोखले आणि टिळकांचा जन्म झाला होता.

महादेव गोविंद रानडे यांचा जन्म नाशिक येथे १८४२ साली झाला होता व शैक्षणिक जीवनात त्यांनी उल्लेखनीय यश मिळवलेलं होतं. १८६२ साली ते पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत

उत्तीर्ण झाले व मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदान समारंभात त्यांनी पदवी घेतली. असं सांगतात की वाड्मय पारंगत परीक्षेत त्यांनी दिलेल्या उत्तरांनी सर अलेक्झॅंडर ग्रँट एवढे प्रभावित झाले की त्यांनी त्या उत्तरपत्रिका एडिंबरो विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आदर्श उत्तरं कशी असतात ते दाखवण्यासाठी पाठवल्या. [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ ४४] सार्वजनिक सभेची स्थापना झाल्यानंतर एक वर्षानंतर १८७१ साली ते तिच्यात सामील झाले. त्यानंतर त्या सभेच्या मुखपत्राद्वारे सतत वीस वर्ष ते महाराष्ट्राच्या आत्म्याला आपल्या समर्थ आणि प्रेरणादायी लेखनानं जागृत करायचा प्रयत्न करत होते. १८८५ साली लॉर्ड रे यांनी त्यांची मुंबईच्या विधान परिषदेवर नियुक्ती केली. अखेरीस न्यायमूर्ती तेलंग यांच्या मृत्यूमुळे रिकाम्या झालेल्या जागेवर १८८३ साली त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली.

१८८१ ते १८९३ सालच्या दरम्यान रानडे यांनी जे कार्य केलं त्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालं होतं. त्यांच्या प्रभावामुळेच १८८७ साली भारतीय सामाजिक संस्थेचं अधिवेशन चेन्नई येथे काँग्रेसच्या अधिवेशनासोबत भरलं होत. १८९० साली त्यांनी भारतीय राजकीय अर्थशास्त्रावरील आपलं युगप्रवर्तक व्याख्यान दिलं होतं. त्यातून त्यांनी मुक्त व्यापाराच्या सिद्धान्तावर टीका केली व शासनानं नवीन उद्योगधंदे उभारून ते स्थिरावल्यानंतर त्यांना खाजगी उद्योगपतींकडे सोपवण्यात यावं असा विचार मांडला. भारतातील विविध उद्योगांना पुनर्जीवित करून तसंच विविध क्षेत्रात उद्योगांची उभारणी करून वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्याविषयी त्यांनी मांडलेला विचार ही भारतीय अर्थविचारात त्यांनी घातलेली महत्त्वाची भर होय.

१८९० साली त्यांनी आपला प्रसिद्ध ग्रंथ *'द राईझ ऑफ मराठा पॉवर'* लिहिला. मराठी सत्तेचा उदय हा वैयक्तिक साहसाचा परिणाम नव्हता, तो राष्ट्र उभारणीचा एक प्रयत्न होता, भाषा, वंश, धर्म, साहित्य यांच्या सामान्य बंधनानं बांधलेल्या जनतेनं राजकीय स्वातंत्र्य मिळवून जाणीवपूर्वक एक होण्यासाठी केलेला तो प्रयत्न होता असं त्यात त्यांनी दाखवलं.

भारताच्या भवितव्याविषयी रानडे यांची भव्य स्वप्ने होती. त्यांच्या मते भारत आपल्यापेक्षा अधिक शक्तीशाली सत्तेच्या व्यवस्थेखाली होता. वैविध्यातून एकतेचा शोध घेऊन परस्पर सहिष्णुतेवर आधारित संपन्न संमिश्र संस्कृतीची निर्मिती करून उदात्त ध्येय असलेल्या शांतता आणि सुसंवादपूर्ण समाजव्यवस्थेकडे भारत वळत आहे. 'प्रत्येक बाह्य आक्रमणानंतर एका निवडक वंशाप्रमाणे उच्चतर ध्येयाची शिस्त अंगी बाणवून आपल्यात विकसनशीलतेची क्षमता असल्याचं जर भारतानं दाखवून दिलं नाही तर या देशाचा इतिहास परिकथेपेक्षा अधिक काही नाही असं ठरेल.' [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया,* द गार्डियन्स, पृष्ठ १७२-७३] मुसलमानी सत्तेच्या अंमलाखाली असताना हिंदू आणि मुसलमान एकत्र आल्यामुळे हिंदूंची भक्ती अधिक डोळस झाली आणि मुसलमान कमी दुराग्रही झाले. नानकसारखे असे धर्मगुरू जन्माला आले की जे आपण हिंदू अथवा मुसलमान कोणीच नसल्याचं व एकाच निर्गुण निराकार परमेश्वराची पूजा करणारे असल्याचं सांगू लागले. शेख महम्मद फरीद आणि महम्मद काझीसारखे असे मुसलमान संत झाले की ज्यांचा हिंदू आणि मुसलमान दोघंही सारखाच आदर करतात. गौरांगसारखे ईश्वराचे भक्त दोन्ही समुदायात आहेत. परंतु औरंगजेबानं आपल्या धर्मवेडामुळे जेव्हा या प्रक्रियेत खीळ घालायचा प्रयत्न केला तेव्हा मोगलांचं साम्राज्य कोसळलं आणि त्यातून मराठा संघ आणि शीख सत्तेचा जन्म झाला. परंतु देशाचं शिक्षण अजून पूर्ण व्हायचं होतं. दोन्हीही समुदायांना स्थिर आणि तरीही प्रागतिक शासन चालू शकेल असे काही गुण शिकणं आवश्यक होते. दोघांमध्येही नागरी जीवनासाठी आवश्यक असलेल्या स्थानिक स्वराज्याच्या गुणांचा अभाव आहे. विज्ञान आणि संशोधनाबाबत या समाजांमध्ये आवड निर्माण होणं आवश्यक आहे. साहसपूर्वक संशोधन, अडचणींवर निर्धारानं मात करणं आणि स्त्रियांचा सन्मान इत्यादी गुणांची आपल्यात उणीव आहे. पाश्चात्य संस्कृतीची ही वैशिष्ट्ये आहेत. हे गुण अंगी बाणले गेले की आपल्या ध्येयाची परिपूर्ती होऊ शकेल.

*'मुक्त झालेलं पौरुष, आशादायी स्फुरण, कर्तव्यापासून कधीच न ढळणारी श्रद्धा, सर्वांशी समभावानं वागायला लावणारी न्यायभावना, कोणत्याही प्रकारचे पुर्वग्रह नसलेली बुद्धी*

*आणि पुर्णपणे सुसंस्कृत सामर्थ्य, सर्व सीगा ओलांडून पुढं जाणारं प्रेम या सर्व गुणांनी नवजीवन मिळालेला भारत जागतिक स्थान प्राप्त करून घेऊ शकेल आणि आपल्या भवितव्याचा आपणच विधाता बनेल.'*

रानडे यांना सामाजिक सुधारणांचा ध्यास लागलेला होता. त्यामुळे त्यांचा टिळकांशी फार मोठा वाद झाला. रानडे याच्यापेक्षा चौदा वर्षांनी लहान असलेले आणि त्यांच्यासारखेच विद्वान असलेले गीतारहस्याचे लेखक टिळक हेही कुशल संघटक आणि कृतिवीर होते व त्यांच्यात नेतृत्वाचे जन्मजात गुण होते. निष्कलंक चारित्र्य, त्याग इत्यादी गुणांमुळे त्यांचे शत्रू आणि मित्र त्यांचा सारखाच आदर करत असत. ते वैशिष्ट्यानं जनतेचे नेते होते व त्यांनीच जनतेला राजकारणात खेचून आणलं होतं. नोकरशाहीच्या दडपणानंतरही आपले विचार स्पष्टपणे बोलून दाखवायचं त्यांच्यात अतुलनीय धैर्य होतं व त्यासाठी पडेल ती शिक्षा भोगायची त्यांची तयारी होती. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळवीनच' हा मंत्र त्यांनी दिला होता. व 'ते मिळवण्याचा मार्ग सत्य आणि अहिंसा आहे' हा अर्धा भाग नंतर गांधीजींनी त्या मंत्राला जोडला होता.

त्यांचा जन्म १८५६ साली झाला होता व मुंबई विद्यापीठाची पदवी परीक्षा त्यांनी विसाव्या वर्षी उत्तीर्ण केली होती. तीन वर्षांनंतर ते कायद्याच्या परीक्षेतही उत्तीर्ण झाले. १८९० साली आगरकर, चिपळूणकर, एन. एम. जोशी आणि आपटे यांच्या सहकार्यानं त्यांनी खाजगी शाळा काढली. जवळपास त्याच वेळी याच लोकांच्या सहकार्यानं त्यांनी इंग्रजीत मराठा आणि मराठीत केसरी ही वृत्तपत्रे काढली. ही दोन्ही वृत्तपत्रे अतिशय यशस्वी ठरली.

त्या काळात समाजसुधारकांना किती कठीण परिस्थितीला तोंड द्यावं लागायचं हे पुढील लहानशा उदाहरणावरून कळेल. १८८० साली मिशनऱ्यांनी दिलेल्या एका चहापान समारंभाला जवळपास ५० लोक हजर होते. त्या पन्नास लोकात आगरकर, भांडारकर, रानडे आणि टिळक यांचा समावेश होता. त्या पार्टीत चहासोबत बिस्किटेही देण्यात आली होती. त्यामुळे पुण्यातील सनातनी ब्राह्मणांनी त्यांना जातिबहिष्कृत करायची धमकी दिली. हे वादळ किती तरी महिने सुरू

होतं आणि अखेरीस त्यांना त्यासाठी शुद्धी करून घ्यायला संमती द्यावी लागली. सामाजिक सुधारणा ही अपरिहार्यपणे सहभोजनाशी आणि आंतरजातीय विवाहाशी संबंधित असते असा लोकांचा समज होऊ नये म्हणून ही अपमानास्पद दिसणारी गोष्ट मान्य करावी लागली असं या गोष्टीचं स्पष्टीकरण देताना रानडे म्हणाले.

१८८४ साली आगरकर, टिळक आणि चिपळूणकरांनी पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. परंतु लवकरच आगरकर आणि टिळकांमधे मतभेद निर्माण झाले. आगरकर धर्माच्या बाबतीत अज्ञेयवादी होते आणि सामाजिक सुधारणांना अग्रस्थान देण्याबाबत अतिशय आग्रही होते. टिळक हे कर्मठ हिंदू आणि ज्वलंत राष्ट्रवादी होते. परंतु सामाजिक सुधारणांच्या बाबतीत ते पुराणमतवादी होते. आगरकरांनी केसरीच्या संपादकपदाचा राजीनामा दिला. परिणामी टिळक केसरी आणि मराठाचे संचालक आणि संपादक झाले. परंतु अशाच प्रकारच्या मतभेदांमुळे टिळकांनाही *डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा* राजीनामा द्यावा लागला. फर्ग्युसन महाविद्यालयात टिळक गणिताचे प्राध्यापक होते. त्या पदाचाही त्यांनी राजीनामा दिला आणि सुधारणावादी रानडे यांच्या विरोधातील जहाल पक्षाचे ते नेते झाले.

१८९१ साली साम्राज्याच्या विधिमंडळात संमतिवयाच्या विधेयकाच्या चर्चेची जेव्हा वेळ आली तेव्हा सुधारक आणि पुराणमतवादी लोकातील मतभेद अजूनच चव्हाट्यावर आले. टिळक जहाल राष्ट्रवादी असल्यामुळे त्यांना विदेशी शासनाचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप देशाच्या कारभारात नको होता. विशेषतः सामाजिक बाबतीत तर तो हस्तक्षेप अगदीच नको होता. त्यांनी केसरीतून त्यावर कडाडून हल्ला केला. दुसरीकडे रानडे मुक्त व्यापाराच्या विरोधी होते व त्यामुळे शासनाने आर्थिक नियोजन करून देशाची आर्थिक प्रगती घडवून आणावी यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यामुळे लोकांच्या विनंतीवरून शासनाने जर पुढाकार घेतला व सामाजिक सुधारणेसाठी विधेयक आणलं तर त्यात काही आक्षेपार्ह आहे असं रानडे यांना वाटत नव्हतं.

त्याशिवाय सामाजिक सुधारणांचा आग्रह धरून पुराणमतवादी लोकांची सहानुभूती राष्ट्रवादी टिळक गमावू इच्छीत नव्हते. टिळकांचं मत होतं की त्यामुळे परकीय सत्तेविरुद्ध सर्व

लोकांना एकत्रित करून लढा देता येणार नाही. देशातील सर्व प्रकारच्या उणिवांसाठी परकीय सत्ताच जबाबदार असल्यामुळे त्या सत्तेला सर्वात आधी घालवणं आपलं कर्तव्य आहे. उलटपक्षी रानडे आणि त्यांच्या पक्षातील लोकांचं मत होतं की सामाजिक सुधारणांशिवाय केलेला राजकीय संघर्ष पांगळा ठरेल; सर्व आघाड्यांवर समान प्रगती - आर्थिक, सामाजिक सुधारणा, राजकीय आणि धार्मिक या सर्व बाबी - यशासाठी आवश्यक आहेत. राजकीय संघर्षासाठी सामाजिक सुधारणांची गती ते मंद करू इच्छीत नव्हते. अखेरीस सांगायचं तर टिळकांचं मत होतं की सामाजिक सुधारणांसाठी अनुनयाची आवश्यकता असते तर राजकारणात बळजोरीही करावी लागते. सामाजिक सुधारणांच्या आड लोकांचं अज्ञान येत असतं. शांतपणे युक्तिवाद केल्यास हे अज्ञान दूर करता येऊ शकतं. ही गोष्ट आपल्या हिताची आहे हे लक्षात येताच लोक समाजसुधारकांचं ऐकतील आणि आपला मार्ग बदलतील. परंतु स्वातंत्र्याच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट म्हणजे परकीय सत्तेचा लाभ. त्यामुळे केवळ शाब्दिक अनुनयाला ते कधीच बधत नाहीत. अशा रीतीनं समाजसुधारक समाजसुधारणेसाठी बळाचा वापर करण्याचा आणि परकीय सत्तेविरुद्ध अनुनयाचा मार्ग पत्करून गोंधळ निर्माण करत आहेत.

१८९४ आणि १८९५ सालच्या दरम्यान टिळकांनी महाराष्ट्रात गणेशोत्सव आणि शिवजयंत्युत्सवाची सुरुवात केली. हे उत्सव, विशेषत्वाने शिवजयंत्युत्सव साजरा करण्यामागील टिळकांचा हेतू 'सर्वसामान्य जनतेला राजकारणाकडे आकर्षित करून सामान्य माणसाच्या मनात स्वातंत्र्याचं बीजारोपण करायचा होता.' देशातील इतर भागाच्या जनतेचं लक्षही शिवाजी उत्सवाकडे वेधलं गेलं. पंजाबमधील लाला लजपत राय यांनी शिवाजींच्या लोकप्रिय चरित्राचा उर्दू भाषेत अनुवाद केला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी भाषणं आणि पत्रकांद्वारे विद्यार्थ्यांत शिवाजीसंप्रदाय रुजवायचा प्रयत्न केला. १९०२ साली बंगालमधे शिवाजी उत्सव साजरा करण्यात आला आणि दोन वर्षांनंतर रवींद्रनाथ टागोर यांनी शिवाजी महाराजांना बंगालची श्रद्धांजली म्हणून *'शिवाजी उत्सव'* हे आपलं प्रसिद्ध काव्य रचलं.

बंगालमध्ये 'वंदे मातरम' ही घोषणा मातृभक्तीची द्योतक बनली. *वंदे मातरम* हे गीत सर्वप्रथम प्रसिद्ध कादंबरीकार बंकीमचंन्द्र चटर्जी यांनी आपल्या *'आनंदमठ'* या कादंबरीत लिहिलं होतं. वॉरन हेस्टिंग्जच्या काळात क्रांतिकारी संन्याशांनी मुसलमानी सत्तेशी केलेल्या संघर्षाच्या प्रसंगाचं चित्रण करताना हे गीत लिहिण्यात आलं होतं. मातृभूमीच्या मुक्ततेसाठी शपथबद्ध होऊन बंधुत्वाच्या भावनेनं एकत्रित झालेल्या तिच्या पुत्रांच्या मुखात वंदे मातरम ही घोषणा घालण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी 'धर्मगीत' म्हणून ते घालण्यात आलेलं नाही. ज्या मातेची त्या ठिकाणी पूजा करण्यात आलेली आहे ती कुणी धार्मिक देवता नाही, केवळ काही जड प्रदेश नाही, तर ती आहे पवित्र मातृभूमी. आपल्या पुत्रांद्वारे आपलं भवितव्य घडवण्यासाठी धडपडणारी ती जिवंत मातृभूमी आहे. तिच्या कुशीतून ज्यांनी जन्म घेतला आणि तिच्या मुक्ततेसाठी जे शपथबद्ध आहेत अशा लोकांनी केलेली 'वंदे मातरम' ही घोषणा आहे.

*वंदे मातरम* हे गीत सर्वप्रथम काँग्रेसमधे १८९६ साली रवैंद्रनाथ टागोर यांनी गाईलं होतं. परंतु १९०५ साली बंगालच्या फाळणीविरुद्ध झालेल्या आंदोलनाचं नवयुग सुरू झाल्यानंतरच 'वंदे मातरम' ही घोषणा स्वातंत्र्यलढ्याची प्रतीक झाली. मुळातील उठाव हा युसलमानांविरुद्ध होता परंतु तो आकस्मिक होता. त्यात अभिव्यक्त करण्यात आलेली भावना मुसलमान धर्माविरुद्धची नकारात्मक भावना नसून मातृभूमीच्या भक्तीची आणि तिच्यासाठी सर्वस्व त्यागायच्या तयारीची सकारात्मक भावना आहे.

क्रांतिकारक राष्ट्रभक्तीसाठी ज्या दूषित साधनांचा उपयोग करायचे त्या साधनांचं समर्थन करणं हा 'वंदे मातरम' गीत लिहण्यामागील लेखकाचा हेतू नव्हता. कारण मातृभूमीच्या सुपुत्रांनी दूषित साधनांचा उपयोग केल्यामुळे मातृभूमीची सेवा करायचा उदात्त हेतूही पराभूत होतो असं शेवटी लेखकानं दाखवलं आहे. तुम्ही जे काही विजय मिळवले आहेत ते दरोड्यातून मिळवलेल्या पैशाच्या बळावर मिळवलेले आहेत. पापातून चांगलं कधीच निष्पन्न होत नाही आणि तुमच्या देशाला तुम्ही अनुचित मार्गानं वाचवू शकाल अशी अपेक्षा कधीच करू नका. परंतु दैवदुर्विलास असा की असं हे 'वंदे मातरम' गीत बंगाली क्रांतिकारकांची युद्धघोषणा बनलं होतं.

## २

हिंदूंमध्ये ज्यावेळी धार्मिक सुधारणा आणि धार्मिक भावनेचं पुनरुज्जीवन होत होतं जवळपास त्याचवेळी मुसलमानांतही याच भावनेचा उदय होऊ लागला होता. भारतातील ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासाचे दोन पर्व आहेत. त्यातील पहिल्या पर्वात व्यापारावर आधारित भांडवलशाहीचा प्रभाव होता. त्याद्वारे भारताच्या संपत्तीचं चोहोबाजूनं शोषण करण्यात आलं. भारतातील इस्लाममध्ये सुधारणा करणारं पहिलं वहाबी आंदोलन जवळपास याच पर्वात झालं. ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारविषयक भांडवलशाहीच्या धोरणामुळे मृतप्राय होऊ लागलेल्या समाजात धर्म आणि संस्कृतीची जी अधोगती होऊ लागली होती त्यामुळे मूलतः सुरू झालेल्या या आंदोलनास राजकीय आणि आर्थिक स्वरूप येऊ लागलं होतं. या आंदोलकांनी धर्मनिंदकांविरुद्ध - पंजाबमधील शीख आणि ब्रिटिश यांच्याविरुद्ध - जिहाद पुकारला. त्यामुळे शेतकऱ्यांनी जमींनदारांविरुद्ध, मग ते हिंदू असोत की मुसलमान, जोरदार उठाव केला. परंतु ब्रिटिशांनी कठोर उपाययोजना करून १८५८मधे आणि पुन्हा १८६३मधे त्याला दडपून टाकलं. तरीही तो असंतोष खदखदतच होता. अखेरीस १८७१ साली त्या आंदोलनाच्या नेत्यांना पकडून त्यांच्यावर जेव्हा खटला भरण्यात आला तेव्हा कुठे ते आंदोलन संपलं.

तयार माल निर्यात करण्यासाठी उपयुक्त बाजारपेठ म्हणून आणि वाढत्या उद्योगांसाठी कच्च्या मालाचा उत्पादक म्हणून ग्रेट ब्रिटननं जेव्हा भारताचा उपयोग करायला सुरुवात केली तेव्हा ब्रिटिश सत्तेच्या दुसऱ्या पर्वाचा प्रारंभ झाला. त्यामुळे होणाऱ्या पिळवणुकीमुळे जो आनुषंगिक लाभ मिळू लागला त्यातून एक नवीन मध्यमवर्ग जन्माला आला. या वर्गात आधी नोकरशाहीतील कारकुनांचा समावेश होता. त्यानंतर त्यात लहान व्यापारी आणि दलालांचा समावेश झाला. नंतर जे लोक व्यवस्थापक, व्यापारी आणि व्यावसायिक यासारख्या मोठ्या पदावर पोहोचले त्यांचा या वर्गात समावेश झाला. त्यासाठी ब्रिटिश साम्राज्यावर आणि ब्रिटिशांच्या प्रतिष्ठेवर त्यांची मदार होती. त्यासाठी त्यांना अशा प्रकारच्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकेल अशा धर्माची आणि विचारसरणीची गरज होती. वेगळ्या शब्दात सांगायचं तर त्यांना

एकोणिसाव्या शतकातील पाश्च्यात्त्य जगाशी जुळणाऱ्या उदारमतवादी, आधुनिक इस्लामची गरज वाटत होती. हे साध्य साध्य करण्यासाठी पाश्चात्त्य विचारसरणीशी न जुळणाऱ्या गोष्टी म्हणजे इस्लामचा चुकीचा लावलेला अर्थ आहे वा त्यात नंतर घुसडलेल्या गोष्टी प्रक्षिप्त आहेत असं म्हणून त्यांना वगळण्यात आलं व सर्व धर्मातील, विशेषतः ख्रिश्चन धर्मातील मूलभूत गोष्टींशी असलेल्या साम्यावर भर देण्यात आला.

सर सैय्यद अहमद खान (१८१७-१८९८) यांना या आंदोलनात सर्वात महत्त्वाचं स्थान होतं. त्यांनी उदारमतवादी अलीगढ विद्यापीठाची स्थापना केली होती. दिल्लीतील प्रसिद्ध सैय्यद वंशात त्यांचा जन्म झाला होता. त्यांचं संपूर्ण शिक्षण परंपरागत पद्धतीनं झालं होतं. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांनी सरकारी नोकरीत प्रवेश केला होता. कर्तबगार व्यक्तिमत्त्व असलेल्या आणि भरपूर लेखन करणाऱ्या सर सैय्यद महमूद यांनी धार्मिक विषयावरील अनेक पुस्तकं लिहिली. त्यातून त्यांनी वहाबी पद्धतीनुसार मुसलमान धर्मात सुधारणा करायचा विचार मांडला. तसंच इतिहासावरही त्यांनी काही लेखन केलं. इतिहासावरील त्यांचे ग्रंथ इंग्रजी आणि फ्रेंच भाषेत प्रकाशित झाले. त्यांचं महत्त्व लक्षात घेऊन रॉयल सोसायटीनं त्यांना आपलं सदस्यत्व दिलं.

१८५७च्या उठावाच्या काळात ते इंग्रजांच्या बाजूनं उभे राहिले आणि अनेक इंग्रजांचे त्यांनी प्राण वाचवले. आधीच मागासलेला मुसलमान समाज १८५७च्या उठावानंतर ब्रिटिश शासनाद्वारे अजूनच दडपला गेला होता. यामुळे एकाएकी तो ब्रिटिश सत्तेच्या अतिशय विरोधात गेला. ब्रिटिशांच्या मदतीशिवाय आणि त्या अनुषंगाने त्यांच्याबद्दल असलेल्या निष्ठेशिवाय मुसलमान समाजाची प्रगती होणं अशक्य आहे हे लक्षात घेऊन सर सैय्यद यांनी ब्रिटिशविरोधी धोरण सोडून ब्रिटिशांशी सहकार्य करून त्यांच्याशी निष्ठा ठेवण्यासाठी मुसलमान समाजाचं मन वळवायला सुरुवात केली. तसंच मुसलमान समाजाची दडपशाही करण्याऐवजी त्या समाजाचं पालकत्व शासनानं पत्करायला हवं असंही त्यांनी सांगितलं. ब्रिटिश विरोधी शक्तींना साथ देण्यात तुमची दिशाभूल करण्यात आली आहे असं त्यांनी एकीकडे मुसलमानांना समजून

सांगायला सुरुवात केली तर दुसरीकडून मुसलमान समाज हा मूलतः शासनाप्रती निष्ठावान आहे आणि ब्रिटिशांनी थोड्याशा समंजसपणानं काम केलं तर तो समाज परत ब्रिटिशांकडून होऊ शकतो असं ब्रिटिशांना समजावून सांगायचा त्यांनी प्रयत्न केला. *असब्व-इबगावत-इ-हिंद* (बंडाची कारणं) या आपल्या परिपत्रकातून मुसलमान समाज हा निष्ठावान असल्याचं दाखवायचा त्यांनी प्रयत्न केला. फोडा आणि राज्य करा या धोरणाचा अवलंब करून उठावाला वेळीच दडपून न टाकण्यासाठी त्यांनी ब्रिटिश शासनाला दोषही दिला.

नादीरशहा जेव्हा... पर्शिआ आणि अफगाणीस्तानचा.... राजा झाला तेव्हा त्यानं दोन्ही सैन्यांना समान शक्तिशाली ठेवायची विशेषतः काळजी घेतली होती. जेव्हा पर्शिअन सैन्य उठाव करायचा प्रयत्न करायचा तेव्हा तो उठाव दाबण्यासाठी अफगाण सैन्य हाताशी असायचं व उलट प्रकार घडला तेर पर्शिअन सैन्य हाताशी असायचं. इंग्रजांनी भारतात या पायंड्याप्रमाणे वर्तन केलं नाही... शासनानं या दोन विरोधी वंशाच्या लोकांना एकाच पलटणीत ठेवलं. परंतु सातत्याच्या संपर्कानं आपलं काम केलं व त्यामुळे पलटणीतील हे दोन वंशाचे लोक जवळपास एक झाले... हिंदू आणि मुसलमानांच्या वेगळ्या पलटणी तयार केल्या असत्या तर त्यांच्यात बंधुत्वाची भावना वाढीस लागू शकली नसती. [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १७३]

*लॉयल मॉहमेडन्स ऑफ इंडिया* या आपल्या पुस्तकात त्यांनी अधिकारीवर्गाशी जुळतं घ्यायची भूमिका घेतली व मुसलमान समाज इंग्रजविरोधी असून स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता असल्याचा आरोप तत्परतेनं फेटाळला.

ब्रिटिशांच्या बाजूनं प्रचारकार्य तर त्यांनी केलंच पण त्याशिवाय त्यांची जिथे जिथे नेमणूक झाली तिथे तिथे त्यांनी शाळा उघडल्या. उर्दू जाणणाऱ्या वाचकांना पाश्चात्त्य कला आणि विज्ञानाचा परिचय होऊन 'आपले दोष दूर करता यावे तसंच ब्रिटिश सत्तेचा परिचय होऊन तिचा लाभ त्यांना घेता यावा म्हणून त्यांनी *ट्रन्सलेशन सोसायटीही* काढली.' [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १७४]

१८७०साली इंग्लंडला भेट दिल्यानंतर त्यांची खात्री पटली की ब्रिटिश सत्ता मान्य करण्यासाठी आपल्या समाजाला समजावणं एवढंच आपलं जीवितकार्य नाही तर त्या समाजाला ब्रिटिश संस्कृती स्वीकारायला लावणं हेही आपलं कर्तव्य आहे. इंग्रजी संस्कृतीनं दिपून गेल्यामुळे त्यांनी लिहिलं की इंग्रज लोक 'नेटिव्ह' लोकांकडे घृणेनं का पाहतात आणि त्यासाठी ते कसे पात्र आहेत ते आता मला कळलं. 'भारतातील नेटिव्ह लोकांची - मग ते उच्च वर्गातील असोत की खालच्या वर्गातील .... सुशिक्षित असोत की अशिक्षित – तुलना इंग्रजांशी शिक्षण, शिष्टाचार, प्रामाणिकपणा आदी बाबतीत जर केली तर ती एखाद्या घाणेरड्या प्राण्याशी सुंदर आणि स्वच्छ माणसाशी केलेल्या तुलनेसारखी होईल.' [सर मंचरजी भोवनग्री के.सी.आय.ई. यांच्या स्वागत समारोहाचा प्रसंग होता. भोवनग्री हे एकदा काठेवाडमध्ये फिरोजशहा मेहता यांच्याबरोबर प्रवास करत असलेल्या प्रसंगाचं वर्णन व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांनी केलं आहे. आपल्या दांडग्या कुत्र्यासह त्याच डब्यातून प्रवास करायचा एका इंग्रज गृहस्थाचा आग्रह होता. सर मंचरजी त्याबद्दल रेल्वे अधिकाऱ्याशी बोलले. त्यामुळे तो इंग्रज आक्षेपकावर अतिशय चिडला आणि त्यानं इंग्रजी भाषेतील निवडक शिव्यांचा त्यांच्यावर वर्षाव केला. अखेरीस तो म्हणाला, 'मी जर. या नेटिव्हाबरोबर प्रवास करण्यावर आक्षेप घेत नाही तर यांना माझ्या कुत्र्याबरोबर प्रवास करायला काय हरकत आहे?' पाहा : व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, द मद्रास लॉ जर्नल प्रेस, मद्रास, (१९४५) पृष्ठ ४७] त्यामुळे त्यांनी *स्पेक्टेटर* आणि *टॅटलरच्या* धर्तीवर *तहजीब-अल-इखलाक* नावाचं वृत्तपत्र सुरू केलं व त्यातून पाश्चात्य संस्कृतीबरोबरच मुसलमान धर्माचा प्रसार करता येईल अशा प्रकारचं मुस्लीम महाविद्यालय काढायची कल्पना मांडली. १८७५ साली अलीगढ येथे 'शासनाच्या पुरस्कारानं' *मॉहमेडन अँग्लो ओरिएंटल कॉलेज* उघडण्यात आलं. ['न्यायालयांकडे आलं तर..... युरोपिअन लोकांवर खास नियमांप्रमाणे खटला चालवण्यात येत असताना कोणत्या प्रकाराच्या न्यायाची अपेक्षा करावी हे सर्वांना माहीत असतं. गेल्या १५० वर्षात कोणत्याही भारतीयाला युरोपिअनाच्या हातून मरण आलेलं असलं तरी ते आजारपण वा अपघात यांच्यामुळे मरण आल्याचं न्यायालयांनी ठरवलं आहे. खुनाचा साधा व सरळ खटला एकही नाही.' (पंडित मोतीलाल, *ऑन लॉ कोर्ट्स*, *अॅन अपील टू लायर्स*, *यंग इंडिया*, ऑक्टोबर १३, १९२०, पृष्ठ ६)]

इस्लामला आधुनिक स्वरूप द्यायच्या त्यांच्या प्रयत्नामुळे पुराणमतवादात हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींकडून त्यांच्यावर कठोर टीका करण्यात आली. ही टीका विशेषत्वाने धर्मगुरू आणि अरेबिक फारसीच्या शिक्षकांकडून करण्यात आली. उलटपक्षी एकोणिसाव्या शतकातील बुद्धिप्रामाण्याच्या प्रकाशात कुराणावर त्यांनी केलेल्या भाष्यामुळे त्यांना *नेचारी म्हणजे निसर्गवादी* ही पदवी मिळाली. धर्मग्रंथांनी निसर्गनियमांचं पालन केलं पाहिजे (ईश्वराच्या

शब्दांचा अर्थ ईश्वराच्या कार्यातून लावावा.) हा सिद्धान्त त्यांनी या भाष्यातून मांडला. पाखंडी म्हणून त्यांचा निषेध करण्यात आला. त्यांना जातिबहिष्कृत करण्यात आलं आणि अनेकदा त्यांना खुनाची धमकी देण्यात आली. परंतु नवीनच उदयाला येऊ लागलेला मध्यमवर्ग मात्र त्यांच्या पाठीशी उभा राहिला आणि त्यांच्या महाविद्यालयास त्यानं संपूर्ण पाठिंबा दिला.

ऑक्सफर्ड आणि केंब्रीजच्या धर्तीवर काढलेलं अलीगढ महाविद्यालय हे केवळ अतिरिक्त विषयाच्या बाबतीत म्हणजे 'ख्रिश्चन धर्माऐवजी इस्लाम धर्म' या बाबतीतच ख्रिश्चन महाविद्यालयाहून वेगळं होतं. त्यातील शिक्षणाचं माध्यम इंग्रजी होतं. तिथे शिकवण्यात येणाऱ्या विषयातील एक विषय ;भारतातील मुसलमानांना ब्रिटिश साम्राज्यासाठी उपयुक्त प्रजा बनवणे' हा होता. [कॉब्डेन यांचं जॉन राईट यांना पत्र, ऑगस्ट २४, १८५७ (*लाईफ ऑफ कॉब्डेन*, पृष्ठ ६७२)] अलीगढ महाविद्यालयाच्या संस्थापकांनी घोषित केलं होतं की 'भारतावरील ब्रिटिश साम्राज्य ही जगातील सर्वात सुंदर घटना आहे.' [१८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यात लिहिलेलं आहे : 'यापलीकडे आमची इच्छा आहे की शक्य असेल तोपर्यंत आमच्या प्रजेला, मग ती कोणत्याही वंशाची वा धर्माची असो, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे, कार्यक्षमतेप्रमाणे, आणि प्रामाणिकपणानुसार मुक्तपणानं आमच्या सेवेतील अधिकार पदावर नेमण्यात येईल.' रोमेश दत्त यांनी *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडियामधे* दिलेलं उद्धरण. पृष्ठ २३४]

व्यक्तिगतरीत्या सहिष्णू असलेले सर सैय्यद अहमद सुरुवातीच्या काळात इतर काहीही असले तरी जातीयवादी नव्हते. त्यांनी काढलेल्या अलीगढ महाविद्यालयात कोणत्याही धर्मावर विश्वास असणाराला प्रवेश होता. चेन्नई येथील पंचैप्पा महाविद्यालय अथवा बनारस केन्द्रीय हिंदू महाविद्यालय यांच्यात अशी परिस्थिती नव्हती. थोडीशी धर्ममार्तंडताही त्यांना क्लेशकारक व्हायची. धार्मिक वैर निर्माण व्हायच्या भीतीनं विविध धर्मातील लोकांत झालेली धार्मिक चर्चासुद्धा त्यामुळे त्यांना आवडत नसे. राष्ट्रीयत्व आणि राजकीय प्रगती यासंबंधीचे त्यांचे विचार त्यांच्या काळाच्या दृष्टीनं बरेच प्रगतिशील होते. *कॉझेस ऑफ म्युटिनी* या आपल्या ग्रंथातून उठावाचं कारण देशाच्या आणि प्रजेच्या अवस्थेबद्दलचं शासनाचं अज्ञान आहे असं त्यांनी दर्शवलं आहे. विधिसभेत जनतेचं प्रतिनिधित्व असावं म्हणून त्यांनी जोरदार आवाज उठवलाः 'जनतेचा आवाजच समस्यांच्या कारणांना मुळापासून नाहीसं करू शकतो आणि एखादा उद्रेक

होऊन आमचा समूळ नाश होण्यापासून आम्हांला वाचवू शकतो.... असं काहीच कारण नाही.... की ज्यामुळे या देशातील लोकांना विधिसभेतून बाहेर ठेवलं जावं.' [रोमेश दत्त यांनी *द इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया* (*व्हिक्टोरिअन एज*), पृष्ठ २३३] शासकांनी स्वतःला प्रजेपासून दूर ठेवण्याच्या धोरणाचा त्यांनी निषेध केला आणि या दोघात मित्रत्वाचं नातं असण्यावर त्यांनी भर दिला. 'शासनानं आजपर्यंत स्वतःला जनतेपासून अशा रीतीनं वेगळं ठेवलं की जणू काय ते गवत आहे आणि जनता विस्तव. आणि या दोघांचा एकमेकाला स्पर्श झाला तर शासक जणू काय जळून खाक होतील. [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २२] उलट त्यांचं म्हणणं होतं की जनता आणि शासन हे एखाद्या वृक्षाप्रमाणे आहेत. 'जनता त्या वृक्षाच्या मुळाप्रमाणे व शासन त्या वृक्षाच्या वरील भागाप्रमाणे आहे. जशी मुळं असतील तसा वृक्ष असेल.' [एडवर्ड थॉम्प्सन अँड जी.टी. गॅरेट, *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ५३७]

जमिनीवरील प्रचंड शेतसाऱ्याबद्दल कठोर टीका करत भारतीय जनतेबद्दल अधिकाऱ्यांच्या मनात असलेली घृणा आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांसमोर स्पष्टपणे बोलायचं जनतेत साहस नसणं या दोन्ही गोष्टींचा त्यांनी निषेध केला. 'अशा प्रकारच्या नियमांवर आपल्या घरात हल्ला करायची नेटिव्हांना सवय आहे. परंतु त्यांची युरोपिअनांशी जेव्हा गाठ पडते तेव्हा ते सांगतात की 'हे नियम न्याय्य आणि शहाणपणाचे आहेत व आम्ही त्यामुळे समाधानी आहोत. 'मी हे सांगतो आहे त्यासाठी मला क्षमा करण्यात यावी.' [बी. पट्टाभी सीतारामैय्या, *द हिस्ट्री ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस*, पद्म पब्लिकेशन्स लि. मुंबई (पुनर्मुद्रण), खंड १, पृष्ठ ८९] आणि हे ते अशा वेळी म्हणाले की जेव्हा ते स्वतः सरकारी नोकर होते! इंपेरिअल लेजिस्लेटीव्ह कौन्सिलचे सदस्य असताना - ज्यावर त्यांना १८७३ साली नामित करण्यात आलं होतं - इल्बर्ट बिलाला पाठिंबा देणारात क्रिस्तोदास पाल सोडले तर अधिकारी वर्गाबाहेरील ते एकमेव सदस्य होते. हिंदू आणि मुसलमानांच्या ऐक्यासाठी, ज्यांना ते भारताचे दोन डोळे समजत असत, त्यांनी वारंवार आवाहन केलं. 'तुम्ही एकाच भूमीत वास्तव्य करत नाही काय? लक्षात ठेवा की हिंदू आणि मुसलमान हे शब्द केवळ धर्माचा भेद दाखवणारे आहेत. एरव्ही या देशात राहणारे सर्व, त्यात हिंदू आणि मुसलमानच नव्हे तर ख्रिश्चनांचाही समावेश आहे, एकाच मातृभूमीत राहणारे असल्यामुळे देशासाठी सारखेच

आहेत.' [बिशप व्हाईटहेड, *इंडियन प्रॉब्लेम*, पृष्ठ २०७ वरून एडवर्ड थॉम्सन अँड जी.टी. गॅरेट, *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ५३६ मधे उद्धृत]

लाहोर येथील इंडियन असोसिएशननं केलेल्या स्वागताला उत्तर देताना ते म्हणाले की मला मान्य आहे की या संस्थेचे बहुसंख्य सदस्य हिंदू आहेत तरीही मी म्हणेन की:

*हा प्रकाश (राष्ट्रीय जाणिवेचा) पसरवण्याचा गुण केवळ बंगाली लोकातच आहे. मी म्हणेन की या देशात केवळ बंगाली लोकच असे आहेत की ज्यांचा आपल्याला अभिमान वाटावा आणि तेच केवळ असे लोक आहेत की ज्यांच्यामुळे या देशात ज्ञान, स्वातंत्र्य, राष्ट्रभक्ती ह्या गुणांची वाढ झालेली आहे....*

*त्यांचा कोणवा धर्म वा पंथ आहे याला माझ्यासाठी फारसा अर्थ नाही कारण यापैकी आम्ही कोणतीच गोष्ट पाहत नसतो. आम्हांला केवळ एवढंच दिसत असतं की आम्ही एकाच भुमीत राहतो, एकाच शासनाची आम्ही प्रजा आहोत. यापासून दोघांनाही मिळणारे लाभ समान आहेत तसंच दोघांनाही दुष्काळाच्या सारख्याच वेदना भोगाव्या लागतात. या भूमीवर राहणाऱ्या दोन्ही वंशांना मी हिंदूच म्हणेन कारण ते दोघंही हिंदुस्तानचेच रहिवासी आहेत.* [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ १८]

बऱ्याच कालावधीनंतर सर सैय्यद अहमद आणि त्यांचं कार्य यांचं मोल हिंदू, फारशी आणि ख्रिश्चनांच्या लक्षात आलं. त्यांनी केवळ त्यांच्या महाविद्यालयाला देणग्याच दिल्या नाही तर तिथे प्रवेश घेण्यासाठी त्यांनी विद्यार्थीही पाठवले. त्यांचं आधीचं लेखन हिंदू आणि मुसलमान सारख्याच उत्सुकतेनं वाचत असत आणि उत्तर भारताच्या १८८४च्या दौऱ्याच्या वेळी दोन्ही समाजांनी त्यांचं सारखंच स्वागत केलं होतं.

परंतु त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या काळात त्यांनी प्रतिक्रियावादी सांप्रदायिक राजकारणी माणसाची भूमिका घेतली. त्यांनी हिंदूंच्या वर्चस्वाचा धसका घेतल्यामुळे हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याऐवजी त्या धसक्याच्या प्रभावातच ते काम करू लागले. १८८५ साली काँग्रेसची जेव्हा स्थापना करण्यात आली तेव्हा आधी त्यांनी तिच्याकडे दुर्लक्ष केलं

आणि नंतर तिला विरोध केला. १८८७ साली लखनौ येथे दिलेल्या भाषणातून निष्ठा आणि मेहरबानी या गुणाच्या आधारे मुसलमान व्यावसायिक वर्गाची उन्नती करण्याची योजना मांडून काँग्रेसपासून दूर राहायचा सल्ला त्यांनी मुसलमानांना दिला. 'तुम्ही जर बेइमानी करून शासनाला अविश्वासाचं कारण दिलं नाही तर शासन तुमच्याकडे (सैन्यात कॉलनल आणि मेजरच्या जागी नेमणूक करण्यासंबंधी) निश्चितच लक्ष देईल. [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ १९] त्यांचे मित्र  कॉलनल ग्रॅहम यांना त्यांनी लिहिलं : 'तथाकथित भारतीय राष्ट्रीय काँग्रेसविरुद्ध मी मोठी जबाबदारी अंगावर घेतली आहे आणि युनायटेड पॅट्रिॲटिक असोसिएशन या नावाची संस्था काढली आहे.' [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ १९]

काँग्रेसच्या विरोधात मुसलमानांना संघटित करण्यासाठी १८८९ साली त्यांनी 'अपर इंडिया मॉहमेडन डिफेन्स असोसिएशन' काढली. तरीही काँग्रेसच्या मागण्यांच्या औचित्यानुसार ते तिला पाठिंबा देत असत. इंपेरिअल लेजिस्लेटीव्ह कौन्सिलच्या सदस्याच्या नात्यानं त्यांना संयुक्त मतदार संघाऐवजी जातींसाठी राखीव मतदार संघ हवे होते.

### ३

राष्ट्रभक्त उदारमतवादी सर सैय्यद यांचं सांप्रदायिक प्रतिगामी काँग्रेसविरोधकात पूर्णपणे परिवर्तन कशामुळे झालं असावं? मुसलमान लोकातील उच्च आणि मध्यमवर्ग ज्या वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या वेळी निर्माण झाला त्या परिस्थितीचं आणि शासन करणाऱ्या वर्गाचं मुसलमानांशी धोरण कसकसं बदलत गेलं याचा अभ्यास केल्यास या गोष्टीच्या कारणांचा उलगडा होऊ शकेल.

एका समुदायाच्या जिवावर दुसऱ्या समाजाला सूट द्यायचं ब्रिटिशांचं सुरुवातीपासून धोरण राहत आलेलं होतं. अगदी १८४३ सालाएवढ्या आधीच्या काळातही गव्हर्नर जनरलनी लंडनला सावध करत साम्राज्याचं जतन करण्यासाठी सांप्रदायिकतेचा उपाय सुचवला होता.

'हा वर्ग (मुसलमान) मूलतः आपला विरोधक आहे या गोष्टीकडे मी दुर्लक्ष करू शकत नाही व त्यामुळे आमचं धोरण हिंदूंशी जुळवून घ्यायचं असायला हवं.' [विल्हेम डिबिलेयस, *इंग्लंड*, पृष्ठ ६१] १८५७च्या उठावानंतर बरेच दिवस ब्रिटिशांचा समज होता की या उठावासाठी मुसलमानातील उच्च मध्यमवर्गच जबाबदार आहे. 'त्या काळातील सर्व प्रकारच्या भयानक घटनांसाठी मुसलमानांनाच जबाबदार धरण्यात आलं.' [एडवर्ड थॉम्सन अँड जी.टी. गॅरेट, रा*ईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया*, पृष्ठ ५३१] त्यामुळे उठावानंतरच्या काही वर्ष मुसलमानांविरुद्ध भेदभाव करण्यात यायचा आणि शासकीय सेवेची दारं त्यांच्यासाठी बंद करण्यात आली, उच्च व्यवसायातील प्रवेशाची संधी त्यांना नाकारण्यात आली आणि त्यांना शैक्षणिक सोयी पुरवायला नकार देण्यात आला. [सर जी. ऑर्थर, *लाईफ ऑफ लॉर्ड किचनेर*, २, पृष्ठ १७७]

१८७०पर्यंत या धोरणाचा उपयोग झाला होता. त्यानंतर ब्रिटिशांनी आपली पसंती बदलायचं ठरवलं. आता ब्रिटिश साम्राज्याचा जम बसला होता. मुसलमान वर्गाचं स्वतंत्रपणे बंड करायचं सामर्थ्य पूर्णपणे लोपलं होतं परंतु हळूहळू पण निश्चितपणे फोफावत चाललेल्या राष्ट्रवादाचा लोंढा अडवायचं त्याच्यातील सामर्थ्य मात्र अजूनही कायम होतं. त्यामुळेच मुसलमान वर्गाशी मैत्री करायचं धोरण ठरवण्यात आलं.

१८७१ सालच्या दरम्यान सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांनी भारतीय मुसलमानांवरील आपल्या प्रसिद्ध पुस्तकात दाखवलं की समाजाच्या सर्व भागांत ब्रिटिशविरोधी व्यापक भावना असणं धोकादायक आहे आणि शासनाची कमीतकमी मुसलमानांबद्दलची नीती तरी सुज्ञपणाची नाही. मुसलमानांची निष्ठा आपल्याकडे वळवण्यासाठी मुसलमानांना अधिक शैक्षणिक सोयी पुरवण्यावर त्यांनी भर दिला. १८७६ साली संयुक्त प्रांताचे लेफ्टनंट जनरल असलेले सर जॉन स्ट्रॅची यांनी दाखवलं की 'परस्परांबद्दल शत्रुभाव असणारे (हिंदू आणि मुसलमान) हे दोन वर्ग अस्तित्वात असणं ही गोष्ट भारतातील आपल्या राजकीय स्थानाच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मुसलमान समाजातील उच्च वर्ग हा आपल्या शक्तीचा स्रोत आहे, आपल्या दुबळेपणाची ती खूण नाही. तुलनात्मक दृष्ट्या अल्पसंख्यांक असलेल्या या वर्गाचे राजकीय हितसंबंध

आपल्यासारखेच आहेत.' त्यामुळे यानंतर मुसलमानांची निष्ठा परत ब्रिटिशांकडे वळवणं हे ब्रिटिशांचं अधिकृत धोरण ठरलं.

दुसरीकडे काही प्रमाणात ब्रिटिशांच्या हातून सहन कराव्या लागलेल्या गोष्टींमुळे आलेल्या संतापामुळे तर काही प्रमाणात उच्चवर्गीय म्हणून भारताच्या ज्या वायव्य भागात मुसलमान सुस्थापित झालेले होते त्या भागातील मुसलमानांवर विशेषतः पाश्चात्य शिक्षणाचा फार कमी प्रभाव पडल्यामुळे मुसलमान आपल्या परंपरांनाच चिकटून राहिले. परिणामी समाज म्हणून शैक्षणिकदृष्टीनं ते मागे पडले, इतर वर्गांच्या तुलनेत आर्थिक स्पर्धेत ते मागं राहिले आणि मध्यमवर्गाच्या प्रगतीतील त्यांचा वाटा अत्यल्प राहिला. इंग्रजी शिकलेले हिंदू नोकऱ्यांत, उद्योगांत आणि व्यापारांत पुढे गेले. मुसलमान आपल्या आर्थिक प्रगतीसाठी दिवसेंदिवस इंग्रजांच्या कृपेवर अधिकाधिक विसंबून राहू लागले. ब्रिटिश सरकार आणि मुसलमान यांच्यात *तडजोड* होण्यासाठी उपयुक्त वातावरण होतं. अधिक प्रगत समाजाच्या राजकीय आकांक्षाना आवर घालण्यासाठी ब्रिटिशांना असंतुष्ट 'नाहीरे' मुसलमान वर्गाच्या पाठिंब्याची गरंज होती. तसंच 'नाहीरे' मुसलमान समाजाला जीवनातील प्रगतीसाठी ब्रिटिशांच्या आधाराची गरज होती. दोघांनाही परस्परांच्या मदतीची गरज जाणवत होती.

त्यामुळे उच्च आणि मध्यम वर्गीय मुसलमानांचा ब्रिटिशांशी सलोखा घडवून आणायचा सर सैय्यद अहमद यांनी जो प्रयत्न केला त्याचं ब्रिटिश अधिकाऱ्यांनी स्वागत केलं. ज्या वर्गातून मुसलमान वगळले गेले होते वा स्वतः होऊन दूर राहिले होते त्या वर्गात मुसलमानांचा प्रवेश व्हावा म्हणून ब्रिटिश त्यांना प्रोत्साहन देऊ लागले. मुसलमानांनी ब्रिटिशांना आपली निष्ठा अर्पावी म्हणून आणि 'हिंदूंच्या नुकत्याच उदयाला येऊ लागलेल्या उठाव करायच्या शक्तीला' आवर घालावा म्हणून मुसलमानांना ब्रिटिश पदं आणि सोयीसवलती पुरवू लागले. [विल्हेम डिबिलेयस, इंग्लंड, पृष्ठ ६२. युरोपिअन लोक भारतीयांविरुद्ध जो भेदभाव करत त्याची दोन उदाहरणं लक्षणीय आहेत : भारतीयांच्याच पैशानं महाबळेश्वर येथे बांधलेल्या फ्रेअर हॉलच्या नियमान्वये तेथील ओसरीवरदेखील भारतीयास चढायची मनाई होती. हीच अवस्था इंग्लिश जिमखाना क्लब, मुंबईचीही आहे. पहा :व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ ४७] सर सैय्यद अहमद यांनी इंग्लंडला भेट दिली असता तिथल्या लॉर्डसनी आणि अधिकाऱ्यांनी त्यांचं भरपूर स्वागत

केलं. नॉर्दर्न प्रॉव्हिन्सचे अधिकारी सर ऑकलंड कॉल्व्हिन आणि सर सैय्यद यांचे चरित्र लेखक लेफ्टनंट कॉलोनल ग्रॅहम या दोन इंग्रज अधिकाऱ्यांनी सर सैय्यद यांनी पंधरा वर्षांपूर्वी लिहिलेल्या कॉझेस ऑफ म्युटिनी या निबंधाचा अनुवाद केला व त्याचं पुन्हा प्रकाशन करण्यात येऊन त्याला पुनर्जीवित करण्यात आलं. शासनानं त्यांच्या महाविद्यालयासाठी अनुदान दिलं. कॉलनल नॉर्थब्लॉक यांनी स्वतःजवळून महाविद्यालयासाठी १०,००० रुपये दिले.

आठव्या दशकाच्या मध्यानंतर राष्ट्रीय आंदोलनाने जोर धरला. त्यात हिंदू बुद्धिजीवी वर्ग पुढे होता. त्यानंतर या प्रक्रियेला अजूनच गती मिळाली.

ब्रिटिशांच्या व्यापारानं आणि संस्कृतीनं भारतात जिथे प्रवेश केला होता तिथे म्हणजे मुंबई, चेन्नई, कोलकाता यासारख्या बंदराच्या ठिकाणी स्वाभाविकपणेच इंग्रजी शिकलेला आणि राजकीय जागृती असलेला मध्यमवर्ग आधी विकसित झाला. या वर्गाला परकीय सत्तेत प्रगतीची पुरेपूर संधी असल्याचं दिसत नव्हतं. त्यामुळे ब्रिटिशांकडून सवलती मिळवायच्या दृष्टीने हा वर्ग अधिकाधिक संघटित होऊ लागला होता. या भागातील मुसलमानांनाही अशाच प्रकारची संधी मिळालेली होती व त्यांच्याही मार्गात अशाच अडचणी उभ्या होत्या. त्यामुळे इतर वर्गांप्रमाणेच मुसलमानही राजकीय दृष्टीनं जागृत होऊ लागले व इतरांबरोबर राष्ट्रीय आंदोलनात अधिकाधिक सहभागी होऊ लागले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या तिसऱ्या अधिवेशनात बद्रुद्दिन तय्यबजी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले : 'मला कळत नाही की मुसलमानांनी आपल्या इतर देशबांधवांबरोबर खांद्याला खांदा लावून काम का करू नये? (टाळ्या)... मित्रहो! हेच ते तत्त्व आहे की ज्यानुसार मुंबई प्रांतातील आपण लोक वागत आलो आहोत.' [सर सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, *अ नेशन इन मेकिंग*, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, (१९३१), पृष्ठ ८८]

ब्रिटिश आणि सर सैय्यद यांच्यासाठी ही परिस्थिती काही फारशी सुखावह नव्हती. ब्रिटिशांच्या कृपाछत्राखाली मुसलमान समाजाची प्रगती करून घ्यायची ब्रिटिशांची तसंच सर सैय्यद यांची योजना होती. त्यामुळे राजकीय दृष्टीनं जागृत मुसलमान समाज काँग्रेसकडे वळू नये म्हणून सर सैय्यद यांनी या वर्गाची राजकीय संघटना आपल्या हाती घेतली. परंतु यापूर्वी

मात्र सर सैय्यद यांनी मुसलमानांनी राजकारणापासून पूर्णपणे दूर राहावं असा सल्ला दिला होता. आर्थिक दृष्टीनं अधिक प्रगत व राजकीय दृष्टीनं जागृत असलेला हिंदू काँग्रेसकडून आणि आर्थिक दृष्टीनं अप्रगत व राजकीय दृष्टीनं कमी जागृत मुसलमान वर्ग ब्रिटिशांकडून अशी विभागणी करता येत नव्हती. परंतु मुंबई, चेन्नई, कोलकाता या तीन बंदरांच्या ठिकाणी राजकीय दृष्टीनं जो जागृत वर्ग निर्माण झाला तो बहुसंख्य मुसलमानेतरांचा होता. कमीत कमी उच्च मध्यम वर्ग आणि मध्यमवर्गाची तरी अशीच परिस्थिती होती. आकस्मिक उद्‌भवलेल्या या परिस्थितीमुळे मात्र हे वर्ग हिंदू आणि मुसलमानाचे वर्ग आहेत असं दाखवता येणं शक्य होतं. आणि काँग्रेसची सदस्यता याचं वर्गातून असल्यामुळे काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे व ती हिंदूंच्या भरभराटीसाठी काम करणारी संस्था आहे असं चित्र उभं करणं शक्य होऊ शकत होतं. याप्रमाणे ब्रिटिश सरकारच्या सहकार्यानं '*अपर इंडिया मॉहमेडन डिफेन्स असोसिएशन*' ही सरकारशी निष्ठावान असलेली काँग्रेसविरोधी संघटना स्थापना करण्यात आली. याच वर्षी सर सैय्यद यांना के.सी.एस आय. या पदवीनं सम्राटांकडून सन्मानित करण्यात आलं.

आयुष्याच्या अखेरच्या दिवसात सर सैय्यद यांचा भ्रम काहीसा दूर झाला व काँग्रेसच्या मागण्या न्याय्य असल्याचं त्यांच्या लक्षात येऊ लागलं. त्यांच्या मुलाला बळजबरीनं निवृत्त करण्यात आल्यानंतर त्यांनी लिहिलं :

*'या देशाचे आमचे विजेते असलेले व आपल्या विजेतेपणाचा स्वाभाविक अभिमान असलेले आमचे युरोपिअन मित्र विनम्र होतील आणि आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्या ज्या जित थारतीयांचा ते तिरस्कार करतात त्या भारतीयांसोबत एकाच बाकावर बसतील अशी वेळ अजून आलेली नाही आणि कदाचित कधीच येणारही नाही.... जर भारतीय माणुस आपल्या विवेकबुद्धीप्रमाणे काम करायचा प्रयत्न करत असेल व त्याच्या शरीरात त्याच्या पुर्वजांचं थोडसंही रक्त असेल तर तो आपलं कर्तव्य पर पाडू शकणार नाही... वास्तव याहून विपरीत आहे अशी लोक कितीही आरडाओरड करोत परंतु शहाण्या माणसालाच या बाबतीतील संपुर्ण सत्य माहीत असेल.'* [व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २४]

परंतु आता फार उशीर झालेला होता. विषारी बीजं पेरली गेली होती आणि भारताला त्याची विषारी फळं चाखणं भाग होतं.

**४**

सर सैय्यद यांचा १८९८मध्ये मृत्यू झाला. त्यांच्या जिवंतपणीच त्यांच्याकडे आकर्षित झालेल्या सुशिक्षितांच्या गटानं त्यांच्या कल्पनांचा व विचारांचा विस्तार आणि प्रसार केला व त्यांनीच ज्याला आपण अलीगढ संप्रदाय म्हणतो त्याची स्थापना केली. त्या सर्वांवर सर सैय्यद यांच्या उदारमतवादाचा प्रभाव होता. त्यांचा विश्वास होता की मुसलमान समाजाचा विकास इंग्रजी शिक्षणानंच होऊ शकेल. सर सैय्यद यांच्याप्रमाणेच त्यांनाही भारतावरील ब्रिटिशांचं राज्य हे आशीर्वाद आणि वरदान असल्यासारखं वाटत होतं. अलीगढ येथील अँग्लो ओरिएंटल मॉहमेडन कॉलेज ब्रिटिशांना अनुकूल व राजकीय दृष्टीनं जागृत असलेल्या मुसलमानांच्या गटाचा बालेकिल्ला बनला होता. सांप्रदायिक विचार पेरण्यासाठी ब्रिटिश नोकरशाहीला मुसलमान वर्गाची सुपीक भूमी सापडली होती. भारतीय राष्ट्रीयत्वाच्या आंदोलनाच्या कार्यात अडथळा आणण्यासाठी त्यांनी तिचा उपयोग केला. सर सैय्यद यांच्या मृत्यूनंतर या दृष्टीनं त्यांची परंपरा चालवणारात मुशिन - उल - मुल्क ही पदवी मिळालेले सैय्यद महदी अली प्रमुख होते. ते सर सैय्यद यांच्या मृत्यूनंतर अलीगढ महाविद्यालयाचे सचिव झाले. आगाखानचं प्रतिनिधिमंडळ व्हाईसराय लॉर्ड मिंटोकडे नेणारात त्यांचा मोठा सहभाग होता. या प्रतिनिधिमंडळानं व्हाईसरायकडे मुसलमानांसाठी विभक्त मतदारसंघाची मागणी केली. तसंच मुस्लीम लीगची स्थापनाही याच मंडळींनी केली.

या 'प्रभावी बनावाची' कथा सर्वश्रुत आहे. बंगालच्या फाळणीविरुद्धचं आंदोलन कळसाला पोहोचलं असताना सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया, लॉर्ड मोर्ले यांनी ११ मे १९०६

रोजी तत्कालीन व्हाईसराय लॉर्ड मिंटो यांना प्रिन्स ऑफ वेल्स यांच्याशी झालेल्या संभाषणाचा उल्लेख करत लिहिलं : 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचं मोठ्या शक्तीत रूपांतर होत असल्याबद्दल ते बोलले ... आपल्याला आवडो वा न आवडो ती इथे आहेच.'

लॉर्ड मिंटो यांनी प्रत्युत्तरात लिहिलं : 'काँग्रेसच्या ध्येयांना प्रतिरोध करू शकणाऱ्या शक्तीचा एवढ्यात मी विचार करत आहे. ....'

पाच आठवड्यांनंतर १९ जून १९०६ला वसाहत मंत्र्यांनी व्हाईसरायना परत लिहिलं : भारतात नवचेतना निर्माण होऊन ती सर्वत्र वाढत आहे अशी सावधगिरीची सूचना प्रत्येकजण आम्हांला देत आहे. लॉरेन्स, चिरोल, सिडनी लो सर्व एकाच सुरात म्हणत आहेत : 'तुम्ही आता त्याच पद्धतीनं शासन करू शकत नाही. तुम्हाला त्यांच्याबद्दल काहीही वाटत असलं तरी काँग्रेस पक्ष आणि तिच्या ध्येयाशी आता तुम्हांला सामना करावाच लागेल. तुम्ही निश्चितपणे लक्षात ठेवा की मुसलमान तुमच्याविरुद्ध लवकरच आपलं वजन काँग्रेसकडून टाकतील व अशाच प्रकारच्या घटना पुढेही घडत राहतील.'

नंतर जे घडलं तो इतिहासाचा भाग आहे. १ ऑक्टोबर १९०६ला हिज हायनेस आगाखान हे मुसलमानांचं प्रतिनिधिमंडळ घेऊन लॉर्ड मिंटो यांच्याकडे सिमला येथे गेले. प्रतिनिधिमंडळनं त्यांच्याकडे मागणी केली की 'मुसलमान समाजाला मुसलमान समाज म्हणून प्रतिनिधित्व देण्यात यावं तसंच मुसलमान समाजाचं स्थान 'त्याच्या लोकसंख्येवरून ठरवण्यात येऊ नये, त्याच्या राजकीय महत्त्वावरून.... व साम्राज्याची त्यानं जी सेवा केली आहे त्यावरून ठरवण्यात यावं.'

लॉर्ड मिंटो यांनी या गोष्टीशी पूर्ण सहमती दर्शवली : 'मी एवढंच म्हणू शकेन की माझ्याशी संबंधित कोणताही प्रशासनिक फेरबदल करताना मुसलमान समाजाचे समाज म्हणून राजकीय हक्क आणि अधिकार यांची जपणूक करण्यात येईल याबद्दल तुम्ही आश्वस्त असावं.'

व्हाईसराय यांच्याकडे हे प्रतिनिधिमंडळ गेल्यानंतर त्याच वर्षी डिसेंबरमधे अखिल भारतीय मुस्लीम लीगची स्थापना करण्यात आली. लीगच्या उद्दिष्टांमध्ये पुढील बाबींचा समावेश होता : ब्रिटिश शासनाबद्दल मुसलमानांमध्ये निष्ठेची भावना निर्माण करणं, शासनानं उचललेल्या पावलांच्या हेतूंबद्दल काही गैरसमज निर्माण झाले असतील तर ते दूर करणं, भारतीय मुसलमानांच्या राजकीय हक्कांची व अधिकारांची जपणूक करणं......' कराची येथे १९०७ साली तयार करण्यात आलेल्या व नंतर पुढील वर्षी लखनौ येथे मान्यता देण्यात आलेल्या मुस्लीम लीगच्या घटनेत तिचं अध्यक्षपद आजीवन असणार होतं. १९१४मध्ये मुस्लीम लीगच्या ध्येयात क्रांतिकारक बदल करण्यात येईपर्यंत हिज हायनेस आगाखान यांच्याकडे ते पद होतं. परंतु या बदलांमुळे त्यांनी त्या पदावरून निवृत्ती घेतली.'

नबाब मोहसीन-उल-मुल्क यांच्या मृत्यूचा उल्लेख करत लेडी मिंटो यांनी आपल्या ३ ऑक्टोबरच्या डायरीत लिहिलं आहे की 'ते महान मुसलमान पुढारी होते. त्यांच्या गुणांचा उल्लेख करत त्या लिहितात, 'मुसलमानांचं प्रतिनिधिमंडळ आयोजित करणारे तेच गृहस्थ होते.' त्याच डायरीत १ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी लिहिलं आहे की 'तो दिवस अत्यंत महत्त्वपूर्ण घटनांनी भरलेला दिवस होता. भारताच्या इतिहासातील युगप्रवर्तक असा तो दिवस होता.' लेडी मिंटो यांना त्यांच्या अधिकाऱ्यानं (नाव सांगण्यात आलेलं नाही.) लिहिलेल्या पत्राचा उल्लेख असा आहे : 'माननीय महोदया, मी तुम्हाला सांगायला हवं की आज एक फार मोठी घटना घडली आहे. मुत्सद्दीपणाचं असं एक काम झालं आहे की ज्याचा प्रभाव भारतावर आणि भारताच्या इतिहासावर दीर्घकाळ पडणार आहे. या घटनेमुळे राजद्रोहाकडे वळू पाहणाऱ्या सहा कोट लोकांना तसं करण्यापासून परावृत्त करण्यात आलेलं आहे. ही घटना एवढी महत्त्वाची आहे .'

[व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २५]

त्याप्रमाणे मोर्ले-मिंटो यांच्या सुधारणांच्या योजनेमध्ये सांप्रदायिक तत्त्वावर विभक्त मतदारसंघाची योजना करण्यात आली. त्या योजनेनुसार दोन समाजांसाठी दोन वेगवेगळ्या मापदंडाची व्यवस्था करण्यात आलेली होती. मतदार होण्यासाठी मुसलमानाचं वार्षिक उत्पन्न ३

हजार रुपयांपेक्षा कमी असायला नको होतं तर त्याच अधिकारासाठी मुसलमानेतराचं उत्पन्न ३ लाखापेक्षा कमी असायला नको होतं. मुसलमान पदवीधराला मतदार होण्यासाठी पदवीनंतर दहा वर्षांनी मतदानाचा अधिकार मिळू शकत असे तर मुसलमानेतरास पदवीनंतर ३० वर्षांचा कालावधी आवश्यक करण्यात आला. परस्परांचे हितसंबंध नसलेल्या वेगवेगळ्या जातीजमातीच्या दहाबारा गटांना विधानसभेत प्रतिनिधित्व देऊन त्यांना एकसंघ होऊन कधीच काम करता येऊ नये अशा रीतीनं विधानसभेचं रूपांतर अजायबघरात करण्यात आलं.

परंतु असं दिसतं की नंतर काही कारणांनी तत्त्वज्ञ-मुत्सद्द सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांनी या विषयाचा पुनर्विचार केला. व्हाईसराय यांना २८ जानेवारी १९०९ला लिहिलेल्या पत्रात सावधगिरीची सूचना देत त्यांनी लिहिलं : *मुसलमानांचा जवळ करत असताना आपण हिंदुना दुर ढकलणार नाही याची काळजी घ्यायला हवी.* त्यामुळे मुसलमानांकडे ज्या प्रमाणात आपण जात आहोत वा जाऊ इच्छितो त्याप्रमाणात जाणं शक्य नाही. (तिरपी अक्षरं माझी) परंतु ब्रिटिशांच्या तत्कालीन धोरणांवर याचा प्रभाव कोणत्याही प्रकारे पडल्याचं आढळत नाही. सांप्रदायिक प्रतिनिधित्वाच्या कर्करोगाच्या जीवाणूंचं रोपण भारताच्या राजकीय शरीरात करण्यात आलं होतं व त्याचा प्रभाव कायम राहणार होता. फोडा आणि राज्य कराचे शिल्पकार, वेगळ्या शब्दात सांगायचं तर 'तो मी नव्हेच' असं म्हणत सर्व जबाबदारी टाळून सांप्रदायिकतेचा भस्मासूर आपलं कार्य कसं करतो ते पाहत आरामशीरपणे आपल्या खुर्चीत बसून म्हणू शकत होते :

*करू द्या खोडसाळपणा त्याला*

*जेवढा करायचा असेल तेवढा,*

*घेऊ द्या त्याला हवं ते वळण.*

तेव्हाच्या बंगालमध्ये (स्वातंत्र्यपूर्व संपूर्ण बंगाल) आसाम, बिहार आणि ओरिसाचा समावेश होता. ब्रिटिश सरकारनं औपचारिकपणे जाहीर केलं की अवाढव्य बंगालचं प्रशासनिक दृष्टीनं विभाजन करणं आवश्यक आहे. परंतु बंगालच्या लोकांना बंगाली भाषिकांच्या वाढत्या ऐक्यावर आणि अस्मितेवर जाणीवपूर्वक केलेला तो हल्ला आहे असं वाटलं. त्यांचा वाढता राजकीय प्रभाव कमी करण्यासाठी आणि भारतीयांत नुकताच उदयाला येऊ लागलेल्या राष्ट्रीय भावनेला आवर घालण्यासाठी तसंच भारताला सांप्रदायिक दृष्टीनं विभाजित करण्यासाठी मुसलमान भाषिकांचा वेगळा प्रांत तयार करायची ती दुष्ट चाल आहे असं बंगालला वाटलं. अधिकृतपणे करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात सांगण्यात आलं होतं की केवळ प्रशासनिक अडचणी दूर करण्यासाठी योजलेला तो उपाय आहे, परंतु त्यावर कोणाचाही विश्वास बसला नाही. फाळणीमागील त्यांचा हेतू केवळ तेवढाच असता तर सर्व बंगाली भाषिकांचा प्रदेश एकत्र ठेवून उरलेल्या प्रदेशाचा वेगळा प्रांत ब्रिटिशांना करता आला असता. परंतु तसं न केल्यामुळे बंगालच्या फाळणीमागे राजकीय हेतू होता हे स्पष्ट होतं.

अंतिम योजनेची तयारी, चर्चा आणि कार्यवाही इतक्या गुप्त रीतीनं करण्यात आली होती की, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या शब्दात, २० जुलैला जेव्हा 'फाळणीची योजना आमच्यावर येऊन कोसळली तेव्हा जनतेला आपल्यावर एखादा बॉम्ब पडल्यासारखं वाटलं... आम्हाला वाटलं की आम्हांला अपमानित करण्यात आलं आहे, आमचा पाणउतारा करण्यात आला आहे आणि आम्हांला मूर्ख बनवण्यात आलं आहे.... आमचं संपूर्ण भवितव्य पणाला लागलं आहे.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., टी. फिशर अनविन, लंडन, (१९१३)पृष्ठ ८३] लॉर्ड कर्झनच्या शासनानं जनमताबद्दल दाखवलेल्या पद्धतशीर अनास्थेमुळे आणि जनतेच्या निदर्शनांबद्दल दाखवलेल्या घृणाभावनेमुळे वाटायला लागलं की केवळ शाब्दिक विरोधाहून अधिक काही तरी करायची आवश्यकता आहे. याच भावनेनं ब्रिटिश मालाच्या बहिष्काराचं व स्वदेशीचं रूप धारण केलं.

७ ऑगस्ट १९०५ला कासिम बाजारचे महाराज मणिन्द्रचंद्र नंदी यांच्या अध्यक्षतेखालील जाहीर सभेत कोलकाता येथील टाऊन हॉलमध्ये बंगालचे नेते गोळा झाले. फाळणीचा व्यावहारिक निषेध म्हणून ब्रिटिश मालाचा बहिष्कार करायचा ठराव त्या सभेत पारित करण्यात आला. चीननेही अशाच प्रकारे अमेरिकन मालाचा बहिष्कार यशस्वीपणे केल्याचा दाखला त्यांच्यासमोर होता. परंतु थोड्याच दिवसात भारतीय उद्योगांच्या संरक्षणासाठी केलेल्या उपाययोजनेचं रूप त्या बहिष्कारानं घेतलं. बहिष्काराच्या व्यापक स्वरूपामुळे त्याला स्वदेशी आंदोलन म्हणून संबोधण्यात येऊ लागलं. स्वदेशीची संकल्पना हळूहळू विकसित होऊ लागली व अखेरीस राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक अवस्थेशी ती एकरूप झाली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी १९०६ साली लिहिलं : 'आम्ही सर्व बाबतीत स्वदेशी असायला हवं. आमचे विचार, आमच्या कल्पना, आमच्या आकांक्षा या सर्व स्वदेशी असायला हव्या. आमची शिक्षण पद्धती स्वदेशी असायला हवी तसंच आमचा विकासही स्वदेशी असायला हवा.' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ८३, पहा परिशिष्ट ज]

अशा रीतीनं देशातील नैतिक आणि सामाजिक सुधारणा, आध्यात्मिक उत्थान तसंच औद्योगिक, सांस्कृतिक व राजकीय पुनरुज्जीवन यांचा स्वदेशीच्या आंदोलनात अंतर्भाव झाला. तिचा पाया व्यापक केल्यामुळे फाळणीविरोधी आंदोलनाला केवळ राजकीय चळवळीचं स्वरूप न राहता गेल्या ५० वर्षात ऋषीमुनींनी आणि महापुरुषांनी आत्मत्याग करून जो आदर्श निर्माण केला होता त्या आदर्शाला अनुरूप असं उच्च स्वरूप स्वदेशी आंदोलनाला प्राप्त झालं. स्वदेशी उद्योगांची पुन्हा उभारणी करण्याकरिता काही तासांच्या अवधीतच ७०,००० रुपये गोळा झाले. बंगालची कापडाची गरज पुरवता यावी म्हणून कापडगिरणी विकत घेण्यासाठी नंतर अठरा लाखांचा निधी गोळा करण्यात आला. तिला 'बंगलक्ष्मी मिल' असं नाव देण्यात आलं. बंगालमधील स्त्रियांनी या कार्यासाठी जो उत्साह दाखवला होता त्या उत्साहामुळे हे नाव देण्यात आलं होतं. स्वदेशीचं आंदोलन शिगेला पोहोचलेलं असताना कोलकाता येथील एका महाविद्यालयातील देण्यात आलेल्या उत्तरपत्रिका परदेशी कागदाच्या असल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यावर उत्तरं लिहायला नकार दिला. त्यामुळे परीक्षा लांबणीवर टाकावी लागली आणि स्वदेशी

कागदाने बनलेल्या उत्तरपत्रिका पुरवाव्या लागल्या. एका नातलगानं आपल्या पाच वर्षांच्या नातीला भेट म्हणून पाठवलेले जोडे स्वदेशी नसल्यामुळे तिनं ते वापरायला कसा नकार दिला तसंच कोलकातातील एक सहा वर्षाची मुलगी एका प्रख्यात डॉक्टरकडून परदेशी औषध घेताना कशी ओक्साबोक्शी रडली याची हकीगत सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी सांगितली आहे.

१६ ऑक्टोबर १९०५ला बंगालची फाळणी झाली. तो दिवस शोक दिवस म्हणून बंगालच्या दोन्ही भागात पाळण्यात आला होता. लक्षावधींनी उपास करून घरात चूल पेटवली नाही. मोठ्या तसंच लहान शहरांमधे माणसं, स्त्रिया आणि मुलांच्या मोठमोठ्या मिरवणुका काढण्यात आल्या. शोकाचं प्रतीक म्हणून हाताला काळ्या फिती बांधून डोक्यावर काहीच न घालता राष्ट्रगीत म्हणत आणि आकाश ‘वंदे मातरम’च्या घोषणेनं दुमदुमवत लोक दिवसभर रस्त्यातून अनवाणी फिरत होते. ते नदीवरील घाटावर आणि पवित्र तळ्यांवर गोळा झाले, तिथं त्यांनी पवित्र आंघोळ केली आणि बंधुभाव व राष्ट्रीय ऐक्याचं प्रतीक म्हणून एकमेकांना राख्या बांधल्या. अशाच प्रकारच्या एका निवडणुकीचं नेतृत्व रवींद्रनाथ टागोर करत होते. यासाठी काही काळ ते आपल्या एकांतवासातून बाहेर आले आणि आंदोलनात राष्टकवी म्हणून सहभागी झाले. रवींद्रनाथांनीच आपल्या प्रतिभेनं रक्षाबंधनाच्या सणाचा राष्ट्रीय सण म्हणून पुरस्कार केला व बंगालच्या ऐक्याचं प्रतीक म्हणून त्या सणाचं महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवलं. त्यांनीच बंगालच्या कॅलेंडरमधे त्याचा अंतर्भाव करवला.

यामुळे अधिकारी दचकले. विद्यार्थी स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीचे प्रचारक बनले. त्यामुळे तरुण विद्यार्थ्यांच्या उत्साहावर पाणी ओतण्यासाठी राष्ट्रीय चळवळीत विद्यार्थ्यांनी भाग घेण्यावर बंदी आणणारा आदेश काढण्यात आला. जाहीर सभेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिक्षेची धमकी देण्यात आली. एवढंच नाही तर शाळा, कॉलेज व विद्यापीठातून काढून टाकायचीही धमकी त्यांना देण्यात आली. त्याचबरोबर शिक्षणसंस्था प्रमुखांना सांगण्यात आलं की त्यांनी जर आपल्या विद्यार्थ्यांना स्वदेशी आंदोलनासारख्या निंद्य प्रकारात भाग घेण्यापासून अडवलं नाही तर त्यांच्या संस्थांचं अनुदान जप्त करण्यात येईल

आणि संबंधित विद्यापीठांना त्यांची मान्यता रद्द करण्यासाठी सांगण्यात येईल. या परिपत्रकाचा सर्वत्र निषेध झाला. कोलकाता येथील स्टेट्समन या अँग्लोइंग्रजी वृत्तपत्राच्या संपादकानं लिहिलं : ह्या परिपत्रकाला लेफ्टनंट गव्हर्नरांनी कुणाच्या सल्ल्यानुसार मान्यता दिली हे आम्हाला जाणून घ्यायचं आहे. [सर वुइल्यम वेडरबर्न, *अॅलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ८३] परंतु अधिकाऱ्यांनी पूर्णपणे तोल गमावला होता. नंतर अशाच प्रकारचे अजूनही आदेश निघाले. त्यातील एकात सार्वजनिक ठिकाणी 'वंदे मातरम' म्हणणं बेकायदेशीर आहे असं ठरवण्यात आलं होतं.

राजकीय सभेतील विद्यार्थ्यांच्या भागावर घालण्यात आलेल्या बंदीमुळे शासकीय शाळा आणि महाविद्यालयांवर बहिष्कार घालण्यात येऊन राष्ट्रीय धोरणानुसार सार्वजनिक शाळा आणि महाविद्यालयं काढण्यात आली. केवळ पूर्व बंगालमध्येच २५ राष्ट्रीय शाळा उघडण्यात आल्या. कलकत्ता उच्चन्यायलयाचे न्यायाधीश आणि लॉर्ड कर्झन यांच्या विद्यापीठ आयोगाविरुद्ध मत देणारे श्री. गुरूदास बॅनर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली *'बंगाल कौंसिल ऑफ नॅशनल एज्युकेशनची'* स्थापना करण्यात आली आणि राष्ट्रीय महाविद्यालये व राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना करायचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी अरविंद घोष आंदोलनात खेचले गेले. अरविंदांचं शिक्षण इंग्लंडमध्ये झालं होतं. युरोपिअन क्लासिक्समध्ये केंब्रीजमधून पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर ते आय.ए.एस.च्या परीक्षेस बसले. त्यात ते उत्तीर्णही झाले परंतु घोडविद्येत प्रवीण नसल्यामुळे त्यांना अपात्र ठरवण्यात आलं. ते बडोद्याच्या महाराजांकडे ५०० पौंड पगारावर नोकरीवर होते. देशाची हाक आल्याबरोबर क्षणाचाही विचार न करता त्यांनी नोकरीचा त्याग केला आणि राष्ट्रीय महाविद्यालयात दरमहा १० पौंड पगारावर प्राचार्यपदाचा स्वीकार केला. त्यांनी आपल्याभोवती राष्ट्रीय वृत्तीच्या कडव्या तरुणांचा गट गोळा केला आणि भारतीय भाषांमधे तसंच इंग्रजी भाषेत विविध वृत्तपत्रे सुरू करण्यासाठी मदत केली. त्यापैकी संध्या आणि वंदे मातरम ही बंगालमधील क्रांतीची मुखपत्रं बनली. काहीच महिन्यात बंगालचा चेहरामोहरा बदलून गेला. अनेक राष्ट्रीय

शाळा काढण्यात आल्या आणि स्वयंसेवकांच्या संस्थांचं जाळं सर्वत्र पसरलं. त्यात विविध सभा, समित्या, आखाडे आणि आश्रम यांचा समावेश होता.

अशाप्रकारच्या कार्यासाठी आर्य समाज आणि रामकृष्ण मिशन यांच्या कार्यानं भूमी आधीच तयार झालेली होती. याच शतकाच्या सुरुवातीला हरिद्वार येथे शासनाच्या नियंत्रणापासून पूर्णपणे मुक्त असलेलं गुरुकुल स्थापण्यात आलं. रामकृष्ण मिशननं काढलेल्या अनेक शिक्षण संस्था आधीच अस्तित्वात होत्या. जनतेच्या सेवेसाठी इतकंच नाही तर स्वदेशीच्या पुनर्जीवनासाठी खाजगी संस्था आणि संघटना काढणं ही गोष्ट फाळणीविरोधी आंदोलनाच्या आधीच सार्वत्रिक झालेली होती.

कोलकातापासून सुरू झालेली स्वदेशी आणि बहिष्काराची चळवळ एखाद्या वणव्याप्रमाणे बंगालमध्ये सर्वत्र वेगात पसरली व पूर्व बंगालमध्ये तर तिनं कळस गाठला. बारीसाल जिल्ह्यात हे आंदोलन इतकं प्रभावी झालं होतं की सर्वत्र लोकप्रिय व जिल्ह्याचे अनभिषिक्त सम्राट असलेले शिक्षणतज्ज्ञ अश्विनिकुमार दत्त यांच्या परवानगीशिवाय त्या जिल्ह्यात कोणताही दुकानदार मँचेस्टरचं कापड विकायला तयार नव्हता. त्यामुळे पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांनासुद्धा शर्टासाठी मँचेस्टर येथे बनलेलं कापड मिळू शकलं नाही. दुसऱ्या एका प्रकरणी आपल्याला खाण्यासाठी मीठ विकायची दुकानदाराला परवानगी द्यावी अशी विनंती जिल्हाधिकाऱ्याला श्रीयुत दत्त यांच्याकडे करावी लागली. अश्विनीकुमारांना स्वदेशी मीठ जेव्हा मिळालं नाही तेव्हा ते अळणी जेवणसुद्धा जेवले. [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ७९-८०]

नुकत्याच निर्माण करण्यात आलेल्या पूर्व बंगाल प्रांताचे लेफ्टनंट गव्हर्नर सर बॅमफिल्ड फुलर यांना गोष्टी आता सीमेपलीकडे चाललेल्या आहेत असं वाटायला लागलं. आंदोलन दडपण्यासाठी त्यांनी बळाचा वापर करायचं ठरवलं. रक्तपात कदाचित आवश्यक असेल असं घोषित करून लॉर्ड कर्झनशी सल्लामसलत केल्यानंतर त्यांनी बारीसाल येथे १०० गुरख्यांची पलटण पाठवली. त्यानंतर स्थानिक नेत्यांनी शांततापूर्वक कायदेशीर बहिष्कारासंबंधीचं जे

परिपत्रक काढलं होतं ते त्यांना मागं घ्यायला भाग पाडलं. एप्रिल १९०६ साली बारीसाल येथे प्रांतिक परिषद झाली. त्या परिषदेसाठी प्रांतातील अनेक प्रमुख लोक उपस्थित राहणार होते. परंतु न्यायाधीशाच्या आदेशावरून जवळपास बंदुकीच्या धाकावर ती सभा उधळण्यात आली. तसंच ८०० ते ९०० प्रतिनिधींच्या मिरवणुकीवर लाठीमार करण्यात येऊन पोलिसांनी ती मिरवणूक उधळून लावली. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या अगदी डोळ्यांसमोर पोलिसांनी अनेकांची डोकी रक्तबंबाळ केली. सर बॅमफिल्ड फुलर यांनी 'आवडत्या बायकोचा सिद्धान्त' इथेच मांडला. नागरी सेवेच्या लोकांनी लेफ्टनंट गव्हर्नरची सूचना लक्षात घेतली. न्यायव्यवस्थासुद्धा दोषानं प्रभावित झाली. एका सत्र न्यायाधीशानं जाहीर केलं, 'माझ्यासमोरील साक्षीदारांची विभागणी हिंदू आणि मुसलमान या दोन वर्गात मी केली आणि एका वर्गाची साक्ष मी मान्य करत असे तर दुसऱ्या वर्गाची अमान्य' . अशा प्रकारचा चुकीचा निर्णय घेणाऱ्या न्यायाधीशावर उच्च न्यायालयानं कडक ताशेरे झाडले. [सर वुइल्यम वेडरबर्न, *अॅलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ५१-५२]

## ६

प्रत्येक सामाजिक आंदोलन आपल्या नेतृत्वाला जन्म देत असते. या नवीन आंदोलनाशी लाल-बाल-पाल यांची नावं जुळली गेली होती. पाल म्हणजे बंगालचे बिपिनचंद्र पाल, बाल म्हणजे महाराष्ट्राचे बाळ गंगाधर टिळक, आणि लाल म्हणजे पंजाबचे लाला लजपतराय. पाल हे या नवीन आंदोलनाचे भाष्यकार होते. लाल हे आंदोलनाच्या पौरुषाचे आणि धैर्याचे प्रतीक होते आणि बाळ हे त्या आंदोलनाच्या हृदयस्थानी होते. अरविंद घोष हे स्वतःच एक संस्था होते. ते त्या आंदोलनाचे तत्त्वज्ञ आणि धर्मगुरू बनले.

काँग्रेसचं जुनं नेतृत्व मुख्यतः वकीलवर्गातून निर्माण झालेलं होतं. त्यात तुरळक डॉक्टर, तंत्रज्ञ आणि घरंदाज जमीनदारांचा समावेश होता. इंग्रज लोक हे स्वभावानं न्यायी आणि चांगले आहेत, त्यांना जर योग्य माहिती देण्यात आली तर ते सत्य आणि न्यायापासून ढळणार नाहीत,

इंग्रजांची घटना ही स्वातंत्र्याचं संरक्षण करणारी आहे, ब्रिटिश संसद ही सर्व सांसदीय व्यवस्थेची माता आहे, इंग्रजी भाषा ही स्वातंत्र्याची भाषा आहे व तिचा उपयोग व प्रसार हे राष्ट्रीय हित साधायचं सर्वोच्च साधनं आहे अशी त्यांची मूलभूत धारणा होती. त्यांच्यातील एक शरण नायर यांनी घोषित केलं होतं की गुलामगिरीचं समर्थन इंग्रजी शिकलेला माणूस करूच शकत नाही. [अम्बिका चरण मझुमदार, *इंडियन नॅशनल इव्हॉल्युशन*, जी. ए. नटेसन अँड कंपनी, मद्रास, (१९१७), पृष्ठ ५२]

सत्तेचा वापर करून आपल्या शासनाला खतपाणी घालायच्या कामात ब्रिटिशही मागे नव्हते. जसजशी जहालमतवादी विचार परंपरा पसरू लागली तसतसे उघडपणे निष्ठा वाहायला तयार असणाऱ्या व कार्यक्षमतेसाठी प्रसिद्ध असलेल्या अतिउत्साही लोकांवर तसंच कठोर टीकाकारांवर बढती आणि पक्षपाती वर्तनाचा ब्रिटिश लोक वर्षाव करू लागले. काँग्रेसच्या लोकांशी भेदभावाची वर्तणूक करणे हा शासनातील बढतीचा राजमार्ग बनला, व्यक्तीचा लाभ व्हायचा पण काँँग्रेसची हानी. अशी घटना ज्या ज्या वेळी घडायची त्या त्या प्रत्येक वेळी राष्ट्रीय कार्याची हानी व्हायची. [सर वुइल्यम वेडरबर्न, *अॅलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ५३]

या गृहीतकामागील कारणपरंपरेला तरुण पिढी आव्हान द्यायची. त्यांचं म्हणणं होतं की काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी गेली बावीस वर्ष हा मार्ग चोखाळला आहे परंतु त्याचा काहीच फायदा झालेला नाही. इथं वा तिथं त्यांना थोडाबहुत विजय मिळाला असेल वा काही प्रमाणात माघार घ्यावी लागली असेल, परंतु एकूण चित्र पाहता वाटाण्याच्या अक्षताच आपल्या पदरी पडलेल्या आहेत. अपमान आणि अपयशाशिवाय या मार्गामुळे दुसरं काहीच मिळालेलं नाही. वादविवादातील कौशल्य, वक्तृत्व व युक्तिवाद या गुणांचा सर्व सामर्थ्यानिशी उपयोग केल्यानंतरही आपल्याला काहीच मिळालेलं नाही. आणि कमीतकमी एका प्रकरणी ब्रिटिश संसदेनं आपल्या बाजूनं निर्णय दिल्यानंतरही त्याला आवश्यक मान्यता न मिळाल्याने तो निर्णय कुचकामी ठरलेला आहे. त्यामुळे जुन्या पद्धतीला आणि नेतृत्वाला सोडून नवीन मार्ग चोखाळण्याची वेळ आलेली आहे, असं या तरुणांचं म्हणणं होतं. त्यामुळे काँग्रेसचं

लोकशाहीकरण करण्यात यावं व शक्तिकेंद्र विधानसभा आणि व्हाईटहॉल ऐवजी जनता असावी अशीही त्यांनी मागणी केली.

अरविंदांनी *वंदे मातरम* मध्ये लिहिलं : 'ग्रांथिक ज्ञान, वादविवादाची क्षमता, प्रश्नांचा परिश्रमपूर्वक अभ्यास, घरात निवांतपणे आरामात बसायची सवय आणि थोडाफार बाहेर केलेला प्रयत्न, शांतपणे आणि सवडीनुसार तयारी करायची प्रवृत्ती ह्यांचा या युगात व देशात काहीच उपयोग नाही. सर्व काही अर्पण करू शकतील; कोणत्याही प्रकारच्या फळाची, विसाव्याची, चैनीची अपेक्षा करणार नाहीत; केवळ आपल्या उदरनिर्वाहापुरतं घेऊन त्यावर समाधान मानतील अशा ध्येयनिष्ठ लोकांची या राष्ट्राच्या मुक्ततेसाठी आवश्यकता आहे.... ' [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ४७] भारताचं भवितव्य जनतेच्या हाती आहे, आजवर स्वतःलाच राष्ट्र समजत असलेल्या काही थोड्याशा वकिलांच्या वा इंग्रजी विद्याविभूषित पदवीधरांच्या हाती नाही. 'जनतेत ईश्वरी शक्तीचा वास असतो व तीच त्यांच्या भवितव्याची स्वामिनी असते.' [आर. पी. मसानी, *दादाभाई नौरोजी*: *द ग्रँड ओल्ड मॅन ऑफ इंडिया*, जॉर्ज ॲलन अँड अनविन लंडन, (१९३९), पृष्ठ ७४]

याचा अर्थ असा नाही की काँग्रेसच्या जुन्या जाणत्या नेतृत्वात देशभक्तीची, धैर्याची वा स्वातंत्र्यप्रेमाची उणीव होती. असं आपण समजलो तर परिस्थितीचं आकलन आपल्याला झालं नाही असं म्हणावं लागेल. ते आत्यंतिक अज्ञानाचंही लक्षण ठरेल. वा या दोन्हींचाही त्यात समावेश असू शकेल. याचा अर्थ असाही नाही की ते लोक सुस्त होते वा त्यांच्यात आवश्यक धैर्य नव्हतं. उदाहरणार्थ लॉर्ड कर्झन यांची व्हाईसरायपदी १९०४ साली दुसऱ्यांदा निवड झाली. तेव्हा त्यांच्या स्वागत समारोहासाठी भरवण्यात आलेल्या दरबारात उपस्थित राहायला फिरोजशहा मेहता यांनी नकार दिला. मुंबईच्या एका मित्रानं कर्झन यांच्या स्वागतासाठी एका भोजनाचं आयोजन केलं होतं. केवळ त्याच समारंभास फिरोजशहा मेहता हजर राहिले. त्या समारोहात फिरोजशहा मेहता हे कर्झनच्या अगदीच जवळ बसले होते परंतु त्यांनी कर्झनकडे ढुंकूनही पाहिलं नाही. असं सांगतात की फिरोजशहा मेहता यांच्या थंड व्यवहारानं शरमिंदे होऊन कर्झन

फिरोजशहा मेहतांकडे गेले आणि म्हणाले : तुम्ही माझ्याशी असे तुटकपणे का वागत आहात? मी असं काय केलं आहे की ज्यामुळे तुम्ही माझ्याकडे पाठ फिरवत आहात? असं काय घडलं?

'आपण ऑक्सफर्डपासूनचे जुने मित्र आहोत.' मेहता उत्तरले, 'तुम्ही व्हाईसराय म्हणून जेव्हा इथे आलात तेव्हा... मित्रत्वाच्या भावनेनं मी तुमच्याशी संपूर्ण सन्मानाने वागलो.... मी इंपेरिअल कौन्सिलचा सदस्य आहे या गोष्टीची ओळख दाखवायचीही तुमची तयारी नव्हती.... तुम्ही तुमच्या स्वीय सचिवाकडून मला उत्तर पाठवलं. तुम्हाला माझी किंमत नव्हती. मला तुम्हाला दाखवायचं आहे की मलाही तसंच वागता येऊ शकतं.' [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलटिक्स सिन्स म्युटिनी*, आंध्र युनिव्हर्सिटी, वाल्टेयर, (१९३७), पृ ३८] क्षमेचे शब्द पुटपुटत लॉर्ड कर्झन मेहतांपासून दूर झाले.

हे तेच फिरोजशहा मेहता होते की जे खुद्द राजाहूनही अधिक निष्ठावान होते. लॉर्ड लिटन यांनी लँकेशायरच्या मालाचा उठाव व्हावा म्हणून व्हाईटहॉलच्या दडपणामुळे महसूल कर रद्द केला असताना व्हाईसरायच्या कौंसिलवर शासनाकडून नामित सदस्यांनी स्वतंत्रपणे मतदान केलं होतं. तेव्हा त्यांना तसं करायचा अधिकार नाही असं म्हणून कायदेशीर आणि घटनात्मक पातळीवर फिरोजशहा मेहता यांनी जाहीरपणे त्याचा विरोध केला होता. [व्ही. स. श्रीनिवास शास्त्री, *लाईफ अँड टाईम्स ऑफ सर फिरोजशहा मेहता*, पृष्ठ २९] फिरोजशहा मेहता आणि त्यांच्या विचारांच्या मंडळींना जे पाश्चात्य शिक्षण मिळालं होतं व त्यातून जे जीवनविषयक तत्त्वज्ञान निर्माण झालं होतं त्यामुळे या मर्यादा निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या मनात निर्माण झालेली बंधनं इतर कोणत्याही बाह्य निर्बंधांपेक्षा अधिक व्यापक आणि सुदृढ होती. परिस्थितीची मागणी निर्माण झाली असता ते ती बंधनं झुगारून देऊ शकत होते व तशी त्यांनी ती वेळप्रसंगी झुगारलीही. परंतु ती बंधनं सुप्त मनाच्या गाभाऱ्यात शिरलेली असल्यानं सामान्य प्रसंगी ती झुगारणं त्यांना कठीण व्हायचं. इंग्रजी भाषेत गुलामगिरीची तरफदारी करणं अशक्य आहे असं शंकरन नायर यांनी कितीही ठासून सांगितलेलं असलं तरीही त्यांच्या इंग्रजी शिक्षणानंच त्यांची मानसिक भूमिका तयार झालेली होती व तिनं निर्माण केलेल्या मानसिक शृंखला काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना तोडणं शक्य

होत नव्हतं. ते आपल्या युगाच्या मर्यादांनी बद्ध होते. त्यांनी एक ऐतिहासिक भूमिका बजावलेली होती, परंतु नवयुगात ती भूमिका कालबाह्य झालेली होती.

ब्रिटिशांचं भारतावर राज्य असताना असा एक लहानसा काळ होता की जेव्हा भारतीयांच्या मनात ब्रिटिशांबद्दल निष्ठा व आदराची भावना निर्माण झालेली होती. परंतु आज त्या काळाचा भूतकाळात समावेश झालेला असताना दुरून ती गोष्ट समजावून घेणे कठीण होते. १८३३ साली ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापार बंद करण्यात येऊन १८३७ साली राणी व्हिक्टोरिया भारताच्या राजगादीवर बसेपर्यंतचा हा काळ होता. वॉरन हेस्टिंग्ज आणि वेलस्ली यांचा राज्य हस्तगत करण्याचा काळ संपलेला होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या बऱ्याच वर्षांच्या अनागोंदी साज्यकारभारापासून, दडपशाहीपासून आणि पिळवणुकीपासून भारतीयांची सुटका झालेली होती व भारतात स्थैर्य निर्माण होऊ लागलेलं होतं. जमिनीवरील शेतसाऱ्याचं ओझं कमी करण्यात आलं होतं आणि प्रशासनातील भारतीयांच्या सहभागाचं स्वागत करण्यात येत होतं. भारतात सुधारणा होण्यासाठी आवश्यक असलेलं व भारतीय ज्याची आतुरतेनं वाट पाहत होते ते पाश्च्यात्त्यांच्या धर्तीवरील इंग्रजी शिक्षण सुरू झालेलं होतं व त्यातील उणिवा अजून लोकांच्या लक्षात आलेल्या नव्हत्या. तरुण राणीनं आपल्या राज्यकारभाराची सुरुवात उदात्त घोषणा करून केली व त्यामुळे लोकांच्या आशा पल्लवित झाल्या. विद्वान आणि सहानुभूतिपूर्ण मन्रो, एलफिन्स्टन, बेंटिक यासारख्या अधिकाऱ्यांनी भारतीयांबद्दचं आपलं कर्तव्य पार पाडण्यावर इतर कोणत्याही बाबींचा विचार न करता भर दिला व एक आदर्श प्रस्थापित केला. मुंबईचे गव्हर्नर एलफिन्स्टनविषयी असं सांगतात की मराठ्यांशी झालेल्या युद्धाच्या वेळी एलफिन्स्टन यांच्या हाताखाली एकेकाळी काम करत असलेले कॉलनल ब्रिग्ज एलफिन्स्टन यांच्यां तंबूत गेले. तेव्हा त्या तंबूच्या एका कोपऱ्यात छापील मराठी पुस्तकांचा एक गठठा पडलेला त्यांना दिसला. 'ही पुस्तकं कशासाठी आहेत' म्हणून कॉलनल ब्रिग्ज यांनी विचारलं. 'नेटिव्हांना शिक्षण देण्यासाठी,' एलफिन्स्टन पुढं म्हणाले 'पण हाच मार्ग आपला युरोपला परत जायचाही मार्ग आहे.' यावर कॉलनल ब्रिग्ज यांनी विचारलं, 'मुंबईच्या गव्हर्नरपदी असताना तुम्ही

असं कसं करू शकता?' एलफिन्स्टन यांनी प्रत्युत्तर दिलं, 'कोणत्याही परिस्थितीत या लोकांबद्दलचं आपलं कर्तव्य पार पाडणं आपल्याला भाग आहे.'

हा काळ ज्यांनी पाहिलेला होता त्यांच्या मनात त्या काळाची पुसटशी का होईना 'रंगाळणारी वैभवशाली चित्रे' कायम होती. आर. सी. दत्त यांनी लिहिलं : 'राणीचं १८३७ साली जेव्हा राज्यारोहण झालं तेव्हा जे लोक शाळेत आणि महाविद्यालयात होते त्यांच्याबरोबर माझी वाढ झाली आहे. इंग्रजी वाङ्मय, इंग्रजांचे विचार, इंग्रजांचं चरित्र याबद्दल त्या लोकांच्या मनात इतका आदर होता की ब्रिटिशांबद्दलची त्यांची निष्ठा कोणत्याच गोष्टीमुळे कमी होऊ शकत नव्हती. ही गोष्ट त्यांच्या रोजच्या बोलण्यातून स्पष्ट होत होती असं जर मी म्हणालो तर त्यात अगदीच अतिशयोक्ती होणार नाही. त्यांना अजूनही बेंटिक, एलफिन्स्टन आणि मन्रोचा काळ आठवत असतो. त्यांनी मेकॉले, ट्रेव्हलीन आणि मेटकाफला पाहिलेलं आहे. त्यामुळे इंग्रजांच्या सत्यवादितेवर त्यांचा विश्वास आणि श्रद्धा आहे.' [स्वत: ह्यूमच्या वडिलांनी म्हणजे जोसेफ ह्यूम ह्यांनी रॅाटन बरो ऑफ वेमाऊथ यांच्या ताब्यात असलेल्या दोन जागा १९०८ साली विकत घेतल्या होत्या - सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम.* सी. बी., पृष्ठ ४]

ज्यांचं शिक्षण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात झालं त्यानंतरच्या पिढीसाठी ही गोष्ट वेगळी होती. इल्बर्ट बिलावर झालेलं आंदोलन, लॉर्ड लिटनची प्रतिगामी राजवट, बंगालची फाळणी करणारी लॉर्ड कर्झनची दडपशाही यासंबंधीच्या त्यांच्या आठवणी होत्या.

काँग्रेसच्या पहिल्या पिढीच्या नेत्यांनी भारतातील ब्रिटिशाच्या राज्याचा स्वीकार ईश्वरी वरदानासारखा केला. 'इंग्लंड आणि भारताचं एकत्र येणं हे ईश्वरी शक्तीनं दिलेलं वरदान आहे' हे फिरोजशहा मेहता यांचे शब्द हीच गोष्ट दर्शवतात. [सर वुइल्यम वेडरबर्न, *ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ७५] रानडे यांच्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानातून हीच श्रद्धा अभिव्यक्त होते. काँग्रेसच्या या नेत्यांसाठी ब्रिटिशांचं राज्य शांतता, स्थैर्य आणि प्रगती यांसाठी पोषक होतं. ते ज्या प्रशासनिक सुधारणांसाठी वा तक्रारी दूर करण्यासाठी संघर्ष करत होते तो सर्व संघर्ष ब्रिटिश राज्याच्या चौकटीच्या आतील होता. ब्रिटिश प्रशासनांतर्गत आपली नैतिक प्रगती होईल अशी त्यांची

मूलभूत धारणा होती. १९०२ साली अहमदाबाद काँग्रेसमधे अध्यक्षीय भाषणातून सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी जाहीर केलं : 'ब्रिटिश राज्य भारतात कायम राहावं अशी आम्ही प्रार्थना करतो.' एवढंच नाही तर १९०१ साली शिवाजी उत्सवाच्या प्रसंगी बिपिन चंन्द्र पालही त्या काळातील भावना अभिव्यक्त करत म्हणाले होते की आपल्या सर्वोच्च ध्येयाची प्राप्ती साम्राज्याच्या सर्वोच्च ध्येयाशी विसंगत असायची आवश्यकता नाही. 'अनेक बाबतीत आम्हांला आमच्या न्याय्य वारसा हक्कापासून वंचित करण्यात आलेलं असलं तरी महोदय आम्हीही ब्रिटिश साम्राज्याची मुलं आहोत व त्यामुळे त्याच्या उच्चतर आणि शुद्धतम ध्येयाशी एकनिष्ठ आहोत. आणि आम्ही एकनिष्ठ आहोत कारण आमच्या देशाच्या इतिहासातील ईश्वरी योजनेवर आमचा विश्वास आहे.' [अम्बिका चरण मझुमदार, *इंडियन नॅशनल इव्हॉल्युशन*, पृष्ठ ८०]

परंतु स्वदेशी आंदोलनानं काही काळातच या सर्व गोष्टीत बदल घडवून आणला. भारतातील ब्रिटिश साम्राज्याची सर्वोच्चता हा ईश्वरी संकेत आहे अशी जी श्रद्धा अंतःकरणात खोलवर रुजलेली होती तिला तडा गेला आणि तिची जागा नवीन घोषणेनं घेतली : 'स्वातंत्र्य हा देशाचा श्वास आहे; सामाजिक सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, औद्योगिक विकास वा जनतेची नैतिक प्रगती राजकीय सुधारणेशिवाय होईल अशी अपेक्षा करणं व्यर्थ आहे आणि ते फार मोठ्या अज्ञानाचं लक्षण आहे.' [अम्बिका चरण मझुमदार, *इंडियन नॅशनल इव्हॉल्युशन*, पृष्ठ ८०] १९०७ साली भारतातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेत लॉर्ड मन्रो यांनी लिहिलं : 'जुन्या परंपरांवर मात करणारी आणि नवीन जाणिवेनं युक्त अशी पौर्वात्य जगात जागृतीची जी लाट आलेली आहे तिच्याकडे भारत सरकारनं दुर्लक्ष केल्यास भारत सरकारच्या आंधळेपणाचंच ते लक्षण ठरेल.' [उदारणासाठी पाहा बी. पट्टाभी सीतारामैय्या, *द हिस्ट्री ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस*, खंड पृष्ठ ३२-३३]

उद्दिष्टात जसजसा बदल होत गेला तसतसा त्याच्याशी सुसंगत असा पद्धतीतही बदल होत गेला. आतापर्यंतच्या काँग्रेसच्या धोरणातील 'निवेदन, प्रार्थना आणि तक्रारी' यांच्या स्वरूपातील 'याचक वृत्तीची' जागा नवीन पक्षाच्या 'शांततामय प्रतिकारा'च्या धोरणानं घेतली. वंदे मातरम या नवीन संप्रदायाच्या मुखपत्रानं लिहिलं, 'ज्यामुळे ब्रिटिश व्यापाराला देशाची पिळवणूक करणं शक्य होईल अथवा ब्रिटिश अधिकाऱ्यांना प्रशासन करणं शक्य होईल अशी

कोणतीही गोष्ट करायला नकार देणं हे शांततामय प्रतिकाराचं पहिलं तत्त्व आहे.... या वृत्तीचा एका शब्दात समावेश झाला आहे आणि तो शब्द आहे 'बहिष्कार'. [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलटिक्स सिन्स म्युटिनी*, पृष्ठ १४] अशा रीतीनं शुद्ध आर्थिक शस्त्र असलेल्या बहिष्काराला सरकारशी असहकार करायच्या चतु:सूत्रीचं स्वरूप आलं - आर्थिक बहिष्कार, शैक्षणिक बहिष्कार, न्यायालयांवरील बहिष्कार व त्याचबरोबर प्रशासनाशी बहिष्कार.'

कायदा तोडणं अपरिहार्य होईपर्यंत 'शांततामय असहकार' आंदोलन कायद्याच्या चौकटीत ठेवणं आवश्यक होतं. स्वातंत्र्यप्रप्तीच्या ध्येयासाठी आपल्याला कायद्याच्या चौकटीत काम करणं जर अशक्य झालं तर मग कायदा तोडायची तयारी ठेवणं आवश्यक होईल 'व कायदा तोडल्यामुळे जी काही शिक्षा करण्यात येईल ती सहन करून इतर देशांमध्ये करण्यात आलं त्याप्रमाणे प्रशासनाला काम न करू देणं अपरिहार्य होईल.' [त्यानुार विधान परिषदेच्या सदस्यांची संख्या काही प्रमाणात वाढवायची तरतूद करण्यात आली व काह विशिष्ट सार्वजनिक संघटनांच्या शिफारसींच्या आधारावर प्रांतीय सभेवर काही नियुक्त सदस्य नेमायची व्यवस्था करण्यात आली व त्यापैकी चार सदस्य केंद्रीय विधान परिषदेत उपस्थित राहण्यासाठी निवडण्यात यावयाचे होते. सविस्तर नियम करताना निवडणुकीच्या तत्त्वाला मान्यता देण्या आली नाही. पुरवणी प्रश्न विचारायचा अधिकार न देता प्रश्न विचारायचा अधिकार देण्यात आला. परिषदेला अर्थसंकल्पाची सर्वसाधारण चर्चा करायचा अधिकार होता परंतु खर्चात कपात सुचवायचा अधिकार नव्हता.] यामागील कारणं स्पष्ट करत वंदे मातरमनं लिहिलं : 'आपण सदैव लक्षात ठेवलं पाहिजे की या देशातील परकीय सत्तेचा निरंकुशपणा आपल्या लोकांच्या सहकार्यावर अवलंबून आहे. ते सहकार्य काढून घ्या आणि लगेच पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे नोकरशाहीची निरंकुशता कोसळून पडेल.' [ॲनी बेझंट, *हाऊ इंडिया रॉट फॉर फ्रीडम*, (१९१५), पृष्ठ १६६]

नवीन पक्ष जुन्या पक्षाला 'मवाळ' म्हणत असे व त्या पक्षातील लोक स्वतःला 'जहाल' म्हणून संबोधत असत. अनेकदा काँग्रेसच्या जुन्या ज्येष्ठ पुढाऱ्यांशी ते अपमानास्पद पद्धतीनं आणि उद्धटपणानं वागत असत. राजकीय रणांगणात आडदांडपणाची एक नवीनच पद्धत त्यांनी सुरू केली.

जहाल शांततामय प्रतिकाराचा पुरस्कार करत असतानाच त्यांच्यातील असंतुष्ट वर्गानं बॉम्ब आणि बंदुकांच्या भाषेत विचार करायला सुरुवात केली. अशा रीतीनं जहालांमधे हिंसा

आणि अतिरेकी मार्गाचा पुरस्कार करणाऱ्या वर्गाचा पक्ष निर्माण होऊ लागला. *युगांतर* हे या क्रांतिकारक पक्षाचं मुखपत्र झालं. भारतातील ब्रिटिश सत्ता बळावर आणि फसवणुकीवर आधारलेली आहे असं क्रांतिकारकांचं म्हणणं होतं. त्यामुळे अशा सरकारविरुद्ध बळाचा आणि फसवणुकीचा अवलंब करण्यात काहीही चूक नाही. [वसाहत कायद्याद्वारे (कॉलनाईझेशन ॲक्ट), लोकांवर चेनाब कालव्याच्या भागात वसाहत करण्याविषयी निर्बंध घालण्यात आले होते व मोर्ले यांना ती गोष्ट संपूर्ण विश्वासघाताची असल्याप्रमाणे वाटत हतं. मोर्ले यांनी वसाहत मंत्री लॉर्ड मिंटो यांना लोकांमधे टीकेचा विषय झालेल्या या कायद्याविषयी (कॉलनाईझेशन ॲक्ट) लिहिलं, 'जे चूक आहे हे आपल्याला माहीत आहे त्याला मान्यता द्यायचं नाकारणं याचा अर्थ आंदोलनासमोर शरणागती पत्करणं होईल व ती गोष्ट आपल्या दुबळेपणाची निदर्शक होईल.' (एडवर्ड थॉप्सन अँड जी.टी. गॅरेट), *राईज अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश रूल इन इंडियामधे* उद्धृत लॉर्ड मिंटो यांचं लॉर्ड मोर्ले यांना पत्र पृष्ठ ५८०] व त्या सरकारला जो कोणी मदत करील वा त्या सरकारला हटवायच्या कामात आडकाठी निर्माण करील त्याला वाटेतून दूर करण्यात काहीच वावगं नाही असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी युद्ध घोषित केलेलं होतं. त्यामुळे युद्धासाठी आवश्यक साधनसाहित्य मिळवण्यासाठी सरकारी खजिना लुटणं, लोकांवर कर लावणं व जे लोक आपली संपत्ती स्वेच्छेनं देणार नाहीत त्यांच्याकडून ती बळजबरीनं घेणं न्याय्य आहे असं ते म्हणायचे. [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलटिक्स सिन्स म्युटिनी*, पृष्ठ २८]

बनारस येथे गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली एकविसाव्या काँग्रेसचं अधिवेशन भरलं तेव्हा मवाळ आणि जहाल यांच्यातील मतभेद शिगेला पोहोचले. परंतु बंगालमधील बहिष्काराच्या आंदोलनाला पाठिंबा देऊन आणि इतर भागातील बहिष्कारासंबंधी मौन बाळगणारा तडजोडीचा ठराव मान्य करण्यात येऊन या परिस्थितीतून मार्ग काढण्यात आला. [*मेकॉले हाऊस ऑफ कॉमन्समधे*, जुलै १०, १८३३] काँग्रेसच्या छावणीतच काँग्रेसच्या तरुण वर्गानं आपली भविष्याची योजना आखण्यासाठी सभा घेतली. याच वेळी टिळकांनी त्यांच्यासमोर शांततामय प्रतिकाराचा विचार मांडला.

पुढील वर्षी मतभेद अजूनच तीव्र झाले. परंतु यावेळीही दोन्ही वर्गांच्या आदराला पात्र असलेले दादाभाई नौरोजी यांना इंग्लंडमधून बोलावून त्यांना कोलकाता येथे भरणाऱ्या काँग्रेसचं अध्यक्ष करण्यात आलं व त्यांच्या आधारानं मार्ग काढण्यात आला. एक्याऐंशी वर्षांचे पितामह दादाभाई नौरोजी परिस्थितीला साजेसे वागले आणि काँग्रेसच्या व्यासपीठावरून प्रथमच 'इंग्लंड

वा त्याच्या वसाहतीत असलेल्या शासनाप्रमाणे स्वयंशासनाची वा स्वराज्याची घोषणा करण्यात आली.’ हे उद्दिष्ट साध्य करायचं धोरण हे काँग्रेसचं ध्येय आहे असा ठराव थोड्याशा दुरुस्तीनंतर करण्यात आला. [वाल्डिमिर हाल्पेरीन, लॉर्ड मिल्नर अँड एम्पायर, ओधाम्स प्रेस लि., लंडन, (१९५२), पृष्ठ ३७ (तिरपी अक्षरं माझी)] दादाभाई नौरोजी यांच्या नेतृत्वाखाली स्पष्ट शब्दात बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य यांच्या बाबतीतील प्रस्ताव मंजूर करण्यात आला. अशा रीतीनं काँग्रेसच्या त्रिसूत्री कार्यक्रमात स्वराज्याची भर पडली. फाळणी रद्द करण्यासंबंधीचा विषय या संघर्षात मागं पडला आणि त्याची जागा स्वराज्याच्या व्यापक विषयानं घेतली.

१९०७ साल हे बहिष्कार, स्वदेशी आणि राष्ट्रीय शिक्षण यांच्या उत्साही अमलबजावणीचं होतं. मध्यंतरीच्या काळात सर बामफिल्ड फुलर यांनी राजिनामा दिला. मुसलमानांना जवळ करायच्या त्यांच्या धोरणाला राबवायचं काम त्यांच्यानंतर आलेल्या अधिकाऱ्यांनीही कायम ठेवलं. मुसलमानांच्या पुंडाईला प्रोत्साहन देण्यात येऊ लागलं आणि अराजक आणि आतंकवादी प्रवृत्तींना पूर्व बंगालच नाही तर संपूर्ण भारतात मोकळं रान सोडण्यात आलं. जुने जाणते पत्रकार सी. वाय. चिंतामणी यांनी नोंदवलं आहे की ‘सरकारनं हिंदूंना लुटायची आम्हाला सूट दिलेली आहे असं डंक्याच्या चोटीवर काही मुसलमान घोषित करत होते’; दुसरीकडे मुसलमान एका न्यायाधीशाच्या आधारे जाहीरपणे सांगत होते की सरकारनं मुसलमानांना हिंदू विधवांशी निका लावून विवाह करायची परवानगी दिलेली आहे’. पूर्व बंगालमधील मुसलमानांमध्ये एक लाल पुस्तिका अतिशय प्रचलित होती व त्या पुस्तिकेतील मजकूर इतका आक्षेपार्ह होता की तो इथं उद्धृत न करणंच माझ्यासाठी उचित होईल.’ [फिलिप वुडरॉफ, *द मेन हू रूल्ड इंडिया*, द गार्डियन्स, पृष्ठ १९०]

उत्तरेकडे पंजाब वादळाचं केंद्र बनलं. सरकारला सैनिक पुरवणाऱ्या लोकांच्या वसाहतीच्या हक्कावर गदा आणणारा कायदा वसाहतीचा कायदा म्हणून ओळखला जायचा. लोकांमध्ये अप्रिय असणाऱ्या सरकारच्या या उपाययोजनांमुळे लाला लजपतराय व सरदार अजित सिंग यांना १८१८च्या बंगाल अधिनियमानुसार कोणत्याही प्रकारच्या सुनावणीशिवाय हद्दपार करण्यात आलं. लजपतराय हे सैनिकांच्या निष्ठेत ढवळाढवळ करायचा प्रयत्न करत

आहेत असं त्यासाठी कारण देण्यात आलं. रावळपिंडी येथे सन्माननीय लोकांवर सरसहा खटले चालवण्यात येत होते व देशद्रोहाचा कायदा घोषित करण्यात आलेला होता.

संपूर्ण देश जणू काय भट्टीत होरपोळत होता. दडपशाहीमुळे वैतागलेल्या काही राष्ट्रवाद्यांनी जाहीर केलं की 'बळाचा विरोध बळानं' करायला पाहिजे. प्रस्थापित जुलुमशाहीचा प्रतिकार करण्याकरिता त्यांनी त्यासाठी गनिमी युद्धाची तयारी सुरू केली. अरविंदांचे भाऊ बरिन्द्रकुमार घोष, आणि स्वामी विवेकानंदांचे भाऊ भूपेन्द्रनाथ दत्त हे या संप्रदायाचे प्रसारक झाले. १९०८ साली बंगालचे राज्यपाल सर अँड्र्यु फ्रेजर आणि बंगालची फाळणी करण्यात पुढाकार घेणारे अजून एक गृहस्थ ज्या आगगाडीत बसले होते त्या आगगाडीला उडवून द्यायचा प्रयत्न करण्यात आला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली मिदनापूर येथे भरणारी एक राजकीय सभा क्रांतिकारकांशी संबंधित असलेल्या काही लोकांनी उधळून लावायचा प्रयत्न केला.

१९०७ साली डिसेंबरमधे जेव्हा काँग्रेस भरली तेव्हा दोन गटातील मतभेद मिटण्याच्या पलीकडे गेले होते. जहालांना भीती वाटत होती की काँग्रेसच्या अधिवेशनात मवाळ बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यावरील ठराव मांडायची परवानगी देणार नाहीत. दुसरीकडे मवाळांना भीती वाटत होती की जहाल बंगाल सोडून इतर प्रांतांवरही बहिष्काराचा कार्यक्रम लादायचा प्रयत्न करतील आणि आपल्या विचारप्रणालीला पाठिंबा देणाऱ्या प्रतिनिधींची काँग्रेसच्या अधिवेशनात गर्दी करून काँग्रेसवर 'वर्चस्व गाजवतील'. प्रत्येक वर्गाला दुसऱ्या वर्गाच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय वाटत होता. पहिल्या दिवशी टिळकांनी प्रतिनिधींसमोर बोलू द्यायची जेव्हा परवानगी मागितली व अध्यक्षांनी ती नाकारली तेव्हा गोंधळाला सुरुवात झाली. दोन्हीही वर्ग आवश्यकता पडल्यास बळाचा वापर करून आपली ताकद दाखवून द्यायच्या तयारीनं आले होते. युक्तिवाद आणि सामंजस्याच्या मार्गाला अपयश आल्यानंतर अन्यायाचा प्रतिकार करायचा त्यावेळी तो एकच मार्ग माहीत होता. तेवढ्यात लाल रंगाचा, नाला बसवलेला एक टोकदार मराठी जोडा सुरेन्द्रनाथ बॅनर्जींच्या दिशेनं भिरकावण्यात आला. तो त्यांच्या हनुवटीला लागून सर फिरोजशहा

मेहता यांच्या अंगावर जाऊन आदळला. गोंधळ माजला आणि त्यातच काँग्रेसच्या अधिवेशनाचा शेवट झाला.

पाँदिचेरीच्या आश्रमात गेल्यानंतर अरविंदांनी त्यासंबंधी लिहिलं :

फार कमी लोकांना हे माहीत आहे की काँग्रेसचं ते अधिवेशन मोडायचा हुकूम देणारा मी होतो (टिळकांचा सल्ला न घेता) आणि मवाळांच्या अधिवेशनात सहभागी न व्हायचा निर्णय घेण्यासाठी जबाबदार असणाराही मीच होतो. सुरत अधिवेशनात याच दोन महत्त्वाच्या घटना घडल्या होत्या. [लॉर्ड कर्झन यांचं भारत मंत्र्यांना पत्र, नोव्हेंबर १८, १९००]

**७**

सुरत येथे पडलेल्या फुटीमुळे राष्ट्रवाद्यांच्या पक्षात फूट पडली आणि नवजात पक्षानं अहिंसक प्रतिकाराच्या कार्यक्रमाची घोषणा केली परंतु त्यांना बळाचंही वावडं नव्हतं. काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीचा फायदा घेऊन सरकारनं आघात केला. दडपशाहीच्या नवीन उपाययोजनेची घोषणा करण्यात आली. वृत्तपत्र कायदा (१९०८), देशद्रोहाच्या सभासंबंधीचा कायदा, स्फोटकांविषयीचा कायदा (१९०८) आणि दोन वर्षांनंतर लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा दंडसंहिता दुरुस्ती कायदा इत्यादी कायद्यांचा दडपशाही करणाऱ्या उपाययोजनेत समावेश होता. वृत्तपत्रांवरील खटले ही दैनंदिन बाब झाली होती. युगांतर, संध्या आणि वंदे मातरमवर बंदी घालण्यात आली. देशद्रोहासाठी पाच वर्षांची शिक्षा ही नित्याची गोष्ट झाली होती. काही महिन्यांच्या आतच जवळपास सर्व नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आलं. १५ जुलै १९०८ला बाळ गंगाधर टिळकांना देशद्रोहाचा प्रचार करण्यासाठी पाच दिवसांच्या सुनावणीनंतर सहा वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. शिक्षा सुनावणीच्या आधी न्यायाधीशांनी तुम्हांला काही सांगायचं आहे काय असं विचारलं असता त्यांनी पुढील ऐतिहासिक वक्तव्य दिलं:

*‘माणसाच्या आणि राष्ट्रांच्या भवितव्यतेवर राज्य करणारी अजून एक उच्च सत्ता आहे व नियतीची कदाचित अशी इच्छा असेल की ज्या ध्येयासाठी मी झटतो आहे त्याची परिपूर्ती मी*

*मुक्त असण्यापेक्षा माझ्या यातनामय जीवनानं व्हावी.'* मंडाले येथे बदली करण्यात आल्यानंतर गीतेवरील प्रसिद्ध भाष्य गीतारहस्य हा ग्रंथ लिहून त्यांनी आपल्या शिक्षेच्या काळाचा उपयोग केला.

अरविंद घोष यांच्यावर सम्राटांच्याविरुद्ध युद्ध छेडायचा आरोप ठेवण्यात आला परंतु पुराव्याच्या अभावी त्यांना सोडून देण्यात आलं. तीन खटल्यांना तोंड दिल्यानंतर व अनेक संकटातून गेल्यानंतर त्यांनी ब्रिटिश प्रदेश सोडला आणि ब्रिटिश साम्राज्यानं वेढलेल्या फ्रान्सच्या वसाहतीतील पाँदिचेरी येथे वास्तव्य केलं. बी. सी. पाल यांना सहा महिन्यांची, चेन्नई येथील वकील चिदंबरन पिल्ले यांना सहा वर्षांची आणि उत्तर प्रदेशातील मुसलमान नेते हसरत मोहानी यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. डिसेंबर १९०८ मध्ये बंगालमधील नऊ नेत्यांना पकडण्यात येऊन कोणत्याही आरोपाशिवाय आणि सुनावणीशिवाय त्यांना हद्दपार करण्यात आलं.

या उपाययोजनेमुळे 'देशद्रोहाच्या' चळवळीत भाग घेणारे लोक भूमिगत झाले. आतंकवाद्यांच्या कामात थोडा अडसर निर्माण झाला. गंभीरपणे घेतलेल्या शपथेनं एकमेकांशी बांधिलकी असलेल्या आणि देशासाठी आपले प्राण अर्पायला तयार असलेल्या क्रांतिकारी राष्ट्रभक्त तरुणांच्या गुप्त संघटनेचं एक जाळंच बंगाल आणि देशातील इतर भागात पसरलं. एप्रिल ३०, १९०८ला बॉम्बचा पहिला स्फोट झाला. अनेक देशभक्तांना कठोर शिक्षा सुनावणारे कोलकाता येथील मुख्य न्यायाधीश श्रीयुत किंग्जफोर्ड यांच्या वधासाठी त्या बॉम्बचा स्फोट करण्यात आला होता, परंतु नामसाम्यामुळे गफलत झाली. कुमारी केनेडी आणि श्रीमती केनेडी यांचा त्यामुळे खून झाला. त्या प्रकरणात गुंतलेल्या दोन लोकांपैकी खुदीराम बोस यांना फासावर चढवण्यात आलं व पकडलं जात असताना दुसऱ्यानं स्वतःवर गोळी झाडून घेतली. दैवदुर्विलास असा की भारतीय विद्यापीठातून पदवीधर झालेले श्रीयुत प्रिंगल केनेडी हे काँग्रेसच्या कार्यात सहभागी झालेल्या मोजक्या इंग्रजांपैकी होते. क्रांतिकारकांच्या हातून अनेक अधिकाऱ्यांना मरण पत्करावं लागलं. बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर आणि बंगालच्या फाळणीचे एक

जनक सर अँड्र्यू फ्रेजर यांचा खून करायचे कमीतकमी तीन प्रयत्न झाले. त्यातील एक प्रयत्न ते बसलेले गाडी उडवून द्यायचा होता. अहमदाबाद येथे व्हाईसराय लॉर्ड मिंटो यांचा खून करायचा प्रयत्न झाला. भारत मंत्री लॉर्ड मोर्ले यांचे राजकीय सचिव असलेले सर वायली कर्झन यांचा अमृतसर येथील मदनलाल धिंग्रा या पंजाबी तरुणानं लंडनमध्ये खून केला. धिंग्रांला फासावर चढवण्यात आलं. नाशिक येथे जिल्हाधीशाचा खून करण्यात आला. या प्रकरणाचा शेवट व्हायच्या आधी १९०६ ते १९१६च्या दरम्यान बंगालमध्ये ८२ लोकांनी आपला जीव गमावला आणि १२२ लोक जखमी झाले.

अतिरेक्यांच्या गुप्त आणि निष्ठापूर्ण कृत्याचा दुहेरी परिणाम झाला. अशा प्रकारच्या आव्हानाचा कसा प्रतिकार करायचा ते सरकारला माहीत होतं. अतिरेक्यांच्या कारवाईला आळा घालण्यासाठी सरकारनं गुप्तहेरांचं जाळं पसरवलं आणि चिथावणी देणाऱ्या पगारी दलालांची नेमणूक केली. चेन्नई येथे १९०८ साली भरलेल्या काँग्रेसच्या तंबूत साध्या पोषाखातील १०० हेर होते आणि त्याशिवाय २१ हेर रीतसर ओळख देऊन तिथं हजर होते. जो कोणी सार्वजनिक जीवनात असेल तो कोणीही असला तरी त्याच्यावर पाळत ठेवण्यात येत असे. त्याच्या डाकेची पडताळणी करण्यात येत असे व त्याचा पत्रव्यवहार मधेच उघडला जायचा. कोणालाही मोकळेपणे बोलायचा वा श्वास घ्यायचा धीर होत नव्हता. संशय आणि अविश्वासाच्या धुरानं भरलेल्या वातावरणात जीव गुदमरत होता. लोक स्वतःच्याच सावलीला घाबरत होते. कोण काय आहे हे कुणालाही माहीत नसायचं. प्रत्येक नवख्या माणसाकडे सरकारी हेर म्हणून पाहिलं जायचं. लाला लजपतराय यांना या गुप्त हेरांनी इतकं छळलं की काही काळ त्यांना अमेरिकेत आसरा घ्यावा लागला.

याहूनही वाईट अवस्था क्रांतिकारकांची झालेली होती. त्यांचं मनोधैर्य अगदी खचलेलं होतं. भूमिगत चळवळीशी जुळलेली गटबाजी, भांडणं आणि परस्परांवरील संशय त्यांच्यातही होते. यामुळे अनेकदा त्यांचे परस्परांवर हिंसक हल्ले व्हायचे. कमीत कमी एकाहून अधिक सहकाऱ्यांना आपल्या सहकाऱ्याच्याच हातून मरण आलेलं आहे. देशात गुदमरवणारं वातावरण

भरलेलं होतं. 'सुरक्षितपणे निंदानालस्ती' करायच्या कौशल्याबद्दल सामाजिक कार्यकर्त्यांना गर्व वाटायचा. गुप्तता, वेषांतर, द्व्यर्थी भाषा, पळवाट आणि युक्त्याप्रयुक्त्या या गोष्टी राजकारणी लोकांसाठी आवश्यक बाबी झाल्या होत्या.

१९०९ साली मोर्ले-मिंटो यांच्या सुधारणांचा अंतर्भाव करणारा भारतीय परिषद कायदा मजूर करण्यात आला. परंतु निराश झालेल्या भारतीय मनाला या सुधारणांबद्दल काहीच उत्साह वाटत नव्हता. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या शब्दात 'या सुधारणांतील निम्मे गुण लोपलेले होते व उदात्तता तर त्यात अगदीच उरलेली नव्हती.' एक वर्षापूर्वी लॉर्ड मोर्ले यांनी पाठवलेल्या अहवालामुळे ज्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या त्यातील फार कमी अपेक्षांची परिपूर्ती या विधेयकानं केलेली होती. आणि जेव्हा या कायद्यासाठी नियम-पोटनियम करण्यात आले तेव्हा तर या विधायकाची उपयोगिता अजूनच कमी झाली. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलं आहे की 'त्यांना (मोर्ले-मिंटो सुधारणांना) फारसा अर्थ आहे अशा भ्रमात भारतात कुणीही नव्हतं. त्यामुळे शासकीय सदस्य सोडून इतर सदस्यांना सार्वजनिक समस्यांविषयी प्रश्न विचारायचा अधिकार तेवढा मिळाला. अशा रीतीनं सरकारच्या ध्येयधोरणावर कोणत्याही प्रकारचा प्रभाव टाकायचा अधिकार न मिळता केवळ टीका करायचा अधिकार त्यांना मिळाला.'

हे जणू काय पुरेसं नव्हतं. सुधारणांबद्दल अजूनही काही गैरसमज उरू नये म्हणून की काय या सुधारणांचं विधेयक ब्रिटिश संसदेत मांडत असताना भारत मंत्री जॉन मोर्ले म्हणाले की मला जोपर्यंत दिसत आहे तोपर्यंत भारत सांसदीय संस्थांसाठी पात्र होईल असं दिसत नाही. हाउस ऑफ लॉर्ड्समधे ते म्हणाले, 'मी जर भारतात सांसदीय लोकशाही स्थापन करायचा प्रयत्न करणार असतो, वा यामुळे भारतात सांसदीय लोकशाहीला सुरुवात होत आहे असं म्हणता आलं असतं तर मला या विधेयकाबाबत काहीही कर्तव्य उरलं नसतं.'

अतिशय महत्त्वाची गोष्ट ही आहे की मोर्ले-मिंटो सुधारणांमुळे निर्माण झालेल्या परिषदेनं पहिली उपाययोजना कोणती केली असेल तर ती १९१०चा वृत्तपत्रविषयक विधेयक मजूर

करायची. ह्या विधेयकातील तरतुदी एवढ्या भयानक होत्या की एका नवनियुक्त विधी सदस्यानं या सुधारणांशी आपलं नाव जोडलं जाण्याऐवजी राजिनामा द्यायची धमकी दिली. परिणामी ते थोडं सौम्य करण्यात आलं. तरीही ते एवढं भयानक होतं की त्यामुळे विधिमंत्र्यांची सर्व देशात छीः-थू झाली.

या सर्व कालावधीत बंगालची फाळणी एखाद्या नासुराप्रमाणे चिघळत होती व ती सतत चिंतेचाच एक विषय राहिलेली होती. ती रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत देशात शांतता राहू शकत नाही हे स्पष्ट झालेलं होतं. लॉर्ड मिंटो यांनी सुरेन्द्रनाथ बॅनर्जीजवळ मोकळेपणानं मान्य केलं की 'माझ्या देशाची जर तुमच्या प्रांताप्रमाणे फाळणी झाली असती तर मलाही तुमच्यासारखंच वाटलं असतं.' **(५१)** परंतु नोकरशाहीची प्रतिष्ठा पणाला लागलेली होती. फाळणी आता 'घडून गेलेली आहे व तिच्यापासून आता माघार घेता येऊ शकत नाही असं तिचं म्हणणं होतं. त्यातून मार्ग काढणं आवश्यक होतं. त्यामुळे लॉर्ड मिंटो यांच्या जागी लॉर्ड हार्डिंग्ज व्हाईसराय पदावर आले आणि लॉर्ड क्रू व्हिस्कॉऊंट मिडलटन यांच्या जागी वसाहत मंत्री झाले, व्हाईसराय यांच्या मंत्रिमंडळातील लॉर्ड सिन्हा यांच्या जागेवर सर अली इमाम आले व राजे पाचवे जॉर्ज यांच्या राज्यारोहण समारोहाची संधी साधून फाळणी रद्द करण्यात आली व लॉर्ड ॲम्टहिल यांनी कार्यकारी व्हाईसराय म्हणून आणि लॉर्ड मोर्ले आणि लॉर्ड मिडलटन या दोघांनी संबंधित राज्यांचे सचिव म्हणून त्यावर स्वाक्षऱ्या केल्या!

बंगालची फाळणी रद्द झाल्यामुळे काँग्रेसमधील लोकांच्या निष्ठेचा प्रवाह परत शासनाकडे वळू लागला. १९११ साली कोलकाता येथे झालेल्या काँग्रेसच्या सव्विसाव्या अधिवेशनात फाळणी रद्द केली गेल्याचा उल्लेख करत एक काँग्रेस पुढारी म्हणाले: 'ब्रिटिशांच्या मुत्सद्दीपणामुळे प्रत्येकाचा ऊर ब्रिटिश साम्राज्याच्या निष्ठेनं भरून आलेला आहे.' **(५२)**

परंतु भारताचं राजकीय क्षितिज फाळणी रद्द झाल्यानंतरही काळवंडलेलंच होतं आणि आनंदाच्या अभिव्यक्तीला फारसा वाव राहिलेला नव्हता. बिहारला बंगालपासून वेगळं करण्यात येऊन त्याचा स्वतंत्र प्रांत करण्यात आलेला होता; भारताची राजधानी कोलकात्यावरून दिल्ली

येथे हलवण्यात आली होती. त्यामुळे प्रासादांच्या शहराच्या प्रतिष्ठेला आणि शासनातील बंगाली लोकांच्या प्रभावाला जबर धक्का लागला; देशाचं प्रशासन पोलीस राज्याप्रमाणे चालवण्यात येत होतं; लोकांच्या स्वातंत्र्यावर बंधनं आलेली होती; क्रांतिकारकांचा शोध निर्दयपणे घेणं चालू होतं; त्यापैकी जे पकडले जायचे त्यांच्याकडून कबुलीजबाब घेण्यासाठी मारहाणीचा आणि छळवादाचा आश्रय घेण्यात यायचा. अशा रीतीनं देशातील काही महान प्रतिभावंतांचा अंत कारागृहातच झाला. बहिष्कार आणि स्वदेशी चळवळीचा आधीचा उत्साह ओसरल्यानंतर हळूहळू ते आंदोलनही ओसरू लागलं व त्याची कडवट चव तेवढी तोंडात उरलेली होती. जनतेचा उत्साह जोपर्यंत कायम होता तोपर्यंत मुंबई आणि अहमदाबाद येथील गिरण्यांची चांगलीच भरभराट झालेली होती. जोपर्यंत नफा आणि देशभक्ती हातात हात घालून चालत होत्या तोपर्यंत चळवळीला व्यापाऱ्याचं सहकार्य मिळत राहिलं. परंतु या दोघातून एकाची निवड करायची जेव्हा वेळ आली तेव्हा त्यांनी गाजावाजा न करता नफ्याची निवड केली आणि देशभक्ती फायदेशीर नसल्यामुळे तिचा जोनाप्रमाणे अव्हेर केला. लोकांनी उत्साहाच्या भरात राष्ट्रीय उद्योगाला हातभार लावण्यासाठी आपला घामाचा पैसा ओतला होता. परंतु सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या शब्दात 'त्या काळाच्या उत्साहाच्या भरात आणि आपल्या स्थानिक उद्योगांना मदत करायच्या इच्छेमुळे प्राथमिक गोष्टींचा वा त्यासाठी आवश्यक असलेल्या संघटनेचा विचार करण्यात आलेला नव्हता व त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याचा विचार करण्यात आलेला नव्हता. भांडवलाचा प्रवाह वाहत होता परंतु त्याचा उपयोग दरवेळी नीट करण्यात येत होता असं नाही. त्यामुळे अपयश आलं व स्वदेशीचा उत्साह मंदावला.' **(५३)**

*   *   *

आणि अशा रीतीने १८५७च्या स्वातंत्र्य समरानंतर ५० वर्षांनी आणि घटनात्मक संघर्षाच्या २५ वर्षांनंतरही भारताच्या दृष्टिक्षेपाच्या टप्प्यात गमावलेलं स्वातंत्र्य कुठेही दिसत नव्हतं. घटनात्मक आंदोलनात अजून काही करायची क्षमता उरलेली नव्हती आणि त्याला प्रभावी पर्याय कोणताही सापडत नव्हता. मध्यंतरीच्या क्रांतिकारकांच्या प्रवेशामुळे काँग्रेसमध्ये दुफळी

पडली होती आणि जनतेचं मनोधैर्य खचलं होतं. राष्ट्रीय आंदोलनातील उणिवा आणि दोष रवींद्रनाथांच्या आधीच लक्षात आले होते. त्यांनी त्यांचं वर्णन आपल्या *द होम अँड द वर्ल्ड* या कादंबरीत केलेलं आहे. 'राजकारणाचं वांझ आंदोलन करणारांचा' आणि 'आरामखुर्चीत बसून राजकारण करणारांचा' सारखाच वीट येऊन आणि भ्रमनिरास होऊन ते म्हणतात : 'राष्ट्राची खरी सेवा करण्यासाठी आवश्यक असलेला निर्धार आणि शिस्त या गुणांचा आमच्यात अभाव आहे. त्यामुळे आमच्या अतृप्त विवेकाची बोचणी कमी करण्याकरिता राष्ट्रीय जीवनात आम्हाला आंदोलनं आणि राजकीय घोषणांच्या व्यसनाला बळी पडावं लागत आहे. विधायक कामांच्या प्रयोगाद्वारे राष्ट्रउभारणी करण्याकरिता ते परत एकदा आपल्या हस्तिदंती मनोऱ्यात शिरले. अरविंदांनी पाँदिचेरीत एकांतवास स्वीकारला; मंडाले येथील किल्ल्यात टिळक सहा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा भोगत होते. त्यामुळे शारीरिक दृष्टीनं जरी ते विकलांग झाले होते तरी मनानं ते सुदृढ होते. लाला लजपतराय दूरवरच्या अमेरिकेत तात्पुरत्या मुक्कामाला गेले होते, बिपिनचंद्र पाल यांच्यातील अग्नी विझला होता. राष्ट्रवादी चळवळीची सर्व दारं बंद झालेली होती.

शांततामय प्रतिकार, चतुःसूत्री बहिष्कार, असहकार अशा प्रकारच्या नंतरच्या काळात इतिहास घडवणाऱ्या महान आणि नवीन कल्पना भारताच्या क्षितिजावर ढगातील प्रतीकात्मक आकृत्यांमधील कल्पनारम्य चित्राप्रमाणे दिसत होत्या. एवढंच नाही तर टिळकांनी कर न भरायच्या आंदोलनालाही ताजेपणा आणला होता. परंतु या सर्वांना चालना देणारा व त्यांच्यामागील शक्तिस्रोत असणारा माणूस अजून यायचा होता. कल्पनेला वास्तवात आणायच्या मार्गात फार मोठी दरी निर्माण झालेली होती. देश गुलामगिरीच्या शृंखलांनी बद्ध झालेला होता आणि परकीयांच्या टाचेखाली चिरडला जात होता. अलिपूर तुरुंगातून एक वर्षाची शिक्षा भोगून परतल्यानंतर अरविंद घोषांनी उत्तरपाडा येथे १९०८ साली दिलेल्या प्रसिद्ध भाषणात आपल्या औदासीन्याचं अतिशय स्पष्ट शब्दात वर्णन केलेलं आहे.

*'मी जेव्हा बाहेर पडलो तेव्हा मी अवतीभवती चोहोकडे पाहत होतो.... ज्यांच्याकडून सल्ला आणि प्रेरणा मिळायची मला सवय झालेली होती त्यांच्याकडे मी पाहत होतो. मला ते दिसले*

*नाहीत. त्याहूनही अधिक काही होतं. मी जेव्हा तुरुंगात गेलो होतो तेव्हा संपूर्ण देश वंदेमातरमच्या घोषणांनी जिवंत होता, राष्ट्रीयत्वाच्या आशेनं जिवंत होता, अपमानास्पद परिस्थितीतून नुकत्याच उठलेल्या कोट्यवधी लोकांच्या आशेनं जिवंत होता. मी जेव्हा तुरुंगातून बाहेर पडलो तेव्हा तो आवाज ऐकायचा मी प्रयत्न केला परंतु त्याऐवजी दिसली ती केवळ स्मशान शांतता. देशाला गप्प बसवण्यात आलं होतं आणि माणसं स्तब्ध झालेली दिसत होती. आमच्यासमोर भविष्याचं दर्शन घडवणारं जे देदिप्यमान ईश्वरी आकाश होतं ते त्यांना दिसत नव्हतं. त्याऐवजी ढगांनी गच्च भरलेलं आकाश त्यांना दिसत होतं व त्यातून मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट यांचा वर्षाव तेवढा होत होता. कोणत्याही माणसाला कुणीकडे जावं ते कळत नव्हतं. चोहोकडून प्रश्न विचारला जात होता, 'आता आम्ही काय करावं? आम्ही करू शकू असं आता काय आहे?'* **(५४)**

वर्तमानाच्या नैराश्यातून प्रलयंकारी भविष्याच्या अभिव्यक्तीचं दर्शन घडत होतं. अशाही अवस्थेत भरकटलेल्या जमातीला आश्वासित प्रदेशाकडे नेणाऱ्या भविष्यकालीन मुक्तिदात्याचं अरविंदांनी सुंदर दर्शन घडवलं आहे : 'हुतात्मा, पोलादी इच्छाशक्तीचा आणि पोलादी हृदयाचा माणूस, ज्याच्या धैर्याला पराभव कधीच शिणवू शकत नाही वा कितीही मोठा धोका ज्याला स्वस्थ बसवू शकत नाही असा निष्ठुर योद्धा, गुलामगिरीत असेपर्यंत जो विसावा वा झोप घेऊ शकत नाही असा जन्मजात कृतिवीर नेता, मातृभूमीच्या वेदीवर आपलं हृदय कापून रक्तस्नान घालू शकणारा, हृदयात आग आणि जिभेवर ज्वाला पेटत असलेला आणि आपल्या अगदी साध्या शब्दांनी बलिदान करायची प्रेरणा देणारा वा तत्काळ कृतीसाठी प्रवृत्त करणारा मुक्तिदाता असलेल्या महापुरुषाची भविष्यकाळ वाट पाहत आहे....' **(५५)**

पहिल्या महायुद्धाच्या नगाऱ्याचा आवाज जेव्हा ऐकू येऊ लागला होता तेव्हा परिस्थिती जवळपास अशीच होती. ब्रिटिश सत्तेचा पीळ अजूनही कायम आहे व नेहमीप्रमाणे आपला चाबूक उगारायचा तिचा निर्धार कायम आहे या विषयी लोकांच्या मनामध्ये संशय राहू नये म्हणून की काय सुधारणेचा प्रत्येक उपाय, नोकरशाहीनं दिलेली प्रत्येक सूट यांचं मूल्य त्याहूनही अधिक

दडपशाही आणि जनमताचा जाणीवपूर्वक केलेला अपमान यांनी चुकवावं लागायचं. या पाशवी शक्तीवरील उत्तर अजून सापडलेलं नव्हतं.

परंतु असं असलं तरी हा उजाडण्यापूर्वीचा काळोख होता. या आव्हानाचं उत्तर तिच्या एका पुत्रानं दूरस्थ प्रदेशात तावून सुलाखून शोधून काढलं होतं. त्यानं आपल्या आत्मशक्तीच्या महान तत्त्वज्ञानात भारतातील सर्व महान परंपरांचा, आजवरच्या राजकीय अनुभवातून आणि संघटनकौशल्यातून भारतानं आपल्या इतिहासात आतापर्यंत विकसित केलेल्या सर्व विचारांच्या शक्तीचा व कृतीचा समावेश केलेला होता. तो मुक्तिदाता होता मोहनदास करमचंद गांधी, दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा प्रवर्तक आणि नेता.

भारत ब्रिटिशांचा अंकित होण्यापूर्वी भारताला अतिशय उत्तम प्रशासकांची आणि राज्यकर्त्यांच्या परंपरेतील सहा पिढ्यांच्या प्रशासकीय वारसा देणाऱ्या घराण्यात त्यांचा जन्म झालेला होता. भारताच्या ज्या परंपरांचं दर्शन नवप्रभातच्या अग्रदूतांनी आणि पथशोधकांनी घडवलं होतं त्या परंपरेत वाढलेल्या गांधीजींचं शिक्षण इंग्लंडमधे झालं होतं व दक्षिण आफ्रिकेत ते परिपक्व झाले होते. त्यावेळी भारत

*भटकत होता दोन जगात, एक होतं मृत,*
*व दुसऱ्यात नव्हतं त्राण जन्म घ्यायचाही.*

अशा अवस्थेत तो होता. त्याच वेळी आपल्या लोकांना मुक्ती मिळावी म्हणून त्यांचं नेतृत्व करण्यासाठी पहिल्या महायुद्धाच्या शेवटी गांधीजी आपल्या मातृभूमीत परतले. ते काठेवाड अथवा सौराष्ट्रात जन्मलेले होते. त्यांच्या एका बाजूला आफ्रिका खंडाला जोडणारा सागर होता तर दुसरीकडे भारताचा मुख्य भूप्रदेश होता. या दोन्हीही भागांना गांधीजींच्या जीवनातील कर्मभूमीचं महत्त्व होतं.

# भाग दूसरा

# महात्म्याचं आगमन

# प्रकरण ७ वे

# अद्भुतरम्य भूतकाळाची झुळूक

**१**

लोककथा आणि लोकगीत यांच्यासाठी काठेवाड प्रसिद्ध आहे. प्रेरणा देणाऱ्या काठींचा तो प्रदेश आहे. उत्तरेकडील मथुरेतून पळाल्यानंतर भगवान कृष्णाचं हेच निवासस्थान होतं. द्वारकेला राजधानी करून इथेच त्यांनी आपलं राज्य स्थापिलं होतं. आता पश्चिम किनाऱ्यावरील तीर्थयात्रेचं हे प्रसिद्ध स्थळ झालेलं आहे. आधुनिक काळात या भागानं भारताच्या दोन महान सुपुत्रांना जन्म दिलेला आहे. भारतात सुधारणावादी जी तीन महान आंदोलनं झाली त्यातील एकाचे जनक महर्षी स्वामी दयानंद हे पहिले आणि दुसरे महात्मा गांधी.

या भागातील विविध प्रकारच्या भूप्रदेशांमुळे तसंच इथं वेगवेगळ्या प्रकारच्या आणि संस्कृतीच्या लोकांचा जो संगम झाला आहे त्यामुळे याला केव्हा केव्हा छोटा भारत असंही म्हणत असतात. काठेवाड हे चौकोनासारखं द्वीपकल्प आहे व पश्चिम किनाऱ्यावरून मोठ्या धैर्यानं कोपर लांबवून तळहात आत घ्यावा त्याप्रमाणे ते अरेबिअन सागरात शिरलेलं आहे. वीस हजार आठशे अठ्ठ्यैंशी चौरस मैल त्याचं क्षेत्रफळ आहे. त्याच्या नैऋत्य आणि दक्षिण दिशेला समुद्र आहे, वायव्येकडे कच्छचं आखात आहे तर पश्चिमेकडे कॅम्बीचं आखात आहे.

त्याच्या उत्तरेकडील सीमेला लागून ज्याला रण म्हणतात ते वाळवंट पसरलेलं आहे. पावसाळ्याच्या दिवसात ते उथळ तळ्यासारखं दिसतं. उन्हाळ्यात तो उदासीन प्रदेश कडक उन्हाच्या झळांनी आणि वाळूच्या वादळांनी भरलेला असतो. साचलेल्या मिठाच्या चमचमणाऱ्या ढिगांनी, ज्यांनी तो प्रदेश भरलेला आहे, दुपारच्या वेळी तिथल्या प्रवाशांचे डोळे दिपून जाऊन दुखायला लागतात. तिथलं फसवं मृगजळ माणसाला विनाशाकडे ओढत असतं.

दक्षिणेकडील भागाचं चित्र अगदी या विपरीत आहे. दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावरून एकीककडून पांढऱ्या पसरट घरांनी भरलेल्या शहरांचं दृश्य दिसत असतं तर दुसरीकडून खडकांवर येऊन आदळणाऱ्या लाटांच्या पांढऱ्या रेषेमागे भरती ओहोटीच्या सीमेवर कोळ्यांच्या आनंदानं नाचणाऱ्या बोटी दिसत असतात. तिथूनच हिरव्यागर्द ताडाच्या झाडांची राई दिसत असते. नदीच्या रुंद मुखाकडे पाहिलं असता अधूनमधून पर्वतामागील पठारी भागावरील प्रदेशाचं चित्र डोळ्यासमोर उभं राहतं.

या दोघांमध्ये आहे सोरठ - गांधीजींची जन्मभूमी. साधी परंतु आकर्षक खेडी बागा आणि उसाच्या मळ्यांना बिलगून बसलेली आहेत. छाया देणारी झाडं आणि हिरवीगार शेतं बाराही महिने डोळ्यांचं पारणं फेडत असतात.

काठेवाडची संस्कृती ही कृष्णआख्यायिकांनी भरलेली आहे. त्यातूनच तेथील प्रसिद्ध रासक्रीडेचा जन्म झालेला आहे. कृष्णभक्तीची विविध गाणी तिथल्या रावांपासून तर रंकांपर्यंत सर्वांच्या मुखी सारखीच आहे.

महाभारतानुसार यादवांचं प्रभास पाटणपासून तर गिरनारच्या पर्वतश्रेणीमागील पोरबंदरपर्यंतच्या संपूर्ण भागावर स्वामित्व होतं. यात सोरटी सोमनाथच्या प्रसिद्ध मंदिराचाही समावेश होतो. यादवांची इथंच भरभराट झाली आणि त्यांनी देशालाही भरभराटीस आणलं. नंतर ऐषआरामाचा त्यांना शौक लागला, ते व्यसनाधीन झाले व अखेरीस श्रीकृष्णाचा शाप भोवून दारूच्या व्यसनाच्या भरात त्यांनी परस्परांचा संहार केला. यातूनच आपल्याला भावाभावांच्या भांडणासाठी वा गृहयुद्धासाठी यादवी हा शब्द मिळालेला आहे. यादवी नाशासाठी कशाप्रकारे कारणीभूत होते व लोकांनी आपला मार्ग बदलला नाही तर त्यांचा कशा प्रकारे नाश होऊ शकेल ते भारतातील लोकांना आपल्या अखेरच्या दिवसात गांधीजीही समजावून सांगत होते.

या प्रदेशाला संतमंडळ आणि त्यांच्या भक्तांनी पवित्र केलेलं आहे व लोक अजूनही मोठ्या चवीनं त्यांच्या आठवणी सांगत असतात. पंधराव्या शतकात तेलंगणामधील वल्लभाचार्यांनी आणि अयोध्येच्या सहजानंद स्वामींनी इथंच आपलं वास्तव्य केलं होतं. आणि सनातन्यांनी मात्र

वैश्य, शूद्र आणि स्त्रिया यांना धर्मकार्यापासून वंचित ठेवलं होतं. परंतु या संतांनी अशा परिस्थितीही कृष्णभक्तिचा संप्रदाय या सर्व वर्गांपर्यंत पोहोचवला होता. अस्पृश्यांचे मित्र, नरसी मेहता यांनी 'वैष्णव जन' हे गांधीजींचं आवडतं आणि गांधीजींनी जीवनातील प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी म्हटलेलं भजन लिहिलं होतं. ते जुनागढ येथेच राहणारे होते. त्यांची भजनं आजही तथाकथित जातीबाहेरील लोकदेखील मोठ्या आवडीनं म्हणतात. एकेकाळी राणी असलेल्या व कृष्णभक्तीवरील अनेक प्रसिद्ध भजनं रचणाऱ्या संत मीराशी द्वारका संबंधित आहे. भारतीय स्त्रियांसमोर ईश्वरभक्तिचा आदर्श म्हणून गांधीजी मीरेचं उदाहरण द्यायचे. गांधीजींची शिष्या मिस मॅडालीन स्लेड यांनी जेव्हा भारतीय नाव धारण करायची इच्छा व्यक्त केली तेव्हा गांधीजींनी या मीरेवरूनच त्यांचं नाव मीरा असं ठेवलं होतं.

हा प्रांत अनेक प्रसिद्ध संतांच्या समाधींनी आणि तीर्थस्थळांनी भरलेला आहे. प्रभास पाटण येथे सोमनाथचं ऐतिहासिक मंदिर आहे. माधवपूर, तुलसीश्याम, सुदामपुरी (पोरबंदर) आणि द्वारका ही सर्व तीर्थस्थळं श्रीकृष्णाशी संबंधित आहेत व संपूर्ण भारतातील हिंदू त्यांच्याकडे आकर्षित होत असतात. गिरनार आणि पलिटाणा टेकड्या ही जैनांची पवित्र तीर्थक्षेत्रं असल्यामुळे त्यांच्यासाठी ती आकर्षणाची केंद्रं झालेली आहेत. प्राचीन काळापासून काठेवाड गलबतांच्या बांधणीसाठी प्रसिद्ध आहे. काठेवाडमधे बांधण्यात आलेली जहाजं एकेकाळी एका बाजूला जावा सिंगापूरपर्यंत तर दुसऱ्या बाजूला पर्शिअन द्वीपकल्प, अरेबिया आणि पूर्व आफ्रिकेतील झांजीबारपर्यंत जात असत. काठेवाडमधील खरवा ही जमात समुद्रपर्यटनात भारतातील सर्वात कुशल जमात होती.

समुद्राशी संपर्क असल्यामुळे काठेवाडी लोक साहसी झाले. त्यामुळे त्यांच्यात व्यापाराचं कौशल्य आलं. काठेवाडमधील मेमन हे भारतातील सर्वात धूर्त व्यापारी आहेत. गत शतकाच्या सातव्या आणि आठव्या दशकात अनेक काठेवाडींनी टांगानिका आणि दक्षिण आफ्रिकेमधे व्यावसायिक संबंध प्रस्थापित केले आणि ते कोट्यधीश झाले. त्यांच्यापैकीच एक शेठ दादा अब्दुल्ला यांच्यामुळे गांधीजींचा दक्षिण आफ्रिकेशी परिचय झाला.

महम्मद गझनवीनं सोमनाथचं देऊळ जेव्हा फोडलं तेव्हा काठेवाडमध्ये मुसलमानांचं पहिलं आक्रमण अकराव्या शतकात झालं. चौदाव्या शतकापासून तिथं एकानंतर एक मुसलमान राजांची तसंच मुसलमान राजांच्या प्रतिनिधींची मालिकाच सुरू झाली. परिणामी इस्लामचा तिथल्या भाषेवर आणि संस्कृतीवर खोल ठसा उमटला आहे. ज्या गुजराती भाषेची काठेवाडी ही बोली आहे तिच्यात अरबी आणि पर्शिअन भाषेत मूळ असलेले जवळपास चाळीस टक्के शब्द भरलेले आहेत. भारतातील इतर भागांत, वैशिष्ट्यानं दक्षिणेकडे कर्मठपणा अतिशय वाढला आहे. याउलट काठेवाडमधे सर्वांना सामावून घेणारी परंपरा आहे. झोरास्ट्रीयन आणि ख्रिश्चन धर्माशिवाय मुसलमानांचा सुफी गूढवादही हिंदू धर्माच्या वैविध्यशाली प्रवाहात तिथं मिसळलेला आहे व त्यात उदार सहिष्णुता आलेली आहे. पोरबंदर येथे हवेली म्हणून एक ठिकाण आहे. तिथं ईश्वराबरोबरच अल्लाचं, तसंच रामासोबत रहीमचंही नाव घेण्यात यायचं.

राजकीयदृष्टीनं, काठेवाडचा नकाशा एखाद्या कापून तुकडे केलेल्या चित्रासारखा दिसतो. अठराव्या शतकाच्या मध्यात, लॉर्ड वेलस्ली यांनी सुरतच्या नबाबाच्या मृत्यूनंतर त्यांचं राज्य जेव्हा खालसा केलं तेव्हा कितीही लहान जमीनदार असला तरीही तो जर मोगलांना खंडणी देत असला तर त्याला 'राजा' म्हणत असत. अशा रीतीनं संपूर्ण काठेवाड हा अनेक राजांनी भरलेला आहे. काही राजांजवळ तर एकदोनपेक्षा अधिक गावंही नसत. परंतु तरीही तिथल्या शासकाला 'जरी त्याची मालकी एखाद्या विहिरीवर असली तरी सार्वभौम म्हणायचे.' [एच. एच. ऑफ बिकानेर, *राईझ अँड फुलफिलमेंट ऑफ ब्रिटिश एम्पायर इन इंडिया* या ग्रंथातील पृष्ठ २२९ ई. थॉम्प्सन आणि जी. टी. गॅरेट यांनी दिलेलं उद्धरण]

१८५७मधे ज्या वादळानं संपूर्ण उत्तर आणि मध्यभारताला व्यापलं त्याचा काठेवाडवर क्वचितच परिणाम झाला असावा. काठेवाडचे राजे आपल्या लहान लहान क्षुद्र भांडणांतच एवढे मग्न होते की त्यांना त्याशिवाय दुसरं काही दिसतच नव्हतं. परंतु तरीही त्या उठावाचा अप्रत्यक्ष परिणाम झाला. त्यामुळे ब्रिटिशांना भारतीय संस्थानिकांबद्दलचं आपलं मागील धोरण बदलवावं लागलं. लॉर्ड कनिंगहॅम यांच्या शब्दात सांगायचं तर 'त्या उठावामुळे पुढे येणाऱ्या वादळाची कल्पना आली व त्या वादळाच्या लाटेनं संपूर्ण देशाला ग्रासायच्या आधीच तिला अडवणारे बांध

बांधता आले.’ [*स्टेटस ऑफ इंडियन प्रिन्सेस* या प्यारेलाल यांच्या ग्रंथातील उद्धरण (१९४१), पृष्ठ ३८] भारताच्या भावी प्रशासकांसमोर सर्वात मोठी समस्या निर्माण करणाऱ्या आधीच अस्तित्वात असलेल्या पहिल्या आणि दुसऱ्या श्रेणीच्या संस्थानांशिवाय १८८४ साली सम्राटांच्या लहरीनुसार २२० संस्थानं नव्यानं निर्माण करण्यात आली.

ते काहीही असलं तरीही या संस्थानांनी तग धरल्यामुळे एक फायदा झाला. सतत पिळवणूक होत असल्याकारणानं ब्रिटिश भारताबाहेर ढकलली जाणाऱ्या स्थानिक प्रतिभेला आश्रयस्थान मिळालं. भारतातील काही आघाडीच्या मुत्सद्यांना, यात सर फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी इत्यादींचाही समावेश आहे, आपली प्रतिभा दाखवण्याची या संस्थानांमुळे संधी मिळाली. तसंच अरविंद घोष, व शामजी कृष्ण वर्मा यांसारख्या लोकांना ब्रिटिश भारतातून निष्कासित करण्यात आल्यानंतर अशा संस्थानांतच आश्रय मिळू शकला. अशाच रीतीनं महात्मा गांधींच्या सहा पिढ्यांना आपली प्रतिभा विकसित करून तिचा उपयोग करायची संधीही काठेवाडच्या एका वा दुसऱ्या संस्थानामुळे मिळाली. त्यांना जर ब्रिटिश भारतातच राहावं लागलं असतं तर एक तर त्यांची प्रतिभा नष्ट झाली असती वा वाया गेली असती.

## २

महात्मा गांधींच्या पूर्वजांचा अगदी जुन्यात जुना शोध लालजी गांधींपासून घेता येतो. मुळात ते जुनागढ राज्यातील कुटियानाचे रहिवासी होते. तिथं ते मुसलमान खोकर कुटुंबाच्या वतनवाडीवर दिवाण म्हणून नोकरीवर होते. त्यानंतर पोरबंदर येथे ते दप्तरी वा नायब दिवाण झाले. त्या दिवसात दप्तरी वा नायब दिवाण हा दिवाणाचा वा प्रधानमंत्र्याचा उजवा हात असायचा व त्याचं स्थान त्या काळात मंत्रिमंडळातील गृहमंत्र्यासारखं असायचं. कुटियाना इथे खोकरांच्या महालाजवळ अजूनही त्यांचं घर - जरी ते गांधी घराण्याच्या मालकीचं नसलं तरीही - उभं आहे. त्याची मालकी नंतर एका मेमन कुटुंबाकडे हस्तांतरित झाली व ते कुटुंबही आता पाकिस्तानमधील कराची येथे स्थलांतरित झालेलं आहे.

लालजी गांधींनंतर त्यांचा मुलगा रामजी गांधी आणि नातू राहीदास गांधी हे क्रमशः त्यांच्या पदावर लागले. राहीदास गांधींना दोन मुलं होती. हरजीवन आणि दमन. ते दोघंही पोरबंदरचे क्रमशः नायब दिवाण झाले.

हरजीवन गांधींच्या एकुलत्या एक मुलाचं नाव उत्तमचंद होतं. तेच करमचंद गांधींचे वडील आणि महात्मा गांधींचे आजोबा होते. गांधी कुटुंबात सर्वप्रथम तेच पंतप्रधानपदी पोहोचले.

राजबिंडं रूप, गुडघ्यापर्यंत पोहोचणारे अजानुबाहू हात, चाणाक्ष आणि भेदक दृष्टी असलेले उत्तमचंद गांधी, ज्यांना लोक प्रेमानं ओटाबाप्पा म्हणायचे, असामान्य व्यक्ती असावे. सर्व दृष्टींनी पाहता त्यांचं व्यक्तीमत्व उदात्त चारित्र्य; दुर्दम्य धैर्य यांनी बनलेलं होतं. असामान्य, अष्टपैलू, जोमदार, आणि कल्पक बुद्धिमत्ता यांची देणगी त्यांना लाभलेली होती. त्यांचं औपचारिक शिक्षण अतिशय कमी झालेलं होतं. परंतु ज्या मातीतून प्रशासक आणि मुत्सद्दी घडतात त्या मातीतून त्यांची घडण झालेली असावी. आपले काका दमण यांच्या माध्यमातून त्यांनी पोरबंदर येथे जकात गोळा करणाऱ्या अधिकाराची नोकरी मिळवली होती. आपल्या कौशल्यानं, व्यवहारज्ञानानं आणि समयसूचकतेनं त्यांनी त्या संधीचं सोनं केलं होतं. काकांच्या कार्यालयात केलेल्या उमेदवारीमुळे त्यांना पुढील जीवन घडवण्यासाठी उपयुक्त प्रशिक्षण मिळालं.

एके दिवशी राणा खिमोजी (१८१३-३१) यांनी दमण गांधींना बोलावलं. त्यांना काही महत्त्वाचं काम होतं. त्यावेळी दमण गांधी कुठं तरी बाहेर गेलेले होते. न घाबरता उत्तमचंद राणाकडे गेले आणि शांतपणे आत्मविश्वासानं राणाला त्यांनी विचारलं, ‘माझ्या काकांच्या अनुपस्थितीत मी तुमची काही सेवा करू शकतो काय?’ राणाला त्यांच्या धैर्याचं, हुशारीचं आणि बोलण्याच्या शैलीचं कौतुक वाटलं. ते उत्तमचंदना म्हणाले : ‘एक कठीण समस्या आलेली आहे. एवढ्याशा वयात तू एकट्यानं ती समस्या सोडवू शकशील असं तुला वाटतं काय?’

आपले आशीर्वाद असले तर जगात अशी कोणतीच समस्या नसेल की जिच्यातून मार्ग काढता येणार नाही.

‘ठीक आहे. माधवपूर येथे जकात गोळा करण्यासाठी नेमलेला कंत्राटदार जकातीची रक्कम काही दिवसांपासून देत नाही व याप्रमाणे तो दरबाराची अवज्ञा करत आहे. त्याला वठणीवर आणायचं आहे.’

‘महाराज हे काम चुटकीसरशी करता येईल. मी आताच माधवपूरसाठी निघू काय?’

‘पण मला आधी हे सांग की तू तिथं जाऊन काय करशील?’

‘ते तिथली परिस्थिती पाहिल्यानंतरच मी ठरवू शकेन. मला केवळ तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. माझ्या सामर्थ्याच्या भरवशावर मी हे बोलत नाही तर तुमच्या नावलौकिकावरील भरवशामुळे मी हे बोलतो आहे.

ब्रिटिश सत्तेचा नुकताच काठेवाडमध्ये प्रवेश होऊ लागला होता. काठेवाड संस्थानाची परिस्थिती बिकट होती. बळी तो कानपिळीचा नियम तिथं लागू होत होता. एका संस्थानाच्या प्रमुखानं शेजारच्या संस्थानाची भूमी बळकावून वा महसूल लुबाडून आपली सत्ता वाढवायचा प्रघात सामान्य होता. ओटा गांधींच्या लगेच लक्षात आलं की अवज्ञा करणारा कंत्राटदार कोणाच्या तरी जोरदार पाठिंब्यामुळे ते काम करत असला पाहिजे. आणि हे काम अजून कुणाचं नाही तर खुद्द जुनागढ दरबाराचंच असावं. पोरबंदरचा लहानसा आकार लक्षात घेता पोरबंदर हे काम आपल्या बळावर करू शकणार नाही हे त्यांच्या लक्षात आलं व त्यामुळे त्यांनी मुत्सद्दीपणाच्या मार्गाचा अवलंब करायचं ठरवलं.

पोरबंदर संस्थानाचे अनेक लहान लहान भाग संपूर्ण जुनागढ राज्यात पसरलेले होते. पोरबंदरचं ह्या लहान लहान भूभागावरील सार्वभौमत्व नाममात्र होतं. ते प्रस्थापित करण्यात अनेक अडचणी यायच्या व त्यामुळे जुनागढच्या अधिकाऱ्यांशी सतत कटकटी व्हायच्या. ओटा बापानी आधी या सर्व प्रदेशांचा बारकाईनं अभ्यास केला आणि मग त्यांनी जुनागढ राज्याच्या अधिकाऱ्याशी बोलणी सुरू केली. त्यांनी ते सर्व लहान-लहान भूप्रदेश त्यातील महसुलासहित जुनागढ राज्याच्या सुपूर्द करायची तयारी दाखवली आणि त्याच्या मोबदल्यात माधवपूरपासून

तर पोरबंदरच्या किनारपट्टीवर महसूल गोळा करायचा अधिकार मागितला. हा भाग त्यावेळी वाळवंटी होता व त्याचा काही लाभ नाही असं त्यावेळी समजलं जायचं. परंतु त्या भागाचा विकास केल्यानंतर त्या भागाची असणारी उपयोगिता ओटाबापांच्या चाणाक्ष दृष्टीच्या लक्षात आलेली होती. जुनागढ दरबारनं ओटाबापांची ही अट लगेच मान्य केली. त्यानंतर पोरबंदर राज्याला लागून असलेली किनारपट्टी संपूर्ण लाभासह मिळाल्यामुळे आपली सीमा वाढवण्याची ताकद तर राज्यात आलीच शिवाय जुनागढशी सतत चालू असलेल्या कटकटीही थांबल्या.

उत्तमचंद यांच्या कार्यानं राणा एवढे प्रसन्न झाले की त्यांनी उत्तमचंद यांना आपल्या प्रधानमंत्रीपदी नियुक्त केलं. नंतर भदर नदीवर बांध बांधण्यात आल्यानंतर, ज्याचा विचार ओटाबापांनी आधीच केलेला होता, किनारपट्टीचा तो भाग पोरबंदरमधील सर्वाधिक महसूल देणारा भाग झाला. माधवपूरसंबंधी त्यांनी जो तह केला होता त्यामुळेच असं घडणं शक्य झालं होतं. असं सांगतात की अगदी अलीकडे पोरबंदरची वर्गवारी प्रथमश्रेणीच्या संस्थानात करण्यात आली होती.

ओटा बापांनी पंतप्रधान म्हणून जेव्हा कारभार हाती घेतला होता तेव्हा संस्थानाची आर्थिक परिस्थिती अतिशय धोक्याच्या अवस्थेत होती. सुंदरजी नावाच्या कच्छी व्यापाऱ्याचं त्याच्यावर फार मोठं कर्ज होतं. प्रशासनाचा खर्च सोडला तर संस्थानाचा जवळपास सर्व महसूल वर्षानुवर्ष सावकाराकडे कर्जाची परतफेड करण्यासाठी जायचा. ओटाबापांनी कारभार हाती घेतल्यानंतर कर्जाच्या सर्व कागदपत्रांचा सूक्ष्म अभ्यास केला. त्यापैकी एकात त्यांना अशा काही अटी आढळल्या की ज्यांच्याकडे एका पक्षानं दुर्लक्ष केलं होतं व दुसऱ्यानं त्यांची उपेक्षा केली होती. त्या अटींनुसार संस्थानाच्या उत्पन्नाच्या केवळ मुख्य स्रोतावरच धनको हक्क सांगू शकत होता. उर्वरित भागावर संस्थानाचा हक्क होता. ह्या कलमानुसार सुंदरजींना जकात आणि शेतसारा सोडून इतर महसुलावरील हक्क सोडावा लागला. इतर स्रोतापासून येणारं उत्पन्न उदा. मुद्रांकन शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादी उत्पन्नाचा प्रवाह पुन्हा खजिन्याकडे वळला व संस्थानाची आर्थिक परिस्थिती स्थिरावली.

पोरबंदरचे दिवाण म्हणून ओटाबापांना दरमहा २००० कवड्या म्हणजे अंदाजे ७०० रुपये पगार मिळायचा आणि संपूर्ण कुटुंबासाठी दरबारकडून अन्नधान्य पुरवण्यात यायचं वा त्याऐवजी खाजगी खर्चासाठी २५० कवड्या देण्यात यायच्या. ओटाबापांना हा पगार पुरायचा नाही कारण अर्ध उत्पन्न ते दानधर्मावरच खर्च करायचे. उदारपणा हे त्यांच्या मनाचं लक्षणीय वैशिष्ट्य होतं. आपल्या दोन मुलांच्या लग्नाच्यावेळी त्यांनी शहराच्या महाद्वारावर परंपरागत पद्धतीनं स्वस्तिकाच्या आकारानं तांदूळ लावून सर्व शहराला जेवणासाठी आमंत्रण दिलं. विवाहसोहळा सात दिवस चालला. शहरात असं कधीही झालं नव्हतं. स्वतः राणांनी त्या विवाहसोहळ्यात भाग घेतला होता. विवाहाच्या निमित्तानं लोकांनी आपल्या लाडक्या दिवाणावर देणग्यांचा पाऊस पडला. परंतु सदसद्विवेकबुद्धी जागृत असलेले ओटाबापा महाराजांना म्हणाले : 'हे सर्व तुमचंच आहे. तुमच्याच प्रजेकडून हे आलेलं आहे.' आणि ओटाबापांनी त्या सर्व देणग्या महाराजांना परत केल्या. त्यामुळे महाराज हेलावले. त्यांनी ओटाबापांना समजवायचा खूप प्रयत्न केला. पण ओटाबापा एक शब्दही ऐकून घ्यायला तयार नव्हते. अखेरीस महाराजांनी त्या देणग्या खजिन्यात जमा करायचा आदेश दिला. त्याचबरोबर विवाहाचा सर्व खर्च सरकारी खजिन्यातून देण्यात यावा असाही त्यांनी आदेश दिला. ओटाबापांना ते म्हणाले, 'तुमची मुलं माझी मुलं आहेत.'

ओटाबापांच्या यशानं दरबारातील खुशामतखोर मत्सरानं जळफळू लागले. त्यामुळे त्यांचे अनेक शत्रू झाले. पण राणा खिमोजीला माणसाची चांगली पारख होती. त्यांच्या जीवनकाळात या कटकटींचा काहीच परिणाम झाला नाही. परंतु महाराजांचा १८३१ साली मृत्यू झाल्यानंतर या लोकांना यश आलं.

महाराजांच्या मृत्यूच्या वेळी त्यांचे वारस विक्मातजी केवळ आठ वर्षांचे होते. ते सज्ञान होईपर्यंत संस्थानाचा कारभार त्यांच्यावतीनं त्यांची आई, राणी रूपाली बा पाहत होती. काठेवाडमधील सम्राटांचे राजकीय प्रतिनिधी श्री. डी. पी. ब्लेंड यांनी पाठवलेल्या अहवालाप्रमाणे काठेवाडचं प्रशासन तेव्हाच्या मंत्र्याकडून, ओटो गँडीकडून, कार्यक्षमतेनं चालवण्यात येत होतं. [कॅप्टन लेग्रँड जेकब, *हिस्टॉरिकल, जॉग्रफिकल, अँड स्टॅटिस्टिकल मेमॉयर्सऑन द सप्रॉव्हिन्सेस ऑफ काठेवार इटीसी, सिल्क्शन फ्रॉम द*

*रेकॉर्ड्स ऑफ बॉम्बे गव्हर्नमेंट* नं. ३७ - न्यू सिरीज, मुंबई (१८५६), पृष्ठ २३७] त्यामुळे असं वाटत होतं की प्रशासनात काहीच बदल होणार नाही. परंतु महाराणी समर्थ, महत्त्वाकांक्षी आणि संतापी स्वभावाची होती. तिच्या भांडाराचा व खजिन्याचा कारभार पाहणारा खिमजी कोठारी हा कडक शिस्तीचा माणूस होता. दरबाराच्या लेखी परवानगीशिवाय तो त्यांची मागणी पूर्ण करायला तयार नसल्यामुळे तो तिच्या मोलकरणींना फारसा आवडत नव्हता. त्यामुळे त्यांनी राणीचे कान भरले व राणीनं खिमजीचा बदला घ्यायचा निश्चय केला. कोठारीच्या लक्षात परिस्थितीचं गांभीर्य आलं आणि ओटाबापूंची पत्नी लक्ष्मी मा यांच्या पायावर पडून ते म्हणाले : 'आई तुम्हीच मला वाचवू शकता. मला न्याय द्या.'

'बाळा तुला तो मिळेल. तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही.'

ओटाबापा घरी आल्यानंतर लक्ष्मीनं त्यांना दिलेल्या वचनाची हकीगत सांगितली.

'परंतु राणीनं त्याला मारायची धमकी दिली आहे व त्याला दरबारात तिच्यासमोर हजर करायचा आदेश दिला आहे.' ओटाबापा सचिंत होत म्हणाले.

'ते काहीही असो. मी शब्द दिलेला आहे. त्याला न्याय मिळालाच पाहिजे.'

'तुझा शब्द पाळला जाईल.'

राणीच्या कोपाला बळी पडलेल्या खिमजी कोठारीची ताबडतोब सुनावणी करून त्याला शिक्षा करण्यासाठी आपल्यासमोर हजर करावं असा आदेश द्यायचा राणीचा विचार होता. पण त्याआधीच ओटाबापा राणीला म्हणाले, 'तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे पण आरोपीवर योग्य रीतीनं खटला चालवून त्याला संपूर्ण न्याय द्यायचं आश्वासन आपण मला द्यायला हवं.'

राणी चिडून म्हणाली की माझी इच्छा हाच कायदा आणि न्याय आहे.

दिवाणांनी तिला समजवायचा प्रयत्न केला. अतिशय संतापून ती म्हणाली, 'माझ्या हुकुमाचं पालन न करण्यात आल्यास तुमच्याविरुद्ध बळाचा वापर करण्यात येईल.' आपल्या

धमकीचा काहीच परिणाम होत नाही असं काही दिवस वाट पाहिल्यानंतर राणीच्या जेव्हा लक्षात आलं तेव्हा तिनं आपल्या सैन्याची तुकडी अपराधी कोठारीला पकडून आणण्यासाठी पाठवली.

धोक्याची जाणीव होऊन कोठारी लपला. पोरबंदर शहराची दारं रात्री दहानंतर बंद होत असत. त्याच्या फक्त दोनच चाब्या होत्या. एक दरबारात ठेवलेली असायची तर दुसरी दिवाणजवळ. काय होणार आहे याची कल्पना आल्यानं ओटाबापांनी आपल्या विश्वासार्ह माणसाबरोबर आपल्याजवळची चाबी पाठवून कोठारीला रातोरात शहरातून निघून जायला सांगितलं. नंतर आपल्या घराची दारं बंद करून त्याच्याभोवती तटबंदी उभारली व कुटुंबियांसोबत बऱ्यावाईट परिणामांची ते वाट पाहत बसले. आपल्या पाच मुलांना आणि बायकोला जवळ बोलावून त्यांनी सांगितलं की सत्य आणि न्यायासाठी मरण पत्करायची वेळ आता आलेली आहे व आपण आनंदानं त्यासाठी तयार राहायला पाहिजे.

राणीची तुकडी जेव्हा ओटाबापांच्या घराजवळ आली तेव्हा त्यांना घराची दारं बंद असल्याचं व घराभोवती तटबंदी असल्याचं दिसलं. आपलं काम न करताच त्यांना परतावं लागलं. आपला बेत उधळण्यात येत असल्याचं पाहून बदला घेण्यासाठी राणीनं ती तटबंदी तोफांनी उडवून लावायचा आदेश दिला आणि त्यासाठी एक तोफ आणण्यात आली.

त्या दिवसात काठेवाडमध्ये दिवाणगिरी करणं ही धोक्याची गोष्ट होती. त्यामुळे ते पद स्वीकारण्यापूर्वी राजाच्या दडपशाहीविरुद्ध व अधिकाराच्या गैरवापराविरुद्ध सुरक्षिततेच्या आश्वासनासाठी जमानतदाराची मागणी करायची त्यावेळी प्रथा होती. ओटाबापाच्या प्रकरणी जमानत घेणाऱ्या माणसाचं नाव गुलाम अहमद मकरानी होतं. तो मकरानी अरब ट्रुपर्सचा कॅप्टन होता. त्यांच्या दोन कंपनी पोरबंदरमध्ये होत्या. कारस्थान आणि प्रतिकारस्थान ही त्यावेळी दैनंदिन बाब होती. स्थानिक गटबाजीहून वेगळे असल्यामुळे मकरानी हे तटस्थ आहेत असं समजलं जायचं. त्यामुळे राज्यात ते सर्वाधिक विश्वासार्ह जमानतदार मानले जायचे. राजवाडा, खजिना आणि पंतप्रधानांचं निवासस्थान यांच्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात यायची. शस्त्रसज्ज रखवालदारांची लहानशी तुकडी रात्रंदिवस ओटाबापांच्या घराचा पहारा

करत असायची. त्यांनी यावेळी आपल्या वचनाप्रमाणे राणीच्या सैन्याचा प्रतिकार केला व लढाईत त्यांचा कॅप्टन गुलाम मोहम्मद मारला गेला.

ओटाबापांच्या घराला प्रचंड दगडी भिंती होत्या. परंतु तोफगोळ्यासमोर त्या टिकाव धरू शकल्या नाहीत. थोड्याच वेळात त्यातील एका भिंतीला दोन ठिकाणी भगदाड पडलं व ती कोसळू लागली. आत असताना ओटाबापा आणि त्यांच्या घरातील लोक आपल्या निर्धारावर न घाबरता कायम राहता यावं म्हणून ईश्वराची प्रार्थना करत होते. एवढ्या वेळात भाग्यानं राणीच्या अरेरावीची बातमी पोरबंदर येथील ब्रिटिश एजन्सीकडे पोहोचली. एजन्सीनं मध्यस्थी केली आणि तोफांचा भडिमार थांबला.

ओटाबापांच्या घराजवळील श्रीनाथजींच्या मंदिरात मकरानी पहारेकरी आणि कॅप्टन यांच्या पराक्रमाच्या व बलिदानाच्या स्मरणार्थ उत्सव असायचा. ओटाबापांच्या घराच्या भिंतींवर तोफेच्या गोळ्याच्या खुणा बराच काळ दिसत होत्या. नंतर महात्मा गांधींचं कीर्तिमंदिर स्थापण्यासाठी त्या घरात जेव्हा फेरफार करण्यात आले तेव्हा त्या खुणा बुजवण्यात आल्या.

या घटनेनंतर ओटाबापांनी आपल्या पत्नीसोबत पोरबंदर सोडलं आणि ते आपल्या वडिलोपार्जित घरी कुटियानाला राहायला गेले. त्यानंतर राणीनं ते घर आतील सर्व सामानासह जप्त केलं व त्या घराला सील ठोकलं.

जुनागढच्या नबाबाला ही गोष्ट जेव्हा कळली तेव्हा त्यांनी ओटाबापांना आपल्या दरबारात यायचं आमंत्रण दिलं. ओटाबापा लगेच गेले आणि त्यांनी आपल्या डाव्या हातानं नबाबांना सलाम केला. नबाबांनी या अशिष्ट वर्तनाचं कारण विचारलं असता त्यांनी उत्तर दिलं की मतभेदांमुळे मला पोरबंदर संस्थानाची नोकरी सोडावी लागली तरी माझी संस्थानाप्रती जी निष्ठा आहे त्यात कोणतंही अंतर पडलेलं नाही. माझा उजवा हात नेहमीसाठी पोरबंदरला बांधलेला आहे त्यामुळे मी नबाबांची सेवा केवळ डाव्या हातानं करू शकतो.

ओटाबापांच्या धीटपणाच्या उत्तरानं नबाब प्रसन्न झाले. 'तुमच्यासारखा मंत्री मिळाला असता तर मी त्याला माझं अर्ध राज्य दिलं असतं.' ते म्हणाले. पण ओटाबापा म्हणाले की आता मला नोकरीचा कंटाळा आला आहे. त्यांच्या उदरनिर्वाहार्थ नबाबांनी त्यांना कुटियाना महालाचा कारभारी म्हणून नियुक्त केलं आणि कुटियानात त्यांना अथवा त्यांच्या वंशजांना काही व्यवसाय करायचा असल्यास जकात माफ केली. त्याबरोबर आपण काही तरी कार्यवाही केलेली आहे असं दाखवण्यासाठी नबाबांनी ओटाबापांना काही मिनिटं अनवाणी उन्हात उभं राहायची शिक्षा केली!

अल्पप्रमाणातील कामाच्या या नोकरीमुळे ओटाबापा आरामशीरपणे राहू शकत होते. सकाळच्या वेळी ते आपल्या काठेवाडी घोडीवर दूरवर फेरफटका मारायला जायचे. त्या घोडीवर त्यांचं अतिशय प्रेम होतं. उरलेला वेळ ते आध्यात्मिक चिंतनात घालवायचे. गांधीमंडळी वंशपरंपरेनं वैष्णव संप्रदायी आहे. हा एक भक्तिसंप्रदाय आहे व प्रगाढ प्रेम आणि संपूर्ण आत्मसमर्पण यामुळे जातीपातीचा वा संस्कृतीचा भेदभाव न करता ईश्वर सर्वांना पावू शकतो अशी या संप्रदायाची शिकवण आहे. वल्लभाचार्यांनी काढलेल्या पुष्टिमार्गी वैष्णव पंथात कृष्णभक्तीची शिकवण आहे. प्रेमस्वरूप कृष्णानं दाखवलेल्या भक्तिमार्गाचा अवलंब करून मोक्ष मिळवायची या पंथाची शिकवण आहे. परंतु ओटाबापा मात्र एका खाकीबाबाकडे फार आकर्षित झाले होते. हे खाकीबाबा रामानंद पंथातील होते. पोरबंदर येथे त्यांच्या नावावरसुद्धा एक चौक आहे. त्याला खाकी चौक असं म्हणतात.

रामानंद हे रामानुज पंथातील वैष्णव संप्रदायाचे अनुयायी होते. तो संप्रदाय अतिशय संकुचित दृष्टीचा व जातीपातींच्या बंधनात अडकलेला आढळला. त्यामुळे त्या संप्रदायाची प्रगती खुंटलेली आहे असं रामानंदांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी तो पंथ सोडला आणि चौदाव्या शतकाच्या अखेरीस आपला नवीन पंथ काढला. त्याद्वारे त्यांनी सर्व जातीजमातीच्या व वंशाच्या माणसांसाठी असलेल्या रामाच्या असीम प्रेमाची शिकवण दिली. त्यांच्या बारा शिष्यात चांभार, म्हाली, धोबी, मुसलमान कोष्टी आणि एका स्त्रीचा समावेश होता. त्यांनी केलेल्या धार्मिक

पुनरुज्जीवनाच्या प्रवाहामुळे अनेक भक्तकवी पुढे आले. लक्षावधी लोकांच्या तोंडी ज्यांचं नाव आहे ते गोस्वामी तुलसीदास त्यांच्यातीलच एक आहेत. त्यांनी रामचरितमानस वा तुलसी रामायण लिहून उत्तर भारतातील लोकांना बायबलसारखा पवित्र ग्रंथ दिला. तुलसीदासाच्या भक्तीचा विषय असलेला राम - ज्याला त्यांनी आपल्या भक्तिकाव्यात अमर करून ठेवलं आहे - काही ऐतिहासिक राम नाही. मर्त्य माणूसही नाही, ‘चिरंतन अस्तित्वानं मूर्त रूप धारण केलेला तो राम आहे... वासनाविरहित, निराकार, अजन्मा, विश्वव्यापी आत्मा, सर्वोच्च चैतन्य, सर्वव्यापी, ज्याची छाया म्हणजेच हे जग आहे, ज्यानं अवतार धारण करून अनेक गोष्टी केल्या आहेत, केवळ प्रेमाखातर तो आपल्या भक्तांचं सर्व काही सहन करतो, शरणागतासाठी कृपासागर व दयाळू, गरिबांचा तारणहार, सर्वोत्कृष्ट, सर्व शक्तिमान असा तो रघुराज आहे असं तुलसीदासांनी रामाचं स्पष्टीकरण केलेलं आहे.’

ओटाबापांच्या जीवनाच्या अखेरच्या काळातील बराचसा वेळ ह्या अमर महाकाव्याच्या वाचनात व श्रवणात गेला होता. त्यांचे पुत्र काबा गांधी यांच्या अखेरच्या आजारात याच महाकाव्यानं त्यांचं सांत्वन केलं तसंच त्यांच्या नातवाला, महात्मा गांधींनाही याच महाकाव्याचा आधार वाटला होता.

रुपाली बाचा १८४१ साली मृत्यू झाल्यानंतर राज्याचं प्रशासन राणा विक्मातजींच्या हाती आलं. त्यावेळी जुनागढच्या नबाबांनी आपल्या प्रभावाचा उपयोग करून ओटाबापांना पोरबंदरला परत बोलावण्यासाठी विक्मातजींचं मन वळवलं. नवीन राणांनी ओटाबापांना त्यांची सर्व संपत्ती परत केली आणि त्यांनी दिवाणपदाचा परत स्वीकार करावा म्हणून प्रयत्न करण्यात आला. परंतु ओटाबापांनी नकार दिला. त्यांचा मुलगा करमचंद गांधी आधीच राजाचा स्वीय सचिव आणि लेखनिक म्हणून नोकरीत होता. ओटाबापांनी आपल्या पदावर परत यायला नकार दिल्यानंतर राणांनी करमचंद गांधींना आधी सहाय्यक कारभारी म्हणून व नंतर दिवाण म्हणून नियुक्त केलं. त्यांना जेव्हा दऊत ठेवायची चांदीची बैठक आणि छिद्र असलेलं चांदीचं वाळूपात्र [टीपकागद येण्यापूर्वी अगदी बारीक वाळू शाई वाळवण्यासाठी वापरण्यात यायची] या गोष्टी मिळाल्या, ज्या गोष्टी

पंतप्रधानपदाच्या परंपरागत सन्मानचिन्हासारख्या होत्या, तेव्हा ते अवघे पंचवीस वर्षांचे होते. ते वर्ष बहुधा १८४७ असावं.

### ३

पोरबंदर येथील महात्मा गांधी कीर्तिमंदिरात दोन तैलचित्रे आहेत. एक गांधीजींचे वडील करमचंद गांधी यांचं व दुसरं गांधीजींच्या आईचं पुतळीबाचं. त्यातील पुतळी बाचं चित्र हे कल्पनेनं एका चित्रकारानं पुतळीबाच्या एका नातलगानं केलेल्या वर्णनानुसार काढलेलं आहे. परंतु काबा गांधींचं मात्र मुळातलं आहे. अनेक वर्षांपूर्वी ते चित्र गांधीजींच्या स्वाक्षरीसाठी साबरमती आश्रमात आणण्यात आलं होतं तेव्हा मी ते पाहिलं होतं. काहीसे लठ्ठ, ठेंगणेसे, रुंद खांदे, पांढऱ्या मिशा, शाल पांघरलेली आणि काठेवाडी पगडी घातलेली असं त्यांचं स्वरूप होतं. त्यांची ढब आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्व पाहून पाहणाराला त्यांच्याविषयी आदर वाटत असावा. त्यांची हनुवटी मोठी होती पण फार पुढं आलेली नव्हती. घट्ट मिटलेले, जाड, उठावदार ओठ माणसाच्या तीव्र भावनाशीलतेची आणि निर्धारी व मितभाषी स्वभावाची जाणीव करून देत असत. चेहरेपट्टीवर अधिकारीपणाची आणि अनुभवानं आलेल्या शहाणपणाची छाया होती. त्यातून आत्मविश्वास झळकायचा, पण जवळीक वाटत नसावी. दृष्टी भेदक पण स्थिर होती. प्रेमळ आणि सावध. स्थिर परंतु स्पष्ट असलेली त्यांची दृष्टी समोरच्या माणसाच्या अंतःकरणाचा ठाव घ्यायची.

ओटाबापांच्या सहा मुलातील पाचव्यानं आपल्या वडिलातील सर्व गुण – त्यांची बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा, मुत्सद्दीपणा आणि मनाचा मोकळेपणा इत्यादी - घेतले होते. 'सत्यप्रिय, शूर आणि उदार पण तापट' असं त्यांच्या प्रसिद्ध पुत्रानं त्यांचं वर्णन केलं आहे. ते गुजराती पाचव्या वर्गापर्यंत शिकलेले होते असं म्हणतात. गांधीजींनी माझे सत्याचे प्रयोग या पुस्तकात नोंदवलं आहे की 'त्यांना इतिहास आणि भूगोलाविषयी फारसं ज्ञान नव्हतं पण त्यांचा अनुभव व्यावहारिक गोष्टींनी समृद्ध होता आणि अतिशय क्लिष्ट समस्या सोडवण्यात तसंच

शेकडो माणसांना हाताळण्यात तो चांगलाच उपयोगी पडायचा.' धार्मिक पांडित्य नसूनही त्यांचा धर्माकडे अतिशय ओढा होता. ते साधुसंतांच्या सहवासात नेहमी असायचे. गीतेचा काही भाग त्यांनी पाठ केला होता. तो पाठ ते रोज पूजेच्यावेळी म्हणत. अखेरच्या दिवसात एका पंडिताच्या मदतीनं संस्कृत शिकायला त्यांनी सुरुवात केली. गांधीजींच्या शब्दात 'अनेक हिंदूंप्रमाणे देवळांत जाणं आणि तिथं विविध साधूसंतांची धार्मिक प्रवचनं ऐकणं हे त्यांच्या धार्मिकतेचं स्वरूप होतं.

जवळपास अठ्ठावीस वर्ष ते पोरबंदरचे प्रधानमंत्री होते. या काळात त्यांनी आपलं कर्तव्य एकनिष्ठेनं पार पाडलं. संस्थानाप्रती आपल्या कर्तव्याशिवाय या काळात त्यांनी इतर कशाचाही विचार केला नाही. एकूण पाहता त्यांच्या आयुष्यातील हा काळ अतिशय शांततापूर्ण होता व गांधी कुटुंबियांसाठीही अतिशय भरभराटीचा व समृद्धीचा होता. परंतु अखेरीस संपत्ती चंचल असल्याचं दिसू लागलं. ब्रिटिश अधिकाऱ्यांशी सतत कटकटी व्हायच्या. संस्थानिक आणि त्यांच्या दिवाणाच्या प्रतिष्ठेला त्यामुळे अजूनच ग्रहण लागलं.

ब्रिटिशांनी काठेवाडमधील आपल्या सत्तेचं दृढीकरण करायचं काम ओटाबापांच्या काळापासूनच सुरू केलेलं होतं. १८६७ साली ब्रिटिश न्यायालयांचं अधिकारक्षेत्र वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. आतापर्यंत संस्थानिकांच्या संपूर्ण अधिकारक्षेत्रात असलेल्या काही प्रकरणी संस्थानिकांच्या निर्णयाविरुद्ध अपील करायचा अधिकार देण्यात आला. त्यासाठी पश्चिम विभागाच्या पॉलिटिकल असिस्टंटच्या अंतर्गत अशा प्रकारचे अपील ऐकण्यासाठी एक न्यायालय उघडायचा निर्णय घेण्यात आला. याचा अर्थ होता संस्थानाच्या अधिकारावर अधिक अतिक्रमण. कोणताही स्वाभिमानी राजा वा दिवाण ही गोष्ट सहन करू शकत नव्हता. काबा गांधींना या न्यायालयावर सदस्य म्हणून काम करण्यासाठी पाठवावं अशी विनंती पोरबंदरच्या राणाला करण्यात आली. राणांनी उत्तरात लिहिलं की आमचे दिवाण तापानं आजारी असल्यामुळे त्या ठिकाणी त्यांच्याऐवजी दुसऱ्या माणसाची नियुक्ती करण्यात यावी. यावर कॅप्टन

एच. टी. बरेट, पॉलिटिकल असिस्टंट, पश्चिम विभाग यांच्या वतीनं पुढील निर्णायक आदेश आला:

*या न्यायालयाचं काम १ ऑक्टोबरला सुरू करता यावं म्हणून सन्माननीय करमचंद यांना समितीवर सदस्य म्हणून तुमच्या राज्याच्यावतीनं नियुक्त करण्यात आलं आहे. आम्ही तुम्हांला लिहिलं होतं की त्यांनी राजकोट येथे ३० सप्टेंबर रोजी हजर व्हावं. आता त्यासंबंधी दिनांक २७ सप्टेंबरला पत्र मिळालं आहे. त्यात तुम्ही सांगितलं आहे की काबा गांधी तापानं आजारी असल्यामुळे त्यांच्या जागी मोतीलाल यांना घेण्यात यावं. याच पद्धतीनं तुम्ही नेहमीच काम करत आला आहात. म्हणजे अगदी शेवटच्या क्षणी तुम्ही तुमची जबाबदारी पार पाडायचं नाकारता आणि आमच्या लेखी आदेशांची अवहेलना करता.*

*काबा गांधींचं नाव तुमच्याकडून आल्यानंतर निश्चित करण्यात आलं. आता त्यांच्या ठिकाणी कुणाला पाठवण्याऐवजी तुम्ही दुसऱ्या अशा गृहस्थांचं नाव सुचवत आहात की ज्यांची नियुक्ती वेगळ्या कार्यक्षेत्रात झाली आहे व त्यांना तिथलं काम सोपवायचं आहे. त्या व्यक्तीला मोकळं करायचा अधिकार कोणाचा आहे याचा तुम्ही विचार केलेला नाही. तो तुम्ही करायला हवा होता. एकदा ठरवण्यात आलेली गोष्ट शेवटच्या क्षणी रद्द करण्याचा उपाय शोधणं तुम्ही थांबवलेलं नाही.*

*समितीवर योग्य पद्धतीनं नेमण्यात आलेल्या व्यक्तीसंबंधी अशा प्रकारे नियत तारखेला आलेल्या उत्तरामुळे (कारण समितीला काम सुरू करायचं आहे) समितीला बराच भुर्दंड पडणार आहे. त्यामुळे या विलंबाला कोण कारणीभूत आहे याचाही विचार करावा लागेल.*

*अगदी सुरुवातीलाच अशा प्रकारचे खर्च समितीला करावे लागणार असतील तर समिती काम कसं करू शकेल? अशा प्रकारच्या अडचणींचा विचार करता, आमची इच्छा नसली तरीही,* ***दंड ठोठावणं*** *आवश्यक आहे असं आम्हांला वाटतं. त्यामुळे तुम्हांला सूचित करण्यात येते की काबा गांधी हजर होईपर्यंत दरदिवशी पाच रुपये दंड वसूल करण्यात येईल व ते जर दहा दिवसात हजर झाले नाहीत तर दंडाची रक्कम वाढवण्यात येऊ शकेल.* (ठळक अक्षरं माझी)

असं दिसतं की काबा गांधींना त्यांच्या राणांचा पाठिंबा असल्यामुळे काबा गांधींना कमीतकमी यावेळी तरी वेळ निभावून नेता आली. नंतर हा आधारसुद्धा कोसळला. राणा विक्मातजींचे पुत्र माधवसिंग सिंहासनावर बसणार होते. त्यांना लक्ष्मण खवस या त्यांच्या मित्राच्या सहवासामुळे दारूचं व्यसन लागलं व अतिशय दारू प्याल्यामुळे तो मरण पावला. राणाचं चारित्र्य निष्कलंक होतं पण स्वभाव अतिशय तापट होता. राणाला ही हकीगत जेव्हा कळली तेव्हा राणाचा पारा अतिशय चढला आणि राणानं लक्ष्मण खवसचे कान आणि नाक कापून आणायचा हुकूम दिला. नाक आणि कान कापण्यात आल्यामुळे लक्ष्मण खवसनं आपल्या महालाच्या गच्चीवरून उडी मारली व त्यामुळे झालेल्या जखमांमुळे तो मरण पावला. ब्रिटिश अधिकाऱ्यांना ही गोष्ट जेव्हा कळली तेव्हा त्यांनी राणांना असलेले प्रथम श्रेणीचे अधिकार काढून घेतले व त्यांची पदावनती तृतीय श्रेणीवर केली. त्यानंतर राणानं संस्थानाच्या कारभाराकडे लक्ष न देता धर्मकार्याकडे अधिकाधिक लक्ष घालायला सुरुवात केली. काबा गांधींना अतिशय वाईट वाटलं पण त्यांनी आपलं काम काही वर्षं चालू ठेवलं.

संस्थानिक आणि त्यांच्या नवीन पिढीतील वंशजांचे जमीनजुमल्यासंबंधीचे व जमीनदारीविषयीचे वाद सोडवण्यासाठी अतिशय प्रभावी असं राजस्थानिक न्यायालय १८७३ साली स्थापण्यात आलं होतं. त्यावर ब्रिटिश अधिकारी अध्यक्ष राहणार होता आणि संस्थानिकांनी सुचवलेल्या नावातून शासनानं निवडलेले सहा प्रतिनिधी राहणार होते. या सहांतून अध्यक्ष दोघांना आपल्यासोबत सल्लागार म्हणून बसवणार होता. सप्टेंबर १, १८७३च्या विज्ञप्तीनुसार सहायक राजकीय प्रतिनिधीनं 'क्रुम चंद ओटम चंद'ची संस्थानिकांनी सुचवलेल्या बारा लोकांच्या यादीतून सहा सदस्यात निवड केली. [दामोदरदास सर्क्युलर्स *(अ कलेक्शन ऑफ काठेवार पॉलिटिकल एजन्सीज सर्क्युलर्स)* खंड १, पृष्ठ १००] काबा गांधींना पुढील वर्षी राजकोटच्या दिवाणपदावर काम करण्यासाठी बोलावण्यात आलं तोपर्यंत ते त्या पदावर काम करत होते.

राजकोटचे ठाकोर बावजीराज हे नोव्हेंबर ८, १८६२साली त्यांच्या वडिलांच्या, मेरमानजींच्या, मृत्यूमुळे जेव्हा गादीवर बसले तेव्हा सज्ञान नव्हते. ते अज्ञान असताना राज्याचा

कारभार त्यांची आजी नानीबा १८६७पर्यंत पाहत होती. त्यानंतर तो कारभार ब्रिटिश अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आला. १८७४साली ठाकोर सज्ञान झाल्यानंतर त्यांच्याकडे मर्यादित अधिकार सोपवण्यात आले व सैय्यद हमीदच्या ठिकाणी करमचंद गांधींना त्यांचा कारभारी म्हणून नेमण्यात आलं. त्यामुळे करमचंद गांधींचे भाऊ मोतीलाल यांची पोरबंदरच्या दिवाणपदी नेमणूक करण्यात आली.

पुढील वर्षी काबा गांधींना सीमा समितीवर नेमण्यात आलं. काठेवाडमधील विविध संस्थानातील सीमावाद सोडवण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. कॉलनल जे. डब्ल्यू. वॅटसन - जे नंतर डिसेंबर १८७६ ते जानेवारी १८७७पर्यंत राजकोटचे राजकीय प्रतिनिधी झाले - त्या वर्षी जूनमधे राजस्थानी न्यायालयाचे अध्यक्ष झाले. काबा गांधींनी समितीच्या सदस्यत्वाच्या नात्यानं केलेल्या कामामुळे ते अतिशय प्रभावित झाले. त्यामुळे बावर्जीराजे यांच्याकडे जेव्हा संपूर्ण अधिकार सोपवण्यात आले तेव्हा संस्थानाला कार्यक्षम दिवाणाची गरज भासली. त्यावेळी वॅटसन यांनी काबा गांधी यांच्या नावाची जोरदार शिफारस केली. त्यामुळे काबा गांधींची राजकोटच्या दिवाणपदी वाढलेल्या अधिकारांसह नेमणूक करण्यात आली. (पहा परिशिष्ट ड)

राजकोट राज्याच्या प्रधानमंत्रीपदी असताना काबा गांधींनी प्रामाणिकपणाचा आणि कर्तव्यनिष्ठेचा, तसंच स्वतंत्र बुद्धीनं काम करायच्या आपल्या त्याच गुणांचा प्रत्यय आणून दिला ज्या गुणांचा प्रत्यय त्यांनी पोरबंदरच्या दिवाणपदी असताना आणून दिला होता. त्यांच्या प्रामाणिकपणाची आणि निःपक्षपातीपणाची एवढी ख्याती होती की न्यायाधीश म्हणून त्यांनी दिलेल्या निकालाविरुद्ध अपील करायला कोणी ठाकोरांकडे गेला तर ठाकोर त्याला परत काबा गांधींकडे जायला सांगायचे आणि म्हणायचे की तू तुझं म्हणणं काबा गांधींना पटवून सांग, ते तुला न्याय दिल्याशिवाय राहणार नाहीत याबद्दल विश्वास बाळग.

काबा गांधी काही काळ जेव्हा राजकोटचे दिवाण होते तेव्हा वेंकनेरच्या राजानं राजकोटच्या ठाकोरांना त्यांच्या कार्यक्षम आणि अनुभवी दिवाणाची सेवा मागितली. त्यावेळी

मोहन नऊ वर्षांचा होता व राजकोटच्या शाळेत शिकत होता. वेंकनेर हे राजकोटप्रमाणेच दुसऱ्या श्रेणीचं संस्थान होतं. ते राजकोटच्या उत्तरेला २५ मैल अंतरावर होतं. भ्रष्टाचार आणि कुप्रशासनामुळे त्या संस्थानात गोंधळाची अवस्था निर्माण झालेली होती आणि त्या प्रशासनाला मुळापासून स्वच्छ करायची गरज होती. राजकोटच्या ठाकोरांना आपल्या प्रधानमंत्र्याच्या सेवेची गरज असल्यामुळे ते त्यांना मुक्त करू शकत नव्हते. परंतु शेजारच्या मित्र राज्याची विनंती नाकारता येत नव्हती म्हणून नाइलाजानं त्यांनी वेंकनेरच्या राजाला संमती दिली. काबा गांधींनी २८ एप्रिल १८७८ला वेंकनेर राज्याचा कारभार मुख्य कारभारी म्हणून हाती घेतला. परंतु त्या आधी त्यांनी एक वर्षपर्यंत पूर्वीच्या नोकरीवर आपला पूर्वाधिकार कायम राहील असं लेखी आश्वासन मिळवलं. (पहा परिशिष्ट जी)

मुख्य कारभारी म्हणून वेंकनेरचा कारभार सांभाळण्यापूर्वी काबा गांधींनी आपल्याला नेमके कोणते अधिकार असतील ते स्पष्ट करून घेतलं. त्याशिवाय त्यांनी सांगितलं मी जोपर्यंत माझ्या अधिकार क्षेत्रात काम करत आहे तोपर्यंत मला दैनंदिन कारभारात पूर्ण स्वातंत्र्य असायला हवं. नेमणूक पाच वर्षांच्या करारावर झाली होती. मान्य करण्यात आलेल्या अटींची पूर्तता न झाल्यास दिवाणला राजीनामा द्यायचा अधिकार होता व तशा अवस्थेत राजानं त्यांना ठरलेल्या मुदतीचा पूर्ण पगार द्यावा असा करार होता.

वेंकनेरच्या राजांनी अटी मान्य केल्या. परंतु काबा गांधींनी प्रशासनात आमूलाग्र फेरबदल करायला जेव्हा सुरुवात केली तेव्हा राजेसाहेब ढवळाढवळ करू लागले. हे प्रकरण तेव्हा हातघाईला आलं जेव्हा काबा गांधींनी केलेल्या मालाच्या लिलावास राजेसाहेबांनी मान्यता द्यायला नकार दिला. त्यांचं म्हणणं होतं की लिलावाची अंतिम बोली मान्य करण्याआधी माझी संमती घ्यायला हवी होती. तसं न करण्यात आल्यामुळे आपल्या उपस्थितीत नव्यानं लिलाव करावा असा त्यांनी आदेश दिला. काबा गांधींनी विरोध करत सांगितलं की मी जे काही केलं आहे ते संस्थानाचं हित लक्षात घेऊन केलं आहे. लिलावाची अंतिम बोली मान्य करण्याआधी मी शेजारच्या राज्यापेक्षा आपल्याला किंमत कमी तर मिळत नाही ना याची चौकशी केली होती.

त्यामुळे हा लिलाव आता परत करता येऊ शकत नाही. राजेसाहेबांनी आपला आग्रह कायम ठेवला. त्यामुळे काबा गांधींनी त्यांना निरोप पाठवला की अशा अवस्थेत मी काम करू शकत नाही व त्यामुळे माझ्या परतण्याची व्यवस्था ताबडतोब करण्यात यावी. संस्थानिक आणि त्यांचे अधिकारी टाळाटाळ करू लागले. त्यामुळे त्यांनी सूचित केलं की माझी परतायची व्यवस्था करण्यात आल्याशिवाय मी अन्नपाणी घेणार नाही.

त्यांचा स्वभाव माहीत असल्यामुळे राजेसाहेबांनी त्यांना जाऊ दिलं परंतु पंधरा दिवसांनंतर त्यांनी काबा गांधींना क्षमायाचनेचं पत्र पाठवलं. काबा गांधींनी आपला आग्रह सोडला आणि ते परतले. परंतु राजेसाहेबांचा ढवळाढवळ बंद करायचा कोणताच हेतू नाही असं आढळल्यामुळे त्यांनी कारभार हाती घ्यायला नकार दिला व आपला हिशेब पूर्ण करायला सांगितलं. राजेसाहेब संतापले आणि त्यांनी राजीनाम्याच्या औपचारिक पत्राची मागणी केली. काबा गांधींनी तिथल्या तिथेच राजीनामा लिहून दिला. त्या राजीनामा पत्रात त्यांनी लिहिलं की मला दिवाणपदावर नियुक्त करण्याआधी महाराजांनी काही अटी मान्य केल्या होत्या. परंतु काही स्वार्थी आणि कारस्थानी लोकांच्या सल्ल्यामुळे माझ्या कामासंबंधी मी तोंडी व लेखी केलेल्या तक्रारीकडे कोणतंच लक्ष देण्यात आलं नाही वा स्वतः महाराजांनीच सुचवल्याप्रमाणे या प्रकरणी लवादही नेमला नाही. त्यामुळे राजीनामा देण्याशिवाय माझ्यासमोर कोणताच पर्याय उरलेला नाही. 'फिदवी करमचंदनं' त्यामुळे ताबडतोब आपल्याला पदावरून मुक्त करावं अशी विनंती केली व तसं न करण्यात आल्यास मी ९ ते १९ जानेवारी १८७९च्या दरम्यान राजकोटला परतेन असंही सांगितलं. त्यामुळे तशा अवस्थेत कार्यभार कोणाला द्यावा हे महाराजांनी आपल्या इच्छेनुसार आदेश द्यावा असंही त्या राजीनामा त्यांनी पत्रात लिहिलं.

हे पत्र ८ जानेवारी १८७९ला लिहिलेलं आहे. करारानुसार आपल्याला पाच वर्षांचा संपूर्ण पगार द्यावा अशी त्यांनी मागणी केली. महाराजांना करारभंगाचा उल्लेख राजीनामा पत्रात करणं मान्य नव्हतं. त्यामुळे राजीनामापत्रातील आक्षेपार्ह मजकूर बदलवावा असं त्यांनी सुचवलं आणि सांगितलं की तशा अवस्थेत तुम्हाला पाच वर्षांचा पूर्ण पगार मिळेल. पण काबा गांधी त्यावर

म्हणाले की तो मजकूर वगळला तर राजीनामा पत्राला काहीच अर्थ उरणार नाही कारण राजीनाम्याचं तेच कारण आहे. त्यामुळे महाराजांनी त्या औपचारिकतेला 'सूट' दिली व काबा गांधींनी 'केलेल्या सेवेसाठी' एकूण १०,००० रुपये देऊ केले.

काबा गांधींनी आग्रह धरला की माझा राजीनामा औपचारिकपणे मान्य करण्यात यावा व माझं जे काही घेणं असेल ते एक तर पूर्ण देण्यात यावं वा मुळीच देण्यात येऊ नये. माझं जे काही हक्काचं घेणं आहे तेवढंच मला देण्यात यावं, कृपा म्हणून काहीच नको आहे असंही ते म्हणाले.

महाराजांनी गोडगोड बोलून त्यांना भुलवायचा प्रयत्न केला. 'तुम्हाला एवढी मोठी रक्कम कोणत्याही औपचारिकतेशिवाय देणारा मालक मिळणार नाही. मला कळलं आहे की तुम्हाला तुमच्या मुलाला (मोहनदास करमचंद गांधी) शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवायचं आहे. मी उदारपणानं देत असलेला पैसा त्यासाठी उपयोगी पडू शकेल. त्यामुळे तुम्ही तुमच्या निर्णयाचा तुमच्यासाठी नाही तर तुमच्या मुलासाठी तरी पुनर्विचार करावा.

काबा गांधींनी उत्तर दिलं: ईश्वरानं भरपूर संपत्ती दिलेले विशाल अंतःकरणाचे राजे अजूनही सापडू शकतील परंतु तुम्ही उदारपणानं देत असलेली रक्कमही सत्यासाठी नाकारणारा माझ्यासारखा नम्र सेवक तुम्हाला सहजासहजी सांपडणार नाही.'

नवलराम हे दोघांचेही मित्र होते. त्यांचाच काबा गांधींना वेंकनेरकडे दिवाण म्हणून आणण्यात हात होता. ते म्हणाले : 'राजेलोकांची नाराजी पत्करायचे काय परिणाम होतील ते माहीत आहे?'

यावर काबा गांधी काहीच बोलले नाही. ते आपल्या निर्धारापासून ढळणार नाहीत असं लक्षात आल्यामुळे नवलरामनं काबा गांधींना राजकोटला घेऊन जाणाऱ्या गाडीच्या बैठकीखाली न कळत पैशाच्या पिशव्या ठेवून दिल्या. परंतु त्यातील एक पिशवी तिथं न मावू शकल्यानं ती त्यांनी गवताच्या बिछान्याखाली ठेवली.

गाडीत गादीवर बसताच गादीखाली काहीतरी कडक लागत असल्याचं पाहून काबा गांधींनी आपल्या घरकाम करणाऱ्या विश्वासार्ह नोकराला, पुरुषोत्तमला विचारलं :

‘पेषा हे काय आहे?’

नोकर उत्तरला : ‘मला कसं कळणार? नवलरामला विचारा.’

नवलरामला विचारलं असता तो म्हणाला : ‘महाराजांना विचारा. ही त्यांची इच्छा आहे.’

एक शब्दही न बोलता काबा गांधींनी स्वतः गाडीतील सर्व पिशव्या हलवल्या आणि महाराजांच्या घरासमोरील विटांच्या ओट्यावर महाराजांना परत करण्यासाठी ठेवल्या. त्यानंतरच त्यांचा राजकोटचा प्रवास सुरू झाला.

पुरुषोत्तम आपल्या मालकाच्या नंतरही किती तरी वर्ष जगला. किती तरी वर्षांनंतर त्याच्या स्वतःच्या विनंतीवरून महात्माजींनी त्याला सेवानिवृत्त केलं आणि त्याला भरपूर प्रतिभूती दिली. त्या रकमेच्या मदतीनं त्यानं सौराष्ट्रातील गोसा गावी लहानसं दुकान काढलं.

काबा गांधी गेल्यानंतर राजकोट संस्थानाचं प्रशासन दिवसेंदिवस बिघडतच चाललं होतं. राजकोटचे ठाकोर बावाजीराज यांना काबा गांधी त्यांच्या संस्थानात परतल्याचं आणि त्यांना बरं वाटत नसल्याचं कळलं. लगेच ते त्यांना भेटायला गेले आणि पूर्वीप्रमाणे दिवाणाचं पद सांभाळायची त्यांना विनंती केली. परंतु प्रकृती बरी नसल्याचं कारण काबा गांधींनी सांगितलं. ठाकोरांनी जाताना त्यांना सांगितलं की तुम्ही बरे व्हाल तेव्हा मी तुम्हाला निरोप पाठवीन. परंतु राजेलोक नेहमीच जसे विसरतात तसे ठाकोरही ते सर्व विसरले. राजकीय प्रतिनिधीच्या कार्यालयातच काबा गांधींचे अनेक प्रभावी मित्र होते. ठाकोरांकडून जेव्हा कोणताच निरोप आला नाही तेव्हा त्या मित्रांच्या मदतीनं त्यांनी इतरत्र नोकरी शोधायचा प्रयत्न केला व अखेरीस जुनागढ संस्थानात नोकरी करायचा निर्णय घेतला. परंतु तिथं जायच्या आधी ते परत आजारी पडले. राजकोटच्या ठाकोरांना ते कळलं. त्यांनी परत आपला प्रस्ताव त्यांच्यासमोर मांडला आणि

दिवाणपद स्वीकारायचा आग्रह केला आणि एप्रिल ४, १८७९ साली त्यांना परत दिवाण म्हणून नेमलं.

स्वभावानं लहरी असल्यामुळे ठाकोर अतिशय प्यायचे. प्रत्येकजण त्यांना घाबरायचा. परंतु ते दिवाणाच्या दराऱ्याला घाबरायचे. काबा गांधी जेव्हा यायचे तेव्हा जर ते पीत असले तर ते ताबडतोब मद्याचा तिथला सर्व सरंजाम हलवायला सांगायचे व खोलीतील मद्याचा वास जाण्यासाठी तिला हवेशीर करायचे. एकदा जी हुजूरी करणाऱ्या आपल्या मित्रांबरोबर अजी नदीच्या काठावर फिरायला जात असताना ते त्यांच्या प्रजेतील एका कुलवधूच्या मोहात पडले. त्यांनी तिच्या घरात रात्री बळजबरीनं शिरायचं ठरवलं. पोलीस अधीक्षक काबा गांधींच्या नातेसंबंधातील होता. त्यानं काबा गांधींना त्यासंबंधी कळवलं. काबा गांधींनी त्याला सांगितलं की नोकरी जायच्या भीतीनं पोलीस अधीक्षक म्हणून लोकांच्या जीविताचं, वित्ताचं व अब्रूचं रक्षण करायच्या तुझ्या कर्तव्यात जर तू चुकलास तर तू तुझ्यावर टाकण्यात आलेला विश्वास गमावशील, राजनिष्ठेची तू जी शपथ घेतली आहेस तीही खोटी पाडशील.

नातलगानं त्यांना आश्वासन दिलं: 'मी माझ्या कर्तव्यात कसूर करणार नाही.' त्यानुसार त्यानं ठाकोरांच्या रात्रीच्या भेटीचा धोका असलेल्या घराभोवती पहारा बसवला. ठाकोरांचं टेहळणी पथक शिड्या घेऊन रात्रीच्यावेळी जेव्हा आलं तेव्हा त्यानं त्यांना लागलीच अटक केली आणि कोठडीत टाकलं. दुसऱ्या दिवशी काबा गांधींनी आपल्याला कोणती कार्यवाही करणं भाग पडलं ते महाराजांना सांगितलं आणि त्यांना सूचित केलं की ब्रिटिशांचं कार्यालय शहराच्या परकोटापासून फार दूर नाही. जर तुम्ही तुमच्या चुकीच्या मित्रांच्या नादी लागून तुमचा अनीतीचा मार्ग सोडणार नाही तर तुम्ही संस्थानाला तर बदनाम करालच पण अशा मार्गानं तुमची गादी जायचाही धोका आहे. अशा प्रकारे त्यांनी आपल्या महाराजांची अनेक प्रसंगी आपल्या निर्धारानं, धैर्यानं आणि स्पष्टवक्तेपणानं परिणामांची फिकीर न करता सेवा केली.

असं असतानाही त्यांची आपल्या महाराजांबद्दल एवढी निष्ठा होती की एकदा ब्रिटिश सहायक राजकीय प्रतिनिधी त्यांच्या उपस्थितीत ठाकोरांसंबंधी काही अपमानजनक शब्द

बोलला असता ते आपल्या महाराजांच्या वतीनं धैर्यानं उभे राहिले व त्या प्रतिनिधीशी वाद घातला. चिडलेल्या अधिकाऱ्यानं त्यांना माफी मागायला सांगितलं पण ती गोष्ट त्यांनी झिडकारली. त्यामुळे त्या इंग्रजानं त्यांना अटक करून झाडाखाली काही तास उभं ठेवलं. परंतु अखेरीस दिवाणाचं स्वाभिमानपूर्ण योग्य वर्तन आणि मालकाबद्दलची अढळ श्रद्धा यांचा विजय झाला व माफीची मागणी परत घेण्यात आली व ते दोघं मित्र झाले.

या प्रसंगातील इंग्रज दुसरा तिसरा कोणी नसून पी. एस. व्ही. फिट्झराल्ड होता. तो नंतर काठेवाडच्या राज्यपालाचा राजकीय प्रतिनिधी झाला. तो जेव्हा चिडलेला वा नाराज असायचा तेव्हा तो त्याच्याकडे भेटायला आलेल्या लोकांना बंगल्याबाहेर कडक उन्हात - ज्याला तो मृदूभाषेत लाल तंबू म्हणायचा - ताटकळत उभं ठेवायचा. एकदा काबा गांधी वेळ घेऊन त्याला भेटायला गेले. त्यांनी दरवानाला त्यांच्या येण्याबद्दलची सूचना द्यायला सांगितलं. तो अधिकारी चिडला आणि त्यानं त्या दरवानाला काबा गांधींना लाल तंबूत वाट पाहत उभं ठेवायला सांगितलं. त्या गरीब बिचाऱ्या दरवानानं अखेरीस उन्हात खुर्ची ठेवली आणि बोलावणं येईपर्यंत त्यांना वाट पाहायला सांगितलं. दिवाण त्याला म्हणाले, तुझ्या साहेबाला सांग की काबा गांधी वेळ ठरवून तुम्हाला भेटायला आले होते पण साहेब कामात आहेत असं दिसत असल्यामुळे ते परत गेले. जर साहेबांना माझ्याशी काही खास चर्चा करायची असेल तर त्यासंबंधी ते मला लिहू शकतात. साहेबांचा तिळपापड झाला. त्यांनी काबा गांधींच्या उद्धटपणाची तक्रार ठाकोरांकडे केली. आत्यंतिक व्यसनाधीनता असूनही ठाकोर कणखर स्वभावाचे होते. ते दिवाणाच्या बाजूनं राहिले आणि अखेर ब्रिटिश अधिकाऱ्याला आपल्या दिवाणाची त्यांनी माफी मागायला लावली.

काबा गांधी अतिशय तत्त्वप्रिय होते. त्यांनी श्रीमंतीचा कधीच ध्यास धरला नाही. राजकोटमधे लोकाना राहण्यासाठी जेव्हा जमिनीचं वाटप चालू होतं तेव्हा ठाकोरांनी काबा गांधींना आपल्या खाजगी उपयोगासाठी हवा असलेला प्लॉट सर्वात आधी निवडायला सांगितलं. परंतु हा आपल्याला विकत घ्यायचा प्रयत्न आहे असं काबा गांधींना वाटलं. त्यामुळे त्यांनी त्या गोष्टीला नकार दिला. ठाकोरांनी आग्रह धरला. नातलगांनीही सुरात सूर मिळवला. पण या

सर्वांच्या आग्रहानंतरही केवळ ४०० यार्डचा प्लॉट घेण्यासाठी ते काबा गांधींची संमती मिळवू शकले. आपल्या कुटुंबाच्या मोठ्या आकाराकडे पाहून काबा गांधींनी मोठ्या प्रशस्त प्लॉटची निवड करावी असा महाराजांनी पुन्हा आग्रह धरला. यावर ते म्हणाले की माझ्या पगारासाठी एवढा प्लॉट पुरेसा आहे आणि फुकट जरी मिळत असला तरी त्याचा मोह मी सोडायला पाहिजे. त्यामुळे त्यांनी आपल्यामागे फारशी संपत्ती ठेवली नाही यात काही आश्चर्य नाही.

काबा गांधींची एकामागून एक अशी चार लग्न झाली होती. ते चौदा वर्षांचे असतानाच त्यांचं पहिलं लग्न झालं होतं. दुसरं वयाच्या पंचविसाव्या वर्षी पहिल्या बायकोच्या मृत्यूनंतर झालं. त्यांच्या पहिल्या आणि दुसऱ्या लग्नापासून त्यांना दोन मुली झाल्या होत्या. तिसऱ्या बायकोला भूलच झालं नाही आणि दुरुस्त न होऊ शकणाऱ्या आजारानं अपंग होऊन ती अंथरुणाला खिळून होती. त्यावेळी ते आधीच चाळीशीत पोहोचलेले होते आणि त्यांना मुलगा नव्हता आणि व्हायची आशाही नव्हती. त्यांनी ज्येष्ठ नातलगांचा आग्रह मान्य केला आणि पुन्हा लग्न करायचं ठरवलं. आपल्या बायकोकडे जाऊन त्यांनी त्यासाठी परवानगी मागितली. ती म्हणाली : 'शक्य असेल तर तुम्ही करू शकता. असा कोणी तरी शोधा की जो या वयात आपल्या मुलीचा हात तुमच्या हातात देईल.'

'मी तसं चोवीस तासात करू शकेन, केवळ त्यासाठी तुझी संमती हवी.'

चोवीस तासांच्या आत काबा गांधींचं लग्न जुळलं.

आपल्या वडिलांबद्दल पूर्ण श्रद्धा असूनही यासाठी त्यांचा मुलगा, महात्मा गांधी, त्यांना कधीच क्षमा करू शकला नाही. यासंबंधी आपल्या आत्मचरित्रात उल्लेख करत ते लिहितात : 'चाळीशीत चौथ्यांदा त्यांनी जे लग्न केलं ते काही प्रमाणात शारीरिक वासनांमुळेही केलं असण्याची शक्यता आहे.' प्राप्त परिस्थिती पाहता देण्यात आलेला हा न्याय थोडासा कठोरच आहे असं म्हणावं लागेल.

चौथी बायको पुतळी बा होती. ती जुनागढ राज्यातील दतराणा गावाची होती. तिनंच महात्माजींना जन्म दिला होता. गांधीजी एकदा आठवण करत म्हणाले, 'माझ्या वडिलांना चौथ्यावेळी जेव्हा लग्न करायचं होतं तेव्हा त्यांच्यासाठी त्यांच्या समाजातील अनुरूप मुलगी शोधण्यात त्यांच्या वाढत्या वयामुळे काही अडचणी आल्या असाव्या. परंतु त्याहीपेक्षा अडचण त्यांची आधीची बायको जिवंत होती ही होती. त्यामुळे त्यांना त्यांच्या जातीपेक्षा थोड्या कमी प्रतीच्या जातीतील मुलीशी लग्न करावं लागलं.

काबा गांधींना चौथ्या बायकोपासून तीन मुलं आणि एक मुलगी झाली. सर्वात मोठा मुलगा लक्ष्मीदास उर्फ कालिदास गांधी पोरबंदर संस्थानात खजीनदार झाला आणि नंतर राजकोट येथे वकिलीचा लहानसा व्यवसाय करू लागला. दुसरी मुलगी होती. रळियत नावाची. ती गांधीजींपेक्षा सात वर्षांनी मोठी होती. तिचं लग्न झाल्यानंतर ती सुखी नव्हती आणि लवकरच ती विधवा झाली. तिनं तिचा कर्मठपणा बरीच वर्ष सोडला नव्हता. त्याच कारणामुळे तिचा भाऊ भारतात स्थायिक झाल्यानंतरही ती त्याच्याजवळ राहू शकली नाही. तिच्या भावाचं निधन व्हायच्या काही दिवस आधी तिनं आपल्या वर्तनात जरी नाही तरी मानसिकतेतून कर्मठपणाचा त्याग केला होता. वयाच्या नव्वदाव्या वर्षी पिकलं पान होऊन ती वारली.

तिसरा मुलगा करसनदास होता. दोन किंवा तीन वर्षांनी गांधीजींपेक्षा लहान. तो त्यांच्याबरोबर हायस्कूलमधे शिकला. मोहनदास हा चौथा मुलगा होता. त्याचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. त्यावेळी काबा गांधी ४७ वर्षांचे आणि पुतळी बा २५ वर्षांची होती. ते त्यांच्या आईचे 'मोनिया' होते. त्यांचे वडील त्यांना 'मनू' म्हणून हाक मारायचे.

राजकीय तसंच घरगुती कटकटींमुळे काबा गांधींचे शेवटचे दिवस फारसे सुखात गेले असं म्हणता येणार नाही. आजार काही त्यांचा पिच्छा सोडत नव्हता. ते अंथरुणाला खिळले. सहा महिन्यांनंतर त्यांनी राजीनामा दिला. परंतु ठाकोरांनी तो काही मान्य केला नाही आणि काबा गांधींचं खातं तात्पुरतं त्यांनी स्वतःकडे घेतलं. त्यांच्या आग्रहामुळे काबा गांधी आपल्या अंथरुणावरूनच वर्षभर कामकाजाकडे लक्ष देत होते. परंतु ठाकोरांचा भावकीशी जमिनीबद्दल

काही वाद सुरू होता. त्यात काबा गांधींना ठाकोरांच्या भावकीची बाजू बरोबर वाटली. परंतु ठाकोरांना काबा गांधींचा हा सल्ला पचवणं कठीण गेलं. अखेरीस काबा गांधींनी राजीनामा दिला व ठाकोरांनी तो स्वीकारला. ठाकोरांनी त्यांच्यासाठी ५० रुपये निवृत्तीवेतन मंजूर केलं व ते त्यांना त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १८८६ पर्यंत मिळत होतं.

ज्या युगात महान नीतिमान, अशिक्षित परंतु प्रतिभाशाली भारतीय लोकही आपली भरभराट करून घेऊन भारतात आपला ठसा उठवू शकत होते ते युग काबा गांधींबरोबरच संपलं. त्या काळात ओटाबापा अथवा काबा गांधींसारखे लोक केवळ आपली बुद्धिमत्ता व चारित्र्य यांच्या जोरावर काठेवाडसारख्या लहानशा संस्थानात उच्चतम पदावर पोहोचू शकत होते. भारतातील इतर भागांप्रमाणेच ब्रिटिशांची काठेवाडमधील सत्ता आता बळकट झालेली होती. संस्थानांना निष्ठावंत ठेवण्यासाठी आणि त्यांना साम्राज्याच्या धोरणानुसार वागायला लावण्यासाठी ब्रिटिशांना हव्या असलेल्या गोष्टींपेक्षा इतर कोणत्याही गोष्टीचा विचार न करणारी माणसं ब्रिटिशांना हवी होती. त्या दृष्टीनं इंग्रजी शिक्षणाच्या टाकसाळीतून बाहेर पडलेली माणसं त्यांना उपयुक्त वाटत होती. त्यांना 'डाव्या हातानं सलाम करणाऱ्या' डोकेफिरू माणसांची वा 'सर्व अथवा काहीच नाहीं' असं म्हणणाऱ्या कल्पनारम्य जगात राहणाऱ्या माणसांची गरज नव्हती. अशाप्रकारच्या डॉन क्विक्झोटसारख्या साहसी वृत्तीला काल्पनिक जगातच स्थान मिळू शकत होतं. गांधी घराण्यातील प्रधानमंत्री झालेला अखेरचा माणूस 'आझम ओटमचंद तुलसीदास' होते. ते 'अनेक वर्ष महामहीम पोरबंदरच्या राणांकडे मुख्य कारभारी' पदावर काम करत होते. त्यांना त्यांच्या पदावरून एफ. एस. पी. लेली यांनी ४० रुपये निवृत्तीवेतन देऊन काढलं. तुला जर बढती हवी असेल तर न्यायाधीशांसाठी असलेली परीक्षा [एफ. एस. पी. लेली अमृतलाल तुलसीदास गांधी यांना, दिनांक, सेप्टेंबर २२, १८९०, सुरत] तू उत्तीर्ण व्हायला पाहिजे असा सल्ला त्यांच्या मुलाला, अमृतलाल तुलसीदासला त्याच अधिकाऱ्यानं दिला : 'ब्रिटिश प्रदेशात उच्च पदं परीक्षा उत्तीर्ण होणारांनाच देतात.' [एफ. एस. पी. लेली अमृतलाल तुलसीदास गांधी यांना, दिनांक, कॅम्प माधवपूर, मार्च २९, १८८८] 'तू जर पास झालास

तर मी तुला मामलतदाराच्या पदावर लवकरात लवकर नेमेन. ओटा गांधी वा काबा गांधी हे न्यायालयाच्या परीक्षेला बसले अशी कल्पना तरी करता येऊ शकते!

काळ बदलला होता व बदललेल्या काळाप्रमाणे पद्धतीही बदलल्या होत्या. गांधी परिवारात नंतर आलेल्या मोहनदास करमचंद गांधींना आपल्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा शोध घेण्यासाठी 'नवीन जंगलातील नव्या कुरणाचा' शोध घ्यावा लागणार होता. त्यांचे वडील त्यांच्यासाठी केवळ परकीयांचं स्वामित्व प्रस्थापित व्हायच्या आधीच्या गतकालीन भारताच्या गौरवाचेच प्रतीक झाले नव्हते तर ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या सांस्कृतिक गुलामगिरीचेही प्रतीक झाले होते. त्यांच्या वडिलांना इच्छा असली वा नसली तरीही शासकीय समारोहासाठी ठरवण्यात आलेल्या पोशाखाप्रमाणेच पोशाख कसा करावा लागायचा हे पाहत असताना त्यांच्या मनाला कशा वेदना व्हायच्या याची अनेकदा गांधीजी आठवण सांगायचे. ''राज्यपालाच्या भेटीच्या वेळी दरबारात जायचं असलं की आमच्या घरात अगदी उलथापालथ होऊन जायची. त्यावेळी ज्याला होल बूट म्हणायचे ते बूट आणि मोजे, जे त्यांनी कधीही घातलेले नव्हते, त्यांना घालावे लागायचे. ते नेहमी नरम चामड्याच्या चपलाच पायात घालत असत. माझे वडील जेव्हा पायात मोजे आणि नीट न बसणारे जोडे घालायचे तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असलेल्या वेदना आणि घृणा कशा दिसत असत वा ते किती अस्वस्थ होत असत त्यांचं चित्र मी जर चित्रकार असतो तर काढलं असतं. त्यांना तसं करणं भाग पडायचं.' [*हरिजन*, फेब्रुवारी ३, १९४०, पृष्ठ ४३६] सांस्कृतिक गुलामगिरी थांबवणं ही गांधीजींसाठी स्वातंत्र्याची कसोटी झाली.

# प्रकरण ८ वे

# कहाणी दोन शहरांची

**१**

द्वारका आणि आताआता पोर्तुगीजांची वसाहत असलेलं दीव शहर यांच्यामधील समुद्रकिनाऱ्याचे पदतल अरेबिअन सागर धूत असलेलं दृश्य अतिशय सुंदर आहे. काठेवाड संस्थानाची राजधानी पोरबंदर आहे. १८८३ साली या संस्थानाचं वर्गीकरण 'प्रथमश्रेणी' च्या संस्थानात करण्यात आलं होतं. काठेवाड राज्याचं भारताशी एकीकरण व्हायच्या आधी त्यावर राणा नावाच्या राजाचं राज्य होतं. अकरा तोफांच्या सलामीच्या अधिकाराशिवाय त्यांचा त्यांच्या प्रजेवर निरंकुश अधिकार होता. तिचं जीवनमरण त्यांच्याच हाती असायचं. पोरबंदर एखाद्या चित्राप्रमाणे मैदानी प्रदेशात वसलेलं असून हळूहळू हा प्रदेश उतरत उतरत दूरवरच्या जांभळ्याशा बरडा जंगलाकडे जातो. एकेकाळी त्याच्याभोवती २० फूट रुंदीचा व त्याच प्रमाणात उंचीचा परकोट होता. तिथली घरं शेजारच्या खाणीतून काढलेल्या चुनखडीयुक्त दगडांनी बांधलेली होती. चुनासिमेंटशिवाय बांधलेल्या या भिंतींच्या दगडांची रचना अशा रीतीनं करण्यात यायची की त्यांच्यावर एक पाऊस पडला की ते दगड एकमेकांशी सांधले जायचे. त्यानंतर ते दगड हलवायचे असले वा त्यातून रस्ता तयार करायचा असला तर एखाद्या अखंड दगडाला फोडून काढावं तसं त्या भिंतीला फोडून रस्ता तयार करावा लागत असे. यामुळे काळाच्या ओघात पोरबंदरला मलईसारख्या रंगाच्या संगमरवराच्या दगडातून कोरून काढलेल्या शहरासारखं स्वरूप आलं. त्यामुळेच या शहराला 'पांढरं शहर' म्हणून ओळखण्यात येऊ लागलं.

शहरात राणाच्या मालकीचे जसे अनेक राजवाडे होते तसंच अनेक बागाही होत्या. जुन्या पद्धतीच्या त्या शहरातील नीरस कंटाळवाणेपणाचं दृश्य घालवण्यासाठी क्वचितच एखादं झाड दृष्टोत्पत्तीस येऊ शकत असे. परंतु प्रत्येक घरात दररोज तुळशीची पूजा व्हायची आणि त्यासाठी

घराच्या मागील अंगणाच्या कोपऱ्यात वा फुलदाणीत वा भांड्यात तुळशीचं रोप वाढत असायचं. सायंकाळी त्यांच्या इवल्याइवल्या पानांखाली पणती लावण्यात यायची व तिच्या मंद प्रकाशात तो सर्व परिसर वैष्णवपंथाच्या धार्मिक वातावरणानं भारला जायचा. शहराच्या अनेक जुन्या आठवणी सांगणाऱ्या ठिकाणांप्रमाणेच आता शहराचा परकोटही नाहीसा झाला आहे. रुंद रस्ते व जुन्या इमारतींच्या जागी उभारण्यात आलेल्या नवीन उंच इमारतींमुळे आधुनिक शहर आपल्या आधुनिकतेचा दिमाख मिरवत आहे. परंतु समुद्राच्या काठाजवळील गर्दी असलेल्या बाजारात आणि अरुंद गल्ल्यांतून आजही जुन्या पोरबंदरची थोडीशी झलक दिसू शकते. त्याच्याच मध्यावर गांधी कुटुंबियांचं घर आहे.

पोरबंदरच्या राणांच्या निमंत्रणावरून गांधीजींचं वंशपरंपरागत घर पाहायला १९३६ साली दक्षिण आफ्रिकेतील उदारमतवादी नेते आणि चरित्रलेखक जे. एच. हॉफमायर आले होते. दक्षिण आफ्रिका गुलामगिरीत असताना सेसिल ऱ्होड्सचे सहकारी आणि नंतर त्यांचे विरोधक असलेले जान हॉफमायर यांचे ते जवळचे नातलग होते. त्या ठिकाणाचा काळोखाने भरलेला घाणेरडा परिसर पाहून ते फार व्यथित झाले. त्यांची अपेक्षा होती की तो परिसर भारताच्या महान गौरवशाली पुरुषाशी संबंधित असल्यानं चांगल्या रीतीनं जतन करून ठेवलेला असावा. दक्षिण आफ्रिकेतील प्रतिनिधिमंडळ घेऊन 'तिथल्या लोकांची मैत्री आणि सद्भावना व्यक्त करण्यासाठी' ते आले होते. आपल्या वक्तृत्वानं देशातील लोकांची मनं जिंकण्यासाठी त्यांनी संपूर्ण देशाचा प्रवास केला. सिमला येथे काँग्रेस पक्षाच्या एका समारोहात गांधीजींविषयी आदर व्यक्त करत ते म्हणाले : 'आफ्रिकेत गांधीजींना जागतिक कीर्तीचा महापुरुष मानण्यात येते.' [पी. एस. जोशी, *द टायरनी ऑफ कलर*, इ. पी. अँड कमर्शिअल प्रिंटिंग कंपनी लि., डरबन (दक्षिण आफ्रिका) (१९४२) पृष्ठ २१३] गांधीजींविषयी आपण आधी काय म्हणालो त्याचा उल्लेख करत ते उद्गारले : 'तुम्हा लोकांना या महापुरुषाच्या महानतेची फारशी ओळख नाही असं दिसतं. दुसऱ्या एखाद्या देशात अशा महान... माणसाच्या स्मृती जपण्यासाठी लक्षावधी रुपये खर्च करण्यात आले असते. या माणसानं या देशासाठी काय केलं आहे याची तुम्हा लोकांना फार कमी कल्पना आहे. चिरंतन स्मरण राहील अशा रीतीनं त्यांच्याशी संबंधित आठवणी जपल्या पाहिजे.'

पोरबंदरचे व्यापारसम्राट शेठ नानजी कालिदास - ज्यांनी एक कोटीहून अधिक रक्कम परोपकाराच्या कामासाठी दानात दिली होती व ज्यांचा दानशूरपणा केवळ गांधीजींवरील श्रद्धेमुळे वाढला होता - यांना त्यांचे शब्द झोंबले. महात्माजींचं वंशपरंपरागत घर व त्याच्या आजुबाजूची जागा महात्माजींच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाची राष्ट्रीय आठवण म्हणून जतन करून ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करून त्यांनी विकत घेतली. यासाठी त्या घरावर हक्क असणाऱ्या २९ वारसदारांना त्यांनी जवळपास ७५००० रुपये दिले. त्यांनी आपल्या खर्चानं तिथं मूल्यवान महात्मा गांधी कीर्तिमंदिर बांधलं.

ह्या मंदिराची इमारत भव्य असून तिला चोहोकडून मनोरे आणि कळस आहेत. तिच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ प्रशस्त संगमरवरी अंगण असून तिच्या सभोवती संगमरवरी ओसरी आहे. तिला गांधीजींच्या लेखनातील महत्त्वाचे उतारे असलेले २६ संगमरवरी खांब आहेत. त्या इमारतीत गांधीजींची थोडीशी पुस्तकं, त्यांच्या आठवणीच्या काही गोष्टी व त्यांच्या विविध विधायक कार्याचं छोटंसं जिवंत संग्रहालय आहे. या इमारतीच्या एका बाजूला लागूनच श्रीनाथजींची हवेली म्हणजे भगवान श्रीकृष्णाचं वैष्णव मंदिर आहे. ते गांधीजींचं वंशपरंपरागत घर होतं. खरेदीखतावरून दिसतं की ते घर १७७७ साली हरजीवन गांधींनी, गांधीजींच्या पणजोबांनी, ५०० कवड्यांना (अंदाजे १६५ रुपयांना) एका ब्राह्मण बाईकडून विकत घेतलं होतं. मूळ खरेदीखत गुजरातीत असून अजून ते चांगल्या रीतीनं जपून ठेवण्यात आलेलं आहे. त्यावर राणाचा शिक्का व स्वस्तिकची खूण आहे. स्वस्तिकची खूण राणांना लिहिता येत नव्हतं म्हणून आहे ! शिवाय त्यावर सात साक्षीदारांच्या सह्या आहेत.

अनेक बदल करण्यात आलेलं हे घर कीर्तिमंदिराचा भाग आहे. ते घर म्हणजे लहानशा चौकाच्या तीन बाजूला बांधलेली तीन मजली भव्य इमारत आहे. त्यातील खोल्या लहान, ठेंगण्या छपराच्या व वारा आणि प्रकाश न येऊ शकणाऱ्या आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात त्या अतिशय गरम व्हायच्या. त्या सामानानं गच्च भरलेल्या असायच्या. अशी एक गोष्ट सांगतात की एकदा

एक मोलकरीण धुपेल म्हणजे सुगंधी तेल तयार करत असताना त्याच्या धुरात गुदमरून मरण पावली.

याला अपवाद म्हणजे वरच्या मजल्यावरील खोली. तिच्यात भरपूर प्रकाश असून समुद्राकडील वारा तिच्यात सारखा वाहत येत असतो. त्या खोलीत ओटाबापा रोज पूजा करत असत. जसजसं कुटुंब वाढत गेलं तसतशा नवीन खोल्या बांधण्यात येऊन इमारतीच्या मजल्यात भर पडत गेली. तिसऱ्या मजल्यापर्यंत जेव्हा बांधकाम आलं तेव्हा लक्षात आलं की पाया तिसऱ्या मजल्यावरील दगडांचा भार सहन करू शकणार नाही आणि म्हणून दगडांच्याऐवजी लाकडाचा उपयोग करण्यात आला.

या इमारतीच्या तळमजल्यावर साडेएकोणीस फूट लांब, तेरा फूट रुंद आणि अकरा फूट उंच अशी एक खोली आहे. तिचं मूळ स्वरूप असं होतं की भरदुपारीही तिच्यात इतका अंधार असायचा की कृत्रिम प्रकाशाशिवाय तिथं दिसणं कठीण व्हायचं. तिलाच जोडून डाव्याबाजूला एक लहानसं स्वयंपाकघर होतं. त्यात मुश्किलीनं दोन माणसं मोकळेपणानं बसू शकत होती. हीच ती खोली होती की जिच्यात गांधीजींच्या आईनं, पुतळी बानं, संपूर्ण आयुष्य घालवलं. याच खोलीच्या उजव्या बाजूला शिरलं की अजूनच एक लहानशी खोली आहे. तिच्यात लक्ष्मी मा, गांधीजींची आजी आपल्या सहाव्या मुलाला, तुळशीदासला घेऊन राहत होती. गांधीजींची आजी जिवंत असतानाच त्या काळोख्या खोलीत पुतळी बानं गांधीजींना जन्म दिला होता.

या इमारतीमागील काही घरं ओलांडून आपण पुढं गेलो की तेवढंच काळोखानं भरलेलं, हवेचा प्रवेश नसलेलं, तेवढंच मोठं अजून एक घर लागतं. हेच ते घर आहे की जे कस्तुरबांचं - लहानशा मोहनच्या बालवधूचं - माहेर होतं.

गांधीजींचा जन्म ज्या खोलीत झाला होता त्या खोलीच्या समोरील ओसरीच्या खाली - जी घराच्या तिन्ही बाजूंसमोर होती - पावसाच्या पाण्याच्या साठ्यासाठी एक मोठं टाकं बनवण्यात आलेलं होतं. हे टाकं २० फूट रुंद आणि १५ फूट खोल होतं व त्यात २०,००० गॅलन पाणी मावू शकत असे. ह्या पाण्याचा उपयोग घरगुती वापरासाठी करण्यात यायचा. पोरबंदर हे

समुद्रकाठाशी असल्याकारणानं तिथल्या विहिरीचं पाणी किंचित खारट व जड होतं. स्वयंपाकासाठी त्याचा उपयोग करता येत नसल्यामुळे पावसाचं पाणी गोळा करण्यात येऊन त्याचा बाराही महिने उपयोग करण्यात येत असे. मान्सूनचा पहिला पाऊस यायच्या आधी गच्ची स्वच्छ झाडून आणि धुऊन काढण्यात येत असे. सरळ टाक्यात जाणाऱ्या एका पाईपद्वारे तिच्यावर पडलेल्या पावसाचं पाणीच बारमाही उपयोगासाठी गोळा करण्यात येत असे. या पाईपच्या तोंडाशी चुन्याचा एक ढीग असायचा. त्यातून निचरून शुद्ध होऊन ते पाणी टाक्यात जात असे.

या घरात गांधी कुटुंबाच्या पाच पिढ्या राहिल्या, वाढल्या आणि समृद्ध झाल्या. अंधाऱ्या, आरोग्यास फारशा हितावह नसणाऱ्या याच घराच्या वातावरणात राहूनही त्या पिढ्यांतील माणसं म्हातारी होईपर्यंत जगली. ज्या घरात ती राहत होती त्या घराप्रमाणेच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या ती सुदृढ, बलवान व चारित्र्यसंपन्न झाली होती. संयुक्त हिंदू कुटुंबातील परंपरेप्रमाणे ती सर्व एकाच घरात राहिली आणि घरट्यातील मधमाशांप्रमाणे त्या सर्वांनी त्या घरातील सुखदुःखात सारखाच वाटा उचलला. प्रत्येक कुटुंबाला राहायला वेगळा भाग व वेगळं स्वयंपाकघर असायचं. परंतु सणवाराला वा इतर महत्त्वाच्या कार्यप्रसंगी सर्व एकत्र जेवत. इतकंच नाही तर सर्व कुटुंबांच्या गाद्या आणि उशा इत्यादी अंथरुणाचं साहित्य एकत्रित ठेवण्यात येत असे व ज्याच्या जे हाती लागेल ते तो वापरत असे. प्रत्येक वापरानंतर त्यांना स्वच्छ धुण्यात येत असे व पुन्हा त्यांना खोलीत भरून ठेवण्यात येत असे. त्या सोनेरी काळात पैसा कमी होता पण जीवनावश्यक वस्तू भरपूर होत्या. घरातील प्रत्येकाच्या आवश्यक गरजा योग्य रीतीनं पूर्ण होतील याची कुटुंबप्रमुख काळजी घ्यायचा.

काबा गांधींचं कुटुंब मोठं होत. त्यांच्याबरोबर जेवायला बसणारांची संख्या वीसपेक्षा कमी नसायची. त्यात केवळ घरातील माणसांचाच समावेश नसायचा तर पाहुणेराहुणे, सचिव आणि त्यांच्या कार्यालयात काम करणारांचाही त्यात समावेश असायचा. त्यांच्या घरातील लोक

आणि ही सर्व मंडळी मिळून त्यांचं एक 'विशाल कुटुंब' व्हायचं. ह्याच गोष्टीचा त्यांच्या मुलाला, महात्माजींना वारसा मिळाला.

हा सर्व घरसंसार चालवायची पुतळी बा. सर्वात आधी उठणारी आणि सर्वात नंतर झोपणारी ती आदर्श गृहिणी होती. घरातील सर्व लहानथोरांना जेवू घातल्यानंतर जे काही उरेल ते ती खायची. असं असतानाही ती नेहमी आनंदी आणि हसतमुख असायची. तिनं आवाज चढवलेला कोणीच ऐकला नाही. तिनं आपल्या मुलांत आणि घरातील इतर मुलांत कधीच भेदभाव केला नाही. तिच्या लहानग्या मुलाला, महात्माजींना यातूनच स्त्रीमुक्तीचा मार्ग सापडला. सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आणि सामुदायिक जीवनातील विविध प्रयोग करण्यासाठी गांधीजींनी याच आधारावर आपल्या आश्रमातील स्त्रियांना प्रशिक्षित केलं.

तिच्या आवडीनिवडी अतिशय साध्या होत्या. तिचे कपडे साधे असायचे. ती काठेवाडी साडी नेसायची व मागे बंद असलेली अर्ध्या पोटापर्यंत येणारी चोळी घालायची. ती अतिशय कमी दागिने घालायची. काही खास प्रसंगी नथ, केवळ काठावरून ज्यांचा हस्तिदंती भाग दिसायचा अशा जुन्या पद्धतीच्या चार ते पाच इंच रुंदीच्या व वरून सोन्यानं मढवलेल्या बांगड्या, आणि तीन हजार वर्षांपूर्वी तक्षिलात घालत तसे चांदीचे जाड कडे ती घालायची. एकदा गांधीजींनी तक्षिलाच्या प्राचीन ठिकाणाला भेट दिली असता तिथल्या पुराणवस्तूसंग्रहालयाच्या प्रमुखानं एक कड्यांची जोडी दाखवली असता गांधीजी निःश्वास टाकत म्हणाले होते, 'माझी आईही असेच कडे घालायची. गळ्यात ती तुळशीमाळ घालायची. तिचा चेहरा प्रेमळ होता. समोरचे थोडे पुढे आलेले रुंद दात तिच्या हसण्याला अजूनच गोडवा आणत.

आजच्या अर्थानं अशिक्षित असलेल्या पुतळी बाची हुशारी आणि तिचं चारित्र्य या दोन्ही गोष्टी उल्लेखनीय होत्या. संस्थानाच्या कारभारात तरबेज असलेली स्वतः राणी माही अनेकदा तिला महत्त्वाच्या राजकीय प्रश्नाच्या सल्लामसलतीसाठी दरबारगढमधे बोलवायच्या. त्या काळात बायांना जर दरबारगढमधे जायचं असलं तर भडक रंगाच्या कपड्यात सजूनधजून त्या तिथे जात असत. परंतु माझी आई मात्र तिथंही नेहमीचे साधे कपडे घालूनच जात असे असं

गांधीजींनी सांगितलं. अनेकदा ती गांधीजींना आपल्यासोबत घ्यायची. गांधीजींच्या आईसंबंधीच्या बहुतेक आठवणी या काळातील आणि तिथे कानावर पडणाऱ्या संभाषणासंबंधीच आहेत.

कुटुंबप्रमुख असलेले काबा गांधी आपल्या वंशातील सर्वांच्या कल्याणाची काळजी घेत. त्यांची लग्नं करणं, त्यांच्यासाठी नोकरी पाहणं आणि जीवनात स्थिरस्थावर होण्यासाठी त्यांना मदत करणं आदी सर्व गोष्टींकडे तेच लक्ष देत. शिवाय पुतळी बाला घरगुती कामातही ते मदत करत. श्रीनाथजींच्या मंदिरात बसून आपल्या बायकोच्या स्वयंपाकासाठी भाजी निवडत वा चिरत भेटायला येणारांशी संस्थानाच्या महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधी चर्चा करत बसलेलं त्यांना पाहिल्याच्या अनेकांच्या आठवणी आहेत. गांधीजींच्या आश्रमाला भेट देणारांना आश्रमाच्या सामुदायिक स्वयंपाकघरासाठी भाजी वगैरे चिरण्याच्या कामात गांधीजींनी बोलावलं असल्याची आठवण हे वाचून अनेकांना येईल.

सामुदायिक जीवनात एकमेकांशी कसं वागावं याचं प्रशिक्षण संयुक्त कुटुंब पद्धतीत माणसाला सहज मिळतं. हे कुटुंब कसं चालवावं यासाठी काही कोणती लिखित घटना नसते. तिथं केवळ नैतिक वा प्रेमाचा कायदाच काम करत असतो. विविध आवडीनिवडींचे, सवयींचे आणि स्वभावांचे अनेक लोक जेव्हा थोड्याशा जागेत दिवसेंदिवस, आठवडेंआठवडे, महिनोंगणती आणि वर्षानुवर्षं एकत्र कोंबले जातात तेव्हा वातावरण निरोगी ठेवण्यासाठी विशेषत्वानं कुटुंबप्रमुखाला काही कमी कौशल्य, हळुवारपणा आणि मुत्सद्दीपणा लागत नसतो. कुटुंबातील सदस्यांनाही परस्परांना मदत करणं, एकमेकांशी आदरानं वागणं, एकमेकांसाठी खस्ता खाणं, एकमेकांच्या लहरी सांभाळणं आदी गोष्टी शिकाव्या लागतात. एखादा मूर्खपणाचा उद्गार, चूक वा दुर्लक्ष, धसमुसळेपणाची सवय, दुसऱ्याच्या भावनांकडे दुर्लक्ष करणं वा त्यांची फिकीर न करणं अशासारख्या कोणत्याही गोष्टीमुळे घरातील वातावरणात तणाव निर्माण होऊ शकतो व त्यामुळे सर्वांचंच जीवन नरकासारखं होतं. या लहानशा जगात तीव्र स्पर्धा असते, एवढंच नाही तर लहानांनाही तिची धार जाणवते. लहानशा गोष्टी मोठं रूप धारण करतात,

अन्याय वा भेदभावाची थोडी जरी जाणीव झाली तरी त्यामुळे मत्सर, कटकटी व क्षुद्र भांडणं सुरू होतात. ते सर्व मिटवण्यासाठी असीम शांतपणा, समयसूचकता आणि हुशारी आदी गुण हवे असतात.

दैनंदिन जीवनातील बारीकसारीक घटनांचा सूक्ष्म आणि तपशीलवार विचार करून संयुक्त कुटुंबात वागावं लागत असतं. तसं न केल्यास शांततेऐवजी असमाधान आणि सुखाऐवजी काळज्याच नशिबी येतात. लहानात लहान गोष्टीचा सविस्तर विचार आणि त्यानुसार संपूर्ण वर्तन या दोन आधारावरच संयुक्त कुटुंब आधारलेलं असतं. असं दिसतं की गांधीजींनी हे गुण सरळ आपल्या वडिलांकडून घेतले असावे. त्याचप्रमाणे आपल्या सत्याच्या प्रयोगासाठी सामुदायिक जीवनात सतत प्रयोग करायची इच्छा, मानवसमाजासाठी केवळ जगण्याचीच नाही तर मानवसमाजात राहायची तळमळ आणि त्या दृष्टीने नंतरच्या काळात आश्रमजीवनाच्या बारीकसारीक बाबींसाठी त्यांनी दिलेला वेळ आणि घेतलेली काळजी या गोष्टींचं बीजारोपण त्यांच्या अगदी बालपणी अवतीभवती असलेल्या संयुक्त कुटुंब पद्धतीच्या परंपरेतूनच झालं असावं.

केवळ एवढ्यातून महात्म्याची निर्मिती होऊ शकली नसती. मुत्सद्दीपणा, व्यावहारिक शहाणपण आणि उच्च नैतिक वर्तन या सहा पिढ्यांपासून चालत आलेल्या परंपरांचा त्यांच्या पूर्वजांकडून वारसा मिळाला नसता व तो त्यांच्या हाडीमासी खिळला नसता; तसंच हिंदू संयुक्त कुटुंबातून मिळणारं चातुर्य आणि समंजसपणा यामुळे त्यांच्यात परिपक्वता आली नसती आणि त्यांच्या श्रेष्ठ पूर्वजांच्या, वैशिष्ट्यानं त्यांच्या संत प्रवृत्तीच्या आईच्या आणि पवित्र आजीच्या जीवनातून कधीही जुन्या न होणाऱ्या भारतातील हिंदू धर्माच्या परंपरेची अभिव्यक्ती झाली नसती तर आपल्याला माहीत असलेले गांधीजी घडले नसते.

## २

काबा गांधींचं आपल्या मुलांवर फार प्रेम होतं. मनू त्यांचा लाडका होता. त्याचा चेहरा प्रफुल्लित आणि गोड होता, केस थोडेसे कुरळे, कपाळ रुंद तेजस्वी, नाक धारदार आणि डोळे आकर्षक होते. इतर मुलांप्रमाणे ते त्याला रडू देत नसत. त्याच्या हसण्याचा आवाज किनरा होता. प्रत्येकाला त्याला कुरवाळावंसं वाटायचं.

आईवडिलांचं या लहानग्यात अतिशय मन होतं. परंतु काबा गांधी आपल्या संस्थानाच्या भानगडीत व्यस्त असत तर आई पुतळी बाला घरातील कामकाजातून व जबाबदाऱ्यातून त्याच्याकडे पाहायला क्वचितच वेळ मिळायचा. त्यामुळे त्यांचा सांभाळ करायची जबाबदारी घरातील इतर सदस्यांवर, विशेषत्वानं पुतळी बाच्या सासरच्या मंडळींवर पडली.

त्या कुटुंबातील ज्या कुणावर त्याची जबाबदारी पडायची त्यात मुख्य होती रळियत उर्फ गोकी बेन, गांधीजींची बहीण. लाडानं तिला फाई बा म्हणजे आत्या म्हणत असत. ती बहुधा मोनियाला झोके द्यायची. काही दिवसांपूर्वी राजकोट येथे मी तिला भेटलो असता तिला त्यांचे बालपणाचे दिवस चांगले आठवत होते. 'असं म्हणता येईल की मोनिया माझ्या मांडीवरच वाढला.' आठवत ती पुढं म्हणाली : 'मी बाहेर फिरायला जात असले की त्याला कडेवर घेऊन जात असे. माझ्या कडेवरून तो खाली पडेल की काय अथवा त्याच्याकडे लक्ष न राहिल्यानं मी त्याला कुठे विसरणार तर नाही याची आईला सतत काळजी वाटत राहायची. मोनिया पाऱ्याप्रमाणे चंचल होता व तो क्षणभरही स्वस्थ बसू शकत नसे. तो एक तर खेळत असे वा भटकत असे. गाई, म्हशी, घोडे, कुत्री, मांजरी इत्यादींची रस्त्यातील गंमत दाखवण्यासाठी मी त्याला सोबत नेत असे. तो सतत काही ना काही विचारत असे. पाहताच तो प्राण्यांजवळ जायचा आणि त्यांच्याशी मैत्री करायचा प्रयत्न करायचा. कुत्र्याचे कान पिळायचा त्याला फार छंद होता.'

उत्सव वगैरे असायचे तेव्हा रस्त्यावरील गर्दीत मोनिया भटकून कुठे हरवणार तर नाही याची काळजी घ्यावी लागायची. एकदा त्याच्या बहिणीनं त्याला मोलाकतच्या सणासाठी बाहेर नेलं. हा सण आषाढात येत असतो. त्यावेळी पौर्णिमेच्या आधी चार दिवस तरुण मुली मीठ न

खायचं व्रत घेत असतात. शेवटच्या दिवशी आनंदोत्सव चालू असतो. जेवणावळी होतात आणि रात्रभर नाच, गाणी चालत असतात. मुलींचे घोळके केसात वेण्या माळून आनंदानं मजेत सर्व शहरभर इकडे तिकडे बागडत जात असतात. लहानग्या मोनियानं आपल्या बहिणीची नजर चुकवली आणि एका घोळक्यामागे तो जाऊ लागला व अशा रीतीनं तो शहरात हरवला. तिन्हीसांजा झाल्या असताना एका मुलीनं त्याला घरी आणून पोहोचवलं. तो खाऊ शकत नव्हता व घशात जळजळ होत असल्याची त्यानं तक्रार केली. कारण विचारलं असता त्यानं सांगितलं की त्यानं एका झाडाखाली पडलेली काही फुलं वेचून खाल्ली.

घाबरलेल्या आईनं विचारलं ‘कोणती फुलं?’

‘मला माहीत नाही,’ मोनिया उत्तरला.

ताबडतोब एका वैद्याला बोलावण्यात आलं. त्यानं विषाचा उतार होणारं औषध दिलं आणि घशाला काही लेपही लावला. त्याच्या वडिलांनी नंतर मोनियाला कधीच एकटा न सोडायची सूचना दिली आणि खास त्याला पाहण्यासाठी रंभा नावाची एक दाई ठेवली. याच रंभेला गांधीजींनी आपल्या आत्मकथेत अमर केलं आहे. गांधी कुटुंबाबरोबर ती मृत्यूपर्यंत राहिली. तिचा मृत्यू गुदमरल्यामुळे झाला असं सांगतात.

मोनियाला घराबाहेर खेळायला फार आवडत असे. जेव्हा त्याला भूक लागायची तेव्हाच तो घरी यायचा आणि जेवण होतं नाही तोच तो बाहेर पळायचा. काहीही केल्या त्याच्या उत्साहाला दाबणं शक्य होत नसे. त्याच्या वडिलांच्या हजेरीत तो थोडा दबून राहत असे, पण काबा गांधींची पाठ वळताच तो घरात धुडगूस घालत असे. वडिलांच्या पूजाघरात जर प्रवेश मिळाला तर पूजेसाठी उपयोगात येणारी सर्व भांडी तो जमिनीवर इतस्ततः फेकून द्यायचा, ठाकूरजींची मूर्ती तिच्या ठिकाणावरून हलवायचा व त्या आसनावर स्वतः बसायचा. तो थोडा मोठा झाला तेव्हा जमिनीवर काही तरी खरडायचा आणि ‘लिहायची’ नक्कल करायचा. तो घरातील मोठ्या माणसांना ‘लिहितांना’ पाहायचा मग त्यानंही का ‘लिहू’ नये? जागा खराब होत

असल्यामुळे त्याची आई त्याला अडवायचा प्रयत्न करायची पण त्याकडे मुळीच लक्ष न देता त्याचं 'लिहिणं' चालूच राहायचं.

केव्हाकेव्हा तो आपल्या आईकडे वर जायचा आणि म्हणायचा : 'आई आज मी घेडाला हात लावला.' त्यावर अधिक विचारलं की तो म्हणायचा : 'नाही आई, मी गंमत करत होतो.'

हट्टी आणि आपलंच चालवणारा मोनिया नेहमी आपलाच हट्ट पुरवायला लावायचा. त्यांच्या घराच्या आजुबाजूला असलेल्या मंदिरात हिंडणं त्याला फार आवडत असे. झाडावरून वा मंदिरातील विहिरीत पडू नये यासाठी रंभेला त्याच्याकडे लक्ष ठेवण्यासाठी पाठवण्यात येत असे. पण मोनियाला त्याच्या मागे मागे गेलेलं अगदीच खपत नसे. त्याचे वडील त्याला म्हणायचे : 'तुझ्या फिरण्यावर बंदी आणण्यासाठी तुझ्यामागे रंभा नसते तर तू कुठं हरवू नये म्हणून ती तुझ्यामागे असते.' पण मोनियाचा आक्षेप कायमच असायचा. अखेरीस त्याला न दिसता त्याच्यावर लक्ष ठेवायला रंभाला सांगण्यात यायचं.

तो अतिशय शांत स्वभावाचा होता. मोनियानं आपल्याला मारलं अशी तक्रार एकाही मुलानं कधीच केली नाही. पण कधी कधी इतर मुलांनी मारल्यामुळे तो घरी रडत यायचा. वडिलांकडून वा आईकडून सांत्वनपर प्रेमाचे शब्द वा थोडासा लाड त्या गोष्टीचा विसर पाडायला पुरेसा असायचा.

त्याला घरात एकटं सोडून घरातील लोक जेव्हा देवदर्शनाला जायचे तेव्हा ती वेळ त्याच्यासाठी अत्यानंदाची असायची. इतर सर्व गोष्टी सोडून तो पेरूच्या झाडावर चढायचा व त्याच्या फांद्यांवरून घसरत खाली यायचा. वडिलांनी त्याबद्दल काही म्हणताच त्याचं स्पष्टीकरण तयारच असायचं : 'बाबा, पिकलेले पेरू पक्ष्यांनी खाऊ नये म्हणून मी केवळ कापडात बांधून ठेवत होतो.' काही वेळा त्याचा मोठा भाऊ त्याचे पाय धरून त्याला खाली ओढायचा. त्यावेळी रडतरडत तो आपल्या आईजवळ तक्रार करत यायचा.

आई म्हणायची : 'मग तूही त्याला तसंच कर. नाराजीनं मोनिया म्हणायचा : 'आई, तू मला माझ्या वडील भावाला मारायला शिकवतेस? मी त्याला परत का मारू?'

भावाबहीणीत जेव्हा भांडणं व्हायची तेव्हा आई म्हणायची : 'तुमचं तुम्ही आपसात मिटवा. तुझा भाऊ तुला मारत असेल तर तूही त्याला परत मार.' उत्तरात मोनिया म्हणायचा : 'मग त्याला मला मारू दे. मी त्याला मारणार नाही.' आणि मग विचार करत म्हणायचा : 'आई मला माझ्या भावाप्रमाणेच वागायला सांगण्याऐवजी तू त्याला मला न मारण्याविषयी सांगू शकत नाहीस काय?' दिङ्मूढ होऊन आई मोनियाला छातीशी घ्यायची आणि म्हणायची : 'अरे मोनिया, हे सर्व तू कुठे शिकलास? कोण शिकवतं तुला हे सर्व?' आणि मग दैवानं तिच्या लहानग्याच्या नशिबी काय लिहिलं आहे याचं ती आश्चर्य करत बसायची.

मोनियाला खेळायची आवड होती पण तो आपला अभ्यासही मन लावून करायचा. तो जे काही करायचा ते तो नीट आणि व्यवस्थित करायचा. तो जेव्हा अभ्यासाला बसायचा तेव्हा तो आपल्या खोलीचं दार बंद करून घ्यायचा व अभ्यास संपेपर्यंत कुणालाच मग खोलीत प्रवेश नसायचा. इतर अनेक मुलांप्रमाणे त्यानं कधीच शाळा बुडवली नाही. उशीर होऊ नये म्हणून अनेकदा तो शाळेत उपाशीच जायचा. त्याची बहीण आठवत सांगायची: 'अगदी शाळा उघडायच्या आधी तो धावपळ करत यायचा आणि विचारायचा, 'माझं जेवण तयार आहे काय?' आम्ही त्याला सांगायचो, 'भाजी होतच आली आहे, आणि तू जरा धीर धरशील तर पोळी आता टाकून देते.' पण तो म्हणायचा 'मी जर थांबलो तर मला शाळेला उशीर होईल व मी वर्गात मागे पडेन.' तो दही मागायचा आणि दही खाकरा व लोणचं जेवून शाळेत पळ काढायचा. तो शाळेतून सायंकाळी पाच वाजता जेव्हा परत यायचा तेव्हाच त्याला चारीठाव जेवण मिळायचं.'

मोनियाच्या आवडीनिवडी अतिशय साध्या होत्या. दिवाणांचं घर विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांनी आणि मिठायांनी भरलेलं असायचं. परंतु मोनिया मात्र दही ढोकळ्यावरच खूष असायचा. आंबटगोड आंब्याचं लोणचं त्याला फार आवडायचं. दही, ढोकळे आणि आंब्याचं लोणचं खाल्लं की त्याला फार कमी भूक राहायची. त्यामुळे जेवणाच्या वेळी कदाचित भूक

नसल्यामुळे म्हणा वा शाळेला उशीर होत असल्यामुळे म्हणा तो जेवणाची टाळाटाळ करायचा. त्याच्या वडिलांना त्यामुळे काळजी वाटायची. ते त्याला सांगायचे: 'अशानं भागणार नाही. नियमित गरम जेवण केल्याशिवाय काम चालू शकत नाही. यामुळे तुझी तब्येत बिघडेल. तुझं जर असंच चालू राहणार असेल तर तुझी न्याहरी मला बंद करावी लागेल. तुला उशीर होत असेल तर आपला टांगा तुला शाळेत घेऊन जात जाईल.' पण मोनिया म्हणायचा : 'याची काही गरज नाही बाबा. मी शाळेत पायी चालत जाऊ शकतो. व आपल्या पायांकडे बोट दाखवत तो म्हणायचा हाच माझा 'टांगा' आहे.'

तलम कपड्याचा त्याला कधीही सोस नव्हता. त्याचा नेहमीचा पोषाख म्हणजे धोतर, शर्ट आणि कोट. हे अहमदाबादच्या मीलमधील बंदुकछाप म्हणून प्रसिद्ध असलेल्या कापडापासून तयार करण्यात आलेले असत. सुखवस्तू लोकांत ते कापड फार प्रचलित होतं.

लपाछपी आणि मोईदांडिया या खेळात तो फार हुशार होता. काही वेळा क्रिकेट वा तत्सम खेळात तो भाग घेत असे. घरात काही कसरतीची साधनं होती. अधूनमधून तो त्यांच्या साहाय्यानं व्यायाम करायचा वा वडिलांची घोडागाडी घेऊन फिरायला जायचा. पण हे क्वचितच. त्याचा आवडता छंद आणि व्यायाम म्हणजे लांब फिरायला जाणं.

तो काही वेळा गायचा. दुसऱ्या एकाच्या आठवणीप्रमाणे त्याच्या वडिलांनी त्याला दिलेला बाजा चांगल्या रीतीने जरी नाही तरी तो वाजवायचा कधीकधी प्रयत्न करायचा. पण त्याला खरोखरी आवडत असत भजनं. हरीकथा वा कीर्तन ऐकण्यात तो सर्व काही विसरून जात असे. त्याला जर कळलं की असा काही कार्यक्रम शेजारीपाजारी चालू आहे तर तो तिथं न चुकता जात असे.

त्याला आपल्या हातानं काम करणं अतिशय आवडत असे. त्याचा खास छंद होता बागेचा. पोरबंदर येथे राहत असलेल्या घराच्या गच्चीवर कुंड्यामधे झाडं लावून त्यानं एक लहानशी तरंगती बाग तयार केली होती. त्या झाडांना पाणी घालण्यासाठी जरी त्याला दोन मजले चढावे लागत असले तरी सकाळ-सायंकाळी पाणी घालण्यात तो कधीच चुकत नसे. त्याचप्रमाणे

राजकोट येथे आपल्या वडिलांबरोबर जेव्हा तो गेला तेव्हा त्यानं तिथे सुंदर परसबाग तयार केली. त्यात त्यानं फळभाज्या, तसंच पेरू, पपया आणि डाळिंब यांची फळझाडं आणि काही फुलझाडं लावली. त्याच्यापेक्षा वयानं मोठी असलेली मुलंही त्याच्या बागकामातील कौशल्याची आणि हौसेची तारीफ करायचे.

त्याला वक्तशीरपणाची सवय होती. उजाडता उजाडताच तो उठायचा आणि घरातील इतर मुलांबरोबर लगेच शेजारच्या फळबागेतील विहिरीवर आंघोळीला जायचा. तिथं मोटेनं पाणी भरलं जात असे. आंघोळ करत असतानाच मुलं कपडे धुवायची शर्यत लावायचे. मोनिया त्या शर्यतीत भाग घ्यायचा. त्याचे कपडे सर्वात पांढरेशुभ्र निघायचे व त्याला त्याबद्दल सार्थ अभिमानही वाटायचा.

हिंदू सण साजरे करायचा खेळ खेळणं हा त्या काळात मुलांचा आवडता खेळ असायचा. एकदा त्याच्या मित्रांनी झुला सणाचा खेळ खेळायचं ठरवलं. या सणात देवीदेवतांच्या मूर्ती पाळण्यात ठेवून त्यांना मागेपुढे झोके देत असतात. बहुधा मुलं हा खेळ मातीच्या मूर्ती तयार करून खेळत असतात. पण यावेळी त्यांनी एक पाऊल पुढे टाकायचं ठरवलं. त्यांनी ऐकलं होतं की लक्ष्मीनारायणाच्या मंदिरात देवीदेवतांच्या पितळेच्या अनेक मूर्ती पडलेल्या आहेत. मग त्यातील काही चोरून खरोखरीचा खेळ का खेळू नये? त्यासाठी मुलांचा एक गट निघाला. त्यांचं नशीब जोरावर होतं. पुजारी वामकुक्षी घेत होता. मूर्ती सहज उचलता आल्या. पण त्यांना तिथून हलवण्याच्या प्रयत्नात एकजण दुसऱ्यावर जोराचा आवाज करत आदळला. पुजारी जागा झाला. त्या छोट्याशा डाकूंची टोळी पसार झाली. पुजाऱ्यानं त्यांचा पाठलाग करायचा प्रयत्न केला पण त्यांनी त्याला गुत्ती दिली. या साहसाच्या नेत्यानं पुरावा नाहीसा करण्यासाठी मूर्ती दुसऱ्या देवळाच्या अंगणात फेकल्या आणि आपल्या सवंगड्यांसह ओटाबापांच्या घरात आश्रयासाठी तो लपला. त्यातील बरीचशी मुलं गांधी कुटुंबातील होती. पुजाऱ्यानं मोनियाच्या काकांकडे तक्रार केली. ते कडक शिस्तीचे व कट्टर वैष्णव पंथी होते. त्यांच्यासमोर मुलांना आणण्यात आलं असताना सर्वांनी सांगितलं की आम्ही देवळात केवळ खेळण्यासाठी गेलो होतो व पुजाऱ्यानं

केवळ संशयावरून आमचा पाठलाग केला. हरवलेल्या मूर्ती कोणी नेल्या वा त्यांचं काय झालं याबद्दल आम्हाला काहीच माहिती नाही.

मोनियाची जेव्हा पाळी आली तेव्हा त्यानं सर्व काही सांगितलं. त्यानं सांगितलं की त्याच्या चुलत भावानं त्या मूर्ती उचलल्या आणि तोच त्या कुठे आहेत ते सांगू शकतो. मुलांच्या लक्षात आलं की मोनियाची घडण वेगळ्याच मातीतून झालेली आहे व त्यानंतर त्यांनी त्याला अशा प्रकारच्या माकडचेष्टात कधीच सहभागी करून घेतलं नाही.

आपण एकदा 'मोहनभाईला' कशी थापड मारली होती पण त्यानं मात्र परत हात न उचलता मला आपल्याला वडिलांकडे कसं नेलं व त्यांच्याकडे त्यानं कशी तक्रार केली याची हकीगत मोनियाचा समवयस्क पण त्याच्या तीन वर्ष मागे असलेल्या एकानं आपल्या चुलत नातवंडाला सांगितली होती. हकीगत सांगणारानं पुढं सांगितलं, 'त्यासाठी मोहनभाईंनी माझा कधी रागही केला नाही.'

मोनिया राहत असलेल्या घरापासून एखादा फर्लांग दूर शीतला चौक नावाचा एक चौक होता. चांदण्या रात्री हिंदू आणि मुसलमान मुलांचे समूह जेवणानंतर तिथं गोळा व्हायचे आणि एखादा तास खेळ खेळायचे. मोनियाही तिथं जायचा, पण त्याला मुळातच आडदांडपणाचे खेळ आवडत नसत. तो त्यात भाग घेत नसे पण पंचाचं काम मात्र तो करायचा आणि खेळणारे खेळाच्या नियमांचा भंग करतात की काय याकडे कडक लक्ष ठेवायचा. जर कोणी नियमबाह्य खेळला तर तो त्याला निर्धारानं पण सौजन्यानं मैदानातून बाहेर काढत असे. त्याच्या निःपक्षपातीपणावर प्रत्येकाचा विश्वास असायचा व प्रत्येकजण त्यानं दिलेला निकाल मान्य करायचा. खेळाडूंमधे जेव्हा वाद व्हायचा तेव्हा भांडण मिटवण्यासाठी त्यालाच बोलावण्यात यायचं. आयुष्याच्या उत्तरकाळी आठवण करत गांधीजी म्हणाले की मी हिंदू, मुसलमान, पारसी वा ख्रिश्चन असा भेदभाव कधीच केला नाही. पोरबंदरमधील वा नंतर राजकोटमधील शाळेत त्यांचं मुसलमान वा पारसी मुलांशी कधीच भांडण झालं नाही. इतरातील भांडणात मध्यस्थी करून त्यांच्यात समेट घडवून आणायची आकांक्षा त्यांनी आयुष्यभर बाळगली होती.

मोनियाच्या घरापासून पायी चालायच्या काही मिनिटं अंतरावरच *एक धूली शाळा* आहे. त्या शाळेत शिक्षक जुन्या पद्धतीने लाकडाच्या फळीवर बारीक धुळीनं अक्षरं लिहायला शिकवत म्हणून त्या शाळेचं नाव *धूली शाळा* पडलं. ह्याच शाळेत मोनिया शिकला होता.

एकदा गांधीजी आठवण करत म्हणाले : 'माझी आई मला शाळेसाठी नेहमीच वेळेवर तयार करायची आणि मी घरी आलो की ती मला अगदीच वेळ वाया घालवू देत नसे. मी जर आळशीपणा वा रिकामटेकडेपणा केला तर ती लागलीच धारेवर धरायची.'

याशिवाय आपल्या पोरबंदरच्या शालेय जीवनाची त्यांना एवढीच आठवण आहे की पाढे पाठ करताना त्यांना थोडी अडचण जात असे. 'वास्तव हे आहे की इतर मुलांच्या सहवासात आमच्या शिक्षकांना सर्व प्रकारची नावं ठेवण्याशिवाय त्या दिवसांसंबंधी मला फारसं काही आठवत नाही. त्यावरून असं नक्कीच लक्षात येतं की मी मंदबुद्धीचा आणि आठवणीचा कच्चा असलो पाहिजे.

## ३

मोनियाच्या कुटुंबानं राजकोटला जेव्हा स्थलांतर केलं तेव्हा राजकोटला मोनियाचं घरही स्थलांतरित झालं. ते त्याचं दुसरं घर होतं. पोरबंदरचं काव्यमय वातावरण नसलं तरी राजकोटलाही जुन्या काळाचे रम्य अवशेष शिल्लक होते. राजकोटच्या सीमेला लागून, दोन्ही बाजूला निवडुंगाची झाडं असलेला मातीचा रस्ता होता. तो संपला की समाधानी खेड्यांना वेढणारा लागवडीखाली असलेल्या शेतीचा मोठा पट्टा दिसतो. पावसाळ्याच्या दिवसात शहराच्या दोन्ही बाजूला ओढा वाहत असतो तर तिसऱ्या बाजूला अजी नदी वाहत असते. हे दोन्ही ओढे अजी नदीत मिळाल्यानंतर ते आपलं पाणी तिच्यात ओतत असतात. शहराच्या नैऋत्येला दोन फर्लांगांवर दगडाविटात बांधलेलं एक लहानसं घर आहे. ते घर आणि सिव्हिल लाईन्स यांच्यामध्ये त्यांना विभक्त करणारं एक मोकळं मैदान आहे. हे काबा गांधींचं निवासस्थान होतं. या घराच्या समोरच्या बाजूला एका मुसलमान मुलाचं घर होतं. तोच शेख मेहबूब तरुण

गांधींचा जिवलग मित्र, नायक आणि वाईट कामातील मार्गदर्शक झाला होता. त्याच ओळीत काहीच घरं ओलांडली तर सोमाली निग्रोचं घर होत. त्याचे कुरळे केस, पिवळे डोळे आणि पांढरे दात हे मोहनदासच्या भावी जीवनात घडू पाहणाऱ्या घटनांचे जणू प्रतीकच झाले होते. तो ओघवत्या गुजराती भाषेत बोलायचा आणि आयुर्वेदाचा व्यवसाय करायचा. त्याला 'चाऊ' म्हणून सर्व ओळखायचे. परदेशी मुसलमानांना काठेवाडमधे 'चाऊ' या नावानं ओळखतात.

या इमारतीच्या फाटकात शिरताच उजव्या बाजूला बैठकीची एक खोली आहे. इथंच काबा गांधी मित्रांना आणि भेटायला येणारांना भेटायचे. फाटकावरच एक लहानशी खोली आहे. त्या इमारतीच्या मानानं अजूनच सामान्य दिसणारी. परंतु ती सर्वात हवेशीर खोली होती. तीच मोहनची अभ्यासिका होती.

गांधीजींनी आपल्या आत्मकथेत लिहिलं आहे की त्यांचे वडील राजस्थानिक न्यायालयाचे सदस्य झाल्यानंतर ते पोरबंदरहून राजकोटला राहायला आले. 'मी जेव्हा सातेक वर्षांचा... असेन तेव्हा माझ्या वडिलांनी (पोरबंदर) सोडलं.' परंतु असं दिसतं की ही आठवण चुकीची आहे. कारण काबा गांधी जेव्हा राजस्थानिक न्यायालयाचे सदस्य नेमले गेले तेव्हा गांधीजी चार वर्षांचे व्हायलाही एक महिन्याचा अवधी होता. ते पुढं सांगतात की राजकोट येथे त्यांना प्राथमिक शाळेत टाकण्यात आलं. येथून ते सबर्बन शाळेत आणि नंतर तेथील अल्फ्रेड हायस्कूलमधे गेले. सबर्बन शाळेतील नोंदीवरून त्यांना सबर्बन शाळेत २१ जानेवारी १८७९ रोजी प्रवेश देण्यात आला होता. या सर्व गोष्टींवरून असं निश्चितपणे लक्षात येतं की ते राजकोटला १८७६च्या अखेरीस वा १८७७च्या सुरुवातीस आले असावे. त्यांचे वडील राजस्थानिक न्यायालयाचे सदस्य नेमले गेले तेव्हा नव्हे तर ते संपूर्ण अधिकारानिशी राजकोटचे दिवाण झाले तेव्हा.

घरात असो वा शाळेत मोहन आपल्याच जगात राहायचा. प्रामाणिक आणि मेहनती विद्यार्थी असलेला मोहन शाळा उघडायच्या अगदी ठोक्यावर शाळेत पोहोचायचा व शाळा संपताच घरी पळ काढायचा. 'दुपारच्या वेळी त्या दिवसात अर्ध्या तासाची सुटी असायची. या मधल्या सुटीच्या वेळेतही मी घरी पळत असे.' शाळेतील त्याची कारकीर्द काही विशेष

चमकणारी नव्हती. 'माझ्या शाळेच्या पुस्तकापलीकडचं मी काहीच वाचत नसे. इतकंच नाही तर गोष्टींच्या पुस्तकांचंही मला आकर्षण नव्हतं.' शाळेची पुस्तकंसुद्धा तो वाचायचा ती त्यातून सुटका नसल्यामुळे. 'मी माझा अभ्यास केला नाही' असं त्याची त्याच्या शिक्षकांना सांगायची इच्छा नव्हती व 'खोटं बोलायचा तर प्रश्नच उपस्थित होत नव्हता.' परिणाम अपेक्षितच झाला. सहामाहीच्या एका निकालात इंग्रजीत उत्तम, गणितात ठीक, भूगोलात कच्चा, वर्तणूक उत्तम, हस्ताक्षर वाईट असं त्याचं वर्णन करण्यात आलं आहे. हस्ताक्षर वाईट असण्याचा हा 'गुण' त्यांच्या नंतरच्या आयुष्यात कायम होता.

योगायोगानं त्याच्या वाचनात श्रावण पितृभक्ती नाटक आलं. प्राथमिक शाळेत असताना ते पुस्तक त्याला त्यांच्या वडिलांच्या पुस्तकात सापडलं. तसंच रंगभूमीवर त्याला हरिश्चंद्र नाटक पाहायचा योग आला. त्याचा त्याच्या जीवनावर सखोल परिणाम झाला. त्याच काळात श्रावणाच्या कथेवरील श्रावण आपल्या म्हाताऱ्या व आंधळ्या आईवडिलांची कावड खांद्यावर घेऊन तीर्थयात्रेला जात असल्याची जी चित्रे त्यांनी डब्यातून दाखवलेल्या चित्रपटातून पाहिली त्यांचाही त्यांच्या मनावर काही कमी परिणाम झाला नाही. काही दिवसांनंतर यात भर पडली रामायणची. 'या तिन्हीतून मातृपितृभक्ती, शपथेचं पावित्र्य, आणि सर्व काही गमावण्याची वेळ आली तरी आपलं कर्तव्य पार पाडायला हवं या आदर्शाचा ठसा मनावर उमटतो.' यातून त्यांना अनुकरणीय उदाहरणं सापडली. 'हरिश्चंद्राच्या कथेवर माझा शब्दशः विश्वास बसला. त्याच्या विचारानंदेखील मला रडू येत असे. आज माझं सामान्य ज्ञान मला सांगते की हरिश्चंद्राची कथा ऐतिहासिक असू शकत नाही. तरीही हरिश्चंद्र आणि श्रावण हे माझ्यासाठी जिवंत वास्तव आहेत व आजही मी ती नाटकं वाचली तर माझ्यावर त्यांचा पूर्वीसारखाच परिणाम पुन्हा होईल.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स वुईथ टुथ*, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, (१९५६) पृष्ठ ७-८]

आपल्या आदर्शांना ऐतिहासिकता प्रदान करण्याच्या त्यांच्या ह्या प्रवृत्तीपासून येशू ख्रिस्तही अलिप्त राहीला नाही. त्यामुळे येशू ख्रिस्ताच्या ऐतिहासिकतेविषयीच्या ज्या वादांनी ख्रिश्चन जग हादरलं आणि अनेक ख्रिश्चनांची अंतःकरणं एकोणिसाव्या शतकात दुभंगली त्या

वादांचा त्यांच्यावर कोणताच प्रभाव पडला नाही. 'अशाच प्रकारचं जिझसचं उदाहरणही आहे असं मला वाटतं.... आत्मबलिदानाचं असं एक परिपूर्ण कृत्य जगासाठी पुरेसं आहे... जिझसची परंपरा ऐतिहासिकदृष्ट्या खरी आहे की नाही याची मला चिंता नाही. माझ्यासाठी ती इतिहासापेक्षाही सत्य आहे कारण माझ्या मते तसं शक्य आहे आणि त्या परंपरेतून चिरंतन विश्वनियमाची प्रतीती होते.' [*हरिजन*, ऑक्टोबर २७, १९४६, पृष्ठ ३७२-७३]

गांधीजी माध्यमिक शाळेत असतानाचा एक प्रसंग त्यांच्या पुढील आयुष्याचं भाकीत करणारा आहे. श्रीयुत गाईल्स हे शाळेची तपासणी करायला आले होते. त्यांनी पाच सोपे इंग्रजी शब्द मुलांना लिहिण्यासाठी सांगितले. त्यातील एक शब्द होता 'kettle.' निरीक्षकाच्या सोबत फिरत असताना शिक्षकाच्या लक्षात आलं की लहानग्या मोहननं या शब्दाचं स्पेलिंग लिहिण्यात चूक केली आहे. त्यांनी वारंवार खुणा करून मोहनला समोरच्या मुलाचं पाहून त्या शब्दाचं स्पेलिंग नीट करायला सांगितलं. पण मोहन एवढा अडाणी होता की त्याच्या लक्षात ती सूचना येतच नव्हती. वर्गात त्या शब्दाचं स्पेलिंग चुकीचं लिहिणारा तो एकच मुलगा असल्याचं आढळलं.

अनातोले फ्रांन्सच्या एका कथेत दाखवलं आहे की एका तरुण महंताच्या वर्तनानं सैतान निराश होतो कारण तो ईश्वरनिष्ठ अतिशय मूर्ख आणि अडाणी असतो. तो सैतान फसवा युक्तिवाद करून त्याला पापाच्या काळोख्या मार्गाकडे जाण्यासाठी भुलवायचा जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा त्याच्या लक्षातच तो युक्तिवाद येत नाही. भारतीय पवित्र लोककथांमध्येही या सारखीच एक गोष्ट आहे. जडभरत वा 'मूढ बुद्धीच्या भरतावर त्याच्या 'दैवी अज्ञानामुळेच' कशाचाही परिणाम होऊ शकत नव्हता. खोटेपणाचं मूल्य कळण्याएवढी मोहनमध्ये बुद्धिमत्ता नव्हती. याच 'अडाणीपणामुळे गांधीजींना भावी आयुष्यात अनेकदा मनस्ताप भोगावा लागला. परंतु ही अक्कल न दिल्याबद्दल आयुष्यभर त्यांनी ईश्वराचे आभारच मानले. मोहांनी त्यांना त्रस्त केलं असताना व त्यांची आंतरिक प्रतिकारशक्ती कोलमडू लागली असताना अनेकदा ह्याच अडाणीपणानं त्यांच्या कवचाचं काम केलं.

गांधीजींनी आपल्या विद्यार्थीदशेचं वर्णन 'सामान्य' असं केलं आहे व इतरांनीही त्याचाच पुनरुच्चार केला आहे. एका अर्थानं ते खरंही आहे. आपल्या 'सामान्य बुद्धिमत्तेचा' वारंवार त्यांनी जो उल्लेख केलेला आहे तो केवळ ग्रांथिक पांडित्याबद्दल गांधीजींना वाटणाऱ्या अतिशय कमी मूल्याचं सूचक असावा व त्याचाच उल्लेख कदाचित अनाहूतपणे गांधीजी करत असावे असा अनेकदा संशय येतो. ज्या गोष्टींचं त्यांना महत्त्व वाटत असे त्या गोष्टींची त्यांना पक्की व स्पष्ट आठवण राहत असे. त्यांच्यात जोमदार बुद्धिमत्ता होती तसंच मूलभूत विचार करायचं सामर्थ्यही होतं. त्याचबरोबर परीक्षेत चांगलं यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेले गुण म्हणजे 'शैलीदार पद्धत', 'पाठांतर' इत्यादी युक्त्यांचा त्यांना मनापासून तिटकारा होता. एवढं असूनही अधूनमधून त्यांना बक्षिसं मिळायची. पाचव्या व सहाव्या वर्गात त्यांना अनुक्रमे ४ व १० रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यांचा शालेय अभ्यास त्यांना विद्वान करू शकत नव्हता व तशी त्यांची आकांक्षाही नव्हती. जीवनाशी व त्यासंबंधित कर्तव्याशी निगडित नसलेल्या शिक्षणाचं त्यांना फार कमी आकर्षण होतं. त्यांची प्रतिभा अगदी वेगळ्या दिशेचा शोध घेणारी होती. त्यांच्या मृत्यूच्या काही दिवस आधी एका अमेरिकन गृहस्थाशी मनमोकळेपणानं गप्पा मारत असताना आपलं मत व्यक्त करत ते म्हणाले : 'सूर्यापासून पृथ्वीचं नेमकं किती अंतर आहे वा पृथ्वी खरोखर गोल आहे की सपाट या ज्ञानाला खरोखरी फार कमी महत्त्व आहे. जीवनाला नियंत्रित करणाऱ्या नियमांचा शोध घेणारं शिक्षण काही कमी महत्त्वाचं नाही. परंतु आपण म्हणतो की हे काम इतकं कठीण आहे की अगदी काहीच मोजके लोक ते मिळवू शकतात.... मी माझा वेळ अमूर्त गोष्टींच्या अभ्यासात घालवला नाही तर वास्तव मूल्य असणाऱ्या गोष्टींच्या अभ्यासात घालवला.' [*गांधीजी इन द कोर्स ऑफ कनव्हरसेशन वुईथ व्हिन्सेंट शीन* या पुस्तकातून प्यारेलालनी *महात्मा गांधी - द लास्ट फेज खंड २* मधे दिलेलं उद्धरण, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, (१९५८) पृष्ठ ७६४]

गांधीजींचं मत होतं की मुख्यत्वेकरून जीवनाला मार्गदर्शन होण्यासाठी आणि त्यातील विचारांचं अनुसरण करण्यासाठी वाचनाचा उपयोग करायचा असतो. ज्याचं अनुसरण करता येऊ शकत नाही त्यात त्यांना रस नव्हता. त्यामुळे ते जीवनाच्या ग्रंथाकडे वळले. त्यांच्या आईवडिलांच्या जीवनानं त्यांना मार्गदर्शन केलं. जीवनातील दुःख दूर करण्यासाठीच नव्हे तर

जीवनात चिरंतन आनंद मिळवणं शक्य व्हावं यासाठी योग्य वर्तणूक करण्यासाठी धडपड करायला त्यांच्या जिव्हाळ्यानं त्यांना शिकवलं. त्यांचं सेवाकार्य हीच त्यांच्या अभ्यासाची शाळा झाली आणि त्यांचं जीवन हा अतिशय मोलाचा आणि जपून ठेवण्यासारखा ग्रंथ झाला. त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस त्यासंबंधी त्यांनीच आठवण करत सांगितलेली हकीगत अशी आहे : 'मी माझ्या आईचा आवडता मुलगा होतो. त्याला पहिलं कारण मी माझ्या आईचा सर्वात धाकटा मुलगा होतो हे तर आहेच परंतु त्याशिवाय तिच्या सेवेशिवाय माझ्या मनाला दुसरी कोणतीच गोष्ट रुचत नसे हेही आहे. माझ्या भावंडांना खेळणं आणि मौजमजा करणं आवडायचं. माझ्यात आणि त्यांच्यात जुळण्यासारखं फार कमी असल्याचं माझ्या लक्षात आलं. माझ्या बहिणींशीही माझी फारशी जवळीक नव्हती. माझ्या आईच्या सेवेपेक्षा खेळांचं मला कधीच आकर्षण वाटलं नाही. तिला जेव्हा केव्हा माझ्या मदतीची गरज असायची तेव्हा मी तिच्याकडे धावत जात असे.

'माझी आई अतिशय धार्मिक होती. उपास आणि तपस्या हा तिच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. अतिशय साध्या श्रद्धेची ती बाई होती. देवळात जायला ती कधीच चुकली नाही. ती केवळ एकच मंत्र म्हणायची : श्रीकृष्णः शरणं मम. गीता वगैरे तिला वाचता येत नसे.

'ती दीर्घ उपास करायची. कधीकधी तर ती दोन वा तीन दिवसांचे उपास करायची. एका चातुर्मासात ती एकदाच जेवत असे तर दुसऱ्यात एका दिवसाआड जेवत असे. एकदा सूर्य पाहिल्यानंतरच अन्न घ्यायची तिनं शपथ घेतली. पण पावसाळ्यात सूर्यदर्शन क्वचितच होत असतं. काही वेळा सूर्य दिसायची बातमी घेऊन मुलं तिच्याकडे धावत जात पण ती येईपर्यंत सूर्य परत ढगाआड लपलेला असायचा. त्याचा अर्थ ती असा घ्यायची की देवाची इच्छा आज आपण जेवावं अशी नाही व ती आनंदानं आपल्या कामाकडे परत फिरायची.'

तिच्या कर्मठपणाच्या कृत्यांवर त्यांचा विश्वास नव्हता. परंपरागत हिंदूंच्या प्रथेप्रमाणे चंद्र आणि सूर्यग्रहणाच्या वेळी अन्नाला स्पर्श करायचा नसल्यानं स्वयंपाकघराचं काम बंद असतं. पण त्याचवेळी त्यांना भूक लागून काही तरी खायला हवं असायचं. त्यांच्यावरील प्रेमामुळे ती त्या पद्धतीतून काही तरी मार्ग शोधून काढायची व त्याला खायला द्यायची. काही वेळा ते

तिच्याबरोबर एकादशी करायचे. एकादशीच्या कर्मकांडांवर त्यांचा विश्वास नसला तरी ‘एकादशीच्या दिवशी रोजपेक्षा अधिक चांगले पदार्थ खायला मिळतात’ म्हणून ते एकादशी करायचे ! त्यांचा त्यांच्या आईच्या कर्मकांडावर जरी फारसा विश्वास नसला तरी तिच्या संपूर्ण प्रामाणिकपणावर त्यांचा ठाम विश्वास होता आणि काळाच्या ओघात त्यालाच सुंदर फळं आली.

ते जेव्हा वयाच्या साठीत होते तेव्हा इंग्लंडमधील श्रोत्यांसमोर आपल्या खाण्या-पिण्यासंबंधीच्या व्रतांसंबंधी स्पष्टीकरण देत ते म्हणाले होते, ‘आमची आई आम्हा मुलांसाठी प्रार्थना आणि उपास करायची. तसं ती आमच्यावरील प्रेमामुळे करू शकायची. त्यामुळे मी मला म्हणालो की आईचा वात्सल्यभाव जर तिला इतका त्याग करायला लावू शकतो तर ईश्वरावरील प्रेमासाठी, जो सर्वापेक्षा अनंत पटीनं मोठा आहे, आपण किती त्याग करायला पाहिजे?’

आईनंतर त्यांच्या जीवनावर परिणाम झाला होता तो त्यांच्या वडिलांचा. आध्यात्मिक विकासाची परिसीमा गाठण्याचा गांधीजी प्रयत्न करत असायच्या काळात दक्षिण आफ्रिकेतील मिशनरी रेव्हरंड जोसेफ डोक, जे कोणत्याही इंग्रज गृहस्थापेक्षा आध्यात्मिकदृष्ट्या गांधीजींच्या अधिक जवळ आले होते, यांनी लिहिलं आहे : ‘श्रीयुत गांधी जेव्हा आपल्या आईवडिलांसंबंधी बोलतात तेव्हा त्यांचं बोलणं ऐकणारांना प्रतीती होत असतं की ते आध्यात्मिक पातळीवरील आहे.’ [जोसेफ डोक, *एम. के. गांधी : अ‍ॅन इंडियन पॅट्रिअट इन साऊथ आफ्रिका*, अखिल भारत सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, (१९५६) पृष्ठ २२] परंतु त्यात एक अंतर होतं. त्यांना त्यांच्या वडिलांबद्दल आदर वाटत होता तर आईचे ते भक्त होते. वडिलांचा त्यांना दरारा वाटायचा : ‘मी त्यांच्याशी फार बोलत नसे. मला त्यांची भीती वाटत असे. पण आईच्या बाबतीत भीतीचा प्रश्नच उभा राहत नव्हता. त्यांच्या उत्तरायुष्यात ते वडिलांवर कधीकधी टीका करत पण आईवर कधीच नाही. त्यांचे वडील त्यांच्यासाठी प्रामाणिकपणाचे मूर्त रूप होते तर आई दयेची. ते पोलादी होते तर आई संत. त्यांचे वडील उत्तरायुष्यात अनुसरण करण्यायोग्य आदर्श होते. त्यांची कुटुंबातील, समाजातील जागा भरून काढणं हा त्यांचा आदर्श ठरला. परंतु त्यांची आई ही त्यांच्या अंतरात्म्याचाच भाग झाली. तिच्या

वात्सल्यानं असं कवच निर्माण केलं की ती दूर असतानाच काय पण ती या जगातून निघून गेल्यानंतरही ते त्यांचं संरक्षण करत होतं आणि त्यांना प्रभावित करत होतं.

मुलाचा आपल्या वडिलांवर जेवढा विश्वास होता त्यापेक्षा वडिलाचा आपल्या मुलावर काही कमी विश्वास नव्हता. तिन्ही मुलं त्यांना फार उशिरा झाली. त्यांना त्यांच्या आणि वैशिष्ट्यानं त्या मुलांच्या आईच्या भवितव्याची काळजी वाटायची. त्यांच्या शेवटच्या दिवसात त्यांना जेव्हा विचारलं की तुमची कुटुंबातील जागा कोण घेईल तेव्हा काबा गांधी म्हणाले: 'मनू आमच्या कुटुंबाचा गौरव वाढवील. तो माझं नाव उजळील.'

त्यांच्या विकासात त्यांच्या आईवडिलांच्या निःस्वार्थ सेवेची काय भूमिका आहे यासंबंधी बोलत असताना गांधीजी एकदा म्हणाले होते : 'माझ्या नैतिक आणि आध्यात्मिक विकासाचीच नाही तर त्यांनी माझ्या बौद्धिक विकासाचीही पायाभरणी केली. केवळ पुस्तकी ज्ञान नाही तर निःस्वार्थ सेवाच शिक्षणाचा पाया रचू शकते असं त्यांनी एकदा सांगितलं होतं. 'ज्या कुणाला यासाठी प्रयत्न करायचा असेल तो स्वतःसाठी याचा प्रयोग करू शकतो आणि त्याला आढळेल की माणसाच्या सार्वत्रिक विकासाची हीच किल्ली आहे. [प्रभुदास गांधी यांनी दिलेलं उद्धरण, *जीवन प्रभात*, सस्ता साहित्य मंडल प्रकाशन, न्यू देल्ही, (१९५४) पृष्ठ ५८]

## ४

मोहन जेव्हा तेरा वर्षांचा होता तेव्हा जवळपास त्याच्याच वयाच्या मुलीशी त्याचं लग्न झालं. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्याच्या आईवडिलांनी त्याला न सांगता सात वर्षांच्या नियोजित वधूशी त्याचं लग्न ठरवलं होत. वधू पोरबंदरचे श्रीमंत व्यापारी गोकलदास माकनजी यांची मुलगी कस्तुरबाई होती. ही त्याची तिसरी सोयरीक होती. लग्न जुळल्यानंतर पहिल्या दोन मुली वारल्यामुळे तिसऱ्या मुलीशी हा संबंध जुळवण्यात आला होता. असं सांगतात की कस्तुरबाई आणि मोहन लग्न जुळायच्या आधी लहान असताना एकमेकांना ओळखत होते व सोबत खेळलेही होते. त्यांची घरं अगदी जवळ असल्यामुळे हे अगदी शक्य आहे कारण त्याची आई या

भावी वधूच्या घरी मोनियासोबत अनेकदा जात असे. असं सांगतात की त्या कोवळ्या वयात मोनियाची लग्न करायची इच्छा नव्हती. परंतु काबा गांधी म्हातारे होत होते. मोनियाच्या आक्षेपावर ते म्हणाले: 'तू जेव्हा मोठा होशील आणि तुला मुलं होतील तेव्हा तू तुझ्या मनाप्रमाणे करू शकशील. पण मी जुन्या पिढीचा आहे. माझ्या जाण्यापूर्वी मला माझ्या मुलाचा लग्नसोहळा पाहायचा आहे.' हो नाही करत मोहननं लग्नाला संमती दिली.

त्यानुसार लग्नाची तिथी ठरवण्यात आली. लग्न पोरबंदरला होणार होतं. परंतु संस्थानाचे अधिकारी असल्यामुळे वडिलांना सुटी मिळू शकत नव्हती. आणि जेव्हा रजा मिळाली तेव्हा पोरबंदरला पोहोचण्याएवढा वेळ शिल्लक नव्हता. बैलगाडीनं राजकोट ते पोरबंदरचं १२० मैलांचं अंतर कापायला त्या दिवसात पाच दिवस लागत असत. काबा गांधींनी एकानंतर दुसऱ्या बैलगाडीची व्यवस्था करून ते अंतर पाचऐवजी तीन दिवसात कापलं. अखेरच्या टप्प्यात त्यांची गाडी उलटली आणि गंभीर जखमी अवस्थेत मलमपट्ट्या करून ते पोरबंदरला पोहोचले. परंतु त्यांना झालेल्या या दुखापतीतून ते कधीच पूर्णपणे बरे झाले नाहीत.

तो तीन लग्नांचा सोहळा होता. मोहन, मोहनचा भाऊ करसनदास आणि मोहनचा चुलतभाऊ या तिघांचीही लग्न एकाच वेळी होती. असं बहुधा आर्थिक कारणासाठी करण्यात आलं असावं. काबा गांधींना झालेल्या अपघातानं समारंभाच्या आनंदावर थोडसं विरझण पडलं. परंतु काबा गांधींनी आपली सर्व कामं न डगमगता निर्धारानं पार पाडल्यामुळे - तसा त्यांचा स्वभावच होता - फारसा परिणाम न होता सर्व काही योजनेप्रमाणे सुरळीत पार पडलं.

आताप्रमाणेच त्या दिवसातही विवाह समारंभात फार मोठा डामडौल असायचा. नवऱ्या मुलाला सुंदर कपडे घालून खास तयार करण्यात आलेल्या घोड्यावर बसवण्यात येत असे, त्याला खास मिरवणुकीनं वधूच्या घरी नेण्यात येत असे. परंतु मोनियाच्या बहिणीच्या आठवणीप्रमाणे मोनियाला अशा गोष्टींची अगदीच आवड नव्हती. विवाह समारंभासाठी म्हणून त्याला त्यातील काही गोष्टी मान्य कराव्या लागल्या. परंतु त्यांनी त्याला 'सोन्याचा हार गळ्यात घालायला सांगितलं तेव्हा मात्र त्यानं ठाम नकार दिला आणि त्याचं म्हणणं त्यांना ऐकावं लागलं.'

नंतरच्या काळात गांधीजींनी या बालविवाहाचा उल्लेख 'महान शोकांतिका' म्हणून केला. 'दोन निष्पाप मुलांना त्यांच्या इच्छेशिवाय जीवनसागरात ढकलण्यात आलं' असा त्यांनी कडवटपणानं या प्रसंगाचा उल्लेख आपल्या आत्मकथेत केला आहे. त्यांच्या वहिनीनं पहिल्या रात्री कसं वागावं याचं सविस्तर प्रशिक्षण त्यांना दिलं होतं. 'मला माहीत नाही माझ्या बायकोला कोणी शिकवलं.... आम्ही इतके घाबरलेलो होतो की एकमेकांशी बोलूही शकत नव्हतो. शिकवण्यानं माझी फारशी प्रगती होऊ शकली नाही. परंतु काहीही न शिकवणं हेच खरोखरी अशा प्रसंगी आवश्यक असतं. पूर्वजन्मीचे जे ठसे मनावर उमटलेले असतात त्यामुळे सर्व प्रकारचं प्रशिक्षण निरर्थक ठरतं.' आणि अशा रीतीनं विवाह समारोह हाच त्यांच्या वैवाहिक जीवनाचा प्रारंभबिंदू ठरला.

वैवाहिक जीवनातील प्रामाणिकपणाचं तत्त्व त्यांनी *व्यावहारिक मार्गदर्शन करणाऱ्या* एका गुजराती पुस्तकातून, जे पै किंमतीला मिळायचं, ग्रहण केलं होतं. आदर्श पती होणं व आपल्या बायकोला आदर्श पत्नी करणं हे त्यांचं ध्येय होतं. स्वतः निष्ठावान पती होऊन ते तिला परिपूर्ण निरागस आणि पवित्र जीवन व्यतीत करायला लावणार होते. पहिली गोष्ट ठीक होती. दुसरीमुळे मात्र तेच अडचणीत सापडले. ते तिच्यावर अधिकाधिक दबाव आणू लागले व तिच्याशी अधिकाधिक अधिकारवाणीनं वागू लागले. त्यांच्या पत्नीनं कोणतंच संशयास्पद वर्तन न करताही अखेरीस त्यांना आपल्या पत्नीबद्दल संशय आणि मत्सर वाटू लागला. ते तिच्यावर लक्ष ठेवू लागले, तिच्या येण्याजाण्यावर नियंत्रण आणू लागले आणि आपल्या परवानगीशिवाय कुठंही जायला त्यांनी तिला मनाई केली. ती साधीसुधी, सरळ, निरागस मुलगी होती. तिला देवळात, तिच्या माहेरी वा मैत्रिणीकडे जावंसं वाटलं तर कोणताही समंजस माणूस तसं करण्यापासून तिला अडवू शकेल ही गोष्ट तिच्या आकलनशक्तीपलीकडची होती. तिनं त्याच्या म्हणण्यासमोर मान तुकवायला नकार दिला आणि तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे वागायचं तिनं ठरवलं. जेव्हा त्यांनी तिला पांडित्यप्रचुर भाषेत पत्नीची कर्तव्ये समजावून सांगायचा प्रयत्न केला तेव्हा तिनं एकच साधी सरळ घरगुती गोष्ट सांगितली. त्या बाबतीत ती वाकबगार होती. त्यावेळी

गांधीजींना आपल्या वागण्यातील हास्यास्पदता कळली. जेव्हा ते चिडलेले असायचे तेव्हा ती त्यांच्याकडे निरागस चेहऱ्यानं पाहायची. त्यामुळे ते अजूनच हताश व्हायचे. त्यामुळे ते अधिकच भडकायचे आणि विवेकाच्या सर्व सीमा त्यांच्याकडून ओलांडल्या जायच्या. त्यानंतर तिच्या डोळ्यातून आसवं वाहू लागत व मग त्यांनाच आपल्या वागण्याची लाज वाटू लागायची.

दिवसा ते क्वचितच भेटू शकायचे, बोलायची तर गोष्टच सोडा. परंपरेप्रमाणे मोठ्यांसमोर नवविवाहितांनी बोलणं निलाजरेपणाचं समजण्यात येत असे. पण रात्रीच्या वेळी घरातील सर्व कामं आटोपल्यानंतर मोहनला अभ्यासाच्या निमित्ताने वैवाहिक जीवनातील गप्पागोष्टी करायला वेळ मिळत असे. बहुधा त्याचं पर्यवसान भांडणात होत असे. मग तमाशा व्हायचा. त्यानंतर ते अनेक दिवस बोलत नसत. शारीरिक सामर्थ्यात ती त्यांच्यापेक्षा वरचढ होती. तिला स्वतंत्र इच्छाशक्ती होती. आपल्या घरगुती सामान्य ज्ञानाप्रमाणे, ते चूक असो वा बरोबर, न घाबरता वागायचं धैर्य तिनं मिळवलं होतं व ते ज्ञान त्याच्या पुस्तकी ज्ञानापेक्षा अधिक अचूक ठरत असे. त्यांनी काहीही केलं तरी ते तिला आपल्या इच्छेनुसार वाकवू शकले नाही.

त्यांनी तिला शिकवायचा प्रयत्न केला. कमीतकमी शिक्षक म्हणून ती त्यांचा अधिकार मान्य करायची. पण इथंही त्यांना आपल्या विद्यार्थ्याशिवायच राहावं लागलं. तिला अभ्यासात रस नव्हता. त्याशिवाय दुर्दैव म्हणजे ‘वासनापूर्ण प्रेमामुळे मला फार कमी वेळ मिळत असे. वासनांमुळे माझा तिच्याकडे अतिशय ओढा होता. शाळेत असतानासुद्धा माझ्या मनात तिचेच विचार असत व रात्र झाल्यानंतर तिच्याशी भेटीचे विचार मला त्रस्त करत असत. तिच्यापासून दूर राहणं मला असह्य होत असे. माझ्यात कर्तव्याची भावना नसती तर ग्रासून टाकणाऱ्या या वासनांमुळे मी एक तर आजारी पडून अकाली मरण पावलो असतो वा ओझ्यासारखं जीवन जगत राहिलो असतो. परंतु ठरलेली कामं सकाळी पार पाडणं आवश्यक असायचं व खोटं बोलायचा तर प्रश्नच उपस्थित होत नव्हता.’ ही गोष्ट आणि वारंवार तिचं माहेरी जाणं यांमुळे ते वाचले. भारतातील एकूण विद्यार्थीदशेत ते फार तर तीन वर्ष सोबत राहिले असावे.

अशा रीतीनं वर्ष जात राहिली. अखेरीस ते जेव्हा त्यांच्या वासनारूपी झोपेतून जागे झाले तेव्हा त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षणांची मागणी करणाऱ्या सार्वजनिक जीवनाच्या वावटळीनं त्यांना पूर्णपणे ग्रासलं होतं. परिणामी त्यांच्या संपूर्ण इच्छेनंतरही कस्तुरबाई निरक्षरच राहिली. परंतु शुद्ध अंतःकरणानं केलेली कोणतीही गोष्ट वाया जात नाही. काळाच्या ओघात 'वासना' परिपक्व होऊन प्रेमात परिवर्तित झाली व त्यांच्या भूमिकेत अदलाबदल झाली. ती 'सत्याग्रहात त्यांची शिक्षिका झाली' व तिच्या नवऱ्यानं तिचा शिक्षक व्हायचा जो प्रयत्न केला होता त्यापेक्षा किती तरी चांगली निष्कर्ष हाच निघाला की प्रेम आणि वासना यांचं सहअस्तित्व राहू शकत नाही. ज्या कोणाला स्त्रीजातीची सेवा करायची असेल त्यानं शारीरिक वासनांपासून मुक्त व्हायला पाहिजे.

ही अद्वितीय भागीदारी बासष्ट वर्षे चालली. 'ती जबरदस्त इच्छाशक्ती असलेली स्त्री होती. त्यामुळे आमच्या सुरुवातीच्या दिवसात मी तिला दुराग्रही समजत होतो. परंतु तिच्या जबर इच्छाशक्तीनं तिला, अगदी इच्छा नसतानाही, अहिंसा आणि असहकार्य या गोष्टीत माझी शिक्षिका व्हायचं सामर्थ्य दिलं' असं तिच्या मृत्यूनंतर गांधीजींनी लॉर्ड वेव्हेल यांना पाठवलेल्या पत्रात तिचं स्मरण करत लिहिलं. [*गांधीज लेटर टू लॉर्ड वेव्हेल*, दिनांक मार्च ९, १९४४ पाटील बाईंच्या सूचनांनुसार दुरुस्ती दि. २२-४-४]

काळाच्या ओघात तिच्या 'निरक्षरपणालाही' महत्त्व राहिलं नाही. उलट त्यामुळे तिच्या महानतेला आगळेपणाचा स्पर्श लाभला. स्त्रियांना सामाजिक सेवेचं प्रशिक्षण देण्यासाठी तिच्या स्मरणार्थ न्यासाची जेव्हा उभारणी करायची होती तेव्हा गांधीजींनी आग्रहपूर्वक सांगितलं की कार्यकर्त्यांमध्ये 'कस्तुरबाची जीवनदृष्टी असायला हवी.' याचा अर्थ काय असं विचारलं असता स्पष्ट करत ते म्हणाले : 'कस्तुरबांनी व्यक्त केलेली जीवनदृष्टी, मोहनदास करमचंद गांधीची जीवनदृष्टी नाही.'

# प्रकरण ९ वे

# बालपण आणि मुग्धावस्था

**१**

मोनियाच्या लग्नानंतर काबा गांधी मोठ्या मुश्किलीनं राजकोटला पोहोचू शकले. त्यांना झालेल्या जखमांनी ते कायमचे विकलांग झाले होते. परंतु या दीर्घ आजारानंतरसुद्धा ते चिडचिडेही झाले नव्हते आणि त्यांनी मनाचा तोलही गमावला नव्हता. त्यांच्या आजाराच्या संपूर्ण काळात मोहननं अतिशय निष्ठेनं त्यांची सेवा केली. वडिलांचादेखील आपल्या या मुलावर असीम विश्वास होता व जेव्हा केव्हा त्यांना गरज पडायची तेव्हा सहजपणानं ते मनूला बोलवायचे. आणि त्यांनी बोलावल्यानंतर मनू गेला नाही असं चुकूनही झालं नाही. अगदी सकाळी उठल्याबरोबर तो आपल्या वडिलांना शौचमुखमार्जनासाठी मदत करायचा, त्यांना मालीश, आंघोळ वगैरेसाठी मदत करायचा व नंतरच तो आपल्या अभ्यासादी कामाला लागायचा. रात्रीच्यावेळी अतिशय प्रेमानं तो त्यांच्या पायांना मालीश करायचा आणि पाय चेपायचा. त्यांना जेव्हा झोप लागायची वा ते जेव्हा जायला सांगायचे तेव्हाच तो जायचा. त्याची आईही त्याच्या वडिलांच्या सेवेकडे काही कमी लक्ष देत नसायची.

याचा परिणाम अभ्यासाकडे दुर्लक्ष होण्यात झाला. पण त्यानं फिकीर केली नाही. त्यांनी लिहिलं आहे : 'माझ्या आठवणीप्रमाणे माझ्या क्षमतेविषयी मला काही फारसा विश्वास नव्हता. जेव्हा केव्हा मला बक्षीस वा शिष्यवृत्ती मिळायची तेव्हा मला आश्चर्य वाटायचं. परंतु माझ्या चारित्र्याची मात्र मी मोठ्या दक्षतेनं काळजी घेत असे. अगदी थोडीशी जरी चूक झाली तरी माझ्या डोळ्यातून आसवं ओघळू लागायची. 'बोलणं खाण्यासारखं माझ्याकडून जेव्हा वर्तन व्हायचं वा माझ्या शिक्षकांना मी चुकीचं वर्तन केलं असं वाटायचं तेव्हा ती गोष्ट मला असह्य व्हायची.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १५]

परंतु दैवदुर्विलास असा की स्वतःला निष्कलंक ठेवायचा त्यांनी एवढा प्रयत्न करूनही त्यांच्यावर दोषारोपण झालंच. ते जेव्हा सातव्या वर्गात होते तेव्हा तिथल्या पारसी मुख्याध्यापकांनी कसरत आणि क्रिकेट या दोन्ही गोष्टींना विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक केली. मोहनला या दोन्ही गोष्टी आवडत नव्हत्या. लाजरेपणामुळे तो इतर मुलांचा सहवास टाळायचा तसंच वडिलांच्या शुश्रूषेसाठीही त्याला घरी जायची घाई असायची. या सर्व कारणांमुळे खेळांच्या तासांपासून सूट मिळावी अशी त्यानं मुख्याध्यापकांकडे प्रार्थना केली. परंतु ती नाकारण्यात आली. नंतरच्या शनिवारी शाळा सकाळी होती. दुपार ढगाळलेली होती. त्याला वेळेचा अंदाज आला नाही. तो जेव्हा क्रीडांगणावर पोहोचला तेव्हा खेळाचा तास संपलेला होता आणि त्याला अनुपस्थित दाखवण्यात आलं होतं. दुसऱ्या दिवशी अनुपस्थितीचं स्पष्टीकरण देण्यासाठी बोलावण्यात आलं असता त्यानं जे काही घडलं होतं ते सर्व खरंखुरं सांगितलं. परंतु मुख्याध्यापकाचा त्याच्यावर विश्वास बसला नाही आणि त्याला दंड करण्यात आला. दंड क्षुल्लक - एकदोन आणेच होता. परंतु खोटं बोलायचा आळ आपल्यावर यावा याचं त्याला दुःख होत होतं. तो धुमसून रडला आणि त्यानं जे घडलं ते वडिलांना सांगितलं. वडिलांनी मुख्याध्यापकांना चिठ्ठी लिहून कळवलं की माझ्या शुश्रूषेसाठी मला मोहनची शाळेचे तास संपताच गरज आहे. त्यामुळे मोहनला खेळाच्या तासापासून सूट मिळाली. दंडही भरण्यात आला. ह्या घटनेचा मोहनच्या मनावर खोल ठसा उमटला. त्यानं त्या प्रसंगाचा उपयोग आपल्या प्रगतीसाठी मैलाच्या दगडासारखा केला. 'मला कळलं की सत्याच्या मार्गावर चालणाऱ्या माणसाचं बेफिकीर राहून भागू शकत नाही. माझ्या निष्काळजीपणाचा हा प्रसंग पहिला आणि शेवटचा होता.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १६]

मोहन आता पंधरा वर्षांचा झाला होता. त्याच्या लग्नामुळे त्याचं शाळेतील एक वर्ष वाया गेलं होतं. पण अतिशय मेहनत करून त्यानं एकदम दोन वर्षांच्या परीक्षा दिल्या. त्यासाठी त्याला इतरांपेक्षा बरीच अधिक मेहनत घ्यावी लागली. चौथ्या वर्गात बहुतेक विषयांसाठी मातृभाषेऐवजी इंग्रजी माध्यम आल्यामुळे त्याच्या अडचणीत अजूनच भर पडली. युक्लिडच्या तेराव्या प्रमेयावर पोहोचेपर्यंत भूमिती त्याला भेडसावतच होती. त्यानंतर त्याला एकाएकी

त्यामागील कारणपरंपरा कळली व त्या विषयाची सुबोधता त्याच्या लक्षात आली. संस्कृतला ‘पाठांतराची’ गरज होती. पण त्याची त्याला अगदीच आवड नव्हती. त्यामुळे तो पर्शिअनकडे वळला. क्रिश्नशंकर हरिशंकर पंड्या हे त्याचे संस्कृतचे शिक्षक होते. त्यांनी त्याला आपल्या धर्माची भाषा न सोडण्यासाठी समजावलं. त्यांच्या प्रेमळपणानं मोहनला लाज वाटली व त्या शिक्षकांचा तो नेहमीसाठी ऋणी राहिला. तो जेव्हा संशयवादाच्या भोवऱ्यात सापडला होता तेव्हा आध्यात्मिक ज्ञानाच्या या खजिन्यातील सरळ प्रवेशाचाच त्याला आधार मिळाला.

अगदी बालपणापासूनच मोहन अतिशय गंभीर स्वभावाचा मुलगा होता. गांधीजींनी आपल्या दुसऱ्या मुलाला, मणीलालला लिहिलेल्या पत्रातील एका वाक्यातील अर्थगर्भ गांभीर्य पाहून आपली धडकी भरू लागते. हे पत्र मार्च २५, १९०९ चं आहे. त्यावेळी गांधीजी चाळीस वर्षांचे आणि त्यांचा मुलगा सतरा वर्षांचा होता. अगदी बालपणापासूनच जीवनाकडे गंभीर दृष्टीनं पाहायची सवय माणसानं स्वतःला लावून घेणं कसं आवश्यक आहे व आपल्या आईची अगदी तनमनानं सेवा करण्यातच खरं शिक्षण कसं आहे हे आपल्या मुलाच्या मनावर त्या पत्रातून ठसवण्याचा गांधीजी प्रयत्न करत होते. पत्र असं आहे :

नाथुराम शर्मा यांच्या *इंट्रोडक्शन टू द उपनिषदाज* या पुस्तकाचा माझ्या मनावर खोलवर ठसा उमटला. त्यामुळे माझ्या लक्षात आलं की माणसाच्या आयुष्यातील पहिला आश्रम, म्हणजे ब्रह्मचर्याश्रम हा शेवटच्या आश्रमासारखाच म्हणजे संन्यासाश्रमासारखाच असतो. मौज आणि गंमत यांना माणसाच्या निरागस अवस्थेत म्हणजे बाराव्या वर्षापर्यंतच स्थान असते. माणसाचं बरंवाईट कळायचं वय होताच त्यानं पूर्ण जबाबदारीनं वागायला शिकायलाच हवं आणि जाणीवपूर्वक आपलं व्यक्तिमत्त्व घडवायचा प्रयत्न करायला हवा.... मला आठवतं की मी जेव्हा तुझ्याहूनही कमी वयाचा होतो तेव्हा माझ्या वडिलांची सेवा करणं हाच माझा सर्वाधिक आनंदाचा विषय होता. **माझ्या बाराव्या वर्षानंतर मौजमजा काय असते ते मला माहीत नाही**. (ठळक अक्षरं माझी)

इतकंच नाही तर अगदी बालपणीच्या चुकाही त्यांच्या या स्वभाववैशिष्ट्यामागे आहेत. ते सात वर्षांचे असताना धूम्रपान करू लागले व त्यासाठी नोकरांच्या खिशातून पैसे चोरू लागले. त्यांचे काका धूम्रपान करायचे. त्यामुळे त्यांना वाटलं की मोठ्या माणसाप्रमाणे धुराचे वलय सोडणं व आपल्या नाकपुडीतून धूर बाहेर फेकणं ही फार मोठी कर्तबगारी असली पाहिजे व त्यामुळे ती अंगी बाणवायला पाहिजे. एका 'नातलगाच्या' सहवासानं ते धूम्रपान करायला शिकले होते. सिगारेट मिळवण्यासाठी पैशांची गरज पडायची. त्यामुळे चोरीचा आधार घ्यावा लागला. परंतु चोरी करायला मन घेत नसल्यामुळे फेकून दिलेल्या थोटकांचा आश्रय घ्यायचं त्यांनी ठरवलं. ही गोष्ट आपल्या आत्मसन्मानाला धरून आहे असं त्यांना त्या मुग्धावस्थेत वाटलं.

त्यानंतर गवताच्या पोकळ दांड्यांचा प्रयोग करण्यात आला. ते त्यातून धूम्रपान करू शकत होते हे खरं. परंतु हा फार वाईट पर्याय होता. ही गुलामगिरी असह्य होत होती. त्यापेक्षा तर मृत्यू परवडला असता. त्यांनी आत्महत्या करायचं ठरवलं, आत्महत्येचा करार लिहिला, केदारजी मंदिराकडे जाताना तो लिफाफ्यात बंद केला, देवानं या साहसात आशीर्वाद द्यावा म्हणून दिवा लावला व खिशात विषारी धतुऱ्याच्या बिया घेऊन ते एकांतस्थळाकडे निघाले. त्यांच्यातील प्रत्येकानं काही बिया गिळल्या. पण नंतर ते घाबरले. मोठं होईपर्यंत आणि जवळ स्वतःचा पैसा येईपर्यंत स्वातंत्र्याचा प्रश्न नक्कीच काही दिवस लांबणीवर टाकता येऊ शकत होता! त्यावेळी आपण धूम्रपान करायला सुरुवात करू आणि उघडपणे धूम्रपान करू असं त्यांनी ठरवलं! आत्महत्येचा विचार सोडून देण्यात आला व त्याऐवजी रामजीच्या देवळात जाऊन 'शांत व्हायचं आम्ही ठरवलं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६]

नंतरच्या आयुष्यात गांधीजींच्या मनात धूम्रपानाविषयी तीव्र तिटकारा निर्माण झाला. ती घाणेरडी सवय असते एवढ्यामुळेच असं झालं नाही. त्यामुळे जी धुंदी येते व माणसाची विवेकशक्ती बधिर होते व सामान्यपणे तो जे काम करणार नाही ते तो करतो हे गांधीजींना जाणवलं आणि त्यामुळे तसं झालं. त्यासाठी ते टॉलस्टायच्या क्रेट्झर सोनाटातील नायकाचं उदाहरण द्यायचे. त्याला खून करायचा असतो पण तो तसं करू शकत नाही. त्यानंतर तो

आरामखुर्चीत पहुडतो व सिगारेट ओढू लागतो. धूम्रपानानं त्याच्या संवेदना बधिर झाल्यानंतर तो ते दुष्कृत्य करतो.

## २

हायस्कूलमध्ये असताना मोहनदासची त्याच्या दोन सहाध्यायांशी घनिष्ट मैत्री झाली. त्यापैकी एक होता लोहाना लाड, त्याच्या शाळेतील शिक्षकांचा लहान भाऊ. दुसरा मुलगा होता मुसलमान - शेख मेहताब. पहिला मुलगा जेव्हा त्यांच्या जीवनातून निघून गेला तेव्हा दुसऱ्यानं प्रवेश केला. या दुसऱ्याशी झालेली मैत्री ही त्यांच्या जीवनाची शोकांतिका होती. त्या शाळेत अशी काही मोठी मुलं होती की ज्यांचा सहवास वाईट आहे असं सर्व मुलांना वाटायचं. मोहनला नेहमी त्यांची भीती वाटायची. त्यांच्या त्रासापासून कोणी तरी आधार देणारा मित्र त्याला हवा होता. तसंच मनात सतत वसत असलेल्या न्यायभावनेमुळे आपल्यासारख्या दुर्बल मुलांनाही आपल्याला आधार देता यावा असं मोहनला वाटत होतं.

मोहनला वाटलं की आपल्यात जे गुण नाहीत ते सर्व मेहताबमधे आहेत. तो सशक्त आणि धट्टाकट्टा होता. त्याची अंगकाठी जबरदस्त होती. कोणतीही शारीरिक शिक्षा सहन करायचं त्याच्यात सामर्थ्य होतं. मोहन लहान बांध्याचा आणि नाजूक होता. त्याला चोरांची, भुतांची व सापांची भीती वाटायची. उजेडाशिवाय तो झोपू शकत नसायचा. त्यामुळे त्याच्या खोलीत सतत दिवा पेटता ठेवावा लागायचा. 'मला वाटत असे की एका बाजूनं भूतं, दुसऱ्या बाजूनं चोर आणि तिसऱ्या बाजूनं साप येत आहेत.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २०] उलटपक्षी त्याच्या मित्राला ना तर देवाची भीती वाटत असे ना राक्षसांची. तो मोठ्या अभिमानानं सांगायचा की 'मी माझ्या हातात जिवंत साप पकडू शकतो, चोरांना पळवून लावू शकतो आणि माझा भूतांवर विश्वास नाही.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २१] टग्यांची त्याला अगदीच भीती वाटत नसे. तो त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकू शकत असे. एकदा मोहनच्या वतीनं त्यानं मित्रांना चहापार्टी दिली. नेहमीप्रमाणे शेवटी पानांचे विडे देण्यात आले. परंतु त्यात काथ टाकण्याऐवजी असं काही तरी टाकलं की ज्यामुळे विडे खाणारांचे ओठ

आणि दात काळे झाले. तेवढ्यातच मोहनचा भाऊ कालिदास तिथं आला. त्या ठिकाणचं ते दृश्य पाहून त्याला धक्काच बसला. त्याला वाटलं की यामागे मोहन आहे. तो उद्गारला, 'मोनिया तू असं काही करू शकशील असं मला वाटलं नव्हतं!'

मोहनच्या आईवडिलांना ही मैत्री आवडत नव्हती. त्याच्या बायकोलाही. त्यांना माहीत होतं की मेहताबला अनेक व्यसनं आहेत. त्यांनी मोहनला सावध केलं. परंतु निष्ठा हा मोहनचा स्थायी भाव होता. त्यानं त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केलं. त्याला त्याच्या मित्राच्या उणिवेची जाणीव होती. परंतु त्याला वाटत होतं की आपण आपल्या मित्रात सुधारणा घडवून आणू शकू. त्यामुळे, 'माझ्याबद्दल काळजी करायचं कारण नाही' असं म्हणून त्यानं त्यांना आश्वस्त केलं. त्यांनी त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवला आणि त्याबद्दल त्याला छेडणं बंद केलं.

पाश्चात्य शिक्षणाच्या वाढत्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या दोषांपासून काठेवाडही अलिप्त नव्हता. आधी बंगाल जसा सुधारणेच्या लाटेतून गेला होता तसाच काठेवाडही या वेळी सुधारणेच्या लाटेतून जात होता. त्याची एक अभिव्यक्ती हिंदुत्वाच्या खाण्यापिण्यासंबंधातील, विशेषत्वानं मांसाहारासंबंधीच्या परंपरांविरुद्ध बंड पुकारण्यात होत होती.

जैन धर्माच्या प्रभावामुळे भारतात इतरत्र कुठेही नाही एवढी गुजरातमधील वैष्णवांत मांसाहाराबद्दल किळस आहे. परंतु सुधारणेच्या प्रभावाखाली राजकोटमधील अनेक तरुणांनी मांसाहार आणि मद्यपानास सुरुवात केली होती. काहींनी उघडपणे तर काहींनी गुप्तपणे. मांसाहार करणारात काही शिक्षक आणि मोहनचा दुसऱ्या क्रमांकाचा भाऊ करसनदासही होता. मोहननं या सुधारणेचा अवलंब करावा म्हणून मेहताब मागे लागला होता. तो म्हणायचा माझ्याकडे पाहा. माझी अंगकाठी आणि धैर्य पाहा. मोहनला या गुणांचं मोल वाटायचं. परिणाम अपरिहार्य होता - मांसाहाराची शिकवण.

मोहन मागेपुढे करत होता. त्याच्या हृदयाच्या तारा त्या वातावरणाला साथ देत नव्हत्या. परंतु त्याचा मित्र माघार घेणारातील नव्हता. त्याला सर्व युक्त्या माहीत होत्या. भारताची गुलामगिरी प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणात सलत होती. इंग्रजांना बाहेर काढून भारताला

पूर्वीचं गौरवाचं स्थान मिळवून द्यायचं स्वप्न ज्यानं कधीनाकधी पाहिलं नसावं असा एखादाच माणूस असेल. मोहनही त्याला अपवाद नव्हता. त्याचा मित्र त्याच्या या भावनेशी खेळू लागला. इंग्रज भारतावर राज्य का करू शकले? कारण ते मांसाहारी होते. नर्मद या गुजराथी कवीनं आपल्या विनोदी काव्यात बुटक्या भारतीयांवर 'ताकदवान साडेसात फूटी मांसाहारी इंग्रजांनी' राज्य केल्याबद्दल इंग्रजांची प्रशंसा केलेली नाही काय ?

हा युक्तिवाद मोहनला पटला. 'माझ्या मनात ठसू लागलं की मांसाहार चांगला आहे, त्यामुळे मी सशक्त आणि साहसी होईन, आणि सर्व देशानं मांसाहार स्वीकारला तर इंग्रजांवर विजय मिळवता येईल.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २१] त्याच्या मित्रानं मांस मिळवलं आणि ते शिजवून घेतलं. ते नदीकाठी एकांताच्या ठिकाणी भेटले आणि मोहननं पहिल्यांदाच मांसाहाराची चव घेतली.

त्याला मांसाहार आवडला नाही. 'बकऱ्याचं मास कातड्यासारखं चिवट होतं... मला कसं तरीच वाटत होतं आणि खाणं तसंच सोडावं लागलं.' रात्रीच्या वेळी भयानक दुःस्वप्नांनी त्याला पछाडलं होतं. 'प्रत्येक वेळी मी झोपायचा प्रयत्न करू लागलो की मला वाटायचं की माझ्या पोटात जिवंत बकरा केकाटत आहे. तसाच मी पश्चात्तापानं उडी मारून उठत असे.' परंतु 'सुधारणेसाठी' त्यानं ते सर्व सहन केलं. त्याला सामर्थ्यसंपन्न आणि साहसी व्हायचं होतं. आपल्या देशातील लोकांनीही असंच करून 'देशाला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करावं असं मला वाटत होतं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २१]

अर्थातच हे सर्व आईवडिलांपासून लपवून ठेवावं लागत होतं. त्यांना जर ते कळलं असतं तर त्यांना धक्का बसून मरणसुद्धा येऊ शकलं असतं. परंतु मांसाहाराचं 'कर्तव्य' देशाच्या स्वातंत्र्यासाठी पार पाडणं आवश्यक होतं. 'मी स्वतःशीच गृहीत धरलं की या ठिकाणी आईवडिलांपासून लपवून ठेवणं हे काही खोटं बोलणं नाही.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २२]

काळाच्या ओघात मांसाहाराबद्दल वाटणारा तिटकारा निघून गेला एवढंच नाही तर मांसाहार त्याला आवडूही लागला. परंतु दुसरीच अडचण उभी राहिली. दरवेळी त्यानं मांस खाल्लं की त्याला भूक राहत नसे आणि जेवायच्या वेळी आईला सांगायला त्याला सबबी शोधाव्या

लागत असत. त्याच्यावर विश्वास असणारी आई त्याच्या शब्दावर शब्दशः विश्वास ठेवायची. तिची फसवणूक करावी लागल्यामुळे आणि तिच्याशी खोटं बोलावं लागल्यामुळे त्याचं मन घृणेनं भरून गेलं. त्याला ते सहन होऊ शकत नव्हतं. त्याचबरोबर एवढी महत्त्वाची 'सुधारणा' तशीच पूर्णपणे सोडूनही देता येत नव्हती. त्यामुळे आईवडिलांच्या जिवंतपणी मांसाहार करायचा नाही, ते जेव्हा नसतील व आपण पूर्णपणे स्वतंत्र असू त्यावेळी उघडपणे मांसाहार करायचा असं त्यानं ठरवलं. अशा प्रकारे तो प्रयोग मधेच थांबवण्यात आला आणि नंतर परत कधीच सुरू करण्यात आला नाही. तो प्रयोग अंदाजे वर्षभर चालू होता व त्या काळात त्यानं पाचसहा वेळाहून अधिक वेळा मांसाहार केला नसावा. त्याबद्दल त्यानं त्याच्या आईवडिलांना कधीच सांगितलं नाही. त्याच्यात धीरही नव्हता. आणि अखेरपर्यंत ते सुखमय अज्ञानात राहिले.

त्याच्या मित्राचा कुप्रभाव इतर विविध मार्गांनी त्याच्यावर पडतच होता. त्यानं मोहनच्या मनात संशयाचं बीज पेरलं आणि त्यामुळे त्याच्यात व त्याच्या बायकोत भांडणांना सुरुवात झाली. अखेरीस त्यानं त्याला कुंटणखान्यात नेलं. प्रत्येक गोष्टीची नीट योजना आखण्यात आली होती आणि सर्व काही आधीच ठरवण्यात आलं होतं. पैसेसुद्धा देण्यात आले होते. 'परंतु ईश्वराच्या असीम दयेनं मला माझ्यापासून वाचवलं. पापाच्या त्या गुहेत मी जवळपास बधिर आणि आंधळा झालो होतो. मी त्या बाईजवळ बिछान्यावर बसलो पण मला शब्दच फुटत नव्हता. जणू माझी जीभ चिकटली होती.' त्या बाईचा धीर संपला आणि तिनं तिच्या काही खास शिव्यांसह त्याला रस्त्यावर ढकललं. 'त्यावेळी मला वाटलं की माझ्या पौरुषाला धक्का लागला आहे. असं वाटलं की धरणी दुभंगावी आणि त्यात लाजेनं सामावून जावं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २४]

अशा रीतीनं तो जरी पूर्ण अधःपातापासून वाचला तरी त्याला जाणवत असल्याप्रमाणे तो पूर्णपणे त्या घाणीतून बाहेर पडला नव्हता, 'कारण शारीरिक वासना कायम होत्या, मनात विचार घोळत होते व असं करणं हेसुद्धा पापकर्म करण्यासारखंच होतं हे त्याचं कारण होतं. मागील प्रसंगी आईवडिलांच्या भक्तीनं आणि त्यांच्याशी खोटं बोलावं लागत असल्याच्या दुःखद जाणिवेनं त्याला वाचवलं होतं. या वेळी त्याच्या 'मूर्खपणानं' त्याच्या कवचाचं काम केलं. यातून

तो धडा शिकला की जो माणूस संकटापासून वाचण्यासाठी स्वतःवरच अवलंबून राहतो तो स्वतःला फसवतो. बुद्धी आणि इच्छा आपल्याला काही अंतरापर्यंतच घेऊन जाऊ शकतात. परंतु कसोटीच्या वेळी या गोष्टी आपली मदत करू शकत नाहीत. त्यावेळी केवळ ईश्वरी कृपाच आपल्याला वाचवत असते. 'आपल्याला माहीत आहे की माणसानं अनेकदा कितीही प्रतिकार केला तरी तो मोहांना बळी पडतो. परंतु आपल्याला हेही माहीत असतं की अनेकदा दैव अशी परिस्थिती निर्माण करते की माणसाच्या इच्छेशिवायही तो त्या मोहांपासून त्याला वाचवतो. हे कसं घडतं, माणूस किती स्वतंत्र आहे आणि तो परिस्थितीचा किती गुलाम आहे - इच्छास्वातंत्र्याची भूमिका काय आहे आणि दैवाचा रंगभूमीवर केव्हा प्रवेश होतो – हे सर्व गूढ आहे आणि गूढच राहील.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २४]

इतकं होऊनही मेहताबची मैत्री त्यानं सोडली नाही. एवढंच नाही तर तो जेव्हा इंग्लंडला अभ्यासासाठी गेला तेव्हा आपल्या तुटपुंज्या पैशातूनही तो त्याला तिथून पैसे पाठवायचा. त्यानंतर त्याचा हा मित्र त्याच्यामागे दक्षिण आफ्रिकेतही गेला. त्यानंतर धक्कादायक दीर्घ प्रकरण घडल्यानंतर त्याच्या या मित्राची गुन्हेगारी व्यक्त करणारी बाजू दिसली. तेव्हा कुठं त्याचे डोळे उघडले.

मध्यंतरीच्या काळात मोहनच्या या मित्रानं संशयाची जी बीजं पेरली होती ती अंकुरली होती. त्यामुळे त्या पतिपत्नीच्या संबंधात विष पेरलं गेलं. त्यासाठी तिनं लहानसं कारण देखील दिलं नव्हतं. विनाकारणच्या मत्सरामुळे पत्नीला वारंवार दिलेल्या दुःखासाठी तो स्वतःला कधीच क्षमा करू शकला नाही. गांधीजींनी आपल्या आत्मकथेत लिहिल्याप्रमाणे अखेरीस ते विष तेव्हाच निघालं 'जेव्हा अहिंसेचा संपूर्ण मला अर्थ कळला. त्यावेळी मला ब्रह्मचर्याचं महत्त्व कळलं आणि लक्षात आलं की बायको ही काही नवऱ्याची खरेदी केलेली गुलाम नसते. उलट ती त्याची सहकारी आणि मदतनीस असते. ती त्याच्या सर्व सुखदुःखातील समान भागीदार असते व तिलाही नवऱ्याप्रमाणे स्वतःचा मार्ग निवडण्याचं स्वातंत्र्य असतं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २५]

मैत्रीच्या या प्रयोगाचं मोहनदाससाठी फार महत्त्व होतं. थोरो कुठं तरी उद्‌गारला आहे की 'मैत्री ही संपूर्ण समतेच्या तत्त्वावर आधारित असते'. त्याचा अर्थ एवढाच नाही की त्यातील पक्ष सर्व बाबतीत समान असतात. त्याचा अर्थ असाही आहे की मैत्रीतील घटकांवर त्या मैत्रीचे होणारे परिणामही समान असतात.... व्यक्ती केवळ मैत्री साठवायच्या अमृताच्या भांड्याप्रमाणे असते आणि 'निश्चल जल' या शब्दातील विरोधाभास हे मैत्रीचं प्रतीक आहे. ती तिच्या पातळीचा शोध घेते आणि सर्व घटकांच्या अंतःकरणांत ती सारख्याच प्रमाणात वाढते.' [*वाल्डेन अँड अदर रायटिंग्ज ऑफ हेन्री डेव्हीड थोरो*, द मॉडर्न लायब्ररी न्यू यॉर्क, (१९३७), पृष्ठ ३७९] आणि पुन्हा : 'स्वार्थी मैत्री ही संकुचित करणारी आणि इतरांना वगळणाऱ्या प्रवृत्तीची असते. खऱ्या मैत्रीच्या आधिक्यामुळे प्रेमभावना निर्माण होते व त्यामुळे मानव समाजात गोडवा निर्माण होतो.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३७९] मोहनला वाटत होतं की आपल्याजवळ जे काही सर्वोत्कृष्ट आहे ते मेहताबला आपण दिलं तर आपल्यावर कोणताही परिणाम न होता आपण त्याच्यात 'सुधारणा' घडवून आणू शकू. त्याच्या फार उशिरा लक्षात आलं की सुधारणेसाठी निर्माण करण्यात आलेली जवळीक हा 'वदतोव्याघात' आहे. मैत्रीचं मूळ स्वरूपच 'द्यायचं आणि घ्यायचं असतं. आणि माणसात गुणांपेक्षा दोषांकडे आकर्षित व्हायची प्रवृत्ती अधिक असते. त्यामुळे एकूण विचार करता 'समविचारांच्या लोकातील मैत्रीच योग्य आणि टिकाऊ असते असं म्हणावं लागते. 'खऱ्या मैत्रीमुळे आपल्याला आपल्या आत्म्याची ओळख पटते. ही गोष्ट जगात क्वचितच आढळणारी आहे. त्यामुळे 'इतरांना वगळणारी जवळीक' नेहमीच टाळायला हवी. 'जो कुणी ईश्वराचा भक्त असतो त्यानं एकटंच राहायला हवं वा संपूर्ण जगाशी त्यानं मैत्री करायला पाहिजे.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १९]

## ३

मांसाहारातील गुप्त प्रयोगामुळे मोहनच्या मोठ्या भावावर थोडसं कर्ज झालं होतं. कर्ज चुकवणं भाग होतं. त्यासाठी पैसे मिळवावे लागणार होते. मोहनचा भाऊ सोन्याचं जड कडं घालत असे. दीर्घ विचारविनिमयानंतर त्यांनी त्यातून एक तुकडा कापून काढायचं ठरवलं.

याप्रमाणे करण्यात आलं आणि कर्जाची परतफेड करण्यात आली. मोहन त्या चोरीत सहभागी झाला होता.

जेव्हा रात्री तो भाऊ परतला तेव्हा आई आणि वडील या दोघांनाही त्या कड्यावरील माथ्याचा भाग गहाळ झाला असल्याचं आढळलं. ते कुठं गेलं म्हणून त्यांनी विचारलं. त्याला काही ते माहीत नव्हतं. त्यांनी मोहनला विचारलं. त्यानंही त्याबद्दल आपल्याला काही माहीत नसल्याचं सांगितलं.

आईवडील दोघांचाही आपल्या मुलावर संपूर्ण विश्वास होता व ते प्रकरण तिथंच थांबलं. मोहनच्या बहिणीच्या सांगण्याप्रमाणे त्यानंतर मोहन आपल्या अभ्यासिकेत गेला व अभ्यास करू लागला. परंतु त्याचं मन त्याला टोचत होतं. तो अस्वस्थ झाला. एखाद तासानंतर तो उठला आपल्या आईकडे गेला आणि त्यानं सर्व काही कबूल केलं.

तिनं संपूर्ण जिव्हाळ्यानं सांगितलं, 'जा आणि तुझ्या वडिलांना सांग.'

'यासाठी बाबा मला मारतील काय?' त्यानं विचारलं.

'ते मारणार नाहीत. ते का मारतील? त्यांनी असं कधी तरी केलं आहे काय ? जा आणि त्यांना सांग. आणि तू जर म्हणशील तर मी जाऊन त्यांना सांगते आणि तुला शिक्षा न करायलाही त्यांना सांगते.'

'नाही आई. चूक माझी आहे. त्यामुळे मीच त्यांच्याकडे जायला पाहिजे आणि होणाऱ्या परिणामांना तोंड द्यायला पाहिजे.'

असं म्हणून तो आईजवळून गेला, त्यानं आपला कबुलीजबाब कागदाच्या एका कपट्यावर खरडला आणि घाबरत वडिलांच्या हाती ठेवला. त्याची भीती स्वतःसाठी नव्हती तर त्याचा परिणाम वडिलांवर काय होईल यासाठी होती. त्या पत्रात त्यानं केवळ कबुलीच दिली नव्हती तर केलेल्या गुन्ह्यासाठी योग्य शिक्षा करावी म्हणूनही विनंती केली होती व अखेरीस

लिहिलं होतं की त्यांनी यासाठी स्वतःला शिक्षा करून घेऊ नये. 'मी याचबरोबर शपथ घेतो की यापुढे मी कधीही चोरी करणार नाही.'

त्या कबुलीजबाबातील एक वाक्य असं होतं : 'त्यामुळे बाबा आता तुमचा मुलगा तुमच्या नजरेत एका सामान्य चोरापेक्षा वेगळा राहणार नसेल.' त्याच्या वडिलांनी ते संपूर्ण पत्र वाचलं. 'त्यांच्या डोळ्यातील मोत्यासारखे अश्रू गालावरून ओघळत तो कागद भिजू लागला. क्षणभर त्यांनी आपले डोळे मिटले आणि तो कागद फाडून टाकला. तो कागद वाचण्यासाठी ते उठून बसले होते. ते पुन्हा पडले. मीसुद्धा रडलो. मला माझ्या वडिलांच्या वेदना दिसत होत्या... प्रेमाच्या त्या मोत्यासारख्या अश्रूबिंदूंनी माझं अंतःकरण स्वच्छ केलं आणि माझं पाप धुऊन काढलं.....

अशा प्रकारची उदात्त क्षमाशीलता माझ्या वडिलांसाठी स्वाभाविक नव्हती. मला वाटत होतं की ते संतापतील, कठोर शब्द बोलतील आणि आपलं डोकं आदळून घेतील. परंतु आश्चर्य वाटावं एवढे ते शांत राहिले. माझा विश्वास आहे की माझ्या संपूर्ण कबुलीमुळेच असं घडलं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २८]

*'आत्मकथा'* वा '*माझे सत्याचे प्रयोग'* या पुस्तकात या प्रसंगासंबंधी त्यांनी लिहिलं: 'त्या दिवसापासून खरं बोलायचं मला वेड लागलं. त्याशिवाय पश्चात्तापदग्ध अंतःकरणातून बाहेर पडलेल्या कबुलीच्या शुद्धीकरणाच्या शक्तीचंही त्यांना ज्ञान झालं. शिक्षा करणारी, शुद्ध करणारी आणि सन्मार्गावर चालायला बाध्य करणारी अहिंसेसारखी दुसरी कोणतीही शक्ती नाही हेही त्या अनुभवानं त्यांच्या लक्षात आलं. 'त्यावेळी त्यातून मला केवळ वडिलांचं पितृप्रेम दिसलं पण आज मला कळतं की ती शुद्ध अहिंसा होती. तिच्या शक्तीला कोणत्याच मर्यादा नाहीत.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २८]

* * *

यानंतर दोन वर्षांनी १८८६ साली मोहन सहाव्या वर्गात होता. त्यावेळी तो सतरा वर्षांचा होता. सर्व प्रकारची शुश्रूषा आणि औषधोपचार करूनही त्याच्या वडिलांची प्रकृती ढासळतच

होती. त्यांना दम्याचा त्रास होता. एका इंग्रज शल्यचिकित्सकानं शस्त्रक्रियेचा सल्ला दिला. परंतु त्यांच्या नेहमीच्या डॉक्टरनं त्याला नकार दिला. नातलगही घाबरत होते. शल्यचिकित्सेचा विचार सोडून देण्यात आला. त्यांची प्रकृती अजूनच वेगानं ढासळू लागली.

वडिलांच्या अखेरच्या दिवशी रात्री तो त्यांचे पाय चेपत होता. साडेदहा-अकराच्या सुमारास त्याच्या काकांनी त्याला जायला सांगितलं. काबा गांधींच्या ढासळत्या प्रकृतीची बातमी कळल्यानं ताबडतोब ते राजकोटला आले होते. दोन्ही भावांचं परस्परांवर फार प्रेम होतं. मोहन जसा तिथून मोकळा झाला तसा नेहमीप्रमाणे तो आपल्या शयनिकेत गेला. त्याच्या बायकोचे दिवस भरत आले होते. 'ती गरीब बिचारी झोपली होती. मी तिला उठवलं. पाच-सहा मिनिटातच नोकरानं दार ठोठावलं. मी घाबरलो. 'तो म्हणाला ऊठ, वडील फार आजारी आहेत.' मी बिछान्यातून उडीच मारली.

'काय झालं? लवकर सांग.'

'वडील गेले.'

मोहनला कळलं की वडिलांना सोडल्यानंतर लगेच ते अत्यवस्थ झाले. त्यांना भविष्याची चाहूल लागली असावी. 'त्यांनी टाक आणि कागद आणायची खूण केली आणि लिहिलं 'अंत्यविधी सुरू करा.' त्यानंतर त्यांनी आपल्या दंडावरील गंडा व गळ्यातील तुळशीचे मणी घातलेली सोन्याची पोत या दोन्ही वस्तू काढून बाजूला फेकल्या. यानंतर एका क्षणातच ते गेले.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३०]

मोहननं स्वतःची खूप निर्भर्त्सना केली. तो तन-मनानं आईवडिलांचा भक्त होता. तो जर वासनांना बळी पडला नसता तर वडिलांच्या शेवटच्या क्षणी त्यांची सेवा करायची संधी त्याला मिळाली असती. 'परंतु प्रत्येक रात्री मी वडिलांच्या पायांची मालीश करत असताना माझ्या मनात माझ्या शयनिकेचेच विचार सुरू असत. आणि तेही धर्म, वैद्यक शास्त्र व सामान्यज्ञान हे सर्व संभोगाला ज्यावेळी मनाई करतात त्या वेळी.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २९] त्याच्या पितृभक्तीत उणीव असल्याचं त्याला जाणवलं. त्या क्षणाची आठवण त्याच्या हृदयात काट्याप्रमाणे सलत होती.

वासनांवर विजय मिळवण्यासाठीचा संघर्ष हा त्याच्या जीवनातील सर्वात मोठा संघर्ष झाला आणि तो संघर्ष करताना त्याला अनेक कसोटीच्या प्रसंगातून जावं लागलं. त्याला झालेलं मूल काहीच दिवस जगलं. 'दुसरी कशाचीच अपेक्षा करता येत नव्हती. विवाहित असलेल्या सर्वांनी माझ्या या उदाहरणापासून धडा घ्यायला पाहिजे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३१]

नंतर गांधीजी अनेकदा सांगायचे की 'फार मोठे परिश्रम केल्यानंतर अहिंसा मला कळली. ब्रह्मचर्यासाठी अजूनही मी संघर्ष करतो आहे. परंतु सत्याचा अर्थ मात्र स्वाभाविकपणे मला कळला. त्यापासून मी ढळलो की मला खोल वेदना होत असत.'

पूर्ण सत्याचरण हाच आपल्या जीवनाचा अर्थ आहे असं त्याच्या लक्षात आलं. इतकंच नाही तर ब्रह्मचर्यासाठी केलेला संघर्षही त्याच सत्याच्या शोधाचा भाग झाला. त्यासाठी गांधीजींनी अनेक खडतर प्रयोग केले व ते करताना कितीही मोठा त्याग करावा लागला तरी त्याची फिकीर केली नाही. अखेरीस 'जो एकटाच आशीर्वाद द्यायला समर्थ आहे त्याच्या भेटीची आस लावून' त्यानं गांधीजींना अमरत्वाच्या मार्गावरील यात्रेकरू बनवलं.

## ४

पुतळीबाईचे आईवडील प्रणामी वा सतप्रणामी पंथाचे होते. तो सर्वसंग्राहक पंथ आहे व त्यात हिंदू धर्मातील व इस्लाममधील सर्व उत्तम तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. गांधीजींच्या शब्दात एकेकाळी त्यांना गुप्त मुसलमान समजण्यात येत असे. मोहनच्या घरापासून प्रणामी मंदिर फार अंतरावर नव्हतं. त्याचं स्वरूप बदललेलं असलं तरी ते अजूनही अस्तित्वात आहे. गांधीजी मागील आठवण सांगताना म्हणाले होते : 'माझ्या लग्नानंतर माझ्या आईनं मला या देवळात एकदा नेलं होतं. अशा प्रकारचं पोरबंदरमध्ये हे एकच देऊळ होतं.' त्यांना त्या देवळासंबंधी सविस्तर आठवण नव्हती तरी त्यांना अस्पष्टसं आठवत होतं की 'त्या देवळाच्या इमारतीत कोणतीच मूर्ती नव्हती. भिंतीवर मात्र काही लिहिलेलं होतं. ते कुराणासारखं वाटत

होतं. तिथले पुजारी जे कपडे घालत तेही हिंदू पुजाऱ्यासारखे नव्हते व त्यांची प्रार्थनापद्धतीही मुसलमानांशी मिळती जुळती होती.'

प्रणामी हे प्राणनाथी म्हणूनही ओळखले जातात. अठराव्या शतकाच्या सुरुवातीला एका प्राणनाथनं, जो काठेवाडमधील क्षत्रिय होता, हा पंथ काढला व त्या पंथाला त्याचंच नाव मिळालं. त्याच्या *'क्वियामातनामा'* मधून त्यानं दिलेल्या शिकवणुकीचा सारांश असा सांगता येईल: 'बायबल सांगते की ख्रिस्त हा सर्वांचा प्रमुख आहे आणि तो येऊन न्याय करणार आहे. ज्यू सांगतात की, मोझेस सर्वात महान आहे व सर्वांचा तोच तारणहार होणार आहे. प्रत्येक जण वेगवेगळ्या प्रथा पाळतो व आपलाच देव श्रेष्ठ आहे असं सांगतो. अशा रीतीने भांडत ते वेगवेगळी नावं घेतात. परंतु सर्वांचा शेवट एकच आहे. परब्रह्म.' [जेम्स हेस्टींग्ज यांच्या *एनसायक्लोपिडिया ऑफ रिलीजन अँड इथिक्समधे* जी. ए. गॅरिसन, खंड १०, पृष्ठ १५०-५१]

प्राणनाथनी आपल्या शिष्यांना अंमली पदार्थांचा उपयोग करायला - तंबाखू, दारू मांसाहार वगैरे - मनाई केली. तसंच त्यांनी परस्त्रीगमनालाही विरोध केला आणि शांतता आणि दयाळूपणा या गुणांची शिकवण दिली. त्यांनी मूर्तिपूजेला मनाई केली. पन्ना येथील त्यांच्या देवळाला एका यात्रेकरूनं १७६४ साली भेट दिली असता तिथल्या देवळात त्याला एक लहानसा बिछाना व त्यावर ठेवलेली पगडी दिसली. ती प्राणनाथची बैठक होती. तिच्या दोन्ही बाजूला एक लाकडी तिवई होती. एका तिवईवर कुराणाची प्रत होती तर दुसरीवर पुराण ठेवलेले होते. 'दोन्ही धर्मातील विद्वान लोकांशी चर्चा करताना [वरीलप्रमाणे, पृष्ठ १५०-५१] कोणत्याही प्रश्नाचं उत्तर द्यायची त्याची तयारी असे व त्याच्या बहुतेक उत्तरातून ईश्वर एकच असल्याचा विचार व्यक्त होत असे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १५०-५१]

पुतळीबाई जरी सर्वसंग्राहक विचाराच्या पंथाची होती तरीही परंपरागत प्रथांना ती अतिशय कर्मठपणानं चिकटून होती. तिच्या घरातील नेहमीच्या सकाळच्या कामकाजाला आणि पूजाअर्चेला सहा वाजता सुरुवात व्हायची आणि त्याला दोन तास लागायचे. पूजाअर्चा संपायच्या आधीच एक ब्राह्मण पुजारी, जो गांधी कुटुंबाचाही पुजारी होता, काबा गांधींच्या

गल्लीत भजन गात यायचा आणि भिक्षा गोळा करायचा. नवऱ्याच्या मृत्यूनंतर पूजाअर्चाच पुतळीबाईचं सांत्वन करू शकत असे. तिच्या घरी अनेक जैन संत येत असत. त्यांचा भर सम्यक वर्तन आणि शुद्ध चारित्र्यावर असायचा. तिचं पावित्र्य इतकं प्रसिद्ध होतं की इतर धर्मातील लोकांनी दिलेलं दान न स्वीकारणारे जैन संतही तिच्याकडून दान घेण्यात संकोच करत नसत.

मोहनच्या वडिलांना आपल्या सर्वसामान्य व्यवहारज्ञानामुळे धर्माच्या तात्त्विक घटपटादी चर्चेत रस नसायचा. परंतु ते मुमुक्षू होते. त्यांना धार्मिक पुरुषांचा सहवास आवडत असे. सार्वजनिक माणूस असल्यामुळे त्यांच्या घरी दररोज मुसलमान, झोरास्ट्रियन आदी विविध धर्मांची आणि पंथाची माणसं यायची. या सर्व लोकांची धर्म आणि इतर सांसारिक बाबींची चर्चा मोहनला ऐकायला मिळायची हे मोहनचं भाग्य होतं. त्यांच्या मुखातून झरलेली विद्वत्तापूर्ण विचारमौक्तिकं गोळा करायची मोहनला संधी मिळायची. त्यामुळे त्याचे वडील ज्या मूल्यव्यवस्थेचं प्रतिनिधित्व करत होते तिची बीजं मोहनच्या अंतःकरणात वाढू लागली. त्याच्या नंतरच्या आयुष्यात हीच त्याची स्वभाववैशिष्ट्ये ठरली. उदाहरणार्थ स्वाभिमान आणि प्रतिष्ठेची तीव्र जाणीव, तत्त्वनिष्ठेचं काटेकोर पालन, सार्वजनिक माणूस म्हणून इतरांशी सहानुभूतिपूर्ण आणि सूज्ञ वागणूक आणि या सर्वांवर कडी म्हणून शाब्दिक नियमांच्या पलीकडे जाणारी सत्य आणि न्यायाची प्रखर जाणीव.

मोहनवर आईवडिलांनंतर शैशवावस्थेत जर सर्वाधिक धार्मिक प्रभाव कशाचा पडला असेल तर तो त्याच्या दाईच्या म्हणजे रंभेच्या श्रद्धेचा. आपण पाहिलं आहे की जेव्हा केव्हा अंधार व्हायचा तेव्हा त्याला भुताखेतांची भीती वाटायची. त्याची दाई त्याला सांगायची : 'भुतं कुठेच नाहीत, पण तुला भीती वाटतच असेल तर तू रामनामाचा जप कर.' त्यानं तसं केलं आणि त्याची भीती पळाली. त्यामुळे त्याच्या अंतःकरणात रामनामाच्या असीम संरक्षक शक्तीच्या श्रद्धेचं बीज अंकुरलं. पूर्ण श्रद्धेनं रामनामाचा जप केल्यास ही शक्ती आपलं रक्षण करते असा त्याचा विश्वास बसला. सर्व प्रकारच्या आध्यात्मिक वा शारीरिक दुःखावरील तो रामबाण उपाय असल्याची त्याची खात्री पटली. त्याच्या बालपणी तो जे काही शिकला त्यानं त्याच्या नंतरच्या आयुष्यातील

नभोमंडळात भव्य रूप धारण केलं. 'तो असा सूर्य होता की ज्यानं माझ्या अगदी काळोख्या क्षणांनाही उजळून टाकलं.' [हरिजन, *वुड्कली लेटर्स,* डिसेंबर ५, १९३६, पृष्ठ ३३९]

वडील आजारी असताना पोरबंदर येथे बिलेश्वर येथील लढा महाराज यायचे आणि त्यांना तुलसी रामायण गाऊन दाखवायचे. वडिलांचे पाय चेपत चेपत मोहन ते ऐकायचा. तुलसीदासांच्या अमर काव्याचं सुंदर संगीत त्यांच्या उपाशी आत्म्याला आल्हाददायक वाटायचं व आयुष्यभर त्याचं स्मरण त्याला होत राहायचं. त्यांच्या आयुष्याचा आधार असलेल्या गीतेनंतर तुलसीरामायणाला त्याच्या जीवनात स्थान मिळालं आणि मुलानं आईच्या छातीशी बिलगावं तसे गांधीजी रामायणला बिलगले.

त्याच्या आईवडिलांच्या उदाहरणानं त्याच्यात व्यापक सहिष्णुता निर्माण झाली आणि सर्व धर्मांबद्दल त्याला आदर वाटू लागला. परंतु ख्रिश्चन धर्मासंबंधी मात्र त्याचं मत अतिशय कलुषित झालं. याला कारण ख्रिश्चन मिशनऱ्यांचं काम होतं. ऐतिहासिक दृष्ट्या ख्रिश्चनांच्या कामाची सुरुवात भारतावर ब्रिटिशांनी विजय मिळवल्यानंतर कमीअधिक प्रमाणात भारतातील ब्रिटिश सत्तेच्या सोबत झाली व त्यामुळे 'तो विजेत्यांचा धार्मिक साम्राज्यवाद आहे' असं गांधीजींना वाटलं. ईश्वरानं आपल्या निवडक लोकांना 'नास्तिकांवर' राज्य करायला पाठवलं. त्यामुळे 'नास्तिकांनी' येशू ख्रिस्ताचा परत 'स्वीकार' करायला पाहिजे असं मिशनऱ्यांना वाटायचं. 'आत्मे गोळा करायची' मिशनऱ्यांनी स्वीकारलेली पद्धत दुर्दैवानं नेहमीच चांगली नसायची, किंबहुना केव्हा केव्हा तर ती अनैतिकही असायची. चांगल्या अंतःकरणाचे धर्मोपदेशकही त्यांच्या प्रभावाखाली आलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांवर आपली लोभी नजर ठेवायचे. 'ख्रिस्ताच्या ह्या उत्साही अनुयायांची पद्धत सरळ होती. ख्रिश्चन धर्माच्या एका तासासाठी इंग्रजी, इतिहास, भूगोल वा गणिताचे चार तास बक्षीस देण्यात यायचे' असं दादाभाई नौरोजी यांच्या चरित्रलेखकानं लिहिलं आहे. [आर. पी. मसानी, *दादाभाई नौरोजी : ग्रँड ओल्ड मॅन ऑफ इंडिया,* पृष्ठ ३८] त्यांची सर्वात दानशूरपणाची कृती हीसुद्धा बेसावध लोकांना जाळ्यात पकडण्यासाठी केलेली कृती असायची. त्यामागेही धर्मपरिवर्तनाचाच हेतू असायचा. लोक त्यांना 'शेळीच्या वेषातील लांडगा' समजायचे.

[वरीलप्रमाणे, पृष्ठ ३८] त्यांच्या या कावेबाजपणाच्या क्लुप्त्यांच्या भीतीमुळे मुंबई प्रांताचे मुख्य न्यायाधीश सर एस्किन पेरी यांनी कायद्याचं शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जाण्यासाठी दिलेली शिष्यवृत्तीही दादाभाई नौरोजींनी नाकारली. ख्रिश्चनेतर धर्मांची ते करत असलेली निंदा आणि टीका यामुळे तसंच धर्मांतर म्हणजे धर्मांतरितानं मद्य, गोमांस भक्षण आणि पाश्चात्य पद्धतीची राहणी ठेवावी असाच अर्थ होत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध केवळ सनातनीच नाही तर सर्व लोकांमध्ये तीव्र भावना निर्माण झालेली होती. मोहननं राजकोटमध्ये अशाच प्रकारच्या धर्मांतराची हकीगत ऐकली होती. त्याला वाटत होतं की ज्या धर्मात गोमांसभक्षण, मद्यपान व आपल्या संस्कृतीशी न जुळणारे कपडे घालणं इत्यादी गोष्टींची मागणी करण्यात येते त्या धर्माला धर्म हे नाव शोभत नाही. 'माझ्या असंही ऐकिवात आलं आहे ज्या माणसाचं नुकतंच धर्मांतर झालं आहे त्यानं आपल्या पूर्वजांची निंदा करायलाही सुरुवात केलेली आहे.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स वुईथ ट्रुथ*, पृष्ठ ३४] त्यामुळे त्याच्या मनात ख्रिश्चन धर्माबद्दल तीव्र तिटकारा निर्माण झाला.

प्रेस्बिटेरिअनांचं राजकोट येथे कार्यालय होतं. काही वेळा मोहन आणि त्याचे मित्र शाळेत जात असताना शाळेच्या फाटकाजवळ जमावाला धर्मोपदेश करताना एक मिशनरी दृष्टीस पडत असे. हा धर्मोपदेशक रेव्हरंड एच. आर. स्कॉट होता. तो काय शिकवत होता याची या मुलांना काहीही कल्पना नव्हती. कमीतकमी मी तरी त्यांच्याजवळ कधीच गेलो नाही. असं गांधीजींनी नंतर जोसेफ डोक यांना सांगितलं. परंतु लोकांनी त्यांच्याशी केलेल्या गैरवर्तणुकीच्या अफवा गांधीजींच्या कानावर यायच्या. गांधीजी म्हणाले की नंतर त्यांच्याशी माझी ओळख झाली व त्यांच्याबद्दल मला आदरही वाटू लागला. [जोसेफ जे डोक, एम. के. गांधी : *अॅन इंडियन पॅट्रीअट इन साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ३१]

गांधीजींचं माझे सत्याचे प्रयोग या पुस्तकातील राजकोटमधील मिशनऱ्यांच्या कार्याबद्दलच्या आठवणी वाचल्यानंतर रेव्हरंड स्कॉट यांनी १९२६ साली गांधीजींना पत्र लिहून स्पष्टपणे कळवलं की 'मी हिंदू धर्मावर कधीही दोषारोपण केलं नाही व मद्यपान वा

गोमांसभक्षणासाठीही कोणाला प्रवृत्त केलं नाहीं.' [*यंग इंडिया*, ४ मार्च १९२६, पृष्ठ ८२] गांधीजींनी हे स्पष्टीकरण रेव्हरंड स्कॉटपुरतं मान्य केलं पण सामान्यपणे धर्मांतराचं जे काम करतात त्यांच्याविषयी आपण आपल्या मतावर अजूनही कायम असल्याचं सांगितलं. काळाच्या ओघात ख्रिश्चन धर्माविषयीचा त्यांचा तिटकारा कमी झाला. परंतु ख्रिश्चन मिशनऱ्यांशी असलेलं त्यांचं भांडण कायम राहिलं. त्यांचं आणि गांधीजींचं सूत कधीच जुळलं नाही.

मोहन ज्या शाळेत शिकत होता तिथं धर्माचं शिक्षण देण्यात येत नसायचं. त्यामुळे ते शिक्षण घरी द्यावं लागायचं. त्याला जेव्हा प्राथमिक शाळेत पाठवण्यात आलं तेव्हा त्याच्या भावानं त्याला एका ब्राह्मणाच्या हाताखाली रामरक्षा स्तोत्र व विष्णूपूजा शिकण्यासाठी ठेवलं. तो ब्राह्मण घरातील इतर मुलांसमवेत त्याला हे शिकवत असे. त्यानं ते पाठ केले. परंतु त्यांचा पूर्ण अर्थ कळावा एवढं संस्कृत त्याला येत नव्हतं. भागवत पुराणावरील प्रवचनांतील पुराणाचं वाचन व त्यावरील भाष्य या दोन्ही गोष्टी चांगल्या नसल्यामुळे त्यांचा गांधीजींवर फारसा प्रभाव पडला नाही.

काही वैष्णव मंदिरात चालत असलेल्या अनैतिक प्रकारांच्या हकीगती कळल्यामुळे वाडवडिलांच्या परंपरागत धर्मावरील मोहनची श्रद्धा कमी झाली व त्याला मिळणारा तो छोटासा आधारही निघून गेला. मनात उठणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी तो *मनुस्मृती*कडे वळला. निर्मितीविषयीच्या दंतकथातील वर्णनामुळे त्याच्या मनाचा तसाच गोंधळ उडाला जसा बायबलमधील *बुक ऑफ जेनेसिस* वाचताना उडाला होता. *मनुस्मृती*तील अहिंसा आणि मांसाहार यांच्याबद्दल मनाचा गोंधळ उडवणाऱ्या विधानांमुळे त्याच्या संभ्रमात अजूनच भर पडली व मांसाहाराविषयी प्रयोग करण्यासाठी त्याला उत्तेजन मिळालं. 'मला असंही वाटू लागलं की साप, विंचू, किडे यांना मारण्यात काहीही अनैतिक नाही. मला आठवतं की त्या वयात कर्तव्य म्हणून मी ढेकणांना वगैरे मारत असे.' [एम. के. गांधी: *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ३४]

गोंधळ अजूनच वाढल्यामुळे त्यानं आपली अडचण घरातील मोठ्या माणसांसमोर मांडली परंतु तेही कोणतंच समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. त्याच्या श्रद्धेचा एकेक

आधारस्तंभ कोसळू लागला. भ्रष्ट हिंदू धर्म आणि नास्तिक्य याशिवाय त्याला कोणताच पर्याय दिसत नव्हता. त्यामुळे त्यानं नास्तिक्याचा स्वीकार केला. गांधीजींनी जोसेफ डोकला सांगितलं की काही काळ वास्तवात मी नास्तिक होतो. या सर्व गोंधळांतही त्याच्या मनात एक गोष्ट पूर्णपणे ठसली होती. ती म्हणजे 'नैतिकता हा सर्व गोष्टींचा आधार आहे व सत्य हे नैतिकतेचं सार आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३४] सत्य हा त्याच्या निर्वाणीचा आधार झाला. जेव्हा इतर सर्वांनी त्याला नाकारलं तेव्हा सत्यानंच त्याला आधार दिला.

* * *

उका नावाचा भंगी त्या काळात त्याच्या घरी संडास साफ करायला आणि आंगण झाडायला यायचा. मोहनला त्याला स्पर्श करता येत नव्हता. चुकून जर का त्याचा अपवित्र स्पर्श झाला तर त्याच्या स्पर्शानं झालेला विटाळ दूर करण्यासाठी त्याला आंघोळ करावी लागायची. तसंच शाळेत त्याचा अस्पृश्याला स्पर्श झालेला असला तर त्याची आई त्याला मुसलमानाला स्पर्श करून यायला सांगायची. एका घाणीनं दुसरी घाण काढायची! त्याच्या आईवडिलांशी त्याचा याबाबतीत बरेचदा वाद व्हायचा. केवळ आईबद्दल वाटत असणाऱ्या भक्तीमुळे त्याला जसं सांगण्यात यायचं तसं तो करायचा. परंतु त्याचं अंतःकरण बंड करून उठायचं. 'मी माझ्या आईला सांगत असे की उकाशी झालेल्या स्पर्शानं आपण विटाळतो ही तुझी कल्पना पाप आहे.' [*यंग इंडिया*, एप्रिल २७, १९२१, पृष्ठ १३५, अहमदाबादच्या सप्रेस्ड क्लास असोसिएशन, अहमदाबादच्या अध्यक्षपदावरून गांधीजी] ज्या *विष्णुपुराणाच्या* श्लोकांचा त्याला अभ्यास करायला लावण्यात आला होता त्यात पुढील भाग होता : 'जले विष्णुः स्थले विष्णुः', देव पाण्यातही आहे, देव जमिनीवरही आहे मग अस्पृश्याच्या स्पर्शाची भीती कशी? अथवा रामायणात जे 'अस्पृश्य' रामाला गंगेतून पलीकडे नेतात त्या अस्पृश्यांचा आत्मा विटाळलेला कसा असू शकतो हेही त्याला कळू शकत नव्हतं.

अशा प्रकारचे प्रश्न करत गेल्यामुळे बालपणातच मोहनला प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जायची व तिला विवेकाच्या कसोटीवर कस लावून पाहायची सवय लागली. यात अर्थातच धार्मिक आणि सामाजिक प्रथांचाही समावेश होता. त्यामुळे त्याच्या बंडखोर हृदयात

अस्पृश्यतेविरुद्धची बीजं पेरली गेली. त्यांनी नंतर गंभीरपणे सांगितलं की 'मला जर पुनर्जन्म मिळाला तर मला अस्पृश्याचा जन्म मिळावा. त्यामुळे त्यांच्या दुःखांत, व्यथांत आणि दररोज होत असणाऱ्या त्यांच्या अपमानात मला सहभागी होता येईल... आणि त्या दुर्दैवी परिस्थतीतून मुक्त व्हायची प्रेरणा मिळेल.' [*यंग इंडिया*, ४ मे १९२१, पृष्ठ १४४]

मोहन गुजराती कवीच्या एका कडव्यानं फार प्रभावित झाला होता. त्यानं पेलाभर पाण्याच्या मोबदल्यात भरपूर जेवण द्यायला बजावलं होतं. साध्या पैची सोन्याच्या नाण्यात परतफेड करायला आणि आपला जीव वाचवणारासाठी आपला जीवही द्यायला सांगितलं होतं.

*.... असतं माहीत खऱ्या उदार माणसाला*
*सर्व माणसं आहेत एक म्हणून,*
*करतो तो परतफेड*
*वाईटाचीही चांगुलपणानं.*

त्याच्यासाठी धर्माचं सारतत्त्व हेच होतं.

## ५

काबा गांधींच्या मृत्यूनं संपूर्ण कुटुंबावर शोककळा पसरली. मोहन शोकानं पिडलेला होता. गांधी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती घसरगुंडीला लागलेली होती. मोहन लवकरच बाप बनणार होता. त्याच्या तरुण खांद्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली होती. तो काळजीत होता. पुढील वर्षी तो प्रवेश परीक्षेला (आताची मॅट्रिक) बसणार होता. पण त्याच्या वडिलांच्या आजारामुळे त्याला तयारी करायला फार कमी वेळ मिळाला. नापास होणारांचं प्रमाण फार जास्त असायचं. त्यामुळे शाळेच्या अधिकाऱ्यांनी चाचणी परीक्षा कडक केली. बत्तीसपैकी फक्त एक विद्यार्थी सगळ्या विषयात पास झाला. मोहन तीन विषयात नापास झाला. परंतु त्यानं भरपूर मेहनत केली. फक्त सोळा विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेला बसण्यासाठी आवेदन पत्रं देण्यात आली. त्यापैकी फक्त दहा पास झाले. मोहनला ६२५ पैकी २४७.५ गुण मिळून तो मोठ्या

मुश्किलीनं बचावला. विद्यापीठात त्याचा क्रमांक ४०४ होता व 'कट्ट्यावार हायस्कूलमध्ये' तो पाचवा होता.

नातलगांच्या सल्ल्याप्रमाणे त्यानं भावनगर येथील शामलदास महाविद्यालयात प्रवेश घेतला. परंतु नव्या वातावरणात त्याला अगदी परक्याप्रमाणे वाटत होतं. शिकवण्यात येणाऱ्या विषयात त्याला रस नव्हता आणि ते ज्या पद्धतीनं शिकवण्यात येत होते त्यामुळे तर त्याचं त्यांत अगदीच मन लागत नव्हतं. इंग्रजी विषय कच्चा असल्यामुळे त्याच्या मार्गातील तो फार मोठा अडसर ठरत होता. राजकोट येथील इंग्रजी शिक्षणाचा दर्जा फार खालचा असावा. कारण मॅट्रिक पास झाल्यानंतरही गरीब बिचारा तो मुलगा इंग्लंडच्या प्रवासात असताना आपल्या रोजनिशीत लिहिताना आढळतो : "here we received a rogue." received हा शब्द "met" साठी आला होता कारण गुजरातीत "received" आणि "met" या दोन्ही शब्दांचा अर्थ 'मिळाला' असा होत असतो ! त्यामुळे त्याला तो अभ्यासक्रम 'जड' वाटला आणि व्याख्यानं कळू शकली नाही यात काही आश्चर्य नाही. त्याशिवाय त्याला बरंही नव्हतं. त्याला घराची आठवण येत होती. त्यामुळे त्या वर्षी पास व्हायची आशा त्यानं सोडली.

पहिल्या सत्रानंतर महाविद्यालय उन्हाळ्याच्या सुटीसाठी बंद झालं व मोहनला काहीसा दिलासा मिळाला. तो मे महिन्याच्या मध्यंतरीचा काळ होता. तिथं पोहोचून त्याला फार तर पंधरवडाच झाला असेल नसेल तोच मावजी दवे नावाचे एक गृहस्थ आले. ते गांधी कुटुंबियांचे मित्र आणि सल्लागार होते. ते विद्वान ब्राह्मण होते तसेच व्यवहारातही हुशार होते. त्यांना गांधीमंडळी जोशीजी म्हणायची.

मोहनच्या आईशी आणि भावाशी झालेल्या संभाषणातून जोशीजींना कळलं की मोहन भावनगरला कॉलेजमधे शिकतो आहे. तिथं कसं काय चालू आहे म्हणून त्यांनी मोहनला विचारलं. मोहननं त्यांना सांगितलं की पहिल्याच प्रयत्नात मी पास होईन अशी आशा नाही. याला इंग्लंडला कायद्याच्या अभ्यासाकरिता का पाठवत नाही असं त्यावर त्यांनी मोहनच्या भावाला विचारलं. त्यांनी त्याला खात्रीपूर्वक सांगितलं की खर्च ५००० रुपयांपेक्षा अधिक येणार नाही.

'काही शिष्यवृत्ती मिळवायचा प्रयत्न करा. जुनागढ आणि पोरबंदर संस्थानांकडे अर्ज करा. माझ्या मुलाला - केवलरामला - भेटा. आणि पैशाची काहीच पाठवा.... तुमच्या वडिलांचं नाव कायम ठेवायचा हाच एकमेव मार्ग आहे.' [*द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, द पब्लिकेशन डिव्हीजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, (१९५८), खंड १ पृष्ठ ४]

इंग्लंडमधे मांसाहाराशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही या धार्मिक कारणावरून पुतळीबाई आक्षेप घेऊ शकेल याची पूर्वकल्पना करत ते म्हणाले, 'त्याला त्याच्याबरोबर उडदाची डाळ द्या. त्याला स्वतःचा स्वयंपाक करू द्या. मग धार्मिक दृष्ट्या कोणताही आक्षेप येऊ शकणार नाही.'

मोहन हे संभाषण श्वास रोखून ऐकत होता. विदेशी शिक्षणासाठी जायचं स्वप्न त्यानं कधीपासून जोपासलं होतं. त्याला माहीत होतं की त्याच्या वडिलांचाही त्याच्याविषयी असाच विचार होता. मला वैद्यकशास्त्राचं शिक्षण घेण्यासाठी विदेशात पाठवता येणार नाही का असं त्यानं विचारलं..

परंतु त्याच्या भावानं आक्षेप घेतला. तो म्हणाला : 'वैद्यकीय शास्त्रात मृत शरीराचं विच्छेदन करण्यात येतं. ते आपल्या वडिलांना पसंत नव्हतं. वडिलांची इच्छा तू कायद्याचा अभ्यास करावा अशी होती.'

भावाचा आक्षेप बाजूला सारत जोशीजी म्हणाले : 'शास्त्र वैद्यकीय शिक्षणाच्या विरोधी नाहीत.' परंतु त्यांनी मान्य केलं की मोहननं वैद्यकशिक्षणाऐवजी कायद्याच्या शिक्षणासाठी जायला पाहिजे. 'वैद्यकशास्त्राची पदवी मोहनला दिवाण बनवू शकत नाही. आता काळ बदलला आहे. आणि माझं तरी त्याशिवाय कशानंही समाधान होणार नाही.'

मोहनच्या मोठ्या भावाचं मोहनवर वडिलांसारखं प्रेम होतं. त्याचा मावजी दवेवर फार विश्वास होता. त्यानं मावजी दवेला मोहनला इंग्लंडला पाठवायचं वचन दिलं. मोहननं त्याच्या आईची आणि काकांची परवानगी मिळवायला पाहिजे एवढीच अट त्यानं मांडली.

तेव्हापासून मोहन आकाशात उडू लागला. पण पैसा कुठून येणार होता? त्याच्या वडिलांनी भरपूर पैसा शिल्लक टाकायची कधीच काळजी घेतली नव्हती. त्यांना जेव्हा यासंबंधी विचारण्यात यायचं तेव्हा ते सांगायचे की ‘माझी मुलं हीच माझी संपत्ती आहे. जर मी फार मोठी संपत्ती गोळा केली तर मी त्यांना बिघडवीन.’ [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ५५] फक्त त्यांनी त्यांना इतक्या लवकर मरण येईल याची कल्पना केली नव्हती.

मोहननं आपल्या बायकोचे दागिने विकायचा विचार केला. त्यापासून दोन ते तीन हजार रुपये मिळाले असते. परंतु त्याच्या भावानं पैशाची व्यवस्था करण्याबद्दल त्याला आश्वासन दिलं. त्याच दिवशी त्यानं मावजीचा प्रस्ताव आपल्या चुलत भावासमोर मांडला. त्या दोघांनाही तो प्रस्ताव आवडला व त्यापैकी मेघजीभाईंनी पाच हजार रुपये द्यायचं आश्वासन दिलं.

मोहन आनंदात होता. पण पुढचं दिसणाऱ्या त्याच्या आईला अधिक चांगलं माहीत होतं. तिनं त्याला सावध करत सांगितलं, ‘वेळ आली की मेघजीकडून तुला कधीच पैसे मिळणार नाहीत हे लक्षात ठेव’. आणि नंतरच्या घटनांनी सिद्ध केलं की जोवर मेघजीचा प्रश्न होता तोवर ती बरोबर होती.

मावजीच्या सल्ल्याप्रमाणे मोहन केवलरामला भेटला. राजकोटमधे त्याचा वकिलीचा व्यवसाय जोरदार चालत होता. त्यानं मोहनला सांगितलं की खर्च १०,००० रुपयांपेक्षा कमी येणार नाही. शिवाय तुला धार्मिक पूर्वग्रह बाजूला ठेवावे लागतील. ‘तुला मांसाहार करावा लागेल, मद्य घ्यावं लागेल. त्याशिवाय तू तिथं जगू शकणार नाहीस.’ [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ५] जणू काय हे पुरेसं नव्हतं म्हणून की काय त्यानं त्यात भर घालत सांगितलं की ‘तू अजून अगदी तरुण आहेस. लंडनमधे अनेक भुलवणाऱ्या गोष्टी आहेत. तू त्यांच्या जाळ्यात फसणं अपरिहार्य आहे.’ [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ५]

काठेवाडमधील दोन परिचित मुलांची मोहनला यावेळी आठवण झाली. त्यांना मोरवी संस्थानानं परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली होती. त्यांची नावं प्राणजीवन मेहता आणि दलपतराम शुक्ला अशी होती. राजकोट आणि पोरबंदर संस्थानांची मोहनच्या वडिलांनी आणि

आजोबांनी सेवा केली होती. त्यामुळे मोहनचा या संस्थानांवर नक्कीच अधिकार पोहोचत होता. त्यानं तो विचार केवलरामला सांगितला आणि तुमचं काय मत आहे म्हणून त्याला विचारलं. त्यांनी पोरबंदर संस्थानाकडे अर्ज करायचा सल्ला दिला. या बाबतीत तुम्ही काही मदत करू शकाल काय असं विचारलं असता ते म्हणाले की याशिवाय तू मला 'कोणतंही काम सांग, ते मी करीन.'

हे निराशाजनक उत्तर होतं. परंतु मोहनही सहजासहजी हार मानणारा नव्हता. त्यानं आपल्या आईची परवानगी मिळवायच्या प्रयत्नाला सुरुवात केली. ती फारशी कठीण गोष्ट नसल्याचं आढळलं. 'गंमत करत मी आईकडे विषयाला सुरुवात केली. थोड्याच वेळात गंमतीनं गंभीर चर्चेचं रूप घेतलं.... मी माझ्या आईचा लाडका होतो. तिचा माझ्यावर फार विश्वास होता आणि त्यामुळे तिच्या अंधविश्वासावर मी सहज विजय मिळवू शकलो.' [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ५ आणि ५६] तीन वर्षांसाठी दूर राहायच्या कल्पनेला संमती मिळवणं मात्र फार जड गेलं. परंतु इंग्लंडला जायचे फायदे वाढवून सांगून त्यानं तिची संमती थोड्या जड अंतःकरणानंच मिळवली.

पुढचं पाऊल होतं पोरबंदरला जाऊन काकांची संमती मिळवायचं आणि शिष्यवृत्तीसाठी प्रयत्न करायचं. यानंतर त्याच्या अडचणींना सीमाच नव्हत्या. ऑक्टोपसप्रमाणे त्यांचं एकेक शेपूट त्याला कवटाळतच होतं. एकदा त्याच्या जाण्याची तारीखही ठरली. परंतु निघायच्या एक तास आधी झालेल्या एका लहानशा अपघातामुळे ती योजना बारगळली. 'मी सारखा माझ्या मित्राशी, शेख मेहताबशी भांडत होतो. जायच्या दिवशी माझ्या मनात त्याच्याशी झालेल्या भांडणाचेच विचार घोळत होते. त्या रात्री आमच्याकडे संगीताचा कार्यक्रम होता. मला त्यात मजा वाटली नाही.... रात्री साडेदहाच्या सुमारास पार्टी संपली आणि आम्ही मेघजीकडे निघालो.' [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ६] मार्गात डोक्यात एकीकडे लंडनच्या आणि दुसरीकडे मेहताबशी झालेल्या भांडणाच्या 'वेडगळपणाच्या विचारात' गढलेला असताना तो एका गाडीवर जाऊन आदळला. त्याला भोवळ आल्यासारखं वाटत होतं पण त्यानं तसं काहीच दाखवलं नाही. त्यानंतर ते मेघजीच्या घरी गेले. इथं पुन्हा त्याला एका दगडाची ठेच लागली व तो बेशुद्ध होऊन पडला. 'मी जवळपास पाच

मिनिटं शुद्धीवर नव्हतो. त्यांना वाटलं की मी मेलो. पण सुदैवानं... ज्या जागेवर मी पडलो ती नरम जागा होती. अखेरीस मी शुद्धीवर आलो आणि त्या सर्वांचा... जीव भांड्यात पडला. आईला बोलावण्यात आलं. मी त्यांना सांगितलं की मी उत्तम आहे. परंतु कोणीच मला जाऊ द्यायला तयार नव्हता. मला नंतर कळलं की माझी धीट आणि प्रिय आई मला जाऊ द्यायला तयार होती. परंतु इतर लोकांच्या निंदेच्या भीतीनं ती काहीच बोलली नाही.' [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ६]

मोठ्या मुश्किलीनं तो पोरबंदरच्या प्रवासासाठी बाहेर पडू शकला. त्यानं काही प्रवास बैलगाडीनं आणि काही उंटावरून पार पाडला. त्याचा मोठा भाऊ करसनदास त्याला खादी पुलावर भेटायला आला होता. मोहनला अतिशय आनंद झाला. ते सोबतसोबत आपल्या जुन्या घरी गेले. ते घर त्यांच्या वडिलांच्या आणि आजोबांच्या आठवणींनी भरलेलं होतं. तसंच त्यांच्या बालपणीच्या अनेक आठवणींचा सुगंधही तिथं दरवळत होता. मोहन काकांना भेटला. काकांनी सांगितलं की मी वाराणसीच्या यात्रेवर जात आहे. मनातल्या मनात त्यांना ती कल्पना आवडलेली होती परंतु तसं उघडपणे सांगताना ते दोनदा विचार करत होते व इंग्लंडला जाण्यासाठी सहकार्याचं तर नावच घेत नव्हते. त्यांना भीती वाटत होती की त्यांनी असं केल्यास त्यांना जातीबाहेर काढण्यात येईल. तीन दिवसांच्या लाडीगोडीनंतर त्यांच्याकडून एवढंच वदवून घेता आलं की 'जर तुझ्या आईचा तुझ्या जाण्याला विरोध नाही तर मला अडथळा आणायचा कोणताच अधिकार नाही'.

याचा 'सहजपणे 'होकारार्थी' अर्थ लावण्यात आला.' परंतु मोहननं त्यांना जेव्हा पोरबंदरचे प्रशासक श्रीयुत लेली यांना देण्यासाठी शिफारसपत्र द्याल का म्हणून विचारलं तेव्हा ते म्हणाले की मी तीर्थयात्रेवर जात आहे हे तुला दिसत नाही का? अशा पवित्र कामावर जाताना मी हे अपवित्र काम कसा काय करू शकतो? त्याऐवजी मोहननं स्वतःच श्रीयुत लेलींना लिहावं असं त्यांनी सुचवलं. ते म्हणाले की 'लेली चांगला माणूस आहे. तो भेटीची विनंती नाकारणार नाही आणि तू योग्य पद्धतीनं लिहिलं तर तो मदतही करू शकेल'.

लेली बाहेरगावी गेलेला होता. पुढील रविवारी तो दौऱ्यावरून परतला. या आधी मोहन कोणत्याच इंग्रजाला भेटलेला नव्हता. 'परंतु लंडनच्या विचारानं मी धीट झालो होतो. काळजीपूर्वक काही वाक्य मी पाठ केले होते व त्याच्यासमोर मी नम्रपणानं वाकलो आणि त्याला दोन्ही हातांनी नमस्कार केला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही!' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ३८ आणि *द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, द पब्लिकेशन डिव्हीजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, (१९५८), खंड १ पृष्ठ ७] साहेब घाईत होता. तो त्याच्या बंगल्याच्या वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्या चढत असताना मला भेटला.... माझं त्याच्याशी गुजरातीत थोडंसं बोलणं झालं.' [*द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, द पब्लिकेशन डिव्हीजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, (१९५८), खंड १ पृष्ठ ७] तुटकपणानं तो मोहनला म्हणाला, 'तुला माहीत आहे की पोरबंदर संस्थान गरीब आहे. तू आधी पदवीधर व्हायला पाहिजे. त्यानंतर तू माझ्याकडे ये. मी तुझ्या म्हणण्याचा विचार करीन असं म्हणून तो घाईघाईत जिना चढून वर गेला आणि मोहन मूकस्तंभासारखा पाहत तिथं उभा राहिला.

त्यानंतर मोहन आपल्या दुसऱ्या चुलतभावाकडे, परमानंदभाईकडे गेला. कावेबाजपणानं तो म्हणाला की काकांनी लंडनला जायची जर तुला परवानगी दिली तर मी आनंदानं तुला ५००० रुपये देईन आणि तशी त्यानं आपल्या मुलाची शपथही घेतली. त्याला पक्कं माहीत होतं की काका उघडपणे मोहनच्या जाण्याला कधीच संमती देणार नाहीत. मोहन फसला. काहीच दिवसांनी तो राजकोटला संपूर्ण आशेनिशी पोहोचला. आपली भाड्यानं घेतलेली खोली सोडण्यासाठी आणि त्यातील फर्निचर वगैरे विकण्यासाठी आधी तो भावनगरला गेला. त्या कामासाठी त्याला एकापेक्षा अधिक दिवस लागला नाही. भावनगरच्या मित्रांचा आणि खोलीच्या मालकिणीचा निरोप घेताना त्याच्या डोळ्यातून काही अश्रू आल्याशिवाय राहिले नाहीत.

मधल्या काळात राजकोटला त्याच्या मित्रानं, मेहताबनं नेहमीसारखाच खोडसाळपणा करत त्याची खोटी सही करून मेघजीला ५००० रुपये देण्यासंबंधी दिलेल्या अभिवचनाची आठवण देणारं पत्र लिहिल. मेघजीनं आपल्या आश्वासनाचा शपथपूर्वक पुनरुच्चार केला. परंतु जेव्हा त्याला त्याची परिपूर्ती करायला सांगण्यात आलं तेव्हा त्यानं सपशेल माघार घेतली आणि

'त्या दिवसापासून तो माझ्यासंबंधी प्रत्येकाजवळ वाईट बोलू लागला व माझ्याशी शत्रूप्रमाणे वागू लागला.' त्यामुळे पुतळीबाईला संताप आला आणि काही वेळा ती अस्वस्थही व्हायची.

व्यथित आणि आशंकित करणारे दिवस संपतच नव्हते. देशाबाहेर पाऊल टाकण्याआधी राजकीय प्रतिनिधी कॉलनल वॅटसन यांची मोहनला भेट घ्यायची होती. ते राजकोटला १९ मे १८८८पूर्वी यायची शक्यता नव्हती. मधल्या काळात मोहन इंग्लंडला जाणार असल्याची बातमी फुटली. त्याच्या इंग्लंडच्या प्रवासाला संमती देणाऱ्या सर्वांवर मोहनला इंग्लंडला जाण्यापासून परावृत्त करावं म्हणून दडपण येऊ लागलं आणि तसं न करता आल्यास त्या अपवित्र कामाशी त्यांनी संबंध ठेवू नये असं त्यांना सांगण्यात आलं. त्याला रात्री झोप येत नसे व अनेकदा रात्री त्याला भयावह स्वप्नं पडत. 'काही.... मला इंग्लंडला जाण्यापासून परावृत्त करत असत तर काही मला तसं करायचा सल्ला देत असत. काही वेळा माझी आईसुद्धा तू जाऊ नकोस असं मला म्हणायची. आणि नवल म्हणजे.... नेहमीच जरी नाही तरी काही वेळा माझ्या भावाचंही मन बदलायचं.'

अखेरीस कॉलनल वॅटसन आले. मोहन त्यांना भेटला. ते म्हणाले : 'मी यावर विचार करीनः पण त्यांच्याकडून कोणतीही मदत आली नाही. अतिशय प्रयत्न केल्यानंतर त्यांनी एक सामान्य ओळखपत्र लिहून दिलं. त्याबद्दल भपकेबाजपणानं ते म्हणाले की 'हे लाखमोलाचं पत्र आहे!' [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ १०] राजकोटच्या ठाकोरसाहेबांनी आपला फोटो दिला. यावेळी कराव्या लागलेल्या लांगुलचालनाचा वीट येऊन मोहननं आपल्या दैनंदिनीत लिहिलं: 'माझ्या साध्याभोळ्या आणि प्रिय भावाच्या आग्रहासाठी असं करणं भाग पडलं नसतं तर मी अशा प्रकारच्या लांगूलचालनाच्या भानगडीत कधीच पडलो नसतो.' [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ १०]

त्याचा मुंबईला जायचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसं त्याच्या कुटुंबाशी दूरवरून संबंध असणारालासुद्धा वाटायला लागलं की आपल्याला हस्तक्षेप करायचा अधिकार आहे. काही लोक त्याच्या आईकडे गेले आणि ती ज्या वातावरणात आपल्या मुलाला पाठवू पाहत होती तिथल्या घाणेरड्या पण मोहक वातावरणाच्या गोष्टी तिच्या कानात ओतू लागले.

तिथं गेलेली तरुण माणसं मांसाहार आणि मद्यपानाच्या, मग बायांची तर गोष्टच सोडा, कशा प्रकारे आहारी जाऊ लागतात ते तिला सांगू लागले.

'याचं काय?' त्याच्या धार्मिक प्रवृत्तीच्या आईनं विचारलं.

मोहननं गंभीरपणे शपथ घेत सांगितलं 'या तिन्ही गोष्टी मी टाळेन.' त्यानं परत विचारलं, 'तू माझ्यावर विश्वास ठेवू शकत नाहीस काय? मी तुझ्याशी खोटा बोलणार नाही.'

'आईचा मुलावर अर्थातच विश्वास होता. परंतु तिनं त्या नवख्या आणि दूरवरच्या जगात लोकांवर जादूटोणा कसा करण्यात येतो ते ऐकलं होतं. अशा परिस्थितीत ती त्याच्यावर विश्वास कसा ठेवू शकत होती? अखेरीस ती म्हणाली की मी बेछर्जी महाराजांचा सल्ला घेते. बेछर्जी महाराज हे जैन साधू होते आणि गांधी ज्या समाजातील होते त्याच समाजातील तेही होते. महाराजांनी सांगितलं की मी तुझ्या मुलाला तीन शपथा घ्यायला लावीन आणि मग तू तुझ्या मुलाला सुरक्षितपणे पाठवू शकतेस. असं केल्यानंतर आईनं संमती दिली. 'दारू, स्त्री आणि मद्य यांना मी स्पर्श करणार नाही अशी मी शपथ घेतली.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ३९]

त्याच्या बायकोचे आईवडील तर त्याहूनही अस्वस्थ होते. विशेषतः आपल्या मुलीसाठी. रात्री रात्री मोहनला त्यांच्याबरोबर बसून त्यांचं म्हणणं ऐकून घेऊन त्यांच्या प्रश्नांची उत्तरं द्यावी लागायची. निरोप घ्यायचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसा वाढत्या ताणानं तो जवळपास कोलमडायच्या अस्वस्थेत आला होता. 'मला माहीत होतं की... माझी तब्येत ढासळत आहे. झोपेत, जागेपणी, पिताना, खाताना, चालताना, धावताना, वाचताना मी केवळ इंग्लंडचंच (तिथं जायची वेळ केव्हा येते याविषयी) स्वप्न पाहत असे व त्या महत्त्वाच्या क्षणी मी काय करेन याचा विचार करत असे.' [*द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, द पब्लिकेशन डिव्हीजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, (१९५८), खंड १ पृष्ठ ५७]

अखेरीस तो दिवस आला. त्यानं त्याच्या आईचा निरोप घेतला. डोळ्यातील अश्रू आपल्या हातामागे लपवायचा ती प्रयत्न करत होती. परंतु तिचे हुंदके स्पष्टपणे ऐकू येत होते. 'माझा ऊर

जरी भरून आलेला होता तरी मी रडायची हिंमत करू शकत नव्हतो.' तो जर रडला असता तर त्याचा अर्थ त्याचा धीर खचला असा घेण्यात आला असता व मग त्याला जाण्यासाठी परवानगी देण्यात आली नसती. अखेरीस माझ्या बायकोचा निरोप घ्यायची वेळ आली. तो क्षणही काही कमी महत्त्वाचा नव्हता. 'अर्थातच तिनं आधीच रडायला सुरुवात केलेली होती. मी तिच्याजवळ गेलो आणि एखाद्या मूढाप्रमाणे उभा राहिलो. मी तिचं चुंबन घेतलं आणि ती म्हणाली 'जाऊ नका.' नंतर काय घडलं त्याचं वर्णन करायची गरज नाही.' [वरीलप्रमाणे, खंड १ पृष्ठ ५८]

त्याच्या शाळेतील मित्रांनी निरोप समारंभ केला. तो जेव्हा उत्तर द्यायला उठला तेव्हा त्याचा धीर खचू लागला. त्यानं बोलायला सुरुवात करताच तो थरथर कापू लागला. तो अडखळत एवढंच बोलू शकला : 'तुमच्यापैकी काही माझं अनुसरण करतील व भारताच्या सुधारणेसाठी अंतःकरणपूर्वक प्रयत्न करतील.'

निरोप द्यायला अनेक लोक आले. प्रस्थानाच्या नियोजित दिवशी म्हणजे १० ऑगस्ट १८८८ला त्याचा भाऊ, त्याचा मित्र शेख मेहताब आणि इतर दोघांसह मोठ्यांचे आशीर्वाद घेऊन तो मुंबईसाठी निघाला. रस्त्यात त्याचे काही मित्र त्याच्या गाडीत बसले. त्यांनी काही स्टेशनांपर्यंत त्याच्याबरोबर प्रवास केला आणि मग ते परतले.

त्याच्या जातीच्या लोकांचा आकस आणि कारस्थान यामुळे राजकोटमधे त्याच्या इंग्लंडप्रवासाला सुरू झालेल्या विरोधानं वाढत वाढत मुंबईमधे छळाचं रूप घेतलं. तो मुंबईच्या अगदी मध्यवर्ती भागात राहत होता. तो वाटेनं जात असताना कुणी तरी बोट दाखवलं नाही वा त्याच्याकडे पाहून कुजबुज केली नाही असं क्वचितच होत असे. टाऊन हॉलपासून जात असताना एकदा त्याच्या भोवती लोक गोळा झाले आणि त्याची 'छीः थू' करू लागले. त्याचा गरीब बिचारा भाऊ गुपचूप उभं राहून पाहत बसण्याशिवाय दुसरं काहीच करू शकत नव्हता. त्याच्या जातीच्या लोकांची अनेक प्रतिनिधिमंडळं यायची आणि ते लोक त्याला प्रश्न विचारून विनाकारण त्रास द्यायचे. जेव्हा त्यांना या कोणत्याच गोष्टीत यश आलं नाही तेव्हा त्याच्या समाजाच्या लोकांची मोठी सभा भरवण्यात आली. प्रत्येकानं त्यात उपस्थित राहणं आवश्यक

होतं. तसं न करणारास पाच आणे दंड ठोठावण्यात येणार होता. त्याला शब्दशः घरातून त्या सभेत नेण्यात येऊन सभेच्या मधोमध बसवण्यात आलं. त्यांच्या कानउघाडणीचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नाही असं पाहून त्याच्यातील एक पंच - मुख्य पटेल - उभा राहिला आणि म्हणाला : 'आम्ही तुझ्या वडिलाचे मित्र आहोत आणि म्हणून आम्हांला तुझ्यासाठी एवढं वाटतं. जातीचे प्रमुख म्हणून तुला आमची ताकद माहीत आहे. आम्हांला निश्चितपणे कळलं आहे की तुला इंग्लंडमधे दारू प्यावी लागेल आणि मांसाहार करावा लागेल. त्याशिवाय तुला समुद्रपर्यटनही करावं लागणार आहे. तुला माहीत आहे की हे सर्व आपल्या जातीच्या नियमांविरुद्ध आहे. त्यामुळे तुला आमची आज्ञा आहे की तू तुझ्या निर्णयाचा फेरविचार करावा. तसं न केल्यास तुला मोठ्यात मोठी शिक्षा करण्यात येईल.

मोहननं उत्तर दिलं: 'मला वाईट वाटतं की मी माझा निर्णय बदलू शकत नाही. मी इंग्लंडसंबंधी जे काही ऐकलं आहे ते तुम्ही सांगता त्याहून वेगळं आहे. तिथं दारूची आणि मांसाहाराची गरज नाही. राहता राहिली समुद्रपर्यटनाची गोष्ट. जर आपले बांधव एडनला जाऊ शकतात तर मग मी इंग्लंडला का जाऊ शकत नाही? माझी खात्री झाली आहे की या सर्व गोष्टींमागे मत्सर आहे.'

रागाने लालपिवळे होत पंचांनी गर्जना केली : 'ह्या पोराची बुद्धी ठिकाणावर नाही. आमची आज्ञा आहे की याच्याशी कुणीही संबंध ठेवायचा नाही. जो कोणी याला पाठिंबा देईल त्याला जातीबाहेर काढण्यात येईल. जो कोणी याला मदत करील वा याला गोदीपर्यंत सोडायला जाईल त्याला सव्वा रुपया दंड करण्यात येईल.'

मोहन याला योग्य उत्तर देणार तोच त्याच्या भावानं त्याला दाबलं. परंतु जातीबाहेर काढल्या जायच्या भीतीनं त्याचीही द्विधावस्था झाली. तो मोहनला काहीच म्हणाला नाही. पण मोहनच्या काही मित्रांना मोहनला आपल्या निर्णयाचा फेरविचार करायला विनंती करायला त्यानं सांगितलं. परंतु मोहन अढळ आहे असं आढळल्यानंतर त्यानं धीर धरला आणि मग पुन्हा तो विचलित झाला नाही. आणि वास्तवात त्याला जातीबाहेरही काढण्यात आलं नाही.

जातीबाहेर काढल्या जायच्या धमकीमुळे मोहन जवळपास वाळीत टाकल्यासारखा झाला होता. त्याच्या जातीच्या लोकांची कारस्थानं चालूच होती. जाण्यापासून त्यांना त्याला अडवता आलं नाही परंतु त्याचा प्रवास एक आठवड्यानं लांबवण्यात त्यांना यश आलं. चाणक्याची कूटनीती वापरून असं करण्यात आलं. मोहन २१ ऑगस्टला प्रवासाला निघणार होता. ऑगस्टमध्ये समुद्रप्रवास केल्यास पुढे वादळी वातावरणाचा त्रास होऊ शकेल असं त्यांनी या भावंडांना सांगायला जहाजाच्या कप्तानाला सांगितलं. मोहन व त्याचा भाऊ जेव्हा कप्तानाकडे भेटायला गेले तेव्हा त्यानं त्यांना तसंच सांगितलं. युक्ती कामात आली. मोहनचा भाऊ ती जोखीम पत्करायला कोणत्याही अवस्थेत तयार नव्हता. मोहनचा निरोप घेऊन तो राजकोटला परतला. प्रवास व इतर खर्चासाठी लागणारा पैसा मोहनच्या मेहुण्याकडे ठेवण्यात आला. वेळ आल्यानंतर सर्व काही त्यालाच करायचं होतं.

अशा रीतीनं पुन्हा घोळ निर्माण झाला. असं दिसू लागलं की त्याच्या विरोधकांच्या कारस्थानांना यश आल्याशिवाय राहणार नाही. तेवढ्यात मोहनला एकाएकी कळलं की जुनागढचे वकील त्र्यंबकराय मझुमदार हे इंग्लंडला निघायच्या बेतात आहेत. ईश्वरानं पाठवलेली संधी असं समजून मोहननं तिला घट्ट धरून ठेवलं. चोवीस तासांच्या आत त्यानं तयारी केली. परंतु भावानं पैसे देण्याविषयी दिलेलं पत्र दाखवूनही त्याच्या मेहुण्यानं जातीबाहेर काढलं जायच्या भीतीनं पैसे द्यायला नकार दिला. त्यामुळे त्यासाठी तो एका मित्राकडे गेला व सुदैवानं त्यानं त्याला पैसे दिले. ते त्याच्या भावानं नंतर परत केले. हा मित्र रणछोडदास पटवारी होता. तो नंतर गोंडल संस्थानाचा प्रधानमंत्री झाला. या मित्रानं ऐन वेळेवर केलेली मदत गांधीजी कधीच विसरले नाहीत आणि त्यानंतर त्याच्याशी होणाऱ्या पत्रव्यवहारात ते त्याला *मुरब्बी* (मोठे भाऊ) रणछोडदासभाई म्हणून संबोधायचे. अशा रीतीनं मिळालेल्या पैशानं त्यांनी तिकीट काढलं, काही कपडे आणि आवश्यक वस्तू विकत घेतल्या. 'काही कपडे मला आवडले आणि काही मला अगदीच आवडले नाही. जो टाय लावण्यात मला नंतर आनंद होत असे त्याचा त्यावेळी मला तिटकारा वाटत होता. आखुडसं जॅकेट हे मला असभ्यपणाचं लक्षण वाटायचं.' [एम. के. गांधी,

*द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४१ सप्टेंबर ४, १८८८] ला त्यानं इंग्लंडच्या प्रवासाला *एस. एस. क्लाईड* जहाजानं सुरुवात केली.

या पाच महिन्यात मोहनच्या गुणवत्तेचा चांगलाच कस लागला. दुसरा कोणी दुबळ्या स्वभावाचा माणूस असता तर त्यानं केव्हाच नाद सोडला असता. पण तो तसा नव्हता. क्षणात आशावादी, क्षणात निराशेच्या गर्तेत अशा रीतीनं ईश्वरावर भार टाकून तो मला माझ्या इप्सीत ध्येयाकडे जायचा योग्य मार्ग दाखवील या आशेनं मी मला ढकलत होतो.' [*द व्हेजीटीरीअन*, 'व्हाय ही वेंट टू इंग्लंड', १३ - ६ – १८९१]

इंग्लंडच्या मुक्कामाच्या अखेरीस इंग्लंडला येण्यासाठी आणि वकिलीचा व्यवसाय स्वीकारण्यामागील कारण काय असं विचारण्यात आलं असता तो उत्तरला : 'एका शब्दात महत्त्वाकांक्षा !' त्याला कुटुंबाची गौरवशाली परंपरा चालवायची होती आणि वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करायच्या होत्या.' मला वाटलं की मी जर इंग्लंडला गेलो तर मी केवळ बॅरिस्टरच होणार नाही... मला संस्कृतीचं केंद्र असलेली, तत्त्वज्ञ आणि कवींची भूमी इंग्लंडही पाहायला मिळेल.'

[*द व्हेजीटीरीअन*, 'व्हाय ही वेंट टू इंग्लंड', १३ - ६ – १८९१]

# प्रकरण १० वे

# पौरुषाची प्रभात

## १

प्रवाशांनी आपल्या मित्रांचा निरोप घेताना केलेल्या गोंगाटात आणि एस. एस. क्लाईडनं जहाजाच्या अधिकाऱ्यांच्या शेवटच्या क्षणीच्या आदेशाच्या गडबडगोंधळात सायंकाळी पाच वाजता आपला नांगर उचलला आणि प्रवासाला सुरुवात केली. मोहन जहाजाच्या डेकच्या कठड्याशी रेलून दूर सरकत जाणाऱ्या समुद्रकाठाकडे पाहत एखाद्या पुतळ्याप्रमाणे उभा राहिला. जेव्हा तो किनारा अदृश्य झाला तेव्हा तो आपल्या केबीनमधे गेला. त्यावेळी त्याच्या मनात गोंधळ माजलेला होता व अंतःकरणात परस्परविरोधी भावनांनी काहूर माजवलेलं होतं.

त्याच्याबरोबर अब्दुल मजीद हे प्रथम श्रेणीतून, आणि त्र्यंबकजी मजूमदार हे त्याच्याप्रमाणेच सलून श्रेणीतून प्रवास करत होते. हे दोघं संपूर्ण प्रवासात त्याचे सोबती होते. अब्दुल मजीद हे मोठे जमीनदार होते व आपल्या अस्तित्वानंच आजुबाजूचं वातावरण भारून टाकायचे. त्यांनी एखाद्या गरीब हमालापेक्षाही वाईट पोषाख केला तरी त्यांचा प्रभाव पडायचा. निश्चितच त्यांचं व्यक्तिमत्व प्रभावी असावं. मजुमदार हे साधे आणि मोकळ्या स्वभावाचे होते. सुरुवातीपासूनच त्यांच्यामुळे मोहनला घरासारखं वाटायला लागलं. एकमेकांशी अपरिचित असणाऱ्या त्या लोकांमध्ये आपण भारतीय आहोत केवळ या भावनेनं जवळीक निर्माण झाली होती. लवकरच ते एकजीव झाले.

सहा वाजता जेवणाची घंटा वाजली. जहाजातील नोकर त्या तिघांना जेवणासाठी सलूनमधे चला असं सांगायला आला. सायंकाळच्या जेवणासाठी प्रथेप्रमाणे काळा कोट घालावा लागायचा. तसा तो मजुमदारांकडे नव्हता. त्यांच्याकडे एव्हाना मोठा भाऊ म्हणून पाहू

लागलेल्या मोहननं त्यांना आपला कोट तत्परतेनं दिला आणि त्यांच्या कॅबीनची चाबी आपल्याजवळ घेतली.

काही प्रमाणात लाजरा असल्यामुळे मोहनला कधीच काट्यासुऱ्यांचा वापर करता आला नाही. त्याला इंग्रजी भाषेचीही अडचण जाणवत होती. 'आधी माझ्या मनात प्रत्येक वाक्य तयार करावं लागायचं, मगच मी ते उच्चारू शकत असे.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४२] त्याशिवाय त्याच्या शाकाहाराचा प्रश्न होता. त्याला कळत नसायचं की कोणते पदार्थ शाकाहारी आहेत व विचारायची हिंमतही त्याच्यात नव्हती. लोक आपल्या लाजाळूपणाला हसतील म्हणून तो मागेच राहायचा आणि त्यामुळे चहाच्या टेबलपर्यंतही त्याला नेणं शक्य होत नसे. मजुमदारांनी त्याच्या मनावर ठसवायचा प्रयत्न केला की 'वकिलानं वक्तृत्व कलेत प्रवीण व्हायला पाहिजे. तुला वकिली करायची असल्यामुळे तू इंग्रजी बोलणाऱ्या कोणत्याही प्रवाशाच्या सहवासाची संधी टाळायला नको. तू त्यांच्या बोलण्याची शैली आत्मसात करायला हवी. अधूनमधून इंग्रजीच्या चुका झाल्या तरी त्यामुळे काय फरक पडतो?' परंतु मोहनला त्याच्या कवचाबाहेर काढण्यात कशामुळेच यश आलं नाही. तो त्याच्या केबीनमध्ये एकटाच जेवायचा आणि पहिले एकदोन दिवस तर तो सोबत आणलेली फळं, मिठाई यासारख्या पदार्थांवरच राहिला. त्यानं पुढंही असंच चालू ठेवलं असतं पण नंतर मजुमदारांनी जहाजावरील नोकरांकरवी त्या दोघांसाठी शाकाहारी पदार्थ करून घ्यायची व्यवस्था केली. हे पदार्थ जहाजाचे अधिकारी मोफत पुरवायचे. त्यानंतर संपूर्ण प्रवासात त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेलं शाकाहारी जेवण त्यांना मिळू लागलं. जहाजावरील नोकर मात्र फार घाणेरडे होते. सामान्यपणे मोहन भारतीय पोळ्यांपेक्षा इंग्रजी ब्रेड पसंत करायचा. मोहनचा हा पहिला प्रवास होता. प्रत्येक गोष्ट अपरिचित आणि आश्चर्यकारक होती. नावाड्यांचं हस्तकौशल्य, समुद्राची विशालता, जहाजाचा आरामशीर प्रवास या सर्व गोष्टी पाहून तो उत्तेजित झालेला होता. जहाजावर वाद्यसाहित्य, पत्ते, बुद्धिबळ आणि ड्रॉट्स वगैरे होते. अधूनमधून पियानो वाजवून मोहन स्वतःची करमणूक करून घ्यायचा. परंतु बहुतेक वेळ तो केबीनमधेच असायचा. जेव्हा डेकवर फारसे प्रवासी नसायचे

तेव्हाच बाहेर पडून तो ताज्या समुद्रावरील आनंद लुटायचा आणि अवतीभवतीच्या सुंदर दृश्याचा आस्वाद घ्यायचं साहस करायचा. चांदण्या रात्री चंद्राची समुद्रात नाचणारी प्रतिमा त्याला मुग्ध करत असे. आणि आश्चर्यातील आश्चर्य म्हणजे एका काळोख्या रात्री *जेव्हा आकाश स्वच्छ होतं व चांदण्या पाण्यात चमचमत होत्या.... तेव्हा त्या किती तरी हिऱ्यांसारख्या दिसत होत्या. पण मला माहीत होतं की हिरे तरंगू शकत नाहीत. मग मला वाटलं की फक्त रात्रीच दिसू शकणारे ते कोणते तरी कीटक असावेत. या अशा दृश्याकडून मी आकाशाकडे पाहिलं आणि माझ्या लक्षात आलं की अरे, ह्या तर चांदण्याच आहेत, अजून काही नाही. मी माझ्या मूर्खपणावर हसलो. चांदण्यांच्या या दृश्यानं आपल्याला वाटतं की आपल्यासमोर आतषबाजीच होते आहे.* [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १३ मध्ये उद्धृत]

त्याला समुद्रप्रवासात कोणताच त्रास झाला नाही. त्याला जहाज लागलं नाही. संपूर्ण प्रवासात तो आजारी पडला नाही. : 'मी नेहमी आठ वाजता उठत असे. तोंड धूत असे व शौच्यास जात असे.' थोड्याच दिवसात इंग्लंडला पोहोचल्यानंतर गांधीजींनी रोजनिशी लिहायला सुरुवात केली. तिच्यात त्यांनी आपल्या इंग्लंड प्रवासाची संपूर्ण हकीगत प्रवासाच्या आपल्या अनुभवासह लिहिलेली आहे. त्यातील काही भाग अजून कायम आहे. प्रवाशांसाठी अथवा हौसेखातर फिरणाऱ्यांसाठी लिहिलेलं ते काही भाषण नाही. ते आहे ज्यांना त्याच्या पावलावर पाऊल टाकून येणाऱ्या अडचणींची माहिती करून घ्यायची आहे त्यांच्यासाठी गंभीरपणानं एका नवीन प्रदेशाचा परिचय करून देणारं ते वर्णन. प्रत्येक ओळीतून गंभीर हेतू, सविस्तर लिहायची तीव्र इच्छा, जवळून निरीक्षण करायची सवय आणि अस्सल वर्णन यांचं दर्शन होतं. ज्या गोष्टींच्या सविस्तर वर्णनाची गरज असते त्या गोष्टी कितीही क्षुद्र असल्या तरी त्यांच्या वर्णनात काटकसर करण्यात आलेली नाही - अगदी इंग्रजांच्या कपाटात ठेवण्यात येणाऱ्या संडासात वापरावयाच्या कागदापासून : 'आम्हाला पाणी.... मिळत नाही आणि कागदाच्या तुकड्याचा वापर करावा लागतो.' [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १३ मधे उद्धृत]

सहाव्या दिवशी सकाळी अकरा वाजता जहाजानं एडन येथे नांगर टाकला. ताबडतोब त्याला लहान लहान बोटीतून आलेल्या अरबांच्या अडाणी पोरांच्या घोळक्यानं घेरलं. युरोपिअन प्रवाशांनी समुद्रात फेकलेली नाणी ते सूर मारून बाहेर काढत असत. मोहनला मजा वाटली. 'ते सुंदर दृश्य होतं. मलाही तसं करता आलं असतं तर !' परंतु तो पुढं लिहितो : 'मी हे सांगायलाच हवं की आम्ही केवळ त्या मुलांना सूर मारून पैसे वर काढताना पाहत होतो. आमच्या खिशातून एक कपर्दिकही न टाकायची काळजी आम्ही घेत होतो.' [वरीलप्रमाणे, खंड १, पृष्ठ १४ मधे उद्धृत] त्या गरीब बिचाऱ्या मुलांचे हातपाय तसा प्रयत्न करताना शार्क आणि समुद्रातील इतर मोठे राक्षसी मासे तोडतात व केवळ गरजेमुळे त्यांना अशी जोखीम पत्करणं भाग पडतं असं त्यानंतर त्याला जेव्हा कळलं तेव्हा तो हतबल झाला.

त्याच्या दोन मित्रांसह तो कॅम्प एडन पाहायला गेला. तिथल्या इमारतींकडे पाहून त्याला राजकोटमधील बंगल्यांची, 'विशेषेकरून राजकीय प्रतिनिधीसाठी बांधण्यात आलेल्या नवीन बंगल्याची आठवण झाली.'

लाल समुद्रातील तीन दिवसांच्या अंगाची लाही लाही करणाऱ्या उकाड्यानंतर जहाजानं हेल्सगेट ओलांडून विविध रंगाच्या प्रकाश दिव्यांचा झगमगाटातील सुएझ कालव्यात प्रवेश केला. 'कालव्यातील पाणी अगदी घाणेरडं होतं. मला त्याची खोली आठवत नाही. रामनाथ येथे अजी नदी जेवढी रुंद आहे तेवढा तो रुंद आहे.' आयुष्यात पहिल्यांदाच त्यानं जहाजासमोर जहाजाला मार्गदर्शन करणारे दिवे पाहिले होते. 'ते चंद्रप्रकाशाप्रमाणे दिसत होते.' दोन समुद्रांना जोडणाऱ्या सुवेझ कालव्याच्या बांधकामातील तंत्रकौशल्याबद्दल पुढील प्रतिक्रिया निर्माण झाली आहे : 'तो खरोखरच आश्चर्यकारक आहे. ज्या माणसानं याची योजना केली त्याच्या प्रतिभेची मी कल्पना करू शकत नाही.... त्यानं निसर्गाशी स्पर्धा केली असं म्हणणं अगदी उचित होईल....' [वरीलप्रमाणे, खंड १, पृष्ठ १५ मधे उद्धृत] मोहनची इंग्रजी भाषा कदाचित प्रगल्भ नसेल परंतु त्यानं जी निरीक्षणं नोंदवली आहेत त्यातून त्यांच्या विचारांची अप्रगल्भता दिसून येत नाही. मुग्धावस्थेच्या या काळातही त्याच्या हुशारीचं दर्शन होतं :

*पोर्ट सैद अजून काही नसून मौजमजेचं ठिकाण आहे. तिथल्या स्त्रिया आणि माणसं अतिशय कावेबाज आहेत. दुभाषा तुमचं मार्गदर्शन करण्यासाठी तुमच्या मागे लागेल पण तुम्ही त्याला स्पष्टपणे सांगा की तुम्हाला त्याची गरज नाही.*

पोर्ट सैद येथील उपाहारगृहात जाण्यासंबंधी त्यांनी लिहिलं :

*एका बाजूला.... आम्ही चहा, कॉफी सोडा वगैरे पितो आणि.... दुसऱ्या बाजूला संगीत ऐकतो.... परंतु संगीत संपताच एक बाई रुमालानं झाकलेली ताटली घेऊन प्रत्येक ग्राहकासमोर येते. याचा अर्थ तुम्ही तिला काही पैसे द्यावे असा होतो. आम्ही तिला सहा पेन्स दिले.* [वरीलप्रमाणे, खंड १, पृष्ठ १६ मधे उद्धृत]

चढउताराचे नागमोडी रस्ते असलेल्या ब्रिडसी येथे त्याची आगबोट मध्यरात्री पोहोचली. तिथल्या कुंटणखान्यांचा व त्यांच्या दलालांचा अतिशय किळसवाणा अनुभव त्यांना आला.

तुमचं जहाज जेव्हा काठाला लागतं... एक माणूस येतो आणि तुम्ही काळे असाल तर तुम्हाला विचारतो, 'साहेब एक सुंदर चौदा वर्षांची मुलगी आहे, माझ्या मागे या, साहेब मी तुम्हाला तिच्याकडे घेऊन जाईन, पैसे काही फार द्यावे लागणार नाहीत साहेब.' तुम्ही एकदम गोंधळता. शांत राहा आणि त्याला ठासून सांगा की तुम्हाला तिची गरज नाही व त्याला तुम्ही निघून जायला सांगा.... तुम्ही सुरक्षित राहाल.

त्यानंतर काही अतिशय व्यावहारिक सल्ला देण्यात येतो :

*तुम्ही जर संकटात सापडाल तर ताबडतोब पोलिसाला बोलवा.... अथवा एकदम जवळपास जी सर्वात मोठी इमारत असेल तिच्यात शिरा. (थॉमस कुक वा हेन्री किंग वा अशाच कोणत्या एजन्सीच्या).... परंतु तिच्यात शिरण्यापूर्वी इमारतीवरील नाव वाचा आणि तिच्यात सर्वांना प्रवेश आहे काय ते पाहा.... कंजूषपणा करू नका. पोर्टरला काही पैसे द्या.* [वरीलप्रमाणे, खंड १, पृष्ठ १७ मधे उद्धृत (तिरपी अक्षरं माझी)]

नंतर आलेल्या माल्टा बंदरावर जहाज फक्त चार तास थांबणार होतं. तिथं मोहननं मजुमदारांसोबत सेंट जुऑन चर्च व सेंट जुऑनचा पुतळा पाहिला. शस्त्रागारातील देखणे पडदे 'अगदी एखाद्या जुन्या तैलचित्रासारखे' दिसत होते. परंतु 'वास्तवात ते तैलचित्रं नव्हतं' तर नेपोलिअन बोनापार्टची ती गाडी होती. संत्र्याच्या बागेनं आमची निराशा केली परंतु गोल्ड फिशच्या मत्स्यालयाला दिलेली भेट मात्र फलदायी ठरली. दुकानदारातील एका बदमाष माणसानं त्यांना आपल्या दुकानात नेलं व त्यांना फसवायचा अयशस्वी प्रयत्न केला. सायंकाळी ते जेव्हा जहाजाकडे परतत होते तेव्हा तो त्यांना पुन्हा भेटला. 'आम्ही... त्या बदमाषाला, दुभाषाला आणि नावाड्याला पैसे दिले..... नावाड्याशी भाड्याबद्दल भांडण झालं आणि अखेरीस निकाल नावाड्याकडूनच लागला!' [वरीलप्रमाणे, खंड १, पृष्ठ १९ मधे उद्धृत] जिब्राल्टरला थोडासा मुक्काम केल्यानंतर जहाज जिब्राल्टरच्या खाडीतून बिस्केच्या उपसागरात शिरलं.

भारतातून निघायच्या आधी त्याच्या काही हितचिंतक मित्रांनी त्याला सल्ला दिला होता की थंड प्रदेशात तुझं मांसाहाराशिवाय भागणार नाही. तुला क्षयरोग होईल. दुसरे सांगत होते की एकदा तुझं मांसाहाराशिवाय भागू शकेल परंतु मद्याशिवाय नाही. 'थंडीनं तू थिजून जाशील.' एकानं तर एडननंतर रस्त्यात लागतील म्हणून त्याला आपल्या बरोबर आठ 'व्हिस्कीच्या बाटल्या सोबत' घ्यायचा सल्ला दिला होता. दुसऱ्यानं त्याला सांगितलं की 'इंग्लंडमधे तुला धूम्रपान करावं लागणार असल्यानं' तू आतापासून धूम्रपान सुरू कर. मोहन घाबरला. मी ह्या सर्व गोष्टी माझ्याकडून टाळायचा प्रयत्न करीन असं तो स्वतःशीच म्हणाला. परंतु त्याशिवाय भागणारच नसेल तर काय करावं हे काही त्याला माहीत नव्हतं. परंतु भारतातून निघण्यापूर्वी त्यानं त्याच्या आईला दिलेल्या शपथेमुळे एकदम फरक पडला. त्याला वाटलं की केवळ तिच्यासाठी का होईना आपण या व्यसनात गुंतायला नको. त्यामुळे त्याच्या बरोबरच्या प्रवाशांनी त्याला जेव्हा मांसाहार करायचा आग्रह केला तेव्हा त्यानं त्यांना सांगितलं की मला मांसाहाराची गरज भासत नाही. 'ते म्हणाले की तुला एडननंतर याची आवश्यकता वाटेल. परंतु एडन निघून

गेल्यानंतरही जेव्हा मांसाहाराची आवश्यकता निर्माण झाली नाही तेव्हा ते म्हणाले की तांबडा समुद्र ओलांडल्यानंतर तुला याची गरज भासेल.'

जहाजावर श्रीयुत जेफरी नावाचे एक इंग्रज प्रवासी होते. त्यांना मोहनबद्दल फार जिव्हाळा वाटत होता. ते मोहनला म्हणाले, 'अजून वातावरण फारसं खराब झालेलं नाही. परंतु बिस्केच्या उपसागरात 'मृत्यू' वा 'मांसाहार आणि मद्य' यातून तुला एकाची निवड करावी लागेल.' [एम. के. गांधी, *व्हाय ही वेंट टू इंग्लंड, द व्हेजिटेरीअन*, जून २०, १८९१] पुढं ते म्हणाले 'आणि इंग्लंडमधे तर इतकी थंडी आहे की तिथं मांसाहाराशिवाय कोणी जिवंतच राहू शकत नाही.'

मोहननं साहस करत सांगितलं की 'मी असं ऐकलं आहे की काही लोक तिथं मांसाहाराशिवाय राहू शकतात आणि राहिलेले आहेत.' जेफरी म्हणाला : 'विश्वास ठेव ती थाप आहे. माझ्या माहितीप्रमाणे तिथं कोणीच मांसाहाराशिवाय राहत नाही.' आणि अगदी मैत्रीपूर्ण स्वरात ज्येष्ठत्वाच्या संपूर्ण अधिकारानिशी समजावून सांगत ते म्हणाले, 'पाहा मी जरी दारू पीत असलो तरी तुला काही दारू प्यायला मी सांगत नाही. परंतु मला वाटतं की तू मांस खाल्लं नाहीस तर तू जगू शकणार नाहीस.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४३]

मोहन त्यावर म्हणाला, 'मी तुमच्या सल्ल्याबद्दल आभारी आहे. परंतु माझ्या आईला दिलेला शब्द मी परत घेऊ शकतं नाही. इथं राहून मांसाहार करण्यापेक्षा मी भारतात परतणं पसंत करीन.'

पुन्हा एकदा भीती व्यर्थ असल्याचं सिद्ध झालं. बिस्केच्या उपसागरातसुद्धा मोहनला दारू वा मांसाची गरज भासली नाही.

मांसाहाराशिवाय राहिल्याचा दाखला घ्यायचा सल्ला त्याला भारतात देण्यात आला होता. त्यानं त्याच्या इंग्रज मित्राला तसा दाखला द्यायची विनंती केली. त्यानं तो आनंदानं दिला. 'काही काळ मी तो जपून ठेवला होता. परंतु नंतर मला जेव्हा आढळलं की एखाद्या मांसाहारी माणसालासुद्धा असा दाखला मिळू शकतो तेव्हा मला त्याचं कोणतंच कौतुक राहिलं नाही.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ४३]

प्लायमाऊथ येथे मध्यरात्री एस. एस. क्लाईड पोहोचली तेव्हा वातावरण जड आणि धुक्यानं भरलेलं होतं. तिथून पुढील २४ तासात जहाजानं साऊथहॉप्टन येथे नांगर टाकला. तो दिवस शनिवार होता आणि तारीख होती २७ ऑक्टोबर १८८८. [गांधीजींनी इंग्लंड प्रवासाच्या आपल्या रोजनिशीत लिहिलं आहे की ते साऊथहॉम्टन येथे शनिवार दि. २८ ऑक्टोबर १८८८ला पोहोचले होते. परंतु ऑक्टोबर २८, १८८८ला शनिवार येत नाही तर ती तारीख रविवारी येते. आपल्या आत्मचरित्रात स्पष्टपणे ते सांगतात की साऊथहॉम्टनला ते शनिवारी पोहोचले आणि दुसऱ्या दिवशी रविवार असल्यामुळे त्याही दिवशी त्यांना त्यांचं सामान मिळणं शक्य नव्हतं. ज्याअर्थी दैनंदिनीतील नोंदीत सुसंबद्धता नाही त्याअर्थी पोहोचायचा दिवस त्यांना निश्चित आठवत असल्यामुळे तोच बरोबर आहे असं गृहीत धरायला हवं. तारखेबद्दल त्यांचा गोंधळ उडाला असावा. (पहा *लंडन डायरी*, *कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १ पृष्ठ ३)]

ग्रिंडलेज अँड कंपनीच्या एजंटच्या स्वाधीन सामान करून मोहन आपल्या दोन मित्रांसह तिलबरी मार्गे व्हिक्टोरिया हॉटेलमध्ये दुपारी ४ वाजता पोहोचला. अब्दुल मजीदनं आपलं सामान पोर्टरच्या स्वाधीन केलं, त्याला टॅक्सीचं 'योग्य भाडं' द्यायला सांगितलं आणि आपल्या नेहमीच्या प्रसन्न शैलीनं त्यानं हॉटेलमध्ये प्रवेश केला. व्यवस्थापकानं जेव्हा त्याला दुसऱ्या मजल्यावरील खोली चालेल का म्हणून विचारलं तेव्हा भाड्याची चौकशी न करता त्यानं सहजपणे त्याला 'होकार' दिला. 'व्यवस्थापकानं ताबडतोब आम्हाला दरदिवशी सहा शिलींगचं बिल दिलं.'

हॉटेलच्या आकर्षकतेनं मोहनचे डोळे दिपून गेले - त्याचं भव्य स्वागतकक्ष, डोळे दिपवणारे विजेचे दिवे आणि अखेरीस उद्वाहन. नोकरानं 'कशाला तरी' स्पर्श केला. मोहनला वाटलं की ते कुलूप आहे. उद्वाहन आलं, दार उघडलं आणि तिघं आत शिरले. मला वाटलं की तिथं काही वेळ बसायचं आहे. [एम. के. गांधी, *लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १ पृष्ठ २१] पण आश्चर्य म्हणजे बटन दाबताच 'खोली' वर गेली आणि तिनं त्यांना दुसऱ्या मजल्यावर सोडलं.

आपण इंग्लंडला जेव्हा पोहोचू तेव्हा आपल्यासाठी मित्रांनी घेतलेला पांढरा सूट बरा राहील असा विचार करून स्टिमरवर मोहननं काळा सूट घातला होता. परंतु ते ऑक्टोबरचे अखेरचे दिवस होते. तो जेव्हा जहाजातून उतरला तेव्हा त्यानं एकट्यानंच पांढरा फ्लॅनेलचा सूट घातलेला होता व त्याचं त्यालाच आश्चर्य वाटलं. पुरुषाच्या 'उत्तम पोषाखाचे' जे नियम होते त्या नियमांविरुद्ध हे होतं. इंग्रजी वृत्तपत्रातील स्तंभलेखक नेव्हिन्सन यासंबंधी म्हणाले की या

नियमांनी 'वास्तवात बायबलमधील दहा आज्ञांची जागा घेतलेली आहे. आणि चौथ्या वा सातव्या आज्ञेपेक्षाही त्यांचं कसोशीनं पालन करण्यात येतं...' त्यांचा भंग 'कायद्यासमोर गुन्हा नसला तरीही ती गोष्ट गुन्ह्यापेक्षाही भयंकर मानण्यात येते.' एकदा इंडियात जाण्यासाठी सायंकाळच्या वेळी तो बाहेर पडला असताना त्यानं काळा टाय व लांब सायंकालीन कोट घातला होता. त्याला आढळलं की संपूर्ण प्रवासात त्याला 'एखाद्या महारोग्याप्रमाणे टाळण्यात येत होतं. मी एखाद्या बाईच्या तोंडावर जरी थुकलो असतो तरी याहून वाईट घडलं नसतं.' [एच. डब्ल्यू. नेव्हिन्सन : *द इंग्लिश,* प्रकरण ५, *'द अपर क्लास : द प्रोफेशनल्स.'*]

अंगाला भेदत जाणाऱ्या रागानं वळलेल्या नजरा तो जिथं कुठं जायचा तिथं त्याचा पाठलाग करायच्या. आणि वाईट गोष्ट ही होती की तो त्याचा पांढरा सूट काही दिवस सोडू शकत नव्हता. कारण त्यानं ग्रिंडलेजकडे सोडलेलं सामान दुसऱ्या दिवशीही मिळू शकणार नव्हतं कारण त्या दिवशी रविवार होता.

त्यानं त्याच्याबरोबर चार ओळखपत्रे घेतली होती. ती डॉ. पी. जे. मेहता, दलपतराम शुक्ला, प्रिन्स रणजितसिंगजी आणि दादाभाई नौरोजी यांच्यासाठी होती. दलपतराम शुक्ला हे त्याच्याप्रमाणेच वकिलीची परीक्षा द्यायला गेले होते तर डॉ. पी. जे. मेहता हे वैद्यकशास्त्रातील उच्च शिक्षणासाठी तिथं गेले होते. मोहननं साऊथहॅम्प्टनहून पाठवलेली तार ज्या दिवशी मिळाली त्याच दिवशी डॉ. पी. जे. मेहता आले. त्याला फ्लॅनेलमधे पाहून त्यांना हसू आलं. परंतु बोलत असताना मोहननं जेव्हा सहजगत्या आपल्या डोक्यावरील टोप काढला आणि त्या मित्रानं त्याला अडवायच्या आधीच त्याच्यावर चुकीच्या पद्धतीनं हात फिरवून त्याची फर खराब केली तेव्हा मात्र त्यांची त्रेधा उडाली. या रानटी माणसाला इंग्रजी समाजाशी जुळवून घ्यायला बरंच काही शिकवण्याची गरज आहे असं त्यांना वाटलं. इंग्रजी शिष्टाचारासंबंधी काही सूचना दिल्यानंतर त्यांनी त्याला एखाद्या इंग्रजाच्या घरी राहायचा सल्ला दिला. नंतर परत सोमवारी भेटायचं आश्वासन देऊन ते परतले. त्यानंतर अनेक वर्षांनी त्यांची शिक्षक आणि विद्यार्थ्याची भूमिका बदलली.

मन अस्वस्थ करण्याएवढं हॉटेल महाग होतं. त्यामुळे सामान येताच मोहन आणि मजूमदार यांनी हॉटेलचं बिल दिलं व ते एका सिंधी मित्रानं भाड्यानं घेतलेल्या खोलीवर गेले. मजूमदारांची त्याच्याशी माल्टा येथे ओळख झाली होती. हॉटेलचं बिल ३ पौंड झालं. त्याशिवाय ‘एवढं मोठं बिल देऊनही मी जवळपास उपाशीच राहिलो होतो ! कारण तिथलं मला काहीच आवडलं नव्हतं. मला जेव्हा एक पदार्थ आवडला नाही तेव्हा मी दुसरा पदार्थ मागवला पण मला बिल मात्र दोन्ही पदार्थांचं द्यावं लागलं.’ [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४४]

नवीन खोलीत गेल्यानंतरही मोहनच्या त्रासात कोणताच फरक पडला नाही. मोहनला घराची आठवण येऊ लागली. ‘माझ्या आईच्या प्रेमाची मला सतत आठवण व्हायची. रात्रीच्यावेळी माझ्या गालावरून आसवं ओघळू लागायची आणि घराच्या विविध प्रकारच्या आठवणींनी झोप यायचा प्रश्नच उपस्थित होत नसे.’ त्या वेदना अजूनच असह्य व्हायचं कारण त्या कोणाजवळच व्यक्त करता येत नसत. ‘प्रत्येक गोष्ट नवखी होती - लोक, त्यांचं वागणं इतकंच नाही तर त्यांची घरंही. इंग्रजी शिष्टाचाराशी मी अगदी अपरिचित होतो व दरक्षणी मला सावध राहावं लागत असे.’ [वरीलप्रमाणे, पृष्ठ ४५] त्याशिवाय माझ्या शाकाहाराचीही समस्या होती. परंतु त्यानं परतायचे दोर कापून टाकले होते. ‘आतला आवाज’ सांगत असे की परत जाणं शक्य नाही. आता तो इथं आलेला असल्यानं तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणं आवश्यक होतं.

सोमवारी पी. जे. मेहता जेव्हा हॉटेलमध्ये गेले तेव्हा मोहन आणि त्याचे मित्र आधीच नवीन खोलीवर गेले असल्याचं त्यांना कळलं. हॉटेलमधून त्यांचा पत्ता घेऊन ते तिथं गेले. नवीन जागेतील व्यवस्था पाहताच ते म्हणाले, ‘यानं भागणार नाहीं.’ आणि लगेच रिचमंड येथील एका कुटुंबात एका महिन्यासाठी त्याची राहायची त्यांनी व्यवस्था केली. मोहनला ‘इंग्रजांच्या राहण्या वागण्याचा परिचय व्हावा’ म्हणून त्यांनी असं केलं.

नवीन यजमान अतिशय प्रेमळ होते. परंतु त्यांना या तरुणाच्या अवस्थेची फार कमी कल्पना होती. न्याहारीत ओटमील पॉरीज असायचं. ते भरपूर असायचं. परंतु जेवणात केवळ उकडलेला पालक, जॅम आणि एकदोन ब्रेडच्या चकत्या एवढंच असायचं. त्यामुळे मोहनची

जवळपास उपासमार व्हायची. त्याच्या भारतीय मित्रांनी त्याच्याशी शाकाहारासंबंधी युक्तिवाद करायचा प्रयत्न केला. मोहनच्या मांसाहारासंबंधीच्या प्रयोगाचा उल्लेख करत ते म्हणायचे, ‘त्यावेळी आवश्यकता नसताना तुला मांसाहार आवडायचा आणि आता आवश्यकता असताना मात्र तुला मांसाहार चालत नाही यात काय अर्थ आहे?’

मोहननं त्यांना आपल्या आईला दिलेल्या अभिवचनाची गोष्ट सांगितली. ‘हूं ! अगदीच बालीशपणा! कमालीचा अंधविश्वास !! मित्र उद्गारले. जिला इथल्या परिस्थितीची माहिती नाही अशा अडाणी आईसमोर घेतलेल्या शपथेला काय अर्थ आहे?.... अशा शपथेला कायदासुद्धा मान्यता देणार नाही. आणि इथं आल्यानंतरही जर तू अशा प्रकारच्या अंधविश्वासाला बळी पडणार असशील तर यापुढे मी तुला कोणतीच मदत करू शकणार नाही. मला असं वाटतं की तू इंग्लंडला यायलाच नको होतं.’ जिव्हाळ्यानं थट्टा करत तो पुढं म्हणाला : ‘तू जर माझा भाऊ असतास तर मी तुझं चंबूगबाळं बांधून इथून परत पाठवलं असतं.’ [वरीलप्रमाणे, पृष्ठ ४६]

मोहनच्या मित्राच्या टोचण्याचा मोहनच्या मनावर लगेच परिणाम झाला. हे खरं होतं की त्यानं एकदा मांस खाल्लं होतं आणि त्याला ते आवडलंही होतं. बौद्धिकदृष्ट्या आताही त्याचा विश्वास होता की मांसाहार आवश्यक आणि वांछनीय आहे. त्याला असं वाटलं की त्याच्या पायाखालची वाळू घसरते आहे. परंतु त्याच्या आईचं प्रेम त्याच्या हृदयाच्या तारांशी जुळलेलं होतं व ते सर्व युक्तिवादाविरुद्ध त्याचा बचाव करत होतं. रात्रंदिवस मित्र त्याच्याशी वाद घालायचे परंतु त्यांना ‘नाही’ हे माझं कायम उत्तर असायचं. ते जेवढा जास्त युक्तिवाद करायचे तेवढी माझी भूमिका ताठर होत असे. मला वाचवण्यासाठी मी दररोज ईश्वराची प्रार्थना करत असे व तो मला वाचवतही असे. असं नाही की ईश्वराविषयी मला सर्व कळत होतं. केवळ ती माझी श्रद्धा होती जी काम करत होती. ती श्रद्धा की जिचं बीजारोपण त्या सच्छील रंभेनं केलं होतं.’ [वरीलप्रमाणे, पृष्ठ ४६]

*बेंथॅमचं थिअरी ऑफ युटिलिटी* त्याच्याजवळ वाचून मित्रानं आपल्या युक्तिवादाचं बळ वाढवायचा प्रयत्न केला. मोहन शेवटी म्हणाला : ‘तुझं म्हणणं योग्य असू शकेल. परंतु हे सर्व

माझ्या शक्तीपलीकडचं आहे. शपथ ही शपथ आहे. मी ती मागे घेऊ शकत नाही. माझा निरुपाय आहे.

त्यानंतर मित्रानं वाद घालणं सोडलं. त्यालासुद्धा त्याच्या प्रामाणिकपणासाठी व चारित्र्याच्या सामर्थ्यासाठी त्याच्याबद्दल आदर वाटू लागला. तो जरी पीत होता आणि धूम्रपान करत होता तरी तो तरुणांना या दोन्ही व्यसनांपासून दूर राहायला सांगत होता.

## २

बॅरिस्टर होण्यासाठी माणसाला न्यायालयाच्या कोणत्या तरी इन मध्ये 'काम करावं' लागतं. चौथं सत्र नोव्हेंबरमधे सुरू झालं. त्या महिन्याची रिचमंड येथील उमेदवारी संपल्यानंतर आणि रिचमंड हे लंडनपासून फार लांब असल्यामुळे डॉ. मेहता आणि दलपतराय या मोहनच्या मित्रांनी त्याची व्यवस्था वेस्ट केनिंगस्टनमधील एका अँग्लोइंग्लिश कुटुंबात भाडेकरू म्हणून केली. न्यायालयाच्या चार इन होत्या. इनर इन, मिडल टेम्पल, लिंकन्स इन आणि ग्रेज इन. त्यातून कोणत्याही एका इनची निवड शिकाऊ उमेदवारास करता येत असे. यापैकी मिडल इनची निवड बहुतेक भारतीय करत असत. परंतु इनर टेम्पल अतिशय श्रेष्ठ गणली जात असे. मोहननं इनर इनची निवड केली. ६ नोव्हेंबर १८८८ला मोहननं एक गिनी भरून प्रवेशअर्ज मिळवला आणि तिथं प्रवेश घेतला.

तीन दिवसांनंतर त्यानं आपल्या भावाला लिहिलं : 'सध्या इथं अतिशय कडाक्याची थंडी पडलेली आहे. परंतु असं वाईट हवामान इथं फार दिवस टिकत नाही. इतकं वाईट हवामान असूनही मला मांस वा दारूची गरज भासत नाही. त्यामुळे माझं अंतःकरण आनंदानं भरून येतं आणि ईश्वराचे त्यासाठी मी आभार मानतो. सध्या माझी प्रकृती अतिशय चांगली आहे.'

त्यानं आपली पहिली लढाई जिंकली होती पण संघर्ष काही संपलेला नव्हता. त्याची सत्त्वपरीक्षा सुरूच होती. वेस्ट किंग्स्टन येथील अँग्लो-इंग्लिश बाई देत असलेलं जेवण त्याला अगदीच मानवत नव्हतं. तो काही त्या घरमालकिणीचा दोष नव्हता कारण तिच्याकडे

पहिल्यांदाच शाकाहारी माणूस राहायला आलेला होता. न्याहारीसाठी ब्रेड, लोणी, जाम आणि चहा व अधूनमधून सोजी असायची. मधल्या जेवणासाठी ब्रेड, लोणी, चीज असायचं तर मुख्य जेवणासाठी ब्रेड, भाज्यांचं सूप आणि एखादी भाजी - बहुतेक बटाट्याची व काही ताजी फळं असायची. इंग्लंडमधे शाकाहार बाल्यावस्थेत असताना शाकाहारी स्वयंपाक क्लेशकारक गोष्ट होती. त्यावेळी कोशिंबीर/सॅलड्स जवळपास माहीतच नव्हते. भाज्यांना हातरुमालात बांधून भांड्यातील उकळत्या पाण्यात बुडवून उकळवण्यात येत असे. त्यासाठी तेच ते पाणी वारंवार वापरण्यात येत असे. त्यामुळे त्या निकस होत असत व त्यांचा नैसर्गिक सुवासही निघून जात असे. त्यामुळे वर्णन न करण्याएवढ्या त्या बेचव व्हायच्या. मांसाहारी इंग्रजांच्या टेबलवरील ब्रेड मांस खाता यावं म्हणून केवळ पुरवठ्यासारखी असते. ती फक्त तोंडीलावणं असते. उलटपक्षी मांसाहारी भारतीयात पोळी वगैरेसारखे पदार्थ जेवणातील मुख्य पदार्थ असतात व ते खाता यावे म्हणून मांस असते. त्या लोकांच्या हे लक्षातच येऊ शकत नव्हतं की मोहनसारख्या लोकांच्या जेवणात मुख्य पदार्थ ब्रेड असते. आणि मोहन तर इतका लाजाळू होता की वाढलेल्या पदार्थापेक्षा तो अधिक मागू शकत नसे. त्याचा मिठाई आदींचा साठा संपलेला होता व त्यानं मागवलेला नवीन साठा अजून यायचा होता. त्याला दिवसभर भुकेलं वाटायचं.

त्यानं अजून आपला अभ्यास नियमितपणे सुरू केलेला नव्हता. दलपतराय शुक्ला यांच्या सल्ल्याप्रमाणे त्यानं वृत्तपत्रं वाचायला सुरुवात केली. द डेली न्यूज, द डेली टेलिग्राफ, आणि पाल माल गॅझेट यांच्यावर तो दररोज नजर टाकायचा. त्यातील उत्तरं त्याची आवडती असायची - ती केव्हा केव्हा अश्लील परंतु बहुधा विनोदी असायची आणि नेहमीच वाचनीय असायची असं तो नंतर सांगायचा.

त्यानं वर्तमान घटनांत खास रस घ्यायला सुरुवात केली. आयरीश लोकांचा स्वयंशासनासाठी जोरात संघर्ष सुरू होता. पार्नेलिझम आपल्या यशाच्या शिखरावर पोहोचलेला होता. आयरीश लोकांच्या गुन्हेगारीची चौकशी करण्यासाठी बसवण्यात आलेल्या आयोगाच्या दैनंदिन कामकाजावर तो बारकाईनं लक्ष ठेवायचा. पिगोटची पत्रं ही खोटी आणि नकली आहेत

असं दाखवून देणारी व पार्नेलचा निरपराधीपणा सिद्ध करणारी लॉर्ड रसेल यांची कौशल्यपूर्ण उलटतपासणी तो लक्षपूर्वक वाचायचा. तो वाचत असलेलं दुसरं प्रकरण म्हणजे त्यावेळी वृत्तपत्रांच्या मथळ्यांत स्थान मिळवणारा मिसेस मेब्रिक यांच्यावर पतीचा आर्सेनिकचं विष घालून खून केल्याच्या आरोपाचा खटला. खटला चालू असताना वृत्तपत्रातून न्यायाधीशांच्या वर्तनासंबंधी सतत वक्रोक्तिपूर्ण लेखन यायचं. त्यामुळे त्याला न्यायालयाच्या अवमाननेविषयीच्या कायद्याची महत्त्वपूर्ण सूक्ष्म दृष्टी मिळाली.

तो काळ होता नागरी चळवळीचा, राजकीय वंध्यत्वाचा आणि सांसदीय गतिरोधाचा. 'तो काळ होता खरी राष्ट्रीय वाढ परिघाकडून केंद्राकडे व्हायचा, केंद्राकडून परिघाकडे नाही.' [जॉर्ज स्टीड व्हिच : *एम्पायर अँड डेमॉक्रसी* (१८९७-१९१३) टी. सी. अँड आर. सी. जॅक, एडिम्बरो, पृष्ठ ७१] कामगार वर्ग आणि समाजसुधारक हे अधिकाधिक नैराश्याकडे ढकलले जात होते व अगदी मंदगतीनं होणाऱ्या सुधारणांबद्दल त्यांना वीट येऊ लागला होता. तो बारकाईनं वाचणारा वाचक होता. वृत्तपत्र वाचनाची जी सवय त्यानं लावून घेतली होती त्यामुळे या सर्व घटनाप्रवाहांशी त्याचा निकटचा संबंध आला व त्या प्रश्नांसंबंधी नंतरच्या वर्षात मतं बनवण्यात त्याला मदत झाली.

भरपूर वेळ असल्यामुळे त्यानं शाकाहारी रेस्टॉरंटचा शोध सुरू केला. त्याला सुचवण्यात आलं की तू जर घरमालकिणीकडेच सर्व जेवणं घेशील व अनेकदा चहा पिशील तर तुला कंजूष समजण्यात येईल. त्यामुळे त्यानं आठवड्यातून कमीतकमी एकदा बाहेर जेवायचा आणि अधिकात अधिक दिवसातून तीनदाच चहा प्यायचा प्रघात ठेवला. तो रोज दहाबारा मैल पायपीट करायचा, स्वस्त रेस्टॉरंटमध्ये जायचा आणि कसं तरी पोट भरायचा. पोटभर जेवायचं समाधान त्याला कधीच मिळालं नाही.

एकदा जवळून जाणाऱ्या एका सद्गृहस्थाला त्यानं शाकाहारी रेस्टॉरंटकडे जायचा रस्ता विचारला. त्याचं नाव होतं पॉरिज बाऊल. त्या रेस्टॉरंट जवळून एकदा गेल्याचं त्याला आठवत होतं. परंतु तिथं पोहोचताच आपण फॅरिंग्टन स्ट्रीटवरील सेंट्रल रेस्टॉरंटसमोर उभे असल्याचं त्याच्या लक्षात आलं. 'ते पाहताच मला तसाच आनंद झाला जसा मुलाला आपल्या आवडीचं

खेळणं मिळालं की होतो.' इंग्लंडमधे आल्यानंतर पहिल्यांदाच तो मनसोक्त जेवला. त्या रेस्टॉरंटमध्ये शिरताच दारामागील काचेवर हेन्री साल्ट यांचं *अ प्ली फॉर व्हेजिटेरीयानिझम* हे पुस्तक त्याला दिसलं. त्यानं ताबडतोब एक शिलींग देऊन त्याची प्रत विकत घेतली आणि ते पुस्तक घरी नेऊन अथपासून इतिपर्यंत वाचलं. त्यामुळे शाकाहाराच्या महत्त्वाची कारणपरंपरा त्याला कळली. जरी वास्तवात तो मांसाहार करत नव्हता तरी आतापर्यंत तो विचारानं 'मांसाहारी' होता. आता त्यानं विचारपूर्वक शाकाहाराची निवड केली होती. त्याला वाटलं की ईश्वर आपल्या मदतीसाठी धावून आला आहे. शाकाहाराचा प्रचार करणं हे त्याचं ध्येय झालं.

शाकाहारातील वाढत्या रसानं त्याच्या मित्रांना त्याची काळजी वाटू लागली. शाकाहाराच्या वाढत्या वेडाचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर होईल वा विक्षिप्तपणात त्याचं परिवर्तन होऊन आहारविषयक प्रयोगाच्या रानटी हंसामागे लागून तो आपल्या शक्तीचा अपव्यय करील असं त्यांना वाटत होतं. एके दिवशी त्यांच्यातील एकानं त्याला सुधारण्याच्या अपेक्षेनं एक लहानशी युक्ती केली. त्यानं त्याला एक नाटक पाहायला बोलावलं. नाटकाआधी त्यानं त्याला प्रसिद्ध हॉलबॉर्न रेस्टॉरंटमध्ये नेलं. त्यानं असा विचार केला की तिथं तरी तो निदान शिष्टाचार म्हणून टेबलवर जे काही वाढण्यात येईल ते प्रश्न न करता खाईल. परंतु त्यानं आपल्या अशिलाला जमेस धरलं नव्हतं. सूप वाढण्यात येताच मोहन वेटरकडे वळला आणि त्यात काय काय आहे म्हणून त्यानं विचारलं. त्याच्या मित्राच्या लक्षात त्याची हालचाल आली. तो तीव्र स्वरात म्हणाला, 'मूर्खा, सभ्य समाजात वावरायच्या लायकीचा तू नाहीस. तुला जर नीटपणे वागता येत नसेल तर तू इथून निघून जा. अजून कुठं तरी जेवण घे आणि बाहेर माझी वाट पाहा.' मोहननं काहीएक न बोलता ते ठिकाण सोडलं. तो बाहेर रात्रीच्या आकाशाखाली गेला. उपाहारगृहातील जेवणारांच्या आणि मद्यप्यांच्या टेबलांवरील आवाज दूरवरून एखाद्या दुष्ट स्वप्नाच्या भासाप्रमाणे ऐकू येत होता. त्याला अजूनच शांत वाटत होतं. जवळच एक शाकाहारी उपाहारगृह होतं. तो तिथं गेला परंतु ते बंद झालेलं होतं. त्यामुळे तो जेवणाशिवायच राहिला. पण तसं आपल्या मित्राला न कळू देता तो त्याच्याबरोबर नाटकाला गेला.

त्याच्या प्रतिक्रियेचा जोवर प्रश्न होता तोवर तिच्यात आगळेपणा असा काही नव्हता. त्याच्या ठिकाणी दुसरा कोणीही त्या परिस्थितीत असता तरी तो तसाच वागला असता. परंतु ३६ वर्षांनंतरही त्या प्रसंगाच्या ज्या परिणामाची नोंद त्यानं केलेली आहे ती त्याच्या स्वभाववैशिष्ट्यावर प्रकाश टाकणारी आहे. त्यानं त्या प्रसंगाचा परिणाम आपल्या मित्राच्या संबंधावर होऊ दिला नाही. 'माझ्या या सर्व मित्रांचे प्रयत्न ज्या प्रेमातून निर्माण झाले होते ते मला दिसू शकत होते व त्यांचं मोलही मला कळू शकत होतं. त्यामुळे या प्रसंगानंतर त्या मित्रांबद्दलचा माझा आदर त्यांचे आणि माझे विचार आणि मार्ग भिन्न असूनही अजूनच वाढला.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४९] त्या मित्राच्या प्रेमाला आणि आदराला कसं पात्र व्हायचं याचा तो अजूनच जोरदार विचार करू लागला. शाकाहाराची शपथ तो मोडू शकत नव्हता. ती अतिशय पवित्र होती. परंतु तो आपल्या मनाशीच म्हणाला : 'शाकाहारामुळे निर्माण होणारा दुरावा मी माझा चमत्कारिकपणा दूर करण्याचा प्रयत्न करून कमी करू शकेन व तसा प्रयत्न मी करीन....... मी त्यांना आश्वासित करीन की यापुढे मी गबाळेपणानं राहणार नाही उलट सभ्य समाजाला मान्य असणाऱ्या सवयी अंगी बाणवून.... मी सभ्य दिसायचा प्रयत्न करीन.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५०]

वर्षं लोटत गेली आणि लाजाळू, गबाळ्या, इतरापासून स्वतःला वेगळं ठेवणाऱ्या त्या मुलाचं रूपांतर जगप्रसिद्ध महात्म्यात झालं. आपल्या आत्मकथेत या प्रसंगाचं वर्णन केल्यानंतर काही दिवसांनी त्याच्या त्या जुन्या मित्रानं, जो आता प्रसिद्ध बॅरिस्टर झाला होता, साबरमती येथील सत्याग्रह आश्रमाला भेट दिली. लंडन येथील हॉलबर्न रेस्टॉरंटमध्ये त्या संस्मरणीय रात्री मोहनला त्यांनी दिलेल्या प्रशस्तिपत्राचा उल्लेख करत आश्रमातील काही आश्रमवासीयांनी त्यांना विचारलं 'शुक्ला साहेब (कारण त्यांचं ते नाव होतं.) एकदा तुम्ही यांना 'मूर्ख' म्हणाला होता. आता तुमचं काय मत आहे?'

'तो तसाच आहे जसा तो होता. त्याच्यात थोडीशीही सुधारणा झालेली नाही.' शुक्लासाहेब गोड हसत म्हणाले.

# ३

आता मोहननं 'इंग्रजांपेक्षाही अधिक इंग्रज व्हायचा प्रयत्न सुरू केला.' त्याच्या स्वभाववैशिष्ट्यांप्रमाणे इतर कामांना ज्या जिद्दीनं तो लागत असे त्याच जिद्दीनं त्यानं याही कामाला सुरुवात केली. त्यानं चिमनी पॉट हॅट घेण्यासाठी १९ शिलींग खर्च केले. लंडनमधील फॅशनचं केंद्र असलेल्या बॉन्ड स्ट्रीट येथून सायंकाळी घालण्यासाठी सूट शिवून घेतला आणि तेव्हाच्या फॅशनला अनुसरून घड्याळ लावण्यासाठी भावाकडून सोन्याची दोन पदरी चेन मागवली. तसंच पोशाखासंबंधी तो अतिशय टापटिपीनं राहू लागला. तयार बांधलेला टाय लावणं 'बरोबर नसल्यानं' तो आपला टाय बांधणं शिकला, आपल्या बंडखोर, कडक केसांना नीट लावण्यासाठी दररोज आरशासमोर तो बराच वेळ घालवू लागला. त्याशिवाय तो शहरी माणसाला शोभणाऱ्या सुसंस्कृतपणाच्या सर्व सवयी अंगी बाणवण्याचा प्रयत्न करू लागला. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट निघणं तीन महिने चालू होतं. सभ्य समाजात शोभण्यासाठी त्यानं फ्रेंच शिकायचा व नृत्य आणि वक्तृत्वात कौशल्य मिळवायचा प्रयत्न सुरू केला. एका सत्रासाठी तीन गिनी शुल्क देऊन तो नृत्याच्या वर्गात दाखल झाला. पियानोचे सूर कळत नसल्यानं आपल्याला पदन्यास कळत नाही असं त्याच्या लक्षात आलं. त्यामुळे त्यानं तीन गिनीला एक व्हायोलिन विकत घेतलं आणि ते शिकवायला एक शिक्षक ठेवला. 'व्हायोलिनच्या सुरांचा कानाला सराव व्हावा म्हणून त्यानं ते घेतलं होतं परंतु त्यामुळे अजूनच असमाधान निर्माण झाल.' वक्तृत्वाचे धडे देण्यासाठी त्यानं अजून एक शिक्षक ठेवला. वक्तृत्वाच्या शिक्षकानं बेलच्या *स्टैंडर्ड इलॉक्यूशनिस्ट* या पुस्तकाची शिफारस केली आणि मोहननं पिट्स स्पीचपासून सुरुवात केली. या दिशेनं टाकलेलं हे त्याचं शेवटचं पाऊल होतं. 'श्रीयुत बेलनी माझ्या कानात सावधगिरीची घंटा वाजवली आणि मी जागा झालो.'

इंग्रज सभ्य माणसाची नक्कल करायचा प्रयत्नातून त्याचा छचोरपणा दिसत नव्हता. ध्येयाकडे, मग ते ध्येय कितीही का चुकीचं असेना, टाकलेलं ते एक गंभीर पाऊल होतं. त्याच्या मोहाच्या अवस्थेतही तो पूर्णपणे जागा असायचा. त्यानं खर्चिलेल्या प्रत्येक पेनीचा त्यानं हिशेब

ठेवला होता. 'माझ्या खर्चाची योजना मी पूर्णपणे आखलेली असायची. प्रत्येक लहानसहान खर्च, जसं की पोस्टाची तिकिटं, बसभाडं, वर्तमानपत्रांवर खर्च करण्यात आलेल्या काही पेनी या सर्वांची नीट नोंद केलेली असायची. रोज रात्री झोपायला जायच्या आधी शिल्लक मिळवण्यात यायची. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५२] वाढत्या खर्चाचा रात्रीमागून रात्री दुःखद अंतःकरणानं आढावा घेतल्यानंतर व शिल्लक रक्कम तपासल्यानंतर सूर्यप्रकाशाप्रमाणे त्याला दिसलं की या गतीनं आपण इंग्लंडमध्ये खर्च केल्यास अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक खर्च येणार होता. काही तरी करणं आवश्यक होतं. त्यानुसार डिसेंबर १८८८मधे पोरबंदरचे प्रशासक एफ. एस. पी. लेली यांना मोहननं एक पत्र लिहिलं. लेली त्या पत्राचं उत्तर देईल की नाही याची शाश्वती नसल्यामुळे त्यानं त्या पत्राची एक प्रत आपल्या भावालाही विचारार्थ पाठवली :

*माझ्या भावाला अतिशय प्रयत्न केल्यानंतरही माझ्या इंग्लंडमधील तीन वर्षांच्या शिक्षणासाठी ६६६ पौंडच जुळवता आले. ते पैसे तीन वर्ष पुरतील असा अंदाज होता. कायद्याचं शिक्षण घेण्यासाठी मी भारतातून इथं इंग्लंडमध्ये आलो.... परंतु लंडनमधील दोन महिन्यांच्या अनुभवानंतर माझ्या असं लक्षात आलं की.... इथं व्यवस्थित राहण्यासाठी आणि चांगलं शिक्षण मिळवण्यासाठी मला अजून ४०० पौंड लागणार आहेत.*

*महामहीन राणासाहेब यांच्या कारकिर्दीत शिक्षणाला फार कमी साहाय्य करण्यात आलं. परंतु इंग्रजांच्या प्रशासनात स्वाभाविकपणेच शिक्षणाला प्रोत्साहन मिळायची आम्ही अपेक्षा करू शकतो.... त्यामुळे मी अपेक्षा करतो की आपण काही लहानसहान मदत कराल....* [एम. के. गांधीज लेटर टू मि. लेली, दिनांक डिसेंबर १८८८]

दुसऱ्या एका पत्रात कॉलनल वॅटसन यांना त्यानं लिहिलं की तुम्ही माझ्या वडिलात फार रस घेतला आणि तुम्ही त्यांच्याकडे आपला मैत्रीचा हात कसा वाढवला ते मला माहीत आहे. पुढं ते लिहितात:

*मला अगदीच शंका नाही की ज्या गोष्टीचं त्यांना महत्त्व वाटत होतं त्यासाठी तुम्ही काही तरी भरीव मदत कराल आणि इंग्लंडमधील माझं शिक्षण नीटपणे पार पाडायला सहाय्य कराल.*

[एम. के. गांधीज लेटर टू कॉलनल जे. डब्ल्यू. वॅटसन दिनांक डिसेंबर १८८८]

ही पत्रं खरोखरी डाकेत टाकण्यात आली होती की नाही हे स्पष्ट नाही. परंतु ते काहीही असलं तरी त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही. त्यानं 'इंग्रज सभ्य गृहस्थ' बनायच्या आपल्या आकांक्षेचा पुनर्विचार करायला सुरुवात केली. 'अखेरीस इंग्लंडमधे मी काही या हेतूनं आलो नव्हतो' तो स्वतःशीच म्हणाला. त्यानं वक्तृत्व कलेच्या शिक्षकाला कळवलं की यापुढे वक्तृत्व कलेचे धडे घेणं मला शक्य होणार नाही. संगीत शिक्षिकेला येईल त्या किमतीला व्हायोलिन विकून टाकायला विनंती करून पुढं तिला तो म्हणाला की मी चुकीच्या कल्पना जोपासत होतो व आता मी माझी पावलं मागं घेणं आवश्यक आहे. ती समंजस बाई होती. 'माझ्यात संपूर्ण परिवर्तन करायच्या माझ्या निर्धारात तिनं मला मदत केली.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ५१]

तीन गोष्टी त्याच्याजवळ कायमच्या राहिल्या. एक त्यानं जोपासलेली काटेकोर हिशेब ठेवायची सवय - ज्यामुळे पुढं त्याला कोणताही घोटाळा न होता मोठाला सार्वजनिक निधी हाताळता आला. दोन- व्यंजनांची काळजी कशी घ्यावी व शब्दोच्चार कसा करावा ते त्याला कळलं. त्यामुळे मोठाल्या सभेच्या अगदी कानाकोपऱ्यातही आपला आवाज स्पष्टपणे ऐकू येईल अशा रीतीनं पोहोचवण्याची कला तो शिकला. तीन - त्याच्या पोशाखातील नीटनेटकेपणा अनेक वर्षं कायम राहिला आणि चर्चिलच्या शब्दातील 'अर्धनग्न फकीर' झाल्यानंतरही लुंगीच्या व वरच्या दुपट्याच्या वळ्या नीट ठेवायच्या दक्षतेतून त्याची ही सवय कायम आहे दिसून येत होतं.

**४**

'इंग्रजांची नक्कल उतरवण्याऐवजी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे राहायचं ठरवल्यामुळे मोहनच्या डोक्यावरील बरंचसं ओझं उतरलं. त्यानंतर त्यानं आपल्या संपूर्ण जीवनाला नवीन दृष्टिकोनानुसार वळण लावायला सुरुवात केली. वेस्ट केनिंग्सटन येथे ज्या ॲंग्लोइंडियन घरमालकीणीकडे तो राहायचा तिथं त्याला राहण्यासाठी व खाण्यापिण्यासाठी दर आठवड्याला ३० शिलींग द्यावे लागायचे. तिथं त्यांच्या जेवणाच्या वेळा ठरलेल्या होत्या. तो टेबलवर वेळेवर

येईल अशी अपेक्षा असायची. त्याला जर असं आढळलं की तो टेबलवर वेळेवर पोहोचू शकणार नाही तर तो बाहेरूनच जेवण करून यायचा. ह्याचा आणि दुपारच्या चहाचा अजून आठवड्याला १० शिलींग खर्च यायचा. त्याशिवाय सौजन्य म्हणून त्या कुटुंबातील लोकांना अधूनमधून बाहेर जेवायला नेणंही आवश्यक असायचं. त्यासाठी व त्यांच्याबरोबर पार्ट्यांसाठी भाडंवगैरे धरून बराच खर्च यायचा. अनावश्यक भाड्यावरही तो बराच खर्च करायचा. अशा रीतीनं तो बाराएक पौंड महिन्याचे खर्च करायचा. हा खर्च तसा काटकसरीचाच समजण्यात यायचा व त्याच्या ओळखीचे बरेच भारतीय एवढा खर्च करायचे. परंतु त्यांना शिष्यवृत्तीची मदत होती. त्यानं हिशेब केला की त्या कुटुंबातून मिळणाऱ्या अन्नाचा खर्च दर आठवडी सात शिलींगपेक्षा अधिक येऊ शकत नाही. त्याला ३० शिलींग जे भाडं द्यावं लागायचं ते राहायचा खर्च तेवढा येतो वा त्यापेक्षा अर्ध्याहूनही कमी येतो म्हणून नाही तर त्याला त्या कुटुंबाच्या सहवासाची संधी मिळते म्हणून. त्याशिवाय तो त्यांच्यात राहत असल्यामुळे त्यांना काही वेळही त्याला द्यावा लागायचा, नव्हे तसा वेळ देणं हे त्याचं कर्तव्यच होतं. त्यानं तसं केलं नसतं तर तो असभ्यपणा समजला गेला असता. तशा परिस्थितीत नियमित विद्यार्थी जीवन जगणं त्याला अशक्य व्हायचं.

त्या कुटुंबात राहण्याऐवजी स्वतःसाठी एक सूट भाड्यानं घ्यायचं त्यानं ठरवलं. तो जिथं काम करायचा तिथं तो खोली भाड्यानं घ्यायचा व कामाचं ठिकाण बदललं की गरजेनुसार वेळोवेळी खोली बदलायचा. त्यामुळे लंडनच्या वेगवेगळ्या भागांचा त्याला अनुभव आला. त्यानं नियमच करून टाकला होता की जिथं चालत जाणं शक्य आहे तिथं भाड्याचं वाहन करायचं नाही. अशा रीतीनं व्यायाम आणि काटकसर यांचा त्यानं समन्वय केला. या बदलामुळे त्याचा अर्धा खर्च वाचला आणि 'दररोज ८-१० मैल चालल्यामुळे' शारीरिक दृष्ट्याही तो तंदुरुस्त राहिला.

ते १८८९ जूनच्या अखेरचे दिवस होते. बारची परीक्षा अजूनही बरीच लांब होती. एफ. एस. पी. लेली यांचे 'पदवीधर आधी हो आणि नंतर माझ्याकडे ये' हे शब्द त्याच्या कानात फिरत होते. त्याचं कच्चं इंग्रजी त्याला नेहमीच सतावत असे. त्याला वाटलं की आपल्या कायद्याच्या पदवीला

एखादी वाङ्मयीन पदवी जोडावी. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज अतिशय खर्चिक होते व त्यासाठी प्रयत्न करणं म्हणजे इंग्लंडमधील मुक्काम ३ ते ४ वर्षांनी वाढवणं होत. ते त्याला परवडणारं नव्हतं. परंतु त्याला सांगण्यात आलं की कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय तो लंडन मॅट्रीकच्या परीक्षेला बसू शकतो. परीक्षा वर्षातून दोनदा घेण्यात यायच्या - जानेवारी व जूनमध्ये. येत्या जानेवारीत त्यानं परीक्षेला बसायचं ठरवलं.

त्यासाठी किती तरी विषयांची तयारी करावी लागणार होती. त्यात लॅटीनचाही समावेश होता. या विषयाचं त्याला अगदीच ज्ञान नव्हतं. शिवाय आधुनिक भाषा हा विषय होताच. जवळपास त्याच्यासाठी ती अशक्यप्राय गोष्ट होती. परंतु इंग्रज सभ्य गृहस्थ व्हायच्या आकांक्षेनं त्याला गंभीर विद्यार्थी बनवलं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५४] त्यानं आपलं वेळापत्रक अगदी एकेका मिनिटाचा विचार करून तयार केलं. मॅट्रिकचा वर्ग त्यानं लावला व लगेच तयारीला सुरुवात केली. अशा रीतीनं त्याचं इंग्लंडमधील पहिलं वर्ष संपलं.

तो १८९०च्या जानेवारी १३ ते १७च्या दरम्यान परीक्षेला बसला आणि नंतर व्हेंटनॉर येथे शाकाहारी काँग्रेसला हजर राहायला गेला. त्या दिवसात हॉलीडे रिझॉर्टला राहणारांची जवळपास सविस्तर यादी स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असे. ऑसबॉर्न हाऊस, मेडेरा रोड, (शेल्टन्स व्हेजिटेरीअन हॉटेल), आईल ऑफ वेट मरक्युरी आणि द व्हेंटॉर गॅझेट यांच्या फेब्रुवारी १ व फेब्रुवारी ७च्या अंकात त्याचं नाव छापण्यात आलं आहे. परंतु त्यानंतर मात्र त्याचं नाव आढळत नाही. त्यावरून तो तिथं जानेवारी २३ ते ३०च्या दरम्यान गेला असावा. परीक्षेसाठी अतिशय मेहनत केल्यामुळे शारीरिक व मानसिकदृष्ट्या तो शिणलेला होता. त्याला विश्रांतीची फार गरज होती. त्याची भरपाई करण्यासाठी त्यानं ब्रायटन येथे एक महिन्याची सुटी घालवायचा निर्णय घेतला व तो तिथं फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात गेला. परंतु प्रयोग करायच्या वेडानं त्यानं आपल्या या सुटीतही साधेपणाचं जीवन जगायचा प्रयोग करून एका नवीन साहसासाठी सुटीचा उपयोग केला.

मॅट्रीकच्या परीक्षेचा निकाल फेब्रुवारी १९ला लंडन येथे दुपारी २ वाजता प्रकाशित झाला. त्याच्या मित्राच्या तारेनं त्याला त्याची बातमी कळवली. तो लॅटीनमधे गचकला होता.

त्यानं भरपूर मेहनत केली होती. परंतु दोन अगदी नवीन विषय मुळापासून तयार करावे लागल्यानं आणि परीक्षा पाचच महिन्यांवर असल्यानं त्याच्या सर्व मेहनतीवर आणि बुद्धिमत्तेवर पाणी फिरलं. तो म्हणाला की मी तरीही धीर सोडला नाही. व्यर्थ दुःख करत बसण्यात एक क्षणही न घालवता त्यानं विषय बदलवले, विज्ञान गटात रसायनशास्त्राच्या ठिकाणी प्रकाश आणि उष्णता हा विषय घेतला. रसायनशास्त्रात प्रयोग करायची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे त्याला त्यात रस वाटू शकला नाही. त्यामुळे त्यानं येत्या जूनमधे पुन्हा एकदा परीक्षेला बसायचं ठरवलं.

साधी राहणी आणि स्वावलंबन यातील त्याच्या प्रयोगांनी पुन्हा एकदा चाचणीला तोंड देण्यासाठी तयारी करायचा त्याचा मार्ग मोकळा केला. त्या प्रयोगांना त्यानं कशी सुरुवात केली आणि आपल्या राहण्याचा खर्च दर दिवसाला एक शिलींग इतका कसा कमी केला ह्याची चर्चा पुढील प्रकरणात करण्यात येईल.

# प्रकरण ११ वे

# ध्येयाच्या शोधात

## १

ज्या इंग्लंडला मोहन गेला होता ते इंग्लंड होतं सिडने वेब्ज आणि जॉर्ज बर्नार्ड शॉचं, ब्रेडला आणि ॲनी बेझंटचं, केर हार्डी आणि जॉन बर्न्सचं, एडवर्ड कारपेंटर आणि हेन्री साल्टचं, वुइल्यम हॉवर्ड आणि हॅवलॉक एलिसचं, हिंडमन आणि रॅम्से मॅकडोनाल्डचं. डार्विनच्या जीवसृष्टीच्या उत्पत्तीविषयक सिद्धान्ताच्या प्रकाशनामुळे वैज्ञानिक विचारांचं एक नवीन युग अवतरलं होतं. शासनविरहित समाजव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रिन्स क्रोपाटकिन यांना रशियातून हद्दपार करण्यात आल्यामुळे ते इंग्लंडमध्ये राहत होते. त्यांनी त्यांचं म्युच्युअल एड ॲज अ फॅक्टर इन इव्हॉल्युशन हे पुस्तक प्रकाशित केलं होतं तर कार्ल मार्क्सला वर्गयुद्धाच्या दारूगोळ्याचा शोध ब्रिटिश म्युझियममधील ग्रंथांच्या अध्ययनकार्यात स्वतःला झोकून दिल्यानंतर लागला होता. वर्षानुवर्ष फर्निचर, वॉल पेपर्स, गालिचे आणि पडदे यांचे आराखडे तयार करण्यात घालवल्यानंतर वुइल्यम मॉरीसन यांना वाटायला लागलं की ‘अशा प्रकारची राहणी पूर्णपणे निरर्थक’ आहे आणि त्यांनी जाहीर केलं की ‘मी अगदी साध्या सफेदी केलेल्या भिंतींच्या आणि केवळ खुर्च्या व टेबल असलेल्या घरात राहणार आहे.’ [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४२]

ते युगच भारावून टाकणारं युग होतं. नवनवीन कल्पनांनी आणि ताज्या शक्यतांनी ते युग भारलेलं होतं. स्त्रीवाद आणि स्त्रियांना मताधिकार या मागण्यांनी केलेली उलथापालथ, थिऑसॉफिस्टांची चळवळ, समाजवादी आणि शासनविरहित समाजव्यवस्थेचा पुरस्कार करणारांचा प्रचार आणि रंगभूमी, संगीत व कलेच्या क्षेत्रात आलेले नवे प्रवाह या सर्वांच्या ताणतणावांनी युक्त असा तो काळ होता. परंपरागत ख्रिश्चन धर्माचा बालेकिल्ला विवेकवाद्यांच्या

टीकेमुळे ढासळत होता, मानववंशशास्त्र नैतिकतेच्या इमल्याला हादरे देत होतं, विज्ञान श्रद्धेची अवहेलना करत होतं व आजवर 'निसर्गाचे जे नियम अपरिवर्तनीय' वाटत होते त्यांचा नवनवीन लागलेल्या शोधांनी समूळ उच्छेद केला जात होता. एडवर्ड कारपेंटर म्हणाले की 'सांस्कृतिक नैतिकतेच्या संपूर्ण ढाच्याचं महत्त्वच नाकारण्यात येत होतं. संपत्ती, व्यापार, वर्गीय संबंध, लैंगिक संबंध, विवाह, राष्ट्रभक्ती यांच्यामागील नैतिक दृष्टिकोन त्वरेनं एखाद्या वितळत्या दृश्याप्रमाणे बदलत होता. नीत्शेनं ख्रिश्चन धर्मातील परोपकाराच्या विचाराला बेचिराख करून टाकलं होतं तर बर्नार्ड शॉ यांनी मोझेसनं सांगितलेले नियम आणि दहा आज्ञा यांनाच जाळून टाकलं होतं.' [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,* खंड १, पृष्ठ १३ मधे उद्धृत]

सामाजिक क्षेत्रात चोहोकडे नवीन शक्तीं कार्यरत होऊ लागल्या. त्यांची जाणिव झाल्यामुळे नवनवीन सामाजिक बदल झपाट्यानं घडू लागले. त्यामुळे एखाद्या रक्षणकर्त्याच्या आगमनानं निर्माण झालेल्या उत्साहामुळे जसं वातावरण भारलं जावं तसं वातावरण भारलेलं होतं. त्याच्या संसर्गाचा सर्व प्रकारच्या लोकांवर परिणाम झालेला होता - मदर शिम्पटनपासून तर हिन्डमनपर्यंत. स्वयंचलित गाड्या आणि उडणारी यंत्र यांविषयी मदर शिम्टननी केलेल्या भविष्यवाणीचा शेवट या शब्दांनी होतो :

*आणि होणार आहे जगाचा अंत*
*वर्ष अठराशे एक्याऐंशी साली.*

हेन्री मेयर्स हिंडमन – 'लोकशाहीवाद्यातील हुकुमशहा आणि हुकुमशहातील लोकशाहीवादी - आपल्या नेहमीच्या भरघोस बोलायच्या शैलीनं औद्योगिक जगात कोणतंही संकट निर्माण झालं की आत्मविश्वासपूर्वक म्हणायचे की मला खात्री आहे की क्रांती तोंडाशी येऊन ठेपलेली आहे आणि ती हे शतक संपायच्या आधी होणार आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या शताब्दीच्या वर्षी म्हणजे १८८९ साली तो दुर्दैवी दिवस उगवेल अशी त्यांची भविष्यवाणी होती. परंतु १८८९ साली काहीच न घडल्यानंतर १८९९ हे वर्ष शतकाच्या अखेरचं वर्ष होतं. त्यात दैव काहीतरी भयंकर घडवणार होतं. परंतु १८९९नं केवळ बोअर युद्धाला जन्म दिला. शतकाचा अंत

झाला पण जगाचा अंत काही झाला नाही. परंतु तरीही १८८१च्या दशकानं एका अर्थानं जुन्या जगाचा अंत केला व त्याच्या ठिकाणी नव्या जगाला जन्म दिला. १८८०-८१च्या सुरुवातीस हिन्डमनची *डेमॉक्रेटिक फेडरेशन*, एडमंड गर्नीची *सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च*, मॅडम ब्लाव्हात्स्कीची *थिऑसॉफिकल सोसायटी, द व्हेजिटेरीअन सोसायटी* व *अ‍ॅन्टी व्हीव्हीसेक्शन सोसायटी* यांनी अत्यधिक आत्मविश्वासानं सुरू केलेल्या कामामुळे आत्मसंतुष्ट भौतिकवादाला रोखायचा व मध्य-व्हिक्टोरिअन युगात परतायचा प्रयत्न केला.

क्षितिजाचं विकसन होत जाणाऱ्या अठराशे अठ्ठ्यैशीच्या दशकातील जगात आपण आपल्या आयुष्याच्या घडणीच्या काळात सापडलो असल्याचं मोहनला आढळलं. जीवनविषयक प्रयोग करायची मुळातच सवय असलेल्या मोहनला तत्कालीन प्रचलित तात्त्विक सिद्धान्त आणि गूढ भविष्यवाणी यामधे अगदीच रस वाटला नाही. त्याऐवजी आपल्या आवडीचे काही मूलभूत प्रयोग करण्यात अजाणता त्यानं स्वतःला बुडवून टाकलं. त्याच्या आईनं घातलेल्या तिहेरी शपथेनं त्याला त्यासाठी मार्ग दाखवला. आत्म्याचं स्वरूप, त्याची शक्ती व त्याचे नियम समजावून घेण्यासाठी शाकाहार, मानवी संबंध आणि धर्म, जीवनातील साधेपणा, स्वयंशासन व आत्मसंयम यांच्या मूलभूत संशोधनाच्या साहसाची त्यानं सुरुवात केली. वेगळ्या शब्दात जी आत्मशक्ती पुढील संघर्षात त्याचं शस्त्र होणार होती तिच्या संशोधनाची त्यानं सुरुवात केली.

त्यावेळी इंग्लंडमधील समाजवाद हा अपरिपक्वावस्थेत होता व तो केवळ युवकांच्या उत्साहाच्या उद्रेकासारखा होता. त्यामागे कोणतीही वैज्ञानिक दृष्टी नव्हती. त्यानं अजून तत्त्वज्ञानाचा उदासवाणा पोषाख घातलेला नव्हता. त्यानं कल्पिलेलं नव्या जगाचं चित्र सोनेरी रंगाचं असलं तरी ते अंधुक आणि गोंधळानं भरलेलं एखाद्या ख्रिसमसच्या झाडासारखं होतं. ‘मुळाशी समतेचा उच्च विचार व वर चमचमणाऱ्या फांद्या असलेल्या या झाडाला शाकाहाराचा पुरस्कार करणाऱ्या सिद्धान्तापासून तर थिऑसॉफी व वैज्ञानिक प्रयोगासाठीही चिरफाडीस विरोध करणाऱ्या कोणत्याही तत्त्वज्ञानानं सुशोभित करता येऊ शकतं होतं.... अट एवढीच की

ते पुरेसं चमकदार असायला हवं.' [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी*, *कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १३ मधे उद्धृत]

१८८०च्या दशकात मोहन इंग्लंडमधील ज्या शाकाहाराच्या चळवळीच्या संपर्कात आला होता ती एका मोठ्या नवजागृतीच्या व ध्येयवादाच्या आंदोलनाचा भाग होती. तिला इमर्सनच्या, थोरो आणि वाल्ट व्हिटमन या अमेरिकन विचारवंतांच्या अतींद्रियवादाच्या विचारप्रणालीतून अशीच अभिव्यक्ती मिळाली होती. अमेरिकेत मुख्यत्वेकरून आध्यात्मिक वातावरण चांगलं नव्हतं. त्यामुळे नवीन इंग्लंडमधील या नावीन्याचे प्रेषित केवळ आत्म्याच्या स्वास्थ्याबद्दल चिंतित होते. इंग्लंडमधे मात्र आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत पूर्णपणे गोंधळाची अवस्था निर्माण झालेली होती. त्यामुळे नवजीवनाच्या शोधासाठी इथल्या सामाजिक चळवळीनं निसर्ग आणि मानवतावादाचा आकार घेतला. *थोरो सोसायट्या, वाल्ट व्हिटमन* समूह यांच्या बरोबरच *सोशलिस्ट लीग, शेफिल्ड सोशलिस्ट ग्रुप* आणि *फेलोशिप ऑफ न्यू लाईफ* यांची स्थापना 'व्यक्तीला परिपूर्ण करून समाजाची उन्नती करण्यासाठी' करण्यात आली. रॅम्सी मॅकडोनाल्ड हे त्यांचे संस्थापक सदस्य होते. यातूनच फेबियन सोसायटीचा जन्म झाला. इंग्लंडमधील शाकाहारी चळवळीचं आणि प्राण्यांच्या चिरफाडीला विरोध करणाऱ्या चळवळीचं नेतृत्व बरंचसं थोरो सोसायट्या आणि वाल्ट व्हिटमन गट यांच्यातून तसंच समाजवादी आणि फेबियन सोसायटीच्या लोकातूनही आलं होतं. शाकाहार हा त्यांच्या मानवतावादाचाच एक भाग होता व मानवतावाद हा त्यांच्या समाजवादाचा भाग होता. ते समाजवादी होते कारण ते मानवतावादी होते आणि ते मानवतावादी होते म्हणून ते शाकाहाराच्या चळवळीकडे ओढले गेले होते.

गांधीजींना १९०६पर्यंत थोरोच्या लेखनाचा परिचय झालेला नव्हता. परंतु इंग्लंडमधील शाकाहारी चळवळीमुळे अप्रत्यक्षपणे गांधीजीत थोरोच्या विचारांनी प्रवेश केला. ज्या विहिरीतून त्यांनी शाकाहाराच्या तत्त्वाचं आठव्या दशकात प्राशन केलं त्यातूनच पूर्व आणि पश्चिम या दोघांनीही आपापल्या बादल्या बुडवल्या, त्या विहिरीचं संरक्षण केलं आणि थोरोच्या शब्दात 'वाल्डेनच्या शुद्ध पाण्यात गंगेचं पवित्र पाणी मिसळलं.' [एम. के. गांधी, *फ्रॉम* द लंडन डायरी, *कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १४ मधे उद्धृत]

## २

आदर्शवाद आणि रुढीबद्धता यांच्याबद्दल माणसाच्या मनात सतत एक संघर्ष चालू असतो. जेव्हा ‘परंपरांच्या बंधनानं मानवी आत्म्याचं चैतन्य निघून जातं’ व त्याच त्या गोष्टी केल्यामुळे ते ‘आक्रसल्यासारखं होऊन’ त्यात जोम राहत नाही तेव्हा आपलं गतवैभव परत प्राप्त करण्यासाठी तो शक्तीचं बाह्य प्रदर्शन करतो; स्वतःला बाह्य डामडौलानं सजवतो. भौतिक सुखसोयी, संपत्तीचं प्रदर्शन, रूढी आणि पोषाखाच्या पद्धती, नैतिकतेचं नीतिशास्त्रानुसार नव्हे तर रूढीनुसार पालन आणि अंतिमतः सोयीप्रमाणे तत्त्व आणि धर्म यांना मुरड घालणं ही ह्या बाह्य डामडौलाची लक्षणं असतात. परंतु त्याचा पोकळपणा आपल्याला लवकरच मरणोन्मुख करतो व जगण्याची अंतःप्रेरणा आपली प्रतिक्रिया व्यक्त करू लागते. ज्यामुळे त्याच्या आत्मशक्तीचे आटलेले झरे पुन्हा जोमानं वाहू लागतील अशा ‘पुनरुज्जीवनाच्या आश्चर्याचं’ रूप मग ते धारण करू लागते. थोरोच्या शब्दात सांगायचं तर ‘कोणत्यातरी चिरंतनाचा शोध लावायचा तो प्रयत्न करू लागतो.’ अमेरिकेत अतींद्रियवादातून याला अभिव्यक्ती मिळाली आहे.

नवीन इंग्लंडमधील अतींद्रियवाद हा इतर गोष्टींशिवाय भारतीय वेदांत विचारानं अमेरिकन मनाला गती दिल्याचा परिणाम होता. इमर्सननं ब्रह्माची जी प्रार्थना केली त्यातून हे स्पष्ट दिसते :

*लाल मारेकरी समजत असेल की मी मारतो*
*अथवा मारला जाणारा समजत असेल की मला मारताहेत*
*तर त्याना माहीत नाही सूक्ष्म मार्ग माझे*
*मीच जगवतो, मारतो आणि पुन्हा जन्माला घालतो.*

*　　　　*　　　　*

*जे मला बाहेरच राहू देतात, कळत नाही त्यांना हिशेब,*
*जेव्हा मला ते उडवतात, तेव्हा मीच असतो पंख,*

*मीच असतो शंका घेणारा, आणि मीच असतो शंका,*
*मीच असतो ती स्तोत्रं ज्यातून करण्यात येत असतं स्तवन ब्रह्माचं.*

अतींद्रियवाद्यांचं निसर्गाकडे परत फिरणं ही भोगवादाची आणि कृत्रिम सभ्यतेची प्रतिक्रिया होती. याचा अर्थ असा की, सुरुवात म्हणून, 'ती एक थोडीशी लांबलेली आनंददायी सहल होती', नवीन श्रद्धा आणि जीवनाला सामोरे जायची नवीन पद्धती होती. लहरीपणाच्या आणि अचेतन करणाऱ्या कल्पनांपासून सुटका करून घेण्याकरिता व आपल्यात, आपल्याशिवाय आणि आपल्या पलीकडे असणाऱ्या असीम क्षमतांच्या मुक्ततेच्या शोधात तिचा विकास झाला.

अतींद्रियवादाच्या आंदोलनातील ह्या सर्व वैशिष्ट्यांचा समावेश हेन्री डेव्हीड थोरोच्या व्यक्तिमत्वात झालेला होता. तो इमर्सनचा १८३७ ते १८६२पर्यंत शेजारी होता. १८४५ साली त्यानं साधी जीवनपद्धती आणि शांततेचं स्वातंत्र्य यांच्या प्रयोगाला सुरुवात केली. त्यानं ॲमोस ब्रॉन्सन अलकॉट या आपल्या मित्राकडून कुऱ्हाड उसनी घेतली, स्वतःच स्वतःसाठी वाल्डेनकाठी पांढऱ्या पाईनच्या लाकडाची झोपडी तयार केली आणि स्वातंत्र्यदिनी तो तिथं रहायला गेला. तो तिथं ४ जुलै १८४५ ते ६ सप्टेंबर १८४७पर्यंत अगदी एकटा राहिला, स्वतःच्या शारीरिक श्रमावर त्यानं तिथं दोन वर्ष काढली आणि १८५४ साली आपल्या प्रयोगाचे निष्कर्ष वाल्डेनमधून सादर केले.

*वाल्डेन* आणि *अ विक ऑन द कॉन्कॉर्ड मरविक रिव्हर्स* या पुस्तकांमधून ज्या कृत्रिम, भित्र्या, परिणामशून्य जीवनपद्धतीमुळे संस्कृतीला 'सामान्यत्वाच्या शोकांतिकेचा' धोका निर्माण झाला आहे त्या जगाविरुद्ध बंडखोरी करणारांचं व्यावहारिक तत्त्वज्ञान थोडक्यात सांगितलं आहे.

*द विकमधील* पुढील प्रसिद्ध परिच्छेदातून थोरोनं त्याचं शाकाहारी माणसात कसं परिवर्तन झालं याचं वर्णन केलं आहे :

*ज्या खारी सकाळी अतिशय मजेत दुडूदुडू उड्या मारत होत्या त्या गरीब बिचाऱ्या खारींचे सांगाडे आम्ही पाहिले व त्यांची कातडी सोलून त्यांना आम्ही जेवणासाठी शिजवल्याची आम्हालाच घृणा वाटल्यानं त्यांचं मांस खाणं आम्ही बंद केलं... केवळ उपाशी माणूस सोडला तर असं खाणं अतिशय वाईट आहे. त्या जर मोठ्या असत्या तर आमचा गुन्हा काही कमी ठरला असता. त्यांचे लाल देह, लहानलहान लाल पेशी, मांसाचे तुकडे यांनी आमची वासना शमली नसती. तत्क्षणीच निर्माण झालेल्या प्रेरणेनं आम्ही ते फेकून दिले व आमचे हात धुतले आणि आमच्या जेवणासाठी थोडा भात शिजवला. 'जो मांस खातो आणि ज्याचं ते आहे यांच्यातील अंतर लक्षात ठेवा! पहिल्याला क्षणिक आनंद मिळतो तर दुसऱ्याला आपल्या अस्तित्वाला मुकावं लागतं!' 'जे आपलं पोट जंगलात भरपूर वाढणाऱ्या वनस्पतीनं भरत असतात आणि ज्यांची पोटं भुकेपोटी जळत असतात अशा प्रकारच्या या गरीब बिचाऱ्या प्राण्यांविरुद्ध एवढा मोठा अपराध कोण करील?'* [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी*, *कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १५ मधे उद्धृत]

गेल्या काही वर्षांत ते बंदूक बाळगत असत. 'माझं समर्थन असं होतं की मी पक्षीशास्त्राचा अभ्यास करत आहे.' परंतु त्यांचा निसर्गाशी घनिष्ट संबंध होत गेला तसतसं त्यांच्या लक्षात येऊ लागलं की पक्ष्यांचा अभ्यास करण्यासाठी याहून उत्तम मार्ग आहेत. फक्त त्यासाठी पक्ष्यांच्या सवयींवर बारकाईनं लक्ष ठेवावं लागतं.' [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी*, *कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १६ मधे उद्धृत] त्यानुसार नवीन झोपडीत राहायला जाण्यापूर्वी त्यांनी आपली बंदूक विकून टाकली आणि अधिक चांगलं आणि सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी सामिष अन्नाचा त्यांनी त्याग केला. 'मासे जेव्हा आक्रंदन करतात तेव्हा कोण ऐकतो?' असं त्यांनी वाल्डेनमध्ये विचारलं आहे. याच पुस्तकात इतरत्र त्यांनी लिहिलं आहे : 'बाल्यावस्थेतील अविचारीपणाचं वय निघून गेल्यानंतर कोणताही माणुसकी असलेला माणूस त्याच्याचप्रमाणे जगायचा अधिकार असलेल्या कोणत्याही प्राण्याला जाणीवपूर्वक मारणार नाही. सशाला जेव्हा अतिशय वेदना होतात तेव्हा तो लहान मुलासारखा रडतो.' [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी*, *कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १७ मधे उद्धृत (तिरपी अक्षरं माझी)]

त्यांचा मिताहार आणि त्यांनी केलेला मांसाहाराचा त्याग हे नकारार्थी जीवनातील वैराग्य नव्हतं तर उच्च दर्जाच्या सौंदर्यविषयक जाणिवेमुळं निसर्गाशी झालेल्या तादात्म्याचा तो परिणाम होता. त्यांनी साधेपणानं राहायचा निर्णय घेतला कारण त्यांना अधिक सखोलपणे जीवनरसपान करायचं होतं. 'ज्या कोणाला आपल्या अन्नाची खरी चव माहीत असते तो कधीच खादाड असू शकत नाही, ज्याला ती माहीत नसते तो तसा असू शकेल.... माणसाच्या तोंडातून जे अन्न आत जातं त्यामुळे माणसाचं पावित्र्य नष्ट होत नाही तर.... ज्या प्रकारच्या भुकेनं तो खातो त्यामुळे ते नष्ट होतं. अन्नाचा दर्जा व प्रमाण यांना महत्त्व नसतं तर इंद्रियांना त्याची जी चव येते त्यावर ते अवलंबून असतं. आपण जे काही मिष्टान्न खातो ते आपला देह जगवण्यासाठी खात नाही, वा आपल्या आध्यात्मिक जीवनाला प्रेरणा मिळावी म्हणून खात नाही, तर केवळ आपल्यामध्ये वास करणाऱ्या किड्यासाठी खातो. त्यामुळे आपण स्खलित होतो.

याच दृष्टीनं आपली विचारसरणी पुढं लांबवत ते म्हणतात की माणसानं इतर प्राण्यांची शिकार करत जगावं हे माणसाच्या उच्च प्रतिष्ठेला धरून नाही. हे खरं आहे की एकेकाळी माणसं तशी जगत होती. *परंतु हा शोचनीय मार्ग आहे. .... जोपर्यंत आपण वेगळ्या मार्गाचा अवलंब करत नाही तोपर्यंत आपण सुसंस्कृत होऊ शकत नाही. आणि.... जो माणूस आपल्या समाजाला अधिक निरपराधी आणि परिपूर्ण जेवण घेणं शिकवील तो आपल्या समाजाचा उद्धार करणारा आहे असं गणलं जाईल. माझ्या सवयी कोणत्याही असल्या तरी, मला शंका नाही की मानवी समाजाच्या भवितव्याचाच तो भाग आहे. ज्याप्रमाणे माणसांच्या रानटी टोळ्यांनी अधिक सुसंस्कृत माणसांच्या संपर्कात आल्यानंतर एकमेकांना खाणं सोडलं त्याप्रमाणे हळूहळू होणाऱ्या उन्नतीत माणसाला प्राणी खाणं सोडावं लागेल.* [एम. के. गांधी, *फ्रॉम द लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १९ मधे उद्धृत]

त्यांना वाचनाचं वेड होतं आणि ते सर्व प्रकारचं वाचन मोकळ्या मनानं करत असत व कोणत्याही भागातून आलेलं ज्ञान स्वीकारायची त्यांची तयारी असायची. भारतात प्रसिद्ध असलेल्या बिशप रेगिनॉल्ड हेबर यांच्या पुतण्याशी कॉलमॉन्डेले या इंग्रेज गृहस्थाची १८५४

साली भेट झाली. काँकॉर्डला भेट दिल्यानंतर त्यांनी अभिजात भारतीय साहित्याची ४४ पुस्तकं थोरोंना पाठवली. ती त्यावेळी अमेरिकेत मिळणं जवळपास अशक्य होतं. त्यांनी भविष्यवाणी केली की 'तो दिवस मूल्यवान असेल ज्या दिवशी व्हॅटिकन हे वेद, झेंडअवस्ता आणि बायबलसारख्या ग्रंथांबरोबर होमर, डांटे आणि शेक्सपिअरच्या ग्रंथांनी भरलेलं असेल.... अशा प्रकारच्या थप्प्यांवर चढून आपण स्वर्गापर्यंत पोहोचण्याची अपेक्षा करू शकतो.' [एम. के. गांधी, *व्हाय ही वेंट टू इंग्लंड, द व्हेजिटेरीअन*, जून २०, १८९१] त्यांनी दिलेली घोषणा होती, 'पूर्वेकडे चला.'

त्यांच्या स्वतःच्या लेखनात भारतीय धर्मग्रंथातील व अभिजात साहित्यातील संदर्भ सतत येत असतात. अ *विक ऑन द कॉन्कॉर्ड अँड मर्विक रिव्हर*मधील *'मंडे'* ह्या लेखात भारतीय तत्त्वज्ञानावरील गीता महान काव्य आहे असा अतिशय आनंदानं उल्लेख केलेला आहे. 'पूर्वेकडील तत्त्वज्ञांचा तुलनात्मक विचार करता असं म्हणावं लागेल की अर्वाचीन युरोपनं तशा एकाही माणसाला जन्म दिलेला नाही. त्याशिवाय भगवद्‌गीतेतील व्यापक आणि विश्वाच्या आदिअंताचा अभ्यास करणाऱ्या तत्त्वज्ञांसमोर आमचा शेक्सपिअरदेखील काही वेळा अतिशय लहान आणि केवळ व्यावहारिक वाटतो. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४३]

*मनुस्मृतीचा* उल्लेख करताना ते *वाल्डेनमधे* लिहितात : 'हिंदूंचा .... कायदा सांगणारा कसं खावं ते शिकवतो.' पुन्हा याच पुस्तकात ते लिहितात : 'आपल्या पाळीव कोंबड्यांचं मूळ भारतातील रानटी तितर पक्ष्यात ज्याप्रमाणे आहे त्याचप्रमाणे आपल्या घरगुती विचारांसारखे विचारही तिथल्या तत्त्वज्ञांचे आहेत. अद्वैतवादाचा स्वीकार करून त्यांनी वेदांताच्या तत्त्वज्ञानाचा विकास केला. इंग्रज संशोधक रॉय वाकर यांनी थोरोवरील निबंधात दर्शवलं आहे की थोरोला कसं खावं यासंबंधीचं ज्ञान 'भारतीय धर्मग्रंथांच्या अभ्यासातून मिळालं यात कोणताही संशय नाही.... पूर्वेकडील धर्मग्रंथांच्या अभ्यासातून सर्व जीव एकच असल्याची जाणीव त्याच्यात निर्माण झाली व आशियाखंडातील अनेक लोकांच्या शाकाहाराच्या तत्त्वज्ञानामागे हाच नैतिक विचार आहे.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४३]

अमेरिकेतील शाकाहाराच्या चळवळीचा मागोवा घेतला तर तिचं श्रेय एका इंग्रज गृहस्थाकडे - रेव्हरंड विल्यम मेटकाफकडे - जातं. इंग्लंडमधील ब्रिटिश ख्रिश्चन चर्चशी संबंधित असलेले मेटकाफ, अजून एक धर्मगुरू आणि ३९ शाकाहारी फादर हे सर्व यात्रेकरू अमेरिकेत १८१७ साली म्हणजे ज्या वर्षी थोरोचा जन्म झाला होता त्या वर्षी स्थानांतरित झाले. त्यांनी अमेरिकेत शाकाहारासंबंधी पहिला निबंध लिहिला व अमेरिकन शाकाहारी सोसायटीची स्थापना केली. तिचे ते शेवटपर्यंत अध्यक्ष होते. त्याचबरोबर त्यांनी *द अमेरिकन व्हेजिटेरिअन*चं संपादनही केलं. *ॲब्स्टिनन्स फ्रॉम द फ्लेश ऑफ ॲनिमल्स* या त्याच्या निबंधाबद्दल लोकांमध्ये फारशी उत्सुकता निर्माण झाली नाही. परंतु गरिबी आणि हेटाळणी यातूनही त्यानं १८३०पर्यंत तग धरला. अखेरीस त्या वर्षी त्यांनी सिल्व्हस्टर ग्रॅहम आणि डॉ. वुइल्यम ए. अल्कॉट यांना आपल्या विचारांकडे वळवलं. त्यांनी शाकाहार तसंच कर न भरणं याबाबतीत थोरोच्या आगमनाची त्यांनी पूर्वसूचना दिली. डॉ. अल्कॉट यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबाला १८३५ साली शाकाहाराकडे वळवलं. कॉंकॉर्डचे त्यांचे चुलतभाऊ ॲमोस ब्रॉनसम अल्कॉट यांची थोरोशी मैत्री झाली व त्यांनी थोरोसमोर स्वतःचा आदर्श ठेवला.

अमेरिकेतून शाकाहारी चळवळ वेगवेगळ्या ठिकाणी विविध प्रकारचं खतपाणी मिळून बरीच जोमदार होऊन इंग्लंडमध्ये परतली. तिथं तिला एडवर्ड कारपेंटर आणि हेन्री साल्ट, बर्नार्ड शॉ आणि हॉवर्ड विल्यम्स, एडवर्ड मेटलँड, ॲना किंग्जफोर्ड आणि ॲनी बेझंट यांच्यासारखे पुरस्कर्ते मिळाले.

## ३

इंग्लंडमधील शाकाहारी गट हा विविध रंगांचा होता. एडवर्ड कारपेंटर समाजवादी आणि मानवतावादी होते. तसंच हेन्री साल्टही. बर्नार्ड शॉ फेबिअन, ॲनी बेझंट थिऑसॉफिस्ट, हॉवर्ड वुइल्यम्स विवेकवादी आणि ॲना किंग्जफोर्ड व एडवर्ड मेटलँड हे गूढवादी होते.

इंग्लंडमधील या नवजीवनाचा मुख्य पुजारी एडवर्ड कारपेंटर होता. केम्ब्रीज येथील ट्रिनिटी हॉलचा तो माजी व्यवस्थापक व फेलो होता. तो आरमार प्रमुखाचा नातू आणि प्रसिद्ध बॅरिस्टरचा मुलगा होता. ब्राइटन येथील सुखवस्तू कुटुंबात त्यांचं पालनपोषण झालं होतं. ते ब्राइटनला गेले आणि कालांतरानं त्यांना तिथं नोकरीवरही घेण्यात आलं. परंतु तिथलं वातावरण त्याला भावलं नाही. वाल्ट व्हिटमनच्या कविता आणि थोरोचं वाल्डेन यांच्या प्रभावाखाली ते समाजवादाकडे ओढले गेले, त्यांनी चर्च सोडलं व विद्यापीठात ते बहिःशाल व्याख्याते झाले. त्या तणावानं त्यांची प्रकृती बिघडली व ते अमेरिकेत गेले. तिथं ते वाल्ट व्हिटमन, इमर्सन व त्यांच्या गटातील इतर लोकांना भेटले. त्यांनी तिथं व्याख्यात्याची नोकरी सोडली आणि ते जीवनातील प्रयोग करू लागले, त्यांनी मांसाहाराचा त्याग केला, चपला घालायला सुरुवात केली. त्या चपला त्याच्या विनंतीवरून त्यांना हॅरॉल्ड कॉक्स या इंग्रज मित्रानं, जे काही काळ अलिगढ येथील अँग्लो मॉहमेडन कॉलेजमध्ये होते, काश्मीरहून पाठवल्या. त्या ते विकू लागले व मिलथ्रॉप येथील खेड्यातील झोपडीत राहू लागले.

*भगवद्गीतेच्या* वाचनानं त्याच्या विचारसरणीवर सखोल परिणाम झाला. त्यातील आत्म्याच्या तत्त्वज्ञानात जीवनात सुसंवाद निर्माण करण्यासाठी आचरणात आणण्यासारख्या अनेक गोष्टी त्यांना आढळल्या. उदाहरणार्थ, क्रमाक्रमानं शासनविरहित समाजाची निर्मिती, सामुदायिक मालकी आणि भूमी आणि भांडवल यांचा सामुदायिक उपयोग, स्त्रियांचा उद्धार, स्त्री-पुरुष समता, कणखर साधेपणा. त्याचबरोबर साधी राहणी, प्राण्यांशी मैत्री, मोकळ्या हवेतील सवयी, फलाहार, व शक्य असेल त्या प्रमाणात नग्नता यांच्या अवलंबनाद्वारे निसर्ग व आपल्यामध्ये तसंच आपल्या मित्रांमध्ये उभ्या राहणाऱ्या गोष्टींना जीवनातून दूर करणं याही गोष्टींचं महत्त्व त्यांना जाणवलं. यापैकी कोणत्याही एका गोष्टीचं तिच्या सर्व परिणामांसह पालन करायचा प्रयत्न झाला तर 'आजच्या आपल्या अनेक संस्था मरण पावल्या असत्या. त्या सर्वांमुळे एवढी मोठी क्रांती झाली असती की तिला केवळ संस्कृतीची वाढ वा विकास असं म्हणाल्यामुळे त्यातून पुरेसा अर्थ व्यक्त झाला नसता.' [गांधीजींनी इंग्लंड प्रवासांच्या आपल्या रोजनिशीत लिहिलं आहे की ते साऊथहॅम्प्टन येथे शनिवार दि. २८ ऑक्टोबर १८८८ला पोहोचले होते. परंतु ऑक्टोबर २८, १८८८ला शनिवार येत नाही तर ती तारीख

रविवारी येते. आपल्या आत्मचरित्रात स्पष्टपणे ते सांगतात की साऊथहॅम्टनला ते शनिवारी पोहोचले आणि दुसऱ्या दिवशी रविवार असल्यामुळे त्याही दिवशी त्यांना त्यांचं सामान मिळणं शक्य नव्हतं. ज्याअर्थी दैनंदिनीतील नोंदीत सुसंबद्धता नाही त्याअर्थी पोहोचायचा दिवस त्यांना निश्चित आठवत असल्यामुळे तोच बरोबर आहे असं गृहीत धरायला हवं. तारखेबद्दल त्यांचा गोंधळ उडाला असावा. (पहा *'लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १ पृष्ठ ३)]

मानवजातीची मुक्ती केवळ जीवनशक्तीच्या परिपूर्णतेकडे परत गेल्यामुळेच होऊ शकते व ती परिपूर्णता संस्कृतीपूर्व माणसाकडेच होती अशी एडवर्ड कारपेंटर यांची अमेरिकेतील कॉन्कॉर्ड सर्कलप्रमाणेच श्रद्धा होती. सिलोन आणि भारताला भेट दिल्यानंतर ते गूढवादात रस घेऊ लागले.

१८८७ साली कारपेंटरनी शेफिल्ड सोशलिस्ट ग्रुपची स्थापना केली. या गटाशी संबंध असणारात हिंडमन, क्रोपाटकीन, मिस ॲनी बेझंट ही मंडळी होती. गमतीत त्यांना 'तऱ्हेवाईकांचा समूह' असं संबोधण्यात येत असे. ते व्याख्यानं आयोजित करायचे, भाषणं द्यायचे, परिपत्रकं छापायचे, व रस्त्याच्या कोपऱ्यावर सभा घ्यायचे. त्यामुळे अनेकदा पोलिसाशी त्यांची झटापटही व्हायची. त्यांनी स्कॉटलंड स्ट्रीटवर मोठं घर आणि एक दुकानही भाड्यानं घेतलं होतं. हा भाग शहरातील गरीब वस्तीत येत होता. तिथं त्यांनी उपाहारगृह उघडलं. घराचा उपयोग कार्यकर्त्यांच्या सामूहिक उपयोगासाठी केला. तसंच त्या घरावर असलेल्या मोठ्या खोल्यांचा उपयोग व्याख्यानं, सभा व सर्व प्रकारच्या सामाजिक कामासाठी करण्यात यायचा. चहा आणि मनोरंजनाची साधनं कामावर असणाऱ्या व विशेषतः सामाजिक कार्यात मदत करणाऱ्या *कॉम्रेड्सच्या* मुलांना, बायकांना, बहिणींना पुरवण्यात यायची. *सिव्हिलायझेशन, इट्स कॉज अँड क्युअर* हा फेबिअन सोसायटीसमोर त्यांनी वाचलेला निबंध बर्नार्ड शॉ आणि वेब्जला आवडला नाही कारण सुरुवातीच्या फेबिअन लोकांना 'निसर्गाविषयीच्या तऱ्हेवाईक सिद्धान्तात' रस नव्हता. त्यांना केवळ आर्थिक विषयांपर्यंत स्वतःला मर्यादित ठेवायचं होतं. परंतु त्यांनी विज्ञानाच्या यशाबद्दल केलेली चिकित्सा आणि निसर्गाशी जवळीक असणाऱ्या नवसमाजरचनेसाठी केलेल्या आवाहनाचा गांधीजींच्या हृदयाला खोलवर स्पर्श केला.

गांधीजींनी *हिंद स्वराजमध्ये* या निबंधाचा उल्लेख करून या विषयावरील तो एक अधिकारी प्रबंध असल्याचं सांगितलं आहे.

१९१४ साली कारपेंटर जेव्हा सत्तर वर्षांचे झाले तेव्हा जगभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. त्यांना मिळालेल्या अभिनंदन पत्रात एक पत्र रविन्द्रनाथ टागोर यांचंही होत. ते १८२९ साली वारले. त्यांच्या मृत्यूची बातमी गांधीजींना हेन्री साल्ट यांनी कळवली. [एम. के. गांधी, *लंडन डायरी, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १ पृष्ठ २१]

कारपेंटरपेक्षा काही वर्षांनी लहान असलेले हेन्री साल्ट यांचे वडील भारतीय सैन्यातील इंग्रज अधिकारी होते. त्यांना भारतीयांना निगर म्हणून संबोधायची सवय होती. त्यांचा जन्म भारतात नैनीतालमधे १८५१ साली झाला होता. त्यांचे आईवडील वेगळे झाल्यानंतर त्यांचा सांभाळ त्यांच्या आईनं केला होता. सामाजिक समतेसंबंधी त्या बाईंचे विचार परंपरागत होते.

तिच्या लहानग्या मुलानं तिला एके दिवशी विचारलं : 'काही लोक खूप श्रीमंत असतात तर काही गरीब असं का?'

ती उत्तरली : 'देवानं जगाची तशीच रचना केली आहे म्हणून. श्रीमंत शिल्लक टाकल्यामुळे श्रीमंत झाले तर गरीब दारू प्याल्यामुळे गरीब झाले.'

त्यांचे चरित्रलेखक विन्स्टन यांनी, लिहिलं आहे की मुलाला 'त्याच्या वयाची श्रीमंत मुलं बचत करताना फारशी दिसत नव्हती आणि पिणं हे काही गरिबांचंच वैशिष्ट्य नव्हतं.' [एच. डब्ल्यू. नेव्हिन्सन : *द इंग्लिश*, प्रकरण ५, *'द अपर क्लास : द प्रोफेशनल्स.'*] मानवतावाद त्यांच्या अणुरेणूत भरलेला होता.

इटन हाऊसमास्टर यांचा जॉन जॉईन्स मुलगा होता. ते केम्ब्रीजमधे स्विनबर्नचे शिक्षक होते. त्यांच्या प्रभावामुळे हेन्री साल्ट समाजवादाकडे खेचले गेले. केम्ब्रीजमधील अतिशय उत्तम कारकिर्दीनंतर इटन येथील त्यांच्या मुख्याध्यापकांनी केलेल्या विनंतीनुसार इटन येथे ते शिकवायला आले. परंतु साल्टनी शाकाहाराचा स्वीकार केला तेव्हा त्यांना इटन सोडायला सांगण्यात आलं असं साल्ट यांनी लंडन व्हेजीटेरीअनच्या सभेत सांगितलं. त्या सभेत गांधीजी

उपस्थित होते. माणूस जर साधी राहणी स्वीकारील तर तो वार्षिक १६० पौंडमध्ये राहू शकतो हे एडवर्ड कारपेंटर यांचं विधान त्यांनी वाचलं. कारपेंटरनी इटनची पायाला लागलेली धूळ पुसली, आपल्या मित्राच्या बहिणीशी केट जॉइन्सशी लग्न केलं आणि ते दोघं तिलफोर्ड येथे झोपडीत साधेपणानं राहू लागले. कारपेंटरप्रमाणेच तेही चपला वापरत असत आणि स्वतःचं घरकाम स्वतः करत असत. चपला या 'स्वातंत्र्याच्या प्रतीक' होत्या. त्या घालून फिरताना त्यांना आपण 'पवित्र भूमीवरून फिरत असल्यासारखं' वाटायचं.

निसर्गप्रेम आणि उदारमतवाद याशिवाय साल्ट यांना सामाजिक सुधारणांची ओढ होती. एडवर्ड मेटलँड आणि हॉवर्ड विल्यम्स यांच्या सहकार्यानं त्यांनी ह्युमॅनेटरीअन लीगची स्थापना केली. या लीगला इतर अनेकांबरोबरच ॲनी बेझंट आणि सिडनी ऑलीव्हर यांचा पाठिंबा होता आणि खेळासाठी प्राण्यांची हत्या करणं, वैद्यकीय अभ्यासासाठी प्राण्यांची चिरफाड करणं वा दुकानात त्यांना अमानुष वातावरणात ठेवणं, कारखाने, तुरुंग आणि इतर सामाजिक दोष या सर्वांविरुद्ध पत्रकं लिहून त्यांनी मोहीम उघडली. त्यांनी शाकाहारवादावर लिहिलेल्या पुस्तकानं त्यांना अनेक अभिनंदनपर पत्रं आली. त्यातील एक काऊंट लिओ टॉलस्टॉय यांचंही होतं. गांधीजींवर या पुस्तकाचा अतिशय प्रभाव पडला. बर्नार्ड शॉ, सिडनी ऑलीव्हर आणि रॅम्से मॅकडोनाल्ड यांचे साल्ट घनिष्ट मित्र होते. त्यांच्याप्रमाणे कारपेंटरनी शाकाहार आणि मानवतावाद याबद्दल कुणाशीही तडजोड केली नाही. विसाव्या शतकात आठव्या दशकात जो केवळ एक मुलगा होता व जो आता महात्मा झाला होता त्याच्या प्रगतीचा उंच चढत जाणारा आलेख एक सहशाकाहारी म्हणून साल्ट वाढत्या उत्सुकतेनं आणि अभिमानानं न्याहाळत होते. नंतर बर्नार्ड शॉ, सिडनी ऑलीव्हर आणि रॅम्से मॅकडोनाल्ड ही मंडळी जेव्हा उच्च पदावर पोहोचली आणि गांधीजी आपल्या स्वतःच्या देशातील एक शक्ती झाले तेव्हा साल्ट हे त्यांना जोडणाऱ्या कडीसारखे झाले.

नवयुगाच्या निर्मितीसाठी धडपड करणाऱ्या संघटनांत हरमेटिक सोसायटीचं स्वतःचं असं एक आगळंच स्थान होतं. तिच्यात खरोखरी दोनच माणसं होती. एडवर्ड मेटलँड आणि ॲना

किंग्जफोर्ड. एकेकाळचे केप कॉलनीचे राज्यपाल सर पेरिग्रीन मेटलँड हे एडवर्ड मेटलँडचे वडील होते. एडवर्ड मेटलँड यांचा जन्म १८२४ साली झाला होता. १८४७ साली केम्ब्रीजमधून पदवीधर झाल्यानंतर ते कॅलीफोर्नियात आणि तेथून ऑस्ट्रेलियात गेले. तिथं ते सम्राटांच्या जमिनीचे आयुक्त झाले. ते शांत स्वभावाचे आणि बुद्धिमान गृहस्थ होते. त्यांना मूलभूत विचार करण्याची क्षमता आणि समयसूचकता यांची देणगी मिळालेली होती. विज्ञान आणि वाङ्मयाचं त्यांचं वाचन सखोल होतं. त्यांनी तीन कादंबऱ्या लिहिल्या.

अॅना किंग्जफोर्ड याच्या संपर्कात आणणारी यातीलच एक कादंबरी होती *बाय अँड बाय.* ही कादंबरी मांसाहाराचा आणि प्राण्यांच्या चिरफाडीला विरोध करणारी होती. उंच, सडपातळ व डौलदार बांधा, पॅरीसमधील शाळेतून मिळवलेलं वैद्यकीय शिक्षण, ग्रीक आणि लॅटीनचं उत्तम ज्ञान व श्रेष्ठ दर्जाची साहित्यिक क्षमता हे अॅना किंग्जफोर्ड यांचे गुण होते. मेटलँडप्रमाणेच त्याही गूढवादी होत्या. त्यांचा मृत्यू होईपर्यंत १४ वर्षे त्यांनी शाकाहाराच्या पुरस्कारासाठी आणि प्राण्यांच्या चिरफाडीला विरोध करण्यासाठी सातत्यानं लढा दिला. त्याशिवाय त्यांनी अनेक पुस्तकं प्रकाशित केली. त्यात *द परफेक्ट वे*, *क्लोद्‍ड वुइथ द सन*, *द व्हर्जिन ऑफ द वर्ल्ड* या पुस्तकांचा समावेश होता. त्यांचा शाकाहारवाद हा त्यांच्या गूढवादाचा एक भाग होता. मोहनदास गांधींवर लंडनमधील विद्यार्थीदशेत शाकाहाराचा पुरस्कार करणाऱ्या ज्या पुस्तकांनी प्रभाव टाकला त्यात अॅना किंग्जफोर्डचं *द परफेक्ट वे इन डायट* हे एक पुस्तक होतं.

अॅना किंग्जफोर्डचा १८८८ साली मृत्यू झाल्यानंतर मेटलँडनी *द न्यू गॉस्पेल ऑफ इंटरप्रिटेशनसह* अनेक पुस्तकं लिहिली. *द न्यू गॉस्पेल ऑफ इंटरप्रिटेशन* या पुस्तकात मेटकाफनी आपल्याला अॅनापासून प्रेरणा मिळाल्याचं सांगितलं आहे. १८९१ साली 'प्रेमाएवढा उंच कोणताच धर्म नाही हे घोषवाक्य असलेल्या एसोटेरिक ख्रिश्चन युनियनची त्यांनी स्थापना केली. या युनियनचं वा ब्रदरहुडचं ध्येय अस्तित्वाच्या परिपूर्ण सिद्धान्ताचं आणि जीवनाच्या नियमांचा प्रसार करणं हे होतं. मुळात ही युनियन *द चर्च सेलेस्टिअल* म्हणून काम करायची पण नंतर द चर्च टेरिस्ट्रीयल याच नावानं ती ओळखली जाऊ लागली. नंतर दक्षिण आफ्रिकेत

मोहनदास एम. के. गांधी, अटर्नी म्हणून एसोटेरिक ख्रिश्चन ब्रदरहुडच्या संपर्कात आले व त्यांना तिच्या कामात रस वाटू लागला. परंतु त्याविषयी नंतर.

## ४

फॅरींग्टन स्ट्रीटवरील ज्या शाकाहारी उपाहारगृहात मोहन वारंवार जायचा त्याचं मुख्य आकर्षण होतं दुपारचा चहा आणि प्रसिद्ध व्यक्ती. विन्स्टन लिहितात की चहाच्या वेळी प्रसिद्ध लोकांना केक खाताना आणि बोलत असताना पाहण्यासाठी लोक मैलोगणती पायी चालत जात असत. साल्ट अशाप्रकारच्या चहापार्टीचं आयोजन करत असत.

*आणि अगदी सुरुवातीच्या दिवसात एक भारतीय सिल्कचा टोप व काळा कोट घालून आत येत असे.... अतिशय प्रेमळ आणि बोलक्या लोकांजवळ तो बसत असे आणि मला नृत्याचं शिक्षण कुठं मिळू शकेल याची चौकशी करत असे.... साल्ट स्वतःच प्रेमळ आणि समजून घेणारे होते. 'माझं नाव गांधी आहे', त्यानं त्यांना सांगितलं. 'तुम्ही अर्थातच ते ऐकलेलं नसणार.' साल्टनी संभाव्य नवीन सदस्याची नोंद घेतली. वर्षं लोटली आणि नाव विस्मृतीत गेलं.* [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४४]

परंतु सिल्कचा टोप आणि काळा कोट घातलेला तो भारतीय काहीच विसरलेला नव्हता. त्याच्याकडे कुणाचं लक्ष वेधलं गेलं नव्हतं पण तो मात्र सर्व काही बारकाईनं पाहत होता. त्याचे शाकाहारी सहकारी टेबलवर काय करत आहेत याची त्याच्या मनानं सूक्ष्म नोंद घेतलेली होती. अनेक वर्षांनंतर लंडनमधील शाकाहारी लोकांच्या सभेसमोर भाषण करताना गांधीजी म्हणतात : 'त्यांना खाणं आणि रोग याशिवाय बोलायची सवय नव्हती. हे काम करायचा हा सर्वात वाईट प्रकार होता.' त्याच्या नंतर लक्षात आलं की जे लोक कोणत्यातरी रोगानं पीडित असतात आणि त्यामुळे शाकाहाराकडे वळतात त्यांना शाकाहारावर टिकून राहणं कठीण जातं. ते अन्नाचं अकारण स्तोम माजवतात. त्यांच्यातील अनेकांना वाटत होतं की शाकाहाराकडे वळल्यामुळे आपण हवे तेवढे लेंटिल, फरसाच्या बिया आणि चीज वगैरे खाऊ शकतो.' त्यांची प्रकृती चांगली

राहू शकत नाही यात काही आश्चर्य नाही. प्रकृती चांगली ठेवण्यासाठी माणसाला 'हात राखून खावं लागत असतं व मधून मधून उपास करावा लागत असतो. कोणताच माणूस वा बाई खरोखरी तेवढंच खात नाही.... जेवढ्याची शरीराला आवश्यकता असते.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४५]

इथंच गांधीजींना मॅन्चेस्टर येथे अस्तित्वात असलेल्या *व्हेजिटेरीअन सोसोयटीची* माहिती कळली. परंतु अधूनमधून त्यांचं नियतकालिक *व्हेजिटेरीअन मेसेंजर* वाचण्यापेक्षा त्यांनी त्यात बराच काळ विशेष असा रस काही घेतला नाही. १८९०च्या सुरुवातीस त्यांना 'लंडन व्हेजिटेरीअन सोसायटी'च्या *द व्हेजिटेरीअन*ची माहिती कळली. जोशिआ ओल्डफिल्ड *द व्हेजिटेरीअनचे* संपादक होते. त्या वर्षाच्या दुसऱ्या अर्धात ते डॉ. ओल्डफिल्ड यांना भेटले. त्या दोघांशीही मैत्री असलेल्या डॉ. पी. जे. मेहता यांच्याकडून डॉ. ओल्डफिल्ड यांना गांधीजींच्या तिहेरी शपथेची हकीगत कळलेली होती आणि एक सहशाकाहारी म्हणून ते गांधीजींकडे आकर्षित झाले होते. वर उल्लेखिलेल्या परिषदेत उपस्थित राहण्यासाठी त्यांनीच गांधीजींना प्रवृत्त केलं होतं. अशा रीतीनं या ओळखीचं रूपांतर आयुष्यभराच्या मैत्रीत झालं.

१८९० साली मोहनला लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीचं सदस्य करून घेण्यात आलं. त्यानं सोसायटीच्या नियतकालिकाची वर्गणी भरून ते घ्यायला सुरुवात केली आणि शाकाहाराच्या चळवळीत तो सक्रिय सहभाग घेऊ लागला. साल्ट आणि ॲना किंग्जफोर्डच्या पुस्तकांशिवाय त्यानं हॉवर्ड विल्यम्सचं *इथिक्स ऑफ डायट* हे पुस्तक आणि आरोग्य आणि आरोग्यशास्त्रावरील डॉ. टी. ए. ॲलिन्सन यांचे लेख वाचले. डॉ. टी. ए. ॲलिन्सन हे मोकळ्या हवेतील जीवनाचे पुरस्कर्ते होते आणि प्रकृतीच्या सुधारणेसाठी ते खाण्यापिण्याच्या सवयींमधे योग्य बदल करायच्या आवश्यकतेचा पुरस्कार करणारे होते. ते आपल्या रुग्णांना काटेकोरपणे शाकाहारी जेवण घ्यायला सांगत.

स्वभावाची योग्य पारख असलेले आणि आणि एकप्रकारे ध्येयाला वाहून घेणारे डॉ. ओल्डफिल्ड यांना त्या लाजऱ्या, न्यूनगंड असलेल्या, यःकश्चित अंगकाठीच्या व्हेजिटेरीअन

सोसायटीच्या नवीन सदस्यात चिकाटी, इच्छाशक्ती आणि ध्येयनिष्ठा या गुणांचा सामान्यपणे जसा कुठेही आढळ होत नाही तसा आढळ झाला. शाकाहाराच्या चळवळीसाठी एवढा मोठा मासा क्वचितच गवसण्याची शक्यता होती. १९ सेप्टेंबर १८९०ला त्यांनी त्याची निवड लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीच्या कार्यकारी मंडळावर करून घेतली. मोहन कार्यकारी मंडळाच्या सभांना ३ ऑक्टोबर आणि ३१ ऑक्टोबरला उपस्थित राहिला परंतु तिथल्या इतिवृत्ताप्रमाणे नैतिक प्रश्न उपस्थित होऊन त्याचा धक्का लागून जाग येईपर्यंत म्हणजे फेब्रुवारीपर्यंत त्यानं सभेच्या कामकाजात कोणताच भाग घेतला नाही. याचा अर्थ असा नाही की त्याला कधीच बोलायचा मोह झाला नव्हता, परंतु आपलं म्हणणं कसं मांडावं हे त्याला कळत नसे. 'सभेतील सर्व सदस्यांना माझ्यापेक्षा उत्तम माहिती असल्याचं आढळायचं. मग केव्हा केव्हा मी जेव्हा बोलायची मानसिक तयारी करत असे तोपर्यंत नवीन विषय सुरू झालेला असायचा. असं बरेच दिवस सुरू राहिलं.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४६]

व्हेजिटेरीअन सोसायटीच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य म्हणून तो 'शाकाहाराच्या सर्व आधारस्तंभांच्या' संपर्कात आला. शाकाहारावरील सर्व साहित्य वाचून त्याच्या मनात आहारशास्त्राबद्दल उत्सुकता निर्माण झाली व त्यासंबंधी त्यानं स्वतःवरच प्रयोग करायला सुरुवात केली. एकदा त्यानं केवळ ब्रेड आणि फळांवरच राहायचा प्रयत्न केला. त्यानं घरून मिठाया आणि इतर खाद्यपदार्थ बोलावणं बंद केलं आणि साधा, मितव्ययी, मसाले वगैरे न घातलेला आहार घ्यायला सुरुवात केली. मसाले वगैरे न घालता केवळ उकडून शिजवलेल्या भाज्या खाणं आधी त्याला शक्य होत नसे. परंतु दृष्टिकोन बदलल्यानंतर त्याच भाज्या आपण चवीनं खाऊ शकतो हे पाहून त्याला सुखद आश्चर्याचा धक्का बसला. 'अशा प्रकारच्या अनेक प्रयोगांनी मला शिकवलं की चवीची खरी जागा जिभेत नसून मनात आहे' असं गांधीजी यासंबंधी म्हणाले होते. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४६]

नुकत्याच जन्माला आलेल्या कोणत्याही ध्येयवादी चळवळीत उत्साही, छांदिष्ट आणि तऱ्हेवाईक लोकांचा सहभाग असतो. इंग्लंडमधील शाकाहारी चळवळही याला अपवाद नव्हती.

तिथं शाकाहारी लोकातही अनेक पंथ होते. एक पंथ मांसाची व्याख्या पक्ष्यांचं आणि जंगली प्राण्यांचं मांस अशीच करायचा. ते मासे आणि अंडी यांना शाकाहाराचा भागच समजायचे. दुसरा पंथ मांसात सर्व जिवंत प्राण्यांच्या मांसाचा समावेश करायचा. त्यांनी आपल्या आहारातून मासे वगळले. त्यांच्या शाकाहाराचा अर्थ होता 'भाअंदू' "(vab)" म्हणजे भाज्या, अंडी आणि दूध. लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीच्या व्याख्येप्रमाणे केवळ तोच शाकाहारी असू शकत होता जो 'भूमातेनं प्रेमानं दिलेल्या फळांवर, पाळीव पक्ष्यांच्या फळांवर म्हणजे अंड्यावर, गुराढोरांच्या फळांवर म्हणजे दुधावरच' राहतो. अजून काहींनी मांसाच्या व्याख्येत सर्व जिवंत प्राण्याचा तर समावेश केलाच पण त्याचबरोबर त्याच्यापासून मिळणाऱ्या उत्पादनांचा म्हणजे दूध, तूप, लोणी, चीज वगैरेंचाही समावेश केला, मांस, मासे अंडी यांची तर गोष्टच सोडा.

आहारातील सुधारणासंबंधी लेखन करणारे काही शाकाहाराचे पुरस्कर्ते लेखक आहारात पिष्टमय पदार्थ नसण्यावर अतिशय भर द्यायचे तर साल्टसारख्या काही लोकांना त्यांचं हे म्हणणं अस्थानी आहे असं वाटायचं. जे लोक आहारातील पिष्टमय पदार्थांवर आक्षेप घेतात 'त्यांनी आधी आपल्या सदऱ्यात व कॉलरमधे किती खळ असते ते पाहावं' असं ते म्हणायचे. [जॉर्ज स्टीड व्हिच : *एम्पायर अँड डेमॉक्रसी* (१८९७-१९१३) टी. सी. अँड आर. सी. जॅक, एडिम्बरो, पृष्ठ ७१] पिष्टमय पदार्थाशिवायच्या आहाराचे पुरस्कर्ते अंडी, दूध आणि चीजच्या पथ्याचा पुरस्कार करायचे. त्यांचा युक्तिवाद होता की अंडी मांस नाहीत कारण ती खाल्ल्यामुळे कोणत्याही जिवंत प्राण्याला इजा पोहोचत नाही. डॉ. ओल्डफिल्डच्या सल्ल्यानुसार मोहननं पिष्टमय पदार्थाशिवायच्या आहारासाठी अंड्यांचा प्रयोग सुरू केला. त्यानं स्वतःलाच समजावण्याचा प्रयत्न केला की मांसाहारापासून दूर राहायच्या शपथेचा हा भंग नाही. परंतु त्याचा विवेक त्याला टोचत होता. त्याच्या आईनं इंग्लंडला जायची परवानगी देताना त्याला घातलेल्या शपथेचा असा अर्थ निश्चितच नव्हता. त्यानं अंडी सोडली. हा प्रयोग जवळपास दीड महिने चालला होता. त्याच्या अनुभवानं त्याला शिकवलं की 'शपथ घालणारा पक्ष ज्या अर्थानं शपथ घालतो त्याच अर्थानं प्रामाणिकपणे शपथेचं पालन करणं' हाच 'सोनेरी नियम' आहे. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ४९] त्यापेक्षा वेगळ्या मार्गानं

जाणं म्हणजे स्वतःची फसवणूक करण्यासाठी पळवाट शोधणं व असत्याचरण करून शपथभंग करणं होईल.

अंडी सोडणं सुरुवातीला काही दिवस त्रासदायक झालं कारण अंड्यांचे काही पदार्थ त्याला आवडू लागले होते. परंतु ही अडचण अखेरीस तत्कालीन ठरली. 'शपथेचं काटेकोरपणे पालन केल्यामुळे जी चव चाखायला मिळाली होती त्यापासून मिळणारं आत्मिक समाधान स्पष्टपणे कितीतरी आरोग्यदायी, नाजूक आणि कायम टिकणारं होतं.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ५०]

काही लेखकांनी चहा आणि कॉफी आरोग्यासाठी घातक असल्याचं दाखवून कोकोचा पुरस्कार केला होता. त्यामुळे त्यानं चहा कॉफी सोडून त्याऐवजी कोको घ्यायला सुरुवात केली. अनेक वर्षांनंतर त्याला कळलं की कोकोचं उत्पादन 'गुलामांच्या श्रमा'नं करण्यात येतं. त्यानंतर त्यानं कोको घेणंही बंद केलं. परंतु काही दिवस आहारतील त्याचे प्रयोग आर्थिक आणि आरोग्यविषयक प्रश्नांवर आधारित होते. हा आधार बळकट नव्हता. लवकरच त्यानं चहा घ्यायला सुरुवात केली.

त्याला आढळलं की शाकाहारातील प्रयोग करणाऱ्या अनेकांचाही असाच अनुभव आहे. थोरो आणि एडवर्ड कारपेंटर यांनी मांसाहारबद्दल कठोर धोरण अवलंबिलं नव्हतं. या मुख्य पुजाऱ्यानी पाडलेल्या पायंड्यानुसार इंग्लंडमधील शाकाहारी चळवळ जर व्यक्तिगत विचारांवर आधारित नसेल तर मुख्यत्वेकरून ती व्यावहारिक पायावर आधारित असायची. त्यामुळे त्या चळवळीत जोम नव्हता. नोव्हेंबर १०, १९३१ला लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीत शाकाहारी लोकांच्या सभेसमोर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना गांधीजींनी शाकाहारी लोकांसमोर नैतिक आदर्श असा मांडला : शाकाहाराच्या विचारानं फारशी प्रगती केली नाही कारण त्याचा अवलंबच दुबळा होता. त्यांचा अवलंब दुबळा होता कारण त्यांचा पाया अर्धवट होता. शाकाहारावर अटळ राहण्यासाठी माणसाला नैतिक अधिष्ठानाची गरज असते:

*'माझ्या सत्याच्या शोधात तो फार मोठा शोध होता. .... माझ्या लक्षात आलं की स्वार्थाचा पाया माणसाला विकासक्रमात उच्च आणि उच्चतम पातळीवर नेण्यासाठी मदत करू शकत नाही. त्यासाठी निस्वार्थी हेतूंची आवश्यकता असते.'* [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ५२] त्याच्या लक्षात आलं की आरोग्याची ठेकेदारी काही शाकाहारी लोकांनीच घेतलेली नाही. 'मांसाहारी लोकांचीही सामान्यपणे उत्तम प्रकृती असल्याचे आढळते.' शाकाहारी लोकांनी सहनशील असायला हवं, थोडं सौजन्यानं वागायला हवं आणि ज्या लोकांचे दृष्टिकोन भिन्न आहेत त्या लोकांना जर शाकाहाराकडे वळवायचं असेल तर त्यांच्या नैतिक भावनेला आवाहन करायला हवं.

*'गायी आणि बैलही शाकाहारी असल्याचं आपल्याला आढळतं - ते आपल्यापेक्षाही चांगले शाकाहारी आहेत - परंतु असं काही तरी अतिशय उच्च आहे की जे आपल्याला शाकाहाराचं आवाहन करते.... माणूस मांसापेक्षा काहीतरी अधिक आहे. ज्याची आपल्याला चिंता असते तो आत्मा आहे. त्यामुळे शाकाहारी माणसाला त्याचं नैतिक अधिष्ठान असायला हवं - माणूस हा काही मांसभक्षक प्राणी म्हणून जन्माला आलेला नाही. भूमातेनं निर्माण केलेल्या फळांवर आणि कंदमुळांवर जगण्यासाठी तो जन्माला आलेला आहे.... त्यामुळे मला वाटतं की शाकाहाराच्या तत्त्वज्ञानानं शाकाहाराचा शारीरिक स्वास्थ्यावर होणाऱ्या परिणामांवर भर न देता नैतिक परिणामांचा शोध घ्यायला हवा.'* [एम. के. गांधीज लेटर टू मि. लेली, दिनांक डिसेंबर १८८८]

जो माणूस आजारी पडल्यानंतर डॉक्टरांनी गायीच्या सूपाचं पथ्य सांगितल्यानंतरही आपल्या शाकाहाराला चिकटून राहू शकत नाही तो माणूस शाकाहारी असू शकत नाही. शाकाहारी माणसाची घडण काही करारीपणाच्या तत्त्वांनी व्हायला हवी. 'जर कोणी मला सांगितलं की मी गायीचं सूप वा शेळीचं मांस खाल्लं नाही तर मी मरेन तर मी मरणं पसंत करीन. माझ्या शाकाहारवादाचा हा पाया आहे.' [एम. के. गांधीज लेटर टू कॉलनल जे. डब्ल्यू. वॅटसन दिनांक डिसेंबर १८८८]

५

अठराव्या शतकाच्या आठव्या दशकात इंग्लंडचं वातावरण साध्या राहणीच्या विचारांनी भारलेलं होतं. आपल्या वर्तुळात इंग्लंडचे थोरो म्हणून ओळखले जात असलेले एडवर्ड कार्पेंटरनी सांगितलं की संपत्ती गोळा करायचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग आहे भरपूर पैसा गोळा करायचा. किती कमी गोष्टींशिवाय आपण भागवू शकतो याचा विचार करून त्यानुसार आपल्या गरजा कमी करणं हा दुसरा मार्ग आहे. त्यांच्या लेखनाच्या प्रभावानं इंग्लंडमध्ये अमेरिकेतील ब्रूक फार्मच्या धर्तीवर सामुदायिक शेतीवर राहणाऱ्या अनेक वस्त्या वसवण्यात आल्या. त्यांना अपयश आलं. परंतु साध्या राहणीचा पंथ मात्र टिकून राहिला. उत्साही तरुण आपल्या सुरक्षित नोकऱ्या सोडून शारीरिक श्रम करून निसर्गाच्या सानिध्यात राहू लागले.

निसर्गवाद्यांच्या या चळवळीशिवाय काही असेही लोक होते की ज्यांनी काटकसरीसाठी साध्या राहणीचा अवलंब केला होता. काही आयरीश सांसद लंडनमध्ये आठवड्याला एका पौंडात राहत. त्यातील एक प्रसिद्ध पार्नेलाईट जो बिगर हे होते. त्याशिवायही काही लोकांनी साध्या राहणीचा स्वीकार केला कारण ते मानवतावादासाठी गरिबांची जी सेवा करायचे त्यासाठी त्यांना स्वतःच्या सुखसोयी कमी करणं व स्वार्थत्याग करणं आवश्यक होतं.

त्यापैकी चार्ल्स बॅडला एक होते. एका आठवड्याला १० शिलींगावर राहून त्यांनी पुस्तकं सोडून सर्व सामान विकून टाकलं. यात 'त्यांनी अत्यंत कष्टानं मिळवलेलं घर, फर्निचर आणि ज्याला त्यांनी मदत केलेली होती त्या कृतज्ञ मित्रानं दिलेली हिऱ्याची अंगठी' यांचाही समावेश होता. ते ज्या प्रकारचं जीवन जगत होते ते सहन न झाल्यानं त्यांची बायको आपल्या कुटुंबाबरोबर खेड्यात राहायला गेली होती. ते टर्नर स्ट्रीटवरील दोन खोल्यात राहायचे व त्यासाठी दर आठवड्याला १३ शिलींग ६ पेन्स भाडं द्यायचे.

कार्डिनल मॅनिंग हे खाण्यावर दर आठवड्याला ९ शिलींगपेक्षा अधिक खर्च करत नसत. *हाऊ टू लिव्ह ऑन वन पौंड अ वुइक* या नावाचं त्याच काळात एक पुस्तक प्रकाशित झालं होतं. डॉ. निकोल्स हे अमेरिकन गृहस्थ प्रौढावस्थेत असताना इंग्लंडमध्ये स्थानांतरित झाले होते.

*ईटिंग टू लीव्ह, द डायट क्युअर* (१८७७), डॉ. निकोल्स' *पेनी व्हेजिटेरीअन कुकरी* (१८८४) आणि *हेल्थ मॅन्युअल* (१८८७) इत्यादी पुस्तकं त्यांनी लिहिली होती. ते आपल्या खाण्यावर आठवड्याला केवळ ३ शिलींग ६ पेन्सच खर्च करायचे. १८७९ साली त्यांनी *हाऊ टू लिव्ह ऑन सिक्स पेन्स अ डे* हे पुस्तक लिहिलं होतं.

एका भारतीय सदगृहस्थानी आपल्या खाण्यावर आठवड्याला एक शिलींगच खर्च करायचं ठरवलं होतं. त्यांनी त्या विषयावर एक पुस्तकही लिहिलं होतं. गांधीजी इंग्लंडमध्ये असताना पंजाबमधील एक न्यायाधीश सुटी घेऊन बॅरिस्टरीचा अभ्यास करायला इंग्लंडमध्ये आले होते. ते इंग्लंडमधे दरमहा ५० रुपयांवर राहायचे. त्यांनी आपल्या मुलालाही आपल्या बरोबर आणलं होतं. आपल्या १५० रुपये मासिक उत्पन्नातून बायकोसाठी ते ५० रुपये पाठवायचे आणि ते आणि त्यांचा मुलगा दरमहा प्रत्येकी ५० रुपये म्हणजे ३ पौंड १ शिलींग ५ पेन्स खर्च करायचे. वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्लंडमधे गेलेले अजून एक गुजराथी गृहस्थ आठवड्याला १० शिलींगपेक्षा कमीवर राहायचे.

ही सर्व उदाहरणं डोळ्यासमोर असताना आणि नवजीवनाच्या प्रवर्तकांच्या तत्त्वज्ञानात त्यावेळी दैनंदिन चर्चेचा विषय शाकाहाराच्या माध्यमाद्वारे साधी राहणी हाच असल्यामुळे मोहनला आपल्या जीवनात अजून साधेपणा आणायची गरज वाटली. मॅट्रिकची परीक्षा झाल्यानंतर त्यानं ब्राईटन येथे जी चार आठवड्याची सुटी घालवली तिथं त्याला ही संधी मिळाली. त्यानं ठरवलं की खोली भाड्यानं घ्यायची, सकाळचा आणि सायंकाळचा स्वयंपाक स्वतःच करायचा आणि दुपारचं जेवण बाहेर घ्यायचं. सुट्यांमध्ये तो फारसा अभ्यास करणार नसल्यामुळे त्याला विश्रांती आणि नवजीवनाचे प्रयोग या दोन्ही गोष्टींसाठी वेळ मिळू शकणार होता.

परंतु ब्रायटन येथे कोणतीच घरमालकीण या अटीवर त्याला खोली भाड्यानं द्यायला तयार नव्हती. त्या सर्वांना भीती वाटत होती की त्यानं जर खोलीत स्वयंपाक केला तर खोली घाणेरडी होईल. त्यातील एक तर म्हणाली की 'मी तुला २० शिलींगलाही खोली देऊ शकत नाही.

संपूर्ण कार्पेट तेलानं घाणेरडी होईल आणि तुझ्यानंतर कोणीही या खोलीत राहायला तयार होणार नाही.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ५१] यावर गांधीजींनी तिला स्पष्ट आश्वासन देऊन सांगितलं की मला केवळ सोजी शिजवायची आणि दूध उकळायचं आहे व कार्पेट खराब झाल्यास मी तुम्हाला नुकसान भरपाई देईन. तेव्हा कुठं त्या बाईनं त्यांना दर आठवड्याला ८ शिलींग भाड्यानं खोली दिली.

खोलीत सामान ठेवून ऐकिवात असलेल्या शाकाहारी उपाहारगृहाच्या शोधात तो गेला. परंतु त्याला ते सापडलं नाही आणि कोणत्याही उपहारगृहाचा मालक त्याला भाज्यांचं सूप, फळं, ब्रेड व बटर यांचं जेवण एका शिलींगमधे पुरवायला तयार नव्हता.

*ते सर्व म्हणत की आम्हाला एकट्या माणसासाठी एवढी भानगड करणं परवडू शकत नाही. मला अतिशय नैराश्य आलं. मला वाटलं की माझा प्रयोग फसतो...... हेतू पूर्ण व्हायची शक्यता दिसत नव्हती.... माझी जेवणासाठी २ वा ३ शिलींग द्यायची तयारी होती. या वेळेपर्यंत मी अतिशय थकलो होतो व मला भूकही जोरात लागलेली होती. परंतु मी प्रयत्न सोडला नाही. ..... मी स्वतःलाच म्हणालो की मी जर दोन वेळेचा स्वयंपाक करू शकतो तर तीन वेळेचा का नाही?* [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ५४]

या विचारांनी तो किराणा दुकानात गेला आणि किराणा व इतर आवश्यक साहित्य घेऊन खोलीवर पोहोचला. त्यानं घरमालकिणीला सांगितलं की मला दोन ऐवजी तीन वेळा स्वयंपाक करावा लागणार आहे. त्यावेळी घरमालकीण एवढी चिडली की 'त्यानं जर त्यावेळी ८ ऐवजी १० शिलींग भाडं देऊ केलं नसतं तर तिनं त्याला खोलीबाहेर हाकलूनच लावलं असतं.' अधिक भाड्याच्या आश्वासनानं ती शांत झाली आणि त्यानं कामाला सुरुवात केली. पहिल्या सायंकाळी त्यानं पॉरीज आणि मंद आचेवर शिजवलेली फळं तयार केली. दुसऱ्या दिवशीही त्यानं तोच स्वयंपाक केला. जेवणासाठी त्यानं तयार केलेला हॅरिअटचा सूप 'पौष्टिक होता व तो अतिशय चविष्ट झाला होता.' स्वयंपाकाला फारसा वेळ लागला नाही. न्याहरी तयार करायला केवळ १० मिनिटं लागली, रात्रीच्या जेवणासाठी २० मिनिटं, आणि दुपारच्या जेवणासाठी जवळपास एक

तास लागला. नंतरच्या चार आठवड्यांत *न्याहरीसाठी ब्रेड आणि दूध, आणि थोडी शिजवलेली फळं आणि ब्रेड, आणि ब्रेड आणि लोणी असायचं. दुपारच्या जेवणासाठी सूप (दीड पेन्स), स्ट्रॉबेरी (२ पेन्स), आणि ब्रेड (१ पेन्स) असायची. रात्रीच्या जेवणासाठी सोजी (१.५पेन्स), ब्रेड, लोणी आणि फळं (२ पेन्स) असत. अशा रीतीनं ब्राईटनमधे मी दररोज ११ पेन्स वा जवळपास एक शिलींगच खर्च करत होतो.* **(२७)**

दहा शिलींग भाडं आणि ३ शिलींग धुलाईसाठी असा अजून खर्च धरला तर चार आठवड्याचा संपूर्ण खर्च ३ पौंड १० शिलींग आला होता. येण्याजाण्याचं भाडं धरलं तरी त्याला ब्राईटनमध्ये चार पौंडापेक्षा अधिक खर्च आला नाही.

ब्राइटन येथील आपल्या प्रयोगाच्या यशानं उत्साहित होऊन त्यानं लंडनमधे पोहोचल्यानंतर टॅव्हीस्टॉक स्ट्रीटवर झोपायची आणि बैठकीची व्यवस्था असलेली खोली ८ शिलींग आठवड्यानं भाड्यानं घेतली. तो त्याची न्याहरी आणि रात्रीचं जेवण तिथं तयार करायचा व दुपारचं जेवण बाहेर घ्यायचा. 'घरमालकिणीनं प्लेटा, चमचे, चाकू वगैरे पुरवले होते.' न्याहरीत जवळपास दररोज पॉरीज, फळं आणि ब्रेड व लोणी असायचं. (३ पेन्स) तो ६ पेन्समधे एखाद्या शाकाहारी उपाहारगृहात दुपारचं जेवण घ्यायचा आणि रात्रीच्या जेवणात ब्रेड, दूध, उकडलेली फळं आणि मुळा किंवा फळं असायची. (३ पेन्स) 'अशा रीतीनं इंग्लंडमधील राहण्याजेवणाचा खर्च शेवटच्या नऊ महिन्यात आठवड्याला १५ शिलींग यायचा आणि शेवटी तर त्याच घरात मी जेव्हा ७ पेन्स भाड्यानं खोली घेतली तेव्हा १४ पेन्सच खर्च यायचा.' (२८)

इंग्लंडच्या संपूर्ण मुक्कामात त्यानं अशी एक पेनीही गमावली नाही किंवा असा एक पौंडही खर्च केला नाही की ज्याचा हिशेब त्यानं ठेवला नव्हता. याला फक्त एकच अपवाद झाला तो म्हणजे दुकानदाराकडून त्यानं रात्रीच्या जेवणासाठी एका पेनीला एक सफरचंद विकत घेतलं आणि शिल्लक राहिलेले दोन पेन्स परत घ्यायला तो विसरला. परतताना त्याला ते आठवलं आणि ते मागण्यासाठी दुकानदाराकडे तो परत गेला. 'दुकानदारानं त्यातलं आपल्याला काहीच

आठवत नसल्याचं ढोंग केलं. माझ्या निष्काळजीपणासाठी मी मलाच दोष दिला आणि भविष्यात अजून काळजीपूर्वक राहायचा धडा घेतला.

साध्या राहणीच्या प्रयोगांनी त्याला काही तरी मिळवल्यासारखं वाटलं आणि त्याला आत्मविश्वास वाटू लागला. गांधीजी आपल्या आत्मचरित्रात लिहितात, 'यामुळे माझं जीवन शुष्क झालं अशी कोणी समजूत करून घेऊ नये. उलटपक्षी या बदलामुळे माझ्या बाह्य आणि अंतर्गत जीवनात अधिक सुसंगती निर्माण झाली.... माझं जीवन अधिक सत्यमय झालं आणि माझ्या आत्म्याला असीम आनंद मिळाला.'

जून १८९०मधे तो परत मॅट्रिकच्या परीक्षेला बसला. या वेळी तो उत्तीर्ण झाला. या काळात आणि यानंतरच्या काळात वैशिष्ट्यानं बारच्या अखेरच्या परीक्षेआधीच्या पाच महिन्यात त्याला अतिशयच जरी नाही तरी बरेच श्रम करावे लागले. परंतु त्याच्या साध्या राहणीमुळे आणि लांब वाटचालीमुळे त्याची प्रकृती ठणठणीत राहिली. 'मी दररोज अंदाजे आठ मैल चालत असे आणि एकूण मला तीनदा चालावं लागत असे - एकदा मी दुपारी जेवायला जात असे तेव्हा, नंतर सायंकाळी साडेपाच वाजता एक तास आणि मग रात्री झोपायच्या आधी ३० ते ४५ मिनिट न चुकता दररोज.... एवढंच नाही तर कडाक्याची थंडी वा दाट धुकंही माझा हा नित्यक्रम चुकवू शकत नसत.' (२९)

फक्त एकदा तो आजारी पडला. परीक्षेमुळे कामाचा अतिशय ताण पडल्यामुळे त्याचं जेव्हा व्यायामाकडे दुर्लक्ष झालं तेव्हा तो ब्रॉँकायटीसनं आजारी पडला. तो डॉक्टरकडे उपचारासाठी जेव्हा गेला तेव्हा डॉक्टरनं त्याला सांगितलं की तुला जर बरं व्हायचं असेल तू गायीचं सूप आणि मांसाहार घ्यायला हवा. 'मी डॉक्टरला विचारलं की मांसाहार न घेतल्यास मी मरेन हे निश्चित आहे काय? त्यांनी वैद्यकीय व्यवसायाच्या आपल्या संपूर्ण अनुभवाची ग्वाही देऊन सांगितलं की इंग्लंडच्या वातावरणात लोक मांसाहाराशिवाय राहू शकत नाहीत... इथल्या थंड हवामानात गायीच्या सूपाची व मांसाहाराची गरज असते.'

'मी त्यांना विचार करायला दुसऱ्या दिवसापर्यंतचा वेळ मागितला. दुसऱ्या दिवशी ते हातात गायीच्या सूपापासून बनवलेला उकळत्या चहाचा कप घेऊन आले आणि म्हणाले : 'पोरा ये, थोडा शहाणपणा शीक आणि हे शक्तिवर्धक पेय घे.'

'मी त्याच्याकडे पाहत पुन्हा विचारलं की 'तुम्ही मला पुन्हा एकदा सांगा की हे घेणं आवश्यक आहे काय व हे मी न घेतल्यास मी मरेन काय?'

'माझ्याकडे गंभीरपणे पाहत त्यांनी सांगितलं की 'तू हा चहा घेणं आवश्यक आहे व तसं तू न केल्यास तू मरशील.'

डॉक्टर ओल्डफिल्ड त्यानंतर त्याच्याकडे त्याच्या आहारासंबंधी चर्चा करायला जेव्हा गेले तेव्हा त्यांनी मोहनला विचारलं : 'नंतर काय झालं?'

'मला सांगावं लागलं की जर ईश्वराची मी मरावं अशीच इच्छा असेल तर मी मरायलाच पाहिजे. परंतु माझ्या आईच्या पायाशी बसून भारत सोडताना मी जी शपथ घेतली ती मी मोडावी अशी ईश्वराची इच्छा कधीच असू शकणार नाही.'

'डॉक्टर ओल्डफिल्ड सांगतात की काही वर्षांनंतर तो डॉक्टर मरण पावला पण गांधी मात्र शौर्यपूर्ण वर्तनानं जगाला चेतना देत राहिले.' (३०)

त्यानंतर ते एकमेकांना वारंवार भेटत असत. कोणतंही औषध न घेता तो आजारातून बरा झाला. 'डॉ. ॲलिसन यांच्या सल्ल्याप्रमाणे मी माझ्या शयनिकेच्या खोल्या सर्व ऋतूत चार इंच उघड्या ठेवत असे. हिवाळ्यात लोक साधारणपणे असं करत नाहीत.... परंतु मला मात्र ते फार मानवलं. (३१)

## ६

मोहनच्या स्वभावात सुरूवातीपासून जो लाजरेपणा होता त्याचा त्रास मोहनला इंग्लंडच्या संपूर्ण मुक्कामात होत राहिला. थोडीशीही नवखी माणसं आली की तो थिजल्यासारखा होऊन

जायचा. त्यामुळे त्याच्यावर अनेकदा निराशेचे प्रसंग आले असले तरी मागे वळून पाहिलं असता त्यामुळे त्याचा बराच लाभ झाला व त्यामुळे तो अनेक मोहपाशातून आणि अनपेक्षित संकटातून वाचला. त्या दिवसातील लंडनमधील अनेक भारतीय विद्यार्थ्यांप्रमाणे त्यानंही अविवाहित असल्याचं दाखवत लग्न झालं असल्याची बाब सहवासाच्या मोहापायी  लपवून ठेवली होती. व्हेंटॉर येथील ऑसबॉर्न यांच्या घरात असताना घरमालकिणीची मुलगी कुमारी शेल्टॉन (३२) कधीकधी त्याला फिरायला घेऊन जात असे. परंतु त्याला घराबाहेर काढायचे तिचे सर्व प्रयत्न - बाहेरच्या वातावरणातील सौंदर्याचं तिनं केलेलं रम्य वर्णन, तिचे टोमणे, तिचे विनोद एवढंच नाही तर चालायच्या शर्यतीचं वा टेकडी चढायच्या शर्यतीचं तिनं दिलेलं आव्हान यांचा त्याच्यावर कोणताच परिणाम होत नसे. हे सर्व करूनही ती त्याच्याकडून अधिकाधिक हो अथवा नाही एवढं एका शब्दाचं उत्तर मिळवण्यातच यशस्वी होत असे. त्याच्यासमोर मुद्दाम टाकलेला सुगंधी हातरुमाल उचलून द्यायचा धीरही त्याला होत नसे. त्याच्या या लाजाळूपणावर त्याची ती मैत्रीण खदखदून हसत असे. तिला हे सर्व स्वाभाविक आणि निरागसपणाचं द्योतक वाटत होतं. तो इंग्लंडमधील स्वस्थ सामाजिक जीवनाचाच भाग होता. परंतु तो अगदी वेगळ्या सामाजिक वातावरणात वाढलेला असल्यानं त्याला ते अपमानास्पद वाटायचं. त्यानं आपल्या 'मागासलेपणाला' आणि 'कमालीच्या घाबरटपणाला' शिव्या घातल्या. पण त्यामुळे काही मदत होऊ शकत नव्हती. त्यामुळे 'दुसऱ्या दिवशी याचा आपण बदला घेऊ' असं स्वतःचं समाधान करून घेत तो स्वस्थ बसायचा.

त्याचा ब्राइटन येथे मुक्काम असताना एके दिवशी शाकाहारी उपाहारगृहाच्या शोधात तो गेला होता. तिथं त्याची 'सामान्य परिस्थिती असलेल्या एका वयस्कर इंग्रज विधवेशी' भेट झाली. तो तिथं नवखा असल्याचं त्या सुस्वभावी बाईच्या लक्षात आलं. मेन्यू कार्ड फ्रेन्चमध्ये छापलेलं होतं. तो त्यातून पदार्थ शोधण्यासाठी धडपडत होता आणि त्याला त्याचा काहीच अर्थबोध होत नव्हता. तिनं त्याला त्यात मोठ्या मनानं मदत केली. लवकरच ते मित्र झाले. लंडनला परतल्यानंतर रविवारी आपल्याकडे जेवायला यायचं तिनं त्याला कायम निमंत्रण दिलं. त्याचा आश्चर्यजनक परिणाम झाला.

लंडनला परतल्यानंतर तिच्या निमंत्रणानुसार रविवारी तो तिच्या घरी जाऊ लागला. ती अतिशय प्रेमानं वागत होती. त्याच्या लाजाळूपणावर मात करण्यासाठी तिनं त्याची किती तरी समवयस्क मुलींची ओळख करून दिली. सुरुवातीला त्याला ती कटू परीक्षा वाटली. त्यांच्या सहवासात त्याची जीभ जणू काय टाळूला चिकटून जायची. पण हळूहळू त्याचा लाजाळूपणा कमी झाला आणि तोही त्या रविवारांची आणि त्या बाईकडे भेटणाऱ्या प्रेमळ मुलींच्या भेटीची उत्सुकतेनं वाट पाहू लागला. आपल्या पाठिंब्यानं त्या तरुण माणसात झालेल्या परिवर्तनामुळे खुश होत तिनं तिचं जाळ अधिकाधिक पसरायला सुरुवात केली आणि तिच्या जवळच्या एका मुलीला, जिच्या भावी जीवनात तिला रस होता, आणि त्याला घरात एकांतात सोडून ती बाहेर जाऊ लागली. जर त्या दोघांचा विवाह जुळेल तर बरं होईल असं तिला वाटत होतं. मोहनला प्रकरण इतकं लांबेल अशी अपेक्षा नव्हती. त्याला विनाश समोर दिसत होता व परतायचा मार्ग कठीण होता. परंतु त्याचं सामान्य व्यवहारज्ञान आणि त्याची विवेकबुद्धी यांचं त्याला सांगणं होतं की आता थांबायलाच हवं. त्यामुळे सर्व धैर्य एकवटत त्यानं पत्र लिहून त्या बाईला सर्व काही स्पष्टपणे सांगितलं. त्यानं तिला सांगितलं की मी तुमच्यापासून माझ्या लग्नाची हकीगत लपवून ठेवली. त्याबद्दल तिची क्षमाही त्यानं मागितली. 'मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो की तुम्ही दिलेल्या स्वातंत्र्याचा कोणताही अनुचित लाभ मी घेतलेला नाही व चुकीच्या मार्गानं मी तो घेणारही नाही असं मी आपल्याला आश्वासन देतो.... हे पत्र मिळाल्यानंतरही तुम्हांला जर वाटलं की तुमच्या आतिथ्याला मी पात्र आहे तर... तर तुमच्या दयाळूपणाचं ते अजून एक उदाहरण आहे असं मी समजेन.' (३३)

त्या सज्जन बाईचं ताबडतोब प्रत्युत्तर आलं. तिनं सांगितलं की 'मी कधीच क्षमा केलेली आहे आणि येत्या रविवारी तू अवश्य ये. आम्ही सर्व तुझ्या बालविवाहाची हकीगत ऐकायला आणि तुझी थट्टा करायला उत्सुक आहोत.' त्या पत्रानं त्याच्या डोक्यावरील फार मोठं ओझं उतरलं. गांधीजींनी आपल्या आत्मकथेत लिहिलं आहे की 'अशा रीतीनं असत्याच्या रोगापासून

मी मला शुद्ध केलं.’ (३४) त्याचा लाजाळूपणा ही भूतकालीन बाब झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनी त्यानं लिहिलं :

*बोलण्याबाबत माझा संकोच, ज्याची एकेकाळी मला चिंता वाटत होती, आता प्रसन्नतेची बाब झालेली आहे..... त्यामुळे मला शब्दांची काटकसर कळली.... अनुभवानं मला कळलं की सत्याला वाहून घेतलेल्या माणसाला आध्यात्मिक शिस्तीसाठी मौनाची आवश्यकता असते. अतिशयोक्ती करायची प्रवृत्ती, जाणीवपूर्वक वा अजाणता सत्य दडपून ठेवायचा वा सत्यापलाप करायचा मोह ही माणसाची स्वाभाविक दुर्बलता आहे. त्यावर विजय मिळवण्यासाठी... त्यातून मोठं होण्यासाठी मौनाची आवश्यकता असते. माझं मौन ही वास्तवात माझी ढाल झालेली आहे. सत्याची पारख करायला त्यामुळे मला संधी मिळालेली आहे.* (३५)

परंतु एका प्रसंगी मात्र त्याच्या ‘ढालेनं’ त्याला दगा दिला. त्यावेळी त्याला शुद्धीकरणाच्या प्रक्रियेतून जावं लागलं होतं.

**७**

अठराव्या शतकातील इंग्लंडमधील शाकाहारी लोकांच्या विचारांची जी खिचडी व्हायची त्यामुळे कधीकधी विचित्र प्रसंग ओढवायचा. उदाहरणार्थ एडवर्ड कार्पेंटरच्या लेखनात त्यांच्या शाकाहारासोबतच निसर्ग व प्रेमासंबंधीच्या सिद्धान्तात समलिंगी व्यक्तींबद्दल वाटणाऱ्या वैषयिक वासनेचंही समर्थन करण्यात आलेलं आहे. केट जॉईन्स यांच्या (सौ. हेन्री साल्ट) संस्कृतच्या अभ्यासाच्या आणि शाकाहारसंबंधीच्या प्रेमात समलिंगी संभोगाच्या प्रवृत्तीचाही समावेश होता. तिनं हेन्री कारपेंटरच्या समलिंगी संभोगाविषयीच्या मतांचा स्वीकार केलेला होता व आपण समलिंगी संभोगी असल्याचा तिचा दावा होता. अनेक शाकाहारी आणि मानवतावादी संततिनियमनाच्या आधुनिक पद्धतीचे पुरस्कर्ते होते. माल्थसचा लोकसंख्येविषयीचा सिद्धान्त आणि त्याचा उपसिद्धान्त असलेला मजुरीचा पोलादी नियम लोकांच्या मनात घट्ट रुजलेला होता. त्या सिद्धान्तानुसार कष्टकरी लोकांची परिस्थिती सुधारायचा प्रयत्न करण्यात काहीच अर्थ

नव्हता. कारण कष्टकरी लोकात जन्मदर अधिक असल्यामुळे त्यांच्या वाढत्या सुबत्तेचा परिणाम त्यांची लोकसंख्या वाढण्यात होऊन त्यांचं जीवनमान फार मोठ्या प्रमाणात पुन्हा कमी होईल असं ते म्हणायचे. ज्या अर्थी माल्थसचा नियम हा निसर्गनियम आहे असं समजण्यात येत होतं त्या अर्थी तो निसर्गाप्रमाणेच अचूक आणि अनुल्लंघनीय आहे असंही समजण्यात येत होतं. त्यामुळे मानवतावाद्यांसमोर उपलब्ध असलेला एकमेव पर्याय म्हणजे एक तर मानवतावाद्यांनी श्रमिक वर्गाच्या आत्यंतिक दारिद्र्याचा आणि निकृष्ट दर्जाचा स्वीकार नियतीची इच्छा म्हणून करायला पाहिजे वा संततीनियमनाच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करायला पाहिजे. परिणामी अनेक मानवतावाद्यांनी लोकप्रियता गमावण्याचाच काय पण प्रसंगी शिक्षा व्हायचा धोका पत्करूनही आधुनिक संततिनियमनाच्या पद्धतीचा पुरस्कार करायला सुरुवात केली. बॅडलॉ आणि ॲनी बेझंट यांनी आक्रमकपणे या विषयावरील निबंध *फ्रूट्स ऑफ फिलॉसॉफी*मधे प्रकाशित करून आपल्यावर कायद्याचा रोष ओढवून घेतला. न्यायालयानं 'अश्लील शारीरिक कृतीचं सविस्तर वर्णन असलेली कृती विकल्याबद्दल मूळ प्रकाशकाला शिक्षा केली.' (३६) प्रसिद्ध आहारशास्त्रज्ञ व निसर्गोपचारक डॉ. टी. ए. ॲलिसन आणि लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीचे एक प्रथितयश सदस्य हेसुद्धा आधुनिक संततीनियमनाच्या पद्धतीचे पुरस्कर्ते होते. मध्यकालीन व्हिक्टोरिअन युगाच्या नैतिक संकल्पनांना त्यांच्या प्रचारानं धक्का दिला आणि कर्मठ लोक त्यांना 'सैतानाचं जिवंत रूप समजायचे.'

थेम्स आइरन वर्क्सचे व्यवस्थापक आणि लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीचे अध्यक्ष श्रीयुत हिल्स हे यशस्वी उद्योगपती होते. ते त्या संस्तेचे प्रमुख आधारस्तंभही होते. त्यांच्या काळातील अनेक उद्योगपतींप्रमाणे तेही लैंगिक विचारांच्या बाबतीत कर्मठ विचारसरणीचे होते. डॉ. ॲलिसन यांच्या कार्यापासून लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीला मुक्त ठेवणारा प्रस्ताव फेब्रुवारी १८९१ साली त्यांनी मांडला. ठरावात 'अनैतिकतेला परवाना देणाऱ्या गर्भनिरोधासाठी वापरावयाच्या डॉक्टर ॲलिसन यांनी पुरस्कारिलेल्या पद्धतीचा' निषेध करण्यात आला होता. (३७) मोहनला हिल्सचा गर्भनिरोधासाठी कृत्रिम साधनं वापरण्यासंबंधीचा नैतिक मुद्दा पटत

होता. परंतु त्याला डॉ. ॲलिसन यांच्या प्रामाणिकपणाबद्दल अतिशय आदर होता आणि त्याला वाटलं की सैतानालादेखील न्याय मिळवायचा अधिकार असतो. 'मला वाटलं की केवळ एखाद्या माणसाला कर्मठ विचारसरणी मान्य नाही म्हणून व्हेजिटेरीअन सोसायटीतून त्याला काढून टाकणं उचित नाही कारण सोसायटीचा हेतू केवळ शाकाहाराचा पुरस्कार करणं आहे, विशिष्ट नैतिक विचारसरणीचा पुरस्कार करणं नाही. डॉ. ॲलिसन यांना इतर कुणाही माणसाप्रमाणे, त्यांचे नैतिक विचार काहीही असले तरी, व्हेजिटेरीअन सोसायटीचा सदस्य असायचा अधिकार आहे.' (३८)

त्यानं आपले विचार एका कागदाच्या तुकड्यावर लिहिले. परंतु त्याच्या समयसूचकतेनं सभेत त्याला अगदी दगा दिला. अखेरीस अध्यक्षांना तो कागद कुणाकडून तरी वाचून घ्यावा लागला. गांधीजी या प्रसंगाचा उल्लेख करत आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, 'डॉ. ॲलिसन पराभूत झाले. या घटनेनंतर काही दिवसांनी मी समितीचा राजीनामा दिला.

लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीच्या वृत्तांतानुसार मात्र त्यानं कार्यकारिणीचा राजीनामा निदान या प्रसंगी तरी दिला नव्हता. इतिवृत्तातील या प्रसंगासंबंधीची नोंद अशी आहे : 'काही चर्चेनंतर श्रीयुत हिल्स यांनी प्रस्ताव मागे घेतला.' श्रीयुत हिल्स यांनी निंदाव्यंजक औपचारिक प्रस्ताव परत घ्यायची तयारी दर्शवली परंतु त्याचबरोबर असंही स्पष्ट केलं असावं की सोसायटीत जोपर्यंत डॉ. ॲलिसनसारखे संततीनियमनाचे पुरस्कर्ते आहेत तोपर्यंत सोसायटीनं माझ्या मदतीची अपेक्षा करू नये व त्यामुळे तिचं अस्तित्वच धोक्यात आलं असावं. (३९)

ते काहीही असो मोहनच्या अंगभूत चिकाटीमुळे जिथे सत्याचा प्रश्न असायचा तिथं ते प्रकरण तो तसंच राहू देत नसे. एप्रिल १०च्या लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीच्या कार्यकारिणीत मोहननं पुढील प्रस्ताव मांडला : 'प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची स्पष्ट जाणीव असावी म्हणून लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीनं शाकाहारवादाची स्पष्ट व्याख्या करावी आणि शाकाहारवादात कशाकशाचा ती समावेश करते ते स्पष्ट करावं.' प्रस्ताव स्वीकृत करण्यात आला. त्यानंतर तो समितीच्या एप्रिल १७च्या आणि मे १च्या सभेस हजर राहिला. त्यावेळी 'चर्चेचं अध्यक्षपद

स्वीकारल्याबद्दल डॉ. हीड यांच्या आभारप्रदर्शनाच्या ठरावाला त्यानं पाठिंबा दिला.' तो परतायच्या आधी समितीची जूनमधे अजून एक सभा होती. तिला तो हजर राहिला नाही. हे शक्य आहे की त्यानं मांडलेला प्रस्ताव जरी मान्य करण्यात आला होता तरी त्याचं पालन समाधानकारकपणे झालं असं त्याला वाटलं नसावं व त्यामुळे त्यानं राजीनामा दिला असावा. परंतु तो तेवढ्यातच इंग्लंड सोडून जाणार असल्यामुळे वा गेलेला असल्यामुळे तो राजीनामा समितीसमोर विचारार्थ मांडण्यात आला नसावा. आपण योग्य कारणाकडून होतो व अशा प्रकराच्या पहिल्याच संघर्षात पराभूत होऊ पाहणाऱ्या पक्षाकडून होतो याचं तरीही त्याला 'मनातून समाधान वाटत होतं.' समुचित वाटणाऱ्या कारणांसाठी दुर्बल पक्षाकडून उभं राहणं हे नंतर त्याच्या स्वभावाचं वैशिष्ट्य झालं होतं.

## ८

पॅरीस येथे ५ मे १८८९ला उघडलेल्या प्रचंड प्रदर्शनाला जायची मोहनला उत्कंठा होती. परदेशातील आपल्या शिक्षणाचा समारोप करण्यासाठी त्यानं खाडी ओलांडली व पॅरीसला धडक मारली. त्यानं तेथील शाकाहारी उपाहारगृहांबद्दल ऐकलं होतं. खोली भाड्यानं घेऊन तो तिथं सात दिवस राहिला. नकाशाच्या मदतीनं पायी फिरत त्यानं तिथली सर्व प्रेक्षणीय स्थळं पाहिली.

पॅरीसमधील नॉत्रेदाम येथील सुंदर शिल्पाकृती व सविस्तर अंतर्गत सजावट तसंच ख्रिश्चन चर्चची भव्यता व नीरव शांतता पाहून तो अतिशय प्रभावित झाला. 'मला वाटलं की अशा प्रकारच्या कॅथेड्रलवर जे लोक लक्षावधीनं खर्च करतात त्यांच्या अंतःकरणात ईश्वरप्रेमाशिवाय वेगळं काही असू शकत नाही.' कुमारी मेरीच्या प्रतिमेसमोर सामान्य माणसं ज्या भक्तीनं नत होत होती ते पाहूनही तो थक्क झाला. त्याला खात्री होती की 'ते केवळ संगमरवराची पूजा करत नव्हते..... त्यांच्या अंतःकरणात खऱ्या भक्तीचा अग्नी पेटलेला होता. ते दगडाची पूजा करत नव्हते तर ज्या दैवी गुणाचं ते प्रतीक होतं त्याची ते पूजा करत होते.' (४०)

त्या प्रदर्शनाचं मुख्य आकर्षण होतं आयफेल टॉवर. हा लोखंडाचा ढीग, जो १००० फूटापर्यंत उंच गेला होता, ज्याकडे अनेक लोक नवयुगाचं प्रतीक म्हणून पाहत होते, त्यात उल्लेख करावा असं विशेष काहीच नव्हतं. त्याचं केवळ एवढंच वैशिष्ट्य होतं की त्यावेळी कल्पना करता येईल तसा तो सर्वात उंच ढाचा होता. मोहन उत्साहात त्यावर दोनदा चढला आणि त्याच्या पहिल्या माळावर असलेल्या उपहारगृहातील जेवणासाठी सात शिलींग त्यानं 'उधळले'. त्यानं नंतर त्याचं वर्णन केलं की ते 'प्रदर्शनाचं खेळणं' होतं आणि आम्ही मुलांप्रमाणे त्या कुचकिमतीच्या वस्तूकडे आकर्षित होत होतो. ते टॉवर माणसाच्या विजयाचं स्मारक नव्हतं तर माणसाच्या दोषाचं स्मारक होतं व अशा प्रकारची गोष्ट केवळ तंबाखू वगैरेच्या नशेतच निर्माण होऊ शकते या टॉलस्टॉयच्या मताशी मी सहमत होतो. उपलब्ध माहितीनुसार महान रशियन लेखक आणि तत्त्वज्ञ लिओ टॉलस्टॉय - ज्यांचा गांधीजींवर अतिशय प्रभाव होता - यांचा गांधीजींनी केलेला हा पहिला उल्लेख आहे.

पॅरीसभेटीनंतर मोहननं पुन्हा एकदा अभ्यासात बुडी मारली आणि बारच्या अंतिम परीक्षेची त्यानं जोमात तयारी सुरू केली. १८९०च्या द्वितायार्धात तो एकाच खोलीत आठवड्याला १७ पेन्स भाडं देऊन राहत होता व तिथं तो स्वतःच आपला स्वयंपाक करत होता. तिथं राहत असतानाच्या काळातच नॅशनल इंडियन असोसिएशनच्या कु. ई. ए. मॅनिंग या सज्जन बाईनं त्याची ओळख नारायण हेमचंद्र या गुजराथी लेखकाशी करून दिली.

नारायण हेमचंद्र हे नुकतंच इंग्लंडमध्ये आले होते. त्यांनी मोहनला आपल्या थोड्याशा घोगऱ्या आवाजात विचारलं 'तुम्ही कुठं राहता?'

'स्टोअर स्ट्रीटवर.'

'मग तर आपण शेजारी आहोत.'

मोहननं त्यांच्याबद्दल ऐकलं होतं व त्यांची काही पुस्तकंही त्यानं वाचली होती. ते दोघंही शाकाहारी होते. त्या दोघांच्या मूलभूत दृष्टिकोनात साम्य होतं. त्यांचं लवकरच सख्य झालं.

मोहनशी नुकतीच ओळख झालेले हे गृहस्थ काही वेगळेच होते. दाढी वाढलेला 'वर्तुळाकार चेहरा, त्यावर देवीचे व्रण', 'टोकदारही नाही आणि बसकंही नाहीं असं नाक, 'गबाळलेला पायजामा', 'चुरगळलेला घाणेरडा करड्या रंगाचा कोट', आणि 'गोंडा असलेली लोकरीची टोपी' असं त्यांचं आगळंच रूप होतं. ते जेव्हा लंडनच्या रस्त्यावर बाहेर पडायचे तेव्हा ते खोडकर मुलांना आपल्याकडे आकर्षित करून घ्यायचे. त्यांना इंग्रजी भाषेच्या व्याकरणाचा अगदीच गंध नव्हता व व त्याबद्दल त्यांना अतिशय घृणाही होती. ते "horse" ला क्रियापदाप्रमाणे वापरायचे तर "run" चा प्रयोग नामाप्रमाणे करायचे. परंतु तरीही त्यांनी केवळ इंग्रजीतीलच नाही तर इतर युरोपिअन भाषांमधीलही पुस्तकांचं गुजरातीत भाषांतर करायचा निर्धार केलेला होता. भाषेच्या नियमांच्या अज्ञानाबद्दल त्यांना चिडवलं असता ते म्हणायचे की विचार व्यक्त करण्यासाठी मला व्याकरणाची गरज पडत नाही.

एकदा ते मोहनच्या खोलीवर शर्ट आणि धोतर नेसून आले. गरीब बिचारी मोहनची घरमालकीण दारात त्या वेषात त्यांना उभं असलेलं पाहून घाबरली आणि मोहनकडे धावत येऊन म्हणाली की 'कोणीतरी वेडसर तुला भेटायला आलेला आहे.' (४१) मोहन भेटायला बाहेर आला असता त्या गोष्टीचं काहीच न वाटता अतिथीच्या रुंद चेहऱ्यावर त्याला विकट हास्य दिसलं. इंग्रजी शिकण्यात मोहननं त्यांना मदत करावी अशी त्यांची इच्छा होती. परंतु मोहनला तसा फारसा उत्साह नव्हता.

ते जवळपास रोज भेटायचे, अधूनमधून आपापले आवडते पदार्थ मागवून सोबत जेवायचे. नारायण हेमचंद्र यांचं मुगाच्या दाळीचं वरण असायचं तर मोहनचं गाजराचं सूप. परंतु इंग्रजी पद्धतीच्या गाजराच्या सुपाला तो गुजराती लेखक नाक मुरडायचा आणि आपल्या तरुण मित्राच्या भांडं धुतलेल्या पाण्यासारख्या पदार्थाच्या आवडीबद्दल तो त्याची कीव करायचा. एके दिवशी मोहनकडून कार्डिनल मॅनिंगबद्दल त्यांनी ऐकलं. कार्डिनल मॅनिंग यांनी लंडनच्या गोदी कामगारांच्या संपाच्या वेळी तडजोड घडवून आणण्यात १८८९च्या वसंतऋतूत मुख्य भूमिका वठवली होती, आणि त्यांच्या साधेपणाबद्दल, करारीपणाबद्दल, मानवतेबद्दल डिझराईलींनीही

त्यांची स्तुती केली होती. त्यांच्याबद्दल कळल्यानंतर नारायण हेमचंद्र म्हणाले, 'मी त्या संत पुरुषाला भेटायलाच हवं.'

कार्डिनलसारख्या मोठ्या माणसानं आपलं म्हणणं ऐकून घ्यायची आवश्यकता या विलक्षण माणसाला वाटावी याचं मोहनला आश्चर्य वाटलं. परंतु आपली ती इच्छा पूर्ण करण्यासाठी मोहनला स्वतःसोबत दुभाषा म्हणून घेऊन ते कार्डिनलकडे गेले. त्यावेळी मोहननं व्यवस्थितपणे काळा सूट घातला होता. परंतु हेमचंद्र यांनी मोहनच्या आक्षेपाकडे लक्ष न देता आपला नेहमीचाच कोट आणि पायजामा घातला होता. मोहननं त्यांना याबाबतीत जेव्हा टोकलं तेव्हा ते हसले आणि म्हणाले, 'तू अननुभवी आहेस. मोठी माणसं माणसाच्या बाह्य रूपाकडे कधीच पाहत नाहीत. ते त्याचं मन पाहत असतात.' मोहन आपल्या मित्राच्या स्वतंत्र विचारशक्तीचं व बाह्य स्वरूपाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करायच्या प्रवृत्तीचं मनातल्या मनात कौतुक केल्याशिवाय राहू शकला नाही. ते कार्डिनलना भेटले आणि कार्डिनलनी त्यांना आशीर्वाद दिले. त्या तरुणाला त्या वेळी कुठं माहीत होतं की एके दिवशी तो याहूनही अपरंपरागत पोषाखात बंकिंगहॅम पॅलेसमधे भेटायला जाणार होता.

स्वयंशिक्षक असलेले व स्वतःच्या मेहनतीनं उभे राहिलेले नारायण हेमचंद्र यांना भारतीय संस्कृतीच्या वारसाचा अतिशय अभिमान वाटत होता. त्यामुळे जिथं कुठं त्यांना जायचं असायचं तिथं आपल्याच पोषाखात जाण्यावर त्यांचा भर असायचा. आपल्या लेखनाच्या तटपुंज्या उत्पन्नातून त्यांनी परदेश प्रवासाच्या भाड्याची आणि राहण्याची व्यवस्था केली होती. नंतर ते फ्रान्सला गेले, फ्रेंच आणि जर्मन शिकले आणि गुजराती भाषिकांना काही फ्रेंच आणि जर्मन भाषेतील अभिजात साहित्याचा परिचय करून देणारी सारांशवजा पुस्तकं त्यांनी सादर केली. अखेरीस ते अमेरिकेत गेले. तिथं शर्ट आणि धोतर नेसून बाहेर गेले असता त्यांना शिष्टाचारानुसार पोषाख न केल्यामुळे अटक करण्यात आली! अखेरीस त्यांची सुटका करण्यांत आली.

इंग्लंडमधे नारायण हेमचंद्र दर आठवड्याला १ पौंड खर्चावर राहायचे. त्यांनी आठवड्याला ७ शिलिंगवर खोली भाड्यानं घेतली होती. ते आठवड्याला ३ वा ४ पेन्स कपडे

धुण्यावर व ७ शिलींग खाण्यावर खर्च करायचे, उरलेला पैसा ते कपडे आणि पुस्तकांवर खर्च करायचे. त्यांनी विकत घेतलेल्या पुस्तकातून एक पेटीभरून पुस्तकं त्यांनी मोहनला भारतात नेण्यासाठी सोपवली. त्यांच्या साधेपणानं आणि मितव्ययीपणानं मोहनला प्रभावित केलं आणि त्यालाही अशा प्रकारचे अजून प्रयोग करायला प्रवृत्त केलं. मोहन जसजसा मोठा होत गेला तसतसं मोहनला त्यांच्या स्वभावातील गुणवैशिष्ट्याबद्दल अधिकाधिक आदर वाटत गेला. याच गुणवैशिष्ट्यांमुळे भारताला जगात आदराचं स्थान मिळू शकेल असं त्याला वाटलं. इंग्रजांची 'भ्रष्ट नक्कल करण्यापेक्षा' नारायण हेमचंद्र यांचा सर्व गावंढळपणा गृहित धरूनही तेच भारताचं योग्य प्रतिनिधित्व करू शकतात असं मोहनला वाटलं.

## ९

मोहन तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना मोहनच्या मनात आपल्या आईवडिलांच्या परंपरागत धर्माबद्दल बंडाची भावना निर्माण झाली होती व त्यामुळे त्याच्या मनात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. स्थिर आणि समाधानकारक श्रद्धेचा प्रश्न मोहनच्या मनाला सतावतच होता. त्यानं जेव्हा याचा उल्लेख डॉ. ओल्डफिल्डकडे केला तेव्हा ते म्हणाले : 'तू ख्रिश्चन धर्माचा स्वीकार का करत नाहीस?' (४२)

मित्राच्या या सूचनेमुळे मोहनचं विचारचक्र सुरू झालं. लगेच त्याच्या लक्षात आलं की त्याला स्वतःच्या धर्माबद्दल जवळपास काहीच माहिती नाही. तो डॉ. ओल्डफिल्ड यांना म्हणाला की मला अजून हिंदू धर्माची काहीच माहिती नाही व मी जोपर्यंत ती करून घेत नाही तोपर्यंत ख्रिश्चन वा अन्य कोणताही धर्म स्वीकारायचा प्रश्नच उपस्थित होत नाही. डॉ. ओल्डफिल्ड यांनी तो मुद्दा नंतर लांबवला नाही. परंतु संधी मिळेल तेव्हा मोहनसमोर ते येशू ख्रिस्ताचं जीवन मांडायचे.

१८९०च्या अखेरीस त्याची मॅडम ब्लॅव्हाटस्की आणि श्रीमती ॲनी बेझंट यांच्याशी ओळख करून देण्यात आली. त्यानं मॅडम ब्लॅव्हाटस्की यांचं *सिक्रेट डॉक्ट्रिन* वाचलं आणि २६ मार्च १८९१

रोजी ब्लॅव्हाटस्की लॉजचा सहा महिन्यांसाठी तो सहसदस्य झाला. परंतु त्यानं त्या सदस्यत्वाचं नंतर नूतनीकरण केलं नाही. *अ शॉर्ट हिस्ट्री ऑफ द थिऑसॉफिकल सोसायटी* या जोसेफाईन रॅन्सम यांच्या पुस्तकात असा दावा करण्यात आला आहे की ब्लॅव्हाटस्की लॉज लंडन येथील तेव्हाचे सदस्य ‘एम. के. गांधी’ यांचा कॉलनल ऑलकॉट यांच्याशी परिचय करून देण्यात आला. निश्चितच येथे नामसाम्यामुळे दोन व्यक्तीत घोटाळा झालेला आहे. कारण संदर्भित सभा १८९६ साली झाली असं दाखवण्यात आलं आहे. परंतु त्यावेळी गांधीजी दक्षिण आफ्रिकेत होते. कॉलनल ऑलकॉट यांनीही आपल्या आत्मचरित्रात श्रीयुत गांधींना, जे प्रसिद्ध जैन गृहस्थ होते, भेटल्याचा उल्लेख केला आहे. जोसेफाइन रॅन्सम यांनी एम. के. गांधी आणि विरमचंद गांधी, जे गांधीजींचे जैन मित्र होते, यांच्यात घोटाळा केला असल्याचं दिसतं. गांधीजी जेव्हा १८९१ साली भारतात परतले तेव्हा विरमचंद इंग्लंडमध्ये सॉलिसिटरच्या परीक्षेचा अभ्यास करत होते आणि काही काळ गांधीजी त्यांच्याबरोबर मुंबईत एकाच खोलीत राहत होते. त्यानंतर ते अमेरिकेत गेले होते आणि तिथंही केव्हा केव्हा एम. के. गांधींशी त्याचा घोटाळा करण्यात यायचा. या बाबतीत सत्य हेच आहे की मित्रांनी दिलेल्या सल्ल्यानंतरही गांधीजी थिऑसॉफिकल सोसायटीचे पूर्ण सदस्य झाले नव्हते. ‘मी नम्रपणानं सांगत असे की ‘माझ्या धर्माचं मला अतिशय मर्यादित ज्ञान असताना मी कोणत्याही धर्माशी संबंधित असू शकत नाही.’ (४३)

थिऑसॉफीमधील मोहनला काय आवडलं असेल तर ती विश्वबंधुत्वाची भावना. परंतु त्यातील गूढ आणि गुप्ततेचा भाग काही मोहनला रुचला नाही आणि नंतरच्या वर्षात त्यांच्या काही विचारांबद्दल, वैशिष्ट्यानं आत्म्याशी संवाद साधायचा ते जो दावा करायचे त्याबद्दल गांधीजींनी तीव्र नापसंती व्यक्त केली. (४४) परंतु तरीही थिऑसॉफीचं साहित्य वाचून मोहनची हिंदू धर्मग्रंथ वाचायची तृष्णा वाढली व ‘हिंदू धर्म केवळ अंधश्रद्धांनी भरलेला आहे हा मिशनऱ्यांनी पसरवलेला त्याच्या मनातील भ्रम दूर झाला.’ (४५)

थिऑसॉफिस्टे बंधूनी भगवदगीतेचा एडविन अर्नोल्ड यांनी केलेला अनुवाद, *द भगवदगीता - सॉंग सेलेस्टियल* त्याला वाचायला दिला. त्यामुळे ‘मला जीवनाचा नवीन दृष्टिकोन

मिळाला. त्यानं माझ्या आत्म्याला स्पर्श केला जसा तो पूर्वेच्या मुलांनाच स्पर्श करू शकतो. अखेरीस मला हवा असलेला प्रकाश मला सापडला असं मला वाटलं.' असं गांधीजींनी लिहिलं आहे. (४६) दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी स्थितप्रज्ञाच्या ज्या लक्षणांचं वर्णन करण्यात आलं आहे त्यानं त्याच्या मनात खोलवर प्रवेश केला. त्याच्या वडिलांप्रमाणेच त्या ग्रंथाचं वाचन त्याच्या दैनंदिन जीवनाचा भाग झाला. भारतात त्याला ज्या ख्रिश्चन धर्माचा परिचय झाला होता तो केवळ गायीचं मांस खाणं आणि दारू पिणं याच स्वरूपात झाला होता. परंतु इंग्लंडमधील शाकाहारी लोकांच्या संपर्कानं त्याला वेगळ्या प्रकारच्या ख्रिश्चन धर्माचा परिचय झाला. मॅन्चेस्टर येथील एका सज्जन ख्रिश्चन गृहस्थांना त्याच्या धार्मिक दृष्टिकोनात रस वाटला आणि त्यांनी त्याची श्रद्धा जिंकायचा प्रयत्न केला. ते गृहस्थ शाकाहारी होते व कधीही मद्यपान करत नसत. त्यानं स्पष्ट केलं की धर्मग्रंथानं ना तर मांसाहाराचा पुरस्कार केला आहे ना मद्यपानाचा. ते विनवणीच्या सुरात म्हणाले : '*बायबल* वाच, निदान माझ्यासाठी तरी.' मोहननं मान्य केलं, *बायबल*ची एक प्रत विकत घेतली आणि जुन्या करारापासून सुरुवात केली. परंतु महान स्थलांतराचं प्रकरण वाचल्यानंतर त्यानं निराश होऊन पुस्तक मिटलं. त्यात त्याला रस वाटला नाही. तरीही त्यानं प्रयत्नपूर्वक ते वाचलं. विशेषतः *बुक ऑफ नंबर्स* त्याला अगदीच आवडलं नाही. परंतु नव्या करारापासून ते वेगळं होतं. सर्मन ऑफ द माऊंटमधील दुष्टपणाची परतफेड सुष्टपणानं करायची ह्या संदेशाशी शामल भटच्या गडवाभर पाण्याच्या मोबदल्यात पोटभर जेवण द्या हा उपदेश मिळता जुळता होता व बालपणी त्याच्या मनावर या उपदेशाचा ठसा उमटलेला असल्यामुळे हा संदेश त्याच्या मनात चटकन रुजला. त्यानं त्याची तुलना गीतेशी केली. 'माझ्या तरुण मनानं *गीता, सर्मन ऑफ द माऊंट* आणि *लाईट ऑफ आशिया* यांची तुलना करायचा प्रयत्न केला. सर्वसंग परित्याग ही धर्माची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे व तिचाच माझ्या मनावर फार मोठा प्रभाव पडला. (४७)

सत्याच्या त्याच्या शोधात त्यानं चर्चमध्ये जायला सुरुवात केली. त्या काळातील प्रसिद्ध धर्मगुरू आर्कडिकान फरार आणि सी. एच. स्पर्जन यांची प्रवचनं त्यानं ऐकली. परंतु त्यांची प्रमेयं

त्याला मान्य होऊ शकली नाही व तो तिथून तसाच कोरडा परतला. डॉ. पारकर यांची सिटी टेम्पलमधील गरूवारची दुपारची प्रवचनं त्याला आवडायची व ती ऐकण्यासाठी तो 'वारंवार' जायचा.

कार्लाईलच्या *'हिरोज आणि हिरो वर्शिप'* या पुस्तकातील *'हिरो अॅज अ प्रॉफेट'* हे प्रकरण त्यानं वाचलं आणि त्याला पैगंबराचा मोठेपणा, शौर्य आणि साधी राहणी याबद्दलची माहिती कळली. (४८) अॅनी बेझंट यांचं *हाऊ आय बिकेम अ थिऑसॉफिस्ट* हे पुस्तकही त्यानं वाचलं. नास्तिक्याचा संपूर्ण टप्पा ओलांडल्यानंतर अखेरीस त्या आस्तिक्याकडे वळल्या होत्या. ३० जानेवारी १८९१ रोजी ब्रॅडलॉचा मृत्यू झाल्यानंतर तो त्यांच्या अंत्यविधीस उपस्थित होता. ब्रॅडलॉंना शेवटचा निरोप द्यायला जे आले होते त्यात काही धर्मगुरूंचाही समावेश होता. अंत्ययात्रेवरून परतताना ते लंडनला जाणाऱ्या आगगाडीची वाट पाहत असताना एक नास्तिक त्यांना सतावण्यासाठी प्रश्न विचारू लागला :

'महाशय आपला देवाच्या अस्तित्वावर विश्वास आहे काय?'

'होय आहे.'

'मग कृपा करून सांगा की त्या देवाचा आकार किती मोठा आहे आणि तो कुठं आहे?'

'तो आपल्या दोघांच्याही हृदयात राहतो हे आपल्याला माहीत असतं तर !'

'आता तुम्ही मला मूल समजू नका.' नास्तिकतेचा पुरस्कर्ता विजयी मुद्रेनं इतरांकडे पाहत म्हणाला.

त्या प्रकारानं मोहनच्या मनात नास्तिक्याबद्दल अजूनच तिटकारा निर्माण झाला. परंतु ब्रॅडलॉच्या उदाहरणातून 'प्रामाणिक शंकांचा' आदर करणं तो शिकला. त्यानं नंतर घोषित केलं होतं की जोपर्यंत करुणेचा कायदा आपल्या हृदयावर राज्य करतो तोवर आपला धर्म कोणता आहे याला फार कमी महत्त्व आहे. 'वेगळ्या शब्दात सांगायचं तर परलोकात लोकांचा न्याय त्यांनी धारण केलेल्या लेबलप्रमाणे होत नाही तर ते कसे वागले यावरून होणार आहे.'

इंग्लंडचा किनारा सोडेपर्यंत नास्तिक्य ही त्याच्या जीवनातील भूतकालीन गोष्ट झालेली होती. परंतु त्याला माहीत असणाऱ्या धर्मातून खरा धर्म कोणता आहे हा त्याच्यासमोर महाप्रश्न निर्माण झालेला होता. त्याला कोणतंच उत्तर सापडत नव्हतं. कोणतंच उत्तर मिळत नव्हतं कारण प्रश्नच चुकीचा होता. परंतु त्यावेळी त्याच्या ते लक्षात आलं नव्हतं. त्यामुळे 'एका खऱ्या धर्माचा' त्याचा शोध सुरूच होता. दक्षिण आफ्रिकेतच अखेरीस त्याला कळलं की एकच खरा धर्म अशी कोणतीच गोष्ट नसते. 'धर्म एकच असतो आणि त्याला अनेक शाखा असतात व त्या सर्व सारख्याच असतात. सर्वांचं मूळ एकच असतं आणि त्यांच्या वाढीचे नियमही सारखेच असतात.' गांधीजींनी सांगितलं की कोणताही धर्म परिपूर्ण नसतो, परंतु प्रत्येक धर्मात परिपूर्णतेकडे जाण्याचा गुण असतो. आणि त्यामुळे प्रत्येकाला आपलं वर्तन पूर्णपणे निर्दोष करून परिपूर्ण व्हायचा प्रयत्न करणं शक्य होतं.

## १०

पुराणमतवादी ब्रिटिश परंपरेचा चमत्कारिक अवशेष होता होऊ घातलेल्या बॅरिस्टरसाठी *कीपींग टर्म्स*चा. *कीपींग टर्म्स* म्हणजे ज्या इनमध्ये जो असेल त्यानं त्या टर्ममध्ये त्या इनमध्ये जेवणं. याचा अर्थ असा नाही की प्रत्येकानं खरोखरच तिथं जेवायला हवं. परंतु प्रत्येकाला जेवायच्या ठराविक वेळी तिथं हजर राहावं लागतं व एक तास बसावं लागतं. लहानात लहान टर्म २० दिवसांची असते तर मोठ्यात मोठी ३१ दिवसांची. एका *टर्म*मध्ये कमीतकमी ६ जेवणांना हजर राहिलं की ती *टर्म* 'पूर्ण केली' असं समजलं जायचं. ही जेवणं घेवो वा न घेवो त्यासाठीचे पैसे द्यावे लागतच. ज्या इनर टेम्पलमध्ये मोहन होता तिथल्या इनमध्ये प्रत्येक जेवणाला ३ शिलींग ५ पेन्स द्यावे लागायचे. मिडल टेम्पलमध्ये २ शिलींग ६ पेन्स आणि ग्रे व लिंकन्स इनमध्ये जवळपास तेवढेच पैसे द्यावे लागत. या जेवणांमुळे बारसाठी माणूस कसा पात्र ठरतो हा एक प्रश्नच होता. जो काही या प्रथेला एकेकाळी अर्थ असेल तो आता गमावला गेला होता. जे लोक

अशाप्रकारे जेवण करून बॅरिस्टर झाले होते त्यांना काही वेळा गमतीत 'डिनर बॅरिस्टर' म्हणून संबोधण्यात यायचं.

मोहन काटेकोरपणे या जेवणांना हजर राहिला होता. तो तिथं क्वचितच जेवायचा कारण त्याला तिथले शाकाहारी पदार्थ आवडत नसत. परंतु जेवणाच्या टेबलवर त्यानं आपल्याजवळ बसावं म्हणून अनेकांचा आग्रह असल्याचं पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्याच्या या लोकप्रियतेचं रहस्य त्याला नंतर कळलं. टेबलवर प्रत्येक चार माणसांसाठी दारूच्या दोन बाटल्या असायच्या. 'मी दारू पीत नसल्यामुळे मी ज्या चौकडीत असे त्यातील तिघांनाच दोन बाटल्या रिकाम्या करायची संधी मिळत असे. (४९) *ग्रँड नाईटला* पोर्ट आणि शेरीच्या जोडीनं शँपेनसारखी जास्तीची दारूही देण्यात येत असल्यामुळे तेव्हा तर त्याला जवळ बसवायचा आग्रह अजूनच वाढायचा.

बारा सत्र पूर्ण केल्यानंतर वकील म्हणून पात्र ठरण्यासाठी दोन परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक असायचं. एक रोमन कायद्याची व दुसरी सामान्य कायद्याची. चार सत्र पूर्ण केल्यानंतर, म्हणजेच प्रवेशाच्या एक वर्षानंतर, परंतु त्याआधी नाही, विद्यार्थी रोमन कायद्याच्या परीक्षेला बसू शकत असत. दुसऱ्या परीक्षेला, जिला बारची अंतिम परीक्षा म्हणायचे, प्रवेशाच्या दोन वर्षांनंतर बसता यायचं. परीक्षेत उत्तीर्ण होणं कठीण नव्हतं. अभ्यासक्रम सोपां होता, परीक्षक उदार होते आणि उत्तीर्ण होणारांचं प्रमाण मोठं होतं. अनेक विद्यार्थी तर नेमलेली पुस्तकंही वाचत नसत. काही शिकवणी लावत तर काही मार्गदर्शिका आणि टिपणं पाठ करून पास होत. परंतु मोहनला घोकंपट्टीचा अतिशय तिटकारा असल्यामुळे, देखावा वा कोणत्याही प्रकारची ढोंगबाजी करणं आवडत नसल्यामुळे त्यानं स्वतःचंच काम कठीण करून घेतलं होतं. त्यानं मूळ लॅटीनमधून जस्टॅनियन अभ्यासलं होतं तसंच इतर कायद्याची पुस्तकंही तेवढ्याच काळजीपूर्वक वाचली होती. प्रवेश घेतल्यानंतर दोन वर्षांनी तो बारच्या अंतिम परीक्षेला १५ ते २० डिसेंबर या दिवसात बसला. लंडनमधे १२ जानेवारी १८९१ला निकाल घोषित करण्यात

आला. तो सहजपणे परीक्षेत उत्तीर्ण झाला, परंतु त्याचे सत्र पूर्ण झाले नसल्यामुळे तो बारसाठी पात्र झालेला नव्हता. त्यामुळे त्याला जूनच्या मध्यापर्यंत थांबणं आवश्यक होतं.

तो इंग्लंडला आल्यानंतरचा त्याच्या आयुष्यातील हा सर्वात सुखाचा काळ होता. त्याला पक्ष्याप्रमाणे मुक्त असल्यासारखं वाटत होतं. अनेक प्रकारच्या अडचणींनंतर तो त्याच्या ध्येयापर्यंत पोहोचला होता. पुढील पाच महिनेही तो अतिशयच व्यस्त होता. त्याला अजूनच फुलोरा येत होता.

नंतरच्या मार्चमधे त्यानं डॉ. ओल्डफिल्डबरोबर सेंट स्टिफन्स स्क्वेअर, बेवाटर, लंडन येथे खोली भाड्यानं घेतली. तिथं त्यानं जोशिआ ओल्डफिल्ड यांच्या अध्यक्षतेखाली *वेस्ट लंडन फूड रिफॉर्म्स सोसायटी* स्थापन केली. तिच्या उपाध्यक्षपदी काही काळ पुना कॉलेजचे प्राचार्य असलेले एडविन अर्नोल्ड होते तर तो संस्थापक सचिव होता. ते सायंकाळचा सर्व रिकामा वेळ शांतता आणि शाकाहारवादाचा घरोघरी जाऊन प्रचार करण्यासाठी देत. तसंच जिथं कुठं श्रोते मिळतील तिथं क्लब आदींमध्ये भाषणं देणं व जाहीर सभेत व्याख्यानं देणं हीही कामं ते करायचे. मांसाच्या ठिकाणी लेंटिल आणि डाळी खायला सांगणं एवढीच 'अन्नसुधारणे' बाबत त्यांची कल्पना होती. परंतु मोहनच्या उत्साहानं आणि श्रद्धेनं त्यांना त्या कामात टिकवून ठेवलं. वेस्ट लंडन सोसायटीचा बफेत लेंटिल सूप, भात आणि भरपूर मनुका असत. अशा अनेक रात्रभोजनांचं त्यांनी आयोजन केलं!'

आमच्या विवेकानुसार आम्ही जगाला अजून चांगलं करायचा प्रयत्न करत होतो व म्हणून ते आनंदाचे दिवस होते असं अनेक वर्षांनंतर त्या दिवसांची आठवण करत डॉ. ओल्डफिल्ड यांनी त्या दिवसांचं वर्णन केलं.' (५०)

वारंवार खोली आपल्या बदलायच्या स्वभावानुसार ती खोली बदलून मोहन वेगळ्या भागात राहायला गेल्यानंतर त्यानं स्थापन केलेली सोसायटी बंद पडली. परंतु त्यामुळे संस्थांचं संचालन करायचं त्याला चांगलं प्रशिक्षण मिळालं व पुढील जीवनात त्याचा त्याला चांगलाच उपयोग झाला. त्यानं भरपूर वाचन केलं आणि लेखनास सुरुवात केली. फेब्रुवारी १८९१ ते जून

१८९१ या काळाच्या दरम्यान त्यानं दहा लेखांची एक मालिका लिहिली. *द व्हेजिटेरिअन*मध्ये *इंडियन व्हेजिटेरिअन्स* या मथळ्याखाली पाच लेख पुढीलप्रमाणे प्रकाशित झाले : फेब्रुवारी २ आणि मार्च १४ला दोन लेख, काही भारतीय सणांच्या निमित्तानं मार्च २८ आणि एप्रिल २५ला तीन लेख प्रकाशित झाले आणि शेवटचा द फुड्स ऑफ इंडिया या मथळ्याखाली द व्हेजिटेरीअन मेसेंजरमधे मे ६ला प्रकाशित झाला.

नुकत्याच लंडनमध्ये आलेल्या अपरिपक्व युवकानं भारत ते इंग्लंडच्या प्रवासाची जी रोजनिशी लिहिली तिच्यात व या लेखात शैली आणि आशय या दोन्ही बाबतीत महदंतर आहे. ओजस्वी आणि विषयात सरळ प्रवेश करणाऱ्या ह्या लेखनातील प्रत्येक लेख एकेक हिऱ्यासारखा आहे. मूलभूत विचार आणि स्पष्ट वर्णन असलेल्या या लेखात आजही दुरुस्ती करणं कठीण आहे. दरिद्रनारायणाचा भावी प्रतिनिधी आणि मिठाच्या सत्याग्रहाचा जनक होणार असलेल्या या तरुणाला या काळातही भारताच्या दारिद्र्याच्या शोकांतिकेचा व मिठावरील करांमुळे निर्माण होणाऱ्या विषमतेचा शोध लागलेला होता. 'भारतात कोट्यवधी लोक असे आहेत की जे रोज एका पैशावर म्हणजे एकतृतीयांश पेनीवर राहतात.... या गरीब लोकांना रोज एकाच जेवणावर राहावं लागतं व त्यातही शिळी भाकरी व मिठाचाच, ज्यावर फार मोठा कर लावण्यात आलेला आहे, समावेश असतो.' (५१) माणसाची शत्रू आणि संस्कृतीला शाप असलेल्या दारूच्या प्रसाराला 'मदत करायचं व अटकावही करायचं' ब्रिटिश सरकारचं धोरण, (५२) भावनाशून्य आणि सुस्त सरकारच्या नाकर्तेपणामुळे सुधारकांची दारूला अडवण्याच्या बाबतीतील असहायता यांचा तर हातभार आहेच (५३) पण त्याशिवाय 'ज्या पद्धतीनं इंग्रज इंग्लंडमधे राहत होते त्याच पद्धतीनं भारतातही राहू पाहणारे व त्याचप्रकारे स्वयंपाक करणारे लवकर न जाग येणारे भारतातील इंग्रज' हे सर्व या परिस्थितीसाठी कारणीभूत आहेत. इंग्रज लोकांनी इंग्लंडमधील आपल्या जीवनपद्धतीला भारतातही घट्ट पकडून ठेवलेलं असल्यामुळे इंग्रजांच्या भारतातील राज्याला १५० वर्ष होऊनही त्यांना भारतातील अन्नपदार्थांबद्दल माहिती नाही. या सर्व लेखनाकडे त्याच्या गुणवत्तेप्रमाणे लोकांचं लक्ष वेधलं गेलं यात काही आश्चर्य नाही.

दादाभाई नौरोजींचा चाहता असलेला हा तरुण, एक प्रसंग सोडला तर भीष्मपितामहाचा वेळ अतिशय मूल्यवान आहे असं वाटल्यामुळे, कधीही त्यांची व्यक्तिगत भेट घ्यायला गेला नाही परंतु त्यांची सभा जाहीर झालेली असली तर तिला मात्र न चुकता तो हजर राहत असे.

या लेखमालेतील समारोपातील उद्गारही होऊ घातलेल्या महात्म्याच्या स्वभावाचं दर्शन घडवणारे आहेत. तो लिहितो की अशी वेळ येणार आहे की 'जेव्हा मांसाहारी इंग्लंड आणि धान्य खाणारा भारत यांच्यातील आहारविषयक सवयीत सध्या असलेलं प्रचंड अंतर नाहीसं होईल व त्याबरोबरच इतर काही भेदभावही जे या दोन देशांतील ऐक्य आणि सहानुभूती यांच्यासाठी बाधक आहेत नाहीसे होतील व अखेरीस सवयींच्या ऐक्यातून हृदयाचं ऐक्य निर्माण होईल. (५४) पुढील उताऱ्यातून इमर्सनच्या शब्दांचा ध्वनी स्पष्टपणे उमटताना आढळतो : 'नुकसानभरपाईच्या कायद्यानुसार जे मानसिक शक्तीनं मिळवलं ते शारीरिक शक्तिद्वारा गमावलं जाणं अपरिहार्य आहे. सॅम्सन हा कधीच ग्लॅडस्टोन होऊ शकत नाही.' या ठिकाणी पहिल्यांदाच आपल्याला असा ध्वनी ऐकायला मिळतो की जो त्याच्या शारीरिक सामर्थ्याविरुद्ध आत्मशक्तिच्या नंतरच्या तत्त्वज्ञानात वारंवार प्रतिध्वनित होणार आहे.

'द फूड्स ऑफ इंडिया' हा लेख आधी एक पेपर म्हणून *लंडन व्हेजिटेरीअन* सोसायटीच्या सभेत मे २१ला मॅडम ब्लॅव्हॉट्स्की हॉलमधे वाचण्यात आला होता. ६ मे १८९१च्या *द व्हेजिटेरिअन*मधील एका परिच्छेदानुसार 'वक्ता सुरुवातीला थोडासा चपापलेला' होता. लेखक 'मुंबई प्रांतातील ब्राह्मण आहे' अशी ओळख करून देण्यात आली होती!

त्या पेपरची अतिशय प्रशंसा झाली आणि मे दिवसाच्या लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीच्या सभेत इतर तीन लोकांबरोबर मोहनला फेडरल युनियन ऑफ व्हेजिटेरीअन सोसायटीच्या पोर्टस्माऊथ येथे मे ५ ला होणाऱ्या परिषदेसाठी प्रतिनिधी नामित करण्यात आलं.

काहीच दिवसांनंतर त्याला पुन्हा बोलायची संधी मिळाली. फेडरल युनियन ऑफ व्हेजिटेरीअन युनियन परिषदेसाठी त्याच्याचबरोबर प्रतिनिधी म्हणून आलेल्या श्रीमती मॅकडोऑल या साल्टच्या ह्युमॅनेटेरिअन लीगचीच एक शाखा असलेल्या बँड ऑफ मर्सीच्या

सदस्यांसमोर व्याख्यान देणार होत्या. पण ऐनवेळी त्या आजारी पडल्यामुळे मोहनला विचारण्यात आलं व त्यानं तत्परतेनं त्याला मान्यता दिली. तो जवळपास १५ मिनिटं बोलला. त्यानं आपल्या भाषणात मांडलेला मुद्दा असा होता : बँड ऑफ मर्सी ही संस्था प्राण्यांशी क्रौर्यपूर्ण व्यवहाराचा विरोध करणारी संस्था आहे, परंतु तिचे सर्व सदस्य शाकाहारी नाहीत. माणूस प्राण्यांशी दयेनंही वागेन आणि त्यांना खाईनही हे एकाच वेळी होऊ शकत नाही. तर्कशुद्ध आणि सातत्याची भूमिका ठेवण्यासाठी बँड ऑफ मर्सीच्या सदस्यांनी शाकाहारी होणं आवश्यक आहे. त्यानं आपल्या पेपरचं वाचन शेक्सपिअरच्या पुढील ओळींनी संपवलं :

*विद्वान, मती गुंग झालेला, शांत आणि संतापी*
*एकनिष्ठ आणि तटस्थही असं असू शकतो*
*कोण एकाच वेळी ?*

## ११

मोहनला प्रतिनिधी म्हणून बोलावण्यात आलेली *फेडरल युनियन ऑफ व्हेजिटेरीअन युनियनची* परिषद पोर्टरमाऊथ येथील अल्बर्ट हॉलच्या वरच्या मजल्यावरील पिरॅमिड रूममधे ५ मे १८९१ रोजी दुपारी ११ वाजता सुरू झाली होती. परिस्थितीनं असा काही कट रचला की तो प्रसंग त्याच्या जीवनातील अजून एक मैलाचा दगड बनला. ऑक्सफर्ड, केम्ब्रीज, नॉरविच, मॅन्चेस्टर आणि लंडन अशासारख्या बाहेरच्या ठिकाणावरून बरेच जुने जाणते शाकाहारी लोक आले होते. *व्हेजिटेरीअन सोसायटी* मॅनचेस्टरचं प्रतिनिधित्व जोसेफ नाईट, *लंडन व्हेजिटेरीअन* सोसायटीचं प्रतिनिधित्व जोशिया ओल्डफिल्ड, कुमारी येट्स, टी. टी. मझुमदार आणि एम. के. गांधी करत होते. त्याशिवाय ऑस्बॉर्न हाऊसचे ई. डी. शेल्टन व ज्येष्ठ शाकाहारी एच. एस. साल्ट हेही तिथं उपस्थित होते. सकाळच्या आणि दुपारच्या दीर्घ कामकाजानंतर अनेक मान्यवर उपस्थितांच्या साहित्यिक गप्पागोष्टींचा कार्यक्रम ठेवण्यात आला. शाकाहारवादावर अनेक मान्यवर पाहुण्यांच्या भाषणांनंतर वैयक्तिक गाणी आणि पाठांतरित उतारे म्हणायच्या

कार्यक्रमानंतर जेवणं झाली. अशा रीतीनं तो वेळ अतिशय मजेत गेला. परंतु त्या रात्री मोहनसाठी कठोर सत्त्वपरीक्षेची वेळ यायची होती.

ज्या खोलीवर मोहन उतरला होता त्या खोलीवर परिषदेतून जेवणानंतर परतत असताना त्याच्याबरोबर आलेल्या एका भारतीय मित्राबरोबर मोहन ब्रीज खेळायला बसला. त्याची घरमालकीणही त्या खेळात सहभागी झाली. पोर्टस्माऊथ हे नाविकांचं शहर होतं आणि तिथले अनेक लॉज अनैतिक व्यवसायाची गुप्त ठिकाणं होती. अर्थात यजमानांना या गोष्टीची कल्पना असायचं काही कारण नव्हतं. ज्या घरात मोहन आणि त्याचा मित्र थांबले होते तिथली घरमालकीणही थोडी सैल चारित्र्याची असावी. जसजसा खेळ पुढं सरकू लागला तसतसा थट्टाविनोदाला ऊत येऊ लागला. आधी ते विनोद साधे होते पण नंतर गप्पा जसजशा रंगत गेल्या तसतसे ते विनोद अधिकाधिक अश्लील होत गेले व उत्तेजना वाढत गेली. अशा प्रकारच्या खेळात तरबेज असलेल्या मोहनच्या मित्रानं त्या विनोदांना त्याच हलकेपणानं घेतलं. पण मोहन मात्र लवकरच त्यात वाहून गेला. 'पानं तशीच टाकून मी अगदी सीमा तोडायलाच निघालो होतो तेवढ्यात माझ्या त्या उत्तम सहकाऱ्याच्या तोंडून मला वाचवण्यासाठीच जणू काय सावधगिरीची सूचना निघाली : 'तुझ्यात हा सैतान कुठून शिरला? अरे तुझ्या आईला दिलेल्या वचनाचं काय?'

'कोणती शपथ ? मला तर काही आठवत नाही.'

'निघ, इथून ताबडतोब निघ.'

तो त्याच्या मूर्खपणातून जागा झाला. प्रथमच त्याच्या लक्षात आलं की तो अगदी खोल गर्तेत बुडायच्या बेतातच होता. त्याच्या आईचा पांढुरका, चिंताक्रांत चेहरा त्याच्या मनश्चक्षूंसमोर त्याला परत बोलावत असलेला उभा राहिला. 'मी त्या ठिकाणावरून पळ काढला. शिकाऱ्याच्या हातून निसटून सावजानं पळ काढावा त्याप्रमाणे मी माझ्या खोलीत थरथरत, धडधडत्या हृदयानं परतलो.' तो म्हणाला की 'माझ्या बायकोशिवाय इतर स्त्रीच्या मोहानं वासनेत वाहून जायचा माझ्या आयुष्यातील हा पहिला प्रसंग होता.' त्या रात्री तो झोपू शकला नाही. केसाएवढ्या

अंतरावरून खोल दरीत घसरण्यापासून वाचल्याबद्दल त्याला आश्चर्य वाटलं. त्यानं त्यानंतर 'आपली खोली न सोडायचं ठरवलं व पहिली संधी मिळताच त्यानं पोर्टस्माऊथ सोडलं. (५५)

दुसऱ्या दिवशी कामकाजविषयक सभा झाल्या. एच. एस. साल्ट ('द रिटर्न टू द नेचर'), श्रीयुत प्रायर ('व्यावहारिक सूचना') आणि श्रीमती हॅरिसन ('गृहिणी आणि अन्न पुरवण्याचा व्यवसाय करणारांना सूचना') यांच्या पेपर वाचनानंतर मोहनला द फूड्स ऑफ इंडिया हा पेपर वाचायचा होता. इथंही लंडनप्रमाणेच त्याच्या पेपरनं बरीच उत्सुकता निर्माण केली होती. त्यावर झालेल्या चर्चेतून निष्पन्न झालं की 'तिळाचं तेल स्वयंपाकासाठी अतिशय उत्तम आहे.' आतापर्यंत इंग्लंडमध्ये ते केवळ औद्योगिक उपयोगासाठी वापरण्यात यायचं. विनंती करण्यात आल्यानंतर श्रीयुत गांधी आणि श्रीयुत मझुमदार यांनी तिळाच्या तेलात तयार करण्यात आलेले पदार्थ भारतातून बोलावून समितीच्या कार्यालयात द्यायचं मान्य केलं.

मोहनला स्वतःवरच खुश होण्यासारखी अनेक कारणं होती. त्याच्या पेपरची स्तुती त्याच्याहून किती तरी ज्येष्ठ लोकांकडून करण्यात आली होती. अन्नातील सुधारणेची चळवळ जेव्हा अगदी बाल्यावस्थेत होती तेव्हा त्यानं त्या चळवळीला हातभार लावण्यासाठी कमीतकमी एक तरी भरीव कृती केलेली होती. सहा शाकाहारी पदार्थांचा बफे व जाहीर सभा त्या दिवसाच्या कार्यक्रमानंतर व्हायची होती. परंतु त्याच्यासाठी प्रत्येक गोष्ट त्याच्या त्या रात्रीच्या अनुभवामुळे धुळीस मिळाली होती. कुणाचीही वाट न पाहता दुपारचं कामकाज आटोपताच तो पोर्टस्माऊथहून व्हेंटॉरला गुपचूप निघून गेला. परंतु त्याचा मित्र मात्र तिथं अजून काही वेळ थांबला.

*व्हेंटॉर गॅझेट*च्या ७ मे १८९१च्या अंकात शेल्टन व्हेजिटेरीअन हॉटेलमधे एम. के. गांधी आणि टी. टी. मझुमदार उतरले असल्याचा पुरावा मिळतो.

तो व्हेंटॉरमधे कमीतकमी ७ मे ते २३ मेपर्यंत थांबला होता. हॉवर्ड विल्यम्सही तिथे होता. शाकाहाराला प्रोत्साहन मिळावं म्हणून तू बोलशील का असं त्याला विचारण्यात आल्यानंतर तो लगेच तयार झाला. इतरही अनेक वक्ते तिथं भाषण देणार होते. त्या कार्यक्रमाचा विषय होता :

'शाकाहार : तो व्यवहार्य आहे काय?' स्वयंस्फूर्तपणे आपण भाषण देऊ शकू की नाही याची खात्री नसल्यामुळे मोहननं आपलं भाषण लिहून काढलं. परंतु सभेत ते वाचण्यासाठी तो जेव्हा उभा राहिला तेव्हा त्यानं सभाधीटपणा गमावला. गांधीजींनी यासंबंधी लिहिलं आहे की, 'माझं भाषण जरी मोठ्या मुश्किलीनं केवळ एखादं पानच होतं तरीही माझी दृष्टी अंधुक झाली व मी थरथर कापू लागलो.' अखेरीस त्याचं भाषण मझुमदारांनी वाचलं.

त्याच वेळी डॉ. जोसेफ नाईटही व्हेंटॉरमार्गे दक्षिण इंग्लंडच्या दौऱ्यासाठी चालले होते. काही दिवसांनी त्यांनी त्याचं वर्णन द व्हेजिटेरीअन मेसेंजरमध्ये व्हेजिटेरीअनॅइझम डाऊन साऊथ अँड राऊंड अबाऊट या मथळ्याखाली केलं. त्यांना 'आपले दोन भारतीय मित्र' शेल्टॉनच्या पथिक निवासात भेटले. 'श्रीयुत गांधी सामान्यपणे शाकाहारासंबंधीचं लेखन करत बसलेले असायचे तर श्रीयुत मझुमदार तिथल्या लोकांच्या मनोरंजनात काही कमी तर पडत नाही ना याकडे सतत लक्ष घालत असल्याचं आढळायचे.' फ्रेंडली सोसायटीच्या हॉलमधील ज्या सभेत मोहन बोलला त्या सभेत ते उपस्थित होते. परंतु आश्चर्य असं की मोहनच्या सभेतील घाबरण्याचा त्यांनी काहीच उल्लेख केलेला नाही. ते लिहितात : 'श्रीयुत मझुमदार आणि श्रीयुत गांधी यांनीसुद्धा भाषणं दिली.' (५६) या दोन वृत्तांतातील अंतरासाठी गांधीजींची अनेक वर्षांनंतर आत्मकथा लिहितानाची स्मरणशक्ती कारणीभूत आहे की जोसेफ नाईट यांनी मुद्दाम त्याकडे दुर्लक्ष केलं हे सांगणं कठीण आहे.

व्हेंटॉर येथे तुलनात्मकदृष्ट्या थोडा विसावा मिळाल्यानंतर मोहनला पोर्टस्माऊथला आलेल्या हृदयविदारक अनुभवावर विचार करायची आवश्यक संधी मिळाली. त्याच्या लक्षात आलं की धर्माच्या केवळ ज्ञानापेक्षा धार्मिक अनुभवाला खरं महत्त्व आहे. केवळ धर्मज्ञान हे भुसकटाप्रमाणे संकटप्रसंगी निरुपयोगी ठरते. ज्ञान, शिक्षण, आध्यात्मिक शिस्त यातील कशाचाच अशा प्रसंगी काहीच उपयोग होत नाही. कसं ते माहीत नाही परंतु आपण ईश्वराकडे जेव्हा संपूर्ण नम्रतेनं आणि काहीच झाकपाक न करता अंतःकरणपूर्वक जातो तेव्हा 'निर्बल के बल बलराम' असलेली केवळ ईश्वरी कृपाच आपल्याला वाचवते.

*सत्त्वपरीक्षेतूनही माणसाला जी टिकवून ठेवते तिची माणसाला कल्पनाही नसते, ज्ञान तर दूरची गोष्ट होते. ईश्वरावर विश्वास न ठेवणारा याचं श्रेय योगायोगाला देईल. तो जर विश्वास ठेवणारा असेल तर तो म्हणेल की देवानं मला वाचवलं. तो असा निष्कर्ष काढील की त्याचा धार्मिक वा आध्यात्मिक अभ्यास या ईश्वरी कृपेमागे आहे. परंतु कृपा व्हायच्या वेळी त्याला माहीत नसते की त्याच्या आध्यात्मिक ज्ञानानं की अजून कशानं त्याला वाचवलं. ज्याला आपल्या आध्यात्मिक शक्तीचा अहंकार वाटतो त्यांचा तो अहंकार कसा धुळीत मिळत असतो हे त्यांना कुठे माहीत असतं ?....*

*मला केवळ अस्पष्टपणे आठवतं की देवानं मला त्याप्रसंगी वाचवलं.... देवानं मला तारलं याचा आज मला खोल अर्थ जाणवतो आणि तरीही मला वाटतं की मला त्याचा संपूर्ण अर्थ कळलेला नाही.... जेव्हा सर्व आशा संपलेल्या असतात, जेव्हा मदत करणारे अयशस्वी होतात आणि समाधान पळून जातं तेव्हा मला आढळतं की कुठून तरी मदत येते, पण ती कुठून येते ते मला माहीत नसतं. भक्ती, प्रार्थना ह्या काही अंधश्रद्धा नाहीत. खाणं, पिणं, बसणं, चालणं याहूनही त्या अधिक सत्य अशा कृती आहेत.... त्याच केवळ खऱ्या आहेत इतर सर्व मिथ्या.*

*अशा प्रकारची भक्ती वा श्रद्धा ही काही केवळ भाषणबाजीतील कल्पनेची उडी नाही. ती केवळ शाब्दिक सहानुभूती नाही. अंतःकरणातील सर्व काही काढून टाकून त्याला रितं करण्यात येतं तेव्हा त्यातून उसळलेला शुद्ध अंतःकरणाचा उद्रेक म्हणजे भक्ती वा प्रार्थना असते. ती स्वतः कोणत्याही ऐंद्रीय प्रयत्नांपलीकडची असते. मला यत्किंचितही शंका नाही की वासनापूर्ण हृदयाला स्वच्छ करण्यांचं अचूक साधन प्रार्थना आहे. परंतु तिच्यासोबत संपूर्ण नम्रता असायला हवी.* (५७)

मोहननं त्याच्या परतीचं तिकीट एस. एस. ओशियानानं काढलं होतं. त्याची निघायची वेळ जसजशी जवळ येत गेली (जून १२) तसतसा तो अस्वस्थ होत गेला. तो अपरिपक्व आणि अननुभवी होता. भारतीय कायद्याचा अभ्यासक्रमात अंतर्भाव नसल्यामुळे त्याला त्याची काहीच माहिती नव्हती. त्यानं मुंबईचे वकील फिरोजशहा मेहता यांच्या भारतीय कायद्यातील

कौशल्यासंबंधी माहिती ऐकली होती. ते 'भारतीय न्यायालयात सिंहाप्रमाणे गर्जत असत.' परंतु त्याच्यासमोर त्याला तर तोंड उघडायचं साहसही होत शकत नव्हतं. या सर्व गोष्टींमुळे वकील म्हणून भारतातील भवितव्याबद्दल तो चिंतित होता.

एका मित्राच्या सूचनेवरून तो हुजूर पक्षाचे वकील फ्रेड्रिक पिन्कट या इंग्रज गृहस्थांना भेटला. ते लंडनमधील भारतीय विद्यार्थ्यांत खास लक्ष घालायचे. पिन्कट हे अतिशय जिव्हाळ्यानं आणि सद्भावनेनं वागले. होऊ घातलेल्या बॅरिस्टरला त्यांनी सांगितलं की 'यशस्वी वकील होण्यासाठी फिरोजशहा मेहता यांच्या कौशल्याची, स्मरणशक्तीची व क्षमतेची आवश्यकता नसते.' (५८) त्यांनी त्याला भरपूर वाचन करून सामान्य ज्ञान वाढवायचा सल्ला दिला. त्याच्यात त्याची अतिशय उणीव होती. वकिलीत यश मिळवण्यासाठी मानवी स्वभावाचं ज्ञान असणं आवश्यक असतं. वकिलाला माणसाच्या चेहऱ्यावरून त्याचा स्वभाव ओळखता यायला पाहिजे. त्यांनी मोहनला काये आणि मॅलेसन यांचं *हिस्ट्री ऑफ इंडियन म्युटिनी ऑफ १८५७* व शेमेलपेनिक्स आणि लॅव्हेटोर यांच्या *फिजियोग्रॅमी* या पुस्तकांच्या वाचनाची शिफारस केली. पिन्कट यांच्या प्रेमळपणानं आणि आश्वासनानं मोहनची काळजी थोडी कमी झाली. त्यानं ताबडतोब लॅव्हेटोर यांचं पुस्तक विकत घेतलं परंतु त्याची फारशी मदत होऊ शकत नाही असं त्याला आढळलं. काये आणि मॅलेसन यांचं पुस्तक दक्षिण आफ्रिकेत गेल्यानंतरच त्याला वाचणं शक्य झालं.

## १२

१५ जून १८९१, शनिवारची सायंकाळ. हॉलबर्न हॉलमधील खोली क्रमांक १९ 'झगमग करत होती व प्लेटा आणि काचेच्या पेल्यांवर वरून दिव्याचा पडणारा प्रकाश व त्यांची परावृत्त होणारी प्रकाश किरणं यामुळे अतिशय सुंदर दिसत होती. टेबल फळं आणि सुंदर फुलांनी सजवण्यात आले होते.' प्रसंग होता मोहननं आपल्या निवडक मित्रांना निरोपसमारंभाच्या निमित्तानं दिलेल्या पार्टीचा - प्रसिद्ध मांसाहारी हॉलबॉर्न हॉलमध्ये खास शाकाहारी जेवणाची

व्यवस्था करण्यात आली होती! आम्हाला सांगण्यात आलं की त्या 'जेवणाची योजना अतिशय काळजीपूर्वक आखण्यात आली होती व ते अतिशय सदभिरुचीपूर्ण होतं' व 'सर्वांनी त्याचा भरपूर आनंद घेतला होता.' तिथं संगीत सुरू होतं आणि अर्थातच भोजनोत्तर व्याख्यानंही. मोहननं या प्रसंगी लहानसं व काहीच वाक्यांचं विनोदी भाषण द्यायचा विचार केलेला होता. त्या तयार करण्यात आलेल्या व्याख्यानातील वाक्य असं होतं : 'मी अतिशय काळजीपूर्वक विचार केलेला आहे.' परंतु त्याची बोलायची पाळी जेव्हा आली तेव्हा त्यानं आत्मकथेत लिहिल्याप्रमाणे ॲडिसनच्या पार्लमेंटमधील प्रसिद्ध पहिल्या भाषणात "I conceive" नंतर ॲडिसन जसा अडकला तसाच तो अडकला. 'इंग्लंडमधे भाषण करायचा हा माझा शेवटचा प्रयत्न होता.... परंतु याही वेळी मी स्वतःला हास्यास्पद करून घेतलं.... 'सदगृहस्थहो, माझ्या निमंत्रणाला मान देऊन आपण सर्व आला याबद्दल मी आपला आभारी आहे' मी एकदम एवढंच म्हणू शकलो आणि खाली बसलो.' (५९) पण लवकरच त्यानं स्वतःला सावरलं व अखेरीस बऱ्या पद्धतीनं निभावून नेलं. १३ जून १८९१ च्या *द व्हेजिटेरीअन*नुसार 'उपस्थितांच्या उपस्थितीमुळे झालेला आनंद व्यक्त करत उपस्थितांचं स्वागत करत श्रीयुत गांधी म्हणाले की इंग्लंडमध्ये मांसाहार वर्ज्य करायची जी सवय वाढते आहे तिचा मला अतिशय आनंद होतो आहे. त्यांनी *लंडन व्हेजिटेरीअन सोसायटी*बरोबर आपले संबंध कशा प्रकारे वृद्धिंगत झाले हे सांगत डॉ. ओल्डफिल्ड यांचे आपण कसे ऋणी आहोत हे भावपूर्ण पद्धतीनं सांगितलं. अखेरीस ते म्हणाले की फेडरेशनची पुढील परिषद भारतात होईल अशी मला अपेक्षा आहे. अशाप्रकारे श्रीयुत गांधींनी थोडं घाबरत पण अतिशय आकर्षक भाषण केलं.'

त्या समारंभाला उपस्थित असलेले श्री. हिल्स यांनी यजमानाला आरोग्यदायी जीवन चिंतिलं. मझुमदारांनी खुसखुशीत भाषणातून 'इंग्लंड आणि इंग्रज लोकांची चौफेर प्रशंसा केली.'

'ध्येयसिद्धीसाठी बाळगावयाचा संयम, अडचणींवर मात करायचा सातत्यानं प्रयत्न याबाबतीत यजमानांनी दिलेल्या धड्याचं कौतुक करत डॉ. ओल्डफिल्ड यांनी व्यक्त केलेली मायदेशी परतणाऱ्या यजमानांबद्दलची आदराची भावनाही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण होती.

बाह्य स्वरूपाला न भुलता त्यांच्या सूक्ष्मदर्शी नजरेला 'तरुण, लाजरा, आत्मविश्वासाचा अभाव असलेला, सडपातळ व काहीसा रोड' असा हा युवक सुरुवातीलाच पडून त्याची ओळख झाली तेव्हा तो त्यांच्याकडे त्याच्या आहारासंबंधी सल्ला घ्यायला एकदा गेला होता. त्यानंतर बऱ्याच काळानंतर, जेव्हा नाटकाचा शेवटच्या अंकाचा पडदा पडलेला होता, तेव्हा त्यांनी आहारविषयक सुधारणा करणाऱ्या आपल्या मित्राच्या लंडनमधील दिवसांसंबंधी लिहिलं, 'भारतीय लोक इंग्लंडमधे येऊ लागल्यापासूनच मला वाटत होतं की त्यांना अशाच कठीण परीक्षेला तोंड द्यावं लागेल. जर त्यात त्यांना अपयश आलं तर सिद्ध होईल की ते सर्वसामान्य बुद्धीचे आहेत व ते इंग्लिश पद्धतीच्या आहाराचा, सवयींचा आणि सामान्य प्रतीच्या जीवनाचा स्वीकार करतील. उलटपक्षी ते जर त्यांच्या श्रद्धेवर अढळ राहू शकले व त्यासाठी मरायचीही त्यांनी तयारी ठेवली तर ते स्वतःचं पुरुषत्व सिद्ध करतील. या प्रकारच्या वर्गातील गांधींचं व्यक्तिमत्व आहे व त्यांच्यावर भारताचं भवितव्य अवलंबून आहे.' (६०)

यानंतर पाच दिवसांनी मोहनला वकिलीची सनद देण्यात आली. त्याच्या दुसऱ्या दिवशी त्यानं आपलं नाव उच्च न्यायालयात नोंदवलं व १२ जून १८९१ला त्यानं मायभूमीच्या प्रवासाला सुरुवात केली.

इंग्लंडच्या आपल्या संपूर्ण मुक्कामात तो परंपरेविरुद्ध लढा देणाऱ्या आणि अती पुरोगामी लोकात वावरत होता. ज्या शाकाहारी चळवळीशी तो एकरूप झाला होता तीसुद्धा पुरोगामी आंदोलनाचाच एक भाग होती. साधी राहणी हा अजून एक भाग होता. दोन्हीही नवजीवनाच्या शोधाचेच भाग होते. सुधारणावादी आंदोलनाच्या एका भागाचं प्रतिनिधित्व हेन्री साल्ट आणि एडवर्ड कारपेंटर करत होते. त्यांची अपेक्षा होती की या धोरणानुसार केलेल्या श्रमामुळे माणूस परत भूमीकडे वळेल व साधं जीवन जगू लागेल. परंतु दुसऱ्या भागाचं प्रतिनिधित्व करणारे वेब्ज, शॉ आणि हिंडमन हे कामाचे कमी तास व 'सांस्कृतिक विकासासाठी भरपूर सवड' असलेल्या औद्योगिक समुदायाचे पुरस्कर्ते होते. पहिला वर्ग पराभूत झाला.

निर्णायक क्षणी इंग्लंडमध्ये विचाराचा जो धागा सोडून देण्यात आला होता तो गांधीजींनी नंतर पकडला. प्रयोगाच्या मार्गावर एका वैज्ञानिकानं टाकून दिलेला प्रयोग दुसऱ्यानं उचलावा व त्यातून त्याला पहिल्याला अनपेक्षित असे दूरवर परिणाम करणारे निष्कर्ष मिळावे अशा प्रकारच्या घटनांनी वैज्ञानिक शोधाचा इतिहास भरलेला आहे. असंच याही बाबतीत घडलेलं होतं. साध्या राहणीच्या गांधीजींच्या प्रयोगातून आपल्याला असं आढळेल की भारतातील खेड्यांच्या आणि त्यांच्या मृतप्राय होत जाणाऱ्या गृहोद्योगांच्या पुनरुज्जीवनाच्या आंदोलनाला चालना मिळाली होती व त्याचं प्रतीक होतं चरखा. त्यांचा शाकाहार विकसित होऊन अहिंसेत परिवर्तित झाला. त्यांच्या नेतृत्वाखालील भारताच्या अहिंसक संघर्षाचे हे दोन मुख्य आधारस्तंभ झाले.

त्यानं शाकाहारासाठी केलेल्या कामामुळे त्याचा श्रेष्ठतम अशा इंग्रज लोकांशी संबंध आला. त्यामुळे शिस्त, साधेपणा, भिडस्तपणा, शांतपणे विचार करणं, ईश्वरावरील श्रद्धा आणि परंपरांचा आदर इत्यादी गुणांनी युक्त असलेल्या ब्रिटिशांच्या चारित्र्याविषयी सखोल आदराची भावना त्याच्यात निर्माण झाली. त्यानंतर २० वर्षांनी जोसेफ डोकजवळ गांधीजी उद्‌गारले की 'आताही भारत सोडला तर इतर कुठेही राहण्यापेक्षा मी लंडनमध्ये राहणं पसंत करेन.' (६१)

त्याची ज्यांच्याशी मैत्री झाली होती त्यातील डॉ. ॲलिसन आणि डॉ. ओल्डफिल्ड हे तो नंतर इंग्लंडला जायचा तेव्हा त्याचे वैद्यकीय सल्लागार झाले. डॉ. ओल्डफिल्ड हे त्याच्या आध्यात्मिक विकासाकडे सतत लक्षपूर्वक पाहायचे. त्यांनी त्याला दक्षिण आफ्रिकेत लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीचं प्रतिनिधी नेमलं होतं व एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या एडवर्ड मेटलँडला आणि गांधीजींना जोडणारे ते मध्यस्थ झाले होते. अखेरीस ते भारतात आले व भावनगर संस्थानात मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून १९२०च्या दरम्यान काम करू लागले. गांधीजींनी १९३१ साली लंडनला भेट दिली असता डॉ. साल्ट यांनी लंडन व्हेजिटेरीअन सोसायटीच्या सभेचं अध्यक्षस्थान भूषवलं होतं. त्याच भेटीत पंचा नेसलेल्या महात्म्याला भेटण्यासाठी काटेकोर पद्धतीनं इंग्लिश पोषाख घातलेले मेत्र दी हॉटेलही आले होते. त्यांनीही

तारुण्यात असताना अठराव्या शतकाच्या आठव्या व नवव्या दशकाच्या दरम्यान 'काळा कोट व सिल्कचा टोप' घातलेल्या 'सभ्य इंग्रज गृहस्थ' होऊ पाहणाऱ्या मोहन बरोबर नृत्याचे धडे घेतले होते. जवळपास तीन वर्षांपूर्वी नुकताच तारुण्यात प्रवेश करणारा मोहन आपली सामान्य दर्जाची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करायला इंग्लंडमध्ये आला होता. त्यावेळी तो स्वतःच अस्थिर होता, निश्चित असे कोणतेही विचार त्याचे तयार झालेले नव्हते, धार्मिक श्रद्धा नव्हत्या व जीवितकार्याची जाणीव अजून निर्माण व्हायची होते. त्याचा मार्ग अडचणींनी भरलेला होता. त्यानं त्या सर्वांवर मात केली. नैराश्याच्या दलदलीतून आणि दरीतून त्यानं प्रवास केला होता. त्याच्या ध्येयाच्या शोधाला भरपूर फळं आली. सिंहावलोकन केलं असता ज्या संघर्षांनी व धोक्यांनी त्याचा जीवनमार्ग भरलेला होता त्यातून सर्वशक्तिमान ईश्वराच्या असीम कृपेनं निष्कलंक बाहेर काढल्याबद्दल आणि तीनही शपथा अभंग ठेवल्याबद्दल तो ईश्वराचा ऋणी होता. *द व्हेजीटेरीअन*च्या प्रतिनिधीजवळ तो उद्‌गारला, 'मी हे सांगण्यासाठी बाध्य आहे की इंग्लंडमधील माझ्या जवळपास तीन वर्षांच्या मुक्कामात .... मी अनेक अशा गोष्टी केल्या की ज्या मी केल्या नसत्या तर कदाचित अजून बरं झालं असतं. आणि तरीही मला फार मोठं समाधान आहे की मी तेथून मद्य वा मांसाला स्पर्श न करत बाहेर पडलो आणि माझ्या स्वतःच्या अनुभवानं मला माहीत आहे की इंग्लंडमध्ये अनेक शाकाहारी लोक आहेत.' (६२)

# प्रकरण १२ वे

# वादळ : आतलं आणि बाहेरचं

१

शनिवार १२ जून १८९१. उन्हाळ्यातील अतिशय सुंदर असा तो दिवस होता. आल्हाददायी आणि लखलखीत. लख्ख आकाशात सूर्य प्रकाशत होता. सकाळी ११.४५ ची जलद गाडी *एस. एस. ओशिआना* जहाजानं बाहेर जाणाऱ्या प्रवाशांना घेऊन बंदरावरील लिव्हरपूर स्ट्रीट स्टेशनला घेऊन चालली होती

१२०० अश्वशक्ती असलेलं ६१८८ टनाचं *ओशिआना* त्या काळात भरपूर सामान वाहू शकणारं व आरामशीर जहाज होतं. बाहेर जाणारे प्रवासी व त्यांना निरोप द्यायला आलेले लोक यांच्यामुळे जहाजाचं डेक जणू आनंदानं न्हाऊन निघालेलं होतं. पी. अॅंड ओ. कंपनीद्वारे त्या सर्वांना चहा देण्यात आला. नांगर उचलून जहाज लवकरच निघणार असल्याची घंटा होताच निरोप घेणारांची गर्दी वितळू लागली आणि हर्षाच्या आरोळ्या व निरोप देणारे रुमाल फडफडवणं सुरू असताना वाफा सोडत जहाजानं किनारा सोडला व आपल्या प्रवासाला सुरुवात केली.

किनारा सोडताना मोहनदासच्या संमिश्र भावना होत्या. दीर्घ काळानंतर मित्र आणि नातलगांच्या सहवासात राहायला मिळायचा एकीकडे आनंद होत होता. दुसरीकडे लंडनमधील विविध प्रकारच्या संस्था, सार्वजनिक उद्यानं, वस्तुसंग्रहालयं, शाकाहारी उपाहारगृहं, चित्रपटगृहं, प्रदर्शनं आदीत तो मनापासून रमला होता व ते सर्व सोडायचं त्याला दुःख होत होतं. तीन वर्षांपूर्वी त्यानं आपल्या आईच्या मांडीवरून एकदम या विशाल जगात उडी घेतली होती. आता तो माणूस होऊन जीवनाच्या जबाबदाऱ्या झेलायच्या तयारीनं मायभूमीत परतत होता. आता त्याला इतर प्रवाशात मिसळायची भीती वाटत नव्हती. शाकाहार आता त्याच्यासाठी समस्या निर्माण करत

नव्हता. जहाजावर केवळ दोन शाकाहारी होते. तशीच वेळ आली तर त्या दोघांचीही उकडलेले बटाटे, काकडी आणि लोणी यांनी काम भागवून घ्यायची तयारी होती. परंतु तशी काही गरज नव्हती. जहाजावरील स्ट्यूअर्डनं त्यांना नियमितपणे भात, रश्शाची भाजी, तपकिरी ब्रेड आणि ताजी व मंद आचेवर उकळलेली फळं प्रथम श्रेणीच्या सलूनमधून द्यायचं कबूल केलं होतं. त्यांना हवं होतं त्याहूनही हे अधिक होतं. मोहनला अन्नपदार्थांची चव चांगली कळायची आणि इतर प्रवाशांपेक्षा तो अन्नाला चांगला न्याय द्यायचा. त्याच्या लक्षात आलं की कोणत्याही अवस्थेत जेवणाच्या वेळी प्रवासी 'अगदी मिनिटानं वेळेवर' हजर राहायचे. 'अगदी सकाळीच झोपेतून उठल्याबरोबर पहिल्या चहाला' चहाच्या काही कपांनी व बिस्किटांनी त्यांची सुरुवात व्हायची व सकाळी साडेआठला ओटची लापशी, काही मासे आणि मांसाचे काप, करी, जाम, ब्रेड आणि लोणी यांची भरपूर न्याहरी करायला ते तयार असत. दुपारी दीड वाजता जेवणात भरपूर मटन आणि भाज्या, भात आणि करी, काही मिठाया आणि अजून काही काही. त्यात आठवड्यातून दोन दिवस भर पडायची सुका मेवा आणि फळांची. यात दुपारी 'ताजंतवानं' करणाऱ्या चार वाजताच्या चहा-बिस्किटांनी व्यत्यय येत नसे. नंतर दोन तासांनी 'भारी चहा' असायचा. त्यात ब्रेड, लोणी, जाम अथवा मार्मालेड, सलाडसहित मटनचे काप व चहा अथवा कॉफीचा समावेश असायचा. आरोग्यवर्धक सागरी हवामानाचे आभार मानत रात्री झोपताना ते 'अगदी कमी, अगदीच कमी म्हणजे ८-१० अधिकात अधिक १०-१५ बिस्किटं, थोडंसं चीज आणि किंचित वाईन अथवा बिअर एवढंच घ्यायचे'! [एम. के. गांधी, *'ऑन माय होम अगेन'*, *द व्हेजीटेरिअन*, एप्रिल ९, १८९२]

जेवणांच्या मधल्या काळात 'गप्पा, पत्ते आणि कुटाळक्या' आदी सुरू असूनही वेळ अतिशय कंटाळवाणा जायचा. त्यावेळी भरपूर पिण्यात येत असे आणि एकदा तर त्यामुळे गुद्दागुद्दीवर वेळ आली होती. त्यातून मुक्तता मिळावी म्हणून प्रवासी गाणी, भाषणं, धावण्याच्या शर्यती, रस्सीखेच यासारख्या कार्यक्रमांना बक्षीस लावायचे. आठवड्यातील एक सायंकाळ गाणी व व्याख्यानं यासाठी राखून ठेवलेली असायची. मोहनदासला वाटलं की 'मधे तोंड खुपसण्यासाठी' ही योग्य वेळ आहे. हे सर्व कार्यक्रम आयोजित करणाऱ्या कार्यवाहाला

शाकाहारावर बोलण्यासाठी त्यानं पाव तासाचा वेळ द्यायची विनंती केली. कार्यवाहानं तत्परतेनं ती मान्य केली. त्यानं तरुण मोहनला व्याख्यान थोडं विनोदी करायची सूचना केली. 'मी घाबरू शकतो पण मी विनोदी बोलू शकत नाही.' मोहन उत्तरला. विरोधात असणाऱ्या श्रोत्यांना तोंड द्यायचं आहे हे माहीत असल्यानं मोहननं भाषणाची चांगली तयारी केली. त्यानं ते पुन्हापुन्हा लिहून काढलं व त्याच्या शब्दाशब्दाची त्यानं नीट योजना केली. पण त्याचं दुर्दैव असं की ती संध्याकाळ कधी आलीच नाही! मागील प्रसंगच प्रवाशांसाठी भरपूर झाला होता. परंतु मोहनमधील उत्साही प्रचारक अशी संधी सोडायला तयार नव्हता. 'मी दोन वा तीन प्रवाशांशी शाकाहाराबद्दल चर्चा करण्यात यशस्वी ठरलो. त्यांनी माझं म्हणणं शांतपणानं ऐकून घेतलं आणि अखेरीस म्हणाले : 'तुझा युक्तिवाद आम्हाला मान्य आहे परंतु जोपर्यंत सध्याचं जेवण आम्हाला आवडतं तोपर्यंत आम्ही ते प्रयोगासाठीही सोडू शकत नाही. (काही काळ आम्हाला अपचन झालं तरीही)'.

आम्हा शाकाहारी लोकांना दररोज जी फळं मिळत होती ती पाहून त्यापैकी एकाला मात्र मोह झाला. त्यानं भाज्या, अंडी व दूध या आहाराचा प्रयोग केला परंतु त्याच्यासाठी मटनच्या कापांचं आकर्षण फार मोठं ठरलं. बिचारा ! [एम. के. गांधी, *'ऑन माय होम अगेन, द व्हेजीटेरिअन*, एप्रिल ९, १८९२]

मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांना एडन येथे *एस. एस. आसाम* या जहाजात हलवण्यात आलं. हेही जहाज *पी. अँड ओ. कंपनीचंच* होतं. या दोन जहाजातील अंतर धक्कादायक होतं. *ओशिआना* स्वच्छ आणि सुव्यवस्थित होतं व सर्वांसाठी त्यात प्रशस्त मोकळी जागा होती. तिथं इंग्रज वेटर होते. ते स्वच्छ आणि नम्र होते. द आसामचा आकार त्याहून निम्मे होता. प्रत्येकाची अवस्था कोंबून भरल्यासारखी झालेली होती. वेटर गोवेकर होते. ते 'अस्वच्छ' होते आणि 'राणीच्या इंग्रजी भाषेचा सतत खून करत होते.' ते लहरी आणि मंद होते.

पावसाळ्याच्या सुरुवातीचे ते जूनचे अखेरचे दिवस होते. त्यावेळी हिंदमहासागर खवळलेला असायची शक्यता असते. दुसऱ्या रात्री हवामान एकदम वादळी झालं आणि पुढील तीन दिवस जहाज हेलकावे खात चाललं होतं. प्रवाशांना जहाज लागल्यामुळे मळमळू लागलं

होतं. न्याहरीचे टेबल ओस पडले होते. खोल्यांची दारं एकमेकांवर आदळत होती व सामानाचं नृत्य जहाजाच्या तळावर चालू होतं. प्रवासी बिछान्यावरून फेकले जात होते व जेवणाच्या वेळी टेबलवरील खाद्यपदार्थ खाणारांच्या तोंडात न जाता त्यांच्या मांडीवर लोळण घेत होते. फुटलेली चिनीमातीची भांडी, उलट्यापालट्या झालेल्या सूपच्या प्लेटा, तिखटामिठाच्या बाटल्यांचे आडवे तिडवे पडलेले स्टॅंड व पिवळ्या रंगानं रंगलेले रुमाल यांनी ते चित्र पूर्ण होत होतं. मोहननं जहाजाच्या कठड्याकडे जायची हिंमत केली पण एका लाटेन कठड्याला दिलेल्या धडकेनं तो परत मागे केबीनच्या दारावर फेकले गेला.

त्यानं स्ट्युवर्डला विचारलं, ‘याला तुम्ही खरोखरीचं वादळ म्हणाल काय?’

‘नाही साहेब, हे काहीच नाही.’ आणि हातवारे करून खऱ्या वादळात जहाज कसं हिंदकळत ते त्यानं दाखवलं.

आतल्या वादळाशी तुलना केली तर हे बाहेरचं वादळ त्याच्यासमोर काहीच नव्हतं. इंग्लंडमधील त्याच्या जीवनात तुलनात्मक दृष्टीनं पाहता आर्थिक काळज्या नव्हत्या, कौटुंबिक जबाबदाऱ्या नव्हत्या आणि घरगुती समस्याही नव्हत्या. आता त्याला वादळी सागरात प्रवेश करायचा होता. त्याच्यासमोर त्याच्या जातीचा, जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचा प्रश्न होता. त्याचबरोबर ज्या सुधारणा त्याच्या मनात सतत घोळत होत्या त्यांची सुरुवात आपल्या घरात कशी करावी ही समस्याही त्याला त्याला छेडत होती.

पाचव्या रात्री जहाज मुंबईला पोहोचलं आणि मोहननं जहाजाचा निरोप घेतला. एस. एस. ओशिआना आणि आसामनं आणलेल्या या प्रवाशांमध्ये विविध प्रकारच्या लोकांचा भरणा होता. ‘काही.... ऑस्ट्रेलियाला मोठ्या अपेक्षांनी जात होते, काहींना कर्तव्यामुळे जाणं भाग पडलं होतं, काही बाया आपल्या नवऱ्यांना भेटायला जात होत्या.... घरात निराशा पदरी पडलेले काही लोक साहस करायला निघाले होते, देवाला माहीत कुठं ते!’ त्याच्या मनात एकच विचार फिरत होता : ‘सर्वांच्या आशांची परिपूर्ती कधी झाली आहे काय?.... अनेकदा आशावान असूनही निराश

व्हायची वेळ किती वेळा माणसावर येते! आपण आशेवरच जगतो.’ [एम. के. गांधी, *'ऑन माय होम अगेन'*, *द व्हेजीटेरिअन*, एप्रिल ९, १८९२]

वादळी हवामानामुळे जहाजाला पोहोचायला वेळ लागलेला होता. संध्याकाळ होऊन बराच वेळ झाल्यानंतर तरुण एम. के. गांधी, बार-अॅट-लॉ कोसळणाऱ्या पावसात धक्क्यावर उतरले. त्यांचे भाऊ लक्ष्मीदास त्यांना घ्यायला आले होते व ते त्यांना घेऊन डॉ. पी. जे. मेहता यांच्या घरी घेऊन गेले. डॉ. मेहता आपला अभ्यास आटोपल्यानंतर इंग्लंडमधून त्याच्या आधीच परतले होते व परतल्यानंतर मोहननं मुंबईत आपल्याकडेच कुटुंबासह मुक्काम करावा असा त्यांचा आग्रह होता. डॉ. मेहतांनी त्याची ओळख आपल्या भावाशी, रेवाशंकर जगजीवन जव्हेरी यांच्याशी, करून दिली. या दोन्ही भावांशी त्याची आयुष्यभराची मैत्री झाली. ते त्याचे सावकार झाले व नंतरच्या आयुष्यात त्याला जेव्हा सार्वजनिक कामासाठी काही अडचण यायची तेव्हा तो त्या भावांवर कितीही आर्थिक ओझं निश्चिंतपणानं टाकू शकत असे.

आईला भेटायची आशा मोहनदासनं आपल्या हृदयाशी घट्ट धरून ठेवली होती. संशय आणि भीतीची भावना ऊराशी बाळगत तिनं त्याला इंग्लंडला जायची परवानगी दिलेली होती. तो तिला म्हणाला होता, ‘आई माझं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी जेव्हा परतेन तेव्हाच मी तुझ्या आशीर्वादासाठी पात्र आहे की नाह ते तुला कळेल.’ त्याला वाटलं की तिला निरोप कळलाच असेल. परंतु त्या बाबतीत अस्वस्थ करणारं मौन होतं. त्याला राजकोटला ताबडतोब परतायची घाई होती. परंतु ते टाळाटाळ करत होते. अखेरीस त्यानं नेमका प्रश्न केला :

‘आई कशी आहे?’

‘ती गेली.’

हळूहळू सर्व काही कळलं. त्याच्या गैरहजेरीत तिची तब्येत ढासळू लागली. रात्रंदिवस ती तिच्या मोनियाशिवाय कशाचाच विचार करत नसे. ज्या दिवशी ते बारची परीक्षा पास झाल्याची तार आली त्या दिवशी ती मृत्यूपंथाला लागलेली होती. तिनं ती बातमी आनंदाश्रू ढाळत ऐकली.

मोनिया केव्हा परतेल म्हणून ती तिच्या मोठ्या मुलाला सारखं विचारत होती. 'मला केवळ त्याचा चेहरा दिसला तर मी सुखात डोळे मिटेन.' ती म्हणाली.

त्यांनी तिला आश्वासित करायचा प्रयत्न केला. पण ती आता निराश होऊ लागली होती. ती त्यांना म्हणाली, 'तो परतेल तेव्हा मी नसले तरी तुम्ही त्याला नाशिकला नेऊन त्याची शुद्धी करून घ्या व राजकोटमध्ये जातीतील सर्व लोकांना जेवण द्या.'

परदेशात त्याला धक्का लागू नये म्हणून तिच्या मृत्यूची बातमी त्याच्यापासून दडवून ठेवण्यात आलेली होती. परंतु त्यामुळे बसणारा धक्का काही कमी झालेला नव्हता. 'माझ्या वडिलांच्या मृत्यूनं झालेल्या शोकाहून माझ्या आईच्या मृत्यूमुळे मला झालेला शोक मोठा होता. मी उराशी बाळगलेल्या अनेक आशांचा चुराडा झाला. परंतु मी माझ्या शोकाचा तमाशा केला नाही. इतकंच नाही तर मी माझे अश्रूही आवरले आणि जणू काही काहीच घडलं नाही असं दाखवत जीवन ज्या स्वरूपात माझ्यासमोर उभं होतं त्या स्वरूपात मी त्याचा स्वीकार केला.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ८७]

## २

प्रत्येक आजारावर उपचार हा असतोच. ज्या रात्री मोहनदासला ती शोककारक बातमी कळली होती त्याच रात्री डॉ. मेहतांनी त्याची अशा माणसाशी ओळख करून दिली की जो त्याला दिलासा देऊ शकत होता व त्याला नितांत आवश्यक असलेलं आध्यात्मिक मार्गदर्शनही करू शकत होता. हे गृहस्थ होते राजचंदभाई. गांधीजींनी त्यांची गणना टॉलस्टॉय आणि रस्किन यांच्याबरोबर केली आहे व आध्यात्मिक बाबतीत तर रशियन ऋषी टॉलस्टॉय यांच्याही वर त्यांना स्थान दिलं आहे. जवळपास त्यांच्याच वयाचे असलेले राजचंद्र हे डॉ. मेहता यांच्या मोठ्या भावाचे जावई होते व रेवाशंकर जगजीवन जव्हेरी या व्यापारी पेढीचे भागीदार होते. जव्हेरी म्हणजे हिऱ्यामोत्यांचा व्यापार करणारा. ते कवी म्हणूनही ओळखले जायचे. त्यांची शतावधानी म्हणून ख्याती होती. शतावधानी म्हणजे एकाच वेळी शेकडो गोष्टींकडे लक्ष देऊ शकणारा. उदाहरणार्थ

एखादा एकाचवेळी पुस्तक वाचतो, व्याख्यान लिहून घ्यायलाही सांगतो, मनातल्या मनात क्लिष्ट गणित सोडवतो, प्रश्नांची उत्तरं देतो, संभाषण ऐकतो, वाद्यवृंदाबरोबर वाद्य वाजवतो, आणि बुद्धिबळही खेळतो आणि त्यानंतर संभाषणातील शब्दनशब्द पुन्हा सांगू शकतो, काय वाचलं त्याची पुनरावृत्ती करू शकतो, प्रश्नोत्तरं काय झाली ते शब्दशः सांगू शकतो आणि बुद्धिबळातील चाली बिनचूकपणे क्रमशः सांगू शकतो त्याला सप्तावधानी म्हणतात. शतावधानी तर शेकडो गोष्टी एकाच वेळी करू शकतो. असं सांगतात की १८८७ साली मुंबईतील निवडक लोकांसमोर, ज्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सर चार्ल्स सार्जंट आणि डॉ. पिटर्सन यांचा समावेश होता, राजचंद्र यांनी आपल्या कौशल्याचा प्रयोग केला. डॉ. चार्ल्स यांनी राजचंद्रांनी युरोपचा दौरा करून आपल्या स्मरणशक्तीच्या कौशल्याचे प्रयोग तिथं करावे असं सुचवलं. परंतु राजचंद्रांनी ती गोष्ट अमान्य केली. काही दिवसांनी त्या गोष्टीचं प्रदर्शन करणं त्यांनी पूर्णपणे बंद केलं.

डॉ. मेहतांनी राजचंद्रांचं असामान्य प्रतिभावंताचं कौशल्य पाहायला मोहनदासला बोलावलं. मोहनदास तरुण होता. त्यालाही आपल्या इंग्रजी भाषेचा काही कमी गर्व नव्हता. त्यानं इंग्रजीतील आठवतील तेवढ सर्व कठीण शब्द, म्हणी, पारिभाषिक शब्द व तो वाचू शकत असलेल्या युरोपमधील भाषांमधील स्मरतील तेवढे शब्द लिहून काढले व ते राजचंद्रांना वाचून दाखवले. त्यानं संपवताच राजचंद्रांनी विनासायास ते सर्व शब्द त्याच क्रमानं पुनरुच्चारित केले. मोहनदास त्यांच्या अद्भुत स्मरणशक्तीनं आश्चर्यचकित झाला. त्यानं त्याचा बालिश गर्व काहीसा कमी झाला. परंतु त्यामुळे काही त्याला त्यांच्याबद्दल आदर वाटू लागला नाही. त्याच्या नंतर लक्षात आलं की राजचंद्रांना धर्मग्रंथांचंही सखोल ज्ञान आहे. परंतु त्याचाही त्याच्यावर तेवढासा प्रभाव पडला नाही. परंतु त्याच्या चारित्र्यातील शुद्धता, स्वयंशिस्त, समतोलपणा आणि आध्यात्मिक परिपूर्णता मिळवण्यासाठी त्यांच्या अंतःकरणाची चाललेली धडपड या त्यांच्या गुणांनी मात्र मोहनदास प्रभावित झाला. राजचंद्र जेव्हा केवळ अठरा वर्षांचे होते तेव्हा त्यांनी केलेल्या पुढील आशयाच्या कवितेतून या गोष्टीला अभिव्यक्ती मिळाली आहे :

*देवा तुझ्या आशीर्वादाच्या त्या अपूर्व क्षणी*
*जेव्हा आतील आणि बाहेरच्या, सर्व गाठी*
*आणि लहानमोठी सर्व बंधनंही होतील मोकळी*
*तेव्हाच चालू शकेन मी*
*त्या पावन झालेल्या मार्गावरून,*
*ज्यावरून चालले तुझे संत आणि महात्मे.*

*अतीताच्या पलीकडे ओढ घेणाऱ्या मनाला*
*आणि त्याच्या सर्व क्षणभंगुर अवस्थांना*
*अजूनच लागला आहे वेध निवृत्तीच्या मार्गाचा.*
*देह आहे साधन स्वयंशिस्तीचं*
*नाही इतर कोणत्याही कारणासाठी*
*नको अजून आता मोह मृगजळाचा*
*जादूई इंद्रियांचा आणि देहाच्या या मातीचा.*

भारतातील त्याच्या दोन वर्षांच्या मुक्कामात मोहनदास राजचंद्रांच्या जीवनाकडे जवळून बारकाईनं पाहत होता - झोपताना, चालताना, काम करताना अथवा विश्रांती घेतानाही. परंतु त्यांच्यात त्याला आसक्तीचा लवलेशही सापडला नाही. उलट श्रेष्ठ प्रतीच्या विरक्तीचंच त्याला त्यांच्यात दर्शन झालं होतं. धोतर, अंगरखा आणि पगडी असा त्यांचा पोषाख असायचा. कपड्यांना इस्त्री केलेली आहे की नाही याची ते कधी चिंता करत नसत. काय खायला आहे याबद्दल ते उदासीन असायचे. जमिनीवर पसरलेल्या आसनावर ते बसायचे. त्यांची हालचाल शांत आणि निश्चलपणाची असायची. ते नेहमी चिंतनात मग्न असल्यासारखे दिसायचे. परंतु त्यांची नजर मात्र सावध आणि तीक्ष्ण, शांत, स्थिर आणि भेदक होती त्यातून एकाग्रतेचं दर्शन व्हायचं. चेहरा गोल, ओठ पातळ, नाक धारदारही नाही आणि बोथटही नाही असं होतं. त्यांचा

बांधा सडपातळ, उंची मध्यम, रंग राखी होता. त्यांच्या हसऱ्या, आनंदी मुद्रेतून प्रसन्नतेचं दर्शन व्हायचं. त्यांच्या आवाजात संगीताचं माधुर्य होतं आणि त्यानं ऐकणारा खिळून राहत असे. त्यांना योग्य शब्दासाठी कधीच अडावं लागत नसे आणि ते जे काही लिहायचे त्यातील शब्द ते क्वचितच खोडायचे व तरीही ते जे काही लिहीत त्यातील प्रत्येक शब्द अचूक असायचा.

त्यांच्या तोंडून वायफळ शब्द कधीच बाहेर पडत नसत. हलकटपणा काय असतो ते त्यांना माहीत नव्हतं. त्यांच्या प्रत्येक कृतीवर समतोलपणा, प्रतिष्ठितता आणि कळकळ यांचा ठसा उमटलेला असायचा. आपल्या सर्व बाह्य कृतींना ते स्वयंशिस्तीचं आणि मुक्तीच्या अंतिम ध्येयाचं साधन समजायचे.

गुजराथी कवी शामल भट यांनी व्यापाऱ्यांचं वर्णन संत म्हणून केलं आहे. श्रीमद राजचंद्र हे त्या आदर्शाचे मूर्त रूप होते. त्यांनी कधीही व्यावसायिक व्यवहारात असत्याचा, पळवाटीचा अथवा अप्रामाणिकपणाचा अवलंब केला नाही. यशस्वी व्यवसाय पूर्णपणे नैतिक मूल्यावर चालवला जाऊ शकत नाही तसंच धार्मिक प्रवृत्तीचा माणूस व्यापार आणि धर्म या दोघांनाही एकत्र सांभाळू शकत नाही हा लोकप्रिय समज त्यांनी खोटा ठरवला. उलटपक्षी त्यांनी दाखवून दिलं की अध्यात्म आणि यशस्वी व्यापार हे हातात हात घालून चालू शकतात. आध्यात्मिक मूल्य अंगी बाणवण्यासाठी व त्याला वाढवण्यासाठी व्यापार हे उपयुक्त क्षेत्र असल्याचंही त्यांनी आपल्या उदाहरणानं दाखवून दिलं.

आध्यात्मिकता अथवा परलोकाविषयीची ओढ आणि चाणाक्षपणा अथवा व्यावहारिकता या गोष्टी परस्पर व्यावर्तक आहेत या हेत्वाभासाच्या खंडनाचे राजचंद्र हे जिवंत उदाहरण होते. त्यांच्यात आध्यात्मिकता आणि उच्च दर्जाचं व्यावसायिक कौशल्य यांचा संयोग झालेला होता. राजचंद्र अगदी साध्या आणि सरळ स्वभावाचे असले तरी त्यांच्या तीक्ष्ण नजरेत कोणत्याही प्रकाराची चालबाजी, तिला लपवायचा कितीही प्रयत्न का करण्यात आलेला असेना, लगेच यायची. जेव्हा कोणी त्यांना फसवायचा प्रयत्न करायचा तेव्हा त्यांच्या जळजळीत नजरेतून आणि कपाळावर पडलेल्या आठ्यातून त्यांना होणाऱ्या तीव्र मनोवेदना स्पष्ट दिसायच्या. त्यांची नैतिक

संवेदनशीलता इतकी तीव्र होती की ते म्हणायचे की मला भाल्यानं भोसकलं तरी मी ते सहन करू शकेन पण असत्य, फसवणूक आणि घाणेरडा व्यवहार मी सहन करू शकत नाही. नंतरच्या काळात गांधीजींमध्येही या स्वभाववैशिष्ट्यांचं दर्शन अजूनच ठळकपणे होऊ लागलं.

त्यांच्या स्पष्ट विचारामुळे पुढील समस्यांची त्यांना आधीच कल्पना यायची व त्या समस्यांचे सर्व बारकावे लक्षात घेऊन आपल्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेनं त्यावर आधीच ते तोडगा सुचवायचे व बहुतेक प्रकरणी तो बरोबर असायचा. ते उत्तम रत्नपारखी होते. कोटीच्या घरात असलेला आणि आशिया व युरोपमधील अनेक देशात पसरलेला व्यवसाय ते सहज सांभाळत होते व त्याच्या काळजीनं ते कधीही व्यग्र नसायचे. एवढंच नाही तर व्यवसायात गुंग असतानाही त्यांचा आत्मा सर्वशक्तिमानाच्या चिंतनात मग्न असायचा. ते नेहमी आपल्या बाजूला धार्मिक वा तत्त्वज्ञानाचं पुस्तक अथवा वही ठेवायचे. जेव्हा केव्हा वेळ मिळायचा तेव्हा ते ती पुस्तकं वाचायचे वा वहीत आपले आध्यात्मिक विचार लिहायचे. ते कितीही व्यस्त असले तरीही आध्यात्मिक प्रश्नासाठी मदत मागायला कुणीही आला तर त्याला ते परत पाठवत नसत.

ज्याला पूर्ण ज्ञानप्राप्ती झालेली आहे त्याला फसवणं अशक्य असतं असं ते नेहमी म्हणायचे. व्यावहारिक माणूस चांगला असूनही साधा असू शकतो. परंतु मुक्तीची आकांक्षा ही चांगुलपणाशी आणि आत्मसाक्षात्कारातून निर्माण झालेल्या सुज्ञपणाशी एकजीव व्हायलाच हवी. ज्याप्रमाणे सत्य आणि अहिंसेच्या उपस्थितीत असत्य आणि हिंसा टिकू शकत नाहीत त्याप्रमाणे दांभिकता आणि ढोंग हे साक्षातकारी माणसासमोर टिकूच शकत नाहीत. प्रेमाच्या उपस्थितीत द्वेष नाहीसा होतो त्याचप्रमाणे स्पष्टवक्तेपणाच्या सूर्यासमोर दांभिकता आणि लबाडी टिकूच शकत नाही. ज्या धार्मिक माणसाला शुद्ध ज्ञानाची प्राप्ती झालेली असेल तो माणूस दांभिक माणसाला पाहताक्षणीच ओळखेल आणि त्या दांभिक माणसाच्या आध्यात्मिक पांगळेपणानं त्याचं अंतःकरण दयेनं भरून येईल. थोडक्यात स्वतःच्या आत्म्याचं ज्ञान झालं की त्यात प्रत्येकाच्या आत्म्याच्या ज्ञानाचाही समावेश होऊन जातो.

श्री राजचंद्र यांचं धर्माविषयीचं ज्ञान एखाद्या ज्ञानकोशासारखं होतं. ते संस्कृत आणि मागधीचे विद्वान होते. त्यांनी वेदांत, गीता आणि भागवत पुराण, जैन धर्मग्रंथं, कुराण, झेंडअवस्ता आदींचा सूक्ष्म अभ्यास केला होता. ते जरी जैन होते तरी ते इतर धर्मांना कमी लेखत नव्हते. मोहनदासला त्यांनी एकदाही आपला स्वतःचा धर्म सोडायला आणि इतर कोणता तरी धर्म मुक्तीसाठी स्वीकारायला सुचवलं नाही. त्यांचा भर वर्तनावर आणि जवळून आणि अजून जवळून आत्मपरीक्षण करण्यावर व आपल्या वर्तनाच्या सुधारणेवर होता. गांधीजींनी त्यांना जेव्हा धर्मावरील मी कोणती पुस्तकं वाचू म्हणून विचारलं तेव्हा त्यांनी त्यांचा स्वाभाविक कल आणि त्यांच्या बालपणीचं वातावरण लक्षात घेऊन गीता वाचायला सांगितलं.

**३**

जैन तत्त्वज्ञानातील तीन गोष्टींनी गांधीजींच्या दृष्टिकोनाला सर्वाधिक प्रभावित केलं. धार्मिक दृष्टीनं त्यात अहिंसेचा समावेश होता तर तात्त्विक दृष्टीनं *अनेकत्ववाद वा स्याद्वादाचा* आणि नैतिक दृष्टीनं शपथेचा. जैनांच्या ज्ञान सिद्धान्तानं ते आकर्षित झाले होते.

धार्मिक दृष्टीनं जैन तत्त्वज्ञान अनेकत्ववादी आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून याला द्वंद्वात्मक विचार पद्धती म्हणतात. जैन शास्त्राप्रमाणे अहिंसा हा नकारात्मक गुण नाही - केवळ हिंसेपासून यांत्रिकपणे दूर राहणे म्हणजे अहिंसा नाही तर सर्व जीव एक आहेत हे जाणून घेऊन सर्व जीवमात्राबद्दल बंधुत्वाची भावना हा अहिंसेचा सकारात्मक अर्थ आहे. ज्या कुणाला या ध्येयाची प्राप्ती झाली तो इतर प्राण्यांच्या दुःखाबद्दल अलिप्त राहू शकत नाही. याशिवाय असा दावा करण्यात येतो की जैन धर्म पहिला असा धर्म आहे की ज्यानं आपल्या विश्वप्रेमात केवळ सर्व मानवांचाच नव्हे तर माणसाच्या खालील सर्व निर्मितीचा, यात वनस्पतीचाही आहे, समावेश केला आहे.

तात्त्विक बाजूनं जैन विचारवंतांनी अनेकत्ववादाचा म्हणजे विविधांगी सत्याचा पुरस्कार केलेला आहे. या दृष्टिकोनानुसार सत्याची संरचना अतिशय गुंतागुंतीची आहे. प्रत्येक सिद्धान्त

खरा असतो परंतु तो विशिष्ट दृष्टिकोनातून. ज्याअर्थी एकाच गोष्टीकडे विविध दृष्टिकोनांतून पाहण्यात येते त्याअर्थी जी गोष्ट एका दृष्टिकोनातून सत्य असते ती दुसऱ्या दृष्टिकोनातून सत्य नसू शकते. उदाहरणार्थ धावत्या गाडीत बसलेल्या प्रवाशाला बाहेरची झाडं उलट दिशेनं पळताना दिसतात तर बाहेर उभ्या असलेल्या माणसाला ती स्थिर दिसतात. कोमट पाणी हे गरम पाण्याच्या संदर्भात थंड आणि थंड पाण्याच्या संदर्भात गरम असते. अशा रीतीनं आपण स्वीकारलेल्या दृष्टिकोनानुसार आपल्याला सत्याचं दर्शन होतं पण त्याचा अर्थ असा नसतो की एकाचा दृष्टिकोन स्वीकारला तर दुसऱ्याचा दृष्टिकोन नाकारायलाच हवा.

एकाच विषयासंबंधी अनेक दृष्टिकोनांची वा परस्पर विरोधी सिद्धान्ताची शक्यता व प्रत्येक सिद्धान्त त्या त्या दृष्टिकोनातून सत्य असण्याची शक्यता यालाच स्याद्वाद अथवा 'शक्यतेचा सिद्धान्त असं म्हणतात. जैन विचारवंतांप्रमाणे सर्व दृष्टिकोन आपापल्या दृष्टिकोनावरच अधिक भर देत असल्यामुळे ते सत्याच्या इतर अंगांकडे दुर्लक्ष करून एकाच अंगाला महत्त्व देतात. त्यामुळे सत्याबद्दलची आपली एकांगी, अपूर्ण आणि चुकीची कल्पना तयार होते. याचं अभिजात उदाहरण आपल्याला सात आंधळ्यांनी हत्तीचं जे वेगवेगळं वर्णन केलं त्या प्रसिद्ध लोककथेतून मिळते. प्रत्येक आंधळा आपल्या दृष्टिकोनातून बरोबर होता व दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून चूक होता. परंतु त्या हत्तीला जाणणाऱ्या माणसाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक आंधळा चूकही होता आणि बरोबरही होता. सत्य जाणण्यासाठी सत्याचा सर्व दृष्टिकोनातून विचार करावा लागतो आणि समग्र दृष्टिकोन स्वीकारावा लागतो.

हेगेलच्या द्वंद्वात्मक सिद्धान्तानुसार जर एखादा अनुभव वास्तव असेल तर त्याच्या तीन गुणांची अभिव्यक्ती व्हायलाच पाहिजे. ते म्हणजे त्याची खात्री करून घेता यायला हवी, त्याला नाकारता यायला हवं आणि त्याचं आकलन करता यायला हवं. जैन विचारवंत सत्याची व्याख्या परिवर्तनामधील चिरंतनत्व, भिन्नतेतही स्थैर्य आणि अनेकत्वात एकत्व अशी करतात. [एस. राधाकृष्णन : *हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी इस्टर्न अँड वेस्टर्न*, जॉर्ज ॲलन अँड अनविन लि. (लंडन), खंड १, पृष्ठ १४०-४१] निसर्गातील प्रत्येक वस्तूत हे तीन गुण असायलाच हवे असं त्यांनी निदर्शनास आणून दिलं आहे. कोयीमध्ये

आंब्याचं झाड अस्तित्वात असते. परंतु कोयीमधे परिवर्तन व्हायला हवं व तिनं नाहीसं व्हायला पाहिजे. असं न झाल्यास रोप वाढणार नाही, त्याची जीवनशक्ती संपेल व ते मरेल. त्याचबरोबर त्याच्या संपूर्ण जीवनकाळात त्याची स्वतःची अशी ओळख कायम राहते. कोयीच्या वाढीच्या या प्रक्रियेतूनच तिचं रूपांतर आंब्याच्या रोपात होतं व रोपाचं रूपांतर कोयीत होतं. वाढणाऱ्या रोपाचं हे वैशिष्ट्य अतिशय महत्त्वाचं आहे.

ज्याअर्थी सत्याची विविध रूपं असतात आणि ती सतत बदलत असतात त्यावरून असा उपसिद्धान्त निघतो की कोणतंही विधान सार्वकालिक सत्य असू शकत नाही, सर्वार्थानं सत्य असू शकत नाही आणि सर्वत्र सत्य असू शकत नाही. त्यामुळे अपरिवर्तनीय सिद्धान्ताला आपण चिकटून राहू शकत नाही. त्याचबरोबर कोणीही आपल्यालाच केवळ सत्याचं दर्शन झालं आहे असा दावा करू शकत नाही.

गांधीजी जिला कृतीचा शब्दकोश म्हणायचे त्या गीतेच्या विचारसरणीचा हाच मूलाधार आहे आणि तिला त्यांच्या जीवनात फार महत्त्वाचं स्थान प्राप्त झालेलं होतं. त्यांची आत्यंतिक सर्वसमावेशकता, केवळ सहनशीलच नव्हती तर ती त्या पलीकडे गेलेली होती, व त्या त्या धर्मातील लोकांच्या दृष्टिकोनातून सर्व धर्म सारखेच सत्य आहेत हे मान्य करण्यावर भर देत होती. त्यामुळे सर्व धर्म मोक्षप्राप्तीच्या साधनाच्या दृष्टीनं सारख्याच योग्यतेचे आहेत या विचारातून त्यांच्या आत्यंतिक सर्वसमावेशकतेचा जन्म झालेला होता.

आपण घेतलेल्या भूमिकेच्या संदर्भानुसार सत्याचं स्वरूप असतं हा सिद्धान्तच गांधीजींच्या सत्याग्रहाचा व अहिंसेचा आधार झाला होता. स्याद्वादावर आपला विश्वास आहे असं त्यांचं म्हणणं होतं. परंतु त्याच्या म्हणण्यानुसार त्यांचा स्याद्वाद विद्वानांचा नव्हता. तो खास असा त्यांचा होता.

*मी अद्वैतवादी आहे व तरीही द्वैतवादाला मी पाठिंबा देऊ शकतो. हे जग प्रत्येक क्षणाला बदलत आहे व त्यामुळे ते सत्य नाही. त्याला शाश्वत अस्तित्व नाही. परंतु ते अशा रीतीनं जरी बदलत असलं तरीही त्यात काही तरी शाश्वत आहे व त्यामुळे त्या मर्यादेपर्यंत हे जग सत्य आहे.*

*त्यामुळे त्याला मिथ्या आणि सत्य म्हणायला माझा आक्षेप नाही. या अर्थानं मी अनेकत्ववादी वा स्याद्वादी आहे.... माझा नेहमीचा अनुभव आहे की माझ्या दृष्टिकोनातून माझी बाजू नेहमी सत्य असते व माझ्या प्रामाणिक टीकाकारांच्या भूमिकेतून ती नेहमी चूक असते. मला माहीत असतं की आम्हा दोघांच्या भूमिकांच्या संदर्भात आम्ही दोघंही बरोबर असतो. या माझ्या ज्ञानामुळे मी माझ्या टीकाकारांवर हेत्वारोपाचा आरोप करत नाही.... सत्याच्या विविध रूपांचा हा सिद्धान्त मला फार आवडतो. याच सिद्धान्तानं मुसलमानाल त्याच्या दृष्टिकोनानुसार व ख्रिश्चनाला त्याच्या दृष्टिकोनानुसार तपासायला मला शिकवलं. पूर्वी माझ्या विरोधकांच्या अज्ञानाची मला चीड येत असे. आज त्यांच्यावर मी प्रेम करतो कारण इतर माझ्याकडे ज्या दृष्टीनं पाहतात त्या दृष्टीनं स्वतःकडे पाहायची व त्या उलट इतर स्वतःकडे ज्या दृष्टीनं पाहतात त्या दृष्टीनं त्यांच्याकडे पाहायची देणगी मला मिळालेली आहे. संपूर्ण जगाला मी माझ्या प्रेमात कवटाळू इच्छितो. माझा अनेकत्ववाद हा सत्य आणि अहिंसा या दोन सिद्धान्तांतून निघालेला आहे.* [*यंग इंडिया*, जानेवारी २१, १९२६, पृष्ठ ३०]

गांधीजींच्या जीवनावर जैन संस्थांमधील मूलभूत परिणाम करणारी तिसरी संस्था म्हणजे शपथेची संस्था आणि वैशिष्ट्यानं रसनेवर विजय मिळवण्यावर दिलेला भर. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटून मोक्ष वा मुक्ती मिळवणं हे जीवनाचं सार आहे व समग्र रूपानं तसंच सूक्ष्म रूपानं कर्म आत्म्यालां प्रकृतीशी बांधते. त्यामुळे जैन शास्त्र सांगतात की माणसानं दैनंदिन जीवनात अशा रीतीनं कर्म करावं की कर्माची वाईट फळं कार्यरतच होऊ नयेत. [*द कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया*, प्रकाशक श्री. रामकृष्ण सेंटेनरी कमेटी, कलकत्ता, कंड १, पृष्ठ २३०] वेगळ्या शब्दात सांगायचं तर माणसानं आपल्या कृतीचं क्षेत्र मर्यादित करत जायला पाहिजे. यासाठी काही नियम वा शपथा सांगण्यात आल्या आहेत. त्यांनाच अनुव्रत असं म्हणतात. ते नियम वा व्रत आहेत - अहिंसा, अस्तेय आणि अपरिग्रह. रसनेवरील नियंत्रण हे स्वतःवरील नियंत्रणाचं पहिलं पाऊल आहे व तेच त्याचं फळही आहे.

काही विशिष्ट प्रकारच्या वर्तनांचा पूर्णपणे त्याग केल्यामुळे आपोआपच आत्म्याचं प्रकृतीशी असलेलं साहचर्य कमी होतं व तेच बंधनाचं कारण आहे.

गांधीजींनी जरी शपथेच्या संस्थेचा स्वीकार केलेला असला तरी त्यांचा त्याकडे पाहायचा दृष्टिकोन अगदी वेगळा होता. शपथेचा उपयोग स्वयंशिस्त बाणवण्यासाठी आवश्यक आहे व मूलतः ती त्यासाठी उपयुक्त आहे तसंच संशयाच्या वा मोहाच्या अवस्थेत ती आपलं संरक्षण करू शकते असं त्यांचं मत होतं. परंतु याबद्दल वेगळ्या ठिकाणी सविस्तर चर्चा करू.

अखेरीस जैनांचा ज्ञानसिद्धान्त येतो. त्यानुसार ज्ञान हा आत्म्याचा अंगभूत गुण आहे. शुद्ध स्वरूपात आत्मा शुद्ध ज्ञान आणि शुद्ध अंतर्ज्ञान आहे. सर्व ज्ञान आत्म्यात असते. वासना आणि भावना यांच्या अडथळ्यामुळे त्याचं शुद्ध स्वरूप अस्पष्ट होतं. त्यामुळे जड कर्मांचा वा अचेतन प्रकृतीचा प्रवाह सुरू होतो व तो आत्म्याला त्याचं संपूर्ण नैसर्गिक कृत्य करण्यापासून अडवतो. [एस. राधाकृष्णन, *इंडियन फिलॉसॉफी*, जॉर्ज ॲलन अँड अनविन लि. (लंडन), (१९२९), खंड १, पृष्ठ २३८ (संदर्भ एसोटेरिक ख्रिश्चन युनियन्स डॉक्टराईन, पृष्ठ ३२१)] डॉ. राधाकृष्णन यांच्या शब्दात 'जीवनाच्या भौतिक स्वार्थात.... आमचं ज्ञान लगतच्या उपयोगी गोष्टींपर्यंत मर्यादित राहते. त्यामुळे सत्याच्या अंगांमध्ये आपल्याला स्वारस्य नसल्यामुळे व आपण निवडक गोष्टींकडे पाहत असल्यामुळे ते आपल्या दृष्टीआड होते.' [एस. राधाकृष्णन, *इंडियन फिलॉसॉफी*, जॉर्ज ॲलन अँड अनविन लि. (लंडन), (१९२९), खंड १, पृष्ठ २३८ (संदर्भ एसोटेरिक ख्रिश्चन युनियन्स डॉक्टराईन, पृष्ठ ३२१)] जैन तत्त्वज्ञानाचं म्हणणं आहे की जेव्हा आत्मा आपल्या पूर्वीच्या शुद्ध स्वरूपात येतो तेव्हा त्याला भूत, वर्तमान आणि भविष्यकाळातील सर्व गोष्टींची सर्वज्ञता प्राप्त होते.'

गांधीजींची मान्यता होती की जो माणूस वासनांच्या वादळानं अस्वस्थ होत नाही व ज्याचा स्वार्थ पूर्णपणे निघून गेलेला असतो किंवा डॉ. राधाकृष्णन सांगतात त्याप्रमाणे 'जेव्हा आत्मा आपल्या नैसर्गिक गतीनं स्पंदन करू लागतो व आपलं कार्य असीम ज्ञानाच्या आधारवर करू लागतो तेव्हा त्याला अचूक अंतर्ज्ञानाची प्राप्ती होते.' [एस. राधाकृष्णन, *इंडियन फिलॉसॉफी*, जॉर्ज ॲलन अँड अनविन लि. (लंडन), (१९२९), खंड १, पृष्ठ २३८ (संदर्भ एसोटेरिक ख्रिश्चन युनियन्स डॉक्टराईन, पृष्ठ ३२१)]

याला कारण जैन धर्माचा सरळ प्रभाव नव्हता तर गुजरातमधील वैष्णवपंथावर जैन धर्मातील विचारांचा जो परिणाम झाला होता त्याचा हा परिणाम होता. त्या वैष्णवधर्माचं पालन करत असतानाच गांधीजी जैन धर्मातील अनेक व्रतांचं पालन करू लागले. या प्रक्रियेमध्ये त्यांनी त्या व्रतांमधे नवीन अर्थ ओतला व त्यांची स्वतःच्या विवेकाप्रमाणे मीमांसा केली. अखेरच्या वर्षात

जैनांच्या काही परंपरांविरुद्ध त्यांनी कठोर टीका केली कारण त्यांचं म्हणणं होतं त्या जैन धर्माच्या खऱ्या तत्त्वाशी सुसंगत नाहीत. ते त्यांचं विडंबन आहे. [श्रीमद राजचंद्र यांच्या जयंतीच्या दिवशी अहमदाबाद येथे १९२१ साली जैन तत्त्वज्ञानात अहिंसा या विषयावर गांधीजी म्हणाले: 'कवी म्हणत असत की जैन धर्म श्रावकांच्या हाती पडला नसता तर त्याच्या विचारातील खोलीनं जगाला आश्चर्यचकित केलं असतं. बनियांनी जैन धर्माचं विडंबन केलं आहे. ते मुंग्यांना खाऊ घालतात आणि बटाटे वर्ज्य करतात. चुकून जर त्यांना बटाटे खाऊ घालण्यात आले तर त्यांना पश्चात्ताप होतो..... ते त्यात आनंद मानू शकतात (जर त्यांना त्यात समाधान मिळणार असेल तर) परंतु त्यांना जर असं वाटत असेल की हेच जैन धर्माचं संपूर्ण सार आहे तर त्यांची धर्मविषयक संकल्पना आध्यात्मिक दृष्टीनं प्रकाशाकडे नेणारी होण्याऐवजी अधःपतनाकडे नेणारी होईल. (नवजीवन, नोव्हेंबर २४, १९२१)] अनेक वर्षांपासून त्यांना स्याद्वादासंबंधी प्रबंध लिहायची इच्छा होती परंतु तसं व्हायचं नव्हतं.

## ४

श्रीमद राजचंद्र यांच्याबद्दल गांधीजींना अतिशय आदर होता. त्यांच्या शिकवणुकीचं व मार्गदर्शनाचं गांधीजींवर ऋण होतं. गांधीजींचा गुरुसंस्थेवर विश्वास होता व एखादा गुरू मिळावा अशी गांधीजींची इच्छाही होती, तरीही गांधीजी श्रीमद राजचंद्रांना गुरू करू शकले नाही. हिंदू धर्मात गुरुसंस्थेला आगळंच महत्त्व आहे. संपूर्ण मार्ग ओलांडलेला व त्या मार्गाशी पूर्णपणे परिचित असणारा गुरू सिद्धहस्त विद्वान असतो. त्याची संपूर्ण शरणागतीची मागणी असते वा आपल्या संपूर्ण व्यक्तिमत्वाच्या प्रभावाद्वारे तो आपल्या शिष्याला अंतःकरणपूर्वक, उत्स्फूर्तपणे संपूर्ण शरणागती पत्करायला लावतों असं म्हटलं तरी चालेल. गुरू जे काही म्हणतो ते शिष्याच्या अंतःकरणात बुद्धीच्या मदतीशिवाय सरळ शिरते. याचा अर्थ होतो गुरूबद्दलची सखोल भक्ती आणि संपूर्ण श्रद्धा. त्यात प्रश्नाला, टीकेला वा संशयाला जागा नसते. एकदा अशा प्रकारची शरणागती पत्करण्यात आली की शिष्य आणि गुरूमध्ये एक मानसशास्त्रीय 'बदल' घडू लागतो व त्यामुळे शिष्याचं हळूहळू गुरूच्या स्वरूपात परिवर्तन होऊ लागतं. मोहनदासची श्रीमद राजचंद्रांवर एवढी भक्ती असूनही ते निःशंक शरणागती पत्करायला लावू शकले नाहीत. गांधीजींना युक्तिवाद करायची, प्रश्न विचारायची आणि समजून घ्यायची गरज वाटत होती. एवढंच नाही तर त्यांच्या दृष्टीला राजचंद्रांच्या ज्या उणिवा दिसत होत्या - अभ्यासात व्यवसायाची भेसळ, धार्मिक सूचना देत असताना व्यवसाय करत राहणं, कामाचं त्यांचं अतिरिक्त वेड व

प्रकृतीच्या नियमांकडे दुर्लक्ष इत्यादी – त्यावर ते टीकाही करत होते. गांधीजींचा 'एका वेळी एकच विश्व' या सोनेरी नियमावर पूर्ण विश्वास होता व शतावधानी ऋषीही त्याकडे दुर्लक्ष करू शकत नव्हते. ज्या माणसानं संपूर्ण वैराग्य प्राप्त केलेलं आहे तो एका गोष्टीकडे लक्ष देईल अथवा दुसऱ्या असं गांधीजींचं म्हणणं होतं. भेसळ ही एक वाईट अनुभूती व अनिष्ट उदाहरण आहे.

या शिवायही त्यांच्यात मतभेदाचे मुद्दे होते. खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींच्या बाबतीत परंपरागत खानपानाच्या नियमांवर आर्य संस्कृतीचा भाग म्हणून श्रीमद राजचंद्रांचा विश्वास होता. त्यांच्या तरुण शिष्यानं या बाबतीत त्यांच्याशी वाद घातला. खालच्या जातीतील माणसानं स्वच्छतेचे सर्व नियम पाळले व निषिद्ध आहारविहारांच्या बाबत कर्मठ परंपरावादी माणसाप्रमाणे तो दूर राहिला राहिला तर त्याच्याबरोबर खाण्यापिण्यात आक्षेपार्ह काय आहे असं गांधीजींनी त्यांना विचारलं. परंपरागत दृष्टिकोनाचा स्वीकार करत राजचंद्र म्हणाले की इतर सर्व दृष्टींनी असं करण्यात काही वाईट नाही असं जरी आढळून आलं तरी जनमताच्या दृष्टीनं तसं करणं योग्य होणार नाही. यामुळे या गोष्टीची पूर्ण जाणीव वा परिस्थितीचं आकलन नसलेल्या साध्यासरळ लोकांसमोर वाईट उदाहरण ठेवलं जाईल. त्यामुळे तुम्हांला सार्वजनिक हितासाठी अहिंदूंकडील आमंत्रण स्वीकारणं आवश्यक वाटलं तरी तुम्ही तिथं फळफळावळापेक्षा इतर काही खाऊ नये. हा सल्ला शुद्ध शिष्य संयमासाठी ऐकायला तयार होता. परंतु जसजसं गांधीजींच्या नजरेस हिंदू धर्माच्या सोवळेपणाचं स्वरूप उघड होऊन त्यातील दोषाची जाणीव होऊ लागली व धर्माचा अर्थ केवळ स्पर्शास्पर्श एवढाच राहिलेला त्यांना आढळू लागला तसतसा त्यांचा आत्मा त्याविरुद्ध बंड करू लागला व अखेरीस त्या प्रथेला हिंदू धर्मावरील कलंक असं गांधीजींनी घोषित केलं. जातीयतेमुळे पडणाऱ्या फुटीरपणासाठीही तेच मूळ कारण आहे असं त्यांचं म्हणणं होतं. याच कारणामुळे भारतातील इतर धर्मही प्रभावित झाले व त्यांचाही अधःपात झाला असल्याचं गांधीजी म्हणाले.

श्रीमद राजचंद्र भारतसोडून इतर देशांना अनार्य भूमी म्हणजे रानटी लोकांची भूमी समजत असत व गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील मुक्कामाचा त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीवर विपरीत

परिणाम होईल अशी आशंका राजचंद्रांना वाटत होती. अंड्यातून बाहेर पडलेली बदकं भ्रमामुळे आपलीच आहेत असं समजून त्यांना पहिल्यांदाच तळ्याकडे घेऊन जाणाऱ्या कोंबडीप्रमाणे राजचंद्रांना गांधीजींबद्दल भीती वाटली असावी असा बाहेरून पाहणाराचा समज झाल्यास नवल नाही. ब्रह्मचर्याच्या बाबतीत असं म्हणता येईल की श्रीमद राजचंद्रांनी गांधीजींना सर्वांपेक्षा अधिक प्रभावित केलेलं असावं. परंतु याबाबतीतही गांधीजींनी गुरूनं सांगितलेला परंपरागत नऊपदरी भिंतीचा पायंडा अमान्य केला व त्याऐवजी स्वतःच्या तत्त्वज्ञानाचा विकास केला. त्यामुळे कर्मठ लोक त्यांच्याकडे आ वासून पाहत राहिले. ['शास्त्रांमधे ब्रह्मचर्य स्वीकारू इच्छिणाऱ्यासाठी काही नियम सांगितलेले आहेत - जिला नवविधा बंधनांची भिंत म्हणतात. त्या नियमांप्रमाणे ब्रह्मचाऱ्यानं स्त्रियात, जनावरांत आणि नपुसकांत राहू नये, त्यानं स्त्रीला एकटीला वा गटातही शिकवू नये, ज्या आसनावर स्त्री बसलेली असेल त्या आसनावर बसू नये, स्त्रीच्या शरीराच्या कोणत्याही अवयवाकडे पाहू नये, दूध, दही, तूप वा अन्य कोणतेही स्निग्ध पदार्थ घेऊ नये तसंच गरम पाण्यानं आंघोळ करू नये आणि तेलानं मालीश करू नये.' (प्यारेलाल, महात्मा गांधी – *द लास्ट फेज*, खंड १, पृष्ठ ५७०)] व्यायामाकडे आणि आरोग्याच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे व थोडक्यात सांगायचं तर अतिशय ताणामुळे श्रीमद राजचंद्र वयाच्या अवघ्या ३३व्या वर्षी अकाली मरण पावले. गांधीजींच्या दृष्टीनं हे त्यांच्या अपूर्णतेचं चिन्ह होतं. जो माणूस सर्व बंधनातून मुक्त झालेला आहे त्यानं आपल्या खेचराबद्दलसुद्धा बंधुभाव बाळगायला पाहिजे. त्या गरीब प्राण्याच्या पाठीला झेपेल एवढंच ओझं त्याच्यावर टाकायला पाहिजे. आपण जर स्वतःला ईश्वरी इच्छेचं साधन मानलं तर आपण आपल्या शरीराकडे ईश्वरानं ठवलेली ठेव म्हणून पाहू व त्याप्रमाणे त्याची काळजी घेऊ. केवळ मुक्तीसाठी त्या शरीराचा उपयोग करू. अशा कामांची जबाबदारी आपण स्वतःवर घेऊ नये की जी आपल्या देहाच्या क्षमतेच्या पलीकडील आहेत. राजचंद्रांना शारीरिक त्रास झाला हे त्यांच्या पूर्ण विरक्तीचं लक्षण नाही असं गांधीजींना वाटत होतं. गांधीजींचं म्हणणं होतं की सर्व रोग हे आसक्तीचे द्योतक असतात, जिथे राग (आसक्ती) नाही तिथं रोग असू शकत नाहीत व ज्याला रागापासून मुक्ती मिळू शकत नाही त्याला मोक्षप्राप्तीही होऊ शकत नाही. त्याचाच अर्थ असा की असा माणूस ज्यासाठी अथक प्रयत्न करत असतो त्या मोक्षाच्या तो कितीही जवळ पोहोचलेला असला तरीही जन्ममृत्यूच्या फेऱ्यातूनही तो मुक्त होऊ शकत नाही. हे विचार व्यक्त केल्यामुळे राजचंद्रांचे जे कट्टर भक्त होते त्यातील काहींच्या मैत्रीला गांधीजी मुकले. राजचंद्रांच्या समग्र वाङ्मयासाठी

गांधीजींनी लिहिलेला पुरस्कार व त्यांच्यासंबंधीच्या आठवणी त्या ग्रंथात त्यांनी प्रकाशित केल्या नाहीत!

अशा रीतीनं सिंहासन रिक्त राहिलं. त्यांचा गुरूचा शोध सुरूच होता. अखेरीस त्यांच्या लक्षात आलं की एका परिपूर्ण धर्माच्या शोधाप्रमाणेच परिपूर्ण गुरूचा शोध आहे. परिपूर्ण धर्म सापडण्यापेक्षा त्याचा शोधच जसा महत्त्वाचा असतो तसाच प्रकार इथंही आहे व तेच मुमुक्षूचं बक्षीस असते. त्यांनी जाहीर केलं की सत्य हाच माझा गुरू आहे. जोपर्यंत माणूस शरीराच्या बंधनानं बांधलेला आहे तोपर्यंत गुरूच्या शोधाची सिद्धी होऊ शकत नाही.

जोपर्यंत श्रीमद राजचंद्र जिवंत होते तोपर्यंत ते गांधीजींना आत्म्याच्या यात्रेत मार्गदर्शन करत होते. शिष्यानं गुरूची सर्वच शिकवण मान्य केली नाही व कदाचित त्यातील कोणतीही पूर्णपणे मान्य केली नसावी. परंतु त्यांची भेट व्हायच्या आधी होकायंत्र नसलेल्या व दिशाभान न राहिलेल्या एखाद्या नावाड्याची जशी अवस्था असावी तशी गांधीजींची अवस्था होती. त्यांची भेट झाल्यानंतर गांधीजींची तशी अवस्था राहिली नव्हती. आणि अखेरीस तर शिष्य आपल्या गुरूच्या शिकवणुकीच्याही पुढे निघून गेला. हासुद्धा गुरूच्या शिकवणुकीचाच भाग होता.

## ५

मोहनदास इंग्लंडमधून परतत असताना तो जेव्हा भर समुद्रातच होता तेव्हा ज्ञातीचे प्रमुख असलेल्या महाजनांच्या वतीनं, ज्या जातीचे गांधीजी होते त्या जातीत म्हणजे संपूर्ण मोध बनिया समाजात एक ब्राह्मण फिरला व त्यानं सर्वांना सावध करत सांगितलं की जातिबहिष्कृत गांधीकुटुंबाशी कोणीही संबंध ठेवू नये. जर कोणी त्यांच्याकडून पेलाभर पाणी जरी घेतलं तरी त्याला जातीबाहेर काढण्यात येईल. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य अस्वस्थ झाले. तरुण मोहन परतल्यानंतर त्याला परत जातीत घेता यावं म्हणून त्याच्या शुद्धीकरण समारंभाची व्यवस्था त्यांनी केली. त्यांनी मोहनदासला त्याच्या आईची शेवटची इच्छा सांगितली. समाजात या मुद्यावर दुफळी पडलेली होती. त्यातील एक गट शुद्धीकरणाच्या साध्या समारंभानंतर मोहनला समाजात

परत घ्यायला तयार होता तर दुसऱ्या गटाचं मत होतं की अपराध्यानं जबरदस्त दंड भरायला हवा. तसं करायला मोहननं साफ नकार दिला. घरातील मोठ्या माणसांनी त्याला सांगितलं की आमचंही हेच मत आहे व काहीही झालं तरी या बाबतीत आम्ही पूर्णपणे तुझ्या पाठीशी आहोत.

पहिल्या वर्गाला शांत करण्यासाठी त्यांनी त्याला नाशिकला नेलं व तिथं त्याचा शुद्धीकरणाचा समारंभ पार पडला. त्याला ते आवडलं नाही परंतु आपल्या मोठ्या भावासाठी, ज्याचा शब्द त्याच्यासाठी कायद्याप्रमाणे होता, व आईच्या शेवटच्या इच्छेसाठी त्याला सांगण्यात आलं तसं त्यानं केलं.

समारंभानंतर ते सर्व राजकोटला परतले. जातीतील सर्व लोकांना जेवणासाठी बोलावण्यात आलं. त्या सर्वांनी मनापासून त्या निमंत्रणाचा स्वीकार केला. गांधीजींच्या नव्वदीच्या घरात असलेल्या बहिणीच्या सांगण्याप्रमाणे गांधीजींनी आपल्या हातानं स्वयंपाकाच्या पदार्थांनी भरलेली भांडी समारंभाच्या ठिकाणी न्यावी अशी कुटुंबातील मोठ्या लोकांची इच्छा होती. गांधीजींना ते मान्य नव्हतं. परंतु त्यांनी 'सदरा वगैरे काढून उघड्या अंगानं जेवायला आलेल्या सर्व पाहुण्यांना प्रथेप्रमाणे वाढलं.'

परिणामी राजकोटमधील जातीचा बहिष्कार उठला, परंतु मुंबई आणि पोरबंदरमधे तो चालूच होता. गांधीजींनी लिहिलं, 'ज्या वर्गानं मला प्रवेश नाकारला होता त्यांच्याकडे मी पुन्हा प्रवेशासाठी प्रयत्न केला नाही, व त्यातील समाजप्रमुखांबद्दल मला कधी रागही आला नाही.' त्यांच्या बायकोच्या माहेरचे लोक गुप्तपणे त्याच्यावरील बहिष्कार दूर करायला तयार होते परंतु 'त्यांच्या घरात मी पाणीही पीत नसे.... मला परत घेण्यात यावं म्हणून मी खळबळ केली असती तर... आंदोलनांच्या भोवऱ्यात मी सापडलो असतो व मला ढोंगात सहभागी व्हावं लागलं असतं.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ९१] असलेल्या परिस्थितीत त्यांना जातीतील लोकांकडून कधीही त्रास झाला नाही उलट कधीकधी त्यांनी मदतच केली.

त्यांच्या भावानं ते घरी येणार म्हणून जय्यत तयारी केली होती. त्यांनी घराची डागडुजी करून त्याला चुना मारला होता. कौलांच्या खाली छत लावण्यात आलं होतं, अगदी नवीन

फर्निचर व महागडी क्रोकरी विकत घेण्यात आली होती. त्या भल्या माणसाला वाटलं असावं की आपला भाऊ आल्याबरोबर खोऱ्यानं पैसा ओढू लागेल. मोहनदासनं या उधळपट्टीबद्दल नाराजी दाखवली, परंतु 'सुधारणां' बद्दल मात्र तो आग्रह धरू लागला. याचा अर्थ होता काटा चमच्यांचा आणि चिनीमातीच्या भांड्यांचा उपयोग करणं, युरोपिअन पद्धतीचा पोषाख करणं आणि आहारातील बदल. ओटमिलची सोजी न्याहरीत वाढण्यात येऊ लागली, चहा आणि कॉफीची जागा कोकोनं घेतली. परंतु त्यामुळे अजून एका पेयात भर पडण्याशिवाय वेगळं काही घडलं नाही. या सर्वांमुळे आधीच बेताच्या आर्थिक परिस्थितीवर अजूनच ताण पडला.

गरीब बिचारी बायकोही त्या 'सुधारणांच्या' तडाख्यात सापडली. बॅरिस्टरची बायको शोभावी म्हणून तिला सुशिक्षित होण्यासाठी लिहिणं वाचणं शिकणं आवश्यक होतं. परंतु हा प्रयत्नही पूर्वीप्रमाणेच अडखळला व त्यासाठी कारणंही पूर्वीचंच होतं. तरुण नवरा आता अजून काही नाही तरी अधिक असहिष्णू झाला होता. अजूनही त्याच्यातील मत्सराचं भूत निघालं नव्हतं. एकदा तर तिला माहेरी पाठवायच्या पातळीवर तो गेला व 'तिला लाजिरवाणं केल्यानंतरच' त्यानं तिला परत आणलं.

तरीही मुलांना शिकवण्याच्या बाबतीत गांधीजींना अधिक यश आलं. त्यांचा सर्वात मोठा मुलगा आता तीन वर्षांचा झाला होता. मुलांना काटक बनवण्यासाठी त्यांनी त्यांच्यावर नियमितपणे व्यायाम करायची सक्ती केली. त्यांना मुलांचा सहवास आवडायचा व मुलांना त्यांचा. अनेकदा त्यांना ते आपल्याबरोबर बाहेर फिरण्यासाठी घेऊन जायचे, त्याच्यातील एक-दोन लहानग्यांना ते आपल्या खांद्यावर घ्यायचे व रस्त्यावरील तळ्यावर त्यांना आंघोळ घालायचे. गांधीजी लिहीतात, 'तेव्हापासून मला वाटायला लागलं की मी मुलांचा चांगला शिक्षक होऊ शकेन.'

परंतु मध्यंतरीच्या काळात घरातील चूल कशी पेटती ठेवायची? ते नवखे होते. एकही अशील त्यांच्याकडे आला नाही व आपल्याकडे येण्याएवढा कोणी मूर्ख असेल अशी त्यांची

अपेक्षाही नव्हती. उच्च न्यायालयाचा अनुभव घेण्यासाठी काही दिवस त्यांनी मुंबईला जायचं ठरवलं. जे काही खटले मिळतील ते घेऊन भारतीय कायद्याचा अभ्यास करायचं त्यांनी ठरवलं.

मुंबईला थाटलेल्या लहानशा घरात त्यांनी रेवाशंकर नावाचा एक ब्राह्मण स्वयंपाकी ठेवला. भारतीय कायद्याचा अभ्यास त्यांना कंटाळवाणा वाटला. कोणताही खटला त्यांच्याकडे आला नाही. त्यातही त्यांनी दलाल नेमायला खंबीरपणे नकार दिला. करण्यासारखं फारसं काही नसल्यामुळे त्यांनी 'जगण्यासाठी अत्यावश्यक आहारावर' प्रयोग करायला सुरुवात केली. कायदेपंडिताच्या परीक्षेचा अभ्यास करत असलेला त्यांचा मित्र वीरचंद गांधीही त्या प्रयोगात सामील झाला. जीवनसत्त्वांच्या शोधाच्या आधी अती शिजवण्यामुळे अन्नातील पोषक तत्त्वाच्या होणाऱ्या नाशासंबंधी प्रायोगिक तत्त्वावर अनेक प्रमेये मांडण्यात आली होती. १८८९ साली श्रीयुत ए. एफ. हिल्स, अध्यक्ष, व्हेजीटेरिअन सोसायटी यांनी असा सिद्धान्त मांडला की सूर्यशक्तीमुळे 'नैसर्गिक अन्नपदार्थात' साठलेली पोषक तत्त्वं शिजवण्यामुळे नाहीशी होतात. त्यांनी फळं, कठीण कवच असलेली फळं, धान्य आणि डाळी - सर्व कच्चे - घ्यायची शिफारस केली. याला जीवनावश्यक आहार असं नाव देण्यात आलं. डॉ. हिल्स त्याला 'नंदनवनातील पहिलं अन्न' म्हणायचे. गांधीजींनी त्यावर एक आठवडा प्रयोग केला. त्यावेळी त्यांना ते फार मानवलं आणि 'मी जर अधिक दिवस ते चालू ठेवू शकलो असतो तर ते मला मानवलं असतं.' परंतु ते त्यांना सोडावं लागलं कारण त्यावेळी त्यांना अनेक मित्रांचं आदरातिथ्य करावं लागत होतं व शिवाय इतर काही सामाजिक कारणंही होती.' [एम. के. गांधी, *'ॲन एक्सपेरीमेंट इन व्हायटल फुड'*, *द व्हेजीटेरिअन*, मार्च २४, १८९४]

ब्राह्मण स्वयंपाक्याच्या मदतीनं त्यांनी नंतर इंग्रजी पद्धतीच्या शाकाहारी स्वयंपाकाच्या प्रयोगास सुरुवात केली. 'त्यातील निम्मे स्वयंपाक मीच करत असे.' स्वयंपाक्याला त्या कलेचं काहीच ज्ञान नव्हतं, त्याला धर्मग्रंथांचं अगदीच ज्ञान नव्हतं, आणि सहनशीलतेच्या पलीकडे तो घाणेरडा होता. परंतु त्या दोघांनाही सोबत जेवण्यासाठी जातीची आडकाठी येत नसल्यामुळे ते एकत्र राहिले. रेवाशंकरला तुला संध्या येते का म्हणून विचारलं असता तो म्हणाला की नांगर

माझी संध्या आहे व फावडं माझा विधी. त्यामुळे मोहनदास त्याचा शिक्षक झाला. 'मी त्याला नोकरासारखं वागवत नव्हतो तर कुटुंबातील एका सदस्यासारखा वागवत होतो.'

गांधीजी दररोज उच्च न्यायालयात हजर राहत असत परंतु त्यांना भारतीय कायद्याचं ज्ञान नसल्यानं खटल्याचं कामकाज समजत नसे व त्यांना तिथेच डुलक्या येत असत. इतरही असंच करतात या ज्ञानानं त्यांना उत्तेजन मिळायचं. 'काही काळानं मला लाजही वाटेनाशी झाली कारण उच्च न्यायालयात डुलक्या घेणं ही फॅशन आहे असा विचार करणं मी शिकलो होतो.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ९६]

अखेरीस मामीबाई नावाच्या प्रतिवादी अशिलानं लघू प्रश्न न्यायालयात आपली बाजू मांडण्यासाठी त्यांना नेमलं. परंतु आरोपीच्या साक्षीदाराची उलटतपासणी करायची जेव्हा वेळ आली तेव्हा ते पूर्णपणे घाबरले : 'मी उभा राहिलो, मी नखशिखांत घाबरलो होतो. माझं डोकं गरगरत होतं व न्यायालय गोलगोल फिरत आहे असं मला वाटलं. काय प्रश्न विचारावे याचा मी विचारही करू शकत नव्हतो.... मी खाली बसलो.' त्यांनी एजंटला सांगितलं की मी खटला हाताळू शकत नाही. त्यांनी त्याला फीचे ३० रुपये परत केले आणि दुसरा वकील नेमायला त्याला सांगितलं. अशिलानं लगेच दुसरा वकील ५१ रुपयात नेमला. 'त्याच्यासाठी अर्थातच ते काम मुलाच्या खेळासारखं होतं.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ९१]

लाजेनं मेल्याहून मेल्यासारखे होऊन ते घरी पोहोचले आणि ठरवलं की जोपर्यंत आपण अशिलाला न्याय करू शकत नाही तोपर्यंत दुसरा खटला चालवायला घ्यायचा नाही. त्यांना दुसरा खटला मिळालाही नाही. 'चांगल्या बापाचा चांगला मुलगा' म्हणून एक गरीब अशील सरकारकडे पाठवण्यासाठी एक अर्ज लिहून घ्यायला त्यांच्याकडे आला. मोहनदासनं तो अर्ज लिहून दिला. ज्या मित्रांनी तो वाचला त्यांनी त्याची स्तुती केली, परंतु त्यापासून त्याला एक पैही मिळाली नाही.

**६**

कितीही विचार केला तरी भवितव्य काही चांगलं दिसत नव्हतं. त्यांचा मित्र वीरचंद गांधी त्यांना फिरोजशहा मेहता, बद्रुद्दिन तय्यबजी आणि इतर न्यायालयातील गाजलेल्या लोकांच्या न्यायालयीन कामकाजविषयक कौशल्याच्या व पराक्रमाच्या गोष्टी सारखा सांगत असे व म्हणायचा की चांगला व्यवसाय चालायला तुला कदाचित तीन, पाच किंवा सात वर्षही लागतील. मोहनदासचं मनोधैर्य अगदीच गळून जात असे. काही वेळा पैसा मिळवण्यासाठी त्याच्या मनात परदेशात जायचा विचार यायचा. पण त्याच्या भावाला ते पटलं नाही. नंतर त्यानं शिकवण्या घ्यायचा विचार केला परंतु त्याही मिळाल्या नाहीत. खर्च वाढतच चालला होता. आत्यंतिक निराशेत त्यानं आपल्या मित्राला, रणछोडदास पटवारीला, पत्र लिहून कर्ज मागितलं. परंतु पटवारीनं असमर्थता दर्शवली. त्याच्या वकिलीच्या व्यवसायातून त्याची पुरेशी शिल्लक पडलेली नव्हती आणि जातीच्या बहिष्कारामुळे मी माझ्या वडिलांनाही सांगू शकत नाही असं त्याचं म्हणणं होतं. मोहनदासनं ५ सप्टेंबर १८९२ला लिहिलं:

*‘तू काही वाटून घेऊ नकोस. मी कुठून तरी व्यवस्था करीन. मी तुला मागील पत्रात कळवल्याप्रमाणे परदेशात व्यवसायासाठी जाणं मला लांबणीवर टाकावं लागलं आहे. माझा भाऊ त्याच्या फारच विरोधात आहे. त्याला वाटतं की काठेवाडमध्ये चांगलं जीवन जगण्यासंबंधी मला काळजी करायचं कारण नाही. आणि तेही कोणतीही खटपट केल्याशिवाय. मी त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागणार आहे. इथंही काही कामाचं मला आश्वासन मिळालं आहे. त्यामुळे कमीतकमी दोन महिने माझा इथं राहायचा विचार आहे.*

*मी एखादी साहित्यिक नोकरी स्वीकारली तर तिचा माझ्या वकिली व्यवसायावर परिणाम होईल असं मला वाटत नाही. उलटपक्षी अशाप्रकारच्या कामानं माझ्या ज्ञानात जी भर पडेल तिचा माझ्या वकिली व्यवसायात मला लाभच होईल. त्याशिवाय सर्व काळज्यातून मुक्त होऊन मी माझ्या कामात अधिक लक्षही केंद्रित करू शकेन. पण अशी जागा कुठं आहे ? अशी एखादी जागा मिळणं ही काही सोपी गोष्ट नाही.*

जातिबहिष्काराचा उल्लेख करत त्यानं लिहिलं :

*जातीचा विरोध पूर्वीइतकाच तीव्र आहे. सर्व काही एकाच माणसावर अवलंबून आहे. मला जातीत परत घेऊ नये म्हणून तो काहीही करायला तयार होईल. मला माझ्यासाठी एवढं दुःख वाटत नाही पण एकाच माणसाचं ऐकून आणि गतानुगतिक होऊन त्याच्या मागे शेळ्यामेंढ्यांप्रमाणे जात असलेल्या माझ्या जातीच्या लोकांसाठी मात्र मला दुःख होतं. ते काही निरर्थक ठराव पास करत आहेत व स्पष्टपणे आपली सीमा ओलांडून आपला आकस व्यक्त करत आहेत. त्यांच्या युक्तिवादात अर्थातच धर्माला कुठेच स्थान नाही. त्यांच्यावर चिडण्यापेक्षा त्यांच्याशी काहीच कर्तव्य नसणं अधिक चांगलं नाही काय ?*

वृत्तपत्राच्या पाहिजेतच्या स्तंभात दररोज एक तासासाठी ७५ रुपयांच्या भरपूर (!) पगारावर एक इंग्रजी शिकवणारा शिक्षक हवा असल्याची जाहिरात त्यांनी वाचली. त्यांनी त्या जागेसाठी अर्ज केला.

यथावकाश त्यांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आलं, शाळेच्या प्राचार्यांनी त्यांना विचारलं : 'तुम्ही पदवीधर आहात?'

'नाही. पण लंडन विद्यापीठातून मी मॅट्रिक पास झालो आहे.'

'ठीक आहे. पण आम्हांला पदवीधर हवा आहे.'

'पण माझा दुसरा विषय लॅटीन होता.' मोहनदासनं याचा तरी परिणाम होईल या आशेनं सांगितलं.

'आभारी आहोत. एवढं पुरेसं आहे. आता तुम्ही जाऊ शकता.'

थंड होऊन निराश अंतःकरणानं तो घरी परतला.

तत्कालीन भारतात गांधीजींना आलेला हा अनुभव काही अगदीच आगळावेगळा नव्हता. तो भारत होता दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले आणि स्वामी विवेकानंदांचा. असा भारत की ज्यात जन्मजात उच्चतम दर्जाची प्रतिभा केवळ स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी बाहेर

ढकलली जायची. परकीय शासनात अशा प्रतिभेला मिळणारी संधी कमीकमी चालली होत होती. भीष्मपितामहांनी आपल्या आयुष्याची सुरुवात 'मुख्य नेटिव्ह शिक्षक' म्हणून शाळेत केली होती. विवेकानंदांच्याच शब्दात सांगायचं तर 'नोकरीच्या शोधात एका ऑफिसमधून दुसऱ्या ऑफिसात हिंडत असताना सर्व बाजूनं चेपला जाऊन मी जवळपास मरायला टेकलो होतो.' गोखल्यांनी इतिहास आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून डेक्कन कॉलेजमधे ७० रुपये महिन्यात काम केलं होतं तर महात्म्याला ७५ रुपयांची नोकरी मिळवण्यात अपयश आलं होतं!

गांधीजींनी आपल्या भावाचा सल्ला घेतला. मुंबईतील सहा महिन्यांच्या मुक्कामानंतर त्यांनी तिथला गाशा गुंडाळला आणि ते राजकोटला परतले. लहान वकील असलेल्या त्यांच्या भावाच्या मदतीनं इथं अर्ज विनंत्या वगैरे लिहून द्यायची कामं मिळत. त्यांना महिन्याचे जवळपास तीनशे रुपये मिळू लागले. परंतु आपण कुणालाही दलाली देणार नाही या तत्त्वाटा त्यांना इथं त्याग करावा लागला होता. मुंबईत मात्र या तत्त्वाला ते घट्ट चिकटून होते. गांधीजींचे भाऊ दुसऱ्या वकिलाच्या भागीदारीत काम करत होते. त्यांचं म्हणणं होतं की ही दोन प्रकरणं अगदी वेगळी आहेत. मुंबईत दलाली दलालांना द्यावी लागत असे तर इथं अशील पाठवणाऱ्या वकिलाला द्यावी लागते. मोहनदासचा भाऊ म्हणाला की माझ्याबाबतीत हा प्रश्न उपस्थित होत नाही कारण आपला पैसा एकच आहे परंतु माझ्या भागीदाराचं काय? मोहनदासला त्याचं म्हणणं मान्य करावं लागलं. 'मी कबुली दिली.... स्पष्टपणे सांगायचं तर मीच मला फसवलं....'

अशा प्रकारचा हा जसा पहिलाच प्रसंग होता तसाच तो अखेरचाही ठरला. यानंतर त्यांनी अशी चूक केली नाही.

एक वर्षानंतर गांधीजींनी लिहिलेल्या लहानशा पुस्तकाला, गाईड टू लंडनला, भावी बॅरिस्टरांसाठी त्यांनी जी पुरवणी जोडली त्यात त्यांना सावध करत गांधीजी लिहीतात,

*जर तुमच्याजवळ १०,००० रुपये असतील तर ते जपून ठेवा. त्यातून केवळ ६,००० वा ४२० पौंडच खर्च करा. उरलेल्या पैशाचा भारतात आल्यानंतर तुम्हाला उपयोग होईल. ....*

*तुम्ही परतल्यानंतर तुमच्याजवळ १,०००, २,०००, ३,००० रुपये असणं अवश्य आहे. मग तुम्हांला इंग्लंडला गेल्याबद्दल पश्चात्ताप होणार नाही.... कारण इथं परतल्यानंतर काम तुमची वाट पाहत बसलेलं नसणार. तुमचे पोकळ सन्मान होतील व अभिनंदनांचाही तुमच्यावर वर्षाव होईल. पण यामुळे तुमच्या मनाची बोचणी मात्र वाढेल. आणि इथं काम असलं तरी माहिती आणि अभ्यासाशिवाय तुम्ही ते करू शकणार नाही. त्यामुळे या सर्व कटू अनुभवातून गेलेल्या माणसाचा सल्ला तुम्हांला ऐकायचा असेल व त्याचा लाभ घ्यायचा असेल तर तुमच्याजवळ जर १०,००० रुपये असतील तर केवळ ४२० पौंड खर्च करा आणि तेवढ्यात समाधान माना. कोणीही तुमच्याकडे बोट दाखवणार नाही.... आणि दोन वर्षात वा जवळपास तेवढ्याच काळात तुमच्या क्षमतेप्रमाणे आणि संधीप्रमाणे तुम्हाला सन्माननीय बॅरिस्टर म्हणून स्थिरस्थावर होणं शक्य होईल. तुम्हाला खरोखरी २००० रुपये हाताशी ठेवणं शक्य नसेल तर बॅरिस्टरचं शिक्षण घ्यायला तुम्ही इंग्लंडला जाऊच नका.*

त्यांच्या व्यावसायिक जीवनाला एकदम कलाटणी देणारी घटना याच काळात जर घडली नसती तर अशाच रीतीनं अजून किती काळ ते फरफटत राहिले असते हे कोण सांगू शकतो? तरुण युवराज भावसिंग यांनी गादीवर बसण्याआधी संस्थानाच्या खजिन्यातून अधिकार नसताना काही रत्न काढले असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. राजकीय प्रतिनिधीच्या कानात कोणी तरी कुजबुजला की त्यांनी असं मोहनदासचा भाऊ लक्ष्मीदास याच्या सांगण्यानुसार केलं. लक्ष्मीदास तरुण युवराजांचा त्यावेळी सचिव आणि सल्लागार होता. त्यामुळे लक्ष्मीदासला ती गोष्ट माहीत असायलाच हवी व त्यानं माहीत असूनही ती गोष्ट कळवली नसल्यानं तोही त्या घटनेत आधी जरी नाही तरी नंतर सहभागी झाला असला पाहिजे. राजकीय प्रतिनिधी इ. सी. के. (काही दिवसांनी सर चार्ल्स) ऑलिव्हंट, के. सी. आय. ई.कडे आपल्यासाठी शब्द टाकायला मोहनदासला त्याच्या भावानं सांगितलं. मोहनदासला जरी त्याबद्दल काही शंका होती तरी त्यानं तसं करायला मान्यता दिली. इंग्लंडमध्ये या अधिकाऱ्याशी भेटायचा एकदा मोहनला योग आला होता व त्यावेळी त्याचं वागणं मोहनदासला मैत्रीपूर्ण वाटलं होतं. परंतु

कठीण परिस्थितीतून जात असलेल्या बॅरिस्टरच्या लवकरच लक्षात आलं की 'काठेवाड इंग्लंडपेक्षा वेगळं आहे' व 'सुटीवर असलेला अधिकारी पदावर काम करत असताना वेगळा असतो.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ९८] अधिकारी म्हणून तो उद्धट, तापट आणि पक्का साहेब असतो. मोहनदासनं आपलं काम सांगताच साहेब अकडला आणि म्हणाला की तुझा भाऊ कटात सामील आहे व यासंबंधी मला काहीही ऐकायचं नाही.

मोहनदासनं स्पष्टीकरण द्यायचा प्रयत्न केला. साहेबाची सहनशीलता संपली, तो उठला आणि म्हणाला की मला आता वेळ नाही. भीडमुरवत न ठेवता तो पुढं म्हणाला, 'आता तू जा.'

मोहनदासनं त्या अधिकाऱ्याला आपलं म्हणणं ऐकून घ्यायची विनवणी केली. त्या इंग्रजानं चपराशाला बोलावलं आणि या दुराग्रही माणसाला दार दाखवायला सांगितलं.

चपराशी आला आणि त्यानं मोहनदासच्या खांद्याला धरून ढकललं.

या अपमानानं चिडून मोहनदासनं हल्ला व मारहाण करायच्या कारणासाठी न्यायालयात खटला भरण्याविषयी त्या अधिकाऱ्याला लिहिलं.

साहेबानं प्रत्युत्तरात लिहिलं की तुला हवं ते तू करू शकतोस.

त्यावेळी काही न्यायालयीन कामासाठी आलेल्या फिरोजशहा मेहतांचा सल्ला मोहनदासनं घेतला. मुंबईच्या सिंहानं एका मित्राला 'गांधीला' सांगायला सांगितलं, 'तो अजून नुकताच इंग्लंडमधून आलेला आहे आणि त्याचं डोकं गरम आहे.... त्याला इथं काही मिळवायचं असेल आणि आरामात राहायचं असेल तर त्यानं ते पत्र फाडून टाकावं आणि झालेला अपमान गिळून टाकावा.... साहेबाविरुद्ध न्यायालयात गेल्यानं त्याला काहीच मिळणार नाही.... त्याला अजून जीवन कळायचं आहे.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स* विथ ट्रुथ, पृष्ठ ९९]

मोहनदासनं अपमान गिळला आणि शपथ घेतली की यापुढे अशा प्रकारच्या विपरीत परिस्थितीत 'मैत्रीचा फायदा घ्यायचा' प्रयत्न कधीच करायचा नाही. त्या धक्क्यानं त्याचं जीवनच बदललं.

**७**

भारतात वर्णीय उद्धटपणा राजरोसपणे करण्यात येत असायचा. भारतीय संस्थानात राजकीय प्रतिनिधी सर्वेसर्वा असायचा. त्याची इच्छा हाच कायदा असायचा. व्यावहारिक काठेवाडनं या पराकोटीच्या असहायतेशी सामंजस्यानं जुळवून घ्यायचं तत्त्वज्ञान स्वीकारलं. प्रसिद्ध गुजराती कादंबरीत, जिला अभिजात साहित्याचा दर्जा मिळाला आहे, एक कावेबाज राजकारणी म्हातारा, जो परंपरागत काठेवाडी विचारसरणीत वाढलेला होता, एका तरुणाची त्याच्या आदर्शवादाबद्दल पुढील प्रकारे खरडपट्टी काढतोः

*'अरे कालच्या पोरा, तू आमच्या व्यावहारिक शहाणपणाची हेटाळणी करतोस, आज्ञाधारकपणाच्या गुणाला कमीपणा समजतोस आणि स्वातंत्र्याचं विनाकारण स्तोम माजवतो. तुला खरी कशाची गरज असेल तर तुझ्या* ***विवेकाला थोडी शिस्त लावायची****. आधुनिक शिक्षणाचा आणि विशेषतः इंग्रजी शिक्षणाचा दोष हा आहे की त्यामुळे तरुणांमध्ये बौद्धिक उद्धटपणा.... आणि असमाधान निर्माण होतं. त्यामुळे तुम्ही जलद आणि मोठ्या फळाच्या मागे लागता, आज्ञाधारकपणाकडे गुलामगिरी म्हणून तुच्छतेनं पाहता, वयानं आलेल्या सुज्ञपणाला शरण जाणं तुम्हाला अपमानास्पद वाटतं, स्वच्छंदीपणाचा गौरव तुम्ही स्वातंत्र्य म्हणून करता, मनात येईल ते बरळता वा त्याला धैर्याचं नाव देता, अनुभवाकडे तुच्छतेनं पाहत हसता. तुम्हाला काही वर्षांसाठी शीघ्रकोपी जुन्या पोलादी पुरुषाच्या जुलमी हातात द्यायला पाहिजे म्हणजे तो तुम्हांला सरळ करून मोठ्यांचा मान ठेवणं शिकवील व तुमच्यातील मूर्खपणाचं भूत काढील.'* (ठळक अक्षरं माझी)

मोहनदाससाठी हा अनुभव अतिशय कटू आणि मानहानिकारक होता. त्यानं जर राजकोटमध्ये वकिली व्यवसाय केला असता तर अपरिहार्यपणे त्याचा राजकीय प्रतिनिधीशी खटका उडायची वेळ आली असती. त्याला न्यायालयात खेचण्याची भाषा केल्यानंतर तो आपले शब्द परत घ्यायच्या मनःस्थितीत नव्हता आणि त्याच्या कृपेचा तर प्रश्नच येत नव्हता.

त्याच्यासमोर एकच पर्याय होता. नोकरी मिळवायचा. प्रधानमंत्री वा न्यायाधीशासारखं पद मिळवायला जोरदार पाठबळाची गरज होती. काठेवाड त्याच्या कटकारस्थानांसाठी प्रसिद्ध होतं. काठेवाडमधील मुत्सद्दीपणासाठी काठेवाडी पगडीसारखाच बाकदारपणा आवश्यक होता. काही वर्षांनंतर गांधीजींनी त्याबद्दल अतिशय कठोर भाषा वापरली होती : 'शूर काठीच्या प्रदेशात भाऊ भावाची मान एका पैशासाठी कापायला तयार असतो.' त्यातून क्वचितच एखादा सहीसलामत हानी न होता बाहेर पडला असेल. ओटाबापा त्यातून सहीसलामत बाहेर पडले मात्र कोणतीच हानी न होता असं नाही. काबा गांधींना जखमांचे खोल व्रण वाहावे लागले आणि त्यांच्या काळात परिस्थिती अतिशय वाईट होत गेली. ब्रिटिशांच्या सर्वश्रेष्ठतेच्या वृक्षाखाली केवळ तणकटाशिवाय वेगळं काही वाढू शकत नव्हतं ! कोणतीही सत्ता वा जबाबदारी नसलेले संस्थानिक केवळ नाममात्र प्रमुख राहिल्यामुळे आणि ब्रिटिश सर्वश्रेष्ठत्वाचं जू त्यांच्या खांद्यावर घट्ट बसल्यामुळे दररोज ऱ्हास आणि अवनतीकडे त्याची वाटचाल सुरू झालेली होती. या संस्थानांना 'कोणत्याही प्रकारच्या सत्तेशिवाय ठेवून आपली धोरणं राबवण्यासाठी त्यांचा उपयोग करायचं ब्रिटिशांचं धोरण होतं.'

लॉर्ड कॅनिंगनंतर १८६२ साली आलेल्या लॉर्ड एल्गिन यांनी लिहिलं : 'शिंदे आणि होळकर ज्या प्रमाणात दुर्बल राहतील व त्यांच्या शेजाऱ्यांविरुद्ध आणि प्रजेविरुद्ध त्यांना आपल्या मदतीची गरज आहे असं त्यांना जाणवत राहील त्या प्रमाणात आपल्याशी ते एकनिष्ठ राहतील.' [डी. व्ही. गुंडप्पा यांनी *द स्टेट्स अँड देअर पिपल इन द इंडियन कॉन्स्टीट्यूशन*, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, बंगलोर सिटी, (भारत) (१९३१), पृष्ठ ५२ वर *लेटर्स अँड जर्नल्स ऑफ जेम्स, एट्थ अर्ल ऑफ एल्गिन* (१८७२), पृष्ठ ४२१, या पुस्तकातून उद्धृत] या धोरणानुसार ब्रिटिश अधिकारी संस्थानिकांच्या स्वतःच्या वा त्यांनी प्रजेशी केलेल्या दुर्व्यवहाराकडे तोवर दुर्लक्ष करत असत जोवर ते ब्रिटिश सत्तेचं धोरण राबवत असत व संताप येण्यासारखी कृती करत नसत. संस्थानिकांना जाणीव होती की ब्रिटिश सत्तेच्या एका फुंकरीनंही ते होत्याचे नव्हते होऊ शकतात. ज्याप्रमाणात प्रजेशी ते मनमानी करत त्याचप्रमाणात ते ब्रिटिश अधिकाऱ्यांशी पक्षपाती व लांगूलचालन करणारं वर्तन करत. ब्रिटिशांच्या राजकीय प्रतिनिधींनी, त्यांच्या अंतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांनी आणि इतकंच नाही तर त्यांच्या चपराशांनीही मुख्याध्यापकानं

उनाड मुलाकडे डोळे वटारून पाहावं तसं पाहिलं तर त्या उनाड मुलाची जशी अवस्था व्हावी तशी अवस्था त्या संस्थानिकांची व्हायची. मोहनदासनं त्याबद्दल ऐकलेलं होतं. आता त्याला त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला होता. त्याला गुदमरल्यासारखं झालं.

त्याला भारतात आल्यानंतर आता अठरा महिने झाले होते. राणा विक्मातजींच्या 'सततच्या गैरकारभारामुळे' त्यांना त्याच्या पदावरून १८८६ साली काढण्यात आलं होतं व पोरबंदर संस्थानाचा कारभार प्रशासकाकडे होता. राणा विक्मातजींचा नातू युवराज भावसिंगजी सज्ञान नव्हता. त्यांच्यासाठी अधिक अधिकार मिळवण्यासाठी मोहनदास पोरबंदरला आला होता. प्रशासक एफ. एस. पी. लेलींना तरुण युवराजांना एखाद्या साथीदाराची आवश्यकता आहे असं वाटल्यामुळे त्यांनी मोहनदासची साथीदार-शिक्षक म्हणून नियुक्ती केली व पोरबंदर येथील चौबारी बंगल्यात त्याची राहायची व्यवस्था केली. मोहनदास तिथं काही काळ राहिला परंतु थोड्याच दिवसात त्याच्या लक्षात आलं की त्याला तिथं करण्यासारखं फारसं काही नाही. त्यानं मेर यांना न्याय मिळवून द्यायचाही अयशस्वी प्रयत्न केला. सरंजामशाहीच्या काळातील ती एक सैनिकी जमात होती. पोरबंदर राज्यात त्यांना अनेक सवलती होत्या व अनेक गोष्टींपासून त्यांना संरक्षण देण्यात आलं होतं. त्याच्यावर छळणूक होण्यासारखा शेतसारा लावण्यात आला होता. ज्या भारतीय अधिकाऱ्याच्या हाती ते प्रकरण सोपवण्यात आलं होतं तो युरोपिअन अधिकाऱ्यांपेक्षाही आढ्यताखोर, जुलमी व घमेंडखोर होता आणि अशा प्रकारची सर्व घाणेरडी कामं 'स्थानिक अधिकाऱ्यावर सोपवून स्वस्थ बसायच्या ब्रिटिश नोकरशाही परंपरेचं पालन करणारा राजकीय प्रतिनिधी होता. ही कार्यपद्धती त्याला मानवणारी होती.

मोहनदासला या सर्व वातावरणाची किळस वाटत होती. जीवन जणू काय एखाद्या कोड्याप्रमाणे झालं होत. त्यानं कितीही प्रयत्न केला तरी चित्राचे तुकडे काही योग्य ठिकाणी नीट बसत नव्हते. तो कंटाळलाही होता आणि चिंताग्रस्तही होता. तरीही तो चिवटपणानं दिवस ढकलतच होता.

अखेरीस मदत आली. अगदी अनपेक्षित प्रकारची आणि त्यानं स्वप्नातही न कल्पिलेल्या भागातून ती मदत आली होती. त्याचा भाऊ तर त्याच्याहूनही अधिक चिंताग्रस्त आणि कंटाळलेला होता. त्यानं पोरबंदरच्या मेमनकडून ऐकलं होतं की त्यांनी दक्षिण आफ्रिकेत फार मोठा व्यवसाय निर्माण केला होता. त्यांना ४०,००० रुपये एवढ्या मोठ्या खटल्यासाठी एका वर्षासाठी एक वकील अथवा बॅरिस्टर पाहिजे होता. त्यासाठी १०५ पौंड फी, पहिल्या वर्गानं जाण्यायेण्याचा व परदेशात राहायचा पूर्ण खर्च मिळणार होता. त्यामुळे मोहनदासला परदेशात जायला मिळणार होतं व त्याचंच त्याला आकर्षण वाटत होतं.

परंतु दादा अब्दुल्ला अँड कंपनीचे भागीदार अब्दुल करीम झवेरी यांच्याशी जेव्हा त्यानं संबंधित फर्मबद्दल, त्याला कराव्या लागणाऱ्या कामाबद्दल चर्चा केली तेव्हा त्याला सांगण्यात आलं की त्याला त्यांच्या वकिलाला खटल्यासाठी आवश्यक असणारी माहिती फर्मच्या कागदपत्रातून द्यावी लागणार होती व फर्मचा इंग्रजी पत्रव्यवहार सांभाळावा लागणार होता. त्याला वाटलं की हे तर कारकुनाचं काम आहे. आधी तो थोडासा कचरत होता. परंतु श्वास घुटमळवणाऱ्या त्या वातावरणातून कसंही करून का होईना सुटका करून घ्यायची संधी मिळत असल्यानं त्यानं तो अपमान गिळला व ती नोकरी स्वीकारली. सुटकेचा मार्ग म्हणून ज्या गोष्टीचा स्वीकार करण्यात आला होता तीच गोष्ट जागतिक कारकिर्दीची आरंभबिंदू ठरली.

# भाग ३ रा

# भवितव्याशी भेट

# प्रकरण १३ वे

# नकोसा वाटणारा पाहुणा

१

मोहनदास अडचणींपासून दूर पळायचा प्रयत्न करत होता परंतु अडचणी त्याचा पाठलाग करत होत्या. सामान्यपणे दक्षिण आफ्रिकेला जाणाऱ्या पहिल्या वर्गाच्या प्रवाशांसाठी जहाजावर भरपूर जागा असते. परंतु त्याच जहाजानं मोझांबिकचे राज्यपाल आपल्या सर्व ताफ्यासह चालले होते व त्यांनी पहिल्या वर्गाच्या सर्व जागांची तिकिटं आधीच काढून घेतली होती. मोहनदासनं दादा अब्दुल्लांच्या दलालाला पहिल्या वर्गाचं तिकीट काढायला सांगितलं तेव्हा एकही तिकीट उपलब्ध नसल्याचं त्यानं सांगितलं. दुसरं जहाज केव्हा जाईल हे निश्चित नाही व त्यामुळे डेकप्रवासी म्हणून जायची तुझी तयारी नसेल तर तू मुंबईत बेमुदत अडकून पडशील असं त्याला सांगण्यात आलं.

मोहनदास पेचात सापडला. होतकरू बॅरिस्टरनं प्रथम वर्गानं प्रवास न करता डेकच्या वर्गानं प्रवास करणं याची त्या दिवसात कल्पनाही करता येत नव्हती. परंतु कशानंही नाउमेद न होता त्यानं जहाजाच्या कप्तानाची वैयक्तिक भेट घेऊन त्याचा काही उपयोग होतो का ते पाहायचं ठरवलं. शक्य तेवढ्या हसतमुखानं त्यानं जहाजाच्या कप्तानाला विचारलं, 'तुम्ही मला आत घुसवू शकत नाही का?'

त्याच्या आत्मविश्वासाचा आणि उत्साहाचा अपेक्षित परिणाम होऊन व्यापारी जहाजाच्या कप्तानानं त्याच्याकडे 'नखशिखांत' पाहिलं आणि तो हसला. तो म्हणाला एकच मार्ग आहे. मी तुला माझ्या खोलीत जागा देऊ शकतो. सामान्यपणे ही जागा प्रवाशांसाठी नसते.

'माझं त्यामुळे भागेल. मी आपला आभारी आहे.' मोहनदास उत्तरला आणि लगेच त्यानं तिकीट घेतलं.

एप्रिल १८९३मधे त्यानं काळ्या खंडाकडील प्रवासाला संपूर्ण उत्साहानं  सुरुवात केली. जहाज समुद्र किनारा सोडत असताना त्याच्या डोक्यात नाना विचार घोळत होते, विविध आठवणींनी व भावनांनी त्याच्या मनात गर्दी केलेली होती. तो आता चोवीस वर्षांचा झालेला होता. नुकतंच त्याच्या व्यवसायानं मुळं धरायला सुरुवात केली होती. कठोर वास्तवाची जाणीव आणि दोन वर्षांचा संघर्ष यांनी तो सौम्य झालेला होता. त्याच्या बायकोशी त्याचे संबंध सुधारू लागले होते. परंतु त्याची अंगभूत अस्वस्थता त्याला शांत घरगुती जीवन जगू देत नव्हती.

त्याच्या आईच्या पावन स्मृतीनं पवित्र झालेल्या घराची त्याला आठवण येत होती. जी आई त्याच्या अंतर्गत विश्वाच्या केंद्रस्थानी होती, जगाच्या काळोख्या भूलभुलैयातून वाटचाल करत असताना ध्रुवताऱ्याप्रमाणे वडिलांच्या मृत्यूनंतर जी आई त्याचं सतत मार्गदर्शन करत होती त्या आईच्या आठवणी त्याला येत होत्या. जिनं अजून एका मुलाची नुकतीच त्याला भेट दिली होती व जिला तो मागं सोडून आला होता त्या बायकोचीही त्याला आठवण येत होती. त्याला घरगुती आनंददायी जीवनाच्या आठवणी होत होत्या. त्याला जर त्या परिस्थितीशी जुळवून घेता आलं असतं तर ते सर्व त्याचंच होतं. परंतु त्याऐवजी आपल्या अंतःप्रेरणेची हाक ऐकून दूरवरच्या दक्षिण आफ्रिकेत नशीब काढायचा त्यानं निर्णय घेतला.

'देवानं टाकून दिलेली, पण जिथं मला माझ्या देवाची भेट झाली ती आफ्रिका' असं काही वर्षांनंतर गांधीजींनी आफ्रिकेचं वर्णन केलं होतं. परंतु त्यावेळी मात्र भविष्यात आपल्यासाठी काय वाढून ठेवलं आहे याची त्याला काहीच कल्पना नव्हती. त्याला एवढंच कळत होतं की आपल्या जीवनमानाची पातळी कमी केल्याशिवाय आपण त्या ठिकाणी राहू शकत नव्हतो. भविष्याचा वारा यापुढे आपल्याला कुठं वाहून नेतो याविषयी त्याला चिंता नव्हती.

या वेळी दूर जायचं तेवढं दुःख नव्हतं जेवढं पहिल्यावेळी झालं होतं. जरी आई आता देहानं त्याच्याजवळ नव्हती तरी ती त्याच्या अस्तित्वाचाच भाग झालेली होती. तिचा आत्मा आता सदैव त्याच्याबरोबर राहणार होता. आता ती केवळ त्याच्याच घराला त्याला बांधून ठेवत नव्हती. त्याच्या पत्नीशी असलेल्या वैवाहिक संबंधातील पूर्वीची क्षुब्धता आता निघून गेलेली होती व

आता ते आध्यात्मिक पातळीच्या उंबरठ्यावर पोहोचलेले होते. त्यामुळे शारीरिक दुरावा आता फारसा जाणवत नव्हता. त्याशिवाय बायकोला त्यानं सांगितलं होतं की मी काही कायम दक्षिण आफ्रिकेत राहायला चाललेलो नाही. नक्कीच एखाद्या वर्षात आपली भेट होईल. त्या आश्वासनानं तिला थोडा दिलासा मिळाला.

त्याचं आणि कप्तानाचं पहिल्या दिवसापासूनच सख्य जुळलं. कप्तानाला बुद्धिबळ खेळायला फार आवडायचं व त्यानं त्यालाही बुद्धिबळ खेळायला शिकवलं कारण त्या दीर्घ कंटाळवाण्या प्रवासात त्यालाही कुणीतरी साथीदार खेळण्यासाठी लागायचा.

केनियातील पहिलंच बंदर लामू येथे जहाजानं नांगर टाकला असता मोहन इतर काही प्रवाशांसह ते ठिकाण पाहायला गेला. ते जेव्हा जाऊ लागले तेव्हा जहाजाच्या कप्तानानं सावध करत सांगितलं 'काळजी घ्या, वेळेवर या, लक्षात ठेवा की हा किनारा फार धोकेबाज आहे.' कप्तानाच्या सूचनेकडे दुर्लक्ष करत त्यांनी किनाऱ्यावर मनसोक्त वेळ घालवला. ते जेव्हा परतले तेव्हा भरतीच्या लाटा जोरात सुरू होत्या व प्रवाह एवढा जोराचा होता की त्यांची खूप भरलेली नाव जहाजावरील शिडीजवळ स्थिर करणं कठीण होत होतं. जहाजाची पहिली घंटा आधीच झालेली होती ते सुटायची वेळ जवळपास झालेली होती. कप्तानानं जहाज सोडायला पाच मिनिटं उशीर केला. तरीही त्या भरलेल्या नाव जहाजाला काही लागू शकत नव्हती. सुदैवानं जहाजावरील एका मित्रानं त्याची ती अवस्था पाहिली आणि त्यानं त्या भरलेल्या नावेजवळच असलेली दुसरी नाव १० रुपये भाड्यानं मोहनला आणण्यासाठी ठरवली. त्या नावाड्यानं मोहनला आपल्या नावेत घेतलं व जहाजाजवळ आणलं. तोवर शिडी वर घेण्यात आली होती अखेरीस मोहनसाठी दोर टाकण्यात आला व मोहन कसाबसा चढतो न चढतो तोच जहाज सुरू झालं. इतर प्रवासी मागेच राहिले.

*त्यानंतर त्यांना लागलेलं बंदर होतं मोंबासा आणि नंतर झांजीबार. झांजीबार येथे कप्तानानं एका इंग्रज गृहस्थाबरोबर त्याला 'बाहेर' फिरायला नेलं. आपण कुठं जात आहोत ते*

*त्या तरुणाला काही माहीत नव्हतं. खलाशांचा 'बाहेर जायचा' अर्थ काय असतो ते त्याला लवकरच कळलं.*

*एका दलालानं आम्हाला एका निग्रो स्त्रीच्या घरी नेलं. आम्हांला प्रत्येकाला एकेका खोलीत नेण्यात आलं. देवालाच माहीत त्या गरीब बिचाऱ्या बाईला माझ्याविषयी काय वाटलं असावं. जेव्हा कप्तानानं हाक मारली तेव्हा जसा मी आत गेलो होतो तसाच बाहेर आलो. त्याला माझा निरागसपणा दिसला.... त्या बाईला पाहून माझ्या मनात किंचितही मोह निर्माण न झाल्याबद्दल मी देवाचे आभार मानले. त्या खोलीत जायचं नाकारायचा.... माझ्यात धीर नसल्याबद्दल माझी मलाच घृणा वाटू लागली.* [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १०४]

त्या प्रसंगानं 'ईश्वरावरील माझी श्रद्धा वाढली आणि काही प्रमाणात माझा खोटा लाजाळूपणा सोडायला शिकवलं.'

झांजीबारला प्रवाशांना दुसऱ्या जहाजात हलवण्यात येणार होतं. आठदहा दिवस जहाजाचा बंदरातच मुक्काम असताना मोहनदासनं त्या संधीचा उपयोग शहरावर आणि तेथील वातावरणावर नीट नजर टाकून घेण्यात केला. त्यानं पाहिलेल्या ठिकाणांमधे न्यायालय होतं. तिथं एक खटला सुरू होता. एक पारशी वकील जमाखर्चाच्या नोंदीसंबंधी प्रश्न विचारून साक्षीदाराची उलटतपासणी घेत होता. मोहनदासला त्यातलं काहीच कळत नव्हतं. त्याला हिशेबाच्या वहिखात्यासंबंधी काहीच माहिती नव्हती. आणि त्यानं अशा खटल्यात काम करायला मान्यता दिली होती जो खटला पूर्णपणे हिशेबावरच अवलंबून होता !

झांजीबारमध्ये त्याला आफ्रिकेचं प्रथमदर्शन झालं. एस. जी. मिलन यांचं म्हणणं आणि अर्नोल्ड टॉयन्बी यांचं भाकीत जर खरं ठरलं तर निग्रोंपासून सुरू झालेल्या मानव समाजाचा विनाश करणाऱ्या ॲटम बॉम्बसारख्या सर्व साधनांचा विचार केला तर 'पुरातन, इतिहासपूर्व, न माणसाळलेला, संकटं आणि गूढांनी भरलेला, असा तो पहिला खंड होता ज्यानं पहिल्या माणसाला जन्म दिला होता तोच कदाचित शेवटचा माणूसही पाहणार होता.' [सारा गरट्रयूटॉड मिलान, *द पिपल ऑफ द साऊथ आफ्रिका*, पृष्ठ १६] इथली प्रत्येक गोष्ट प्रचंड होती. इथल्या रहिवाश्यांची अंगकाठी,

इथल्या झाडांची उंची, त्यांचा घेर आणि त्यांचा व्याप, इथल्या भाज्यांचा स्वाद व फळांचा आकार हे सर्व प्रचंड होतं. तो भारून गेला होता.

मोझांबिक सोडल्यानंतर जहाज डरबन येथे पोहोचलं. केपचे राज्यपाल सर बेंजामिन डरबन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शहराचं हे नाव ठेवण्यात आलं होतं. यालाच नाताळचं बंदर म्हणूनही ओळखतात. १४९७ साली वास्को डी गामानं नाताळच्या दिवशी सर्वप्रथम याचा शोध लावल्यानं नाताळ हे नाव पडलं होतं. हे इथलं मुख्य बंदर आहे.

४७२,६८५ मैल क्षेत्रफळाच्या दक्षिण आफ्रिकेचे जवळपास आजच्यासारखेच चार भौगोलिक विभाग होते. केप कॉलनी, नाताळ, ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट. एकोणिसाव्या शतकाच्या नवव्या दशकात गांधीजी तिथं पोहोचले तेव्हा तिथं राहणाऱ्या ३३ लाख लोकांपैकी केवळ ७ लाख गोरे होते. उरलेले नेटिव्ह, रंगीत आणि अधूनमधून शिडकावा केल्यासारखे ‘आशिया खंडातील’ लोक होते.

हा प्रदेश लांबवर अंतरांचा आणि परस्पर विरोधांनी भरलेला आहे. डरबन आणि केप टाऊनमधे १८०० मैलांचं अंतर आहे. दगडाळ, जवळपास नापीक आणि ओसाड आणि ज्याच्या समुद्रकिनाऱ्यावरून मोठमोठी जहाजं जात असतात अशा कारूच्या प्रदेशापासून तर केळी, अननस, द्राक्षं, पीच, प्लम, लिंबाच्या जातीच्या फळांची झाडं, ग्रॅनॅडिला, ॲव्हॅकाडो व पिअर यासारख्या भरपूर आणि अप्रतिम चवीच्या फळांसाठी ट्रान्सवालचा गवताळ प्रदेश प्रसिद्ध आहे.

हवामान सौम्य आणि सम आहे. निसर्ग उदार आहे. आफ्रिकेतील लोकांचं मुख्य खाद्य असलेलं मेझ, मिलेट आणि ऊस ही इथली मुख्य पिकं आहेत. जमिनीत भरपूर खनिज पदार्थ आहेत. कोळसा, लोखंड आणि मँगेनिझशिवाय दक्षिण आफ्रिकेला तिच्या सोन्याच्या आणि हिऱ्यांच्या खाणींचा अभिमान आहे. किंम्बर्ले येथील हिऱ्यांच्या खाणीत जगातील सर्वाधिक हिरे आहेत. दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या खाणीतून जगातील अर्ध सोनं निघतं. १९६१ साली त्यांच्यातून ८० कोटी डॉलर किंमत असलेलं २२,९०० औंस शुद्ध सोनं निघालं होतं. १८८४ साली

दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या खाणींचा शोध लागल्यानंतर दक्षिण आफ्रिकेनं १९ बिलीयन डॉलर मिळवले असावेत असा अंदाज आहे.

आज दक्षिण आफ्रिका इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा रंगभेदासाठी म्हणजे शब्दशः वेगळं ठेवण्यासाठी वा वेगळेपणासाठी प्रसिद्ध आहे. हा शब्द वांशिकदृष्ट्या वंशश्रेष्ठत्वाच्या भावनेवर आधारित आहे. या एका शब्दामुळे दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना अक्षय सुरक्षितता, नैतिक श्रेष्ठता, धर्म, तत्त्वज्ञान आणि राजकारण या सर्व गोष्टी तर दिल्याच पण त्याचबरोबर जगाची डोकेदुखी ठरणारा वांशिक संघर्ष आणि रंगभेदही दिला. मे १९६१ साली दक्षिण आफ्रिका जेव्हा ब्रिटिश राष्ट्रकुलातून वेगळा झाला तेव्हा दक्षिण आफ्रिकेतील २६ लाख ४० हजार गोऱ्यांचे संसदेत १५६ सदस्य होते तर एक कोट गौरेतर लोकांचं प्रतिनिधित्व ७ सदस्य (सर्व गोरे) करायचे. सिनेटमधे हीच संख्या क्रमशः ८५ आणि ४ होती. भारतीयांना काहीच प्रतिनिधित्व नव्हतं. त्याचबरोबर रंगीत स्त्रिया आणि ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमधील सर्व रंगीत स्त्री-पुरुष यांनाही प्रतिनिधित्व नव्हतं. दक्षिण आफ्रिकेतील राष्ट्रवादी याचं समर्थन 'गोऱ्यांची वर्णश्रेष्ठता' या शब्दानं करायचे. हेस्टिंग्ज कामुतुझू बांडा हे जेव्हा न्यासालँडचे प्रधानमंत्री झाले तेव्हा त्यांनी काढलेल्या पुढील शब्दातून दीर्घकाळापासून दबलेल्या या रागाला अभिव्यक्ती मिळाली :

*तुम्ही गोरे लोक स्वतःला काळ्या घोड्यांच्या पाठीवरील स्वार समजता. तुम्ही गोरे आता संपला आहात - इथं आफ्रिकेत आणि जगातही. हा तुमचा स्वतःचाच दोष आहे. शतकांपूर्वी तुम्ही जे गुन्हे केले त्याचं उत्तर आता तुम्हाला त्याच शब्दात मिळत आहे. आता तुम्ही निघा ! निघा आता!*

[रॉल्फ इटालँडर, *द न्यू लिडर्स ऑफ आफ्रिका*, प्रेन्टिस-हॉल, इंटरनॅशनल, लंडन, (१९६१), पृष्ठ ९७]

वर्णविद्वेष, आणि या विचारसरणीला प्रेरणा देणारे विचार यामुळे दक्षिण आफ्रिकेतील सर्व प्रकारच्या 'निराशापूर्ण आणि आटोक्याबाहेर जाणाऱ्या परिस्थितीचा' बोध होतो. त्याचबरोबर याच कारणास्तव हा विषय संशोधनासाठी सर्वात महत्त्वाचा विषय झाला आहे आणि 'आधुनिक युगात सर्वात कठीण संबंधांची समस्याही याच वर्णद्वेषामुळे निर्माण झाली आहे.'

गांधीजी जेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या मार्गावर होते तेव्हा हे सर्व काळाच्या उदरात दडलेलं होतं. दक्षिण आफ्रिकेचं संघराज्य अजून निर्माण व्हायचं होतं. केप हा प्रांत ब्रिटिश ध्वजाखालील स्वयंशासित वसाहत होता, नाताळ ब्रिटिश सरकारच्या अंकित व ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट हे बोअरांचे गणराज्य होते. सेसिल ऱ्होड्स केपचे प्रधानमंत्री होते, पॉल क्रुगर हे ट्रान्सवाल गणराज्याचे अध्यक्ष होते. या दोघांमध्ये युद्धाचं वातावरण तयार झालेलं होतं. व्यक्तिव्यक्तीतील, गटागटातील, वा राष्ट्राराष्ट्रातील सर्व प्रकारच्या मतभेदातून वाट शोधून काढणाऱ्या सत्याग्रहाच्या संशोधनाची दक्षिण आफ्रिका प्रयोगशाळा व्हावी अशा प्रकारे घटना वळण घेत होत्या.

## २

डरबन बंदराच्या अर्धवर्तुळाकार मनमोहक देखाव्याच्या मागील बाजूला सहा चौरस मैलांच्या क्षेत्रफळाच्या भूप्रदेशात लाटांप्रमाणे हेलकावे खात असलेल्या प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर जंगलांनी व्यापलेल्या एकावर एक मजले चढवल्यासारख्या टेकड्या, समुद्रकाठाच्या बाजूबाजूनं जात असलेला दुतर्फा झाडी असलेला रस्ता आणि चमचम करणाऱ्या उन्हात न्हात असलेला समुद्रकिनारा अशी अजूनही काही सुंदर दृश्यं आहेत. जहाज धक्क्याला लागताच दादा अब्दुल्लांची माणसं आणि इतर लोक भारतीय प्रवाश्यांना भेटायला आले. त्यांच्याशी बंदरावरील अधिकारी ज्याप्रकारे वर्तन करत होते त्याकडे एक दृष्टिक्षेप जरी टाकला तरी रंगीत लोकांना नाताळमध्ये कोणतं स्थान होतं ते लक्षात येऊ शकत होतं.

पोरबंदर येथील एका व्यापाऱ्याच्या मुलानं, शेठ दादा अब्दुल्ला यांनी आपल्या जन्मजात हुशारीनं आणि व्यावसायिक कौशल्यानं भरपूर संपत्ती मिळवली होती. त्यांनी ग्लासगो येथून जहाजं विकत घेतली, भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या दरम्यान प्रवासी वाहतूक करणारा स्वतःचा व्यवसाय सुरू केला. त्याचबरोबर नाताळ आणि ट्रांसवालमध्ये विशाल प्रमाणात व्यापार सुरू केला. १८८८ ते १८९०च्या दरम्यान सोन्याच्या खाणींचा नुकताच शोध लागला होता, त्याकडे लोकांचा लोंढा धावू लागला होता, भारतात सोन्याच्या आयातीवर बंधनं नव्हती व पौंडाचा भाव

केवळ १३ रुपये होता. अशा त्या काळात इतर अनेक भारतीय व्यापाऱ्यांप्रमाणेच दादा अब्दुल्लांनी भरपूर संपत्ती जमवली होती. पोरबंदर या त्यांच्या गावात समुद्र किनाऱ्याला लागून त्यांची स्थावर जंगम मालमत्ता भरपूर प्रमाणात पसरलेली आजही दिसेल. जरी ते निरक्षर होते तरी त्यांनी आपल्या व्यवसायाला आवश्यक तेवढी इंग्रजी भाषा आत्मसात केलेली होती व भारतीय समुदायात त्यांना फार मान होता. परंतु अगदी पहिल्याच भेटीत गांधीजींना तेथील लांगुलचालनाचं व वागण्यातील भंपकपणाचं वातावरण आढळल्याशिवाय राहिलं नाही. त्यांना ते आवडलं नाही.

चुणचुणीत दिसणाऱ्या ह्या तरुणाची, ज्याला त्याच्या भावानं पाठवलेलं होतं, पोशाखाची पद्धत आणि राहण्याची शैली पाहून हा 'पांढरा हत्ती' तर ठरणार नाहीना असा विचार करत दादा अब्दुल्लाही मनातून आशंकित होते. अशा रीतीनं दोन्ही बाजूंचं एकमेकांविषयी झालेलं मत प्रथमदर्शनी तरी फारसं अनुकूल नव्हतं. गांधीजींच्या शब्दात, 'त्यांनी मला ओळखलं नाही आणि मी त्यांना.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १०५]

गांधीजी आल्यानंतर दुसऱ्या वा तिसऱ्या दिवशी दादा अब्दुल्लांनी आपल्या या नवीन अटर्नीला डरबन न्यायालयात नेलं. त्यावेळी गांधीजींनी लांब कोट आणि 'बंगाली पगडीसारखी दिसणारी पगडी' घातलेली होती.

न्यायाधीशांनी विचित्र पोषाख केलेल्या या नवागताकडे पाहिलं, त्याच्याकडे काही काळ कटाक्ष टाकला आणि त्याला पगडी काढायचा हुकूम दिला.

त्यानं तसं करायला नकार दिला व तो न्यायालयाबाहेर पडला.

त्याला लवकरच त्याचं कारण कळलं. दक्षिण आफ्रिकेत गोऱ्यांना स्वस्त शेतमजूर मिळावे म्हणून भारतीयांना आधी करारबद्ध मजूर म्हणून आणण्यात आलं होत. सामान्यपणे त्यांना पाच वर्षांच्या करारावर आणण्यात यायचं. ते गिरमिटिया म्हणून ओळखले जायचे. गिरमिटिया हा शब्द गिरमिटपासून, जो इंग्रजी शब्द ॲग्रीमेंटचा अपभ्रंश आहे, आलेला आहे.

त्यांच्या मागोमाग लहान व्यापारी, बहुतेक भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून, आले. त्यांचा व्यापार जसजसा वाढत गेला तसतसं त्यांनी पारशी आणि इतर सुशिक्षित भारतीयांना आपल्या फर्ममधे कारकुनाचं वा इतर कामाच्या नोकरीसाठी बोलावलं. कालांतरानं करारातून मुक्त झालेले मजूर त्याच्यात आले. त्यांच्यातील काहींनी शेती करायला सुरुवात केली. ते फळं, भाज्या वगैरे पिकवू लागले. इतर काही फिरत्या विक्रेत्याचा आणि गाडीवाल्याचा व्यवसाय करू लागले. त्याशिवाय गिरमिटियांची मुलंही होती. त्यांचा जन्म कराराच्या काळात झालेला होता तसंच करारातून मुक्त झालेल्या भारतीयांची मुलंही होती. त्यांच्यातील अनेकांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला होता व ते उपाहारगृहात वेटरचं काम करायचे. त्यांनी इंग्रजी पोषाख स्वीकारला होता.

करारबद्ध मजूर, करारातून मुक्त झालेले श्रमिक आणि इतर भारतीय यात गोरे कोणतंच अंतर करत नसत. त्यांच्यासाठी ते सर्व 'कुली' होते व त्या सर्वांना ते तसंच वागवायचे. काही वेळा त्यांना सामी म्हणून बोलावण्यात यायचं. सामी हा स्वामी या शब्दाचा अपभ्रंश आहे. दक्षिण भारतात नावाच्यामागे हा शब्द सामान्यपणे लावण्यात येतो व करारबद्ध मजुरात बरेच लोक दक्षिण भारतीय असल्यामुळे या मजुरांना सामी म्हणण्यात यायचं. गोरे लोक सामी हा शब्द घृणेनं वापरत असत.

अशाप्रकारे दक्षिण आफ्रिकेत भारतीयांचे तीन वर्ग होते. एक व्यापारीवर्ग, यात बहुतांश मुसलमानांचा, त्याच्या पारशी कारकुनांचा आणि हिंदूंचा समावेश व्हायचा. 'कुली' ह्या अपमानास्पद संबोधनापासून वाचण्यासाठी मुसलमान स्वतःला 'अरब' म्हणवत असत एवढंच नाही तर पायघोळ अरब पोषाख घालत असत. पारशी स्वतःला पर्शीअन म्हणवत असत व ते त्यांच्या पारशी पोषाखामुळे ओळखले जात असत. परंतु परंपरागत पोशाख घालणारे हिंदू कोणताही व्यवसाय करत असले वा त्यांचं समाजात कोणतंही स्थान असलं तरी कुली झाले. अशा रीतीनं दक्षिण आफ्रिकेत 'कुली व्यापारी', 'कुली डॉक्टर', 'कुली कारकून', 'कुली बॅरिस्टर' आणि अशा रीतीनं अनेक प्रकारचे 'कुली' झाले.

काही वेळा मोहनदासला भारतीय वेष टाकून देऊन आणि पाश्चात्य पोशाख स्वीकारून या कठीण समस्येतून मार्ग काढायचा मोह झाला. परंतु दादा अब्दुल्लांनी त्या कल्पनेबद्दल जोरदार नापसंती दाखवली. 'त्यामुळे तुम्ही केवळ वेटरसारखे दिसाल' ते म्हणाले. त्याशिवाय ज्या भारतीय बांधवांनी भारतीय पोषाख स्वीकारला आहे त्यांना टाकून दिल्यासारखं होईल. त्या घटनेला वृत्तपत्रातील मथळ्यात स्थान मिळालं. 'काहींनी मला पाठिंबा दिला तर काहींनी माझ्या आडदांडपणासाठी माझी निंदा केली.' तो 'स्वागतयोग्य पाहुणा नाही असं त्याचं चित्र उभं करण्यात आलं. या घटनेनं दक्षिण आफ्रिकेत आल्यानंतर काहीच दिवसात गांधीजींना' अनपेक्षित प्रसिद्धी मिळाली.

नंतरच्या काही दिवसात गांधीजींची ज्यांच्याशी भेट झाली त्यात डरबनमध्ये न्यायालयात दुभाष्याचं काम करणारे भारतीय ख्रिश्चन श्रीयुत पॉल हे रोमन कॅथॉलिक गृहस्थ होते. तसंच पारसी रुस्तमजी आणि आदमजी मियाखान यांच्याशीही त्यांनी ओळख करून घेतली. त्यानंतर काही दिवसांनी हे दोघंही आणि त्यांच्यानंतर त्यांची मुलंही गांधीजींचे राजकारणातील सहकारी झाले. सुभान गॉडफ्रे यांचा मुलगा जेम्स गॉडफ्रे आणि पारसी रुस्तमजी यांचा मुलगा जाल रुस्तमजी भारतात अनेकदा दक्षिण आफ्रिकेतील प्रतिनिधी मंडळ घेऊन आले होते. ते काही वर्षांपूर्वी वारले. त्यांनी आपल्या वडिलांचा उच्च नैतिक दर्जा आयुष्यभर जपला होता.

डरबन येथे ७-८ दिवस मुक्काम झाल्यानंतर दादा अब्दुल्ला यांच्या फर्ममध्ये प्रिटोरिया येथील त्यांच्या वकिलाकडून खटल्याची माहिती देण्यासाठी दादा अब्दुल्ला यांना वा त्यांच्या कुणा प्रतिनिधीस पाठवण्यासंबंधी निरोप आला.

'तुम्ही जाल का?' दादा अब्दुल्लांनी गांधीजींना विचारलं.

'खटल्याचं कामकाज समजून घेतल्यानंतरच ते मी सांगू शकेन.' गांधीजी उत्तरले.

दादा अब्दुल्लांनी आपल्या कारकुनाला गांधीजींना खटला समजावून सांगायला सांगितलं. 'कारकून हे जमा आणि हे नावे असं सांगत चालला होता आणि माझा अधिकाधिक

गोंधळ वाढू लागला.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १०९] त्यांना तर हेही माहीत नव्हतं की व. चिठ्ठी कशाला म्हणतात. त्यानं शब्दकोशाची मदत घेतली. तो शब्दच त्यात नव्हता. अखेरीस हिंमत करून त्यांनी कारकुनाला त्याचा अर्थ विचारला व कारकुनाकडून त्यांना कळलं की व. चिठ्ठी म्हणजे वचन चिठ्ठी.

अंगभूत हुशारी आणि कितीही मानसिक त्रास झाला तरी श्रमाचा कंटाळा न करणं या त्यांच्या गुणांची त्यांना या वेळी मदत झाली. त्यांनी जमाखर्च कलेचं पुस्तक विकत आणलं आणि हिशेबासाठी जे काही ज्ञान आवश्यक असतं ते सर्व त्यांनी त्यातून लगेच आत्मसात केलं.

त्यांना जेव्हा खटल्याचं स्वरूप पूर्णपणे कळलं तेव्हा त्यांनी दादा अब्दुल्लांना माझी आता जायची तयारी आहे म्हणून सांगितलं. दादा अब्दुल्लांनी त्यांच्या वकिलाला गांधीजींच्या राहण्याची व्यवस्था करायला सांगितलं.

स्वभावानं संशयी असल्यामुळे दादा अब्दुल्ला गांधीजींना म्हणाले, 'मी यासंबंधी माझ्या मेमन मित्रालाही लिहेन. परंतु तुम्ही त्यांच्यासोबत राहावं असं माझं मत नाही'. दादा अब्दुल्लांना भीती होती की ते त्यांचा खाजगी पत्रव्यवहार मधेच उघडून वाचतील वा गांधीजींना प्रभावित करायचा प्रयत्न करतील. 'तुम्ही त्यांच्याशी जेवढा कमी संबंध ठेवाल तेवढं आपल्यासाठी बरं राहील.' त्यांनी सूचित केलं.

गांधीजी म्हणाले, 'परंतु माझी त्या पक्षाशी ओळख वाढवायची इच्छा आहे. न्यायालयाबाहेर तडजोड करायचा प्रयत्न करायची माझी इच्छा आहे. अखेरीस तैय्यबशेठ तुमचे मित्र आहेत.'

न्यायालयाबाहेरील खाजगी तडजोडीचा विचार ऐकताच दादा अब्दुल्लांचे कान टवकारले गेले. सावध करत ते म्हणाले, 'सावध राहा. तैय्यबशेठ सहजासहजी तडजोडीसाठी तयार होणारा माणूस नाही. तुमच्या किंचितशा बेसावधपणानं ते तुमच्याकडून सर्व काही माहिती काढून घेतील.... त्यामुळे काही करण्याआधी तुम्ही दोनदा विचार करा.'

गांधीजींनी त्यांना आश्वस्त केलं. 'मी सावधपणे काम करीन. माझ्याकडून कोणीही एक शब्दही काढून घेऊ शकणार नाही. तैय्यबजीशेठ वा इतर कुणाशी मी खटल्यासंबंधी बोलणार नाही. न्यायालयाबाहेर तडजोड करावी एवढंच मी त्यांना सुचवीन. त्यामुळे दोन्ही पक्षांची कज्जेबाजीतून सुटका होऊ शकेल.'

दादा अब्दुल्लांचं समाधान झालं. एका आठवड्याच्या जवळच्या संबंधातून या तरुण वकिलाची त्यांना चांगली ओळख झाली होती. तो विश्वासपात्र होता. आता तो पांढरा हत्ती नव्हता. डरबनला आल्यानंतर सातव्या वा आठव्या दिवशी गांधीजी प्रिटोरियासाठी रवाना झाले.

## ३

१८९५ साली रँडमधून रेल्वे जाईपर्यंत नाताळपासून दळणवळणासाठी चार्लस्टनलाच जावं लागायचं. तेव्हा चार्लस्टन ते जोहान्सबर्गच्या दरम्यान रेल्वे नव्हती. केवळ चारचाकी घोडागाडी असायची. गांधीजींसाठी पहिल्या वर्गाचं रेल्वेचं आणि घोडागाडीचं तिकीट काढण्यात आलं होतं. दादा अब्दुल्लांनी त्यांना झोपायच्या व्यवस्थेसहित तिकीट काढायचा आग्रह धरला होता पण गांधीजींनी त्याला नकार दिला कारण त्यांच्याजवळ स्वतःचं अंथरूण-पांघरूण होतं. गांधीजींना वाटलं की बिछान्यासहित तिकीट घेण्यासाठी होणारा पाच शिलिंगचा अतिरिक्त खर्च व्यर्थ होईल. डरबनपासून मारिट्झबर्गचा रेल्वेप्रवास ७३ मैलांचा होता. तिथं रेल्वे पोहोचली तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. एक युरोपिअन प्रवासी आत आला. डब्यात 'काळ्या कातडीचा' माणूस पाहून त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या, तो बाहेर गेला आणि एक अथवा दोन रेल्वे अधिकाऱ्यांना घेऊन परतला. ते काहीच म्हणाले नाहीत. त्यानंतर अजून एक अधिकारी आला आणि त्यानं 'कुली बॅरिस्टर'ला असभ्यपणे व्हॅनच्या डब्यात जायला सांगितलं.

परंतु 'कुली बॅरिस्टर' विरोध करत म्हणाला, 'माझ्याजवळ पहिल्या वर्गाचं तिकीट आहे. मी आपण होऊन येथून जाणार नाही.'

रेल्वे अधिकाऱ्यांनी पोलिसांना बोलावलं. पोलिसांनी विरोध करणाऱ्या भारतीयाचा हात धरून त्याला बाहेर ढकललं. त्यानंतर त्याचं सामानही बाहेर भिरकावण्यात आलं. त्यानं दुसऱ्या डब्यात जायला नकार दिला. गाडी सुटली. तो फलाटावर अडकला. त्याचं सामान जिथं पडलं होतं तिथंच पडलेलं राहू देऊन तो विश्राम गृहात गेला आणि तिथं बसून राहिला. त्याच्याजवळ त्यावेळी केवळ हातात ठेवायची बॅगच होती.

पर्णाच्छादित दरीत वसलेल्या आणि समुद्रपातळीपासून २२१८ फूट उंच असलेल्या पिटरमारिट्झबर्गच्या चोहोबाजूला पर्वतराई पसरलेली आहे. दक्षिण आफ्रिका विषुववृत्ताच्या दक्षिणेस असल्यानं तिथले ऋतू भारतातील ऋतूच्याविरुद्ध असतात. इथं जेव्हा हिवाळा असतो तेव्हा तिथं उन्हाळा असतो आणि इथं उन्हाळा असताना तिथं हिवाळा असतो. तो जूनचा महिना होता आणि त्यामुळे तिथं कडाक्याची थंडी पडलेली होती. आजुबाजूच्या पर्वतावरून कापरं भरवणारे वारे वाहत येत होते. 'माझा वर घालायचा कोट सामानातच होता परंतु पुन्हा अपमानित व्हायच्या भीतीनं तो मागायचा मला धीर होत नव्हता.... खोलीत उजेड नव्हता. एक प्रवासी जवळपास मध्यरात्री आला आणि त्याला माझ्याशी बोलायची बहुधा इच्छा होती. पण मी बोलायच्या मनःस्थितीत नव्हतो.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ११२]

मनानं आणि शरीरानं सुन्न झालेल्या अवस्थेत थंडीत थरथरत गांधीजी तिथं रात्रभर बसून होते. ही नोकरी सोडून परत भारतात जायचं की अपमानाचा विचार न करता प्रिटोरियाला जाऊन अधिकारासाठी भांडायचं आणि खटल्याचं कामकाज संपल्यानंतरच भारतात परतायचं हाच विचार त्यांच्या मनात सारखा घोळत होता. सकाळ होऊ लागून फटफटू लागलं व आजुबाजूच्या टेकड्यांवर उन्हं पडू लागत असतानाच त्यांचा निर्णय झालेला होता. थांबायचं, कोणत्याही अडचणी आल्या तरी त्यांना निर्धारानं तोंड द्यायचं, वैयक्तिक बदला घेण्यासाठी नाही तर खोलवर रुजलेल्या व्याधीच्या प्रतिकारार्थ. आपला वैयक्तिक अनुभव ज्या व्याधीचं केवळ वरवरचं चिन्ह आहे ती व्याधी दूर करण्यासाठी संघर्ष करायचा त्यांचा निर्धार झालेला होता. त्यांना वर्णविद्वेशाची विकृती आणि रंगाबद्दलचा पूर्वग्रह यांना तोंड द्यावं लागणार होतं.

आणि तो निर्धार किती महत्त्वाचा असल्याचा सिद्ध झालं? अनेक वर्षांनंतर अमेरिकन मिशनरी डॉ. जॉन मॉट्स यांनी गांधीजींना त्यांच्या जीवनातील सर्वाधिक सर्जनक्षम अनुभवाबद्दल विचारलं असता त्यांना त्या रात्रीच्या अंतःसंघर्षाची आठवण झाली जेव्हा कडाक्याच्या थंडीत त्या काळोख्या विश्रामगृहात ते बसलेले होते. त्या अनुभवानं त्यांचं संपूर्ण जीवनच बदलून गेलं होतं. 'माझ्या क्रियाशील अहिंसेला त्या दिवसापासून सुरुवात झाली' [*हरिजन*, डिसेंबर १०, १९३८] असं ते म्हणाले.

सर्वांच्या हृदयाचा शोध घेणाऱ्या सर्वशक्तिमान परमेश्वरानं त्या दिवशी प्रवासात त्यांची परीक्षा घ्यायचं ठरवलं होतं. सकाळी गांधीजींनी दोन लांब तारा - एक रेल्वे कंपनीच्या जनरल मॅनेजरला आणि दुसरी दादा अब्दुल्ला यांना - पाठवल्या. दादा अब्दुल्ला रेल्वेच्या जनरल मॅनेजरला भेटले आणि पिटरमारिट्झबर्ग येथील आणि इतर ठिकाणाच्या भारतीय व्यापाऱ्यांना गांधीजींकडे लक्ष देण्यासाठी ताराही केल्या. त्या दिवशी यथावकाश भारतीय व्यापारी आले. आपण काय अनुभवलं हे गांधीजींनी त्यांना सांगितलं. ते म्हणाले की यात वेगळं असं काही नाही आणि त्यांनी गांधीजींना आपले स्वतःचे कटू अनुभव सांगितले. ती उद्वेगजनक कहाणी होती. आणि ती अधिकच उद्वेगजनक यासाठी झाली होती की त्यांनी स्वतःला त्या परिस्थितीशी जुळवून घेतलं होतं. ते म्हणाले की आम्ही व्यापारी आहोत. आम्ही इथं पैसा कमवायला आलेलो आहोत. आत्मसन्मानाच्या बाबतीत आम्ही फार चिकित्सक राहू शकत नाही. असे अपमान पचवणं आम्हाला भाग आहे. संध्याकाळची गाडी येईपर्यंत मनातून गांधीजी अतिशय व्यथित झाले. त्यांच्यासाठी पहिल्या दर्जाचं आसन आरक्षित करून ठेवण्यात आलं होतं. आता त्यांनी बिछान्यासहितचं तिकीट घेतलं. ते आधी त्यांनी डरबनला नाकारलं होतं. दुसऱ्या दिवशी गाडी चार्लस्टाऊन येथे पोहोचली.

गांधीजींनी डरबन येथे घेतलेल्या तिकिटात चारचाकी घोडागाडीच्या तिकिटाचाही समावेश होता. परंतु गांधीजींनी जेव्हा घोडागाडीच्या एजंटला चार्लस्टाऊन येथे ते दाखवलं तेव्हा त्यानं ते 'रद्द झालं' असल्याचं सांगितलं. गांधीजींना माहीत होतं की हे चूक होतं. मध्येच प्रवास

खंडल्यानं तिकीट बेकायदेशीर ठरू शकत नव्हतं. अखेरीस एजंटला ते मान्य करावं लागलं. परंतु 'गडद रंगाच्या माणसाला' गाडीत बसवायला तो घाबरत होता. इतर प्रवाशांनी त्यावर नक्कीच आक्षेप घेतला असता आणि त्यांनी गाडीत 'कुली'च्या बाजूला बसायला नकार दिला असता.

पुढारी म्हणवणाऱ्या एका गोऱ्या माणसाच्या ताब्यात ती गाडी होती. सामान्यपणे तो गाडीवानाच्या बाजूला बसत असे. पण या वेळी त्यानं आत बसायचा निर्णय घेतला व त्यानं आपली जागा 'कुली बॅरिस्टर' ला दिली. परंतु तीन वाजता गाडी जेव्हा पर्देकॉफला पोहोचली तेव्हा त्याला सिगारेट प्यायची इच्छा झाली आणि गाडीवानाजवळ बसायचा तो आग्रह धरू लागला.

गाडीवानाजवळून एक घाणेरडं कापड घेऊन पाय ठेवायच्या जागेवर पसरवत तो लांब कोट घातलेल्या कुली बॅरिस्टरला म्हणाला : 'सामी आता तू इथं बस.'

'तुला तुझ्या पायाजवळ मला बसवायचं आहे पण मी असं करणार नाही. माझी आत बसायची तयारी आहे.' गांधीजी उत्तरले.

चिडलेला तो गोरा गांधीजींच्या कानावर गुद्दे मारू लागला. त्यांचा हात धरून तो त्यांना बाहेर ढकलायचा प्रयत्न करू लागला. 'गाडीच्या पितळी दांड्याला मी घट्ट धरून ठेवलं. .... माझ्या मनगटाची हाडं तुटली तरी तो दांडा सोडायचा नाही असा मी निर्धार केलेला होता.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ११४]

एकीकडे दुबळा, निरपराध, नवागत तरुण आणि दुसरीकडे धिप्पाड, दांडगा दादा गोरा यांच्यातील असमान संघर्ष पाहून काही माणसांच्या भावना दुखावल्या. मध्यस्थी करत ते म्हणाले: 'अरे त्याला सोड.... तो बरोबर आहे. तो तिथं जर बसू शकत नसेल तर त्याला आत येऊ दे आणि आमच्याजवळ बसू दे.'

'घाबरायचं कारण नाही.' परंतु त्याच वेळी त्यानं आपली पकड ढिली केली आणि हॉटेनटन नावाच्या नोकराला, जो दुसऱ्या बाजूला बसलेला होता, निलाजरेपणानं त्यानं आपल्या पायाशी

बसायला सांगितलं व आपण त्याच्या जागी जाऊन बसला. तरीही त्याचं शिव्या आणि धमक्या देणं चालूच होतं. ट्रान्सवाल भागातील स्टँडरटनला पोहोचल्यानंतर काय होते ते पाहा म्हणून तो सारखा धमकावत होता.

प्रवाशांनी आपापल्या जागा घेतल्या, गाडीवानानं शिटी वाजवली व गाडी सुरू झाली. 'माझ्या छातीत जोरदार धडधड सुरू होती आणि मी माझ्या मुक्कामावर सुखरूप पोहोचतो की नाही याबद्दल मला काहीच खात्री नव्हती.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ ११४] समोर बसलेला दादा सारखा त्याच्याकडे बोट दाखवत होता व सतत धमक्या द्यायचं त्याचं सत्र चालूच होतं. त्यावेळी गांधीजी मात्र गप्प बसून मदतीसाठी देवाचा धावा करत होते.

स्टँडरटन हे व्हाल नदीवर वसलेलं आहे. तिथं ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमधील सीमा आहे. तिथं काळोख पडल्यानंतर गाडी पोहोचली. इथंसुद्धा दादा अब्दुल्लांनी काही भारतीय मित्रांना लिहिलं होतं. त्यांनी गांधीजींचं स्वागत केलं आणि ते त्यांना शेठ हाजी सुमर यांच्या दुकानात घेऊन गेले. इथंसुद्धा गांधीजींच्या नशिबी शेठ आणि त्याच्या कारकुनांना सहन कराव्या लागलेल्या अनुभवांच्या क्लेशकारक अपमानजनक आठवणी ऐकणंच होतं. त्यांना वाटलं की त्यामुळे गांधीजींना दिलासा मिळेल.

दुसऱ्या दिवशी गाडीच्या कंपनीच्या एजंटला कंपनीच्या माणसानं दिलेल्या धमक्यांची माहिती देणारं पत्र गांधीजींनी लिहिलं. एजंटनं आश्वस्त करत प्रत्युत्तरात लिहिलं की तुम्हांला पुढील प्रवासात इतर प्रवाशांसोबत डब्याच्या आतच बसवण्यात येईल आणि व तुमच्याशी गैरवर्तन करणारा माणूस त्यात नसेल.

ते जोहान्सबर्गला पोहोचले तेव्हा रात्र झालेली होती. कोणीच स्टेशनवर न आलेलं पाहून त्यांनी एक घोडागाडी भाड्यानं ठरवली आणि नॅशनल हॉटेलमध्ये घेऊन चलायला त्यांनी गाडीवानाला सांगितलं.

त्यांनी खोलीची मागणी केली असता हॉटेल व्यवस्थापक म्हणाला, ‘माफ करा, आमच्याकडे सध्या जागा नाही. नमस्कार.’

नंतर त्यांनी गाडीवानाला कमुद्दिनकडे घेऊन चलायला सांगितलं. त्यांचा पत्ता दादा अब्दुल्लांनी दिलेला होता. अब्दुल गनी शेठ तिथं गांधीजींची वाट पाहत होते.

नवागतानं त्यांना जेव्हा हॉटेलमधील अनुभव सांगितला तेव्हा हसत नवल करत त्यांनी विचारलं. ‘आणि तुमची अपेक्षा होती की तुम्हाला नॅशनल हॉटेलमध्ये जागा मिळेल ?’

‘का नाही?’

‘तुम्हाला हळूहळू कळेल.’

इतर मित्रही संभाषणात सहभागी झाले. तुम्ही क्रुगरच्या ट्रांसवालमध्ये आहात. तुम्ही उद्या प्रिटोरियासाठी प्रवासाला सुरुवात कराल तेव्हा तिसऱ्या वर्गानं प्रवास करावा लागणार आहे. ‘भारतीयांना पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाची तिकिटं कधीच देण्यात येत नाहीत.’

‘ती मिळवण्यासाठी तुम्ही सातत्यानं प्रयत्न केला नसेल.’ गांधीजी उद्‌गारले.

त्यांनी सांगितलं की आम्ही अर्ज केला होता परंतु पहिल्या वर्गानंच प्रवास करायचा असा आमचा आग्रह नव्हता.

गांधीजींना कळू शकलं नाही. त्यांनी आपल्यासाठी पहिल्या वर्गाचं तिकीट काढायला सांगितलं आणि ते पुढं म्हणाले की जर मला रेल्वेचं पहिल्या वर्गाचं तिकीट मिळालं नाही तर मी घोडागाडीनं जाणं पसंत करीन. अखेर प्रिटोरिया जोहान्सबर्गपासून ३७ मैलांपेक्षा थोड्या अधिक अंतरावरच तर आहे. त्यांनी स्टेशन मास्तरला पत्र लिहून पहिल्या वर्गाचं तिकीट द्यायची विनंती केली. त्या पत्रात त्यांनी आपण बॅरिस्टर असल्याचा आणि नेहमीच पहिल्या वर्गानं प्रवास करत असल्याचा व लवकरात लवकर प्रिटोरिया येथे पोहोचणं आवश्यक असल्याचा विशेष उल्लेख केला. उत्तरासाठी फारसा वेळ नसल्यानं स्टेशनवर पोहोचल्यानंतरच त्यांनी प्रत्युत्तर मिळायची अपेक्षा केली होती.

त्यांनी विचार केला की स्टेशन मास्तर त्यांच्यासमोर जेव्हा एका निर्दोष पोषाख केलेल्या सुसंस्कृत बॅरिस्टरला पाहतील तेव्हा कुली बॅरिस्टरला पहिल्या वर्गाचं तिकीट देण्याबद्दलचं आपलं मत त्यांना बदलावं लागेल.

भाग्यानं स्टेशन मास्तर बोअर नसून डच होते व त्यामुळे रंगभेदासंबंधी त्यांच्या भावना तेवढ्या तीव्र नव्हत्या. ते म्हणाले की तुम्ही जर मला नंतर अडचणीत आणणार नसाल म्हणजे तुम्हाला कोणी तिसऱ्या वर्गात जायला सांगितलं तर तुम्ही रेल्वे कंपनीवर खटला भरणार नसाल तर माझी तुम्हांला पहिल्या वर्गाचं तिकीट द्यायची तयारी आहे. मैत्रीपूर्ण स्वरात ते पुढं म्हणाले, ‘तुमचा प्रवास सुरक्षित व्हावा असं मी इच्छितो.’

परंतु शेठ गनींना अधिक चांगली माहिती होती. ‘मला वाटतं की गार्ड तुम्हाला शांतपणे बसू देणार नाही.’ गाडी सुटत असताना ते उद्गारले.

शेठची भीती खरी ठरली. जर्मिन्स्टन येथे रेल्वेचा गार्ड तिकिटं तपासायला आला आणि त्यांनी ‘कुली बॅरिस्टरला’ तिसऱ्या वर्गात जायचा हुकूम केला.

गांधीजींनी त्यांना पहिल्या वर्गाचं तिकीट दाखवलं.

‘ते काही नाही. बाहेर निघ येथून.’ गार्ड करड्या आवाजात त्यांना म्हणाला. त्या डब्यात केवळ एक इंग्रज प्रवासी होता. गार्डची कानउघाडणी करत ते म्हणाले : ‘त्या सद्गृहस्थांना तुम्ही का त्रास देताहात? त्यांच्याबरोबर प्रवास करायला माझी काहीच हरकत नाही.’

‘तुम्हाला जर कुलीबरोबर प्रवास करायचा असेल तर मी कशाला काळजी करत बसू?’ गार्ड कुरकुरत निघून गेला.

प्रिटोरिया येथे गाडी पोहोचली तेव्हा आठ वाजले होते. स्टेशनवर सामसूम होती. गॅसचे दिवे मंदपणे प्रकाशत होते. सर्व प्रवासी जाईपर्यंत त्यांनी वाट पाहिली. नंतर घाबरत आणि थरथरत त्यांनी तिकिटं गोळा करणाराला तिकीट दाखवत, तुम्ही एखाद्या हॉटेलची माहिती सांगू शकता काय असं त्यांनी विचारलं. तिकीट मास्तर त्यांना ती माहिती सांगू शकला नाही परंतु

त्यांचं संभाषण ऐकत असणाऱ्या जवळच्या एक निग्रोनं त्यांना एका लहानशा हॉटेलमध्ये न्यायची तयारी दाखवली. त्याचा मालक एक अमेरिकन गृहस्थ होता. तो त्या निग्रोच्या चांगला ओळखीचा होता. नवागताला तो म्हणाला, 'मला खात्री आहे की तो तुम्हाला घेईल.'

त्या निग्रो मित्रानं त्यांना जॉनस्टन फॅमिली हॉटेलमधे नेलं. गांधीजींची जर आपल्या खोलीतच जेवण घ्यायची तयारी असली तर मालकाची त्यांना खोली द्यायची तयारी होती. तो म्हणाला, 'मी रंगभेद मानत नाही परंतु युरोपिअन ग्राहक तुमच्यासोबत एकाच टेबलवर जेवायला तयार होणार नाहीत अशी मला भीती वाटते आणि ती गिऱ्हाईकी गमावणं मला परवडणारं नाही.'

गांधीजींनी प्रस्ताव मान्य केला आणि त्यांना त्यांची खोली दाखवण्यात आली. थोड्या वेळानं श्रीयुत जॉनस्टन परत आले आणि क्षमायाचनेच्या स्वरात म्हणाले की मी माझ्या गिऱ्हाइकांशी बोललो आणि त्यापैकी कुणाचीच तुमच्याबरोबर जेवायला हरकत नाही. 'त्यामुळे तुम्ही कृपाकरून जेवणघरात जेवायला या आणि तुम्हांला हवं तेवढे दिवस तुम्ही राहा. ते जेवणघरात गेले व पोटभरून जेवले.

**४**

गांधीजींना ज्या वकिलांकडे जायचं होतं ते सुतार आणि मिशनरीही होते. ए. डब्ल्यू. बेकर हे त्यांचं नाव होतं व ते निष्ठावान ख्रिश्चन होते. रंगभेदाच्या भावनेचा त्यांना स्पर्शही झालेला नव्हता. परंतु 'बायबलवर अतिशय श्रद्धा' असल्यामुळे त्यांना वाटत होतं की माणसाची मुक्ती ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याशिवाय होऊ शकत नाही. दक्षिण आफ्रिका जनरल मिशनच्या निदेशकांपैकी ते एक होते. त्यांनी आपल्या खर्चानं एक चर्च बांधलं होतं व तिथं ते आपल्या खर्चानं नियमितपणे धर्मोपदेश करायचे. स्त्रियांना मिशनरी काम शिकवण्यासाठी त्यांनी स्वतः झुलूंच्या भाषांचा अभ्यास केला होता.

गांधीजी जेव्हा त्यांना दुसऱ्या दिवशी भेटले आणि आपल्या राहायच्या व्यवस्थेविषयी बोलले तेव्हा ते गांधीजींना म्हणाले, 'इथं अतिशय वर्णभेद आहे.' त्यांनी गांधीजींना ते ओळखत

असलेल्या एका बेकरीवाल्याच्या बायकोकडे नेलं. तिनं त्यांना दर आठवड्याला ३५ शिलींग भाड्यानं खोली द्यायचं कबूल केलं.

बेकर आणि त्यांच्या गटातील त्याचे सहकारी रोज दुपारी एक वाजता 'प्रकाश आणि शांतता' मिळावी म्हणून भेटायचे. गांधीजींची धर्मनिष्ठा अजून स्थिर झालेली नाही व धर्माच्या बाबतीत ते कुठं उभे आहेत हे त्यांना अजून कळलेलं नाही असं बेकर यांना जेव्हा गांधीजींकडून कळलं तेव्हा त्यांनी गांधीजींना दुसऱ्या दिवशी प्रार्थनेला उपस्थित राहायची विनंती केली.

जॉन्सटन हॉटेलचं बिल देऊन गांधीजींनी आपला मुक्काम राहायच्या नवीन ठिकाणी हलवला. त्यांच्यासाठी बनवण्यात आलेल्या शाकाहारी जेवणात सहभागी झाल्यानंतर दादा अब्दुल्लांनी ज्या मित्रांसाठी पत्रं दिली होती त्या मित्रांना गांधीजी भेटायला गेले. ते ज्यावेळी आपल्या मुक्कामी परतले तेव्हा काळोख पडला होता. त्या रात्री ते जेव्हा बिछान्यावर पडले तेव्हा प्रिटोरियातील पहिल्या दिवसाचा विचार करताना त्यांच्या मनाचा गोंधळ उडालेला होता. एका बाजूला भयावह अशा रंगद्वेषानं भरलेल्या या प्रदेशात ते अगदी नवखे होते. दुसऱ्या बाजूला ख्रिश्चन होते ज्यांना त्यांच्या आत्मोद्धाराची चिंता वाटत होती आणि जे परलोकविषयक सुरक्षिततेची शाश्वती देत होते. त्यांची काळजी केवळ परोपकारबुद्धीतून निर्माण झालेली होती काय? संपूर्ण सत्याच्या शोधाचा त्यांचा मार्ग त्यामुळे सुरुवातीसच पूर्वग्रहांनी भरणार तर नाही? याचा विचारच त्यांच्या मनात वादळ निर्माण करत होता. पण हळूहळू ते वादळ शमू लागताच त्यांचा स्पष्ट निर्णय झाला की जे काही आपल्या मार्गात येईल त्याचा भावनाविवश न होता अभ्यास करायचा. त्यानुसार बेकर यांच्या गटाशी 'ईश्वराच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागायचा मी निर्णय घेतला. जोपर्यंत मला माझ्या धर्माचं नीट ज्ञान होत नाही तोपर्यंत मी दुसऱ्या धर्माचा स्वीकार करायचा विचार करू शकत नाही.'

त्यांच्या मनावरील दडपण कमी झालं आणि ते निवांतपणे झोपले.

दुसऱ्या दिवशी बेकर आणि त्यांच्या गटातील लोक प्रार्थना करायला गुडघ्यावर बसले. तेही त्यांच्याबरोबर प्रार्थनेसाठी गुडघ्यावर झाले. त्यांची रोजची प्रार्थना 'हृदयाची दारं उघडावी

आणि दिवस शांततेत जावा’ अशी असायची. त्या दिवशी दैनंदिन प्रार्थनेसह विशेष प्रार्थना करण्यात आली : ‘जी शांतता तू आम्हाला दिली आहे ती.... आमच्याबरोबर आलेल्या आमच्या या नवीन भावासही दे. हे येशू तू जसं आम्हाला वाचवलं आहेस तसंच यालाही वाचव.’ [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १२२] प्रार्थना काही मिनिटांपेक्षा अधिक वेळ चालली नाही. प्रार्थनेनंतर ते सर्व पांगले. प्रत्येकजण जेवायला वा आपापल्या कामावर गेला.

दोन प्रौढ कुमारिका, कुमारी हॅरिस आणि कुमारी गिब्ज तसंच क्वेकर मायकेल कोट्सही त्या प्रार्थनेत सहभागी झालेले होते. त्या दोन स्त्रियांनी गांधीजींना आपल्या घरी दर रविवारी चार वाजता चहासाठी कायम निमंत्रण दिलं. कोट्स यांनी आपल्या इतरही काही मित्रांची गांधीजींशी ओळख करून दिली. ते सर्व ख्रिश्चन होते. त्यांना आवडणाऱ्या धार्मिक पुस्तकांचा गांधीजींवर त्यांनी मारा केला.

बेकर यांनी गांधीजींना सांगितलं की त्यांच्याजवळ गांधीजींना बॅरिस्टर म्हणून देण्यासारखं फारसं काम नाही कारण त्यांनी उत्कृष्ट वकिलाची नेमणूक केलेली आहे. गांधीजींची मदत त्यांना मुख्यत्वेकरून त्यांच्या अशिलाकडून म्हणजे दादा अब्दुल्लांकडून महत्त्वाची माहिती मिळवून देण्यासाठी लागणार होती. भरपूर वेळ हाताशी असल्यामुळे गांधीजींनी बुभुक्षितासारखं वाचन केलं. १८९३ साली प्रिटोरियात केलेल्या संपूर्ण मुक्कामात त्यांनी धर्मावरील जवळपास ८० पुस्तकं वाचली. दर रविवारी कोट्सची भेट झाली असता ते त्यांना आठवड्यातील आपली धार्मिक दैनंदिनी सांगायचे, त्यांनी वाचलेल्या पुस्तकांसंबंधी चर्चा करायचे आणि आपल्या मनावर त्यांचा कोणता ठसा उमटला ते सांगायचे. ‘स्त्रिया त्यांना आलेले गोड अनुभव सांगायच्या व त्यांना लाभलेल्या शांततेसंबंधी चर्चा करायच्या.’

गांधीजींनी जी पुस्तकं वाचली त्यातील बटलर यांचं ॲनॉलॉजी हे पुस्तक ‘सखोल विचारांनी भरलेलं आणि कठीण’ असल्याचं गांधीजींना वाटलं. डॉ. पार्कर यांचं भाष्य नैतिकदृष्ट्या उत्तेजित करणारं होतं. परंतु ‘मेनी इनफॅलिएबल प्रुफ्स’चा त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही. जोवर ईश्वराच्या अस्तित्वाचाच प्रश्न होता तोवर त्यांना कोणत्याच ‘पुराव्याची गरज नव्हती

आणि कोणताच 'अचूक पुरावा' येशू हाच 'एकमेव देवाचा अवतार आहे आणि देव आणि माणसातील मध्यस्थ आहे हे त्यांना पटवून देऊ शकत नव्हता.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ टूथ*, पृष्ठ १२३]

बेकरप्रमाणेच कोट्ससाठीही ख्रिश्चन धर्म हाच केवळ सत्यधर्म होता. एके दिवशी आपल्या अख्रिस्ती मित्राच्या गळ्यातील वैष्णव पंथाची खूण असलेली तुळशीमाळ पाहून कोट्सनी विचारलं, 'तुमचा यावर विश्वास आहे?'

'हिच्या गूढ परिणामांची मला कल्पना नाही. मी जर ही घातली नाही तर माझं काही नुकसान होईल असंही मला वाटत नाही. परंतु पुरेसं कारण असल्याशिवाय मी ती टाकूनही देऊ शकत नाही.' गांधीजी उत्तरले.

'मग ही अंधश्रद्धा आहे. ती तुम्हाला शोभत नाही. इकडे या, मी ही माळ तोडून टाकतो.'

'नाही, तुम्ही ती तोडू शकत नाही. माझ्या आईनं मला दिलेली ती पवित्र भेट आहे. तिनं माझ्या गळ्यात आपल्या प्रेमाचं प्रतीक म्हणून ती घातली. काळाच्या प्रवाहात तीच केव्हा तरी तुटेल. तेव्हा मी नवीन घालणार नाही. परंतु ही माळ तोडता येऊ शकत नाही.'

त्यामुळे ती माळ कायम राहिली. कोट्सची निराशा झाली.

एका प्लायमाऊथ बंधुशी कोट्स यांनी गांधीजींची ओळख करून दिली होती. ख्रिश्चन धर्मातील पापमुक्तीचा सिद्धान्त आणि येशूनं मानवजातीच्या पापासाठी स्वतः भोगलेल्या यातना यातील सौंदर्याचं सविस्तर विवेचन करून त्यांनी गांधीजींना ख्रिश्चन धर्माकडे वळवायचा प्रयत्न केला.

ते गांधीजींना म्हणायचे, 'इकडे पाहा, मला जे हवं ते मी करतो आणि तरीही माझ्या मनावर पापाचं ओझं राहत नाही.' आणि हे सिद्ध करण्यासाठी की काय 'त्यांनी मुद्दाम पापकर्म केलं.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ टूथ*, पृष्ठ १२५]

गांधीजी उत्तरले, 'मला माझ्या पापांच्या परिणामांपासून मुक्ती नको आहे. मला पापापासूनच मुक्ती हवी आहे, किंबहुना पापाविचारपासूनच मला मुक्ती हवी आहे.'

प्लायमाऊथ बंधू गांधीजींना समजावत म्हणाले की तुमचा प्रयत्न व्यर्थ आहे. प्रत्येकाकडून पाप हे होणारच. या जगात पापमुक्त होऊन राहणं अशक्य आहे. त्यामुळेच येशूनं अवतार धारण करून मानवजातीच्या पापमुक्तीसाठी स्वतः प्रायश्चित्त घेतलेलं आहे. 'या महान त्यागाचा लाभ घेऊन येशूवर आणि येशूनं दिलेल्या चिरंतन जीवनाच्या अभिवचनावर विश्वास ठेवणं हे आता मानवजातीचं काम आहे.'

'सर्व जण ज्या ख्रिश्चन धर्मावर विश्वास ठेवतात तो हाच धर्म असेल तर तो मी स्वीकारू शकत नाही.' गांधीजी उत्तरले.

प्लायमाऊथ बंधुचा आलेला अनुभव गांधीजींनी जेव्हा कोट्स यांना सांगितला तेव्हा त्यांना धक्काच बसला. ते स्वतः ईश्वरभिरू माणूस होते. गांधीजींनी त्यांना आश्वस्त केलं की या अनुभवामुळे ख्रिश्चन धर्माबद्दल मी माझं मत पूर्वग्रहदूषित होऊ देणार नाही. सत्याचा माझा शोध मी मोकळ्या मनानं सुरू ठेवीन. गांधीजींना माहीत होतं की सर्व ख्रिश्चन ख्रिश्चन धर्माचा असा अर्थ लावत नाहीत. त्यांची अडचण मूळ बायबलचा अर्थ लावण्या विषयीची होती.

५

गांधीजींच्या अंतःकरणात शूळ खोलवर घुसला होता. त्यांचे देशबांधव ज्या वर्णभेदाच्या वातावरणात राहत होते त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी शपथबद्ध असल्यामुळे ते आपल्या पायाखालीही तेच गवत उगवू देऊ शकत नव्हते. ख्रिश्चनांशी संबंध जुळवत असतानाच गांधीजी भारतीय समुदायाशीही संबंध जुळवायचा प्रयत्न करत होते. दादा अब्दुल्ला यांच्या खटल्यातील प्रतिवादी शेठ तैय्यब हाजी खान यांनाही ट्रांसवालमध्ये तसंच सन्माननीय स्थान होतं जसं दादा अब्दुल्ला यांना नाताळमधे. प्रिटोरियात राहणाऱ्या सर्व भारतीयांना ज्या अड्चणीच्या परिस्थितीत जीवन जगावं लागत होतं त्यातून त्यांना जागं करण्याकरिता शेठ तैय्यब हाजी खान यांच्या

मदतीनं गांधीजींनी प्रिटोरिया येथे आल्यानंतर एका आठवड्याच्या आतच एक सभा बोलावली. ते हाजी महम्मद हाजी जूसब यांच्या घरी भेटले. सभेत बहुतांश लोक मेमन होते व त्यात तुरळक हिंदू दिसायचे.

व्यापारसुद्धा सत्याधारित असावा हा त्यांच्या पहिल्या जाहीर भाषणाचा विषय होता. व्यवसायाशी वा व्यावहारिक गोष्टींचा सत्याशी काही संबंध नसतो हा लोकप्रिय समज त्यांनी फेटाळून लावला. व्यवहार आणि धर्म या वेगवेगळ्या गोष्टी आहेत व 'ह्या दोघांचं मीलन कधीच होऊ शकत नाहीं हे मत त्यांनी नाकारलं. गांधीजींनी त्यांना सांगितलं की या परदेशात तुम्ही मोजकेच लोक आहात. यामुळे जीवनात सत्याचरण करायची तुमची जबाबदारी अजून वाढते कारण 'तुम्हा थोड्याशा लोकांच्या वर्तणुकीवरून तुमच्या कोट्यवधी देशबांधवांविषयी मत बनवण्यात येणार आहे.' त्यांच्यातील आरोग्याला हानिकारक अशा घाणेरड्या सवयींसंबंधी गांधीजी त्यांच्याशी बोलले. गांधीजींनी त्यांना सांगितलं की आपण वैयक्तिक आणि सामाजिकदृष्टीनं स्वच्छतेच्या अशा सवयी लावायला पाहिजे की कुणालाही आपल्याकडे बोट दाखवता येणार नाही. तुम्हाला जर आजुबाजूला पसरलेल्या शत्रुत्वानं भरलेल्या या वातावरणात टिकून राहायचं असेल तर तुम्ही जातीयवादी, धार्मिक आणि प्रादेशिक भेदभाव विसरून स्वतःला सर्वप्रथम भारतीय आणि शेवटपर्यंत भारतीय समजायला पाहिजे.

त्या भाषणात असं काहीच नव्हतं की जे श्रोत्यांनी केव्हा ना केव्हा आणि कुठे ना कुठे ऐकलेलं नव्हतं. परंतु अशा रीतीनं कोणीही इतक्या अंतःकरणपूर्वक असं बोललेलं नव्हतं. असे हृदयातील अंतर्हृदयीचे बोल सातत्यानं न डगमगता केलेल्या सत्याच्या दीर्घ उपासनेतूनच निघत असतात. गांधीजींनी त्यांच्यासमोर जे पाच मुद्दे मांडले होते ते मुळातच अगदी सामान्य होते. परंतु ते त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग होते, त्यांच्यापैकी प्रत्येकाला ते लागू होत होते आणि अपमानित जीवनाचं जे दुःख त्यांना भोगावं लागत होतं त्याच्याशी त्यांचा सरळ संबंध होता. त्यांच्या भाषणाचा सखोल प्रभाव पडला. चर्चा सुरू झाली. त्यांच्या अडचणी आणि त्यांची

कायदेशीर अपात्रता अधिकाऱ्यांच्या आणि शासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी संघटना काढायची गांधीजींनी त्यांना सूचना केली.

त्या सूचनेचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. अनेक लोकांनी पुरावे द्यायची तयारी दाखवली. इंग्रजी भाषिक देशात राहत असूनही श्रोत्यातील अगदी कमी लोकांना इंग्रजी येतं हे पाहून एखादा वर्ग सुरू करण्यात आल्यास त्या वर्गाला वा ज्या व्यक्तींना इंग्रजी शिकायची इच्छा असेल त्या व्यक्तींना इंग्रजी इंग्रजी शिकवायची तयारी गांधीजींनी दाखवली. वर्ग काही सुरू झाला नाही पण गांधीजी आपल्याकडे येऊन सवडीच्यावेळी शिकवायला तयार असतील तर इंग्रजी शिकायची तयारी तीन तरुणांनी दाखवली. त्यातील दोन मुसलमान होते - एक म्हाली आंणि दुसरा कारकून तर तिसरा हिंदू. त्याचं लहानसं दुकान होतं. गांधीजींनी त्यांच्या सवडीप्रमाणे त्यांना शिकवायचं कबूल केलं. ‘त्यांना शिकवायच्या माझ्या क्षमतेच्या बाबतीत माझा गैरसमज नव्हता. ते थकू शकत होते पण मी नाही. काही वेळा मी त्याच्याकडे जात असे आणि ते कामात गुंतले असल्याचं आढळत असे. पण मी धीर सोडला नाही.’ गांधीजींच्या त्या मेहनतीमुळे जवळपास आठ महिन्यांच्या काळात त्याच्यातील दोघं शिकले. दुकानदार ‘हिशेब ठेवायला व साधी व्यावसायिक पत्र लिहायला शिकला’ तर म्हाली आपल्या गिऱ्हाइकांशी ‘बोलताचालता येईल एवढं इंग्रजी शिकला.’ अशा रीतीनं त्यातील दोन विद्यार्थी ‘बऱ्यापैकी उत्पन्न मिळवायला समर्थ’ ठरले.

गांधीजी म्हणाले की ‘मी पूर्ण समाधानी होतो. ईश्वरानं दया करून मला जी काही बुद्धी दिली तिचा उपयोग करायचं समाधान मला वाटत होतं. माणसाला गरजेपेक्षा अधिक काम देण्यात येत नाही.’

पहिल्या सभेच्या यशानं प्रोत्साहित होऊन लोकांनी दर आठवड्याला अथवा कमीतकमी दरमहा एकदा भेटायचं ठरवलं. सभा जवळपास नियमितपणे होत होत्या. या सभांमध्ये सर्व प्रकारच्या व्यावहारिक समस्यांचा, मग त्या वैयक्तिक असोत की सामाजिक, मोकळेपणानं विचार करण्यात यायचा. गांधीजी अथकपणे काम करत होते. थोड्याच दिवसात प्रिटोरियात

असा एकही भारतीय नव्हता की ज्याला गांधीजी ओळखत नव्हते वा ज्याची परिस्थिती गांधीजींना अवगत नव्हती.

पहिल्या वर्गाच्या प्रवासासंबंधी भारतीयांवर असलेल्या निर्बंधांचा विषय त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसमोर मांडला. बारीक चौकशीनंतर लक्षात आलं की तत्कालीन नियमांमध्येही त्यांना काहीच आधार नव्हता. त्यामुळे आश्वासन देण्यात आलं की भारतीयांनी जर 'योग्य पद्धतीनं पोशाख केलेला असेल' तर त्यांना पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाची तिकिटं द्यावी. हा अर्धवट विजय होता. तत्त्व मान्य करण्यात आलं होतं पण व्यवहारात रेल्वे अधिकाऱ्यांच्या तारतम्य बुद्धीवर बरंच काही सोपवण्यात आलं होतं. अखेरीस कोणी 'योग्य पोषाख' केलेला आहे हे ठरवायचा अधिकार अधिकाऱ्यांनाच देण्यात आला होता. गांधीजींनी प्रिटोरियातील जॅकोबस डी वेट या ब्रिटिश प्रतिनिधीशी संपर्क साधला आणि त्यांनी त्यांच्याकडून शक्य होईल ती मदत भारतीयांना करायचं आश्वासन दिलं. ऑरेंज फ्री स्टेटमधून काही भारतीयांना त्याच्या सामानसुमानासहित कशाप्रकारे हाकलून लावण्यात आलं होतं ते प्रतिनिधींनी दाखवलेल्या काही कागदपत्रांवरून लक्षात येत होतं.

हळूहळू मेहनतीला फळ येऊ लागलं. डरबन आणि प्रिटोरियातील ५०० मैलांच्या अंतरानं जरी भारतीय समाज विभागलेला होता तरी व्यावहारिक दृष्टीनं सर्व कारणांसाठी तो एक होता. ट्रान्सवाल आणि नाताळ या दोन्ही ठिकाणी अनेक प्रमुख भारतीय लोकांच्या व्यवसायाच्या शाखा होत्या वा त्यांचे व्यावसायिक संबंध होते. त्यांच्यात सतत आणि जोरात जाणं येणं सुरू असायचं. कोणत्याही एका प्रांतात एखादी घटना घडली तरी तिचे तरंग दोन्ही प्रांतात उठायचे.

गांधीजींच्या प्रिटोरियातील आगमनानंतर भारतीय समुदायात जे नवीन वातावरण निर्माण होऊ लागलं होतं त्याचं प्रत्यंतर १८९३ सालच्या नोव्हेंबर महिन्यात घडलेल्या घटनेवरून येतं. डरबन येथे राहणारे तैय्यब अहमद या मुसलमान पुढाऱ्याला दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून पिटमारिट्झबर्ग ते डरबन या प्रवासात एकदा या डब्यात तर दुसऱ्या वेळी वेगळ्या डब्यात अशा रीतीनं तीनदा अपमानास्पद रीतीनं हुसकवण्यात आलं होत. पैसा कमावण्यासाठी अपमान सहन

करायच्या भारतीय समुदायाच्या आतापर्यंतच्या तत्त्वज्ञानाऐवजी त्यांनी नाताळ सरकारच्या रेल्वे विभागाविरुद्ध १०० पौंडांचा दावा बेकायदेशीरपणे दुसऱ्या वर्गातून हुसकावून लावल्याबद्दल केला.

वेगवेगळ्या ठिकाणी गोऱ्या प्रवाशांनी आणि रेल्वे अधिकाऱ्यांनी 'वास मारणारा कुली' अशा शिव्या दिल्या की नाही आणि स्वतः होऊन दुसऱ्या डब्यात गेला नाही तर 'या नरकाला बाहेर फेका' अशा धमक्या दिल्या की नाही याची उलटतपासणी खटल्याच्या वेळी करण्यात आली असताना प्रतिवादींनी द्व्यर्थी भाषेचा आधार घेतला व धमक्यावगैरे दिल्याचं नाकारलं. त्यामुळे न्यायाधीशांनी पुढील ताशेरे झाडले :

विल्यम मॅसी या १४ वर्षांच्या मुलानं सांगितलं की त्यानं एका अधिकाऱ्याला (हेंड्री) एका अरबाला 'बाहेर ये' असं म्हणताना ऐकलं. परंतु वादीला 'कुली' असं म्हणण्यात आलं नव्हतं. साक्षीदाराच्या वडिलांनी सांगितलं की मी 'केवळ त्याला एकट्यालाच' हे शब्द ऐकले. परंतु कारण साक्षीदाराला माहीत नव्हतं.

न्यायाधीश (श्रीयुत डिलाँ) : ' 'केवळ त्याला एकट्यालाच असू दे' असं तुझे वडील म्हणाले असल्याचं तुम्ही हेन्ड्रीला सांगितलं होतं काय ?'

साक्षीदार : 'माझे वडील असं का म्हणाले ते मला माहीत नाही.'

श्रीयुत डिलाँ : 'मला असं वाटलं.'

वादीच्या वकिलांनी, फरमान यांनी पुढं उलट तपासणी केली असता : 'श्रीयुत मॅसी 'केवळ त्याला एकट्यालाच' असं म्हणाले नाही तर 'बरं ते ठीक आहे' असं म्हणाले:'

न्यायाधीश : 'मग तुम्ही अरबाला तिथं का राहू दिलं नाही ?'

साक्षीदार : 'मला देण्यात आलेल्या सूचनांचं मला पालन करावं लागत होतं.'

न्यायाधीश : 'तुम्हाला देण्यात आलेल्या सूचनांमध्ये भारतीय आणि अरबांना विचारपूर्वक वागवावं असं सांगण्यात आलेलं आहे.'

साक्षीदार : 'होय.'

श्रीयुत डिलों : 'मग माझ्या मतापेक्षा तुमचं मत फार वेगळं आहे. आणि जे लोक रेल्वेशी संबंधित नाहीत ते तुमच्यापेक्षा त्यांचं अधिक पालन करतात.'

साक्षीदार : 'या लोकांना वाईट वागणूक दिलेली मी कधीच पाहिली नाही.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर १४, १८९३]

खटल्याचा निकाल रेल्वे खात्याविरुद्ध लागला. नाताळ मर्क्युरीनं त्यावर भाष्य केलं :

*निकाल.... कदाचित लोकप्रिय नसेलही - परंतु आपल्याला मान्य करणं भाग आहे - ....की हा निकाल न्याय्य आहे. आपले व्यापारी अरबांशी व्यापार करतात व सार्वजनिक विक्रीच्या वेळी त्यांच्यात मिसळतातही. त्यामुळे ते जर नियमांचं पालन करत असतील तर विचारपूर्वक आक्षेप घेण्यासारखं कोणतंच कारण असू शकत नाही. जे अनेक गरीब परिस्थितीतील लोक रेल्वेनं प्रवास करतात ते स्वच्छतेच्या मुद्याचाच विचार केला तर नाताळमधील भारतीय व्यापाऱ्यापेक्षा अधिक आक्षेपार्ह असतात.* [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर २४, १८९३]

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह आंदोलनाची गंगोत्री ही अशी होती. गांधीजींना कल्पनाही नव्हती की भारतीयांच्या प्रश्नाचा ते जो सूक्ष्म अभ्यास करत होते त्याचा भविष्यात काही लाभ होईल वा तो त्यांना प्रगतीपथावर घेऊन जाईल. कारण तो खटला संपल्यानंतर म्हणजे एका वर्षानं भारतात परतायचा ते विचार करत होते. त्यांच्यासमोर जी परिस्थिती उभी झाली होती तिच्यात त्यांना जे कर्तव्य जाणवलं ते त्यांनी त्यावेळी केलं. 'दूरच्या दृश्याची' ते फिकीर करत नव्हते. जीवनविषयक जे तत्त्वज्ञान ते विकसित करत होते त्यात यशापयशाला महत्त्व नव्हतं. तिथं काहीही मोठं नव्हतं आणि काहीही लहान नव्हतं. तो सर्व त्यांच्या आध्यात्मिक संघर्षाचा भाग होता. ते त्यांच्या जीवनकार्याची तयारी करत होते याची त्यांना काहीच कल्पना नव्हती.

# प्रकरण १४ वे

# चाचपडणे

## १

यावेळी दक्षिण आफ्रिकेतील वातावरण काळ्या कातडीच्या माणसासाठी अगदीच आरोग्यदायी नव्हतं. १८८६ साली दुरुस्ती करण्यात आलेला १८८५ सालच्या कायदा क्रमांक ३ च्या अंतर्गत ट्रान्सवाल गणराज्यात राहू इच्छिणाऱ्या प्रत्येक भारतीयाला ३ पौंड पोल कर भरून नोंदणी करणं आवश्यक होतं. भारतीयांसाठी राखून ठेवण्यात आलेले भाग, वस्त्या वा गल्ल्यांशिवाय दुसरीकडे त्यांना स्थावर मालमत्ता विकत घ्यायचा अधिकार नव्हता. त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता. जोहान्सबर्ग येथील सोन्याच्या खाणीच्या कायद्यानुसार त्यांना खनोत्पादनासाठी परवाना मिळत नसे आणि 'स्थानिक' सोनं विकणं वा जवळ ठेवणं हा त्यांच्यासाठी गुन्हा ठरवण्यात आला होता. स्थानिक लोकांबरोबरच त्यांच्यावर इतरही काही बंधनं घालण्यात आलेली होती.

वर्तनाचं उदात्तीकरण करणं हा मानवी स्वभाव असल्याचं प्रसिद्ध आहे. १८७७ साली अँथनी ट्रॉलोपी या इंग्रज कादंबरीकारानं दक्षिण आफ्रिकेला अधिकृत भेट देऊन तिथल्या समस्यांचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर लिहिलं : 'दक्षिण आफ्रिका हा काळ्या लोकांचा प्रदेश आहे.... गोऱ्यांचा नाही. तो तसा होता, तसा आहे व तसाच राहील.' काळी माणसं केवळ आपल्या संख्याबळावर आपल्याला दाबून टाकतील असं गोऱ्यांना वाटत राहत असते. त्यांनी 'नेटिव्हां' ची (स्थानिक) भूमी बळकावली आहे. प्रगतीच्या नियमानुसार हे कायदेशीर व योग्य होतं. डार्विननं भविष्यवाणी केली नव्हती काय की निकटच्या भविष्यकाळात, शतकांनी मोजावं एवढ्या दूरच्या नाही, 'जवळपास निश्चितपणे जगातील सुसंस्कृत वर्ग सर्व रानटी लोकांचा नाश करून त्यांची जागा घेईल?' परंतु अशा स्थानिक लोकांचं काय करावं की जे डार्विनच्या भविष्यवाणीनंतरही

नष्ट न होता संख्येनं सारखे वाढतच होते? ज्या काळ्या लोकांचं गोऱ्यांशी ५ ला १ असं प्रमाण आहे त्यांच्यावरील गोऱ्यांचं प्रभुत्व कसं टिकवावं?

याचंही डार्विननं उत्तर दिलेलं आहे : त्यानं वैज्ञानिक पद्धतीनं दाखवलं आहे की काळा माणूस हा गोऱ्या माणसापेक्षा गोरिलाच्या जास्त जवळचा आहे व त्यामुळे तो गोऱ्यांपेक्षा कमी प्रतीचा आहे. व डार्विन चूक असू शकत नाही. ऱ्होड्सनी जाहीर केलं होतं की स्थानिक लोक पुरेसे विकसित मानव प्राणी नाहीत. त्यांना मानवी मन आहे पण ते नुकतेच रानटीपणातून बाहेर पडत आहेत. सांस्कृतिक दृष्ट्या ते अजून बाल्यावस्थेत आहेत. शारीरिक दृष्टीनं ते जरी प्रौढ असले तरी युरोपिअन लोकांची स्वस्त मजुराची मागणी पूर्ण करायचं कार्य पूर्ण करण्यासाठी निसर्गानं त्यांना निर्माण केलेलं आहे. दुर्दैवानं स्थानिक लोक फक्त एका दिवसाचाच विचार करत जगायचे. जेव्हा ते उपाशीपोटी असायचे तेव्हाच ते काफिराचं काम करायला तयार व्हायचे व त्यासाठी कोणताही गोरा त्यांना अडवत नसे. काही शेळ्या विकत घेता येईल इतका पैसा मिळताच तो आपल्या खेड्यात निघून जातो व पैशाची चणचण भासेपर्यंत कामावर परतत नाही. भरपूर कष्ट करण्यापेक्षा तो थोड्यावर भागवण्यात खुश असतो. ‘नेटिव्ह’ ‘आळसात राहण्यासाठीच’ केवळ कष्ट करतात अशी गोऱ्यांची तक्रार असते.

गोऱ्या माणसाला हा ‘आळशीपणा’ वाटतो. त्याला वाटत असतं कठोर शिस्तीच्या पालनाद्वारे नेटिव्हांचा हा रोग दुरुस्त करून त्यांना श्रमाचं मूल्य शिकवणं आवश्यक आहे. कोणताही प्रश्न न करता त्यांना आज्ञापालन करणं शिकवून त्यांच्या मनात गोऱ्यांबद्दलची भीती भरवणं ही सर्वात महत्त्वाची गोष्ट होती. याच पद्धतीनं युरोपिअन लोकांना स्वस्त मजूर पुरवण्यासाठी निसर्गानं त्यांची जी निर्मिती केली आहे त्या हेतूची परिपूर्ती करता येईल आणि त्यांना या संस्कृतीत सामावून घेता येईल.

या दृष्टीनं काळ्यागोऱ्यांचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक संबंध निश्चित करण्यासाठी ट्रान्सवालच्या राडकडून अनेक कायदे पास करण्यात आले होते. या गणराज्याच्या १८५८ साली तयार करण्यात आलेल्या घटनेच्या तिसऱ्या कलमानुसार ‘राज्यात वा चर्चमधे

काळ्यागोऱ्यात कोणताच भेदभाव करण्यात येणार नाहीं' असं नमूद करण्यात आलं आहे. नेटिव्हांना काम करण्यासाठी उद्युक्त करावं म्हणून तिथं 'आळशीपणासाठी' वार्षिक १० शिलिंग विशेष कर लावण्यात आलेला होता. १८४४ सालच्या कायद्यानुसार असं ठरवण्यात आलं होतं की कोणताही नेटिव्ह शहराजवळ तिथल्या रहिवाशांना अडचण होईल अशा रीतीनं आपलं घर राडच्या परवानगीशिवाय बांधू शकणार नाही. त्यामागील हेतू त्यांच्या जाण्यायेण्यावर निर्बंध घालायचा होता.

कॉकेशिअन वंशियांचं श्रेष्ठत्व कायम टिकवण्याकरता एका पोटनियमानुसार काळ्यांना पायवाटेवरून चालण्याची मनाई करण्यात आली होती. या नियमाचा भंग करणारांसाठी फटक्यांची शिक्षा ठेवण्यात आली होती. सश्रम कारावास वा साधा कारावास यांचा आफ्रिकन लोकांवर फार कमी परिणाम होतो असा युक्तिवाद करण्यात यायचा. त्यांना कठोर शारीरिक श्रम करायची सवय असायची. तुरुंगाची शिक्षा गुलामगिरीपेक्षा त्यांना फार भयानक वाटत नसे. घरदार वा खाणंपिणं याबाबतीतही तुरुंग त्यांना फार भयानक वाटत नसे. मग त्याच्या अपराधप्रवृत्तीतून त्याला मुक्त कसं करायचं? फटके हे त्याचं उत्तर होतं. तीच एक अशी गोष्ट होती की ज्याचा त्यांच्यावर प्रभाव पडू शकत होता.

जोहान्सबर्गमध्ये पायवाटेच्या नियमाचा भंग केल्याबद्दल काही नेटिव्हांना १८९४ साली फटक्यांची शिक्षा देण्यात आली होती. या शिक्षेला विरोध करणाऱ्या इंग्रजांवर टीका करताना क्रुगरच्या बाजूनं असलेले - आणि लोक ज्याला समुद्री डाकू म्हणायचे - रँडमधील निर्दय कोट्यधीश खाणमालक सर जोसेफ बेंजामिन रॉबिन्सन यांच्या मालकीच्या द प्रेस या वृत्तपत्रानं पुढील उद्‌गार काढले :

एक्सेटर हॉलमधे आणि इंग्लंडमध्ये राहणाऱ्या बहुतेक स्त्री-पुरुषांना कळत नाही की काफिरांना योग्य ठिकाणावर आणणं किती आवश्यक असतं. नेटिव्हांना आपण युरोपिअनांच्या बरोबरीचे आहोत असं जर का वाटायला लागलं तर ट्रान्सवालमधील गोऱ्यांचं अस्तित्व धोक्यात येईल. दक्षिण आफ्रिकेतील युरोपिअन लोकांचं श्रेष्ठत्व कायम टिकवून कॉकेशिअन वंशाचं

आधिपत्य इथोपिअन लोकांवर कायम टिकवणं आवश्यक आहे. दक्षिण आफ्रिकेतील अर्धसंस्कृत लोकात वसाहत करणाऱ्या ट्रान्सवालमधील गोऱ्यांना काफिर ही माणसं आहेत आणि त्यांच्याशी बंधुभावानं वागायला हाहिजे हा सिद्धान्त नाकारण्याची आवश्यकता वाटते आणि ते तो अंतःकरणापासून एकमतानं नाकारत आहेत. याला अपवाद तेच लोक आहेत जे नुकतेच इंग्लंडमधून आले आहेत.

**भारतातील इंग्रजही जर आपलं श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी एवढेच कटिबद्ध असते जेवढे दक्षिण आफ्रिकेतील बोअर आहेत तर तिथं झालेलं भयानक बंड झालं असतं की नाही याबद्दल शंका आहे**. रंगीत लोकांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा सिद्धान्त कळत नाही. त्यांना एवढंच कळतं की विजेता मालकच असायला हवा, सामर्थ्यसंपन्नानं दुबळ्यांना गुलामगिरीतच ठेवायला पाहिजे, कमीप्रतीच्या वंशाच्या लोकांनी श्रेष्ठ जातींसमोर वाकायलाच पाहिजे. त्यांच्यासाठी समतेची मागणी हे त्यांना दुर्बलतेचं चिन्ह वाटतं व त्याचा ते लगेच फायदा घ्यायचा प्रयत्न करतात. (ठळक अक्षरं माझी)

फटक्याच्या शिक्षेचं समर्थन करताना वृत्तपत्रानं पुढील उद्‌गार काढले आहेत : ‘या नेटिव्हांच्या मनातील कॉकेशिअनांबद्दलचा आदर निघून गेला आहे आणि ते स्वतःला गोऱ्या लोकांच्या बरोबरीचं समजतात.’ त्यांना माहीत असतं की आपण रस्त्यावरून चालायचं असतं व पायवाट गोऱ्या लोकांसाठी मोकळी ठेवायची असते. या सूचनेकडे सातत्यानं दुर्लक्ष करणारे केवळ ‘उद्धटपणामुळे’ तसं करतात. द प्रेसनं सावधगिरीची सूचना देत पुढं लिहिलं, ‘आफ्रिकेतील गोऱ्या लोकांचं संपूर्ण भवितव्य *काळ्या लोकांना गुलामगिरीतच ठेवण्याच्या* कठोर पालनावरच अवलंबून आहे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील युरोपिअन लोकांनी *कमीत कमी एका शतकासाठी तरी स्वतःला कुलीन आणि सैनिकासारखी जमात म्हणून जपलं पाहिजे* आणि त्यासाठी स्वतःपेक्षा संख्येनं अधिक असलेल्या लोकांकडे लक्ष ठेवून त्यांच्यात मिसळणं आणि समतेनं वागणं टाळायला पाहिजे. (तिरपी अक्षरं माझी)

आफ्रिकेतील नेटिव्ह लोकांसाठी केलेल्या या कायद्याची अंमलबजावणी करताना तारतम्य न बाळगता सरसकटपणे सर्व रंगीत लोकांना तो लागू करण्यात आला व त्यात भारतीयांचाही समावेश झाला. गोरी कातडी ही सभ्यतेची खूण झाली. त्यामुळे तशी कातडी नसणाऱ्या सर्व वंशांचा 'असंस्कृत नेटिव्हा'त भारतीयांचाही समावेश करण्यात आला.

उदाहरणार्थ नेटिव्हांना प्रवास करताना १ शिलिंग शुल्क भरून परवाना काढावा लागायचा व तो एका प्रवासासाठीच वैध असायचा. नाताळमधील प्रमुख व्यापारी हाजी मोहम्मद हाजी दादा हे ट्रान्सवालमध्ये प्रवास करत असताना या नियमांतर्गत त्यांना त्यांच्या बग्गीतून उतरवण्यात आलं व परवाना घेण्यासाठी घोड्यावर बसलेल्या युरोपिअन पोलिसाबरोबर बंदुकीच्या बळावर तीन मैल पायी चालवण्यात आलं. परवाना देणारा त्यांना ओळखत होता व त्यानं सांगितलं की तुम्हाला परवान्याची गरज नाही. त्या भानगडीत त्यांची गाडी चुकली व व्होल्करस्ट ते चार्लस्टाऊनपर्यंत त्यांना रखडत जावं लागलं. मद्रास विद्यापीठाचे पदवीधर श्रीयुत पिल्ले यांना प्रिटोरिया येथे पायवाटेवरून फेकून देण्यात आलं.

ट्रान्सवाल आणि नाताळमधील परवाना कायद्यानुसार प्रत्येक नेटिव्ह माणसाला रात्री ९ वाजल्यानंतर बाहेर पडायचं असल्यास गोऱ्या माणसापासून त्याला ओळखपत्र घ्यावं लागायचं. त्यात त्याच्या माहितीनुसार तो कुठे जात आहे व कशासाठी जात आहे याचा उल्लेख असणं आवश्यक होतं. करारबद्ध भारतीयांनी कामावरून पळून जाऊ नये म्हणून नाताळमधील परंपरेनुसार परवान्याचा नियम केवळ करारबद्ध भारतीयांनाच लागू होत होता, भारतीय व्यापाऱ्यांचा पायघोळ अरबी पोषाख लक्षात येत असल्यामुळे केवळ सूट म्हणून हा नियम त्यांना लागू होत नव्हता. परंतु एखाद्या रक्षकानं उत्साहाच्या भरात मग्रूर 'आशियायी' ला धडाच शिकवायचा ठरवलं तर भारतीय व्यापारी ते काहीच करू शकत नव्हते.

गांधीजींचे अटर्नी आणि मिशनरी मित्र मायकेल कोट्स यामुळे अस्वस्थ झाले. गांधीजी त्यांच्याबरोबर अनेकदा रात्री फिरायला जायचे. त्यांना त्यांच्या निग्रो नोकराला परवाना द्यायचा अधिकार होता. परंतु त्यांची इच्छा असली तरी वा गांधीजींनी मागितला तरी गांधीजींना ते

परवाना देऊ शकत नव्हते. परंतु गांधीजींनी त्याची कधीच फिकीर केली नाही. त्यांच्या मते तो भ्रष्टाचार झाला असता. आपल्या या भारतीय मित्राला अपमानित होण्यापासून वाचवण्यासाठी ते गांधीजींना एफ. ई. टी. क्रॉज यांच्याकडे घेऊन गेले. ते इंग्लंडमधून कायद्याचा अभ्यास करून ते नुकतंच परतले होते. दक्षिण आफ्रिकेतील प्रिटोरियातील जुन्या उच्च न्यायालयात त्यांनी वकील म्हणून आपल्या व्यवसायाला सुरुवात केली आणि ते सरकारी वकील झाले. गांधीजी जेव्हा बॅरिस्टरीच्या परीक्षेची तयारी करत होते तेव्हा ते लंडन येथील मिडल टेंपलमधे होते. त्यांनी गांधीजींची ओळख आपल्या भावाशी, डॉ. ए. ई. जे. क्रॉज यांच्याशी करून दिली. ते गणराज्याचे महाधिवक्ता होते. क्रॉज यांनी गांधीजींना परवान्यापासून सूट देणारा दाखला दिला. या दाखल्याच्या बळावर गांधीजी केव्हाही रात्रीबेरात्री पोलिसांचा त्रास न होता जाऊ शकत होते. त्याचा उपयोग करायची वेळ त्यांच्यावर कधीच आली नाही पण हा 'केवळ योगायोग होता' असं ते सांगतात.

डॉ. ए. ई. जे. क्रॉज आणि गांधीजी हे मित्र झाले व गांधीजी अधूनमधून त्यांना भेटायला जायचे. क्रॉज यांनी एका रात्री गांधीजींना जेवायला बोलावलं. त्यासंबंधी एफ. ई. टी. क्रॉज या त्यांच्या भावानं नंतर सांगितलेल्या प्रसंगावरून युरोपिअन लोकांमध्ये असलेली जातीय भावना रंगीत लोकांमध्येही कशी पसरली आहे ते गांधीजींच्या लक्षात आलं. क्रॉजच्या लक्षात आलं की नेटिव्ह नोकरांची गांधीजींना वाढायची तयारी नव्हती. त्यांना जेव्हा समजावून सांगण्यात आलं की गांधीजींचं स्थान त्यांच्या देशात फार मोठं आहे व इथल्या जमातीच्या प्रमुखाप्रमाणे ते तिथले प्रमुख आहेत तेव्हा कुठे ते त्यांना वाढायला तयार झाले. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी काळ्या माणसाच्या या शोकात्मिकेचं स्वरूप किती व्यापक आहे याची गांधीजींना कल्पना आली. काळ्यागोऱ्यांच्या वर्णसंकरातून निर्माण झालेल्या लोकांना आपल्या अंगातून गोऱ्यांचं रक्त वाहत आहे याचा अभिमान वाटायचा व ते जमातीतील इतर लोकांकडे तुच्छतेनं पाहायचे.

नंतर बोअर युद्धाच्या दरम्यान एफ. ई. टी. क्रॉज यांच्यावर सैनिकी न्यायालयात एका इंग्रजाचा खूनाचा कट करण्याच्या आरोपावरून खटला भरण्यात आला. त्यांत त्यांना ७ वर्षांची

शिक्षा झाली आणि त्यांची वकिलीची सनदही काढून घेण्यात आली. युद्ध संपल्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली व त्यांची वकिलीची सनदही परत करण्यात आली. त्यांनी जेव्हा आपल्या वकिलीची पुन्हा सुरुवात केली तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ गांधीजींनी स्वतः त्यांना वकिलीचा पोषाख चढवायला मदत केली.

अशा रीतीनं या दोन भावांशी झालेल्या ओळखीचा गांधीजींना आपल्या सार्वजनिक कार्यात खूप फायदा झाला.

## २

प्रिटोरियाच्या सीमेला लागून धुळीनं भरलेल्या मार्गावर दुर्लक्षिली गेलेली बंगलेवजा टिनाचं सपाट छप्पर असलेली एक बेढब इमारत आहे. या इमारतीच्या मागे व पुढे व्हरांडा आहे. व्हरांड्याच्या पायऱ्याशी 'भविष्यकथन करणाऱ्यासारखे दिसणारे चिंताग्रस्त चेहऱ्याचे दोन सिंहांचे शिल्प' जणू काय त्या पायऱ्यांचं रक्षण करत आहेत अशा आविर्भावात बसलेले आहेत. त्याच्याच जवळ एकेकाळी डबे, बाटल्या वगैरे कचरा जिथे टाकला जायचा ते मैदान आहे. बंगल्याच्या दगडाळ आवाराला भेगा पडलेल्या असून त्यातून गवत वाढलेलं आहे. दुपारच्या पोळणाऱ्या चकाकणाऱ्या उन्हात पडलेली खापरं त्या जागेच्या देखरेखीकडे दुर्लक्ष असल्याचं प्रकर्षानं जाणवून देतात. मधूनच वाहत येणारा वारा रस्त्यावरील वाळू उचलून छताच्या पत्र्यांवर टाकतो व त्याचा किणकिण असा आवाज होऊ लागतो. याच बंगल्याच्या समोरच्या पायऱ्यांवर आपली पीकदाणी आणि पाईप घेऊन पॉल क्रुगर बसायचे. कोणीही बोअर शेतकरी आला तर कॉफी आणि तंबाखूनं त्याचं स्वागत करायचे. इथंच ते त्यांच्या अनेक मित्रांसोबत आणि भेटायला येणारांसोबत गप्पागोष्टी करायचे. त्या बंगल्यापेक्षा अनेक बंगले वास्तवात अधिक आकर्षक असूनही त्या बंगल्याभोवती पोलिसांचा जो पहारा होता त्यामुळे तो बंगला इतरांपेक्षा वेगळा दिसायचा.

दररोज सायंकाळी गांधीजी पायवाटेवरून पोलीसचौकी ओलांडून प्रेसिडेंट स्ट्रीटमार्गे पुढील मैदानापर्यंत काहीही त्रास न होता फिरायला जायचे. परंतु एके दिवशी नेहमीप्रमाणे ते फिरायला जात असताना तिथं काम करणाऱ्या पोलिसानं कोणतीही सूचना न देता त्यांना पायवाटेवरून ढकललं आणि काठीनं मारत रस्त्याकडे हाकलत नेलं. त्यांना धक्काच बसला. ते सावध होऊन काही बोलणार तोच तिथून घोड्यावर बसून चाललेल्या कोट्सना तो प्रकार दिसला तसंच ते ओरडत आले :

'श्रीयुत गांधी जे काही झालं ते मी पाहिलेलं आहे. तुम्ही जर या माणसावर खटला भरणार असाल तर मी आनंदानं साक्षीदार होईन. तुम्हाला एवढ्या रानटीपणानं मारहाण करण्यात आल्याबद्दल मला खेद होतो.'

'तुम्हाला दुःखी व्हायचं काहीच कारण नाही. या गरीब माणसाला काय माहीत आहे? त्याच्यासाठी सर्व रंगीत माणसं सारखीच आहेत. त्यानं माझ्याशी जशी वर्तणूक केली तशीच वर्तणूक तो निग्रोंशीही करत असला पाहिजे.' राहता राहिला प्रश्न मारहाण करणाऱ्या पोलिसाविरुद्ध खटला भरायचा. गांधीजींनी कोट्सला सांगितलं की हा प्रश्नच उपस्थित होत नाही कारण वैयक्तिक कारणासाठी न्यायालयात जायचं नाही असा मी नियमच केलेला आहे.

'हे तुमच्या स्वभावाला धरूनच आहे. परंतु यावर विचार करा. अशा माणसांना आपण धडा शिकवायला पाहिजे.' कोट्स आपला मुद्दा पुढं रेटत म्हणाले.

गांधीजी अचल राहिले. डच भाषेत कोट्सनी त्या बोअर पोलिसाची चांगलीच खरडपट्टी काढली. त्या पोलिसानं निर्लज्जपणे माफी मागितली. 'परंतु तशी काहीच गरज नव्हती. मी आधीच त्याला क्षमा केलेली होती असं गांधीजींनी लिहिलेलं आहे.

परंतु त्या अनुभवाची पुनरावृत्ती व्हावी असं त्यांना वाटत नव्हतं. त्या रस्त्यावर कामावर असणारा माणूस दररोज बदलता राहणार असल्यामुळे तो प्रसंग टाळायचा एकच मार्ग होता. असा धोका न पत्करण्याचा. ते परत त्या मार्गावरून कधीच गेले नाहीत.

त्या अनुभवानं त्यांचं अजूनच दृढ मत झालं की दक्षिण आफ्रिका हे 'स्वाभिमानी भारतीयासाठी राहण्यासारखं ठिकाण नाही.' त्यांच्या मनात आपल्या देशबांधवांचे विचार येऊ लागले व या दुर्दशेतून त्यांना बाहेर कसं काढावं याचा ते विचार करू लागले. परंतु काही काळ त्यांना आपल्या या इच्छेला मोडता घालणं आवश्यक होतं. त्यांना दक्षिण आफ्रिकेत आणणारा खटला हे त्यांचं पहिलं काम होतं. त्यानंतर सर्व गोष्टींचा क्रम लागत होता.

* * *

दादा अब्दुल्लांच्या खटल्यामुळे गांधीजींना कायदेविषयक कामकाजाचा अनुभव घेण्याची अमूल्य संधी मिळाली. त्यामुळे नंतरच्या सार्वजनिक जीवनात तिचा फार मोठा उपयोग झाला. दादा अब्दुल्ला यांचा खटला व्यवसायातील देवघेवीच्या वादावरून निर्माण झाला होता. तो दावा अंशतः वचनचिठ्ठ्या आणि त्यावरील रक्कम विशिष्ट ठरलेल्या वेळेवर न चुकवल्या बद्दलच्या वादातून निर्माण झाला होता. या वचनचिठ्ठ्या फसवणुकीनं घेण्यात आल्या आहेत व वास्तवात तेवढं देणं बचावपक्षाकडे निघत नाही असा प्रतिवादीचा बचाव होता. आरोपीच्या वकिलासाठी खटल्याची तयारी करायला धैर्यपूर्वक बरीच मेहनत करायची आणि कामकाजाच्या सूक्ष्म माहितीची गरज होती. त्याशिवाय त्यासाठी स्पष्ट विचारांची आणि निर्णयशक्तिचीही गरज होती. गांधीजींनी स्वतःला तनमनानं झोकून दिलं. त्यामुळे त्यांना आपल्या क्षमतेचं ज्ञान झालं आणि न्यूनगंड दूर करायला मदत झाली. त्याही पलीकडे त्यामुळे तथ्यांचं महत्त्व त्यांना कळलं.

लंडन सोडायच्या अगदी आधी गांधीजींनी बारच्या अंतिम परीक्षेनंतर प्रख्यात कायदेपंडित फ्रेड्रिक पिंकट यांचा सल्ला घेतला होता. ते म्हणत असत की 'तथ्य हे तीन चतुर्थांश कायदा' असतात. परंतु गांधीजींच्या लक्षात पिंकट यांच्या सल्ल्याचं महत्त्व आलं नव्हतं. दक्षिण आफ्रिकेतील एका खटल्यात गांधीजींच्या अशिलाची बाजू न्याय्य होती परंतु कायदा त्याविरुद्ध असल्यासारखा दिसत होता. त्यांनी दुसऱ्या एका प्रसिद्ध वकिलाचा, अधिवक्ता लिओनार्डचा, सल्ला घेतला. लिओनार्ड म्हणाले : 'आपण तथ्यांची काळजी घेतली तर कायदा त्याची स्वतःची

काळजी घेईल.’ यावर त्यांनी गांधीजींना खटल्यातील तथ्ये खोलात जाऊन पाहायची विनंती केली. गांधीजींनी तसं केलं आणि खटल्याचं वेगळंच स्वरूप त्यांच्या लक्षात येऊ लागलं. त्यानंतर त्यांना न्यायालयीन निवाड्याचाही आधार मिळाला. त्यांच्या मनात पक्कं ठसलं की ‘तथ्य म्हणजे सत्य, आणि एकदा का आपण सत्यावर अढळ राहिलो की कायदा स्वाभाविकपणेच आपल्या मदतीला येतो.’ त्यानंतर त्यांनी कधीच तथ्यांना, ते कितीही गैरसोयीचे असले वा गैरसमज निर्माण करणारे असले तरी, बाजूला सारलं नाही वा त्यांच्यावर पडदा टाकायचा प्रयत्न केला नाही. या तत्त्वाला घट्ट धरून राहिल्यामुळे अनेकदा पोलादी पडद्यानं मार्ग अडल्यासारखा वाटत असतानाही त्यांना अखेरीस मार्ग सापडला.

या आणि अशाच प्रकारच्या इतर अनेक अनुभवांमुळे गांधीजी शिकले की काळ्याला पांढरं आणि पांढऱ्याला काळं ठरवणारा कायदा हा काही बौद्धिक कसरतीचा खेळ नाही. त्यात ‘नैतिकतेला क्रमशः शब्दबद्ध करण्यात आलेलं आहे. त्यांच्यासाठी कायद्याचा व्यवसाय हा न्याय स्थापित करण्यासाठी होता, ‘कायद्याच्या जाळ्यात न्यायाला गुंतवायचा’ नव्हता. त्यांनी आपल्या पूर्ण व्यावसायिक जीवनात खोटा वा संशयास्पद खटला चालवायला घेतला नाही.

त्यांना दादा अब्दुल्ला यांच्या यशाविषयी कधीच संशय नव्हता. तथ्यं दादा अब्दुल्लांच्या बाजूनं होती. त्यामुळे कायदा त्यांच्या बाजूनं असणं अपरिहार्य होतं. परंतु त्यांना स्पष्ट दिसत होतं की खटला लांबत राहिला तर निकाल कोणाच्याही बाजूनं लागला तरी दोन्ही पक्षांची फार मोठी हानी झाल्याशिवाय राहणार नाही. वकिलांची फी सारखी वाढतच होती. कायद्यानुसार विजेत्या पक्षाचाही खटल्याचा सर्व खर्च भरून निघत नाही. त्यांना आपल्या व्यवसायाचा वीट आला. दोन्ही पक्षांना एकत्र आणून मध्यस्थ नेमून न्यायालयाबाहेर तडजोड का होऊ नये? अखेरीस दादा अब्दुल्ला आणि तैय्यबजी शेठ हे दोघंही एकाच शहरातील होते व त्यांच्यात नातेसंबंधही होते. मध्यस्थ नेमायला दोन्ही पक्षांची संमती मिळवण्यात त्यांना यश आलं.

मध्यस्थांनी दादा अब्दुल्ला यांच्या बाजूनं निर्णय दिला. आता दादा अब्दुल्लांनी दाव्याची आणि खर्चाची रक्कम ३७,००० पौंड रक्कम ताबडतोब मिळावी असा आग्रह धरला असता तर

तैय्यब शेठ यांना ती रक्कम देणं शक्य झालं नसतं आणि त्यांचं दिवाळं निघालं असतं. असं घडलं असतं तर ती दुर्दैवी घटना ठरली असती. भारतीय व्यापाऱ्यांमधे दिवाळखोरीपेक्षा मरण परवडलं असं मानण्यात येत असे. दादा अब्दुल्लांनी मनाचा मोठेपणा दाखवून दीर्घ मुदतीच्या किस्ती पाडून देऊन रक्कम परत करायची सूट देणं हा त्यावर एकमेव उपाय होता. मध्यस्थासाठी मान्यता मिळवण्यापेक्षाही ही कठीण गोष्ट होती. परंतु गांधीजींच्या चिकाटीला अखेरीस यश आलं व दोन्ही पक्षांना निकालामुळे समाधान मिळालं. 'माझ्या आनंदाला सीमा नव्हती आणि कायद्याचा व्यवसाय करायची खरी पद्धत मी शिकलो.'

गांधीजींना त्यांच्या व्यवसायामुळे मानवी स्वभावाची चांगली बाजू पाहायला मिळून माणसाच्या मनात शिरायची कला ते शिकले. त्यामुळे त्यांना खऱ्या तडजोडीच्या अर्थाची व सौंदर्याची ओळख झाली व त्यांच्या हातातील समेट घडवून आणायचं ते अमोघ अस्त्र ठरलं. त्यांनी त्याचा उपयोग आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी फार चांगला केला. कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी विजयश्री खेचून आणण्यासाठी कधीच केला नाही तर दोन्ही पक्षांना न्यायाच्या आणि समतेच्या तत्त्वावर एकत्रित आणण्यासाठी केला. वीस वर्षांच्या वकिली व्यवसायाच्या कारकिर्दीनंतर त्यांना सांगण्यात समाधान वाटत होतं की त्यांनी जेवढे खटले न्यायालयाबाहेर सोडवले तेवढे खटले न्यायालयात चालवून सोडवले नव्हते. 'त्यामुळे मी काहीच गमावलं नाही. पैसाही नाही. आत्मा तर अगदीच नाही.'

### ३

बेकर यांना काहीही करून या भारतीय मित्राला येशू ख्रिस्ताच्या धर्मात आणायची फार इच्छा होती. प्रार्थनेच्या प्रभावित करायच्या शक्तीवर विश्वास असल्यामुळे त्यांनी गांधीजींची आधीच ब्रिस्टल येथील परोपकारी जॉर्ज मुलर यांच्याशी, जे आपल्या 'ऐहिक गरजांसाठीसुद्धा' प्रार्थनेवर अवलंबून राहायचे, ओळख करून दिली होती. त्यांचं कोणतंच निश्चित उत्पन्न नसतानाही त्यांच्या एका वक्तव्यानुसार साडे चौसष्ट वर्षे ते केवळ श्रद्धेच्या बळावर जगले. त्या

काळात त्यांनी कधीही कोणालाही देणगी मागितली नाही, परंतु प्रार्थनेच्या प्रतिसादात त्यांना त्या दिवसाच्या मानानं १,४००,००० पौंड एवढी रक्कम मिळाली. [*नाताळ मर्क्युरी*, ऑक्टोबर २६, १८९५] १८९३च्या शेवटी त्यांनी आपल्या या अध्यात्ममार्गावरील पाल्याला काही ख्रिश्चन मित्रांसह ख्रिश्चनांच्या वेलिंग्टन येथे भरणाऱ्या केस्विक पंथाच्या अधिवेशनाला नेलं. प्रसिद्ध धर्मोपदेशक रेव्हरंड अँड्र्यू मरे यांच्या अध्यक्षतेखाली ते अधिवेशन भरणार होतं. रंगभेदामुळे भारतीयाबरोबर प्रवास करण्यात बेकर यांना खूप त्रास झाला. विश्रांतीच्या दिवशी ते लोक प्रवास करत नसल्यामुळे त्या दिवशी त्यांनाही थांबावं लागायचं. स्टेशनवरील हॉटेल मॅनेजरनं 'रंगीत कातडीच्या माणसा' ला हॉटेलमध्ये जागा द्यायला साफ नकार दिला. बेकर यांनी ग्राहकांच्या हक्कासाठी कितीही युक्तिवाद केला तरी त्याचा काहीच फायदा झाला नाही. वेलिंग्टन येथेही याच घटनेची पुनरावृत्ती झाली. अनेक वर्षांनंतर बेकर यांनी आपल्या आत्मचरित्रात, ग्रेस ट्रिम्फन्टमधे लिहिलं :

*'त्यांच्यासोबत वेलिंग्टन येथील अधिवेशनापर्यंत एकाच डब्यात प्रवास करण्यात मला फार अडचणी आल्या व त्यांच्यासाठी मला वेगळी जागा मिळवता आली नाही. माझ्या यजमानांनी, जे डच सॉल्व्हेशनिस्ट होते, आम्हाला मोठ्या पलंगाची (डबल बेडरूम) खोली दिली. आणि आज भारतातील प्रसिद्ध तत्त्वज्ञ म्हणून ख्यातिप्राप्त असलेल्या माणसाबरोबर एकाच बिछान्यावर मला झोपायला मिळालं हे माझं भाग्य आहे.'*

अधिवेशन तीन दिवस चाललं. आपल्यासाठी प्रत्येकजण प्रार्थना करत आहे असं गांधीजींना आढळलं. त्यांची निष्ठा उघड दिसत होती, त्यांची श्रद्धा अचूक होती. काही काळानंतर रेव्हरंड जोसेफ डोक यांना त्यांनी सांगितलं, 'हे लोक माझ्यावर एवढं प्रेम करत होते की त्यामुळे मी जर ख्रिश्चन झालो असतो तर त्यांनी शाकाहारी व्हायलाही मान्यता दिली असती.' परंतु गांधीजी तरी काय करू शकत होते? त्यांना वाटत होतं की धर्म अंतःकरणाला भावायला पाहिजे तसंच त्यानं बुद्धीचंही समाधान करायला पाहिजे. येशू हाच एकमेव अवतार आहे, 'ईश्वरानं निर्माण केलेला तो एकमेव पुत्र' आहे आणि त्याच्या भक्तीशिवाय मुक्ती अशक्य आहे हे मान्य

करायला त्यांची बुद्धी तयार नव्हती. तसंच लोकांच्या पापासाठी त्यानं घेतलेल्या प्रायश्चित्ताच्या तत्त्वज्ञानाबद्दल त्यांच्या ख्रिश्चन मित्रांची घेतलेली भूमिकाही त्यांना मान्य नव्हती. क्रुसावर येशूचा झालेला मृत्यू 'जगासमोर फार मोठं उदाहरण आहे परंतु त्यात गूढ वा आश्चर्यजनक असा काही गुण आहे हे माझं मन मान्य करायला तयार नाही. नैतिकदृष्टीनं ख्रिश्चन जीवनपद्धती इतर धर्मातील जीवनपद्धतीपेक्षा श्रेष्ठ आहे असं काही दिसत नव्हतं. धार्मिक प्रवृत्तीच्या ख्रिश्चनांप्रमाणेच इतर धर्मातील लोकांनीही नैतिक आणि आध्यात्मिक परिपूर्णता दाखवलेली आहे. स्वार्थत्याग आणि सर्वसंगपरित्याग याबाबतीत तर हिंदूंनी ख्रिश्चनांवरही कडी केलेली आहे. आणि शेवटी ख्रिश्चन मानवप्राण्याशिवाय इतर प्राण्यांना आत्मा असल्याचं मान्य करत नाहीत. त्यामुळे त्यांचा मृत्यू हा त्यांचा कायमचा नाश असतो हा विचार त्यांना मान्य नव्हता. 'बुद्धाप्रमाणे येशूच्या जीवनातून विश्वाला कवटाळणाऱ्या करुणेचं दर्शन गांधीजींना होतं नव्हतं. ख्रिश्चन तत्त्वज्ञानात वेगळं असं काही त्यांना आढळत नव्हतं. त्यातून आपण का अस्तित्वात आलो, कसे अस्तित्वात आलो, आपण काय आहोत, आपण कोठून आलो व कुठं जाणार आहो यासंबंधीची समाधानकारक उत्तरं मिळत नव्हती. व त्यामुळे 'ज्या दारातून ते आत शिरले त्याच दारातून .... (ते) बाहेर पडले.'

त्यांच्या ख्रिश्चन मित्रांना धक्काच बसला. परंतु बेकर निराश झाले नाहीत. गांधीजी भारतात गेल्यानंतरही त्यांनी वर्षानुवर्ष त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू ठेवला होता. काही दिवस झाले की ते लगेच गांधीजींना विचारायचे, 'आता तुम्हाला त्याबद्दल काय वाटते?' त्यावर गांधीजींचं ठरीव उत्तर असायचं की माझ्या माहितीप्रमाणे सर्व ठीक आहे. 'ईश्वर तुम्हाला त्या देदिप्यमान प्रकाशाकडे नेवो ज्या प्रकाशानं येशूचा चेहरा उजळेलला आहे' असं बेकर यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलेलं आहे. [अल्बर्ट वेअर बेकर, *ग्रेस ट्रिम्फंट*, पृष्ठ ८५-८६] गांधीजींना स्वाक्षरी करून भेट दिलेल्या प्रतीवर इजमंड पी. एम. बर्ग, नाताळ येथे दिनांक १३-७-१९४०ला लिहिलेली पुढील नोंद आहे :

'माझे मित्र

गांधी यांना

१८९३ मधील प्रिटोरियातील

जुन्या संबंधांच्या स्मृतिप्रीत्यर्थ

ए. डब्ल्यू. बेकर

'जो माझ्यामागे येतो (येशू ख्रिस्त यांनी सांगितलं आहे) त्याला काळोखात चालावं लागत नाही उलट त्याला जीवनाच्या प्रकाशांचा लाभ होतो.'

जॉन ८-१२

जॉन १४-२३/२७'

**४**

प्रिटोरिया येथे तुलनेनं थोडी सवड मिळाल्यामुळे गांधीजींनी भारतात असताना सुरू केलेली दोन लहानशी कामं पूर्ण करायचा प्रयत्न केला. त्यातील एक काम होतं गाईड टू लंडन लिहायचं. लंडनमधून परतल्यानंतर अनेकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरं द्यायचा गांधीजींनी यातून प्रयत्न केला आहे. हे पुस्तक त्यांच्यासाठी होतं ज्यांना त्यांच्याप्रमाणे अभ्यासासाठी लंडनला जायची इच्छा होती. दुसरं काम होतं जीवनावश्यक आहारासंबंधी अर्धवट राहिलेले प्रयोग पूर्ण करायचं.

११२ हस्तलिखित फुलस्केप कागद असलेल्या या मार्गदर्शिकेत ४ प्रकरणं आहेत व त्यांना प्रस्तावना आणि परिशिष्ट जोडलेले आहेत. त्यावरून असं आढळून येतं की त्यातील कमीतकमी काही भाग तरी १८९३च्या द्वितीयार्धात आणि १८९४च्या प्रथमार्धात लिहिलेला आहे असे पुढील विधानावरून दिसून येते – 'माझ्याच्याजवळ सप्टेंबर १८८८ मध्ये मी इंग्लंडला गेलो तेव्हा सकाळी घालायचा एकच सूट होता व तो आता पाच वर्ष जुना झालेला आहे.' त्यांनी ती मार्गदर्शिका कधीच प्रकाशित केली नाही. १९२० साली मी साबरमती येथील सत्याग्रहाश्रमात गेलो तेव्हा विणकाम चालणाऱ्या छताखाली पडलेल्या कागदात मला या मार्गदर्शिकेची कागदं

सापडली. गांधीजींना ती दाखवली असता त्यांनी सांगितलं की मी अतिशय वाईट हस्ताक्षरात लिहिलं असल्यामुळे माझ्या सूचनेवरून दक्षिण आफ्रिकेतील एका कारकुनानं ती प्रत तयार केली होती. दुर्दैवानं पुरवणीतील काही पानं गहाळ झालेली होती. मूळ प्रत कधीच सापडू शकली नाही.

तरुण लेखकानं उत्साहात सुरुवात केली आहे : 'स्वस्त प्रकाशनाच्या या दिवसात भरपूर लेखक निर्माण होत आहेत. परिणामी त्यांच्याबद्दल जी आदराची भावना असायची ती आता कमी होऊ लागली आहे.' त्यांना लेखक म्हणवून घ्यायची काही आकांक्षा नव्हती. 'मार्गदर्शिका लिहिल्यामुळे काही कोणी लेखक होत नसतो. त्यासाठी याहून करारी व्यक्तित्वाची गरज असते.'

पहिल्याच प्रकरणाच्या सुरुवातीला ते विचारतात, 'इंग्लंडला कोणी जायला पाहिजे?' आणि उत्तर देतात की 'ज्यांना परवडू शकतं त्या सर्वांनी इंग्लंडला जायला हवं.' त्यांनी तिथं बॅरिस्टर व्हायलाच जावं असं नाही तर तिथं वाणिज्याचा अभ्यास करावा, तिथल्या लोकांचा अभ्यास करावा, त्यांच्या आवडीनिवडी पाहाव्या, त्याच्या गरजा समजावून घ्याव्या व त्याच्याशी व्यापारी संबंध प्रस्थापित करावे. जे तिथं केवळ फिरायला जातात त्यांनी आधी आपला देश पाहावा असा माझा त्यांना सल्ला आहे. बेहरामजी मलबारी यांना उद्धृत करत ते सांगतात, 'पूर्वाभ्यासाशिवाय तुमच्यावर जेव्हा ज्ञान लादले जाते तेव्हा ते गतिहीन असते व त्यामुळे प्रगती होऊ शकत नाही.... त्यामुळे तुम्ही अधिकात अधिक वस्तूंकडे पाहू शकता, वस्तूंच्या पलीकडे पाहू शकत नाही.

सैन्यातील कोठारी ज्या नीटनेटकेपणानं काम करतो त्या नेटकेपणानं आणि बारीकसारीक बाबींचा सविस्तर विचार करून हा निबंध लिहिलेला आहे. त्यात वकिलीत तरबेज असलेल्या मर्मभेदक आणि परिपक्व दृष्टीची भर पडलेली आहे. इंग्लंडमधील विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं प्रत्येक लहानसहान बाबीचा, मग ती गोष्ट वरवर कितीही क्षुल्लक वा सामान्य का वाटेना त्यात विचार केलेला आहे. यात दाढी, आंघोळ, जाणंयेणं, प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, पुस्तकांची किंमत, विविध प्रकारचे शाकाहारी पदार्थ व त्यांचे दर, राहण्याची व्यवस्था व स्वयंपाक आदी

विषयांची सविस्तर चर्चा केलेली आहे. इतकंच नाही तर आगपेटी, बटन, टाचण्या, सुईदोरा अशासारख्या चिल्लर दिसणाऱ्या गोष्टींचीसुद्धा सविस्तर यादी त्यात किमतीसह दिलेली आहे. व यातील कोणतीही गोष्ट विसरल्यास होणाऱ्या परिणामांची कल्पना दिलेली आहे. इथं एक उदाहरण आहे :

*पांढरे सदरे वगळले आहेत कारण त्यांच्यामुळे आठवड्याचा धुलाईचा खर्च फुगतो..... जर फॅशनदेवीची पूजाच करायची असेल तर, जशी ती कमी अधिक प्रमाणात करावीच लागत असते, ..... तर तुम्ही पांढरी कॉलर आणि कफ वापरा. त्यामुळे इतरांना तुम्ही पांढरा सदरा घातलेला आहे असं वाटेल. ह्या युक्तीचा अवलंब लंडनमध्ये हजारो लोक करतात. आणि काही वेळा लंडनच्या फॅशनप्रमाणेच राहावं असं तुम्हाला वाटेल तर यादीमध्ये पांढरा सदरा दिलेला आहे. त्याचा उपयोग अधूनमधून करावा.*

तरीसुद्धा होतकरू लेखकाची भाषा फुलत असताना त्याला शब्दशक्तीची जाणीव झालेली असल्याचं आढळतं व त्याच्या हेतूत अपरिपक्वता कुठेच दिसत नाही हे पुढील उताऱ्यावरून दिसेल.

*इंग्लंडमधील विद्यार्थ्यांच्या आणि सामान्य माणसांच्या हालचाली सारख्याच गुढांनी भरल्यासारख्या असतात.... पुढील पानांच्या.... लेखकाला त्या गुढाचं वलय दूर करायचं आहे.... त्यामुळे माझ्यावर निंदा वा स्तुतीचा वर्षाव होऊ शकेल.... त्यामुळे मला कदाचित काहींच्या मैत्रीलाही मुकावं लागेल. आणि इतर काही लोक माझ्याविरुद्ध तरुणांना भडकवतील. परंतु सत्यासाठी हे सर्व वादळ सहन करायचं मी ठरवलं आहे.*

*मला माहीत आहे की असे काही लोक आहेत की जे हीच गोष्ट माझ्यापेक्षाही चांगल्या भाषेत, अधिक बिनचूकपणे व अधिक सविस्तरपणे सांगू शकतील.... परंतु तरीही मी हे पुस्तक लिहीत आहे कारण याची इतकी गरज असूनही इतर कोणीही या विषयावर लिहिलं नाही.... ज्या गोष्टींची इतरत्र सहज माहिती मिळू शकेल त्या गोष्टी मी इथं वगळल्या आहेत परंतु ती माहिती*

*कुठं मिळू शकते त्यांचे संदर्भ मी देईन. या पुस्तकाचा हेतू इतर पुस्तकातील माहिती गोळा करणं नाही तर जी माहिती इतरत्र मिळू शकत नाही ती द्यायचा प्रयत्न करणं हा आहे.*

इथं आपल्याला त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचं सूत्र मिळतं – ‘जे इतरांनी केलं नाही ते करायचा प्रयत्न करणं.’

लंडनमध्ये माणूस आठवड्याला एका पौंडात कशाप्रकारे राहू शकतो हे दाखवणारं प्रकरण या पुस्तकाचं सार आहे. या पुस्तकाचं दुसरं वैशिष्ट्य हे आहे की त्यांनी यात पहिल्यांदाच टॉलस्टॉयचं उद्धरण दिलं आहे. हे उद्धरण ‘व्हाय पिपल गेट इनटॉक्सीकेटेड?’ (लोक व्यसनाधीन का होतात?) या मुळात १८९० साली लिहिलेल्या निबंधातील आहे. हा निबंध डॉ. पी. एस. अॅलेक्सेफ यांच्या ड्रंकननेस यांच्या पुस्तकाची प्रस्तावना म्हणून लिहिलेला आहे. डॉ. पी. एस. अॅलेक्सेफ हे टॉलस्टॉयचे भावी चरित्रलेखक एल्मर मॉड यांचे मेहुणे होते. या निबंधाचं इंग्रजी भाषांतर १८९१ साली मॉडर्न रिव्ह्यूमधे प्रकाशित झालं व त्यातूनच गांधीजींनी उद्धरण घेतलेलं आहे :

*लोक दारू पितात आणि धूम्रपान करतात ते वेळ काढण्यासाठी, काहीतरी चांगलं करावं म्हणून वा उत्साह वाटावा म्हणून करत नाहीत, तसंच त्यामुळे समाधान मिळावं म्हणूनही तसं करत नाहीत तर त्यांना बोचणाऱ्या सदसद्विवेकबुध्दीचा आवाज बंद करण्यासाठी तसं करतात.... अशा प्रकारच्या उत्तेजकांनी आणि गुंगी आणणाऱ्या पदार्थांनी माणूस जेवढा स्वतःला धुंदी आणायचा प्रयत्न करतो तेवढा तो बौद्धिक आणि मानसिक दृष्टीनं मंद आणि निश्चल होत जातो.*

५

ऑगस्ट १८९३च्या अखेरच्या आठवड्यात गांधीजींनी जीवनावश्यक आहाराविषयी प्रयोगांना पुन्हा सुरुवात केली. ते त्यांना मुंबईत अर्ध्यातूनच सोडावे लागले होते. या प्रयोगात क्रमशः शिजवलेल्या अन्नाची जागा न शिजवलेल्या अन्नानं घ्यावयाची होती. सुरुवातीपासूनच

हा उपक्रम दुर्दैवी ठरला होता. सुरुवातीला दोन मोठे चमचे गहू, एक मोठा चमचा वाटाणे, एक मोठा चमचा तांदूळ, दोन मोठे चमचे मनुका २०, लहान कठीण कवचाची फळं, २ संत्री आणि १ कप कोको ह्यांचा त्यांच्या नेहमीच्या न्याहरीत समावेश असायचा. दाळी आणि धान्य रात्रभर भिजवून ठेवण्यात यायचं. तरीही त्यांना चावायला पूर्ण ४५ मिनिटं लागायची. आधी त्यांचा उत्साह वाढला. त्यांना आधीच दोन दिवसांपासून सर्दीचा त्रास होता व कानात किंचित थंडी वाजत होती. तरीही पहिल्या दिवशी सकाळी त्यांना फार चांगलं वाटलं. परंतु सायंकाळी किंचित डोकं दुखू लागून उदासल्यासारखं वाटू लागलं. जेवणासाठी त्यांनी नेहमीप्रमाणे ब्रेड, भाज्या वगैरेंचा समावेश केला होता. त्यानंतर पुढे त्या प्रयोगातील अपयश वाढतच गेलं.

*ऑगस्ट २३ : भूक लागल्यासारखं वाटते, काल रात्री काही वाटाणे घेतले. त्यामुळे रात्री झोप चांगली आली नाही आणि उठलो तेव्हा तोंडात वाईट चव होती. कालप्रमाणेच न्याहरी आणि जेवण होतं. दिवस जरी थोडासा उदासवाणा होता आणि थोडा पाऊसही आला होता तरी माझं डोकं दुखत नव्हतं वा सर्दीही वाटत नव्हती. बेकरबरोबर चहा घेतला. हे अगदीच मानवलं नाही. पोटात दुखायला लागलं.*

*ऑगस्ट २४ : सकाळी उठलो तेव्हा स्वस्थ वाटत नव्हतं व पोट भारी होतं. तशीच न्याहरी केली. वाटाणे फक्त एकच्या ऐवजी अर्धा चमचा घेतले. नेहमीचंच जेवण. बरं वाटत नव्हतं. संपूर्ण दिवसभर अजीर्णासारखं वाटत होतं.*

*ऑगस्ट २५ : बरं वाटत नव्हतं. जेवायची अगदी इच्छा नव्हती. तरीही मी ते घेतलं. कालच्या जेवणात अर्धवट शिजवलेले वाटाणे होते. त्यामुळे जडपणा वाटत असेल. दुपारपासून डोकं दुखायला लागलं. जेवणानंतर थोडंसं क्विनाईन घेतलं.*

*ऑगस्ट २६ : दिवसभर तोंडाला चांगली चव नव्हती. बरंही वाटत नव्हतं. नेहमीप्रमाणे जेवण घेतलं. सायंकाळी ७ वाजता एक संत्रं खाल्लं आणि एक कप कोको घेतला. मला भूक लागलेली होती (सकाळी ८ वाजता) आणि तरीही खावंसं वाटत नव्हतं. जीवनावश्यक आहार मानवत नाही असं दिसतं.* [एम. के. गांधी, *'ॲन एक्सपेरिमेन्ट इन व्हायटल फुड', द व्हेजिटेरिअन*, लंडन, मार्च २४, १८९४]

सतत पोट खराब राहत असल्यानं वाटाणे आणि तांदळ यामुळे तसं होत असावं असं त्यांना वाटलं आणि म्हणून सहाव्या दिवशी त्यांनी या दोन गोष्टी वगळल्या परंतु त्याचबरोबर न्याहरीबरोबरच जेवणातही जीवनावश्यक अन्न घ्यायला सुरुवात केली. अशा रीतीनं न्याहरीत दीड चमचा गहू, दोन चमचे मनुका, १० अक्रोड आणि एक संत्रं होतं. दुपारनंतर त्यांना बरं वाटू लागलं. 'दुपारी एक वाजता एक चमचा न भिजवलेले गहू, एक चमचा मनुका, आणि १४ सुका मेवा.... श्रीमती हॅरीस यांच्याकडे चहा (ब्रेड, बटर, जाम आणि कोको),... चहानंतर अतिशय भूक लागल्यासारखं आणि थकवा आल्यासारखं वाटत होतं.... त्यामुळे घरी परतल्यानंतर एक कप कोको आणि एक संत्रं घेतलं.'

*ऑगस्ट २८ : अशक्तता आणि भूक याशिवाय मला अगदी चांगलं वाटत होत. तोंडाची चवही चांगली होती.*

*ऑगस्ट २९ : सकाळी चांगली जाग आली. न्याहरीसाठी दीड चमचा गहू, दोन बेदाणा, एक संत्रं आणि २० सुका मेवा हे पदार्थ घेतले. जेवणासाठी तीन चमचे गहू, २ बेदाणा, २० सुका मेवा आणि दोन संत्री घेतली. सायंकाळी तैय्यबकडे भात, शेवया, आणि बटाटे घेतले. सायंकाळी थकवा जाणवत होता.*

*आता थकवा हळूहळू वाढत चालला होता आणि कच्चं व न भिजवलेलं धान्य चावण्यामुळे दात दुखायला लागले होते.*

*ऑगस्ट ३० : थकवा फार जाणवतो आहे. नेहमीएवढं फिरतानाही गळून गेल्यासारखं वाटत होतं.*

*ऑगस्ट ३१ : सायंकाळी एक कप कोको आणि एक संत्रं घेतलं. दिवसभर अतिशय थकवा जाणवत होता. फिरायला जाताना अतिशय त्रास होत होता. दातही अशक्त होऊन राहिले आहेत आणि तोंडाला गोड चव आहे.*

*सप्टेंबर १ : सकाळी उठतानाच अगदी थकल्यासारखं वाटत होतं. कालच्याप्रमाणेच न्याहरी आणि जेवण घेतलं. अतिशय थकवा वाटतो व दात दुखत आहेत. प्रयोग थांबवायलाच पाहिजे. बेकरचा वाढदिवस असल्यामुळे त्यांच्याबरोबर चहा घेतला. चहानंतर बरं वाटलं.*

*सप्टेंबर २ : सकाळी उठलो तेव्हा ताजंतवानं वाटत होतं. (कालच्या चहाचा परिणाम) पूर्वीचं जेवण घेतलं. (सोजी, ब्रेड, लोणी, जाम आणि कोको) एकदम बरं वाटायला लागलं.*

अशाप्रकारे जीवनावश्यक आहाराचा तो प्रयोग संपला. त्याच्या अपयशासाठी त्यांनी स्वतःच्या अपुऱ्या माहितीला दोष दिला. तो प्रयोग श्रीयुत हिल्स यांच्या एका लहानशा पत्रकाच्या आणि द व्हेजिटेरिअनमध्ये एवढ्यातच प्रकाशित झालेल्या दोन लेखांच्या आधारावर करण्यात आलेला होता. दुसरी गोष्ट अशी होती की त्या दिवसात त्या ठिकाणी संत्र्यांशिवाय दुसरी कोणतीच फळं उपलब्ध नव्हती. दक्षिण आफ्रिकेत दूध ही क्वचितच मिळणारी गोष्ट असते. आणि अखेरीस उतावीळपणाही त्यासाठी कारणीभूत झाला 'जीवनावश्यक आहाराचा प्रयोग सुरू करून पाचच दिवस झाले नाहीत तोच मी नेहमीच्या आहाराच्या ठिकाणी जीवनावश्यक आहार आहार घ्यायला सुरूवात केली. २० वर्षांपासून ज्या पोटाला शिजवलेल्या अन्नाची सवय झालेली होती ते एकाएकी न शिजवलेलं अन्न पचवू शकेल अशी अपेक्षा करणंच चुकीचं होतं.' तरीही हा प्रयोग 'कोणी पुरेशा माहिती अभावी केला तर तो स्वतःला आणि आणि हेतूलाही..... इजा पोहोचवील' अशी सावधगिरीची सूचना देण्यासाठी या प्रयोगाचा उपयोग होईल असं त्यांनी स्वतःचं समाधान करून घेतलं. [एम. के. गांधी, *'ॲन एक्सपेरिमेन्ट इन व्हायटल फुड', द व्हेजिटेरिअन*, लंडन, मार्च २४, १८९४]

वस्तुस्थितीची जाणीव करून देणारा तो अनुभव होता. जीवनावश्यक अन्नासंबंधी प्रयोग करायची त्यांना इच्छा व्हायचं कारण त्यातील अतिशय साधेपणा तर होताच परंतु त्याशिवाय त्यामुळे स्वयंपाकाची खटपटही वाचू शकली असली असती, इतरांवर अवलंबून राहावं लागणार नव्हतं, आणि घरमालकीण जे अन्न पुरवत होती त्यात जर काही अस्वच्छता असली तर त्यापासूनही गांधीजी त्यामुळे वाचणार होते. परंतु या खेळात लाभापेक्षा हानीच अधिक नव्हती काय? सर्वसामान्य शाकाहारी माणसानं, ज्याची प्रकृती उत्तम आहे व ज्याला आपला आहार

आवडतो, या प्रयोगासाठी एवढा वेळ देणं व त्याकडेच सर्व लक्ष केंद्रित करणं कितपत उचित आहे असं त्यांनी स्वतःलाच विचारलं. अशाप्रकारचे प्रयोग तज्ज्ञांवर सोपवणंच उचित नाही काय? 'सर्वसामान्य शाकाहारामुळे उत्तम प्रकृती राहू शकते हे जर दाखवता येऊ शकत असेल तर यापेक्षा आपल्याला अजून काय हवं आहे?'

ते काही हेकट अथवा छांदिष्ट नव्हते. एखाद्या गोष्टीच्या केवळ नावीन्यामुळे, मग ती कितीही मोहक असली तरी, त्याकडे आकर्षित व्हायचं त्यांचं ते वय आता निघून गेलेलं होतं. ते सतत स्वतःचा विकास करून घेत होते. त्यांचा शाकाहार आता जीवनाचा अर्थ शोधण्याचा भाग झालेला होता व शारीरिकतेकडून आध्यात्मिकतेवर ते भर देऊ लागले होते. त्यांच्या अंतःकरणातील खळबळीचं दर्शन पुढील निष्कर्षावरून होतं :

*जीवनावश्यक आहारामध्ये फार मोठी संभावना लपलेली असू शकेल, परंतु त्यामुळे आमची नश्वर शरीरं काही अमर होणार नाहीत.... जीवनावश्यक आहार आमच्या आत्म्याची गरज भागवू शकत नाही, भागवू शकणार नाही. आणि जर आपलं सर्वोच्च ध्येय, जे या जीवनातील एकमेव ध्येय असू शकते ते आत्मदर्शन होणं आहे तर मग नम्रपणानं आपल्याला मान्य करावं लागतं की जी कोणती गोष्ट आत्मज्ञान करून घ्यायच्या संधीपासून आपल्याला दूर नेत असेल ती त्याज्य ठरते. त्यामुळे जीवनावश्यक आहारासंबंधीच्या प्रयोगाचा खेळही त्याप्रमाणात जीवनातील सर्वोच्च ध्येयापासून दूर नेणारा ठरतो...... अखेरीस ज्याचा शेवट स्वार्थसिद्धीसाठीच व्हायचा आहे आणि सर्वोच्च ध्येयापेक्षा जे कितीतरी कमी प्रतीचं आहे त्यासाठी किती वेळ खर्च करणं आणि त्रास सहन करणं योग्य होईल? अशा गोष्टींसाठी वेळ घालवता यावा एवढं जीवन प्रदीर्घ नाही.*

या प्रयोगाचा स्थायी परिणाम म्हणजे त्यांच्या दातांना त्यामुळे झालेली इजा. त्यामुळे अखेरीस त्यांना दोन दाढा काढाव्या लागल्या.

डॉ. ओल्डफिल्ड यांच्या सूचनेनुसार गांधीजींची दक्षिण आफ्रिकेतील लंडन व्हेजिटेरिअन सोसायटीच्या प्रतिनिधीपदी नियुक्ती करण्यात आली. शाकाहारी साहित्याच्या प्रसारासाठी त्यांनी

जोरदार प्रचार सुरू केला. द व्हेजिटेरिअनला लिहिलेल्या पत्रातून त्यांनी भारतीय शाकाहारी लोकांना लंडन व्हेजिटेरिअन सोसायटीचे सदस्य बनण्याविषयी आणि द व्हेजिटेरिअनचे वर्गणीदार होण्याविषयी आग्रह केला. गांधीजींचं म्हणणं असं होतं की 'इंग्लंडमधील शाकाहारी चळवळ अप्रत्यक्षपणे भारताला राजकीय दृष्टीनंसुद्धा सहाय्यभूत होऊ शकेल कारण त्यामुळे इंग्रज शाकाहारी लोकांना भारतीयांच्या आकांक्षांबद्दल अधिक सहानुभूती वाटू शकेल.' [एम. के. गांधी, *'ट्र इंडियन्स इन इंग्लंड', द व्हेजिटेरिअन,* एप्रिल २८, १८९४] कोणालाही वाटेल की वैयक्तिक अनुभवावर आधारित भाबडेपणाचा हा विचार आहे. काही आठवड्यानंतर त्यांनी दारूच्या व्यसनापासून मुक्तीसाठी शाकाहाराची शिफारस केली. 'मला हे सांगायची परवानगी असावी की ज्यांना दारूचं व्यसन जडलेलं आहे व ते सोडायची इच्छा असूनही सुटत नाही त्यांनी दारूची लत पूर्णपणे कमी करण्यासाठी कमीतकमी एक महिना कोंड्याची ब्रेड आणि संत्री वा द्राक्ष यांचा प्रयोग करावा.' [गांधीजींचं पत्र, दि. जानेवारी २१, १८९५, *नाताळ अॅडव्हरटाईझरला,* फेब्रुवारी १, १८९५]

अखेरीस शाकाहाराच्या निष्ठावंत प्रचारकाला शाकाहाराकडे एका व्यक्तीला वळवायचं समाधान मिळालं. ती होती 'माझी घरमालकीण, एक इंग्रज बाई,' आपल्या मुलांनाही तिनं शाकाहाराकडे वळवावं म्हणून तिचं मन वळवण्यात आलं. 'परंतु मला भीती वाटते की ती घसरेल....' [एम. के. गांधींचं प्रिटोरिया येथून खाजगी पत्र, *द व्हेजिटेरिअंन,* सप्टेंबर ३०, १८९३]

वेलिंग्टन येथील अधिवेशनात त्यांना अजून एकाला शाकाहाराकडे वळवण्यात यश मिळालं. तो 'सहा वा सात वर्षांचा मुलगा असावा. तो माझ्याबरोबर फिरायला आला होता.' त्याच्याशी प्राण्यांशी दयेनं वागण्याविषयी चर्चा करताना मी त्याच्याबरोबर शाकाहारासंबंधी बोलू शकलो. 'मला असं सांगण्यात आलं आहे की तेव्हापासून त्या मुलानं मांसाहार घेतलेला नाही......... त्याचे आईवडील जरी शाकाहारी नसले तरी त्यांचा शाकाहाराच्या गुणांवर विश्वास आहे. मुलांचे आईवडील जर विरुद्ध नसतील तर मुलांना किती सहजपणे सर्वश्रेष्ठ सत्य समजावून सांगता येते आणि त्यांना शाकाहाराकडे वळवता येते' हे सांगण्यासाठी मी हे सांगत आहे. [एम. के. गांधींचं प्रिटोरिया येथून खाजगी पत्र, *द व्हेजिटेरिअन,* मे ५, १८९४]

## ६

ख्रिश्चन धर्मातील शिकवणीविषयी धर्मोपचारक मित्रांशी वाद सुरू असतानाच गांधीजींनी ख्रिश्चन एसोटेरिक युनियनचे संस्थापक एडवर्ड मेटलँड यांना पत्र लिहिलं. जोशिया ओल्डफिल्ड यांनी गांधीजींची त्यांच्याशी ओळख करून दिलेली होती. मेटलँडनी गांधीजींना आपली दोन पुस्तकं पाठवली - *द इंटरप्रिटेशन ऑफ बायबल* आणि *द परफेक्ट वे अथवा फाइंडिंग ऑफ द ख्राईस्ट*. यातील *परफेक्ट वे*मध्ये अनेक गूढ कल्पनांचं मूळ भारतीय आहे. व जवळपास याच वेळी मॅडम ब्लावाट्स्की आणि थिऑसॉफिकल सोसायटी यांनी पाश्चात्य जगात त्यांचा प्रचार केला होता.

इंद्रियातीत अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या माणसासाठी मॅथ्यू अर्नोल्ड यांनी सांगितल्याप्रमाणे दोनच मार्ग असतात. पहिला त्या माणसाचं ख्रिश्चन धर्माशिवाय भागू शकत नाही व दुसरा ख्रिश्चन धर्म जसा आहे तसा स्वीकारल्यामुळेही त्याचं भागू शकत नाही. एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या सदस्यांचं म्हणणं होतं की ख्रिश्चन धर्मविचारात काही उणीव नाही तर त्या धर्माच्या अधिकृत प्रवर्तकांनी त्याचा जो विज्ञानविरोधी अर्थ लावलेला आहे त्यामुळे आपला तसा समज होतो. वैज्ञानिक शोध आणि चिकित्सा यांचं महत्त्व असलेल्या या युगात धर्मानं केवळ श्रद्धेच्याच बाजूचा विचार करून भागत नाही तर बुद्धीचंही समाधान त्याच्याकडून होणं आवश्यक आहे. अशा प्रकारच्या एकोणिसाव्या शतकाच्या द्वितीयार्धातील अनेक प्रयत्नापैकी एसोटेरिक ख्रिश्चन युनियन हा एक प्रयत्न होता. वैज्ञानिक शोधांमुळे भौतिकवादानं झपाटलेल्या आधुनिक मनाला भावेल अशा प्रकारे ख्रिश्चन धर्माची पुनर्रचना करून तो लोकांसमोर मांडायचा त्यांचा प्रयत्न होता.

*द परफेक्ट* वेमधील मुख्य मुद्दा असा होता की ख्रिश्चन धर्मातील प्रतीकं आणि चिन्हं ह्यांच्यात पूर्वीच्या धर्मातील प्रतीकांशी आणि चिन्हांशी अतिशय साम्य आहे व त्यामुळे पूर्वीच्या धर्मांचा, विशेषतः 'पौर्वात्य धर्मांचा आणि मूर्तिपूजकांच्या तत्त्वज्ञानाचा' अभ्यास करूनच त्यांचा योग्य अर्थ लावता येतो. कारण ख्रिश्चन धर्म हा 'त्यांचा वारस आहे आणि ख्रिश्चन धर्माच्या धमन्यातून त्यांचं उत्तम रक्त वाहत आहे.' [अॅना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग*

*ऑफ ख्राईस्ट*, जॉन एम. वॅटकिन्स. लंडन, १९२३, प्रस्तावना, पृष्ठ १२] मानवजातीला अगदी सुरुवातीपासूनच ईश्वरी ज्ञानाचा साक्षात्कार झालेला आहे व हे साक्षात्कारी ज्ञान पूर्णपणे वा अंशतः वेगवेगळ्या वेळी आणि ठिकाणी विविध नावांनी माणसांसमोर वारंवार प्रगट झालेलं आहे. याच प्रकारच्या साक्षात्कारात बायबलमधील पापमुक्तीवरील प्रकरणांचा समावेश होतो. त्या विचारांचा जे स्वीकार करतात ते ऐहिकतेच्या सीमा ओलांडून आत्म्याच्या शुद्ध स्वरूपात जाऊन मिळतात. त्यामुळे त्यांचं केवळ.... पापांच्या परिणामांपासूनच रक्षण होत नाही तर पापापासूनही रक्षण होतं.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलॅंड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, पृष्ठ ४४]

थोडक्यात या प्रकरणांचा सारांश असा सांगता येईल : ईश्वर हा मूळ आत्मा आहे. तो संपूर्ण प्रेम आणि ज्ञान आहे, शक्ती आणि चांगुलपणा आहे व माणूस त्याचा अंश आहे. त्यामुळे स्वभावतः आणि घडणीप्रमाणे माणूस चांगला आहे आणि दैवी शक्तीची क्षमता असलेला आहे. त्यामुळे त्या ईश्वराचा साक्षात्कार करून घ्यायची त्याच्यात क्षमता आहे.

*उदाहरणार्थ समजा की आपण एखाद्या गवतानं आणि फुलांनी आच्छादिलेल्या मैदानात आहोत. तांबडं फुटायची ती वेळ आहे आणि प्रत्येक गोष्ट दवाच्या टिकल्यांनी सुशोभित झालेली आहे. आपल्याला काय दिसेल ? 'प्रत्येक दवबिंदूत प्रत्येक गोष्ट प्रतिबिंबित झालेली असेल. अगदी सूर्यापासून तर लहानसहान वस्तू.... प्रत्येक गोष्ट प्रत्येक दवबिंदूत असेल.' त्याचप्रमाणे,*

*प्रत्येकातून ईश्वर प्रतिबिंबित होतो.... ईश्वर प्रत्येक व्यक्तीत असतो. ईश्वराला प्रतिबिंबित करायच्या त्याच्या क्षमतेप्रमाणे तो त्याच्यात असतो.... आणि प्रत्येकाची क्षमता त्याच्या आत्म्याच्या विकासावर आणि शुद्धतेवर अवलंबून असते. ज्या आत्म्यातून सूर्य पूर्णपणे प्रतिबिंबित होतो तो आत्मा सूर्यच होतो, ईश्वरी प्रभेच्या तेजानं झळाळून निघालेला व ईश्वरी चैतन्यानं परिपूर्ण असलेला तो ईश्वरी माणूस होतो.* [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलॅंड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ ६१-६२]

ईश्वर आणि आणि आत्मा हे मुळात एकच असतात. जे काही विश्वव्यापी परमेश्वरात असते तेच त्याच्या व्यक्तिगत स्वरूपातही असते. 'त्यामुळे देवात असं काहीच नाही की जे माणसात

नाही. आणि जसा माणूस आहे तसाच देव आहे.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ ६३] त्यामुळे 'वाचवला' गेलेला माणूस हा पापापासून मुक्त झालेला त्या देहातील माणसापेक्षा काही वेगळा नसतो तर तो त्याचाच पुनर्जन्म असतो आणि एका अर्थानं तो अगोचराशी एकाकार झालेला असतो.' ही प्रक्रिया आत्म्याला ईश्वराबद्दल असलेल्या तीव्र ओढीपासून सुरू होते वा 'त्याच्यातच असलेला आत्मा' त्यांच्या देहात अशा रीतीनं झिरपतो आणि देहाला व्यापतो की देहाला स्वतःची अशी काहीच इच्छा राहत नाही. 'ईश्वरी इच्छेशी मानवी इच्छा एकाकार झाल्यामुळे गूढपणे.... त्याला पापमुक्ती वा ईश्वर आणि देवातील ऐक्य असं म्हणतात' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ ६५] व व्यक्तीचं अशा रीतीनं ऐक्य होत असताना त्याची पापमुक्ती होते आणि 'ती करण्याकरिता ........ ईश्वरापासून आत्मा पुढे येतो.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २१२]

ही प्रक्रिया संपूर्णपणे माणसाची अंतर्गत प्रक्रिया असल्यामुळे व ती बाहेरून पार पाडणं वा त्याच्याशिवाय दुसऱ्याकडून पार पाडणं अशक्य असते व प्रत्येक व्यक्तीत तिची सुरुवात नव्यानं करावी लागते. ख्रिश्चन युगाच्या किती तरी पूर्वी इजिप्त, पर्शियां व भारतातील गूढवाद्यांनी या प्रक्रियेचं ज्ञान मिळवलं होतं व ज्याला आपण धर्म म्हणतो 'त्याचं उदाहरण देण्यासाठी असिरिस, मिश्रा, बुद्ध यांच्यासारख्यांची त्यासाठी निवड केली. त्यांच्या जीवनातून आत्म्याची पूर्ण अभिव्यक्ती झाली आहे.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २२५] पश्चिमेकडील गूढवाद्यांनी, ज्यांचं मुख्य कार्यालय अलेक्झॅन्ड्रिया येथे होतं, 'सर्व मुक्त झालेल्या आत्म्यांच्या ऐतिहासिक उल्लेखासाठी त्याच पद्धतीनं येशूची निवड केली.' त्यांनी शारीरिक अवताराचा केवळ 'प्रतीक' म्हणून उपयोग केला व बोधकथेप्रमाणे त्यांच्या गोष्टी सांगितल्या. 'जे वैयक्तिक होतं त्याला विश्वस्वरूप द्यायची आणि जे ऐहिक होतं त्याला आध्यात्मिक रूप द्यायची त्यांची पद्धत होती.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २२६]

गूढवादी त्यांच्या आंतरिक अनुभवानं बोलत होते. परंतु काळाच्या ओघात चर्चनं गूढवादी शक्ती वा 'आंतरिक आध्यात्मिक दृष्टी गमावली. पुजारी सिंहासन स्थापन करायचं पाप करत असताना एक प्रकारच्या मूर्तिपूजेला चर्च बळी पडलं व आत्म्याला महत्त्व देण्याऐवजी बाह्य प्रतीकांना महत्त्व देऊ लागलं. प्रायश्चित्ताच्या सिद्धान्ताच्या वास्तव आणि प्राचीन स्वरूपात 'संतांचं वैभव आणि अधःपतितांची आशा यांचा समावेश झालेला होता.' परंतु या विकृतीमुळे 'पापापासून मुक्त होण्यापेक्षा पापाच्या शिक्षेपासून सुटायचा तो मार्ग झाला' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ १२] व जगाला स्वैराचार आणि पापाच्या मार्गाकडे त्यानं ढकललं.

ख्रिश्चनत्वाला अपयश यायचं कारण त्या विचारात काही असत्य होतं हे नाही तर त्याला खोटं स्वरूप देण्यात आल्यामुळे तसं घडलं. [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, प्रस्तावना, पृष्ठ ७] त्यामुळे नवीन धर्माच्या प्रकटीकरणाची आवश्यकता नव्हती तर 'आधीच अस्तित्वात असलेल्या धर्माचा खरा अर्थ लावण्याची आवश्यकता होती.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, प्रस्तावना, पृष्ठ ९] त्यासाठी बायबलमधील घटनांकडे ऐतिहासिक दृष्टीनं पाहायच्या पद्धतीची गरज नव्हती तर चिरंतन सत्य सांगणाऱ्या 'दृष्टान्ताप्रमाणे आणि प्रतीकाप्रमाणे त्यांच्याकडे पाहून त्यांचा अर्थ लावायच्या पद्धतीची आवश्यकता होती.' येशूचा अद्भुत जन्म, त्याला सुळावर चढवणं आणि त्याचं पुनरुत्थान या गोष्टी 'एका विशिष्ट व्यक्तीच्या बाह्य जीवनात घडलेल्या काही ऐतिहासिक घटना' नाहीत तर तुमच्या आणि माझ्या मनातीलच नव्हे तर संपूर्ण मानवजातीच्या अंतःसंघर्षाचा तो इतिहास आहे. [उदाहरणार्थ मृत्यूनंतर, जसं लॅझारसचं झालं, पुन्हा जिवंत होण्यात असा अर्थ अध्याहृत आहे की 'आध्यात्मिक मृत्यूनंतर पुनर्जन्म', दृष्टी द्यायचा अर्थ आहे 'आध्यात्मिक दृष्टी मिळणे' आणि शेकडो भुकेल्यांना खाऊ घालणं याचा अर्थ 'माणसाची आध्यात्मिक भूक भागवणं' ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ १२] त्याचप्रमाणे बायबलमध्ये ज्या ख्रिस्ताच्या निर्मितीचं वर्णन करण्यात आलं आहे तो नश्वर माणूस अगदीच नव्हता तसंच तो चिरंतन काळापासून निर्मात्याच्या अंतःकरणात वसलेला लोगोसच्या जगातील [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २२१] ऐतिहासिक

माणूसही नव्हता वा कोणी अलौकिक व्यक्तीही नव्हता तर 'तो एक तत्त्व होता, एक प्रक्रिया होता आणि जडाचं चेतनात परिवर्तन घडवून आणणारी एक व्यवस्था होता.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २१९]

आणि जो या प्रक्रियेचा शक्य तेवढा अधिकात अधिक अवलंब करून देहधारी असतानाही आत्म्याच्या सर्व गुणांची पूर्णपणे अभिव्यक्ती करतो तो ख्रिस्त असतो. [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २१९]

ख्रिस्ताची परिपूर्णता आणण्यासाठी आध्यात्मिक माणसानं आत्मत्याग आणि स्वयंशिस्त या गुणात निष्णात होऊन देहाला आत्म्याच्या स्वाधीन करायला हवं, आत्म्याशी सुसंगती निर्माण करण्यासाठी देहाला 'शुद्ध करून त्याची शक्ती एवढी वाढवायला पाहिजे की आत्म्याच्या प्रत्येक हालचालीची संवेदना जाणवून त्याच्याशी योग्य असा प्रतिसाद त्याला देता यायला पाहिजे.' यातच सर्वसंगपरित्यागाचा खरा अर्थ आणि मूल्य ह्या दोन्ही गोष्टी दडलेल्या आहेत. आध्यात्मिक प्रेरणा काढून घेतलेला आत्मत्याग 'वाईटाहूनही वाईट असतो.... ईश्वरानं दिलेली उत्तम भेट उद्धटपणानं नाकारणं आहे.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २१९]

परिपूर्णतेला मदत व्हावी म्हणून शाकाहाराची, साध्या मोकळ्या वातावरणातील जीवनाची आणि निसर्गाच्या निकटच्या सानिध्याची शिफारस करण्यात आली आहे. 'शुद्धतम मूलभूत द्रव्यांपासून आणि सूर्यशक्तीनं भरलेल्या वनस्पती सृष्टीकडून मिळू शकत असलेल्या अन्नातूनच आत्म्याला आपलं अस्तित्व टिकवता येऊ शकतं.' यासाठी प्रयत्नशील असलेल्या माणसानं 'मृत आणि जळालेल्या वाऱ्यात, ज्या वाऱ्यातून जीवनावश्यक शक्ती शोषून घेण्यात आलेली असते, श्वासोच्छ्वास करू नये.' तो 'मोकळ्या मैदानात, बागबगिच्यात आणि पर्वतांवर भटकणारा आणि तिथेच राहणारा असावा.... तारकांनी चमचमणाऱ्या दिव्य तारकांशी त्याचा संवाद होत असावा. त्यानं विद्युत शक्तीनं भारल्या गेलेल्या वाऱ्याच्या जिवंत प्रवाहांशी व या भूमातेवरील मातीत आणि तिला आच्छादणाऱ्या गवतात अनवाणी चालून त्याच्याशी सरळ संपर्क प्रस्थापित करावा.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३,

पृष्ठ २२४] त्याला 'कशाचीही भीती वाटू नये आणि ईश्वर सोडून कशाचीही इच्छा नसावी' आणि त्याच्यात संपूर्ण गरिबी पत्करायचं साहस असायला हवं आणि हे सर्व सद्गुण बाणवायचा त्यानं प्रयत्न करायला पाहिजे.

मिताहार, प्रार्थना, ध्यान, जागृती, आत्मसंयम, निर्भयता, आणि स्वैच्छिक दारिद्र्य यांनी शपथबद्ध असलेल्या माणसानं शरीरावर संपूर्ण विजय मिळेपर्यंत प्रयत्न करत राहायला पाहिजे. त्यानंतर त्याची सर्व शपथांमधून सुटका होते. त्यानं सर्व कसोट्या पार पाडलेल्या असतात व त्यानं त्याच्या इच्छेला मुक्त केलेलं असतं..... त्याची जडापासून मुक्ती झालेली असते आणि त्याला या भौतिक शरीरात कधीही राहायची वेळ येत नाही. [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २२३-२४]

या सर्व गोष्टींनी गांधीजींच्या आदर्शवादाला अतिशय प्रभावित केलं असावं. ते म्हणाले की 'मला मेटलँड यांची पुस्तकं फार आवडली. असं दिसतं की ते हिंदू घर्माच्या विचारसरणीला पाठिंबा देतात. [*द स्टोरी ऑफ माय एक्सपेरिमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १३७] बुक ऑफ जेनेसिसमध्ये 'ईश्वरानं स्वतःची - अर्धनरनारीनटेश्वराची प्रतिमा म्हणूनच माणसाला निर्माण केलं आहे' असं जे सांगण्यात आलं आहे त्यावर द परफेक्ट वेमध्ये भाष्य करताना असं स्पष्टीकरण देण्यात आलं आहे की 'याचा अर्थ माणसानं ईश्वरस्वरूप होण्यासाठी स्वतःत पुरुष आणि स्त्री या दोघांच्याही गुणांचा समन्वय घडवू आणला पाहिजे आणि आध्यात्मिक दृष्टीनं स्त्री आणि पुरुष दोन्ही व्हायला पाहिजे.' आत्म्याच्या विकासाचं दर्शन ईव्हपासून तर कुमारी मेरीपर्यंतच्या प्रतीकातून घडवण्यात आलं आहे त्याचंही अशाच रीतीनं विवेचन करण्यात आलं आहे : 'तिनं जेव्हा अज्ञानातून निर्माण झालेला निष्पापपणाचा त्याग केला व त्याऐवजी संपूर्ण ज्ञानातून येणाऱ्या परिपूर्ण निष्पापतेचा स्वीकार केला तेव्हा परत दुराचरणाकडे वळल्या जाण्याचा तिला धोका नव्हता.' [ॲना (बोनस) किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड, *द परफेक्ट वे ऑर द फाइंडिंग ऑफ ख्राईस्ट*, १९२३, पृष्ठ २१९] कितीतरी वर्षांनंतर गांधीजींनी जेव्हा स्वतःचं वर्णन 'अर्धनरनारी' म्हणून केलं आणि ब्रह्मचर्यविषयक तत्कालीन कल्पनांच्या विरोधात जाऊन 'ज्या ब्रह्मचर्याच्या पालनासाठी आचरणविषयक नियमांच्या नऊ पदरी भिंतीची

आवश्यकता असते ते ब्रह्मचर्य हे खरं ब्रह्मचर्यच नव्हे असं जेव्हा गांधीजींनी जाहीर केलं तेव्हा त्यांच्या या शब्दातून मेटलँडचाच विचार प्रतिध्वनित होत होता. ब्रह्मचर्याचे नाव सार्थ करायचं असेल तर ते ‘मुलाच्या अज्ञानातून निर्माण झालेल्या निरागसतेसारखं ब्रह्मचर्याचं’ स्वरूप नसावं तर ‘प्रौढ पुरुषाला पूर्ण लैंगिक ज्ञान झाल्यानंतर जी निष्पापता प्राप्त होते तसं खरं ब्रह्मचर्य असावं.’ [प्यारेलाल, *महात्मा गांधी, द लास्ट फेज,* खंड १, पृष्ठ ५८५]

यात काही संशय नाही की एडवर्ड मेटलँडच्या लेखनाचा गांधीजींच्या मनावर खोल ठसा उमटला होता. बायबलचा जो अर्थ लावण्यात येत होता त्याबद्दल गांधीजींना ज्या शका त्रस्त करत होत्या त्यातील अनेक शंकांची उत्तरं गांधीजींना मिळाली. प्लायमाऊथ बंधूंनी प्रायश्चित्तासंबंधी केलेल्या युक्तिवादाला गांधीजींनी दिलेल्या उत्तरातील प्रत्येक शब्दातून द परफेक्ट वे या पुस्तकातील विचार प्रतिध्वनित होताना आढळतो. ज्यावेळी हिंदू धर्माची ओळख करून देण्यासाठी त्यांना कुणाचंच मार्गदर्शन नव्हतं त्यावेळी मेटलँडच्या पुस्तकामुळे हिंदूधर्मातील अनेक मूलभूत बाबींसंबंधी उदाहरणार्थ पुनर्जन्म, आत्म्याची देहान्तरप्राप्ती अथवा परकायाप्रवेश, ईश्वर आणि व्यक्तीचा आत्मा यातील अद्वैत आणि ईश्वराच्या ज्ञानानं पापक्षालन झाल्यानंतरही परत अधःपतन व्हायची शक्यता यासंबंधीची विवेकाला पटणारी उत्तरं गांधीजींना मिळाली. त्यानंतर काही काळानं गांधीजींनी मेटलँडच्या पद्धतीचा उपयोग रामायण आणि महाभारत व गीता या धर्मग्रंथांच्याही बाबतीत केला व ते म्हणू लागले की यांना आपण ऐतिहासिक कृती न मानता ऐतिहासिक वातावरणाचा आधार घेऊन लिहिलेली तत्त्वज्ञानात्मक काव्ये मानायला पाहिजे. त्यांच्यावर मेटलँडच्या ‘विवेकी श्रद्धेचा’ फार प्रभाव पडलेला होता [मुळातील ख्रिश्चन धर्माचा आधार धर्मगुरु नव्हते तर अनुभव होता असं असोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या संस्थापकांचं म्हणणं आहे : ‘आम्ही सत्ता आणि प्रस्थापित विचारसरणी यांचा अधिकार अमान्य करतो. आम्ही मानवतेच्या विवेकाला आवाहन करतो.’ (द परफेक्ट वे, प्रस्तावना पृष्ठ १९), मानवी विवेकाच्या पलीकडे अनंत सत्य पसरलेलं आहे या आक्षेपाला उत्तर देताना ॲना किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड म्हणतात : ‘सत्य अनंत नाही असं काही नाही परंतु विवेकसुद्धा जेव्हा खरोखरच परिपूर्ण होतो तेव्हाच तो परिपूर्ण होतो........ मानवी विवेकाच्या अपूर्णतेमुळे संपूर्ण सत्याचं आकलन त्याच्या क्षमतेपलीकडचं आहे हा सिद्धान्त अंधश्रद्धेचा सर्वात मोठा आधार राहिलेला आहे. विवेकाच्या आधारे तिला समजावून घेऊ शकतो या श्रद्धेचा, जी श्रद्धाच केवळ ‘वाचवू शकते’, तो सर्वात मोठा शत्रू आहे.’ *द परफेक्ट वे* प्रस्तावना पृष्ठ

२०] आणि नंतर त्यांनी सांगितलं की श्रद्धा विवेकाच्या पलीकडे जाणारी असते परंतु ती विवेकाच्या विरोधात असू शकत नाही.

एसोटेरिक ब्रदरहुडचं सदस्यत्व स्वीकारणं म्हणजे एखाद्या सिद्धान्ताला वा दृष्टिकोनाला मान्यता दिली असा अर्थ होत नव्हता तर सोसायटीच्या सर्वसामान्य तत्त्वांना दिलेली संमती असा अर्थ होत होता. गांधीजी एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या साहित्याचे उत्साही प्रचारक झाले. आता त्यांच्या लेटरहेडवर पत्ता असा होता :

एम. के. गांधी
प्रतिनिधी,
एसोटेरिक ख्रिश्चन युनियन आणि
द लंडन व्हेजिटेरिअन सोसायटी.

नाताळ मर्क्युरीला लिहिलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं : 'जाहिरात दिलेल्या पुस्तकातून ज्या विचारप्रणालीचा अवलंब करण्यात आला आहे.... ती अशा धर्माची विचारप्रणाली आहे जी विश्वात्मक धर्माची शिकवण देते..... तिच्यात मोहम्मद वा बुद्ध यांच्यावर शिवीगाळ करण्यात आलेली नाही.... ती ख्रिश्चनविचारसरणीला इतर विचारसरणींशी सुसंगत करून घेते. ही विचारसरणी (अनेक) लेखकाच्या मते वेगळी नसून अजून एका आगळ्या पद्धतीनं तेच चिरंतन सत्य सांगणारी विचारसरणी आहे.' [गांधीजींचं पत्र, दि. २६ नोव्हेंबर १८९४ *नाताळ मर्क्युरीला,* डिसेंबर १२, १८९४] काही महिन्यांनंतर नाताळ ॲडव्हरटाईझरमधे त्यांनी लिहिलं : 'युनियननं सादर केलेली ही व्यवस्था (विचार) जगातील सर्व महान धर्मात ऐक्य असल्याचं व त्यांचा स्रोतही एकच असल्याचं प्रतिपादित करते आणि.... जगानं कधीही न अनुभवलेली संस्कृती जगाला दिल्याचा जडवाद जो टेंभा मिरवतो त्यातील पूर्ण फोलपणा त्यांनी लक्षात आणून दिला आहे.... त्याचबरोबर.... जडवाद विसरतो की त्याची सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे त्यानं निर्मिलेली विनाशाची अती भयानक साधनं आहेत, बेबंदशाहीची प्रचंड वाढ, श्रम आणि भांडवल यांच्यातील संघर्षात झालेली भयावह वाढ, विज्ञानाच्या नावावर निष्पाप मूक, जिवंत प्राण्यांवर करण्यात येणारे राक्षसी भरमसाट

अत्याचार आहे व यांनाच जडवाद तथाकथित संस्कृतीचं नाव देतो.' [गांधीजींचं पत्र, दि. २१ जानेवारी १८९५ *नाताळ ॲडव्हरटाईझरला,* फेब्रुवारी १, १८९५] असा जर कोणी माणूस असेल की ज्याला आपल्या आत्म्याच्या गरजांच्या दृष्टीने आजचा जडवाद अपुरा वाटतो आणि चांगलं जीवन जगायची ओढ वाटते त्यानं या जाहिरातीतील पुस्तकांवर एक दृष्टिकोन टाकावा आणि 'मी आश्वासन देतो की त्याला आपण स्वतः अधिक चांगला माणूस झालो असल्याचं आढळेल.' [गांधीजींचं पत्र, दि. २६ नोव्हेंबर १८९४ *नाताळ मर्क्युरीला,* डिसेंबर १२, १८९४] एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या १८९४च्या वार्षिक अहवालात गांधीजींनी घेतलेल्या श्रमाबद्दल पुढील प्रशंसोद्गार काढलेले आहेत :

बेलफास्ट, आयर्लंड, आणि दक्षिण आफ्रिकेतील डरबन येथे केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे.... या चळवळीसाठी शेवटच्या ठिकाणी काम करणारे एक हिंदू गृहस्थ आहेत जे तिथं वकिलीचा व्यवसाय करतात. तेथील केंद्रानं केलेल्या प्रगतीचा आणि जनतेत संस्थेच्या कामासंबंधी निर्माण झालेल्या औत्सुक्याचा त्यांनी पाठवलेला अहवाल उत्साहवर्धक आहे.... थिऑसॉफी पंथानं जरी सर्व धर्मातील ऐक्याच्या आवश्यकतेचं प्रतिपादन केलेलं असलं तरी त्यांनी ख्रिश्चन चर्चला ज्याप्रमाणे नाकारलं आहे त्याप्रमाणे एसोटेरिक ख्रिश्चन युनियननं केलेलं नाही. त्यांची मान्यता आहे की ख्रिश्चन धर्माचं तत्त्वज्ञान बहुतांशानं इतर धर्मासारखंच उदाहरणार्थ बौद्ध धर्मासारखं असलं तरी त्यानं त्यांच्या सामान्य सिद्धान्तांना जाणिवेच्या क्षेत्रात 'अजून उच्च स्थानावर' न्यायच्या दृष्टीने भर घातलेली आहे. या धर्माची विचारसरणी डोक्याचा हृदयाशी, मनाचा आत्म्याशी संबंध असावा तशाप्रकारची आहे. 'या दोघांनाही संपूर्ण धर्मापासून वेगळं करता येऊ शकत नाही.' [एडवर्ड मेटलँड यांना पत्रं, ऑगस्ट ४, १८९१, *पायोनिअर मेलला* आणि ऑगस्ट २८, १८९१, द टेबलला] 'आपल्या या जगातील दृश्य वा अदृश्य सर्व प्रकारच्या क्रियाप्रतिक्रियांच्यावर लक्ष ठेवणाऱ्या 'महान वा परिपूर्ण आत्म्याच्या परंपरेच्या थिऑसॉफीतील गूढ विचारसरणीच्या भागाबद्दल [*द कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया,* श्री रामकृष्ण सेंटेनरी कमेटी, बेलूर मठ, कलकत्ता. खंड २ रा, पृष्ठ ४३४] प्रश्न उपस्थित न करता एसोटेरिक ख्रिश्चन युनियननं थिऑसॉफीच्या गूढवादास आपल्या कार्यक्षेत्राबाहेर ठेवून स्वतःला अध्यात्मवादाच्या सीमेत ठेवलं. [ॲना किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड यांनी गूढवाद व अध्यात्मवाद यातील अंतराचं विवेचन असं केलं आहे. : 'गूढवाद म्हणजे अतिंद्रीय पदार्थविज्ञान व ते विज्ञानाच्या कक्षेत येते. मिस्टिसिझम म्हणजे अतींद्रीय तत्त्वज्ञान व ते धर्माच्या

क्षेत्रात येते. वा अधिक साध्या भाषेत सांगायचं तर गूढवादाचा संबंध अशा धर्माशी असतो की जो आत्म्याच्या बाहेर असतो व जे आत्म्याच्या आकर्षणाच्या वातावरणात असते. आणि मिस्टिसिझम हे आत्म्यांतर्गत तत्त्व आणि प्रक्रियेशी संबंधित असते व त्याच्या प्रगतीशी व अवस्थेशी संबंधित असते......' *द परफेक्ट वे* प्रस्तावना पृष्ठ १७]

१८८२ च्या वसंत ऋतूत भारतात द परफेक्ट वेचं आगमन झाल्यानंतर ॲना किंग्जफोर्ड व एडवर्ड मेटलँड यांना थिऑसॉफिकल सोसायटीच्या ब्रिटिश शाखेचं क्रमशः अध्यक्षपद आणि उपाध्यक्षपद स्वीकारायची सोसायटीच्या प्रमुखांनी विनंती केली. जून १८८३मध्ये त्यांची निवड झाली आणि ते त्यावेळी लंडन लॉज म्हणून ओळखल्या जात असलेल्या थिऑसॉफिकल सोसायटीत अध्यक्ष आणि उपाध्यक्ष म्हणून आले. परंतु ते पुरस्कारत असलेल्या ख्रिश्चन थिऑसॉफीला विरोध होत असल्यामुळे ते लंडन लॉजपासून वेगळे झाले व एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या आधीच्या हरमेटिक सोसायटीची स्थापना त्यांनी केली. यामुळे या दोन संघटनांतील दोन संस्थापकात वाद निर्माण झाला व तो अनेक दिवस चालला व काही वेळा त्यात कटुताही आली. परंतु गांधीजींना या मतभेदांची माहिती नसावीसं वाटतं अथवा असलीच तर त्यांना त्यात फार कमी व्यावहारिक महत्त्व वाटल्यामुळे त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं असावं. पुढील वर्षी त्यांनी डरबन येथून लिहिलं : 'माझ्या येथील मुक्कामात माझ्याकडून शक्य होईल तेवढा मी थिऑसॉफीचा प्रचार करणार आहे. माझ्यासाठी थिऑसॉफी आणि एसोटेरिक ख्रिश्चन युनियन यांच्यात काहीच फरक नाही.' [गांधीजींचं श्रीमती लेविस यांना पत्र, दि. ऑगस्ट ४, १८९४]

एडवर्ड मेटलँड जिवंत असेपर्यंत गांधीजींचा त्यांच्याशी नियमित पत्रव्यवहार सुरू होता. दुर्दैवानं त्यातील एकही पत्र आज अस्तित्वात नाही. गांधीजी जेव्हा असंग्रहाचा प्रयत्न करत होते तेव्हा त्यांनी ती नष्ट केली. तोच असा एक पत्रव्यवहार होता की जो नष्ट केल्याचं त्यांना दुःख होत होतं असं त्यांनी मला एकदा सांगितलं होतं.

या पत्रव्यवहारातील एकच पत्र प्रकाशात येऊ शकलं. ते एका कॉर्निशमनची मुलगी श्रीमती लेवीस यांना लिहिलेलं आहे. त्यांनी आपले पहिले पती, विल्यम बरोज यांच्या मृत्यूनंतर डॉ. व्हेनिझेलस यांच्या नात्यातील डॉ. प्लॅटन युस्टॅथिस ट्रॅकुलस यांच्याशी लग्न केलं होतं. त्या ॲना किंग्जफोर्ड आणि एडवर्ड मेटलँड यांच्या जवळच्या मित्र आणि प्रशंसक होत्या आणि

एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या संस्थापकांपैकी एक होत्या. पत्रावर डरबन, ऑगस्ट ४, १८९४ अशी तारीख आहे. त्या पत्रातून गांधीजींनी त्यांना एसोटेरिक ख्रिश्चन युनियनचं साहित्य पाठवायची विनंती केली आहे. त्या साहित्याची जाहिरात आपल्या खर्चानं करायची गांधीजींनी तयारी दाखवली आहे. मागवलेलं साहित्य असं होतं : द परफेक्ट वे - ५ प्रती, ऑफ क्लोद्ध विथ द सन- ५ प्रती, द न्यू इंटरप्रिटेशन १० प्रती आणि इतर पुस्तकं. उरलेल्या पत्रात एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या एका पुस्तकाच्या लेखिकेनं आत्म्याशी वा देहापासून मुक्त झालेल्या चैतन्याशी परिचय असल्याचा जो उल्लेख केला होता त्याविषयी श्रीमती लेवीस यांनी जो संशय दर्शवला होता त्यावर गांधीजींनी केलेली टीका होती.

*जर तुम्हाला 'आत्म्या' संबंधी फारसा विचार करण्यासारखं काही आहे असं वाटत नसेल तर या पुस्तकाला सन्माननीय साहित्यात काय स्थान राहील? जर लेखकानं आपल्या वैयक्तिक निरीक्षणाप्रमाणे संपूर्ण सत्य लिहिलं असेल तर पुस्तकाचा विचार गांभीर्यानं केला पाहिजे. जर त्यातून असत्याची मोहिनी घालून सत्यावर विश्वास ठेवायला लावून लोकांना फसवायचा प्रयत्न करण्यात आला असेल तर त्याचा अधिकात अधिक निषेध करायला हवा. कारण असत्याच्या मदतीनं आपण सत्य टिकवू शकत नाही. अर्थातच ज्या लेखिकेबद्दल मला काहीच माहिती नाही तिच्याबद्दलच्या अनादरापोटी मी हे लिहीत नाही. ती स्त्री सत्याच्या बाबतीत अतिशय विश्वसनीयही असू शकेल. मी एवढंच पुन्हा सांगू इच्छितो की आत्म्याचा परिचय होण्यासाठी लेखिकेचं चारित्र्यसंपन्न असणं अतिशय आवश्यक आहे.*

आणि ज्या गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता त्यावर टीकास्त्र सोडण्यात आलं असता त्यांनी हे लिहिलं होतं. त्यांनी हरमेटिक सोसायटीप्रमाणेच तिची अनुगामी असलेल्या एसोटेरिक ख्रिश्चन युनियनशीही आपला संबंध तिच्या संस्थापकाचा २ ऑक्टोबर १८९७ला मृत्यू होईपर्यंत कायम टिकवला होता. त्यानंतर तिचं कामकाज तहकूब झालं.

## ७

गांधीजींचे मित्र त्यांना ज्याप्रमाणे ख्रिश्चन धर्माकडे वळवायचा प्रयत्न करत होते त्याचप्रमाणे काही त्यांना इस्लामचा अभ्यास करण्यासाठी प्रवृत्त करत होते. त्यांच्या प्रकाश दाखवायच्या प्रयत्नांचं गांधीजींनी सत्यशोधक म्हणून स्वागत केलं. त्यांनी सेल्सनं अनुवादिलेली कुराणाची प्रत आणि इस्लामवरील इतर पुस्तकं मिळवली व श्रद्धापूर्वक यथावकाश त्यांचं वाचन केलं.

ते इतर धर्माविषयी जसजसं वाचन करत होते तसतसं त्यांना आपल्या धर्माच्या तत्त्वांचं वास्तव ज्ञान नसल्याची जाणीव होऊ लागली. हिंदूधर्म हा असीम महासागर आहे. असा एखादाच धर्मविषयक विचार वा दृष्टिकोन असेल ज्याला हिंदूधर्मग्रंथात स्थान मिळालं नसेल. परंतु त्याच्या सहस्र वर्षांच्या वाढीमुळे त्याच्या शुद्ध सुवर्णात बरीच निरुपयोगी भेसळ झाल्याचं आढळतं. खऱ्या मोत्यांमध्ये नकली मोती मिसळले गेले आहेत. त्यामुळे शुद्ध स्वरूपात त्याचं ग्रहण करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकाची गरज पडते. उदाहरणार्थ अस्पृश्यतेच्या परंपरेविषयी वा ऐतिहासिक हिंदू धर्मात स्त्रियांना जे स्थान देण्यात आलं होतं त्यासंबंधी अथवा वेगवेगळ्या धर्मग्रंथात हत्या न करण्याविषयी जी परस्परविरोधी भूमिका घेण्यात आली होती त्यासंबंधी वा अशाच प्रकारच्या इतर प्रश्नांसंबंधी गांधीजींनी कोणती भूमिका घ्यायला पाहिजे होती?

अशाप्रकारच्या गोंधळाच्या अवस्थेत त्यांनी श्रीमद राजचंद्र यांना लिहिलं. एका पत्रातून गांधीजींनी त्यांना २७ प्रश्न विचारले. १९०१ साली श्रीमद राजचंद्र यांचा मृत्यू होईपर्यंत त्यांचा पत्रव्यवहार सुरू होता. आत्मा आणि ईश्वर, मोक्ष वा मुक्ती, राम आणि कृष्ण यांचं देवत्व वा केवळ त्यांच्या ईश्वरी अवतारावर विश्वास ठेवल्यामुळे मोक्ष मिळू शकतो काय, अवतार आणि प्रेषितामागील तत्त्वज्ञान, वेदांचं प्राचीनत्व आणि त्यांची अधिकृतता, त्यांना प्रत्यक्ष ईश्वरी शब्द मानता येते काय आणि मग तसं असल्यास बायबल व कुराणाला तसं का मानण्यात येऊ नये अशा प्रकारचे अनेक प्रश्न गांधीजींनी राजचंद्रांना पत्रांमधून विचारले होते. पुन्हा आत्मा आणि विश्व दोन्हीही अनादी अमर आहेत काय, आत्मा विश्वचैतन्याशी एकरूप होतो की कायमचा नाहीसा

होतो, अस्तित्व आणि पाप यांना वेगळं करता येत नाही काय आणि पापापासून पूर्ण मुक्ती होऊ शकते काय? अखेरीस त्यांनी विचारलं की ख्रिश्चन मिशनरी म्हणतात त्याप्रमाणे ख्रिश्चन धर्म हाच सर्वात महान, सर्वात उदात्ततम व एकमेव खरा धर्म आहे काय व 'येशू हा ईश्वरानं निर्माण केलेला एकमेव पुत्र' आहे ही भूमिका टिकणारी आहे काय व जुन्या करारात करण्यात आलेली येशूच्या मुखातील भविष्यवाणी येशूच्या देवत्वाचा अचूक पुरावा म्हणून मिशनरी म्हणतात त्याप्रमाणे मान्य करता येण्यासारखी आहे काय ?

श्रीमद राजचंद्र यांनी २० ऑक्टोबर १८९४च्या पत्रातून उत्तर दिलं. त्यातील काही उत्तरं इथं त्यांचं सिंहावलोकन करण्याच्या दृष्टीने अतिशय दुर्बोध आहेत. त्यातील अधिक महत्त्वाची उत्तरं इथं थोडक्यात देण्यात येत आहेत :

ईश्वर कर्मबंधनांपासून पूर्णपणे मुक्त झालेला आत्मा आहे. ईश्वर त्याच्या मूळ स्वरूपात शुद्ध चैतन्य आहे, परिपूर्ण बुद्धी आहे, सर्वशक्तिमान आहे, सर्वज्ञ आहे. शुद्ध स्वरूपातील आत्म्यापेक्षा अधिक शक्तिशाली असं कोणतंच आदिकारण नाही वा आत्म्याच्या बाहेर त्याचं अस्तित्व नाही.

*　　　　*　　　　*

आत्मा आणि विश्व हे दोन्ही अनंत आहेत. त्यांना आदी नाही व अंतही नाही. माझ्या विवेकबुद्धीला सर्व आत्म्यांचा लोप होईल वा सर्व आत्म्यांना कायमची मुक्ती मिळेल असं दिसत नाही तसंच संपूर्ण विश्वाचं विसर्जन होईल असंही वाटत नाही. विश्व आणि आत्मा हे दोघंही चिरंतन प्रवाहासारखे आहेत व नेहमीसाठी ते तसेच राहतील.

*　　　　*　　　　*

द्वेष आणि मोह, हाव आणि कामवासना इत्यादीसारख्या वासना आत्म्याला शरीराशी बांधून ठेवतात व त्या या बंधनांसाठी कारणीभूत असतात. मुक्ती वा मोक्ष म्हणजे यापासून संपूर्ण मुक्ती.

*                    *                    *

सत आणि असत इतर सर्व विचारांप्रमाणेच नाश न होणारे आहेत. परंतु सर्व प्राणीमात्रांची असतापासून कायमची मुक्ती होऊ शकते की नाही हा प्रश्न बाजूला ठेवला तरी 'असता'पासून कायमची मुक्ती होऊ शकते वा होऊ शकत नाही म्हणून तोवर वा त्यामुळे मी 'असता'तच राहीन असा युक्तिवाद करायचा काहीच अधिकार नाही. कारण प्रत्येक व्यक्तीला सत वा असत यातून एकाची निवड करायचा अधिकार आहे व त्यातील एकाला स्वीकारणं आणि दुसऱ्याचा त्याग करणं हे प्रत्येकाचं नैतिक कर्तव्य आहे.

*                    *                    *

वेदांचं प्राचीनत्व नाकारता येत नाही. बुद्ध आणि महावीराच्या आधीही वेद होते. परंतु प्राचीनत्व म्हणजे परिपूर्णत्व नाही. त्यानंतरचं प्रगटीकरण अधिक परिपूर्ण असू शकेल. सर्व प्रकारचे विचार आधीपासून अस्तित्वात होते व शेवटपर्यंत अस्तित्वात राहतील परंतु त्यांची अभिव्यक्ती वा बाह्याकार बदलत असतो. असं म्हणता येईल की वैदिक वा जैन धर्मात सांगितलेल्या जीवनपद्धती आधीपासून अस्तित्वात होत्या. प्रश्न एवढाच उरत असतो की कोणती जीवनपद्धती आत्म्याच्या गरजा चांगल्या रीतीनं भागवते.

*                    *                    *

मृताला परत जिवंत केल्यामुळे काही तात्त्विक प्रश्न उपस्थित होत असले तरी ख्रिस्तानं केलेल्या चमत्कारांना नाकारता येत नाही. परंतु परिपूर्ण आत्म्याच्या सर्वशक्तिमानतेसमोर येशूचे सर्व चमत्कार क्षुद्रतेच्या सीमेत जातात.

*                    *                    *

द्वेष आणि मोह यासारख्या वासनांपासून व त्यामुळे होणाऱ्या अज्ञानातून पूर्ण मुक्ती झाल्यानंतरच मोक्ष मिळू शकतो. राम अथवा कृष्णाच्या देवत्वावर विश्वास ठेवल्यामुळे जर

कुणाची या वासनांपासून मुक्ती होऊ शकत असेल तर असं म्हणता येईल की त्या प्रकरणी मोक्ष हा त्या श्रद्धेचा परिणाम आहे.

तरुण मुमुक्षूनं विचारलेला एक प्रश्न निरुत्तर करणारा होता. ‘तुम्ही अशी इच्छा कराल काय की एखादा विषारी सर्प मला चावत असला व मी कोणत्याही परिस्थितीत चावण्यापासून त्याला अडवूच शकणार नसेन तर मी त्याला चावू द्यावं की तुम्ही मला त्याला मारायची परवानगी द्याल?’

उत्तर कठोर होतं. ‘या नश्वर देहाचं क्षणभगुरत्व व अमर आत्म्याचं चिरंतन वैभव व त्याचं असीम सामर्थ्य जर तुमच्या लक्षात आलं असेल तर देहाच्या क्षणिक अस्तित्वासाठी तुम्ही आत्म्याचा सौदा करणार नाही. त्यामुळे तुम्ही काय करावं अशी माझी इच्छा आहे असा प्रश्न उपस्थित होत नाही तर तुमची काय निवड असावी अशी तुमची इच्छा आहे हा प्रश्न आहे. तुमची निवड तुमचं अज्ञान किती दूर झालं आहे वा तुमचा मार्ग किती उजळलेला आहे यावर अवलंबून राहील.’

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्मासंबंधी व त्याच्या निर्मात्याविषयी जो खास दावा केला होता त्याचं उत्तर देताना त्या दोन्हींसंबंधीच्या आदरात यत्किंचितही उणेपणा न येऊ देता त्यांनी थोडक्यात उत्तर दिलं. त्यांनी गांधीजींना धीर न सोडता हिंदू धर्माचा सखोल अभ्यास करायला सांगितलं. त्यांनी एका पत्रात लिहिलं : या प्रश्नाचा भावनाविवश न होता विचार केला तर मला निश्चितपणे असं वाटतं की भारतातील प्राचीन ऋषीमुनींनी आश्चर्यजनक अध्यात्मविषयक जे शोध लावले आहेत वा आत्म्यासंबंधीच्या प्रश्नांसंबंधी जी सखोल दृष्टी दाखवली तशी दृष्टी कोणत्याही धर्मानं दाखवली नाही.’ [*महात्मा गांधी आणि श्रीमद राजचंद्र* (गुजरातीत) प्रकाशक भोगीलाल नगिनदास, उन्झा फार्मसी लि. (गुजरात) (संवत २००५) पृष्ठ ३३]

गांधीजी म्हणतात की श्रीमद राजचंद्रांच्या पत्रानं ‘माझं काहीसं समाधान झालं.’ श्रीमद राजचंद्रांनी पाठवलेली काही पुस्तकं गांधीजींनी वाचली. त्यात पंचीकरण, मणिरत्नमाला, मुमुक्षू

प्रकरण आणि योगवासिष्ठ तसंच हरिभद्र सुरी यांच्या षड्दर्शन समुच्चय या पुस्तकांचा समावेश होता. गांधीजींनी भारतातील काही श्रेष्ठ धार्मिक व्यक्तींशीही पत्रव्यवहार केला.

जैन तत्त्वज्ञान कोणत्याही औपचारिक धर्मावर वा पंथावर निष्ठा ठेवायची मागणी करणारा पंथ नव्हता. तो केवळ आपल्यासमोर आदर्श ठेवतो. संपूर्ण जगाला जिंकणाऱ्या जीनचा आदर्श. जैन तत्त्वज्ञानाप्रमाणे प्रत्येकजण जैन असतो व जैन होण्याचे गुण त्याच्यात असतात. माणसाला ज्या प्रमाणात आपल्या खऱ्या स्वरूपाचं ज्ञान झालेलं असेल त्या प्रमाणात तो जैन असतो. आपल्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत वर्तन करत श्रीमद राजचंद्रांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणे गांधीजींना आपल्या धर्माकडे 'वळवायचा' प्रयत्न केला नाही. गांधीजींना हवं असलेलं मार्गदर्शन तेवढं त्यांनी केलं आणि सत्याचा शोध घेण्यासाठी गांधीजींनी स्वतःसाठी जो मार्ग निवडला होता त्या मार्गावर पुढे चालत राहण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केलं. त्यांनी स्वतःच्या उदाहरणानं हिंदू धर्माच्या प्राचीन सत्याचं गांधीजींना जिवंत दर्शन घडवलं. त्या उदाहरणाशिवाय गांधीजींसाठी ती केवळ अमूर्त कल्पना राहिली असती. त्यांनी मूलभूत आध्यात्मिक कल्पनांची आणि प्राचीन भारतीय परंपरेचा वारसा असलेल्या उज्ज्वल धर्मविचारांची गांधीजींना ओळख करून दिली. हा तोच धर्मविचार होता ज्यानं एका बाजूला श्री. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद आणि स्वामी दयानंदांना घडवलं होतं तर दुसऱ्या बाजूला थिऑसॉफिस्ट, अतिंद्रीय ज्ञानप्राप्तीवर विश्वास ठेवणाऱ्यांना व एसोटेरिक ख्रिश्चन युनियनच्या गूढवाद्यांना घडवलं होतं.

खऱ्या धर्माचा स्वीकार करण्यासाठी तो कसा ओळखावा आणि सर्व खोटे धर्म बाजूला कसे सारावे या गांधीजींसमोरील लहानपणापासून त्रस्त करणाऱ्या प्रश्नाचं उत्तर शोधून काढायला श्रीमद राजचंद्रांनी गांधीजींना मदत केली. [*महात्मा गांधी आणि श्रीमद राजचंद्र* (गुजरातीत) प्रकाशक भोगीलाल नगिनदास, उन्झा फार्मसी लि. (गुजरात) (संवत २००५) पृष्ठ १८-२१] त्याचा सारांश थोडक्यात असा सांगता येईल : धर्म हा एखादा 'वाद' नाही. एखाद्या विशिष्ट विचारसरणीचं ते केवळ बौद्धिक ज्ञानही नाही आणि किंवा त्या विचारसरणीवरील श्रद्धाही नाही. तो आत्म्याचा अंतर्गत गुण आहे. त्यामुळे माणसाला माणूस म्हणून आपलं जीवनकर्तव्य काय आहे याचं आणि आपल्या बांधवांशी योग्य

संबंध कसे प्रस्थापित करावे याचं ज्ञान होते. परंतु त्याआधी आपल्याला आपल्या स्वभावधर्माचं ज्ञान असणं आवश्यक आहे. त्यामुळे धर्म म्हणजे आत्मज्ञान करून घ्यायचं साधन आहे वा आत्म्याचं खरं स्वरूप जाणून घ्यायचं साधन आहे.

या साधनाचं ज्ञान विशिष्ट देशांसाठी वा लोकांसाठी मर्यादित नाही. सर्व मानवजातीचा तो सामायिक वारसा आहे. परंतु इंद्रियजन्य अनुभवांवर भर द्यायच्या अवस्थेत तो आपल्यातच निद्रिस्त अवस्थेत असतो. वेगवेगळ्या लोकातील, मग ते पूर्वेकडील असोत वा पश्चिमेकडील असोत वा ते वेगवेगळ्या धर्माचे असोत, त्याचं मूलभूत स्वरूप बदलत नाही. ज्यांनी विविध धर्माचा अभ्यास केला आहे ते सर्व धर्म एकच आणि समान असल्याची व केवळ त्यांचा बाह्याकार वेगळा असल्याची साक्ष देतील. उदाहरणार्थ शंकराचार्यांनी घोषित केलं : 'ब्रह्म हेच केवळ सत्य आहे, जग मिथ्या आहे.' पवित्र कुराण मान्य करते : 'देव एकच आहे. केवळ तोच आहे व त्याच्याशिवाय काहीही नाही.' बायबल म्हणते : 'मी आणि माझा निर्माता एकच आहे.' वेगळ्या शब्दात सांगायचं तर या विश्वात जे काही आहे ती सर्व एकाच सर्वोच्च सत्याची रूपं आहेत. मर्यादित दृष्टी असलेल्या आम्हा अपूर्ण मानवांनी आपापल्या दृष्टीनं विश्वाचं वर्णन करायच्या प्रयत्नामुळे हा अंतहीन गोंधळ निर्माण झालेला आहे. सर्व धर्मातील खडाजंगीच्या आणि भांडणांच्या मुळाशी हेच कारण आहे.

गांधीजी म्हणाले होते की आपण सर्व अपूर्ण माणसं असल्यामुळे सर्वोच्च प्राप्तीच्या आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी आपण आपल्याहून कमी अपूर्ण असलेल्या लोकांची मदत घेतो. ते जगद्गुरू वा धर्मसंस्थापक आहेत. परंतु आपल्या आध्यात्मिक प्रवासात अपरिहार्यपणे अशी एक वेळ येते की कोणीही आपलं मार्गदर्शन करू शकत नाहीत - धर्मग्रंथसुद्धा. या प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात सर्वोच्च ध्येय गाठू इच्छिणाऱ्या माणसाला आपल्या अंतरंगाचं मार्गदर्शन घेत सर्व संघर्ष स्वतःशीच करावा लागत असतो. श्रीमद राजचंद्र यांनी आपल्या मुक्तछंदातील कवितेत आत्म्याच्या यात्रेसंबंधीचं केलेलं वर्णनाचा आशय असा आहे :

*सर्वज्ञ जीन लीन असताना भावसमाधीत*
*गैरवान्वित केलं त्यांनी त्या स्थितीला*
*मूक साक्षी होते ते त्या अवस्थेचे*
*दिङ्‌मूढ होऊन हरवले त्यात,*
*कोणतीही मर्त्य जिव्हा गुणगानकरू शकत नाही*
*त्या गौरवास्पद स्थितीचं.*
*परंतु जो न थकता करतो अविरत संघर्ष*
*आढळेल त्याला आपल्या आतच*
*आपल्याच अस्तित्वात दडलेला*
*तो दिव्य अनुभव*

वेगळ्या शब्दात केवळ आत्म्याकडूनच आत्मज्ञान होऊ शकतं.

कवीचं वर्णन करताना गांधीजींनी लिहिलं : ‘श्रीमद राजचंद्र यांना वेगवेगळे असे धर्म आवडायचे की ज्यांनी सर्व प्राणिमात्रांना आपलं संरक्षण दिलेलं होतं. परंतु मुमुक्षूला मुक्तीनंतर संरक्षण नको असते तर स्वातंत्र्य हवं असते. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट धर्माला बांधून घ्यायची वा एखाद्या धर्माचं लेबल लावायची गरज नसते.’

गांधीजी पुढं सांगतात, ‘व्यक्तिशः माझा विश्वास आहे की आपापल्या भक्तांच्या दृष्टिकोनातून सर्व धर्म परिपूर्ण आहेत. परंतु इतरांचा जोवर प्रश्न असतो तोवर सर्व धर्म अपूर्ण असतात. स्वतंत्रपणे विचार केला तर सर्व धर्म परिपूर्ण तसेच अपूर्णही आहेत. कारण एखाद्यानं आध्यात्मिक विकासाची एक सीमा ओलांडल्यानंतर धर्मग्रंथातील सूत्रेही पुढील विकासाच्या दृष्टीनं बेड्यासारखी होतात.

‘परंतु हे त्यालाच लागू होते जो सापेक्ष अस्तित्वाच्या पलीकडे गेलेला आहे. श्रीमद राजचंद्र यांच्या शब्दात आमच्या या दैनंदिन काम भागवू इच्छिणाऱ्या जगात आपला स्वतःचा धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारायची काहीच गरज नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्माच्या पालनानं मुक्ती मिळू

शकते. कारण मुक्ती म्हणजे मोह आणि द्वेषापासून पूर्णपणे सुटका. आणि सर्व धर्मांचं हेच सामान्य ध्येय आहे.' [*महात्मा गांधी आणि श्रीमद राजचंद्र* (गुजरातीत) प्रकाशक भोगीलाल नगिनदास, उन्झा फार्मसी लि. (गुजरात) (संवत २००५) पृष्ठ १८-२१]

# प्रकरण १५ वे

# दुःखद वादळ

१

नाताळ बंदरात उतरल्यानंतर गांधीजींना उणेपुरे सहा महिनेच झाले होते. त्यांच्यासाठी हा प्रदेश अगदी नवखा होता व ते या प्रदेशाला नवखे. परंतु तरीही कुणाही माणसाची मती गुंग व्हावी अशा काही विलक्षण आणि विसंगत गोष्टींचं दर्शन या अल्पावधीतच गांधीजींना तिथं झालं. सुवेझच्या दक्षिणेकडील त्या प्रदेशात सर्वसामान्यपणे मान्य करण्यात आलेल्या मूल्यव्यवस्थेला कोणतंच स्थान नव्हतं. विकृत मूल्ये असलेलं ते विचित्र जग होतं. तिथं विरोधाभासाची भरपूर उदाहरणं होती व त्यामुळे मनाचा गोंधळ उडून ते संभ्रमात पडत असत.

बोअर आणि ब्रिटिश या दोघांमधून ब्रिटिश तपकिरी रंगाच्या लोकांशी सहनशीलतेनं वागायचे व बोअर लोकांच्या रंगभेदाच्या भूमिकेमुळे बोअरांची टीका करायचे. दुसरीकडे बोअर आपलं वांशिक श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी क्रूरपणानं वागायचे हे खरं असलं तरी काळ्या माणसाबद्दल बंधुत्वाच्या गोष्टी करणाऱ्या त्याच ब्रिटिशांनी एक प्रकारची जंगम गुलामगिरीच निर्माण करणारी श्रमव्यवस्था निर्माण केली होती. ब्रिटिशांच्या या भंपकबाजीवर बोअर टीकास्त्र सोडायचे.

त्यानंतर तिथं डच रिफॉर्म चर्चचे मिशनरी होते. ते काळ्या लोकांना गोऱ्यांसोबत चर्चमध्ये उभं राहू देत नसत. आणि दुसरीकडे इंग्रज होते. ते काळ्या माणसाशी त्याच्या बोअर मालकाच्या विरोधात जाऊन मैत्री करायला तयार होते. परंतु याचा अर्थ असा नव्हता की त्यांना आपल्या वर्णश्रेष्ठत्वाचं बोअरांपेक्षा कमी भान होतं. त्याशिवाय तिथं अशी मिश्र जातीची रंगीत माणसं होती ज्यांचा काळे आणि गोरे दोघंही तिरस्कार करायचे. परंतु ह्या मिश्र जातीच्या लोकांचा काळे जेवढा द्वेष करायचे त्याहूनही अधिक ते काळ्यांचा द्वेष करायचे व त्यांच्या या अवस्थेसाठी

जबाबदार असणाऱ्या गोऱ्यांचीच ते हां जी हां जी करायचे व त्यांच्याचकडून त्यांचा कल असायचा.

अशा आणि अशासारख्याच अनेक कठीण समस्यांचा परिचय दक्षिण आफ्रिकेची ही कहाणी वाचताना आपल्याला होणार आहे व दक्षिण आफ्रिकेत बोअर व ब्रिटिश यांच्यात श्रेष्ठत्वासाठी जो दीर्घ संघर्ष झाला त्याचा इतिहास आपण पाहू तेव्हाच आपल्याला त्यांचा अर्थही लागणार आहे. हे दोघंही दोन वेगवेगळ्या जीवन शैलीचं प्रतिनिधित्व करत होते. एक धनगरी आणि पितृप्रधान जीवनपद्धती होती तर दुसरी औद्योगिक आणि शहरी.

गोऱ्यांचा भारतीयांच्या प्रश्नांबद्दलचा दृष्टिकोन, मग ते बोअर असोत की ब्रिटिश, 'नेटिव्हांकडे पाहायच्या दृष्टिकोनावरच अवलंबून असायचा. 'नेटिव्हां' ची भूमी बळकावण्यात ब्रिटिश बोअरांपेक्षा काही मागं नव्हते व भारतीयांकडे पाहायचा त्यांचा दृष्टिकोनही बोअरांपेक्षा काही वेगळा नव्हता. तरीही 'सम्राटांच्या प्रजेशी' बोअर जे 'लाजिरवाणं वर्तन' करायचे त्याबद्दल ब्रिटिश तक्रार करायचे. परंतु या दोघांच्या वर्तनातील अंतर अर्धा डझन व सहा यामधे जेवढं असतं तेवढंच होतं.

दक्षिण आफ्रिकेच्या एका इतिहासकारानं 'काळ्या खंडातील संस्कृतीचा कष्टदायक आणि अपराधातून झालेला जन्म' असा उल्लेख केलेला आहे. त्यांचं म्हणणं आहे की 'आपलं आजचं विश्व ज्याच्याकडून शासित होतं त्या अटळ न्याय करणाऱ्या विवेकाच्या न्यायालयात अथवा चौकशीच्या ठिकाणी' आपण कितीही उदात्तीकरण करायचा प्रयत्न केला तरी 'आजच्या स्खलनशील अवस्थेचं' आपल्याला कधीच समर्थन करता येऊ शकणार नाही. युरोपिअन लोकांच्या दक्षिण आफ्रिकेतील प्रवेशाची कहाणी रक्त आणि अश्रू यांनी लिहिण्यात आलेली आहे. ज्या रंगभेदाचा सामना गांधीजींना करावा लागला होता आणि त्याचं जे जालीम स्वरूप व्यक्त झालं होतं त्याची मुळं चार शतकांच्या काळ्या आणि गोऱ्यांच्या संघर्षात व त्या संघर्षाच्या अजूनही ताज्या असलेल्या जखमात दडलेली आहेत. रंगभेदाच्या भीतीनं दोन्ही बाजूत जी

अवास्तव भीती निर्माण केली आहे व जी अजूनही कार्यरत आहे तिला या संपूर्ण संदर्भातच समजावून घेणं शक्य आहे.

## २

पाश्चात्य जग आणि पौर्वात्य जग यांच्या जवळपास मध्यभागी असलेल्या स्थानामुळे दक्षिण आफ्रिका हे सगळ्या जगातील लोकांना भेटण्याचं मध्यवर्ती केंद्र झालं आहे. अमेरिकेचा शोध लागला जवळपास त्याच काळात दक्षिण आफ्रिकेचा शोध पोर्तुगीजांनी लावला होता. परंतु केपमधे पहिली युरोपिअन वसाहत वसवणारे डच होते व त्यांनी ती वसाहत पोर्तुगीजांच्या ऱ्हासानंतर वसवलेली होती. १६०२ साली पूर्वेशी व्यापार करण्याकरिता द ग्रेट डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करण्यात आली होती. त्या काळात अशा प्रकारचं स्वप्न युरोपमधील सर्व नौदल सामर्थ्य असलेली राष्ट्र पाहत होती. अर्ध्या शतकानंतर व्हॅन रिबेकला पूर्व भारताकडून जा-ये करणाऱ्या जहाजांना अन्नपाणी पुरवण्यासाठी टेबलच्या उपसागरात एक स्थानक उभारण्यासाठी पाठवण्यात आलं. एक किल्ला बांधण्यात आला व ते ठिकाण जहाजं भेटायचं शक्तिशाली ठिकाण म्हणून विकसित करण्यात आलं. केप हेच ते ठिकाण असून 'नाविकांचं पथिकाश्रम' म्हणून ते ओळखलं जाऊ लागलं.

काळाच्या ओघात इंग्रज, फ्रेंच ह्युगोनॉट्स, व लो जर्मन लोकही डचांच्या मागोमाग आले. हे सर्व आद्य वसाहतकार एकमेकात मिसळले व त्यांच्यातून जी एक नवीन जमात निर्माण झाली ती म्हणजे बोअर लोकांची. त्यांचं स्वतःचं असं एक वेगळं स्वभाववैशिष्ट्य तयार झालं तसंच त्यांची स्वतःची एक भाषाही घडत गेली. ती डच भाषेहून बरीच वेगळी होती. आज ती आफ्रिकानार - आफ्रिकेतील गोऱ्या वंशजांची भाषा म्हणून ओळखली जाते.

कंपनी शेतमालासाठी इतके कमी दर देत असे की गोऱ्या वसाहतवाल्यांनी पश्चिम आफ्रिका, मादागास्कर, मलायातून स्वस्त निग्रो गुलामांची आयात सुरू केली. अशा रीतीनं एकत्रित आलेले रंगीत लोकांचे विविध वंशही एकमेकात मिसळले व त्यानंतर गोऱ्या

वसाहतवाल्यांचं व नाविकांचं रक्तही त्यांच्या रक्तात मिसळलं व या सर्व संकरातून निर्माण झालेल्यांना 'केप कलर्ड पिपल' म्हणून ओळखण्यात येऊ लागलं. आज त्यांची संख्या सर्वात जास्त म्हणजे जवळपास ४ लाख आहे व ते आफ्रिकानार भाषाच बोलतात.

अशा रीतीनं दोन मुख्य गट सागराच्या या पथिकाश्रमात शेजारीशेजारी राहायला आले. एका बाजूला युरोपियन होते. त्यांच्यात कंपनीचे नोकर, शेतकरी, व्यापारी, कुशल कामगार इत्यादी होते. आणि दुसऱ्या बाजूला काळी माणसं होती. त्यांच्या नशिबी 'हलकीसलकी कामं करणंच होतं.' [जॉन एच. हॉफमायर, *साऊथ आफ्रिका*, अर्नेस्ट बेन लिमिटेड, लंडन, (१९५२), पृष्ठ ३९]

केपमधील मूळ रहिवासी बुशमन आणि हॉटेनटॉट्स यांना गोऱ्या वसाहतवाल्यांनी मागे ढकललं. बुशमन ही भटक्या शिकाऱ्यांची प्रतिभासंपन्न जमात होती. त्यांच्यात अभिनय, नृत्य, संगीत, चित्रं आदींची प्रतिभा होती व त्यांनी काढलेली ऱ्होडेशियाच्या गुहेतील व नैऋत्य आफ्रिकेतील चित्रांना आज फार मागणी आहे व वैज्ञानिक त्यांच्या प्रतिकृती तयार करून त्यांचा अभ्यास करत आहेत. आखूड बांध्याचे, 'खोल गालाचे, खोल पाठीचे व पिवळ्या रंगाच्या मंगोल चेहऱ्याचे ते लोक होते. त्यांची भाषा कोंबड्यांची आणि कावळ्यांची (क्लिक्स आणि क्रोक्सची) भाषा होती. ते विषारी बाण वापरायचे, जंगली फळांवर व किडा-कीटकांवर गुजराण करायचे व दऱ्यांच्या गुहांमध्ये आणि जमिनीत पडलेल्या छिद्रांमध्ये राहायचे. परंतु निसर्गाचा जो ग्रंथ सुसंस्कृत लोकांसाठी बंद पुस्तकासारखा आहे त्या निसर्गाच्या रहस्याचं त्यांना ज्ञान होतं. ते 'पशूपक्ष्यांशी त्यांच्या भाषेत बोलायचे.' त्यांनी संस्कृतीशी समेट करायचं नाकारलं व कालाहारी वाळवंटातील सुरक्षित ठिकाणातील काही हजार लोक सोडले तर ते सर्व आज नष्ट झालेले आहेत.

बुशमनपेक्षा मोठा बांधा असलेले हॉटेन्टॉज हे आदिवासी धनगर वर्गातील लोक होते. त्यांची भाषा कोंबड्यांची होती परंतु कावळ्यांची नव्हती. गोऱ्यांनी आणलेल्या दारूच्या व्यसनानं आणि रोगराईनं त्यांच्यातील अनेकांचा मृत्यू झालेला होता. त्यातून जे वाचले त्यांना गोऱ्यांनी

गुलाम बनवलं. त्यांच्या रक्तात गोऱ्यांचं रक्त मिसळलं व आज ते केपमधे रंगीत लोक म्हणून राहत आहेत.

गोऱ्या वसाहतवाल्यांबरोबर फार कमी स्त्रिया आल्या होत्या. विवाहयोग्य गोऱ्या स्त्रियांच्या उणिवेची समस्या सोडवण्यासाठी डच कंपनीनं संमिश्र विवाहाला प्रोत्साहन दिलं. अशा रीतीनं करण्यात आलेला पहिला ज्ञात मिश्र विवाह जॉन वुन्टर आणि अँटोनी नावाच्या एका बंगाली माणसाची मुलगी यांच्यात झाला होता. व्हॅन मिरॉफ यांनी एका हॉटेनटॉट स्त्रीशी विवाह केल्यानंतर व्हॅन रेबिक यांनी संमती दर्शवणारं सूचक चिन्ह म्हणून त्यांना शल्यचिकित्सकाच्या (सर्जनच्या) पदावर पदोन्नत केलं. परंतु समाज जसजसा स्थिरावत गेला तसतशी मिश्र विवाहांना असलेली मान्यता कमी होत गेली व काळ्या व गोऱ्या लोकांचे समाज अधिकाधिक वेगळे होत गेले.

बोअर हे गुराढोरांची शेती करणारे होते. त्यांच्या जनावरांना चरायला मुक्त कुरण मिळेल एवढी जमीन त्यांना हवी होती. असं सांगतात की 'दुसऱ्या माणसाचा धूर दिसणार नाही एवढं मोठं आपलं शेत असावं' [सारा गरट्रूड मिलान, *ऱ्होड्स,* चाटो अँड विंडस, लंडन, (१९३३), पृष्ठ ४९] असं बोअर लोकांचं स्वप्न होतं. करांना ते दरवडा समजायचे आणि आणि सर्व प्रकारच्या शासनाला ते 'ढवळाढवळ' समजायचे. त्यापासून सुटका करून घेण्यासाठी ते स्थलांतर करत राहायचे. 'ट्रेकबोअर' या शब्दाचा अर्थ 'गुरांच्या चराईसाठी फिरत राहणारा धनगर' असा झाला.

त्यांचा विलगपणा व सुसंस्कृत समाजाच्या सामाजिक बंधनांच्या उणिवेमुळे आदी वसाहतवाले संपूर्ण अधःपाताच्या सीमेवर गेले. आणि अनेक प्रकरणी त्याचे परिणामही दिसून आले. अनेक वसाहतवाले नेटिव्हांसारखे राहू लागले, त्यांनी आफ्रिकन बायका केल्या आणि अनेक बायका करणं आणि रखेल्या ठेवणं हे प्रकार त्यांनी सुरू केले. त्यांना 'नेटिव्ह' लोकांच्या जिवाबद्दल फार कमी आदर वाटायचा व 'काफीर' व 'बुशमन' यांना मारण्यात काही अपराध आहे असं त्यांना वाटत नव्हतं. कमिसरी डी मिस्ट यांनी आपल्या केपटाऊन येथील कार्यालयातून ॲमस्टरडॅम येथे १८०२ साली कळवलं की हे आदी वसाहतकार लोक 'अर्ध रानटी' झाले आहेत

आणि त्याच्यातील 'नैतिक जाणिवेची पूर्ण घसरण झाली आहे.' 'सुसंस्कृत लोकांशी त्यांचा कोणताच संपर्क न राहिल्यामुळे व दररोज शिकार, सतत मांसाहार असं एकसुरी कंटाळवाणं जीवन जगावं लागल्यामुळे [जॉन एच. हॉफमायर, *साऊथ आफ्रिका,* अर्नेस्ट बेन लिमिटेड, लंडन, (१९५२), पृष्ठ ४७] असं घडलं असं त्याचं म्हणणं होतं. परंतु दोन गोष्टींनी या घसरणीला अडवलं - एक स्त्रियांचा प्रभाव. त्यांनी शिष्टाचाराच्या आपल्या तीव्र जाणिवेमुळे पुरुषांना घसरण्यापासून अडवलं आणि दुसरी गोष्ट म्हणजे ट्रेकबोअरांचा धर्म.

ट्रेकबोअरांनी आपल्यासोबत आणलेला धर्म म्हणजे काल्विन लोकांचा धर्म. नियतिवादाच्या सिद्धान्तामुळे गोऱ्यांना 'सहजपणे काळ्यांना कमी लेखता आलं.' [लिओ मार्कर्ड, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका,* फेबर अँड फेबर लिमिटेड, लंडन, (१९५८), पृष्ठ २३] ते कौटुंबिक प्रार्थनेचं कटाक्षानं पालन करत असत. तिथं असं एकही घर नव्हतं की ज्या कुटुंबाजवळ आपलं स्वतःचं बायबल नसेल. त्यांच्या प्रार्थनेत बायबलचं नियमितपणे वाचन करण्यात यायचं. परंतु त्यांच्यासाठी बायबलचा अर्थ होता जुना करार, नवा करार नाही. हळूहळू काळ जसजसा पुढे सरकू लागला तसतसे ते जुन्या करारातील लोकांशी एकरूप होऊ लागले व स्वतःला 'स्वर्गाच्या राज्यात नेण्यासाठी देवानं पसंत केलेले लोक' असं समजू लागले. [लिओ मार्कर्ड, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका,* फेबर अँड फेबर लिमिटेड, लंडन, (१९५८), पृष्ठ २३]

'तद्देशीय लोकांशी' सतत युद्धाच्या मनोवस्थेत डच वसाहतवाले राहत आल्यामुळे त्यांच्यात शत्रूवर हल्ला करण्यासाठी व त्यांच्यावर धाड टाकण्यासाठी प्रशिक्षित सैनिक तयार करायची पद्धत पडली. त्यानुसार वसाहतीतील प्रत्येक पुरुषाला सैन्याच्या कामासाठी बोलावलं जाऊ शकत होतं. वर्षातून एकदा सैनिकी प्रशिक्षणाचं शिबिर व्हायचं. त्यावेळी वसाहतीतील प्रत्येक माणसाला 'घोडा, जीन, लगाम आणि तीन दिवसांचा शिधाआटा घेऊन' शिबिरात हजेरी लावावी लागायची. या शिधाआट्यात स्वतःसाठी आणि त्याच्या हॉटेन्टॉट घोड्यासाठी बहुधा बिलटाँग (वाळलेलं मांस), खुसखुशीत पाव हे साहित्य आणावं लागायचं. यामुळे आणि दररोजच्या शिकारीच्या गरजेमुळे तरुण ट्रेकबोअर हा निष्णात घोडेस्वार आणि नेमबाज व्हायचा.

## ३

सतराव्या आणि अठराव्या शतकात युरोपिअन लोकांच्या वसाहतीचं भवितव्य, मग ते जुन्या जगातील असोत की नव्या. त्यांच्या मूळ देशाच्या भवितव्याप्रमाणे बदलत राहायचं. अठराव्या शतकाच्या शेवटी ब्रिटन आणि फ्रान्समध्ये युद्ध सुरू होतं. हॉलंडला फ्रान्सनं जिंकलं होतं व प्रिन्स ऑफ ऑरेंजनी इंग्लंडमध्ये आश्रय घेतलेला होता. फ्रेंचांकडून केप घेण्यासाठी प्रिन्स ऑफ ऑरेंजकडून अधिकार घेऊन इंग्रजांनी १७९५ साली पहिल्यांदा आणि पुन्हा १८०६ साली केपटाऊन कायमचं ताब्यात घेतलं.

केपमधे ब्रिटिशांच्या आगमनाबरोबरच मिशनऱ्यांच्या हालचालींना आणि मानवतावादी सुधारणांना वेग आला. जॉन वेस्ली यांना इंग्लंडच्या चर्चमधून जेव्हा काढून टाकण्यात आलं व त्यांनी मेथॉडिस्ट चर्चची स्थापना केली तेव्हा अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये ख्रिश्चन धर्माच्या पुनरुज्जीवनाला जोर आलेला होता. मानवतावादी सुधारणा हा या पुनरुज्जीवनाच्या चळवळीचा एक भाग होता. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर तेथील सामाजिक दुरवस्था अतिशय वाढली होती. त्यामुळे राष्ट्रीय कर्तव्याच्या जाणिवेत फार मोठं परिवर्तन होऊ लागलं होतं. ते युग झोपडपट्टीचं, गुलामगिरीचं, कामगार वर्गाच्या दारिद्र्याचं, माल्थसच्या लोकसंख्येच्या सिद्धान्ताचं व त्याच्या कठोर हृदयी उपसिद्धान्ताचं, मजुरीच्या पोलादी नियमाचं - ज्यामुळे हूड्सला सॉंग ऑफ द शर्ट हे काव्य रचायला प्रवृत्त केलं - होतं. सॉंग ऑफ द शर्टमधे कवी म्हणतो :

*'भाकरी असावी एवढी महाग*
*आणि रक्त आणि मांस एवढं स्वस्त !'*

ब्रिटनच्या संसदेची पुनर्रचना झालेली नव्हती आणि ती प्रतिगामी कुलीन जमीनदारांचं प्रतिनिधित्व करत असलेल्या टोरी पक्षाच्या जबरदस्त पकडीत होती. आपले खिसे भरण्यासाठी त्यांना केवळ धान्याचे भाव वर ठेवण्यातच रस होता. त्यामुळे कोणतंही जन आंदोलन कठोरपणे दडपून टाकण्यासाठी त्यांची सदैव तयारी असायची. तिथं ब्रेडसाठी उठाव झाले होते.

मॅन्चेस्टरच्या लोकांनी जाहीरसभा घेऊन सुधारणांसाठी जेव्हा निदर्शनं केली तेव्हा पिटर्लू येथील सैन्यानं केलेल्या हत्याकांडाद्वारे त्यांना गप्प बसवण्यात आलं. परंपरागत चर्चला न मानणाऱ्या वेस्लीच्या प्रार्थनासभेत कामगार वर्ग आणि नवमध्यम वर्ग यांचाच भरणा असायचा. धर्मोपदेशक आणि लिबरल पक्षाचे सदस्य, पुरोगामी आणि प्रस्थापित विचारसरणीविरुद्ध असणारे लोक ह्या सर्वांनी मिळून संसदेवर भरपूर दडपण आणलं व त्यांचा प्रभाव समाजाच्या सर्व स्तरात जाणवू लागला. याच लोकांनी एकोणिसाव्या शतकातील महान सुधारणांसाठी लोकांना प्रेरीत केलं होतं. १८०७ साली गुलामांच्या व्यापारावरील बंदी आणि ब्रिटिश साम्राज्यात १८३३ साली बंद करण्यात आलेली गुलामगिरी हे याच वर्गाचं काम होतं व त्यांचा दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासावर मोठा प्रभाव पडलेला आहे.

राष्ट्रांतर्गत मानवताप्रेमाचाच दुसरा भाग होता परदेशातील मिशनऱ्यांचं कार्य. मूळ निवासी हे मिशनऱ्यांसाठी वाचवण्यायोग्य आत्मे होते तर वसाहत करणारांसाठी ते शेतमजूर होते. धर्मपरिवर्तन केलेले हॉटेन्टॉट मिशनऱ्यांच्या ठिकाणांकडे शेतीवरील कठोर परिश्रमाच्या जीवनापासून सुटका करून घेण्यासाठी धाव घेत असत. चर्चमधील प्रार्थनेला हजर राहता यावं म्हणून त्यांनी रविवारच्या सुटीची मागणी केली. मिशनरी आपले मजूर चोरत आहेत व हॉटेन्टॉट लोकांना बिघडवत आहेत अशी गोऱ्या वसाहतवाल्यांनी तक्रार केली. मिशनरी हॉटेन्टॉटना स्वतंत्र माणूस समजत होते व त्यांना काम करायला बाध्य करता येऊ शकत नाही व आवश्यकता पडल्यास ते आपल्या मालकाविरुद्ध नागरी न्यायालयात तक्रार निवारणासाठी खटलाही भरू शकतात असं त्यांचं म्हणणं होतं. [लिओ मार्कर्ड, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका*, फेबर अँड फेबर लिमिटेड, लंडन, (१९५८), पृष्ठ ९८] वसाहतवाल्यांचा आरोप होता की मिशनऱ्यांची ठिकाणं 'हॉटेन्टॉट, चोर आणि पळून जाणाऱ्या लोकांची आश्रयस्थानं झालेली आहेत.' तिथं त्यांना त्यांच्या गोऱ्या मालकांविरुद्ध तक्रार ऐकायला उत्सुक असलेले कान भेटायचे आणि मालक व नोकरांच्या भांडणात मिशनऱ्यांचा कल बहुधा नोकरांकडून असतो असं वसाहतवाल्यांचं म्हणणं होतं.

जॉन्सन थिओडोरस व्हॅन डर केम्प हे लंडन मिशन सोसायटीचे मिशनरी आणि जीन जेकस रुसोचे अनुयायी होते. रुसोच्या शिकवणुकीच्या प्रभावाखाली त्यांची मान्यता होती की 'रानटी माणसाचं जीवन साधं आणि परिपूर्ण असते.' त्यामुळे त्यांनी 'दोन शेळ्यांची कातडी आणि मण्यांची माळ एवढीच संपत्ती असलेल्या' एका गुलाम स्त्रीच्या मुलीची गुलामगिरीतून मुक्तता करून तिच्याशी लग्न केलं. 'सर्व माणसं देवाच्या दृष्टीत सारखीच आहेत व त्यामुळे सर्वात पवित्र असणारांशी रंगाचा विचार न करता लग्न करणं हे ख्रिश्चनांचं कर्तव्य आहे' [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ११] अशी शिकवण ते देऊ लागले. त्यांचे सहकारी डॉ. रीड आणि इतर अनेकांनी त्यांचा कित्ता गिरवला. गोऱ्या वसाहतवाल्यांच्या दृष्टीत ही गोष्ट तिरस्कारार्ह होती. डॉ. व्हरवर्डच्या आजच्या दक्षिण आफ्रिकेत काळ्या आणि गोऱ्यांच्या विवाहाला 'अनैतिकतेच्या कायद्याखाली बंदी आहे.

या दोघांमधील स्थान होतं ब्रिटिश अधिकाऱ्यांचं. प्रशासक म्हणून गोऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत त्यांना सहानुभूती होती व मिशनऱ्यांना ते कमी अधिक प्रमाणात उपद्रवी व्यक्ती समजत असत. परंतु त्यांना लंडनमधील मिशनऱ्यांचा धाक होता. गुलाममालकांच्या हक्कांना मर्यादित करायचा त्यांनी काहीच प्रयत्न केला नाही. परंतु कायद्यानं दिलेल्या सर्व हक्कांचं पालन होतं आणि मालक आणि नोकर या दोघांनाही चांगली वागणूक मिळते असं न्यायालयांना त्यांना दाखवावं लागायचं. अशा रीतीनं अधिकारी, मिशनरी व वसाहतवाले असा परस्परांशी 'अस्वस्थ संबंध असणारांचा एक त्रिकोण' [ॲलन पॅटन, *होप फॉर साऊथ आफ्रिका*, पाल माल प्रेस, लंडन, (१९५८), पृष्ठ २३] निर्माण झाला होता. हॉटेन्टॉट नोकरांशी शेतकरी करत असलेलं क्रूर वर्तन व त्यांचे पगार अडवून ठेवायची त्यांची वृत्ती याबद्दल रीड यांनी लंडन सोसायटीला पाठवलेल्या अहवालात आरोप केलेले आहेत. परिणामी राज्यपालांना १८१२ साली नवीन सर्किट कोर्टाची स्थापना करावी लागली. बोअर त्यांना काळे कोर्ट म्हणायचे. त्यात ५० शेतकऱ्यांवर खटले चालवण्यात आले व त्यातील अनेकांना शिक्षाही झाल्या.

वसाहतीच्या कायद्यांतर्गत हॉटेन्टॉटवर एकाच जिल्ह्यात राहायचं बंधन होतं व त्या जिल्ह्यातून लेखी परवान्याशिवाय ज्याला पास म्हणत असत - त्यांना बाहेर जायची परवानगी नसायची. तसंच मालकाच्या शेतावर जन्मलेला गुलामाचा मुलगा आठ वर्षांपर्यंत तिथेच वाढल्यास त्याला पुढील दहा वर्ष तिथेच 'शिकाऊ उमेदवार' म्हणून काम करावं लागायचं. ही गोष्ट गुलामगिरीपेक्षा पाऊलभरच मागे होती. हॉटेन्टॉट लोकांचं स्वातंत्र्य कायम राखण्यासाठी कटिबद्ध असलेले डॉ. जॉन फिलिप यांनी लंडन सोसायटीला कडक शब्दात एक अहवाल पाठवला व त्यापाठोपाठ ते स्वतःही धर्मोपदेशक आणि पुरोगामी लोकांना परिस्थितीची जाणीव करून द्यायला तिथं गेले. १८२८ साली हॉटेन्टॉट चार्टर म्हणून ओळखला जाणारा एक अधिनियम पारित करण्यात आला. त्याद्वारे भेदभाव करणारे मागील सर्व आदेश रद्द करण्यात आले आणि हॉटेन्टॉटना युरोपिअन लोकांच्या बरोबरीचं स्थान देण्यात आलं. या अधिनियमाद्वारे गोरे आणि काळे यांना कायद्यासमोर समान लेखण्यात आलं. पंधराएक वर्षांनंतर जेव्हा केप कॉलनीला स्वराज्य देण्यात आलं तेव्हा या अधिनियमामुळे तिथल्या घटनेत रंगभेदाला कोणतंच स्थान मिळू शकलं नाही.

बोअर आणि ब्रिटिश यांच्यातील दरी वाढत वाढत ती अतिशय अगदी खोल व रुंद झाली होती. 'सर्व माणसं देवासमोर समान आणि सर्व माणसं कायद्यासमोर समान' ही जी दोन तत्त्वं ब्रिटिशांनी मान्य केलेली होती त्यामुळे बोअर वसाहतवाल्यांच्या दृष्टीतून 'देवाच्या शब्दाचा सरळ अधिक्षेप' करण्यात होत होता. [ॲलन पॅटन, *होप फॉर साऊथ आफ्रिका*, पाल माल प्रेस, लंडन, (१९५८), पृष्ठ २२] त्यांच्या दृष्टीतून याहूनही तिरस्करणीय गोष्ट होती गोऱ्यांच्या रक्तात काळ्यांचं रक्त मिसळण्याची. ते दिवस आता गेले होते जेव्हा कमांडरच्या संमतीनं सर्जन व्हॅन मीरहॉफ इव्हाशी लग्न करू शकत होते. अस्तित्वाच्या या संघर्षात गोऱ्या सीमासंरक्षकांचे आणि मूळ लोकांचे, जे संख्येनं किती तरी जास्त होते, संबंध कधीही न संपू शकणाऱ्या शत्रुत्वाचे झाले होते.

नुकतंच अशा काही घटना घडल्या होत्या की ज्यामुळे ही दरी अजूनच वाढली. १८१५ साली एका हॉटेन्टॉट नोकरानं स्लॅष्टर्स नेक येथील डच मालकाकडून मिळालेल्या वाईट

वर्तणुकीची तक्रार केली. नोकराशी क्रूरपणानं वागायच्या आरोपाखाली मालकाला न्यायालयात उपस्थित व्हायचे आदेश देण्यात आले. मालकानं ते नाकारले. त्यामुळे त्याला पकडून आणण्यासाठी युरोपिअन अधिकाऱ्याच्या हाताखाली हॉटेन्टॉट सैनिकांची तुकडी पाठवण्यात आली. त्यानं अटकेला विरोध केला व त्या प्रयत्नात तो मारला गेला. त्याच्या भावांनी आणि मित्रांनी बदला घ्यायची शपथ घेतली. त्यामुळे तिथं रक्तरंजित उठाव झाला. त्याला दडपण्यात आलं व चार्ल्स सॉमरसेट, केपचे टोरी पक्षाचे राज्यपाल यांनी टोळीतील पाच प्रमुखांना जाहीर रीतीनं फासावर लटकवण्याचा आदेश दिला. ब्रिटिश दडपशाहीचं कधीही न विसरता येण्यासारखं असं स्लॅष्टर्स नेक हे प्रतीक झालं.

यानंतर ब्रिटिश सरकारनं आफ्रिकानार डचच्या ठिकाणी हळूहळू इंग्रजी भाषा आणायच्या प्रयत्नाला सुरुवात केली. डचच्या ठिकाणी इंग्रजीचा कार्यालयीन भाषा म्हणून उपयोग होऊ लागला. ती बोअरांना समजत नव्हती. डच लँड्रॉट्सच्या ठिकाणी इंग्रज न्यायाधीश नेमण्यात आले व डच रिक्स डॉलरची जागा इंग्रजांच्या पौंडनं घेतली. यामुळे डचांच्या साचलेल्या रागात अजूनच भर पडली.

या सर्वांवर कहर केला गुलामांच्या मुक्ततेनं. विल्बरफोर्स यांनी आपल्या मृत्यूपूर्वी सुरू केलेल्या आंदोलनामुळे ब्रिटिश संसदेनं ब्रिटिश साम्राज्यातून गुलामगिरी नष्ट करणारा कायदा १८३३ साली पारित केला. त्यामुळे ८००,००० गुलामांची मुक्तता झाली. त्यातील २९,००० केपमधे होते. बोअरांच्या गणिताप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतील गुलामाच्या सुटकेमुळे नुकसान भरपाई २८,०००,००० पौंड होत होती परंतु ती १,२२५,००० पौंड एवढीच निश्चित करण्यात आली व तीही इंग्लंडमध्ये जाऊन सिद्ध करावी लागणार होती व तिथेच मिळणार होती. अनेक बोअर शेतकऱ्यांना ती मिळवण्यासाठी इंग्लंडला जाणं परवडणारं नव्हतं. सट्टेबाजांनी त्याच्या शेतांना भेटी दिल्या व नाममात्र किंमत देऊन त्यांनी ती नुकसानभरपाई विकत घेतली.

इंग्रज वसाहतवाल्यांसाठी गुलामगिरी फारशी लाभदायक नव्हती कारण ते बहुतांश व्यापारी होते. परंतु डच शेतकऱ्याच्या शेतीव्यवस्थेचा तो आधार होता. गुलामगिरी रद्द झाल्यामुळे

त्यांच्यावर कठोर आघात झाला. त्यामुळे पूर्वीच्या मालकात आणि नोकरात, गोऱ्यांत आणि काळ्यांत 'ईश्वराला मान्य नसलेली' समता मान्य करण्यात येत होती हे त्यांना त्याहूनही अधिक वाईट वाटायचं कारण होतं. गुलामांना मुक्त करायच्या कामाला 'लज्जाजनक आणि अन्याय्य कामकाज समजणाऱ्या' ॲना स्टीन्कम्प या व्हूरट्रेकर स्त्रीनं त्यासंबंधी लिहिलं : *आणि तरीही त्यांना मुक्त करण्यात आल्यामुळे आम्हांला या परिस्थितीत यावं लागलं म्हणून नाही तर ईश्वरी नियमाविरुद्ध त्यांना ख्रिश्चनांच्या समान लेखण्यात आल्यामुळे व वंश आणि रंग यांच्या नैसर्गिक भेदांमुळे कोणत्याही चांगल्या ख्रिश्चनाला या जोखडाखाली जुंपून घेणं आवडणार नाही. त्यामुळे आमच्या शुद्धतेच्या तत्त्वानुसार आम्ही येथून निघून जायचं ठरवलं आहे.'* [ॲलन पॅटन, *होप फॉर साऊथ आफ्रिका*, पाल माल प्रेस, लंडन, (१९५८), पृष्ठ २७]

बोअरांच्या हे सहनशक्तीपलीकडे चाललं होतं. त्यांनी या आधी जे केलं होतं तेच त्यांनी याही वेळी केलं. त्यांनी आपली शेती विकली, आपलं सर्व मूल्यवान सामान छताच्या गाड्यात भरलं आणि आपली गुरंढोरं आणि कोंबड्या वगैरे घेऊन व्हालच्या पलीकडे त्यांनी वाटचाल सुरू केली. फेब्रुवारी २, १८३७च्या जाहीरनाम्यात रेटीफ यांनी लिहिलं, 'आम्ही वसाहत सोडत आहोत. इंग्रज सरकारनं दिलेल्या संपूर्ण आश्वासनानुसार त्यांना यापुढे आमच्याशी काहीच कर्तव्य नसेल आणि भविष्यात कोणतीही ढवळाढवळ न करता ते आम्हांला आमचा कारभार पाहू देतील.' परदेशात वस्ती करायला जात असलेली ही माणसं 'ईश्वरावर पूर्ण भार टाकून जंगली आणि धोकादायक प्रदेशात प्रवेश करत आहेत' [लिओ मार्कर्ड, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका,* पृष्ठ १२५] असं जाहीरनाम्याच्या अखेरीस लिहिण्यात आलं होतं. १८३५ ते १८४० च्या दरम्यान त्यांच्यातील ६,००० लोकांनी तो भाग सोडला. त्यातच एक दहा वर्षांचा मुलगा होता पॉल क्रुगर. त्यानं ६३ वर्षांनंतर इंग्रज - बोअर युद्धात बोअरांचं नेतृत्व केलं.

## ४

पूर्वीचे ट्रेकबोअर उत्तरेकडे स्थलांतर करत असत तर दुसरा काळ्या लोकांच्या स्थलांतरितांचा जथ्था, ज्यांच्या धमन्यातून आशियातील लोकांचं रक्त वाहत होतं, उत्तरेकडून दक्षिणेकडे प्रवास करत होता. ते बांटू भाषिक लोक होते. त्यांना त्यांच्या मुळच्या पूर्व आफ्रिकेतील पर्वतीय प्रदेशाच्या मायभूमीतून हुसकावून लावण्यात आलं होतं. ३०० वर्षांच्या गुलामांच्या व्यापाराच्या काळात गुलाम पकडण्यासाठी लूटमार करणाऱ्या लोकांनी आफ्रिकेच्या केवळ पश्चिम किनाऱ्यावरून १ कोटी २० लाख लोकांना पकडून अमेरिकेत आणि वेस्ट इंडीजमधे नेलं होत. त्यामुळे तिथल्या लोकांनी दक्षिणेकडे आणि अजून दक्षिणेकडे सामूहिक स्थलांतराला सुरुवात केली.

बांटू या शब्दाचा अर्थ आहे 'माणसं वा मानव प्राणी, केवळ मूक प्राणी नाही.' पूर्व आफ्रिकेतील अरब त्यांना म्हणत असत. काफीर म्हणजे नास्तिक वा महम्मदावर श्रद्धा नसलेले. त्यानंतर काही काळानं युरोपिअन लोक आफ्रिकेतील सर्व लोकांना काफीर म्हणू लागले. जिथे युरोपिअन लोकांशी त्यांची पहिली भेट झाली होती तो काफीरलँड वा आजचा काफ्रारिया प्रदेश आहे. 'काफीर', 'बांटू', 'नेटिव्ह' आणि 'निग्रो' ह्या शब्दांचा आफ्रिकेतील काळ्या लोकांच्या वंशजांसाठी उपयोग करणं आज त्यांना अपमानास्पद वाटतं. आधुनिक बांटू लोकांना आफ्रिकन म्हणवून घेणं आवडतं. परंतु हे विसरता येत नाही की ह्या शब्दांचा उपयोग ते स्वतःसाठी आणि इतरांना संबोधण्यासाठी आताआतापर्यंत करत असत. यातील काही शब्दांचा अंतर्भाव शासकीय परिभाषेत करण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ 'नेटिव्ह रिझर्वज', 'डिपार्टमेंट ऑफ नेटिव्ह अफेअर्स', 'कॅफ्रारिया', 'काफीर गोल्ड' इत्यादी शब्दात तसा उपयोग झाला असल्याचं आपल्याला आढळतं. जेव्हा एखाद्या माणसाला सविस्तर वर्णन करायचं असतं वा ऐतिहासिक उल्लेख करायचा असतो तेव्हा या शब्दांचा उपयोग करणं अपरिहार्य ठरतं.

बांटू दोन गटात विभागले गेले आहेत - झुलू-झोसा आणि बासुटो-बेछुआना. यातील प्रत्येक गटही लहानलहान विभागात आणि उपविभागात - जाती आणि जमातीत - विभागला

गेला आहे जसे की मेटाबेले, मशोना, पॉन्डो, टेम्बू इ. इ. बासुटो-बेछुआनात बा आणि बेचा अर्थ पुन्हा माणसं असाच होतो. अधिक सुसंस्कृत बेछुआना आणि बासुटो आज स्वतःला त्सवाना वा सोथो म्हणवून घेतात.

अठराव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांच्यातील सर्वात महत्त्वाची झोसा-झुलू जमात दक्षिण आफ्रिकेच्या पूर्व भागातील अगदी दक्षिणेकडे म्हणजे जिथं सध्याचं एलिझाबेथ बंदर आहे तिथं वसली. त्या भागाला त्यांच्यावरून काफ्रिआना हे नाव पडलं आहे. आमा झुलू म्हणजे 'स्वर्गातील लोक' नाताळमधे स्थायी झाले.

आमा झोसा अजून दक्षिणेकडे गेले व केप प्रांतात पसरले. गोऱ्या वसाहतवाल्यांना पाहून पळणाऱ्या हॉटेन्टॉट लोकांशी तिथं त्यांचा संपर्क झाला. हॉटेन्टॉट रक्तासोबतच त्यांच्या भाषेत 'क्लिक' भाषेचा समावेश झाला.

पूर्व केपमधे काळे आणि गोरे यांची भेट झाल्यानंतर तिथं 'काफीर युद्धा'च्या मालिकेची सुरुवात झाली. ते युद्ध १०० वर्षं चाललं. त्याची सुरुवात व्हायचं कारण होतं टेम्बूंच्या सर्वात प्रमुख पुढाऱ्याचा झोसांच्या सर्वात प्रमुख पुढाऱ्यानं केलेला अपमान. झोसांच्या सर्वात प्रमुख पुढाऱ्यानं आपल्या मुलीसाठी केवळ १०० गुरं लोबोला म्हणून टेम्बूंच्या सर्वात प्रमुख पुढाऱ्याला देऊ केला होता. लोबोलां म्हणजे उलट पद्धतीचा हुंडा. मुलीसाठी गुरांच्या स्वरूपात तो एक प्रकारचा विमा असायचा. वरपक्षाच्या लोकांनी वधूच्या आईवडिलांना दिलेलं ते एकप्रकारचं वधूमूल्य असते. ज्या जमातीची वधू असते त्या जमातीची प्रतिष्ठा किती आहे यावर लोबोला किती द्यायचा हे अवलंबून असायचं.

या शंभर वर्षातील प्रमुख घटना म्हणजे झुलूंचा प्रमुख चाका याच्या सामर्थ्यात झालेली दर्शनीय वाढ. त्याच्या विलक्षण सैनिकी कौशल्यामुळे आणि मोठेपणा आणि रक्त यांची त्याला जी तहान लागलेली होती त्यामुळे काही वेळा झुलूंचा नेपोलिअन म्हणून तो ओळखला जात असे.

उत्तम गीतकार, उत्कृष्ट नर्तक आणि हजर जबाबी कोटीबाजपणा यासाठी प्रसिद्ध असलेला चाका अतिशय भावनाशील माणूस होता. त्याच्यात प्रचंड सहनशीलता होती. नोंद असलेल्या वाटचालीतील सर्वात कठीण वाटचाल त्यानं केलेली होती. त्याला त्याच्या आईच्या आजाराची बातमी कळताच बरीच सायंकाळ झालेली असूही तो पायीच तिच्या भेटीसाठी निघाला. साठ मैल अंतरावरील क्राल येथे (आदिवासींचे खेडे) तो दुसऱ्या दिवशी दुपारी पोहोचला. प्रवासात त्याला मार्गातील एकामागून एक पर्वत आणि खोल दऱ्या ओलांडाव्या लागल्या. रात्रीच्या काळोखात त्यानं काटेरी झुडपाच्या व जवळपास वाट नसलेल्या प्रदेशातून मार्ग काढला. त्याच्यासोबत असलेला गोरा डॉक्टर फिन घोड्यावर बसलेला असूनही मोठ्या मुश्किलीनं त्याच्याबरोबर राहू शकत असे.

त्याची आई जेव्हा वारली तेव्हा झुलूप्रदेशातील सर्वात सुंदर १० मुलींचं तिच्याबरोबर दफन करण्यात आलं. लांब ढालीसह ६०,००० योद्धे, १००,००० हंबरत असलेली गुरं शोकस्थळी आणण्यात आली होती. शोक म्हणून प्रमुखाच्या आज्ञेनं अनेक लोकांना जागेवरच ठार मारण्यात आलं. त्यानंतर उन्मादात किंकाळ्या, नृत्य आणि लयबद्ध गाण्यांना सुरुवात झाली. त्याबरोबरच मनमानेल त्याप्रमाणे कत्तल सुरू झाली. तिच्यात ७,००० लोक मरण पावले. 'तीन हजार म्हाताऱ्या बायांच्या मुलांना मातृवियोगाचं दुखं होऊन चाकाच्या दुःखात सहभागी होता यावं म्हणून मारण्यात आलं. आईच्या मरणाचं दुःख काय असतं ते वासरांनाही कळावं म्हणून ३००० गाई मारण्यात आल्या.' एक वर्ष कोणतीच लागवड करायची परवानगी नव्हती. कुणालाही काम करायची, भांडायची, गायची, नाचायची व मुलांना जन्म द्यायचीही परवानगी नव्हती. कुणीही दूध वापरायचं नव्हतं व काढलेलं दूध तसंच जमिनीवर सांडवायचं होतं. त्यानंतर एक वर्षभर कुणाही स्त्रीजवळ मूल आढळलं तर तिला तिच्या नवऱ्यासह पुरण्यात येत असे. [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २८ आणि ई. ए. रिटर, शाका झुलू, *द राईझ ऑफ द झुलू एम्पायर*, लॉगमन्स ग्रीन अँड कंपनी, लंडन, पृष्ठ ३१३] १२००० योद्ध्यांना स्मशानभूमीवर एक वर्षासठी लक्ष ठेवण्यासाठी नेमण्यात आलं व त्यांच्या उपयोगासाठी १५,००० गुरं वेगळी ठेवण्यात आली. तीन महिन्यांच्या शोककाळानंतर शेतात तण अतिशय माजलं व त्यामुळे देशात मोठा दुष्काळ पसरला.

चाकानं आपल्या सैन्याची रचना इम्पिस वा तुकड्यांमध्ये केली व सैन्याला कडक शिस्तीचं पालन करायला शिकवलं. चांगल्या प्रकारच्या रणगीतांचं स्वप्न पाहता यावं म्हणून त्याच्या काळातील गीतकारांना आंधळं करण्यात आलं तसंच म्हाताऱ्या आणि निरुपयोगी माणसांना मारून टाकण्यात आलं. असं सांगतात की त्याचा दरारा एवढा मोठा होता की त्याच्या आदेशावर 'संपूर्ण पलटण.... दरीत वा समुद्रात चालत जाऊ शकत असे.' [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २७] त्याच्या मागील दोन मोहिमेत ज्या सैनिकांनी चांगली कामगिरी केली नव्हती त्या हजारो सैनिकांना जमलेल्या सर्व लोकांसमोर 'भेकडांना' धडा शिकवण्यासाठी त्यानं मारून टाकलं. जे त्या भेकडांसाठी रडले त्यांना टिपून काढण्यात आलं व त्यांचीही तीच गत करण्यात आली. यानंतर अपयशी योद्धे परत येऊन 'अशा रीतीनं मरण्यापेक्षा युद्धात मरण पत्करणं पसंत करत असत.' [बी. एल. ब्रेट, बी. ए., *मेकर्स ऑफ साऊथ आफ्रिका*, थॉमस नेल्सन अँड सन्स लिमिटेड, लंडन, पृष्ठ २३-२४]

दहा वर्षांच्या अल्पावधीत चाकानं झुलूंच्या नगण्य जमातीला वर उचलून शक्तिशाली बनवलं व सर्वांना दहशत वाटावी अशा राष्ट्रात तिचं परिवर्तन घडवून आणलं. आज आपण ज्याला नाताळ वा झुलूलँड म्हणून ओळखतो त्या भागातील सर्व देश त्यानं जिंकले आणि त्यांचा विध्वंस केला. त्यानं आपल्या भयानक युद्धात जवळपास १०० जमातींचा संपूर्ण वा जवळपास नाश केला. त्यातून वाचलेल्यांना सापडेल त्या दिशेला निर्वासित म्हणून पळ काढत जावं लागलं. संपूर्ण जमातीच्या जमाती व त्यांचे नायक त्याच्या धाकानं पळून जात असत. त्यांच्यातील एक, मोझेलीकाट्झ पराभूत झाल्यानंतर निम्मे राष्ट्र जिंकत ड्रेकेन्सबर्ग पर्वतापलीकडे पळून गेला. त्यानं जिंकलेल्या लोकांना तो आपल्यात सामावून घेत असे व अशा लोकांनाही स्वतःला मेटॅबेले म्हणवून घेण्यात अभिमान वाटत असे. मेटॅबेले म्हणजे लांब ढालवाले. ही ढाल संपूर्ण शरीराला झाकण्याएवढी लांब असायची. त्यानं ती चाकाच्या धर्तीवर बनवली होती व चाकाला त्याचे संरक्षक आणि मानलेले वडील डिंगास्वायो यांच्याकडून ती मिळाली होती. त्यांनी तिचा आणि लहान भाल्याचा शोध जवळून होणाऱ्या लढाईसाठी लावला होता. पळणारे लोकही संधी मिळताच पळताना मारत आणि जिंकत वा पराभूत होत व मरतामारता पळत जात असत.

जवळपास २० लाख लोक मरेपर्यंत असं सुरू होतं असं सांगतात. त्याच्या स्वतःच्या नावाचा अर्थ होता रक्तरंजित मार्ग. त्याच्या सार्वत्रिक युद्धामुळे आणि विध्वंसामुळे भयानक दुष्काळ पडले. अनेकजण नरमांसभक्षक झाले.

बाट्लोक्वा राणी मान्टात्शीनं चाकाच्याच मार्गाचं अधिक चांगलं अनुकरण केलं. तिनं बेछुआना लोकांचं तेच केलं जे चाकानं झुलूंचं केलं. तिच्या सैन्यानं एकामागून एका जमातीचा नाश करणं तोपर्यंत चालू ठेवलं जोपर्यंत नाश करायला कोणतीच जमात शिल्लक उरली नव्हती. 'त्याचप्रमाणे त्यांच्यासाठी जेव्हा खायलाही काहीच उरलं नाही... तेव्हा ते परस्परांना खाऊ लागले.' [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २९]

मांटातींच्या, मान्टात्शीच्या लोकांना लोक याच नावानं संबोधले जायचे, शक्तीला पायबंद तेव्हा बसला जेव्हा त्यांची गाठ ग्रिकॉजशी, मोफॅट मिशनरींच्या पाल्यांशी पडली. प्रसिद्ध संशोधक डॉ. लिव्हिंगस्टन यांचे ते सासरे होते. मांटाती १५,००० होते तर ग्रिकॉज केवळ १५० होते. परंतु त्यांच्याजवळ बंदुका होत्या. ग्रिकॉजच्या गोळ्यांनी मांटातींची कत्तल केली.

आजचं प्रिटोरिया जिथं आहे तिथं मोझेलीकाट्झनं आपलं क्राल ट्रान्सवालमध्ये वसवलं होतं. व्हूरट्रेकरांच्या एका नेत्यानं, अॅड्रिस प्रिटोरिसनं, हाकलून लावल्यानंतर तो अजून उत्तरेकडे गेला, मॅशोना व इतर जमातींचा पराभव केला व सरतेशेवटी जिला मेटॅबेलेलँड म्हणतात तिथं त्यानं स्वतःचं बस्तान बसवलं आणि बुलावयो (म्हणजे कवट्यांचं ठिकाण) या ठिकाणी आपली राजधानी स्थापिली. ते राज्य ऱ्होड्सनं त्याचा मुलगा लोबेनगुलापासून जिंकलं व त्याला ऱ्होडेशिया हे नाव ठेवलं.

चाका आणि मोझेलीकाट्झच्या मुलांनी कीर्तीच्या मोहानं सर्व जमातींना खाल्लं, दहा लाखापेक्षा अधिक लोकांच्या रक्तानं आपल्या भाल्यांना न्हाऊ घातलं आणि नाताळ आणि ट्रान्सवालमधील संपूर्ण प्रदेशात दुष्काळ आणि उध्वस्ततेची परिस्थिती निर्माण केली. सारा गरट्रूड यांच्या शब्दात, 'सर्व काळे लोक एकेकाळी एकमेकांचे शत्रू वा मित्र होते. ते आज गोऱ्या लोकांवर हल्ला करणारे आहेत, त्यांचे नोकर आहेत, त्यांच्यासाठी धोकादायक व्यक्ती आहेत,

त्यांच्या आश्रयाखाली राहणारे आहेत व त्यांच्या अन्यायाचे बळीही आहेत.’ [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २६१] मृत्यूला आव्हान देणारे ते योद्धे प्रतिष्ठा आणि मोठेपणाच्या पायी आपल्याच रानटीपणाच्या आगीत, जिचा जमातवादाच्या वाऱ्यानं अजूनच भडका उडवला, भस्मसात झाले. चाकानं त्याच्या वडिलांची आणि त्याच्याशी शत्रुत्व करणाऱ्या दोन सावत्र भावांची व अखेरीस डिंगिसवायोची हत्त्या केली. त्याचा स्वतःचाही खून त्याच्या सावत्र भावानं, डिंगाननं केला व डिंगानचा खून बोअरांच्या मदतीनं त्याच्या सावत्र भावानं केला. झुलू आपल्याच राष्ट्रातून निसटायचा सतत प्रयत्न करत असत कारण ‘मुलगा बापाला घाबरायचा, भाऊ भावाला घाबरायचा, वा लहान नायक मोठ्या नायकाला घाबरायचा.’ [सारा गरटूड मिलान, *साऊथ आफ्रिका*, वुइल्यम कॉलिन्स ऑफ लंडन, (१९४१) पृष्ठ १५] मोझेलीकाट्झनं आपल्या शत्रूंचा नाश केल्यानंतर आपल्या मुलांनाही मारून टाकलं. त्याच्यानंतर सत्तेवर आलेल्या लोबेनगुलानंही ‘शत्रूंना खायची आणि मित्रांना मारायची प्रक्रिया कायम ठेवली.’ [सारा गरटूड मिलान, साऊथ आफ्रिका, वुइल्यम कॉलिन्स ऑफ लंडन, (१९४१) पृष्ठ १६] जोपर्यंत त्या भागातील झुलूंच्या सत्तेचा ऱ्हास झाला नाही, त्यांची संख्या घटली नाही तोपर्यंत ही प्रक्रिया कायम राहिली व त्यानंतर निर्माण झालेल्या पोकळीत गोऱ्यांना फक्त पाऊल ठेवायचंच काम होतं.

## ५

व्हूरट्रेकरांनी अंगावर घेतलेलं काम दीर्घकालीन आणि अडचणींनी भरलेलं होतं. त्यांना अतिशय अडचणीच्या आणि घनदाट जंगलातून तसंच नद्या आणि पर्वतातून मार्ग काढावा लागणार होता. रविवार सोडला तर ते दररोज सहा मैल अंतर कापायचे. ‘आठवड्यातील नेमका कोणता दिवस कधी आहे हे त्यांना निश्चित माहीत नसलं तरी’ रविवारी ते प्रवास करत नसत. [लिओ मार्कर्ड, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ १२८] अनेकदा त्यांना वन्य प्राण्यांशी व स्थानिक जमातींशी लढावं लागायचं. ती दीर्घ वाटचाल संपेपर्यंत ६००० सिंह मारण्यात आले होते. त्यातील २०० एकट्या पॉल क्रुगर यांनी मारले होते. [जॉन क्लर्क रिडपाथ एल.एल.डी. आणि एडवर्ड एस. एलिस, *द स्टोरी ऑफ साऊथ*

*आफ्रिका*, वुइल्यम वॅटसन अँड कंपनी, लंडन (१८९९), पृष्ठ २११] आफ्रिकेतील लोक भयंकर योद्धे होते. परंतु त्यांची शस्त्र जिथं ५० फूटांपर्यंतच मारा करू शकत होती तिथं बोअरांची शस्त्र त्याच्या दुप्पट अंतरावरून मारा करू शकत असत.

ऑरेंज नदीच्या पलीकडे आणि ड्रेकन्सबर्गला ओलांडून नाताळचा प्रदेश येईपर्यंत ते वाटचाल करत राहिले. झुलूलँडमधे चाकाचा सावत्र भाऊ डिंगान, ज्याला लोक 'गिधाड', 'पक्षीभक्षक' म्हणायचे, राज्य करत होता. पिटर रेटिफ डिंगानला भेटला. स्थलांतर करणाऱ्यानी चोरलेली गुरं जर परत केली तर त्याना वसाहत करण्यायोग्य जमीन द्यायला डिंगान तयार झाला. रेटीफनं आरोप अमान्य केला, चोरीस गेलेली गुरं त्यानं परत आणून दिली आणि सांगितलं की शेजारच्या जमातीच्या प्रमुखानं ती चोरून नेली होती. गुरं परत केल्यामुळे डिंगाननं कबूल केलेली जमीन मागायला तो डिंगानच्या क्रालमधे गेला. मधल्या वेळात रेटिफचे व्हूरट्रेकर डिंगानच्या परवानगीची वाट न पाहता नाताळमध्ये शिरले. 'चालती-फिरती घरं असलेल्या' (बैलांच्या पाठीवरील घरं), 'शिंग नसलेली गुरं' (घोडे) बाळगणाऱ्या, व 'गोळी झाडणाऱ्या काठ्या' हातात असलेल्या हजारो बोअर लोकांना आपल्या जमिनीवर आक्रमण करताना पाहून डिंगान घाबरला व त्यानं या 'चेटूक करणारांना मारून टाकायचा' हुकूम आपल्या लोकांना दिला. रेटीफ आणि त्याची माणसं मारली गेली व ५०० बोअर बाया-माणसं आणि मुलं यांची कत्तल झाली. अकरा महिन्यानंतर अँड्रिस प्रिटोरियस या नवीन नेत्याच्या नेतृत्वाखाली, ज्यानं आपल्या सोबत एक तोफ आणली होती, बोअरांनी झुलूंशी पुन्हा लढाई केली व तीन हजार झुलूंची कत्तल करून रक्ताची नदी वाहवत झुलूंना पराभूत केलं. यात फक्त तीन बोअर जखमी झाले.

एका इंग्रजानं चाकाच्या आजारात त्याच्यावर यशस्वी उपचार केल्यामुळे चाका उपकृत झालेला होता. त्या उपकारातून उतराई होण्याकरिता चाकानं दिलेल्या निमंत्रणावरून नाताळमधे १८२४पासूनच इंग्रजांनी वसाहत केलेली होती. त्यानं इंग्रजांना तो भाग आपल्या ताब्यात घ्यायची विनंती केली. पण इंग्रजांनी ती विनंती मान्य केली नाही. त्यांनी बोअर लोकांना आपल्याबरोबर वसाहत स्थापन करायची विनंती केली. परंतु बोअरांना वाटलं की स्वतंत्र

वसाहत स्थापण्यासाठी आपली संख्या पुरेशी आहे. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या गणराज्याची स्थापना केली व त्याची राजधानी पिटरमारिट्झबर्ग केली. या शहराचं नाव पिटर रेटीफ आणि मार्टिझ या दोन व्हूरट्रेकरांच्या स्मृतीवरून ठेवलं होतं.

बोअर लोकांना आशा वाटत होती की त्यांनी ब्रिटिशांचं संरक्षण नाकारल्यानंतर ब्रिटिश सरकार त्यांना मोकळं सोडेल. कमीतकमी नाताळच्या भागात कोणत्याही प्रकारच्या हस्तक्षेपाशिवाय आपल्याला निश्चिंत जीवन जगता येईल. परंतु त्यांची ही आशा अल्पजीवी ठरली. सीमेवरील जमातींना त्यांनी जेव्हा हुसकावून लावलं आणि त्यांनी मारलेल्या लोकांच्या मुलांना त्यांनी जेव्हा 'शिकाऊ उमेदवार' करण्यासाठी पकडून आणलं तेव्हा ब्रिटिशांनी हस्तक्षेप केला व बोअरांच्या विनंतीनुसार त्यांचं स्वातंत्र्य मान्य करायला नकार दिला. १८३८च्या केप ऑफ गुड होप पनिशमेंट कायद्यान्वये 'एकदा ब्रिटिश नागरिक झाला की कायम ब्रिटिश नागरिक' या तत्त्वानुसार त्यांनी घोषित केलं की ब्रिटनचा एकदा नागरिक झालेला माणूस स्थलांतर करून कितीही लांबवर गेला तरी तो ब्रिटनचाच नागरिक राहतो. महाराणी आपल्याच प्रजेचं स्वातंत्र्य मान्य करू शकत नाही. १८४५ साली ज्यांनी आपल्या नेटिव्ह धर्मांतरितांसाठी संरक्षणाची मागणी करणाऱ्या मिशनऱ्यांच्या आग्रहामुळे, आणि बोअर गणराज्यात मिळत असलेल्या वाईट वर्तणुकीची व्यापाऱ्यांनी केलेल्या तक्रारीमुळे ब्रिटिशांनी नाताळ ताब्यात घेतला.

व्हूरट्रेकर्सनी पुन्हा आपली घरं सोडली, पुन्हा ऑरेंज नदी ओलांडली व सध्याच्या ऑरेंज फ्री स्टेटच्या सीमेत मुक्काम ठोकला व आपल्या व्होल्कराडची स्थापना ब्लूमफाउंटेन येथे केली.

तिथंसुद्धा ब्रिटिशांचा लांब हात पोहोचलाच. व्हूरट्रेकर नाताळमधील आपल्या गणराज्यात 'नेटिव्हांशी' अरेरावीचं वर्तन करतात या कारणास्तव ब्रिटिश त्यांच्या कारभारात हस्तक्षेप करताना मागेपुढे पाहत नसत. परंतु तेच ब्रिटिश 'नेटिव्हांच्या' हक्कांना अगदी तुच्छ लेखत असत. एकेकाळी भारतातील ब्रिटिश सैन्याचे डेप्युटी ॲडज्युकंट जनरल असलेले, ग्वाल्हेरच्या लढाईतील कामगिरीमुळे नाईट कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ बाथ ही पदवी मिळालेले व पहिल्या शीख युद्धात (१८४५-४६) अलिवाल येथे शिखांच्या ६६ तोफा काबीज

केल्यामुळे नावाजल्या गेलेले सर हॅरी स्मिथ यांना १८४७च्या अखेरीस केपच्या राज्यपालपदी नेमण्यात आलं होतं. दक्षिण आफ्रिकेत पाय ठेवल्यानंतर काही दिवसातच त्यांनी काफीरांच्या भूमीतील दोन प्रदेश आपल्या प्रांताला जोडले. त्यांना पूर्व व्हिक्टोरिया आणि ब्रिटिश काफ्रारिया ही नावं देण्यात आली. आपली घोषणा व अटी ऐकवण्यासाठी त्यांनी जेव्हा जमातींच्या प्रमुखांना बोलावलं तेव्हा त्यांनी गाडी भरून बारूद सोबत नेली व जमात प्रमुखावर 'प्रभाव' पाडण्यासाठी त्यांनी तिचा स्फोट केला. त्यावेळी जुने करार फाडून वाऱ्यावर उधळत जमातप्रमुखांना ते म्हणाले, 'हे तुमचे करार ! यापुढे करार वगैरे काही नाही.' [हेन्री गिब्ज, *बॅकग्राऊंड टू बिटरनेस*, फ्रेड्रिक मुलर लि. लंडन, (१९५४), पृष्ठ ८३] तीन महिन्यांनंतर केपटाऊनला ते जेव्हा गेले तेव्हा व्हूरट्रेकर व 'नेटिव्ह' यांच्यातील सीमेवरील तणावाचा फायदा घेत डच शेतकरी बूमप्लाट्सचा त्यांनी पराभव केला आणि 'आरेंज, व्हाल आणि ड्रेकन्सबर्ग पर्वत या भागात राहणाऱ्या सर्व वंशांवरील, वर्णावरील आणि धर्मावरील ब्रिटिशांच्या सर्वोच्चतेची व अधिकाराची' त्यांनी घोषणा केली. [हेन्री गिब्ज, *बॅकग्राऊंड टू बिटरनेस*, फ्रेड्रिक मुलर लि. लंडन, (१९५४), पृष्ठ ८३]

व्हूरट्रेकरांच्या एका वर्गानं या बदलाशी जुळवून घेतलं. परंतु बहुसंख्य व्हूरट्रेकर तसं करू शकले नाहीत. ज्या लोकांना ऑरेंज नदीच्या प्रदेशातील ब्रिटिश सार्वभौम सत्तेत राहणं मान्य नव्हतं त्यांनी त्यांच्या नेत्याचं, अँड्रिस प्रिटोरियसचं अनुकरण करत 'व्हाल नदी ओलांडून झाम्बेसीच्या पलीकडे वाटचाल करायचा निर्धार केला.' [सारा गरट्रूड मिलान, **द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका**, पृष्ठ ३५] तिथल्या गवताळ प्रदेशात त्यांनी आपला मुक्काम ठोकला व दक्षिण आफ्रिका गणराज्याची स्थापना केली.

ज्या लोकांनी केपटाऊनपासून तर ट्रान्सवालपर्यंतची जवळपास १००० मैलांची वाट तुडवली होती त्यांना नियंत्रणात ठेवण्यातील अडचण ब्रिटिशांच्या लक्षात आली. थकून अखेरीस त्यांनी त्यांचा नाद सोडला. आपल्याच घरातील राजकीय बदलांनी अशा लोकांच्या हाती सत्ता आली होती की ज्यांना वसाहती लाभदायक वाटत नव्हत्या. १८५२ साली सँड रिव्हर कन्व्हेन्शनमध्ये त्यांनी नवीन ट्रान्सवाल गणराज्याच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली. ट्रेकर्सनी

आपल्या बाजूनं गुलामगिरीला मान्यता न द्यायला कबुली दिली. १८५४ साली ब्लोमफाँटेन कन्व्हेन्शननं तेच काम ऑरेंज नदी आणि व्हालमधील बोअरांसाठी केलं. अखेरीस ते महान स्थलांतर एकदाचं थांबलं.

१८५६ साली नाताळ ही ब्रिटिशांची वसाहत झाली व सुरुवातीला तरी तिथं मताधिकार वर्णावर आधारित नव्हता.

अशा रीतीनं तिथं ब्रिटिशांचे दोन प्रांत झाले. केप कॉलनी आणि नाताळमधे रंगभेदाशिवाय मतदानाचा अधिकार होता तर ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट या दोन डच गणराज्यांच्या घटनेत 'राज्यात वा चर्चमध्ये समता मानली जाणार नाही' म्हणून नमूद करण्यात आलेलं होतं.

महान स्थलांतर संपल्यानंतर बोअर आणि ब्रिटिशांमधील संबंधात सुधारणा व्हायला सुरुवात झाली. त्यात अजूनही सुधारणा झाली असती परंतु हिऱ्यांचा आणि त्या पाठोपाठ सोन्याचा जो शोध लागला त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा इतिहासच बदलून गेला.

## ६

१८६७ साली ओरिली नावाचा एक शिकारी आणि शाल्क व्हॅन निकरेक हा शेतकरी या दोघांना काही मुलं संगमरवरी दगडाच्या गोट्यांनी खेळत असल्याचं दिसलं. ते खेळत असलेल्या गोट्यातील एक गोटी पांढऱ्या चमचमणाऱ्या दगडाची होती. त्यांनी जेव्हा त्या गोटीचं कौतुक केलं तेव्हा त्या मुलांच्या आईनं ती गोटी त्यांना आनंदानं दिली. ती गोटी त्यांनी खनिजशास्त्रज्ञाकडे पाठवली. तेव्हा ती गोटी अडीच कॅरटचा ५०० पौंडाचा हिरा असल्याचं आढळून आलं. दोन वर्षांनंतर निकरेकला आफ्रिकेतील चेटकिणीचा एक डॉक्टर भेटला. तो एका दगडाचा जादूटोण्यासारखा उपयोग करत होता. निकरेकनं आपली संपूर्ण संपत्ती म्हणजे ५०० शेळ्या, १० बैल आणि एक घोडा देऊन तो मिळवला. तो प्रसिद्ध हिरा 'स्टार ऑफ साऊथ आफ्रिका' निघाला. आधी तो ११,००० पौंडला विकला गेला व अखेरीस त्याची किंमत २५,००० पौंड आली. त्यानंतरच्या वर्षी किम्बर्ली व नंतर व्हॉल येथे हिरे सापडले. आधी वरवरच्या उत्खननात व नंतर

ज्वालामुखीच्या विवरात खोलवर केलेल्या उत्खननात निळसर छटा असलेले हिरे मिळाले. 'किम्बर्लाईट वा निळसर छटा असलेले' हिरे म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. तशा प्रकारचे कोटीकोटी पौंडांचे हिरे तिथं मिळाले. १८७१पर्यंत ३००,००० पौंडचे हिरे एकट्या डिगिंग्ज नदीतूनच काढण्यात आले.

तरीही काही तज्ज्ञ असे होते की ज्यांनी दोन हिरे 'नकली' असल्याचं घोषित केलं. त्यातील ग्रेगरी नावाच्या तज्ज्ञानं घोषित केलं की दक्षिण आफ्रिकेत हिऱ्यांच्या खाणी असलेली भूमीच नाही त्यामुळे दक्षिण आफ्रिकेत ग्रेगरीचा अर्थ घोडचूक असा झाला आहे.

आज जो भाग ग्रिकॉलँड वेस्ट म्हणून ओळखला जातो त्या भागात हिऱ्यांच्या खाणी आहेत. ग्रिकाँ लोकांचा एक प्रमुख, वाटरबोअर व ट्रान्सवाल गणराज्य हे तिघंही त्यावर आपला अधिकार सांगत होते. केप कॉलनीनं तशा कोणत्याच अधिकाराचा दावा केला नाही परंतु 'कायदा आणि सुव्यवस्थेच्या नियमांतर्गत' हा प्रदेश शासनानं ताब्यात घ्यावा असं त्यांनी ब्रिटिश सरकारला सांगितलं. हक्काचा दावा करणाऱ्या तिघांमधून ऑरेंज फ्री स्टेटचा त्यावर बहुधा सर्वात जास्त अधिकार पोहोचत असावा. केपच्या राज्यपालाकडे ही समस्या सोडवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यांनी वाटरबोअर आणि ट्रान्सवाल सरकारची लवाद मान्य करण्यासाठी समजूत घातली. नाताळचे लेफ्टनंट गव्हर्नर कीट्स ह्यांचा निर्णय अंतिम राहणार होता. त्यांनी आपला निर्णय ती भूमी ब्रिटिश सरकारनं हस्तगत करावी अशी मागणी करणाऱ्या वाटरबोअरकडून दिला. १८७१ साली संपूर्ण ग्रिकॉलँड ब्रिटिश साम्राज्याचा भाग असल्याचं घोषित करण्यात आलं.

ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट या दोघांनाही त्यातील बनवाबनवी जाणवल्यानं ते अतिशय चिडलेले होते, परंतु ते करू काहीच शकत नव्हते. १८७६ साली पुढील चौकशीनंतर ऑरेंज फ्री स्टेटला नुकसान भरपाई म्हणून इंग्लंडनं ९०,००० पौंड देऊ केले. त्यामुळे इंग्लंडचीच बाजू चुकीची असल्याचं दिसून आलं. ऑरेंज फ्री स्टेट सरकारनं ती स्वीकारून दुसरी चूक केली. इंग्लंडनं आपली 'हिऱ्याच्या खाणीची भूमी चोरली अशी भावना दोन्ही बोअर गणराज्यांची झाली.'

केवळ उचलायची वाट पाहत असलेल्या भूमीखालील कल्पनातीत संपत्तीमुळे हिऱ्यांच्या खाणींकडे लोकांचा प्रवाह सुरू झाला. हिरे असलेल्या भागात जमिनीच्या किमती आकाशाला भिडल्या. बोअरांनी फुकट देणगी म्हणूनच मिळवलेल्या जमिनीची सट्टेबाजी करणारे लोक ६,००० पौंड किंमत देऊ लागले व तिचेच त्यांना एका वर्षानंतर १००,००० पौंड मिळू लागले.

त्यानंतर सुरू झाला सोन्याच्या खाणींकडे ओघ. ज्या वर्षी शाल्क व्हॅन निकरेकला पहिला हिरा सापडला होता त्याच वर्षी पिटर जॅकोबस मॉरिस हा बोअर माणूस एकटाच मौल्यवान धातूच्या खाणी शोधायला निघाला होता. त्याच्या हाती खडकाचा एक तुकडा पडला. तो घेऊन तो तडक डच लोकांच्या संसदेत म्हणजे व्होल्कराडला गेला. तिथं त्याचं 'जोरदार घोषणा करून स्वागत करण्यात आलं व ही गोष्ट कुणालाही सांगायची नाही अशी शपथ त्याला घालण्यात आली व शपथभंग केल्यास मृत्युदंडाची शिक्षा ठरवण्यात आली.' [एफ. अॅडिंग्टन सिमन्ड, *द जोहान्सबर्ग स्टोरी,* फ्रेड्रिक मुलर लि. लंडन, (१९५३), पृष्ठ १२] सोन्याच्या खाणीचा पैसाचपैसा दिसत असल्यामुळे बोअर लोकांवर दहा आज्ञांची आपत्ती कोसळली व सर्व पापाच्या मुळाशी त्या खाणी असल्यामुळे तत्कालीन सरकारनं त्या खाणीतून सोनं काढायला मनाई केली. नंतर ट्रान्सवाल गणराज्याचे अध्यक्ष झालेले ओम पॉल क्रुगरनी सावधगिरीची सूचना देत सांगितलं की 'ज्याला कुणाला सोनं सापडतं त्याला संकटं सापडतात.' परंतु बंदी असल्यानंतरही पिवळ्या धातूच्या मोहाचाच विजय झाला व सोन्याचा शोध सुरूच राहिला. १८७० साली ट्रान्सवालमधील पिटसबर्ग येथे, १८७२ साली लेडेनबर्ग येथे आणि १८८२ बार्बरटन येथे सोन्याच्या संपन्न खाणी सापडल्या. दोन वर्षांनंतर १८८४ साली व्हिटवाटरस्टँड येथे ड्रेकन्सबर्ग पर्वताच्या उतारावरील आजारांचं प्राबल्य असलेल्या, सिंहांनी आणि मलेरियाच्या डासांनी भरलेल्या 'व्हाईटवाटरच्या दऱ्यात' मुख्य सोन्याच्या खाणीचा शोध लागला आणि सोन्याच्या खाणींकडे इतिहासाला ज्ञात असलेला सर्वात मोठा लोंढा वाहू लागला. किम्बर्ली येथे हिऱ्यांच्या शोधासाठी हजारो लोक गेले असतील तर या सोन्याच्या खाणीकडे जगातील सर्व भागातील लोकांचा त्याहूनही किती तरी पटींनी मोठा प्रवाह सुरू झाला. सर्व देशातील संपत्तीचा शोध घेणारे लोक जथ्यानं दक्षिण आफ्रिकेला येणाऱ्या

प्रत्येक बोटीनं येत, तिथून रेल्वेनं ती जात असेल तोपर्यंत जात व त्यानंतर जे कोणतं साधन मिळेल त्या साधनानं - बैलगाडी, खेचर, घोडा आणि काहीच मिळालं नाही तर पायी - सोन्याच्या खाणीकडे जात असत.

पुढील वर्षी अमेरिकेतील गृहयुद्धामुळे मंदीची जी महान लाट आली तिच्यामुळे इंग्लंडमधील एकामागून एक कापडगिरण्या बंद पडू लागल्या. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेतील आदिवासींशी चालू असलेल्या सततच्या लढायांमुळे तिथली गणराज्ये आर्थिकदृष्ट्या दिवाळखोरीच्या सीमेवर पोहोचली होती. सरकार नोकरांना रोखीत पगार द्यायला असमर्थ ठरत होतं व शेती फार मोठ्या प्रमाणात गहाण टाकण्यात आलेली होती. दक्षिण आफ्रिकेच्या गणराज्याच्या अध्यक्षाला ३०० पौंडचे कर्जरोखे काढणंसुद्धा कठीण झालेलं होतं. परंतु ही सर्व परिस्थिती हिरे आणि सोनं यांनी बदलवून टाकली.

जमिनीच्या वरच्या भागावरील सोनं लवकरच संपलं. व्हिटवाटरस्टेंड येथील गाळात सोनं नव्हतं. खाणीत खोलवर जाणारे रस्ते खोदावे लागत असत. काही वेळा तर नीट हिशेब करून अडीच मैल खोल, मैलंमैल लांब एकमेकांना जोडणारे भुयारी मार्ग खोदावे लागत, त्याच्यात मजले बांधावे लागत. लाखो टन खडक खोदून काढून त्यांचा चुरा करून त्यातील सोनं काढावं लागायचं. त्यावेळेच्या सर्वात चांगल्या पद्धतीनंही फक्त ६० टक्के सोनंच वेगळं काढता येत असे. 'सोन्याचा फुगा फुटायच्याच बेतात होता की सायनाईडद्वारे सोनं वेगळं काढायचा शोध लागला. त्यामुळे ९० टक्के सोनं काढता येत असे. सायनाईड हे जालीम विष आहे. परंतु सोनं निर्मात्यांनी छातीठोकपणानं सांगितलं की सायनाईड गोऱ्या माणसांच्या कातडीसाठी हानिकारक असलं तरी 'किंचितही धोका न पत्करता नेटिव्ह' ते हाताळू शकतात. [एफ. ॲडिंग्टन सिमन्ड, *द जोहान्सबर्ग स्टोरी,* फ्रेड्रिक मुलर लि. लंडन, (१९५३), पृष्ठ १०२] या नवीन प्रक्रियेमुळे सोनं काढायच्या पद्धतीत क्रांतिकारक बदल झाला. परंतु त्यासाठी उच्च दर्जाच्या तांत्रिक ज्ञानाची व कौशल्याची गरज होती. तसंच यंत्रसामुग्री आणि कारखाना वगैरेवर एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागत होता की सोनं काढणं ही सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरची गोष्ट तर झालीच परंतु सोनं काढणाऱ्या

गटाच्याही क्षमतेपलीकडे ती गोष्ट गेली. त्यामुळे एकट्यानं संपत्तीचा शोध घेणारांच्या युगाचा शेवट झाला. त्यांची जागा मोठ्या खाणमालकांनी, व मोठ्या प्रमाणावर भांडवल असणाऱ्या कंपन्यांनी घेतली. भांडवलदार आणि साम्राज्य अशा रीतीनं एकत्रित आल्यामुळे भांडवलाच्या साम्राज्यवादाचं नवीन युग सुरू झालं. त्याला साम्राज्याची बांधणी असं नाव देण्यात आलं. दक्षिण आफ्रिकेत साम्राज्य बांधणीशी वैशिष्ट्यानं ऱ्होड्सचं नाव जुळलेलं आहे.

## ७

सोनं उत्खननाचं मध्यवर्ती ठिकाण असलेलं किम्बर्ली हे शहर घाणेरड्या झोपडपट्ट्यांनी, धूळ आणि माशांनी भरलेलं आहे. तिथल्या वातावरणात उन्हात उष्णतामानाचा पारा ११६ अंशापर्यंत, आणि सावलीत ९७ अंशापर्यंत चढतो. ज्या लोकांना तिथं संपत्ती सापडली तेच तिथं आठवड्यातून एकदा आंघोळ करायचा षौक पूर्ण करू शकतात. तिथं सोड्याच्या बाटलीसाठी ५ शिलींग द्यावे लागायचे. संपत्तीच्या शोध घेणारांच्या या काल्पनिक सुवर्णभूमीत सर्व देशातील स्वच्छंदी, खुदाई करणारे, सटोडिये, दारूचे दुकानदार, वेश्या आणि त्यांचे भडवे १८७१ साली भटकत असायचे. त्यातच शांत स्वभावाचा, थोडासा लहरी, निळसर डोळ्याचा सुंदर केस असलेला, क्षयरोग झाल्यासारखा काटकुळा दिसणारा, इंग्लंडच्या चर्चमधील धर्मोपदेशकाचा १८ वर्षांचा एक मुलगा खोदकामाच्या साहित्याची पेटी, अभिजात साहित्यात मोडणाऱ्या काही पुस्तकांच्या स्वस्त आवृत्त्या, ग्रीक भाषेचा शब्दकोश अशी आपली संपूर्ण संपत्ती घेऊन आला. तो होता सेसिल जॉन ऱ्होड्स. किम्बर्ली येथे पोहोचल्यानंतर एका वर्षाच्या आतच तो ५,००० पौंड संपत्तीचा मालक झाला व ही संपत्ती सतत वाढत जावी अशी परिस्थिती त्यानं निर्माण केलेली होती. त्याच वेळी त्याच्या मनात आंतरिक संघर्ष सुरू झाला व त्याला पहिला हृदयविकाराचा झटका आला. एका मित्राला त्यानं लिहिलं : ‘हिऱ्यांच्या या प्रदेशात माझ्या धार्मिक तत्त्वांना बळकटी येत नसल्याची मला भीती वाटते.’ त्यावेळी नुकताच कुठे तो एकोणीस वर्षांचा झाला होता.

डार्विनच्या विकासवादाच्या सिद्धान्तानं वैज्ञानिक जगाला नुकताच हादरा बसलेला होता. बुद्धिवादी लोकांपैकी ज्यांनी डार्विनच्या सिद्धान्ताचा आधार आपल्या लोकप्रिय धार्मिक आणि तत्त्वज्ञानात्मक तत्त्वप्रणालीसाठी घेतला होता त्यात विनवुड रीड हे एक गृहस्थ होते. आपल्या *मर्टायरडम ऑफ मॅन* या ग्रंथातून डार्विनच्या निरीक्षणांचा अतिशय उथळपणानं उपयोग करून नास्तिकवादाच्या पंथाची स्थापना करायचा त्यांनी प्रयत्न केला. ऱ्होड्स या पुस्तकाच्या प्रभावात आले. 'डार्विन त्याचा येशू झाला, रीड प्रेषित व *मर्टायरडम ऑफ मॅन* हा ग्रंथ त्याचं बायबल.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, कॅसेल अँड कंपनी लि., लंडन, (१९५६), पृष्ठ २५] तो ग्रंथ वाचल्यामुळे त्यांच्या सर्व शंकाकुशंकांचं निरसन झालं.

१८७६ साली त्यांनी किम्बर्लीच्या खाणीचे अधिकार विकत घेतले. चार वर्षांनंतर त्यांनी किम्बर्ली माइनिंग कंपनीची स्थापना केली व केपच्या संसदेवर त्यांची निवड झाली.

मध्यंतरीच्या काळात संपत्ती शोधाच्या साहसात ते इंग्लंडला गेले. तेव्हा त्यांनी १८७३ साली पहिल्यांदा ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश घेतला व एक वर्ष तिथं शिक्षण घेतलं. त्यानंतर पुन्हा १८७६ साली त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश घेऊन दोन वर्ष शिक्षण घेतलं. १८८१ साली ते पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले.

त्यांना हवं असलेलं नवीन शिक्षण ऑक्सफर्डच त्यांना देऊ शकत होतं असं काही नव्हतं. परंतु त्यांनी सभ्य इंग्रज गृहस्थ व्हायचा निर्धार केलेला होता व ऑक्सफर्डच्या ठप्प्यामुळे आपल्याला तशी मान्यता मिळेल असा त्यांचा विश्वास होता. किम्बर्ली येथे संपत्तीच्या शोधात असताना ते त्यांच्याजवळील अभिजात साहित्याचाही अभ्यास करत होते. आता ऑक्सफर्डमध्ये अभिजात साहित्याचा अभ्यास करत असताना आपल्या योजनांसाठी पैसा ओतयला तयार असणाऱ्या चांगल्या व्यक्तींच्या शोधात होते. परंतु जीवनांच्या अर्थाला तत्त्वज्ञानाचं रूप द्यायच्या त्यांच्या प्रयत्नाचा वा कोटाच्या खिशातून सहजपणे हिरे काढून त्यांचं प्रदर्शन करून ते करत असलेल्या व्यवसायाच्या उज्वल भविष्याबद्दलच्या अहंकाराचा प्रभाव पडत नव्हता. तसंच अधूनमधून केलेल्या खडतर साहसाच्या रांगड्या भाषेतील कथांनी अभिजात वर्गाला ते प्रभावित

करायचा प्रयत्न करायचे. पण त्याचा तोही प्रयत्न वाया जात असल्याचं लवकरच त्यांच्या लक्षात आलं. सभ्य गृहस्थ होण्यासाठीही विद्यार्थ्याप्रमाणेच चिकाटीची व नियमित प्रशिक्षणाची गरज असते.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, कॅसेल अँड कंपनी लि., लंडन, (१९५६), पृष्ठ ३६] ज्या गुणांची आपल्यात उणीव आहे असं त्यांना जाणवलं ते मिळवण्यासाठी त्यांनी ऑक्सफर्डमध्ये त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कितीतरी उच्चभ्रू क्लबांचं आणि मंडळांचं सदस्यत्व घेतलं. अखेरीस फ्री मॅन्स युनिव्हर्सिटी लॉजचं त्यांना नियमित सदस्यत्व मिळालं. त्या वेळी ऑक्सफर्डमधे जॉन रस्किनकडे अतिशय आदरानं पाहिलं जात असे. 'गॉस्पेल ऑफ लेबर' आणि 'अन टु धिस लास्ट' ही आपली दोन्ही पुस्तकं प्रेषिताच्या उत्साहानं ते शिकवत असत. विरोधाभास असा आहे की त्यांनीच ब्रिटिश साम्राज्यवादाला त्याचं तत्त्वज्ञान दिलं. ऑक्सफर्डच्या विद्यार्थ्यांसाठी उद्‌घाटनपर भाषण करताना ते म्हणाले :

*भवितव्यतेनं आपल्या राष्ट्रासमोर आपल्या क्षमतेत असलेलं फार मोठं कार्य ठेवलेलं आहे. आपण ते आव्हान स्वीकारू शकतो वा नाकारू शकतो.... तुम्ही इंग्लंडचे तरुण, या लहानशा बेटाला सर्व राज्यांचं राजदंड धारण करणारा असा देश बनवणार आहात काय की जो जगासाठी प्रकाशाचा स्रोत असेल, मध्यवर्ती केंद्र असेल.... हे ते कार्य आहे की जे इंग्लंडनं करायलाच पाहिजे. वा नष्ट व्हायला पाहिजे. वसाहत करण्यायोग्य जे भाग असतील ते शक्य असेल तेवढ्या वेगानं शोधायला पाहिजे आणि शक्य तेवढ्या वेगात तिथं आपल्या वसाहती वसवायला पाहिजे. आपल्या अतिशय उत्साही आणि कर्तबगार व्यक्तींद्वारे जिथं पाय टेकवता येईल अशी वाया जाणारी प्रत्येक उपयुक्त भूमी इंग्लंडनं ताब्यात घ्यायला पाहिजे आणि तिथं आपल्या वसाहतींना आपल्या देशाशी एकनिष्ठ राहायला शिकवायला पाहिजे, त्यांचं पहिलं कार्य जळीस्थळी इंग्लंडची सत्ता वाढवणं असायला पाहिजे....* [ऑक्सफर्डमधील स्लेड प्रोफेसर म्हणून रस्किन यांनी फेब्रुवारी ८, १८७० ला दिलेलं उद्‌घाटनपर भाषण, *द वर्क्स ऑफ रस्किन,* जॉर्ज ॲलन, लंडन, (वाचनालय आवृत्ती) (१९०५), पृष्ठ ४१-४२]

या कळकळीच्या उपदेशातून ऱ्होड्सना आपल्या जीवनहेतूचा शोध लागला. त्यातून त्यांना आफ्रिकेचा नकाशा 'ब्रिटिशांच्या लाल रंगानं आणि लक्षावधींच्या रक्तानं रंगवायची प्रेरणा

मिळाली.' [वरीलप्रमाणे] दुसरे एक वैज्ञानिक एडविन अर्नोल्ड यांनी ऱ्होड्सला 'केप ते कैरो ही आकर्षक घोषणा पुरवली. सर एडविन अर्नोल्ड हे कवीही होते. गांधीजी जिला नीतिशास्त्राचा विश्वकोश व आध्यात्मिक संदर्भग्रंथ समजत होते त्या भगवद्गीतेचा त्यांनी द साँग सेलेस्टियल या नावानं सुंदर अनुवाद केलेला आहे. अशा रीतीनं एकाच भूमीतून वेगवेगळी झाडं वेगवेगळी सत्व शोधून घेतात त्याप्रमाणे दोन तरुणांनी आपल्या तारुण्याच्या उंबरठ्यावर उभं असताना एकाच भूमीतून वेगवेगळी सत्वं शोषून घेतली. त्यातील एक नीत्शेच्या विचारसरणीनुसार ब्रिटिश साम्राज्याला वाढवू पाहत होता तर दुसरा त्या साम्राज्याचा कडवा विरोधक झाला आणि अखेरीस त्या साम्राज्यात त्यानं परिवर्तन घडवून आणलं.

अशा रीतीनं रस्किनचे शब्द, रीडच्या कल्पना व डार्विनचे वैज्ञानिक शोध यातून ऱ्होड्सनी आपल्या मार्गाचा शोध घेतला. डब्ल्यू. टी. स्टीड यांच्याजवळ ऱ्होड्स म्हणाले की सुरुवातीस मी गृहित धरलं होतं की सर्वशक्तिमान ईश्वर असायची शक्यता पन्नास टक्के आहे. त्यामुळे जर ईश्वर असेल तर तो सेसिल ऱ्होड्स काय करतो याची फिकीर करील काय ? व त्यानं काय करावं असं त्या ईश्वराला वाटेल? उत्तर स्पष्ट होतं. 'त्याला मी तेच करावंसं वाटेल जे तो स्वतः करतो आहे.' तो काय करतो आहे? डार्विन यांनी उत्तर दिलेलं होतं. नैसर्गिक निवडीद्वारे तो वंशांना परिपूर्ण करत होता व कोणालाही स्पष्ट दिसेल याप्रमाणे 'इंग्रजी भाषिक लोकांना न्याय, स्वातंत्र्य आणि शांततापूर्ण समाज निर्माण करण्यासाठी त्यानं निवडलं आहे' व त्या कार्यासाठी तो त्यांना परिपूर्ण करत आहे. त्यामुळे स्पष्ट होतं की 'इंग्लिश वंशाचं सामर्थ्य अधिकात अधिक वाढेल असं काम ऱ्होड्सनं करावं' अशीच **त्याची** इच्छा असणार.

*निष्कर्ष स्पष्ट होता :*

*जर देव असेल तर मी काय करावं असं त्याला वाटत असेल तर मी आफ्रिकेचा नकाशा ब्रिटिशांच्या लाल रंगानं शक्य तेवढा रंगवावा अशीच त्याची इच्छा असणार. त्याचबरोबर अन्यत्रही इंग्रज वंशाचा प्रभाव वाढेल व त्यांच्यात ऐक्य निर्माण होईल असं कार्य मी करावं अशीच तो अपेक्षा करत असणार.* [वरीलप्रमाणे, पृष्ठ ६२]

ऑक्सफर्डमधील ओरियल कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना ऱ्होड्स यांनी एका मृत्युपत्रातून इग्नेशियस लायोला या संस्थेप्रमाणे 'एक गुप्त संस्था स्थापन करण्यासाठी, तिचा कारभार चालवण्यासाठी व तिची भरभराट करण्यासाठी' आपल्या संपूर्ण संपत्तीची एक विश्वस्त संस्था निर्माण करावी व तिचा कारभार सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड कारनरव्हॉन यांच्याकडे वा त्यांच्या पदावर येणाऱ्या व्यक्तीकडे सोपवण्यात यावा अशी इच्छा व्यक्त केली होती.

*संपूर्ण जगात ब्रिटिश साम्राज्याचा प्रसार करणं.... ब्रिटिश वसाहतवाल्यांनी संपूर्ण आफ्रिका खंड, पवित्र भूमी, युक्रेटिसच्या दऱ्या, सायप्रस आणि कँडियाची बेटं, संपूर्ण दक्षिण अमेरिका, पॅसिफिक महासागरातील आतापर्यंत ब्रिटिशांच्या ताब्यात होती तीच केवळ तीच बेटं नव्हे तर सर्व बेटं, मलेशियाचा संपूर्ण द्वीपसमूह, चीन आणि जपानचा संपूर्ण सागर किनारा असा सर्व भाग ताब्यात घेणं; अमेरिकन संयुक्त संस्थानांना पूर्वीप्रमाणेच ब्रिटिश साम्राज्याचा भाग बनवून साम्राज्याच्या संसदेत सर्व वसाहतींना प्रतिनिधित्व देणं; व त्यांना साम्राज्याच्या सैलसर बंधनात ठेवून एका सामर्थ्यसंपन्न राष्ट्राची निर्मिती करून संपूर्ण मानवजातीच्या विकासासाठी काम करणं यांचा त्या संस्थेच्या खऱ्या हेतूत व ध्येयात समावेश असावा.* [सर लेविस मिचेल सी. व्ही. ओ. यांनी *द लाईफ अँड टाईम ऑफ द राईट ऑनरेबल सेसिल डी. ऱ्होड्स*, एडवर्ड अर्नोल्ड या ग्रंथातील उद्धरण, (१९१२), पृष्ठ ३९]

आपल्या स्वप्नाच्या परिपूर्तीकरिता ऱ्होड्सना पैसा हवा होता. त्यांना जर जगातील हिऱ्यांचा व्यापार ताब्यात घेता आला असता तर त्याला हवा तेवढा पैसा मिळू शकला असता. आफ्रिकेत सर्वत्र विपुल प्रमाणात हिरे सापडतात. ऑरेंज फ्री स्टेटमधे हिरे सापडतात. प्रिटोरियाच्या आजुबाजूच्या भागात हिरे सापडतात. जिथल्या खाणीनं तर जगातील सर्वात मोठा ३,०२५.७५ कॅरेटचा (१.५ पौंडाचा) कलिनन नावाचा प्रसिद्ध हिरा दिला होता. नाम्कालँडमध्ये असा एक दगड दाखवण्यात आला की त्याच्याखाली ४५० हिरे सापडले. इतक्या मोठ्या प्रमाणात तिथं हिरे होते. [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साउथ आफ्रिका*, पृष्ठ ५६] केपमधील गाळाखाली, ट्रान्सवालमधील चार हजार मैल भूमीखाली; तसंच कांगो, अंगोला आणि लायबेरिया वगैरे आफ्रिकेतील सर्व भागात हिरे होते. नैऋत्येकडील समुद्र किनाऱ्यावरील वाळवंट हिऱ्यांनी भरलेलं आहे. गोल्ड कोस्ट, फ्रेंच

इक्वेटोरीयल आफ्रिका आणि टांगानिकामधेही इतके हिरे आहेत की जेवढे जगात कुठेच नाहीत. हिऱ्यांना त्यांच्या दुर्मिळतेमुळे किंमत आहे असं नाही तर डी बीअर्सच्या हाती हिऱ्यांचा संपूर्ण व्यापार आहे व ते हिऱ्यांचा पुरवठा त्यांची किंमत उतरू नये अशा रीतीनं करतात म्हणून हिऱ्यांना एवढी किंमत आहे. ऱ्होड्सनी जगातील हिऱ्यांच्या किंमतीवर स्वतःचं नियंत्रण ठेवायचं ठरवलेलं होतं.

ऱ्होड्सच्या मागोमागच एक जर्मन ज्यू, अल्फ्रेड बेट आणि अजून एक ज्यू, बार्नी बार्नेटोही किम्बर्ली येथे हिऱ्यांच्या शोधार्थ आले. हे तिघंही एकच खेळ खेळत होते.

थोड्याच दिवसात ऱ्होड्सनी बेट्सशी आपले हितसंबंध जुळवले. परंतु बर्नाटो मात्र वेगळेच राहिले. ऱ्होड्सच्या चाणाक्षपणाची बरोबरी करत ते ऱ्होड्सच्या प्रत्येक चालीवर बिनतोड चाल करत होते. त्याच्यावर ना तर धमक्यांचा परिणाम होत होता, ना खुशामतीचा. कितीही मोठी रक्कम देऊ केली तरी तिचा मोह त्यांना होत नव्हता. ऱ्होड्स ऑक्सफर्डमध्ये जे शिकले होते त्याची त्यांना या वेळी आठवण झाली : 'केवळ पैशानं माणूस प्रतिष्ठित होत नाही. आणि आपल्या बांधवांमध्ये प्रतिष्ठा मिळायची शक्यता असली तर ती गोष्ट माणसाला जगातील सर्व संपत्तीहूनही मोठी वाटते'. ऱ्होड्सचा हा प्रतिस्पर्धी किम्बर्लीला गृहहीन भटक्या अवस्थेत पैसा मिळवण्यासाठी हलक्या प्रतीच्या सिगारेटींची एक पेटी घेऊन आला होता. काम चलाऊ नट, कसरतीचे खेळ करणारा, सर्कसमधील विदूषक, हॅम्लेटची सर्व स्वगत भाषणं एका पायावर उभं राहून पाठ म्हणून दाखवू शकणारा अशी त्याची प्रसिद्धी होती. त्याला माहीत होतं की त्याला प्रतिष्ठित समाज स्वीकारू शकत नाही. ऱ्होड्सनी त्यांना किम्बर्ली क्लबमध्ये निवडून द्यायचं आश्वासन दिलं. यामुळे ते प्रतिष्ठित गणले जाऊ शकले असते. किम्बर्ली क्लब हा फार निवडक लोकांसाठी होता व त्यावर ज्यूची क्वचितच निवड झालेली होती. ऱ्होड्सचे चरित्र लेखक यावर भाष्य करताना लिहितात की 'कुणा सभ्य गृहस्थानं अशा प्रकारचं आश्वासन देणं व कुणा माणसानं ते स्वीकारणं ही गोष्ट 'अविश्वसनीय' आहे.' [सारा गरट्रूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ १४] परंतु असं घडलं होतं. बर्नाटो नरम पडले. जुलै १८८९मधे ऱ्होड्सनी व्यवहार पक्का केला व बर्नाटो आणि ऱ्होड्स यांनी आपले हितसंबंध

एकत्रित केले व 'डी बीअर्स कंसॉलिडेटेड माईन' हे प्रतिष्ठान अस्तित्वात आलं. त्यासाठी ऱ्होड्सनी ५०३,०००,००० पौंडांच्या चेकवर सही केली. त्या वेळेपर्यंतचा तो सर्वात मोठा चेक होता. कंपनीच्या माहितीपत्रकात देण्यात आलेल्या कंपनीच्या उद्दिष्टातील एक उद्दिष्ट कंपनीच्या निधीचा उपयोग ब्रिटिश साम्राज्याच्या विकासासाठी करणं हे होतं.

किम्बर्लीनं ऱ्होड्स यांना ताबडतोब दोन धडे शिकवले. 'पहिला - इंग्लंड एकामागून एका देशाला ताब्यात घेत चालला होता; दुसरा त्यांना ताब्यात घेण्याबद्दलचं समर्थन करायची इंग्लंडची पद्धती लवकरच ऱ्होड्स या दोन्ही शिकवणुकीनुसार चालू लागले एवढंच नाही तर शिकलेल्या धड्यांचा त्यांनी अजूनच विकास केला.

८

सोळाव्या आणि सतराव्या शतकात मुख्य प्रोत्साहन व्यापाराद्वारे मिळायचं. स्पर्धा तीव्र होती. प्रतिस्पर्ध्यांना मक्तेदारीद्वारे बाजूला सारण्यावर व्यापारातील नफा अवलंबून होता. वसाहतीचा अर्थ होता राजकीय सत्ता आणि संबंधित प्रदेशावर नियंत्रण. त्याशिवाय वसाहतींमुळे खंडणी वसूल करायची, नैसर्गिक साधनसामग्रीच्या पिळवणुकीची, व परतंत्र राष्ट्रातील लोकांच्या श्रमशक्तीची व कौशल्याची लूट करायची अमर्याद संधी मिळत असे. व्यापारी भांडवलशाहीमुळे 'जुना वसाहतवाद सुरू झाला होता.'

१७७० साली अमेरिकेतील तेरा वसाहतींनी स्वातंत्र्य घोषित केल्यानंतर त्या पाठोपाठ १८३७ साली कॅनडात झालेल्या बंडामुळे या संकल्पनेला जबर धक्का बसला व 'वसाहती या फळासारख्या आहेत व ती फळं तोपर्यंतच झाडाला चिकटून राहतात जोपर्यंत ती पिकत नाहीत' [जे. आर. शिळी एम. ए., *द एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंड*, पृष्ठ १५] या टर्गोटच्या लोकप्रिय प्रसिद्ध मताला त्यामुळे पुष्टी मिळाली.

१७५७ ते १८५७ या शतकात पूर्वेतून लुटण्यात आलेल्या संपत्तीमुळे इंग्लंडला वाफेवर चालणारे कारखाने उभारण्यात युरोपातील इतर राष्ट्रांपेक्षा खूप अधिक मदत झाली. लावण्यात

आलेल्या शोधांची माहिती सुरुवातीस अतिशय गुप्त ठेवण्यात आल्यामुळे इंग्लंडच्या गिरण्यांतील विशेषतः कापसाच्या सुतापासून तयार करण्यात आलेल्या कापडाला आणि लोखंडी साहित्याला जवळपास कोणीच स्पर्धक नव्हता. त्यामुळे कोणत्याही प्रकारची संरक्षक उपाययोजना न करता इंग्लंडला आपला माल इतर राष्ट्रांपेक्षा कमी किमतीत विकणं शक्य होतं. परिणामी वसाहतींचं महत्त्व कमी झालं. दुसऱ्या बाजूला दाट लोकवस्तीच्या युरोपमधील बाजारपेठेतील मुक्त प्रवेशामुळे इंग्लंडला आपला अतिरिक्त माल खपवणं आवश्यक होतं.

बदलत्या परिस्थितीमुळे नवीन आर्थिक आणि राजकीय विचाराची गरज निर्माण झाली. या नवीन संप्रदायाचे मुक्त व्यापार आणि वसाहतींविषयी औदासीन्य हे दोन मुख्य सिद्धान्त होते. असा युक्तिवाद करण्यात आला की व्यापारविषयक कायदे करून वसाहतीतील व्यापारावरील मक्तेदारीमुळे वाढलेल्या नफ्यामुळे सांस्कृतिक वाढ होईल. परंतु वसाहतीतील व्यापारात मक्तेदारी निर्माण करण्यात आल्यामुळे 'नफा वाढण्याऐवजी कमीच झाला असल्याचं लक्षात आलं.' (अॅडम स्मिथ) [अॅडम स्मिथ, *द वेल्थ ऑफ नेशन,* (१७७६), बुक ४, प्रकरण ७] वसाहती केवळ घाट्यातच चालल्या नव्हत्या तर त्यांच्यावर 'फार मोठा सैनिकी आणि नाविक खर्च करावा लागत होता, परदेशांशी युद्धाचा धोका पत्करावा लागत होता, व स्वतःच्या देशात राजकीय भ्रष्टाचार पसरत होता.' (बेन्थॅम) [पारकर थॉमस मून, पीएच्.डी., *इम्पेरिॲलिझम अँड वर्ल्ड पॉलिटिक्स,* द मॅकमिलन कंपनी, न्यू यॉर्क, (१९२९), पृष्ठ १७] त्यामुळे आर्थिक दृष्टिकोनातून विचार केला तर साम्राज्य मोडीत काढल्यामुळे इंग्लंडचा फायदा झाला असता [अॅडम स्मिथ, *द वेल्थ ऑफ नेशन,* (१७७६), बुक ४, प्रकरण ७] जेम्स मिलही याच विचारांशी सहमत झाले. कॉब्डेन आणि ब्राईट यांच्या वसाहतविरोधी मोहिमेत जळजळत्या नैतिक भावनांचाही समावेश होता. ब्राईट यांनी घोषित केलं की 'ज्या दिवशी इंग्लंडजवळ आशियातील एक एकरही जागा नसेल तो दिवस इंग्लंडचा भाग्याचा दिवस असेल.' [लादिमिर हाल्पेरिन, *लॉर्ड मिल्नर अँड द एम्पायर,* पृष्ठ २८]

त्यांच्या राजकीय मताशी देशातील जनतेची त्यांना नेहमीच सहमती मिळवता आली असं नाही. भारताच्या बाबतीत असं घडलेलं आढळतं. परंतु या आंदोलनाला गती मिळायला सुरुवात

झालेली होती. १८६२ साली ऑक्सफर्डमधील इतिहासाचे प्राध्यापक गोल्डविन स्मिथ यांनी डेली न्यूज़च्या स्तंभातून सांगायला सुरुवात केली की ब्रिटिशांना समुद्रापलीकडील 'गुलामगिरीतील राष्ट्रांचा मालमत्ता म्हणून काहीच उपयोग नाही.' साम्राज्यातील वसाहती केवळ अतिरिक्तच नाहीत तर त्यांच्यामुळे धोका व्हायचीही शक्यता आहे. इंग्लंडसाठी ती एक जबाबदारी आहे व तिला कोणत्याही अवस्थेत संपत्ती मानता येऊ शकत नाही. त्यांचा निष्कर्ष स्पष्ट होता : 'वसाहती संपायलाच पाहिजे.' [लादिमिर हाल्पेरिन, *लॉर्ड मिल्नर अँड द एम्पायर*, पृष्ठ २८-२९]

एकोणिसाव्या शतकाचा पाऊण भाग संपेपर्यंत हा विचार टिकला व त्याला मध्य व्हिक्टोरिअन युगात साम्राज्यवादविरोधी तत्त्वज्ञानातून अभिव्यक्ती मिळाली. नाताळमधील ब्रिटिश वसाहतवाल्यांनी ब्रिटिशांच्या संरक्षणाची वारंवार मागणी केल्यानंतरही आणि आपल्या राज्यातील ब्रिटिशांची वसाहत असलेला भाग ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घ्यावा अशी चाकानं वारंवार विनंती केल्यानंतरही ब्रिटिशांनी ती विनंती झिडकारली याला कारणही हेच तत्त्वज्ञान होतं. त्यामुळे ग्लॅडस्टोन सरकारला 'जगातील सर्व भागातून आपली सत्ता काढून घ्यायची इच्छा झाली.' [सारा गरट्रूड मिलान, ऱ्होड्स, पृष्ठ १७०] इतकंच नाही तर डिझराईली यांनाही, जे नंतर कडवे साम्राज्यवादी झाले, वाटत होतं की 'काहीच वर्षात स्वतंत्र होणाऱ्या या भिकार वसाहती आपल्या गळ्याभोवतीच्या लोढण्यासारख्या आहेत.' [मनिपेनी अँड बकल, *लाईफ ऑफ डिझ्राईली*, खंड ३, पृष्ठ ३८५] अगदी १८६६मध्येही त्यांनी लॉर्ड डर्बी यांना 'आफ्रिकेतील सैन्य परत बोलवायची आणि आफ्रिकेतील पश्चिम किनाऱ्यावरील वसाहत उठवण्यात यावी' अशी मागणी करणारं पत्र लिहिलं. [वरीलप्रमाणे]

हीच भूमिका इतर युरोपिअन राष्ट्रांचीही होती. प्रशियाचे पुढारी बिस्मार्क यांनी १८६८ साली लिहिलं, 'स्वदेशासाठी दाखवण्यात येणारे बहुतेक लाभ मृगजळासारखे आहेत.' इंग्लंड वसाहतीचं धोरण सोडत आहे व इंग्लंडला 'त्या बऱ्याच महागात पडत आहेत' असं त्यांचं मत पडलं. [झिमरमन, गेशिश्टे डी. ड्यूशेन कॉलनी पॉलिटिक, (बर्लिन), पृष्ठ ६ मधून *इम्पेरिअॅलिझम अँड वर्ल्ड पॉलिटिक्स*मध्ये उद्धृत, द मॅकमिलन कंपनी, न्यू यॉर्क, (१९२९), पृष्ठ २३] वसाहती जर म्हणाल्या की आमच्याजवळ संरक्षणासाठी सैन्य नाही व आमचं प्रशासन चालवण्यालायक प्रशासक नाहीत तर ते म्हणणं ऐकून घ्यायची माझी

अगदीच तयारी नाही असं पोलादी चान्सेलर बिस्मार्क म्हणाल्याचं सांगतात. एवढंच नाही तर उत्तर अमेरिकेतील फ्रेंचांनी स्थापिलेल्या वसाहतींचंही त्यांनी स्वागत केलं कारण त्यामुळे अलास्का-लॉरेनचा प्रशियाकडे गेलेल्या भागामुळे त्यांची जी हानी झाली तिची भरपाई होईल असं त्यांचं मत होतं. तसंच इजिप्तमधील ब्रिटिश साम्राज्याच्या विस्ताराच्या योजनेलाही त्यांनी पाठिंबा दिला.

परंतु दक्षिण आफ्रिकेत हिरे आणि सोन्याचा शोध लागल्यानंतर युरोप इतिहासाच्या नवीन पर्वात प्रवेश करू लागला होता. औद्योगिक क्रांतीत इंग्लंडनं केलेल्या प्रगतीची बरोबरी इतर राष्ट्र करू लागली होती व आपल्या गरजेपेक्षा ते अधिक मालाचं उत्पादन करू लागले होते. [फ्रान्समध्ये कोळशाचं उत्पादन १८४७मधील ५.१ हजार टनापासून १२.७३ हजार टनापर्यंत १८६७ वाढलं, कच्च्या लोखंडाचं उत्पादन ५.९ ते १२.६ हजार क्विंटलपर्यंत, वाफेच्या यंत्रांचं ४.८ ते २३.४ हजारापर्यंत व पक्क्या मालाची निर्यात ६९,००० फॅन्कपासून १५३,००० फॅकपर्यंत वाढली. इंग्लंड आणि जर्मनीमध्ये क्रमशः कच्च्या लोखंडाचं उत्पादन १८७०पासून १९०३पर्यंत ५९०,००० टनापासून ८९०.००० टनापर्यंत आणि १,३९०,००० पासून ९,८६०,००० टनापर्यंत वाढलं. १८५१ ते १८६९च्या दरम्यान फ्रान्समधील एकूण व्यापार २०६ टक्क्यांनी वाढला. जर्मनीमधील व्यापार १८७० ते १९०३च्या दरम्यान सोळा बिलियन पौंडपासून १९ बिलियन पौंडपर्यंत वाढला. ह्या वाढीमुळे जर्मनीनं इंग्लंडच्या २५ बिलियन पौंडच्या व्यापाराशी जवळपास बरोबरी केली. याहूनही अधिक धक्कादायक बाब होती लोकसंख्येची वाढ आणि अतिरिक्त भांडवलाची परदेशातील गुंतवणूक. १८७०च्या दरम्यान फ्रान्सनं परदेशात १० बिलियन फॅक्सची आणि इंग्लंडनं १५ बिलियन फ्रँक्सची परदेशात गुंतवणूक केलेली होती. जर्मनीची गुंतवणूक नाममात्र होती. परंतु १९१४ पर्यंत फ्रान्सची परदेशातील गुंतवणूक ६० बिलियन, इंग्लंडची ७५ बिलियन आणि जर्मनीची ४४ बिलियन फ्रँक्सपर्यंत पोहोचली. याच काळात इंग्लंडची लोकसंख्या ३३ मिलियनपासून ४५ मिलियनपर्यंत वाढली, जर्मनीची ४१ पासून ६० मिलियनपर्यंत आणि फ्रान्सची ३६ पासून ४० मिलियनपर्यंत वाढली. (एल. सी. ए. नॉवेल्स, *इकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन द नाइनटीन्थ सेंचुरी*, पृष्ठ १४६ यातून नुरुल हसन यांनी द स्क्रम्बल फॉर आफ्रिका इ.१८७५ ते १९१४ ट आफ्रिका कॉर्टर्ली, जुलै - सप्टेंबर १९६१, पृष्ठ १४)] त्यांना परदेशी बाजारपेठेची व स्वस्त कच्च्या मालाची गरज वाटू लागली होती. वसाहतींनी अतिरिक्त उत्पादनासाठी केवळ स्वस्त बाजारपेठ आणि स्वस्त कच्च्या मालाच्या अविरत पुरवठ्याचीच गरज भागवली नाही तर त्यांच्या अतिरिक्त लोकसंख्येसाठी अतिरिक्त संधी आणि अतिरिक्त भांडवलाच्या अतिशय फायदेशीर गुंतवणुकीची सोयही त्यांना उपलब्ध करून दिली. उदाहरणार्थ फ्रान्समधे रेल्वेतील नफ्याचं प्रमाण केवळ २.३टक्केच होतं, त्याच वेळी नवीन देशातील नफ्याचं प्रमाण १० ते १२ टक्के असल्याचं तिथल्या अर्थशास्त्रज्ञांनी दाखवलं आहे. त्यामुळे सर्व औद्योगिक, व्यापारी आणि

आर्थिक हितसंबंध वसाहतीची एकमुखानं मागणी करू लागले व साम्राज्यवादाच्या विस्ताराच्या युगाला सुरूवात झाली.

साम्राज्यवाद सुरू होण्यामागील ऐतिहासिक प्रक्रिया ही अशी आहे. आधी संशोधक आणि मिशनरी आले. त्यांनी आफ्रिकेतील जमातप्रमुखांचा विश्वास जिंकला आणि ते साम्राज्याचे आघाडीवरील सैनिक झाले. त्यांच्या मागोमाग व्यापारी आले व तिथल्या आदिवासींशी हस्तिदंत, डिंक, ब्लँकेट, मणी इत्यादींचा वस्तुविनिमयाद्वारे व्यापार करू लागले. नंतर आले शिकारी. बंदुकीच्या भेटीच्या मोबदल्यात हत्ती, वाघ, सिंह, बिबटे आणि हरीण यांच्या शिकारीच्या परवानगीची ते मागणी करू लागले. त्यानंतर खनिज संपत्तीचा जेव्हा शोध लागला तेव्हा परवानाप्राप्त शिकाऱ्याच्या भूमिकेऐवजी ते दलालाची भूमिका करू लागले. आणि खनोत्पादन जमिनीवरील मालकीशिवाय करता येत नसल्यामुळे खाणींच्या अधिकारात सत्तेच्या अधिकाराचा पर्यायाने समावेश झाला. अशा रीतीनं सुंदर हस्तिदंताच्या शोधासाठी पारकर मूनसारखी माणसं व 'परलोकातील राज्याच्या शाश्वतीची शिकवण देण्यासाठी गेलेले मिशनरी यांनी या लोकातील भव्य साम्राज्याची निर्मिती केली.' [पारकर थॉमस मून, पीएच्.डी., *इम्पेरिऑलिझम अँड वर्ल्ड पॉलिटिक्स*, द मॅकमिलन कंपनी, न्यू यॉर्क, (१९२९), पृष्ठ ६४]

काही वेळा मिशनऱ्यांनी अगदी नकळत साम्राज्यवादाचा प्रसार केला. त्यांची 'रानटी लोकांनी' जेव्हा हत्या केली तेव्हा त्यांच्या देशाच्या शासनाला संबंधित जमातप्रमुखाकडून त्याचा प्रदेश बळकांवण्याचं निमित्त मिळालं. पण देशभक्तीमुळे जाणीवपूर्वक त्यांनी साम्राज्याच्या विस्तारासाठी जी मदत केली ती अधिक महत्त्वाची होती. ख्रिश्चन मिशनरी आपल्या स्वतःच्या देशात परोपकारी होते व परदेशात तिथल्या स्थानिक लोकांचे हितसंबंध जपत होते की गोऱ्यांच्या श्रेष्ठत्वाची जपणूक करत होते हा विवादास्पद प्रश्न असला व यापैकी त्यांचा दृष्टिकोन कोणताही असला तरीही एक गोष्ट मात्र सर्व प्रकारच्या मिशनऱ्यांसाठी अपरिहार्यपणे निश्चित होती. ती म्हणजे काही अपवाद सोडले तर ज्यांच्या आश्रयावर व नैतिक पाठिंब्यावर मिशनरी अवलंबून असायचे त्या लोकांच्या हितसंबंधाला, विशेषतः आर्थिक हितसंबंधाला ते जपायचे.

दक्षिण आफ्रिकेतील डच रिफॉर्म चर्चच्या कार्यक्षेत्रात बहुतेक स्थानिक बोअर मिशनरी लोक राहत होते व त्यांनी हॉटेन्टॉट लोकांना नोकरीवर ठेवलेलं होतं. तसंच आफ्रिकेतील मूळ रहिवाशांशी जे लढले होते त्या मिशनऱ्यांनी 'नेटिव्हांच्या अधिकारांकडे' कोणतंच लक्ष दिलं नाही. इंग्रज मिशनऱ्यांना 'नेटिव्हांच्या अधिकाराबद्दल' कितीही कळकळ वाटली तरी 'नेटिव्हांची जमीन' जेव्हा इंग्रजांनी बळकावली तेव्हा त्या मिशनऱ्यांना त्याचं काहीच वाटलं नाही.

मॅन्चेस्टर चेम्बर ऑफ कॉमर्ससमोर अमेरिकन मिशनरी, संशोधक आणि पत्रकार हेन्री मार्टिन स्टॅनले यांनी भाषण दिलं. त्यावेळी त्यांनी गृहीत धरलं की संस्कृती आणि ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीमुळे कांगोतील नग्न लोक कमीतकमी रविवारी नीटनेटके कपडे घालायला शिकतील. ते म्हणाले की 'कांगोतील प्रत्येक नेटिव्हांसाठी एकेक नीटनेटका पोषाख गृहित धरला तरी त्याचा अर्थ होत होता ३२०,०००,००० वार मॅन्चेस्टर मीलचं कापड.' त्यांच्या उद्गाराचं श्रोत्यांनी जोरात स्वागत केलं. स्टॅनले पुढं म्हणाले की 'नेटिव्ह जेव्हा दररोज चांगले कपडे घालणं शिकतील तेव्हा त्याचा अर्थ होईल दर वर्षी २६,०००,००० पौंड.' त्यांच्या भाषणातील समारोपाचे उद्गार पूर्णपणे उद्धृत करण्यासारखे आहेत :

*कांगोच्या सीमेत ४ कोटी लोक राहतात व मॅन्चेस्टरमधील कापड निर्मिते त्यांना कापडानं झाकू इच्छितात. बर्मिंगहॅमच्या टाकसाळी पिवळ्या धातूनं चमकत आहेत. त्याच्या बदल्यात तुम्ही त्यांचीं दुःखी हृदयं आनंदानं भरू शकाल. त्या गरीब बिचाऱ्या नास्तिक लोकांना येशूचे धर्मोपदेशक ख्रिश्चन धर्मात आणू इच्छीत आहेत.* [पारकर थॉमस मून, पीएच्.डी., *इम्पेरिअॅलिझम अँड वर्ल्ड पॉलिटिक्स* पृष्ठ ६६ वर मॅन्चेस्टर चेम्बर ऑफ कॉमर्सनं काढलेलं पत्रक, १८८४, मधून उद्धृत]

स्टॅनलेला इंग्लंडच्या लोकांना वसाहतीच्या कामात रस घ्यायला लावण्यात यश आलं नाही. परंतु त्यामुळे नाउमेद न होता तो बेल्जियमला गेला व तिथं राहणाऱ्या अडाणी लोकांच्या प्रमुखांना थोडं घाबरवत, थोडी खुशामत करत, थोडा धाक दाखवत कांगोच्या इंटरनॅशनल असोसिएशनच्यावतीनं बेल्जियमचे राजे लिओपाड यांचं स्वामित्व निर्माण करणारे ४०० करार

त्यानं सहजपणे केले. १८९०च्या दरम्यान आफ्रिकेसाठी झोंबाझोंबी वेगात सुरू होती. फ्रान्स, पोर्तुगाल, इटाली, जर्मनी सर्वच स्पर्धेत होते.

या नवीन जागृतीत सहभागी होण्यात इंग्लंडला वेळ लागला. युगांडातून पलायन न करण्याविषयी ऱ्होड्स यांनी केलेल्या विनंतीला उत्तर देताना तिथले पितामह ग्लॅडस्टोन उद्गारले की 'आमच्याच डोक्यावरील ओझं फार मोठं आहे. आमच्या सर्व वसाहतींकडे लक्ष देण्यासाठी मला माणसं सापडू शकत नाहीत. आम्हाला.... बरंच काही करायचं आहे.... नवीन प्रदेश साम्राज्याला जोडल्यामुळे जगातील सर्व भागातील जबाबदारी अंगावर घेण्यापलीकडे इंग्लंडमधील जनतेचा काय लाभ होईल असं तुम्हाला वाटतं?'

ऱ्होड्स यांनी उत्तर दिलं :

श्रीयुत ग्लॅडस्टोन, ग्रेट ब्रिटन फार लहान बेट आहे.... ग्रेट ब्रिटनची परिस्थिती त्याच्या व्यापारावर अवलंबून आहे. आणि आज रानटी अवस्थेत असलेली जगातील राज्यं जर आपण आपल्या ताब्यात घेतली नाहीत तर आपण जागतिक व्यापारातून बाहेर फेकले जाऊ. [सारा गरटूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ १७१]

१८७० ते १८८० च्या दरम्यान केव्हा तरी हे धोरण बदललं. १८८०च्या दरम्यान इंग्रज लोक जवळपास लढाई हारले होते. वसाहतींच्या जबाबदारीतून मुक्त व्हायच्या १८५० ते १८७५ या काळातील धोरणाला एकोणिसाव्या शतकाच्या उर्वरित काळात मुरड घालण्यात आली. इंग्लंड स्पर्धेत सहभागी झाला.

त्याचं पहिलं चिन्ह दक्षिण आफ्रिकेत १८७७ साली दिसलं. याच वर्षी डिझराईलींनी राणी व्हिक्टोरियाला भारताची महाराणी बनवलं होतं. याच वर्षी लॉर्ड कॉर्नवॉलिस, जे वसाहतीच्या विषयाचे सेक्रेटरी ऑफ स्टेट होते, यांच्या गुप्त सूचनांनुसार काम करत असलेले नाताळमधील सेक्रेटरी ऑफ नेटिव्ह अफेअर्स सर थिओफिलस शेपस्टोन हे २५ नागरी सेवेतील सेवकांसह प्रिटोरियात शिरले (या पंचवीसात एक रायडर हॅगार्ड हे कादंबरीकारही होते.) व तिथल्या दिवाळखोरीच्या अवस्थेत गेलेल्या सरकारला कोणत्याही विशेष प्रतिकाराशिवाय ताब्यात

घेतलं. त्यांनी बोअरांना स्वतंत्र प्रतिनिधित्व असलेली संस्था स्थापन करायचं आश्वासन दिलं. आश्वासन पाळण्यात आलं नाही. ब्रिटिश प्रशासन कठोर आणि सहानुभूतिशून्य असल्याचं आढळलं. उदारमतवादी नेते ग्लॅडस्टोन यांनी आपल्या निवडणूक भाषणात मिडलोथियातील प्रचाराच्या दरम्यान त्या सामिलीकरणाचा निषेध केला आणि म्हणाले की, 'राज्यातील स्वतंत्र प्रजेनं एका गणराज्यातील स्वतंत्र प्रजेवर जुलमजबरदस्ती करावी व त्यांना मान्य नसताना वा ते नकार देत असताना या राज्याची नागरिकता स्वीकारायला त्यांना भाग पाडावं' आणि ज्या पद्धतीनं हे करण्यात आलं आहे ती पद्धती या गोष्टी या देशासाठी सन्माननीय नाहीत.' [सारा गरटूड मिलान, *होड्स,* पृष्ठ ४३] परंतु उदारमतवादी पक्ष सत्तेवर आल्यानंतर पितामहांनी घोषित केलं की राष्ट्रहिताच्या निकडीमुळे शासन नेटिव्ह लोकांना वाऱ्यावर सोडू शकत नाही. त्यामुळे ट्रान्सवालवरील सत्ता सोडायचा सल्ला मी राणीला देऊ शकत नाही.

बोअरांनी बंड केलं. डिसेंबर १६, १८८०ला व्हूरट्रेकरांनी डिंगानवर विजय संपादन करायच्या वार्षिक दिवशी त्यांनी परत आपल्या गणराज्याची घोषणा केली. क्रुगर, जॉबर्ट आणि प्रिटोरियस हे नवीन नेते उदयास आले आणि फेब्रुवारी १८८१मध्ये अनेक पराभवांनंतर ब्रिटिश सैन्याचा मजुबा हिलमधे बोअरांनी सपशेल पराभव केला. दीर्घकाळ चालणारं आणि अतिशय खर्च येणारं हे सैनिकी साहस सुरू ठेवायची ग्लॅडस्टोन सरकारची इच्छा नव्हती. त्यामुळे फेब्रुवारी १८८१मध्ये प्रिटोरिया येथील अधिवेशनात ग्लॅडस्टोन सरकारनं राणीच्या आधिपत्याखाली राहायच्या अटीवर ट्रान्सवालचं स्वातंत्र्य घोषित केलं. राणीच्या अधिकारानुसार युद्धाच्या वेळी ब्रिटिश सरकारला ट्रान्सवालच्या सीमेतून सैन्य न्यायचा अधिकार राहणार होता, ट्रान्सवालचे विदेश विषयक धोरण ठरवायचा अधिकार राहणार होता, व 'नेटिव्हांच्या अधिकारावर' लक्ष ठेवण्यासाठी रेसिडंट नेमायचा अधिकार राहणार होता.

अशा प्रकारच्या मर्यादित स्वातंत्र्यानं बोअरांचं समाधान झालं नाही. क्रुगर यांच्या म्हणण्यानुसार माणसाचे 'सर्व कपडे काढून घ्यावे आणि नंतर घड्याळ आणि पैशाचं पाकीट काढून घेऊन ते कपडे परत करावे' त्याप्रमाणे हे झालं अशी बोअरांची भावना झाली होती. [फेलिक्स

ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, कॅसेल अँड कंपनी लि., लंडन, (१९५६), पृष्ठ १०१] अधिवेशनात सह्या झाल्यानंतर सहा महिन्यांनी जनरल जॉबर्ट यांनी मोझालीकाट्झच्या मुलाला, लोबेनगुलाला एक पत्र दिलं व त्यातून मजुबा येथे शिकवलेला धडा कळवला. 'एखाद्या माकडाच्या हाती कोहळ्याच्या बिया असाव्या व त्याला मरेपर्यंत मारलं नाही तर त्या तो जसा सोडायला तयार होत नाही तशी इंग्रज माणसाच्या हाती जेव्हा तुमची संपत्ती असते तेव्हा त्याची परिस्थिती होते.' ब्रिटिशांसाठी मजुबा येथील पराभव हा दुःखद आठवणीचा प्रसंग होता. 'मजुबाचा बदला' ही साम्राज्यवाद्यांच्या चेष्टेची घोषणा झाली.

१८८३मधे जेव्हा क्रुगर अध्यक्ष झाले तेव्हा हा तिढा सुटला. त्यानंतरच्या वर्षात लंडन अधिवेशनात प्रिटोरिया अधिवेशनातील काही अटींमधे बदल करण्यात आला. ट्रान्सवालला ऑरेंज फ्री स्टेटशी आणि आफ्रिकी लोकांशी करार करायचा अधिकार देण्यात आला. त्याचबरोबर 'नेटिव्ह सोडून इतर सर्वांसाठी' दक्षिण आफ्रिका गणराज्याच्या कोणत्याही भागात प्रवेशाचे, प्रवासाचे, आणि निवासाचे तसंच प्रतिष्ठित माणसांवर न लावण्यात येणारे कर न लावता व्यापार करण्याचे हक्क इंग्लंडनं मिळवले.

इंग्लंडच्या आधिपत्याचा प्रश्न कायदेबाजीच्या युक्तिवादात सापडला. नवीन प्रस्तावाच्या उपोद्घातात केवळ एवढंच सांगण्यात आलं होतं की 'नवीन अधिवेशनातील पुढील कलमांचा समावेश ३ ऑगस्ट १८८१च्या अधिवेशनात मान्य करण्यात आलेल्या कलमांमध्ये करण्यात येत आहे.' जुन्या करारातील आधिपत्याचं कलम नवीन घटनेत बदलवण्यात आलेलं नव्हतं.

लंडन अधिवेशनात सह्या होतात न होतात तेवढ्यातच इतर युरोपिअन राष्ट्रांमधे आफ्रिकेचे तुकडे करून ते आपसात वाटून घ्यायची तीव्र स्पर्धा सुरू झालेली होती. जे भाग ताबडतोब बळकावले जाऊ शकत नव्हते त्यांची विभागणी प्रभावातील क्षेत्र म्हणून करणं चालू होतं. किंग लिओपाल्ड यांनी कांगोचं परिवर्तन बेल्जियमच्या मळ्यात केलं होतं, पोर्तुगिजांचा तळ पश्चिमेकडील अंगोलात आणि पूर्वेकडील किनाऱ्यावरील मोझाम्बिकमधे होता व ते लिम्पूशी हस्तांदोलन करायचा प्रयत्न करत होते. जर्मनीचा राईश झेंडा दक्षिण पूर्व आफ्रिकेत फडकत

होता (१८८३) व त्यानं नामाक्यूलँडला संरक्षित क्षेत्र घोषित केलेलं होतं. (१८८४). चार वर्षांनंतर आफ्रिकेच्या दुसऱ्या बाजूकडील देश टांगानिकाला राईशच्या अंतर्गत संरक्षित क्षेत्र घोषित करण्यात आलं. उत्तरेकडे फ्रान्स, स्पेन आणि इटली यांनी आपापल्या भूखंडांवर आपापली कुंपणं बांधली होती.

९

या सर्व घटनांचा परिणाम केपटाऊन, प्रिटोरिया, ब्लुमफाऊन्टन आणि लंडनवर होत होता. नेटिव्ह विषयक सामान्य धोरण ठरवायच्या दृष्टीनं दक्षिण आफ्रिकेतील राज्यांना एकत्रित करण्याच्या बाजूनं काही दिवसांपासून लोकांचा कल होऊ लागला होता. द ट्रान्सवाल रिपब्लिक, द ऑरेंज फ्री स्टेट आणि केप कॉलनी यांची या दृष्टीनं धडपड चाललेली होती. परंतु प्रत्येकाची धडपड आपापल्या मार्गानं चाललेली होती. दक्षिण आफ्रिकेतील राज्यांचा राष्ट्रसमूह बनवायच्या दृष्टीनं वसाहतींचे सेक्रेटरी ऑफ स्टेट असलेले लॉर्ड कारनरव्हॉन यांनी एक नवीन योजना तयार केलेली होती. परंतु त्यासाठी ती वेळ अनुकूल नव्हती. वातावरण संताप, संशय आणि शत्रुत्वानं भरलेलं होतं. ऑरेंज फ्री स्टेटचे डच ग्रिकॉलँड गमावल्याचा व ग्लॅडस्टोन सरकारनं केलेल्या धोकेबाजीचा अजून शोक करत होते; केपच्या डचांचं त्यांच्या उत्तरेकडील भावांसाठी मन दुखत होतं. क्रुगर यांना संयुक्त आफ्रिका हवा होता परंतु इंग्रजांना समुद्रात हाकलून लावल्यानंतर तो डचांचा असावा असं त्यांना वाटत होतं. परंतु ती गोष्ट अशक्य आहे हे जाणवल्यामुळे केप आणि नाताळ या इंग्रजांची सत्ता असलेल्या दोन राज्याशी संबंध न ठेवता दोन गणराज्यांचा राष्ट्रसमूह त्यांना करायचा होता. या संभावित राज्यात स्वतःचं सरकार, कायदे, जकात, स्वतःची वेगळी स्वतंत्र रेल्वे व स्वतःचं बंदर असावं अशी क्रुगर यांची योजना होती.

केपच्या डच लोकांनी आफ्रिकेत राहणाऱ्या डचांची बाँड नावाची एक संघटना तयार केली होती. तिचं नेतृत्व जर्मन धर्मोपदशकाचा मुलगा डब्ल्यू. पी. श्रीनर करत होता परंतु त्यामागील खरी प्रेरणा होती दक्षिण आफ्रिकेचे एक निर्माते व काही काळ केप मंत्रिमंडळाचे सदस्य असलेले

डच गृहस्थ जॉन हेन्ड्रिक्स यांची. बाँडच्या सदस्यांना संयुक्त दक्षिण आफ्रिका हवा होता व क्रुगरचं केपपासून वेगळं राहायचं धोरण त्यांना चुकीचं वाटत होतं. ऑरेंज फ्री स्टेटला आपल्या श्रीमंत शेजाऱ्याचा मत्सर वाटत होता व त्यात आपलं अस्तित्व हरवून जाईल अशी त्याला भीती वाटत होती. ट्रान्सवालमध्ये अनेकांना क्रुगर दुराग्रही आणि हुकूमशहा होत आहे व त्यांच्या ठिकाणी एखादा तरुण यावा असं वाटत होतं.

नाताळ व केप कॉलनी या दोन इंग्रजी भाषिक वसाहती आणि ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट ही दोन डच गणराज्ये यांनी एकत्रित यावं आणि ज्यात ब्रिटिशांचा वा त्याच्या अधिकाऱ्यांचा कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप नाही असा ब्रिटिश ध्वजांतर्गत गोऱ्यांचा संयुक्त दक्षिण आफ्रिका बनवावा आणि त्यात डचांनी आणि इंग्रजांनी खांद्याला खांदा लावून एक राष्ट्र म्हणून काम करावं असं ऱ्होड्स यांना वाटत होत. त्याहीपलीकडे केप ते इजिप्त आणि पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यापासून तर अटलैंटिक महासागराच्या किनाऱ्यापर्यंत संपूर्ण आफ्रिका ब्रिटिश साम्राज्यांतर्गत एक व्हायचं स्वप्न ऱ्होड्सची प्रतिभा पाहत होती.

ऱ्होड्सनी हॉफमायरशी हातमिळवणी केली. त्या दोघात बरंच काही सामान्य असल्याचं त्यांना जाणवलं. लवकरच हॉफमायर ऱ्होड्सचा माणूस झाला. त्यांनी ऱ्होड्सला विधान मंडळात आणि बाहेरही पाठिंबा दिला व बाँड संघटनेला त्यांच्या पाठीशी उभं केलं. हॉफमायरना वाटत होतं की आपल्याला यश मिळाल्यास आपण बहुसंख्य असल्यामुळे दक्षिण आफ्रिकेचं शासन आपल्या हाती येईल.

बाँडच्या सदस्यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी व दोन गणराज्यांना आपल्यासोबत ठेवण्याकरिता नेटिव्हांच्या अधिकाराविषयी ऱ्होड्स डचांच्या तालावर नाचू लागले.

*माझा निर्णय झाला आहे की (केपच्या संसदेत त्यांनी घोषित केलं) वेगवेगळ्या वर्गांसाठी वेगवेगळे नियम असायला पाहिजे, परवान्याचा आणि शांतता रक्षणाचा कायदा करायला पाहिजे आणि जिथं कुठं नेटिव्ह असतील तिथं त्यांना आपल्यापेक्षा वेगळी रानटी माणसासारखी वागणूक द्यायला पाहिजे. आपण त्यांच्या मालकाच्या जागी असायला हवं.... नेटिव्हांना*

*मुलाप्रमाणे वागणूक द्यायला हवी आणि त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात येऊ नये. त्यांना दारूचा अधिकारही देण्यात येऊ नये.... दक्षिण आफ्रिकेतील रानटी लोकांबरोबर आपण जुलूमशाहीच्या व्यवस्थेचा स्वीकार करायला पाहिजे. अशी व्यवस्था भारतात उत्तमरीत्या काम करत आहे.* [सारा गरटूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ ६४ (तिरपी अक्षरं माझी)]

त्यांनी नेटिव्हांना वगळणारी 'झाम्बेसीच्या दक्षिणेकडे राहणाऱ्या प्रत्येक गोऱ्या माणसाला समान हक्क' ही घोषणा केली व साम्राज्याच्या घटकासंबंधी द्व्यर्थी बोलायला सुरुवात केली. त्यातून ब्रिटिशाच्या ध्वजाचा त्याग करायला तयार असल्याचं व दक्षिण आफ्रिकेच्या स्वतंत्र ध्वजाखाली काम करायला तयार असल्याचं ते बाँडच्या सदस्यांना दाखवू इच्छीत होते. वास्तवात मिशनऱ्यांच्या प्रभावामुळे त्यांच्या विस्तारवादात गृहविभाग अडाणीपणानं जो हस्तक्षेप करत असे केवळ तोच ऱ्होड्स यांना नको होता.

त्यावेळेचा आफ्रिकेचा राजकीय नकाशा हा असा होता. आफ्रिकेच्या पायाशी केप कॉलनी होती, पूर्वेकडील बगलेवरील समुद्रकिनाऱ्यावर नाताळ होतं व वरच्या भागावर दुसऱ्या बाजूला पोर्तुगीज पूर्व आफ्रिका होता. केप कॉलनीच्या पूर्वेकडील भागाच्या उत्तरेस ऑरेंज फ्री स्टेट होतं आणि त्याचा दक्षिण भाग व नाताळ यांच्यामध्ये बॉस्टोलँडचा प्रदेश होता. ऑरेंज फ्री स्टेटच्यावर ट्रान्सवाल होतं. केप कॉलनीच्या उत्तर सीमेच्या मध्यापासून मधल्या वाटेनं वर गेलेला अडीच लाख मैलांचा पट्टा बछुआनाचा आहे. ओसाड, रेताड, पाणी नसलेला आणि मेटॅबोलेच्या भूभागाकडे जाणाऱ्या प्रदेशात मशोना, बारोत्से व इतर भाग आहेत. त्याचा आजच्या ऱ्होडेशियात समावेश होतो. त्यांच्या शेजारी कांगोच्या खोऱ्याचा प्रदेश आहे. नंतर ग्रेट लेकचा भाग आहे. त्यापलीकडे ओसाड प्रदेश पसरलेला आहे. इंग्लंडला जर केपटाऊन आणि कैरोला जोडायचं असेल तर त्यानं या भागात स्वतःचे हातपाय पसरणं आवश्यक असलेला हा प्रदेश होता.

बछुआलँड हा ऱ्होड्सचा 'उत्तरेकडे जायचा मार्ग' होता वा काही वेळा तो म्हणत असल्याप्रमाणे अंतर्गत प्रदेशांना जोडणारा तो 'सुवेझ कालवा' होता. शेजारच्या सर्व युरोपिअन राष्ट्रांना त्याची हाव सुटलेली होती. स्वतःला आधीच ट्रान्सवालवरून न जाणाऱ्या रेल्वेमार्गावर

स्थापित केलेल्या स्टेलालँड आणि गोशेन या दोन लहान गणराज्यांना आपल्या राज्यात सामील करून घ्यायच्या धमक्या क्रुगर देत होते. जर्मन लोक बोअर गणराज्यांना आपल्या प्रभावक्षेत्रात आणायला इच्छुक होते. स्पर्धकांनी उत्तरेकडील मार्ग कायमचा बंद करू नये असं वाटत असल्यास ऱ्होड्सनी त्वरित पाऊल उचलणं आवश्यक झालेलं होत.

१८८५ साली बेछुआनालँडचा दक्षिणेकडील भाग केप कॉलनीला जोडून घेण्यात त्यांना यश आलं व ब्रिटिशांनी उत्तरेकडील अर्धा भाग आपल्या संरक्षणाखाली असल्याची घोषणा केली. क्रुगर यांची मेटॅबोलेचा प्रमुख लोबेनगुलाला आपल्या बाजूनं वळवून घ्यायची योजना होती. प्रसिद्ध मिशनरी रॉबर्ट मोफॅट याचा मुलगा रेव्हरंड जे. एस. मोफॅटवर मोझेलीकाट्झचा दीर्घकाळापासून विश्वास होता. क्रुगरची योजना उधळून लावण्यासाठी ऱ्होड्सनी केपचे राज्यपाल सर हर्क्युलस रॉबिन्सन यांना रेव्हरंड जे. एस. मोफॅट यांच्या माध्यमातून एका दस्तावेजावर स्वाक्षरी घ्यायचं काम सोपवलं. त्या दस्तावेजानुसार लोबेनगुलाला त्याच्या राज्यातील कोणताही भाग 'विकता येणार नव्हता, इतर राज्याला जोडता येणार नव्हता वा कुणाच्या स्वाधीन करता येणार नव्हता.' [सर लेविस मिचेल सी. व्ही. ओ. यांनी *द लाईफ अँड टाईम ऑफ द राईट ऑनरेबल सेसिल डी. ऱ्होड्स,* पृष्ठ १३४] त्यासाठी त्याला दक्षिण आफ्रिकेच्या मुख्य आयुक्तांना आधीच माहिती देऊन पूर्व परवानगी घ्यावी लागणार होती. [लोबेनगुलाला सापळ्याचा संशय आल्यामुळे त्यानं कोणत्याही प्रकारचा तह करायला नकार दिला. मोफॅटनं जेव्हा आग्रह केला तेव्हा लोबेनगुलानं त्याला फार शहाणपणा न दाखवायला स्पष्टपणे सांगितलं. परंतु मोफॅटनं गोऱ्या महाराणीला निदान सौजन्य म्हणून तरी पत्र लिहायची विनंती केली. त्यानंतर त्यानं त्याच्यासमोर ठेवण्यात आलेल्या एका कागदावर सही केली. आपण तुमच्याशी करार करण्यास असमर्थ आहोत व त्याबद्दल महाराणीकडे आपण दिलगिरी करत आहोत असं त्या कागदावर लिहिलेलं आहे या विश्वासानं लोबेनगुलानं त्या कागदावर सही केली होती. हत्तीच्या पायाची खूण असलेला जो दस्तावेज मोफॅटनं त्याच्या खूश झालेल्या मालकाला दिला त्यामुळे लोबेनगुलाचं राज्य हिरावून घेतलं गेलं. त्याच्या समारोपात्मक भागात लिहिलेलं होतं : ' ......... अमांडेबेले राज्याचा प्रमुख लोबेनगुला याहीपलीकडे मान्य करतो की माझ्या वर निर्देशित केलेल्या राज्याच्या संबंधात मी अथवा माझे लोक सम्राटांच्या सरकारच्या उच्चायुक्तांच्या माहितीशिवाय कोणत्याही दुसऱ्या राज्याशी संबंध ठेवणार नाही वा या राज्यातील कोणताही वा सर्व प्रदेश विकण्यासंबंधी, दुसऱ्या राज्याला जोडण्यासंबंधी वा दुसऱ्या राज्याला देण्यासंबंधी करार करणार नाही..... पहा सर लेविस मिचेल सी. व्ही. ओ. यांच्या *द लाईफ अँड टाईम ऑफ द राईट ऑनरेबल सेसिल डी. ऱ्होड्स* पृष्ठ १३४]

तीन वर्षांनंतर ऱ्होड्स स्वतःच सवलतीचं आमिष दाखवून मासा गळाला लावायच्या स्पर्धेत सामील झाले. त्यासाठी त्यांनी बेछुआनाचे आयुक्त आणि त्याचे ऑक्सफर्डमधील मित्र

सर सिडने शिपर्ड यांची मदत घेतली. त्याचबरोबर जे. एस. मोफॅट यांच्या ठिकाणी आलेले लंडन मिशनरी सोसायटीचे रेव्हरंड सी. डी. हेल्म यांचीही मदत ऱ्होड्सनी घेतली. रे’व्हरंड सी. डी. हेल्म यांच्यावर लोबेनगुलाचा विश्वास होता आणि आता ऱ्होड्सकडे ते दरमहा २०० पौंड पगारावर गुप्त प्रतिनिधी आणि साथीदार म्हणून काम करत होते. त्यांनी लोबेनगुलाचा विश्वासघात केला आणि मेटॅबोलेच्या प्रमुखाची सही दस्तावेजावर घेतली. त्या दस्तावेजात ऱ्होड्सला 'माझ्या राज्यातील, माझ्या मांडलिकांच्या राज्यातील आणि माझ्या अधिकारात असलेल्या संस्थानातील सर्व खनिज संपत्तीवर संपूर्ण आणि एकमेव अधिकार राहील’ असं नोंदवण्यात आलं होतं. व त्याची किंमत म्हणून एक लाख बंदुकीच्या गोळ्या, ज्यांना नंतर लोबेनगुला ‘रक्तरुपी पैसा’ म्हणाला, व 'झांम्बेसीला जाऊ शकता यावं म्हणून एक शस्त्रसज्ज आगबोट द्यावी असं ठरलं.’ [हेन्री गिब्ज, *बॅकग्राऊंड टू बिटरनेस*, पृष्ठ १४१]

लोबेनगुलाचा काही गैरसमज होता. त्याची भीती दूर करण्यासाठी व त्याला आश्वस्त करण्यासाठी त्याला ऱ्होड्सकडून मौखिक आश्वासन देण्यात आलं की ‘उल्डोझी (म्हणजे मोठ्या छिद्राचा माणूस) म्हणून ओळखला जात असलेल्या ऱ्होड्सला किम्बर्ली येथे त्यानं केलेल्या पहिल्या छिद्राप्रमाणेच पुन्हा एक छिद्र करायचं आहे. त्यासाठी १० हून अधिक गोरे लोक काम करणार नाहीत व ते लोबेनगुलाच्या क्रालजवळ छिद्र करणार नाहीत व लोबेनगुलाच्या राज्यातील सर्व नियमांचं पालन करतील.’ [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ १५३] ऱ्होड्सचं हे वचन हेल्म्सनं लोबेनगुलाला कळवलं होतं. परंतु सवलतीच्या करारनाम्यात त्याचा कधीच उल्लेख करण्यात आलेला नव्हता.

आफ्रिकेतील जमातीत मराना माका म्हणजे खोटारड्यांचा बाप म्हणून ओळखला जाणारा सर स्टॅनले शिपर्ड हा त्याच्या या प्रसिद्धीला पूर्णपणे जागला. त्यानं आपल्या वरिष्ठांना कळवलं की ‘शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा वा प्रतिनिधीचा या सवलतीशी काहीही संबंध नाही आणि माझ्या माहितीप्रमाणे जे काही घडलं व दस्तावेजात आहे त्यासंबंधीच्या या अफवा आहेत.’

परंतु काही वर्षांनंतर त्यांनं दर्पोक्तिपूर्ण उद्गार काढले की :

*१८८५ साली मी सर्वप्रथम मॅफेकिंगला आलो तेव्हापासूनच लोबेनगुलाचा प्रदेश इंग्लंडला जोडायची योजना मी आणि ऱ्होड्स यांनी १८७८ साली आखली होती. त्या योजनेनुसार लोबेनगुलाचा प्रदेश इंग्लंडला जोडायच्या दृष्टीनं मी लोबेनगुलाच्या संपर्कात होतो.* [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ १५४]

हेल्मनं आपल्या नवीन मालकाला सवलतीच्या दस्तावेजावर पुढील शब्द टाकायला लावून उपकृत केलं : 'मी प्रमाणित करतो की सोबतच्या दस्तावेजाचा संपूर्ण अर्थ माझा मालक, लोबेनगुला व त्याच्या मंत्री परिषदेला (इंडुनाज) स्पष्ट करून सांगण्यात आला आहे.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ १५३] लोबेनगुलाला या व्यवहाराचा अर्थ काय कळला ते नंतर पाहण्यात येईल.

भूमीचा सामायिक उपयोग हा आफ्रिकेतील आदिवासी जीवन पद्धतीचा भाग होता. भूमीवर कोणाचाच वैयक्तिक अधिकार नसायचा. युरोपिअन लोकांना जेव्हा वाटायचं की आपण जमीन 'विकत' घेतली आहे तेव्हा आफ्रिकी लोक त्याचा अर्थ ती परवानगी देणारा जमात प्रमुख त्याचे मंत्री वा जमात पंचायतचे लोक जिवंत असेपर्यंत वापरायला दिली आहे असा घेत असत व जमात प्रमुखाला वा पंचायतीला जमातीच्या हिताला बाधा पोहोचणार नाही अशा रीतीनं 'खरेदीत' बदल करायचा अधिकार असायचा. गिब्ज यांनी निदर्शनास आणून दिलं आहे की त्यांना 'जमीन वैयक्तिक मालकीची वस्तू असू शकते या ख्रिश्चनांच्या जमीनविषयक संकल्पनेचा अर्थच कळू शकत नव्हता.' [हेन्री गिब्ज, *बॅकग्राऊंड टू बिटरनेस*, पृष्ठ ३२, लिओ मारकॉर्ड, द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका, पृष्ठ १५३]

हेल्म गेल्यानंतर मेटॅबोले प्रमुखाला इतरांकडून कळलं की त्यानं ज्या दस्तावेजावर सही केली आहे त्या दस्तावेजानुसार त्यानं आपली सर्व जमीन तिच्या खाणींच्या सर्व अधिकारांसह सवलत देणाराला दिलेली होती. त्यानं हेल्मला अजून दोन मिशनऱ्यांसह बोलावलं, हेल्मच्या हाती सवलत देणारा तो दस्तावेज ठेवला आणि विचारलं :

‘हा कागद वाचा आणि मला प्रामाणिकपणानं सांगा की मी मेटॅबोलेंची जमीन याद्वारे दिली आहे काय?’

‘होय महाराज आपण दिली आहे. गोरा माणूस जमिनीचा मालक असल्याशिवाय जमिनीत सोन्यासाठी खोदकाम कसं करू शकेल?’

‘आणि देशात कुठंही सोनं सापडलं तर गोरा माणूस ती जमीन ताब्यात घेऊन तिथं सोन्यासाठी खुदाई करू शकेल काय?’

‘होय महाराज.’

‘जर सोनं माझ्या राजधानीत सापडलं तर ते तिथंही प्रवेश करून खुदाई करू शकतील काय?’

‘होय महाराज.’

निर्भर्त्सनेनं त्यांच्याकडे पाहत त्या धर्मगुरूंना तिथून निघून जायला त्यानं सांगितलं आणि तो म्हणाला : ‘हालेम तू स्वतःला देवाचा माणूस म्हणवतोस? तू व्यापाऱ्यांपेक्षा मुळीच चांगला नाहीस.’ [फेलिक्स ग्रॉस, *होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ १५७]

आपली फसवणूक झाल्याचं लक्षात आल्यानंतर त्यानं आपल्या दोन इंडुनाना (मंत्र्यांना) एक पत्र देऊन इंग्लंडच्या मोठ्या गोऱ्या राणीकडे - व्हिक्टोरियाकडे पाठवलं :

*लोबेनगुलाला तिथं कुणी राणी आहे का हे जाणून घ्यायचं आहे. या देशात आलेले काही लोक असं सांगतात की तिथं एक राणी आहे, काही सांगतात की नाही.*

*लोबेनगुलाला सत्य तेव्हाच कळू शकेल की जेव्हा डोळे पाठवून तिथं खरोखरी*

*कोणी राणी आहे काय हे तो समजून घेऊ शकेल.*

*इंडुना हे त्याचे डोळे आहेत. लोबेनगुलाची तिथं कोणी राणी आहे काय हे जाणून घ्यायची इच्छा आहे व असल्यास लोबेनगुलाला तिचा सल्ला आणि मदत हवी आहे. कारण त्याच्या देशात*

*सोन्याच्या खोदकामासाठी आलेल्या गोऱ्या लोकांकडून त्याला अतिशय त्रास होत आहे. त्यांनी सोन्यासाठी खोदकाम करण्यासाठी मला जागा मागितली व सांगितलं की त्या अधिकारासाठी ते मला काही वस्तू देतील. मी त्यांना सांगितलं की ते मला काय देऊ शकतात ते त्यांनी मला आणून दाखवावं आणि मी त्यांना काय देऊ शकतो ते मी त्यांना दाखवीन. एक दस्तावेज लिहिण्यात आला व माझ्या सहीसाठी तो मला देण्यात आला. यात काय लिहिलेलं आहे ते मी त्यांना विचारलं व मला सांगण्यात आलं की त्यात माझे आणि त्यांचे शब्द आहेत. मी त्यावर सही केली. त्यानंतर जवळपास तीन महिन्यांनी मला काही लोकांकडून कळलं की त्या दस्तावेजाद्वारे मी माझ्या देशातील सर्व खनिज संपत्तीचे अधिकार त्यांना दिले आहेत.... त्यानंतर माझ्या इंडुनांसोबत माझी बैठक झाली व ते तो कागद मान्य करणार नाहीत कारण त्यावर माझे शब्द नाहीत आणि त्यांचे शब्दही नाहीत.... मी तुमची फसवणूक होऊ नये म्हणून आणि सत्य कळावं म्हणून तुम्हाला लिहीत आहे.* [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ १६५-६६]

लंडनमधे हे पत्र समोर आल्यानंतर ते पत्र नकली असल्याचं ताबडतोब ऱ्होड्सनी जाहीर केलं. त्यांचं म्हणणं होतं की त्यावर कोणत्याही मिशनऱ्याची साक्ष नाही तर केवळ मेटॅबोलेच्या मोठ्या हत्तीचं चिन्ह आहे व म्हणून हे पत्र नकली आहे. वसाहत मंत्री लॉर्ड क्नुट्सफोर्ड यांनी पुढील कोणत्याच पुराव्याची मागणी न करता हा फुसका आक्षेप मान्य केला. परंतु जुन्या जॉन कंपनीचं भारतात विसर्जन झाल्यानंतरही ऱ्होड्स चार्टर्ड कंपनीच्या नावानं तिला पुन्हा जिवंत करण्यात येत आहे असा आक्षेप घेऊन प्रतिस्पर्ध्यांनी संसदेत वादळ उठवलं. त्यांच्यातील पुढाऱ्याला ऱ्होड्सनं ऱ्होड्स ग्रुपमधे घेऊन एक प्रकारची लाच दिली आणि पार्नेलच्या पक्षाला १०,००० पौंड द्यायचं आश्वासन देऊन आयरिश सदस्यांना बांधून घेतलं. परंतु नॉर्दम्टनचे सदस्य हेन्री ड्यू प्रिटोरिया लाबेन्चरचं तोंड काही बंद करता आलं नाही. त्यांनी हाउस ऑफ कॉमन्समध्ये जेव्हा गैरसोयीचे प्रश्न विचारायला सुरुवात केली आणि अजून नुकसानदायक माहिती जाहीर करायची धमकी आपल्या ट्रुथ या प्रसिद्ध वृत्तपत्रातून दिली तेव्हा वसाहत कार्यालयानं ताबडतोब

हालचाल करून लोबेनगुलाला पुढील संदेश पाठवून या संपूर्ण प्रकरणापासून आपले हात झटकायचा प्रयत्न केला :

*राणी लोबेनगुलाला सल्ला देऊ इच्छिते की गडबडीत जमिनीवरील सवलती वा खोदकामाची परवानगी देण्यात येऊ नये.... राजा नवागताला बैल देत असतो, संपूर्ण कळप देत नसतो.* [बेसिल विल्यम्स, *सेसिल ऱ्होड्स*, कॉन्सटेबल अँड कंपनी लि., लंडन, (१९२१), पृष्ठ १३४]

लोबेनगुलानं प्रत्युत्तरात लिहिलं, *'मी तुमच्या शब्दांसाठी आभारी आहे. गोरे लोक सोन्यासाठी मला त्रास देत आहेत. राणीच्या ऐकण्यात आलं की मी संपूर्ण देश दिलेला आहे तर ते खरं नसेल. माझ्या देशात असा कोणीच नाही की ज्याला लिहिता येतं. मला कळत नाही की भांडणाचा मुद्दा काय आहे कारण मला लिहिता येत नाही.'* [सारा गरटूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ ११७]

यावेळी मिशनरीकडून पत्रावर साक्ष घ्यायची त्यानं काळजी घेतली. परंतु ऱ्होड्सला भीती वाटत होती की सनद मिळेपर्यंत हे पत्र लंडनमध्ये पोहोचलं तर आपला बेत उधळला जाईल. त्यामुळे बछुआनात प्रशासक असलेल्या आपल्या मित्राला ऱ्होड्सनं ते पत्र अडवून ठेवायला सांगितलं. लंडनमधे राजपत्रात सनद प्रसिद्ध व्हायला चारच दिवस उरलेले असताना ते पत्र रवाना करण्यात आलं. सामान्यपणे बुलावायोहून पाठवण्यात आलेलं पत्र लंडन येथे पोहोचायला तीन आठवडे लागतात. परंतु हे १० ऑगस्टला लिहिलेलं पत्र लंडन येथे १८ नोव्हेंबर १८८९ला पोहोचलं. मोफॅटला ते मिळाल्यानंतर ११० दिवसांनी. मध्यंतरीच्या काळात २९ ऑक्टोबर १८८९ला ऱ्होड्सच्या सनदेला राजमुकुटाची संमती मिळाली. त्या सनदेनुसार 'ब्रिटिश दक्षिण आफ्रिका कंपनीला संधी करायचे, कायदा करायचे, पोलीस ठेवायचे, रस्ते बांधायचे, रेल्वे आणि बंदरांचा विकास करायचे, खाणी आणि उद्योगधंदे उभारायचे व जमीन द्यायचे २५ वर्षांचे हक्क मिळाले.' [पारकर थॉमस मून, पी.एच.डी., *इम्पेरिऑलिझम अँड वर्ल्ड पॉलिटिक्स*, द मॅकमिलन कंपनी, न्यू यॉर्क, (१९२९), पृष्ठ १७०]

सनद मिळाल्यानंतर ऱ्होड्स रेल्वे आणि तारायंत्र पसरवून मशोनालँडला व्यापू इच्छीत होता कारण असं समजण्यात येत होतं की तिथं अजूनच मोठी खाण आहे. परंतु लोबेंगुलानं रस्ता द्यायला नकार दिला आणि उच्चायुक्त सर हेन्री लॉच यांनी अगदी आर्जवून सांगितल्याप्रमाणे

सैन्याच्या संरक्षणाखाली सुरुवातीसच सैन्याच्या तुकड्या पाठवल्या असत्या तर नवीनच सनद मिळालेल्या कंपनीच्या खजिन्यावर फार मोठा ताण पडला असता. ऱ्होड्सला ते काम 'स्वस्तात करायचं होतं.' परंतु अशा अवस्थेत सैन्यातील एक साहसी तरुण त्यांच्या मदतीला धावून आला. सैन्यातील तज्ज्ञांनी ४०० मैल लांब रस्ते किल्ले बांधण्यासाठी सांगितलेल्या खर्चापेक्षा एकदशांश खर्चात म्हणजे ८८,२८५ पौंडात (नंतर ९०,५००) ते काम करून द्यायचं कंत्राट सादर केलं. एवढ्या रकमेत मशोनालँडमधे नागरी सरकार काम करू शकेल अशा रातीनं १ ऑक्टोबर १८९०पर्यंत तो रेल्वेमार्ग विकसित करून देणार होता. [लेफ्टनंट कॉलनल फ्रँक जॉनसन, डी.एस.ओ., *ग्रेट डेज,* जी. बेल अँड सन्स लि. लंडन, (१९४०), पृष्ठ १०६] हा तरुण होता फ्रेंक जॉन्सन. या कथानकात त्याच्याबद्दल यथावकाश आपल्याला अजून ऐकायला मिळणार आहे.

अंधश्रद्ध मेटॅबोलेंवर कधीकधी दरारा निर्माण करण्यासाठी दूरनियंत्रणाद्वारे भूसुरुंग उडवून, प्रखर प्रकाश झोताचे दिवे लावून सुसज्जित झालेल्या १७९ लोकांच्या तुकडीनं ३०० पोलिसांसह २७ जून १८९०ला बेछुलीलँड ओलांडून ९० दिवसांच्या ठराविक मुदतीत माऊंट हॅम्पडन येथे प्रवेश केला. हे ठिकाण त्या प्रदेशाचं भविष्यातील केंद्र बनणार होतं. लोबेनगुलाचे सैनिक त्यांच्या प्रकाश झोताच्या दिव्यांना आणि सुरुंगांना घाबरले. 'चेटकाला' एकाहून अधिक 'सूर्यांना' रात्रीच्या काळोखात 'डोळे दिपतील' अशा रीतीनं प्रकाशायला लावू शकणाऱ्या आणि धरणीकंप घडवून संपूर्ण : 'झोपडी मावू शकेल एवढं मोठं जमिनीला छिद्र' पाडू शकणाऱ्या 'गोऱ्या जादुगारा' विरुद्ध ते काय करू शकणार होते? एक भक्कम किल्ला बांधण्यात आला व ११ सप्टेंबर १८९०ला कामाची सुरुवात करणाऱ्या लोकांनी तिथं युनियन जॅक फडकवला व त्याचं नाव ब्रिटिश प्रधानमंत्र्याच्या नावावरून सॅलिसबरी असं ठेवलं.

लोबेनगुला अजूनही मेटॅबोलेलँडचा राजा होता. ऱ्होड्सनं अशी काही 'घटना' घडवून आणायचा कट रचला की त्यामुळे त्याचं राज्य खालसा करायला निमित्त मिळालं. सनद मिळालेल्या कंपनीनं तक्रार केली की तिची तारायंत्राची ५०० यार्ड तार चोरीला गेली आहे व गुन्हेगाराला शिक्षा करायची तिनं मागणी केली. लोबेनगुलानं मशोनांच्या विरुद्ध कारवाईला

सुरुवात केली तेव्हा त्याला निर्वाणीचा इशारा देण्यात आला व त्याच्या सीमेवर सैन्य गोळा करण्यात आलं. आपल्या देशाला हल्ल्यापासून वाचवण्यासाठी लोबेनगुलानं आपल्या इंडुनांना उच्चायुक्तांनी आश्वासिलेल्या सुरक्षेत केपटाऊन येथे पाठवलं. परंतु त्यांनी सीमा ओलांडताच त्यांना 'चुकीनं' अटक करण्यात आली व ऱ्होड्सच्या माणसांनी त्यांना पुढं जाण्यापासून अडवलं. त्यांच्यापैकी दोघांना 'निसटायचा प्रयत्न करत असताना' गोळ्या झाडून ठार मारण्यात आलं व तिसऱ्याचा पुन्हा कधीच ठावठिकाणा लागला नाही. [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ २३६ ब्रिटिश साऊथ आफ्रिकन कंपनीचे नोकरही त्यांच्या मालकापेक्षा स्वतःच्या मनाला नैतिकतेच्या प्रश्नानं फार त्रस्त करणारे नव्हते. काही दिवसांनी ऱ्होड्सच्या सैनिकांनी त्याचा प्रदेश जिंकल्यानंतर लोबेनगुलानं दोन युरोपिअन सैनिकांना शरणागतीचं चिन्ह म्हणून काही रक्कम उच्चायुक्तांना देण्यासाठी दिली होती. परंतु ती त्यांनी हडप केली. नंतर चौकशी केल्यानंतर ही बाब उघडकीस आली व त्या सैनिकांना शिक्षा करण्यात आली होती. परंतु असे प्रकार सार्वत्रिक होते. (पहा बेसिलं वुइल्यम्स यांचं सेसिल ऱ्होड्स, पृष्ठ १७८)] डॉ. जेम्सन यांच्या नेतृत्वात दारूगोळा आणि मशीनगन यांनी सुसज्ज असलेल्या सैन्याला लोबेनगुलावर हल्ला करायला पाठवण्यात आलं. व्हाईटहॉलमधून त्याला अडवणारा काही निरोप आला तर निरोप आणणारास आपण दिसू नये म्हणून जेम्सन सीमेपलीकडे पोहोचेपर्यंत ऱ्होड्स झुडुपात लपून बसला. डिसेंबर ११, १८९३ला त्यानं बुलावायोत तुकडीसह प्रवेश केला आणि लोबेनगुलाचं क्राल जिथे होतं त्या क्रालच्या राखेत उभा राहून मेटॅबोलेलँडच्या 'विजेत्यांसमोर त्यानं भाषण दिलं.' आफ्रिकेच्या स्वातंत्र्यासाठी धडपडणारा अखेरचा राजा विजनवासात देवीमुळे आलेल्या फणफणणाऱ्या तापानं एका गुहेत जानेवारी २४, १८९४ला मरण पावला. [केप कॉलनीच्या प्रधानमंत्रीपदी काही दिवस असलेले जॉन झेवियर मेरीमन यांनी काही दिवसांनंतर केप कॉलनीच्या दुःखद प्रकरणाचं असं वर्णन केलं : 'काही व्यक्ती उत्तरेकडे गेल्या व त्यांनी दुर्दैवी राजाकडून कागदावर सही करून घेतली, कदाचित सही केली त्यावेळी ते प्यालेला असावा. तो माणूस इंग्लंडला गेला व तो सवलतीचा कागद ड्यूक, लॉर्ड व राजघराण्यातील लोकांना विकला. त्यांनी एक सनदप्राप्त कंपनी तयार केली. त्यांच्या असंही ऐकिवात आलं की राजा उडाणटप्पू होता व नंतर संस्कृतीच्या शक्तींनी त्याच्या साधनांचा त्याच्याविरुद्ध उपयोग केला. सध्या या देशाला दोन कंपन्या चालवतात - डी बीअर्स कंपनी आणि सनदप्राप्त कंपनी. ह्या देशात भरपूर साधनसंपत्ती असली तरी हा देश गरीब आहे.....' (*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी २, १८९५)]

केपकॉलनी आणि नाताळ यांच्यामधे पॉन्डोलँड आहे. त्या भागातील ते अखेरचं 'नेटिव्हांचं' स्वतंत्र राज्य होतं. काही आठवड्यांनंतर पांढऱ्या रंगाचे आठ घोडे लावलेल्या एका घोडागाडीत बसून मशीनगन व आठ पोलीस घेऊन ऱ्होड्स तिथं गेले आणि तिथल्या राजाला, सिग्काऊला

त्यानं बोलावलं आणि त्याला सांगितलं की तुझ्या माणसात राज्य करायची पात्रता नाही व त्यामुळे तुझं राज्य खालसा करण्यात येत आहे. त्याला धडा शिकवण्यासाठी ऱ्होड्स त्याला रणांगणात घेऊन गेले.

ऱ्होड्सच्या आदेशानुसार तिथल्या उंच वाढलेल्या मक्यावर एकाएकी मशीनगननं गोळ्यांचा मारा सुरू केला. त्यामुळे तो मका अशा रीतीनं खाली कोसळला की जणू एखाद्या भूतानं विळा घेऊन संपूर्ण शेताची सोंगणी करावी. घाबरलेल्या राजाकडे पाहत.... ऱ्होड्स म्हणाला की तू जर आम्हाला त्रास दिला तर तुझीही अवस्था अशीच होईल. [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ २४०]

सिग्काऊनं तो प्रदेश सोडून दिला.

## १०

लोबेनगुलाचा देश ताब्यात घेतल्यानंतर ऱ्होड्सनी लोबेनगुलाच्या मुलांना 'नेटिव्हांच्या' शाळेत पाठवलं. त्यांच्यापैकी एकाला त्यानं वैयक्तिक नोकर म्हणून 'कपडे धुण्यासाठी, भांडी विसळण्यासाठी व बूट पुसण्यासाठी कामावर ठेवलं.' [सारा गरट्रूड मिलान, ऱ्होड्स, पृष्ठ १६] तारखेची आठवण करत ऱ्होड्सनी मुलाला विचारलं 'मी तुझ्या बापाला कोणत्या वर्षी मारलं होतं?' त्यानं न्जुबीला, मुख्य वारसाला बोअर युद्धाच्या वेळी मेटॅबोलेलँडमधे अशांतता निर्माण झाली असता राज्यापासून दूर ठेवलं. ५० पौंड आणि किम्बर्लीमधील नेटिव्हांचं असतं तसं घर देऊन ऱ्होड्सनं त्याला फेंगू जमातीच्या मुलीशी लग्न करायला लावलं व त्यामुळे जमातीतील त्याचं जमातप्रमुखाचं पद गेलं कारण फेंगू हे चाकानं निर्वासित केलेल्या लोकांचे वंशज होते. ते झोआसकडे 'फेंगुझिला' म्हणजे आम्ही अडचणीत आहोत असं म्हणत रडत आले होते त्यामुळे त्यांना घृणेनं झोआसनं ते नाव दिलं होतं. त्यांना हलक्या जातीचं समजण्यात येत असे. आफ्रिकेत भंग्याचं काम करणाऱ्या व आजही जोहान्सबर्गच्या खाणीत ते काम करत असलेल्या बाकांच्या एकमेव जमातीपेक्षा थोडीशीच वरची ही जमात होती. ऱ्होडेशियाच्या प्रशासकांना ऱ्होड्सनी तार

केली : ‘साम्राज्य आणि वासना यांच्यात न्जुबी गुंतलेला होता.... बुलावायोत बसून कटकारस्थानं करत राहून तुमच्या पाठीत खंजीर खुपसू देण्यापेक्षा त्याला किम्बर्लीत बसवून कुटुंबाकडे लक्ष द्यायला लावलं तर ते बरं होईल.’ [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ६२]

मेटॅबोलेलँडमधील मोहिमेसाठी स्वयंसेवकांना पुढील अटींवर नेमण्यात आलं होतं : ‘लूट दोन भागात वाटण्यात येईल. अर्धा भाग ब्रिटिश साऊथ आफ्रिका कंपनीचा असेल आणि उरलेला अर्धा भाग कर्मचारी आणि अधिकारी यांच्यात समान प्रमाणात वाटण्यात येईल.’ [फेलिक्स ग्रॅास, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ २३५] लोबेनगुलाच्या मृत्यूनंतर देशातील सर्व गुरंढोरं सिंहासनाची संपत्ती मानून, वास्तवात ती कुणाच्या मालकीची आहेत याचा शोध घ्यायचा प्रयत्न न करता, कंपनीनं ताब्यात घेतली. मेटॅबोलेंची सर्व जमीन ताब्यात घेण्यात आली, त्यांच्या झोपड्या वसाहतवाल्याना जागा मिळावी म्हणून जाळून टाकण्यात आल्या व त्यांचे सर्व मालकीहक्क काढून घेण्यात आले. केवळ दोन मेटॅबोलेंकडे मालकीहक्क, राहिले कारण त्यांनी कंपनीकडून बागायती भूखंड विकत घेतले होते. सुपीक जमीन, पाणी, आणि शिकार यापैकी काहीही उपलब्ध नसलेल्या व तापाची साथ सतत सुरू असलेल्या प्रदेशातील सर्वात वाईट भागात ‘वस्तीसाठी’ त्यांना देण्यात आला आणि घरंदारं, सुपीक भूमीपासून वंचित करण्यात आलेल्या मेटॅबोलेंच्या समुहांना उपासमार, आजार यांच्या वातावरणात कोंबण्यात आलं होतं. काही काळानंतर एका ब्रिटिश अधिकाऱ्यानं त्या ठिकाणाचं वर्णन ‘वस्ती असं न करता स्मशानभूमी’ असं केलं होतं. लोकांवर ‘झोपडी कर’ लावल्यानंतरही त्यांना काम करायला प्रवृत्त करता येऊ शकत नाही असं आढळल्यानंतर काम करायची सक्ती करणारी व्यवस्था निर्माण करण्यात आली. एका ब्रिटिश रेसिडंटनं कालांतरानं त्या व्यवस्थेचं वर्णन ‘गुलामगिरीचं दुसरं रूप असलेली श्रमव्यवस्था’ असं केलं. [फेलिक्स ग्रॅास, ऱ्होड्स ऑफ आफ्रिका, पृष्ठ ३२९]

आत्यंतिक नैराश्याकडे ढकलले गेल्यामुळे उपासमार होत असलेल्या मेटॅबोलेंनी बंड केलं. ‘तुम्ही मेटॅबोलेंना संपवू शकाल. पण त्यांना तुम्ही कुत्रे करू शकणार नाही असं एका म्हाताऱ्या जमातप्रमुखानं ऱ्होड्सला सांगितलं होतं. ते शब्द आठवत ऱ्होड्सनं वैफल्यग्रस्त होऊन

आपलं पुढील धोरण जाहीर केलं : 'निग्रोंपेक्षा मी जमीन पसंत करतो.' त्याच्या सैन्याला शक्य तेवढ्या आफ्रिकींना मारायचा व कोणालाही बंदी बनवू नये असा आदेश होता. प्रत्येक झटापटीनंतर तो आपल्या सेनाधिकाऱ्यांना विचारायचा, 'किती नेटिव्ह मारले गेले?' त्यांच्यातील एकानं एकदा उत्तर दिलं, 'फार कमी साहेब, त्यांनी शस्त्र टाकली, ते गुडघ्यावर टेकले आणि आम्हाला दयेची भीक मागू लागले.' ऱ्होड्स त्यांना फटकारत म्हणाले, 'ठीक आहे, तुम्ही त्यांना सोडायला नको होतं. तुम्हाला शक्य असेल तेवढ्यांना तुम्ही मारायला पाहिजे होतं. त्यामुळे ते धडा शिकले असते.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका,* पृष्ठ ३३२] एका नेटिव्ह प्रमुखाविरुद्धच्या हल्ल्यात घोड्यावर बसून हातात चाबूक घेतलेल्या ऱ्होड्सनं स्वतः पुढाकार घेतला व जळत्या झोपड्यातून निसटायचा प्रयत्न करणाऱ्या सर्वांना मशिगनच्या गोळीबारानं मारून टाकायची ऱ्होड्सनं खबरदारी घेतली.

गोऱ्यांच्या कत्तल करणाऱ्या बंदुकांसमोर टिकाव न धरू शकल्यामुळे मेटॅबोले मोठ्या संख्येत पर्वतीय प्रदेशात आणि जंगलात निघून गेले व आपल्या मुलांना आणि बायकांना त्यांनी माटोपा पर्वताच्या दऱ्यात पाठवलं. त्यांच्या माणसांना शरण यायला भाग पाडण्यासाठी ऱ्होड्सनं त्यांच्या गुहांना बारुदीनं उडवून द्यायचा प्रयत्न केला पण त्याचाही उपयोग झाला नाही. या लोकांना सैनिक शक्तीनं शरण आणणं सनदप्राप्त कंपनीच्या शक्तीच्या - माणूसबळ व पैशाच्या दृष्टीनं - बाहेरची गोष्ट आहे हे ऱ्होड्सच्या लक्षात आलं. त्यांच्या चिवट प्रतिकाराचं कारण त्यांची निराशा आहे हेही त्याला जाणवलं. त्यांमुळे ऱ्होड्सनं त्यांच्याशी शांततेची बोलणी सुरू केली. त्यासाठी त्यानं त्यांच्या तक्रारी दूर करायचं आश्वासन दिलं. सारा गरट्रूड मिलान यांनी यावर भाष्य करताना लिहिलं, 'शांतता प्रस्थापित झाली. मेटॅबोले शांतता टिकवतील. त्याशिवाय त्यांच्याजवळ टिकवण्यासारखं फार कमी आहे.' बंडानंतर मेटॅबोलेप्रमुखाचा जो फोटो घेतला होता त्याचं वर्णन करत त्या लिहितात :

*नायकांचे नग्न देह चमकत नाहीत, लढायचा हव्यासही त्यांच्यात उरलेला नाही.... परंतु हाडं,... खप्पड गाल... शिणलेलं शरीर... अगदी पहिल्याच मालकापासून नव्हे तर चौथ्या पाचव्या*

*मालकाकडून विकत घेतलेला लांब कोट, जॅकेट... शहरातील परवाना कार्यालयासमोर गर्दी करणाऱ्या आणि आपल्याला कोणता आजार आहे की काय याची तपासणी व्हायची वाट पाहत असणाऱ्या धुरकट आणि उदास नेटिव्ह माणसांपेक्षा काही ते चांगले दिसत नाहीत. काम न मिळाल्यास आपल्या क्रालमध्ये परतणं त्यांना भाग पडत असतं.*

*फोटोतील म्हातारे नायक जमिनीवर वाकून बसलेले आहेत. नायकांच्या चेहऱ्यावर त्यांच्या कपड्याप्रमाणेच टाकून दिल्याची भावना आहे. त्यांची मनं त्यांच्या कपड्याप्रमाणेच अर्ध रानटी आणि अर्ध सुसंस्कृत आहेत. भूतकाळ नष्ट झालेला आहे व कोणतंच भवितव्य त्यांना उरलेलं नाही.* [सारा गरट्रूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ ३१४]

काही वेळा असं सांगण्यात येत असे की आफ्रिकेतील काळ्या माणसांनी एकमेकांशी जे वर्तन केलं त्यासमोर गोऱ्या माणसांनी काळ्या लोकांशी केलेलं वर्तन काहीच नाही व गोऱ्या माणसाची भूमिका संस्कृतीच्या मिशनरीची होती. परंतु स्वतः आफ्रिकी लोकांना यासंबंधी काय वाटत होतं ते पाहणं योग्य होईल.

ज्या करारामुळे ब्रिटिशांची सत्ता लोबेनगुलाच्या राज्यावर प्रस्थापित झाली त्या कराराची बोलणी चालू असताना वेळेचीच ही घटना आहे. बछुआनाचा सर्वात प्रमुख राजा खामा (तिसरा) हा महान काळ्या राज्यातील शेवटचा राजा होता व तो सेरेट्से कामाचा आजोबा होता. त्याचं लग्न एका इंग्रज मुलीशी झाल्यामुळे बामांग्वाटू जमातीत वादळ निर्माण झालं होतं व संरक्षणासाठी इंग्रजांची मदत मागावी की काय असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण झाला. परंतु गोऱ्या माणसाच्या संस्कृतीच्या परिणामांची भीती वाटत असल्यामुळे त्यानं सर सिडने शेफर्ड यांना असं पत्र लिहिलं:

*जेव्हा लोबेनगुलाच्या वडिलांजवळ नाताळमधील मोठे शूरवीर लोक होते तेव्हा मी लढलो. आणि त्याला मी माघार घ्यायला लावली.... तरीही ब्रँडीपेक्षा लोबेनगुलाला मी कमी घाबरतो.... गोऱ्या माणसानं आणलेल्या या पेयाची मला मेटॅबोलेंच्या सर्व शस्त्रसामग्रीपेक्षाही अधिक भीती वाटते. त्यामुळे माणसाच्या शरीराचा मृत्यू होतो व तो लवकर संपतो.* [सारा गरट्रूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ १०३]

आम्हाला असं सांगण्यात आलं आहे की मसोलीलँड काबीज केल्यानंतर ऱ्होड्सच्या बिनीच्या लोकांनी सॅलिसबरीत जी 'पहिली वॅगन नेली होती तिच्याप्रमाणेच बुलावायो येथे जी पहिली खाजगी वॅगन गेली तीही व्हिस्कीनं भरलेली होती.' [सारा गरट्रूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ ११९]

सनदेसाठी अर्ज करताना अर्जदारांनी इतर गोष्टींबरोबरच 'त्या प्रदेशात राहणाऱ्या नेटिव्ह लोकांच्या आर्थिक परिस्थितीत भरपूर सुधारणा होईल व त्याच्या संस्कृतीचा विकास होईल' असं आश्वासन दिलं होतं. फेलिक्स ग्रॅास यांचं म्हणणं आहे की गोऱ्या लोकांचा संस्कृतीचा जो अर्थ होता त्यानुसार प्रगती करायची भरपूर संधी मेटॅबोलेंना होती. तो अर्थ होता : 'गुप्तरोग, दारू, वेठबिगारी, कर, दुष्काळ, वेश्याव्यवसाय, बाहेरख्यालीपणा, शारीरिक अधःपात, पैशाची हाव आणि भ्रष्टाचार.' [फालक्स ग्रास, *ऱ्होड्स आफ आफ्रिका*, पृष्ठ २४२]

ऱ्होड्स केपचे प्रधानमंत्री झाल्यानंतर फटक्याच्या विधेयकाला संसदेची मंजुरी मिळवायचं काम त्यांनी सर्वात आधी केलं. या विधेयकानुसार नेटिव्ह स्त्री-पुरुषांना न्यायालयांना 'अगदी लहानसहान गुन्ह्यासाठीही फटक्याची शिक्षा सुनावण्याचा अधिकार मिळणार होता.' [फेलिक्स ग्रॅास, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ २१७] बोअर शेतकऱ्यांना खूश करण्यासाठी असं करण्यात आलं. परंतु या विधेयकाचं कायद्यात रूपांतर झालं नाही. पॅाडोलँड काबीज केल्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजे लोबेनगुलाचा प्रदेश ज्या महिन्यात सनद मिळालेल्या कंपनीला जोडण्यात आला त्या महिन्यात ग्लेन ग्रे विधेयक सादर करण्यात आलं. या विधेयकाचं नाव प्रसिद्ध काई नदीच्या दक्षिणेला असलेल्या ग्लेन ग्रे जिल्ह्यावरून - जिथं हा कायदा अंमलात आणला गेला होता - ठेवण्यात आलं होत. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणारे युद्ध, दुष्काळ आणि आजार हे घटक पूर्वीएवढे प्रभावी न राहिल्यामुळे नेटिव्ह भरमसाट वाढत होते. परंतु गोरा माणूस निगरांऐवजी जमीन पसंत करत होता. वाढत्या निग्रोंच्या लोकसंख्येचं काय करायचं? त्यांच्या समूळ नाशाचा प्रश्न विचारात घेता येत नव्हता कारण गोऱ्यांचं नेटिव्ह मजुरांशिवाय भागू शकत नव्हतं. नेटिव्हांपासून सुटकाही व्हावी आणि त्यांचा उपयोगही करून घेता यावा यासाठी काय करावं ही गोऱ्या माणसासमोरील समस्या होती.

'नेटिव्हांच्या वरवर सोडवण्यास कठीण दिसणाऱ्या त्या समस्येचं' ग्लेन ग्रे कायदा हे ऱ्होड्सनं दिलेलं उत्तर होतं. ६०० एकर जमीन मोजून तिचे लहान लहान ७० भूखंड तयार करण्यात आले होते. ते 'नटिव्हांसाठी आरक्षित क्षेत्र' असल्याचं घोषित करण्यात आलं. नेटिव्हांनी जर ती जमीन लागवडीखाली आणली नाही तर ती जमीन परत घेण्यात येत असे. त्या जमिनीवरील हक्क अहस्तांतरणीय होता. जमिनीची वारसात वा मालकात वाटणी होऊ शकत नसे. तिची मालकी आईवडिलांच्या पहिल्या अपत्याकडे जात असे. लहान मुलांना दुसरीकडे काम शोधणं भाग पडत असे. प्रत्येकाला गोऱ्या माणसासाठी वर्षातून तीन महिने काम करणं सक्तीचं होतं. जे काम करणार नसतील त्यांच्यावर कर लावण्यात येत असे. उद्योगाला 'थोडंसं प्रोत्साहन देण्यासाठी' व 'श्रमप्रतिष्ठा वाढवण्यासाठी' हा कर लावण्यात आला असल्याचं सांगण्यात यायचं. निग्रोंचे कनवाळू आणि इतर अव्यवहारी भावूक लोक युरोपिअन व्यापारी प्रतिष्ठानात आणि जोहान्सबर्ग आणि किम्बर्ली येथील हिऱ्यांच्या वा सोन्याच्या खाणीत काम न करू इच्छिणाऱ्या निग्रोंवर उगारलेला हा चाबूक आहे असं या नियमाबद्दल म्हणून स्वतःला खूश करून घेऊ शकत होते.

आरक्षित क्षेत्रांमुळे नेटिव्हांना स्वतःची काळजी घेणं शिकता येईल, ते स्वतःचे रस्ते व पूल बांधतील, स्वतःची जंगलं वाढवू शकतील, स्वतःवर कर बसवू शकतील व स्वतःच्या शिक्षणाची व्यवस्था करू शकतील. त्यांना मद्यपान करता येणार नाही कारण त्यामुळे खाणीवर काम करणाऱ्या मजुराची काम करायची क्षमता कमी होते. युरोपिअन लोकांना त्या वस्तीत राहायची परवानगी नसेल. संस्कृतीच्या वेगवेगळ्या पातळ्यावरील वंशांच्या लोकांच्या संकरामुळे संस्कृतीच्या विकासात समस्या निर्माण होतात. व्हॅन डर केम्पस वा डॉ. जॉन फिलिप्स यांच्यासारख्या लोकांना हॉटेन्टॉट लोकांच्या प्रेमामुळे यापुढे आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घ्यायची अनुमती देता येऊ शकणार नाही. तसंच त्या लोकांना आरक्षित क्षेत्रातील शांततेचा भंग करायची अनुमती देता येऊ शकणार नाही.

'आम्हाला गुलामांची जेव्हा गरज असते तेव्हा ते आम्ही ते मिळवतो' सातत्यानं श्रमपुरवठा व्हावा म्हणून डचांनी योजलेला हा उपाय होता. एकोणिसाव्या शतकाच्या परंपरांचा परिणाम होऊन त्यांचे वसाहतदार वंशज त्यांच्याही एक पाऊल पुढं गेले. त्यांनी तसं अप्रत्यक्षपणे केलं. नेटिव्हांच्या आरक्षित क्षेत्रात नेटिव्हांना आपली संख्या कितीतरी पटीनं वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यायचं व त्याद्वारे त्यांना सतत स्वस्त आणि नियंत्रित श्रमपुरवठा व्हायचा..

ऱ्होड्स या विधेयकाला आफ्रिकेचं विधेयक म्हणायचा. त्याला ग्लेन ग्रेमधे जर यश मिळालं तर ते संपूर्ण काळ्या आफ्रिकेला लागू करण्यात येणार होतं. आज दक्षिण आफ्रिकेत एकूण क्षेत्रफळाच्या अशा आरक्षित क्षेत्रांचं प्रमाण १३ टक्के आहे. वेगळ्या शब्दात पाच कोटी लोक १३ टक्के जमिनीवर राहतात तर उरलेले दोन कोटी युरोपिअन ६७ टक्के जमिनीवर राहतात.

**११**

सॅलिसबरी येथे ज्या वर्षी ब्रिटिशांचा ध्वज फडकला त्यावर्षी हॉफमायरनी ऱ्होड्ससाठी राजीनामा दिल्यामुळे सदतीस वर्षांच्या ऱ्होड्सनी केप सरकारच्या प्रधानमंत्रीपदाची सूत्र हाती घेतली. (जुलै १८९०) केवळ वार्षिक दोन हजार पौंडावर ऱ्होड्सनी दोन हजार मैल क्षेत्रफळाच्या बारोत्सेतील खाणी आणि व्यापार यावरील अधिकार आधीच मिळवलेले होते. (जून १८९०). काही महिन्यांनंतर (सप्टेंबर १३, १८९०) त्यांनी परत १००० मैल क्षेत्रफळाच्या मनिकालँडवरील अधिकार वार्षिक १०० पौंडात मिळवले. डी. बीअर्स अँड कंसोलिडेटेड गोल्डफिल्ड्सचा आजीव अध्यक्ष आणि सनदप्राप्त कंपनीचा हा प्रबंध संचालक अनेक वर्षे कोट्यवधी वा त्याहूनही अधिक पौंडांची संपत्ती मिळवत होता. आपलं केप ते कैरोचं स्वप्न पूर्ण करायच्या दृष्टीनं ऱ्होड्सनी आता संपूर्ण दक्षिण आफ्रिकेवर आपला प्रभाव निर्माण करायला सुरुवात केली.

आतापर्यंत नशीब त्यांच्या बाजूनं होतं. नाताळला १८९३ साली स्वराज्याचे अधिकार देण्यात आले. पिटरमारिट्झबर्ग येथील नवीन मंत्रिमंडळानं आर्थिक संघराज्याच्या कल्पनेला पाठिंबा दिला. महाराणीच्या सरकारनं युगांडाला संरक्षित क्षेत्र घोषित केलेलं होतं. ट्रान्सवाल समुद्रापासून तोडला गेलेला होता. कांगो फ्री स्टेटनं आपल्या सरहद्दीतून लेक टांगानिकापर्यंत जाण्यासाठी मार्ग दिलेला होता.

परंतु यानंतर मात्र नशिबानं ऱ्होड्सची साथ सोडली. बेल्जियमच्या लिओपाल्ड राजावर फ्रान्सनं दडपण आणलं. त्यांनी रेल्वेमार्गासाठी दिलेली परवानगी नाकारली. ऱ्होड्सला वाटत होतं की पूर्वेकडे मोझांम्बिक आणि दक्षिणेकडे नाताळ यांनी घेरून पॉल क्रुगरची त्यांच्याच क्रालमधे कोंडी करता येईल. परंतु ऱ्होड्सना ब्रिटिश सरकारनं कळवलं की लिस्बननं परवानगी जरी दिली तरी डेलागोआ बेट न द्यायचा बर्लिननं निर्धार केलेला आहे. (जून १८९४). अशा रीतीनं केप ते कैरोच्या संपूर्ण ब्रिटिश मार्गाची कोंडी झाली व क्रुगरच्या गळ्याभोवती आवळल्या जाणाऱ्या फासातून क्रुगर निसटले. मशोनालँडमधे दुसरी मोठी खाण सापडायची आशा फलद्रूप झाली नव्हती. (सप्टेंबर, १८९४). सनदेप्राप्त प्रदेशातील प्रशासनात कंपनीचा निधी शोषला जात होता व कंपनीच्या समभागांचे जे भाव ३ पौंड १० शिलिंगवर पोहोचले होते ते १० शिलींगवर उतरले आणि त्या भावातही कोणी ते समभाग घ्यायला तयार नव्हता. ऱ्होड्सला त्याच्या कंपनीसाठी जर जोहान्सबर्ग येथील पिवळी धातू हडप करता आली असती, जसं त्यानं किम्बर्ली येथे हिऱ्यांच्या बाबतीत केलं होतं, तर पुन्हा त्याची आणि त्याच्या कंपनीची गाडी रुळावर येऊ शकली असती.

पुरातन काळातील मोझेसप्रमाणे क्रुगर त्यांच्या मार्गात आडवे येऊन उभे राहिले. ऱ्होड्सनी ट्रान्सवाल गणराज्याच्या अध्यक्षाला लाच देऊन आपल्या बाजूनं वळवायचा प्रयत्न केला. ऱ्होड्सनं विनंती केली, 'आपण सोबत राहून काम करायला पाहिजे. गणराज्याला बंदराची गरज आहे हे मला माहीत आहे. तुम्हाला डेलागोआ बेट मिळायलाच हवं.'

क्रुगर विरोध करत म्हणाले, 'ते बंदर पोर्तुगीजांच्या ताब्यात आहे. ते ते बेट देणार नाहीत.'

‘मग आपण ते घ्यायला पाहिजे.’

पापभीरू म्हातारा कडाडला, ‘दुसऱ्याची संपत्ती आपण घेऊ शकत नाही. पापाच्या मार्गानं मिळवलेल्या संपत्तीमुळे देव शाप देतो.’

ऱ्होड्सची अशा प्रतिस्पर्ध्याशी गाठ पडली होती ज्याची फसवणूक करता येत नव्हती, ज्याच्यावर दादागिरी करता येत नव्हती आणि ज्याला विकतही घेता येत नव्हतं. आतापर्यंत त्यानं शांतपणे मुत्सद्दीपणाचा मार्ग अवलंबिला होता. त्याला अपेक्षा होती की क्रुगरला त्याचेच बांधव सत्ताच्युत करतील. परंतु १८९२च्या निवडणुकात ते तिसऱ्यांदा निवडून आले. ऱ्होड्सचा धीर सुटला. त्याला घाई होती. त्याची स्वतःची प्रकृती ढासळत होती. फार काळ जगायची आशा नाही असं त्याला त्याच्या डॉक्टरांनी सांगितलेलं होतं. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याचं स्वप्न आपल्या आयुष्यातच वास्तवात यावं असं वाटत असल्यास बळाचा वापर करणं त्याला भाग होतं. क्रुगरला उलथवण्यासाठी बळजबरीनं राज्यक्रांती घडवून आणायच्या महाकटाचा ऱ्होड्स विचार करू लागला.

१८२५ साली जन्मलेले स्टिफॅनस जोहानेस क्रुगर हे अनेक बाबतीत ऱ्होड्सच्या अगदी विरुद्ध होते. दोनदा लग्न झालेले आणि सतरा मुलांचे वडील असलेले क्रुगर कडवे ख्रिश्चन होते. त्यांना जुना करार पाठ होता व रोज एक तास ते त्याचं वाचन करायचे. त्यांना विज्ञानाची काहीच माहिती नव्हती. कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे गाडी उलटून आपण त्यातून पडू या भीतीनं एकदा त्यांनी मोटारगाडीत बसायला विरोध केला होता. त्यांचं ठाम मत होतं की पृथ्वी सपाट आहे. त्यांना जेव्हा सांगण्यात आलं की ती गोल आहे तेव्हा ते विस्मयचकित होत उद्गारले, ‘थांब, थांब! तू जे सांगतोस ते खरं असेल तर मला कदाचित माझं बायबल फेकून द्यावं लागेल.’ आधुनिक प्रगती त्यांना पसंत नव्हती. त्यांचा विश्वास होता की सर्व मानवी ज्ञान बायबलमध्ये सांगण्यात आलेलं आहे व त्यापुढील ज्ञानानं अश्रद्धाच निर्माण होईल.

त्यांच्या काही विचित्र श्रद्धा होत्या व ते त्यांना ठामपणे चिकटून होते. त्यांचा गाढ विश्वास होता की जुना करार शब्दशः सत्य होता आणि व जीवनातील भौतिक व आधिभौतिक अशा सर्व

प्रकारच्या गोष्टीत तो मार्गदर्शन करू शकत होता; की त्याचे लोक त्या निवडक वंशातील होते की ज्यांना विजयाकडे नेण्यासाठी त्यांना नेतृत्व करायचं होतं; की इतर वंशांचे लोक, विशेषतः रंगीत वर्णाच्या लोकांचा जन्म अपघातातून झालेला असून ते कनिष्ठ वर्णाचे आहेत व त्यांच्यात कोणत्याच प्रकारचे नियम नसल्यामुळे स्वर्गातील प्रवेशाच्या आश्वासनातून त्यांना वगळण्यात आलेलं आहे. ज्यू प्रतिनिधींचं प्रतिनिधिमंडळ त्यांना भेटायला गेलं असता त्यांनी सांगितलं की धार्मिक कारणासाठी जी जागा आरक्षित करण्यात येईल त्यातील उपासनास्थळातील चार भागांचा उपयोग करायचा अधिकार ख्रिश्चनांना राहील. ज्यू बायबलच्या निम्मे भागावरच श्रद्धा ठेवत असल्यामुळे त्यांना दोन भागांचाच उपयोग करायचा अधिकार राहील. ज्यूंच्या उपासनास्थळाचं उद्‌घाटन करण्यासाठी बोलावण्यात आलं असता देवळात जाताना उघड्या डोक्यानं जाऊ नये या नियमाकडे दुर्लक्ष करत त्यांनी तिथं जाताना डोक्यातील टोप काढला व उपासनास्थळाचं उद्‌घाटन करताना ते म्हणाले, 'आता चर्चचं उद्‌घाटन झाल्याचं आमच्या येशू ख्रिस्ताच्या नावानं घोषित करतो. आमेन !' [एफ. ऑडिंग्टन सिमन्ड, *द जोहान्सबर्ग स्टोरी*, फ्रेड्रिक मुलर लि. लंडन, (१९५३), पृष्ठ १२]

परंतु क्रुगर १० वर्षांचा झालेला असतानाच तो व्हुरट्रेकर झालेला होता. त्यानं पहिल्या सिंहाची शिकार तेराव्या वर्षी केली होती व सतरा वर्षांचा असताना झुलूंच्या बंदुकांचा त्याला सामना करावा लागला होता. कमावलेल्या शरीराचा, ६ फूट उंच शरीरयष्टी असलेला, अवाढव्य शक्ती आणि धैर्य असलेल्या क्रुगरनं आपल्या लहान बहिणीवर एक बिबटा उडी घ्यायच्या बेतात असताना साध्या हातांनी मारला होतं, व एक रानटी रेडा अंगावर आला असता त्याची शिंगं धरून त्याला ठार केलं होतं. एकदा एका गेंड्याशी लढत झाली असता त्याच्या बंदुकीचा त्याच्या हातातच स्फोट झाला व त्यामुळे त्याचा अंगठा तुटला. त्यावेळी त्यानं आपल्याच हातानं अंगठ्याचा लोंबकळणारा भाग कापून काढला, त्यातील शिरा जाळण्यासाठी त्याचा खुंट टर्पेंटाईनमधे धुऊन काढला व बकऱ्याच्या नुकत्याच उघडलेल्या पोटात तो हात खुपसला कारण त्याचं म्हणणं होतं की जखमा दुरुस्त करायचा तो सर्वात चांगला उपाय आहे.

शिक्षणापासून तो जवळपास वंचित झालेला होता. त्याच्या आईनं त्याला दिलेलं तीन महिन्यांचं शिक्षण हेच त्याचं संपूर्ण शिक्षण होतं. परंतु त्याला विलक्षण चाणाक्षपणाची आणि व्यवहारज्ञानाची देणगी मिळालेली होती. त्याबद्दलच्या अनेक दंतकथा सांगण्यात येत असत. एकदा वडिलांनी वारशात मागं सोडलेल्या शेतीच्या वाटणीसंबंधी दोन भावात एकमत होत नव्हतं त्यावेळी क्रुगरनं सांगितलं की लहान भावानं शेताचे दोन वाटे करावे आणि मोठ्या भावानं त्यातील एकाची निवड करावी. ग्रामीण चातुर्य व मानवी स्वभावाचं ज्ञान असल्यामुळे तो युरोपातील प्रशिक्षित मुत्सद्द्यांना युक्तिवादात मागं टाकत असे.

तो आपल्या देशावर व्हुरट्रेकरांप्रमाणेच उत्कटतेनं प्रेम करत होता. 'मला स्वातंत्र्य द्या वा मृत्यू द्या' या पॅट्रिक हेन्रीच्या बोधवाक्याचा बोअर भाषेत सुंदर अनुवाद करून व त्याला चांगली फ्रेम करून ती त्याच्या बैठकीत सुंदर पद्धतीनं लावण्यात आलेली होती. ते बोधवाक्य त्याच्यासाठी केवळ एक घोषणाच नव्हती. तो त्याचा श्वासोच्छ्वास होता. त्याला इंग्रजी चांगलं समजत होतं व बोलता येतं होतं असा संशय होता. परंतु तरीही त्याला त्याच्या मातृभाषेचा अभिमान असल्यामुळे आपल्याला इंग्रजी भाषा येते हे मान्य करायची त्याची तयारी नसायची. त्यामुळे भेटायला येणाऱ्या प्रत्येकाशी तो स्वतः आफ्रिकानार भाषेत बोलत असे व पाहुण्यांशी दुभाषाच्या माध्यमातून संवाद साधत असे.

असं सांगतात की त्याला इंग्रजीची इतकी घृणा वाटायची की त्याची तुलना 'सैतानाला पवित्र पाण्याची वाटत असणाऱ्या घृणेशीच करता यावी.' [जॉन क्लर्क रिडपाथ एल.एल.डी. आणि एडवर्ड एस. एलिस, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका*, वुइल्यम वॅटसन अँड कंपनी, लंडन (१८९९), पृष्ठ २१०] व्हूरट्रेकर म्हणून त्याला त्यांची घृणा करायला शिकवण्यात आलं होतं. ऱ्होड्सबद्दल त्याच्या मनात तीच तिटकाऱ्याची भावना होती कारण तो त्याला फाजील देशाभिमानाचं आणि 'दक्षिण आफ्रिकेच्या शापाचं मूर्त रूप समजत असे.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ १०२]

यशानं ऱ्होड्स सर्वांना तुच्छ समजत असे. ऱ्होड्सचं मत होतं की 'माणुसकी ही चांगली गोष्ट आहे परंतु पाच टक्के माणुसकी ही त्याहून चांगली गोष्ट आहे. तो तिचंच आचरण करत असे.

'प्रत्येकाची आपली एक किंमत असते' या रॉबर्ट वॉलपोलच्या वचनावर त्याचा विश्वास होता व त्यानं लाच द्यायच्या कलेला सुंदर रूप दिलं. तिचा उपयोग सरसकटपणे करण्यात त्याला यश मिळालं होतं व तसं करताना आपण काही चूक करतो असं ऱ्होड्सला वाटत नव्हतं. या कलेचा प्रयोग आपण राजघराण्यातील लोकांवर करतो की राजकीय पक्षावर करतो वा शासन प्रमुखांवर करतो याची त्याला अगदीच फिकीर नसायची. 'मला तुम्ही माणसाची महत्त्वाकांक्षा सांगा मी त्याला कसं वळवायचं ते सांगेन' हे त्याचं प्रसिद्ध वचन होतं. त्यानं राजकारणाला भ्रष्ट केलं, मतपेटीला पूर्ण विरोध केला आणि विवेकावर अत्याचार केला.

अशा प्रकारचे ऱ्होड्स आणि क्रुगर हे 'दोन इतिहासपूर्व दानवांप्रमाणे समोरासमोर आले. एक क्रूर, अनियंत्रित सत्ताकांक्षा असलेला आणि विवेकहीन होता तर दुसरा तेवढाच क्रूर, दणकट, रानटी व हुकुमशाही वृत्तीचा होता. क्रुगरच्या नजरेत ऱ्होड्स हा पैशानं येणाऱ्या सर्व दोषांचं मूर्त रूप होता – 'खोटं बोलणं, लाचलुचपत, धोकेबाजी, विवेक वा नैतिकतेचा विचार न करता गुंडगिरी, बाजारावर गैरमार्गानं ताबा मिळवणं. या सर्वातून मिळवलेल्या पैशाचा त्यानं इतका दुरुपयोग केला की त्या आधारे केलेल्या राजकारणाला घाण वास येऊ लागला.' [एच. सी. आर्मस्ट्रॉंग, *ग्रे स्टील*, मॅथ्यू अँड कंपनी लि., लंडन, (१९५१), पृष्ठ २२] ऱ्होड्सच्या दृष्टीत अध्यक्ष 'घाणेरडा, अशिक्षित डच म्हातारा होता. मागासलेला, जंगली आणि कोणतीही गोष्ट न ऐकणारा, अकाली जन्माला आलेला, मोझेसच्या गतेतिहासाच्या काळात वावरणारा होता. त्याला वाटेतून दूर करणं जरुरीचं आहे असं ऱ्होड्सचं मत होतं.' [एच. सी. आर्मस्ट्रॉंग, *ग्रे स्टील*, मॅथ्यू अँड कंपनी लि., लंडन, (१९५१), पृष्ठ २३]

दक्षिण आफ्रिकेतील गणराज्यांचा चेहरा हिऱ्यांचा आणि सोन्याचा शोध लागल्यानंतर बदलून गेला होता. क्रुगर वाढत्या काळजीनं, अविश्वासानं आणि सावधगिरीनं ट्रान्सवालमध्ये येणाऱ्या अस्वस्थ, धनलोभी शहरी परदेशी लोकांच्या लोंढ्याकडे पाहत होता. त्यांची संख्या गतिशील नसलेल्या ग्रामीण बोअर लोकांपेक्षा वाढू लागलेली होती व ती गणराज्याला धोका पोहचवण्याच्या अवस्थेत जाऊ लागलेली होती. ट्रान्सवालमध्ये 'चविष्ट अन्नाचा घास' नजरेस पडला की त्यावर तुटून पडणारे आणि ट्रान्सवालमधील खनिज संपत्तीरूपी अन्न संपलं की हात

झटकन निघून जाणारे ते आसाव्होगल म्हणजे घाणेरडे गिधाडं आहेत असं तो म्हणायचा. त्याला एवढंच समाधान होतं की बोअरांच्या भागातील युटीलँडरांच्या या कामामुळे दिवाळखोरीच्या काठावर पोहोचलेल्या त्याच्या गणराज्याचं उत्पन्न जे १८८१ साली १६१,५९६ पौंड होतं ते १८८९ साली २,०८७,८५२ पौंड झालं. त्याच्या मते सोनं हे 'माणसाच्या हृदयाला सडवणाऱ्या कर्करोगाप्रमाणे होत' [एच. सी. आर्मस्ट्राँग, *ग्रे स्टील,* मॅथ्यू अँड कंपनी लि., लंडन, (१९५१), पृष्ठ २२] व परदेशी साहसी लोकांचे हे कळप 'घाणेरडा वास मारणाऱ्या भ्रष्टाचारापेक्षा काही कमी वाईट नव्हते.' 'देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांच्यापासून गंभीर धोका आहे' असं तो म्हणायचा. [एच. सी. आर्मस्ट्रॉंग, *ग्रे स्टील,* मॅथ्यू अँड कंपनी लि., लंडन, (१९५१), पृष्ठ २३]

एकदा तो म्हणाला होता की 'या देशात भरपूर पिवळी धातू असल्यामुळे या मातीच्या रक्षणासाठी तिच्या उत्कृष्ट प्रतीच्या हजारो लोकांचा बळी द्यावा लागेल व अशाप्रकारे आमच्या भूमीच्या पोटातून काढण्यात येणारं प्रत्येक औंस सोन्याचं मूल्य अश्रूच्या नद्यांनी चुकवावं लागेल.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका,* पृष्ठ १३४ वर उद्धृत] त्याच्या डोळ्यांना आजुबाजूला जे दिसत होतं त्यामुळे त्याची भीती साधार असल्याचं सिद्ध होत होतं. जोहान्सबर्गमध्ये सर्व संपत्ती, सर्व सोनं युटीलँडरांच्या नियंत्रणात होतं. त्यांचीच दुकानं होती, क्लब होते व घोड्याच्या शर्यतीची मैदानं होती. तेच सर्वत्र मूल्यवान जमिनी, इमारती विकत घेत होते. उलट बोअर मात्र अधूनमधून बंद गाड्यातून येऊन आपला माल - कोंबड्या आणि अंडी व लाकडाचे ओंडके - श्रीमंत युटिलँडर्सना विकायचे आणि मूकपणे आपल्या शेताची वाट धरायचे. क्रुगरला झटपट श्रीमंत होऊ पाहणाऱ्या सोन्यासाठी खोदकाम करणाऱ्या लोकांची, सट्टेबाजांची, शहरी लोकांची नावानंच घृणा वाटायची. 'तुम्ही परदेशी लोक आज आलेले आहात. होय तुम्ही खोटारडे आहात, चोर आहात आणि खुनी आहात' असं एकदा तो त्यांच्याबद्दल जाहीर सभेत म्हणाला होता. तो जरी राजधानीपासून केवळ सदतीस मैल अंतरावरच राहत होता तरीही नऊ वर्षात तीन वेळाहून अधिक वेळा तिथं जायचा धीर त्याला होऊ शकला नव्हता. [सारा गरट्रूड मिलान, *ऱ्होड्स,* पृष्ठ २५१]

युटिलँडर लोकांपासून ताबडतोब संपूर्ण मुक्ती मिळावी अशी त्याची इच्छा होती. परंतु त्यांची जायची तयारी नसल्यामुळे ते त्याच्या देशात जे काही करत होते त्याची भारी किंमत वसूल करायचा त्यानं निर्धार केलेला होता. त्यानं खाणींवर प्रत्यक्ष कर लावला होता तसंच त्यासाठी दिलेल्या सवलती आणि एकाधिकाराच्या विक्रीवर जबर कर लावलेला होता. दारूच्या पुरवठ्यावर तसंच बारूदीच्या आयातीच्या अधिकारावर आणि सोन्याच्या खाणींचा व्यवसाय अवलंबून असलेल्या सायनाईडच्या निर्मितीवर सवलती देण्यात आलेल्या होत्या. भ्रष्टाचार लाचलुचपत यांचं प्रमाण गणराज्यातील अधिकाऱ्यात फार वाढलेलं होतं. जोपर्यंत समुद्रकिनाऱ्यापासून डेलागोआपर्यंतचा त्याचा रेल्वेमार्गाचा प्रकल्प पूर्ण होत नव्हता तोपर्यंत केप आणि नाताळ व खाणीना जोडणारा रेल्वेमार्ग बाधू द्यायची त्याची तयारी नव्हती. डिसेंबर १८९४मध्ये तो रेल्वेमार्ग तयार झाल्यानंतर केपटाऊन आणि नाताळहून होणारी मालवाहतूक आपल्या रेल्वेकडे वळवण्यासाठी त्यानं त्याच्या ३० मैलांच्या हद्दीतून खाणीकडे वा खाणींतून जाणाऱ्या मालावर जबर प्रतिबंधक कर लावला. युटिलँडर्सनी त्याबद्दल जेव्हा तक्रार केली तेव्हा त्यानं त्यांना सांगितलं की तुम्हांला माझे कायदे आवडत नसतील तर तुम्ही जाऊ शकता. तुम्ही थांबलात तर सिद्ध होईल की तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी लावलेले कर अन्याय्य नाहीत! [एफ. ॲडिंग्टन सिमन्ड, *द जोहान्सबर्ग स्टोरी*, फ्रेड्रिक मुलर लि. लंडन, (१९५३), पृष्ठ ११०]

जो कोणी विदेशी माणूस गणराज्यातील नियम-कायद्यांचं पालन करायला तयार असेल त्या 'प्रत्येक विदेशी माणसाला ट्रान्सवालमध्ये राहायची परवानगी असेल' असं ट्रान्सवालच्या घटनेत लिहिण्यात आलेलं होतं. क्रुगरनं निवडणूक नियमात संशोधन केलं. आधी विदेशी लोकांना केवळ पाच वर्षांपासून ट्रान्सवालमध्ये राहत असल्याचं आणि नाममात्र संपत्ती असल्याचं सिद्ध करावं लागत होतं. अगदी गरीब माणूससुद्धा ते सिद्ध करू शकायचा. परंतु आता नवीन नियमानुसार चाळीस वर्ष वय, कायम वास्तव्याचा परवाना मिळाल्यानंतर १० वर्षांचं वास्तव्य आणि एकूण चौदा वर्षांचं वास्तव्य या अमेरिकेतील संयुक्त संस्थानांच्या पद्धतीनुसार युटिलँडर लोकांना मतदानाचे संपूर्ण अधिकार मिळणार होते. याचा अर्थ आपल्या मूळ देशाचं नागरिकत्व त्यांना सोडावं लागणार होतं. युटिलँडर लोकांनी आपला मताधिकार काढून घेतला

जाण्याची तक्रार केली. प्रतिनिधित्वाशिवाय कर भरावा लागायची त्यांनी तक्रार केली. बारुदीचा एकाधिकार असल्यामुळे कमी प्रतीच्या सुरुंगाच्या बारुदीसाठी मोजाव्या लागणाऱ्या अधिक किमतीची त्यांनी तक्रार केली. त्यामुळे त्यांना वार्षिक ६००,००० पौंड अधिक खर्च करावे लागत होते. तसंच त्यांची तक्रार होती की मतदानाचा अधिकार नसणारे युटिलँडर नऊदशांश कर भरत होते आणि एवढं असूनही ट्रान्सवालमध्ये राहणारांच्या शिक्षणावर सरकार प्रती विद्यार्थी ९ पौंड खर्च सहन करते जेव्हा की प्रती युटिलँडर मुलाच्या शिक्षणावर सरकार केवळ २ शिलींग खर्चच सहन करते. त्याचबरोबर ट्रान्सवाल रेल्वेच्या महाग भाड्यामुळे युटिलँडरांच्या उत्पादन खर्चात आणि राहणीमानाच्या खर्चात वाढ होते असंही त्यांचं म्हणणं होतं.

युटिलँडर लोकांनी राजकीय नियंत्रण मिळवण्यासाठी आरडाओरड करायला सुरुवात केली. क्रुगर आणि आणि त्याचे व्होल्कराड युटिलँडरांसमोर शरणागती पत्करायला कोणत्याही परिस्थितीत तयार नव्हते. त्यांचं म्हणणं होतं की युटिलँडरांना दोन्ही गोष्टी हव्या आहेत. त्यांना आपलं मूळ नागरिकत्वही कायम टिकवायचं आहे आणि त्याचबरोबर ट्रान्सवालच्या कारभारात हस्तक्षेप करण्यासाठी येथील मतदानाचा अधिकारही त्यांना हवा आहे. त्यांना आपल्या मुलांना इंग्रजी शिकवायचं आहे, आफ्रिकानार नाही. तसंच त्यांना आफ्रिकेतील मजुरांच्या मदतीनं येथील संपत्ती लुटून न्यायची आहे. युटिलँडरांना जर ट्रान्सवालच्या नागरिकांच्या समान हक्क हवे आहेत तर ते आपल्या देशाचं नागरिकत्व सोडून या गणराज्याचे सन्माननीय नागरिक का होत नाहीत?

१८९२ साली जोहान्सबर्गमध्ये नॅशनल युनियन नावाची एक संघटना समान हक्कांच्या मागणीसाठी आणि घटनात्मक मार्गानं इतर तक्रारी दूर करून घेण्यासाठी स्थापन करण्यात आली. त्यात मध्यम वर्गीय आणि कुशल कामगारांचा समावेश होता. चार्ल्स लिओनार्ड या मूळच्या केपच्या हुशार वकिलानं ही संघटना स्थापन केली होती. खाणमालक मात्र या संघटनेपासून व्यवसायावर अनिष्ट परिणाम व्हायच्या भीतीनं दूर राहिले. परंतु आता आपल्या मागण्यांचा रेटा वाढवण्यासाठी त्यांनी या संस्थेशी चुंबाचुंबी करायला सुरुवात केली. संघटना

उभी झाली आणि तिनं क्रुगरला अवाढव्य मागण्यांचं एक निवेदन सादर केलं. त्यात युटिलँडरांसाठी नागरिकत्वाच्या समान हक्काच्या मागणीचाही समावेश होता. क्रुगरनं तुसडेपणानं त्यांना सांगितलं की मी माझं धोरण कधीच बदलवणार नाही. तुम्हाला जे काही वाईट करायचं असेल ते तुम्ही करू शकता.

वैफल्यातून खाण मालकांनी क्रुगरची सत्ता उलथवण्याचा कट रचायला सुरुवात केली. जोहान्सबर्ग येथे मुख्यालय असलेली एका सुधारणा समितीची त्यांनी स्थापना केली. तिच्यात नॅशनल युनियनचा अध्यक्ष चार्ल्स लिओनार्ड यांचा, लिओनल फिलिप्स आणि जॉन हेज हॅमंड या दोन खाण मालकांचा आणि एका अमेरिकन तंत्रज्ञाचा व जॉन ऱ्होड्सचा भाऊ कॉलनल फ्रैंक फिलिप्स यांचा समावेश होता. खाण मालकांनी जाहीर सभा, गुप्त सोसायट्या आणि रायफल क्लब यांच्या माध्यमातून वातावरण तापवायला सुरुवात केली.

क्रुगरनं आगीत तेल ओतलं. ट्रान्सवालमध्ये झालेलं लहानसं बंड उधळून लावून नागरिकांना मदत करण्यासाठी त्यांच्याबरोबर लढायला जाण्यासाठी क्रुगरनं काही ब्रिटिश लोकांना गणराज्यातील नियमानुसार सांगितलं. आपल्याला नागरिकत्वाचे अधिकार नसल्यानं या लढाईत जिवाचा धोका पत्करायची आमची तयारी नाही असा यावर संबंधित ब्रिटिश नागरिकांनी आक्षेप घेतला. पाच इंग्रजांनी या कारणास्तव लढाईत भाग घ्यायला नकार दिला. त्यामुळे क्रुगरनं त्यांना अटक केली व आघाडीवर कैदी म्हणून पाठवलं. त्यांच्या सुटकेसाठी उच्चायुक्तांना प्रयत्न करावे लागले.

## १२

युटीलँडरांच्या असमाधानात आपल्याला संधी असल्याचं ऱ्होड्सच्या लक्षात आलं. उठावात आपल्या सनदप्राप्त पोलिसांची मदत करायचं त्यानं त्यांना आश्वासन दिलं, मोहिमेची सूत्रं आपल्या हाती घेतली आणि डॉ. जेम्सन या आपल्या मित्राला प्रत्यक्ष ठिकाणावर हेरगिरी करण्यासाठी आणि सुधारणांसाठी उपाययोजना सुचवण्यासाठी जोहान्सबर्ग येथे पाठवलं.

ऱ्होड्सचा समवयस्क असलेला डॉ. लिएन्डर स्टार जेम्सन हा ऱ्होड्सप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेत प्रकृतीच्या कारणासाठी आला होता. 'दमट वातावरणामुळे बुरशी चढलेल्या फुफ्फुसांना आफ्रिकेतील उन्हानं वाळवायला तो इथं आला होता.' उतावीळ स्वभावाचा जेम्सन १८७८ साली किम्बर्ली येथे आला तेव्हा उणापुरा पंचवीस वर्षांचा होता. तो हुशार शल्यचिकित्सक होता व जोहान्सबर्गमध्ये वैद्यक व्यवसाय करत असताना त्यानं क्रुगरला दुरुस्त केलं होतं. अनेक विरोधी गुणांचा समन्वय असलेल्या जेम्सनला जुगाराचा नाद लागला व जुगार खेळताना तो इतका बेदरकारपणे खेळायचा की त्याच्यासाठी कोणतीही बाजी मोठी बाजी नसायची. तो साहसासाठी तहानलेला होता. ऱ्होड्सचं त्याला आकर्षण वाटलं. त्याला वाटलं की ऱ्होड्सच्या सहवासात असताना मरगळलेल्या जीवनाचा प्रश्नच येणार नाही. हळूहळू त्याला व्यवसायात रस वाटेनासा झाला व तो पूर्णपणे ऱ्होड्सच्या तालावर नाचू लागला. ऱ्होड्स त्याच्यापेक्षा हुशार होता. त्यानं त्याला सनदप्राप्त प्रदेशाचा प्रशासक नेमून त्याचा उपयोग करून घेतला. डॉ. 'जिम' आपल्या नवीन मोहिमेवर निघाला व ऱ्होड्सला आपल्या मोहिमेचे अतिशय उत्साहवर्धक अहवाल पाठवू लागला.

१८९५च्या जानेवारीत क्रुगरनं प्रिटोरिया येथे जर्मन क्लबसमोर कैसरच्या जन्मदिवसानिमित्त भाषण दिलं. त्यात त्यानं विचार न करता जर्मनी आणि त्याच्या 'देशातील परस्परांतील सामंजस्याचा आणि सहानुभूतीचा उल्लेख केला.' त्यानंतर प्रिटोरिया येथील जर्मन कॉन्स्युलेटनं जाहीरपणे घोषित केलं की त्यांचा देश ट्रान्सवालला 'कोणत्याही आणि कशाही प्रसंगात केव्हाही मदत करायला तयार आहे' आणि भविष्यात क्रुगर जर्मनांवर केव्हाही विसंबून राहू शकतो. डेलागोआ बंदरात उभ्या असलेल्या दोन युद्धनौकांनी या धमकीला वास्तवाचं रूप दिलं. ब्रिटिश सरकारनं कोसी बंदरासह टॉंगोलॅंड काबीज करून ट्रान्सवालला समुद्रमार्गानं कोणतीच बाहेरची मदत न पोहोचू देण्याची दक्षता घेऊन ताबडतोब प्रत्युत्तर दिलं.

याच महिन्यात ऱ्होड्स जहाजानं इंग्लंडला गेला. त्याचे देव्हारे माजवण्यात आले, त्याला प्रिव्ही कौंसिलर बनवण्यांत आलं आणि त्याच्या सनदप्राप्त कंपनीच्या प्रदेशाचं नाव ऱ्होडेशिया

असं ठेवण्यात आलं. त्यानं त्या संधीचा पूर्ण उपयोग करून द टाईम्स आणि द मॉर्निंग या वृत्तपत्रांचा आणि खाजगीरीतीनं लॉर्ड सॅलिसबरी यांचा पाठिंबा मिळवला. तसंच ग्लॅडस्टोनच्या उदारमतवादी साम्राज्यवादी विचारसरणीचे वारस व प्रधानमंत्री लॉर्ड नॅथानियल मेयर यांचे जावाई उमराव रोथशिल्ड यांचाही त्यांना पाठिंबा होता. ते ऱ्होड्सला अर्थपुरवठा करायचे. युटिलँडरांचा उठाव झाल्यास तिथं कंपनीचे पोलीस पाठवून हस्तक्षेप करायच्या कल्पनेला या सर्वांचा ऱ्होड्सनं पाठिंबा मिळवला. परंतु त्याचबरोबर असंही ठरवण्यात आलं की 'प्रत्यक्ष उठावाला सुरुवात झाल्याशिवाय पोलिसांनी हालचाल करायची नाही.' [एरिक ए. वाकर, *अ हिस्ट्री ऑफ सदर्न आफ्रिका*, लाँगमन ग्रीन्स अँड कंपनी, लंडन, (१९५७), पृष्ठ २४५] त्याचबरोबर ऱ्होड्सशी सहकार्य न करणारे सर हेन्री लॉच यांना लवकर सेवानिवृत्त करायला लावून त्यांच्या जागी आपले मित्र सर हर्क्युलस रॉबिन्सन यांची ऱ्होड्सनं केपच्या उच्चायुक्तपदी नियुक्ती करून घेतली. सर हेन्री वसाहत मंत्री लॉर्ड रिपन यांच्याकडून सूचना घेऊन आवश्यकता पडल्यास ट्रान्सवालमधे मध्यस्थाची भूमिका बजावण्याच्या तयारीनं व मध्यस्थीच्या प्रयत्नात अपयश आल्यास १०,००० सैन्यासह हस्तक्षेप करायच्या तयारीनं केपला पोहोचले होते. [सुरुवातीस लॉर्ड रिपन या मार्गाच्या फार विरोधात होते. सप्टेंबर १८९४च्या सुरूवातीस त्यांनी प्रधानमंत्री रोझबरी यांना पुढील अहवाल पाठवला : 'आपण बोअरांविरुद्ध युद्ध सुरू करू शकतो... वा आपण ब्रिटिश घटकांचा..... बोअर घटकांविरुद्ध उपयोग करून बोअरांना बराच त्रास देऊ शकतो. बोअरांविरुद्ध युद्ध छेडायचा माझ्या मते प्रश्नच उपस्थित होत नाही. ते बरंच खर्चाचं होईल, त्यासाठी बरंच सैन्य लागेल. .... 'ब्रिटिश प्रजेला ट्रान्सवालमध्ये मिळणाऱ्या वागणुकीविरुद्धच्या आपल्या तक्रारींचा तडा लावण्यासाठी व ब्रिटिशांना त्यांच्या अधिकारासाठी मदत करण्यासाठी इतर गोष्टींचा उपयोग केल्यामुळे अधिक यश मिळू शकेल. कदाचित त्यामुळे मिळणारं यश अनिश्चितही असू शकेल व आपल्याला कदाचित हलकट आणि भित्रेही समजण्यात येईल..... या शेवटच्या गोष्टीची आपण फिकीर करू नये असं मला वाटतं.' परंतु जर्मनीनं दिलेल्या धमकीनं आलेल्या दडपणामुळे असं दिसतं की त्यांनी स्वतःला समजावलं वा इतरांनी त्यांना समजावलं. (पहा फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ ३००)]

रोझबरी मंत्रिमंडळाचा पराभव झाल्यानंतर थोड्याच दिवसात २ जानेवारी १८९५ला लॉर्ड सॅलिसबरी सत्तेत आले व लॉर्ड रिपनच्या ठिकाणी जोसेफ चेम्बरलेन वसाहत मंत्री झाले. वसाहत कार्यालयातील कागदपत्रं चाळत असताना त्यांच्या लक्षात आलं की ट्रान्सवालला ब्रिटिश ध्वजाखाली आणायच्या पर्यायाला क्रुगरनं संमती न दिल्यास ट्रान्सवालमध्ये क्रुगर विरुद्धच्या उठावाच्या योजनेला १८९३मधेच त्यांच्या पूर्वसुरींनी उच्चायुक्तांच्या सल्ल्यानुसार मान्यता दिलेली होती. त्याशिवाय वसाहत कार्यालयाच्या फाईली पाहिल्यानंतर त्यांच्या असंही

लक्षात आलं की जी 'घाणेरडी कामं' परराष्ट्रीय धोरणामुळे वा देशातील जनमताच्या विरोधामुळे शासन करू शकत नाही ती कामं करून ऱ्होड्स पैसा मिळवत असेल तर वसाहत कार्यालयाला त्यात काही चूक वाटत नव्हती आणि त्या कार्यालयाच्या परंपरेनुसार ऱ्होड्ससारख्यांच्या साहसाला प्रोत्साहन देण्यात त्याना काहीच हरकत वाटत नव्हती. [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ २९१] उदारमतवादी पक्षानं जे करायची योजना आखलेली होती व संमती दिलेली होती त्याला ते विरोध करू शकणार नाही हा विश्वास निर्माण झाल्यानंतर 'ब्रिटनला जगातील निर्विवाद अशी सर्वात मोठी भांडवली शक्ती' बनवण्यासाठी जोसेफ चेम्बरलेन यांनी वैध वा अवैध मार्गानं रँडमधील सोन्याच्या खाणी ताब्यात घ्यायचं ठरवलं.

युटीलँडरांच्या 'बाह्य मदतीसह वा शिवायही उठाव करायच्या निर्णयाची' ['एरिक ए. वाकर, *अ हिस्ट्री ऑफ सदर्न आफ्रिका*, पृष्ठ २४५] माहिती कळताच तिथं तसं घडलं तर कोणती प्रक्रिया अवलंबायची यासंबंधी त्यांनी उच्चायुक्तांकडे विचारणा केली. साम्राज्याचे सचिव ग्रॅहम बोअर यांनी तयार केलेल्या आणि त्यांचे 'दुसरे मालक' [एरिक ए. वाकर, *अ हिस्ट्री ऑफ सदर्न आफ्रिका*, पृष्ठ २४५], केपचे प्रधान मंत्री ऱ्होड्स यांनी संपादित केलेल्या उत्तराचा जो मसुदा त्यांना मिळाला त्यात लिहिण्यात आलं होतं की ब्रिटिश सरकार उघडपणे जर उठावास पाठिंबा देऊ शकत नसेल तर उच्चायुक्तांनी दोन्ही पक्षांना आपला लवाद मान्य करा असं सांगावं. त्याचबरोबर फार मोठं सैन्य दक्षिण आफ्रिकेत प्रवेश करायच्या तयारीत असल्याची माहिती कनिष्ठ सभागृहास देण्यात यावी. प्रिटोरियावर पुन्हा युनियन जॅक फडकवण्याची आपल्याएवढीच ऱ्होड्सलाही इच्छा असल्याची निश्चिती करून घेतल्यानंतर चेम्बरलेन यांनी उच्चायुक्तांच्या भूमिकेला संमती दिली. त्यांनी केवळ एवढीच अट घातली की यशाची शंभर टक्के खात्री असल्याशिवाय उठाव करण्यात येऊ नये. 'तो फसल्यास त्याचे परिणाम भयानक होतील. [एरिक ए. वाकर, *अ हिस्ट्री ऑफ सदर्न आफ्रिका*, पृष्ठ २४५] ऱ्होड्सला मध्यस्थाकडून निरोप कळला की चेम्बरलेनची स्वतःची कारस्थानात भाग घ्यायची इच्छा नसली तरी त्यांना जे काही शक्य आहे ते ते सर्व करतील, 'केवळ त्यांना या कारस्थानाची अधिकृतपणे बातमी कळायला नको.' [एरिक ए. वाकर, *अ हिस्ट्री ऑफ सदर्न आफ्रिका*, पृष्ठ ४४८]

१८९५ या संपूर्ण वर्षात डॉ. जेम्सन कारस्थानाची सविस्तर योजना आखण्यात व्यस्त होता. असं ठरवण्यात आलं की उठावासाठी १५०० माणसं तयार करण्यात यावी. त्यांना रायफली, स्वयंचलित बंदुका आणि काही दारूगोळ्यानं सुसज्जित करण्यात यावं. त्यासाठी किम्बर्ली येथून जोहान्सबर्गला १५०० अतिरिक्त रायफली, तीन स्वयंचलित बंदुका १,०००,००० गोळ्या एवढं साहित्य चोरून पाठवण्यात यावं. नियोजित वेळी युटिलँडरांची कमेटी व्होल्क्सराडला निर्वाणीचा खलिता देईल. तो नक्कीच फेटाळला जाणार होता. नंतर ट्रान्सवालचे लोक उठाव करून जोहान्सबर्ग आणि प्रिटोरिया काबीज करतील व तात्पुरत्या सरकारची स्थापना करतील डॉ. जेम्सन त्यावेळी त्यांच्या सुटकेसाठी जातील. ऱ्होड्सला मध्यस्थी करण्यासाठी बोलावण्यात येईल. डिसेंबर २८ अथवा जानेवारी ४ अशा तारखा त्यासाठी ठरवण्यात आल्या.

त्यानुसार डी बीअर्सच्या अधिकाऱ्यांनी जोहान्सबर्गमधे रात्रीच्या काळोखाचा फायदा घेऊन तेलाच्या पिपात लपवून, 'ज्यातून खरोखरच तेल गळत असल्याचं दाखवण्यात आलं होतं', आणि 'जर्मन पियानो' लिहिलेल्या लाकडी खोक्यातून चोरून शस्त्र आणली व ती खाजगी मालकीच्या घरात, मागील अंगणात आणि खाणींच्या खोलवरच्या रस्त्यांत लपवून ठेवली. जेम्सनचं सैन्य केप कॉलनी या शेजारच्या मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या राष्ट्रातून सहजपणे घुसू शकत नव्हतं. त्यामुळे ऱ्होड्सनं त्याच्या सनदप्राप्त कंपनीच्या नावानं मॅफेकिंगच्या उत्तरेला आणि बछुआलँडच्या पश्चिमेला मॅफेकिंग-किम्बर्ली रेल्वेमार्गासाठी वरवर दाखवण्यासाठी सहा ते दहा मैल रुंदीच्या जमिनीच्या पट्ट्याचं अधिग्रहण केलं. परंतु वास्तवात तो पट्टा आक्रमण करण्यासाठी उडी घ्यायला जागा असावी म्हणून ताब्यात घेण्यात आला होता. त्यासाठी त्यानं सनदप्राप्त पोलिसांना बुलावायोवरून मेफॅकिंगजवळ ट्रान्सवालच्या सीमेवरील पित्सानी या लहानशा ठिकाणी हालवलं आणि उघडपणे स्वयंसेवकांची भरती करून त्यांची कवायत घ्यायला सुरुवात केली.

नोव्हेंबरच्या मध्यात ब्रिटिश ग्वायना आणि व्हेनेझुएला यांच्या सीमावादावरून एकाएकी अमेरिका आणि ब्रिटिश सरकारमध्ये तणाव वाढला. त्यामुळे चेम्बरलेन यांनी ऱ्होड्सला

अप्रत्यक्षपणे निरोप पाठवला की एक तर अमेरिकेचा प्रश्न चिघळण्याच्या आधीच ताबडतोब उठाव करण्यात यावा अथवा तो लांबणीवर टाकण्यात यावा. यावेळी पहिल्यांदाच चेम्बरलेन यांनी प्रधानमंत्री सॅलिसबरी यांना काय घाटत आहे याची कल्पना दिली आणि सर हर्क्युलस यांना सैन्याची जहाजं केपच्या मार्गावर असल्याचं तारेनं कळवलं.

परंतु लवकरच स्पष्ट झालं की ऱ्होड्स आणि डॉ. जेम्सन यांना परिस्थितीचा नीट अंदाज आला नव्हता. कारस्थान करणारांचं आपसात एकमत नव्हतं. खाणींच्या समभागांचे भाव जागतिक बाजारात कधी नव्हे तेवढे चढलेले होते, सोन्याचे भाव सारखे चढत होते. सप्टेंबर १८९५मधे रँड समभागाची एकूण किंमत ३०,०००,००० पौंडपासून १५०,०००,००० पौंडांपर्यंत वाढली. व्यापारातील विशेष हक्क मिळवण्यासाठी व्यापारी कशाचीच पर्वा करायला तयार नव्हते आणि राजकारणात त्यांना अगदीच रस नव्हता. थापांच्या मदतीनं केवळ आपली गाऱ्हाणी दूर करून घेण्यातच त्यांना रस होता. ऱ्होड्सचा साम्राज्यवादाच्या खेळात सहभागी व्हायची त्यांची अगदीच मनःस्थिती नव्हती आणि ब्रिटिशांचा हस्तक्षेप टाळण्यासाठी ते उत्सुक होते. ते वाद करत राहिले आणि वेळ पुढं ढकलत राहिले. विजयानंतर ब्रिटिशांचा ध्वज फडकवण्यात यावा की गणराज्याचा ध्वज फडकवण्यात यावा यावरूनही त्यांच्यात वाद होता. बराच वाद झाल्यानंतर गणराज्याचा ध्वज फडकवण्याचा निर्णय झाला परंतु तो ‘उलटा फडकवावा’ असं ठरलं. [एच. सी. आर्मस्ट्राँग, *ग्रे स्टील*, पृष्ठ ३१]

डिसेंबर महिना जसजसा उलटू लागला तसतशा जास्त समित्या स्थापन करण्यात येऊ लागल्या. एक हेरखातं उभारण्यात आलं, एक संकेत भाषा ठरवण्यात आली, तारा गूढ संदेशांनी खणखणू लागल्या व त्यातील भाषेत समभागांच्या बाजारातील शब्द विशेष अर्थानं वापरण्यात आले होते. त्यात डॉ. जेम्सन ‘जनावरांचे शल्यचिकित्सक’ झाले, आणि इतर ‘कंत्राटदार’, त्यांचा ‘व्यवसाय’ ‘रेल्वेमार्ग बांधणं’ व त्यांचे शिपाई ‘मुलं’ झाले. क्रांतीचा उल्लेख ‘संचालकांची सभा’ वा ‘भागधारकांची सभा’ वा ‘कंपनीची स्थापना’ म्हणून करण्यात येत होता व शेवटी तर तिचा उल्लेख ‘पोलोचा सामना’ म्हणून करण्यात येऊ लागला.

आणि नंतर डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात कटातील एक नेता लिओनेल फिलिप्स यांनी विचार न करता संघर्षाचं आवाहन करणारं जोरदार भाषण करून त्यांना काय म्हणायचं आहे यासंबंधी संभ्रम राहणार नाही अशा रीतीनं सर्व काही उघड केलं. सुधारकांचा उत्साह थंडावला आणि त्यांनी उठाव लांबणीवर टाकला. ऱ्होड्सला 'पोलोचा सामना' एका आठवड्यानं 'नाताळच्या सुट्यांमुळे' लांबणीवर टाकण्यात आल्याचं कळवण्यात आलं. त्यानं उच्चायुक्तांना उठाव फसल्याचं कळवलं आणि सर हर्क्युलस यांनी ते चेम्बरलेन यांना कळवलं. त्याचवेळी ऱ्होड्सनं डॉ. जेम्सनला सीमोल्लंघन न करण्याविषयी कळवलं. परंतु त्याचा निरोप गंतव्य ठिकाणी कधीच पोहोचला नाही. डॉ. जेम्सनच्या आदेशानुसार तारायंत्राच्या तारा कापण्यात आलेल्या होत्या.

ऱ्होड्स दोघांनाही फसवू शकतो असं चेम्बरलेन याना वाटत असल्यामुळे त्यांचा ऱ्होड्सवर पुरेसा विश्वास नव्हता आणि त्यामुळे सावधगिरी म्हणून उच्चायुक्तांना त्यांनी हल्ला थांबवायची आणि जेम्सनच्या कृत्याची निर्भर्त्सना करायची सूचना दिली. सर हर्क्युलस यांनी खास दूताकरवी डॉ. जेम्सन यांना निरोप पाठवला आणि सर्व ब्रिटिश प्रजेला डॉ. जेम्सन यांना उत्तेजन वा मदत न करायची आज्ञा दिली. दूतानं डॉ. जेम्सन यांना गाठलं व त्यांना निरोप दिला परंतु डॉ. जेम्सन यांनी तो निरोप तसाच ठेवला व ते पुढे निघाले. डिसेंबर २९ला त्यांनी ट्रान्सवालमध्ये प्रवेश केला.

प्रिटोरिया येथील आपल्या ओसरीत बसून पाईप ओढत बसलेल्या क्रुगरला या सर्व गोष्टींचा वारा लागलेला होता. जोहान्सबर्गमधे जे काही घडत होतं त्यावर त्याची बारीक नजर होती. उठावाच्या आदल्या दिवशी क्रुगरनं युटीलँडरांच्या जवळपास सर्व मागण्या मान्य केल्या. केवळ मतदानाच्या हक्काबाबत तो ठाम होता. शेतकऱ्यांच्या प्रमाणात त्यांची संख्या सातपट असल्यामुळे त्यांना मतदानाचा अधिकार देणं म्हणजे देश परक्यांच्या हवाली करणं होईल असं क्रुगरचं म्हणणं होतं. क्रुगरनं आपल्या शेतकऱ्यांना सूचित केलं की 'तुम्हाला वाटतं त्यापेक्षा मी

किती तरी अधिक सावध आहे.’ [एफ. ॲडिंग्टन सिमन्ड, द जोहान्सबर्ग स्टोरी, पृष्ठ १२२] तो केवळ ‘कासवानं डोकं बाहेर काढायची वाट पाहत होता. एकदा कासवानं डोकं बाहेर काढलं की....’

पूर्णपणे ऊहापोह करून अतिशय कौशल्यानं आणि गुप्ततेनं क्रुगरनं आक्रमणाचा प्रतिकार करायची व त्यानंतर हल्ला करायची तयारी केली. जेम्सनच्या सैनिकांना आत यायचा मोह व्हावा व ते सापळ्यात सापडावे म्हणून सेनापती क्रोनिये यांच्या हाताखालील रात्रीच्या काळोखात लपून शत्रूंवर धाड टाकायचं खास प्रशिक्षण मिळालेल्या ट्रान्सवालच्या सैनिकांनी त्यांचा मार्ग मोकळा सोडलेला होता. त्यांच्या माऱ्याच्या टप्प्यात ते येताच त्यांनी जोरदार गोळीबाराला सुरुवात केली. क्रुगरच्या गावापासून केवळ १२ मैलांवर आणि जोहान्सबर्गपासून १८ मैलांवर असताना डॉ. जेम्सन आणि त्याच्या सैनिकांना आपण घेरले गेलो असल्याचं आढळलं. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी शरणागती पत्करली. त्यांच्याजवळ सापडलेल्या कागदपत्रात सुधारकांनी ‘डॉ. जिम’ याना लिहिलेलं पत्र होतं. त्यातून क्रुगरला सर्व सुधारक नेत्यांची माहिती मिळाली. त्यामुळे क्रुगरनं लगेच कारवाई करून सर्वांना घेरलं आणि तुरुंगात कोंबलं.

बोअर हर्षोन्मत्त झालेले होते. ढोलाच्या तालावर त्यांच्यावर सैनिकी न्यायालयात कार्यवाही करावी असं त्याच्या सैनिकांना वाटत होतं. काहींना श्लेटरच्या त्या प्रसंगाची आठवण झाली ज्यावेळी आपल्या गुलामांना वाईट वर्तणूक दिल्यामुळे चार शेतकऱ्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ब्रिटिशांनी फासावर लटकवलं होतं. ज्या फासावर १८१६ साली डच शेतकऱ्यांना लटकवण्यात आलं होतं त्याच फासाचं साहित्य तशाच प्रकारे ब्रिटिशांचा बदला घ्यावा म्हणून त्यांनी प्रिटोरियाहून आणलं होतं. [ए. कॉनन डॉईल, *द ग्रेट बोअर वॉर*, स्मिथ एल्डर अँड कंपनी, लंडन, (१९००) पृष्ठ ८] परंतु क्रुगरनं निर्धारानं आपलं ‘क्षमा करा आणि विसरा’चं धोरण अमलात आणलं व जेम्सन आणि त्याच्याजवळच्या सेवकांना पकडून ब्रिटिश सरकारनं त्यांच्यावर कारवाई करावी म्हणून इंग्लंडला रवाना केलं. ट्रान्सवाल उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ग्रेगोरोवस्की यांनी आक्रमकांच्या चार नेत्यांना फासावर लटकवण्याची आणि इतरांना विविध मुदतीच्या कारावासाची आणि

दंडाची शिक्षा दिली. क्रुगरनं बराच युक्तिवाद केल्यानंतर फासाची शिक्षा बदलवण्यात येऊन कारावास आणि २५,००० पौंड दंड अशी शिक्षा देण्यात आली. जेम्सनला १५ महिन्याची तुरुंगाची शिक्षा झाली परंतु प्रत्यक्षात तो चार महिनेच तुरुंगात होता कारण प्रकृतीच्या कारणासाठी त्याला सोडण्यात आलं व एका दशकाच्या आतच केप सरकारचा प्रधानमंत्री म्हणून त्याचं परत आगमन झालं.

आता क्रुगरनं आपला चाबुक उगारला. उठाव करणारांच्या नेत्यांकडून आणि सुधारणा समितीच्या विविध लोकांकडून वसूल करण्यात आलेल्या दंडामुळे त्याच्या खजिन्यात २,५००,००० पौंडांची भर पडलेली होती. त्यानं कार्यवाहीवर आलेल्या 'प्रत्यक्ष खर्चाचं' ६७७,९३८ पौंड ३ शिलींग आणि ३ पेन्सचं आणि 'नैतिक आणि बौद्धिक संपत्तीच्या नाशासाठी' १०,०००,००० पौंडांचं बिल ब्रिटिश सरकारला दिलं. [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ ३२३] त्याचबरोबर त्यानं लंडन परिषद रद्द करायची मागणी केली.

त्यातील पहिली मागणी नाकारत आणि दुसरीकडे दुर्लक्ष करत चेम्बर्लेननी क्रुगरला आठवण करून दिली की सुरुंगावरील बारुदीचा एकाधिकार हा लंडन परिषदेच्या निर्णयाचा भंग आहे. परंतु त्यांनी ऱ्होड्सच्या वर्तनाची चौकशी करून आक्रमणाची जबाबदारी निश्चित करण्याकरिता ऱ्होड्सविरुद्ध सांसदीय चौकशी समिती नेमली. चेम्बर्लेननी जर ऱ्होड्सच्या कंपनीची सनद रद्द करायचा प्रयत्न केला वा प्रिव्ही कौन्सिलच्या पदाला धक्का लावायचा प्रयत्न केला तर आपल्याकडे असलेल्या काही तारांचा उपयोग करून चेम्बर्लेनला 'आक्रमणाची निर्विवादपणे पूर्वकल्पना होती', [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ ३१८] असं आपण सिद्ध करू अशी ऱ्होड्सनं चेम्बर्लेनला धमकी दिली. धमकीचा परिणाम झाला. चौकशीच्या दरम्यान चेम्बर्लेन यांनाच नव्हे तर उदारमतवादी पक्षाचे आधीचे प्रधानमंत्री लॉर्ड सॅलिसबरी यांनाही ऱ्होड्सच्या आक्रमणाच्या योजनेची पूर्वकल्पना होती हे ऱ्होड्सनं सिद्ध करू नये म्हणून चेम्बरलेन, लॉर्ड रोझबरी एवढंच नाही तर पुरोगामी विचारांचे हरकोर्टही ऱ्होड्सवर सत्य वदवण्यासाठी फार मोठा दबाव आणू शकले नाही. हाउस ऑफ कॉमन्सनं चौकशी करण्यासाठी जी विशेष समिती नेमली

होती तिच्यावर चेम्बरलेन यांना महत्त्वाचं स्थान होतं. त्या समितीनं उच्चायुक्तासारख्या महत्त्वाच्या साक्षीदारांना साक्ष देण्यासाठी कधीच बोलावलं नाही तसंच वसाहत कार्यालयाची संशयास्पद भूमिका स्पष्ट झाली असती अशा तारांचीही चौकशी केली नाही. समितीला वसाहत कार्यालयाची कागदपत्रं मागवता आली असती अथवा कमीतकमी तारांच्या प्रती तरी तारघरातून मागवता आल्या असत्या. परंतु समितीनं यातील काहीच केलं नाही. चेम्बर्लेनशी संबंध कायम टिकवत ऱ्होड्सनंही त्या प्रती समितीला दिल्या नाहीत. समितीनं आक्रमणाचा निषेध केला, ऱ्होड्स आणि जेम्सनवर ठपका ठेवला व चेम्बर्लेनना दोषमुक्त केलं. [लिओ मार्कर्ड, *द स्टोरी ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २०४] समितीत आणि हाउस ऑफ कॉमन्समध्ये चेम्बर्लेननं स्वतःच खोटी साक्ष द्यायचा गुन्हा केला. ते सर्व एकमेकांना वाचवू पाहत होते आणि चेम्बरलेन निर्दोष असल्याचं सिद्ध करू इच्छीत होते. अशा रीतीनं हरकोर्टच्या शब्दात सांगायचं तर '६० वर्षाच्या राज्याच्या काळातील सर्वात मोठा नैतिक अधःपात घडवणारं प्रकरण पार पडलं.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ ३५२] ऱ्होड्सच्या चरित्रकारांच्या शब्दात ' 'सनदशीर स्वातंत्र्यानं' राजकीय नैतिकतेवर विजय मिळवला.' [फेलिक्स ग्रॉस, *ऱ्होड्स ऑफ आफ्रिका*, पृष्ठ ३५५]

हल्ल्यानंतर कुणाचीही मदत न घेता हल्ल्याचा बीमोड केल्याबद्दल कैसरनं क्रुगरला पाठवलेल्या अभिनंदनपर तारेमुळे इंग्लंडमधील जनमत खवळलं. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांना 'या विषयाच्या संबंधात जवळ येणं भाग पडलं.' साम्राज्यवाद्यांच्या नजरेत 'डॉ. जिम' वीर पुरुष ठरला.

त्या हल्ल्यामुळे ऱ्होड्सच्या राजकीय जीवनाचा अंत झाला. त्याला केप सरकारच्या प्रधानमंत्रीपदाचा आणि सनदप्राप्त कंपनीच्या प्रबंध संचालक पदाचा राजीनामा द्यावा लागला. हॉफमायर, मेरीमन, डब्ल्यू. पी. श्रीनर आदी बाँडमधील त्याच्या सर्व सहकाऱ्यांनी त्याचा निषेध केल्यानंतर ऱ्होड्सनं प्रोग्रेसिव्ह पार्टी नावाचा नवीन पक्ष काढला, व ज्यांच्याकडे पराभवापूर्वी तो अतिशय घृणेनं पाहत होता त्या 'काळ्या लोकांची मतं' मिळवण्याकरिता निवडणूक घोषणेतून

'गोरा' हा शब्द काढून टाकला व त्याऐवजी 'झॅम्बॅसीच्या दक्षिणेकडील सर्व लोकांना समान अधिकार ही नवीन घोषणा केली. काळानं आपला बदला घेतला होता.

ऱ्होड्सला केवळ त्याच्या बाँडमधेच दुखापत झाली नाही. त्यावेळी ही गोष्ट फारशी कोणाच्या लक्षात आली नाही परंतु केपटाऊनचा अशील नसलेला 'उंच,... चेहऱ्यावर प्रेतकळा असलेला, खोल गेलेले गाल, खुंटासारखे केस, फिकट चेहरा... रागीट डोळे [एच. सी. आर्मस्ट्राँग, *ग्रे स्टील,* पृष्ठ ३८] असलेला एक बॅरिस्टर, ज्याचा उत्कट प्रामाणिकपणा आपल्याकडे लक्ष वेधून घ्यायचा, ऱ्होड्सचा पाठीराखा आणि प्रशंसक होता. परंतु ऱ्होड्सच्या धोकेबाज दुटप्पीपणामुळे त्याच्या मनातील ऱ्होड्सच्या आदर्श प्रतिमेला तडा गेला व त्यानं त्याला आपल्या जीवनातून आणि जाणिवेतून काढून टाकलं, आपल्या ब्रिटिश नागरिकत्वाचा त्याग केला व क्रुगरच्या नशिबाशी आपलं नशीब जोडून टाकलं. जे काही क्रुगरचं बरं वाईट होईल तेच आपलंही होईल असं समजून क्रुगरला सहकार्य करायचं त्यानं ठरवलं आणि तो क्रुगरच्या पाठीराख्यांपेक्षाही इंग्रजांचा कडवा विरोधक झाला. हा होता जॉन ख्रिश्चन स्मट्स, २५ वर्षांचा तरुण. दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका करण्याचं त्याच्या भवितव्यतेत लिहिलेलं होतं. त्याच्याशी आठ वर्षे एवढा दीर्घ काळ गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गानं संघर्ष केला होता व अखेरीस 'ज्यांच्या बुटात पाय ठेवायची माझी पात्रता नाही असा थोर पुरुष' [एस. राधाकृष्णन यांनी संपादित केलेल्या *महात्मा गांधी,* जॉर्ज ॲलन ॲंड अनविन लि., लंडन, (१९४९), पृष्ठ २८२ वरील रेव्हरंड ऑनरेबल जे. सी. स्मट्स, एम.ए., एल.एल.डी., डी.सी.एल., गांधीजीज पॉलिटिकल मेथड या लेखातून] अशी त्यानं गांधीजींची प्रशंसा केली होती.

क्रुगरसाठी तो हल्ला ईश्वरी वरदानासारखा ठरला. तो लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार झाला व गणराज्याच्या अध्यक्षपदी चौथ्या वेळी निवडून आला. ऑरेंज फ्री स्टेटनं ट्रान्सवालशी आक्रमक आणि संरक्षक करार केला. अंतिम लढ्याच्या दृष्टीने दोन्ही पक्ष जोरदार तयारी करू लागले आणि दक्षिण आफ्रिकेतील बोअर आणि इंग्रज यांच्यात प्रभुत्वासाठी चाललेल्या संघर्षाचं प्रतीकात्मक रूप त्या संघर्षाला आलं.

अशा रीतीनं या दोन्ही गणराज्यात सापडलेल्या खनिजांमुळे चोहोकडे विनाशाला सुरुवात झाली. त्यानं साहसी लोकांच्या हावरटपणाला चेतवलं आणि बोअर आणि ब्रिटिशांमध्ये मोठ्या स्थलांतरानंतर तह होऊन ब्रिटिशांनी बोअरांच्या स्वातंत्र्याला मान्यता दिल्यानंतर जे वैर शांत व्हायला सुरुवात झाली होती, झालं गेलं विसरून जायची जी प्रक्रिया सुरू झाली होती त्या प्रक्रियेला या शोधांमुळे खीळ बसली. सोनं आणि चांदीच्या आकर्षणानं अनेकांचा विनाश झाला. अगदी माहितगार असलेले लोक असं सांगतात की कोणत्याही वैयक्तिक खोदकाला फार मोठी संपत्ती गोळा करता आलेली नाही. 'आत्मवंचना' करूनच काही तरी मिळाल्याचं समाधान त्याला मानता यावं एवढीच संपत्ती प्रत्येकाला मिळू शकली होती. दोन हिऱ्यांच्या सम्राटांपैकी आठ वर्षांनंतर बर्नाटोनं आपल्या जीवनाचा अंत जहाजातून अटलँटिक महासागरात उडी मारून केला. जोहान्सबर्ग येथील सोन्याच्या खाणींना आपल्या किम्बर्ली येथील संपत्तीत जोडायचं स्वप्नभंग झालेल्या ऱ्होड्सनं आपल्या सर्व संपत्तीसह ईश्वरानं दिलेल्या मोकळ्या हवेसाठी, जी हवा हलकटाहून हलकट जिवालाही मिळते, तडफडत प्राण सोडला. त्यानं पाहिलेल्या स्वप्नातून काय शिल्लक राहिलं असेल तर त्यानं सहाव्या आणि शेवटच्या मृत्युपत्रान्वये निर्माण केलेली शिष्यवृत्ती. आपलं स्मरण '४००० वर्ष कायम राहील' अशी त्याची अपेक्षा होती. ब्रिटिश आणि बोअर यांच्यात वैराचं केलेलं बीजारोपण आणि आफ्रिकी समुदायाविरुद्ध केलेले अपराध यासाठीच आज त्याची आठवण शिल्लक आहे. आता आफ्रिकेचा पुनर्जन्म होत असताना झालं गेलं विसरून जायचा काळ यायला बराच वेळ लागणार आहे.

## १३

प्राचीन काळात झुलू शिस्त आणि चांगल्या वर्तणुकीचे आदर्श होते. अतिशय असंस्कृत वातावरणात राहूनही त्यांनी उच्च प्रतीच्या सामाजिक गुणांचं दर्शन घडवलं होतं. वडिलांच्या अधिकारासमोर संपूर्ण शरणागती हा आफ्रिकी मुलाच्या शिक्षणाचा आणि चारित्र्य घडणीचा आरंभबिंदू असायचा. मोठ्यांबद्दल आदराची भावना, आज्ञाधारकपणा, औदार्य आणि सौजन्य या

गुणांद्वारे त्याच्यात भावी जीवनातील स्वातंत्र्यप्रेम, कर्तव्यपालन आणि जबाबदारीची जाणीव, विश्वास आणि विश्वासार्हता, स्वावलंबन आणि आत्मशिस्त या गुणांचं बीजारोपण व्हायचं. बाहेर गवताळ प्रदेशात हिंडल्यामुळे मुलांमध्ये निरीक्षणशक्ती यायची. विविध गवतांची नावं आणि वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांची माहिती, वारा, ढग आणि धुकं यांचा अर्थ काय आहे ते ते शिकायचे. लेखी भाषेच्या अभावामुळे त्याची स्मरणशक्ती अतिशय वाढायची आणि वाक्चातुर्याची देणगी त्यांना मिळायची. असं सांगतात की प्रत्येक आफ्रिकी हा जन्मजात वक्ता असतो. या प्रतिभेसाठी वन्य जीवन अतिशय सोयीस्कर आहे. त्यामुळे अशा वंशाचा विकास झाला होता की ज्याला एकाचवेळी 'उदार अंतःकरणाची, भारदस्त आणि सुसंस्कृत वागणुकीची आणि निसर्ग विज्ञानाच्या ज्ञानाची देणगी मिळालेली होती.' [इ.ए.रिटर, *शाका झुलू - द राईझ ऑफ द झुलू एम्पायर*, पृष्ठ ७-८]

वायव्य सरहद्दीवरील पठाणांप्रमाणे भयानक योद्धा असलेला झुलू आपल्या क्रालमध्ये, त्याच्याबद्दल असलेल्या समजाच्या अगदी विरुद्ध, अतिशय नम्रपणे वागत असतो. लिव्हिंगस्टनपासून तर जे. एच. गुंटरपर्यंतच्या जवळपास सर्व संशोधकांनी आफ्रिकेतील लोकांच्या शांतपणाची, त्याच्या भारदस्त वर्तणुकीची आणि नम्रपणाची तारीफ केलेली आहे...... 'अगदी घनदाट जंगलात आणि निबीड अरण्यातही..... नियमानं चालणारा प्रवासी न्यूयॉर्कच्या सेंट्रल पार्कमध्ये रात्री चालणाऱ्या प्रवाश्यापेक्षा अधिक सुखरूप असतो.' [जॉन गुन्थर, *इनसाईड आफ्रिका*, हमिश हॅमिल्टन, लंडन, (१९५५), पृष्ठ २८७] चाका झुलू या ग्रंथाचे लेखक ई. ए. रिटर यांच्या साक्षीप्रमाणे 'आफ्रिकी वातावरणातील झुलूंच्या क्रालमधे अत्युच्च प्रतीचं आनंदी व मैत्रीचं चातावरण असतं. एकीकडे मोकळेपणा आणि स्वातंत्र्याचं वातावरण असतानाच दुसरीकडे कठोर शिस्तीचं सातत्यानं पालन करण्यात येत असतं. परंतु *त्यामागे संपूर्ण नैतिक सामर्थ्याचा जोर असतो. तरुणांना संपूर्णपणे त्यांच्या भरवशावर सोडल्यानंतर कोणत्याही नियमांचं बंधन नसताना आणि कोणीही लक्ष ठेवायला नसतानाही त्यांनी विश्वासाला पात्र न ठरणारं वर्तन केलं आहे असं क्वचितच घडतं.'* [इ. ए. रिटर, *शाका झुलू - द राईझ ऑफ द झुलू एम्पायर*, पृष्ठ ७-८]

प्राचीन काळी आणि आताही आफ्रिकेतील लोकात कोणताच धर्म अस्तित्वात नव्हता या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी पसरवलेल्या मताची पुष्टी करू शकणारा पुरावा गांधीजींना कधीच मिळू शकला नाही आणि त्या मताशी गांधीजी कधीच सहमत होऊ शकले नाहीत. नैतिकता जर धर्माचा सार असेल, आणि वर्तमान आणि ऐहिक यांच्या पलीकडे कशावर तरी जिवंत श्रद्धा असा त्याचा अर्थ असेल तर आफ्रिकी लोकांमध्ये धार्मिक भावनेचा अभाव असतो असं म्हणता येत नाही, कारण त्यांची मानवी आकलनापलीकडील एका सर्वश्रेष्ठ शक्तीवर श्रद्धा असते आणि तिची ते पूजाही करत असतात. हेन्री गिब्ज लिहितात की 'सर्वश्रेष्ठ शक्तीच्या, उम्कुलुम्कुलूच्या श्रद्धेवर त्यांचा वन्य धर्म आधारित असतो व ती शक्ती विविध नावांनी ओळखली जात असते.' [हेन्री गिब्ज, *बॅकग्राऊंड टू बिटरनेस,* पृष्ठ ३२] ते त्या शक्तीला घाबरत वर्तन करत असतात. मृत्यूनंतरच्या जीवनाची वा आपल्या आत असं काहीतरी आहे ज्याचा या नश्वर देहाच्या मृत्यूनंतरही अंत होत नाही याची त्यांना फार कमी जाणीव असते. त्यांची स्वतःची अतिशय कडक अशी काही वर्तनासंबंधीची बंधनं आहेत व त्यांचं वर्तन आणि आचरण हे अनेक युरोपिअन लोकांपेक्षा केव्हाही उच्च दर्जाचं असतं, कमीत कमी सत्य, प्रामाणिकपणा, व्यवहारातील सचोटी व वचनाचं पावित्र्य या बाबतीत तरी.

सत्याचरणाला राजासारखा सन्मान होता व प्राचीन आफ्रिकी समाजात तो अतिशय उच्च गुण गणला जायचा. असं सांगतात की लोबेनगुलाच्या हद्दीतून सेलस (एक शिकारी) जेव्हा ऱ्होड्सच्या लोकांसाठी मेटॅबोलेंचा रस्ता बांधायचा प्रयत्न करत होता तेव्हा लोबेनगुलानं त्याला अडवलं. त्यावर डॉ. जेम्सन मध्यस्थी करत असताना लोबेनगुलानं संतापून त्याला विचारलं की, 'त्याला परवानगी कुणी दिली होती?' डॉ. जेम्सननी त्याला आधीच्या वचनाची आठवण देत सांगितलं, 'महाराजांनी मला सांगितलं की मी रस्ता बांधू शकतो. महाराज खोटं बोलतात काय?' एकदम लक्षात येऊन लोबेनगुला म्हणाला, 'महाराज कधीच खोटं बोलत नसतात.' आणि त्यानं डॉ. 'जिम' कडे घृणेनं पाहत पाठ वळवली. त्यानंतर त्या कामात कधीच अडथळा निर्माण करण्यात आला नाही. 'लोबेनगुलाचे शत्रू त्याच्या भूमीचा ताबा घेत होते आणि तो (राजा) रस्ता

बांधणारे आणि त्यांच्यावर संतापलेले त्यांचे योद्धे यांच्यामध्ये उभा राहीला. त्यानं वचन दिलं होतं व ते त्यानं पाळलं.' [सारा गरटूड मिलान, *ऱ्होड्स*, पृष्ठ १२२]

निष्कपट, साधेभोळे आणि उदार, अगदी मुलासारखा स्वभाव असलेल्या जुन्या काळातील आफ्रिकी लोकांमध्ये आत्मनियंत्रण आणि क्षमा करायच्या गुणाच्या बाबतीत वेळ आली की कितीही उच्च दर्जावर पोहोचायची क्षमता होती. चाका झुलूकडून पक्ष बदलून मोझेलीकाट्झ दुसरीकडे गेलेला होता. त्यांच्या नियमांप्रमाणे अशा वेळी शत्रूच्या रक्तानं त्यांना आपला भाला धुवावा लागत असायचा. परंतु जिंकलेल्या सगळ्यात दुबळ्या अशा या जमातीला श्रमा करायची मिशनरी मोफॅट यांनी विनंती केली. चाकानं त्यांची विनंती 'केवळ सौजन्य म्हणून' मान्य केली व आपला शब्द पाळला. सनदप्राप्त कंपनी जेव्हा मेटॅबोलेलँड घ्यायचा प्रयत्न करत होती त्यावेळी मोझेलीकाट्झचा शांपेनप्रेमी मुलगा लोबेनगुला आपल्या इम्पिसना म्हणजे सैनिकांना त्याचं राज्य जिंकायचा प्रयत्न करणाऱ्या त्याच्या क्रालमधील गोऱ्या लोकांसंबंधी म्हणाला, ' 'अमाकिवा' माझे पाहुणे आहेत. तुम्ही त्यांना स्पर्श करायचा नाही.' आणि 'त्याच्या शांतता मिशनच्या सदस्यांचा व त्याच्या स्वतःच्या लोकांचा ऱ्होड्सच्या माणसांकडून खून होत असताना आणि त्याचं स्वतःचं क्राल जाळलं जात असतानाही त्यानं त्या पाहुण्यांचं रक्षण केलं.' [सारा गरटूड मिलान, *साऊथ आफ्रिका*, वुइल्यम कॉलिन्स ऑफ लंडन, (१९४१), पृष्ठ १६]

त्यानंतर असंच उदाहरण बासुटो प्रमुख मोशेशचंही आढळतं. पराभूत केलेल्या मांतारी योद्ध्यांना बासुटोंना खाण्याच्या आरोपावरून पकडून त्याच्यासमोर आणण्यात आलं तेव्हा तो केवळ एवढंच म्हणाला, 'त्यांना जाऊ द्या.'

'परंतु त्यांनी तुमच्या स्वतःच्या वडिलांना खाल्लं आहे.'

'माझ्या वडिलांच्या थडग्याची मी विटंबना करू काय? त्यांना जाऊ द्या.' [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २९]

सामान्यपणे आफ्रिकेतील क्रालमधील जीवन निसर्गाच्या स्वतःच्या समाजवादाप्रमाणे नियंत्रित होत असतं. त्याची मुळं त्यांच्या जिवंत परंपरांत रुजलेली आहेत व युरोपच्या नवीन

समाजवादातही त्या परंपरा आढळत नाहीत. हा नवीन समाजवाद सिद्धांताधारित आहे आणि तो बहुधा बौद्धिक व्यापार आहे. आफ्रिकेतील प्राचीन काळाचा समाजवाद त्यांच्या हाडांत मुरलेला आहे. जमातप्रमुख हा प्रत्येक सदस्याच्या कल्याणासाठी जबाबदार असायचा. तिथं भौतिक लाभासाठी शत्रुत्व वा संघर्ष नसायचा. कुणालाही आपल्या बांधवांपेक्षा अधिक मिळवायची वा त्यांच्यावर ताण करायची इच्छा नसे. 'एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक' हा क्राल जीवनाचा आधार होता. फेलिक्स ग्रॅास सांगतात की संपत्तीवरील खाजगी अधिकाराची कल्पना त्यांच्यासाठी 'तेवढीच अनाकलनीय आहे जेवढी सूर्य कुणाच्या तरी मालकीचा आहे, पावसावर कुणाचा तरी हक्क आहे वा विहिरीतील पाणी कुणाच्या तरी मालकीचं आहे ह्या कल्पना आपल्यासाठी अनाकलनीय आहेत.' [फेलिक्स ग्रॅास, *व्होइस ऑफ आफ्रिका,* पृष्ठ १४७] परिणामी एकही माणूस असा नसायचा की ज्याला एकही मित्र नाही. एस. जी. मिलान सांगतात की 'इतकंच नाही तर आजही कुणा तीन वर्षाच्या काळेभोर गोल डोळे, समोर निघालेलं पोट असलेल्या क्रालमधील नागड्या मुलानं एखाद्या गोऱ्याच्या सांगण्यावरून परंपरागत नाच केला व त्याला त्याबद्दल त्या गोऱ्या माणसानं काही दिलं तर तो ती भेट त्यांच्या क्रालमधील मोठ्या मुलाला देतो वा ती भेट वाटून घेण्यासारखी असेल तर वाटून घेतो. क्रालमधील कोणत्याही नेटिव्हाला, मग तो म्हातारा असो वा तरुण, अतिशय अडचणीच्या दिवसातही अन्न मिळालं तर तो त्या अन्नाला सर्वांच्या उपयोगासाठी आपल्याजवळ विश्वस्त म्हणून ठेवलेली ठेव समजतो.' त्याचप्रमाणे, क्रालच्या एखाद्या सदस्यावरील कर्ज दुसऱ्या एखाद्या क्रालसदस्यानं फेडलं तरं त्याच्या मनात ते पैसे परत मिळण्याचा विचारच येत नाही. 'तो मला कसं काय परत करू शकतो? तो मांझा भाऊ आहे.' [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका,* पृष्ठ २६८] आणि तो भाऊ म्हणजे खरा भाऊ, दूरच्या नात्यातला भाऊ वा क्रालमधील कोणीतरी शेजारीही असू शकतो.

मालकीप्रमाणेच क्रालमधील सदस्यांच्या जबाबदाऱ्याही सामुदायिक आहेत असं समजण्यात यायचं. समाज आपल्याला आपल्या सदस्यांच्या संरक्षणासाठी आणि कल्याणासाठीच जबाबदार समजत नसायचा तर त्याच्या सदस्यांच्या दोषांसाठीही जबाबदार

असायचा. समुदायाच्या एखाद्या सदस्यानं समुदायाच्या नियमांचा भंग केला तर इतर सदस्य त्याची सूचना ताबडतोब क्रालप्रमुखाला द्यायचे. तसं न करण्यात आल्यास संपूर्ण समाजाला कर्तव्यच्युतीसाठी जबाबदार असल्याचं मानलं जायचं. ज्याप्रमाणे भारतीय गावपंचायतीत आपल्या समाजातील माणसांसमोर माणसं नेहमी खरं बोलायची परंतु तीच माणसं ब्रिटिश न्यायालयासमोर अशी काही साक्ष द्यायचे की ते 'कल्पनातीत असत्य वाटावं' त्याचप्रमाणे आपल्या समाजापासून दूर केला गेलेला आफ्रिकी माणूस राखीव वस्तीत कधीच काही सांगत नसे. 'एखाद्या नेटिव्हाच्या मित्रावर काही गुन्हा केल्याचा आरोप असेल व त्या नेटिव्हाला काय घडलं म्हणून विचारलं तर तो बहुधा अशा प्रकारे प्रत्युत्तर देईल : 'मालक (किंवा साहेब) तुम्हाला काय वाटतं?' केवळ खरं सांगावं हे त्याच्या डोक्यातच शिरू शकत नाही. न्यायालयाला शक्यता गृहीत धरूनच काम करावं लागतं.' [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २६९] आफ्रिकी लोकांवर गोऱ्या संस्कृतीचा जो दुष्परिणाम झाला त्याचं हे एक केवळ नमुन्यादाखल दिलेलं उदाहरण आहे.

महान स्थलांतरानंतर काळ्या आणि गोऱ्या लोकांमध्ये झालेल्या संघर्षात काळ्या माणसानं स्वातंत्र्य आणि बरीचशी जमीन या दोन्ही गोष्टी गमावल्या परंतु तरीही त्याच्या जीवनात मूलभूत असं कोणतंच परिवर्तन त्यामुळे झालं नाही. तो जेव्हा बोअरांच्या शेतावर कामाला जायचा तेव्हाही तो पूर्वी जसा वन्य जीवन जगत असायचा तसंच साधं सरळ जीवन जगायचा. त्याच्या सामाजिक परंपरा, त्याचं अन्न व त्याचे कपडे वा कपडे नसणं या गोष्टींवर कोणताच परिणाम झालेला नव्हता. त्याच्या बोअर मालकाला त्याची भाषा यायची व तिच्यातच तो त्याच्याशी बोलायचा. तो त्याच्या बायकोला घेऊन शेतावर जाऊ शकत असे व तिथेच बोअरांच्या परंपरेप्रमाणे तो राहायचा, त्याला मुलंबाळं व्हायची व त्यांचं संगोपनही तो आपल्या जमातीच्या परंपरांप्रमाणेच करायचा. परंतु तो जेव्हा औद्योगिक वातावरणातील जोहान्सबर्ग आणि किम्बर्ली येथील झोपडपट्ट्यात कोंबला गेला तेव्हा हे सर्व संपू लागलं. हिऱ्यांच्या आणि सोन्याच्या खाणीच्या पट्ट्याच्या शोधानं आफ्रिकेतील आदिवासी समाजाचं रूपांतर गृहहीन भटक्या समूहात

झालं. त्यामुळे वन्य जीवन व्यवस्थेवर इतका मोठा आघात झाला की ती मोडकळीस आली व त्याचबरोबर प्रतिष्ठितपणा आणि शिस्त यासारख्या आफ्रिकेतील वन्य जमातीच्या इतर उत्तम चालीरीतींचाही लोप झाला.

आज आफ्रिकेतील जवळपास चाळीस टक्के लोक त्यांच्या समुदायात – 'आरक्षित क्षेत्रात' राहतात. ते आजही त्यांच्या जमातप्रमुखाचं बंधन मान्य करतात. इतर साठ टक्के शहरात राहतात. ते युरोपिअन लोकांबरोबर शेतीत वा शहरात राहतात व त्यांच्यावर जमातीचा जो ठसा होता तो अंशतः वा पूर्णपणे पुसला गेला आहे.

'आरक्षित क्षेत्रात' राहणाऱ्या प्रत्येक आफ्रिकी प्रौढ पुरुषाला वार्षिक २० शिलींग 'पोल कर' भरावा लागायचा. त्याशिवाय दर बायकोमागे १० शिलींग परंतु कोणत्याही अवस्थेत २ पौंडपेक्षा अधिक नाही एवढा 'झोपडी कर' स्थानिक प्रशासनाला त्याला द्यावा लागायचा. चराई सामुदायिक असायची. कुटुंबप्रमुखाची आज्ञा मान्य करायचा प्रघात होता. हे आरक्षित क्षेत्र शेतीच्या दृष्टीनं स्वावलंबी होऊ शकत नसल्यामुळे 'नेटिव्हांना' मोठ्या प्रमाणात, विशेषतः मोठा मुलगा सोडून इतरांना काम शोधायला खाण कामगार म्हणून व्हाईटवाटररँड वा किम्बर्लीसारख्या खाणींच्या ठिकाणी जाणं भाग पडायचं. जे नेटिव्ह सोन्याच्या वा हिऱ्याच्या खाणीत काम करायचे त्यांना कुंपणात ठेवण्यात यायचं, तिथंच त्यांना जेवण देण्यात यायचं, त्यांच्यावर पहारा ठेवण्यात यायचा व त्यांच्याजवळ अवैध सोनं वा हिरे आहेत काय याचा कसून शोध घेण्यात यायचा. हा शोध घेण्यासाठी घरी जायच्या आधी त्यांना जोरदार जुलाब देण्यात यायचा. त्यांचे पगार दरमहा तीन पौंड ते दहा पौंड (त्यांच्यात काही विशेष कौशल्य असल्यास) या दरम्यान असायचे जेव्हा की गोऱ्या खाण कामगाराचे पगार पन्नास पौंडापासून सुरू व्हायचे. कुटुंबाचं जेवण सोडून आरक्षित क्षेत्रातील नेटिव्हांचं सरासरी मासिक उत्पन्न ११-१२ पौंडाहून जर जास्त झालं तर ते पैसे हाती असेपर्यंत आराम आणि लख्ख सूर्यप्रकाशाच्या आनंदाचं जीवन सोडून सकाळी तीन वाजेपासून सायंकाळ होईपर्यंत खाणीच्या खोल विवरात घामट आणि दमट

अशा फुफ्फुसाचा क्षयरोग होणाऱ्या वातावरणात, ज्यात मृत्यूचं प्रमाण फार अधिक असायचं, काम करायला जायची त्यांची तयारी नसायची.

याहूनही वाईट परिस्थिती त्यांची असायची जे वाळूत आणि नद्यात खोदकाम करायचे. या खोदकामालगतच्या प्रदेशातील भिकार घरांवर शेजारच्या वाळूच्या टेकड्या कोसळल्या की 'त्यांच्यात पसरलेल्या साथीच्या रोगांनी ते जसे नामशेष व्हायचे' तसेच त्या झोपड्यात नामशेष व्हायचे. [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ५८] जेवणासाठी त्यांना अन्नाचं एक ढेकूळ तेवढं मिळायचं. 'त्यामुळे त्यांची खोल गेलेली पोटं आजाराला बळी पडायची.' उपासमारीनं कृश झालेल्या त्या लोकांचे पाय बाशाप्रमाणे दिसतात, संकाळपासून तर सायंकाळपर्यंत ते घाम गाळतात व दिवसाच्या अखेरीस आपल्या वस्तीतील झोपडीत येऊन 'निकस अन्न, कापसापासून बनवलेले ब्लँकेटस आणि सिफिलीस यांची वाटणी करून घेतात.' [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ५९] थंडीपासून बचाव करण्यासाठी डोकं बाहेर काढण्यासाठी एक छिद्र असलेलं पोतं तेवढं त्यांच्याजवळ असायचं. हिवाळ्याच्या रात्री काटक्या आणि जनावरांचं शेण गोळा करत हिंडताना ते अनेकदा दिसायचे. प्राचीन गौरवाच्या 'अवशेषाचेही अवशेष' असलेले आणि 'अस्तास चाललेल्या जुन्या जगाचा भाग' असलेले बासुटो, बेछुआना, झोसा, झुलू वंशाच्या ह्या लोकांनी, ज़े आज निर्वासित झालेले आहेत, एकेकाळी इंग्रजाच्या शक्तीला आपल्या मातृभूमीच्या रक्षणार्थ आव्हान दिलं होतं. स्वाभिमानी, पौरुषपूर्ण पूर्वजांहून आज ते अगदीच वेगळे दिसत असले तरी त्यांच्यात त्यांचे काहीच गुण नाहीत असं नाही. ते नियमांचं पालन करणारे आणि प्रामाणिक आहेत. सारा गरट्रूड मिलान यांनी निदर्शनास आणून दिलं आहे की आपल्या स्वभावाविरुद्ध वर्तन करून नेटिव्ह माणूस क्वचितच आपल्या मालकाचे हिरे वा सोनं चोरून ते विकायचा जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा ते पाहून आश्चर्य वाटतं. दक्षिण आफ्रिकेत चोरीचं सोनं वा हिरे विकत घेणं हा गुन्हा आहे व त्यासाठी कायद्यात सात वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सांगण्यात आलेली आहे. ' 'नेटिव्ह' लोक आपल्या भागातून शहरात यायचे

तेव्हा ते याहून कमी प्रामाणिक असायचे असं काही नाही. परंतु आज ते तेवढे प्रामाणिक नाहीत' असं ही लेखिका पुढं सांगते. [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ५९]

## १४

दुरून पाहिलं असता गांधीलमाश्यांच्या घरट्यासारखे आफ्रिकी क्राल दिसत असतात. शंकाकृती, मातीनं लिंपलेल्या तट्ट्याच्या भिंती आणि छप्पर व आतून खांबाचा आधार असलेल्या १० ते २० झोपड्यांचा आफ्रिकी क्रालसमूह असतो. या झोपड्यात शिरण्यासाठी एकच अरुंद लहानशी खालच्या बाजूनं मोकळी जागा असते व तिला दारं वा खिडक्या अगदीच नसतात. झोपडीच्या आत प्रकाश वा वारा नसतो. जमीन आणि भिंती माती व शेणानं सारवलेल्या असतात. तिथं टेबल, खुर्च्या वा फर्निचर वगैरे काहीच नसतं. वेळूपासून बनवलेल्या चटयांचा सामान्यपणे उपयोग करण्यात येत असतो. पिवळसर रंगाचं सिलेंडरच्या आकाराच्या मानेच्या वाकाशी जुळणाऱ्या लाकडाच्या ठोकळ्याचा उपयोग झोपताना उशीसारखा होत असतो. तो मखमलीसारखा स्पर्शाला मऊसर व अतिशय कलात्मकतेनं कोरलेला असतो. गांधीजींना तो एवढा आवडला होता की त्यांनी दक्षिण आफ्रिकेत असताना तो घेतला होता व भारतात येताना असाच एक लाकडाचा तुकडा त्यांनी सोबत आणला होता. जेवणात बारीक केलेल्या व पाण्यातून शिजवलेल्या मिली असतात व त्या भरपूर लागत असतात. जेव्हा केव्हा मिळतं तेव्हा त्यात मांसाची भर घालण्यात येत असते. मांस कच्चं वा शिजवून वा भाजून खातात परंतु त्यात मिठाशिवाय कोणताच मसाला नसतो. काही तर त्याला मिठाचाही स्पर्श होऊ देत नाहीत आणि त्यात कोणी मसाला घातल्यास ते फेकून देण्याच्या लायकीचं होतं.

युरोपिअन संस्कृतीच्या आगमनाच्या आधी आफ्रिकी लोक, स्त्रिया आणि पुरुष दोघंही जवळपास नागवेच फिरत असत. काहीच कपडे घालण्यात येत नसत. लज्जारक्षणासाठी काही वेळा ते जनावरांचं कातडं वापरत असत. त्याचाच उपयोग सतरंजीसारखा, चादरीसारखा वा दुलईसारखाही व्हायचा. आता त्यांची जागा ब्लँकेटनं घेतलेली आहे. आता कायद्यानं पुरुषांना

कंबरेपासून खालपर्यंत आणि स्त्रीयांना छातीपासून गुडघ्यापर्यंत कपडे घालायचं बंधन आहे. यासाठी नियमात बसतील असे कापडाचे तुकडे युरोपमधून आयात करण्यात येतात. या नियमांमुळे त्यांना फार मागणी असते. ज्यांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला आहे त्यांनी युरोपिअन पोषाख घालायला सुरुवात केलेली आहे. त्यांच्या बाया मलय पोषाख घालतात. माणसं शहरात राहायला जातात तेव्हा युरोपिअनांप्रमाणे कोट, शर्ट आणि पँट घालतात. तिथं ते गोऱ्यांकडे स्वयंपाकी, नोकर आणि कारकुनाचं काम करतात.

जुन्याच पोषाखाला चिकटून बसलेले लोक आधुनिकतेचा स्वीकार केलेल्या आफ्रिकी लोकांच्या दृष्टीत 'मागासलेले' असतात. दुसरीकडे ख्रिश्चन धर्माचा स्वीकार न केलेल्या जुन्या पद्धतीनं राहणाऱ्या आफ्रिकींसाठी, त्यांच्या आजुबाजूला दिसतं त्याप्रमाणे, युरोपिअन संस्कृती म्हणजे दारू, अनैतिकता आणि इतर दोष यांनी युक्त अशी संस्कृती असते. त्याच्या दृष्टीत ही अशी संस्कृती असते की जिच्यात अधार्मिक वर्तनाला परवानगी असते व जिच्यामुळे विवेकबुद्धीचं हनन होतं. अनेकदा याबद्दल या दोन वर्गात अतिशय तावातावानं वाद होत असतो. एकदा दोन झुलू बायात वाद सुरू होता. एक आधुनिक ख्रिश्चनीकरण झालेली व दुसरी ख्रिश्चनीकरण न झालेली, जुन्या पद्धतीची होती. ही दुसरी बाई गांधीजींची सहकारी होती. गांधीजींना झुलू भाषा समजत होती व ते त्यांचं संभाषण लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांच्यातील एकीला ते म्हणाले, 'तू तिच्यावर फार संतापलीस. पण तुला दिसत नाही काय की ती सुसंस्कृत आहे व तू नाहीस. यामुळे फरक पडत नाही काय?'

तिनं ताडकन विचारलं, 'संस्कृती म्हणजे तुम्ही काय समजता? केवळ भडक कपडे घालणं, बाहेर वेश्येसारखं मटकणं, युरोपिअन दारू ढोसणं, वाक्चातुर्यानं लोकांची फसवणूक करणं, अनैतिक जीवन जगणं आणि रविवारी हां जी हां जी करत चर्चमधे जाऊन देवाची फसवणूक करणं? जर हीच संस्कृती असेल तर मला ती अगदीच नको आहे. त्यापेक्षा रानटी वा तुम्हाला जे काही नाव द्यायचं असेल त्या नावानं ओळखलं जाणं मी पसंत करीन.'

तिला मधेच अडवत गांधीजींच्या एका सहकाऱ्यांनी सुचवलं, 'तुम्हांला कदाचित अधिक प्रगत अशा या तुमच्या बहिणीबद्दल जास्त मत्सर वाटत असेल. तुमच्या या तेलकट कपड्यांकडे पाहा, त्यांचा वास येतो. तुमच्या शरीराचा एरंडीच्या तेलासारखा वास येतो. तुम्हाला हेही माहीत नाही की सभ्यपणानं कसं बोलावं, कसे कपडे घालावे आणि कसं राहावं.'

दुसरी भडकून म्हणाली, 'आम्हाला माहीत आहे. परंतु त्याला काय अर्थ आहे? ते वरून सभ्य दिसत असतील व सुंदर कपडे घालून संस्कृतीचा टेंभा मिरवत असतील परंतु त्यांच्या आतलं काय? त्यांचं जीवन किती घाणेरडं आहे? तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आमच्या शरीराचा वासही येत असेल पण आतून ती स्वच्छ आहेत. आम्ही आमच्या निर्मात्याला घाबरून चालतो आणि आम्ही त्याला फसवत नाही.'

मित्र वाद घालत पुढं म्हणाला, 'चांगलं आणि वाईट चोहोकडे असतं. कोणीच वाईटापासून पूर्णपणे मुक्त नाही. तू त्यांच्या अनैतिक जीवनाकडे बोट दाखवतेस पण तुला असं म्हणायचं आहे काय की तुम्ही सर्व धुतलेल्या तांदळासारखे आहात? तुमच्यातही वाईट लोक असू शकतील.'

ती उत्तरली, 'मला हे मान्य आहे. फरक एवढाच आहे की आमच्यातील १० टक्केच भ्रष्ट आहेत पण बाकीचे शुद्ध आहेत. पण दुसऱ्या बाजूला परिस्थिती अगदी उलट आहे. पन्नास वर्षांपूर्वी तेही आमच्यासारखेच होते. परंतु त्यांनी अजूनही आमचा त्याग केलेला नाही. माझं त्यांच्याशी काहीच भांडण नाही. माझं भांडण तुम्ही ज्याला 'संस्कृती' वा 'सुधारणा' म्हणता केवळ त्याच्याशी आहे.' [रावजीभाई मणीभाई पटेल, *गांधीजींनी साधना,* (गुजरातीत), नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, (१९३९), पृष्ठ ९]

तटस्थ साक्षीदार 'अप्रगत' 'जुन्या पद्धतीच्या' आफ्रिकी बहिणीचं म्हणणं सत्य आहे म्हणून मान्य करील असं दिसतं. सारा गरटूड मिलान यांनी लिहिलं आहे, 'आखूड कपडे घालून व डोळ्यांना काहीही झालेलं नसलं तरी चष्मा लावून हिंडणाऱ्या मुलीसाठी तरुण लोबोला म्हणजे

उलट्या पद्धतीचा हुंडा द्यायला तयार नसतात. चष्मा हे स्खलनाचं चिन्ह आहे असं एखादा सहजपणे गृहीत धरू शकतो.' [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २६४]

वांशिक दृष्ट्या आजच्या आफ्रिकींची दोन गटात विभागणी करता येऊ शकते - बांटूचे वंशज आणि त्यांच्या संकरित जाती. दक्षिण आफ्रिकेतील मिश्र रक्ताच्या लोकांना रंगीत लोक म्हणतात. इथं 'रंगीत' हा शब्द विशेषण म्हणून वापरण्यात आलेला नसून नाम म्हणून वापरण्यात आलेला आहे. अगदी सुरुवातीस जे गोरे लोक वसाहत करायला आले त्यांचा हॉटेन्टॉट स्त्रियांशी जो संबंध आला त्या संबंधातून यांचा जन्म झालेला आहे. त्यातच काही मलय, बुशमन आणि बांटूंचंही रक्त मिसळलेलं आहे. त्यांच्यात हॉटेन्टॉट रक्त असलं तरी आफ्रिकी लोकांनी त्यांना हॉटेन्टॉट म्हटलेलं आवडत नाही. रंगीत माणूस केपमधे राहत असला तर त्याला केपरंगीत म्हणतात. एकेकाळी हॉटेन्टॉट राहत असलेल्या उत्तरेकडे जे गेले व व्हॉलमधे ज्यांनी वास्तव्य केलं त्यांना ग्रिकॉज म्हणून ओळखण्यात यायचं. परंतु त्यांना बॅस्टर्ड म्हणवून घेणं आवडायचं कारण त्यांना त्यांच्यातील गोऱ्या रक्तावर भर द्यायचा असायचा. केपकॉलनीतील रंगितांनी युरोपिअन पोषाख आणि रीतीभातींचा स्वीकार केला होता व ते आफ्रिकान भाषा बोलायचे. परंतु सामाजिक प्रसंगी इंग्रजी बोलणं ते पसंत करायचे. व्हॅन रिबॉक दक्षिण आफ्रिकेत आल्यानंतर बरोबर नऊ महिन्यांनी पहिला रंगीत माणूस जन्माला आला असं सांगतात. एका बाजूला गुलामांचं रक्त असलेले आणि दुसरीकडे 'निष्काळजी, स्वार्थी, मूर्ख आणि दुष्ट अशा तत्कालीन चैनी लोकांच्या मौजमजेतून निर्माण झालेल्या' या लोकांना काळ्या आणि गोऱ्या दोन्ही समाजांनी नाकारलेलं होतं, त्यांच्या पालकांनी टाकून दिलेलं होतं आणि समाज त्याच्याकडे घृणेनं पाहत होता. केपरंगितांचं वर्णन, 'बंड करायची क्षमता नसलेला.... कमी प्रतीचा, स्थितिशील आणि ज्यांच्यात आध्यात्मिक वा बौद्धिक प्रगतीची क्षमता नाही असा वंश' असं करण्यात आलेलं आहे. [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २५३] असं सांगतात की दक्षिण आफ्रिकेच्या संपूर्ण इतिहासात रंगीतानं कोणत्याही क्षेत्रात मोठी प्रगती करून नाव काढलं आहे असं आढळत नाही. दीर्घकाळापासून गोऱ्या माणसानं त्यांना आपल्यापेक्षा कमी प्रतीचं लेखून वागणूक दिलेली आहे.

*द पिपल ऑफ द साऊथ आफ्रिका* या ग्रंथाच्या लेखकाचं असं म्हणणं आहे की 'ज्यांचा सामर्थ्याचा आणि शौर्याचा पूर्वेतिहास आहे आणि त्याच्याच प्रवृत्तीशी पूर्णपणे मेळ असलेल्या संपूर्ण आफ्रिका खंडाचं ज्यांना ज्ञान आहे अशा क्रालपुत्रांनाच पुन्हा अभिनंदनीय कार्य करता येईल.' परंतु 'गरीब, विश्वासघात झालेले व निष्काळजी, स्वार्थी, मूर्ख आणि दुष्ट लोकांचं रक्त अंगात असलेल्या व अपमानित अवस्थेत जन्माला आलेल्या....आणि जगाला नको असलेल्या' या रंगीत लोकांच्या जीवनात आशेचा किरण केव्हा उगवणार आहे व सन्माननीय वागणूक त्यांना केव्हा मिळणार आहे? [सारा गरट्रूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ५९] त्याला माहीत आहे की तो गोऱ्या माणसांच्या समान व्हायची आशा कधीच बाळगू शकत नाही. आणि हे शक्य नसल्यामुळे तो तशी आशाही करत नाही. तो गोऱ्यांच्या बंगल्यांपासून आणि काळ्यांच्या क्रालपासून सारखाच दूर राहतो. संकरित जातीचा हा माणूस सर्वांपासून वेगळा राहून आपलं जीवन व्यतीत करतो.

दक्षिण आफ्रिकेतील निग्रो हे झुलूंसारखेच आहेत असं समजण्यात यायचं. झुलू स्वतःला आफ्रिकेतील सर्वात सुंदर आणि हुशार वंशातील समजतात. परंतु शांगानादेखील स्वतःला त्याप्रमाणेच सुंदर आणि हुशार मानतात. ते स्वतःच्या चातूर्याबद्दल आणि दिसण्याबद्दल अतिशय प्रौढी मारत असतात. रुंद छाती, प्रमाणबद्ध बांधा, सशक्त आणि मजबूत स्नायू, गोल मांड्या आणि दंड अशा प्रकारची शरीरयष्टी असलेल्या स्त्री-पुरुष झुलूंचा एखाद्या पुतळ्यासारखा उंच आणि भव्य, सुंदर व ताठ बांधा असतो. मोठे आणि जाड ओठ त्यांच्या शरीराच्या प्रमाणबद्धतेत [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, (१९६१), पृष्ठ ९] भरच घालतात. गोल चमकदार डोळे, चेहऱ्याला शोभणारं मोठं आणि बसकट नाक, [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, (१९६१), पृष्ठ ९] व डोक्यावरील कुरळे केस आणि सॅटीनसारखी मुलायम काळीशार कातडी असलेले झुलू मानवजातीचा उत्कृष्ट नमुना आहेत. गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे सौंदर्यविषयक आपली कल्पना एकांगी नसली तर झुलूंचं जे स्वतःबद्दल मत आहे ते सार्थ

असल्याचं लक्षात येईल. गांधीजींनी झुलूंचं वर्णन 'शारीरिकदृष्ट्या सर्वाधिक परिपूर्ण लोक' असं केलेलं आहे.

शारीरिक सामर्थ्याच्या बाबतीत इतरांपेक्षा श्रेष्ठ असलेले झुलू एखादा युरोपिअन मुलगा दिसला की जीवाच्या भीतीनं घाबरून पळून जाण्याएवढे भित्रे असल्याचं गांधीजींच्या लक्षात आलं होतं. [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका,* नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, (१९६१), पृष्ठ ११-१२] सारा गरटूड मिलान लिहितात, 'त्यांची जेव्हा गोऱ्या माणसावर दृष्टी पडते तेव्हा त्यांच्या कातडीवरील रंग त्यांच्या अंतःकरणावर उतरल्यासारखं होतं' [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका,* पृष्ठ २५२] आफ्रिकी लोकांचा वन्य जीवनाशी जुळलेला अपरिपक्व जोम आणि अनियंत्रित भावनाशीलता ह्या गोष्टी त्यांच्या विनाशाला कारणीभूत झाल्याचं गांधीजींना जाणवलं होतं. त्यामुळे ज्या संघर्षात गांधीजी गुंतलेले होते त्या संघर्षात पाशवी शक्तीच्या आव्हानाला तेवढ्याच प्रमाणातील पाशवीशक्ती हे उत्तर होऊ शकत नाही, तर कदाचित त्याहून वेगळं कोणतं तरी उत्तर असायला हवं असं त्यांना वाटलं. कदाचित त्या उलटही ते उत्तर असू शकेल असं गांधीजींच्या आधी अस्पष्टपणे आणि नंतर स्पष्टपणे लक्षात आलं. विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात दक्षिण आफ्रिकेतील एक निग्रो मित्र गांधीजींना भेटायला आला व त्यानं आपली समस्या गांधीजींसमोर मांडली : 'पाश्च्यात्य संस्कृती आमच्याकडे एका हातात बिअरची बाटली आणि दुसऱ्या हाती बंदूक घेऊन आली. ख्रिश्चन मिशनरी आमच्याशी आपल्याच पद्धतीनं मैत्रीनं वागत होते आणि त्यांनी आम्हांला येशूनं पर्वतावर केलेला उपदेश सांगितला. युरोपिअन लोकांच्या परस्परातील वागण्यात वा त्यांनी आमच्याशी केलेल्या वर्तनात येशूनं पर्वतावर केलेल्या उपदेशाचा प्रभाव पडल्याचं आम्हा आफ्रिकी लोकांना कुठेच आढळत नाही. परंतु मिशनऱ्यांच्या मागेमागे आलेले मद्यपान आणि संस्कृतीचे इतर दोष मात्र गवताला लागलेल्या आगीप्रमाणे आदिवासी आफ्रिकी लोकात पसरले व त्यांनी आणलेली बंदूक आमच्या परस्परांच्या विनाशासाठी कारणीभूत ठरली. त्यामुळे आमची परिस्थिती पूर्वीहूनही वाईट झाली. आम्ही आफ्रिकी माणसं अशा चमत्कारिक आणि भयानक शक्तींनी घेरले गेलो असल्याची आम्हाला जाणीव होते. तिचं आम्हाला नीट

आकलन होऊ शकत नाही आणि तिनं आम्हाला राक्षसिणीप्रमाणे जखडून ठेवलं आहे. 'आम्ही अशा शक्तीकडून भरडलं जात आहोत की जी निर्दय आणि कठोर आहे...... आम्हाला कोणताच मार्ग सुचत नाही.' गांधीजींना भेटायला आलेला पाहुणा गांधीजींना म्हणाला, 'आमचा सत्यानाश झाला आहे.' [*यंग इंडिया*, मार्च २८, १९२९] 'तुम्ही आमचं काही मार्गदर्शन करू शकता काय?' त्यांनी गांधीजींना विचारलं.

गांधीजींनी त्यांना सांगितलं की आफ्रिकी लोकांनी निराश व्हायचं काही कारण नाही. कारण प्रत्येक प्राण्यात असं काही तत्त्व आहे की ज्याची शक्ती असीम आहे आणि ज्याला एकदा जागं करून गतिशील केलं की जगातील कोणतीही शक्ती त्या शक्तीला दाबू शकत नाही. आपल्याला जेव्हा आपलं खरं स्वरूप वा आपल्या अंतर्यामीचं स्वरूप कळतं तेव्हा ती आपोआप अभिव्यक्त होते. त्यामुळे गांधीजींनी त्यांना सत्याग्रहाच्या मार्गाचं अनुसरण करायला आणि आत्मशुद्धी करायला सांगितलं. भेटायला आलेल्या पाहुण्यांचे डोळे नवीन मार्गाचा शोध लागल्याच्या आनंदानं लकाकले व त्यांच्या अंतःकरणात नवीन आशा आणि धैर्याचा संचार झाला. परंतु गांधीजी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकाच्या सुरुवातीस आफ्रिकेत पोहोचले तेव्हा त्यांना याची जाणीव नव्हती. ते केवळ चाचपडत होते.

# प्रकरण १६ वे

# गावकुसाबाहेरील पोरं

## १

आफ्रिकी समाजाचं चित्र व त्याची राजकीय पार्श्वभूमी ही अशी होती. एकोणिसाव्या शतकाच्या घडामोडींनी भरलेल्या अखेरच्या पाव शतकात दक्षिण आफ्रिकेच्या रंगभूमीवर भूमिका वठवणारे अभिनेतेही हे असे होते. त्या काळात तिथं असलेल्या लहानशा भारतीय समाजाच्या अस्तित्वालाही धोका निर्माण करणारं आव्हान भारतीय समाजासमोर उभं ठाकलेलं होतं. जुन्या आफ्रिकेचा अंत झालेला होता व नवीन आफ्रिका आकार घेऊ लागलेली होती. प्रत्येकजण अस्थिर अवस्थेत होता. आंतरराष्ट्रीय दरोडेखोरीच्या सभोवतीच्या वातावरणात नैतिकतेचं अवमूल्यन झालेलं असताना माणसाला घाणीप्रमाणे लेखणं आणि संपूर्ण वंशांचं निर्मूलन करणं यांचं समर्थन 'प्रगतीचे' सोयिस्कर तत्त्वज्ञान सांगणाऱ्या अर्धवट विज्ञानाधारे करण्यात येत होतं. साम्राज्यवादाचं धर्माप्रमाणे उत्साहानं स्वागत करण्यात येऊ लागलं होतं. तत्कालीन बिनीचे मुत्सद्दी राजकीय ध्येयसिद्धीसाठी असत्याचरणाचा फॅशनप्रमाणे उपयोग करू लागले होते.

दक्षिण आफ्रिकेतील आदिबासी बुशमन आणि हॉटेन्टॉट हे जणू काय अगदी वेगळेच वंश आहेत असं समजून त्यांचं निर्मूलन करण्यात आलं होतं. बांटूंचं पूर्वीचं जे वैभव होतं त्याच्या केवळ सावलीप्रमाणे त्यांचे वंशज राहिले होते. बंदिस्त भागात बंदिस्त जीवन जगणाऱ्या बांटूंच्या नशिबात गोऱ्यांच्या पाळीव पशूसारखं जीवन जगण्याशिवाय दुसरं काहीही शिल्लक नव्हतं. केपमधील रंगीत लोकांनी यशाची आशा आणि क्षमता इतकी गमावलेली होती की त्यांना गोऱ्यांशी स्पर्धा करायची कल्पनाच 'निसर्गविरोधी' [सारा गरटूड मिलान, *द पिपल ऑफ साऊथ आफ्रिका*, पृष्ठ २५१] वाटायची. संकरित ग्रिकॉँना आपल्या गोऱ्या रक्ताचा अतिशय अभिमान होता. त्यांचा 'वारसा

हिरावून घेणाऱ्या व त्यांच्या पवित्र भूमीचा विनाश घडवून आणणाऱ्या' गोऱ्या माणसांबद्दल त्यांना घृणा आणि कटुता वाटत नव्हती. उलट त्यांच्यातीलच 'लज्जास्पद विश्वासघाताला बळी पडलेल्या आणि उध्वस्त झालेल्या आपल्या अर्ध्या भागाबद्दलच' [सारा गरटूड मिलान, *द साऊथ आफ्रिकन्स*, कॉन्स्टेबल अँड कंपनी लिमिटेड, लंडन, (१९२७), पृष्ठ १९६] म्हणजे काळ्या कातडीच्या माणसांबद्दलच त्यांना घृणा आणि कटुता वाटायची.

आफ्रिकी माणसाला सहनशीलतेनं किंबहुना आश्रित म्हणून वागवून उपकृत करणं गोऱ्यांना परवडायचं. परंतु वसाहत केलेले भारतीय त्यांना काट्याप्रमाणे सलत होते. गोऱ्या लोकांनी रंगीत लोकांना या जगात आणलं आहे व 'नेटिव्हांच्या' मायभूमीचा ताबा घेतला आहे त्यामुळे आमच्यावर भारतीयांपेक्षा 'नेटिव्हां' ची जबाबदारी अधिक असं बोअरांचं म्हणणं होतं. ब्रिटिश तर याहूनही एक पाऊल पुढं गेले. भारतीय घुसखोर आहेत व त्यामुळे भारतीयांपेक्षा नेटिव्हांना अधिक अधिकार आहेत असं त्यांचं म्हणणं होतं. हे केवळ असत्यच नव्हतं तर हा त्याच्या कृतघ्नतेचा कळस होता. कारण भारतीयांना नाताळमध्ये आणणारे हेच ब्रिटिश होते. जेव्हा 'मदत करा वा आम्ही मरू' अशाप्रकारचा आरडाओरडा ब्रिटिशांनी केला तेव्हा भारतीयांना इथं आणण्यात आलं होतं. भारतीयांनी नाताळच्या समृद्धीचा पाया रचला होता व त्यांच्या आगमनाला 'वसाहतीसाठी निर्विवादपणे लाभदायी मानण्यात आलं होतं.' [जान एच. हॉफमायर, *साऊथ आफ्रिका*, पृष्ठ १४६] जे. एच. हॉफमायर यांनी दर्शवल्याप्रमाणे सुरुवातीपासूनच नाताळ सरकारच्या धोरणामागील मूळ हेतू स्पष्ट होता. करारबद्ध मजूर म्हणून म्हणा वा स्वतंत्र माणूस म्हणून म्हणा 'वसाहतीच्या समृद्धीला हातभार लावणारा घटक म्हणून भारतीयांचं कॉलनीत कायम निवासी म्हणून स्वागत करायचं धोरण' ठरलेलं होत. [जान एच. हॉफमायर, *साऊथ आफ्रिका*, पृष्ठ १४६] परंतु गोऱ्या वसाहतदारांना आता तो गुलाम म्हणून हवा होता, स्वतंत्र माणूस म्हणून नको होता.

अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली होती.

ब्रिटिश साम्राज्यात १८३३ साली गुलामगिरीवर बंदी आणण्यात आल्यानंतर कॉलनीतील मळेवाल्यांना स्वस्त, कार्यक्षम 'अर्धगुलामासारख्या' मजुरांची गरज भासू लागली होती.

गुलामांच्या मुक्तीचा कायदा झाल्यानंतर मजुरांची उणीव भासेल याची पूर्वकल्पना येऊन मळेवाल्यांनी वेठबिगारीचा म्हणजे 'करारबद्ध मजूर' पद्धतीचा मार्ग शोधून काढ़ला होता. परंतु मुक्त झालेले गुलाम कोणत्याही अवस्थेत त्यांच्या मालकाच्या कामावर परतायला तयार नव्हते. त्यामुळे मळेवाल्यांनी आपली नजर भारत आणि चीनकडे वळवली. भारतावर ब्रिटिशांची मालकी होती म्हणून भारतात इंग्रज वसाहतदारांना खास सवलती दिल्या गेल्या. अशा रीतीनं वसाहतीतील बंधुआ मजुरांचा एक नवीन वर्ग अस्तित्वात आला व भारताला त्याचा भार सहन करावा लागला.

युरोपिअन मळेवाल्यांसाठी भारतीय करारबद्ध मजूर भरती करावयच्या पद्धतीची पहिली नोंद १८३० सालची आहे. तेव्हा जोसेफ ऑर्गाड या फ्रेंच व्यापाऱ्यानं १३० भारतीय कुशल कामगारांना बोरबॉन येथे नेलं होतं. [एन. गांगुली, *इंडियन्स इन द एम्पायर ओव्हरसीज*, द न्यू इंडिया पब्लिशिंग हाऊस लिमिटेड, लंडन, (१९४७), पृष्ठ २१] परंतु अकुशल मजुरांची पहिली मागणी जेव्हा मॉरिशस आणि ब्रिटिश ग्वायनाधील ऊसाच्या मळेवाल्यांकडून आली तेव्हा ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी भारताचे व्हाईसराय लॉर्ड ऑकलंड यांना भारतीय मजूर ब्रिटिश वसाहतींना पुरवण्यासंबंधी आवश्यक पावलं उचलायला सांगितलं.

त्यानुसार १८३७ साली भारतीयांसाठी परदेशात जाऊन वस्ती करण्यासंबंधीचा कायदा करण्यात आला. या कायद्यात मजूर भरतीचे नियम, वस्ती करण्यासंबंधीचे करार, त्यांची वाहतूक यांसंबंधीची तरतूद करण्यात आली होती. १८३७च्या मध्यापर्यंत भारतातून मॉरिशसला २०,००० पेक्षा अधिक मजुर पाठवण्यात आले होते [एन. गांगुली, *इंडियन्स इन द एम्पायर ओव्हरसीज*, पृष्ठ २२] व एका दशकातच वस्ती करायला जाणाऱ्या भारतीय मजुरांचा एक प्रवाहच त्रिनिदाद, जमेका व ब्रिटिश ग्वायनात वाहू लागला होता.

१८४९मधे ब्रिटिशांचा कित्ता गिरवत फ्रेंच विधिमंडळानं गुलामगिरीचा कायदा रद्द करून १६०,००० गुलामांची मुक्तता केली. अँटिला व री युनियन येथील मळेवाले भारतातील फ्रेंचांच्या

वसाहतींकडे मजुरांच्या पुरवठ्याची मागणी करायला गेले. त्यांनी नाविक परंपरेमुळे समुद्र पर्यटनावर बंदी नसलेल्या दक्षिणेकडील बहुतेक द्रविड भाषिक मजुरांची भरती केली.

भारतीय मजुरांच्या कौशल्यानं आणि मेहनतीनं मॉरिशस, ब्रिटिश ग्वायना आणि वेस्ट इंडीज, फिजी आणि पूर्व आफ्रिका या प्रदेशात संपन्नता आली होती. परंतु 'त्या संपन्नतेचा भारतीयांना काहीच लाभ झाला नाही' [एन. गांगुली, *इंडियन्स इन द एम्पायर ओव्हरसीज*, पृष्ठ २८] असं या विषयावरील तज्ज्ञ सर जॉन किर्क यांचं म्हणणं आहे. युगांडामध्ये रेल्वे अस्तित्वात आली ती भारतीय मजुरांमुळे. वेस्ट इंडीजमधे करारबद्ध मजूर जाऊ लागल्यानंतर १३ वर्षांनी तत्कालीन वसाहत मंत्री सर एडवर्ड बुलवर लिटन यांना राज्यपाल कीट्स यांनी १८५८ साली पाठवलेल्या शासकीय वृत्तांतात मान्य केलं की त्रिनिदाद आपल्या प्रगतीसाठी भारतीय मजुरांचा ऋणी आहे. राज्यपाल महोदयांनी लिहिलं की 'भारतीय मजूर आले नसते तर साखर निर्मितीचं केंद्र म्हणून त्रिनिदादचं जगात जे स्थान आहे ते पुसलं गेलं असतं.' [एन. गांगुली, *इंडियन्स इन द एम्पायर ओव्हरसीज*, पृष्ठ २८] आर्थिक प्रगती आणि संपन्नतेविषयीच्या अशाच प्रकारच्या कार्यालयीन प्रतिक्रिया फिजी आणि मॉरिशस विषयीही मिळतात. तिथल्या ऊस उत्पादनाचं आणि साखर उद्योगाच्या विकासाचं श्रेय भारतातून आलेल्या मजुरांनाच जातं.

नाताळमधे इंग्रजांनी १८४३ सालीच वस्ती केली होती. परंतु ब्रिटिश, डच व बोअर यांच्यात प्रभुत्वासाठी चाललेल्या संघर्षामुळे १८५०पर्यंत तिथलं वातावरण स्थिरावलं नव्हतं. इंग्रज वसाहतवाल्यांच्या लक्षात आलं की तिथं उत्कृष्ट चहा आणि कॉफीचं उत्पादन होऊ शकतं. आणि एके दिवशी १८५२मध्ये ऊसाच्या पहिल्या लागवडीनं तिथं 'खळबळ' उडाली. सर जॉन रॉबिन्सन यांनी नोंदवल्याप्रमाणे ऊसातून रस अगदी जुनाट पद्धतीनं काढण्यात येत असला व रस ओबडधोबड पद्धतीनं उकळवण्यात येत असला व 'ती साखर जरी चिकट व काकवीसारखी होती तरी परिणाम निर्विवादपणे साखर हाच होता.' [सर जॉन रॉबिन्सन, *अ लाईफ टाईम इन साऊथ आफ्रिका*, स्मिथ, एल्डर अँड कंपनी, लंडन, (१९००), पृष्ठ ७३] दोन वर्षांनंतर वसाहतीसाठी आलेले डब्ल्यू. जी. होल्डन यांनी किनारपट्टीवर ऊसाच्या लागवडीला सुरुवात केली. तिथं ऊसाचं उत्तम पीक आलं व तो प्रदेश

त्या भागातील साखरसाम्राज्य म्हणून गणला जाऊ लागला व थोड्याच दिवसात तो उद्योग इतका फोफावला की तो इंग्लंडमधील मोजक्या वसाहतवाल्यांच्या आटोक्याबाहेर गेला.

झुलूंना कठोर परिश्रमाची सवय नव्हती. बक्षिसाचा मोह वा शिक्षेची भीती यांपैकी काहीच त्यांना पगारी गुलाम म्हणून काम करायला प्रवृत्त करू शकत नव्हते. इंग्लंडमधील निराधार मुलांना आणूनही काहीच परिणाम झाला नाही. त्यामुळे ब्रिटिश वसाहतवाल्यांनी मॉरिशस वसाहतीतील ऊस मळेवाल्यांच्या पावलावर पाऊल टाकून भारतातून मजुरांच्या आयातीसाठी वसाहत विभागाशी आणि ईस्ट इंडिया कंपनीशी वाटाघाटी सुरू केल्या. त्यांनी आधी त्याला नकार दिला आणि कराराची मुदत संपलेल्या कुलींच्या परतायची व्यवस्था करायची आणि दरमहा सहा शिलींगपेक्षा अधिक मजुरीची मागणी केली. परंतु अखेरीस भारत सरकारनं प्रायोगिक तत्त्वावर १५० कुलींची लहानशी पहिली तुकडी पाठवायला मान्यता दिली. भारतीय करारबद्ध मजुरांची पहिली तुकडी नाताळ येथील बंदरात नोव्हेंबर १६, १८६०ला पोहोचली. त्यांच्या आगमनानं नाताळची समस्या कशी सुटली याचं सर जॉन रॉबिन्सन यांनी अ लाईफ टाईम इन साऊथ आफ्रिका या ग्रंथात पुढीलप्रमाणे वर्णन केलं आहे :

*मला ती सायंकाळ चांगली आठवते.... उंचावरून सागराकडे पाहत असताना टुरो नावाचं जहाज नांगर टाकायच्या भागाकडे येताना दिसलं. त्याचे पांढरे सुकाणू निळसर सागराच्या क्षितीज रेषेवर फडकताना दिसत होते. आम्हा सर्वांना नवीन ईश्वरी संदेशाचा तो अग्रदूत आहे असं वाटत होतं.* [सर जॉन रॉबिन्सन, *अ लाईफ टाईम इन साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ७३] 'आणि तसंच ते असल्याचं आढळून आलं' असं ते पुढं सांगतात. परंतु एका विशाल अर्थानं त्या प्रसंगाचं वेगळंही महत्त्व असल्याचं नंतर सिद्ध झालं. कारण त्यामुळेच भारतीयांच्या प्रश्नाचं बीजारोपण दक्षिण आफ्रिकेत झालं होतं व परिणामी सत्याग्रहाच्या संघर्षाला सुरुवात झाली होती.

या व्यवहारात भारत सरकारची भूमिका दोन पक्षातील तटस्थ मध्यस्थाची होती. करारबद्ध मजूर - ज्यांच्यात स्त्रियांचं किमान एक प्रमाण असणं आवश्यक होतं - नाताळ सरकारच्या खर्चानं यायचे. त्यांच्या आगमनानंतर त्यांना मान्यताप्राप्त मालकांना तीन वर्षांच्या

करारावर सोपवण्यात यायचं. मालकाला मजुराला कुटुंबाच्या खर्चाशिवाय १० शिलींग दरमहा पगार द्यावा लागायचा व तो वाढत वाढत १२ शिलींगवर जायचा. तीन वर्षांनंतर एक वा दोन वर्षांसाठी मजुराला आपल्या इच्छेनुसार पुन्हा करार करावा लागायचा व त्यानंतर तो त्याच्या इच्छेनुसार हवं तिथं काम करायला व राहायला मोकळा असायचा. अजून पाच वर्षांनंतर त्याला भारतात परतण्यासाठी भाडं मिळायचा वा आफ्रिकेतच राहायचं असलं तर भाड्याच्या खर्चाएवढ्या किमतीची सरकारी जमीन मिळायचा अधिकार असायचा. अशा रीतीनं काम करायला आलेल्या मजुरांच्या हिताकडे लक्ष देण्यासाठी प्रोटेक्टर म्हणून ओळखला जाणारा एक अधिकारी असायचा. तो आपलं कर्तव्य कशा रीतीनं पार पाडायचा व आपल्या कर्तव्याची कशा रीतीनं हेळसांड करायचा त्याचं वर्णन नंतर करण्यात येईल.

मॉरिशसच्या इतिहासाचीच नाताळमध्ये पुनरावृत्ती झाली. साखर उद्योगात एवढा नफा होऊ लागला की भारतातून करारानं बांधलेल्या मजुरांचा प्रवाह कायम टिकवण्यासाठी १००,००० पौंडांचं सार्वजनिक कर्ज १८६४ साली उभारण्यात आलं. १८६५ सालापर्यंत ६५०० कुली 'नाताळमध्ये समृद्धी निर्माण करण्यासाठी मदत करत होते.' श्रीयुत गरलँड यांच्या म्हणण्यानुसार भारतीय करारबद्ध मजुरांना आणायचा निर्णय घेण्यात आला तेव्हा वसाहतीची प्रगती आणि अस्तित्व ही दोन्ही जवळपास धोक्यात यायची वेळ आली होती. भारतातून आलेल्या मजुरांनी समृद्धी आणली. भारतीय मजूर आयोगाचे एक सदस्य श्रीयुत सॉंडर्स यांच्या शब्दात,

*'किमती वाढल्या, लोक़ नाममात्र किमतीवर शेतीतून उत्पन्न काढायला वा ते काढलं तरी विकायला तयार नव्हते.... काही वर्षातच महसूल चौपटीनं वाढला. ज्या यंत्रज्ञांना काम मिळत नव्हतं व ५ शिलींग वा त्याहूनही कमी रोजावर काम करावं लागत होतं त्यांना आपली मजुरी दुपटीनं वाढली असल्याचं लक्षात आलं आणि या प्रगतीमुळे शेतापासून तर सागरापर्यंत सर्वांचा लाभ झाला.'* [एम. के. गांधी, *द ग्रिव्हान्सेस ऑफ ब्रिटिश इंडियन्स इन साऊथ आफ्रिका*, राजकोट, ऑगस्ट १४, १८९६] १८८२ साल उजाडेपर्यंत साखरेची निर्यात १५४,००० पौंडांपर्यंत गेली होती. महसुलाचा बराचसा भाग

मळेवाल्यांकडून येत असल्यामुळे 'बागांच्या वसाहतीच्या चेहऱ्यावर रात्रीतून झालेल्या प्रगतीमुळे हसू उमललं.'

'अशाप्रकारे मजुरांचा पुरवठा करण्यात आला नसता तर डरबनमधील युरोपिअन लोकांची संख्या.... आज जेवढी आहे त्यापेक्षा निम्मे राहिली असती आणि आज जिथं २० कामगार लागतात त्या ठिकाणी केवळ पाचच कामगार लागले असते. डरबनमधील मालमत्तेची किंमत आजच्यापेक्षा ३०० ते ४०० टक्क्यांनी कमी राहिली असती.' [एम. के. गांधी, *ओपन लेटर टू ऑनरेबल मेम्बर्स ऑफ द ऑनरेबल लेजिसलेटिव्ह कौन्सिल अँड द ऑनरेबल लेजिसलेटिव्ह असेंब्ली*, डिसेंबर १८९४]

पुढील वर्षी भारत सरकारनं करारबद्ध मजूर पाठवणं बंद करायचा निर्णय घेतल्यानंतर नाताळच्या उद्योगांवर बंद पडायची पाळी आली व कामगार पुन्हा बेकार होऊ लागले. 'बंधुआ मजुरांच्या आयातीवर बंधनं येताच पुन्हा महसूल आणि पगार खाली गेले, आत्मविश्वास लोपला कामगार कपात आणि पगार कमी करणं ह्याचाच विचार सुरू झाला.' [एम. के. गांधी, *ओपन लेटर टू ऑनरेबल मेम्बर्स ऑफ द ऑनरेबल लेजिसलेटिव्ह कौन्सिल अँड द ऑनरेबल लेजिसलेटिव्ह असेंब्ली*, डिसेंबर १८९४. पृष्ठ २७६] भारत सरकारनं १८७४ साली बंधुआ मजुरांच्या निर्यातीवरील बंदी उठवताच नाताळमधे समृद्धीचं नवीन युग अवतरलं. भारतीय बंधुआ मजूर विश्वस्त संस्थेची स्थापना करण्यात आली आणि भारतीय मजुरांचा नाताळला स्थिर व सतत पुरवठा होण्यासाठी भारत सरकारनं मजुरांची भरती करावी म्हणून भारत सरकारला नाताळ सरकार दरवर्षी १०,००० पौंड खर्चापोटी देऊ लागलं. परिणामी वसाहतीतील आत्मविश्वास आणि उत्साह पुन्हा दुणावला. 'पुन्हा महसुलात, पगारात आणि मजुरीत वाढ झाली व कामगार कपात ही भूतकालीन गोष्ट झाली.' [एम. के. गांधी, *ओपन लेटर टू ऑनरेबल मेम्बर्स ऑफ द ऑनरेबल लेजिसलेटिव्ह कौन्सिल अँड द ऑनरेबल लेजिसलेटिव्ह असेंब्ली*, डिसेंबर १८९४. पृष्ठ २७६. १८९३ मधील नाताळच्या लोकसंख्येचे आकडे खालील दुसऱ्या परिच्छेदात नाताळ सरकारच्या बिन्स-मॅसन प्रतिनिधी मंडळाच्या दिनांक १ - २ – १८९४ च्या भारत सरकारला २० जानेवारी १८९४ ला दिलेल्या निवेदनाच्या सहपत्रातून घेतलेले आहेत. (नॅशनल आर्किव्हज ऑफ इंडिया, भारत सरकारच्या महसूल आणि शेती विभागाच्या फाईल क्र. १८ ऑफ १८९४)]

भारत ते नाताळच्या मार्गावर मॉरिशस आहे. नाताळमधे मोठ्या संख्येत भारतीय आले असल्याची बातमी मॉरिशसमध्ये पोहोचताच तिथे स्थायी झालेल्या अनेक भारतीयांनी

नाताळमध्ये जायचा निर्णय घेतला. नाताळमध्ये पहिलं भारतीय दुकान उघडणारे शेठ अबुबकर आमोद होते. भारतीय बंधुआ मजुरांच्या आयातीमुळे इंग्रजांनी प्रचंड संपत्ती कमावली होती. त्यामुळे एका भारतीयानं दुकान उघडल्यामुळे त्यांना विशेष काही वाटलं नाही. त्यातही अबुबकर शेठ यांनी आपल्यासोबत एक इंग्रज भागीदार ठेवायची काळजी घेतली होती. त्यांनी प्रिटोरियात शाखा उघडली, जमीनजुमला विकत घेतला आणि आपली भरभराट करून घेतली. त्यांचं उदाहरण पाहून काठेवाड संस्थानातील त्यांच्या पोरबंदर शहरातील व त्याच्या आजुबाजूच्या भागातील अनेक मेमनांना व सुरत येथील बोहरांना दक्षिण आफ्रिकेत यायची प्रेरणा मिळाली.

दक्षिण आफ्रिकेत अंदाजे ४७०,००० झुलू, ४५,००० युरोपिअन व ४६,००० भारतीय राहत होते. या ४६,००० भारतीयात १६,००० बंधुआ मजूर होते, २५,००० माजी बंधुआ मजूर वा करारातून मुक्त झालेले मुक्त भारतीय होते. उरलेल्यात व्यापारी व त्यांचे कारकून वगैरे होते. भारतीय समुदायाचं मुख्य अन्न भात होतं. भारतीय व्यापाऱ्यांच्या कौशल्यामुळे, हुशारीमुळे आणि मेहनतीमुळे एक वर्षापूर्वी तांदळाच्या पोत्याचे जे भाव २१ शिलींग होते ते १८८४ साली १४ शिलींगवर आले. करारातून मुक्त झाल्यानंतरही ज्या बंधुआ मजुरांनी 'मुक्त भारतीय' म्हणून तिथंच राहायचा निर्णय घेतला होता तेही तिथं लहान दुकानदार झाले. काहींनी परतीच्या प्रवासखर्चाच्या मोबदल्यात मिळालेल्या रकमेत जमीन विकत घेतली आणि तिच्यात फळं आणि भाजीपाला पिकवायला सुरुवात केली. परिणामी तिथं जी फळं आणि ज्या भाज्या पिकत नव्हत्या त्यांच्या उत्पादनास सुरुवात झाली तसंच ज्या फळभाज्या अल्पप्रमाणात पिकत होत्या त्यांचं मोठं उत्पन्न तिथं येऊ लागलं. फळांच्या आणि भाज्यांच्या किमती उतरल्या. इंग्रज गृहिणी इतर किराण्यासोबतच एका शिलींगला कोबी विकत घेऊ शकत होती. त्यासाठी तिला आधी अर्धा पौंड द्यावा लागायचा. त्यातही हे सर्व साहित्य तिला तिच्या दारावर मिळायचं. त्यामुळे भारतीय किराणा दुकानदार आणि फळं व भाज्या विकणारे भारतीय फेरीवाले तिला वरदानासारखे वाटले.

नाताळमधील यशानं उत्साहित होऊन काही भारतीय व्यापारी दोन बोअर गणराज्यात, ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमधे गेले. तिथं बोअरांबरोबर व्यापाराला चांगली संधी असल्याचं त्यांनी ऐकलं होतं. तिथं त्यांनी दुकानं उघडली. बोअर शेतकऱ्यांना भारतीय व्यापाऱ्याशी व्यवहार करण्यात काही कमीपणा आहे असं वाटलं नाही. त्या काळात तिथं रेल्वे नसल्यामुळे भारतीय व्यापाऱ्यांनी मोठा नफा मिळवला.

केप कॉलनीतही अनेक भारतीय व्यापाऱ्यांनी दुकानं उघडली आणि तिथंही त्यांनी चांगला व्यवसाय केला. अशा रीतीनं चारही वसाहतींमध्ये भारतीय लोक वेगवेगळ्या संख्येत विखुरलेले होते. त्यातील कधीच बंधुआ मजूर नसलेले भारतीय ४० ते ५० हजार असावेत तर माजी बंधुआ मजूर असलेले भारतीय व त्यांचे वंशज, जे 'मुक्त भारतीय' म्हणून ओळखले जायचे ते जवळपास एक लाख असावे. 'मुक्त भारतीय' पूर्णपणे मुक्त नव्हते. त्यांना जर एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जायचं असलं तर परवाना घ्यावा लागायचा. त्यांनी जर लग्न केलं तर त्या लग्नाला वैध ठरण्यासाठी त्यांना प्रोटेक्टर ऑफ इंडियन इंन्डेंचर्सच्या कार्यालयात नोंदणी करावी लागायची. त्याशिवायही त्यांच्यावर काही कठोर निर्बंध होते.

भारतीयांच्या लगेच लक्षात आलं की ते केवळ आपल्या भारतीय बांधवांशी आणि गोऱ्यांशीच फायदेशीर व्यवहार करू शकतात असं नाही तर आफ्रिकी लोकांशीही ते तेवढाच फायदेशीर व्यवहार करू शकतात. गोरे दुकानदार आफ्रिकी लोकांकडून अधिक पैसे घ्यायचे आणि त्यांची फसवणूक करायचे. त्यांनी धैर्य करून अधिक पैसे घेतल्याबद्दल आक्षेप घेतला वा शिल्लक रकमेचा नीट हिशेब मागितला तर ते त्यांचा अपमान करायचे. त्या गरीब बिचाऱ्या माणसाला थोड्याशा निमित्तानं वा निमित्त नसतानाही लाथाडण्यात आलं नाही वा मारहाण करण्यात आली नाही तर तो स्वतःला भाग्यवान समजायचा. आफ्रिकी माणूस गोऱ्या माणसाला घाबरायचा. भारतीय दुकानदारही आफ्रिकी माणसाच्या अज्ञानाचा फायदा घेण्यात काही वेळा मागं नसला तरी आफ्रिकी माणसाशी तो सौजन्यानं वागायचा. कोणीही निग्रो त्याच्या दुकानात मोकळेपणानं जाऊ शकायचा व त्याच्याशी गप्पा मारू शकायचा व प्रसंगी विनोदही करू

शकायचा. त्याला सामान पाहायचा व त्यातून निवड करायचा अधिकार असायचा. निग्रो भारतीयांना घाबरण्यापेक्षा काही वेळा परिस्थिती उलट असायची. जर भारतीय दुकानदारानं निग्रो ग्राहकाला फसवलं आणि त्याच्या जर ते लक्षात आलं तर चिडलेल्या ग्राहकाकडून त्याला मारहाण व्हायची शक्यता असायची. त्यामुळे आफ्रिकी माणसाला गोऱ्या माणसाशी व्यवहार करण्यापेक्षा भारतीय माणसाशी व्यवहार करणं आवडायचं. व निग्रो तर संपूर्ण आफ्रिकेत होते. यामुळे आतापर्यंत एकाधिकार असलेल्या लहान गोऱ्या दुकानदारांना भारतीयांचा मत्सर वाटू लागला. आता आपल्या कौशल्यानं, बुद्धीनं आणि मेहनतीनं तसंच न चुकता सौजन्यानं वागून गोऱ्यांशी स्पर्धा करणारा तिरस्करणीय 'एशिॲटिक' गोऱ्याला आपला प्रतिस्पर्धी वाटू लागला. शांत, मेहनती व नियमानं चालणारा भारतीय काळ्या आणि गोऱ्या लोकांमधे सारखाच लोकप्रिय होता. त्यामुळेच तो लहान गोऱ्या दुकानदाराच्या डोळ्यात सलू लागला.

## २

जसं नाताळमधे होतं तसंच ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमधेही होतं. ट्रान्सवालमधे १८८०च्या आधीच भारतीयांच्या विरोधातील भावना निर्माण होऊ लागली होती. त्याला मुख्य कारण झालं होतं अबुबकर शेठ यांचं व्यवसायातील यश. त्यामुळे त्यांनी प्रिटोरिया मुख्य मार्गावर मालमत्ता विकत घेतली होती. ट्रान्सवाल गणराज्य होतं. त्यामुळे ब्रिटिश नागरिकत्वाचा ट्रान्सवालमध्ये फार कमी लाभ व्हायचा. भारतीय व्यापाऱ्यांची संख्या जसजशी वाढू लागली तसतसे जमीनदार आणि युटिलँडर दोघांनीही भारतीयांच्या विरोधात, ज्यांना ते व्यापारातील स्पर्धक समजत होते, वृत्तपत्रातून मोहिमेला सुरुवात केली व ते भारतीयांना काढून टाकण्यासाठी व त्यांचा व्यापार थांबवण्यासाठी व्होल्कराडना अर्ज आणि विनंत्या करू लागले. 'भारतीय लोकांच्या घाणेरड्या सवयींमुळे आणि अनैतिक वर्तनामुळे संपूर्ण समाजाला महारोग, गुप्तरोग व तत्सम रोगांच्या प्रसाराचा धोका आहे' [एन. गांगुली, *इंडियन्स इन द एम्पायर ओव्हरसीज*, पृष्ठ २१] असा प्रशासनाकडे केलेल्या एका अर्जात अप्रत्यक्षपणे आरोप करण्यात आला. दुसऱ्या एका अर्जातून

सूचित करण्यात आलं की 'ही माणसं राज्यात (ऑरेंज फ्री स्टेट) बायका अथवा नात्यातील स्त्रियांसह प्रवेश करत नसल्यामुळे होणारा परिणाम स्पष्ट आहे. स्त्रियांना आत्मा नसतो आणि ख्रिश्चन हे त्यांचं नैसर्गिक भक्ष आहेत असं त्यांचा धर्म त्यांना शिकवतो.' [*द इंडियन पिटिशन टू लॉर्ड रिपन*, मे, १८९५]

भारतीयांना काय घाटत आहे हे जेव्हा कळलं तेव्हा ते क्रुगरला भेटायला गेले. त्यानं त्यांना घरातही न घेता बाहेर अंगणातच ताटकळत ठेवलं व थोडावेळ त्यांचं म्हणणं ऐकल्यानंतर तो म्हणाला:

*तुम्ही इस्माईलची मुलं असल्यामुळे जन्मापासूनच तुम्ही येशूच्या वंशजांची गुलामगिरी करण्यासाठी बांधील आहात. आम्ही येशूचे वंशज असल्यामुळे आमच्याबरोबर तुम्हांला समतेची वागणूक देता येऊ शकत नाही वा आमच्या बरोबरीचे तुम्हांला मानू शकत नाही. आम्ही जे काही अधिकार देतो त्यावरच तुम्ही समाधान मानायला हवं.* [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ३३. हा प्रसंग *नाताळ मर्क्युरी*मधे २१ नोव्हेंबर १८९६ला प्रसिद्ध झाला आहे तो पुढीलप्रमाणे 'भारतीयांना वस्तीमधे हलवण्यासंबंधीची आपली तक्रार नोंदवण्यासाठी प्रभावी भारतीयांचं एक प्रतिनिधी मंडळ अध्यक्ष क्रुगर यांना भेटायला गेलं होत. त्यावेळी माननीय अध्यक्षांनी तुम्ही अब्राहमवर विश्वास ठेवता काय म्हणून विचारलं. घाईत त्यांनी होकारार्थी उत्तर दिल्यामुळे त्यावेळी आमच्या मेटॅबोलेच्या अध्यक्षांनी भाबडेपणानं सांगितलं की मला हे ऐकून आनंद झाला. प्रतिनिधी मंडळाला आठवत असेलच की अब्राहमनं आपल्याच मुलाला, इस्माईलला छावणीबाहेर राहायला सांगितलं होतं. 'तुम्हाला लक्षात यायला हवं की व्होल्करराडनं मला अब्राहमच्या जागी ठेवलं आहे. आणि तुम्हाला कायदा पाळावा लागेल व इस्माईलप्रमाणे बाहेर राहावं लागेल. असं सांगतात की त्या भारतीयांना अब्राहमवर विश्वास ठेवतो असं सांगितल्याबद्दल नंतर खेद होत होता.]

प्रिटोरिया अधिवेशनाच्या कलम २६नुसार आणि १८८४च्या लंडन अधिवेशनाच्या कलम १४नुसार ब्रिटिश सरकारनं 'नेटिव्हसोडून ट्रान्सवाल राज्याच्या नियमांचं पालन करणाऱ्या इतर सर्व लोकांना.... गणराज्यात आपल्या कुटुंबियांसह प्रवेश करायचं, फिरायचं वा राहायचं.... भाड्यानं वा स्वतःच्या मालकीची जागा वा घर घ्यायचं, कारखाने, गोदाम, दुकानं आणि.... व आपला स्वतःचा व्यापार सुरू करायचं वा ज्याला ते योग्य समजतील त्या प्रतिनिधीला कामावर नेमून त्याच्यामार्फत व्यापार चालवायचं स्वातंत्र्य देण्यात आलं होतं तसंच ट्रान्सवालच्या नागरिकांवर जे कर लावण्यात येत नाहीत त्या करांपासून त्यांना व्यक्तिशः वा त्यांच्या व्यापारावर

वा उद्योगावर' सूट देण्यात आली होती. [*द प्रेस,* एप्रिल ५, १८९५. मूळ दस्तावेजात 'माननीय महाराणींची प्रजा' असा शब्दप्रयोग करण्यात आला होता. परंतु हा लेख जेव्हा लंडनला तारेनं पाठवण्यात आला तेव्हा लॉर्ड किम्बर्ली यांनी जुलै १८८१ च्या आपल्या संदेशात केपचे राज्यपाल सर हर्क्युलस रॉबिन्सन यांना सुचवलं की 'नेटिव्ह सोडून इतर सर्व' हे शब्द त्यात टाकायला सांगितलं]

६ जानेवारी १८८५ला ट्रान्सवाल सरकारनं वसाहत मंत्री लॉर्ड डर्बी यांना लिहिलं की जे पौर्वात्य लोक, जवळपास सर्व दुकानदार, गणराज्यात राहू लागले आहेत त्या 'पौर्वात्य लोकांसाठी नियम करायचा' दक्षिण आफ्रिका गणराज्याला १८८४च्या लंडन अधिवेशनाप्रमाणे कोणते अधिकार आहेत याची माहिती द्यावी. लॉर्ड डर्बी व लंडन अधिवेशनाच्या वेळी केपचे राज्यपाल असलेले केप कॉलनीचे उच्चायुक्त सर हर्क्युलस रॉबिन्सन यांच्याकडे राज्याचे सचिव डॉ. लीड्स यांचं पत्र मतप्रदर्शनार्थ पाठवण्यात आलं. लंडन अधिवेशनातील 'नेटिव्हसोडून इतर लोक' या शब्दाचा नेमका अर्थ आणि हेतू काय आहे याबद्दल केप कॉलनीचे मुख्य न्यायाधीश सर हेन्री डी व्हिलर्स यांच्याकडे विचारणा करण्यात आली. 'नेटिव्हसोडून इतर लोक' या शब्दांचा अर्थ प्रिटोरिया अधिवेशनातील सर्व पक्ष काहीही करत असले तरी [ट्रान्सवालच्या प्रतिनिधींसाठी त्यावेळी डच भाषेत इनबूरलिंगन हा शब्द वापरण्यात यायचा. त्याचा अर्थ 'ट्रान्सवालचे रंगीत आदिवासी असा होता.'] सर हेन्री डी व्हिलर्स यांनी लिहिलं की अरब, भारतीय, चिनी आणि आशियातील इतर लोकांचा नेटिव्हात समावेश करता येत नाही. त्यांच्याकडे 'नेटिव्हेतर म्हणूनच पाहायला हवं.' परंतु चेम्बरलेन यांच्या दुबळ्या आणि डळमळीत धोरणामुळे त्यांनी पुढं लिहिलं की 'परंतु ट्रान्सवालमध्ये राहायला येणाऱ्या जगातील सर्व देशातील लोकांना हेच संरक्षण दिल्यास केवळ दक्षिण आफ्रिकेतील रंगीत लोकच याला अपवाद राहतील.' त्यामुळे माझं मत आहे की, 'भारतातून आलेल्या लोकांसाठी ट्रान्सवाल सरकारनं भारतीय आप्रवाश्यांच्या बाबतीत नियम करू नये असा लॉर्ड किम्बर्ली यांचा उद्देश कधीच असू शकत नाही.' त्यापुढं जाऊन चेम्बरलेन यांनी आगाऊपणे सुचवलं की 'दक्षिण आफ्रिकेतील सम्राटांच्या सरकारनं अधिवेशनाच्या कलम १४मध्ये दुरुस्ती करून त्यात 'आफ्रिकी नेटिव्ह वा भारतीय वा चिनी कुली आप्रवासी' या शब्दांचा अंतर्भाव करावा.' [लॉर्ड डर्बी यांना सर रॉबिन्सन हर्क्युलस यांनी लिहिलं : 'माझी दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला अशी शिफारस करायची इच्छा आहे की दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला कळवण्यात यावं की सम्राज्ञींचं सरकार कलम १४मधे आफ्रिकी नेटिव्ह, अथवा भारतीय वा चिनी कुली आप्रवासी या शब्दांचा अंतर्भाव करून दुरुस्ती करू इच्छित आहे. त्यानंतर हे कलम असं होईल : आफ्रिकी नेटिव्ह, अथवा भारतीय वा चिनी कुली

आप्रवासी सोडून दक्षिण आफ्रिकी गणराज्याच्या नियमांचं पालन करणाऱ्या इतर सर्व लोकांना त्यांच्या कुटुंबियांसह गणराज्यात प्रवेश करायचा, प्रवास करायचा आणि वास्तव्य करायचा संपूर्ण अधिकार असेल. (तिरपी अक्षरं माझी) *द प्रेस*, एप्रिल ५, १८९५] त्यानंतर हे कलम असं होईल :

*दक्षिण आफ्रिकेच्या गणराज्याच्या नियमांचं पालन करणाऱ्या आफ्रिकी नेटिव्ह वा भारतीय वा चिनी कुली आप्रवासी यांच्याशिवाय इतर सर्व लोकांना आपल्या कुटुंबासह प्रवेश करायचा, प्रवासाचा वा निवासाचा अधिकार असेल इत्यादी.*

लॉर्ड डर्बी या मताशी सहमत झाले परंतु त्यांना वाटत होतं की 'लंडन परिषदेच्या या बाबीसंबंधी एखादा योग्य कायदा करण्यात आला तर त्या संदर्भात सम्राटांचं सरकार आक्षेप घेणार नाही असं आश्वासन मिळालेलं असल्यामुळे दक्षिण आफ्रिकी गणराज्यानं या अर्थाचा नियम करणं उचित होईल.' [सी.डी. २२३९, ब्रिटिश भारतीयांच्या ट्रान्सवालमधील परिस्थितीविषयी इंग्लंडच्या दोन्ही सभागृहांना ऑगस्ट १९०४ रोजी दिलेल्या माहितीनुसार पत्र क्र ४ पृष्ठ ३८]

ट्रान्सवाल सरकारचं यामुळे समाधान झालं नाही. असा नियम केल्यानंतरही ह्या नियमाच्या कक्षेबाहेर 'अरब' व्यापारी राहिले असते. ते आधीच त्या राज्यातील शहरात व्यापार करत होते व त्यांना परिषदेचे सर्व अधिकार आधीच मिळालेले होते. त्याचबरोबर अशा प्रकारच्या नियमामुळे दक्षिण आफ्रिकी गणराज्यातील आशियातील कुली आप्रवाशांवर म्हणजे मजुरांवरच बंधनं येणार होती, वरच्या वर्गातील लोकांवर बंधनं येणार नव्हती. लॉर्ड डर्बी यांनी सुचवल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याऐवजी ट्रान्सवाल सरकारनं १८८५चा उपनियम क्रमांक ३ पास केला. *त्यानुसार कोणत्याही रंगीत परकीय माणसाला नागरिकत्वाचे अधिकार* मिळू शकणार नव्हते वा त्याला *स्थावर मालमत्ता विकत घेता येणार* नव्हती. ज्या लोकांनी गणराज्यात आधीच व्यापारासाठी वास्तव्य केलेलं आहे त्यांनी लँड्रॉट्सकडे आठ दिवसात २५ पौंड नोंदणीशुल्क भरून त्यासाठी नोंदणी करायला पाहिजे होती. या नियमाचा भंग करणारास १० ते १०० पौंड दंड करण्यात येणार होता व तो न भरणारास सहा महिन्याची शिक्षा होणार होती. अशा लोकांनी कोणत्या मार्गावर, कोणत्या वार्डात वा कोणत्या वस्तीत वास्तव्य करावं हे ठरवायचा अधिकार आम्हांला राहील असं सरकारचं म्हणणं होतं. हा नियम लागू व्हायच्या आधी ज्या लोकांनी

नाताळमध्ये वास्तव्य केलेलं असेल त्यांना नोंदणीशुल्क पडणार नव्हतं. [लॉर्ड डर्बी यांनी सर हर्क्युलस रॉबिन्सन यांना १९ मार्च १८८५ रोजी लिहिलं : 'परिषदेच्या प्रस्तावात दुरुस्ती करण्यासंबंधीच्या तुमच्या सूचनेचा मी गंभीरपणे विचार केला आणि तुमचं जर असं मत असेल की ही दुरुस्ती दक्षिण आफ्रिकी गणराज्यासाठी अधिक चांगली आणि समाधानकारक असेल तर तुम्ही सुचवल्याप्रमाणं सम्राज्ञींचं सरकार दुरुस्ती करायला तयार आहे. तरीही असं वाटतं की व्होल्कराडनं या अर्थाचा कायदा करावा. परिषदेत मान्य करण्यात आलेल्या अटींच्या अर्थात बदल न करता शब्दरचनेत आवश्यक त्या दिशेनं फेरफार करण्यात आल्यास सम्राज्ञींच्या सरकारचा आक्षेप नसेल]

पुढील वर्षी या कायद्यात ब्रिटिश सरकार व ट्रान्सवाल गणराज्यात झालेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने दक्षिण आफ्रिका गणराज्याच्या कार्यकारिणीच्या ठरावान्वये पुन्हा दुरुस्ती करण्यात आली व तिचीच घोषणा २६ जानेवारी १८८७च्या राजपत्राद्वारे करण्यात आली. त्यानुसार नोंदणी शुल्क २५ पौंडावरून ३ पौंड करण्यात आलं आणि 'शासनाला कोणत्या मार्गावर, कोणत्या वार्डात वा कोणत्या वस्तीत वास्तव्य करावं' या शब्दांच्या आधी आरोग्यविषयक कारणासाठी ह्या शब्दांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे आरोग्यविषयक कारणासाठी शासनाला आशियातील लोकांनी कुठे राहावं हे ठरवायचा अधिकार होता. तसंच ज्या कलमान्वये कोणत्याही भारतीयाला स्थावर मालमत्ता विकत घेता येणार नव्हती ते कलम रद्द करण्यात येऊन आशियातील लोकांना *आरोग्यविषयक कारणासाठी शासन ठरवील* त्या मार्गावर, त्या वार्डात वा त्या वस्तीत स्थावर मालमत्ता विकत घ्यायचा अधिकार मिळाला. (तिरपी अक्षरं माझी)

यामुळे ब्रिटिश सरकारच्या मनाला लागलेली टोचणी संपली. परंतु ही दुरुस्ती ट्रान्सवालमधील गोऱ्यांना आवडली नाही. गोष्टी त्यावेळी निकरावर आल्या जेव्हा १८८८ साली मेसर्स सुलेमान इब्राहीम कंपनीनं २५ पौंड नोंदणीशुल्क देऊनही विशिष्ट जागेवर व्यापार करायची मिडलबर्गच्या लँड्रोस्टनं त्यांना परवानगी नाकारली आणि तडजोड म्हणून १८८५च्या पोटनियम ३नुसार व्यापार करायची परवानगी कुठं देता येईल ते सांगितलं. सुलेमान अँड कंपनीनं ती तडजोड नाकारली व आपल्याला हव्या त्या जागी व्यापार करायची परवानगी लँड्रोस्टनं द्यावी म्हणून कार्यवाहीला सुरुवात केली. ट्रान्सवाल सर्वोच्च न्यायाधीशांनी दोन्ही बाजूंचं म्हणणं ऐकल्यानंतर १८८५चं कलम ३ अतिशय स्पष्ट असल्यामुळे वेगळा कोणताही

निर्णय देता येत नाही व व्यवसायाच्या व राहायच्या जागेत न्यायालय भेदाभेद करू शकत नाही असं म्हणून फिर्यादीच्या विरुद्ध निकाल दिला.

काही दिवसांनंतर (४ जानेवारी १८९०) लॉर्ड नट्सफर्ड यांनी सुधारित कायद्यातील 'राहणं' आणि 'व्यापार' यात केलेल्या अंतराकडे उच्चायुक्तांनी ट्रान्सवाल सरकारचं लक्ष वेधलं आणि सांगितलं की 'आरोग्य विषयक कारणासाठी' हे कारण व्यापाऱ्यांना आणि वरच्या श्रेणीतील लोकांना लागू होऊ शकत नाही. याच कारणास्तव त्यांनी 'त्या दुरुस्तीला, ती दुरुस्ती लंडन अधिवेशनाच्या कलम १४च्या विरोधात असूनही संमती दिली. परंतु तरीही ट्रान्सवाल सरकारचं म्हणणं होतं की तो कायदा सर्व आशियायी लोकांना सारखाच लागू होतो व 'निवासासाठी' या शब्दाचं पुन्हा स्पष्टीकरण करत 'त्यात व्यापाराच्या जागेचाही समावेश होईल' अशी नियमात दुरुस्ती केली. त्यामुळे आशियायी लोकांसाठी राखीव जागेत आशियायी लोकांनी कुठं राहावं केवळ यासाठीच नव्हे तर कुठं व्यापार करावा यासाठीही ते सक्ती करू शकतात' असा त्यांचा दावा होता. [सी. डी. २२३९ ट्रान्सवालमधील ब्रिटिश भारतीयाच्या स्थितीविषयी ऑगस्ट १८९४मधे ब्रिटिश संसदेच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आलेला पत्रव्यवहार. पत्र क्र. ४ पृष्ठ ३९]

ट्रान्सवालचे सचिव डॉ. लेड्स यांनी उच्चायुक्तांना पाठवलेल्या आपल्या उत्तरात लिहिलं की ट्रान्सवाल सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी सुलेमान इस्माईल खटल्यात दिलेल्या निकालाचा सन्मान करायला पाहिजे. १८८५च्या कायद्यात १८८६ साली दुरुस्ती करण्यात आली. त्यांचा दावा होता की दुरुस्त करण्यात आलेला कायदा न्याय्य, विवेकी आणि ब्रिटिश सरकारनं मान्यता द्यायच्या योग्यतेचा होता. त्यात सर हर्क्युलस रॉबिन्सन यांनी शिफारस केलेल्या आणि लॉर्ड डर्बी यांनी १८८५ साली मान्यता दिलेल्या कायद्यापेक्षाही [*द प्रेस*, एप्रिल ५,१८९५] रंगीत परदेशी लोकांना म्हणजे युटिलँडरांना अधिक अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानंतर लगेच क्रुगर यांनी ४ जानेवारी १८९०ला तार पाठवून कळवलं की 'भारतीय व्यापाऱ्यांचा व्यापार बंद पडू नये म्हणून' त्यांच्या राहण्यासाठी १८८५च्या पोट नियम ३नुसार नियोजित केलेल्या जागा शहराच्या मुख्य रस्त्याला लागून व जवळ आहेत. तरीही ब्रिटिश सरकार आपल्या भूमिकेवर कायम राहिलं

आणि १८८५च्या आधी ज्या ब्रिटिश भारतीय व्यापाऱ्यांचे हितसंबंध गणराज्यात निर्माण झालेले होते व राखीव वस्त्यांच्या बाहेर ज्यांनी व्यापार सुरू केलेला होता त्यांच्या हिताला कोणत्याही अवस्थेत धक्का लागू नये म्हणून ट्रान्सवाल गणराज्य सरकारवर ते दडपण आणत राहिलं. ट्रान्सवाल सरकारनं त्यांना हटवण्यासाठी आदेश काढले परंतु त्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी काहीही केलं नाही. त्यांचे हात युटिलँडरांच्या प्रकरणामुळे आधीच बरबटलेले होते व ज्यामुळे परिषदेच्या कराराचा भंग केल्याचा आरोप येऊन संघर्ष वाढेल असं कोणतंही कृत्य ते करू इच्छींत नव्हते. भारतीयांनी आपला व्यवसाय शहरात सुरू ठेवला.

ऑरेंज फ्री स्टेटमधे भारतीयांची परिस्थिती वाईट होती. ७२,००० वर्गमैल क्षेत्रफळाच्या या राज्याची २०७,५०३ लोकसंख्या होती. त्यातून युरोपिअन केवळ ७७७१६ होते, रंगीत लोक १२९,७८७ होते. तिथं १८९० साली तीन भारतीय दुकानं होती व त्यांतील एकाची चल संपत्ती ९,००० पौंड होती व तो भारतीय दुकानदारात सर्वात श्रीमंत गणला जायचा. कोणतीही नुकसान भरपाई न देता ती दुकानं बंद करण्यात आली व त्यांच्या मालकांवर सर्व सामान हटवण्यासाठी एका वर्षाचा अवधी दिल्याची सूचना देण्यात आली. ऑरेंज फ्री स्टेट हे स्वतंत्र डच गणराज्य असल्यामुळे त्यावर ब्रिटिशांची कोणतीच सत्ता चालत नव्हती. भारतीयांनी आपल्या ब्रिटिश नागरिकत्वाचे अधिकार जर तिथं दाखवले तर त्यांची चेष्टा करण्यात यायची. ब्रिटिश सरकारकडे करण्यात आलेल्या निवेदनांचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे तिथं वेटरची अथवा किरकोळ कामाची नोकरी वगैरे करणारे तेवढेच म्हणजे फार कमी भारतीय राहिले.

'आशियातील रंगीत लोकांचा लोंढा थांबवण्यासाठी' करण्यात आलेल्या कायद्यानुसार कोणताही भारतीय ऑरेंज फ्री स्टेटमध्ये दोन महिन्यापेक्षा जास्त काळासाठी अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय राहू शकत नव्हता व त्याला अर्ज सादर करण्यात आल्यानंतर आणि इतर सर्व औपचारिकता पार पाडून ३० दिवस झाल्यानंतरच तो अर्ज विचारात घेण्याचा अधिकार होता. 'परिस्थितिनुसार' परवानगी द्यायची वा नाही याचाही अधिकार अध्यक्षांना होताच. तरीही कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराला स्थावर मालमत्ता ठेवण्याचा, व्यापार अथवा शेती करण्याचा

अधिकार नव्हता. यावरही ताण म्हणजे प्रत्येक भारतीय रहिवाशावर वार्षिक १० पौंड कर होता. व्यापार वा शेती करून कोणी कायद्याचा भंग करताना पहिल्यांदा कोणी आढळला तर २५ पौंड दंड अथवा तीन महिन्यांच्या सश्रम वा साधी तुरुंगाची शिक्षा व्हायची. नंतरच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी ही शिक्षा दुप्पट होत जायची.

**३**

दोन गणराज्यात बोअरांचं भारतीयांशी जे वर्तन होतं त्याचं नाताळमधील ब्रिटिशांनी अनुसरण केलं. एकमेकांच्या वर्तनाची क्रियाप्रतिक्रिया त्यांच्यावर व्हायची व त्यानुसार ते वर्तन करायचे. वारा कोणत्या दिशेनं वाहतो आहे याची पहिली चुणूक भारतीय आप्रवाशांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी १८८५ साली मजूर आयोगाची नाताळ सरकारनं नेमणूक केली तेव्हाच दिसली. स्वतंत्र भारतीय मजुरांच्या बाबतीत कॉलनीतील युरोपिअन लोकमताचा कल कुणीकडून होता हे त्यातून स्पष्ट होत होतं. त्याचबरोबर ते त्यांना 'व्यापारातील वा शेतीतील स्पर्धक वा विरोधक समजत असल्याचंही' [जान एच. हॉफमायर, *साऊथ आफ्रिका*, पृष्ठ १४७] त्यातून निदर्शनास आलं होतं. परंतु ऊसाची व चहाची लागवड करणाऱ्या गोऱ्या मळेवाल्यांचं त्यावेळी विधानसभेत प्राबल्य होतं. आप्रवासी भारतीयांचं येणं सुरू राहिलं पाहिजे याबद्दल ते ठाम होते. काही काळ त्यांचा आवाज ऐकला गेला. शासनानं माघार घेतली. [जान एच. हॉफमायर, *साऊथ आफ्रिका*, पृष्ठ १४७]

परंतु आप्रवासी भारतीयांना यायची परवानगी नाकारण्याच्या प्रयत्नाला ऊस मळेवाल्यांच्या विरोधामुळे जरी यश आलं नाही तरी करारातून मुक्त झालेल्या स्वतंत्र मजुरांच्या विरोधातील लहान युरोपिअन दुकानदारांच्या आरडाओरडीकडे सरकार दुर्लक्ष करू शकलं नाही. भारतीय रहिवाशांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी १८९१मधे एक कायदा करण्यात आला. त्यानुसार पूर्वाश्रमीच्या करारबद्ध मजुरांना जमीन विकत घ्यायची परवानगी नाकारण्यात आली. [एन. गांगुली, *इंडियन्स* इन द एम्पायर ओव्हरसीज, पृष्ठ ४६] त्याचबरोबर त्याच्यावर इतरही त्रासदायक निर्बंध लादण्यात आले. त्याकडे आपण नंतर वळू.

नाताळच्या लोकांचं १८९१च्या कायद्यानं समाधान झालं नव्हतं. परंतु नाताळ अजूनही ब्रिटिश सरकारची वसाहत होती व वसाहत कार्यालय त्याच्या प्रशासनासाठी जबाबदार होतं. नाताळच्या लोकांना आपल्या इच्छेनुसार सर्व काही करता येऊ शकत नव्हतं. या व इतर काही कारणांमुळे नाताळमधे जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणाऱ्या आंदोलनास सुरुवात झाली.

नाताळमधे ४ जुलै १८९३ला जबाबदार सरकारची स्थापना करण्यात आली. १८५६च्या घोषणेनुसार जो नेटिव्ह नाही वा परदेशातील असून ज्याला नाताळचं नागरिकत्व देण्यात आलेलं नाही, वा ज्याला अनैतिक गुन्ह्यासाठी शिक्षा झालेली आहे वा अशा शिक्षेची पूर्ण माफी मिळालेली नाही अशा माणसांना वगळून ज्याच्याजवळ किमान ५० पौंडाची स्थावर मालमत्ता वा १० पौंड भाडं असलेली जागा आहे अशा २० वर्षांवरील प्रत्येक प्रौढ पुरुषाला मतदानाचे अधिकार देण्यात आले होते. अनेक भारतीय रहिवाशांकडे मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी आवश्यक पात्रता असूनही केवळ त्या गोष्टीचं ज्ञान नसल्यामुळे त्यांनी आपली नावं मतदार यादीत दाखल करून घेतली नव्हती. परंतु १८८२च्या दरम्यान नाताळमधील ख्यातनाम वकील हॅरी एस्कॉम्ब व डरबन येथील व्हार्फ एंजिनिअर या दोन प्रसिद्ध युरोपिअनांमध्ये निवडणुकीत स्पर्धा निर्माण झाली. एंजिनिअर आपल्या प्रभावामुळे मतदारांना आपल्याकडे वळवतील व आपल्याला पराभूत करतील अशी एस्कॉम्ब यांना भीती वाटली. त्यांच्या श्रीमंत अशिलातील दादा अब्दुल्ला एक होते. त्यांनी दादा अब्दुल्लांशी संपर्क करून त्यांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराची कल्पना दिली. परिणामी दादा अब्दुल्ला आणि त्यांच्या संबंधातील सर्व भारतीयांनी मतदारांच्या यादीत आपली नावं नोंदवली व सर्वांनी एस्कॉम्ब यांच्याकडून मतदान केलं.

आगीत तेल पडलं. व्यापारातील मत्सरात भारतविरोधी गोऱ्यांच्या राजकीय विरोधाची भर पडली. भारतीयांना व्यापाराच्या स्पर्धेतून हटवण्यासाठी आणि त्यांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करण्यासाठी राजकारणी लोकांनी व्यापाऱ्यांशी हातमिळवणी केली.

नाताळमधील सार्वत्रिक निवडणुका १९ सप्टेंबर १८९३ला होणार होत्या. ३१ ऑगस्ट १८९४ची मतदार यादी १ जुलै १८९३ला दुरुस्त करण्यात यावयाची होती. डरबन कौंटीच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १च्या निवडणूक अधिकाऱ्यांनी उमलाझी विभागाची मतदार यादी तयार करून ती निवासी न्यायाधीशांकडे २८ जून १८९३ला पाठवली. त्यात त्यांना मतदानाचा अधिकार असलेल्या ७३ भारतीयांची नावं आढळली नाहीत. गाळलेली नावं टाकून दुरुस्त यादी त्यांनी राजपत्रात ८ जुलै १८९३ला प्रकाशित केली.

आपल्या राष्ट्रभक्तीचा देखावा करायची आणि लबाडीची सवय असलेले विल्यम पामर हे निवडणुकीत एक उमेदवार होते. त्यांनी मतदार यादीतील भारतीयांच्या नावावर सर्वोच्च न्यायालयात आक्षेप घेतला. परंतु महाधिवक्त्यांनी न्यायालयाच्या लक्षात आणून दिलं की हा आक्षेप मान्य करण्यात आल्यास संपूर्ण यादीच रद्द होईल व युरोपिअन मतदारांनाही मतदान करता येणार नाही आणि परिणामी येत्या मंगळवारी होणाऱ्या निवडणुका रद्द कराव्या लागतील. त्यामुळे अर्जदारानं न्यायालयाच्या संमतीनं आपला अर्ज परत घेतला. [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, सप्टेंबर १५, १८९३]

निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर पामरनं नाताळ विधानसभेच्या काही सदस्यांना परिपत्रकाच्या स्वरुपातील एक पत्र पाठवलं. कुली मतदारांना मतदानाचा अधिकार मिळू नये म्हणून न्यायालयात उशिरा करण्यात आलेल्या तक्रारीसाठी ४८ पौंड १८ शिलींग खर्चासाठी वर्गणी द्यायची त्यातून विनंती करण्यात आली होती. त्यापेक्षा अधिक वर्गणी गोळा झाली तर उरलेली वर्गणी ‘मी हा संघर्ष पुढं चालू ठेवणाऱ्या लेडीस्मिथ येथील मित्रांना देईन’ असं आश्वासनही देण्यात आलं होतं. विनंतीच्या शेवटी समारोपात म्हणण्यात आलं होतं की ‘आशा आहे की मला उलट टपाली तुमचे धनादेश मिळतील.’ परंतु त्यांच्या अपेक्षेच्या विपरीत *टाईम्स ऑफ नाताळ*मधे पुढील प्रतिक्रिया पाहायला मिळाली. एका आमदारानं आपल्या पुढील भाष्यासह ती प्रसिद्धीसाठी दिली होती :

*सन्माननीय संपादक महोदय, तुम्ही आम्हाला सांगू शकाल काय की आम्हा गरीब आमदारांना श्रीयुत पामर हे आपल्या चैनीसाठी केलेला खर्च कसा काय मागू शकतात.... श्रीयुत पामर हे राष्ट्रभक्त आहेत काय? श्रीयुत पामर यांनी त्यांना आलेल्या ४८ पौंड १८ शिलींगचा खर्च कसा आला ते दाखवणारी बिलं प्रसिद्ध केलेली आहेत काय? हा सर्व विनोद आहे की उद्धटपणा आहे ?*

काही अतिरिक्त वर्गणी गोळा झाल्यास तिचा विनिमय करण्याविषयी देण्यात आलेल्या आश्वसनाविषयी खरडपट्टी काढत आमदारांनी आपल्या पत्राचा समारोप असा केला :

*यात काही संशय नाही की श्रीयुत पामर यांना वाटतं की ते निवडणुकीत पराभूत झालेले असल्यामुळे सर्व निवडून आलेल्या उमेदवारांनी त्यांच्या मूर्खपणात सहभागी व्हायला पाहिजे व त्यामुळे सर्वांनी त्यांच्या विनोदाला वा उद्धटपणाला बळी पडायला पाहिजे.* [*नाताळ ॲडव्हरटाईझर* मधे *उद्धृत*, ऑक्टोबर १०, १८९३]

याहून वेगळी विचारसरणी नाताळ विधानसभेचे सदस्य हेन्री बेल (काही काळानं सर हेन्री) यांची होती. ते काही काळानं महाधिवक्ता आणि हॅरी एस्कॉम्ब यांच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री झाले होते. त्यानंतर ते नाताळच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले व सरतेशेवटी सम्राटांच्या सरकारचे ते नाताळ कॉलनीवरील सर सेनापती आणि आणि याच विभागासाठी नेटिव्हांसाठी सर्वोच्च अधिकारी झाले. ते सुद्धा गोऱ्या शहराचे उमेदवार होते. ते खास इंग्रजी शैलीचे सद्गृहस्थ होते. ते धर्मांतरित ख्रिश्चन होते व धार्मिक चळवळीत ते उत्साहानं भाग घ्यायचे. विधानसभेत आपल्या 'सदसद्विवेकबुद्धीचा' उल्लेख ते सतत करत असल्यामुळे त्यांना 'श्रीयुत सदसद्विवेकबुद्धी' हे टोपण नाव पडलेलं होतं.

भारतविरोधी त्रिकोणाचे तिसरे सदस्य होते अटर्नी आणि नाताळ विधानसभेचे सदस्य श्रीयुत टॅथम. १९०६च्या दरम्यान नाताळ विधानसभेतील नाताळ मजूर पक्षाचे ते नेते झाले.

नाताळ कायदा मतदान केंद्रावर दुभाष्याला मान्यता देत होता. बेलनं सर्वोच्च न्यायालयात दुभाष्याबद्दल आक्षेप घेतला. त्यांचं म्हणणं असं होतं की तो दुभाष्या काय म्हणतो ते प्रतिनिधीला,

निवडणूक अधिकाऱ्याला वा मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या अन्य कुणाला कळू शकणार नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर १५, १८९३] तरीही मुख्य न्यायाधीशांनी निर्णय दिला की 'भारतीयांना मतदानाचा जर अधिकार असेल तर त्यांना या सुविधेचाही अधिकार आहे. असं न केल्यास मतदाराला ज्या भाषेत प्रश्न विचारण्यात येतील ती भाषा त्याला येत नसल्याने ते प्रश्न त्याला कळणार नाहीत.' आणि अशा प्रकारची समस्या न्यायालयासमोर आणल्याबद्दल इतर दोन न्यायाधिशांच्या सहमतीनं त्यांनी अर्जदाराविरुद्ध ताशेरे ओढले.

सप्टेंबर १८९३च्या अखेरीस लेडीस्मिथ मतदार यादी दुरुस्त करण्यात यावयाची असताना २९ भारतीयांनी मतदार यादीत आपलं नाव सामील करून घेण्यासाठी क्लिप रिव्हर प्रभागाच्या निवासी न्यायाधीशांकडे अर्ज केला. परंतु एका विशेष कायद्यानं अरबांना खास न्यायालयाच्या कार्यकक्षेत ठेवलं आहे व त्यांच्यासाठी परवाना आणि दारूसंबंधीचे खास कायदे करण्यात आले आहेत तसंच सनदेसंबंधी व इतर अनेक कायद्यांनी मूळ कायद्यात दुरुस्ती करण्यात आली असल्याचं कारण त्यांनी दिलं व त्यामुळे अर्जदारांना मतदारसूचीत नाव दाखल करून घ्यायचा अधिकार नाही असं सांगून त्यांनी तो अर्ज फेटाळला.

भारतीयांनी या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यांच्यावतीनं युक्तिवाद करत महाधिवक्ता श्रीयुत मॉरकॉम म्हणाले की युरोपिअन लोकांच्या अशा प्रकारच्या खटल्यांचा विचार करणाऱ्या न्यायाधीशांनीच भारतीय मतदारांच्या अपात्रतेसंबंधी निर्णय देऊन ती अपात्रता रद्द ठरवली आहे. खास कायद्यानं खास न्यायालयांचीही व्यवस्था करायला पाहिजे. भारतीयांसाठी केवळ एकच खास न्यायालय होतं व ते म्हणजे आप्रवाशांच्या हक्कांचं संरक्षण करणारं न्यायालय. परंतु ते बंद करण्यात आलेलं आहे व त्यानंतर वसाहतीतील युरोपिअनांचे खटले ज्या न्यायालयात चालवले जातात त्याच न्यायालयात सर्व भारतीयांचे, मग ते मुक्त असोत की करारबद्ध, खटले चालवले जातात. जर असं मान्य करण्यात आलं की १८९१च्या आप्रवासी भारतीयांबद्दलच्या कायद्यानं खास कायदा निर्माण केला आहे व त्या कायद्यासंबंधी निर्णय देण्यासाठी आपोआपच खास न्यायालयाची गरज निर्माण होते तर मग भारतीयाला कामावर

ठेवणारा प्रत्येक मालकही मालक-नोकर खटल्यात त्याच प्रमाणात या न्यायालयाच्या कक्षेत येईल. वेगळ्या शब्दात सांगायचं तर जर भारतीय लोक खास कायद्यामुळे मतदानास अपात्र ठरत असतील तर त्यांचे मालकही त्याच न्यायालयाच्या कक्षेत येत असल्यामुळे मतदानास अपात्र ठरतील. कुली कायद्याचं कलम ११८ करारबद्ध मजुरांना लागू होतो, मुक्त भारतीयांना नाही.

महाधिवक्त्यांनी सांगितलं की सर्व अर्जदार ब्रिटिश नागरिक आहेत, परदेशी नाहीत. सर्वांजवळ आवश्यक पात्रतेप्रमाणे मालमत्ता आहे वा आवश्यक तेवढी भाड्याची जागा आहे, त्यांना कोणत्याही अनैतिक कामाच्या गुन्ह्याखाली शिक्षा झालेली नाही. त्यामुळे मतदारसूचीत अर्जदारांची नावं टाकण्यासाठी अर्जदारांनी केलेला अर्ज खारीज करण्यात न्यायाधीश महोदयांनी चूक केलेली आहे. सर्वोच्च न्यायालयानं महाधिवक्त्यांचा युक्तिवाद मान्य केला आणि काही तांत्रिक मुद्दे स्पष्ट करण्यासाठी आणि अर्जदारांना मतदानासाठी अपात्र ठरवणारे वेगळे काही मुद्दे आहेत काय हे पाहण्यासाठी लेडीस्मिथ न्यायालयाकडे ते प्रकरण परत विचारार्थ पाठवलं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २७, १८९३]

अशा रीतीनं भारतीयांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करायचे तिन्ही प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे भारत विरोधी गोरे एकत्र झाले आणि त्यांनी आशियातील लोकांच्या विरोधात एक संघ स्थापन करून भारतीयांच्या प्रश्नाचा एकदाचा कायमचा सोक्षमोक्ष लावायचं ठरवलं. लेडीस्मिथ प्रकरणात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयासंबंधी भाष्य करताना *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं की सध्याच्या कोणत्याच कायद्यानं भारतीयांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करता येत नाही असा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अर्थ असेल तर त्यासाठी नवीन कायदा करायला पाहिजे. 'कोणत्याही प्रकारानं का होईना आशियातील सर्व लोकांचा वसाहतीतील मतदानाचा अधिकार काढून घ्यायलाच पाहिजे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २८, १८९३]

याबाबत काही करण्यात आलं नाही तर काही वर्षातच 'कुली मतं' युरोपिअन मतदारांना खाऊन टाकतील असा आरडाओरडा करण्यात आला. नाताळमधील आशियातील लोकांची

संख्या युरोपिअन लोकांपेक्षा आधीच मोठी होती व जर आशियातील लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला तर 'युरोपिअन लोकांचा निवडणुकीत पराभव व्हायला काही दिवसांचाच अवधी उरला आहे असं मानावं लागेल. अशा अवस्थेत आपली मुलं आपल्या घोडचुकीसाठी आपल्यालाच दोष देतील' असं त्याचं म्हणणं होतं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २८, १८९३]

भारतीय, 'नेटिव्ह' आणि युरोपिअन लोकांमधे आवश्यक पात्रता असणाऱ्या लोकांची तुलनात्मक आकडेवारी देऊन गांधीजींनी नंतर दाखवलं की वास्तवात वरील भीतीसाठी काहीच आधार नव्हता. परंतु भारतीय आप्रवाशांच्याबाबतीत गोऱ्यांचं लोकमत त्यांच्या पुढाऱ्यांनी एवढं भडकवलं होतं की तो निवडणुकीतील एक मुद्दा झाला. डरबन मतदारसंघातून नाताळ विधानसभेवर निवडून जायच्या उमेदवाराच्या बाबतीत वैशिष्ट्यानं असं घडलं. आणि सर्व पक्षांचं घटनादुरुस्तीसाठी एकमत असलं तरी चाकरमाने म्हणजे वर्किंग मेन्स पक्षानं सर जॉन रॉबिन्सन यांच्या नेतृत्वाखालील फॉरवर्ड पक्ष जोपर्यंत आपल्या घोषणापत्रात घटनादुरुस्तीच्या मुद्याचा समावेश करत नाही तोपर्यंत त्या पक्षाशी सहकार्य करायचं नाकारलं.

नाताळमधे स्वराज्याचा कारभार सुरू व्हायच्या आधी आर्थिक स्थित्यंतराची प्रक्रिया सुरू झालेली होती व त्यातच मळेवाले आणि मालमत्तावाले एका बाजूला, व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे स्वतःच्या श्रमावर अवलंबून असणारा नोकरदार वर्ग अशा दोन महत्त्वाच्या गटात सत्तासंघर्षही सुरू झालेला होता. नाताळची घटना मालमत्ताविषयक अटी पूर्ण करणाऱ्या प्रत्येक प्रौढाला एक मत या तत्त्वावर आधारित होती. यामुळे पहिला वर्ग वेगात अल्पमतात जाऊ लागलेला होता कारण चाकरमान्या म्हणजे शहरात नोकरी करणाऱ्या वर्गाची संख्या झपाट्यानं वाढत होती व त्यामुळे तो वर्ग सत्तासंघर्षात महत्त्वाचा घटक झालेला होता. पहिल्याचं मुखपत्र होतं *नाताळ ॲडव्हरटाईझर* तर दुसऱ्याचं *नाताळ विटनेस.*

नोकऱ्या मिळण्याची अधिकाधिक संधी उपलब्ध होईल अशी परिस्थिती निर्माण करणं वसाहतीचं कार्य आहे अशी नोकरदारांची मान्यता होती व त्यामुळे परदेशी आप्रवाशांना येऊ देण्यावर त्यांचा फार मोठा आक्षेप होता. मळेवाल्यांना स्वस्त मजुरांची गरज आहे हे नाताळ

सरकारला कळत होतं तरी नोकरदारांना फारसं नाराज करायची त्याच्यात हिंमत नव्हती. तसंच वसाहत कार्यालयालाही वसाहतींचा उपयोग भारताच्या अतिरिक्त लोकसंख्येला संधी आणि सोयी मिळवून देण्याऐवजी इंग्लंडच्या अतिरिक्त लोकसंख्येला सुखसोयींची संधी मिळण्यासाठी व्हावा असंच होतं.

निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्ष व राजकारणी लोक आपल्या चुकांसाठी कुणाला तरी बळीचा बकरा बनवायच्या शोधात असतात. कर भरणाऱ्या लोकांच्या जिवावर ऊस मळेवाल्यांसाठी करारबद्ध भारतीय मजुरांची आयात केल्याबद्दल नाताळमधील ऊसाच्या मळेवाल्यांवर टीकेचा आगडोंब उसळलेला होता. त्यांनी ती टीका कौशल्यानं आपल्याकडून आणि आपल्या मळ्यावर काम करणाऱ्या 'कुली' मजुरांकडून भारतीय व्यापाऱ्यांकडे वळवली. *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं, 'आपल्या लोकसंख्येत अगदीच नको असलेल्या आशियायी लोकांची भर पडलेली आहे.' परंतु वसाहतीतील लोकांनी कुलींच्या प्रश्नाकडे बारकाईनं पाहिलं तर त्यांच्या लक्षात येईल की कुली मजुरांवर आणि फेरीवाल्यांवर वसाहतीच्या लोकांचा खरोखरी रोष नसून तो भारतीय व्यापाऱ्यांवर आहे.

*सर्वांना एकाच तराजूत तोलण्यापेक्षा थोडा बारकाईनं विचार केला असता लक्षात येईल की.... कुली, मजूर, फेरीवाले आणि नोकर म्हणून ह्या लोकांवर किमान आक्षेप घेता येईल. परंतु भारतीय व्यापारी मात्र सर्वात आक्षेपार्ह आहेत.* [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर १५, १८९३]

भस्मासूर निर्माण करणं सोपं असतं पण त्याला नियंत्रणात ठेवणं कठीण असतं. यानंतर या आरोपाचा आशियायी लोकांविरुद्धच्या प्रचाराच्या झंझावातात हा फेरीवाला अथवा 'कुली' आणि हा व्यापारी असा कोणताच भेदभाव राहिला नाही. भारतीय माणूस हा तिरस्काराचा विषय झालेला होता. गांधीजींच्या शब्दात सांगायचं तर त्याला 'शिव्या द्यायला' शब्दकोशात पुरेसे कठोर शब्द सापडत नव्हते. तो 'आशियातील घाण' होता, 'माणसाच्या जीवनशक्तीला कुरतडणारा तो खरोखरीचा कसर होता', 'संपूर्ण किनारपट्टीवर पसरलेल्या बांडगुळासारखा तो होता', 'खोटारडे आणि बनवाबनवी करणारे कुली', 'डुक्कर', 'डुकरीण', 'घाणेरडे गोचीड' अशी

काही शेलकी विशेषणं होती की ज्यांचा त्याच्यावर सतत वर्षाव व्हायचा. नाताळच्या एका वृत्तपत्रांनं विडंबन काव्यात त्याचं वर्णन 'काळा, हीन दर्जाचा, स्वच्छतेपासून लांबवर असलेला निंदनीय हिंदू' असं केलं होतं. 'तो आळसात वेळ घालवतो व जमिनीवर थुंकतो व कितीतरी जुने कपडे घालतो.' 'आवाज असतो त्याचा गुदमरल्यासारखा आणि जगतो तो भातावर...... अशा हिंदूंची मला मनापासून घृणा वाटते.' [मून, जून १०, १८९३] वृत्तपत्रातून त्याचा उल्लेख नेहमी 'रामीस्वामी' 'श्रीयुत स्वामी', 'श्रीयुत कुली', 'काळा माणूस' असाच करण्यात यायचा. भारतीयांपासून सुटका करून घेण्यासाठी ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमधे जहाल उपायांचा अवलंब करण्यात आला होता. त्यामुळे तेथून बहिष्कृत करण्यात आलेल्या भारतीयांचं आश्रयस्थान नाताळ आणि केप कॉलनीला होऊ द्यायचं नसेल तर त्याच जहाल उपायांचा अवलंब या दोन ब्रिटिश वसाहतींत करायला पाहिजे व ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटचा आदर्श आपल्यासमोर ठेवायला हवा असं त्यांचं म्हणणं होतं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर १५, १८९३] या कडवट टीकेचा समारोप नाताळ ॲडव्हरटाईझरनं असा केला :

*हे कावेबाज आशियन..... ठोक विक्रेत्यांचा (गोऱ्या) फायदा घेतात..... आणि लहान गोऱ्या व्यापाऱ्यांना त्यांनी व्यवसायाबाहेर घालवलं आहे.... आधी जे स्थानं गोऱ्या व्यापाऱ्यांचं होतं ते आता जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन जगत असणाऱ्या या भिकार आशियायी लोकांनी घेतलेलं आहे. ते काहीच खर्च करत नाहीत आणि सर्व शिल्लक कलकत्त्याला पाठवत असतात व मनात येईल तेव्हा दिवाळं काढत असतात.... या भारतीयांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची हयगय करायची आवश्यकता नाही व त्यांच्याबाबतीत कोणतीच दयामाया दाखवायची आवश्यकता नाही. शक्य असेल तर त्यांना काढून टाकायला पाहिजे व तसं लगेच शक्य नसेल तर कमीतकमी त्यांच्यावर अशाप्रकारे कर लावायला पाहिजे की त्यांना या वसाहतीत फार काळ राहणं परवडू नये.* [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर १५, १८९३]

आतापर्यंत अशा प्रकारच्या हल्ल्यांना कोणी आव्हान देत नसायचं. भारतीय व्यापारी समाज त्याच्याविषयी वृत्तपत्रात काय येतं याची फिकीर करत नसत. परंतु आता त्यांच्यात

वेगळ्या प्रकारचा एक भारतीय होता. गांधीजी एकदाचे आपल्या कोशातून बाहेर पडले होते. नाताळ ॲडव्हरटाईझरनं प्रकाशित केलेल्या लेखाला उत्तर देत ते म्हणाले की जर सर्व भारतीय व्यापारी दिवाळं काढतात असं गृहित धरलं तर, वास्तवात जे असत्य आहे, तो दिवाळं काढण्यासंबंधीच्या कायद्याचा दोष नाही काय? आणि ते काहीही असलं तरी सर्व 'आशियायींना' आपलं चंबूगबाळं आटपून दक्षिण आफ्रिकेतून हाकलून लावणं उचित आहे काय? 'या व्यापाऱ्यांना इंग्रज व्यापाऱ्यांकडून अजूनही उधारीवर माल मिळतो त्यावरून तुम्ही दाखवता तेवढे हे व्यापारी वाईट नाहीत हे सिद्ध होत नाही काय ?

लहान व्यापाऱ्यांना हाकलून लावण्याबद्दल :

*यावरून असं दिसतं की भारतीय व्यापाऱ्यांच्या व्यापारातील स्पर्धाशीलवृत्तीचं दर्शन होतं. अशाप्रकारचं कौशल्यच त्याला बाहेर हाकलून लावण्यासाठी कारणीभूत आहे काय ! महोदय मी आपल्याला विचारू इच्छितो की हे न्याय्य आहे काय?.... निरोगी स्पर्धेला हुसकावून लावणं उचित आहे काय ?*

भारतीय जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन जगत असतात या आक्षेपाला उत्तर देत ते पुढं लिहितात :

*जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन म्हणजे काय याविषयी तुमचे विचार काय आहेत हे जाणून घेण्यात मला आनंद होईल. ते जे जीवन जगतात त्याविषयी माझ्या काही कल्पना आहेत. जर एखाद्या खोलीत सुंदर महागडा गालिचा नसेल, वर किंमती झुंबरं लटकलेली नसतील, जेवणाच्या टेबलवर (बहुधा पॉलिश न केलेल्या) मूल्यवान चादर अंथरलेली नसेल व त्याला फुलांनी सजवण्यात आलेलं नसेल, त्यावर मद्याच्या बाटल्या नसतील, डुकराचं वा गायीचं मास वाढलेलं नसेल तर ते जीवन जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन आहे असं म्हणता येईल काय? जर पांढरा सुखावह पोषाख - वैशिष्ट्यानं उष्ण हवामानाला जुळणारा, ज्याबद्दल मला सांगण्यात आलं आहे की अनेक युरोपिअनांना त्याचा हेवा वाटतो - घालणं हे जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन जगणं आहे काय ? जर ते बिअर पीत नसतील, तंबाखू ओढत*

*नसतील, शोभेसाठी हातात छडी वापरत नसतील, त्यांच्या हाताच्या घड्याळाला सोन्याची साखळी नसेल, त्यांची बैठकीची खोली ऐषआरामाच्या वस्तूंनी सजवलेली नसेल तर त्याचं जीवन जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन आहे असं म्हणता येईल काय? थोडक्यात सांगायचं तर सामान्यपणे ज्याला साधं मितव्ययी जीवन समजण्यात येतं त्याला जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन म्हणता येत असेल तर भारतीय व्यापाऱ्यांवर जवळपास रानटी लोकांसारखंच जीवन जगत असल्याचा आरोप करता येईल व तसं असल्यास अशा वसाहतीच्या सर्वोच्च सांस्कृतिक जीवनातून लवकरात लवकर त्याला काढून टाकणंच उचित होईल.*

हा युक्तिवाद एखाद्या वकिलाचा वकिली युक्तिवाद नव्हता तर साध्या जीवनाची दीक्षा घेतलेल्या आणि त्यानुसार जीवन जगण्यावर श्रद्धा असलेल्या माणसाच्या अंतरीचे ते बोल होते. इंग्लंडमधे विद्यार्थीदशेत असताना त्याच्या संपर्कात आलेल्या काही अतिशय श्रेष्ठ इंग्रज गृहस्थांशी झालेल्या चर्चेमुळे ही श्रद्धा त्यांच्या अंतःकरणात निर्माण झालेली होती. त्यांच्या ओठातून हे जे शब्द बाहेर पडले ते त्या विषयातील त्यांच्या अधिकारामुळे.

भारतीय लोक शासनासाठी धोका नाहीत हे दाखवत त्यांनी लिहिलं की ते राजकारणात लुडबुडच करत नसतात व केली तरी ती नाममात्र असते, ते कायद्याचं पालन करणारे आहेत, 'एकाही भारतीयाला शिक्षा झालेली नाही अथवा चोरी, दरवडेखोरी वा अशाप्रकारच्या जघन्य गुन्ह्यांचे त्यांच्यावर आरोप करण्यात आलेले नाहीत', दारूचं व्यसन त्यांना नसल्यामुळे अतिशय शांत नागरिकात त्यांची गणना होईल. शेवटी त्यांनी लिहिलं :

*चर्चेतील लेखात लिहिण्यात आलं आहे की ते काहीच खर्च करत नाहीत. खरंच ते खर्च करत नाहीत काय ? मी असं गृहित धरतो की ते वाऱ्यावर वा भावनांवर जगतात. आपल्याला माहीत आहे की व्हॅनिटी फेअरमधे बेकीनं वर्षभर काहीच खाल्लं नाही. आणि इथं तर संपूर्ण वर्गालाच अशा रीतीनं जगायच्या मार्गाचा शोध लागला आहे असं दिसतं. असं गृहीत धरायला हवं की त्यांना भाडं, कर, कसायाचे पैसे, किराण्याचं बिल, कारकुनाचा पगार इत्यादी इत्यादी द्यावे*

*लागत नाही. वैशिष्ट्यानं संपूर्ण जगात आज जी व्यापाराची परिस्थिती आहे ती परिस्थिती पाहता अशाप्रकारच्या व्यापाऱ्यांच्या वर्गात मोडणं कुणालाही आवडेल.*

*एकूण विचार करता असं दिसतं की त्यांचा साधेपणा, त्यांची संपूर्ण व्यसनहीनता, त्यांचा शांत स्वभाव आणि या सर्वांपेक्षाही मोठी गोष्ट म्हणजे त्यांचं व्यावसायिक वागणं आणि मितव्ययी सवयी याच गोष्टी आक्षेपार्ह झालेल्या आहेत. वास्तवात त्यांचं अनुकरण व्हायला हवं परंतु याच गोष्टी भारतीय व्यापाऱ्यांबद्दलच्या द्वेषभावनेसाठी व घृणेसाठी कारणीभूत झालेल्या आहेत. हे ख्रिश्चनत्वाला शोभणारं आहे काय ?.... हीच संस्कृती आहे काय ? मी उत्तराच्या प्रतिक्षेत आहे.*

[*नाताळ अॅडव्हरटाईझरला* (सप्टेंबर २३, १८९३) गांधीजींचं पत्र, सप्टेंबर १९, १८९३]

आत्मसमर्थन करत असलेल्या भारतीय माणसाचा आवाज वसाहतीत अगदी पहिल्यांदाच ऐकू येत होता. ह्या आवाजाचा दक्षिण आफ्रिकेतील लोकांच्या कानाला परिचय व्हायला अजून वेळ होता. अघटित असं काही तरी घडलेलं होतं. गोऱ्यांच्या जरी लक्षात आलं नव्हतं तरी त्या आवाजानं दक्षिण आफ्रिकेतील भारतीय प्रश्नाला महाप्रश्नाचं स्वरूप दिलं होतं.

## ४

निवडणुकांच्या निकालांनंतर फॉरवर्ड पक्ष पुढं आला आणि सर जॉन रॉबिन्सन यांना नाताळमधील जबाबदार शासन पद्धतीतील पहिलं सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण करण्यात आलं. २८ सप्टेंबरला नाताळ आणि झुलूलँडचे राज्यपाल व नेटिव्हांवरील सर्वोच्च अधिकारी महामहोदय वॉल्टर फॅन्सिस हचिनसन हे राजधानीच्या शहरी म्हणजे पिटरमारिट्झबर्गला जाताना डरबन येथे आले. तिथं शेठ दादा अब्दुल्ला, एम. के. कमरुद्दिन, आमद तिल्ली, दाऊद महम्मद, आमद जिवा, पारसी रुस्तमजी या नाताळच्या सर्व मुख्य व्यापाऱ्यांनी आणि भारतीय समाजाच्या वतीनं ए. सी. पिल्ले यांनी त्यांच्या स्वागत समारंभाचं आयोजन केलं. स्वागत भाषण आमद तिल्ली यांनी वाचलं. इतर अनेक बाबींसह त्यात पुढील गोष्टींचा उल्लेख करण्यात आला होता :

मान्यवर महोदय, आपल्या अनुमतीनं व आमच्या समाजाबद्दल सहानुभूतीचं धोरण ठेवणाऱ्या महामहोदया राणीसाहेबांचं आपण प्रतिनिधित्व करत असल्यामुळे आम्ही आपल्याला विनंती करतो. [नवीन राज्यपालांचं स्वागत करताना भारतीयांचं स्वागत भाषण सप्टेंबर २३, १८९३]

राज्यपाल संदिग्ध भाषेचा वापर करत उत्तराच्या भाषणात म्हणाले :

नवीन प्रशासनांतर्गत तुमच्या समाजाचा तसंच सम्राटांच्या सरकारच्या नाताळमधील प्रजेच्या सर्व वर्गांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर ३०, १८९३]

परंतु नाताळ विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी केलेल्या उद्‌घाटनपर भाषणात त्यांनी अप्रत्यक्षपणे 'आशियायी लोकांना मतदानाचे अधिकार देण्याच्या अनिष्टतेचा' उल्लेख केला. [*नाताळ मर्क्युरी*, जून २८, १८९४]

१८९३च्या ऑक्टोबरमधे काम सुरू करताच निवडणुकीतील आश्वासनाची परिपूर्ती करण्यासाठी नवीन मंत्रिमंडळानं नाताळ विधानसभेचे सदस्य एच. बिन्स आणि भारतीयांच्या प्रश्नाचे संरक्षक एच. एल. मॅसन यांचं प्रतिनिधीमंडळ भारताचे व्हाईसराय आणि गव्हर्नर जनरल लॉर्ड एल्गिन यांना भेटायला पाठवलं व त्यांच्याचबरोबर नाताळच्या राज्यपालांनी लिहिलेलं एक पत्रही पाठवलं. त्यातून सूचित करण्यात आलं होतं की :

१. *कराराची मुदत ५ वर्षांपासून बेमुदत वाढवण्यात यावी व कराराची वर्षं जसजशी संपतात तसतसा २० शिलींगपर्यंत पगार वाढत जावा.*

२. *भारतीय जर दोन वर्षांनंतर असा करार वाढवायला संमती देणार नसेल तर सक्तीनं शासनाच्या खर्चानं त्याला भारतात परत पाठवण्यात यावं.*

३. *तो भारतात परतू इच्छीत नसेल आणि कराराची मुदतही वाढवू इच्छीत नसेल तर त्याला वार्षिक २५ पौंड कर द्यावा लागेल.*

प्रतिनिधिमंडळ कलकत्त्याला १५ जानेवारी १८९४ला रात्री पोहोचलं व १७ जानेवारी १८९३ला भारत सरकारच्या महसूल आणि शेती खात्याच्या सचिवांना भेटलं व त्यांच्याशी त्यानं

गंभीर विचारविनिमय केला. त्यांच्या भेटीचा हेतू भारतात कळताच लोककल्याणात रस घेणारे नागपट्टणम येथील सद्गृहस्थ जी. ई. महालिंगम ऐय्यर, संपादक *भास्कर ज्ञानोदय*, यांनी ६ जानेवारी १८९४ला इ. सी. बक यांना एक पत्र लिहिलं होतं. जी. ई. महालिंगम ऐय्यर यांचे किम्बर्ली आणि दक्षिण आफ्रिकेत अनेक मित्र होते. त्यांना भारतीयांच्या तेथील परिस्थितीबद्दल चांगली माहिती होती. श्रीयुत जी. ई. महालिंगम ऐय्यर यांनी लिहिलेल्या पत्रात नाताळमधे गोरे लोक भारतीयांशी कशा प्रकारचं अपमानास्पद वर्तन करतात त्याचं सविस्तर वर्णन केलं होतं. तसंच नुकताच लेडीस्मिथ येथे भारतीयांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करायचा कसा प्रयत्न करण्यात आला होता तेही त्यांनी लिहिलं होतं. बिन्स-मॅसन प्रतिनिधिमंडळाचा उल्लेख करत त्यांनी लिहिलं :

नाताळमधील युरोपिअन वसाहतवाले तिथे राहणाऱ्या रंगीत वंशाबद्दल एवढे असहिष्णू असतील तर व नाताळ हा केवळ आपल्यासाठीच राखून ठेवण्यात आलेला भाग आहे असं ते समजत असतील तसंच सम्राटांच्या सरकारची प्रजा असलेल्या काळ्या लोकांविरुद्ध स्वार्थी विचार जर ते करत असतील तर त्यांनी अशा ठिकाणावरून मजूर मिळवावे ज्यांच्या रंगाचा त्यांना तिटकारा वाटणार नाही. म्हणजे त्यांनी गोरे मजूरच मिळवावे. [भारत सरकारचं कलकत्ता येथील रेकॉर्ड २, १८९४ ची फाईल क्र. १८, महसूल आणि कृषी विभाग]

त्यांनी आपल्या पत्राच्या समारोपात भारत सरकारला विनंती केली की 'जे बाहेरचे लोक सम्राटांच्या सरकारची प्रजा असलेल्या भारतातील स्थानिक लोकांच्या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा अपहार करतात त्यांच्या कोणत्याही अटी मान्य करू नये आणि त्यांना कोणत्याही सवलती देण्यात येऊ नयेत. [भारत सरकारचं कलकत्ता येथील रेकॉर्ड २, १८९४ ची फाईल क्र. १८, महसूल आणि कृषी विभाग]

इ. सी. बक यांनी नोकरशाहीला वाटणाऱ्या भारतीय बुद्धिवाद्यांच्या व वैशिष्ट्यानं भारतातील प्रसिद्धी माध्यमाविषयी वाटणाऱ्या घृणेतून त्या पत्राच्या गुणदोषांचं वर्णन करताना 'नाहीपेक्षा परत बोलावण्याला अनुकूल' असं संबोधत त्या पत्रावर पुढील शेरा मारला :

लेखक खरोखरी म्हणतो आहे की ‘अपमानास्पद परिस्थितीशिवाय तुम्ही भारतीयांना बोलावू शकत नसाल तर भारतीयांना बोलावूच नका.’ परंतु असं म्हणणं म्हणजे चेहऱ्याविषयी वाटणाऱ्या द्वेषामुळे नाक कापण्यासारखं होईल.

*आपला हेतू या प्रदेशातील गर्दी कमी करणे हा आहे, वृत्तपत्रांच्या संपादकांच्या व त्यांच्या वर्गातील लोकांच्या गर्विष्ठपणाच्या भावनेला सूट देणं नाही.* [भारत सरकारचं कलकत्ता येथील रेकॉर्ड २, १८९४ ची फाईल क्र. १८, महसूल आणि कृषी विभाग. (तिरपी अक्षरं माझी)]

गोऱ्या लोकांची वसाहत म्हणवल्या जाणाऱ्या नाताळ सरकारनं भारतीय आप्रवाशांच्या कायम वास्तव्यासंबंधी जनमताचं दडपण आणि मळेवाल्यांचा भारतीय आप्रवाशाचा मार्ग कायमचा बंद करायला असलेला विरोध या दोन्ही बाबींचा विचार करून १८९१मधेच प्रस्ताव मांडला की (१) करारबद्ध मजुराच्या मुदतीत सक्तीनं ५ वर्षांऐवजी १० वर्षांपर्यंतची वाढ (२) आणि सेवाकाळानंतर भारतीयांवर परतायची सक्ती. दुसरा प्रस्ताव पुढं जाऊ शकला नाही कारण जोपर्यंत कायद्यानं ब्रिटिश भारतीयांचं तिथं राहणं गुन्हा ठरवल्या जाऊ शकत नाही तोपर्यंत असं करता येऊ शकत नव्हतं. व हा प्रस्ताव भारत सरकारसमोर मांडला जायच्या आधीच परराष्ट्र मंत्र्यांनी तो फेटाळला. दुसरा प्रस्ताव भारत सरकारनं पुढील कारणास्तव फेटाळला :

(१) सर्व वसाहतीत सक्तीचा काळ ५ वर्षांचा आहे,

(२) दुसऱ्या कोणत्याही वसाहतीत पुन्हा करार करायची सक्ती नाही,

(३) आप्रवाशाला परतीच्या सवलतीचा अधिकार नाकारणं हा त्याच्यावर अन्याय होईल,

(४) अथवा आपल्या दुसऱ्या पाच वर्षांचा सर्वोत्तम उपयोग कसा करायचा हे ठरवायच्या त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधन येतं.

व्हाईसराय यांच्या कार्यकारिणीसमोर हे प्रकरण गुरुवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी विचारार्थ मांडण्यात येणार होतं. बिन्स-मॅसन प्रस्तावाला पाठिंबा देत श्रीयुत बक्स यांनी भारत

सरकारला पाठवलेल्या टिपणात सांगितलं की प्रस्तावावरील क्रमांक १, २ आणि ३ हे आक्षेप दूर करण्यात आलेले आहेत. 'दुसऱ्या पाच वर्षांचा सर्वोत्तम उपयोग कसा करायचा हे ठरवायच्या कुलींच्या स्वातंत्र्यावर बंधन येतं हा चौथा आक्षेप त्यांनी फेटाळून लावला. त्यांचं त्याबद्दल म्हणणं असं होतं की काळ संपल्यानंतर आप्रवाशांना परकीय वसाहतीत राहण्यासाठी प्रोत्साहन द्यायचं धोरण हे गळा कापायच्या धोरणासारखं होणार आहे. तसं केल्यास त्यांची शिल्लक भारतात येण्याऐवजी वसाहतीतच राहील. भारतात परतलेला 'कुली' सामान्यपणे सुखवस्तू असतो व त्याच्या देशावर त्याचं ओझं पडत नाही. करारबद्ध मजुरांना कराराचा काळ संपल्यानंतरही परदेशात राहायची अनुमती दिल्यास भारतातून आयात करावयाच्या मजुरांची मागणी कमी होऊन आप्रवाशांची संख्या कमी होईल. दुसऱ्या बाजूनं पाहता कराराचा काळ संपल्यानंतरही आप्रवासी भारतात राहायची भीती दूर झाली तर त्यांच्याबद्दलचा गैरसमज दूर होऊन ऑस्ट्रेलिया वगैरेसारख्या ज्या अनेक वसाहतींनी आप्रवासी भारतीयांसाठी आपली दारं बंद केली आहेत ती उघडून भारतीयांसाठी अमर्याद संधी निर्माण होतील. 'काही वैयक्तिक आप्रवाशांच्या तथाकथित हितासाठी संपूर्ण आप्रवासी भारतीयांच्या हिताचा त्याग करणं हे उपासमार होत असलेल्या भिकाऱ्याला गायीच्या मासाचं जेवण द्यावं की त्यानं मटनची मागणी केल्यामुळे त्याचं जेवणच रद्द करावं' अशा प्रकारच्या युक्तिवादासारखं होईल.

भरती करायच्या वेळीच वसाहतीत प्रवेश केल्यानंतर 'कुलीला' मुक्त मजूर म्हणून राहता येणार नाही यासाठी बांधून घेणं कदाचित 'कुलीला' आवडणार नाही असं म्हणून बंगालमधील आप्रवाशांचे संरक्षक डॉ. मॅक्लीड यांनी सुरुवातीला शंका प्रदर्शित केली. परंतु श्रीयुत बक यांचं म्हणणं होतं की जर अशा प्रकारचं बंधन घातलं नाही तर कोणत्याच 'कुलीला' नाताळमधे प्रवेश करायची अनुमती देण्यात येणार नाही : 'नाताळमधील आप्रवासी भारतीय जनतेसाठी असलेली सोय वरील बंधनासह कायम राहावी की ती बंद करावी असा प्रश्न आहे.' डॉ. मॅक्लीड यांनी पुढं सुचवलं की आप्रवाशांना आकर्षण वाटावं एवढे पगार जास्त नाहीत. परंतु श्रीयुत बक यांना

वाटत होतं की 'आप्रवाशांचा प्रवाह चालू राहण्याएवढे ते भरपूर आहेत. एवढ्या पगारातच आम्ही त्यांना बोलावू शकतो.'

आप्रवाशांसाठी नाताळचे प्रतिनिधी सर चार्ल्स मायकेल यांनी भारत सरकारजवळ कबूल केलं की वसाहतीसाठी आप्रवासी भारतीयांच्या व्यवस्थेत अंगभूत दोष काहीच नाहीत आणि आधी श्रीयुत बिन्स ह्यांनाच हा प्रस्ताव न्याय्य वाटत नसल्याने ते या प्रस्तावाच्या विरोधात होते. यामुळे प्रस्तावाला विरोध करण्याऐवजी श्रीयुत बक यांचं म्हणणं होतं की यातून 'नाताळ सरकारला या प्रस्तावात विशेष रस नाही एवढंच सूचित होतं. आणि आता तर स्वतः बिन्स हेच बिन्स-मॅसन प्रतिनिधी मंडळात आलेले आहेत.'

काही काळ बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर व व्हाईसराय यांच्या कार्यकारिणीचे सदस्य असलेले सन्माननीय श्रीयुत सर मॅकडोनल यांचं मत होतं की आप्रवाशांनी आपल्या मायदेशात परतून घरी बसून राहण्यापेक्षा वसाहतीत कायम वास्तव्य न करताही तिथं राहून पैसा मिळवणं अधिक उचित आहे. कराराचा अवधी संपल्यानंतर आप्रवाशांना वसाहतीत कायम वास्तव्याचा अधिकार असावा की असू नये हा प्रश्न वसाहत आणि वसाहत मंत्र्यांचा आहे व त्याबद्दल भारत सरकारचा संबंध 'या दोन पर्यायांपैकी कोणता पर्याय उत्तम आहे हे ठरवण्यापुरताच येतो.' [भारत सरकारचं कलकत्ता येथील रेकॉर्ड २, १८९४ ची फाईल क्र. १८, महसूल आणि कृषी विभाग] भारतीय 'कुली' ब्रिटिशांची प्रजा असल्यामुळे त्याला ब्रिटिश साम्राज्याच्या कोणत्याही भागात जायचा आणि वास्तव्य करायचा अधिकार आहे. परंतु त्यानं वसाहतीत पाच वर्षांसाठी जायचा व त्यानंतर परतायचा करार केला असेल तर 'त्याला कराराप्रमाणे वागावं लागणं उचित आहे.' स्पष्टपणे मान्य करण्यात आलेल्या तत्त्वाप्रमाणे' ब्रिटिश प्रजेचा ब्रिटिश ध्वजाखाली कुठंही राहायचा हिरावून घेता येणं शक्य नसलेल हक्काचा आग्रह धरून आप्रवाशांसाठी उघडी असलेली दारं बंद व्हायचा धोका पत्करणं हे 'भारत आणि भारतीय कुली या दोघांसाठीही हितावह होणार नाही.' त्यामुळे भारतीय 'कुलींनी' विशिष्ट मुदतीची सेवा केल्यानंतर ज्या बंदरातून ते नाताळला आले असतील त्या बंदरात

परतायला बंधनकारक असणारा करार कुलींशी करायचा करायला अधिकार त्यांना देण्याच्या विचाराशी ते अनुकूल होते.

भारतीय कुली आणि त्यांचे मालक यांनी कोणत्याही दडपणाशिवाय राजीखुशीने केलेल्या करारावर संपूर्ण व्यवस्था आधारित असावी असं सर चार्ल्स ब्रॅडली प्रिकार्ड, के.सी.आय.ई. आणि सर मॅकडोनेल यांनी मान्य केलं.

गरीब बिचाऱ्या भारतीय मजुरांसाठी निष्ठुरपणे वागणाऱ्या या सर्व लोकांत समाधान वाटायला लावणारी एकच बाब होती. ती म्हणजे व्हाईसराय यांच्या मंत्रिमंडळातील कायदे मंत्री सर ए. इ. मिल्लर यांनी जोडलेली भिन्नमतदर्शक टिप्पणी. कुलीचा करार संपल्यानंतर करार पूर्ण करण्यासाठी परतायला कसं भाग पडल्या जाऊ शकतं हे त्यांना कळत नव्हतं. त्यांचं म्हणणं होतं की 'कुलीला याबाबतीत फौजदारी कायद्यानुसार गुन्हेगार ठरवण्यात येऊ शकेल. अशा प्रकारच्या कोणत्याही कायद्याला' भारत सरकारनं मान्यता देऊ नये. मुदत पूर्ण झालेला 'कुली' आपला परतीच्या प्रवासखर्चाचा हक्क सोडायला जर तयार असेल तर व वसाहतीत राहू इच्छीत असेल तर त्याला तसं करायचा पूर्ण अधिकार आहे व त्याच्या या करारभंगामुळे नाताळ सरकारची काही हानी होत असेल तर त्याच्यावर दिवाणी दावा करता येऊ शकेल. अथवा वसाहत कार्यालय जर परवानगी देत असेल तर कराराची मुदत संपलेल्या 'कुलींवर' नाताळ विधानसभा निवासी कर लावू शकेल. *परंतु आपली प्रजा ब्रिटिश वसाहतीत राहू इच्छिते आणि घरी परतायच्या प्रवासखर्चाचा आपला हक्क सोडायला तयार आहे म्हणून आपल्या प्रजेला तुरुंगाची शिक्षा होऊ द्यायला वा बळजबरीनं परत पाठवायला अनुमती द्यायला भारत सरकारला सांगणं ही गोष्ट भारत सरकार एक क्षणभरही मान्य करू शकणार नाही अशी मला आशा आहे. व त्यांनी तसं केलंही तरी वसाहत मंत्री ते मान्य करणार नाहीत अशी माझी खात्री आहे.*

सर ए. इ. मिल्लर यांनी जोडलेल्या भिन्न मतदर्शक टिपणीला गव्हर्नर जनरल यांच्या परिषदेचे अर्थमंत्री सर जे वेस्टलॅड यांनी प्रत्युत्तर दिलं. नाताळमधील राजकीय सत्तेतील स्थित्यंतर पाहता वसाहतींना स्वस्त मजुरांच्या आयातीवर निर्बंध घालायचा अधिकार आहे व

वसाहतींनी ह्या गोष्टीचा 'आग्रह धरणं अनुचित नाही.' 'वसाहतीतून कुलींना घालवून लावणाऱ्या कायद्यापासून कुलींचं संरक्षण करण्यासाठी वसाहत मंत्रालय आपली करंगळी उचलेल' असा विचार करणं चूक आहे. 'वसाहतीत राहिल्याबद्दल कारावासाची शिक्षा ठोठावणारा कायदा करायला नाताळसारख्या लहानशा वसाहतीला कदाचित धैर्य गोळा करावं लागेल' परंतु तरीही नाताळमधे वसाहत करणारे *कराराची मुदत संपलेल्या मुक्त मजुराचं वास्तव्य अशक्य करून टाकतील.... माझा विश्वास आहे की जोपर्यंत कुली मळ्यात करत असलेलं काम गोरी माणसं करू शकत नाहीत तोपर्यंत त्यांच्यासाठी वसाहतींकडून चांगल्या वर्तनाची मागणी करू शकाल. परंतु तो मुक्त मजूर आणि स्पर्धक होताक्षणीच जगातील कोणतीही शक्ती वसाहतीतील लोकासाठी सुरक्षित परिस्थिती निर्माण करू शकत नाही.* ***सर्वसामान्य वसाहतवाल्यांना कायद्याच्या तुलनेत न्याय्य काय आहे याची फार कमी कल्पना असते आणि अमूर्त न्यायाची कोणतीही कल्पना आपले हेतू साध्य करायच्या दृष्टीनं कायदा करण्यापासून त्यांना अडवू शकत नाही.*** (ठळक अक्षरं माझी)

व्हाईसराय यांच्या कार्यकारिणीचे सैन्यातील सदस्य लेफ्टनंट जनरल सर हेन्री ब्रॅकनबेरी यांनी मान्य केलं की नाताळमधील मळेवाल्यांना कुली मिळाले नाहीत तर त्यांचा नाश होईल. परंतु त्यांनी निदर्शनास आणून दिलं की मळेवाले अल्पमतात आहेत आणि किनारपट्टीच्या आतील लोकांचं बहुमत आहे. अंतर्भागातील हे लोक 'कुलींच्या' कराराचा काळ संपल्यानंतर त्यांना नाताळमधे वास्तव्य करू द्यायच्या विरोधात आहेत. 'ते जर 'कुलींना' वास्तव्य करण्यापासून अडवू शकले नाहीत तर ते 'कुलींच्या' आयातीसाठी असलेलं शासकीय अनुदान थांबवतील.' कुलीचा कराराचा काळ संपल्यानंतर भारतात परतावं लागण्यात काही आक्षेपार्ह आहे असं त्यांना वाटलं नाही. ह्या कराराची अंमलबजावणी कशी करावी हे नाताळ सरकारवरच सोपवलेलं बरं राहील असं त्यांचं मत होतं. 'त्यांना जर तसं करता आलं नाही तर त्यात भारताचा काहीच तोटा नाही. त्याचं न परतणं दखलपात्र गुन्हा ठरवणाऱ्या कायद्याला वसाहत कार्यालय वा नाताळचे राज्यपाल मान्यता देणार नाहीत.'

भारताचे सरसेनापती आणि व्हाईसराय यांच्या कार्यकारिणीचे विशेष सदस्य सर जॉर्ज व्हाईट यांचं मत होतं की ‘भारत सोडण्यापूर्वी कुलीला नाताळमधे राहायच्या अधिकाराचा त्याग करण्याविषयी ‘समजून सांगण्यात थोडीशीही अडचण’ येणार नाही कारण त्यावेळी करार करत असताना त्याच्या मनात आपल्याला आपल्या मायदेशात परतता येईल की नाही याचीच शंका असेल. नाताळमधे राहायची इच्छा तिथं राहिल्यानंतर त्याला मिळणाऱ्या दर्जावर अवलंबून राहील.’ त्यामुळे त्यांना वाटत होतं की ही गोष्ट अतिशय अनुचित होईल.

*ब्रिटिश वसाहतीत राहण्याविषयी स्वतंत्रपणे निर्णय घ्यायच्या कुलीच्या अधिकारावर बंधन येईल अशा प्रकारच्या करारात भारत सरकारनं स्वतःच सहभागी होणं उचित नाही. कारण हा करार करायच्या वेळी त्याला आपण कशासंबंधी करार करतो आहो याचीच पूर्ण कल्पना नसते. त्याचं तिथं वास्तव्य झाल्यानंतर तिथं राहायचा त्याला मोह व्हावा अशी परिस्थिती निर्माण होऊ शकेल....*

*भारतातील आप्रवाशासाठी ती काळोखात मारलेली उडी असते. त्यामुळे शासनातर्फे पुरस्कृत स्थलांतराची व्यवस्था पालकाच्या काळजीनं परिपूर्ण असायला पाहिजे. ज्या मातृभूमीला परतायचे दोर आपण कापून टाकत आहोत त्या मातृभूमीत पाच वर्षांत वा त्यानंतर लगेच आपल्याला परतणं भाग पडणार आहे याची जाणीव असलेल्या कुली स्त्री-पुरुषांना नाताळला पाठवताना आज ते ज्या परिस्थितीत आहेत त्यापेक्षाही वाईट परिस्थितीत जाणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल काय ?*

***परतण्याबद्दल सक्ती करणारं करारातील कलम वसाहतवाल्यांच्या हितासाठी घालण्यात आलं आहे, कुलींच्या नाही; आणि मला वाटत नाही की वसाहतवाल्यांसाठी कुलींच्या परिस्थितीचा लाभ घेण्यासाठी आम्हांला इथं बोलावण्यात आलेलं आहे***. (तिरपी अक्षरं माझी)

विरोधी मतप्रदर्शन करणाऱ्या सदस्यांनी एवढ्या जोरदारपणे आपले विचार मांडूनही श्रीयुत बक आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. भारतातील गरिबांची वाढती

संख्या प्रशासनात उपद्रवच निर्माण करील असं त्यांना वाटत होतं व त्यामुळे कोणत्याही मार्गाने का होईना त्यांना त्यापासून सुटका करून घ्यायची होती. गरीब भारतीय मजुरांचा नाताळच्या गोऱ्या मळेवाल्यांसाठी बळी देण्यात आला.

बिन्स-मॅसन प्रतिनिधी मंडळाशी झालेल्या चर्चेच्या परिणामी - जरी काहीही लेखी नोंदवण्यात आलेलं नाही तरी - असं एक मतैक्य झालं होतं की या चर्चेच्या आधारावर दोन संबंधित शासनांमधे एक करार करण्यात येईल. १८७५ साली करारबद्ध आप्रवासी मजुरांवरील बंदी उठवताना भारत मंत्री लॉर्ड सॅलिसबरी यांनी स्पष्ट शब्दात घोषित केलं होतं की करारबद्ध आप्रवासी मजुरांनी विश्वास बाळगावा की त्यांच्या कराराची मुदत संपली की 'ते सर्व बाबतीत स्वतंत्र असतील व वसाहतीत राहणाऱ्या सम्राज्ञीच्या शासनातील कोणत्याही वर्गाला जे अधिकार असतील त्यापेक्षा त्यांना तसूभरही कमी अधिकार राहणार नाहीत अशी प्रस्तावित करारातील अपरिहार्य अट असेल.' [भारत सरकारचा रेकॉर्ड टीप क्र. ४२ मधील (उद्धरणासाठी) पाहा] परंतु ज्या लॉर्ड एलिगन यांनी एका भारतीय मित्राजवळ कबूल केलं होतं की 'मला भारताबद्दल काहीच माहिती नाही आणि मी माझ्या सल्लागारांचा सल्ला ऐकला नाही तर मी मूर्ख ठरेन'. [सी. वाय. चिंतामणी, *इंडियन पॉलिटिक्स सिन्स द म्युटिनी*, पृष्ठ २८] त्याच लॉर्ड एल्गिन यांनी नाताळ सरकार परतीचा प्रवासखर्च सहन करील या अटीवर कोणतीही तक्रार न करता प्रतिनिधी मंडळाच्या पुन्हा करार करण्यासंबंधीच्या प्रस्तावाचा स्वीकार केला. 'गुलामसम' मजुरांचा सतत पुरवठा होण्यासाठी हा लहानसा खर्च करायची नाताळची अगदी एका पायावर तयारी होती. फेब्रुवारी १, १८९४ रोजी प्रतिनिधी मंडळानं भारत सरकारला लिहिलं की 'कुलींना परतीचा प्रवासखर्च आमच्या सरकारकडून मांगायचा अधिकार असेल'. ही अट मान्य करावी अशी शिफारस आमच्या सरकारला करायची आमची तयारी आहे. [भारत सरकार कलकत्ता रेकॉर्ड, २, १८९४ ची फाईल क्र. १८, महसूल व कृषी खाते]

जे करारबद्ध मजूर कराराची मुदत संपल्यानंतर पुन्हा करार करायला तयार नसतील व नाताळमधे वास्तव्य करू इच्छित असतील त्यांच्यावर 'निवासी कर' नाताळ सरकारला लावता येईल हा प्रतिनिधी मंडळाचा प्रस्ताव लॉर्ड एल्गिन यांनीही स्वीकारला. करारातून मुक्त झालेल्या

मजुरानं पुन्हा करार न करता नाताळमधेच राहायचं ठरवलं तर नाताळ सरकारला कोणत्याही परिस्थितीत त्या 'कुलीवर' दखलपात्र गुन्ह्याच्या कलमाखाली खटला भरता येणार नाही कारण भारत मंत्री लॉर्ड किम्बर्ली ही गोष्ट मान्य करणार नाहीत असं त्यांना वाटत होतं व त्यामुळे प्रस्ताव मान्य करताना त्यांनी केवळ तेवढी एकच अट घातली.

२८ फेब्रुवारी १८९४ला नाताळच्या मळेवाल्यांची बाजू घेत इ. सी. बक यांनी बंगाल, आणि मद्रास सरकारला एक पत्र पाठवलं. सध्याचा आप्रवासीविषयक कायदा बदलवला नाही तर नाताळ सरकार भारतीय मजुरांची आयात बंद करील अशी शक्यता वर्तवून त्या पत्रातून त्यांनी बिन्स-मॅसन प्रस्ताव मान्य करायची त्यांना विनंती केली. त्यांनी त्यात असंही सांगितलं की १८९१मधे भारतीय मजुरांचा लोंढा पूर्णपणे थांबवायचा नाताळ सरकारनं विचार केला होता; 'आप्रवासी कायदा भारतातील अतिरिक्त विविध वसाहतीत मजुरांना काम देण्यासाठी करण्यात आला'; आणि नाताळमधील जबाबदार शासनांतर्गत सत्तारूढ पक्षाच्या भारतीय मजुरांच्या आयातीसंबंधीच्या अनुकूल धोरणाचा फायदा घेतला नाही तर अतिरिक्त भारतीय मजुरांना सामावून घेणारा तो महत्त्वाचा मार्ग कायमचा बंद होऊन जाईल. त्या पत्रात पुढं लिहिण्यात आलं होतं की ब्रिटिश साम्राज्यातील प्रजेला ब्रिटिश ध्वजांतर्गत असलेल्या कोणत्याही प्रदेशात वास्तव्य करता येण्याच्या नियमाबद्दल भारत सरकारला कोणतीही सहानुभूती नव्हती. तथापि 'तडजोड म्हणून' जे करारबद्ध मजूर कराराची मुदत संपल्यानंतर कराराचं नूतनीकरण न करता नाताळमधे राहायचं ठरवतील त्यांच्यावर 'निवासी कर' लावायचं वा 'दखलपात्र गुन्हा सोडून इतर काही कार्यवाही करायचं' नाताळ सरकारनं ठरवलं तर त्यावर आक्षेप घेण्यात येऊ नये. [भारत सरकार कलकत्ता रेकॉर्ड, २, १८९४ ची फाईल क्र. १८, महसूल व कृषी खाते]

बिन्स-मॅसन प्रतिनिधी मंडळाचा अहवाल १८९४च्या एप्रिल अखेरीस नाताळ गॅझेटमधे प्रकाशित होताच वसाहतीतून आप्रवासी लोकांच्या वर्गाला परत पाठवावयाचा कायदा करण्याची परवानगी वसाहतीला द्यायचा प्रश्न बाजूला सारला गेला कारण त्याच्यावर फार मोठे आक्षेप घेण्यात आलेले होते. त्यामुळे त्याची अंमलबजावणी करायचं सामर्थ्य वसाहतीत नव्हतं.

परंतु प्रतिनिधिमंडळानं सांगितलं केली की आजपर्यंत भारत सरकार आप्रवासी करारबद्ध मजुरांना 'सक्तीनं परत पाठवायच्या ठामपणे विरोधात होतं कारण त्यांनी ती सवलत कोणत्याच वसाहतीला दिलेली नव्हती.' त्यामुळे प्रतिनिधी मंडळानं विनंती केली की वसाहतीनं प्रस्तावित ठराव 'फार मोठी प्रगती' म्हणून मान्य करावा. त्याचबरोबर सहायक उपाय म्हणून करारातून मुक्त झालेल्या मजुरांना वसाहतीत राहण्यापासून 'परावृत्त करायचा उपाय म्हणून 'निवासी कर' लावायचा विचार करण्यात आलेला आहे व त्याला भारत सरकार आक्षेप घेणार नाही असं आश्वासन आम्हाला देण्यात आलं आहे.

केवळ नाताळवर परिणाम करणारा अशा प्रकारचा कायदा हा एक नमुनाच असेल हे मान्य करण्यात आलं होतं. परंतु खास आजारांसाठी ज्याप्रमाणे खास औषधांची गरज असते त्याचप्रमाणे हे होतं. नाताळ मर्क्युरी या शासनाच्या मुखपत्रानं सावधगिरीची सूचना देत लिहिलं की काही खास निर्बंध आणण्यात आले नाहीत तर 'पाच वर्षांच्या आत अरब आणि भारतीय व्यापारी सोडूनही नाताळमधील कुलींची संख्या ५३,००० होईल.' [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल १८, १८९४]

आशियातील लोकांविरुद्ध नाताळच्या मळेवाल्यांनी उडवलेल्या धुळवडीनंतरही त्याच्या हाती विशेष काही पडलं नाही. त्याचबरोबर भारतीय विश्वस्त संस्था कायदा दुरुस्ती विधेयक नाताळ संसदेत मांडण्यात आलं. त्यानुसार ऊसमळेवाल्यांच्या फायद्यासाठी गेल्या पंचवीस वर्षांपासून शासकीय अधिकोषातून भारतीय आप्रवाशावर सरू असलेला वार्षिक १०,००० पौंडांचा खर्च रद्द करण्यात येणार होता. मळेवाल्यांनी याबद्दल जेव्हा कुरकुर केली तेव्हा नाताळ मर्क्युरीनं टोला हाणत लिहिलं की कुणालाही भारतीय मजुरांची गरज नाही व मळेवाले त्यांची आयात करत असतील तर तसं ते आपल्या स्वार्थासाठी करतात.

*मळेवाल्यांची संपूर्ण समस्या पौंड, शिलींग, पेन्सची आहे व जर मळेवाल्यांच्या इच्छेप्रमाणे कुलींच्या आयातीचा खर्च शासनानं केला नाही तर इथं आधीच असलेल्या मजुरांना ते कामावर लावतील.... एवढंच आहे की आतापर्यंत शासन मळेवाल्यांना स्वस्त मजूर मिळवून*

*देण्यात मदत करत असल्यामुळे मळेवाले आतापर्यंत जी मजुरी देत होते त्यापेक्षा मुक्त भारतीय जास्त मजुरीची अपेक्षा करतात.* [*नाताळ मर्क्युरी*, जून २२, १८९४]

## ५

जबाबदार शासनपद्धतीत नाताळमधे संसदेचे दोन स्तर होते. एक १० वर्ष मुदतीसाठी नामित ११ सदस्य असलेली विधानपरिषद आणि दुसरी २७ निर्वाचित सदस्य असलेली विधानसभा. विधानसभेची मुदत ४ वर्षांची होती. कार्यकारिणीत राज्यपाल व त्यांचं मंत्रिमंडळ असायचं. संसदेच्या पहिल्या सत्रात चर्चिल्या जाण्यासाठी शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेल्या खाजगी विधेयकातील एक विधेयक हेन्री बेल यांचं होतं. त्या विधेयकानुसार 'कोणत्याही भारतीय, आशियायी वा पॉलीनेशियन वंशाच्या माणसाला मतदार सूचीत नाव दाखल करायचा वा निवडणुकीत मतदान करायचा अधिकार राहणार नव्हता.' (५२) परंतु संसदेचं ऑक्टोबर सत्र लहान होतं. स्वतंत्रपणे आलेल्या आप्रवासी भारतीयांच्या समस्येला सोडवण्यासाठी त्यानंतरच्या सत्रात शासनानं स्वतःच मतदान दुरुस्ती विधेयक मांडलं. त्याचा उद्देश भारतीयांना भारतीय म्हणून मतदानाच्या अधिकारापासून वंचित करायचा होता. या विधेयकाच्या आधीच ज्यांची नाव मतदार सूचीत आलेली होती केवळ त्यांच्याच बाबतीत त्यात अपवाद करण्यात आलेला होता. भारतीयांवर परिणाम करणारं वांशिक भेदभावावर आधारित असलेलं असं हे पहिलंच विधेयक होतं.

त्याला विरोध करणारा आवाज केवळ केप कॉलनीतून उठला. त्याचा अर्थ असा नाही की नाताळमधे सदसद्विवेकबुद्धी असणारे लोक नव्हते. परंतु अज्ञानामुळे भारतीय लोकांनी त्याकडे लक्ष दिलं नाही व सर्व वृत्तपत्रांवर गोऱ्या हितसंबंधाचं नियंत्रण होतं. ब्रिटिशांची सर्वात जुनी वसाहत असल्यामुळे व याच बंदरातून ब्रिटिश संस्कृतीचा दक्षिण आफ्रिकेत प्रवेश झालेला असल्यामुळे केप कॉलनीत वर्णभेदाचा किमान परिणाम झालेला होता. एकोणिसाव्या शतकातील मानवतावाद आणि विश्वबंधुत्वाच्या ब्रिटिश परंपरेचा वारसा त्यांना सर्वात जास्त

मिळाला होता. दक्षिण आफ्रिकेतील इतर कोणत्याही भागापेक्षा इथं काळ्यागोऱ्या रक्ताचं मीलन जास्त झालं होतं. इथल्या लोकसंख्येत मलय लोकांचं प्रमाण बरंच होतं. त्यांची केप मातृभूमी होती व डच मातृभाषा होती.

डचांबरोबर सुरुवातीपासून ते राहत आल्यामुळे त्यांनी डच जीवनपद्धतीचा स्वीकार केलेला होता. अनेक मुसलमानांनी मलय स्त्रियांशी विवाह केलेला होता. त्याचबरोबर केपकॉलनीत दक्षिण आफ्रिकेतील ग्लॅडस्टोन म्हणून ओळखले जाणारे श्रीयुत मॅरिसन, मॉल्टिनो आणि श्रीनर यांच्यासारखे उदारमतवादी पुढारीही बरेच होते.

१८७२मधे केपमधे स्थानिक स्वराज्याची स्थापना झाल्यापासून जॉन झेवियर मेरिमन हे पहिल्या आणि नंतरच्याही मंत्रिमंडळाचे सदस्य होते व संघराज्याची स्थापना व्हायच्या वेळी १९१०मधे जे शेवटचं मंत्रिमंडळ होतं त्याचे ते प्रधानमंत्रीही होते. सर जॉन मॉल्टेनो हे १८७२ साली कॉलनीचे पहिले प्रधानमंत्री झाले होते. डब्ल्यू. पी. श्रीनर हे प्रसिद्ध वकील होते, काही काळ महाधिवक्ता होते व नंतर प्रधानमंत्रीही झाले होते. प्रसिद्ध कादंबरीकार ऑलिव्ह श्रीनर या त्यांच्या भगिनी होत्या व स्त्रियांच्या उद्धारासाठी त्या निर्भयपणे काम करत असत. ब्रिटिशांची परंपरा अंगात पूर्णपणे मुरलेले श्रीयुत मेरिमन, मॉल्टेनो आणि श्रीनरसारखे लोक निग्रोंच्या हक्कावर गदा यायची वेळ आली की त्यांच्या बाजूनं उभे राहायचे. भारतीय आणि निग्रोत अंतर असल्याची त्यांची मान्यता होती. निग्रो हे दक्षिण आफ्रिकेचे मूळ निवासी असल्यामुळे त्यांच्या नैसर्गिक हिताला धक्का लावता येऊ शकत नाही अशी त्यांची मान्यता होती. परंतु भारतीयाच्या बेसुमार स्पर्धेमुळे निर्माण झालेला धोका दूर करण्याकरिता त्यांना वगळणारा कायदा करण्यात काही गैर आहे असंही त्यांना वाटत नव्हतं. परंतु तरीही भारतीयांबद्दल त्यांच्या मनात जिव्हाळ्याची भावना होती.

'समाजातील एखाद्या वर्गाविरुद्ध कायदा करण्याची मागणी होणं ही सामान्यपणे काही तरी फार मोठी चूक होत असल्याचं चिन्ह असतं' असं इ. पी. हेरॉल्ड या केपच्या वृत्तपत्रानं लिहिलं. [इ. पी. हेराल्ड, *नाताळ मर्क्युरीमधे* उद्धृत, ऑक्टोबर ११, १८९३] त्यानं पुढं लिहिलं की संदर्भित प्रकरणी

युरोपिअन लोकांची ही मागणी न्याय्य आहे असं म्हणता येत नाही. पहिली गोष्ट ही आहे की भारतीयांना नाताळमधे आणण्यात आलेलं आहे व त्यांना 'इथं केवळ वास्तव्य करायची परवानगीच देण्यात आलेली नाही तर तसं करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात आलेलं आहे.' दुसरी गोष्ट अशी आहे की 'ते कायदा पाळणारे लोक आहेत आणि व ते कधीही दंगल वा बंड करत नाहीत.' तिसरी गोष्ट म्हणजे ते साम्राज्याच्या एका भागातील नागरिक होते व त्यांना तिथून हलवण्यात आलेलं आहे. 'अनेक दृष्टींनी ते आक्षेपार्ह असू शकतात - तसे युरोपिअनही आहेत,...... परंतु ते ब्रिटिश प्रजाजन आहेत.'

भारतीयांना मतदानाचा अधिकार कोणत्याही अवस्थेत देण्यात येऊ नये कारण

विज्ञानाच्या अद्ययावत शिकवणुकीनुसार ज्याप्रमाणे नेटिव्ह हे युरोपिअन.... संस्कृतीच्या किती तरी मागे असल्यामुळे त्यांच्यावर विशेष बंधनं घालण्यात आलेली आहेत त्याचप्रमाणे भारतीयांवरही, ते पूर्णपणे समकक्ष नसल्यामुळे.... सौम्य प्रमाणात का होईना.... काही खास बंधनं घालायला पाहिजे या नाताळच्या भूमिकेला अन्याय्य ठरवत वृत्तपत्रानं सूचित केलं की,

*जगानं आमच्याकडे सन्मानानं पाहावं असं वाटत असेल तर आमच्या नाताळमधील मित्रांनी मतदानाच्या प्रश्नाबाबत सर्वांना समान पद्धतीनं वागवायला हवं. रामीस्वामींना विधानसभेपासून बाहेर ठेवण्यासाठी वा मतदानापासून वंचित करण्यासाठी ते जी काही बंधनं घालू इच्छीत असतील ती सर्वांना सारख्याच प्रमाणात लागू व्हायला पाहिजे. त्यांनी अनेक मूर्खांप्रमाणे मूर्खपणाचं बीजारोपण केलेलं असलं व म्हणीप्रमाणे त्याची फळं त्यांना भोगावी लागणार असली तरी त्यांना त्याची फिकीर वाटत नाही. नाताळमधील ४०,००० लोकसंख्या असलेले भारतीय राजकारणाच्या दृष्टीने नगण्य नाहीत व त्यांना मतदानापासून वंचित करण्याऐवजी त्यांच्याशी अधिक मुत्सद्दीपणानं वागायची गरज आहे.* [इ. पी. हेरॉल्ड, *नाताळ मर्क्युरीमधे* उद्धृत, ऑक्टोबर ११, १८९३]

ही सूचना द्रष्टेपणाची ठरली. परंतु नाताळनं आपल्या मार्गानं जायचं ठरवलं होत. नाताळ मर्क्युरीनं लिहिल्याप्रमाणे 'चूक असो वा बरोबर, न्याय्य असो वा अन्याय्य' दक्षिण आफ्रिकेतील

युरोपिअनात आणि 'वैशिष्ट्यानं दोन गणराज्यात भारतीयांना वा आशियातील अन्य लोकांना मतदानाचे अनिर्बंध अधिकार देण्याच्या विरोधात एक तीव्र भावना पसरलेली होती आणि नाताळमधील युरोपिअनांना दुसऱ्या दोन गणराज्यांतील युरोपिअन ज्ञातिबांधवांकडून 'आशियातील लोकांसारखा व युरोपिअनांच्या शासनाशी सुसंगत व संबंध नसलेला देश म्हणवून घेऊन आत्मघातकीपणाचा निर्णय घेऊन जातिबहिष्कृत व्हायची इच्छा नव्हती.' [एम. के. गांधी, *द ग्रिव्हान्सेस ऑफ ब्रिटिश इंडियन्स इन साऊथ आफ्रिका*, राजकोट, ऑगस्ट १४, १८९६]

नाताळ विधानसभेत विधेयकाचं दुसरं वाचन सुरू करताना २१ जून १८९४ला सर जॉन रॉबिनसन यांनी प्रस्तावित विधेयकाद्वारे योजण्यात यावयाच्या वांशिक उपायांचं समर्थन केलं. ते म्हणाले की वसाहतीत काही थोडेच वर्ग आहेत 'परंतु अनेक वंश आहेत. या अनेक वंशांमुळे भविष्यासंबंधी संभ्रम निर्माण झालेला आहे.

***त्यांना वाटत होतं की मतदानाचा अधिकार हा विशेष वंशाचा विशेषाधिकार आहे*** *हे गृहीतक त्यांच्या या भूमिकेमागं होतं....* ***कॉकेशिअन वंश व त्यातही अँग्लो-सॅक्सन वंशासारख्या विकसित आणि सुसंस्कृत वंशांचा तो फार मोठा मूल्यवान वारसा आहे... आशियन लोकांना.... या भूमीचे पुत्र समजता येत नाही वा ज्या लोकांनी दक्षिण आफ्रिकेत वसाहत करायचं कर्तव्य पार पाडायचं ठरवलं आहे****.... त्या लोकांनी दक्षिण आफ्रिकेवर भविष्यात ख्रिश्चन आणि युरोपिअन संस्कृतीचा ठसा उमटवायचा निर्धार केलेला आहे. व ह्या खंडाला रानटीपणापासून व्यवस्थितपणे मुक्त करायचं असेल तर.... तसं या तत्त्वांच्या माध्यमातूनच करता येणार आहे.* (ठळक अक्षरं माझी)

ते पुढं म्हणाले की सभागृहासमोरील या विधेयकामुळे जे लोक प्रभावित होणार आहेत ते नाताळमधे 'फार मोठ्या राजकीय हक्कांमुळे वा आकाक्षांमुळे' आलेले नाहीत तर केवळ पैसा कमावण्यासाठी वा जीवन निर्वाह करण्यासाठी आलेले आहेत. ते जेव्हा इथं आले तेव्हा 'भूतकाळात ते ज्याप्रमाणे या अधिकाराविषयी अज्ञानात होते त्याचप्रमाणे भविष्यात मिळणाऱ्या मतदानाच्या अधिकाराविषयीही त्यांना काहीच कल्पना नव्हती', त्यांना मतदानाच्या ज्या

अधिकाररुपी शस्त्राची प्राप्ती झालेली आहे ते त्यांच्यासाठी 'अगदी नवीन शस्त्र आहे.' परंतु या मतदानाच्या अधिकाराच्या योग्य उपयोगासाठी त्याचा 'परिचय, हुशारी आणि अनुभव यांची आवश्यकता असते. त्या लोकांजवळ भूतकाळात जे होतं त्यापासून ही दुरुस्ती त्यांना वंचित करणार नाही.'

त्यांनी एक आश्चर्यजनक विधान केलं. ते म्हणाले की ही गोष्ट भारतीय ज्या ब्रिटिश साम्राज्याचे प्रजाजन आहेत व नाताळ ज्या ब्रिटिश साम्राज्याचा भाग आहे त्या ब्रिटिश साम्राज्याच्या ध्येयाशी भारतीयांविरुद्ध भेदभाव करण्यात काही विसंगत गोष्ट नाही. त्याशिवायही या वसाहतीप्रती साम्राज्याचं जे कर्तव्य होतं तेच ते करत होते; कारण *या नवीन आणि आश्चर्यजनक देणगीचा एकाएकी लाभ झाल्याचं जर यांना आढळलं तर ते ज्या महान देशातून आले त्या देशात ते आंदोलक व राजद्रोही बनतील असा विश्वास बाळगायला बराच आधार आहे.* [*नाताळ मर्क्युरी*, जून २२, १८९४]

सर जॉन समारोप करत म्हणाले की भारतीयांचा काहीच अधिकार नाही कारण ते विदेशी वंशाचे आहेत. त्याच वेळी ट्रान्सवाल गणराज्यात सर जॉन यांच्या शब्दांच्या विपरीत काय घडत होतं याची त्यांना कल्पना नव्हती. अगदी याच वेळी ब्रिटिश सरकार तिथं क्रुगरविरुद्ध युटिलँडरांना म्हणजे विदेशी लोकांना बर्धरांएवढ्याच म्हणजे स्थानिक शेतकऱ्याएवढ्याच समान अधिकारासाठी भडकवत होतं आणि सशस्त्र बंडखोरीसाठी तयार करत होतं.

हेन्री बेल यांनी मान्य केलं की मतदानासाठी वर्णभेद करायची गरज नाही व त्यामुळे त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात सांगितलं की याऐवजी शिक्षणाच्या कसोटीवर मतदानाचा अधिकार द्यायला पाहिजे. 'ज्या कोणाला लिहिता वा वाचता येत नाही, मग तो गोरा असो वा काळा, त्याला मतदानाचा अधिकार देण्यात येऊ नये.' आपल्या या भूमिकेत सुसंगती आणि सातत्य असावं म्हणून ज्यांना काही 'खास कारणासाठी' मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे असे आशियन लोक सोडून - त्यांचं नाव 'चुकीनं' मतदान सूचीत आलेलं असलं तरी - आशियातील सर्व लोकांना विधेयकाद्वारे 'अकार्यक्षमतेच्या' तत्त्वावर मतदान सूचीतून वगळण्यात यावं.

मॉरकॉम यांच्या जागी महाधिवक्ता म्हणून आलेले हॅरी एस्कॉम्ब मधेच आक्षेप घेत म्हणाले की श्रीयुत बेल या देशात जे लोक येणार आहेत त्यांच्याशी न्यायानं वागायची सूचना करत आहेत परंतु जे लोक आधीच या देशात आहेत त्यांच्याशी श्रीयुत बेल यांच्या सूचनेप्रमाणे वागलो तर ते न्यायाचं होणार नाही हे कदाचित श्रीयुत बेल लक्षात आलं नसेल. 'तुम्हाला जर इथं यायचं असेल तर तुमच्या येण्यासाठी अशा अशा अटी आहेत' असं म्हणणं एक गोष्ट आहे. परंतु 'लोकांना इथं येऊ द्यायचं, त्यांना व्यापार करू द्यायचा, त्यांची इथं लग्नं होऊ द्यायची, त्यांची कुटुंबं वाढू द्यायची आणि मग त्यांना जे आधीच मिळालेलं आहे ते परत घ्यायचं हा तर्काचा नव्हे तर अगदी वेगळ्याच प्रकाराचा हा प्रश्न आहे. अशा गोष्टीला आपण कधीच संमती देऊ शकणार नाही' असं श्रीयुत एस्कॉम्ब यांचं म्हणणं होतं.

नाताळ संसदेचे दुसरे एक सदस्य श्रीयुत रिले म्हणाले की वगळण्याच्या या तत्त्वाप्रमाणे विदेशी लोकांना नगरपालिकेतही मतदान करता येणार नाही अशी मला आशा आहे.

परंतु सर्वात कठोर आघात केला श्रीयुत टॅथम यांनी. भारतीय मतदारांच्या मदतीनं विधानसभेत निवडून आलेल्या श्रीयुत टॅथम यांनी आपल्या उपकाराची परतफेड पुढील उद्गारांनी केली : 'हे विधेयक देशासमोर अनेक आठवड्यांपासून असूनही त्यावर कोणताच आक्षेप घेण्यात आला नाही यावरून स्पष्ट होतं की ह्या लोकांना मतदानाचा अधिकार नको आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, जून २२, १८९४]

या विधेयकाचं दुसरं वाचन त्याच दिवशी रात्री १० वाजता सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी उरकवण्यात आलं. हे विधेयक हवं तेवढं पुढे गेलेलं नाही व त्याची अंमलबजावणी मागील तारखेपासून करण्यात आलेली नाही व आशियन लोकांना नगरपालिकांच्या व संसदेच्या निवडणुकीत मतदान करण्यापासून वंचित करण्यात आलेलं नाही असा वृत्तपत्रातील सर्वसामान्य टीकेचा रोख होता. 'रामीस्वामी हा शहरात वा शहराजवळ भाजीपाला पिकवणारा वा पुरवठा करणारा म्हणून चांगला आहे परंतु तो उपद्रवकारक घाण आहे.... आम्हाला त्याला नगरसेवकही बनवायचं नाही आणि त्याच्या मतानं त्याच्या बांधवांना नगरसेवक म्हणून

निवडूनही येऊ  द्यायचं नाहीं असं *नाताळ विटनेसनं* लिहिलं. [*नाताळ विटनेस*, जून २९, १८९४] एवढंच नाही तर मतदान हक्क दुरुस्ती विधेयकाच्या वर्णीय स्वरूपाबद्दल आणि ब्रिटिश साम्राज्याच्या एका भागाला इतर नागरिकांच्या तुलनेत मतदानाचा अधिकार नाकारण्यात आल्याबद्दल ज्यांचा नाताळशी वाद झाला होता ते केपचं लोकमतही या विधेयकाच्या ध्येयाशी सहमत होतं. 'सौम्य हिंदूचं' त्यांच्यातील वास्तव्य त्यांनाही निश्चितच नको होतं. त्यामुळे असं सुचवण्यात आलं की त्याला वसाहतीबाहेर ठेवायचा उत्तम मार्ग म्हणजे स्थानिक अधिकाऱ्यांनी 'शांत राहून कावेबाज आणि घाणेरड्या हिंदूला शहरात राहणं अशक्य करून टाकायला पाहिजे.' उदाहरणार्थ 'अन्याय्य स्पर्धेतून' त्यांना हुसकावून लावण्यासाठी त्यांचं कंबरडं मोडेल अशा प्रकारचे कर त्यांच्यावर लावायला पाहिजे. एवढंच नव्हे तर फेरीवाल्यांची संख्या मर्यादित करण्यासाठी 'प्रतिबंधक परवान्यांचा' उपाय योजायला हवा. याहूनही परिणामकारक उपाय म्हणजे गर्दी करणं, घाण घरातच साठवणं वा कचरा रस्त्यावर टाकणं अशासारख्या स्वच्छतेचा नियमभंगाबद्दल नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अतिशय कठोर कार्यवाही करायला हवी. 'त्यांना त्यांच्या पद्धतीनं राहायची मनाई करण्यात आली असतानाही तिथं ते त्या पद्धतीशिवाय फार काळ राहू शकतील अशा प्रकारचे हे लोक नाहीत.' [*पी. इ. टेलिग्राफ*, नोव्हेंबर १४, १८९३] अजून एक उपाय सुचवण्यात येत होता. तो असा की वस्तीविषयक नियम नेटिव्ह आणि भारतीयांना सारख्याच पद्धतीनं लावणं. वेगळ्या शब्दांत सांगायचं तर 'भारतीयांच्या मुलांना श्रमप्रतिष्ठा शिकवण्यासाठी' [इ. पी. हेरॉल्ड, *नाताळ ॲडव्हरटाईझर*मधे उद्धृत, नोव्हेंबर ८, १८९३] त्यांना सक्तीनं 'मजुरीच्या कामावर उमेदवारी करायला लावावी' जेणेकरून स्वस्त कुली मजुरांचा पुरवठा सातत्यानं होत राहील. कोंबडी तुपात तळून खावी की भाजून खावी एवढंच नाताळ आणि केपच्या मतात अंतर होतं!

अशा परिस्थितीत मतदान दुरुस्ती विधेयकाचं विधानसभेत दोनदा वाचन होऊन समितीच्या विचारार्थ पुढं गेलं होतं व तिसऱ्या वाचनासाठी ते २७ जूनला येणार होतं. मानवी पद्धतीनं विचार करायचा तर ते विधेयक पारित होऊन सम्राज्ञीची संमती त्याला मिळणं आणि त्याची कार्यवाही सुरू होणं ही काहीच दिवसांची बाब राहिलेली होती. असं दिसत होतं की

भारतीयांवर कोसळणारं हे संकट चमत्काराशिवाय कोणीच टाळू शकत नव्हतं व ज्याच्यावर हे संकट कोसळू पाहत होतं तो मात्र त्याबद्दल पूर्ण अंधारात होता. परंतु एक लहानशी घटना घडली आणि संपूर्ण घटनाप्रवाहच बदलला.

# प्रकरण १७ वे

# नशिबाच्या हिंदोळ्यावर

१

जून १८९४च्या शेवटच्या आठवड्यात दादा अब्दुल्लांच्या खटल्याचं कामकाज संपल्यानंतर गांधीजी डरबनला परतले व घरी परतायची तयारी करू लागले. परंतु गांधीजींना योग्य पद्धतीनं निरोप दिल्याशिवाय दादां अब्दुल्लांची त्यांना परतू द्यायची इच्छा नव्हती. दादा अब्दुल्लांनी गांधीजींच्या निरोपसमारंभाचं आयोजन डरबनच्या उपनगरातील समुद्रकिनाऱ्यावरील सिडेनहॅम या उपाहारगृहात केलं. त्या समारंभात डरबनमधील सर्व प्रमुख भारतीयांना आमंत्रित करण्यात आलं होतं. संपूर्ण दिवस तिथंच घालवायचं ठरवण्यात आलं होतं. एका मित्रानं दिलेल्या वृत्तपत्राची पानं सहज चाळत असताना त्याच्या कोपऱ्यातील एका स्तंभावर गांधीजींची नजर पडली. ते वृत्तपत्र होतं सर जॉन रॉबिन्सन यांच्या वडिलांनी स्थापन केलेलं नाताळ मर्क्युरी. सर जॉन रॉबिन्सन हे या वृत्तपत्राचे मालक होते व प्रधानमंत्री होण्यापूर्वी अनेक वर्ष ते त्याचे संपादक होते. त्याचा मथळा होता 'भारतीयांचा मतदानाचा हक्क.'

गांधीजींनी ती बातमी वाचली तेव्हा त्यांना धक्काच बसला. भारतीयांना मतदानाच्या हक्कापासून वंचित करणाऱ्या बिलाचं समर्थन करताना त्या वृत्तपत्रानं लिहिलं होतं :

*आशियातील लोक पूर्णपणे मरगळलेल्या संस्कृतीच्या वंशातून आले आहेत. त्यांना प्रातिनिधिक सरकारच्या व्यवस्थेच्या तत्त्वांचं तसूभरही ज्ञान नाही. त्यांच्या सहजप्रवृत्ती आणि त्यांना मिळालेलं शिक्षण यांच्याकडे पाहिलं तर त्यांचं स्वरूप अतिशय मागासलेलं आणि राजकीयदृष्ट्या बाल्यावस्थेत असलेलं आढळेल. आपल्या राजकीय आकांक्षांबद्दल त्यांना काही सहानुभूती असू शकेल अशी अपेक्षा करणं.... हा त्यांच्यावर अन्याय करण्यासारखं होईल. ते वेगळ्या पद्धतीनं विचार करतात आणि त्यांचा विचार अशा पातळीवरील असतो की*

*युरोपिअनांना त्यांचं तर्कशास्त्र कळू शकत नाही. त्यांच्यासाठी आपल्या राजकीय समस्या तेवढ्याच गूढ आहेत जेवढं आपल्यासाठी त्यांचं वैदिक साहित्य.*

हा उपाय योजायच्या कारणाचं समर्थन करताना त्यांनी पुढील कारणं दिली : (अ) फार कमी भारतीयांना इंग्रजी वृत्तपत्र वाचून दैनंदिन राजकीय प्रश्न समजून घेण्याएवढं आणि त्याद्वारे वसाहतीसाठी महत्त्व असलेल्या प्रश्नांसंबंधी मत बनवण्याएवढं इंग्रजी भाषेचं ज्ञान आहे; (ब) त्यांना नाताळच्या वसाहतीसंबंधी काहीच देणंघेणं नाही; (क) त्यांच्या सवयी 'बांडगुळासारख्या' आहेत, ते स्वतंत्रपणे प्रगती करून घेऊ शकत नाहीत; (ड) जॉन स्टुअर्ट मिल यांनी सांगितलं आहे की 'माणूस जे मागतो त्याच्या निम्मे देण्यात न्याय नाही तर त्याला काय मिळणं योग्य आहे ते संपूर्ण देण्यात न्याय आहे.' विचाराधीन असलेलं हे विधेयक न्यायाच्या या कसोटीवर पूर्णपणे उतरते. 'त्यानं जे मागितलं त्याच्या निम्मे त्याला दिलं जात नाही तर त्याच्या पात्रतेप्रमाणे त्याला संपूर्ण देण्यात येत आहे'; 'भारतीयांना मतदानाचा अधिकार देणं हाच त्यांच्यावर अन्याय झाला असता;' विधेयकातील तरतुदीप्रमाणे हे अधिकार नाकारणं हाच न्याय आहे. 'ह्या शक्तीचा बरा वा वाईट परिणाम माहीत नसल्यामुळे ही शक्ती काढून घेतल्यामुळे त्यांना कदाचित मोकळंच वाटेल'; (इ) 'मतदान केंद्रावर त्यांना किती सहजपणे प्रभावित करता येतं ते पाहिलं तर' मतदारसूचीत त्यांचं नाव कायम ठेवण्यामुळे राजकीय नैतिकता राहत नाही; (फ) भारतीयांचा मतदानाचा अधिकार काढून घेतल्यामुळे त्यांची कोणतीच हानी होणार नाही कारण मतदार सूचीत ज्यांची नावं असतील ते त्यांच्या हिताची पूर्णपणे काळजी घेतील. प्रधानमंत्र्यांनी संसदेत आश्वासन दिलंच आहे की 'जर वसाहतीतील लोकांनी आपल्यासाठी गैरवाजवी हक्कांची मागणी केली तर सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन योग्य आणि न्याय्य पद्धतीनं कारभार होईल याची शासन दक्षता घेईल, तसंच महत्त्वाचा सत्ताधारी वंश म्हणून उदारपणानं आणि न्यायानं मतदानाचा अधिकार नसलेल्या लोकांच्या हितरक्षणाचं काम करील.' [*नाताळ मर्क्युरी*, २५ जून १८९४ नाताळ इंडियन काँग्रेसच्या पहिल्या अहवालात गांधीजींनी ऑगस्ट १८९५ साली लिहिलं की '१८९४च्या जुलै महिन्यात नाताळ सरकारनं विधानसभेत मतदान कायदा दुरुस्ती विधेयक सादर केलं.' स्पष्टपणे ही चूक आहे. विधेयक जूनमध्ये केव्हातरी सादर करण्यात आल्याचा उल्लेख २५ जून १८९४च्या नाताळ मर्क्युरीच्या अग्रलेखात करण्यात आला होता व समितीच्या पातळीवरून त्याच महिन्यात ते पुढं गेल्याचा उल्लेख नाताळ मर्क्युरीत २८ जूनला करण्यात आला होता. गांधीजी घटनाक्रमाच्या आठवणीत क्वचितच चूक करतात. परंतु

गांधीजींच्या साबरमती संग्रहालयात या अहवालाची एकमेव चक्रमुद्रित प्रत उपलब्ध आहे. कदाचित प्रचारासाठी आणि वितरणासाठी मुद्रित केलेल्या प्रतीत ही चूक दुरुस्त करण्यात आलेली असावी.]

आतापर्यंत गांधीजींना या विधेयकासंबंधी काहीच माहिती नव्हती. दादा अब्दुल्लांना त्यांनी विचारलं, 'तुम्हाला यासंबंधी काही माहिती आहे ?'

दादा अब्दुल्लांना वा तिथं जमलेल्या कोणत्याही पाहुण्याला त्यासंबंधी काही माहिती नसल्याचं गांधीजींना सांगण्यात आलं. दादा अब्दुल्ला म्हणाले, 'या गोष्टीतलं आम्हाला काय कळतं? आम्हाला केवळ आमच्या व्यवसायावर परिणाम करणाऱ्या गोष्टी कळतात.' त्यानंतर ऑरेंज फ्री स्टेटमधून त्यांना कसं हुसकावून लावण्यात आलं व त्यांचा व्यापार कसा बुडाला ते त्यांनी सांगितलं. त्यांनी त्याविरुद्ध आंदोलन करायचा प्रयत्न केला होता पण त्याचा काहीच फायदा झाला नव्हता. ते म्हणाले की अखेरीस आम्ही काय करू शकतो ? आम्ही निरक्षर असल्यामुळे पांगळे झालेलो आहोत.

'आपल्या शवपेटीवर ठोकण्यात येणारा हा पहिला खिळा आहे. आपल्या अस्मितेवरच यानं आघात केलेला आहे' गांधीजी भावविवश कापऱ्या आवाजात म्हणाले. त्यांच्या त्या आवाजानं दादा अब्दुल्ला स्तंभित झाले.

मतदानाच्या हक्कापासून वंचित केलं जाण्याची कारणपरंपरा सांगत दादा अब्दुल्ला गांधीजींना म्हणाले की ह्या सर्व गोष्टींची सुरुवात हेन्री एस्कॉम्ब यांनी केलेल्या सूचनेनुसार आमच्यापैकी अनेकांनी मतदार सूचीत जेव्हा नावं नोंदवली तेव्हा झाली. 'इथं आमचे कान आणि डोळे युरोपिअन अटर्नी आहेत.' ते खेदपूर्ण आवाजात गांधीजींना म्हणाले.

'दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या आणि शिकलेल्या भारतीयांचं काय? तुमच्यात अनेक असे लोक आहेत. ते तुम्हाला मदत करत नाहीत हे कसं? गांधीजींनी विचारलं.

नैराश्याच्या सुरात दादा अब्दुल्ला म्हणाले, 'ते आमच्यापासून दूर राहतात. ख्रिश्चन असल्यामुळे ते पूर्णपणे गोऱ्या धर्मगुरूंच्या अंगठ्याखाली आहेत. आणि ते धर्मगुरू शासनाची पिल्लं आहेत. ते स्वतःला भारतीय समुदायाचा भागच समजत नाहीत.' पण त्याचबरोबर हेही खरं

आहे की ख्रिश्चनेतर समाजानंही कधी त्यांना आपल्या समाजाचा घटक मानायचा वा बनवायचा प्रयत्न केलेला नाही.

यामुळे गांधीजींचे डोळे उघडले. ख्रिश्चनांनी स्वतःला भारतीय का समजू नये? गांधीजींनी विचारलं. हे ख्रिश्चनत्व आहे काय? दादा अब्दुल्लांना गांधीजी म्हणाले की यापुढे या सुशिक्षित खिश्चनांना आपल्याकडे ओढायचा तुम्ही प्रयत्न करायला पाहिजे.

'तुम्ही काय म्हणता ते आम्हांला कळतं. दादा अब्दुल्ला गांधीजींना म्हणाले. 'आता आम्ही काय करायला हवं ते तुम्ही आम्हांला सांगा. आम्ही तुमच्या सल्ल्याप्रमाणे वागू.'

इतर पाहुणेही हे संभाषण ऐकत होते. तेही त्यात सहभागी झाले. त्यांच्यातील एक म्हणाला, 'तुम्ही काय करायला पाहिजे ते मी तुम्हाला सांगतो. तुम्ही तुमचं जाणं एका महिन्यानं लांबणीवर टाका आणि आम्ही काय करावं याबद्दल मार्गदर्शन करा. तुम्ही म्हणाल तसं आम्ही करू.'

सर्व जण त्या आवाजात आवाज मिसळत म्हणाले, 'अब्दुल्ला शेठ, तुम्ही गांधीभाईंना थांबवायलाच पाहिजे.'

दादा अब्दुल्ला चाणाक्ष गृहस्थ होते. त्या सूचनेकडे दुर्लक्ष करत ते म्हणाले की मी तुमच्याशी अगदी सहमत आहे. परंतु तुम्हालाही माझ्याएवढाच गांधीभाईंना थांबवायचा अधिकार आहे. 'आपण सर्वच जण त्यांना थांबवण्यासाठी त्यांचं मन वळवू या.'

सर्व जण एकदम उद्गारले, 'बरोबर आहे, बरोबर आहे.'

'पण तुम्ही हे विसरायला नको की हे बॅरिस्टर आहेत. त्यांच्या फीचं काय?'

गांधीजी लगेच म्हणाले, 'अब्दुल्ला शेठ, या कामासाठी मला कोणतीच फी नको. सार्वजनिक कामासाठी फी घ्यायची नसते.' पण सार्वजनिक कामाची सुरुवात काही पैसा हाती असल्याशिवाय करता येऊ शकत नव्हती. लेखनसाहित्य, टपालहशील, तारा, प्रवास यासाठी

खर्च तर लागणारच होता. स्थानिक वकिलांचाही सल्ला घ्यायची गरज पडू शकत होती. अखेरीस ते म्हणाले, 'हे एका माणसाचं काम नाही. अनेकांनी पुढं येऊन सहकार्य करायला पाहिजे. सर्व जण सहकार्य करायला तयार असतील तर मी माझं परतणं एक महिन्यानं लांबणीवर टाकायला तयार आहे.'

त्यांच्या प्रस्तावाचं 'अल्ला महान आणि कृपाळू आहे' या गजरात स्वागत करण्यात आलं. त्यांनी आश्वासन दिलं की तुम्ही थांबायला तयार असाल तर सर्व काही ठीक होईल आणि लागेल तेवढा पैसा आणि माणसं या दोन्ही गोष्टींची सोय करता येईल.

काही मिनिटातच निरोप समारंभाचं रूपांतर कार्यकारी समितीत झालं. जेवणानंतर गांधीजी घरी परतले, काय करायचं याचा त्यांनी विचार केला. मतदार सूचीत कोणाकोणाची नावं आहेत ते पाहिलं आणि दक्षिण आफ्रिकेतील आपला मुक्काम एका महिन्यानं लांबवायचा त्यांनी निर्णय घेतला.

**२**

यानंतर घटना एवढ्या वेगानं घडू लागल्या की श्वास घ्यायलाही फुरसत मिळत नसे. दादा अब्दुल्ला यांच्या घरी दुसऱ्या दिवशी (२६ जून) शेठ हाजी महम्मद यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. नाताळमधील सर्व भारतीय त्यांच्याकडे सर्वात मोठा नेता म्हणून पाहत असत. या सभेत शेठ दाऊद महम्मद, महम्मद कासम कमरुद्दीन, आदमजी मियाखान, ए. कोलांडवेल्लू पिल्ले, सी. लछिराम, रंगासामी पडियाची, आमद जिवा आणि पारसी रुस्तमजी हजर होते. त्याचबरोबर दादा अब्दुल्ला प्रतिष्ठानात काम करणारे माणेकजी, जोशी, नरसिंहराम आणि इतर काही कारकूनही त्या सभेत हजर होते. सार्वजनिक कार्याच्या सभेत सहभागी व्हायचा त्यांच्या आयुष्यातील हा पहिलाच थरारक अनुभव होता. कारकुनापासून सार्वजनिक कार्यकर्त्यापर्यंत झालेल्या पदोन्नतीमुळे त्यांना आपली उंची दोन इंचांनी वाढल्यासारखं वाटलं.

मतदार विधेयकास विरोध करायचा निर्णय घेण्यात आला व त्यासाठी स्वयंसेवकांची भरती करायचं ठरलं. मिशन शाळेचे मुख्याध्यापक सुभान गॉडफ्रे आणि डरबन न्यायालयातील दुभाष्या श्रीयुत पॉल यांच्या मेहनतीला प्रतिसाद देऊन अनेक भारतीय सभेत उपस्थित झाले होते. त्यांत बहुतांश भारतीय ख्रिश्चन होते. ते सर्व पुढं आले आणि त्यांनी स्वयंसेवक म्हणून आपलं नाव नोंदवलं.

गांधीजींनी त्यांना आपली योजना समजावून सांगितली. भारतीयांनी आतापर्यंत विधेयकाला विरोध न केल्यामुळे विधेयकाला त्यांची मूक संमती असल्याचा पुरावा मानण्यात आलं होतं. शक्य तेवढ्या सह्या घेऊन संसदेसमोर त्यांनी आपला विरोध नोंदवणं आवश्यक होतं. परंतु तिसरं वाचन दुसऱ्याच दिवशी होणार असल्यामुळे सर्वप्रथम त्या विधेयकाला लांबणीवर टाकायला लावणं आवश्यक होतं. त्यानुसार संसदेचे अध्यक्ष हेन्री एस्कॉम्ब, महाधिवक्ता आणि प्रधानमंत्री सर जॉन रॉबिन्सन यांना तारा करून या विधेयकासंबंधी तयार करण्यात येत असलेलं निवेदन तयार होऊन ते त्यांना पाठवण्यात येईपर्यंत विधेयकावरील पुढील चर्चा लाबणीवर टाकायची विनंती करण्यात आली.

२७ जूनला नाताळ विधानसभेचं अधिवेशन मतदान विधेयकावरील तिसऱ्या वाचनासाठी जेव्हा सुरू झालं तेव्हा प्रधानमंत्र्यांनी सभागृहाला सूचित केलं की संदर्भित विधेयकासंबंधी काही तारा आल्या असल्यामुळे आणि शासन घाईगडबडीत हे विधेयक पारित करू इच्छीत आहे असं कुणालाही वाटू नये म्हणून शासन या विधेयकाची चर्चा एका दिवसानं लांबणीवर टाकत आहे. हे विधेयक जनतेसमोर आधीच सहा आठवड्यांपासून आहे व याच कारणामुळे हे विधेयक अजून लांबणीवर टाकणं शक्य नाही असं ते म्हणाले. त्यानंतर सभागृहानं भारतीय आप्रवाशांबद्दलचं विधेयक - जे सभागृहाला आधीच सादर करण्यात आलेलं होतं - सभागृहाच्या समितीकडे पाठवायचं ठरवलं. बिन्स-मॅसन प्रतिनिधिमंडळानं दिलेल्या अहवालानुसार भविष्यात येणारे आप्रवासी पुन्हा करार केल्याशिवाय वा निवासी कर दिल्याशिवाय नाताळमधे राहू शकणार नाहीत ही व इतर काही दुरुस्त्या त्या विधेयकात करून पुढील वर्षी ते विधेयक सभागृहाला

सादर करावं असं ठरलं. अजून काही चर्चा झाल्यानंतर ते विधेयक विषय नियामक समितीकडे पाठवण्यात आलं.

त्यानुसार अध्यक्षांनी विधेयकाची चर्चा एक दिवसानं पुढं ढकलायला मान्यता दिली. त्यामुळे त्यांच्यात धीर आला. श्रेष्ठ-कनिष्ठ, लहान-मोठा हे कालबाह्य झालेले सर्व भेद विसरून खांद्यालाखांदा लावून ते एका सामान्य उद्दिष्टासाठी जेव्हा एकत्र आले तेव्हा त्यांना ऐक्याच्या शक्तीचं महत्त्व कळलं आणि विजयाची चव पहिल्यांदाच त्यांना चाखायला मिळाली.

गांधीजींनी सांगितलेल्या मजकुराप्रमाणे श्रीयुत ऑर्थर या सद्गृहस्थांनी निवेदनाची अंतिम प्रत तयार केली. त्या मूळ प्रतीतील मजकूर कोणी तरी सांगितला वा त्या प्रतीच्या मोठ्या, सुंदर आणि सुवाच्च अक्षरातील अजून चार प्रती वेळ वाचावा म्हणून एकाच वेळी तयार करण्यात आल्या. त्यातील एक प्रत वृत्तपत्रांसाठी होती. नंतरचं काम होतं सह्या गोळा करायचं. अनेक मोठ्या व्यावसायिकांनी त्यासाठी काम करायची तयारी दाखवली. ते आपल्या गाड्यांमध्ये वा भाड्यानं घेतलेल्या गाड्यातून, ज्यांचं भाडं त्यांनी स्वतःच दिलं, सर्वत्र हिंडले. इंग्रजीचं ज्ञान असलेले अनेक स्वयंसेवक रात्रभर काम करत फिरले. अशा रीतीनं रात्रीतून ५०० सह्या गोळा करण्यात आल्या व निवेदन पाठवण्यात आलं.

२८ जूनला शुक्रवारी सायंकाळी भारतीयांच्या निवेदनाचा विधानसभेत विचार होईल या अपेक्षेनं सभागृहातील प्रेक्षागृह 'तिथल्या माणसांच्या आठवणीप्रमाणे नखशिखांत पोषाख घातलेल्या अरब आणि हिंदू प्रेक्षकांनी पहिल्यांदाच तुडुंब भरलं होतं.' युरोपिअन प्रेक्षकांना मागं टाकून त्यांनी 'समोरच्या खुर्च्यांवरील जागा पटकावल्या' होत्या. त्यामुळे नंतर आलेल्या स्त्रियांसाठी केवळ मागेच जागा शिल्लक होत्या. तिथं 'त्यांची बसायची तयारी नसल्यानं त्यांना परतावं लागलं.' [*नाताळ मर्क्युरी*, जुलै ९, १८९४]

भारतीय विश्वस्त मंडळाविषयीच्या विधेयकासंबंधी विषयनियामक समितीचा अहवाल महाधिवक्ता ज्यावेळी सादर करत होते त्याचवेळी दादा महम्मद हाजी व वसाहतीतील ५०० भारतीय यांनी केलेला अर्ज डरबन बरोमधून निवडून आलेले सन्माननीय सदस्य श्रीयुत

ल्युखारस यांनी टेबलवर ठेवला. काही सह्या भारतीय लिपीत आहेत असा आक्षेप घेण्यात आल्यामुळे न्यायालयाचे दुभाष्या श्रीयुत पॉल यांनी त्यांचं लिप्यंतर करून दिलं. अशा प्रकारे दुरुस्त करण्यात आलेलं निवेदन स्वीकारण्यात आलं व सन्माननीय सभागृहाचे सदस्य श्रीयुत हलेट यांच्या प्रस्तावानुसार सर्वसामान्यांच्या माहितीसाठी ते निवेदन मुद्रित करायचा आदेश देण्यात आला. [*नाताळ मर्क्युरी*, जून २९, १८९४] सदस्यांना निवेदनाचा अभ्यास करायची संधी मिळावी म्हणून प्रधानमंत्र्यांनी मतदानविधेयकाचं तिसरं वाचन सोमवार २ जुलैपर्यंत पुढं ढकललं.

निवेदन वृत्तपत्रांतून प्रकाशित करण्यात आलं व एकूण त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. नाताळमधील प्रमुख दैनिक नाताळ मर्क्युरीनं लिहिलं, 'आपण मान्य करायला पाहिजे की भारतीयांनी निवेदनात त्यांचा दृष्टिकोन फार चांगल्या रीतीनं मांडला आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, जून २९, १८९४] विधानसभेवरही त्याचा फार चांगला ठसा उमटला.

असा प्रसंग उद्भवेल याची जाणीवच नसल्यामुळे या विषयासंबंधी पूर्णपणे अंधारात असताना आकस्मिकपणे निर्माण झालेल्या परिस्थितीतं पूर्वतयारी न करता उत्स्फूर्तपणे निवेदन तयार करण्यात येऊन त्याचा अंतिम दस्तावेज विश्वास बसणार नाही एवढ्या कमी वेळात ऐनवेळी तयार करण्यात आला होता. याचा विचार करता कोणतीही कसोटी लावली तरी तयार करण्यात आलेलं निवेदन निश्चितच उल्लेखनीय होतं असंच म्हणावं लागेल. विशेषणाची काटछाट केलेलं, सत्य आणि वास्तवावर आधारित, निंदानालस्ती वा रागाचा शब्दही नसलेलं, बौद्धिक सामर्थ्याच्या विलक्षण कौशल्याचं, स्पष्ट विचारांचं आणि धारदार युक्तिवादाचं त्या दस्तावेजातून दर्शन होत होतं. गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की कल्पनाही करता येणार नाही एवढ्या प्राचीन काळी अँग्लो-सॅक्सनांच्याही आधी भारतीयांनी मतदानाचा हक्क बजावलेला आहे व त्याचं दर्शन त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांतून होतं. सर हेन्री समर मेन यांनी पुराव्यानिशी सांगितलं आहे की 'भारतीय वंशाच्या लोकांना प्रातिनिधिक संस्थांचा कल्पना करता येणार नाही एवढ्या प्राचीन काळापासून परिचय आहे' आणि भारतीय ग्रामीण समाज जेवढा संघटित होता तेवढा ट्युटॉनिक मार्क 'संघटित वा प्रातिनिधिक होता असं म्हणता येणं

फार कठीण आहे.' लंडन येथील ईस्ट इंडियन असोसिएशनसमोर भाषण देताना चिझोम ॲनस्टे म्हणाले :

*शिक्षण व इतर प्रकारच्या माध्यमातून पूर्वेकडील लोकांना नागरी व सांसदीय प्रशासनासाठी तयार करायचा या देशातील आपण लोक प्रयत्न करतो तेव्हा आपण विसरतो की 'पूर्व' नगरपालिकांच्या पितृपदी आहे. पूर्व जेवढी प्राचीन आहे तेवढ्याच प्राचीन त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत.* म्हैसूर विधानसभा व डरबन ट्रेड कौन्सिल (पंचायत) ही हा मुद्दा स्पष्ट करणारी अगदी अलीकडची उदाहरणं आहेत.

१८९१ साली भारतात ७५५ नगरपालिका ८९२ स्थानिक मंडळं होती व त्यांचे २०,००० भारतीय सदस्य होते व नुकतंच भारताच्या विविध प्रांतात प्रस्तावित करण्यात आलेलं भारतीय परिषद विधेयक इत्यादी वास्तवाकडे लक्ष वेधत प्रार्थींनी आपला मुद्दा पुढं मांडत सांगितलं की भारतीयांचा मतदानाचा अधिकार म्हणजे 'त्यांना देण्यात आलेला असा अधिकार नाही की ज्याचा त्यांनी पूर्वी कधीच उपयोग केला नव्हता वा त्यांना माहीत नव्हता'. त्यामुळे हा मतदानाचा अधिकार बजावण्यास त्यांना 'अपात्र ठरवणारं बंधन भारतीयांसाठी अन्यायकारक होईल व ते जर आपल्या मातृभूमीत असते तर त्यांच्यावर असे निर्बंध कधीच लादण्यात आले नसते.'

भारतीयांना शिक्षण नसल्यामुळे मतदान अधिकाराचा योग्य उपयोग करायच्या भारतीय मतदारांच्या क्षमतेसंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता. त्यासंबंधात अर्जदारांनी पुराणमतवादी व प्रसिद्ध इंग्रज न्यायविद फ्रेड्रिक पिंकट यांची साक्ष काढली. भारतीय लोकांच्या अज्ञानाविषयी आणि प्रातिनिधिक सरकार चालवण्याच्या त्यांच्या पात्रतेविषयी व त्यापासून होणाऱ्या फार मोठ्या लाभाची जाणीव असण्याविषयी इंग्लंडमध्ये जी चर्चा चालू होती त्याविषयी श्रीयुत फ्रेड्रिक पिंकट म्हणाले होते की या देशात चाललेली ही चर्चा अतिशय मूर्खपणाची आहे

*कारण प्रातिनिधिक सरकारचा शिक्षणाशी काहीही संबंध नाही. सामान्य व्यवहारज्ञानाची त्यासाठी गरज असते. भारतीय जनतेला तेवढ्याच व्यवहारज्ञानाची देणगी मिळालेली आहे जेवढी आपल्याला मिळालेली आहे. आपण निवडणुकीच्या अधिकाराचा आणि प्रातिनिधिक*

*संस्थांचा उपयोग अनेक शतकांपासून करत आलो आहोत. तेव्हा आपल्याला शिक्षण वगैरे काहीही नव्हतं. त्यामुळे शिक्षणाच्या कसोटीचा अर्थ शून्य आहे. ज्यांना आपल्या देशाचा इतिहास माहीत आहे त्यांना आठवत असेल की २०० वर्षांपूर्वी आपला देश अंधश्रद्धांनी आणि अज्ञानानं भरलेला होता व तरीही आपल्याजवळ आपली प्रातिनिधिक संस्था होती.* [नाताळ विधानसभेला सादर करण्यात आलेलं भारतीयांचं निवेदन, जून २८, १८९४, वसाहत कार्यालय, नोंद क्र. १७९ खंड १८९. व्होट्स अँड प्रोसिडिंग्ज ऑफ पार्लमेंट ऑफ नाताळ. (*कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ ९५)]

सर जॉर्ज बर्डवुड यांनी जोरदारपणे प्रतिपादन केलं होतं की 'भारतीय जनता आपल्यापेक्षा मूलतः कमी प्रतीची नाहीं. परंतु जेव्हा आपण 'खोट्या मापदंडानं मोजमाप करतो, तेव्हा आपण आपल्यालाच फसवत असतो आणि बतावणी करतो की तेच मापदंड श्रेष्ठ आहेत.' भारतीयांच्या शेतीच्या कौशल्याबद्दल, त्यांच्या अद्वितीय कारखानदारीबद्दल, सार्वजनिक शिक्षणाविषयी त्यांना असलेल्या काळजीबद्दल आणि दयाळूपणा आणि आतिथ्याबद्दल सर थॉमस मन्रो यांनी भारतावर अतिशय सुंदर शब्दात स्तुतिसुमनं वाहिलेली आहेत. त्याचबरोबर 'अतिशय शिवीगाळ करण्यात आलेल्या आणि त्याहूनही जास्त गैरसमज पसरलेल्या भारतीयाबद्दल' प्राध्यापक मॅक्समुल्लर यांनी लिहिलं आहे की मला जर कोणी विचारलं की कोणत्या आकाशाखालील मानवी मनानं सर्वोत्तम आणि निवडक विकासाची देणगी आपल्याला दिली आहे, मानवी जीवनाच्या समस्यांचं अतिशय खोलवर चिंतन कोणी केलं आहे व त्यांच्यातील काहींचं असं उत्तर कोणी शोधून काढलं आहे की ते वाचून प्लेटो आणि कांटचा अभ्यास केलेल्या आपल्यासारख्या लोकांचंही लक्ष त्या उत्तराकडे वेधलं जावं तर मी भारताकडे बोट दाखवीन. [वरीलप्रमाणे]

अर्जदारांनी या सर्व आधारावर प्रार्थना केली की विधेयकावर पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये.

दुसऱ्या दिवशी मारिट्झबर्ग येथे गांधीजी आणि अजून तीन सदस्य असलेलं प्रतिनिधिमंडळ प्रधानमंत्री आणि महाधिवक्ता यांच्यासह आदरणीय सभागृहाच्या काही सन्माननीय सदस्यांना भेटायला गेलं. प्रतिनिधिमंडळाचं सौजन्यपूर्वक स्वागत करण्यात आलं व

त्यांचं म्हणणं शांतपणे ऐकून घेण्यात आलं. [महामहीम माननीय मॉक्विस ऑफ रिपन यांना भारतीयांनी दिलेलं निवेदन, जुलै १७, १८९४ वसाहत कार्यालय नोंद क्र. १७९, खंड १८९, (*कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ ११७)] परंतु काही सदस्यांना प्रार्थनेतील न्याय्य भूमिका पटत असली तरी त्यांचं म्हणणं होतं की निवेदन देण्यात फार उशीर झालेला आहे.

सर जॉन रॉबिन्सन यांनी विधानसभेत सांगितलं की मतदानाचा अधिकार हा विशिष्ट वंशाचा विशेषाधिकार आहे व कॉकेशस वंशाचा तो अतिशय मूल्यवान असा अधिकार आहे. भारतीय वेगळ्या वंशाचे असल्यामुळे त्यांना तो अधिकार देता येऊ शकत नाही या युक्तिवादावर मॅक्समुल्लर, मॉरिस, ग्रीन व इतरही अनेक लेखकांनी एकमुखानं आणि स्पष्टपणे दोन्ही वंश एकाच आर्य वंशातून वा अधिक नेमकेपणानं सांगायचं तर इंडो-आर्यन वंशातून निर्माण झाले असल्याचं निदर्शनात आणून देत प्रतिनिधी मंडळानं आपलं म्हणणं पुढं मांडत सांगितलं:

*आमच्याच देशाचे भावंड असलेल्या देशावर, जो देश आमचं त्या दृष्टीनं स्वागत करू इच्छीत नाही त्या देशावर आमचं सदस्यत्व लादायची आमची अगदीच इच्छा नाही. परंतु ठासून मांडण्यात आलेल्या असत्याच्या आधारावर करण्यात आलेल्या युक्तिवादाद्वारे आम्ही मतदानाला पात्र नाही असं सांगण्यात येत असल्यामुळे सत्य काय आहे हे आम्ही सांगितलं तर आम्हांला क्षमा करण्यात यावी.*

'भारतीयांना मतदानाचा अधिकार वापरायला सांगणं हा कदाचित त्याच्यावर क्रूर आघात होईल' असं विधान करून विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळी सर जॉन रॉबिन्सन यांनी कदाचित अहेतुकपणे भारतीयांच्या जखमेवर पुन्हा मीठ चोळलं. त्यावर अर्जदारांनी लिहिलं, 'आमचं हे निवेदन हे या विधानाला दिलेलं पुरेसं उत्तर आहे हे नम्रपणे आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छीतो.'

असं सांगण्यात येतं की काही सन्माननीय भारतीय मतदानाचा योग्य उपयोग करण्याएवढे नक्कीच हुशार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी मान्य केलं होतं. त्यावर अर्जदारांनी

विचारलं, 'तसं असल्यास सर्वसामान्य न्यायाच्या दृष्टीनं अशा प्रकारच्या भारतीयांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करणं कितपत उचित होईल ?'

प्रधानमंत्री पुढं म्हणाले होते की 'स्वतःला श्रेष्ठ वंशाचे समजणाऱ्या लोकांवर मतदानाचा अधिकार नसलेल्या लोकांशी शासन उदारपणे आणि न्यायानं वागत आहे हे पाहायची जबाबदारी आहे.' काळ्या ढगातील सोनेरी रेषेप्रमाणे असलेल्या या उद्गाराचं स्वागत करत निवेदकांनी पुढं लिहिलं होतं की आपलं भाषण आमच्या दृष्टिकोनातून आम्हांला कितीही अन्याय्य वाटत असलं *तरी या विधानातून न्यायाच्या, नैतिकतेच्या आणि त्याहूनही अधिक ख्रिश्चनत्वाच्या अगदी खऱ्या भावनेचं दर्शन होतं. या भूमीतील निवडक लोकात जोपर्यंत ही भावना दिसून येते आहे तोपर्यंत प्रत्येक गोष्टीबाबत न्याय केला जाईल या भावनेवरून आमचा विश्वास डळमळणार नाही.*

त्यांनी प्रार्थना केली की याच भावनेशी सुसंगती राखत या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक चौकशी समिती नामित करण्यात यावी आणि निःपक्षपाती आयोगानं निःपक्षपातीपणे भारतीयांना मतदानासाठी पात्र ठरवल्यास त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा. विधेयकासंबंधी आमचा जो समज आहे त्याप्रमाणे विधेयकाचं कायद्यात रूपांतर झाल्यानंतर 'नेटिव्हातील अगदी असंस्कृत नेटिव्हापेक्षाही भारतीय माणूस कमी प्रतीचा ठरेल. कारण नेटिव्ह शिकून स्वतःतील निवडणुकीसाठी पात्र ठरण्यासाठी असलेली उणीव दूर करू शकतो परंतु भारतीय तसं करू शकत नाही. असं दिसतं की हे विधेयक एवढं व्यापक आहे की ब्रिटिश सभागृहातील भारतीय सदस्य जरी इथं आला तरी तो इथं मतदानासाठी पात्र ठरणार नाही.' हेही एक असं कारण आहे की ज्यामुळे आम्ही चौकशी समितीची मागणी करत आहोत.

विधेयकाचं तिसरं वाचन व्हायच्या पूर्व संध्याकाळी डरबनमध्ये फिल्ड स्ट्रीटवरील मेसर्स दादा अब्दुल्ला आणि कंपनीच्या जागेत जवळपास शंभर प्रमुख भारतीयांची एक सभा भरली. त्यात राज्यपालांकडे एक प्रतिनिधिमंडळ पाठवायचं ठरलं. त्याचबरोबर विधेयकाचं दुसरं वाचन चालू असताना संसदेतील वादविवादाच्या दरम्यान टार्थम यांचा भारतीयांच्या प्रश्नाकडे पाहायचा

जो दृष्टिकोन होता त्यावरही जोरदार आक्षेप घेण्यात आला. तसंच भारतीयांच्या हिताची सर्व प्रकारच्या सांसदीय मार्गानं काळजी घेण्यासाठी एक राजकीय संस्था स्थापन करायच्या व तिच्यासाठी निधी गोळा करायच्या प्रश्नाची चर्चा करण्यात आली. तिला अनुकूल प्रतिसाद मिळाला. टाथॅम यांच्या वर्तनाविषयी निषेध नोंदवण्यासाठी मारिट्झबर्ग येथेही भारतीयांची एक सभा घेण्यात आली.

या सर्व विरोधानंतरही विधानसभेत विधेयकाच्या तिसऱ्या वाचनाची सुरुवात २ जुलैला करण्यात आली. या उपायांकडून असलेल्या लोकांनी विधेयकाचं समर्थन करायचा प्रयत्न केला परंतु ते समर्थन दुबळं असल्याचं मान्य करण्यात येऊनही विधेयक संमत करण्यात आलं.

त्यानंतर गांधीजी आणि इतर सहा लोकांचा समावेश असलेलं एक प्रतिनिधिमंडळ नाताळच्या राज्यपालांना भेटायला गेलं. ३ जुलैला त्यांनी सम्राज्ञीचे सन्माननीय प्रतिनिधी असल्याच्या नात्यानं राज्यपाल महोदयांना विनंती केली की ह्या विधेयकामुळे सम्राज्ञींची 'भारतीय प्रजा मतदानाच्या अधिकाराला कधीच पात्र ठरू शकणार नसल्यामुळे या विधेयकाला मान्यता देण्यात येऊ नये.' [नाताळच्या राज्यपालांना भारतीयांचं निवेदन, जुलै ३, १८९४, जावक क्र. ६२, हे निवेदन राज्यपाल हेली-हचिन्सन यांनी वसाहत मंत्री लॉर्ड रिपन यांना दिनांक १६ जुलै १८९४ला पाठवलं होतं. सोबत दोन सहपत्रे होती. (*कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ १०३)]

नाताळ विधानसभेला देण्यात आलेल्या या निवेदनासोबतच व्हेरुलम, रिचमंड रोड, माऊंट एजकॉम्ब आणि उम्गेनी येथूनही भारतीयांच्या निवेदनाला पाठिंबा देणाऱ्या तारा विधानपरिषदेला आल्या. परंतु त्या तारा सभागृहाच्या सदस्यांच्या माध्यमातून पाठवण्यात आलेल्या नव्हत्या त्यामुळे घटनात्मक प्रावधानाप्रमाणे सभापतींनी त्यांना विचारार्थ घ्यायला नकार दिला. परिणामी सभागृहानं न्याय आणि समतेशी सुसंवाद राखायच्या दृष्टिकोनातून विधेयक दुरुस्तीच्या आपल्या शक्तीचा उपयोग करावा अशी विनंती करणारा दुसरा एक अर्ज ४ जुलैला सन्माननीय श्रीयुत कॅम्पबेल यांच्या माध्यमातून करण्यात आला. भारतीयांना फार उशिरा जाग आली असा खालच्या सभागृहात जो टोमणा हाणण्यात आला होता त्याचा उल्लेख करत अर्जदारांनी सांगितलं की विधेयकाचं कायद्यात रूपांतर झालं तर त्याचे परिणाम अतिशय गंभीर

होतील. आमची प्रार्थना 'एवढी साधी आणि न्याय्य' आहे की फार उशीर झाल्याची अडचण सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना अर्जावर विचार करताना वाटू नये.

सुसंस्कृत देशातील संसदांमध्ये याहूनही कमी गंभीर परिस्थितीत समितीच्या पातळीवरून पुढं गेल्यानंतरही विधेयकांत दुरुस्ती करण्यात आल्याची वा ती फेटाळली गेल्याची उदाहरणं सापडणं काही कठीण नाही. हाउस ऑफ लॉर्ड्सनं आयरिश स्वराज्य विधेयक ज्या परिस्थितीत फेटाळलं त्याचा केवळ उल्लेख या बाबतीत आपले अर्जदार करू इच्छितात. उलटपक्षी मतदान दुरुस्ती विधेयक आज जसं आहे तसं पारित झाल्यास त्याचे परिणाम अतिशय गंभीर आणि व्यापक होतील. आज मतदार सूचीत नाव नसलेला कोणताही भारतीय, मग त्याची क्षमता कितीही मोठी असली तरीही तो मतदार होऊ शकणार नाही. आपल्या अर्जदारांचा विश्वास आहे की आपली सन्माननीय विधानपरिषद असा दृष्टिकोन स्वीकारणार नाही व त्यामुळे हे विधेयक पुनर्विचारासाठी विधानसभेकडे पाठवील. [नाताळ विधान परिषदेला भारतीयांचं निवेदन, जुलै ४, १८९४, (*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जुलै ५, १८९४)]

ह्या अर्जात विधानसभेच्या कामकाजाचा उल्लेख असल्यामुळे तो नियमबाह्य असल्याचा निर्णय देण्यात आला व त्याचीही आधीच्या तारांसारखीच गत करण्यात आली. ४ जुलैला विधानपरिषदेत ह्या विधेयकाचं घाईगडबडीत दुसरं वाचन संपवण्यात आलं.

हे कळताच भारतीयांनी ५ जुलैला परिषदेला दुसरा अर्ज पाठवला व तो दुसऱ्या दिवशी सन्माननीय विधानपरिषदेला सादर करण्यात आला. विधेयक कार्यवाहीत आलं तर त्यामुळे निर्माण होणारी विसंगती आणि नियमबाह्यता यांचं विवेचन करून त्याकडे त्या अर्जातून लक्ष वेधण्यात आलं. त्यातून दाखवण्यात आलं की (अ) या विधेयकाद्वारे लहरीनुसार पूर्वी ज्यांची नावं मतदार सूचीत होती त्यांची नावं मतदार सूचीत कायम ठेवण्यात आलेली आहेत. जेव्हा की नवीन आलेल्या माणसाची पात्रता तेवढीच वा त्याहूनही अधिक असली तरी, आतापर्यंत या सूचीत त्यानं आपलं नाव नोंदवण्याची जर काळजी घेतली नसेल तर त्याच्यासाठी या सूचीत नाव नोंदवायची दारं कायमची बंद करण्यात आलेली आहेत; (ब) काही भारतीयांच्या वडिलांना

मतदानाचा अधिकार असला तरी त्यांच्या मुलांना, मग तो मुलगा पात्रतेच्या बाबतीत वडिलांच्या पुढं गेलेला असला तरी, तो अधिकार मिळू शकणार नाही; (क) या विधेयकामुळे मुक्त भारतीय आणि करारबद्ध भारतीय यांना व्यावहारिक दृष्टीनं एकाच पातळीवर आणलेलं आहे; (ड) कोणत्याही कारणाशिवाय या विधेयकाद्वारे गृहीत धरण्यात आलं आहे की कोणताही भारतीय कोणत्याही काळात मतदानाच्या अधिकाराला पात्र नव्हता आणि भारतीय आणि युरोपिअन माणसात एवढं मोठं अंतर आहे की भारतीयाशी युरोपिअनांचा कितीही काळ संपर्क आला तरी तो मतदानाच्या अधिकाराला पात्र ठरू शकत नाही; (इ) सम्राटांच्या १८५८च्या घोषणेत गंभीरपणे अभिवचन देण्यात आलं आहे की ब्रिटिश सरकारवर भारतात वास्तव्य करणाऱ्या जनतेला तशीच वागणूक देणं बंधनकारक आहे जशी वागणूक ब्रिटिश सरकार साम्राज्याच्या इतर कोणत्याही भागातील जनतेला देते. या घोषणेच्या भावनेशी आणि शब्दांशी हे विधेयक विसंगत आहे कारण या विधेयकाद्वारे एका वर्गाच्या ब्रिटिश प्रजेत आणि दुसऱ्या वर्गाच्या ब्रिटिश प्रजेत मत्सरजनक भेदभाव करण्यात आला आहे. (फ) भारतीयांना त्यांच्या मातृभूमीत मतदानाचा अधिकार नाही या कारणास्तव त्यांना मतदानाचा अधिकार नाकारण्यात येत असेल तर राजेशाही असलेल्या रशियासारख्या देशात जिथं लोकांना मताधिकार नाही तिथल्या लोकांनाही मताधिकार नाकारण्यात यायला पाहिजे. [नाताळ विधान परिषदेला भारतीयांनी दिलेलं दुसरं निवेदन, जुलै ६, १८९४, वसाहत कार्यालय नोंद क्र. १८१, खंड ३८, (*कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ ११८)]

या सर्व कारणांसाठी आणि भारतीय लोक मतदानाच्या अधिकाराला पात्र आहेत काय व त्यांना जर मतदानाचा अधिकार देण्यात आला तर युरोपिअन मतदारांना ते गिळंकृत करतील की काय या प्रश्नाची चौकशी करण्याकरिता अर्जदारांनी चौकशी समितीची मागणी केली.

या प्रयत्नालाही आधीच्या प्रयत्नापेक्षा अधिक यश काही आलं नाही कारण विधेयकाच्या दुसऱ्या वाचनानंतर एका दिवसातच विधेयक समितीच्या पातळीवरून (५ जुलै) पुढं गेलं होतं. ६ जुलैला जेव्हा सन्माननीय सदस्य श्रीयुत कॅम्पबेल यांनी भारतीय अर्जदारांच्या अर्जाचा विचार करण्यासाठी विधेयकाचं तिसरं वाचन पुढं ढकलायचा प्रस्ताव मांडला तेव्हा अर्जाला उशीर

झाला आहे असं कारणं सांगून तो प्रस्ताव फेटाळण्यात आला. [महामहीम माननीय मॉक्विस ऑफ रिपन यांना भारतीयांनी दिलेलं निवेदन, जुलै १७, १८९४ वसाहत कार्यालय नोंद क्र. १७९, खंड १८९, (*कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी*, खंड १, पृष्ठ ११८)]

नागरीसेवेतील सर्व लोक युरोपिअन वंशाचे असावे हा प्रस्ताव संसदेच्या याच सत्रात समितीच्या पातळीवर संमितीचे अध्यक्ष श्रीयुत ह्युलेट यांच्या निर्णायक मतानं फेटाळण्यात आला होता. एकाच बैठकीत आशियातील लोकांचा मतदानाचा आणि ते कितीही कार्यक्षम असले तरी वसाहतीत नोकरी करायचा अधिकार काढून घेण्यात आला तर त्यामुळे ‘राजकीय वा सामाजिक परिस्थितीचा विचार न करता या लोकांचे सर्व मार्ग बंद करायचा सापळा रचण्यात आलेला आहे’ [*नाताळ विटनेस*, जून २८, १८९४] असा समज पसरेल असं वाटल्यामुळे ही लहानशी कृपा करण्यात आली होती हे नंतर उघड झालेल्या गुपितावरून कळलं. अमेरिकेत गुलामांची मुक्तता करण्यात आल्यानंतर त्यांना त्यांच्याच हालावर सोडून देण्यात आल्यामुळे गुलांमांची जी दुरवस्था झाली त्यामुळे इंग्लंडमधील लोकमत अतिशय क्षुब्ध झालेलं होतं. ‘गुलामगिरीविरुद्ध करण्यात आलेला संपूर्ण संघर्ष पुन्हा तर करावा लागणार नाही ना’ असा प्रश्न रिव्ह्यूमधील एका लेखातून विचारण्यात आला होता. एकाच वेळी भारतात आणि इंग्लंडमध्ये सनदीसेवेसाठी परीक्षा घेण्यात यावी अशा प्रकारचा श्रीयुत हर्बर्ट यांचा प्रस्ताव १८९३ साली पारीत करण्यात होता आला परंतु त्यावर कार्यवाही करण्यात ब्रिटिश सरकारला आलेल्या अपयशामुळे उडालेल्या गोंधळाचे प्रतिसाद दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रांपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे असं वाटायला लागलं होतं की याच वेळी भारतीयांना वसाहतीत नागरी सेवेसाठी अपात्र ठरवण्यात आलं तर त्याचा साम्राज्याच्या मंत्र्यांवर निश्चितच विपरीत परिणाम होईल. [*नाताळ विटनेस*, जून २८, १८९४] ही मदतही तात्पुरती ठरली. परंतु तरीही भारतीय युवकांना त्यामुळे आपली पात्रता सिद्ध करायची संधी मिळाली.

मार्च १८९८ साली वसाहतीच्या नागरी सेवा परीक्षेत पहिला भारतीय उत्तीर्ण झाला. तो होता सुभान गॉडफ्रेंचा मुलगा जी. व्ही. गॉडफ्रे. त्याच्या अभिनंदनाचा समारंभ डरबन येथील भारतीयांनी कॉंग्रेस हॉलमध्ये केला होता.

## ३

आतापर्यंत सुस्त असलेल्या समाजात एकाएकी निर्माण झालेल्या प्रतिकाराची ही नवीनच उद्भवलेली भावना पाहून नाताळमधील गोऱ्यांनी आणि वृत्तपत्रांनी एक प्रकारे धसकाच घेतला. विधेयकाच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळी सभागृहाच्या प्रेक्षागृहात एकाएकी वीस अरब नवागतांना 'उगवलेलं' पाहून प्रधानमंत्र्यांनी भविष्य वर्तवल्याप्रमाणे 'बंडखोरीचं' बीजारोपण होत आहे असं एका वृत्तपत्रानं भाष्य केलं. अरबांनी प्रेक्षागृहातील खुर्च्या ज्या 'उद्धटपणानं' आणि 'निगरगट्टतेनं' अडवल्या होत्या आणि अनेक युरोपिअन बायांनी त्यांना 'विनंती केल्यानंतरही त्यांनी त्या रिकाम्या करून देण्यास ज्या पद्धतीनं नकार दिला' होता ते पाहून दुसऱ्या एका वृत्तपत्रानं अरबांविरुद्धच्या रागाच्या झटक्यात त्याबद्दल खेद व्यक्त करत लिहिलं की काळसर रंगाचे हे प्रेक्षक सभागृहाच्या 'सशस्त्र रक्षकांच्या गरुड नजरेस' कदाचित पडले नसावे, नाही तर त्यानं सभागृहाचा योग्य सन्मान राखण्यासाठी भारतीयांना आपल्या 'पगड्या आणि टोप्या काढायला लावल्या असत्या' यात काही संशय नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जून २९, १८९४]

मतदान विधेयकात एक कलम असं घालण्यात आलं होतं की या कायद्याची कार्यवाही तोपर्यंत सुरू होणार नाही जोपर्यंत साम्राज्याची संमती याला मिळत नाही. याही गोष्टीला अनीष्टसूचक नकार समजण्यात आला आणि मंत्र्यांनी यासंबंधी काही पत्रव्यवहार केला आहे काय व असल्यास त्याचं स्वरूप काय याची 'विचारणा करण्यात यावी' असं सुचवण्यात आलं.

भारतीयांच्या प्रकरणी न्यायसंगत युक्तिवाद करणं शक्य न झाल्यामुळे गोरे वितंडवादावर उतरले. भारतीयांनी ब्रिटिश प्रजेप्रमाणे समान हक्काची जी मागणी केली होती तिचा उल्लेख करत *नाताळ मर्क्युरीनं* नवीनच सिद्धान्त विचारार्थ मांडला. भारतीय ब्रिटिश प्रजा आहे याचा अर्थ असा की 'ब्रिटिशध्वज सर्व प्रकाराच्या अन्यायापासून त्यांचं संरक्षण करील आणि व त्यांना जगातील शुद्धतम आणि न्याय्य पद्धतीची शासन व्यवस्था मिळवून देईल.' 'देशात वास्तव्य करणाऱ्या जनतेशी कोणतेही लागेबांधे नसलेल्या भारतीयांना देशातील जनतेच्या बरोबरीनं समान राजकीय सत्तेचा हक्क मिळवून देणं हा या पवित्र आणि महत्त्वपूर्ण शब्दांच्या अर्थ आहे

अशी कल्पना केली तर तो त्यांचा आत्यंतिक विपर्यास करणं होईल. [*नाताळ मर्क्युरी*, जुलै ६, १८९४] त्यांनी मान्य केलं की 'वसाहतीतील सर्व भारतीय जर श्रीयुत गांधींप्रमाणे उच्चशिक्षित असते व त्यांच्याप्रमाणे आमच्या भाषेचा व संस्कृतीचा सर्वांना पूर्ण परिचय असता तर प्रश्नाचा दृष्टिकोन 'एकदम बदलला असता.' परंतु *नाताळ मर्क्युरीनं* मान्य केलं की 'त्यांच्या योग्यतेचे फार कमी भारतीय असले' [*नाताळ मर्क्युरी*, जुलै ६, १८९४] तरी तशा भारतीयांसाठी, ते संख्येनं फार कमी असले तरी, विधेयकात त्यांच्यासाठी अपवाद करण्यात आलेला नाही. मतदान करायची सर्व प्रकारची योग्यता आणि पात्रता असलेले लोक वसाहतीत होते हे सत्य दृष्टीआड करणं शक्य नव्हतं; आणि सम्राटांच्या घोषणेनुसार त्यांना सर्व प्रजेप्रमाणे समान वागणूक द्यायचं अभिवचन देण्यात आलं होतं; व ते विदेशी आहेत या कारणास्तव, जसे की ते नव्हते, त्यांच्याशी भेदभाव करण्यात आला असता तर तोच युक्तिवाद जास्त नाही तरी तेवढ्याच प्रमाणात ट्रान्सवाल गणराज्यातील युटिलँडरांनाही लागू पडला असता. अखेरीस त्यांनी धारण केलेला नैतिकतेच्या वा न्यायाच्या आधारावर समर्थन करणारा मुखवटाही त्यांना टाकून देणं भाग पडलं व सरळसरळ मान्य करावं लागलं की युरोपिअन 'सत्ताधारी वंशाचे आहेत व त्यांच्या या श्रेष्ठतेमुळे त्यांना इतरांपेक्षा अधिक विशेषाधिकार आहेत. 'एकूण पाहता अर्जदारांनी आपली बाजू फार चांगल्या रीतीनं मांडली' हे मान्य करत युटिलँडरांचं प्रभावी मुखपत्र असलेल्या जोहान्सबर्ग येथील द स्टार या वृत्तपत्रानं लिहिलं :

*नाताळ.... ही युरोपिअन वसाहत आहे.... आणि.... भारतीयांना मतदानाचा अधिकार देणं म्हणजे.... कॉकेशिअन वंशाच्या राजकीय प्रभुत्वाचा लोप करण्यासारखं होईल.... ज्या युक्तिवादानं मंत्रिमंडळ स्वतःचं समर्थन करत आहे ती कारणं आमच्या स्वतःच्या सरकारच्या मित्रांनी दिलेल्या कारणांपेक्षा वेगळी नाहीत. या दोन प्रकरणात मुख्य अंतर हे आहे की नाताळमधे मतदानाच्या अधिकारापासून वंचित करण्यात आलेला वर्ग पौर्वात्यांचा आहे, आणि ट्रान्सवालमधे ते पाश्चात्त्य आहेत - हे जगाच्या इतिहासातील एक असं अंतर आहे की ज्याला* ***आगळंच महत्त्व आहे.*** [स्टारमधून *नाताळ मर्क्युरीत* उद्धृत, जुलै ७, १८९४, (ठळक अक्षरं माझी)]

गांधीजींच्या लक्षात आलं की शाब्दिक युक्तिवादाला आता जागा राहिलेली नाही. वाळूवर वादविवादाचे निष्फळ किल्ले रचण्यापेक्षा हा प्रश्न नैतिकतेच्या पातळीवर न्यायची आवश्यकता त्यांना जाणवली. नाताळ मर्क्युरीनं भारतीयांच्या अर्जावर भाष्य करताना लिहिलं होतं की भारताच्या ग्रामसमाजातील प्रातिनिधिक व्यवस्थेपेक्षा सांसदीय शासनपद्धती फार वेगळी आहे. व याचा पुरावा म्हणून *नाताळ मर्क्युरी*नं सर जॉर्ज चेन्सी यांच्या *नाईन्टीन्थ सेंचुरी* या पुस्तकाच्या आधारे सांगितलं की भारतीय ग्रामसमुदायाचं प्रातिनिधिक शासनव्यवस्थेशी काही घेणंदेणं नव्हतं, त्यांचा संबंध केवळ शेतीच्या मुदतीशी होता. त्या पत्राचा संदर्भ देत गांधीजींनी संपादकांना लिहिलं की ऐहिक पातळीवर प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू असतात हे मान्य आहे. परंतु त्याचबरोबर तुमच्या पत्रानं भारतीय आणि युरोपिअन यांच्यातील 'ओढूनताणून शोधलेल्या वा केवळ काल्पनिक भेदांवर' भर देण्याऐवजी त्यांच्यातील साम्यस्थळं शोधून त्यावर भर दिल्यास मानवतेची अधिक चांगली सेवा होणार नाही काय ? मतभेदांचं आणि शत्रुत्वाचं बीजारोपण करणं सोपं असतं परंतु 'त्याहून किती तरी उच्च आणि उदात्त' अशी एक गोष्ट तुमच्या आवाक्यात आहे, 'अशी गोष्ट की ज्यामुळे तुम्हांला केवळ मोठेपणाचीच प्राप्ती होणार नाही तर चांगुलपणाही तुमच्या पदरी पडेल आणि त्याहूनही मोठी गोष्ट म्हणजे ज्या राष्ट्राला बाराशे वर्षांपासून जुलूम आणि दडपशाहीनं चिरडण्याचा प्रयत्न करण्यात येत असूनही जे चिरडलं जाऊ शकलं नाही त्या राष्ट्राची कृतज्ञता तुम्हाला मिळेल.' ती गोष्ट आहे वसाहतीला भारत आणि भारतीयांबद्दल योग्य रीतीनं शिक्षित करायची. [*नाताळ मर्क्युरी*च्या संपादकांना गांधीजींचं पत्र, जुलै ११, १८९४] ही दोन्ही राष्ट्र ब्रिटिश साम्राज्याशी समान हितसंबंधांनी बांधली गेलेली आहेत व म्हणून या दोघात फूट न पाडता यांना एकत्र आणायचा प्रयत्न करणं हे आपलं कर्तव्य आहे.

हा मुद्दा गळी उतरला. नाताळ सरकारच्या मुखपत्रानं लिहिलं, 'आमच्या लोकात आणि भारतीयांत आमच्यामुळे मतभेदांचं आणि शत्रुत्वाचं बीजारोपण होत आहे याचा आम्हांला खेद आहे,' परंतु त्यापुढे त्यानं लिहिलं की यासाठी भारतीयच जबाबदार आहेत. त्यांनी जर पाश्चात्त्यांच्या रीतिरिवाजांचं पालन केलं असतं तर ही समस्या निर्माण झाली नसती. परंतु

त्यांनीच दाखवल्याप्रमाणे सर्व भारतीयांना कायमचं पंगू करण्यासाठी हे कारण पुरेसं नव्हतं. तो काही दूर न करता येण्यासारखा दोष नव्हता. त्यामुळे आशेची दारं उघडी राहिली. [*नाताळ मर्क्युरी*, जुलै १२, १८९४]

परंतु याचा अर्थ असा नाही की या दिशेनं त्यांनी केलेल्या प्रयत्नांना नेहमीच यश आलं. *टाईम्स ऑफ नाताळ*मधून विवेकबुद्धीला केलेल्या आवाहनाचा एकदम विपरीत परिणाम झाला. नाताळमधे भारतीयांना देण्यात येत असलेल्या गैरवर्तणुकीबद्दल भारतीयांनी लॉर्ड रिपनकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात *टाईम्स ऑफ इंडियात* एक लेख आला होता. *टाईम्स ऑफ नाताळनं* 'रामीस्यामी' नावाच्या लेखात त्या लेखातील मतांचं वर्णन 'धादांत असत्यानं भरलेली वायफळ बडबड' असं केलं होतं. 'कोट्यवधी लोकांनी भरलेल्या भारतात' निःसंशयपणे काही लोक अतिशय सुसंस्कृत, उच्च बुद्धिमत्ता असलेले आणि उदात्त चारित्र्याचे आहेत असं मान्य करून त्या लेखात पुढं लिहिण्यात आलं होतं की नाताळमधील भारतीय, काही अपवाद असण्याची शक्यता वगळता, अगदी वेगळे आहेत. ते 'आमच्या रक्तमासाचे जरी असले' तरी मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी ते अगदीच पात्र नाहीत.' या विधेयकामुळे भारतीयांना 'आफ्रिकेतील सर्वात रानटी लोकांच्याहीं' खालच्या पातळीवर नेण्यात आलं आहे या आक्षेपाचा उल्लेख करत *टाईम्स ऑफ नाताळ*नं पुढं लिहिलं होतं की 'भारतीयांनी लक्षात आणून दिलेली ही विसंगती दूर करण्यासाठी आफ्रिकी लोकांचाही मताधिकार काढून टाकण्यासाठी त्वरित कार्यवाही सुरू करण्यात यावी.' लेखाच्या शेवटी लिहिण्यात आलं होतं की वसाहतीतील लोकांना आपली वसाहत गोऱ्यांसाठी जर ठेवायची असेल तर *त्यांनी आपल्या राजकीय सत्तेवरील भारतीयांच्या वा काफिरांच्या आक्रमणाचा ताबडतोब आणि कठोरपणे बीमोड करायला पाहिजे. वसाहतीतील प्रत्येक काळ्या माणसाला गोऱ्या माणसांएवढंच संरक्षण मिळतं. यापेक्षा काळा माणूस रास्तपणे काही अधिक अपेक्षा करू शकतो असं आम्हांला वाटत नाही.* [*टाईम्स ऑफ नाताळ*, ऑक्टोबर २२, १८९४]

संपादकाला लिहिलेल्या पत्रातून या लेखाचा उल्लेख करत गांधीजींनी लिहिलं, 'स्पष्टपणे दिसते आहे की या लेखाचा 'रामीस्यामी' हा मथळाच मुळात गरीब बिचाऱ्या भारतीयांबद्दलच्या

'जाणीवपूर्वक घृणेनं भरलेला आहे'. गांधीजींनी संपादकांच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करत लिहिलं की ह्या संपूर्ण लेखात 'कारण नसताना भारतीयांना अपमानित करायचा' जो प्रयत्न करण्यात आला आहे तो अनावश्यक नाही काय ? 'भारतीयांमध्ये उच्च श्रेणीचे लोक आहेत' हे मान्य करत असतानाही गोऱ्यांबरोबर समान अधिकार नाकारायचा प्रयत्न करून मुळातील अपमानाच्या जखमेवर अजून मीठ चोळायचाच हा प्रयत्न नाही काय ? 'तुमचं जर असं मत असतं की भारतीय सुसंस्कृत नसून पशुतुल्य रानटी माणसं आहेत व त्या कारणास्तव तुम्ही त्यांना समान राजकीय अधिकार नाकारत आहात तर ती गोष्ट एकदा समजून घेण्यासारखी तरी झाली असती. परंतु ही निरुपद्रवी माणसं बुद्धिमान असली तरी आम्ही त्यांना पायतळी तुडवून अपमानित करायचा संपूर्ण आनंद लुटू शकतो असं दाखवणं तुम्हांला आवश्यक वाटलं असावं.' पुन्हा लंडनच्या ईस्ट एन्डला राहणारा एखादा माणूस अज्ञानांधःकारात आणि व्यसनात बुडालेला असला तरीही त्याच्यात स्वतंत्र इंग्लंडचा प्रधानमंत्री व्हायची क्षमता जर असू शकत असेल तर ज्यांच्यात बुद्धिमत्ता असल्याचं तुम्ही मान्य करता त्याच वंशाच्या लोकांना आणि त्याचेच बांधव असलेल्यांना संधी देण्यात आल्यास 'याच लोकांच्या भारतातील अधिक सुदैवी बांधवांप्रमाणे यांच्यातही भारतात राहणाऱ्या त्यांच्या बांधवांसारखी क्षमता निर्माण होऊ शकणार नाही असं का समजण्यात यावं?'

आफ्रिकी लोकांना मिळालेल्या मताधिकाराबद्दल भारतीयांनी तक्रार केलेली आहे वा त्यांचा तो वा तत्सम अधिकार काढून घेतल्यास भारतीयांना काही समाधान मिळेल असं समजणं हा भारतीयांच्या भूमिकेचा पूर्णपणे केलेला विपर्यास आणि विडंबन आहे. *'पात्र असणाऱ्या नेटिव्हांना मताधिकार मिळत असल्याचा भारतीयांना मुळीच खेद नाही. उलट नेटिव्हांना तो न मिळाल्यास भारतीयांना खेद होईल. त्यांचं केवळ एवढंच म्हणणं आहे की त्यांच्यात जर तेवढी क्षमता असेल तर त्यांनाही तो अधिकार देण्यात यावा.'* (तिरपी अक्षरं माझी) नेटिव्हांना वा भारतीयांना केवळ त्यांच्या काळ्या कातडीमुळे मतदानाच्या पवित्र अधिकारापासून वंचित करणं हा न्याय आहे काय, ख्रिश्चन तत्त्वज्ञानाशी हे सुसंगत आहे काय ? गांधीजींनी विचारलं. 'तुमची

धाव केवळ बाह्याकडे आहे. जोवर कातडी गोरी आहे तोवर तिच्या आत विष दडलेलं आहे की अमृत याची तुम्ही फिकीर करणार नाही. तुम्हाला ढोंगी धर्मगुरूनं.... केवळ ओठांनी केलेली प्रार्थना अधिक स्वीकार्य वाटते.... परंतु एखाद्या सामान्य खाणावळवाल्यानं अंतःकरणापासून केलेली प्रार्थना मात्र तुम्हांला भावणार नाही. आणि हेच ख्रिश्चनत्व आहे असा तुमचा समज आहे. तुम्ही असं समजायला मोकळे आहात, पण हे ख्रिश्चनत्व नाही.

*टाईम्स ऑफ नाताळ*चा दावा होता की 'वसाहतीतील प्रत्येक काळ्या माणसाला तोच न्याय' मिळालेला आहे.... 'जो गोऱ्यांना मिळतो.' परंतु हे सत्य नाही काय की नुकताच डरबनच्या महापौरांनी आयोजित केलेल्या मुलांच्या मेळाव्यातील मिरवणुकीत एकही काळा मुलगा दिसला नाही ? 'दीनदुबळ्या मुलांसाठी मी आहे ह्या येशूच्या वचनाशी हे कितपत सुसंगत आहे ?' अथवा ' 'दीनदुबळ्या' या शब्दाच्याआधी 'गोरे' हा शब्द लावून येशूचे शिष्य येशूच्या वचनात दुरुस्ती करू पाहत आहेत ?' त्यांनी अखेरीस अंतःकरणपूर्वक विनंती करत लिहिलं :

जर तो आमच्यात येईल, तर तो आमच्यातील अनेकांना म्हणणार नाही काय की 'मी तुम्हांला ओळखत नाही' ? वसाहतीतील रंगीत लोकांशी तुमची जी वागणूक आहे तिच्याबद्दल तुम्ही थोडा वेळ चिंतन कराल काय ? तसं चिंतन केल्यानंतर ती बायबलच्या विचारांशी वा उत्कृष्ट ब्रिटिश परंपरेशी सुसंगत आहे असं तुम्ही म्हणू शकाल काय ? तुम्ही जर बायबल वा ब्रिटिश परंपरेशी तुमचा संबंध तोडला असेल तर मला काही म्हणायचं नाही.... तुमच्याप्रमाणे विचार करणारे ज्या दिवशी अनेक लोक होतील तो दिवस इंग्लंड आणि भारतासाठी दुर्दिन असेल एवढंच मी म्हणेन. [*टाईम्स ऑफ नाताळ*च्या संपादकाला गांधीजींचं पत्र, ऑक्टोबर २५, १८९४, टाईम्स ऑफ नाताळमध्ये ऑक्टोबर २६, १८९४ला प्रकाशित]

घरातल्याच या अहेरानं मनातून अस्वस्थ होत टाईम्स ऑफ नाताळनं ती गोष्ट झटकायचा प्रयत्न करत लिहिलं की 'रामीस्यामी' हा शब्द आप्रवासी भारतीयांसाठी त्या अर्थानं योजण्यात आला आहे 'ज्या अर्थानं असंस्कृत ब्रिटिशांसाठी 'हॉज' हा शब्द योजण्यात येत असतो' व इंग्रजीचे विद्वान असलेल्या श्रीयुत गांधींना ही गोष्ट माहीत असायला हवी. संतापाच्या भरात गांधीजींच्या

विनवणीची त्यांनी 'विषादपूर्ण' आणि 'शिवराळपणाची' म्हणून वासलात लावली आणि 'ख्रिश्चन धर्माला विनाकारण यात ओढल्याबद्दल' व 'आपणच आपल्या देशबांधवांचे हितरक्षण करणारे आहोत' असं समजल्याबद्दल गांधीजींची निर्भर्त्सना केली. त्या लेखाचा समारोप जाताजाता मारलेल्या पुढील टोमण्यानं केला होता : 'या विद्वान सद्गृहस्थांना या दैनिकाशी याच पद्धतीनं पुन्हा संपर्क करायचा असेल.... तर सरळसरळ या वृत्तपत्राच्या जाहिरात विभागाशी संपर्क करून त्यांनी वेळ वाचवावा.' [*टाईम्स ऑफ नाताळ*, ऑक्टोबर २१, १८९४]

एव्हाना अशा प्रकारच्या अनुभवांचा स्वीकार खेळाचा एक भाग म्हणूनच करायचं गांधीजी शिकले होते. कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता त्यांनी आपलं कर्तव्य पार पाडलं होतं व त्याचंच त्यांना समाधान होतं. शांतपणे केलेल्या युक्तिवादामुळेही प्रतिपक्षाचा तोल सुटत असेल तर त्याला त्याच्या भूमिकेतील विसंगती लक्षात आली असल्याचं ते चिन्ह ठरतं. एकदा ही गोष्ट घडली की लवकर म्हणा वा उशिरा, बहुधा लवकरच, त्याच्या आवेगाची धार बोथट होणं अपरिहार्य आहे व मग त्याला उभं राहायला कोणताच आधार उरणार नाही.

## ४

नाताळ विधान परिषदेनं विधेयकाचं वाचन पुढं ढकलायला नकार दिल्यानंतर मतदान दुरुस्ती विधेयकाचं भवितव्य निश्चित झालेलं होत. त्या विधेयकाला सिंहासनानं मंजुरी देऊ नये अशी शिफारस सिंहासनाला वसाहत मंत्र्यांनी करावी ही विनंती करण्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग शिल्लक राहिलेला नव्हता. याचा अर्थ होता त्यांना त्यांचा लढा आता इंग्लंडमधेही लढावा लागणार होता. गांधीजींनी त्यासाठी तयारी सुरू केली.

इंग्लंडमधून पाठिंबा मिळवण्यासाठी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ब्रिटिश समितीशी संपर्क करून तिचा पाठिंबा मिळवणं आवश्यक होतं. कॉंग्रेसचं काम पुढं नेण्यासाठी इंग्लंडमध्ये प्रचार करणं आवश्यक असल्याची कल्पना श्रीयुत ए. ओ. ह्यूम यांनी १८८५ सालीच मांडली होती. त्यांचा पूर्ण विश्वास होता की भारतीयांशी ब्रिटिशांना न्यायानं व्यवहार करायचा आहे व एकदा

न्याय काय आहे हे त्यांना कळलं तर ते न्याय केल्याशिवाय राहणार नाहीत असं त्यांनी भारतीय नेत्यांच्या मनावर ठसवलं. त्यासाठी आवश्यकता होती ब्रिटिशांना 'अज्ञानातून निर्माण झालेल्या आशावादाची सुस्ती झटकायला लावण्यासाठी प्रयत्नांच्या पराकाष्ठेची'. [सर विल्यम वेडरबर्न, बार्ट, *ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ८४] परंतु त्यांच्या लवकरच लक्षात आलं की सिमल्यातील नोकरशाहीसमोर कोणतीही सुधारणा शक्य नाही. त्यासाठी इंग्लंडमधून प्रेरणा प्राप्त होणं आवश्यक होतं.

इंग्लंडमध्ये युरोपिअन अधिकाऱ्यांची चौकडी फार प्रभावी होती. १० फेब्रुवारी १८८९च्या पत्रान्वये ह्यूम यांनी काँग्रेसच्या नेत्यांच्या लक्षात आणून दिलं की भारत सरकारची *इंग्लंडमधील नोकरशाहीची परंपरा आणि त्यांचा पक्षपाती कल यांमुळे आमच्या मागण्या कशा न्याय्य आहेत ते समजावून घ्यायची त्यांची तयारी नाही. आपण काहीही म्हणालो तरी त्यांचं समाधान आपण करू शकत नाही.... आमच्या जनतेवर जो अन्याय होतो आहे त्याची ब्रिटिश जनतेला जाणीव करून देणं हाच एकमेव उपाय आता शिल्लक आहे.* [सर विल्यम वेडरबर्न, बार्ट, *ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम*, सी. बी., पृष्ठ ८४]

त्यामुळे काँग्रेसची एक ब्रिटिश स्थायी समिती इंग्लंडमध्ये स्थापन करणं आवश्यक आहे व ब्रिटिश जनतेला भारतीय प्रश्नांची जाणीव व्हावी म्हणून सतत प्रचार करता यावा याकरिता त्या समितीच्या कामकाजासाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात यावी.

त्यावेळी इंग्लंडमधे राहत असलेले दादाभाई नौरोजी यांनी १८८७ सालापासूनच काँग्रेसचे इंग्लंडमधील प्रतिनिधी म्हणून काम करायला सुरुवात केली होती. परंतु व्यवसायात व्यस्त असल्यामुळे काँग्रेसच्या कामासाठी ते फार कमी वेळ देऊ शकत असत. त्यांना कोणताच निधी पुरवण्यात आला नव्हता. आपल्या मर्यादित साधनानं आणि एकट्यानं त्यांना जे करता येणं शक्य होतं ते त्यांनी केलं. एका वर्षानंतर त्यांच्या कामात डब्ल्यू. सी. बॉनर्जी सहभागी झाले. त्या दोघांनी मिळून आपल्या कामासाठी संसद सदस्य चार्ल्स बॅडलॉ यांचा पाठिंबा मिळवण्यात यश मिळवलं. त्यानंतर स्पष्टवक्तेपणानं आणि आव्हानात्मक भाषेत लिहिलेल्या *प्रॉस्परस ब्रिटिश*

*इंडिया* या ग्रंथाचे लेखक सेवानिवृत्त ब्रिटिश भारतीय अधिकारी आणि विल्यम डिग्बी, सी. आय. ई. यांच्या हाताखाली एक नवीन एजन्सी उघडण्यात आली. तिचं कार्यालय २५, क्रॅव्हन स्ट्रीट, स्ट्रॅंड येथे उघडण्यात आलं व तिथं ब्ल्यू बुक्स आणि भारताशी संबंधित गॅझेटिअर्स तसंच भारतातील प्रमुख वृत्तपत्रे ठेवण्यात आली. अशा रीतीनं ते ठिकाण भारत विषयक अधिकृत माहितीचं केंद्र झालं होतं. त्या कार्यालयातर्फे ब्रिटनमधील दोन्ही पक्षांच्या विविध संस्थांशी आणि संघटनांशी संबंध प्रस्थापित करण्यात आला व ब्रिटिशांची भारतविषयक प्रश्नात रुची वाढवण्याचा शिस्तबद्ध प्रयत्न करण्यात आला. [आर. पी. मसानी, *दादाभाई नौरोजी : द ग्रँड ओल्ड मॅन ऑफ इंडिया,* जॉर्ज ॲलन ॲंड अलविन लि., लंडन, (१८३९), पृष्ठ ३०६-७]

या एजन्सीला कामकाजात मार्गदर्शन करण्यासाठी व तिच्या हिशेबावर लक्ष ठेवण्यासाठी एक वजनदार समिती २७ जुलै १८८९ला तयार करण्यात आली. तिच्या सदस्यात सर डब्ल्यू. वेडरबन (अध्यक्ष), दादाभाई नौरोजी, आणि कडवे मद्यपान विरोधक संसद सदस्य डब्ल्यू. एस. केन, डब्ल्यू. एस. ब्राईट व संसद सदस्य मॅकलर्न होते. त्या समितीचे सचिव डिग्बी होते. तिच्या कामकाजासाठी कॉंग्रेसनं ४५,००० रुपये मंजूर केले. ह्या समितीचं अधिकृत नाव 'ब्रिटिश कमेटी ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस' असं ठेवण्यात आलं.

त्यानंतर त्या समितीत संसद सदस्य जॉन एलिस, जॉर्ज यूल, डब्ल्यू. सी. बॉनर्जी, संसद सदस्य सर चार्ल्स शूमन, संसद सदस्य सर हर्बर्ट रॉबर्ट्स, डी. जी. क्लर्क, आणि मरियन वुड यांची भर घालण्यात आली. यातील जॉन एलिस हे कॅम्पबेल बॅनरमन यांच्या मंत्रिमंडळात १९०६ साली भारत मंत्री झाले.

सर वेडरबर्न हे जरी समितीचे अध्यक्ष होते तरी त्या समितीमागील खरी प्रेरणा दादाभाई नौरोजी यांची होती. परंतु ते स्वभावानं इतके निरभिमानी आणि मागेमागे राहणारे होते की एकदा दक्षिण आफ्रिकेतून डाक खर्च आणि किरकोळ खर्चाची काही रक्कम त्यांच्याकडे पाठवण्यात आली असता त्यांनी ती रक्कम परत केली आणि आणि कळवलं की ही रक्कम सरळ अध्यक्ष सर वेडरबन यांच्या पत्त्यावर पाठवण्यात यावी आणि यापुढील पत्रव्यवहारही त्यांच्याशी

त्यांच्याच पत्त्यावर करण्यात यावा. त्यांनी तिथल्या कामासाठी सर्व प्रकारची मदत करायचं आश्वासन दिलं. १८९२पासून सेंट्रल फिन्सबरीमधून निवडून जात असलेल्या दादाभाईंच्या नावानं सर्व भारतीय दिङ्मूढ व्हायचे. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय त्यांच्या संपर्कात १८९१पासून होते. गांधीजींनी आपल्या तरुण खांद्यावर महत्त्वपूर्ण जबाबदारी घेतलेली असल्यामुळे त्यांना दादाभाईंचे आशीर्वाद घेणं आवश्यक वाटत होत. दादाभाईंची राजकीय विद्वत्ता, त्यांचा स्वार्थत्याग व त्यांची एकनिष्ठ देशभक्ती या सर्व गुणांमुळे दादाभाईंबद्दल इंग्लंडमधे शिकत असल्यापासूनच गांधीजींच्या मनात भक्तिभावना होती. ५ जुलै १८९४ला गांधीजींनी दादाभाईंना लिहिलेल्या पत्रातून गांधीजींच्या विनम्र स्वभावाचं वैशिष्ट्यपूर्ण दर्शन होतं:

*मी अजून अननुभवी आणि तरुण आहे. त्यामुळे माझ्याकडून चूक होणं सहज शक्य आहे. माझ्या क्षमतेपेक्षा माझ्या खांद्यावर मी घेतलेली जबाबदारी किती तरी मोठी आहे. मी हे सर्व काम कोणत्याही प्रकारचा मेहनताना न घेता करत आहे हे मी या ठिकाणी सांगायलाच पाहिजे. त्यामुळे तुम्हांला आढळून येईल की माझ्या क्षमतेबाहेरील हे काम भारतीयांच्या जीवावर श्रीमंत होण्यासाठी मी अंगावर घेतलेलं नाही. हा प्रश्न हाताळू शकणारा इथं मी एकटाच भारतीय आहे. त्यामुळे आपण मला मार्गदर्शन करून उपकृत करावं अशी आपल्याला प्रार्थना आहे आणि आपण केलेल्या मार्गदर्शनाचा स्वीकार मुलानं आपल्या आईवडिलांच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करावा त्याचप्रमाणे करण्यात येईल असा आपण विश्वास बाळगावा.*

मतदान दुरुस्ती विधेयकामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचं वर्णन करत गांधीजींनी दादाभाईंना दक्षिण आफ्रिकेत स्वाभिमानाच्या आणि मूलभूत हक्कांच्या रक्षणार्थ सर्व प्रकारच्या विपरीत परिस्थितीत चाललेल्या लढ्यात रुची घ्यायची आणि मदत करायची विनंती केली: *मी अंतःकरणपूर्वक.... आपल्याला विनंती करतो की भारतीयांच्या वतीनं आपण आपल्या प्रभावाचा उपयोग करावा.... भारतीय लोक आपल्याकडे मुलानं वडिलांकडे पाहावं तसं पाहत आहेत.* [वरीलप्रमाणे]

५

तिसऱ्या वाचनानंतर विधानपरिषदेत ७ जुलैला विधेयक मंजूर करण्यात आलं. राज्यपाल ते विधेयक गृहमंत्रालयाकडे पाठवणार असल्याचं गांधीजींना कळलं होत. त्या विधेयकास सम्राटांनी मान्यता द्यावी अशी शिफारस गृहमंत्रालयानं करायची होती. त्यावर गांधीजींनी इतर सात भारतीयांच्या सह्यांसह राज्यपालांना पत्र लिहिलं व (१० जुलै १८९४) त्यातून वसाहत राज्य मंत्री लॉर्ड रिपन यांना पाठवण्यासाठी आपण अर्ज तयार करत असल्याचं कळवलं व तो अर्ज जोपर्यंत राज्यपालांना मिळत नाही तोपर्यंत ते विधेयक गृहमंत्रालयाकडे पाठवणं त्यांनी लांबणीवर टाकावं अशी राज्यपालांना विनंती केली. त्याच दिवशी त्यांनी दादाभाई नौरोजी यांना पत्र लिहिलं आणि कळवलं की पारित झालेल्या मतदान दुरुस्ती विधेयकात एक परंतुक असं आहे की या विधेयकाला नाकारायची महाराणींची इच्छा नाही असं राज्यपाल कळवत नाहीत तोपर्यंत या विधेयकाचं कायद्यात रूपांतर होऊ शकत नाही. त्याचबरोबर त्यांनी तयार केलेल्या अर्जाची एक प्रतही पाठवली. त्या अर्जावर ५,००० सह्या आधीच गोळा झालेल्या होत्या व एकूण १०,००० सह्या त्त्या अर्जावर घेण्यात येणार होत्या.

गांधीजींनी आपल्या आत्मकथेत लिहिलं की 'तो अर्ज तयार करण्यासाठी मी फार मोठी मेहनत घेतली होती.' त्या अर्जात गांधीजींनी उचललेला मुख्य मुद्दा असा होता की ज्या भारतीयांचं नाव आधीच मतदार सूचीत सामील आहे त्यांचं नाव त्या सूचीत कायम राहणार होतं. यावरून भारतीय मतदानासाठी पात्र नाहीत हा मुद्दा चूक असल्याचं सिद्ध होतं. नाताळ सरकारनं स्पष्टपणे जरी मान्य केलं नव्हतं तरी त्यांनी अपरोक्षपणे मान्य केलं होतं की भारतीयांचं मतदार सूचीतून नाव वगळण्याचं समर्थन केवळ राजकीय कारणावरूनच करता येऊ शकतं. भारतीयांना जर मतदानाचा अधिकार देण्यात आला तर ते युरोपिअन मतदारांना खाऊन टाकतील असा एक मुद्दा भारतीयांना मतदार सूचीतून वगळण्यासाठी शोधून काढण्यात आला होता. वसाहतीतील भारतीयांची आणि युरोपिअनांची संख्या जवळपास सारखी असली तरी मतदार सूचीत २५१ भारतीयांची नावं होती तर युरोपिअनांची ९,३०९ नावं होती यावरून ही भीती

किती निराधार होती ते कळत होतं. हे प्रमाण एकास अडतीस असं होतं. करारबद्ध मजूर कराराच्या कालावधीत असताना मालमत्तेसंबंधीची अट पूर्ण करू शकणार नव्हते व त्यानंतरही अनेक वर्ष त्यांना तसं करणं शक्य होणार नव्हतं. बरं जे लोक स्वतःच्या साधनानं वसाहतीत आले होते ते वसाहतीत कायम मुक्काम करणार नव्हते तर काही वर्षांनंतर ते आपल्या स्वतःच्या देशात परतणार होते व त्यांची जागा दुसरे भारतीय घेणार होते. त्यामुळे व्यापारी समाजाची जेवढी मतं होती ती कमीअधिक प्रमाणात तेवढीच राहणार होती.

ज्यांची नावं आधीच मतदार सूचीत आहेत त्यांना मतदानाचा अधिकार देणं आणि त्यांच्या वंशजांना त्यापासून वंचित करणं हे एका हातानं देऊन दुसऱ्या हातानं परत घेण्यासारखं आहे असं अर्जात दाखवण्यात आलं. याबद्दल सभागृहात उघडपणे सांगण्यात आलं होतं की कलम दोन अन्वये ज्यांची नावं मतदार सूचीत आहेत ती असली काय आणि नसली काय सारखंच आहे कारण काही दिवसांनी ही मतं नाहीशी होणारच आहेत.

ज्या बंधुआ मजुरांनी आणि त्यांच्या मुलाबाळांनी वसाहतीची मोलाची सेवा केलेली होती व कराराचा काळ संपल्यानंतर मुक्त भारतीय म्हणून जे इथं स्थायी झालेले होते त्या बंधुआ मजुरांना मतदानाच्या अधिकारापासून कायम वंचित करण्यात आल्यामुळे त्यांच्यावर मोठा अन्याय्य आणि क्रूर आघात करण्यात आलेला होता.

हे विधेयक दिसायला वरवर सामान्य होतं परंतु त्याचे पुढील परिणाम भयावह होणार होते. भारतीयांना नगरपालिकेतील मतदानापासूनही वंचित करण्यात यावं अशी ओरड आधीच सुरू झालेली होती. नाताळमध्ये भारतीयांना मिळणारी भेदभावाची वागणूक जर सहन करण्यात आली तर भारतीयांच्या दक्षिण आफ्रिकेच्या इतर भागातील परिस्थितीवरही त्याचा परिणाम झाला असता व मग अशी एक वेळ आली असती की स्वाभिमानी भारतीयाला तिथं राहणं शक्य झालं नसतं. त्यामुळे प्रार्थना करण्यात आली की सम्राज्ञींच्या प्रजेच्या एका वर्गाच्या हक्कात जो हस्तक्षेप करण्यात येत आहे त्याला ब्रिटिश सरकारनं मंजुरी देऊ नये.

प्रांतातील सर्व भागातून भारतीयांच्या सह्या गोळा करणं हे काही सोपं काम नव्हतं प्रत्येक सही करणाराला आपण कशासाठी सही करतो आहोत हे समजावून सांगितल्याशिवाय त्याची सही घ्यायची नाही असं ठरवण्यात आल्यामुळे तर हे काम अजूनच कठीण झालेलं होतं. खेडी दूरवर विखुरलेली होती. काम करणारे सर्व स्वयंसेवक होते व या कामासाठी ते सर्व नवखे होते. परंतु त्यांनी या कामासाठी स्वतःला तनमनानं झोकून दिलं होतं. दाऊद महम्मद, रुस्तमजी आदमजी, मियाखान आमद जिवा यासारखी शेठ मंडळी एकजीव होऊन काम करत होती. आपल्या खिशातून खर्च झाला तरी तो परत मिळायचा विचार त्याच्या मनाला स्पर्शही करत नसे. दाऊद शेठ आपल्या गाडीतून जवळपास दिवसभर हिंडत असायचे. त्यांच्या घराचं रूपांतर शब्दशः सार्वजनिक कार्यालयात झालं होतं. ते ठिकाण अशी धर्मशाळा झालं होतं की जिथं लोक यायचे, काम करायचे, झोपायचे आणि इतकंच नाही तर शेठच्याच घरी जेवायचेही.

एका पंधरवाड्याच्या काळात अशा रीतीनं १०,००० सह्या गोळा करण्यात आल्या व १७ जुलै १८९४ला रीतसरपणे राज्यपालांच्या माध्यमातून वसाहत राज्यमंत्र्यांना अर्ज सादर करण्यात आला. अर्जाच्या एक हजार प्रती वाटण्यासाठी आणि प्रसारासाठी छापण्यात आल्या होत्या. सर वेडरबर्न आणि भारताच्या इतर मित्रांना तसंच वृत्तपत्रांना त्याच्या प्रती पाठवण्यात आल्या होत्या. द टाईम्स ऑफ लंडन आणि टाईम्स ऑफ इंडिया यांनी नाताळमधील भारतीयांच्या अर्जाला भरघोस पाठिंबा दिला. मतदान दुरुस्ती विधेयकाचं वर्णन 'केवळ संकुचित वृत्तीचं आणि घटनाभंग करणारं' धोरण असं करण्यात येऊन हे विधेयक 'अन्याय्य, दडपशाही करणारं, आणि मागासलेपणाचं' असल्यानं शासनानं त्याला मान्यता देऊ नये अशी त्यांनी शासनाकडे जोरदार मागणी केली. [*टाईम्स ऑफ इंडिया*, ऑगस्ट २७, १८९४] नाताळमधील भारतीयांच्या परिस्थितीची भारतीय आणि ब्रिटिश जनतेला पहिल्यांदाच कल्पना आली होती.

काही दिवसानंतर गांधीजींनी दादाभाई नौरोजी यांना लिहिलं :

*नेटिव्हांवर शासन करण्यापासून आशियातील लोकांना अडवणं हे विधेयक पारित करण्यामागील एकमेव कारण आहे असं महाधिवक्ता श्रीयुत एस्कॉम्ब यांनी आपल्या अहवालात*

*सांगितलं. त्याचं कारण अगदी साधं आहे. त्यांना भारतीयांना अशा काही अपमानास्पद आणि अडचणीच्या अवस्थेत ठेवायचं आहे की ज्यामुळे भारतीयांना वसाहतीत राहायचीच इच्छा होऊ नये. परंतु तरीही त्यांचं भारतीयांशिवाय पूर्णपणे भागूही शकत नाही.... त्यांना बंधुआ मजुरांची अतिशय गरज आहे परंतु या बंधुआ मजुरांचा कराराचा काळ संपल्यानंतर त्यांनी भारतात परतावं अशी त्यांची इच्छा आहे. अगदी सिंहासारखी ही भागीदारी होती ! त्यांना हे माहीत आहे की ते असं एकदम करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी मतदान दुरुस्ती विधेयकापासून सुरुवात केलेली आहे ...*

त्यामुळे नेटिव्हांचं शासन युरोपिअनांकडून भारतीयांकडे जायचा बागुलबुवा उभा करण्यात आला. *साधी गोष्ट आहे की.... गृहमंत्रालयाला घाबरवण्यासाठी.... भारतीयांच्या मतांनी दोन तीन गोऱ्यांनी निवडून जावं अशी त्यांची इच्छा नाही कारण तसं झाल्यास ते भारतीयांच्या हितसंबंधाकडे संसदेत लक्ष देतील अशी भीती त्यांना वाटते. भारतीयांना मोडून टाकण्यासाठी कोणत्याही प्रकारचा विरोध न होता शासनाला काम करता यावं म्हणून हे पाऊल उचलण्यात आलेलं आहे.* [गांधीजींचं दादाभाई नौरोजी यांना पत्र, जुलै २७, १८९४ (गांधी निधी फोटोस्टेट क्र. २२५२)]

* * *

अर्धा जुलै संपलेला होता. नाताळमधील त्यांच्या वाढवलेल्या मुक्कामाची मुदतही संपत आलेली होती. लॉर्ड रिपन यांना निवेदन सादर केल्यानंतर गांधीजींना वाटायला लागलं की आता आपली जायची वेळ झालेली आहे. तशी परवानगी मागायला ते भारतीयांकडे गेले. परंतु संघर्षरत असलेल्या त्या भारतीयांची त्यांना तशी परवानगी द्यायची अगदीच तयारी नव्हती.

गांधीजींमागे लकडा लावत ते म्हणाले, ‘तुम्हीच आम्हांला सांगितलं आहे की मतदान दुरुस्ती विधेयक हे आपल्याला नष्ट करण्यासाठी उचललेलं केवळ पहिलं पाऊल आहे. आपल्या निवेदनाला वसाहत मंत्री अनुकूल प्रतिसादच देतील हे कशावरून. आमच्याजवळ उत्साह आहे, पैसा आहे. तुम्ही जर इथून गेलात तर आजवर जे करण्यात आलं आहे त्या सर्वांवर पाणी फिरेल. तुम्ही थांबणं हे आता तुमचं कर्तव्य आहे.’

पण हे कसं करायचं? त्यांच्याजवळ साधनं नव्हती. त्यांना वाटत होतं की आपण इथं थांबलो तर आपल्याला चांगल्या वस्तीत राहणं शक्य व्हायला पाहिजे आणि त्यांच्या तेव्हाच्या कल्पनेनुसार समाजाचा सन्मान वाढेल अशा पद्धतीचं जीवन जगता येणं शक्य व्हायला पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. हे सर्व करायला वार्षिक ३०० पौंडापेक्षा कमी खर्च येणार नव्हता. त्याचबरोबर सार्वजनिक कामाचा मेहनतानाही ते घेऊ शकत नव्हते. त्यांना वकिली कामकाजापासून किमान तेवढं उत्पन्न व्हायची शाश्वती भारतीय समाज देऊ शकत असेल तरच त्यांना तसं करणं शक्य होतं.

त्यांनी जेव्हा आपल्या मित्रांना ही गोष्ट सांगितली तेव्हा ते म्हणाले की याची काहीच आवश्यकता नाही, तुम्ही जे काही काम करताहात त्याचं मानधन म्हणून आम्ही एवढे पैसे तुम्हाला देऊ शकतो व वकिलीच्या कामकाजाचं जे उत्पन्न येईल ते तुमचं अजून वेगळं उत्पन्न होईल. परंतु गांधीजी आपल्या मतावर ठाम होते. गांधीजी त्यांना म्हणाले, ‘माझ्या इथल्या या कामात बॅरिस्टर म्हणून माझ्या कौशल्याचा फार कमी उपयोग आहे. माझं काम असेल तुम्हा सर्वांना काम करायला लावणं. आणि या कामाचे पैसे मी कसे काय घेऊ शकतो?’

गांधीजी त्यांना म्हणाले, ‘हे तुम्ही जे काही म्हणताहात ते उत्साहाच्या भरात आणि माझ्यावरील प्रेमामुळे म्हणताहात. या दोन्ही गोष्टींच्या खरेपणाबद्दल मला कोणताही संशय नाही. परंतु तुमचं हे प्रेम आणि हा उत्साह नेहमीसाठी कायम राहील याची काय शाश्वती काय आहे ? माझी जी काही कल्पना आहे त्यानुसार या संघर्षासाठी बराच खर्च येणार आहे. या कामातून मी पैसा मिळवत असताना तुम्हाला त्याग करायला मी कसा काय सांगू शकेन?’ अखेरीस निर्वाणीचं बोलत ते म्हणाले, ‘याशिवाय तुमचा मित्र आणि सेवक म्हणून मला काही वेळा तुमच्याशी कठोरपणानं वागावं लागेल. त्यावेळी माझ्याबद्दल तुम्हांला किती प्रेम वाटेल हे देवालाच माहीत. परंतु सत्य हे आहे की सार्वजनिक कामासाठी मी कोणताच पगार घेऊ शकत नाही. मी थांबावं म्हणून तुम्ही मला जे काम द्याल तीसुद्धा माझ्या सार्वजनिक कामाची मला मिळालेली देणगी आहे असं मी समजेन.’

त्याचा परिणाम असा झाला की जवळपास वीस व्यापाऱ्यांनी त्यांना एक वर्षासाठी आपलं कायद्याशी संबंधित काम दिलं. दादा अब्दुल्लांनी गांधीजींना जायच्यावेळी जी देणगी द्यायचं ठरवलं होतं त्यातून त्यांनी गांधीजींसाठी घर पाहिलं आणि आवश्यक फर्निचरची खरेदी केली. अशा रीतीनं नाताळमधील त्यांच्या वास्तव्याला सुरुवात झाली.

* * * * *